
# कस्तुरबा गांधी

## जीवन चरित्र

डॉ. विश्वास पाटील



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# कस्तुरबा गांधी जीवन चरित्र

प्राचार्य डॉ. विश्वास पाटील



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई - ४०० ०२५

एच-१७०
१

# कस्तुरबा गांधी जीवन चरित्र

**प्राचार्य डॉ. विश्वास पाटील**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई - ४०० ०२५

➢ **पुस्तकाचे नाव** : कस्तुरबा गांधी जीवन चरित्र

➢ **लेखक** : डॉ. विश्वास पाटील

➢ **आयएसबीएन** : ९७८-९३-९३५९९-७१-१

➢ **प्रथमावृत्ती** : २०२३

➢ **प्रकाशक** : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन** :

➢ **मुद्रक** : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी. पी. ओ. नजीक, पुणे - ४११ ००१.

➢ **किंमत** : रु. २३६/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अर्पण

प्रिय सौ. चंदू (चंद्रकला)
तू प्रपंचात तप्त उन्हाच्या झळा सोसल्यात.
मनाच्या गुलाबपुष्पाला कधी कोमेजू दिले नाहीस.
हलाहल पचवून निळकंठाच्या शिवत्वाला जपलेस.
हे लिहिताना सतत अंतरंग सोबत केलीस.
तुझे कृतज्ञ स्मरण अखेरच्या श्वासापर्यंत राहील.
कस्तुरचे हे जीवन चरित्र अर्थात् तुलाच.......

**विश्वास पाटील**

# अध्यक्षांचे मनोगत

महात्मा गांधीजींच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव टाकणाऱ्या महिलांमध्ये त्यांच्या साध्वी, भक्तिमती माता पुतळाबाई, त्यांच्या कृतनिश्चयी, समर्पणशील पत्नी कस्तुरबा यांच्यासोबत त्यांना राम महामंत्राचा प्रबोध देणाऱ्या दाई रंभाबाई यांचा समावेश होतो.

गांधीजी व कस्तुरबा यांचे दांपत्यजीवन परस्परपूरक व परस्परप्रेरक होते. कस्तुरबांनी शाळेचा उंबरठाही ओलांडलेला नव्हता. एक समर्पित गृहिणी, अग्रणी नेत्री, झुंजार स्वाधीनता सेनानी अशी त्यांची विविध रुपे आहेत. कस्तुरबांचे जीवन गांधीजींच्या जीवनाशी एकाकार झालेले होते. तरी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक आगळा-वेगळा कंद होता. आपल्या स्व व सर्वस्वाला तिलांजली अर्पून त्यांनी भव्य जीवनकार्याची उभारणी केली. कस्तुरबांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात कारावासापासून होते व आयुष्याची इतिश्रीही कारावासातच होते.

कस्तुरबांच्या चरित्र लेखन – प्रकल्पानिमित्त ही संधी प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांनी उपलब्ध करुन दिली आहे. या जीवनचरित्राचा पोत आंतरविद्याशाखीय आहे. यातून गांधीजी व कस्तुरबा यांच्या जीवनातील अनेक अज्ञात व अलक्षित पैलूंवर प्रकाशझोत टाकला गेला आहे. या संदर्भबहुत ग्रंथाची शैली काव्यात्म व मनोरम आहे. यातून भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या मंतरलेल्या काळाचे कृतज्ञ स्मरण घडते. या ग्रंथाच्या माध्यमातून मराठी मानस, साहित्य व संस्कृती समृद्ध होईल असा विश्वास वाटतो.

**सदानंद मोरे**

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

## प्रस्तावना

# परिमळामाजी कस्तुरी

जगाचा विचार करताना एकोणिसावे शतक मोलाचे आहे. विसावे शतक विशिष्ट आहे. एकोणिसाव्या शतकातील अखेरची दोन दशके महत्वाची आहेत. विसाव्या शतकातील आरंभीची दोन दशके लक्षणीय आहेत. हा चाळीस वर्षांचा काळ भारतातही महत्वाचा आहे. याला एक विशिष्ट संदर्भ आहे. एक पृथगात्म परिमाण आहे. एक टोकदारपणा आहे. हा काळ जागरणाचा आहे. पुनर्जीवनाचा आहे. पुनर्विचाराचा आहे. परंपरांना जोखण्याचा आहे. नवे काही निर्माण करण्याचा आहे. जुन्याची तपासणी करण्याचा आहे. या काळात विविध क्षेत्रात आकाशाशी स्पर्धा करणारी माणसे जन्माला आलीत. आपल्या जीवनाचा होम मांडून इतरांच्या जीवनात आनंद ओतणारी माणसांची स्पर्धा लागली. याचा आधार महिलांचे शिक्षण होता. पाश्चात्यांचा प्रभाव होता. आपला जीवनानंद होता. यातून मंथन झाले. नवे ज्ञान उपजले. विज्ञान-तंत्रज्ञान आले. यामुळे विचाराना झळाळी मिळाली. नव्या मनूचा विकास झाला. हा काळ समाज, शिक्षण, धर्म, राजकारण, साहित्य, अर्थशास्त्र यासारख्या नाना विषयात प्रगतीचा काळ होता. या काळात या विविध आघाड्यांवर क्रांतदर्शी पावले गतिशील झालीत. अनेक प्रसंगात पती-पत्नींच्या सामुदायिक सहकार्याच्या जाणीवेच्या पुसटशा खुणाही तपासता येतात. मुख्यत्वेकरुन भारतीय स्त्री पतिपरायण आहे. पतीला परमेश्वर मानणारी आहे. पती म्हणेल ती पूर्वदिशा मानून वाटचाल करणारी आहे. तिला आपले स्वत:चे मत फारसे नाही. तिचे मत असले तरी त्याचा जाणीवपूर्वक फार विचार नाही. तिला गृहीत धरुन चालण्याचाच एकूण काळ आहे. अशा काळात तिच्या शिक्षणातून जागरण आले. परिवर्तन आले.

या काळात पत्नीने पतीसाठी सर्वस्व अर्पण केल्याच्या कथा आहेत. पतीला बळ पुरवणाऱ्या कथा आहेत. त्याची सावली बनून जगण्याच्या कथा आहेत. त्याला प्रेरणारुप ठरण्याच्या कथा आहेत. त्याच्यासाठी स्वजनांना दूर लोटण्याच्या कथा तर अनंत आहेत. पतीलाही तिच्या ठायी स्फुल्लिंगाचे दर्शन घडले आहे. अनेकदा पतीने ते अमान्य केले आहे. कधी जबरदस्तीपूर्वक मान्य ही केले आहे. मनाशी मान्य केलेल्या पत्नीच्या या महात्म्याचा जाहीरपणे घोष केल्याची फार उदाहरणे मात्र नाहीत.

या पार्श्वभूमीवर आपल्या व्यक्तिमत्वाची एक अनोखी ओळख सांगणारे दांपत्य भेटते. ते जन्माला आले गुजरातेत. प्रभाव जगावर टाकला. एक युग घडवले. इतिहासाची एक नवी मीमांसा मांडली. पती ज्ञानाच्या शिखर पदवीला स्पर्श करुन आलेला. विलायतेत शिक्षणासाठी गेलेला ज्ञानसाधनारत. पत्नी अशिक्षित. बालपणीच विवाह झालेला. पतीने पत्नीला शिकवण्याचे भरपूर प्रयत्न केलेत. ते अयशस्वी ठरलेत. पत्नी भावसार्थक होती, भावसाक्षर तर खचितच होती. परंपरेने आलेल्या वैष्णव धर्ममतात दीक्षित होती. गृहकृत्यदक्ष होती. सुगरण होती. चतुर होती. ठाम होती. निर्णय घेऊ शकणारी होती. आपल्या निर्णयाबद्दल आग्रही होती. तिनेही पतीसोबत देश ओलांडला. विदेश पाहिला. चळवळ पाहिली. चळवळीत सहभाग नोंदवला. तुरुंगाच्या भयद आठवणी ऐकल्या. साक्षात् तुरुंगवास पत्करला. या पार्श्वभूमीवर हे दांपत्य विशिष्ट आहे.

गांधीजींना जगभर मान - मान्यता लाभली. कस्तुरबाला जगाने वंदन केले. हे काही एका क्षणभरात झालेले घटित नव्हते. यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा झाली. कस्तुरबाचे जीवन व क्षेत्र कमालीचे मर्यादित होते. तिला आपल्या घरट्यातून आकाश बघायचे होते. तिचे तसे प्रयत्न होते. गांधीजींचे मत आणि मन गगनविहारी होते. यामुळे ती प्रभावित झाली. तिलाही आकाशात तरंगत राहून घरट्याची निगा राखायची दीक्षा मिळाली. तिची मातृभाषा गुजराती होती. तिने हिंदी भाषेतून संवाद

साधायची कला शिकून घेतली. प्रसंगी आपल्या खास भारतीय शैलीतल्या इंग्रजी भाषेचाही आधार घेतला. काळाने तिच्या इंग्रजीच्या व्याकरणसंमत आणि भाषाशास्त्रीय रुपाची कधी चर्चा-चिकित्सा केली नाही. ती मुक्त होती बरसत्या गगनधारांसारखी. ती घनव्याकुळ होती श्रावणसरींसारखी. तिने दुसऱ्याच्या दु:खाला स्वत:चे दु:ख मानले. आपला तो आपला पण परका तोही आपला अशी जीवनसाधना विकसित केली. तिला स्पृश्यास्पृश्य भावाचे स्मरण होते. भान होते. आग्रहही होता. गांधीजींच्या सोबत ती चालत राहिली. तिचा वैष्णव धर्म व्यापक बनला. तिच्या वैष्णव धर्माच्या छत्रछायेखाली सारेच सामावले. एकत्र आले. एक झालेत. एकमेक झालेत. तिने वैयक्तिक भावसंदर्भाला सामुदायिक जगण्याचे परिमाण अर्पण केले.

एका धनंतर परिवारात तिचे पोषण झाले. राजपरिवारात तिचा विवाह झाला. तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल होते. ते तिने उल्लंघिले. ज्या काळात पुरुषांनाही समुद्र ओलांडण्याची समाजाने मनाई केली होती. खुद्द गांधीजींना जात पंचायतीने बहिष्कृत ठरवले होते. त्या काळात तिने आपल्या छोट्या लेकरांच्या सोबत सागर लंघनाचा प्रयोग केला. ती दबून गेली नाही. प्रभावित होऊन शांत बसून राहिली नाही. तिच्या आत्मतेजाने तिला सतत देदिप्यमान केले. ती सतत नव्याच्या ओढीने विकसत राहिली. तिला रामायण भावले. भागवताच्या कथात्मक संहितेने मोहिनी घातली. ती गीतेच्या गर्भगृहाच्या महाद्वाराप्रत जाऊन पोहोचली. तिथले परमगुह्य समजून घेण्याची धडपड केली. वाचण्यापेक्षा जगण्यावर तिचा अधिक भर होता. ती गांधीजींच्या प्रयोगशाळेत सामावली. कधी उपकरण बनली. कधी प्रयोगनलिका बनली. कधी प्रमेय बनली. कधी सिध्दांत बनली. तिने या सर्वांचा मध्यबिंदू तपासून बघितला. मध्यबिंदूला भेदून परिघापर्यंत पोहोचणारा व्यास बनली. ती प्रत्यक्षात जगली. ती प्रत्यक्षाला सामोरी गेली. तिचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे जीवनस्पर्शी होते. तिने जीवनातून जीवन वाचले. ती जीवनाच्या पाठशाळेत शिकली. तिने जीवनाला समजून घेतले. या आधारे ती आपल्या राग-लाभ-लोभांच्या इयत्ता ओलांडताना दिसते. तिच्या ठायी दोष नाहीत असे नाही. तिच्या मर्यादा नाहीत असे नाही. ती सारे काही आकळून घेणारी आहे.

गांधी आणि कस्तुर पुढे अभिन्न मित्र बनले. एकमेकांविषयी निर्विकार बनले. नवऱ्याची नाना दुखणी तिने पाहिली. मनाच्या तळापासून सेवा बजावली. सेविका बनली. पुढे नवऱ्याला बायको जीवनसंगिनी वाटू लागली. सहचारिणी वाटू लागली. सोबतीण वाटू लागली. मैत्रिण वाटू लागली. सहधर्मचारिणी वाटू लागली. ती केवळ भोगविलासाचे साधन नाही. ती उन्नतीचा झरा आहे. ती कुठलाही हुकूम पाळणारी दासी नाही. ती स्वतंत्र विचारांची मालकीण आहे. तिला देह आहे. तसे मन आहे. बुध्दी आहे. विचार आहे. तिला निर्णय घेता येतो. ती स्वतंत्र बाण्याची आहे. हे गांधींना कळले. यातून एक समंजस धारा वहाती झाली.

कस्तुरबा केवळ सहगामिनी नव्हती. ती सहधर्मिणी बनली. ती केवळ सोबत चालणारी नव्हती. सहधर्मचारिणी होती. अनेक निर्णयांबाबत ती तर्जनी उंचावत राहिली. तिचा हात नकार दर्शवत ठामपणे उभा रहायचा. आपली चूक झाली. तिने ती निरलसपणे मान्य केली. ती सामान्य गृहिणी होती. असामान्य आई बनली. बायको बनून आली होती. आई बनून जगली. गांधीजी विचार करत राहिले. ती तो विचार जगत राहिली. ती केवळ गांधी-ग्रंथाच्या समासातील नोंद नव्हती. तळटीप नव्हती. काकपदासोबत येणारा मजकूर नव्हती. गाळलेली जागा नव्हती. अनेकदा ती स्वगत बनली. अनेकदा कंसातील सूचना बनली. तिचे स्वतंत्र विचार विश्व होते. तिचे आपले म्हणून काही आदर्श होते. नवऱ्याचे सारे वागणे तिला आवडत नसेल. नसेल म्हणजे नसायचे. ती सहन करायची. तिने सदा नवऱ्याची पाठराखण केली. तिला आवडो वा न आवडो. तिने नवऱ्याचा पंथ धरला. रुचो वा न रुचो गांधीजींच्या आवडी-निवडींना आपले मानले. तिला कळो वा न कळो गांधीजी बोलतात ते खरे असे ती मानत राहिली. कस्तुरने गांधीजींच्या कठोर दुराग्रह आणि प्रचंड प्रकोपाच्या विषाचे नि:शब्द प्राशन केले आहे. ती स्वाभिमानी महिला होती. तिने नवऱ्याचा सर्वांगीण विकास आणि साधना अनुभवली होती. या साधनेत आपले मूक पण संपूर्ण योगदान अर्पिले होते. ती गांधींच्या शक्तीची आदिस्रोत

होती. गांधींनी जगभरातल्या विषाचे प्राशन केले होते. कस्तुर त्या विषाला शोषून घेऊन अमृत परत करणारी महादेवी होती. तिच्या सहकार्याच्या अभावी गांधी कदाचित दुर्वासा बनले असते. त्यांच्या क्रोधाग्नीला संयमित-सीमित-शमित करायचे श्रेय कस्तुरला जाते.

गांधी आणि कस्तुरची ही कहाणी आहे. ही जगाला नवा उजेड दाखवते. एकोणिसावे शतकाचे सातवे दशक संपत होते. कस्तुर नावाची मुलगी जन्माला आली. विसाव्या शतकाच्या मध्यबिंदुपर्यंत ती चालत राहिली. तिच्या आयुष्यात गांधीजी आले. ही कहाणी गांधीजींची आहे. कस्तुर त्यांच्या आयुष्यात सामावलेली आहे. यामुळे ही कथा कस्तुरचीही आहे. गांधीजी आणि कस्तुर दंपती. ते जगावेगळे जीवन जगले. एकमेकात सामावून गेले. त्यांनी एकमेकांना उत्क्रांत केले. एका ऊर्ध्वारोहणाची ही कहाणी आहे.

या ग्रंथासाठी गांधी रिसर्च फाउण्डेशन, जळगाव येथील आदरणीय अशोकभाऊ जैन यानी महाभिलेखागारातून कस्तुरबांशी संबद्ध अनेक दुर्मिळ छायाचित्रे उपलब्ध करून दिलीत. गांधी तीर्थ येथील प्रिय सर्वश्री उदय महाजन, डॉ. अश्विन झाला, ग्रंथपाल अशोक चौधरी व भूषण मोहरीर यांनी खूप सहाय्य केले. मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी विविध ग्रंथांमधून कावडी भरभरून घेतल्या, हे सारे ऋण खूप मोलाचे आहे. त्यातून उतराई होता येणे शक्य नाही. ज्ञात अज्ञात सर्वांचेच खूप आभार मानतो.

***- प्राचार्य डॉ. विश्वास पाटील***
*३० जानेवारी २०२१ गांधी पुण्यतिथी*

❖❖❖

# अनुक्रमणिका


| क्र | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **अध्यक्षांचे मनोगत** | | सात |
| **प्रस्तावना: परिमळामाजी कस्तुरी** | | नऊ |
| **ऋग्वद** | | |
| १ | जगदंबा! | १८ |
| २ | इतिहासाचा मागोवा! | २० |
| ३ | शुभ्र नगरी पोरबंदर! | २४ |
| ४ | दैवते माय-तात! | २६ |
| ५ | बालविवाहाचा दंश! | २९ |
| ६ | कस्तुर सासरी निघाली! | ३३ |
| ७ | प्रतिबंधांचे कुंपण | ३५ |
| ८ | नवरेपणाचा अधिकार | ३९ |
| ९ | सेवाव्रती परिचारक! | ४२ |
| १० | प्रेयाकडून श्रेयाकडे! | ४५ |
| ११ | ज्ञाती बहिष्कृतीचा बडगा! | ४८ |
| १२ | दोन संघर्षशील महिला | ५० |
| १३ | नवरा विलायतेच्या वाटेवर! | ५२ |
| १४ | भयव्याकुळ विव्हळ पक्षिणी! | ५४ |
| १५ | कस्तुरची तपश्चर्या आणि मोहनदासची प्रतिज्ञा! | ५९ |
| १६ | मोहनदासचा विलायतेला निरोप! | ६२ |
| १७ | अहिंसा गुरु कस्तुर! | ६४ |
| १८ | गृहकृत्यदक्ष कस्तुर! | ६६ |
| १९ | घन तमी शुक्र | ६८ |
| **यजुस** | | |
| १ | विरह योग | ७० |
| २ | दक्षिण आफ्रिकेच्या वाटेवर | ७४ |
| ३ | दक्षिण आफ्रिका: एक ओळख | ७७ |
| ४ | भारतीय मजूरांचे पहिले जलपोत | ७९ |
| ५ | गिरमिटे गुलाम की शत्रु? | ८१ |

| क्र | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६ | नकोसा पाहुणा | ८३ |
| ७ | वाट बघून डोळे शिणले | ८६ |
| ८ | हिंदजनांच्या मताधिकारावर कुऱ्हाड | ८९ |
| ९ | डर्बनमधले घर | ९१ |
| १० | कस्तुरचे दक्षिण आफ्रिकेकडे प्रयाण | ९७ |
| ११ | दुसऱ्या वादळाची पूर्वतयारी | १०१ |
| १२ | कांचनमृगाचा चकवा | १०६ |
| १३ | मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न | १०९ |
| १४ | चल, निघ माझ्या घरातून | १११ |
| १५ | कस्तुरची कसोटी | ११४ |
| १६ | कस्तुर मायदेशी परत | ११७ |
| १७ | गांधी परत डर्बनला | १२० |
| १८ | कस्तुरचा दुसरा सागर प्रवास | १२२ |
| १९ | या रे या रे, सारे या | १२५ |
| २० | फिनिक्स आश्रम | १२८ |
| २१ | टॉल्स्टॉय फॉर्म | १३१ |
| २२ | कस्तुरचा कायापालट | १३४ |
| २३ | घायाळांसाठी सेवा पथक | १३७ |
| २४ | ब्रह्मचर्याचा निश्चय | १४० |
| २५ | पाऊल एक पुरेसे मजला | १४३ |
| २६ | गांधींचे कस्तुरला ऐतिहासिक पत्र | १४६ |
| २७ | कस्तुरचे आजारपण | १४९ |
| २८ | कस्तुरवर शस्त्रक्रिया | १५३ |
| २९ | प्रयोगवीर नवरा आणि कस्तुरची सेवा | १५५ |
| ३० | थकवणारा अध्याय | १५९ |
| ३१ | पहिली महिला सत्याग्रही | १६४ |
| ३२ | कस्तुर तुरुंगात | १६८ |
| ३३ | निरवा निरव | १७१ |
| ३४ | तडजोड झाली | १७४ |
| ३५ | सत्कार समारंभ आणि मानपत्रांचा वर्षाव | १७६ |
| ३६ | वैष्णवजन कस्तुर | १७८ |

| क्र | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **सामवद** | | |
| १ | प्रयोगवीराच्या कर्मक्षेत्रात | १८२ |
| २ | सत्याग्रहाश्रमाची स्थापना | १८६ |
| ३ | दयेची देवी | १९२ |
| ४ | खेडा जिल्ह्यात कस्तुर | १९८ |
| ५ | हरीलाल | २०१ |
| ६ | मणीलाल, रामदास आणि देवदास | २०६ |
| ७ | साबरमती आश्रमात कस्तुरबा | २१४ |
| ८ | समरांगणात रणरागिणी | २१८ |
| ९ | खादीव्रती कस्तुरबा | २२१ |
| १० | गांधीजींची माता : कस्तुरबा | २२३ |
| ११ | शेळीचे दूध | २२६ |
| १२ | कस्तुरबाचे राग-लोभ | २२९ |
| १३ | आत्मप्रत्ययी कस्तुरबा | २३३ |
| १४ | घरात चोर | २३६ |
| १५ | चळवळीत अग्रणी | २३८ |
| १६ | महाप्रस्थान | २४१ |
| १७ | जीवनाभिमुख कस्तुरबा | २४६ |
| **अथर्ववद** | | |
| १ | हृद्य पत्र-व्यवहार | २५० |
| २ | साबरमतीच्या मध्यवर्ती तुरुंगात | २५३ |
| ३ | पायी शृंखला, ओठी मुक्तीगीत | २५८ |
| ४ | मगनवाडी आणि सेवाग्राम | २६८ |
| ५ | सेवाग्राम आश्रम विहारिणी | २७३ |
| ६ | गांधी उपोषण समयीची कसोटी | २८२ |
| ७ | परिव्राजक माऊली | २८९ |
| ८ | मंगल प्रवचने | २९७ |
| ९ | कस्तुरबाच्या मनाची मशागत | ३०४ |
| १० | दांपत्य भाव-संबंधांच्या मनोहर छटा | ३०९ |

| क्र | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ११ | ईश्वराच्या दिशेने ! | ३१६ |
| १२ | घायाळ मातेची हाक | ३१९ |
| १३ | जगन्नाथ मंदीर आणि कस्तुरबा | ३२४ |
| १४ | अहिंसा गुरु | ३२६ |
| १५ | समरांगणी बिजली तळपली | ३२८ |
| १६ | ब्रह्मचर्य प्रयोगात साथीदार | ३३५ |
| १७ | येरवडा तुरुंगात | ३४० |
| १८ | करेंगे या मरेंगे | ३४२ |
| १९ | सत्यवानाची सावित्री | ३४६ |
| २० | तनू भागली | ३४८ |
| २१ | दिसे पैल तीर | ३५२ |
| २२ | निघते मी आता | ३५९ |
| २३ | महापरिनिर्वाण | ३६३ |
| २४ | उत्तर पर्व | ३६६ |


**यज्ञशिष्ट**


| | | |
|---|---|---|
| १ | कस्तुरबांच्या आयुष्याचा काल पट | ३७६ |
| २ | कस्तुरबा परिवार-परिचय | ३८३ |
| ३ | कस्तुरबांची काही भाषणे | ३८५ |
| ४ | गांधीजींनी कस्तुरबांना लिहिलेली पत्रे | ३९० |
| ५ | कस्तुरबांनी लिहिलेली पत्रे | ४१७ |
| ६ | कस्तुरबांच्या आजारपणात तुरुंग अधिकारी यांच्याशी झालेला गांधीजींचा पत्र-व्यवहार | ४२२ |
| ७ | कस्तुरबांच्या निधनानंतर भारत सरकारशी झालेला गांधीजींचा पत्र-व्यवहार | ४२५ |
| ८ | विविध श्रद्धांजली | ४३४ |
| ९ | कस्तुरबा ग्राम स्मारक राष्ट्रीय ट्रस्ट | ४३८ |
| १० | वैद्यकीय सेवा कार्य | ४४५ |
| ११ | संदर्भ ग्रंथ सूची | ४४७ |
| १२ | कस्तुरबा गांधी सचित्र जीवन दर्शन | ४४९ |

प्रथम खंड

# ऋक् वद

***ऋक् वद १८६९ ते १८८३ हा***
***चौदा वर्षांचा काळ***
***गांधीजी इंग्लंडहून शिकून परत***
***येईपर्यंतचा काळ***
***ऋक् वद***

ऋक् शब्द ऋ (ऋच्) या धातुपासून उत्पन्न झाला आहे. ऋ म्हणजे गती, ज्ञान, प्रकाश. ऋक्वद या पहिल्या भागात कस्तुरच्या व्यक्तिमत्वाच्या फुलण्याचे अंकन आहे. तिच्या व्यक्तिमत्वाच्या उत्कर्षवाटेची ही कहाणी आहे. तिच्या संघर्ष आणि वियोगाचा आविष्कार यातून सजला आहे.

***भद्रं कर्णेभिः शृणुयाम् देवा।***
***भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।।***
***स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः। व्यशेम देवहितं***
***यदायुः।। (ऋग्वेद १/१४/५)***

हे देवगणांनो, आम्ही कानांनी कल्याणकारक वचने ऐकावीत. हे पूजनीय देवतांनो, आम्ही डोळ्यांनी सुंदर स्वरुप पहावे. आपले स्तुतीगान करता-करता सामर्थ्य संपन्न अवयवांनी युक्त शरीर असलेले आम्ही आपण निर्माण केलेले दीर्घायुष्य प्राप्त करायला समर्थ व्हावे.



## १) जगदंबा!

९ ऑगस्ट १९४२. देशभर ‘चले जाव’ हा नारा घुमला होता. त्याच दिवशी गांधीजींना अटक करण्यात आली. त्यांच्यासोबत महादेवभाई होते. ‘करेंगे या मरेंगे’ हा नारा बुलंद झाला. सायंकाळी पावणे पाच वाजता कस्तुरबा सभेसाठी निघणार होत्या. त्यांना शिवाजी पार्कवर भाषण द्यायचे होते. त्यांच्या भाषणाची चर्चा होती. पोलीस अधिकारी दारात उभा होता. त्याने हात जोडले. कस्तुरबाना सभेत न जाण्याची विनंती केली. कस्तुरबानी ती अमान्य केली. बिर्ला हाऊसमधून बाहेर पडताच त्यांना अटक झाली. त्यांच्या समवेत डॉ. सुशीला नायर यांनाही अटक करण्यात आली. कस्तुरबाना शिवाजी पार्कवर भाषण द्यायला जाऊ दिले गेले नव्हते. मुंबईच्या ऑर्थर रोड जेल मध्ये ठेवण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फोनवर काही चर्चा झाली. पुढे कस्तुरबाना येरवडा तुरुंगात हलवण्यात आले. त्यांची डॉक्टर म्हणून सुशीला नायर यांनाही नेले.

या घटनेला पाच दिवस लोटले होते. सहावा दिवस होता. १५ ऑगस्ट १९४२ साल. येरवडा तुरुंग. गांधीजींचे पुत्रवत स्वीय सचिव महादेवभाई देसाई. गांधीजींनी महादेवभाईंच्या चारित्र्याचा गौरव केला आहे. ते म्हणाले होते की महादेवभाईंचे जीवन हे भक्तीचे अखंड काव्य आहे. आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षी महादेवभाई गांधीजींच्या चरणी नतमस्तक झाले. चक्रवर्ती राजगोपालाचारी महादेवभाईंना गांधीजींचे ‘हृदय द्वितीयम्’ म्हणत असत. अचानक त्यांची तब्येत बिघडली. हृदयविकाराचा प्रकोप झाला. त्यांनी अखेरचा निरोप घेतला. कस्तुरबा खचून गेल्या. हे दु:ख त्या झेलू शकल्या नाहीत. महादेवभाईचे जाणे त्यांना वज्रप्रहारासारखे होते. महादेवभाईची पंचवीस वर्षांची सोबत आणि सेवा होती. कस्तुरबा गांधीजींसोबत अंत्ययात्रेत चालत निघाली होती.

गांधीजींचे उपवास सुरु होते. उपवासाचा आज तेरावा दिवस होता. गांधीजींना बिछान्यात जाऊन पडावे लागले होते. त्यांची शुध्द हरपली होती. नाडी मंद चालत होती. शरीर घामाने डबडबलेले होते. बोलणे तर लांबच राहो. इशारा करणेही शक्य नव्हते. नौका डगमग करु लागली होती. कस्तुरबा नेहमी त्यांच्यासोबत असायची. तिथे नसली तर मग बालकृष्णाच्या मूर्तीसमोर किंवा मग तुळशी मातेसमोर असायची. तिथे बसून विनवत होती. या आजारादरम्यान सतत प्रार्थनेत निमग्न असायची. गुडघे टेकलेले. हात जोडलेले. डोळे मिटलेले. चेहरा करुण आणि दीन. ध्यांनात लीन. तिला आजूबाजूच्या जगाचा विसर पडला होता. ‘माझे सौभाग्य राख.’ ही एक प्रार्थना. देवाने प्रार्थना ऐकली होती. तिने सावित्रीसारखी प्रार्थना केली. ‘मी पुढच्या वर्षी येईन असे का ती देवाला म्हणाली होती?’ त्यालाच माहित.

गांधीजींचे एकवीस दिवसांचे उपवास सुरु होते. चक्रवर्ती राजगोपालाचारींना ती म्हणाली ‘I see you talk lot, I see what you do outside. ‘मी बघत आहे. की गप्पा तर तुम्ही ढीगभर मारता. प्रत्यक्षात बाहेर काय कराल ते मी स्वत: बघणार आहे.’ हे कस्तुरबाचे इंग्रजी. दक्षिण आफ्रिकेत ती शिकली. या इंग्रजीच्या शुध्दपणाबद्दल काळाने काही कधी प्रश्न उपस्थित केला नाही. हे इंग्रजी मान्य करुन घेतले.

३ मार्च १९४३ गांधीजींचे उपवास पूर्ण झाले. कस्तुरबा थकून गेली होती. नेहमीसारखा फलाहार सुरु होता. दिवसातून एकदा फलाहार. तेच जेवण. अनेक मित्र भेटी पाठवत. वैद्य मालिशसाठी तेल पाठवत. डॉक्टर्स औषधे पाठवत. हरीजन विद्यार्थ्यांनी मध पाठवले होते. काहींनी गंगाजळ पाठवले. मुंबईच्या एका मुस्लिम बंधुने अनोखी भेट पाठवली होती. एक छोटीशी करंडी होती ती! त्या करंडीत दोन नाजूक बांगड्या होत्या. सौभाग्य दर्शक हळदी-कुंकू होते. एक छोटेसे पत्र सोबत होते. पत्रातून लिहिले होते

‘कस्तुरबा, आपला सौभाग्य चुडा वज्रमंडित होवो. ही भावना मनात आहे. या सौभाग्यसूचक बांगड्या पाठवत आहे. कृपया स्वीकार व्हावा, ही प्रार्थना!’

१९४४ साल उजाडले. फेब्रुवारी महिना आला. २२ फेब्रुवारी तारीख होती ती ! गेल्या रात्रीपासून तिला पाणी घेण्याविषयीही अरुची उत्पन्न झाली होती. देवदासने गंगाजळ आणले आहे. असे कळले. तिने ओठ विलग केले. गांधीजींनी चमचाभर गंगाजळ मुखात घातले.

कस्तुरबाने लगेच घोट घेतला. 'पुरे.' असे म्हणाली. थोड्या वेळाने परत गंगाजळाचे सेवन केले. त्यात तुळशीची पानेही होती. गीता पारायण झाले. मगनलाल गांधींच्या पत्नी संतोकताई आणि मनूने भजने गाऊन दाखवलीत. कस्तुरबा गांधीजींच्या मांडीवर विसावली होती. श्वास थांबत-अडखळत होता. बा भवबंधनातून मुक्त झाली.

इतिहासाची पाने फडफडत राहिली होती. १९१३ ते १९४४. त्या घटनेला एकतीस वर्षे उलटून गेली होती.

दक्षिण आफ्रिकेची आठवण. १९१३ साल होते ते कस्तुरबा तुरुंगात होती. खूप आजारी होती. 'तू जर तुरुंगात मरण पावलीस तर मी तुझी जगदंबा मानून पूजा करीन.' गांधीजी म्हणाले होते. आज महाशिवरात्र. तुरुंगवासाचा काळ. मळभभरले कुंद आभाळ. आगाखान पॅलेसची निस्तेज बाग. बागेत शोकमग्न फुले. कस्तुरबाची जीवन ज्योत मालवली होती. आसपास हुंदक्यांचे अरण्य उगवले. प्रार्थना सुरु झाली. आसवे आवरुन गांधीजीही प्रार्थनेत सामील झाले.

२५ फेब्रुवारीचा दिवस उजाडला. चिता भस्म गोळा केले गेले. यात पाच बांगड्या होत्या. चंपारण्यात एकदा कस्तुरबांच्या बांगडीची फिरकी कुठेतरी हरवली होती. सर्वांनी ती शोधण्याचा खूप प्रयत्न केला. काही उपयोग झाला नव्हता. गांधीजी आणि महादेवभाई यांच्यात पुढील संवाद झाला होता. 'चला लवकर निघायला हवे. उशीर का करताहात?' गांधीजींच्या स्वरात उतावीळ होती.

'बांच्या बांगडीची फिरकी काही सापडत नाही.' महादेवभाईंनी कारण सांगितले. 'तिला सांगा मी हयात आहे. बांगडीशिवायच चल.' गांधीजी निर्धास्तपणे बोलले.

कस्तुरबा मात्र हे ऐकायला तयार नव्हती. अखेर निंबाच्या एका काडीची फिरकी केली गेली. पुढचा प्रवास सुरु झाला. आता अखेरचा प्रवास होता. या प्रसंगी कस्तुरबाने आपल्या बांगड्या सुरक्षित राखल्या होत्या. काचेच्या बांगड्या. सुरक्षित. ना जळल्या ना विरघळल्या. गांधीजींनी तो वज्रमंडित चुडा बघितला.

'ती जगदंबा होती.' ते एवढेच म्हणाले.

❖❖❖

## २) इतिहासाचा मागोवा

अठरावे शतक पुढे सरकू लागले होते तसतसे लागोपाठ मोठमोठे दुष्काळ पडू लागले. जगभरात हाहाःकार माजला होता. शतकाच्या अखेरची तीन दशके भयंकर होती. जीवित हानीची तीव्रता चौपटीने अधिक होती. हे अशुभ शतक होते. हे अन्यायी शतक होते. हे दुर्भिक्ष्याचे शतक होते. दारिद्र्याचे शतक होते. याची सावली काळीकुट्ट होती. ती थेट दक्षिण आफ्रिकेपर्यंत पसरली होती. तिथे भारतीय बंदी मजूर पाठवावे लागले. भयानक स्थिती निर्माण झाली होती. भारतीय मजूर समुद्रपार गेले होते. त्यांचा एक वेगळा प्रश्न उभा ठाकला होता. धर्माने समुद्र ओलांडायला बंदी घातली होती. कर्माने समुद्र ओलांडून जावे लागत होते. भारतीय जन राजकीयदृष्ट्या जणूकाही अज्ञातवासात होते. राजकीय वेठबिगारीने ग्रस्त होते. साम्राज्यशाही वर्णश्रेष्ठत्वाच्या पायावर उभी होती. तिचा विखार दक्षिण आफ्रिकेपर्यत पोहोचला होता. गांधी आणि कस्तुर. यांच्या आयुष्याचा मोठा भाग दक्षिण आफ्रिकेत गेला.

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आला. 'भारत आपल्या राष्ट्रीय उत्थानासाठी अंतर्मुख झाला' असे रोमां रोलां म्हणाले होते. हा काळ नवजागरणाने रोमांचित होता. जीवनाची तमाम क्षेत्रे बहरुन आली होती. धर्म काय अन् संस्कृती काय, कला काय आणि विज्ञान काय, साहित्य काय आणि सामजिक सुधारणा काय, आर्थिक जागरण काय आणि राजकीय चळवळ काय - सर्वत्र एकाएकी नवजागरणाची लाट उसळली.

पूर्व दिशा प्रेरणा मिळवण्यासाठी पश्चिमेकडे वळली. या बाबतीत ब्राह्मोसमाजाचे स्थान विशिष्ट आहे. पश्चिम दिशा ज्ञान व विद्वत्तेसाठी पूर्वेकडे वळली. याला निमित्त थिऑसॉफिकल सोसायटीचे झाले. थिऑसॉफी शब्दाचा अर्थ ब्रह्मविद्या वा अमूर्ताचे ज्ञान असा आहे. आर्य समाज, ब्राह्मो समाज, रामकृष्णाचे आंदोलन राजकारणाकडे पाठ वळवणारे होते. तसे थिऑसॉफिकल सोसायटीचे नाही, उलट सोसायटी भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी एकरुप झाली. गांधीजींशी या सोसायटीचे धार्मिक आणि तात्विक विचारांविषयी साम्य होते. यामुळे गांधीजींना विद्यार्थी दशेत इंग्लंड येथे अनेक मित्र लाभले. दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह संघर्षात नाना विश्वासू सहकारी मिळाले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तराध्दातला गुजरात कसा होता? गांधी आणि कस्तुर यांच्या जन्मापूर्वीचा गुजरात समजून घ्यायला हवा.

१८५० पर्यंतच्या काळात एकूण पाच वृत्तपत्रे प्रकाशित झालीत. यात 'जामे जमशेद' हे प्रसिध्द वृत्तपत्र होते. या पत्रकारितेतून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यिक चळवळींचा परिचय घडतो. राजकीय विषय मात्र अस्पर्श्य दिसतो. या काळात पत्रकार पुराणपंथी होते. १८५० सालानंतर सुधारक विचारसरणीचे समर्थन आढळते. काही वृत्तपत्रांनी राजकीय विषयांनाही स्पर्श केलेला दिसतो. प्रजेच्या हक्कांसाठी देशी राजांशी घेतलेली टक्कर दिसते. गुजरातेत सामाजिक क्षेत्रात क्रांती करण्याचे प्रयत्न झालेत. या कामी पत्रकारितेचा पुढाकार मुख्यत्वेकरुन दिसतो. साहित्याच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीचा उद्‌घोष झाल्याचेही चित्र आढळते. साहित्याने स्त्री-शिक्षण, विधवा विवाहाचे समर्थन केले. बालविवाहाचा विरोध केला. जातीप्रथेची दूषणे समजावून सांगितली. जनमताचे प्रशिक्षण केले. साहित्यिक हे शांत आणि विवेकी सुधारक होते. १८५० साली कन्या शाळेची मुहूर्तमेढ रोवली गेली. गुजरात भयग्रस्त, लाचार आणि हताश होता. गुजरातच्या सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात नवा समन्वय जागला. नवा अध्याय लिहिला गेला.

सामान्यपणे १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात गुजरातचा सहभाग शून्य होता असे मानले जाते. १८५७ सालापूर्वीही गुजरातने सरकारच्या अन्यायी कार्याचा विरोध केला आहे. सामुदायिक चळवळी केल्या आहेत.[१] १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात गुजरात एकूणच उदासीन दिसतो. नेतृत्वाचा अभाव, व्यवस्थित कार्यक्रमाची उणीव, गायकवाडी राज्याची निष्क्रियता, काठियावाडी राज्यांची तटस्थता, व्यूहात्मक निष्फळता, नैतिक दुबळेपणा यासारखी नाना कारणे याला जबाबदार आहेत.

गांधी आणि कस्तुर यांचा जन्म अजून व्हायचा होता. त्यापूर्वीचे हे एक दशक आहे. १८५७ चे पहिले

स्वातंत्र्य समर. या लढ्यात गुजरात असा दिसतो. असहकार, सत्याग्रह, शांततापूर्ण निदर्शने हे शब्द त्या काळात जन्माला आले नव्हते. जनतेने पत्करलेला मार्ग मात्र अहिंसक लढ्याचा होता.

मुख्यतः इंदोर आणि धारमध्ये बंडाळी जागली होती. तिचा खोल प्रभाव गुजरातवर उमटला होता. पंचमहाल, खेडा, दाहोद, बडोदा, भरुच इथले क्रांतीकार्य विशिष्ट होते. जून १८५७ साली अहमदाबादला उठाव झाला होता. सैनिकी तुकडीतील मराठी सैनिकांनी बंड पुकारले होते. [२]

बंडखोरांशी शासन क्रुरपणे वागत होते. हद्दपारीची सजा सुनावत होते. तोफेच्या तोंडी देत होते. संपूर्ण गावांची राखरांगोळी करत होते. अन्नधान्यांचे साठे उध्वस्त करत होते. पंचमहाल जिल्ह्यातल्या दाहोद गावी बंड उसळले होते. गोधरा येथे क्रांतीची ठिणगी पडली होती. पाल गाव उजाड करुन टाकण्यात आले. मही नदीकाठावरचे खानपुर पेटवण्यात आले होते.

मध्य आणि उत्तर गुजरात पेटत होते. दक्षिण गुजरातमधे क्रांतीचे स्वरुप क्षीण होते. या कथांना लोकजीवनाचे संदर्भ आहेत. ऐतिहासिक पुष्टी मात्र अपूर्ण आणि अविश्वसनीय स्वरुपाची आहे. लोकजीवन म्हणते की १८५७ च्या स्वातंत्र्य समरात गुजरातचा लक्षणीय सहभाग होता.

इंग्रजांची गुजरातवर मांड पक्की झाली होती. सुरतेत सामूहिक आंदोलन झाले होते. एप्रिल १८४८ साल. बंगाली पध्दतीच्या मोज-मापाची नवी साधने प्रचलनात आली होती. याचा तीव्र निषेध करण्यात आला होता. विरोध लक्षात घेऊन सरकारला आपला निर्णय मागे घ्यावा लागला होता. [३]

गुजरातच्या प्रजेचा हा सरकार विरोधातला पहिला विजय मानला जातो. पहिली लोकक्रांती मानली जाते. ईस्ट इंडिया कंपनीचा पहिला राजकीय पराभव झाला. भारतातील हे पहिले समाज जागरण झाले. हे जागरण शांतता व अहिंसेच्या मार्गाने झाले आहे. या भूमीवर ब्रिटिशांनी पहिले पाऊल रोवले. इथेच त्यांचा पहिला पराभव नोंदवला गेला होता.

सौराष्ट्रात नाना लहान-मोठ्या रियासती कार्यरत होत्या. संस्थाने कार्यशील होती. यांच्या वहिवाटीवर कंपनी सरकारची करडी नजर असायची. शांतता स्थापन करण्याचे निमित्त पुढे करत ब्रिटिश सत्तेचा वरचष्मा वाढला. त्या काळी सौराष्ट्र 'काठियावाड' नावाने ओळखले जात होते.

सामाजिक क्षेत्रात गुजरातेतील हालचाल जाणून घेऊ या. १८७३ साली सुरत येथे 'प्रार्थना समाजाची' सुरुवात झाली. या दरम्यान काँग्रेसची स्थापना झाली होती. राष्ट्रीय चेतना जागृत झाली होती. सुधारणेचे वारे वाहू लागले होते. इंग्रजी सत्तेविरुध्द असंतोष जागला होता. दयानंद सरस्वती यांनी मुंबईत 'आर्य समाज' स्थापन केला. १८७५ साली दलितोध्दार आणि वैदिक धर्मोत्थानाच्या दिशेने पावले उचलली गेलीत. अमेरिकेला प्रस्थान करण्यापूर्वी स्वामी विवेकानंद गुजरातेत आले होते. काही महिने इथे थांबून धर्मजागृतीचे वातावरण उभे केले होते. श्रीमन्नृसिंहाचार्य (१८४८ ते १८९८) आणि श्रीमान् नाथूराम शर्मा (१८५८ ते १९३०) यांनीही गुजरातेत धर्मस्थापनेचे कार्य उभारले होते.

१८८४ साली 'गुजरात सभा' स्थापन झाली. प्रजेत राजकीय जागृती झाली. राष्ट्रवादी भावनांचा गळा मोकळा झाला. सक्षम राजकीय वातावरण उभारले गेले. काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी ही सभा स्थापन झाली होती. प्रजेच्या अडी-अडचणी दूर करायचे काम होते. अन्याय दूर करण्याचे काम होते. सनदशीर मार्गाने लढा सुरु झाला. आरंभिक काळात काँग्रेसचेही असेच ध्येयधोरण होते. अशा प्रकारे गुजरात सभेची रचना काँग्रेसची पूर्वावृत्ती म्हणता येईल. कलकत्ता (१८८६), मद्रास (१८८७) आणि लाहोर (१८९३) या काँग्रेसच्या आरंभिक अधिवेशनांमधून गुजरातचे प्रतिनिधित्व प्राधान्याने दिसते. गुजरातचे श्री दादाभाई नौरोजी तीनदा तर श्री बद्रुद्दीन तैयबजी एकदा काँग्रेसचे प्रमुख होते.

एकोणिसावे शतक आले. ते सुधारणेचे शतक म्हणून गौरविले जाते. या शतकात सामाजिक आणि धार्मिक सुधारणेला सुरुवात झाली. १८५० सालापर्यंत जवळपास संपूर्ण भारतभर ब्रिटिश सत्ता स्थापन झाली होती. भारतीयांना धार्मिक आणि राजकीय स्वातंत्र्याची

आच होती. हे मिळवण्यासाठी ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज या सारख्या संस्था निर्माण झाल्या होत्या. अशा प्रकारची कुठलीही संस्था १८५० सालापर्यंत गुजरात वा मुंबई प्रांतात आढळून येत नाही. १८७१ साली सुरतेत 'प्रजा समाज' या संस्थेची स्थापना झाली. ही गुजरातची पहिली राजकीय संस्था म्हणता येईल. सूरतेप्रमाणेच भरुच येथेही १८७१ साली या संस्थेची स्थापना झाली. विशेष भूमिका न बजावताच १८७४ साली ही संस्था बंद झाली. १८७८ साली सुरतेत 'प्रजाहितवर्ध्दक' सभेची स्थापना झाली. या सभेने कराच्या विरोधात चळवळ केली. मताधिकार द्यायला भाग पाडले.

जनजीवन नाना लहान-मोठ्या जातींमध्ये विभाजित झाले होते. सागर प्रवास निषिध्द होता. या शतकात सतीची चाल रुढ होती. गुजरातेत सौराष्ट्र, कच्छ, उत्तर गुजरात, साबरकाठा वगैरे अनेक ठिकाणी सतीचे खांब दृष्टोत्पत्तीस येतात. हे खांब म्हणजे सतीचे स्मारक होय. स्पृश्यास्पृश्य भाव विद्यमान होता. पाणवठे वेगळे होते. मंदिर प्रवेशाला बंदी होती. या शतकापर्यंत सामाजिक सुधारणांचे वारे वाहतांना दिसत नाहीत. कुणी समाजसुधारक झळकत नाही. १८८३ साली सयाजीराव गायकवाडांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. ते या सुधारणेकामी अग्रस्थानी होते.

१६ नोव्हेंबर १८६०. हिंदी मजुरांचे जहाज दक्षिण आफ्रिकेच्या बंदराला लागले. वेठमजूरांवर अपार बंधने होती. वार्षिक तीन पौंडांची डोईपट्टी होती. सर्वत्र संचार करता येत नव्हता. वागण्या-बोलण्यावर बंधने होती. हर प्रकारची क्रुर पिळवणूक होती. गांधी व कस्तुरच्या जन्मापूर्वीचे हे दशक आहे.

या घटनेला तीन हजार वर्षांपेक्षा अधिक वर्षे लोटलीत. उपनिषद काळातली ही घटना आहे. आंगिरस नावाचे ऋषी होते. त्यांना भेटायला एकदा शौनक आले. शौनक अट्ठ्यांशी हजार ऋषीकुळाचे अधिष्ठाते आहेत. त्यांनी आंगिरसाना विनम्र अभिवादन केले.

'महात्मन्, एक जिज्ञासा घेऊन आलो आहे.' शौनकांनी शिष्य भावनेने सांगितले.

'अवश्य विचार.' आंगिरसाने आत्मविश्वासपूर्वक सांगितले.

'हे प्रभु, 'कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति इति।' 'हे भगवान, जे जाणून घेतले की सारे काही जाणून घेता येते म्हणजे आत्मतत्त्वाला जाणून घेता येते असे तत्त्व कोणते?' शौनकाने आंगिरसांना विचारले.

'सत्येन लभ्य: तपसा ह्येष आत्मा' सत्याने म्हणजे अनृत भाषणाचा त्याग केल्याने म्हणजे अमृताने जाणून घेता येते. सत्य आणि तपाचरणाने आत्मतत्त्वाला जाणता येते. सत्य, तप म्हणजे ज्ञानाची प्राप्ती आणि आत्मतत्त्व म्हणजे परमसत्याचा शोध. आत्म तत्त्वाची शोध यात्रा ही सत्याचीच शोध यात्रा. ऋषी आंगिरस महाशाल शौनकाला उत्तर देत आहेत. [४]

ऋषी आंगिरसाने मोक्षाचा मार्ग दाखवला. तो सत्य, सम्यक् ज्ञान, तपाचरण आणि ब्रह्मचर्य असा चौपदरी आहे. गांधी या मार्गाचे पाईक आहेत. त्यांनी आपले दोष क्षीण केले. ही युतींची साधना आहे. सामान्य माणसाचे तपाचरण आहे. गांधी धुळीतून धुरंधर झालेत. एक मातीची दिवली आकाशगंगेच्या शीर्षस्थानी पोहोचली. थेंबाचा महासागर बनला. ठिणगीचा दावानल बनला. धुळीतून धुरंधर उभा ठाकला. सामान्य असामान्य बनला. गांधींचा वैयक्तिक पुरुषार्थ राष्ट्रीय पुरुषार्थ बनला. गांधींनी सत्याचा आग्रह धरला. त्यांच्या आत्मचरित्रात हे निखालसपण आले. न सांगता येणाऱ्या किंबहुना लपवून ठेवाव्या अशा गोष्टी त्यांनी उघड केल्या. चुका स्पष्ट शब्दात मांडल्या. स्खलनाचे प्रसंग आणि कथा समरसून सांगितल्या. त्यांनी त्या तशा सांगितल्या नसत्या तर जगापुढे आल्याही नसत्या. ही त्यांची सत्याची उपासना होती. या उपासनेत कस्तुरचे मोठे सहकार्य होते. सहभाग होता.

सत्य हे साध्य. अहिंसा हे साधन. साध्य उत्तम असेल तर साधन शुध्द हवे. हा आग्रह गांधींनी धरला. महर्षी पतंजलींनी 'योगसूत्र' लिहिले. यातून मानवाला प्रकाश लाभला. योगशास्त्र चित्तवृत्तींचा विस्तारपूर्वक परिचय करुन देते. हा अभ्यास हे योगशास्त्राचे मर्म आहे. मर्म कळले नाही तर पतनाचे गर्त शिल्लक उरते. साधक त्या गर्तेत जाऊन हमखास पडतो. श्रीमद्भगवद्गीतेने

साधनेचा विचार मांडताना दोन तत्त्वांना आवश्यक मानले आहे. अभ्यास आणि वैराग्य ही ती दोन तत्त्वे होत. महर्षी पतंजली यावरच मुख्य भर देतात. यम-नियमांच्या फळाची मीमांसा मांडताना ते म्हणतात.

***अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निध्दौ वैर-त्याग:।*** [५]

अर्थात्: अहिंसा स्थिर झाली की तिच्या भोवती वैर, द्वेष, हिंसा फटकत नाही.

काया-वाचा-मनसा अहिंसेचे पालन व्हावे. ही भावना स्थिर व्हावी. तिच्या आजूबाजूला वैर उरत नाही. द्वेष अजिबात रहात नाही. हिंसेचा त्याग होतो. अशी व्यक्ती निर्भय बनते.

गांधींना क्षमावान पिता लाभले. बालपणी गांधींनी चिठ्ठी लिहिली. आपल्या चुकांची प्रामाणिक कबूली दिली. क्षमा मागितली नाही. शिक्षेची याचना केली. हा प्रसंग आत्मचरित्रात आहे. वडिलांची आसवे त्या चिठ्ठीवर पडली. चिठ्ठी भिजली. गांधीजी आत्मचरित्रात लिहितात.

‘त्या मौक्तिकबिंदूंच्या प्रेमबाणाने माझे हृदय भेदून गेले. मी शुध्द झालो.’ [६]

गांधी आणि कस्तुरकालीन हा इतिहास समजून घेण्यासारखा आहे. हा कालपट अंधारलेला आहे. उजेडाची कुठे तिरीप नसलेला आहे. पहाटेपूर्वीची गुलाबी छटा क्षितिजावर दिसत नाही. अशा काळी गांधी आणि कस्तुरचे आगमन होते.

*संदर्भ*

*१) Political Department (P. D. Volume, no. 1627 of 1844-45, (i) Bombay Government P. no. (ii) Bombay Times (Times of India) 7th sept 1844;*

*२) Bombay Government Vol I, Part I Page 438;*

*३) (i) Bombay Gazeteer vol. II P. 167 (ii) source material of history of freedom movement - Vol. I P. 17;*

*४) मुंडकोपनिषद ३ / १ / ५;*

*५) पातंजल योगदर्शन ‘साधन पाद’ ३५ वा श्लोक;*

*६) सत्याचे प्रयोग : श्री मो.क. गांधी पृष्ठ २७.*

❖❖❖

## ३) शुभ्र नगरी पोरबंदर !

पोरबंदराभोवती समुद्राचा वेढा पडलेला आहे. या गावाचे व्यापारी मोल मोठे आहे. थेट आफ्रिकेशी व्यापारी संबंध आहे. अरबी दुनियेशी संबंध आहे. पोरबंदरच्या पूर्वेला राजकोट. या द्वीपाला सौराष्ट्र असेही म्हणतात. याच्या उत्तरेला कराची. दक्षिणेकडे मुंबई. इथली भाषा गुजराती. गुजरातचा हा भाग समृध्द आहे. सौराष्ट्राच्या चरणाशी अरबी समुद्र गरजतो आहे. सागरलाटांची गाज या भूमीवर ऐकता येतो. हा घोष विलक्षण आहे. यासोबत काळाच्या बदलत्या कळा अनुभवता येतात. गतकालीन इतिहास तपासता येतो. इतिहासाचे नव-नवे अध्याय या सागर लाटांच्या नादातून ऐकता येतात. राजवटींचा नेमका तोल तपासून बघता येतो. या भूमीत एक आगळे-वेगळे चैतन्य निनादले. एका जागरयात्रेचा शुभारंभ झाला.

या प्रदेशाच्या नाभीस्थानी पोरबंदर वसलेले आहे. द्वापर युगात इथे कृष्णभक्त सुदामदेव जन्माला आले होते. कलियुगात या भूमीने संत नरसी मेहतांना घडवले. नरसी मेहतांनी हरिजन वाड्यात जाऊन कृष्ण नामाचा महिमा गाईला होता. कृष्ण भक्तयोगिनी मीराबाईने द्वारकाधीशापुढे आपल्या दु:खांचे गाऱ्हाणे मांडले होते. विष आणि विषधरांशी मैत्र जोडण्याचे बळ संपादित केले होते.

लांब-लांबून येणाऱ्या खलाशाना या भूमीतल्या चकाकत्या पांढऱ्या ग्रेनाईटने मोहवले होते. यामुळे पोरबंदर ही 'शुभ्र नगरी' म्हणवली जात होती. इतिहास या भूमीतून गांधी नावाची ऊर्जा निर्माण करण्यात दंग झाला. मोहनदास करमचंद गांधी या सेवाव्रती मनिषीचे आदिस्थान पोरबंदर. कस्तुर गांधीची जन्मभूमी पोरबंदर. सौराष्ट्राच्या सुपुष्ट स्कंधावर संस्कृतीची पुष्पे उमलली.

इथली भूमी सुजलाम् सुफलाम्. या भूमीत संवाद, सेवा आणि समर्पणाची गाथा लिहिली गेली. साधना, तपस्या आणि आहुतीची त्रिवेणी प्रवाहित झाली. समुद्र कस्तुरच्या जीवनात आला. कमालीच्या ताकदीने तिने सागर ओलांडला. ती सागरलाटांवर आरुढ झाली. सागराला जुमानले नाही. पराक्रमाचा पोवाडा गाईला. आपल्या व्यक्तिमत्वाचा स्वतंत्र ठसा उमटवला.

पोरबंदर नगरीच्या उत्तरेला द्वारका हे महाद्वार. हे पश्चिमेकडून येणाऱ्या जलपोतांचे प्रवेशद्वार. दक्षिणेस सोमनाथाचे देऊळ. सातत्याने आक्रमण झेलूनही भक्तांच्या हृदयासारखे अभेद्य. पूर्वेला भादर नदीचा खळाळता काठ. पश्चिमेला बरडा डोंगराच्या सुरम्य रांगा. कधीकाळी या डोंगराच्या कुशीत वनराज सहपरिवार नांदते असायचेत. त्यांच्या हुंकाराने उभा डोंगर थरारुन उठायचा.

शेकडो वर्षांचा इतिहास सांगतो. काठेवाडच्या या भूमीवर हिंदू-मुस्लिम राजसत्तेवर चवऱ्या ढाळल्या गेल्यात. मुस्लिम राजे नबाब. दिवाण अधिकांशत: हिंदू. या दिवाणांनी त्यांचा राजशकट हाकललेला असायचा. सहज धार्मिक संवेदन असायचे. परस्पर सहिष्णुता नांदायची. हा पाठ या भूमीला पुरातन काळापासून प्राप्त झाला आहे. पोरबंदरच्या काठावर विविध जाती, धर्माचे लोक नांदले. माणूस नावाच्या अस्तित्वाचे अखंडपणे येणे-जाणे होत राहिले. हिंदू साधु-बैरागी. सूफी संत. मौलवी. जैन वा बौध्द भिक्षु-भिक्षुणी. ख्रिश्चन पादरी. पारशी दस्तूर. सारे लाटेतील जलकणांप्रमाणे एकात्म लयीत गात असत. हे सारे विविध विचार-मत-संप्रदाय-पंथ-धर्म एकत्र नांदत. यांच्यासोबत वैष्णव धर्म. तो तर सर्वसामान्य जनांची जीवनरीत बनून गेला होता. यासोबत प्रणामी संप्रदाय, स्वामी नारायण संप्रदाय नांदता होता. निसर्गसिध्द समस्वरता होती. ही या प्रदेशाला ललामभूत होती. इथे नाना संतांच्या समाध्या आहेत. भरपूर तीर्थस्थळे आहेत. गिरनार व पालिताणा या टेकड्या आहेत. हे स्थान गलबतांच्या बांधणीसाठी प्राचीन काळापासून प्रसिध्द आहे. ही जहाजे कधीकाळी पृथ्वी प्रदक्षिणा करत. जावा सिंगापुर गाठत. पशिर्यन द्विप गाठत. अरेबिया पर्यंत पोहोचत. पूर्व आफ्रिकेत झांजीबारपर्यंत सफर करत असत.

ते युग वेगळे होते. त्या युगात नीतिसंपन्न आणि प्रतिभाशाली माणसांना मान होता. ते अशिक्षित असले तरीही आपली भरभराट करुन घेऊ शकत असत. आपला ठसा उठवू शकत असत. त्याकाळात उत्तमचंद

व करमचंद यांच्यासारखे पिता-पुत्र होते. त्यांच्यापाशी बुध्दिमत्ता आणि चारित्र्यसंपन्नता होती. काठेवाड वैभव संपन्न संस्थान होते. तिथे ते उच्चतम पदावर पोहोचू शकले. हे युग करमचंदांच्या सोबत जणू काही संपून गेले.

ब्रिटिश सत्ता भारतात सर्वत्र बळकट झालेली होती. तशी ती काठेवाडातही होती. संस्थाने निष्ठावंत असणे ब्रिटिशाना गरजेचे होते. संस्थानाना ब्रिटिश साम्राज्याच्या इशाऱ्यावर नाचावे लागत होते. पदाधिकाऱ्यांना वेगळा विचार करता येणे शक्य नव्हते. अशी 'होय-बा' माणसे ब्रिटिशांना हवी होती. त्या द्दष्टीने इंग्रजी शिक्षण मोलाचे होते. या टाकसाळीतून बाहेर पडलेली माणसे त्यांना उपयुक्त वाटत होती. त्यांना कल्पनारम्य जगातल्या माणसांची गरज नव्हती. डाव्या हाताने सलाम करणाऱ्या माथेफिरु माणसांचा तर रागच होता. काही माणसे स्वाभिमानी होती. सत्तेपुढे सर्वप्रथम स्वाभिमानालाच गहाण ठेवावे लागते. असे न करणारी साहसी माणसे होती. अशा प्रकारच्या साहसी वृत्तीला काल्पनिक जगातच स्थान मिळू शकत होते प्रत्यक्षात नव्हे!

गांधींच्या सहा पिढ्या इथे नांदल्या. त्यांना आपली प्रतिभा विकसित करता आली. एक वा दुसरे संस्थान त्यांना धरुन होते. गांधींचे मूळ ज्ञात पुरुष श्री लालजी गांधी. जुनागढ राज्यात कुतियाना आहे. ते मूळचे तिथले रहिवासी होते. ते पोरबंदर येथे दफ्तरी वा नायब दिवाण झाले. हा प्रधान मंत्र्यांचा उजवा हात असायचा. त्याचे स्थान गृहमंत्र्यासारखे असायचे. लालजी गांधींनंतर त्यांचा मुलगा रामजी. रामजी नंतर त्यांचा मुलगा रहीदास. हे क्रमश: त्यांच्या पदावर आले. रहीदास यांना दोन मुले. हरजीवन व दमण. ते दोघेही पोरबंदरचे क्रमश: दिवाण झाले. हरजीवन गांधींचा एकुलता एक मुलगा उत्तमचंद. गांधी कुटुंबात तेच प्रथम पंतप्रधानपदी पोहोचले. ते करमचंदांचे वडील. गांधीजींचे आजोबा होत. त्यांचे काका दमण गांधी. त्यांच्या माध्यमातून उत्तमचंदांनी पोरबंदर येथे नोकरी मिळवली. नोकरी होती जकात गोळा करणाऱ्या अधिकाऱ्याची.

गांधींच्या पूर्वजांची ही कथा रमणीय आहे. उत्साहवर्धक आहे. हिंमतवान आहे. आत्मप्रत्ययावर विश्वास दर्शवणारी आहे. आत्मसन्मानयुक्त आहे. आपला आब राखून प्रजेच्या हिताकडे लक्ष देणारी आहे. हा वसा व वारसा गांधींना लाभला आहे.

❖❖❖

## ४) दैवते माय-तात !

उत्तमचंद गांधींच्या दोन बायका होत्या. उत्तमचंदांना सहा मुले होती. त्यातले करमचंद पाचवे होते. ते लक्ष्मीबाईंचे चिरंजीव. त्यांचा जन्म १८२२ साली पोरबंदरला झाला. करमचंदांची चार लग्ने झालीत. पहिले लग्न १८३६ साली झाले. त्यावेळी ते चौदा वषांर्चे होते. पहिल्या पत्नीपासून त्यांना दोन मुली झाल्यात. पहिल्या पत्नीचे निधन झाले. त्यांनी दुसरा विवाह केला. या दरम्यान ते पोरबंदरचे दिवाण होते. या पत्नीचे प्रसूतीकाळात निधन झाले. तिसरी बायको सदा न् कदा आजारी असायची. तिची अवस्था अपंग सदृश होती. तिसऱ्या पत्नीच्या हयातीतच त्यांनी १८५७ च्या क्रांतीपर्वावर चौथा विवाह केला. या विवाहासमयी त्यांचे वय पस्तीस वर्षांचे होते. त्यांची चौथी बायको पुतळी होती. ती जुनागढ राज्यातील दतराणा गावची होती. ही गांधींची आई. कबा गांधींना चौथ्या बायकोपासून तीन मुले आणि एक मुलगी झाली. सर्वात मोठी मुलगी रलियात उपाख्य गोकी. हिचा जन्म १८६२ साली झाला. मुलगा लक्ष्मीदास उपाख्य कालिदास. हा १८६३ साली जन्माला आला. हा पोरबंदर संस्थानात खजीनदार झाला. पुढे राजकोट येथे वकिलीचा व्यवसाय करु लागला. १८६६ साली करसनदासचा जन्म झाला. मोहनदासचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. त्यावेळी करमचंद गांधी सत्तेचाळीस वर्षांचे होते. पुतळीबाईंचे वय पंचवीस वर्षे होते. मोहनदासला आई लाडाने ‘मोनिया’ म्हणून हाक मारायची. करमचंदांचा तो लाडका ‘मनू’ होता. मुलीचे लग्न झाले. ती काही सुखात नव्हती. ती लवकरच विधवा झाली. ती पुराणपंथी होती. तिने बरीच वर्षे आपला कर्मठपणा सोडला नव्हता. मोहनदास भारतात स्थायिक झाला. तरीही ती त्याच्यासोबत राहू शकली नाही. तिने आपले वर्तन काही बदलले नाही. पुढे तिची मानसिकता बदलली. तिने आपला कर्मठपणा सोडला. वयाच्या नव्वदाव्या वर्षी विकलांग दशेत तिचे निधन झाले.

गांधींच्या मनात आपल्या वडिलांविषयी पूर्ण श्रध्दा होती. तरी ते या लग्नासाठी त्यांना कधीच क्षमा करु शकले नाहीत. यासंबंधी आपल्या आत्मचरित्रात ते लिहितात ‘(वडील) काही अंशी विषयासक्तही असावेत. त्यांचा शेवटचा विवाह चाळिसाव्या वर्षी झाला होता.’[१] करमचंदांना चौथ्या वेळी लग्न करताना काही अडचणी आल्या असतील. अनुकूल मुलगी मिळणे अवघड होते. वाढते वय ही तर अडचण होती. मुख्य कारण त्यांची आधीची बायको जिवंत होती हे होते. त्यांना भरपूर जुळवून घ्यावे लागले होते. ते पत्नीला घरगुती कामातही मदत करत. भाजी निवडून देत. चिरुन देत. गांधींनी पुढे ही सवय विकसित केलेली दिसते. गांधींना पवित्र मनाची आजी लाभली. तिच्या वागण्या बोलण्यातून धर्मपरंपरा प्रकटत होती. आई संत प्रवृत्तीची व्रतस्थ महिला होती. रंभादाई गांधी कुटुंबाबरोबर अखेरपर्यत राहिली. तिचाही प्रभाव मोहनदासवर होता. तो पुढे विकसित झाला. त्याकाळीही राजकीय कटकटी होत्या. करमचंद गांधींचे अखेरचे दिवस खूप सुखात गेले नाहीत. आजार त्यांचा पिच्छा सोडत नव्हता. ते अंथरुणाला खिळले. ते स्वाभिमानी होते. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. ठाकोरांनी तो मंजूर केला. त्यांच्यासाठी पन्नास रुपये निवृत्ती वेतन मंजूर केले. हे वेतन त्यांना त्यांच्या मृत्युपर्यत म्हणजे १८८५ सालापर्यंत मिळत होते.

पुतळी आईचे घराणे प्रणामी वा सतप्रणामी पंथाचे होते. हा सर्वसंग्राहक पंथ आहे. प्रणामी अथवा निजानंद संप्रदायाचे संस्थापक आचार्य देवचंद्रजी (१५८२-१६५५). यांचा जन्म उमरकोट (सिंध) येथे झाला. बालपणीच आत्मज्ञानाच्या शोधात त्यांनी घरा-दाराचा त्याग केला. जामनगरला ‘निजानंद संप्रदाय’ स्थापन केला. स्वामी प्राणनाथ देवचंद्रजींचे शिष्य होत. (१६१८-१६८४) त्यांनी हिंदू धर्म व मुस्लिम तात्विक सिध्दांतांचे ऐक्य साधले. हिंदू-मुस्लिम सांप्रदायिक समन्वयाचे विशेष प्रयत्न केलेत. अस्पृश्यता निवारणाकामी पाऊल उचलले. प्रणामी संप्रदायात मूर्तीपूजेचा निषेध करण्यात आला होता. ग्रंथाचे पूजन-पठन केले जाते. प्रणामी हे प्राणनाथी म्हणूनही ओळखले जातात. प्राणनाथांनी आपल्या शिष्यांना अंमली पदार्थ सेवनाला मनाई केली. तंबाखू, दारु, मांसाहार वर्ज्य मानला. पर-स्त्री गमनालाही विरोध केला. शांतता आणि दयाळूपणा

या गुणांची शिकवण दिली. मूर्तिपूजेचा विरोध केला. त्यांच्या उपदेशातून ‘ईश्वर एकच आहे.’ हा विचार प्रकट होत असे. या पंथाला मानणारे बाळकृष्णाची उपासना करतात. मंदिरात मूर्ती नसते. चित्र वा फोटो असतो. प्रणामी पंथ मूर्तीपूजेचे काही खंडन करत नाही. समर्थनही करत नाही. निर्गुणोपासनेच्या मार्गाने मोक्षाची वाटचाल करतो.

गांधींच्या आई पुतळी. पुतळी शब्दाचा गुजराती भाषेत अर्थ होतो काचेची बाहुली. या बाहुलीने जगाला एक वज्रपुरुष प्रदान केला. विवाह करुन त्या वैष्णव कुटुंबात आल्या होत्या. घरात वृध्द सासूबाई होत्या. आजारी, पंगू सवत होती. करमचंद यांचे कुटुंब मोठे होते. पुतळी आईने सावत्र मुलींना जपले. सांभाळले. त्यांना आपला-परका असा भेदभाव ठाऊक नव्हता. त्यांनी कधी भेदभाव केला नाही. त्यांच्या मुलांचे सावत्र बहिणींशी सख्य होते. सावत्र मुली पुतळी आईहूनही वयाने मोठ्या होत्या. पुतण सुना त्यांच्या वयाच्या होत्या. पुतळी आई सर्वसंग्राहक पंथाच्या विचारांच्या होत्या. त्या परंपरागत प्रथांना अतिशय कर्मठपणाने चिकटून होत्या. त्यांच्या दैनंदिन कामकाजाला सकाळी सहा वाजता सुरुवात व्हायची. सारा घरसंसार चालवायची जबाबदारी पुतळी आईची. त्या सर्वात आधी जागायच्या. सर्वात उशिरा झोपायच्या. आधी सर्वांना भरवायच्या. सर्वात शेवटी जेवायच्या. उरले अन्न खायच्या. त्या आनंदी आणि हसतमुख असायच्या. त्यांचा चढा आवाज कधी कुणी ऐकला नाही. पुतळी आई अनन्य भक्त होत्या. त्यांची धर्मनिष्ठा अद्भुत होती.

पुतळी आईच्या आवडी-निवडी साध्या होत्या. कपडे साधे असायचे. त्या काठियावाडी साडी नेसायच्या. मागे बंद असलेली चोळी असायची. चोळी अर्ध्या पोटापर्यंत जायची. त्या अतिशय कमी दागिने वापरायच्या. विशेष प्रसंगी नथ वापरायच्या. मनगटात बांगड्या असायच्या. काठावरुन त्यांचा हस्तीदंती भाग दिसायचा. जुन्या वळणाच्या चार ते पाच इंच रुंदीच्या. त्या वरुन सोन्याने मढवलेल्या असायच्या. बायका चांदीचे जाड कडे वापरत. पुतळी आई तसे जाड कडे वापरायच्या. गळ्यात तुळशीची माळा घालायच्या. त्यांचा चेहरा प्रेमळ होता. समोरचे दात रुंद होते. काहीसे पुढे आलेले होते. पूजा अर्चा करायला त्यांना दोन तास लागायचे. त्यांच्या घरी अनेक जैन संत येत असत. त्यांचा भर सम्यक् वर्तनावर होता. शुध्द चारित्र्यावर होता. त्या पवित्र होत्या. ते पावित्र्य सर्वांना मान्य होते. जैन साधु-संत अन्य धर्मियांकडून गोचरी म्हणून अन्नपदार्थ स्वीकारत नसत. पुतळी आईचे घर याला अपवाद होते.

पुतळी आईला तथाकथित शिक्षण मिळाले नव्हते. त्या जन्मतःच हुशार होत्या. चारित्र्यसंपन्न होत्या. संस्थानच्या कारभारात तरबेज होत्या. अनेकदा त्यांना दरबारगडावरुन बोलावणे यायचे. महत्वाच्या राजकीय प्रश्नांविषयी राणी साहेब त्यांच्याशी मसलत करायच्या. तो काळ राजदरबाराच्या झगमगाटाचा होता. पुतळी आई मात्र भडक रंगांच्या कपड्यात नटून-थटून जात नसायच्या. नेहमीचे साधेच लुगडे नेसायच्या. अदबीने दरबारात जायच्या. अनेकदा मोहनदासला सोबत न्यायच्या. पुतळी आई व्यवहार कुशल होत्या. त्यांचे मन समजुतदार होते. त्या आदर्श गृहिणी होत्या. मोहनदासला यातून स्त्री-मुक्तीचा मार्ग सापडला. या आधारावर त्याने पुढे महिलांना प्रशिक्षित केले. महिला सत्याग्रहात पुढे आल्यात. सामुदायिक जीवनात विविध प्रयोग करु लागल्यात.

काळ बदलला होता. बदललेल्या काळाप्रमाणे पध्दतीही बदलल्या होत्या. मोहनदास करमचंद गांधींना आपल्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा शोध घ्यायचा होता. त्यासाठी नवनवीन कुरणांचा शोध घ्यावा लागणार होता. त्यांचे वडील गतकालीन भारताच्या गौरवाचे प्रतीक होते. ब्रिटिशांच्या सांस्कृतिक गुलामगिरीचेही प्रतीक वाटत होते. ही सांस्कृतिक गुलामगिरी होती. ही थांबवणे गांधींसाठी स्वातंत्र्याची कसोटी होती.

काठेवाड संस्थान. राजधानी पोरबंदर. तिथे सुंदर कीर्तीमंदिर आहे. या इमारतीचा तळ मजला. इथे एक खोली आहे. साडे एकोणीस फूट लांब. तेरा फूट रुंद. अकरा फूट उंच. तिचे मूळ स्वरुप विलक्षण होते. भर दुपारी तिथे अंधार असायचा. तिलाच जोडून डाव्या बाजूला लहानशा आकाराचे एक स्वयंपाकघर होते. तिथे दोन व्यक्तींना मोकळेपणाने बसणेही अवघड

होते. या खोलीत पुतळी आईने आपले उभे आयुष्य घालवले. या खोलीच्या उजव्या बाजूला शिरावे. तिथे एक लहानशी खोली आहे. तिथे मोहनदासची आजी लक्ष्मीबाई रहायची. आजीसोबत तुळशीदास होता. ही आजी हयात होती. पुतळी आईने या काळोख्या खोलीत मोहनदासला जन्म दिला होता. या इमारतीमागे काही घरे ओलांडायची. तेवढेच मोठे एक घर लागते. हे कस्तुरचे माहेरघर.

उत्तमचंदांच्या घरात गांधी कुटुंबाच्या पाच पिढ्या राहिल्या. वाढल्या. समृध्द झाल्या. तो काळ संयुक्त कुटुंब पध्दतीचा होता. सारे एकाच घरात रहात. मधमाशांप्रमाणे सारे एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होत. घरात वीसहून कमी माणसे जेवायला नसायची. यात घरातील माणसे तर असतच. पाहुणे-रावळे असत. सचिव असत. कार्यालयातील कर्मचारीही असत. त्या घरात एक विशाल कुटुंब नांदायचे. मोहनदासला हा प्रेमाचा वारसा लाभला. इतिहास पुरुष काही प्रसन्न नव्हता. पारंपारिक वारसा मात्र समृध्द आहे.

कस्तुरच्या सासरची ही कथा आहे. तिच्या सासऱ्याच्या व्यक्तिमत्वावर राजकीय थाटमाटाचा शिक्का आहे. घरात मात्र साधेपणा आहे. त्या काळानुसार घर संयुक्त कुटुंबव्यवस्थेचा भाग आहे. करमचंद कर्तबगार राजपुरुष आहेत. पुतळी गृहकृत्यदक्ष गृहिणी आहे. तिच्या व्यक्तिमत्वावर माहेरहून लाभलेला प्रणामी संप्रदायाचा भावसमृध्द असा ठसा आहे. घर सर्वांचे आणि सर्वांसाठी आहे. सर्वांना सामावून घेणारे खुले आहे. या घरात नववधू कस्तुरचा प्रवेश होतो. सून कस्तुर पुढे आई बनते. गांधींसोबत प्रपंचाला लागते. थेट दक्षिण आफ्रिका गाठते. ही मनोरम कथा आहे. ती पुढे वाचायची आहे.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग: श्री मो. क. गांधी पृष्ठ ७.

❖❖❖

## ५) बालविवाहाचा दंश !

सौ. ब्रजकुंवर आणि श्री गोकुळदास मकनजी कापडिया. हे दांपत्य पोरबंदरला रहात होते. त्यांची कन्या कस्तुर. एकुण भावंडे पाच. तीन भाऊ, दोन बहिणी. एक भाऊ व एक बहीण बालपणीच देवाघरी निघून गेले. एकुलती एक बहिण कस्तुर. धाकटा भाऊ माधवदास. गोकुळदास धान्य आणि कापसाची निर्यात करत. निर्यात थेट आफ्रिकेत करत. कस्तुरचे आजोबा मकनजीही व्यापारी होते. यांचा कदाचित कपड्याचाही व्यापार असावा. यामुळे आडनाव कापडिया पडले असावे. त्यांच्या व्यापारी शाखा मुंबई व कलकत्यातही होत्या. कस्तुरचे माहेर श्रीमंत होते. कस्तुर बालपणापासूनच साहसी आणि निर्भय होती. कस्तुर मोहनदासहून सहा महिन्यांनी मोठी होती. ११ एप्रिल १८६९ कस्तुरचा जन्मदिवस.

करमचंदांनी आपल्या ज्ञातिबांधवांच्या उपस्थितीत कस्तुरला मोहनदाससाठी मागणी घातली. आज साखरपुडा होता. शुभ मुहूर्त ठरला. करमचंदांच्या घरची काही माणसे आलीत. एका पितळी थाळीत फुले-फळे आणि सोन्या-चांदीचे दागिने ठेवलेत. करमचंदांच्या कुटुंबियांनी त्या थाळीला हात लावला. आशीर्वाद दिलेत. कस्तुर नटली. नवी नवरी सजली. ती माजघरातून पुढे आली. ती थाळी तिच्या माथ्यावर ठेवून देण्यात आली. पुरोहिताने आशीर्वाद दिलेत. साखरपुडा झाला. हा धणे-गुळाचा विधी होता. ती अवघ्या सात वर्षांची होती.

करमचंदांना चार लग्ने करावी लागली होती. नियती फार कठोरपणे वागत असते. अशीच गोष्ट मोहनदासच्या बाबतीतही घडताना दिसते. त्याला कारण मात्र वेगळे आहे. परिमाण आणि परिणाम वेगळे आहेत. मोहनदासचा साखरपुडा झाला होता. एकदा नव्हे, दोनदा नव्हे अगदी तीनदा. तो केव्हा व कसा झाला याचा त्याला पत्ता नव्हता. दोन मुली एका पाठोपाठ वारल्या. त्या नुकत्याच चालायला लागल्या होत्या. त्या दोन्ही कन्या बालवयातच मृत्युमुखी पडल्या. ते साखरपुडे आपोआपच मोडलेत. तिसरा साखरपुडा त्याला काहीसा आठवतो. त्यावेळी त्याचे वय सात-एक वर्षांचे होते. अर्थात् या साखरपुड्यांविषयी त्याच्याशी कुणीही काहीही बोलले नव्हते. सल्ला वा मत विचारायचा तर प्रश्नच उद्भवत नव्हता. लग्नात मात्र वर-वधू दोघांची गरज असते. काही विधीही करायचे असतात. गांधीजींनी आपली विवाह कथा आपल्या आत्मचरित्रात सांगितली आहे.

गांधी कुटुंबीय श्रीमंत नव्हते. समाजात मात्र मोठा मान होता. सरकार-दरबारी वजन होते. करमचंदजी ब्रिटिश सरकार-दरबारी दिवाण होते. या कुटुंबात बालविवाह काही गैर नव्हता. मोहनदासला तेरा वर्षे पूर्ण झालीत. तो माध्यमिक शाळेत शिकत होता. तिसऱ्या इयत्तेत होता. आजची ही आठवी इयत्ता होय. घरच्यांनी त्याच्यासाठी एक मुलगी बघितली. मुलीच्या घरच्यांशी करारही केला होता. लग्न लावण्याविषयी वर-वधूंचे आई-वडिल एक करार करतात. हा करार म्हणजे साखरपुडा. साखरपुडा मोडू शकतो. एकदा साखरपुडा झाला आणि वर वा वधू वारले तर कन्या विधवा होत नाही वा वर विधूर होत नाही. साखरपुड्यामध्ये मुला-मुलीचा काहीही संबंध येत नाही. दोघांना याविषयी गंधवार्ताही नसते. मोहनदासची सगाई म्हणजे साखरपुडा झाला होता. तीनदा साखरपुडा झाला होता. साखरपुडा व लग्न यात फरक आहे. काठेवाडात काय आणि महाराष्ट्रात काय. गुजरातेतील सगाई म्हणजे महाराष्ट्रातला साखरपुडा, वाङ्.निश्चय.

लग्न ठरले. कस्तुरच्या वडिलानी लग्नपत्रिका हाती घेतली. त्यावर तांबड्या शाईने निमंत्रण लिहिले. विड्याची पाने घेतली. सुपारी घेतली. खारका घेतल्या. मंदिराकडे निघाले. कुलदेवतेच्या मंदिरात पहिले निमंत्रण पोहोचले. मुलीसाठी सासरहून दागिने आले होते. मणिबंधाभोवती सोन्याची पोची. गळ्यात सोन्याची साखळी. सोन्याच्या बांगड्या. हिऱ्याची अंगठी. सोन्याची बाळी. नाकात नथ. घर पाहुण्यांनी गच्च भरले होते. नातलग, मित्र, शेजारी-पाजारी, मदतनीस, पाणके, वाजंत्रीवाले, स्वयंपाकी घरात पाय ठेवायला जागा उरली नव्हती. आंब्याची तोरणे सजली. केळीचे खांब आलेत. भिंतींवर स्वस्तिक रेखले गेले. अंगणात मंगल वाद्यांचा एकच गलका उडला होता.

रोज एकच विषय असायचा. मोठे व्हाड येईल. बडी-बडी मंडळी असेल. वरात पुढील आठवड्यात येईल. परवा येईल. उद्या येईल. वाट बघणे सुरु होते. आता आला की विवाहाचा मुहूर्त. तिच्या विवाहाची तयारी सुरु होती. कपडे आलेत. दागिने घडवले गेलेत. सांडगे झाले. पापडांची लगबग उरकून गेली. आजूबाजूच्या बायका मदतीला गोळा व्हायच्यात. नातलग बायका गोळा झाल्यात. बायका कामाला वाघ. रोज बत्ताशे वाटले जायचे. हसणे-लाजणे-मुरकणे याची कोण धांदल नुसती! नव्या कोऱ्या कपड्यांचा सुळसुळाट आणि सुवास. जागता उल्हास. कस्तुरला वाटायचे की विवाह म्हणजे केवढा आनंद आहे. बायका का भितात लग्नाला कोण जाणे.

आदल्या दिवशी कस्तुरला पीठी लावण्यात आली. हळद, चंदन आणि बदाम यांचे उटणे म्हणजे पीठी. आई, काकू, शेजारणी, मैत्रिणी जमल्या. तिकडे नवरदेवालाही पीठी लावली गेली. लग्नाच्या दिवशी सुगंधी तेल आणि सुवासित जडी बुटीच्या पाण्याने स्नान घालण्यात आले. हाता पायावर मेंदी चितारण्यात आली. मंगल तिलक सजला. विवाहाचा दिवस जवळ येऊन ठेपला. तिने पारंपारिक लाल काठाची साडी परिधान केली. माथ्यावर रेशमी ओढणी होती. घुंघट घेतला होता.

थांबले. अखेर वाट बघणे थांबले. चिंता संपली. आली, आली एकदाची वरात आली. राजकोटहून निघालेले व्हाड पोरबंदरला पोहोचायला किमान पाच दिवस लागायचेत. सव्वाशे मैलांचा प्रवास होता तो ! कस्तुरच्या घरी या लग्नाचा आनंद होणे स्वाभाविकच होते. तीन तीन नवरदेवांचे व्हाड निघाले होते. राजा आणि परधान्याची जोडी. रथासारखी सजवलेली बैलगाडी. त्या पाठोपाठ बैलगाड्यांची लांबच लांब रांग. बैलांच्या गळ्यातील घुंगरघंटा निनादत आहेत. पाठीवर भपकेबाज रंगीबेरंगी झुली. झुली झुपकेदार. बाल नवरदेव आणि त्यांच्याहूनही हर्षभरित झालेली वरात निघाली. काही छकड्या गाड्या निघाल्या होत्या. बैल मस्तवाल. उभट बाकदार शिंगांचे. शिंगे रंगवलेली. शिंगांना बांधलेले लहरते रेशमी गोंडे. गळ्यात कवड्यांच्या चकाकत्या माळा. पितळी घुंगुरांच्या घणघणत्या माळा. झरझर. झरझर. झरझर. फरफर. फरफर. फरफर. घणघण. घणघण. घणघण. असा नादकल्लोळ! पोरबंदरच्या वेशीवर व्हाड पोहोचले आहे. महिला वर्ग वेगवेगळ्या दाग-दागिन्यांनी सजला आहे. झकपक पोशाख आहे. त्यांच्या कंठस्वरांनी लग्नगीते झरताहेत.

या लग्नाचा आनंद मोठा होता. त्यात एक गंमत होती. करमचंदांच्या घरातलीच तीन-तीन लग्ने सोबत होती. एका मंडपात तीन-तीन लग्ने आटोपायची होती. गांधी कुटुंबात मोठा होता लक्ष्मीदास. त्याचे लग्न झाले होते. मोहनदासपेक्षा दोन वर्षांनी मोठा एक भाऊ होता. त्याचे नाव होते करसनदास. तो शिक्षणात एक वर्षाने पुढे होता. मोहनदासचा एक चुलत भाऊ होता. मोतीलाल. तो तुलसीदास काकांचा मुलगा होता. तो त्याच्यापेक्षा एका वर्षाने मोठा होता आणि खुद्द मोहनदास. अशी तीन-तीन लग्ने. लग्नात थाटमाटही होईल. खर्चही कमी लागेल. तीन लग्ने एक साथ करायचे ठरवले. मुबलक खर्च करायला काय हरकत आहे.? चुलते व वडील वृध्द होते. नवरदेव त्यांचे सर्वात धाकटे मुलगे. लाडा-कोडाचे. हा लग्न सोहळा आनंददायक. आपल्या डोळ्यांदेखत पार पडावा अशीही त्यांची इच्छा होती. नाना गोष्टी होत्या. यामुळे ही तिन्ही लग्ने एकत्र करायचे ठरवले. याची तयारी अनेक महिन्यांपासून चालू होती. मोहनदाससाठी कस्तुर नावाची मुलगी ठरवली होती. हे सारे घरातल्या मोठ्या मंडळींनी ठरवले होते. यात या लेकरांच्या कल्याणाचा विचार नव्हता. इच्छा वा अनिच्छेचा तर प्रश्नच नव्हता. विचार होता वडिलांच्या सोईचा. 'आपल्याला लग्न करायचे नाही' असे मोहनदास सांगत होता. त्याचे ऐकायला कुणालाच सवड नव्हती.

मुलाची आवड-निवड कोण बघणार? लग्न तर आई-वडिलांनी ठरवलेले होते. त्यांच्यापुढे प्रश्न वेगळेच होते. लग्न कसे थाटात लावायचे. मांडव केवढा मोठा घालायचा? पंक्ती कशा थाटात द्यायच्या? मान-पान कसे जोशात करायचे? वाजंत्री वाजवणाऱ्यांना किती पैसे द्यायचे? लग्न खर्चात आपला वाटा किती? वधू पक्षाचा वाटा किती? एक का गोष्ट होती? या व यासारखे नाना विषय. यावर चर्चा चालायची.

अंगणात सनईवाल्याने सूर धरला होता. ढोलकियाने ढोलकावर थाप दिली. गरबा खेळण्यासाठी जमलेल्या बायकांची झुंबड उडली. टिपऱ्यांच्या नादाने गिरकी घेतली. चंडोल पक्ष्यासारखा गरबा हळूहळू आकाशाशी स्पर्धा करु लागला. पलीकडे बायका लग्नाची गाणी गात होत्या. त्यात सूर, लय, ताल शोधायचे काही कारण नव्हते. काही गाणी विनोदी होती. काही चिडवणारी होती. काही गंमती-जंमतीची होती. काही गाण्यांमधून कस्तुरच्या सासरच्या वैभवाचे वर्णन होते. काहीगाणी वधुची प्रशंसा गाणारी होती. काही वधूला उपदेश करणारी होती. काही माहेरच्या विरह-वियोगाचा महिमा गाणारी होती. काही सासरच्या कठिण परिस्थितीचे वर्णन करणारी होती. काही वडिल आणि सासरे, आई आणि सासू, भाऊ आणि दीर, बहिणी आणि नणंदा यांच्यातले साम्य-भेद वर्णन करणारी होती. काही पूर्वजांचे स्मरण करणारी होती. काही गाणी आशेचे तोरण गुंफणारी होती.

नवरदेवाचे एक घर पोरबंदरला आहे. कस्तुरला त्या घराची ओळख आहे. या अंगणात मोहनदासचा विटी-दांडूचा खेळ रंगायचा. गोट्यांचा डाव चालायचा. दोन-पाचशे पावलांचेच अंतर होते. शेठ गोकूळदास मकनजी कापडिया यांचे घर शेजारीच होते. त्या अंगणापर्यंत मोहनदास अनेकदा जाऊन आलेला होता. गोकूळदास यांचे घर भले-थोरले. घरासमोर मोठी मोकळी जागा काही नव्हती. अगदी बालपणी कस्तुर तिथेच खेळायची. खेळत-खेळत थेट गांधी कुटुंबाच्या अंगणापर्यंत येऊन पोहोचायची. आजचा दिवस नवलाईचा. सर्वांचे नवे-कोरे कपडे. दाराशी सनई-चौघडा निनादत आहे. ब्रजकुंवर सासुबाई जोशात आहेत. त्यांच्या आनंदाला पारावार नाही. स्वयंपाक कक्षातून पक्वान्नांचा सुवास दरवळत आहे. बायका एकमेकांच्या थट्टा-मस्करीत मश्गुल आहेत. रोजचे राजकुमार आज थेट राजा बनले आहेत.

अहो, आता वऱ्हाड तर वेशीवर येऊन पोहोचले आहे. स्वागत झाले. अजून वरपिता मात्र यायचे आहेत. त्यांची वाट बघितली जात आहे. ते राजकोटचे दिवाण आहेत. राजकोटच्या ठाकूर साहेबांनी करमचंदांना थांबवून ठेवले आहे. काही चर्चा-मसलत करायची असेल. वरपिता वऱ्हाडाच्या सोबत नाहीत. करमचंद दिवाण खरे पण आहेत. तर नोकरच ना. त्यात ते राजाच्या विशेष मर्जीतले दिवाण मग काय? ठाकूर साहेब त्यांना अखेरच्या क्षणापर्यंत जाऊ देत नाहीत. अखेर परवानगी मिळते. उशीर झाला होता. ठाकूर साहेबांनी विशेष सोय करुन दिली होती. दोनच दिवसात करमचंद पोहोचणार होते. ते तीन दिवसात आले. ठाकूर साहेबांनी वेगवान तांगा दिला होता. तांगा दौडवत ते निघाले. यापूर्वी सारे वेगाने निघाले होते. करमचंद घाई करत होते. करमचंदांचा घोडा अडला. बग्गी हाकणारा चिडला. त्याने आसूड उगारला. घोडा बेफाम धाऊ लागला. मग काय? घोडा उधळला. बग्गीचे उजवे चाक निखळले. बग्गी कलंडली. वर उडली. चाक लांबवर जाऊन पडले. चालक घायाळ झाला. करमचंद तर घायाळ झालेतच. ते खाली पडले. त्यांच्या डोक्याला लागले. हाताला कोपराजवळ जखम झाली. पाय मुरगळला. त्यांनी कोरे धोतर फाडले. कपाळावर कापडी पट्टी बांधली. उपरण्याच्या पट्टया केल्या. जखमा बांधल्यात. चालकाच्या जखमा बांधल्यात. हात गळ्यात अडकला. पायाला जखम झाली होती. आजूबाजूचे शेतकरी धावत आले. बग्गीला चाक जोडले. घोडे पुनरपि सज्ज झालेत. वरातीच्या आनंदावर विरजण पडले खरे. विवाहाविषयीचा अर्धा आनंद तर असा मावळून गेला. सगळ्यांनी सगळे समजून घेतले. नाराजी नाही. राग नाही. रुसवा नाही. बायकांचा फुगवा नाही. करमचंद विवाह स्थळी पोहोचले होते. कसेबसे मंडपात जाऊन बसले. उसने अवसान आणून बसून राहिले. चेहरा तेवढा प्रफुल्लित राखला. शरीर ठणकत होते. लग्नात मात्र परिपूर्ण भाग घेतला. मंडपातल्या मंडळींना हायसे वाटले. या सामुदायिक विवाहाची शोभा औरच. ती काय वर्णावी? चहुकडे आनंदच आनंद. सारे मधुरभाषी.

तीन नवरदेव रथावरुन खाली उतरतात. मोतीलाल घोड्यावर बसतो. मोहनदास घोड्यावर बसायला काही नाही म्हणत नाही. सोनसाखळी मात्र परिधान करत नाही. विवाह समारंभ संपन्न झाला. तीन माता-पित्यांनी वधुंना हाताशी धरून मंडपात आणून बसवले.

चार कोपऱ्यात मंगल पितळी कलश उतरंडीने रचले होते. आंब्याच्या पानांची तोरणे सळसळती होती. मंडप फुलांनी शृंगारलेला होता. मोहनदास पूर्वाभिमुख बसला होता. कस्तुर त्याच्या समोर पश्चिमाभिमुख होती. मध्ये आंतरपाट सजला होता. 'तदेव लग्नं सुदिनं तदेव तारा बलं चंद्र बलं च' झाले. वर-वधुंनी एकमेकांना माळा घातल्यात. गोकूळदासाने कस्तुरचा उजवा हात मोहनदासच्या हाती सोपवला. सप्तपदी पार पडली. करमचंदांनी एका नातलगाच्या खांद्यावर हात ठेवला. हळूहळू पावले टाकत मंडपात आले. कन्यादानाचे उदक हाती झेलले.

एकाच मंडपात तीन-तीन विवाह संपन्न झालेत. बायकांची कोण घाई उसळली होती तिथे. भरीस भर मुलांचा वाढता गोंधळ! मंडपात चौरंगावर मोहनदास बसला होता. शेजारी पाटावर नवी नवरी बसली होती. चांदीची वाटी आली. त्यात तूपा-गुळाचा घास होता. कस्तुरने मोहनदासला घास भरवला. मोहनदासने आता कस्तुरला घास भरवायचा. केवढा मोठा घुंघट घेतला होता कस्तुरने. नवरा मुलगा सुंदर होता की नवरी मुलगी? खरे तर कस्तुरच अधिक सुंदर होती. दोघे उठले. आता कवड्यांचा खेळ सुरु झाला. छोट्या परातीएवढ्या तांब्याच्या एका खोल पात्रात पाणी भरले होते. या पात्राला गुजरातीत 'खुमचा' असे म्हणतात. पाण्यात कुंकू टाकले होते. पाण्यात होत्या कवड्या. त्या हातात घ्यायच्या आणि हा खेळ खेळायचा. नवऱ्याच्या मुठीत किती कवड्या आहेत. हे नवरीने ओळखायचे. नवरीच्या मुठीत किती कवड्या आहेत. हे नवरदेवाने ओळखायचे, असा खेळ. खेळाचे नाव 'एकी की बेकी?' नवरा आणि नवरी आमने-सामने बसले होते. खेळाची आवर्तने होत राहिलीत.

सारे काही ठरल्याप्रमाणे झाले. मोहनदासचे लग्न आटोपले. कस्तुरने शाळेचा उंबरठा काही ओलांडलेला नव्हता. तिला अक्षर ओळख नव्हती. घरकामात मात्र ती तरबेज होती. स्वयंपाक उत्तम करायची. शिवण-टिपण करायची. मंदिरात देवदर्शनाला जायची. कस्तुरशी मोहनदासचा विवाह झाला. व्याही मंडळी एकमेकांशी परिचित होती. करमचंद पोरबंदरचे दिवाण होते. गोकूळदास मकनजी कापडिया कधी काळी प्रतिष्ठित नगरशेठ होते. दोघे परस्परांना ओळखत होते. दोघांची मैत्री होती असेही सांगता येईल. दोघांची घरे जवळ-जवळ होती. या घरातला खाद्यपदार्थ त्या घरी पोहोचायचा. कन्येसाठी वराचा शोध घेताना गोकूळदास यांनी करमचंद गांधी यांचा विचार केला. त्यांच्या चतुरपणाचा विचार केला. प्रशासकीय कौशल्य ध्यानी घेतले. समृध्द वारशाचे स्मरण केले. ब्रजकुंवर पुतळीला बघत होत्याच. पुतळी भल्या स्वभावाची होती. उदार वृत्तीची होती. तिच्या पोटात माया-ममता होती. लेकीला अशी सासू लाभावी असा विचार कोणती आई करणार नाही? तिलाही अत्यानंद झाला. करमचंदचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. पुतळीबाईला उपजत शहाणपण लाभले होते. राज्याशी संबंधित तमाम गोष्टींची तिला अद्ययावत माहिती होती. दरबारातील स्त्रियांना तिच्या बुध्दिमत्तेविषयी आदर वाटायचा. हे सारे ब्रजकुंवरना ठाऊक होते.

❖❖❖

## ६) कस्तुर सासरी निघाली!

लग्न लागले. सारे विधी पार पडले. वऱ्हाड परतत होते. एका घोडा गाडीत नवरदेव बसले होते. त्यांच्या सोबत थोरले भाऊ लक्ष्मीदास होते. याच घोडागाडीत जखमी करमचंदही होते. कस्तुर, गंगा आणि थोरल्या जाऊबाई नंदकुंवरताई एका गाडीत होत्या. या सुनांच्या सोबत पुतळी आई होत्या. त्यांची गाडी स्वतंत्र होती. कस्तुरच्या मनात गोंधळ होता. अजून सासरे लंगडतच होते. त्यांना परत काही अपघात होऊ नये. सर्वांच्या ओठांवर प्रार्थनेचे स्वर होते. प्रवास सुखाचा होवो अशी प्रार्थना होती. मनात धाकधूक होती. घोडे दौडवावे असे कस्तुरला वाटायचे. करमचंद घोडे दमतील असे म्हणत होते. त्यांना तांगा मंद गतीने हवा होता. मोठी जाऊ गंगाचा डोळा लागला होता. कस्तुर वयाने मोठी होती पण ती लहान जाऊ होती. कस्तुरने पोरबंदरची सीमा वयाच्या तेराव्या वर्षांपर्यंत कधी ओलांडली नव्हती. प्रथमच जणू ती एका नव्या विश्वात प्रवेश करणार होती. तिला सोबत घेऊन वरात परतीला लागली. पुतळी आईला धाकट्या सुनेचे अपरंपार कौतुक होते. त्या साध्या-सुध्या होत्या. त्यांना झकपक पोशाखाची आवड नव्हती. जड-जवाहिरात रस नव्हता. पूजा-प्रार्थना केल्याशिवाय त्या अन्नाचा घास घेत नसायच्या. ही धार्मिकता काही कस्तुरला नवी नव्हती. तिचे आई-बाबाही धार्मिक वृत्तिचेच होते. राजकोट येथे रलियातताई या थोरल्या भगिनीने औक्षण केले. भावानी बहिणीला ओवाळणी घातली. आईनेच दोघांच्या वतीने बहिणीला भेटी दिल्या. वर-वधुंचा गृहप्रवेश झाला. पुतळीने मुलांना व सुनांना सोबत घेतले. पोरबंदरच्या वैष्णव मंदिरात नेले. या मंदिराला हवेली म्हणतात. शिव मंदिरात नेले. फकीरांच्या दर्ग्यावरही नेले.

कस्तुरचे सासर मोठे होते. दिवाणसाहेबांचे घर होते ते. घर मोठे. माणसे भरपूर. दीर-जाऊबाई. वन्संबाई-जावई. सासु. सासरे. राजकोटच्या दिवाणाचे घर. घर कसले? तो तर भला थोरला वाडा होता. कस्तुर नव्या घरात आली. घरातल्या प्रमुख होत्या सासुबाई. त्यांच्या हाताखाली थोरल्या दोन्ही जाऊबाई. मोठ्या वन्संबाई. कस्तुर धाकटी सून. तिची जबाबदारी काही फार मोठी नव्हती. सासुबाईंचा आदेश पाळायचा. घरात मोठ्या जावा. सारेच तिला काम सोपवू शकायचे. अगदी तिच्यासोबत लग्न झालेली गंगाही कामे सांगायची. तिला सर्वांचे म्हणणे ऐकायचे होते. दिवस आनंदात चालले होते. सारे सांभाळून घेणारी सासू होती. कस्तुर मुलगीच तर होती. आता बाई बनली. तिच्या मुखावर घुंघट आला. परक्या पुरुषांपुढे जायचे नाही. घरात वडिलधारी मंडळी असते. त्यांच्यासमोर घुंघट हवा. पुतळी आई हुशार होती. तिला सारे कळायचे. ती आदेश देत नसे. काम करुन दाखवत असे. छान घर. सारे संवादी सूर.

माहेरात कस्तुर लाडकी कन्या होती. तिला श्रमाची फार सवय नव्हती. सासरची रीत वेगळी होती. कस्तुरचे माहेरही वैष्णव संप्रदायात दीक्षित होते. देवळात म्हणजे हवेलीत दर्शनासाठी जायची परंपरा होती. सासूचे हे वर्तन सहज स्वाभाविक होते. कस्तुरचे मन या दोन महिलांमध्ये तुलना करायचे. 'अगं आई' ते 'अहो आई' असा प्रवास होता. सौराष्ट्रात स्वामी नारायण संप्रदायाचा प्रभाव होता. प्रणामी संप्रदायाचा प्रभाव होता. जैन साधू-साध्वींचा प्रभाव होता. मुस्लिम फकीर करमचंद यांच्याकडे चर्चेला येत. विविध धर्म-मतांची त्या परिवारावर छाया होती.

दिवस आनंदात जायचा. दिवसभर कस्तुर काही-ना-काही कामात असायची. दिवसभर राब-राब राबायचे. रात्र आली की वनवास सुरु व्हायचा. मोहनदासचे शयनकक्ष तिसऱ्या मजल्यावर होते. दोन जिने चढून जावे लागायचे. तो हायस्कूलमध्ये शिकत होता. त्या मोठ्या घरात त्यांची भेट रात्रीच होत असे. काय होते त्या भेटीचे तात्पर्य? दोन निर्दोष बालके एका अजाणत्या विश्वात प्रवेश करत होती. पहिल्या रात्री कसे वागावे याची शिकवण त्याला वहिनींनी दिली होती. दोघे एकमेकाना आजमावून बघत होते. भय अधिक होते की लाज? सांगणे अवघड आहे. काय बोलावे? कसे बोलावे? हे कुणालाच कळत नव्हते. अशावेळी मिळालेल्या तथाकथित शिकवणीचा तरी काय उपयोग? या गोष्टी का शिकवाव्या लागतात? आपल्या पहिल्या भेटीचे वर्णन खुद्द गांधीजीच आपल्या आत्मचरित्रात करतात "ती पहिली रात्र. दोन निर्दोष बालकांनी अजाणता प्रपंचात प्रवेश केला. मी पहिल्या रात्री कसे वागावे त्याची शिकवण वहिनींनी दिली होती. धर्मपत्नीला कोणी दिली होती, ते विचारुन घेतल्याचे



एच-१७०
३

मला स्मरत नाही. वाचकांना एवढे सांगू शकतो की आम्ही दोघेही एकमेकांना भीत होतो अशी अंधूक आठवण आहे. एकमेकांची लाज तर वाटत होती. काय बोलावे, कसे बोलावे, हे मला काय कळे? मिळालेल्या शिकवणीचा तरी काय उपयोग? जेथे संस्कारच बलवान असतात तिथे शिकवण ही व्यर्थ बडबड होऊन बसते. हळहळू एकमेकांना ओळखू लागलो. बोलू-चालू लागलो. आम्ही दोघे सारख्याच वयाचे आहोत. मी मात्र स्वामित्व गाजवायला सुरुवात केली."[१] आपल्या मनात विषयवासना कशी उद्भवली त्याचे वर्णनही गांधीजी करु शकत होते. वाचकांनी तशी जिज्ञासा ठेवू नये. हा सल्ला त्यांनी दिला आहे. आपल्या लज्जेवर पांघरुण घातले आहे.

कस्तुरच्या जीवनातील ते रम्य क्षण होते. रात्री विश्रांतीची वेळ असायची. मोहनदास तिला शिकवू बघत होता. या काळातील महाराष्ट्राचे जनजीवन बघू. पतीचे ऐकून इंग्रजी शिक्षण घेऊ लागलेल्या भगिनी बघू या! रमाबाई रानडे काय किंवा काशीबाई कानिटकर काय. यांचा घरच्यांकडून अपरंपार छळ झाला आहे. त्या काळात मोहनदास आपल्या पत्नीला शिकवण्याची खटपट करत आहे. पत्नी अनुगामिनी तर आहेच. तिला सहगामिनी बनवण्याची त्याची धडपड आहे. ही धडपड विलक्षण आहे. आधी कस्तुरला वाटले होते की रात्र तर स्वर्गासारखी पारदर्शक असेल पण तिची फसगत झाली. कसले काय अन् कसले काय? त्या स्वर्गद्वाराला जणू एक काटेरी कुंपण होते. प्रत्येक भेटीत मोहनदासची कटकट सुरु असे. शिकायला अजिबात अनुकूल परिस्थिती नव्हती. शिकवणी सुरु व्हायची. ती काही नियमित नसायची. हे बरे होते आणि वाईटही होते. तिला शिकायची गोडी नव्हती यामुळे बरे होते. एकदम अभ्यास करावा लागायचा हे वाईट होते. नवऱ्याचा आग्रह शिगेला पोहोचायचा. नवरा की शिक्षक? शिक्षक की नवरा? या प्रश्नांचे द्वंद्व तिला भेडसावत रहायचे.

मोहनदास दिवसभर शाळेत असायचा. सायंकाळी घरी परत यायचा. थकून-भागून यायचा. कस्तुर निरक्षर होती. साधी-भोळी, स्वतंत्र वृत्तीची आणि परिश्रमी होती. नवऱ्याशी तर ती खूप कमी बोलायची. आपल्याला लिहिता-वाचता येत नाही याची तिला कधी खंत नाही वाटायची. नवरा शिकला म्हणून आपणही शिकायला हवे असे काही तिला कधी वाटले नाही. तो जबरीने तिला शिकवू बघत होता. हे शिक्षण रात्री एकांतात शक्य होते. शिकवण्याची संधीही प्रतिकुल होती. आता खरे म्हणजे लिहायला-वाचायला शिकून काय करायचे होते? बरे जावाना काय वाटले असते? 'ही शिकून आली की मोठी आमच्या डोक्यावर मिऱ्या वाटायला. त्यांच्या थट्टेची का वाटेकरी होऊ मी? त्या टिंगल नाही का करायच्या माझी?' ती असा विचार करायची. आपल्या शिक्षणाचा आपल्या जावांवर विपरित परिणाम होईल असे तिला वाटायचे. यासाठी ती जपायची. सासू काय विचार करील? जबरदस्तीने शिकवले तरी तिचा जीवनविषयक दृष्टिकोण का बदलणार होता? एक का शंभर प्रश्न. प्रश्नांचे आग्यामोहोळ तिला भंडावून सोडत असे. हे पुरुषांना कसे कळणार? नाहीच कळणार मुळी. अशी तिची ठाम समजूत होती. घरातल्या एकाही बाईला लिहायला-वाचायला येत नव्हते. आईला नाही. सासुबाईंना नाही. जावांना नाही. नणंदेला नाही. खरेच काय बरे बिघडले होते त्यांचे? कस्तुरने उघडपणे कधी नवऱ्याला विरोध नाही केला. पाठाकडे लक्षही दिले नाही, एवढेच.

काठेवाड सामाजिक दृष्ट्या मागास होता. बुरख्याचा निरुपयोगी व अडाणी रिवाज रुढ होता. यामुळे शिकवायची संधीही प्रतिकूल होती. शिकवण्याचे प्रयत्न भरपूर झालेत. ते सारे व्यर्थ गेलेत. विषयाची आसक्ती हे एक ठळक कारण. कस्तुरची अनिच्छा हे दुसरे कारण. पुढे मोहनदास सार्वजनिक जीवनात गुरफटला गेला. घरच्यासाठी वेळ असा उरला नाही. शिक्षकांच्या मदतीने शिकवण्याचे प्रयोगही व्यर्थ गेलेत. कस्तुर जेमतेम पत्र लिहू शकली. गुजराती भाषेचे सर्वसामान्य ज्ञान मिळवू शकली. एवढी शिदोरी तिच्याजवळ होती. नवऱ्याच्या मनात द्वंद्व होते. शिक्षणावर कधी विषयवासना स्वार व्हायची. प्रेम होते खरे पण ते विषयदूषित मानावे लागेल. अन्यथा कस्तुरही विदुषी बनली असती. तिच्या मनी शिक्षण विरोधी भावना होती. ही शुध्द प्रेमाने घालवता आली असती. शुध्द प्रेमाला काही अशक्य नाही.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग: श्री मो. क. गांधी पृष्ठ १०.

❖❖❖

## ७) प्रतिबंधांचे कुंपण

मोहनदासची परवानगी घेणे कस्तुरसाठी आवश्यक होते. त्याशिवाय त्या वाड्याच्या कुंपणाच्या पलिकडे तिला पाऊलसुध्दा टाकता यायचे नाही. लग्न म्हणजे आनंद मानायचा ना? छे, नाना अडथळे होते. विविध आदेश होते. ती निषेधांची एक न संपणारी लांबच लांब रांग होती. मोहनदासला काही बाबींचे आकलन झाले. बायको स्वयंप्रेरणेने वागते. त्याने आपल्या आदेशांच्या औचित्याबद्दल तिचे समाधान करुन दिले पाहिजे. अन्यथा ती त्याकडे दुर्लक्ष करते. आपल्या मनाने वागायला स्वतंत्र असते. मोहनदास दबाव घाली. ती अधिक मोकळिक घेई. तो अधिकाधिक चिडत असे. कस्तुरची मोकळिक निर्दोष होती. तिच्या मनाला पापाचा लवलेशही नव्हता. ती का नियंत्रण सहन करील? ती स्पष्ट होती. ठाम होती. स्वतंत्र होती. मितभाषिणी होती. नवऱ्याच्या मनात वक्रता होती. वक्रतेच्या मूळाशी प्रेम होते. ते तिला कळत होते. तिचे जीवन बदलून गेले होते. तिच्या इच्छा आता तिच्या स्वतःच्या उरल्या नव्हत्या. ती होती मोहनदासची बायको. रात्र उजाडली की कोरडे शब्द. हुकूमी आवाज. स्नेहशून्य नजरेचे तापते वाळवंट. रात्रीचे एकाकीपण. त्याला बिलगून असणारा वासनेचा चिकट अंधार. देहाभोवती लपेटलेले हात. ते तिला बाजूला सारावेसे वाटत. तिला शरीरासोबत मन आहे. विचार आहे. आवडनिवड आहे. हृदय आहे. या गोष्टींकडे कुणाचे लक्ष होते? वयाच्या तेरा ते अठरा वर्षांचा काळ असा गेला. मोहनदास तिला शिकवायचा प्रयत्न करायचा. ती त्याचे बेत उधळून लावायची. कस्तुरचा स्वभाव साहसी होता. तिला भीती माहित नव्हती. तिला ना अंधाराचे भय वाटले ना चोरा-चिलटांचे. ना साप-विंचूचे भय वाटले ना भूता-खेतांचे भय. ती अंधारात कुठेही जाऊ शकत होती. "माझ्यापेक्षा माझी बायको अधिक हिंमतवान होती. तिला सापा-बिपाचे भय काय ते माहितच नव्हते. ती अंधारातून एकटी जाई. या गोष्टीची मला लाज वाटते."[१] असे गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रात नमूद करुन ठेवले आहे. कस्तुर स्पष्टवक्ता होती. मोहनदास नवरेपणा मिरवू पहात होता. ते चूक होते. तिने त्याच्या आज्ञा अमान्य केल्या. प्रेमाने त्यांचा अस्वीकार केला. ही अहिंसेची साधना होती. ही अहिंसाच तर सत्यप्राप्तीचे अमोघ साधन होती. साध्य-साधन विवेक गांधीजींनी पाळला. पाळायला लावला. कस्तुर गांधीजींची अहिंसा गुरु आहे.

गांधीजींना विवाहामागील कुरुपता दिसते. ती सांगितल्याशिवाय त्यांना राहवत नाही. ते लिहितात की आपल्या समाजात विवाहाचा मोठा बडेजाव असतो. ही काही अशी-तशी घटना नाही. वर-वधूचे माता-पिता पैसे उधळतात. काळाचा अपव्यय करतात. अक्षरशः सर्वस्व घालवून बसतात. कित्येक महिने तयारी करतात. कापड घेणे वेगळे. शिवणे वेगळे. सोने खरेदी करणे, दागिने घडवणे, गाव भोजनांचे अंदाज बांधणे, पक्वान्नांच्या चढाओढीचा विचार करणे या सारख्या शंभर बाबी असतात. गान कलेचा काहीही सुमार नाही. बायका घसा खरवडून गात रहातात. आजारी पडतात. शेजाऱ्याच्या शांततेचा भंग करतात. शेजारीही सारे सहन करतात. त्यांच्याकडेही असा प्रसंग यायचा असतो ना? ते मग गोंगाट झेलतात. खरकटे अंगणात सांडू देतात. सारे मुकाटपणे सहन करतात. लग्नसमारंभात हे सारे आपापतः घडतेच.

आपला विवाह तेराव्या वर्षी झाला. ही गोष्ट गांधीजींनी दुःखाने लिहिली आहे. मोठे झाल्यावर ते बालकांना बघतात. त्यांना मग स्वतःचीच कीव वाटायला लागते. ही मुले या भयंकर प्रसंगातून बचावलीत असे वाटते. याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. त्यांचा बाल विवाह होता. हा का नैतिक होता? छे, अजिबात नाही. मागे वळून बघताना त्यांना हा प्रश्न पडतो. हा विवाह अजिबात समर्थनीय नाही असे त्यांना ठामपणे वाटते. आपल्या बालविवाहाची कथा त्यांनी स्वतःच लिहिली आहे. त्यांच्या आत्मचरित्राचे एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्याचे नावच मुळी 'बालविवाह' असे आहे. यात विवाह विषयक आठवणी आल्या आहेत. या प्रकरणाची सुरुवात गांधीजी अनिच्छेने करतात. ही कथा त्रासदायक आहे. यात त्यांना भरपूर कडू घोट घ्यावे लागले.[२]

मोहनदासला बालविवाहाची प्रथा अनिष्ट वाटली. तो लहान होता. आपण मोठे होऊ. या प्रथेविरुध्द लढू असे त्याने मनाशी ठरवले. बालविवाहाची प्रथा

मध्ययुगात दिसते. शत्रुच्या नजरेतून वाचणे हा कदाचित हेतु असावा. काठियावाड राजे-रजवाड्यांचा प्रदेश. इथे सुधारणेचे वारे मंदगतीनेच प्रवेश करत होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्ध्दात देशभरात बालविवाहाची परंपरा होती. या काळात इंग्रजांची सत्ता होती. बालविवाह अपराध मानणारा कायदा मात्र नव्हता. एवढेच नव्हे पण संस्थानिकांकडे बालविवाह होत. बड्या श्रीमंतांच्या घरात बालविवाह होत. या समारंभांना ब्रिटिश सरकारचे मोठ-मोठे अधिकारी हजेरी लावत. बाल जोडप्यांना भेटी देत. शुभेच्छा देत. अशी जणू राजमान्यता होती. सामाजिक संमती होती. लग्नात मोठी गर्दी व्हायची. जवळचे-लांबचे नातेवाईक जमत असत. गावकरी जमत. एक आनंद सोहळा असायचा. हे सर्वसामान्य दृश्य होते. याला अपवाद नव्हता.

बालविवाहाचा रिवाज घातक आहे. यातून थोडी मोकळीक मिळायला हवी. समाज जीवनात तशी पध्दतही ठेवली होती. बाल पती-पत्नींची काळजी त्यांचे आई-वडिल घेत. दोघाना फार काळ एकत्र राहू देत नसत. बायकोचा अर्ध्याहून अधिक काळ माहेरी जायचा. कस्तुर-मोहनदासच्या बाबतीत अर्थात् असे झाले. लग्नानंतर सहा वर्षे दोघे एकत्र होते. साधारणपणे तीन-एक वर्षे दोघे सोबत राहिले असावेत. या दरम्यान अधून मधून कस्तुर माहेरी जाई. सात-आठ महिने व्हायचे. माहेरहून सांगावा यायचा. दोघाना वाईट वाटायचे. नवऱ्याला अधिक वाईट वाटायचे. मुलीला माहेरचे आकर्षण असायचेच. ही कौटुंबिक व्यवस्था होती. या सक्तीमुळे दोघे बचावले.

तो काळ समाज सुधारणेचा होता. देशात समाज सुधारक होते. चळवळ सुरु होती. शाळेत शिक्षक तशी चर्चा करत. ही चर्चा मोहनदासला ठाऊक होती. नवरा मेला की बायको विधवा व्हायची. पत्नी पतीच्या चितेवर उडी मारायची. सहगमन करायची. सती व्हायची. ही सतीची चाल होती. ही थांबवण्यासाठी अनेकांनी लेखन केले. चळवळ केली. मोहनदासचे वय कोवळे होते. या वयात लग्न म्हणजे एक खेळ वाटायचा. पोरखेळ. मुला-मुलींची आवड-निवड कोण बघणार? विवाह जवळपास जबरदस्तीने लाऊन दिले जात. ही पध्दत रानटी होती. चुकीची होती. हे समजावून सांगणारी काही पुस्तके होती. छोटी-छोटी पुस्तके. निबंधांच्या लहान-लहान चोपड्या. त्या बाजारात मिळत असत. पैशा-पैशाच्या वा पै-पैच्या असत. यातून पति-पत्नी प्रेम, काटकसर, बालविवाह या सारख्या विषयांवर चर्चा केलेली असे. मोहनदासच्या शाळेत एक शिक्षक होते. हे सुटा-बुटात रहात. ते अशी पुस्तके विकत. मोहनदासच्या लग्नाचे प्रयत्न सुरु होते. ही गोष्ट या शिक्षकाला ठाऊक होती. त्याने दोन पुस्तके त्याला फुकट दिलीत. वाचून काढायला सांगितले. मोहनदासने वाचून काढले. वाचलेले आवडले तर ते अंमलात आणायचे. न आवडले तर विसरून जायचे ही त्याची सवय होती.

एकपतिव्रत पत्नीने पाळावे हा विचार मोहनदासला आवडला. हा विचार त्याच्या हृदयात घोळत राहीला. सत्याची आवड तर होतीच. 'दांपत्य प्रेम आणि सहगमन' या नावाचे एक पुस्तक होते. दुसरे होते 'लग्न म्हणजे पोरखेळ आहे काय?' मोहनदासला उत्सुकता होती. बायकोची प्रतारणा करायची नाही. दुसऱ्या स्त्रीशी संबंध ठेवायचा नाही. हेही लक्षात आलेच. तसा लहान वयात एकपत्नीव्रताचा भंग होण्याचा संभव कमीच होता.

मोहनदासला प्रामाणिक पत्नी हवी होती. कस्तुरला याविषयी काही अडचण नव्हती. लग्नात सप्तपदी करताना दोघांनी शपथ वाहिली होती. तिचा हाच तर अर्थ होता. कस्तुरचा संस्कार दृढ होता. पतिव्रतेचा आदर्श तिला ठाऊक होता. या संबंधी दोघांची मते वेगवेगळी होती. मतभेदाची पहिली ठिणगी पडली. त्यांचे वैवाहिक जीवन व अनुभव विलक्षण आहेत. आपण जर एकपत्नीव्रत पाळले तर बायकोनेही एकपतिव्रत पाळायला हवे. हा विचार मनावर बिंबला. यातून मनात संशयाचे भूत जागले. 'पाळायला हवे' हा अर्थ बदलत-बदलत 'पाळायला लावायला हवे' इथपर्यंत येऊन पोहोचला. असे असेल तर बायकोवर बारीक लक्ष द्यायला हवे. हा विचार मनात जागला. याचा परिणाम व्हायला नको तो झाला. नवविवाहित मोहनदास नववधू कस्तुरवर नवरेपणा गाजवू लागला. कस्तुरवर पाळत ठेवायला सुरुवात झाली. आपली बायको नेहमी कुठे जाते? आपल्याला विचारुन का बरे जात नाही? बायको

कुठे जाते हे आपल्याला ठाऊक झालेच पाहीजे. तिने आपल्या परवानगीशिवाय कुठेही जाऊ नये. असे त्याला वाटायचे.

शारीरिक सामर्थ्यात कस्तुर नवऱ्यापेक्षा वरचढ होती. तिला स्वतंत्र इच्छाशक्ती होती. तिला घरगुती सामान्य ज्ञान होते. ते चूक की बरोबर याचा ती विचार करत बसणारी नव्हती. ते ज्ञान निर्भीडपणे अंमलात आणायचे धैर्य तिच्या ठायी होते. ते ज्ञान नवऱ्याच्या पुस्तकी ज्ञानापेक्षा अधिक अचूक ठरायचे. नवऱ्याने काहीही केले तरी तो काही तिला आपल्या इच्छेप्रमाणे वाकवू शकत नव्हता. शकत नसायचा. या आग्रहामुळे दोघांमध्ये दु:खदायक बेबनाव उभा राहिला. नवऱ्याच्या परवानगीशिवाय कुठे जायचे नाही. ही खरे तर एक प्रकारची कैदच झाली होती. कस्तुर अशा प्रकारची कैद सहन करणारी स्त्री नव्हती. ती मनाला येईल तेव्हा नवऱ्याला न विचारता बाहेर जायची. बाहेर म्हणजे कुठे? जावांच्या सोबत कुणा नातलगाकडे जायची. सासुबाईंच्या समवेत कधी मंदिरात जायची. कस्तुरला लहानपणापासून स्वातंत्र्याचा रंग लागला होता. न स्वीकारता येणारा आदेश नवऱ्याचा जरी असला तरी तिने तो का स्वीकारावा? नवरा जसजसा दाब टाकायचा तसतसा ती विरोध नोंदवायची. दाब वाढायचा आणि ती मोकळीक घ्यायची. नवरा अधिकाधिक चिडायचा. नवऱ्याचा आदेश तिला चुकीचा वाटायचा. त्या आदेशाला ती नम्रपणे नकार द्यायची. दृढपणाने विरोध करायची. या वागण्यातून दोघांमध्ये अबोला निर्माण व्हायचा. पुढे मोहनदासला कस्तुरचे हे वागणे योग्य वाटले. निर्दोष वाटले. तिच्या मनाला पापाचा स्पर्शही झाला नव्हता. निर्दोष बालिका देवदर्शनाला जाण्यासाठी बंधन का स्वीकारील? कुणाला भेटायचे आणि कुणाला नाही यासाठी बंधन का पत्करील? नियंत्रण का म्हणून सहन करुन घेईल? नवऱ्याने बायकोवर बंधने लादायचीत. बायकोने नवऱ्यावर काही आदेश का लादू नयेत? असे प्रश्न पुढे गांधीजींनी आपल्या मनाला विचारले आहेत. ही झाली नंतरची गोष्ट. त्या वयात तर ते भांडत राहीलेत. त्यांना आपले स्वामित्व शाबित करायचे होते ना? पुढे गांधीजींनी अनेकदा मनमोकळेपणे हे मान्य केले की आपण सत्याग्रहाचा पाठ आपल्या पत्नीपासून शिकलो आहोत.

कस्तुर शाळेत शिकायला गेलेली मुलगी नव्हती. ती भावसाक्षर होती. भावसार्थक होती. सरळ स्वभावाची होती. स्वतंत्र प्रज्ञेची होती. परिश्रमी होती. आपण शिकावे असे तिला वाटले असेल असे वाटत नाही. तिच्या भोवतीचा साराच स्त्रीवर्ग न शिकलेला होता. नीतिनिपुण होता. कार्यकुशल होता. सुगरण होता. नवऱ्याच्या इशाऱ्यानुसार शिकावे. एकमेकात दोघांनी ओतप्रोत होऊन जावे. असे मोहनदासला वाटायचे. कस्तुरला शिकण्याविषयी फार उत्साह असा नव्हता. मोहनदासचे तिला शिकवण्यात प्रामाणिक प्रयत्न दिसतात. कस्तुरची तटस्थता कळते. काहीशी नाखुशी आणि अनुत्सुकता कळते. मोहनदास कस्तुरला आपली जीवनसंगिनी बनऊ इच्छित आहे. कस्तुर नवऱ्याच्या ध्येयपथावर चालायला फारशी तयार नाही. नवऱ्याचे प्रेम शारीरिक स्वरुपाचे आहे. यात उत्कटताही आहे. कस्तुरकडून तितकाच प्रतिसाद मात्र दिसत नाही. शिकणे तिच्या स्वभावाविरुध्द आहे. किंबहुना शिकणे तिला निरर्थकही वाटते. तिचा शिक्षणाला ताठर विरोध आहे. यामुळे मोहनदासला अनेकदा पिछेहाट घ्यावी लागली आहे. खरे तर दोघांमध्ये समजुतदारपणाचा अभाव आहे. या त्या वयाचा दोष मानावा लागेल.

आता कस्तुर काय विचार करत होती? ते मोहनदासला कसे कळावे? तिला अक्षर-ओळख नव्हती. ती स्वभावाने सरळ व परिश्रमी होती. किमान बालवयात तरी तिला शिक्षण आवश्यक वाटत नव्हते. उलट ही अकारण जबरदस्ती वाटायची. यावरुन शिक्षण हा एकपक्षीय विषय असावा, असे वाटते. मोहनदासचे विषयसुख कस्तुरवरच साठवलेले होते. तो प्रेमाचा प्रतिध्वनी ऐकू चाहत होता. मूळाशी प्रेम तर होते. यामुळे तिथे सर्वस्वी दु:ख कसे बरे असेल?

गांधीजींनी या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कुठलाही आडपडदा ठेवला नाही. आत्मचरित्रातून सारे तपशिलवारपणे मांडले आहे. कस्तुरचे तसे नाही. ते आपल्याला अनुमानाने समजून घ्यावे लागते. मोहनदासचे शाळेत चित्त लागेना. मनात सारखा

कस्तुरचाच विचार असे. कस्तुरला घरात ढीगभर कामे असायचीत. कामांमध्ये तिला नवऱ्याची आठवण येतच नसेल असे नाही. भेटीची आतुरता तिच्याही मनात असेल. भेटीच्या क्षणाचा विचार दोघांच्याही मनात असावा. वियोग असह्य वाटत असला पाहिजे. कस्तुरच्या ठायी कर्तव्यपरायणता होती. मोहनदासच्या ठायीही होती. यामुळे ते व्याधिग्रस्त झाले नाहीत. सकाळ उजाडायची. वासनेची रात्र सरायची. नित्यकर्मांचा उजेड पसरायचा. कुणी कुणाला फसवण्याचा प्रश्न नव्हता. या विचारामुळे दोघे संकटातून बचावले.

बालपणात तर आपण शिकावे अशी भावना तिच्या मनात नव्हती. पुढील आयुष्यात मात्र ती शिकण्यासाठी धडपडताना दिसते. अगदी मूळ संस्कृत भाषेतील 'गीता' आपल्याला शिकता यावी अशी इच्छा करते. संगीत शिकू बघते. इंग्रजी भाषा शिकण्याचा प्रयत्न करते. लिहिता-वाचता शिकण्यासाठी प्रयत्न करते. अशी एक ऊर्ध्वगामी वृत्ती तिच्या व्यक्तिमत्वात दिसून येते.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग: श्री मो. क. गांधी पृष्ठ २०;

२) कित्ता पृष्ठ ७/८

❖❖❖

## ८) नवरेपणाचा अधिकार

मोहनदास शाळेत जायचा. घरात पाहुणे-रावळे नित्याचेच असायचे. त्यांची मोठीच वर्दळ असायची. या दरम्यान मोहनदास कस्तुरची दृष्टीभेटच व्हायची. मोहनदास शाळेत जायचा. लक्ष मात्र घरातच असायचे. कस्तुर बायकांमध्ये असायची. घरगुती रीतीरिवाज सुरुच असायचे. बायकांना का कमी कामे असतात? कधी तरी चुकून दोघांची भेट होऊन जायची. कस्तुर नजर वाचवून निघून जायची. तिचे सामान्य जीवन सुरु झाले होते. तिला माहेरची आठवण यायची. आईची आठवण यायची. तिचे डोळे भरुन येत. घळघळा आसवे गळत.

कस्तुर हळूहळू सासरी रमत होती. मोहनदासमध्ये बदल जाणवत होता. दोघे एकमेकांना चाहत असत. मोहनदास नवरा होता. दादुलेपणाचा तोरा मिरवायचा. अधिकार गाजवू बघायचा. ते कस्तुरला नाही आवडायचे. यातून ईर्ष्याभाव वाढीस लागायचा. मोहनदासला कधी कस्तुर हटकायची. ते त्याला नाही आवडायचे. कस्तुरला वाईट वाटायचे. ती अशिक्षित होती पण ती दबून नाही जायची. मोहनदास तिला शिकवायचा प्रयत्न करायचा. स्वयंपाक करता आला. शिवण-टिपण आले. हिशेब जमले. झाले शिक्षण. यासाठी मान मोडून अभ्यास का करावा लागतो? हा तिचा तीक्ष्ण प्रश्न असायचा. मोहनदासला हे सारे अडाणीपणाचे वाटायचे.

लहानपणापासून तिच्या मनाची ठेवण अशी झालेली होती की नवऱ्याच्या परवानगीशिवाय कोणतेही काम करु नये. नवरा नाही म्हणाला तर मग नाहीच नाही. बायको नाही म्हणाली तर ते काही नवऱ्यावर बंधनकारक नसते. नवऱ्याचा प्रत्येक शब्द बायकोसाठी लक्ष्मणरेषेसारखा असतो. तिला मोहनदासशी वाद घालायचा नव्हता. भांडायचे तर मुळीच नव्हते. तरी निर्भयपणे ठाम शब्दात आपले म्हणणे मांडायचे होते. आता या अडाण्याला कायच सांगावे हे काही तिला कळत नसायचे. ती चूप रहायची. अशावेळी ती काही बोलायची नाही. या मौनामुळे हे भांडण काही थांबायचे नाही. उलट विकोपाला जायचे. दोघांमध्ये अबोला रहायचा. अबोला सुरु आणि बाहेर येणे-जाणेही सुरु असे चालत रहायचे. सासरी तर प्रत्येकाची पिपाणी वेगवेगळी. कुणा-कुणाचे मन राखावे? तिला पेच पडला होता. 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' असे तिने ठरवले होते पण सोपे का होते ते?

विवाह झाला तेव्हा मोहनदास हायस्कूलात शिकत होता. तिन्ही भाऊ एकाच शाळेत शिकत होते. थोरला भाऊ वरच्या इयत्तेत होता. करसनदासचे लग्न मोहनदासच्या सोबतच झाले होते. तो एक वर्ष पुढे होता. लग्नाने काही प्रसाद तर द्यावाच ना? दोघा भावांचे एक-एक वर्ष वाया गेले. करसनदास व मोहनदास एक-एक वर्ष नापास झालेत. यात करसनदास यांच्या बाबतीत तर आणखीच खूप वाईट झाले. विवाहानंतर ते शाळेतच जाऊ शकले नाहीत. मोहनदासचा अभ्यास मात्र सुरुच राहीला. विवाहामुळे एक वर्ष फुकट गेले होते. ते भरून काढायचे होते. या कामी शिक्षकांनी प्रयत्न केलेत. मोहनदासकडून अभ्यास करवून घेतला. दोन वर्षांचा एकत्रितपणे अभ्यास केला. मोहनदासने वर्ष भरुन काढले होते.

मोहनदास विद्यालयात शिकत होता. जवळचे म्हणावे असे त्याचे कुणी मित्र नव्हते. जेमतेम दोन मित्र लाभल्याचे गांधीजी नोंदवतात. यातली पहिली मैत्री तर फार काळ टिकली नाही, दुसरी मैत्री मात्र दीर्घकाळ टिकली. ती होती शेख मेहताबशी. त्याचे वडील गोंडल शहरात जेलर होते. मेहताब मोहनदासच्या राजकोटच्या घरापासून काही पावलांच्या अंतरावर रहायचा. तो मोहनदासपेक्षा तीन-चार वर्षांनी मोठा होता. तो खरे तर करसनदासचा मित्र होता. करसनदास हा मोहनदासचा मधला भाऊ. मोहनदासची ही मैत्री करसनदासला आवडायची नाही. तो आपल्या मित्राला बरोबर ओळखून होता. त्याने विरोध नोंदवला. थोरला भाऊ लक्ष्मीदास. त्यानेही विरोध दर्शवला. ही मैत्री आईला पसंत नव्हती. तिने नापसंती दर्शवली. या मैत्रीविषयी कस्तुर तर स्पष्टच नाराज होती. तिला ही कुसंगती वाटली होती. तिने या विषयी नवऱ्याला बजावून सांगितलेही होते. तरुण उतावळा नवरा. बायकोचे म्हणणे ऐकण्यात त्याचा अहंकार आड आला होता. तिने शंका घेतल्या होत्या. मोहनदास मेहताबला सुधारु इच्छित होता. या मैत्रीला

घरातून चौफेर विरोध होता. मोहनदास मात्र कुणाचेही काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हता.

मोहनदासची प्रकृती मेहताबच्या अगदी विरुध्द होती. मोहनदास लुकडा आणि दुबळा तर मेहताब हट्टाकट्टा आणि व्यायामपटू होता. मोहनदास लाजाळू आणि बुजरा तर मेहताब बळकट आणि दांडगट होता. मोहनदासला क्रीडांगणविषयक नावड तर मेहताब खेळात पटाईत होता. मोहनदास अबोल वा मितभाषी तर मेहताब बडबड्या होता. मोहनदास पापभीरु तर मेहताब पापाची मूळीच पर्वा न करणारा होता. मोहनदास मागे मागे राहणारा तर मेहताब सर्वात पुढे जाऊन काम करु इच्छिणारा होता. मेहताब राकट व कणखर होता. त्याला वेगाने लांबवर धावता येत असायचे. लांब उड्या मारता येत असायच्या. उंच उड्या मारता येत असायच्या. वेगाने पोहता येत असायचे. त्याला शारीरिक शिक्षा झेलायचे सामर्थ्य होते. तो एकूणच मोहनदासच्या विरुध्द स्वभावाचा होता. दोघे असमानशील होते. मेहताबच्या ठायी अनेक दोष होते. मोहनदासला ते दोष स्पष्टपणे दिसत होते. एकदा ज्याला आपला मानला त्याला अंतर द्यायचे नाही असे त्याने ठरवले होते. मोहनदासने शांतपणे आपले मत मांडले होते. तो म्हणाला होता "हे बघा, तुम्ही त्याचे जे दोष सांगितले आहेत. ते मला माहीत आहेत. त्याचे गुण मात्र तुम्हा कुणाला माहीत नाहीत. मला तो चुकीच्या मार्गावर नेणार नाही. माझा त्याच्या बरोबरचा संबंध केवळ त्याला सुधारण्यासाठी आहे. त्याला सन्मार्गावर नेण्यासाठी आहे. तो सुधारला तर फार उत्तम मनुष्य बनेल, अशी माझी खात्री आहे. तुम्ही माझ्याविषयी निर्धास्त असावे अशी माझी मागणी आहे."[१] या बोलण्याने घरच्यांचे काही समाधान झाले नाही. मोहनदास आपल्या मार्गाने चालत राहिला. त्याचा अंदाज बरोबर नव्हता हे पुढे काळाने सिध्द केले.

मेहताबने दिलेल्या सल्ल्यानुसार कस्तुरची बरोबरी करण्यासाठी मोहनदासला बळकट व्हावेसे वाटले. मेहताबने स्वत:मध्ये तर बदल करवुन घेतले नाहीत. उलट मोहनदासला चुकीच्या मार्गाला लावले. त्याच्या मनात कस्तुरविषयी विष कालवले. त्याचा गैरसमज करवुन दिला. तो संशयी नवरा बनला. मेहताब नव-नवी शस्त्रास्त्रे परजत होता. मोहनदासला कस्तुरची प्रेमव्यवहारातली शुष्कता त्रास देत असायची. साऱ्या बायका अशाच वागतात का? या प्रश्नाने मोहनदासच्या मनात फणा काढला. सल्लागार एकमेव मित्र मेहताब हाच तर होता.

मेहताबला मोहनदासचा कच्चा दुवा माहित झाला होता. नवऱ्याचे बायकोवर निरतिशय प्रेम होते. मेहताबने त्या कोमल भावनेवरच तडाखा लगावला. मोहनदास अनभिज्ञ होता. अननुभवी होता. त्याच्या मते मेहताब या क्षेत्रातला विशेषज्ञ होता. मेहताबने त्याच्या मनात विषवृक्षाचे बीज रोवले. 'तुझी बायकोच विश्वसनीय नाही. ती इतर कुणाला चाहत असेल.' ती रात्र कस्तुरवर प्रश्नांसह कोसळली. तिला हे लांछन झेलणे अशक्य होते. मेहताबने त्याला वेश्येच्या घरी पाठवले. सारी जुळणी करुन दिली. पैसेही स्वत: दिले. बायको माहेरी गेली होती. मोहनदास वेश्यागृहात गेला. या कामी मेहताबला यश मिळाले. 'यामुळे बायको तुझ्यामागे धावत येईल.' असा मेहताबचा तर्क होता. हे मोहनदासला पटले होते. त्याचाच हा परिणाम होता. मोहनदास तिथे थांबला, थबकला, ओशाळला. काही अपमानास्पद शब्द ऐकून परतला. हा एक कुठाराघात होता. पत्नीसमोर तो खोटा सिध्द झाला. मोहनदासच्या पुरुषत्वाचा अपमान केला गेला होता. हे सह्य होते. तिने कस्तुरच्या साध्वी रुपाचाही धि:कार केला. हे मात्र असह्य होते. कस्तुरविषयीचा संशय निराधारच होता तरी तो कस्तुरशी क्रुरपणे वागला. नको ते आरोप केले. निकोप वैवाहिक जीवन कलुषित झाले. हे सारे पुढे मोहनदासने कस्तुरला सांगितले होते. या मित्राचे म्हणणे ऐकून त्याने आपल्या धर्मपत्नीला खूप दु:ख दिले. याविषयी गांधीजी पुढे स्वत:ला कधीही क्षमा करु शकले नव्हते. हे सारे गांधीजींनी आत्मचरित्रातून सविस्तर मांडले आहे.

हा काळ अंतर्द्वंद्वाचा होता. मोहनदाससाठी होता. कस्तुरसाठी काही कमी नव्हता. दांपत्य जीवनात द्वंद्व नव्हते. द्वंद्वाचा विषय शिक्षण हा होता. मेहताबची मैत्री हा फार चिंतेचा विषय होता. या मैत्रीमुळे कस्तुरच्या दांपत्य संबंधाच्या वृक्षाला वाळवी लागली. नवरा खोटे बोलू लागला होता. मांसाहार करु लागला होता.

कस्तुरच्या चाणाक्ष नजरेने हे टिपले होते. तिचा आपल्या परीने विरोध जारी होता. मोहनदास जुमानत नव्हता. तो पापाचरण करत होता. अशी तिची ठाम भूमिका होती. यापासून त्याला कसे वाचवायचे हा कस्तुरपुढे प्रश्न होता. तिच्या जवळ प्रार्थनेचे बळ होते. साधारणपणे वर्षभरचा काळ लोटला. नवऱ्याची थेरं थांबत नव्हती. आपला नवरा काही छोटी-छोटी पुस्तके वाचतो. ती काही अभ्यासाची नाहीत. एवढे कस्तुरला कळायचे. ती विरोध करायची.

मोहनदाससारखा गर्विष्ठ नवरा. तो बायकोचा का सल्ला मानेल? मित्र मेहताबचे ऐकून मोहनदासने कस्तुरला त्रास दिला होता. गांधीजी आत्मचरित्रातून लिहितात "आम्हा नवरा - बायकोमध्ये वितुष्ट येई आणि कज्जे होत. त्याच्या मूळाशी मेहताबची मैत्रीपण होती. मित्राच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन मी माझ्या धर्मपत्नीला कितीतरी दु:ख दिलेले आहे. या हिंसेबद्दल मी स्वत:ला कधीच क्षमा केलेली नाही." [२]

आपल्या मनोवृत्तीचे विश्लेषण करताना गांधीजी लिहितात "या संशयी वृत्तीचा सर्वथैव नाश मला अहिंसेचे सूक्ष्म ज्ञान झाले तेव्हाच झाला, म्हणजे जेव्हा मी ब्रह्मचर्याचा महिमा समजलो आणि हेही समजलो की पती पत्नीची दासी नाही तर त्याची सहचारिणी आहे., सहधर्मिणी आहे., दोघेही एकमेकांच्या दु:खात समान वाटेकरी आहेत. आणि बरेवाईट करण्याचे जितके स्वातंत्र्य पतीला आहे. तितकेच पत्नीलाही आहे. या संशयग्रस्ततेच्या काळाचे स्मरण झाले म्हणजे मलाच माझा मूर्खपणा आणि विषयांध निर्दयता याविषयी संताप येतो आणि मैत्रीच्या बाबीतल्या मूढपणाची कीव वाटते."[३]

गांधीजी या वेळेला कस्तुरला दोषी ठरवत नाहीत. झाल्या चुकीबद्दल स्वत:ची सुटकाही करुन घेत नाहीत. आपला दुबळेपणा रेखांकित करतात. निष्ठूरपणे स्वत:विषयीचा अभिप्राय नोंदवतात. नववधू कस्तुर गांधीजींना अधिक प्रौढ वाटते. वयाने ती बालिका वा किशोरी आहे. तिचा दर्जा मात्र सुनेचा आहे. धाकट्या सुनेचा आहे. गृहिणीचा आहे. तिच्या ठायी प्रगल्भता आहे. नवऱ्याच्या चुकीच्या आदर्शांना ती धुडकावून लावते. भांडणे थांबत नसतील तर अबोला धरु शकते. तिला स्वातंत्र्याचा स्वाद चाखता आला आहे. यासाठी अपेक्षित किंमत तिने चुकवली आहे. 'नवऱ्याच्या हितातच आपले कल्याण' हा माहेर-सासरचा सहज संस्कार आहे. त्या समाजात तर शतकानुशतके रुजू होत आलेले ते संस्कार आहेत.

कस्तुर शांत होती. प्रतिकारशून्य होती. कस्तुरची ही अग्निपरीक्षा होती. ती या धगीत उजळून निघाली. सोन्याची पुतळी सिध्द झाली. तिने सहकार्याची भूमिका मांडली. प्रचंड मानसिक आघात झेलला. पंधरा वर्षाच्या कन्येच्या ठायी असे धैर्य! अशी उदारमनस्कता. असा गाढ विश्वास. अशी विलक्षण समज. हे दुर्लभ आहे. त्या काळात आणि आजही!

संदर्भ


१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १८;

२) कित्ता पृष्ठ २४;

३) कित्ता पृष्ठ २४ - २५.


❖❖❖

## ९) सेवाव्रती परिचारक !

आपल्या पत्नीच्या विषयी मोहनदास विषयासक्त होता. गांधीजी स्वत:च आत्मचरित्रातून हे मान्य करतात. शाळेत शिकत असतानाही कस्तुरचेच विचार त्यांच्या मनात येत असत. वियोग असह्य वाटायचा. रात्र झाली म्हणजे दोघे एकत्र येत. त्या काळी पती-पत्नीचे एकत्र भेटणे शक्य नव्हते. एकांत काय तो रात्रीतूनच लाभायचा. वडिलांच्या देखत केवळ पत्नीकडे बघणेसुध्दा शक्य नव्हते. तिच्याशी बोलायचे तर नावच नको. काठेवाडात त्या काळी बुरख्याचा रिवाज अंमलात होता. हा अडाणी आणि निरुपयोगी रिवाज होता. शतकभर त्याचा प्रभाव कायम होता.

मोहनदासचे सोळावे वर्ष सुरु होते. वडिल आजारी-आजारी असत. बिछान्याला खिळून असत. त्यांच्या सेवेत मोहनदासची आई पुतळीबाई असायची. घरचा एक जुना नोकर असायचा. मोहनदास असायचा. तिघे मिळून हे सेवेचे काम सांभाळत असत. मोहनदास उत्तम परिचारक होता. रुग्णसेवक होता. तो जखमा स्वच्छ करायचा. मलम लावायचा. औषधे तयार करायचा. औषधे घरीच तयार करावी लागत असत. हे सेवेचे मुख्य काम होते. वडिलाना झोप लागल्यावर तो सेवेतून उठायचा मग झोपायला जायचा. हा परिपाठ होता. यात कधी खंड पडला नाही. हलगर्जीपणा झाला नाही. त्या काळी तो विद्यालयात शिकत होता. शाळा आणि सुश्रूषा असे दोन विषय होते. मोहनदास आई-वडिलांची सेवा करायचा. याला भक्ती मानायचा. धर्म मानायचा. तरी वासनेने त्याला थकवले होते. बालपणापासून श्रावण बाळ त्याचा आदर्श होता. रोज रात्री तो वडिलांचे पाय चेपून द्यायचा. पाय चेपण्याचे काम तर हात करत असत. त्याचे मन मात्र शयनगृहाकडे धाव घेत असायचे. याला काही काळाचे बंधन नव्हते. वेळेचे बंधन नव्हते. धर्मशास्त्राचे बंधन नव्हते. व्यवहारबुध्दिचे बंधन नव्हते. आरोग्यशास्त्राचे सुध्दा बंधन नव्हते. सेवेतून सुटका होताच त्याला आनंद वाटायचा. तो वडिलांच्या पाया पडायचा. शयनकक्षाकडे धाव घ्यायचा. कस्तुर दिवसभर कामे करुन दमून जायची. सहाजिकच तिला झोप लागलेली असायची. मोहनदासने तिला जागे करावे. मनाला आवडेल अशी निरर्थक बडबड करावी. तिला झोपू देऊ नये हे ठरलेले असायचे. ही आसक्ती तर बळकट होती.

वडिलांचे आजारपण दिवसेंदिवस विकोपास जाऊ लागले होते. अशक्तपणा वाढत चालला होता. तब्येत खूप काळजी करायला लावणारी होती. ही बातमी करमचंदांच्या बंधूंना कळली. ते सेवेसाठी येऊन थांबले होते. तेही प्रेमाने थोरल्या बंधुंची सेवा करत असत. दिवसभर बिछान्यापासून क्षणभरही हटत नसत. सर्वांना सुटी देत. स्वत: भाऊंच्या बिछान्याशेजारीच झोपून रहात. प्रत्येक रात्र अखेरची वाटावी अशी परिस्थिती होती. असे हे बऱ्याच दिवसांपासून सुरु होते. सेवेकऱ्यांना याची पूर्ण कल्पना आली होती. अखेरची रात्र आली. रात्रीचे साडे दहा-अकरा झालेत. मोहनदास वडिलांच्या बिछान्याजवळ बसून पाय चेपून देत होता. काकांनी मोहनदासला विश्रांती घ्यायला पाठवले. ते स्वत: सेवेला लागले.

मोहनदास शयनगृहाकडे गेला. दिवसभरच्या कामात दमलेली कस्तुर भर निद्रेत होती. मोहनदासने तिला उठवले. पाच-सात मिनिटे गेली असतील-नसतील तोच दाराची कडी वाजली.

'उठ, बापूजी आजारी आहेत.' नोकराने कळवळून सांगितले.

'अरे हो, पण नेमके काय झाले ते सांगशील तर खरे.' नोकराच्या म्हणण्याचा अर्थ कळूनही मोहनदासने विचारले.

'बापूजी गेले.' उत्तर मिळाले.

बापूजी आजारी तर होतेच. आता पश्चात्ताप करायला तरी कुठे वेळ उरला होता? या काळात कस्तुर गरोदर राहिली होती. मोहनदासला याची दुहेरी शरम वाटत होती. एक तर त्याचे हे विद्यार्थी जीवन होते. या काळात संयम पाळायला हवा होता. तो त्याने पाळला नाही. शाळेचा अभ्यास करणे हा धर्म होता. त्यात अडथळे येत होते. विषयवासनेचा प्रवाह प्रचंड होता. गजग्राहासारखी अवस्था होती. एकीकडे सेवेचा भाव होता. दुसरीकडे विषयाचे आकर्षण होते. केवळ लाज वाटावी अशी

परिस्थिती होती. पित्याच्या अखेरच्या क्षणी मोहनदास त्यांच्यासोबत नव्हता. थेट आपल्या शयनगृहात होता. या घटनेचा पश्चात्ताप त्याच्या मनाला आयुष्यभर दंश करत राहिला होता.

१८८५ साली करमचंद यांचे निधन झाले. मोहनदास पोरका झाला. त्याला हे पोरकेपण खूप जाणवले. पुतळी एकाकी झाल्या. घरावरचे छत उडून गेले. गांधी कुटुंबाचा आधारवड कोसळला. कस्तुरच्या जीवनात अशी दु:खद घडी आली. सासरे निवर्तले. चार दिवस लोटलेत. कस्तुरने अर्भकाला जन्म दिला. अविकसित बाळ. काही दिवसांचीही सोबत नाही. बाळ निघून गेले. नवशिशु जन्माआधी देवाला आवडला. मुलगा मृत होता. बाळाने दोन-चार श्वास घेतले. या जगातला मुक्काम संपवला. तिच्या मनावर या दोन निधनांचा खोल परिणाम झाला. कस्तुरने आपले पहिले लेकरु गमावले. सूतक आणि शौच एकत्र अनुभवायला लागले. जननाशौच व मरणाशौच एकत्र अनुभवले. कधी वृध्द सासऱ्याचा थकला चेहरा आठवायचा. कधी या निष्पाप अर्भकाची आठवण सतवायची. तिच्या काळजाचा तुकडा, वंशवेलीवरले पहिले-वहिले पुष्प कोमेजून गेले होते. गांधी कुटुंबाच्या शोकाला पार नव्हता. कुटुंबाचा वटवृक्ष कोसळला, ज्याच्यावर वडाची जबाबदारी होती तो अंकुर कोमेजला होता. विकासापूर्वीच नियतीने खुडून टाकला होता. गांधी कुटुंबाचा भूतकाळ पुसला गेला होता. भविष्यकाळाची पहाट उगवलीच नाही. कुठल्या दु:खासाठी रडावे याचा नेमका बोध कस्तुरला होईना. मोहनदासलाही होईना. आता आता तर बाळ कुशीत होते. लगेचच हरपले. लेकराच्या दु:खाच्या भाराखाली कस्तुर कोलमडून पडली. तिचे मन सैरभैर झाले. बाळ आले. निघूनही गेले. ती तशीच अतृप्त राहिली. काही उत्सव नाही. आनंदही व्यक्त करता आला नाही. दोघांच्या मनावर या घटनेने खोल ओरखडा केला. कस्तुरने वेणा झेलल्या. वेदना साहिल्या. जसे-तसे बाळंतपण आटोपले. आई कशीबशी वाचली होती. तिचे कोमल शरीर थकून-थकून गेले होते. मनाचा अपार कोंडमारा झाला होता. उशी आसवांनी ओलीचिंब भिजली होती. मोहनदास मूळापासून हादरला. कस्तुरच्या छातीतले दूध आटले. ती एकाकी झाली. सूनी-सूनी झाली. यातना छातीत कोंडून धरल्या. काय-काय स्वप्नांचा गोफ तिने मनाभोवती विणला होता. आठवणींचे सप्तरंग होते. तिने एका भव्य स्वप्नाची आरास मनाभोवती मांडली होती. सारे-सारे काळाच्या एका तडाख्याने नष्ट झाले. वय कोवळे. शरीर नाजूक. मन आलवार. बाळ काळाला प्रिय झाले. ही अपुऱ्या दिवसांची प्रसूती होती. दुसरे काय होणार होते? सासुबाई तर मनाने खचून गेल्या होत्या. त्यांना सतत नवऱ्याची आठवण यायची. त्या अधिक गंभीर झाल्यात. सुनेची मानसिक चिंता त्यांना जाणवायची. त्यांच्या मनावर बधिरतेचा डोंगर उभा ठाकला होता.

कस्तुरच्या मनाच्या कातळावर आघात कोरले गेले होते. एक मृत्यु. दुसरा जन्म. परत मृत्युच. हे विसरणे का कधी शक्य होते? घरात घंटा किणकिणल्या नाहीत. पाळणा हलला नाही. अंगाई गीते गाईली गेली नाहीत. बाळाची दुपटी वाळायला अंगणात टाकली गेली नाहीत. सूनी-सूनी उदास कस्तुर. ऋतु आलेत आणि निघून गेलेत. पुढे तिने चार मुलांना जन्म दिला. पहिल्या मुलाच्या जाण्याचे दु:ख तिच्या छातीत बर्फासारखे गोठून राहिले. याविषयी तिने कधी चकार काढला नाही. मृत बालकाच्या वेदनेची ही व्यथा तिने आपल्या श्वासासंगे कायम झेलली. ती जावांच्या लेकरांशी हसू-खेळू-बोलू लागली. त्या वेदनेला कधी शब्दरुप दिले नाही. हे खरेही असेल कदाचित पण अश्रुरुप तर तिने अनेकदा दिले. पुढे तिच्या थोरल्या मुलाचा मुलगा गेला. ते अकाली मरण होते. त्या समयी तिचा हंबरडा काही केवळ नातवासाठी होता? तिच्या मनात आपल्या मुलाची स्मरणशिळा उभी राहिली नसेल का?

करमचंदांचे जाणे अनेक दृष्टींनी क्लेशकारक होते. घरची परिस्थिती डबघाईला आली होती. वडिलाना मिळणारे पेन्शन बंद झाले होते. वडिल दिवाण होते खरे पण त्यांनी माया काही जोडली नव्हती. मुलांचे शिक्षण केले. लग्ने लाऊन दिलीत. तिथेही काटकसर केली. सामुदायिक लग्ने लावलीत. मोठा खर्च वाचवला. तरीही मोठा खर्च झाला होता. एक घर पोरबंदरला होते. दुसरे राजकोटला होते. राजकोटला रहात तेव्हा पोरबंदरच्या

घरचे घरभाडे मिळायचे. बाप मुलांना काही धन-दौलत ठेऊन गेला नाही. मोहनदाससाठी मोठा वारसा सद्गुणांचा होता. याचे कस्तुरला अप्रूप होते. करमचंद कार्यकुशल होते. आर्थिक आघाडीवर काटकसरी होते. विवेकी होते. सैध्दांतिक आघाडीवर सत्यनिष्ठ होते. स्वाभिमान जपणारे होते. ही एक व्यवस्था होती. मोहनदासला या गुणांचा लाभ झाला. मोहनदासच्या तरुण खांद्यांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली होती. तो काळजीत होता. पुढील वर्षी तो प्रवेश परीक्षेला - मॅट्रिक - (आताची दहावी-बारावी) बसणार होता. वडिलांच्या आजारपणामुळे त्याला तयारी करायला खूप कमी वेळ मिळाला होता.

❖❖❖

## १०) प्रेयाकडून श्रेयाकडे !

मोहनदासने उच्च शिक्षणासाठी भावनगर गाठले. शामळदास महाविद्यालयात शिकायला गेला. कस्तुर इकडे एकटी राहिली. मोहनदासला घरची आठवण यायची. तो मनातून दुःखी व्हायचा. कस्तुरला दुःख व्यक्त करायला जागा नव्हती. तिकडे मोहनदासला अभ्यासात काही समजेना. सारे विषय कठीण वाटू लागले होते. शिकण्यात गोडी वाटेना. समजही पडेना. यात अध्यापकांचा काही दोष नव्हता. पहिली सहामाही पूर्ण केली. तो घरी परतला.

कुटुंबाचे एक जुने मित्र व सल्लागार होते. ते विद्वान व व्यवहारकुशल होते. मावजी दवे त्यांचे नाव. त्यांनी पुढील शिक्षणाचा विषय काढला. विलायतेला शिकायला जायचा सल्ला दिला. या सल्ल्याचा सर्वांनी विचार केला. आई थकून गेल्या. कस्तुरला धक्का बसला. तिच्या उदरात बाळ होते. मागचा अनुभव दुःखद होता. ते दुःख विस्मरणात गेले नव्हते. भविष्याच्या गर्भात न जाणो कायच होते? चिंतेला पार नव्हता. मोहनदास विलायतेत शिकायला जायचे मनसूबे रचू लागला. थोरला भाऊ लक्ष्मीदासला हे पटले. मावजी दवे कुटुंबाचे जुने स्नेही होते. त्यांनी पाठिंबा दिला. आता गांधी कुटुंबाचे प्रमुख होते तुलसीदासकाका. पुतळी आईने त्यांची संमती घ्यायला सुचवले. मोहनदास तुलसीदास काकांना जाऊन भेटला. दवेंचा प्रस्ताव सांगितला. आईची सूचना सांगितली. लक्ष्मीदासची इच्छा सांगितली. आपला मनोदय मांडला. परवानगी मागितली. काकांचे वय झाले होते. ते मृत्युच्या उंबरठ्यावर उभे ठाकले होते. समुद्र ओलांडून विदेश गाठणे त्यांना धर्मविरोधी वाटले. 'आपण कधीही पाठिंबा देणार नाही.' असे ते स्पष्टपणे बोलले. इंग्लंडहून परतणाऱ्या भारतीयांविषयी त्यांचे मत चांगले नव्हते. त्यांना आहाराचा कुठलाच विधि-निषेध नसतो. त्यांच्या मुखात कायम सिगार असते. त्यांचा पोशाख लज्जास्पद असतो. एवढे बोलून ते म्हणाले की तरीही मोहनदासच्या आईची मर्जी. 'त्याला जाऊ द्यायला राजी असेल तर तिची मर्जी.'

मोहनदासच्या शिक्षणाचे वारे वाहू लागले होते. पुतळी आई फार मोठ्या चिंतेत होती. काळजी तर कस्तुरलाही होती. आता नवरा विलायतेत शिकायला जाणार होता. घरात चर्चा सुरु होती. आईची काळजी आणि तिची चिंता समांतर दिसतात. विलायतेत गेल्यावर मोहनदासचे नेमके कायच होईल? कस्तुरला खूप काळजी वाटली. विलायतेत काय होईल? इथेच एवढे सारे रंग-ढंग आहेत. तिथे कुणाचा धाक? तिथे कोण रोखणारे? कोण टोकणारे? हा प्रश्न दोघांच्या मनांना वाळवीसारखा कुरतडत होता. मोहनदासच्या पुढे आईची समजूत घालण्याचे मोठे आव्हान होते. आईची समजूत कशी घालावी? आईने काळजीपूर्वक सारा तपास करुन बघितला होता. विलायतेत शिक्षण आणि तरुण वय. तरुण तिथे बहकतात. ते मांसाहार करु लागतात. मद्य सेवन करतात. पुतळी आईने हे सारे मोहनदासला स्पष्टपणे विचारुन घेतले. कस्तुरच्या कानावर हे सारे येत होते.

'मला काळजी वाटते. माझ्या कानावर पुष्कळच काही-बाही आले आहे.' आईने म्हटले.

'तुझा का माझ्यावर विश्वास नाही? मी तुला फसवणार नाही. शपथ वहातो. मी मांसाहार करणार नाही. मद्य प्राशन करणार नाही. स्वतःला स्वच्छ ठेवीन. माझ्यावर विश्वास ठेव.' मोहनदास म्हणाला.

श्री मावजी दवे यांनी संमती दिली होती. ती एक ढाल होती. मोहनदासने ती ढाल वापरली. धोका असता तर का त्यांनी मला परवानगी दिली असती? हे ऐकल्यावर त्या मातेचे हृदय द्रवले. तिचा विश्वास मोहनदासवर तर होताच पण प्रश्न दूर देशीचा होता. तिची मती गुंग होऊन गेली होती. तिने सांगितले की ती बेचरजी स्वामींना विचारील. बेचरजी स्वामी मूळचे मोढ बनियाच होते, पुढे त्यांनी जैन धर्मात दीक्षा घेतली होती. तेही दवेंप्रमाणेच गांधी कुटुंबाचे सल्लागार होते. त्यांनी सांगितले होते की ते या मुलाकडून या तिन्ही बाबतीत व्रत घेववतील. त्याला जाऊ देण्यास हरकत राहणार नाही. मोहनदासने मांस, मदिरा आणि स्त्रीसंगापासून दूर रहायची प्रतिज्ञा घेतली. पुतळी आईने परवानगी दिली. कस्तुरच्या मनावरचे मणा-मणाचे ओझे हलके झाले.

लंडनला शिकायला जायचे ठरले. मोठा प्रश्न पैश्यांचा होता. मामेभावाची आर्थिक स्थिती चांगली होती. मोहनदास मामेभावाला भेटला. कस्तुरच्या मनात आशा जागली. काहीतरी होईल असे वाटले पण व्यर्थ. मोहनदास रित्या हातानी परत आला. सासरी गेला. सासरे भेटले. विदेशयात्रेसाठी परवानगी मागितली. 'काही मदत करा.' अशी अपेक्षाही व्यक्त केली होती. जावयाला स्पष्ट शब्दात नकार देणे गोकुळदास यांना जीवावर गेले. त्यांचा हात काही खिशात गेला नाही, हे मात्र खरे. शाब्दिक शुभेच्छांचा वर्षाव झाला. कनवटीतून कवडी काढून दिली असेल असे वाटत नाही. हे सारे कस्तुर अनुभवत होती. नवऱ्याच्या आशा-आकांक्षांना पंख लागले होते. एक पर्याय कर्ज घेण्याचा होता. घरात पैश्यांची सोय नव्हती. चहुकडे प्रयत्न जारी होते.

नवऱ्याची नजर बायकोच्या दागिन्यांवर स्थिरावली. करमचंद बाबाने सुन-मुख बघताना सोन्याच्या दोन बांगड्या दिल्या होत्या. माहेरहून मिळालेली सोन्याची साखळी होती. सुवर्ण पट्टीने मढवलेली हस्तिदंती दोन काकणे होती. हे दागिने कधी अंगावर मिरवण्याचा मोह कस्तुरला झाला नव्हता. मोहनदासची नजर त्या दागिन्यांकडे वळली. तिला काय वाटेल? काही दागिने सासरचे खरे. अधिक दागिने तर माहेरचे होते. ते तिचे स्त्री धन होते. ते का देऊन टाकायचे? नवरा शिक्षणासाठी पैसे गोळा करत होता. त्याची दमछाक ती बघत होती. थोरल्या दिराची धावपळ बघत होती. यातून काय मार्ग काढता येईल याचा विचार करत होती. तिने क्षणभरही विचार केला नाही. दागिने नवऱ्याच्या हाती सोपवले. क्षणाचाही विलंब न करता तिने आपले स्त्रीधन नवऱ्याच्या स्वाधीन केले.

मोहनदासने कस्तुरचा निरोप घेतला. तिच्या निःशब्द प्रतिक्रियेत अब्द-अब्द सामावलेले होते. कस्तुरने मोहनदासच्या या मागणीला संमती दिली. विरोध केला नाही जर विरोध केला असता तर गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रातून याची अवश्यमेव नोंद घेतली असती. कस्तुरच्या आग्रही आणि जिद्दी स्वभावाची इतकी कसून नोंद घेणारे गांधीजी या कामी कदापि मागे राहिले नसते. एक मुद्दा असाही आहे. कुणाही पुरुषाचे अशा अडचणीच्या वेळी पत्नीच्या दागिन्यांकडे लक्ष गेले असते. तसे मोहनदासचे गेले आहे. कस्तुर या मागणीला तितक्याच सहजतेने स्वीकारते. विरोध करत नाही. हे तिला स्वाभाविक वाटते. यात काही चुकीचे वाटत नाही. हे त्या युगातील दोघाच्या समान प्रगल्भतेचे निदर्शक आहे. बायकोचे दागिने विकायचा मार्ग होता. तो अधिक सोईचा होता. दागिने सासरचे असतील तर सोपाही होता.

दागिने परत करायचा वायदा काही मोहनदासने केला नाही. विदेशातून शिकून काही फायदा होईल काय? याचा विचारही कस्तुरने केला नाही. नवरा अडचणीत आहे. घरात पैसा नाही. नातेवाईक कुणी द्यायला तयार नाहीत. काय करावे? ती त्याग करते. मागचा-पुढचा काहीही विचार करत नाही. नवरा विलायतेत शिकायला गेला. कस्तुर माहेरी जात नाही. सासरीच राहून सेवा करते. जबाबदाऱ्या पेलते. मोठे दीर लक्ष्मीदास. त्यांच्या पत्नी पूजापाठ करत रहायच्यात. मधले दीर करसनदास त्यांनी तर विवाहानंतर अभ्यासाचे दप्तर अडगळीत टाकले होते. ते उभयता आपल्या धुंदीत असायचे. कस्तुरचा नवरा विलायतेत होता. ती धाकटी सूनही होती. मोठ्यांची सेवा करायची जबाबदारी नाहीतरी तिचीच होती ना! मोठ्या दिरांच्या लेकरांचीही जबाबदारी कस्तुरचीच.

थोरला भाऊ लक्ष्मीदास पुढे आला. त्याने काही पैशांची जुळवाजुळव केली. कस्तुरबा आपल्या सुखरुप बाळंतपणासाठी देवाचा धावा करत होती. सुंदर गुटगुटीत बाळ जन्माला आले. तिचा जीव सुखावून गेला. १८८८ साली वसंत ऋतु आला. तिने एका पुत्राला जन्म दिला. त्याचे नाव हरीलाल. अठराव्या वर्षाच्या वयात तर मोहनदास शिकण्याच्या निमित्ताने विलायतेला गेला आहे. त्यामुळे अनायासेच दीर्घ मुदतीचा वियोग झाला. हा अनुकूल असा वियोग ठरला. मोहनदास विलायतेत शिकायला निघाला होता. या चर्चेत कस्तुरचा कुठे सहभाग दिसत नाही. त्या काळी ते तसे शक्य नव्हते. आवश्यक तर जणू नव्हतेच. एकूणच अशी समाजरचना होती. त्या काळात कस्तुरची स्थिती रामायणातील ऊर्मिलेसारखी होती. तो काळ काय आणि नंतरचाही

काही काळ काय, अपवादभूतच होता. भारतीय स्त्रियांना सासरा-सासूंचे म्हणणे मान्य होते. नवऱ्याचा निर्णय स्वीकार्य होता. थोरल्या जाऊबाई तर म्हणायच्याही 'बिचारी कस्तुर. रात्रं-दिवस राब-राब राबते. आकंठ कामात बुडालेली असते. कामच काम. धाकटा हरीलाल दिवसभर भटकत रहातो. लेकराचे तोंड स्वच्छ धुऊन द्यायचीही उसंत कस्तुरला नसते बाई !'

आता नवरा विलायतेत शिकायला जाणार होता. मोठे भाऊ म्हणाले की मोहनदासने बॅरिस्टर व्हावे. याला मामांनी दुजोरा दिला. बॅरिस्टर व्हायचे तर विलायतेला जायला हवे. त्याला खूप आनंद झाला. आता विलायतेला जायचे तर सागर ओलांडणे आले. याला तर धर्माची मान्यता नाही. हे देवाधर्माला न आवडणारे काम आहे. पंच परमेश्वर काय निर्णय देतील? तिचे मन थकून-थिजून गेले.

आपल्या विवाहानंतरच्या आयुष्याविषयी गांधीजींनीच आपल्या आत्मचरित्रात जे काही लिहून ठेवले आहे. ते प्रमाण आहे. ते प्रामाणिक आहे. सत्याधारित आहे., मुख्य म्हणजे पारदर्शक आहे. आपल्या प्रपंचात सुख मूळी नव्हतेच असे कुणी मानू नये असे ते बजावून सांगतात. आपल्या वक्र स्वभावाच्या मूळाशी स्निग्ध भावना होती असे ते म्हणतात. ते आपल्या पत्नीला आदर्श बनवू चाहत होते. तिने निष्पाप व्हावे आणि रहावे यासाठी ते प्रयत्नरत होते. आपण जे काही शिकलो आहोत ते सारे तिलाही शिकवावे असे त्यांना मनापासून वाटायचे. उभयतांच्या मनाच्या तारा जुळाव्यात असे त्यांना वाटायचे. मोहनदासचे प्रेम हे खरे तर एकपक्षीय होते. त्याचे विषय सुख एका स्त्रीवर केंद्रित होते. तो त्या सुखाच्या प्रतिध्वनीची प्रतीक्षा करत असायचा. प्रेम होते पण बहुश: एकतर्फी होते. यातून दु:खाचा संभव होणे अगदीच शक्य होते.

मोहनदास आणि कस्तुरचे असे बालपण. बालपणीच झालेले लग्न. या लग्नानंतरचा आरंभिक काळ. आयुष्यातले प्रथम चरण. हा मोठा रोमहर्षक अध्याय आहे. ते दोघे प्रेय आणि श्रेय या बाबतीत झुंजताना दिसतात. त्यांचे वय संवेदनशील आहे. अवतीभवतीचे वातावरण प्रभाव टाकणारे आहे. मोहनदासवर कुसंगतीची छाया आहे. काही भल्या संस्कारांचा ठसाही आहे. या सर्वांचा प्रभाव पडला आहे. दोघांचे सहज वळण प्रेय वाटेवर आहे. ईश्वरावर त्यांची अथांग श्रध्दा आहे. यामुळे ते श्रेयाकडे आकृष्ट होताहेत. कर्तव्यबुध्दी त्यांना विषयांध बनू देत नाही. सेवा त्यांना विषयवासनेतून बाजूला ओढून नेते. दोघेही पापभीरुमुळे वाचले आहेत. मोहनदास कधी सत्यामुळे सुरक्षित राहिला आहे. कधी दैवामुळे तर कधी कुठल्या अज्ञात कारणांमुळे तो सावरत चालत आहे. काही क्षण कसोटीचे आहेत. ईश्वर कृपेने तो श्रेयाकडे वाटचाल करताना दिसत आहे. तो बुध्दीच्या मार्गाने चालत आहे. श्रध्देचा आधार घेत आहे. जिथे बुध्दिचे क्षेत्र संपून जाते तिथून श्रध्देचा मार्ग सुरु होतो. तो बालपणापासून सत्याच्या आधारे जगण्यासाठी जणू प्रतिबध्द आहे. यासोबत मनात पावित्र्याची भावना आहे. साहस आहे. आपली चुक कबूल करुन घेण्याची हिंमत आहे. प्रेय आणि श्रेय यातील संघर्ष मोठ्या तीव्र स्वरुपाचा आहे.

❖❖❖

## ११) ज्ञाती बहिष्कृतीचा बडगा !

मोहनदास शिक्षणासाठी विलायतेत जायचे ठरवत होता. पैश्यांची जुळवाजुळव सुरु होती. या दरम्यान ज्ञातीमध्ये खळबळाट झाला. समाजाची सभा भरवण्यात आली. मोहनदासला सभेत हजर रहायचा आदेश झाला. कस्तुरच्या छातीत धडकी भरली. मोहनदास नाराज झाला नाही. सभेत जाऊन उभा राहिला. त्याला ना भय वाटले ना संकोच. तो ठाम होता. सभेच्या अध्यक्षस्थानी शेठजी होते. ते लांबचे नातलगही होते. करमचंदांचे आत्मीय होते. सभेत खूप लोक जमले होते.

"तू इंग्लंडला निघाला आहे.स. हे बरोबर नाही. आपल्या धर्मात समुद्र ओलांडून जाण्याची मनाई आहे. हे आपल्या जातीला मान्य नाही. विलायतेत धर्म सांभाळता येणार नाही, असे आम्ही ऐकतो आहोत. धर्माची तशी आज्ञा नाही. हे निषिध्द कृत्य आहे. तिथे यूरोपियन लोक असतील. त्यांच्यासोबत खावे-प्यावे लागेल. याला पंचांचा विरोध आहे." समाजाचे अध्यक्ष म्हणाले होते.

'माझे असे मत आहे. की विलायतेत शिकायला जाणे हा काही अधर्म नाही. मी तिकडे विद्याभ्यासच करणार आहे. तुम्हाला जी भीती वाटते ती निराधार आहे. मी आईच्या चरणाशी बसून शपथ घेतली आहे. मी चुकीच्या गोष्टींपासून दूर राहू शकेन.' मोहनदास ठामपणे म्हणाला. एवढे ऐकल्यावरही शेठजींचे समाधान झाले नाही. 'पण आमचे तुला सांगणे आहे. विलायतेत धर्मपालन करणे शक्य नाही. तुझे वडील माझे निकटवर्ती होते. हे का तू जाणत नाहीस? माझे म्हणणे तुला मान्य करावेच लागेल.' अध्यक्ष म्हणाले.

"माझ्या वडिलांचा व आपला संबंध मला ठाऊक आहे. आपण मला वडिलांसमान आहात. माझा निरुपाय आहे. मी माझा निर्णय बदलु शकत नाही. माझ्या वडिलांचे एक मित्र व सल्लागार आहेत. मावजी दवे त्यांचे नाव. ते विद्वान ब्राह्मण आहेत. त्यांना माझे विलायतेला जाणे काहीही वावगे वाटत नाही. माझ्या आईने परवानगी दिली आहे. थोरले भाऊ लक्ष्मीदासांची परवानगीही मला मिळाली आहे. आपण आडकाठी आणू नये." मोहनदास शांतपणे म्हणाला.

'म्हणजे जातीचा हुकूम तू मानणार नाहीस तर?' अध्यक्ष गरजले.

'माझा नाइलाज आहे. मला वाटते हा माझा खासगी प्रश्न आहे. यात जातीने न पडणे बरे !' अठरा वर्षे वयाचा मोहनदास म्हणाला. शेठजींच्या रागाचा पारा वाढला. त्यांनी चार-दोन सुनावल्या. मोहनदासने कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

'या मुलाला आजपासून ज्ञाती-बहिष्कृत मानले जाईल. याला कुणी मदत करु नये. बंदरावर पोहोचवायला जाऊ नये. असे कुणी केल्यास ज्ञाती त्याला जाब विचारील. सव्वा रुपया दंड होईल.' शेठजींनी हुकूम ठोठावला.

मोहनदासवर या निर्णयाचा अजिबात परिणाम झाला नाही. त्याने शेठजींची परवानगी घेतली नाही. मोहनदासला जात पंचायतीने वाळीत टाकले होते. कस्तुरच्या मनात पंचांच्या कटु निर्णयाचे ढोल निनादू लागले होते. नकाराच्या तर्जन्या मनाभोवती एक कोट बनून उभ्या ठाकल्या होत्या. तिचा श्वास कोंडला गेला. याचा लहानग्या हरीलालला काय पत्ता? कस्तुरला मात्र ती झळ पोहोचत होती. त्यात यापुढे आता नवऱ्याची अनुपस्थिती असणार होती. हे नाकारता न येणारे मोठे शून्य होते. अधून-मधून कस्तुर माहेरी निघून जायची. माहेरी असो वा सासरी. जाती बहिष्कृतीचा शाप तर पाठीमागे होताच. मोहनदासने किती सहन केले. आपणही हा शाप-ताप झेलू या. या भावनेने ती कटिबध्द झाली होती.

आपल्या भावावर या निर्णयाचा काय परिणाम होईल? याची चिंता मोहनदासला वाटू लागली होती. सुदैवाने भाऊ मागे हटला नाही. त्याने आपली संमती कायम ठेवली. राजकोटहून तसा निरोप धाडला. 'ज्ञातीचा ठराव काहीही असो. काळजी करु नकोस. मी तुला याविषयी मुळीच अटकाव करणार नाही. मी तुझ्यासोबत भक्कमपणे आहे.' गांधीजींनी आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. मुंबईत ज्ञातीबंधू रहात होते. यातल्या अनेकांना मोहनदासचे पाऊल शोभनीय वाटले नव्हते. त्यांच्या मते हे पाप होते. यापूर्वी कुणीही समाजबांधवाने

सागर ओलांडला नव्हता. त्यांनी मोहनदासची खिल्ली उडवली.

मोहनदासने पैसे कस्तुरच्या भावाजवळ दिले. खुशालभाई मकनजी यांनी ते पैसे घेतले. मोहनदासने स्वत:जवळची रक्कमही दिली. निरोप घेतला. पंचांनी त्याला जाती बहिष्कृत केले होते. मोहनदासने पैसे मागितले असता त्याने परत द्यायला नकार दिला. पंचांच्या निर्णयाचा बडगा त्याच्या माथ्यावर उगारलेला होताच. मोहनदासने मग एका मित्राकडून पैसे मागितले. रणछोडदास पटवारी त्याचे नाव. हा मोठा बनिया होता. त्याच्याजवळ फुटकळ खर्चासाठी कर्ज मागितले. ते मिळाले. तो काही मोहनदासच्या जातीचा नव्हता. सबब त्याच्यावर पंचांच्या निर्णयाचे बंधन नव्हते. खुशालभाईंनी ते पैसे पटवारी यांना दिले. मग पटवारींकडून मोहनदासने मिळवले. कर्ज घेतले. ते लक्ष्मीदासकडून वसूल करायची विनंती केली. मित्राने हे म्हणणे मान्य केले. ही लहान घटना नव्हती. खुशालभाईंनी पैसे देण्याऐवजी 'नरो वा कुंजरो वा' केले होते. [१]

कस्तुरच्या कानावर हे सारे येत होते. आपण जातीबहिष्कृत झालोत हे तिला कळले. तिला काही कळेना. आपला नवरा प्रतिज्ञाबध्द आहे. शिक्षणासाठी जात आहे. पंच असा निर्णय कसा काय घेऊ शकतात? मोहनदासला हटकायचे कारणच काय? त्याची चूक काय? या लहानग्या हरीलालचे काय? आता बहिष्कृतीमुळे माहेर अंतरले की काय? प्रश्नांच्या गांधीलमाशांनी तिचे चित्त विध्द केले. या घटनेचा परिणाम कस्तुरवर खोलवर झाला. तिच्या मांडीवर धाकटा हरीलाल होता.

लंडनला जाण्यापूर्वी मोहनदासला पंचांनी विरोध केला होता. वाळीत टाकले होते. यापूर्वी आपण असेच आद्य शंकराचार्यांना वाळीत टाकले होते. ज्ञानेश्वरांसोबत त्यांच्या सर्व भावंडांनाही वाळीत टाकले होते. गांधीजींच्या काळात विदेशगमन भयंकर सामाजिक गुन्हा होता. विदेशी जाणाऱ्याला जातीबहिष्कृत केले जाई. गुजरातेतच यापूर्वी अशा घटना आढळतात. नडियादचे पाटीदार श्री शामळदास देसाईंनी १८३२ साली सर्वप्रथम परदेशी प्रयाण केले. १८६० साली श्री महीपतराम यांनी समुद्र ओलांडून विदेश गाठले. श्री महीपतराम नीलकंठ विदेशात गेले होते. मोहनदासला निरोप द्यायला जाणाऱ्यांनाही पंचांनी दंड ठोठावला आहे. मदत करणारा तर दंडनीय अपराधी होता. पोहोचवायला जाणाराही तेवढाच अपराधी होता. त्याला पंच जाब विचारणार होते. सव्वा रुपया दंड करणार होते. ही निषेध आज्ञा होती. बरेच लोक निरोप द्यायला जमले होते. त्यांची नावे गांधीजींच्या रोजनिशीत आढळतात.

मोहनदासने वडिल मंडळींचा आशीर्वाद घेतला. मुंबईकडे जायला निघाला. मुंबई प्रवासाचा हा पहिला प्रसंग होता. सोबत थोरले बंधू आले होते. घरी कस्तुर होती. तिच्या मांडीवर काही महिने वयाचा हरीलालही होता. आता कस्तुरला त्याचीच काय ती सोबत होती. मुंबईला गेल्यावर एक अडचण समोर आली. जून-जुलै महिन्यात हिंदी महासागरात वादळ आले होते. आता मोहनदासला नोव्हेंबर महिन्यात पाठवावे असा एक सल्ला मिळाला. बडिल बंधू घाबरुन गेले. मोहनदासने असा जीव धोक्यात घालावा. शिकायला जावे हे काही त्यांना पटेना. आता त्यांचा सल्ला वडिल सल्ल्याप्रमाणे होता. मोहनदास एका मित्राकडे थांबला.

मुंबईला निरोप द्यायला भाऊ आणि मित्र होते. कस्तुर घरी राहिली. ती तीन वर्षे एकटी होती. मोहनदास बहिष्कृत होता. त्याच्या सोबत ती व छोटा हरीही बहिष्कृत होता. माहेरी जायची वाट बुजली होती. तिचे दिवस मोठे. रात्री लांबलचक झाल्यात. किती-किती बदललेले होते सारे. आता घर तेच तर होते. धाकटा हरी सोबत होता. यामुळे थोडी गोडी होती. हरीच्या खोड्या बघून पुतळीला मोहनचे बालपण आठवत रहायचे. कस्तुरला सासुची साथ होती.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३९ ते ४२

❖❖❖

## १२) दोन संघर्षशील महिला

कस्तुर आणि पुतळी. दोन संघर्षशील महिला आहेत. एक शिखर आहे. दुसरा पाया. पुतळी गांधी परिवाराची अध्वर्यु आहे. तिच्या मस्तकावर वैधव्याची कुऱ्हाड बरसली आहे. ती कावरी बावरी आहे. कस्तुर सैरभैर आहे. १० ऑगस्ट १८८८ साल. मोहनदास मुंबईकडे निघाला. मोहनदासने घरच्यांचा निरोप घेतला. आई निरोप देताना रडली. या रुदनाला मुख्य दोन पदर आहेत. नवरा सोबत नाही. धाकटा मुलगा साता समुद्रापार जातो आहे. परत केव्हा भेट होईल काही सांगता येत नाही. मोहनदासचे मनही उचंबळून आले. कस्तुरची भेट घेतली. ती थबकली, म्हणाली 'नका हो जाऊ.' एवढे वर्णन गांधीजींनी केली आहे. पुढे काय झाले? हे त्यांनी वाचकांवर सोपवून दिले आहे.[१]

कस्तुरचे 'नका हो जाऊ.' असे म्हणणे हे विरोधासाठी नाही. ते वियोगदर्शक आहे. मोहनदास विलायतेला शिकायला निघाला होता. आई डोळ्यांना पदर लाऊन रडत होती. तिच्या हुंदक्यांचा आर्त ध्वनी लांबवर ऐकू येत होता. मोहनदासने बायकोचा निरोप घेतला. ती तर रडून-रडून दमून गेली होती. तो भेटीला येण्यापूर्वीपासून ती एखाद्या मूक प्रतिमेसारखी माथा झुकवून उभी होती. तो तिच्या समोर जाऊन उभा राहिला. दोन पुतळे एकमेकांपुढे उभे ठाकले होते. त्याने तिची आसवे पुसली. मुखडा वर उचलला. संपूर्ण फुललेल्या उजळ दीपमाळेसारखी ती समोर उभी ठाकली होती. तिच्या थरथरत्या ओठांवर त्याने हलकेच ओठ टेकवले. दीपमाळ एकदम झळाळून निघाली. खोल पाण्यातून उसळणाऱ्या चिमुकल्या मासोळीसारखा एक अदृश्य हुंदका उसळला. तिने हात उंचावला. एवढेच म्हणाली. 'जाऊ नका ना.' मोहनदासला तिचा थरथरता अधरोष्ठ थकवत राहिला होता. तिच्या नेत्रातील अधीरता जखम करत राहिली होती. पावसाळी ढगातल्या चंद्रासारखे तिचे मुख होते. मोहनदास निकराने माघारी वळला. कस्तुरला वाटले की आपण खूप मागे राहून गेलो आहोत. मनातले दु:ख तिला व्यक्तही करता आले नाही. तिच्या मनात काहुर होते. नवरा विलायतेच्या झगमगाटात हरवून तर नाही ना जाणार? पुतळी आईलाही नेमकी हीच काळजी वाटत होती.

या प्रसंगाविषयी गांधीजींचे चरित्रकार श्री नारायण देसाई या प्रश्नाची वेगळी बाजू मांडताहेत. ते गांधीजींचे स्वीय सचिव श्री महादेवभाई देसाई यांचे चिरंजीव आहेत. ते लिहितात की हा प्रसंग वाचताना अनेकाना यात कस्तुरचा दोष दिसून येईल. मोहनदासचा नवरेपणाही दिसेल. असे वाटायला कारणेही आहेत. तत्कालीन सामाजिक परिस्थिती. तिचा अभ्यास या निमित्ताने करणे गरजेचे ठरते. तो काळ बघू जाता कस्तुर अधिक उदार वाटते. ती पतीच्या सोबत चालताना कधी लाचार झालेली नाही. हे या आधीच्या तिच्या वागण्यावरुन आपल्या सहज लक्षात येते. एकोणिसाव्या शतकाचा तो उत्तर काळ होता. अखेरचे दशक होते. हा तो काळ आहे. हे आपण समजून घेऊ या. तत्कालीन काठियावाडचे वातावरण बघू या. मध्ययुगीन वातावरणाचा प्रभाव त्या काळावर दिसून येतो. शतकापूर्वीच्या जुन्या व्यवस्था होत्या. काठियावाड त्या व्यवस्थेला जणू काही घट्ट चिकटून असल्याचे दिसते. समाजात राजा आणि राजपुरुषांचे वर्चस्व होते. घरा-घरात घरधन्याचा दबदबा होता. नवरा म्हणजे धनी. धनी म्हणजे मालक. देशाच्या बहुतांश भागात नवजागरणाचे वारे वाहू लागले होते. त्याचा प्रभाव बंगालात दिसतो. महाराष्ट्रात आहे. गुजरातेत अल्प-स्वल्प प्रमाणात आहे. बंगालचा ब्राह्मोसमाज आणि महाराष्ट्रातील प्रार्थना समाज कार्यरत होते. आर्यसमाजही देशभरात जागरणाचा घंटानाद करत होता. आर्यसमाजाचे प्रवर्तक मूळ गुजरातचे आहेत. हे ध्यानी घ्यावे. दयानंद सरस्वती मूळ काठियावाडचे. अर्थात् 'पिकते तिथे विकत नाही'. हा न्याय इथेही लागू पडलेला दिसतो. हा प्रभाव पंजाबात पडला. दिल्लीवर पडला. उत्तर-पश्चिम संयुक्त प्रांतावर दिसतो. गुजरातेत सुधारणा जागली. त्याची कारणे मात्र वेगळी होती. ती धार्मिक चळवळींची होती. स्वामी नारायण संप्रदायाचा प्रभाव होता. अन्यान्य साधु-संतांचा प्रभाव होता. साधु जीवनाचे आचरण आणि उच्चारण याला कारणीभूत ठरले. अर्थात् त्या समाज जीवनात स्त्रीचे स्थान काय होते? हा मनाला दंश करणारा प्रश्न होता. राजा राममोहन राय यांच्यापासून सामजिक परिवर्तनाची चळवळ

आकाराला येत होती. आपल्या परीने कार्यरत होती. या प्रवृत्तीचे लोण सावकाश पोहोचत होते.

पुतळीच्या जीवनात शून्यता साकळली आहे. कस्तुरच्या जीवनात नवऱ्याचा विरह-वियोग आहे. मोहनदासची घरात अनुपस्थिती आहे. याचा ताण पुतळी आणि कस्तुर या दोघींना आहे. कस्तुर लहानग्याला सांभाळताना धावपळ करत आहे. पुतळी हरीलालच्या खोड्या अनुभवत आहे. तिला अटळपणे मोहनदासचा खोडकरपणा आठवत आहे. कस्तुरला घरातील आर्थिक अस्वस्थतेची स्पंदने थकवत राहिलीत. सासरे संस्थानचे पंतप्रधान होते. घरात माणसांचा राबता होता. आता मोठे दीर राबत होते. आर्थिक खर्चाची जुळणी करणे अवघड होत चालले होते. लक्ष्मीदासला दुसरी मुलगी झाली. करसनदासला मुलगी झाली. घरात तीन बालके आलीत. खाणारी तोंडे वाढलीत. राबणारे हात होते तेवढेच राहिलेत. मोहनदासला अंदाजापेक्षा दुप्पट खर्च लागणार होता. घर कर्जबाजारी होऊ बघत होते. कस्तुर पुतळीची कासावीशी बघत होती.

कस्तुरसाठी इंग्लंड हा अज्ञात प्रदेशच होता. ते एक गूढ होते. तिच्या कल्पना जगासाठी तो अतर्क्य प्रदेश होता. अद्भुत गोष्टींनी भारलेला प्रदेश होता. तिला लिहिता-वाचता येत नव्हते. पत्र कोण वाचेल? पत्र लिहावे कसे? या प्रसंगी प्रयत्नपूर्वक शिकवू बघणारा नवरा तिला आठवे. शिकायचेच नाही असा हट्ट करणारा स्वत:चा निग्रही चेहरा आठवे. ती निराश-निराश होऊन जाई. तिचा पत्रव्यवहार खासगी कसा काय होऊ शकत होता? तिच्या मनाचा पार कोंडमारा व्हायचा. मोहनदास थोरल्या भावाला उद्देशून पत्रे लिहायचा. त्याची बायको नंदकुंवर. तिच्यामार्फत कस्तुरला नवऱ्याची ख्याली-खुशाली कळायची. पत्रे विशेषत: पैसे मागण्यासाठी असत. त्या पत्रांचे काही कौतुक नसायचे. आपला नवरा लंडनमध्ये कसा रहात असेल? काय खात-पीत असेल? तिथे त्याचे मित्र कोण असतील? क्षणभर तिच्या मनात मेहताबच्या मैत्रीची पाल चुकचुकायची. ती विचार-विचार करत रहायची. साथ-सोबत काय ती एकट्या हरीलालची होती. वाट बघणे एवढा एकच एक पर्याय तिच्यापुढे उरला होता.

कस्तुरच्या मनात परावलंबनाची भावना होती. आपले लेकरु काय आणि आपण स्वत: काय मोठ्या दिरांवरच अवलंबून आहोत. हा विचार कस्तुरला सतावत होता. ती आपल्या परीने यथाशक्य बचत करु लागली. तिचे बालपण श्रीमंतीत गेले होते. सासरी आल्यावरही पंतप्रधान सासऱ्यांचा दिमाखदार काळ तिने बघितला होता. आता नवे कपडे कोण आणून देणार होते? आपल्या नणंदेकडून उसनी साडी ती घेऊ शकत होती. तिने सासूप्रमाणे आपला आहारही कमी केला. हरीलालची काळजी घेणे तिचे मुख्य लक्ष्य होते.

कस्तुर गांधी घराण्याची सून होती. एका लेकराची आई होती. तिची स्थिती घरा-समाजात कदाचित काहीशी सुदृढ असेल. तिचा सामाजिक दर्जा उच्च होता. काही व्यवहारांमध्ये तरी असे असावे. सासूच्या बरोबरीचा किमान मोठ्या जाऊंच्या बरोबरीचा तरी मानला जाऊ शकत असेल. असे मानायला थोडी जागा आहे. पण पुरुषी व्यवस्थेच्या संदर्भातली तिची भागीदारी नगण्य आहे. ती शयनगृहाच्या पलीकडे जाऊ शकत असेल असे काही वाटत नाही. कस्तुरचे वय अठरा वर्षांचे आहे. विवाहामुळे तिच्या जीवनात मोहनदासइतके प्रौढत्व आणि परिपक्वता आली असेल. कदाचित याहून काहीसे अधिकच जागले असेल. त्या वयात मग ती बालिका वा किशोरी का असेना पण तिचा दर्जा तर गृहिणीचा होऊन जात होता. कस्तुरच्या प्रगल्भतेची तर अनेक उदाहरणे या पहिल्या अध्यायातच दिसतात. नवऱ्याच्या चुकीच्या आग्रहाना ती बळी पडत नाही. निकराने त्यांना विरोध करते. ती स्वतंत्र प्रज्ञेची गृहिणी आहे. पतीच्या कल्याणात आपले कल्याण सामावले आहे. हा बोध तिला माहेरी मिळाला होता. सासरी या बोधाचाच कित्ता गिरवला गेला होता. समाज जीवनाचे तर अनेक शतकांपासूनचे संस्कार होतेच होते.

संदर्भ

१) 'द व्हेजेटेरियन' या पत्रात प्रकाशित गांधीजींची दिनांक १३ जून १८९१ ची मुलाखत

❖❖❖

## १३) नवरा विलायतेच्या वाटेवर !

४ सप्टेंबर १८८८. पी. एंड ओ. कंपनीचे एस्. एस्. क्लाईड जहाज बंदरावर उभे होते. मोहनदास विलायतेकडे निघाला होता. कस्तुरसाठी हा वियोग तीन वर्षांसाठी होता. किमान तीन वर्षे तरी नवरा तिला भेटणार नव्हता. बाळाच्या मस्तकावरुन मायेचा हात फिरवणार नव्हता. कस्तुरचे मन एकाकी-एकाकी झाले. घरात पाळणा होता. पाळण्यात हरीलाल म्हणजे भविष्य होते. वर्तमान मात्र विलायतेत होते. मोहनदास निश्चयी होता. परिस्थिती बिकट होती. दुसरा कुणी असता तर त्याचा निश्चय डळमळीत झाला असता. तो इंग्लंड बघू शकला नसता. गांधीजी या प्रसंगाविषयी लिहितात -- 'एकदा एखादा निश्चय केल्यावर सहजासहजी सोडून देणाऱ्यातला मी नाही.'[१]

मोहनदास पंख लेऊन निघून गेला. सागर लाटांवर त्याचा प्रवास सुरु झाला. इकडे कस्तुर एकटी होती. ज्ञातीबहिष्कृतीचे वादळ तिच्या डोक्यात घोंगावत होते. अश्रू गाळणारी सासू सोबतीला होती. कडेवर तान्हा हरीलाल होता. तो अबोध होता. तो कुठलीच वेदना समजू शकत नव्हता आणि त्याचीच तर साथ आश्रयाला होती.

मोहनदासजवळ मोठे धन होते. आईकडून मिळालेली भक्ती होती. वडिलांकडून धर्मजिज्ञासा लाभली होती. कस्तुरकडून लाभलेले सेवा आणि समर्पणाचे पाथेय सोबत होते. रंभा मोलकरणीने श्रध्दा अर्पिली होती. चिंता अपार होत्या. आशा-निराशांची बरसात होती. नजरेसमोर एकच ध्रुवतारा होता. प्रयत्नशीलता होती. ईशश्रध्दा तर होतीच होती.[२]

कस्तुरसाठी विलायत स्वप्नलोकीची वस्ती होती. घरात चर्चा व्हायची, नाही असे नाही. चर्चेचा सूर मुख्यत्वे करुन पैसे पाठवण्याविषयीचा असायचा. काळजी असायची. मसाले मागवले जात. कधी मिठाई मागवलेली असायची. मोहनदाससाठी हौसेने गोडधोड पदार्थ तयार करुन ती लंडनला पाठवी. त्याला गूळ पापडी खूप आवडायची. पुढे पुढे तर ती मागणीही थांबली होती.

मोहनदास जहाजात बसला. सारे कुटुंब जणू काही सोबतच होते. वडिलांच्या निधनाचे दु:ख होते. आईची ममता होती. थोरल्या भावाचे प्रेम होते. कस्तुरचा त्याग होता. कुटुंब सुखी करण्याचा ध्यास होता. सोबत फराळाची सामग्री होती. यासोबत कस्तुरच्या सुगरण असण्याच्या खुणा होत्या. एक अतर्क्य साथ-संगत होती. मुंबई बंदर सोडले. बोटीवरचा प्रवास सुरु झाला. बोटीवर खाद्य पदार्थ मिळायचेत. त्यातले शाकाहारी पदार्थ कोणते हे कळत नव्हते. विचारायची लाज वाटायची. आईने आणि कस्तुरने मिठाया दिल्या होत्या. मोहनदासने त्यांचा आस्वाद घेतला. फलाहार केला. मजूमदार सोबतीला होते. जहाजावर काही कर्मचारी भारतीय होते. मजूमदारांनी त्यांचे मन वळवले. त्यांना राजी केले. ते डाळ तयार करायला लागले. तोवर मोहनदास घरुन आणलेल्या मिठायाच खायचा. फळे खायचा. मिठाया खाताना त्याला घरची आठवण यायची. आईची ममता आठवायची. कस्तुरची माया आठवायची.

प्रवास सुरु होता. सोबत एक इंग्रज होता. त्याला दया वाटली. तो वयाने मोठा होता. त्याने बोलायला सुरुवात केली. खाण्यापिण्याविषयी चौकशी केली. मद्यपानाविषयी मोठ्या उदारपणे जणू काही त्याने सवलत दिली. मांसाहार मात्र करावा लागेल असे मत व्यक्त केले. मोहनदासने या सल्ल्याबद्दल त्याचे आभार मानले. आपण आईशी केलेली प्रतिज्ञा त्याला आठवली. कस्तुरची कासाविशी आठवली. प्रतिज्ञा मोडणार नाही हा त्याचा निश्चय होता. वेळ पडल्यास पुनश्च मायदेशी परतायची त्याची तयारी होती.

मोहनदासचा प्रवास कसाबसा पूर्ण झाला. तो साउदॅम्प्टन बंदरात उतरला. हॉटेलात थांबला. हॉटेल महागडे होते. पोटाचे हाल कायम होते. हॉटेलात कुठलाच पदार्थ आवडेना. एखादा पदार्थ घेतला. तो आवडायचा नाही. घरचे पदार्थ होते म्हणून निभाव लागत होता. त्या पदार्थांमध्ये कस्तुरचा स्निग्ध स्नेह होता.

मोहनदासला इंग्लंडमध्ये करमत नव्हते. सारखी देशाची आठवण यायची. घरची आठवण यायची. रात्र झाली की रडू कोसळे. घरच्या नाना आठवणी जागत. मनाभोवती फेर धरत. झोप येत नसायची. मनात

दुःख दाटून यायचे. बोलायला सोबत कुणीही नव्हते. मनाचे समाधान तरी कसे घालावे? मोहनदासला उत्तर सापडेना. लोक विचित्र होते. त्यांची राहणी विचित्र होती. घरेही विचित्र होती. काय तिथले वागणे? कशा तिथल्या रीतीभाती? कसले वर्तनाचे नियम? कसल्या वाईट-वाईट सवयी? अखाद्य खाणे. अपेय पिणे. खाद्य पदार्थ त्याला शुष्क वाटत. बेचव लागत. अडकित्त्यात सुपारी असावी अशी त्याची अवस्था होती. विलायत आवडत नव्हते. मायदेशी परतता येत नव्हते. बरे, मामला काही आठवड्यांचा नव्हता. काही महिन्यांचाही नव्हता. तब्बल तीन वर्षे काढायची होती. मोहनदासचा निश्चय अकंप होता. आईला दिलेले वचन पूर्ण करायचे होते. ज्ञानाने संपन्न व्हायची आस होती. त्याला कस्तुरचा प्रेमळ चेहरा आठवत असायचा.[2]

मोहनदासने १८८८ मध्ये रोजनिशी लेखनाला सुरुवात केली. दुर्दैवाने सुरुवातीचा काही भागच शिल्लक आहे. रोजनिशीचा बराचसा भाग आज उपलब्ध नाही. मोहनदासने लक्ष्मीदास यांना लांबलचक पत्रे लिहिलीत. आईला प्रदीर्घ पत्रे लिहिलीत. ती आज उपलब्ध नाहीत. हरवलीत किंवा नष्ट झालीत. लंडनच्या आयुष्याच्या खुणा त्यातून वाचता आल्या असत्या. तो दस्तावेज आज उपलब्ध नाही. कस्तुरला लिहिता-वाचता येत नव्हते. तिला पत्र लिहून काही उपयोग नव्हता. तिला काही निरोप द्यायचा असेल तर भावाला कळवावे लागे. मुलाला काही निरोप कसा देणार? त्यासाठी मग भावालाच कळवावे लागे. घरुन अनेकदा मिठाई वगैरे खायचे जिन्नस मागवावे लागत. कधी असे पदार्थ यायला विलंब लागायचा. अंतर खूप होते. प्रवास सुगम नव्हता. प्रतिज्ञा आता आनंददायक वाटू लागली होती.

आता त्याचा शाकाहारी लोकांशी परिचय वाढला. एक संस्था 'द व्हेजेटेरियन' नावाचे साप्ताहिक काढायची. मोहनदास या साप्ताहिकाचा वर्गणीदार बनला. संस्थेचा सभासद झाला. कार्यकारी मंडळावर त्याची निवड झाली. तो शाकाहार विषयक प्रयोगात गढून गेला. आता घरुन मिठाई मागवणे बंद केले. मसाले मागवणे बंद केले. ही वार्ता कस्तुरला जाऊकडून कळली. मोहनदासचा मसाले वगैरेचा शौक मावळू लागला. एरवी त्याला मसाल्या अभावी भाजी बेचव वाटत होती. आता नुसती उकडलेली भाजी स्वादिष्ट वाटू लागली. त्याचे आहारविषयक प्रयोग सुरु झाले होते. मोहनदासच्या आहारव्यवस्थेला आईच्या प्रतिज्ञेचे कुंपण होते. प्रतिज्ञापालनाचा आनंद मोठा होता. स्वाद सूक्ष्म व निर्मळ होता. यात मातेच्या प्रतिज्ञेचा विचार होता. कस्तुरच्या आनंदाचा विषय नसेल असे कोण म्हणू शकतो?

संदर्भ

१) गांधीजींची लंडनची रोजनिशी;

२) 'द व्हेजेटेरियन'

❖❖❖

## १४) भयव्याकुळ विव्हळ पक्षिणी!

पुतळीला वियोगाने गिळंकृत केले होते. कस्तुरला विरहाने ग्रासले होते. मोठे दीर लक्ष्मीदास कारभारी बनले होते. जावा अधिकाधिक भजन-पूजन करु लागल्या होत्या. घरची कामे तर काही कमी होत नव्हती. तिला अधिक कामे करावी लागत होती. घरची मोठी जबाबदारी तिच्यावर येऊन पडली होती. ती सैरभैर झाली होती. विरक्त पुतळीआईच्या पंखाखाली तशी ती सुरक्षित होती. आता उरले होते केवळ दु:ख ! उरले होते वेदनांचे भयंकर तूफान. शिल्लक राहिली होती अनिश्चिततेची उसळती वादळे. मोहनदासचा विलायतेचा खर्च वाढता होता. आपण आपल्या लेकरासह मोठ्या दिरांवर अवलंबून आहोत, ही जाणीव तिचे काळीज कुरतडत रहायची. ती आपल्या परीने जमेल तेवढी कामे आवरायची. आधी सारे घर कसे सुरळित होते. एका घरात भांडी आवाज न करता नांदत होती. त्यांची एकमेकांशी टक्कर होत नव्हती असे काही नाही पण त्यांचा आवाज जाणवत नव्हता. आता मात्र जणू प्रत्येक भांड्याचे स्वतंत्र अस्तित्व जाणवू लागले होते. आधी प्रत्येकाच्या समंजसपणाच्या आड झाकला जाणारा भांड्यांचा आवाज आता निनादू लागला होता. ती आता नेहमीपेक्षा लवकर उठायला लागली. उशिरा झोपायला लागली. आईची आठवण येत रहायची. एखाद्या काटेरी झुडुपात घायाळ होऊन पडलेले पाखरु असावे तशा त्या आठवणी होत्या. त्या तिने अनेकदा आपल्या मनवृक्षाच्या पारावर विव्हळताना पाहिल्या होत्या. अंतरीची नजर गहन, परिचित अशा भूतकाळाच्या वेशीवर वेताळासारखी रेंगाळत रहात असायची. गत आयुष्याच्या जगण्याचे काही खंड विखुरलेल्या स्वप्नांसारखे होते. सायंकालीन संधीप्रकाशासारख्या एकाकी मेघाच्या विरत-विझत जाणाऱ्या रुपाकडे जणू ती न्याहाळत होती. व्याकुळ होत होती. एकटी, एकटी ती अधिकाधिक एकटी होत होती. घायाळ झालेल्या हृदयाला विनवणी करत होती. आपणच आपले स्वत:चे सांत्वन करत होती. तिचे दु:ख गहिरे होते. ते खोल डोहावर पसरलेल्या काळ्याशार नि:शब्द सावल्यांसारखे होते. तडकलेल्या वेड्यावाकड्या अपारदर्शक काचेच्या तावदानासारखे होते. त्याचे नेमके स्वरुप काही तिला कळत नव्हते. दु:ख तिला विसरता मात्र येत नव्हते. तिचे मन दुभंगलेल्या लाटांसारखे घायाळ होऊन गेले होते. तिच्याभोवती घोंगावणारे वादळ होते. ती इतस्तत: भरकटत जाणाऱ्या विव्हळ पक्षिणीसारखी भयव्याकुळ झाली होती.

कस्तुरच्या बालपणीच्या आठवणी झगमगत्या सुख-वैभवाच्या होत्या. तिने त्या आठवणींना पूर्णविराम दिला होता. नवीन कपडे हा विषय कल्पनेपलिकडचा होता. वेळोवेळी मोठ्या जाऊबाईंचा सल्ला विचारावा लागायचा. विलायत तिला नवलाईचा प्रदेश होता. अनोळखी जग होते ते! ती काय-काय कल्पना करत रहायची. मिथक आणि अद्भुतात जमा होणाऱ्या गोष्टींची भूते भोवताली होती. ती तिच्या मनाभोवती धिंगाणा घालत रहायची. तिथे नवरा काय करत असेल? कुठे जेवत असेल? मित्र कोण असतील तिथे? अभ्यास कसा करत असेल? तिचे मन थकून जायचे प्रचंड वादळात भरकटलेल्या एकाकी पानासारखे तिच्या मनाचे झाले होते.

एकदा मोहनदासने आपले छायाचित्र पाठवले होते. लंडनमधील छायाचित्र! पुतळी आईने ते कस्तुरला दिले. ते बघून तर ती चक्रावून गेली होती. असा आहे. आपला नवरा? मोहनदास असा आहे. तर एकूण विलायतेत? तिचा तर विश्वासच बसेना. छायाचित्र काही संपूर्ण नव्हते. ती होती अर्धीच छबी. गडद रंगाचा युरोपीयन सूट परिधान केलेला मोहनदास तिला खूप अनोळखी वाटत राहिला होता. त्याचा पांढरा स्वच्छ सदरा. गळ्याभोवतीचा टाय. गहिरे डोळे. काळेभोर केस. गंभीर मुद्रा. हे तर सारे ओळखीचे वाटत होते. ती विचार करत राहिली. हा आहे. तर आपल्या हरीचा बाप. आपला नवरा. होय, हा तिचा मोहनदास होता. तिचे मन स्वत:शी बोलू लागले.

"बाई ग, अन् पागोटे कुठे गेले? आणि गळ्यात ही पट्टी कसली? भांग कशी पाडलेली? हा तर अगदी अनोळखी पुरुष वाटतो. तिने निरखुन पाहिले. अरे हो, आले की लक्षात! हा काय तो त्याचा उजवीकडचा किंचित टवकारल्यासारखा वाटणारा कान! हरी कसे काय ओळखील? छे, काहीतरीच आपले. तो कसे ओळखील बरे? आपण त्याला सांगू ना." आपला नवरा

शिकायला गेला एवढे तिला माहित होते. ती त्याच्या वाटेवर डोळे लाऊन बसली होती. लहानगा हरीलाल खोड्या करायचा. तसतशी तिला मोहनदासची आठवण यायची. तिच्यासाठी ही करमणूक होती. तेच गाणे आणि तेच नृत्यही. तीच वक्तृत्व कला आणि तोच अभिनयही. तिच्यासाठी तर वेळ घालवायचे तेवढेच एक साधन होते. ती विलायतेची कल्पना कशी करु शकत होती? कल्पनेलाही तर अखेर वास्तवाचा आधार लागतो ना?

गांधीजींनी आत्मकथेत एक स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. 'असत्यरुपी हलाहल.' असे या प्रकरणाचे शीर्षक आहे. याचा संबंध मोहनदासच्या विवाहाशी येतो. अप्रत्यक्षपणे काय पण प्रत्यक्षपणे कस्तुरशी येतो. घरात पत्नी होती. पत्नीच्या मांडीवर लेकरु होते. एक अर्भक जन्माला येऊन निधन पावले होते. सुखावणाऱ्या बाबी दोन होत्या. आईपाशी केलेली प्रतिज्ञा. पत्नी व लेकराची आठवण. गांधीजी लिहितात की त्या काळी विलायतेला जाणारे लोक संख्येने कमी होते. ते लग्न झालेले असत पण आपण अविवाहित आहोत असे सांगत. खोटाच बहाणा करत. हा जणू काही रिवाजच होता. त्या देशातली परिस्थिती वेगळी होती. तिथले विद्यार्थी काही विवाहित नसत. विवाहित असेल तर तो विद्यार्थी कशाला असेल? आपल्याकडेही प्राचीन काळी असेच होते. विद्यार्थी काळ हा ब्रह्मचर्याचा काळ मानला गेला आहे. विद्याप्राप्तीनंतर मग विवाह म्हणजे गृहस्थाश्रम अशी व्यवस्था होती. विलायतेत तर बालविवाहाचा प्रश्नच उद्भवत नाही. हिंदी युवकांना यामुळेच तर आपण विवाहित असण्याविषयी लाज वाटायची. ते खोटे बोलायचे. विवाहित असण्याची आणखीही एक अडचण होती. ती गांधीजींनी अगदी स्पष्ट शब्दात मांडली आहे. विवाहित युवकाला इंग्लंडमधल्या घरात आपोआपच एक प्रकारची बंदी यायची. कसली बंदी? त्या घरातील मुलींसोबत हिंडण्या-फिरण्याची बंदी. विनोद करायची बंदी. मोकळेपणाने रहायची बंदी. अर्थात्च हा विनोद निर्दंश असतो. निर्दोष असतो. निष्पाप असतो. अशी मैत्री घरातल्या वडिल मंडळींनाही आवडते. युवक युवतींमधले असे साहचर्य तिकडे आवश्यकही वाटते. तिकडे प्रत्येकजण आपल्या सहचारिणीला स्वतःच शोधू शकतो. हे मुख्य कारण होते. यामुळे इथला युवक निघाला. तिथे जाऊन पोहोचला. कुणाला जीवन सहचारिणी बनवू बघू लागला हा तर केवढा अनर्थ ! केवढा भयंकर होईल याचा परिणाम. यामुळे हे बंधन पाळणे आवश्यक होते. ही मोहिनी माया आहे. या मायेत आपले अनेक युवक सापडतात. इंग्रजांना हा सहवास स्वागतार्ह वाटतो. आपल्यासाठी मात्र हे सारे त्याज्य आहे. अशा मोहिनी मायेत मोहनदासही सापडला. तो सहा वर्षांपूर्वीचा विवाहित होता. एवढेच नव्हे पण एका मुलाचा बापही होता. आपण अविवाहित आहोत असा बहाणा त्याने केला. या कामी कचरला नाही. या बहाण्यापासून त्याला थोडा लाभही मिळाला. याला कस्तुरच्या कारुण्याची झालर आहे. [१]

मोहनदास वेंटनर येथे एका कुटुंबात रहायचा. तो लाजाळू तर होताच पण भित्राही होता. घरातल्या मुली शिष्टाचार पाळत. त्याला सोबत फिरायला घेऊन जात. एकदा एक मुलगी मोहनदाससोबत फिरायला गेली. वेंटनरच्या आसपास सुंदर टेकड्या आहेत. तिथे ते दोघे गेले. मोहनदासच्या तुलनेने ती मुलगी भलत्याच वेगाने चालू शकायची. तिच्या मागून त्याला जवळपास रखडत जावे लागत होते. ती फिरताना गप्पागोष्टींची कारंजी उडवत चालली होती. मोहनदासच्या तोंडावाटे मात्र 'हो' किंवा 'नाही' एवढेच शब्द निघत होते. मुलीचा खूप आग्रह व्हायचा तेव्हा मुखातून प्रकटायचे. 'अहाहा! काय पण शोभा सुंदर !' एवढे वाक्य जेमतेम निघायचे. मुलगी तर जणू हवेवर स्वार झाली होती. मोहनदास मात्र आपण घर केव्हा गाठू या विवंचनेत होता. 'चला, आता आपण परत फिरु या !' असे काही तो म्हणाला नाही. असे म्हणण्याची त्याची छाती झाली नाही. आता ते एका टेकडीच्या शिखरावर पोहोचले होते. आता खाली उतरायचे कसे? हा प्रश्न होता. टेकडी चढणे अवघड नव्हते. टेकडी उतरणे मात्र अधिक अवघड होते. मोहनदासच्या वयाचीच तर ती मुलगी होती. तिचे उंच टाचेचे बूट होते. ती विद्युत वेगाने खाली उतरली. मोहनदास शरमिंदा झाला. कसाबसा टेकडी उतरु लागला. ती मुलगी टेकडीच्या खाली उभी होती. मोहनदासला हसत होती. धीर देत होती. परत वर चढत जाऊन त्याचा हात धरत होती. हात धरुन 'चल मी तुला उतरवते.' असे म्हणत होती. मोहनदास लाजेने

चूर झाला होता. कसाबसा पाय फरफटत, मधूनच बसत खाली उतरला होता. तिने मग अगदी थाटात त्याला 'शाब्बास' असे म्हटले होते. ही सारी त्याची मस्करी होती. हे सारे त्याला लाजवणे होते. [२] हे जगताना मोहनदासच्या मनात सतत कस्तुरची आठवण आहे. हे सहजपणे आपल्या ध्यानात येते. कस्तुर घरी आहे. रामकथेतील लक्ष्मणपत्नी ऊर्मिलेसारखी साधनारत आहे. त्याला अंधाराला न भिणाऱ्या कस्तुरची आठवण आली असेल का? धैर्यशील कस्तुरशी या युवतीची त्याने तुलना केली असेल का? हे काही आपल्याला सांगता येत नाही. असे प्रसंग वरचेवर येत होते. दर खेपेला बचाव करणे कसे शक्य होते? मोहनदासच्या ठायी असत्याचे हलाहल होते. ते काढण्याची ईश्वराचीच इच्छा होती. ही वेंटनरची आठवण झाली. गांधीजींनी आणखी एक आठवण लिहिली आहे. ही अधिक भेदक आहे. या आठवणीच्याही केंद्रस्थानी विवाहाचा मुद्दा आहे. कस्तुरचा भावकोवळ्या आठवणींचा फेर आहे.

समुद्रकाठावर ब्रायटन आहे. हवा खाण्यासाठीचे प्रसिध्द स्थान. मोहनदास तिथे एकदा गेला होता. एका हॉटेलात मुक्काम केला होता. तिथे एक श्रीमंत प्रौढ विधवाबाई भेटल्या होत्या. हॉटेल मोठे होते. मेनु कार्ड फ्रेंच भाषेत होते. मोहनदास मेनूकार्ड वाचायचा प्रयत्न करत होता. त्याला फ्रेंच येत नव्हते. त्या बाईंनी स्वतःहून बोलायला सुरुवात केली. त्याने त्या भल्या बाईंचे आभार मानले. नम्रपणे म्हणाला - 'ही यादी मला वाचता येत नाही. मी शाकाहारी आहे. यातले कोणते पदार्थ शाकाहारी आहेत.? मला हे जाणून घ्यायला हवे.'

त्या महिलेने त्याला मदत केली. मोहनदासने मदत स्वीकारली व आभार मानले. या घटनेने त्यांच्याशी संबंध जोडला गेला. मोहनदास तीन वर्षे विलायतेत होता. या काळात हा संबंध टिकून राहिला. बाई भल्या होत्या. त्यांनी आपला लंडनचा पत्ता दिला. 'येत जा की दर रविवारी जेवायला' असे निमंत्रणही दिले. काही विशेष प्रसंगीही त्या मोहनदासला हाक मारत. तरुण मुलींशी परिचय करुन देत. मोहनदासचा बुजरेपणा घालवण्याचे प्रयत्न करत. तरुण मुलींशी गप्पागोष्टी करायला प्रोत्साहन देत. एक मुलगी त्यांच्याकडेच रहात असे. तिच्याबरोबर पुष्कळदा बोलायला लावत. त्या कधी या दोघाना एकटेच सोडून देत असत.

सुरुवातीला मोहनदासला हे सारे विचित्र वाटे. काय बोलावे हे सुचेना. विनोद तरी काय करणार? ती युवती धडे देई. हळूहळू भीड चेपत गेली. तो रविवारची वाट बघत असे. त्या युवतीसोबत बोलण्या-चालण्याची त्याला आवड वाटू लागली. यात आईसोबत वाहिलेल्या प्रतिज्ञेचा भंग होत होता. या खुल्या व्यवहाराचा कस्तुरशी थेट संबंध होता. या गोष्टीची आईला खबर व्हायचे काही कारण नव्हते. मनोमंथन सुरु असेल. त्याविषयीचे तपशील कुठे वाचायला मिळत नाहीत. आत्मचरित्रात हा प्रसंग विस्ताराने मांडला आहे. यातून आपण या मनोमंथनाची दिशा जाणून घेऊ शकतो. विवाहित मोहनदासला अशा प्रकारची सूट सवलत नव्हती. त्याने असत्याचा आश्रय घेतला होता. असत्याच्या आड एक शपथ होती. ती मात्र चिरडली जाण्याची शक्यता होती. त्याच्या मनी आकर्षण जागले होते. त्याला ते सारे हवे-हवेसे वाटत होते. कस्तुर साता समुद्रापार होती. त्याने काय करावे? तो मनाशी विचार करु लागला. "आपण चुकत आहोत. या भल्या महिला आहेत. आपण सत्य लपवायला नको. खरे सांगून टाकले तर किती बरे होईल? विवाहिताचे का पुनर्लग्न होते? झाले असते तर कस्तुरचे कायच झाले असते? तिच्या कडेवरल्या लेकराचे काय झाले असते? मृत अर्भकाचा आवंढा कस्तुरला कसा गिळता आला असता? अजूनही वेळ टळलेली नव्हती." मोहनदासला त्याच्या सावध मनाने दटावले. आपण सत्य सांगावे. संकटापासून वाचावे. सारे तपशिलात बोलणे तर अवघड होते. त्याने त्या प्रौढ महिलेला पत्र लिहिले.

मोहनदासने असे चूक कबूल करणारे पत्र यापूर्वी लिहिले होते. बालपणी आपल्या वडिलाना असे पत्र लिहिले होते. चुका केल्या होत्या. त्या परत करायच्या नाहीत. असा त्याने निश्चय केला होता. वडिलांपाशी कबूली द्यायला हवी. असे त्याला वाटले होते. त्याची जीभ उचलवेना. वडील शिक्षा करतील ही भीती होती. वडिलांनी लेकरांवर यापूर्वी कधीही हात उगारला नव्हता. मोहनदासने आपले दोष मान्य करायचे ठरवले

होते. दोष क्षालनाचा हाच एक मार्ग त्या बालकाला दिसत होता.

आताचा प्रसंग मात्र वेगळा होता. चूक वेगळ्या प्रकारची होती. हे केवळ असत्य नव्हते. त्याच्या आधारे आणखी अधिक स्खलन होणार होते. आता चूक मान्य करावेसे वाटले होते. प्रौढ महिला शिक्षा करणार नव्हत्या. त्या नातलग नव्हत्या. जवळच्या नव्हत्या. परक्या होत्या. त्याला एकच एक मार्ग दिसत होता. आपण चूक मान्य करावी. एक पत्र लिहावे. मोहनदासने पत्र लिहिले. आपल्या भेटीबद्दल आभार मानले. वृध्द महिलेची तुलना साक्षात् आपल्या आईशी केली. आपण पहिल्याच भेटीत आपल्या विवाहित असण्याबाबतीत सांगायला हवे होते, असे लिहिले. आपले बालवयातच लग्न झाले आहे. आपल्याला एक मुलगाही आहे. हे पत्रात लिहिले. क्षमायाचना केली. आपण कुठलाही अतिप्रसंग केला नसल्याची ठाम हमी दिली. आपण नालायक ठरवलो गेलो तर आपल्याला वैषम्य वाटणार नाही असेही लिहिले. आपल्यावर दर्शवलेल्या लोभ आणि विश्वासाबद्दल ऋण व्यक्त केले. आपण त्याग केला तर हर्ष होईल असे लिहिले. एवढे लिहूनच मोहनदास थांबला नाही. यापुढे त्याने असे लिहिले 'आपण मला अजूनही लायक समजलात तर आनंद होईल.'

असे पत्र लिहिणे सोपे नाही. हे काही क्षणभरात लिहिले जाऊ शकत नाही. या पत्राचे त्याने न जाणो किती मसुदे केले असतील. यात अपार मनोमंथन आहे. सत्याचा आधार आहे. कस्तुरच्या समर्पित आठवणींची झालर आहे. तान्ह्या लेकराचा अवखळपणा आहे. एका पतीची वेदना आहे. पित्याचा परिताप आहे. एक सच्चे, निश्च्छल मन आहे. पत्र लिहून मोहनदासने आपल्या माथ्यावरील मोठा भार उतरवला आहे. वडिलांना लिहिलेले पत्र तुलनेने वेगळे होते. ते बालकाचे पित्याला पत्र होते. साक्षात् पित्याला होते. चूका अक्षम्य असल्याची जाणीव होती. मन शिक्षा भोगायला सिध्द होते. दुसरे पत्र मात्र अपरिचित व्यक्तीला आहे. पत्र वाचिका महिला आहे. मोहनदास आता बालक उरलेला नाही. एक जबाबदार पती आहे. वत्सल पिता आहे. त्याला अपराधाची जाणीव आहे. मिळेल ती शिक्षा भोगायला त्याचे मन तयार आहे.

वडिलांना लिहिलेले पत्र विलक्षण होते. दुसरे पत्र मात्र प्रौढ विधवा महिलेला लिहिलेले आहे. ते पारदर्शक आहे. त्यात आत्मविश्लेषणाचा पाढा आहे. मोहनदासने थरथरत्या मनाने लिहिलेले पत्र आहे. महिलेच्या मनात मोहनदासच्या भलेपणाचाच विचार प्रामुख्याने आहे. त्यांच्या मनात या युवकाविषयी कोवळीक आहे. मोहनदासच्या वडिलांनी चिट्ठी वाचली होती. त्यांच्या नेत्रातून मोत्यांचे बिंदू पाझरले होते. चिट्ठी भिजून गेली होती. वडिलांनी क्षणभर नेत्र मिटले होते. चिट्ठी फाडून टाकली होती. बिछान्यावर परत आडवे झाले होते. प्रौढ महिलेने उलट टपाली उत्तर पाठवले. आपली भावना पत्रातून कळवली. या मनमोकळ्या पत्राबद्दल समाधान व्यक्त केले. दोघींना समाधान वाटल्याचे कळवले. मोहनदासच्या असत्याचरणाला त्यांनी क्षम्य मानले. आपले निमंत्रण कायम असल्याचे म्हटले. मोहनदासच्या बालविवाहाची गोष्ट ऐकण्याविषयीची खोडकर भूमिका पत्रात आहे. स्नेह कायम असल्याचा विश्वास आहे.

वडिलांची प्रतिक्रिया शब्दांची नव्हती. तिथे आचरणविषयक दोष होता. वडिलांचे अश्रू ओघळले होते. ते शब्दांपेक्षा प्रभावी होते. प्रौढ महिलेने शब्दातून प्रतिक्रिया व्यक्त केली. या दोन्ही घटनेत असत्य आहे. पहिल्या घटनेत जीवनशैलीचा अपराध घडला होता. दुसऱ्या घटनेत जीवनपावित्र्याचा संदर्भ आहे. इथे कस्तुरची आठवण आहे. पत्रात उत्सुकता आहे. ही उत्सुकता मोहनदासपुरती नाही. एकतर्फी नाही. विवाह या विषयाशी कस्तुरचा अंतरंग संबंध आहे. विवाहातील मानसिक कोंडी स्पष्ट आहे. मनात आकर्षणाचा भाव आहे. बालविवाहविषयक कटुतेची भावनाही आहे. आता वेगळ्या संदर्भात त्या आठवणींना उजाळा मिळत आहे. या घटनेने दोन गोष्टी साधल्या गेल्यात. असत्याचे हलाहल काढून टाकता आले. विवाहासंबंधी खरे सांगायला कचरणे दूर झाले. सत्याची कास धरता आली. या सत्य पालनात कस्तुरचा असा प्रत्यक्ष सहभाग आहे. गांधीजी विलायतेहून परतले. त्यानंतर दीर्घकाळपर्यंत या मैत्रीचा सुवास दरवळत राहिला होता. मोहनदास सत्याचा प्रयोगवीर आहे. या प्रकरणाचा समारोप करताना गांधीजींनी आत्मचरित्रात लिहिले आहे. "अशा

तऱ्हेने माझ्यामध्ये असत्याचे जे हलाहल व्यापून राहिले होते ते मी काढून टाकले आणि या पुढेही कोठेही माझ्या विवाहासंबंधी वगैरे सांगून टाकण्याला मी कचरत नसे.[३] यामुळे कस्तुरची सतत आठवण राहिली. ती कधीही विस्मरणात गेली नाही.

पुढील घटना मनोमंथनाची आहे. मोहनदासचे वय वीस वर्षांचे झाले आहे. त्याला गृहस्थाश्रमाचा बराच अनुभव मिळाला होता. ते १८९० साल होते. पाच-सहा मे रोजी शाकाहारविषयक परिषद होती. परिषद पोर्टस्मथ्ला होती. परिषदेत ६ मे रोजी मोहनदासचे व्याख्यान होते. सोबत श्री त्र्यंबक मजूमदार होते. पोर्टस्मथ हे खलाश्यांचे बंदर म्हणून प्रसिध्द आहे. तिथे पुष्कळ घरे दुराचारी स्त्रियांची असतात. त्या स्त्रिया विश्वसनीय नसतात. संशयास्पद असतात. त्यांचे आचरण निर्दोष नसते. अशाच एका घरात मोहनदास आपल्या मित्रासमवेत उतरला होता.

रात्र झाली. सभा आटोपली. दोघे मित्र सभेतून घरी परतले होते. जेवणे आटोपली होती. पत्ते खेळायला बसले होते. विलायतेत कुलीन घरातही हे असे चालते. गृहिणी पाहुण्यांसोबत पत्ते खेळायला बसते. यात निर्दोष थट्टा-मस्करी क्षम्य आहे. इथे मात्र बिभत्स विनोद सुरु झाला होता. विनोदाची पातळी घसरली होती. मोहनदासचे मित्र या कामात पटाईत होते. मोहनदासला याची खबर नव्हती. त्याला त्या अभद्र विनोदात गोडी वाटू लागली. तोही त्यात सामील झाला. शब्द केवळ शब्द उरले नाहीत. ते कृतीत उतरले. मजूमदाराने मोहनदासला जागवले. मजूमदारच्या ह्रदयात रामाने प्रवेश केला होता. त्याने बजावले 'अरे तुझ्या अंगात हा सैतान कसा काय संचारला? हे तुझे काम नव्हे. पळ काढ बरे येथून !'

या प्रसंगाविषयी आपण शरमलो असे गांधीजी लिहितात. ते भानावर आले. मनातून आपल्या मित्राचे उपकारच मानले. आईच्या चरणाशी बसून घेतलेली प्रतिज्ञा त्यांना आठवली. त्यांनी अक्षरश: पळ काढला. थरथर कापत आपल्या खोलीत जाऊन पोहोचले. त्यांची छाती धडधडत होती. खाटकाहातून निसटणाऱ्या जनावरासारखी त्यांची अवस्था झाली. ते पर-स्त्रीला बघून विकारवश झाले होते. ही अशी पहिलीच वेळ होती. रात्री त्यांच्या डोळ्याला डोळा लागला नाही. डोक्यात विचारांचे काहुर माजले. बेसावधपणाचा परिणाम लक्षात आला. त्यांनी अधिक सावधगिरी बाळगायचे ठरवले. दुसऱ्याच दिवशी ते निघाले.[४]

मोहनदासला आईपाशी घेतलेली शपथ आठवली. कस्तुरचा निष्पाप उजळ चेहरा आठवला. मन गंभीर बनले. मन ताळ्यावर नसले तर अनर्थ होऊ शकतो हे ध्यानात आले. त्याने अगदी काळजीपूर्वक वागायचे ठरवले. भाषण दिले. व्हॅटनरचा मार्ग धरला. तिथे ११ मे रोजी व्याख्यान द्यायचे होते. इतरत्रही व्याख्याने होती. मोहनदास आता शाकाहारी जगतातला मान्यवर वक्ता होता. 'ईश्वराने वाचवले.' ही त्याची भूमिका होती.

मोहनदास नैतिक आणीबाणी अनुभवताना दिसतो. त्याने प्रतिज्ञा घेतलेली आहे. 'पर-स्त्री-गमन' या वर्तुळाच्या केंद्रस्थानी कस्तुरची कोवळी असोशी आहे. तिचा श्रमबिंदूंनी थबथबलेला चेहरा आहे. लेकराचे लालन-पालन करणाऱ्या परिश्रमशील मातेचे कष्ट आहेत. भरल्या कुटूंबात एकटेपण भोगणाऱ्या पत्नीच्या व्यथा-वेदना आहेत. नवऱ्यावरचा अपरंपार विश्वास आहे. प्रतिज्ञा बचावाचे निमित्त बनली आहे. या विपत्तीचा शत्रु बाहेर नव्हताच मुळी तो तर आत दडलेला होता. आतल्या शत्रुला पराभूत करायचे होते.

आपल्या मनातील या संघर्षाचे केवळ चित्रण नव्हे तर विश्लेषण स्वत: गांधीजींनीच केले आहे. त्यांनी मातृचरणी प्रतिज्ञा घेतली आहे. यामुळे या प्रतिज्ञेला मातेचे पावित्र्य सहजीच लाभले आहे. या पावित्र्याच्या मूळाशी ईशश्रध्दा आहे. या ईश्वरानेच तर मातेच्या मनात आणि व्यक्तिमत्वात पावित्र्य पेरले आहे. ईश्वरानेच तर कस्तुरच्या व्यक्तिमत्वात पतिनिष्ठा रोपली आहे. ईश्वरानेच तर मोहनदासच्या मनात प्रतिज्ञा पालनासाठीचे बळ दिले आहे. गांधीजींनी आत्मचरित्रात हे सारे तपशिलवारपणे मांडले आहे.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ६४ / ६५; २) कित्ता पृष्ठ ६५ / ६६; ३) कित्ता पृष्ठ ६८; ४) कित्ता पृष्ठ ७३ / ७४

❖❖❖

## १५) कस्तुरची तपश्चर्या आणि मोहनदासची प्रतिज्ञा!

हे प्रकरण विशिष्ट आहे. गांधीजींनी आत्मचरित्रात या प्रकरणाला 'निर्बल के बल राम' हे अनोखे शीर्षक दिले आहे. हिंदीचे सुप्रसिध्द मध्ययुगीन कृष्णभक्तकवी सूरदास यांचे 'निर्बल के बल राम' या शीर्षकाचे गोड भजन आहे. त्यांनी आपल्या व्रज या हिंदीच्या बोलीभाषेत कृष्णलीला गान केले आहे. मुख्यतः बालकृष्णाचे अद्भुत प्रत्ययकारी चित्रण केले आहे. या भजनाचा विषय ईश्वराची कृपा आहे. यासाठी त्यांनी भक्तीपरंपरेतले दोन दाखले दिले आहेत. एक आहे. गजेंद्र मोक्षाचा आणि दुसरा आहे. द्रौपदीच्या वस्त्रहरणप्रसंगी श्रीहरीने केलेल्या सहाय्याचा. गजेंद्राला मगरमिठी पडली आहे. प्रचंड गजराज पाण्यात अधिकाधिक खोलवर ओढला जात आहे. सोंड वर करुन तो जगन्नियंत्याला एक कमलपुष्प अर्पण करत आहे. त्याचा अखंड धावा सुरु आहे. मोहनदासची प्रतिज्ञा अशाप्रकारे वासनेच्या मगरमिठीत रुतली आहे. दुसरा प्रसंग आहे. अपमानीत द्रौपदी राजसभेत निःसहाय उभी आहे. पराक्रमी पाचही पांडव माना खाली घालून हतबल होऊन बसले आहेत. सारे सभाजन मूढ बनले आहेत. या वेळच्या द्रौपदीच्या मनोदशेचे चित्र नजरेसमोर आणावे. मोहनदासची प्रतिज्ञा निर्वस्त्र व्हायच्या बेतात आहे. अशावेळी मोहनदासच्या मनात प्रचंड भूकंप माजला असेल. त्याची कल्पना करणे सहज शक्य आहे. या भावनेचे विश्लेषण करताना धर्म म्हणजे काय? ईश्वराचे स्वरुप कसे आहे.? तो आपल्या हृदयात कसे काम करतो? हे काही त्याला त्या वेळी कळत नव्हते. ईश्वराचे स्वरुप स्पष्ट करताना गांधीजींचे स्पष्टीकरण अद्भुत आहे. असे विश्लेषण त्यांच्या विरोधकानाही करता येणे शक्य नाही. या ईश्वराची प्रतिमूर्ती आई आहे. ईश्वराची स्त्री आवृत्ती कस्तुर आहे. सामान्य समजूतीनुसार त्यावेळी ईश्वराने आपल्याला वाचवले असे ते म्हणतात.

पुढे वेगवेगळ्या प्रसंगी त्याला अशा प्रकारचे अनुभव आलेले आहेत. या भावनेचे समग्र रहस्य आपल्याला कळले नसल्याचे त्याने नम्रपणे मांडले आहे. या प्रसंगीचे भाष्य कस्तुरच्या अंतरंगाचाही परिचय देणारे आहे. दोघांच्या समन्वयाची चर्चा करणारे आहे. हे मूळ गांधीजींच्या शब्दातच वाचायला हवे. या अनुभवाचे विश्लेषण ते या शब्दात करतात "असली उपासना, असली प्रार्थना हा काही वाणीचा विलास नव्हे, त्यांचे उगमस्थान कंठ नव्हे, तर हृदय होय. म्हणून जर आपण आपले हृदय शुध्द राखले तेथे असलेल्या तारा व्यवस्थित ठेवल्या तर त्यातून जो सूर निघेल तो गगनाला भेदून जाईल. त्यासाठी जिभेची आवश्यकता नाही. ती स्वभावतःच अद्भुत वस्तु आहे. विकाररुपी मळाच्या क्षालनासाठी अंतःकरणापासून केलेली उपासना ही एक महौषधी आहे., याबद्दल मला शंकाच वाटत नाही. परंतु तो प्रसाद मिळवायचा असेल तर आपल्यामध्ये संपूर्ण नम्रता पाहिजे."[१]

मोहनदासला पुढे राजकीय, संस्थात्मक आणि आध्यात्मिक अशा त्रिविध क्षेत्रात यश लाभले आहे. ईश्वराशी संबध्द तत्त्वे ना असत्य ना अतिशयोक्तीभरली! ती सत्य आहेत. वैयक्तिक सद्भावना आणि प्रार्थना सामुदायिक बनते. अंगणातील ईशस्तवन अवकाशापर्यंत पोहोचते. विकारांवर विवेकाचा अंकुश स्थापायला हार्दिक उपासना हवी. नम्रतेने हा प्रसाद प्राप्त होऊ शकतो. मोहनदासच्या आयुष्यातला हा स्खलनाचा प्रसंग आहे. जीवनातल्या च्यूत क्षणी त्याला अच्युताचे स्मरण आहे.

गांधीजींचे विलायतेतील वास्तव्य महत्वाचे आहे. शाकाहार हा एक विषय याच्या मध्यवर्ती आहे. या विषयाभोवती सहजच कस्तुरचे स्मरण आहे. हे स्मरण केवळ आहारातील स्वादापुरते मर्यादित स्वरुपाचे नाही. यात तिच्या आग्रह व निग्रहाचे संतुलन आहे. शाकाहार ही जीवन शैली मानण्यासाठी मोहनदासची कमालीची धडपड दिसून येते. विविध ठिकाणी या विषयावर लेखन कर, व्याख्याने दे, चर्चासत्रात सहभागी हो-असे त्याचे सुरु आहे. 'भारतीय आहारशास्त्र' या विषयाचे आपले चिंतन त्याने मुक्तपणे मांडले आहे. एकीकडे विलायतेतील शिक्षण सुरु आहे. त्या सोबत चळवळीच्या रुपाने शाकाहाराचे चिंतन सुरु आहे. विलायतेचा निरोप घेताना त्याने मित्रांना शाकाहारी

भोजन दिले आहे. मित्रांपुढे एक भाषण दिले आहे. या भाषणाविषयी आत्मचरित्रातून तर केवळ नोंदच घेतली आहे. 'व्हेजेटेरियन' चा अंक मात्र याविषयीची माहिती देतो "आपल्या आकर्षक भाषणाद्वारे गांधीजींनी सर्वांचे स्वागत केले. इंग्लंडमधल्या वाढत्या शाकाहारी आग्रहाविषयी आनंद व्यक्तवला. 'लंडन व्हेजेटेरियन सोसायटी' च्या विकासाचा आढावा घेतला. डॉ. ओल्डफिल्डचे मार्मिक शैलीत ऋण व्यक्त केले होते."[२]

मोहनदासचे शिक्षण सुरु होते. या काळात शाकाहाराच्या प्रतिज्ञेमुळे सत्संग लाभला होता. सत्संगामुळे धर्मांकुर विकसला होता. यामुळे ते गीतेच्या अभ्यासाकडे वळले होते. थिआसॉफिस्टांशी संपर्क घडला होता. यामुळेच एनी बेझंट या नावाने मोहिनी घातली होती. सत्याविषयीचे त्यांना काही केवळ आकलन नव्हते. पोकळ आग्रहही नव्हता. त्याला नीतीचा आधार होता. याची प्रेरणा मातेच्या चरणाशी बसून घेतलेल्या प्रतिज्ञेशी होती. मांसत्याग झाला. प्रतिज्ञेचा भंग करण्यापेक्षा प्राणत्यागाला ते सिध्द झाले. शाकाहाराचा अभ्यास केला. सैध्दांतिक समर्थन मिळवले. चळवळ चालवली.

आईच्या चरणी बसून मोहनदासने तीन प्रतिज्ञा घेतल्या होत्या. मद्यप्राशन करणार नाही. मांसाशन करणार नाही. पर-स्त्री विषयी निःसंग राहीन. यातल्या पहिल्या प्रतिज्ञेचे पालन सहज झाले होते. दुसऱ्या प्रतिज्ञेचे पालन करताना त्या देशाच्या प्रवाहाविरुध्द पोहायला लागले होते. या पध्दतीने या प्रतिज्ञेचे पूर्णपणे पालन केले होते. तिसऱ्या प्रतिज्ञेच्या पालना निमित्त कसोटीभरले प्रसंग होते. एकाहून एक अधिकाधिक अवघड प्रसंग होते. याचे पालन करताना मोहनदासने आपल्या पुरुषार्थाचा पोवाडा गाईला नाही. ईशश्रध्देला अधिक कारणीभूत मानले. बालपणी त्याने मांसाशन केले होते. विलायतेत राहून मात्र यातून तो बचावला आहे. आहार आणि आचरण या दोन ध्रुवावरच्या या प्रतिज्ञा आहेत. तशा त्या थेट कस्तुरच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या आणि प्रभाव टाकणाऱ्या आहेत. मोहनदासने या प्रतिज्ञेचे पालन केले. यामागील तत्त्वज्ञान समजून घेतले. धर्मज्ञान पारखून घेतले.

तिसरी कसोटी मात्र खरोखरच कसोटी ठरली. या प्रसंगाची चर्चा खुद्द गांधीजीनी आपल्या आत्मचरित्रातून केली आहे. ती तशी केली नसती तर कुणाला याविषयी काहीही कळलेसुध्दा नसते. एकांतातल्या या हकीकती त्यांनी लोकांतात मांडल्या आहेत. लपवाछपवी करावी असे प्रसंग खुलेपणाने उघड केले आहेत. उघड-उघडपणे लिहिले आहेत. या प्रसंगांचे वर्णन करताना ही आत्मचर्चा आत्मपीडेच्या काठाला स्पर्श करते. या व्यथेतून आत्मपरीक्षण जागते. या परीक्षणातून आत्मशोधन उद्भवते. साधारणपणे मनात जे झाकून ठेवायचे ते आत्मचरित्रातूनही झाकून ठेवावे अशी रीत आहे. त्या रीतीला गांधीजींचे आत्मचरित्र अपवाद आहे. ते इतराना दोषी ठरवत नाहीत. स्वतःतले हीण प्रकट करतात. हा त्यांचा पारदर्शक स्वभाव आहे. यात मनाचा सच्चेपणा आहे. कस्तुरच्या पावित्र्याची पताकाही यानिमित्त फडफडताना दिसते.

हा काळ मोहनदासच्या अठरा ते एकवीस वर्षे वयाचा आहे. किशोरावस्था पूर्ण करुन मोहनदास यौवनाच्या महाद्वाराशी उभा ठाकला आहे. हा नाजूक काळ आहे. यात अधोगामी बनण्याचा शाप असतो. त्याने त्याला ऊर्ध्वगामी दिशा दिली आहे. हा काळ समाजसुधारणेचा आहे. यातले चैतन्य युवक मोहनदासला सहज लाभले. झेलता आले. यातून त्याचे व्यक्तिमत्व पुष्ट झाले. या काळात इंग्लंडमध्ये थियोसॉफीचा दबदबा होता. शाकाहाराला प्रतिष्ठा लाभत होती. स्त्रियांच्या मताधिकाराच्या प्रश्नाने चळवळीचे स्वरुप घेतले होते. यातली अखेरची दोन मोहनदासच्या आहार आणि आचरणाला बळ देणारी तत्त्वे होती.

कस्तुरला आपल्या खोडकर लेकराला सांभाळताना नाकी नऊ येत असत. दिवसामागून दिवस चालले होते. कुणीतरी जबरदस्तीने जणू त्यांना ढकलत होते. दिवस उगवायचा आणि मावळायचा. नवीन काहीच तर घडत नव्हते. १८९१ साल उजाडले. एके दिवशी अघटित घडले. कस्तुरवर दुर्दैवाचा घाला झाला. वसंत ऋतु आला. अगदी अचानक पुतळी आई आजारी पडल्या. हा आजार फार दिवस पुरला नाही. पुतळी आईंनी देह ठेवला. सासरे निवर्तले होते. तेव्हा कस्तुरच्या

माथ्यावरचे आभाळ फाटले होते. आता पुतळी आईंचे निधन झाले. तिच्या पायाखालची जमीन हादरली होती. नवरा समुद्रापार शिकायला गेलेला. त्याची वाट बघत पण त्याला न भेटताच आईने देह ठेवला. किती आशा-आकांक्षा तिच्या सोबत संपून गेल्यात हे तिचे तिला एकटीला ठावे. ती साधिका, सती, साध्वी होती. कस्तुरचे चैतन्य हरपले. मार्गदर्शनाचा स्रोत आटला. घर दुभंगले. तिच्या आकांताला सीमा उरल्या नाहीत. आता तिची समजूत घालणारेही कुणी नव्हते. मोहनदास अंतिम परीक्षेची तयारी करत होता. कस्तुरसाठी प्रत्येक क्षण अंतिम परीक्षेचाच होता. वडिलांच्या निधनाच्या बातमीने नवरा पार कोलमडला होता. आता आईचे निधन झाले होते. या बातमीने त्याचे भावविश्व काळवंडून गेले असते. तो लंडनमध्ये शिकत होता. त्याला हे कळवावे की कळवू नये हा प्रश्न जागला. यावर खलबते झाली. एक मत म्हणाले की कळवायला हवे. एक पक्ष म्हणाला मुळीच कळवू नये. ही बातमी घात करु शकते. मोहनदास हे ऐकून परतला तर? या शंकेने सारे सावध झाले. विलायतेत न कळवण्याचे सर्वमताने ठरले. या निर्णयामुळे कस्तुरचे समाधान झाले. मोहनदासच्या तीन वर्षांच्या शिक्षणाचा प्रश्न होता.

मोहनदासला ही बातमी न कळवण्याचे घरच्यांनी ठरवले होते. ते योग्यच होते. तिकडे तो एकटा होता. त्याला ही बातमी कळल्यावर त्याचे सांत्वन करणारे कोण होते? घरच्यांनी केलेला विचार बरोबर होता. कस्तुर नवऱ्याच्या भेटीसाठी आसुसलेली होती. सासूच्या निधनाने ती दु:खी-दु:खी झाली. मोहनदास जाती बहिष्कृत होता. त्याचे सावट पुतळी आईंच्या मरणावर पडले होते. अनेक जुने मित्र अंत्यविधीला उपस्थित राहिले नव्हते. नवऱ्यावर जर या बहिष्कृतीचा तडाखा बसला तर त्याच्या व्यवसायावरही परिणाम होईल, अशी सार्थ भीती कस्तुरला होती.

कस्तुरचे पंख छाटले गेले होते. ती अधिक पोरकी बनली होती. तिची ताकद संपून गेली होती. सासुच्या निधनामुळे नवऱ्याची उणीव अधिक तीव्र बनली होती. वाट बघणे अधिक जीवावर आले होते. निष्पर्ण झाडावर कस्तुरने आपले घरटे बांधले होते. त्या झाडाच्या मूळाशीच काळाने चूड लावली होती. झाडाचा सारा पसारा हळूहळू त्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडताना बघणे कासावीशी वाढवणारे होते. कस्तुरचे आता त्या घरात आपले म्हणावे असे कुणी उरले नव्हते. कुणी म्हणजे अगदी कुणी नाही. कस्तुर अगदी एकटी बनली. ना प्रेम ना मार्गदर्शन. एखाद्या नगरातल्या बहिष्कृत भागासारखी बनली. आतून हलली. जीवन अस्थिर होते. आता दु:खी बनले. आता नवऱ्याची वाट बघणे केवळ उरले होते.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ७४;

२) 'द व्हेजेटेरियन' १३ जून १८९१ 'गांधी इन लंडन' या डॉ. हंट जेम्स यांच्या लेखातून उध्दृत पृष्ठ २९

❖❖❖

## १६) मोहनदासचा विलायतेला निरोप!

मोहनदासचे शिक्षण पूर्ण झाले होते. आता विलायतेचा निरोप घ्यायचा होता. 'द व्हेजेटेरियन' चे संपादक होते जोरिआ ओल्डफिल्ड. त्यांनी मोहनदासची मुलाखत घेतली होती. या मुलाखतीत विनयाचा रंग खूप गहिरा आहे. आपण विवाहित असल्याचा तो आवर्जुन उल्लेख करतो. बाल विवाहाची घटना लपवत नाही. त्याच्या मनात पोर्टस्मथचा प्रसंग ताजा असेल. तिथे मोहनदास बचावला आहे. असत्याचरणापासून वाचला आहे. शपथ सत्यपालनाविषयी नव्हती. परस्त्रीविषयक पवित्र भावनेची होती. या शपथेला अनायासेच सत्य पालनाचा संदर्भ होता. ब्रह्मचर्य पालन आणि सत्याचरण. या दोन्ही गोष्टी परस्पर संबध्द होत्या. पहिलीचा कस्तुरशी थेट संबंध होता. पुढे सत्यासाठी गांधीजींनी आयुष्य पणाला लावले.

विलायतेत मोहनदास प्रतिज्ञाबध्द आहेच. प्रतिज्ञा जेवढी अवघड तेवढी अधिक निसरडी असते. ही प्रतिज्ञा आचरणाशी संबंधित आहे. यातले मर्म पर-स्त्री गमनाला विरोध आहे. मोहनदासचे वय अठरा ते वीस आहे. कस्तुर लांब स्वदेशात आहे. विलायतेतील वातावरण भिन्न आहे. मोहाची नाना स्थळे खुणावताहेत. तारुण्य सुलभ दोषांची शक्यता आहे. अशा क्षणी निग्रही मोहनदास वाट काढत आहे. अंधारात प्रतिज्ञेची इवलीशी दिवली त्याला आधार देत आहे. आईची अपरंपार माया आहे. कस्तुरची सघन करुणा आहे. एका निष्पाप स्वयंसिध्द पत्नीची छाया आहे. ती सतत मोहनदासला स्खलन प्रसंगी रोखते आहे. अशा प्रकारे कळत नकळत त्याला कस्तुरची साथ-संगत लाभली आहे.

मोहनदासचे शिक्षण आटोपले होते. घराकडे लगेच परतणे आवश्यक होते. आपल्या आर्थिक अडचणींचा त्याला कधीच विसर पडलेला नव्हता. आईची आठवण येत होती. कस्तुरची आठवण येत होती. एकीकडे लंडनचे आकर्षण होते. दुसरीकडे घरची ओढ होती. या दोन ध्रुवावर त्याचे मन झुलत होते. शाकाहारी मोहनदासला इंग्लंडने बांधून ठेवले होते. हिंदमधील मित्र, नातलगाना दीर्घकाळानंतर भेटता येणार होते. या विचाराने त्याला आनंद आणि पुलकित भाव वाटत होता.

१० जून १८९१ साल. मोहनदास बॅरिस्टर झाला होता. ११ जूनला लंडनच्या हायकोर्टात नाव नोंदवले होते. १२ जून रोजी हिंदुस्तानकडे यायला निघाला होता. त्याने कायदे वाचले होते. अभ्यास केला होता. वकीलीचा मात्र अजून अनुभव नव्हता. वकीली करायला तो काही शिकला नव्हता. 'आसाम' आगबोटीतून प्रवास करुन तो मुंबई बंदरावर उतरला. पावसाला सुरुवात व्हायची होती. हिंद महासागर एरवी शांत असतो. यामुळे पावसाळ्यात क्षुब्ध होतो. रात्री वादळ उसळले होते. खूप लोक आजारी पडलेत. काहीतरी निखळून पडल्यासारखे वाटायचे. लाटा उसळत्या होत्या. शांत चित्ताने झोपणे कुणालाच शक्य नव्हते. दरवाजा धाड-धाड आवाज करत रहायचा. सारे सामान थरथरत वाजू लागायचे. बिछान्यावर पहुडलेले लोक लाटण्यासारखे गडगडू लागायचे. जेवणाच्या मेजावर हादरे बसायचे. काटे-चमचे, प्लेट्स, थाळ्या, मसाले व तेलाचे स्टँड्स जेवणारांच्या मांड्यांवर यायचेत. स्थिर रहायचा निष्फळ प्रयत्न करत रहायचे. तरी याला काही खरे वादळ म्हणता यायचे नाही. बंदरावर समुद्र तापलेला होता. लाँचने उतरावे लागले होते. सारेच आजारी होते. एकटा तोच मजेत होता. वादळ बघत डेकवर उभा होता. काहीसा भिजलासुध्दा होता. त्याला सागरी वादळाचा सामना करावा लागला होता.

हे बाहेरचे वादळ होते. खरे तर त्याच्या आतही असेच वादळ उसळले होते. बाहेरच्या वादळात मोहनदास शांत होता. मुंबईला पोहोचलो रे पोहोचलो की लगेच राजकोट गाठायचे. आई वाटेवर डोळे लावून बसली असेल. पुत्राला बघून तिच्या नेत्रांना आनंदाश्रुंची धार लागेल. आईच्या चरणाशी बसेन. प्रतिज्ञा पालनाचा आनंद सांगेन. लहानगा हरी तर आता बोलायला लागला असेल. त्याला का बाबा अनोळखी वाटतील? बाबाला बघून तो कसा काय लगेचच ओळखून घेईल? आणि कस्तुर? तिला का थोरल्या दिरासमोर चकार शब्द उच्चारता येईल? मोहनदास तिला इंग्लंडची रीतभात शिकवील. 'आता घुंघट घ्यायची काहीही गरज नाही.' असे समजावून सांगेल. तिला हे मान्य करणे शक्य होईल का? मोहनदासच्या मनात विचारचक्र भिरभिरत होते. मुंबई बंदर आले. स्टीमर थांबले. लाँचमध्ये बसून

आता किनारा गाठायचा आहे. नजर थोरल्या भावाला शोधत होती. वकीली कशी चालेल? ही चिंता होती. स्वकीयांची भेट होईल हा आनंद होता. मन थरारते होते. पावले कंपित होती. लक्ष्मीदासच्या मनात वेगळेच वादळ उसळले होते. मोहनदासला आईच्या निधनाची वार्ता कशी काय द्यायची? मोहनदासने लक्ष्मीदासला लांबूनच नमस्कार केला. 'चला निघू या आता. आईचे दर्शन करु या. मातेला भेटायची मला कोण घाई झाली आहे.' बंदरावर उतरल्यावरचे मोहनदासचे पहिलेच बोल प्रकटले. लक्ष्मीदासचे हृदय हलले. त्याचे डोळे आसवांनी भरुन आले. त्याला हुंदका दाटून आला. त्याच्या थरथरत्या ओठातून बातमी प्रकटली 'आई आता आपल्यात नाही. तुझी आठवण करत-करत ती देवाघरी निघून गेली आहे.' यावर 'आपल्याला का कळवले नाही?' असे मोहनदासने विचारले. मोहनदास विलायतेत होता. परीक्षेची तयारी करत होता. अभ्यासात व्यत्यय नको. यामुळे त्याला ही दु:खद बातमी कळवली नव्हती. लक्ष्मीदासने खुलासेवार सांगितले. मोहनदास धाकटा. आईचा लाडका. लहानपणापासून भावुक व हळवा. वडिलांच्या निधनापेक्षा त्याला हे दु:ख अधिक गहिरे वाटले. तो आईच्या दर्शनासाठी अधीर झाला होता. थोरले भाऊ लक्ष्मीदास त्याला घ्यायला बंदरावर आले होते. मुंबईला तो डॉक्टर मेहतांच्या घरी पोहोचला. आईच्या निधनाचा परिणाम त्याच्या सबंध देहावर एखाद्या अजस्त्र लाटेसारखा पसरला की कडाक्याच्या गारठ्यासारखा हे काही त्याला नेमकेपणाने ठरवता आले नाही. त्याच्या उभ्या देहाचा त्याच्या तमाम संवेदना व संज्ञांचा मिळून एक हुंदका झाला. त्याला हलाहलासारखे गिळून कंठात स्थिर करण्याचा अशक्य प्रयत्न तो करत राहिला होता. त्याने आसवांना वाट मोकळी करुन दिली नाही. ते मनात एखाद्या अतर्क्य वेदनेसारखे गोठवून ठेवलेत. स्वत:ला सावरले. त्याला वडील निवर्तले तो प्रसंग आठवला. किती काळ लोटला होता. आता त्याच्या हाती उदरनिर्वाहाचे साधन होते. खरे तर त्याला ही बातमी विलायतेत कळवता आली असती. यामुळे तो सैरभैर झाला असता. तिथे सांत्वन करायला कोण होते? हा आघात कमी व्हावा असा विचार थोरल्या भावाने केला. तेही बरोबर होते म्हणा. त्याने आपल्या दु:खावर पडदा टाकायचा प्रयत्न केला. वडिलांच्या निधनापेक्षा या दु:खाचा भर आणि भार अधिक होता. मनातल्या अनेक इच्छा मनातच राहिल्यात. आता आई उरली नव्हती. आई कायमची निघून गेल्याची बातमी त्याला कळली. त्याच्या आयुष्याचे वात्सल्य पर्व संपले होते. त्याने स्वत:ला सावरले. आईच्या निधनाला विसरुन कामकाजाला सुरुवात केली. हे काही सोपे नव्हते पण काळाचा रेटा प्रचंड होता. तो मान्य करावाच लागणार होता.

आईच्या स्मरणाने त्याच्या रोमरोमात पावित्र्य भरले होते. वडिल व्यवहारी होते. आई साध्वी होती. थोरल्या लक्ष्मीदासने आईची अखेरची इच्छा सांगितली. दिवंगत मातेची इच्छा पाळायची होती. यासाठी मनाच्या विरुध्द प्रायश्चित्त घ्यायचा अप्रिय निर्णय मोहनदासने घेतला होता. तो नाशिकला गेला होता. धार्मिक विधी उरकले होते. शुध्दी करुन घेतली होती. राजकोटला परतला होता. ज्ञातिबांधवांना भोजन दिले होते. यात त्याला रस नव्हता. थोरल्या भावाची तशी इच्छा होती. मुख्य म्हणजे आईची इच्छा होती. त्यापुढे त्याने मान तुकवली. तो बहिष्कृत होता. सासुरवाडीला गेला. तिथे पाणीही घेतले नाही. सासरचे लपून-छपून सारे करायला तयार होते. लपून-छपून स्वागत करवून घ्यायला त्याचे मन तयार झाले नाही. कस्तुर विचार करत राहिली. हा अवघड माणूस होता. यामुळे मोढ बनिया जात सुखावली. गांधी कुटुंब व त्यांच्यातली दरी कमी झाली. मोहनदासची जात दोन गटात विभागली गेली होती. एका गटाने त्याला जातीत सामिल करुन घेतले. दुसरा गट मात्र तयार झाला नाही. त्या गटाचे नेते मात्र समाधानी नव्हते. त्यांना दंड हवा होता. मोहनदासने हे अमान्य केले. गांधीजींची थोरली बहिण रलिआतताई. तिच्या सासरचा बहिष्कार होता. मोहनदासने बहिणीकडे पाणीही घेतले नाही. कस्तुरच्या माहेरचाही बहिष्कार होता. त्यांच्या घरी गांधी कुटुंबाला बंदी होती. मोहनदासला फुलपात्रभर पाणीसुध्दा मिळणार नव्हते. कस्तुरची केवढी कुचंबणा झाली. जातीचा बडगा उगारलेला होता. याचा कस्तुरवर काहीच परिणाम झाला नाही असे कसे म्हणता येईल?

❖❖❖

## १७) अहिंसा गुरु कस्तुरबा!

मोहनदास आता बावीस वर्षे वयाचा होता. कस्तुरचे वय तेवढेच होते. या काळात अनेक-अनेक गोष्टी घडल्या होत्या. काही आठवडे घरात सारे सुरळीतपणे सुरु होते. मुलांना शिकवायचे मोहनदासच्या मनात आले होते. त्याचे लोण कस्तुरपर्यंत पोहोचले होते. शिकवणी परत सुरु झाली होती. कस्तुरला पूर्वीप्रमाणेच अभ्यास नीरस वाटत होता. अभ्यासाचे मोल व महत्व तिला काही कळेना. मोहनदासचे मन खंतावून जायचे. तो प्रयत्न करत राहिला. कस्तुर विरोध करत राहिली. नवरा संशय घेत राहिला. आरोप करत राहिला. अन्यायाचे दुष्चक्र परत गरगरु लागले. कस्तुरचे मन भयव्याकुळ झाले. नवऱ्यात सुतराम बदल झालेला नव्हता. त्याच्या मनातला संशय कायमच होता. बॅरिस्टर नवरा बायकोच्या प्रत्येक हालचालीवर बारीक लक्ष देत होता. आरोप करत होता. कस्तुरची मुस्कटदाबी सुरुच होती. तिची अगतिकता वाढत चालली होती. पुढे लक्ष्मीदासची नोकरी गेली. आर्थिक मोठा स्रोत खंडित झाला होता. मोहनदासचे सारे लक्ष कस्तुरवर केंद्रित झाले होते. तिने एकांतात नवऱ्याला सारी परिस्थिती समजाऊन सांगितली. तिचा स्वर कधी टीपेलाही पोहोचला. तिने घरात होणारा खर्च व आवक यातला फरक सांगितला. घराला आता त्याच्या मदतीची गरज आहे. हे तिने ठणकावून सांगितले. पहिल्यांदाच कस्तुर असे वागत होती.

यात मोहनदासचीच नादानी होती. कस्तुरने हा त्रास एकतर्फी भोगला होता. नवऱ्याच्या जाचापासून वाचली होती. शिकवणी सुटली होती. याचा का तिला आनंद झाला असेल? मोहनदासचे जीवन स्थिर होत चालले होते. सुरक्षित होत चालले होते. यामुळे कस्तुरशी संबंध सुधारायला लागले होते. मोहनदासचे दांपत्य जीवन वासनामुक्त नव्हते. ते हळूहळू शुध्द होत चालले होते. दांपत्य जीवनाला सुखाचा स्पर्श लाभत होता. यातली नादानी त्याच्या लक्षात आली होती. तोवर बराच उशीर झाला होता. गांधीजीनी आत्मचरित्रातून हे सारे तपशिलवारपणे मांडले आहे.[१] तो संशयी होता. ती सोशिक होती. तो असंयमी होता. ती सारे निमुटपणे सोसायची. तो शंका घेत रहायचा. ती सुस्मित वदनाने सारे झेलायची. तो त्रास द्यायचा. ती सहन करायची. तो वार करायचा. ती सारे वार निष्प्रभ करायची. तो त्रागा करायचा. ती शांत रहायची. बराच कालावधी लोटला. त्याला चूक कळून आली.

मोहनदास संशयी नवरा होता. आपला अधिकार गाजवण्याची एकही संधी त्याने दवडली नव्हती. हा अपराध घडला होता. हे प्रांजळपणाने त्याने मान्य केले होते. हा मात्र मोठेपणाचा भाग होता. कस्तुरने नवऱ्याच्या मत्सराचे हे विष पचवले होते. सारे सहन करुन ती आनंदी होती. कस्तुरला मोहनदासने माहेरी घालवून दिले. नवऱ्याच्या गैरहजेरीत कस्तुरला माहेरी जाणे जमले नव्हते. जाती बहिष्कृतीचा पाशही मानेभोवती होता. आता काठियावाडमध्ये रेल्वे आली होती. राजकोट ते पोरबंदर प्रवास सुखावह झाला होता.

मोहनदासने हे जाहीरपणे मान्य केले आहे. गांधीजी आपल्या आत्मचरित्रात लिहितात "पत्नीबरोबरचा माझा संबंध अजूनही माझी इच्छा होती तसा बनला नाही. माझा मत्सरी स्वभाव मी विलायतेतही ठेऊन येऊ शकलो नाही. प्रत्येक बाबतीत माझी धुसफूस आणि संशयी वृत्ती चालू असायची, त्यामुळे माझ्या मनाच्या इच्छा मला पार पाडता आल्या नाहीत. पत्नीला अक्षरज्ञान असलेच पाहिजे आणि मीच ते देईन असा विचार केला होता परंतु माझ्या विषयासक्तीपुढे ते काम बाजूलाच पडले आणि माझ्या कमकुवतपणाचा राग मी पत्नीवर काढला. एक प्रसंग तर असा आला की मी तिला माहेरी लावून दिली आणि भरपूर त्रास दिल्यानंतर परत एकत्र राहू देण्याचे कबूल केले. यात माझीच केवळ नादानगिरी होती हे मागून माझ्या लक्षात आले."[२] ही या संबंधातली मर्मबंधाची ठेव होती. महिना लोटला. मोहनदासने विनंतीपूर्वक कस्तुरला परत बोलाऊन घेतले होते. खूप वेदना दिल्या होत्या. ती महिन्याभरानंतर माहेराहून परतली होती. लहानग्या हरीलालला सोबत घेऊन आनंदाने परतली होती. घरात परिस्थिती बदलली होती. आता अभ्यास थांबला होता. शिकवणीचा जाच नव्हता. वाद नव्हते. शंका-कुशंका नव्हत्या. भांडणे नव्हती. सुसंवाद जागला. संशय संपला होता. मत्सर निमाला होता. उभयतांमध्ये नवे गांभीर्य जन्माला आले होते.

तिला आठवले की विलायतेहून परतल्यावर काही कमी दगदग झाली नव्हती. सोबत रहाण्याचा काळ थोडासा होता. मोहनदास पतिपेक्षा शिक्षक अधिक होता.

तिला हवे होते नितळ प्रेम. मनाच्या तळापासूनची माया हवी होती. लेकराला प्रेमळ पिता हवा होता. मोहनदास होता कडक शिक्षक. मुलांसाठी शिक्षक. बायकोसाठीही शिक्षक. त्याला पूर्ण पती काही बनता आले नाही. त्याला संपूर्णपणे पिता काही बनता आले नाही. कस्तुरचे मन खंतावत होते. तरी सहवास होता. सोबत होती. सुख-दु:खं वाटून घेता यायची. घरातल्या छोट्या-मोठ्या शंभर गोष्टी होत्या. तिचे अंतर्मन तृप्त होते. कुठलीही तक्रार नाही. काहीही मागणे नाही. काहीही सांगणे तर नाहीच.

तिचा अधिकांश वेळ स्वयंपाकघरात जायचा. ते जणू काही अंतहीन कथेच्या सुरुवातीसारखे होते. आतल्या आत धुमसणारी आग, रसरशीत निखारे, उसळत्या अग्निज्वाळा तर कधी तरंगता-झोंबता धूर. धाकटा हरी सोबतीला होता. एवढ्या मोठ्या घरात तशी कस्तुर एकटी होती. ती मनाशी विचार करायची. नुसता विचार करत रहायची. विचार करुन दमून जायची. स्वयंपाकघरात जाळापेक्षा धूराचे साम्राज्य शक्तिशाली होते. तिची कासावीशी वाढत रहायची.

मोहनदास शिकून परत आला होता. कस्तुरशी असलेल्या त्याच्या संबंधात गुणात्मक बदल काही दिसत नाही. इंग्लंडमध्ये तीन वर्षे घालवली होती. पर-स्त्रीपासून लांब राहिला होता. धनीपणाचा भाव मात्र कायमच राहिला होता. याचा पुरावा आत्मचरित्रातून वाचता येतो. विलायतेत मातृ-प्रतिज्ञेचा महत्वाचा संदर्भ 'पर-स्त्री-गमन' होता. याविषयी मोहनदासने स्वत:चा पदोपदी बचाव केला आहे. यात ईशकृपेचा अर्थ उलगडवून दाखवला आहे. एक नव्हे, दोन नव्हे तर अगदी तीन वर्षे तो सलगपणे विलायतेत राहिला आहे. हा काळ सिडनी आणि बिएट्रिस वेब यांच्यासारख्या समाजवाद्यांच्या असण्याचा आहे. जॉर्ज बर्नार्ड शॉ सारखे चिंतक आणि साहित्यिक असण्याचा आहे. या काळात एनी बेझंट आणि एडवर्ड कारपेंटर यांच्यासारखे तत्त्वज्ञ आहेत. हॅवलॉक एलिस यांच्यासारखे शास्त्रज्ञ आहेत. यांच्याशी काही मोहनदासचा थेट संपर्क आलेला नाही. वातावरणात मात्र या लोकांचा प्रकाश होता, वारे होते. नवमतवादाचे वारे मुक्तपणे मोहनदासने आपल्या अंगावर वाहू दिले होते. कित्येक विवेकी, सुधारक मित्रांचा संपर्क व सान्निध्य अनुभवले होते. त्याच्या वृत्ती-प्रवृत्तीत मात्र काही मूलभूत फरक दिसत नाही. 'नवरेपणा' गाजवायचा भाव काही क्षीण होताना दिसत नाही. हे कळून घ्यायला तत्कालीन रोजनिशी कामी आली असती. ती गांधीजींनी लिहिलेली नाही. आत्मचरित्र मात्र उपलब्ध आहे. अर्थात् आत्मचरित्र नंतरचे आहे. तीस-पस्तीस वर्षे या घटनेला लोटली आहेत. एक समंजस प्रगल्भता गाठीशी आहे. आत्मपरीक्षणाची सवय आहे. परीक्षण काटेकोर आणि कठोर आहे. अशा पार्श्वभूमीत आपण आत्मचरित्राचा आधार घेत आहोत. त्याच्या आधारे त्या काळातील आकलन मांडत आहोत. या विवेचनावर आत्मसंयमाचे पुट आहे. यामुळे ते स्वत:ला पारखताना अनेकश: कठोर आहेत. ही कठोरता नजिकच्या नातलगांना तर विशेष जाणवली असेल. कस्तुरला तर त्याचा जाच अधिकच झाला असेल. खुद्द मोहनदासला या कठोरपणाचा काही कमी जाच झाला नाही, झाला नसेल. या वातावरणात या पती-पत्नींचे भावसंबंध आणि आंतरसंबंध तपासून बघायचे आहेत.

कस्तुरला शिकवण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. आता मोहनदास मुलांच्या शिक्षणाकडे वळला आहे. हरीलाल चार वर्षांचा होत आला आहे. घरात इतरही बालके आहेत. मोहनदासने त्यांना व्यायाम करायला शिकवणे सुरु केले आहे. तो लेकरांशी खूप रमून गेला आहे. लक्ष्मीदासची याला संमती आहे. यामुळे त्याला अधिक यश लाभले आहे.

तीन वर्षांनंतर मोहनदास स्वदेशी परतला होता. राजकोटमध्ये धंदा सुरु करणे अवघड होते. मित्र मंडळींनी सल्ला दिला. मुंबईला जाऊन हायकोर्टाचा अनुभव घ्यावा असे ठरले. भारतीय कायद्यांचा अभ्यास करायचा होता. आहारविषयक प्रयोग सुरुच होते. दारावर पाटी झळकत होती. बॅरिस्टर एम्.के. गांधी. घरात बसून बॅरिस्टरीची तयारी सुरु होती. ही विरुध्द टोके होती. यात विसंगती भरपूर होती. पाटी लाऊन काही यश संपादित करता येणार नव्हते. ही प्रतारणा होती. प्रतारणा स्वत:शीसुध्दा होती. आत्मवंचना होती. सासरी आलेल्या नववधुसारखी मोहनदासची अवस्था होती.

संदर्भ


१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ९१ / ९२;

२) कित्ता पृष्ठ ९१ / ९२ .


❖❖❖

## १८) गृहकृत्यदक्ष कस्तुर!

१८९१ साली मोहनदास विलायतेहून परत आला. या काळात कस्तुरच्या पुर्नभेटीचा उल्लेख कुठे वाचायला मिळत नाही. तो इंग्लंडहून शिकून परतला होता. आहारविषयक सुधारणा तर त्याच्या घरी येण्यापूर्वीपासूनच सुरु झाल्या होत्या. घरात थोरल्या भावाने जय्यत तयारी केली होती. विलायतेसारखे थोडेसे वातावरण तयार करुन घेतले होते. घराची डागडुजी झाली होती. चूना मारला जात होता. कौलांच्या खाली छत लावण्यात आले होते. फर्निचर नवे आले होते. महागडी क्रॉकरी विकत घेण्यात आली होती. तशी ती घरात होती. प्रसंग विशेषी ती कपाटाच्या बाहेर यायची. पाहुणे-रावळे आले तर त्यांचे स्वागत करताना कामी यायची. आता मात्र ती भांडी सर्रास सर्वांसाठी वापरात येऊ लागली. चहा होता. तसलाच पाहुणा असला तर त्याला चहा मिळायचा. आता चहा सर्वांना मिळायला लागला. ओटच्या कणकेची लापशी मोहनदासने आणली होती. चहा-कॉफीच्या ऐवजी कोको आला होता. हाही सर्वांना खुला झाला होता. बूट-मोज्यांनी आधीच वस्ती केली होती. आता कोट-पाटलोणीने घर पावन केले होते. कस्तुर हे नवखेपण पहात होती. अनुभवत होती. मनोमन सुखावत होती. भावाला आशा होती. मोहनदास परत येत आहे. आता तो खोऱ्याने पैसा ओढू लागेल. मोहनदासने या उधळपट्टीविषयी नाराजी व्यक्त केली. आर्थिक परिस्थिती तर बेताचीच होती. त्यावर ताण पडत होता. मोहनदासचा सुधारणांविषयी मात्र आग्रह होता. एथवर सारे ठीक होते. कस्तुरने नवे कपडे वापरावे असे मोहनदासचे म्हणणे होते. त्या वयात अशा विलक्षण वा विचक्षण कपड्यांचा मोह कस्तुरला झाला असेल, झाला नसेल. काही सांगता येत नाही. घरचे वातावरण मात्र या बदलाला अनुकूल नव्हते. सर्वमान्य पोशाख असावा अशी किमान अपेक्षा होती. इतरांपेक्षा अगदी नव्या धाटणीचा पोशाख असावा. सर्वमान्य पोशाख ही काळाची गरज होती. घरच्या वातावरणाची आवश्यकता होती. परिस्थितीला अनुकूल रहाणे होते. विलायती शैलीतले फॅशनेबल कपडे नवऱ्याची आवड होती. कस्तुरच्या देहावर पारशी शैलीतला पोशाख विलसला होता. हरीलालला पाश्चात्य शैलीचे कपडे वापरण्याचा आग्रह झाला होता. त्याला कोट-पाटलोण आले होते. त्याला हे नेसायला आनंदच वाटला असेल ना?

मोहनदास मायदेशी परत आला होता. आपल्या वकीलीचे कायच होईल? हा प्रश्न त्याला भेडसावत होता. निराशा आणि भयाला सीमा नव्हती. वकिलीसाठी लागणारी सर्वोत्तम पदवी मोहनदासने संपादित केली होती. यासाठी लागतो आत्मविश्वास. उडत्या पाखराचे पंख मोजण्याची विद्या लागते. त्याने कायदे वाचले होते. वकिली करता येईल असे काही आपल्याला येऊ लागले आहे. असे त्याला वाटले नव्हते. वकिली तर भारतात करायची होती. भारतीय कायद्यांना इंग्लंडच्या पाठ्यक्रमात स्थान मुळी होतेच कुठे? परीक्षा द्यायच्या आधीपासून ही घालमेल त्याच्या मनात होती. भारतीय कायद्यांशी संबंधित ज्ञान मिळवावे लागते. हे तर सारे मिळवायचे राहिलेच होते. देशाच्या इतिहास व भूगोलाविषयीचे सामान्य ज्ञान सुध्दा त्याच्यापाशी जवळपास काहीच नव्हते. इंग्रजी लेखन कला अवगत होती. पाच-पंचवीस व्यक्तींपुढे बोलता येणे अवघड होते. मोहनदासचे मायदेशी आगमन झाले. भारतीय कायद्याचा अभ्यास करावा लागला. तो करता आला. दावे कसे मिळतील? कोर्टात उभे कसे रहायचे? अशीलाची बाजू कशी मांडायची? हे प्रश्न समोर उभे होते. नव्या वकिलांना दावे कसे मिळतील? त्यात हे तर बॅरिस्टर. यांची फी नको का परवडायला? खर्च प्रचंड वाढत होता. कमाई शून्य होती. थोरल्या भावाने नाना मनोराज्ये रचली होती. त्यांना धनाचा लोभ होता. कीर्तीची कांक्षा होती. हुद्याचे आकर्षण होते. त्यांचे बादशाही हृदय होते. त्यांचा उदारपणा उधळपट्टी बनत चालला होता. दावे तर मिळत नव्हते. लक्ष्मीदासचा मित्र परिवार मोठा होता. त्यांच्या मदतीने दावे मिळतील. मोहनदास खोऱ्याने पैसे ओढील. हे सारे त्यांनी गृहित धरले होते. यामुळे खर्चाचे झुकते माप होते. मोहनदास विलायतेहून परत आला होता. बॅरिस्टर बनून परत आला होता. विद्यासंपन्न झाला होता. सहा-एक महिने दोघे सोबत राहीलेत. मोहनदास राजकोट-मुंबई दरम्यान ये-जा करु लागला होता. तो वकीलीचा काळ होता.

मोहनदासने मुंबईला जायचे ठरवले होते. कस्तुर माहेरी थांबली होती. हा परत वियोग होता. नवरा कामाला

लागत होता. हे गरजेचे होते. कुटुंबाची स्वप्ने सत्यात उतरवायची होती. मोहनदासला यशस्वी वकील व्हायचे होते. आता तिच्या आशा फुलल्यात. ती सुंदर भविष्याची चित्रे रंगवू लागली. तिने नवऱ्याला निरोप दिला. लगेचच आनंदाची बातमी काही तिने दिली नाही. नवरा स्थिरावला की मग आपण गरोदर असल्याचे त्याला कळवू असे तिने ठरवले होते. मोहनने विलायतेत शाकाहारी अन्नाचे प्रयोग केले होते. त्याची इथे उजळणी सुरु होती. कस्तुर राजकोटलाच राहिली होती. मोहनदासने आचारी ठेवला होता. कुठे सुगरण कस्तुर आणि कुठे आचारी रविशंकर. स्वच्छ, सुंदर कस्तुर. कळकट, घाणेरडा आचारी. रविशंकरला स्वयंपाक करता येत नव्हता. मोहनदासनेच त्याला स्वयंपाक शिकवला. अर्धा स्वयंपाक तर त्याला स्वत:लाच करावा लागायचा. वेळही भरपूर होता. मोहनदासच्या मनाभोवतीचे कस्तुरचे स्वस्तिपद्मदल उजळत राहिले होते.

मोहनदासला पहिला दावा मिळाला होता. ममीबाई नावाची एक बाई होती. तिचा दावा होता. यात एक नैतिक अडचण उभी राहिली. दलालाला कमीशन द्यावे लागणार होते. मोहनदासने हा प्रस्ताव सपशेल धुडकावून लावला. कमीशन एक रुपया दिला नाही. दावा मिळाला. पहिला-वहिला अनुभव. मोहनदास कोर्टात उभा ठाकला. तो प्रतिवाद करणार होता. उलटतपास करायचा होता. उभा तर राहिला. पाय लटपटू लागले. डोके गरगरु लागले. कंठ शुष्क झाला. काही सुचले नाही. भरल्या कोर्टात हसे झाले. दाव्याची रक्कम ममीबाईला परत केली. लाज वाटली. संपूर्ण हिंमत आल्याशिवाय पुढचा दावा न लढवण्याचा निश्चय झाला.

मुंबईत अर्ज लिहायचे एक काम मिळाले. अर्ज चांगला लिहिता आला. आत्मविश्वास जागला. आपण किमान अर्ज तरी लिहू शकतो. अर्ज लिहिण्याकामी तरी लायक आहोत असे वाटले. फुकट अर्ज लिहून द्यायचे काम. तिथे का गर्दी नाही होणार? काम भरपूर होते. मोबदला मात्र शून्य होता. यातून का दोन वेळच्या जेवायची सोय होणार होती? एक जाहिरात वाचली. शिक्षकाच्या पदासाठी अर्ज केला. निराशा पदरी आली. तिथेही नन्नाचाच पाढा. नोकरी मिळवताना तथाकथित पदवीचा अडथळा होता. नामुश्की पत्करावी लागली. पदवी फक्त नावापुरतीच होती. पोटापाण्याची सोय करवून देणारी नव्हती. असा निरुपाय झाला होता.

लक्ष्मीदासनेही काळजी व्यक्त केली. दोघांचे एकमत झाले होते. मुंबई सोडावी. घरची वाट धरावी. राजकोटमध्ये स्थिर व्हायचे ठरले. यात सहा महिन्यांचा काळ गेला. राजकोटला येऊन मोहनदासने कचेरी उघडली. गाडे थोडे बहुत रेटण्याचा प्रयत्न केला. यात काही यश आले नाही[१] अर्ज लिहिण्याचे काम मिळू लागले होते. दरमहा सरासरी तीनशे रुपये मिळत. कस्तुरला मिळवत्या नवऱ्याचा आनंद होता. जात पंचायतीचा एक गट नाराज होता. नाराज नव्हे क्रुध्द होता. त्या गटाने एक ब्राह्मण नेमला. तो घरोघरी फिरला. त्याने पंचांचा संदेश घरोघरी पोहोचवला. मोहनदास विलायतेहून परतला आहे. त्याला कुणी घोटभर पाणीसुध्दा देऊ नये. दिल्यास पंचांच्या आदेशाचा तो अवमान ठरेल. ती व्यक्ति समाजाचा गुन्हेगार मानली जाईल. घरात भक्तिचे अधिष्ठान असलेली आई तर देवाघरी गेली होती. पितृतुल्य थोरला भाऊ होता. मोहनदासच्या शिक्षणात त्याचा वाटा सिंहाचा होता. कस्तुर मूक. मौन. सेविका होती. तिच्या त्याग व बलिदानाची मोजदाद करायची त्या काळी पध्दत नव्हती.

१८९२ साल उजाडले. २८ ऑक्टोबर १८९२ साली हरीलालला भाऊ झाला. त्याचे नाव मणीलाल. मुलाच्या आगमनाने कस्तुर आनंदात होती. किमान कुणावर अवलंबून रहाणे नव्हते. मोहनदासचे प्रापंचिक जीवन स्थिर होत होते. बरी कमाई होऊ लागली होती. हरीलाल आणि मणीलाल या दोन मुलांचा तो पिता होता. कस्तुर समाधानी होती. ती सासरी नांदत होती. सासू-सासरे निवर्तले होते. तिच्या मोठ्या जावा घरात होत्या. मोठे दीर होते. संयुक्त कुटुंब होते. छान एकतानता होती. कस्तुरचा नवरा आता तिला समजून घेत होता. नवऱ्याच्या आग्रहाशी आणि हट्टाशी ती आता परिचित झाली होती. आपल्या परीने प्रतिसाद देत होती. आपल्या दोन लेकरांच्या सोबत तृप्त होती.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी ९७ / ९८ .

❖❖❖

## १९) घन तमी शुक्र

मोहनदाससाठी चौफेर एकूणच निराशेचे वातावरण होते. न्याय मिळत नव्हता. घरात तशी शांतता होती. तो अपेक्षित बदल करवून घेत होता. कस्तुर सारे कुतूहलाने बघत होती. या बदलात सहभागी होत होती. बॅरिस्टरी जमली नाही. यातल्या खटपटी-लटपटी जमल्या नाहीत. जबाबदारीचे ओझे तर बेसुमार होते. कस्तुरसोबत राग करत रहाणे सुरु होते. कधी मनधरणी करायचा. हे सारे जारी होते. पत्नीला सुशिक्षित करायच्या प्रयत्नांना यश मिळाले नाही. ते एक स्वप्नच ठरले. कस्तुरची ओढाताण वाढली. एक प्रकारची नकारात्मक अवस्था जागली. शिक्षणाचा फार काही उपयोग झाला नाही. छातीशी बाळगलेल्या ध्येय-स्वप्नांच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडल्या. सत्याला वळसा घालून प्रसंगी वाट शोधावी लागली होती. हौसमौज, शौक, थाटमाट या वृत्तींना तर सपशेल फाटाच होता. थोरला भाऊ धडपडत होता. वेगवेगळे उत्पन्नाचे स्रोत शोधू बघत होता. परिस्थितीपुढे त्याचाही निरुपाय होत चालला होता.

मोहनदासला मनाजोगते गृहसौख्य नव्हते. रात्रीनंतर दिवस उगवत होता. देहावर देहाचे आक्रमण होत होते. मनाच्या सांदी-कोपऱ्यातही आशेची दिवली काही झगमगत नव्हती. पंचांचा बहिष्कृतीचा निर्णय खड्गासारखा माथ्यावर लटकता होता. आत्मीय जन दुरावले होते. कस्तुर शिक्षणाची वाट धरायला काही तयार नव्हती. मोहनदासचे मन बाह्य सुधारणांनी तुष्ट नव्हते. कस्तुरच्या मन-मेंदुवर शिक्षणाची महती त्याला ठसवता येत नव्हती. वस्त्र प्रावरणातील सुधारणा तिने ग्रहण केल्या होत्या. घरातले वळण साहेबी होत चालले होते.

कस्तुरच्या मनात विरहाचे ढग दाटून आले. तिला शामळदास महाविद्यालयातील शिक्षणाचा काळ आठवला. तिने मनात किती उमेदी रचल्या होत्या. ते शिक्षण अर्ध्यात थांबले होते. कसे-बसे तिथले पहिले सत्र संपवून नवरा घरी परतला होता. शिकायला विलायतेत गेला. धाकटा हरी आणि कस्तुर सोबत राहिले होते. तिला मोहनदासचे एथवरचे अनेक भ्रमनिरास ठाऊक होते. नाना फजित्या माहित होत्या. त्याच्या अनेक निराशा तिला अगदी तोंडपाठ झाल्या होत्या. त्याचे अपयश जणू काही आता पूर्णत्वाला पोहोचले होते. मूठभर धान्याशिवाय काही प्रवचन रंगत नाही. जोवर दिवलीत तेल असते तोवरच धर्मचर्चा रंगतात. सर्वत्र नकारघंटा घणघणत होत्या.

विवाहानंतरचा गांधीजींचा काळ संशय आणि शंकांनी भरलेला होता. ते दु:खी दिवस होते. त्यांना खरे तर यातून खूप शिकायला मिळाले. याचे भान काहीसे उशिरा आले. अनेक वर्षानंतर या प्रसंगाची आठवण त्यांना आली. याविषयीचे आपले मनमोकळे मनोगत त्यांनी व्यक्त केले आहे. ते जॉन एस्. होईलँड यांना म्हणाले-

“मी पत्नीला माझ्या इच्छेपुढे नमवण्याचे प्रयत्न केले. यातून मी अहिंसेचा पहिला पाठ शिकलो. एकीकडे माझ्या पत्नीने माझ्या विवेकशून्य हुकूमांचा निकराने विरोध केला. दुसरीकडे माझ्या अविवेकाने झालेला त्रास तिने मुकाट्याने सहन केला. तिच्या या संयमी आचरणाने मला माझीच लाज वाटायला लागली. माझ्या मनात मी तिचा नवरा आहे. माझा जन्म तिच्यावर शासन करण्यासाठीच आहे. या वेडगळ विचाराच्या पाठलागापासून मी स्वत:ला वाचवू शकलो. अशाप्रकारे ती माझ्यासाठी अहिंसेची दीक्षागुरु बनली.”[१]

मोहनदासचे मन मात्र नव्या वाटा शोधत राहिले होते. अंधार जेवढा जास्त तेवढी उजेडाची शक्यता अधिक असते. रात्रीच्या गर्भातच तर उद्याचा उज्ज्वल उष:काल हसत असतो. घनदाट अंधकारात आकाशात शुक्रतारा खुणावत असतो.

कस्तुरच्या कणखर जीवनाचे प्रतिबिंब पुढे तिच्या स्वातंत्र्य लढ्याच्या सहभागात झळकते. ती हळूहळू पतीच्या शास्त्रीय प्रयोगात सहभागी होते. प्रयोगाचे उपकरण बनते. बांधिलकी जोपासते. सामिलकी सांभाळते. नवऱ्याचा लढा तिचा श्वास बनतो. विश्वास ठरतो. लढा तिच्या संवेदनांचा आविष्कार होतो. नवऱ्याच्या शिकवणुकीची ती फक्त मौन मूक साथीदारीण नाही. ती प्रकट होते. आविष्कृत होते. भाषणे देते. विविध विचार परिषदांचे अध्यक्षपद भूषवते. तिचा संदेश सर्वत्र पोहोचतो. सेवेचे स्पंदन लाखो जनतेप्रत पोहोचते. हे सारे यथास्थानी आपण बघणार आहोत.

संदर्भ

१) महात्मा गांधी : एक जीवनी श्री बी. आर. नंदा / हिंदी अनुवाद - श्यामू संन्यासी पृष्ठ ८-९



ooo

दुसरा खंड

# यजुस

**यजुस वद १८८३ ते १९१४ हा एकतीस वर्षांचा काळ**



### यजुस

यजुस शब्द यज् या धातुपासून उत्पन्न झाला आहे. यजुस म्हणजे निष्काम कर्म वा यज्ञ. यजुस म्हणजे जोडणे, तयारी, समन्वयाची धारा.

***मित्रस्य मा चक्षुया सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम् । मित्रस्याहं चक्षुणा सर्वाणि भूतानि समीक्षे .. .. .. ॥ (यजुर्वेद ३६ / १८ )***

मित्राच्या नजरेने आम्ही जगाला बघावे, मित्राच्या नजरेने जगाने आम्हाला बघावे.

## १) विरह योग

कस्तुरचा आनंद आता हरपला होता. तिच्या चौफेर अंधारलेल्या वाटा होत्या. दिशा सून्न होत्या. ती खिन्न होती. मनात उजाडत नव्हते. काही सुचत नव्हते. या दरम्यान एक चांगली बातमी आली. पोरबंदरची एक मेमण पेढी दक्षिण आफ्रिकेत होती. त्यांच्या प्रतिनिधींचे लक्ष्मीदास यांच्याशी बोलणे झाले. त्यांना निरोप आला होता. निरोप असा होता "दक्षिण आफ्रिकेत आमचा व्यापार आहे. आमची मोठी पेढी आहे. आमचा एक मोठा दावा चालू आहे. दावा चाळीस हजार पौंडांचा आहे. आमच्याजवळ उत्तम वकील आहेत. बॅरिस्टर्स आहेत. तुमच्या भावाला पाठवाल? आम्हाला मदत होईल. त्यालाही काही मिळेल. त्याचे काम मर्यादित स्वरुपाचे आहे. त्याने आमची बाजू आमच्या वकिलांना चांगल्या प्रकारे समजाऊन सांगायची. त्याला नवा मुलुख बघायला मिळेल. नवीन ओळखी-पाळखी होतील. लाभच होईल."[१]

लक्ष्मीदास यांनी धाकट्या भावाला सारे काही समजावून सांगितले. गांधी सारे समजले. कामाचे स्वरुप काही धडपणे कळले नाही. वकीलांना बाजू समजाऊन सांगायची एवढे मात्र कळले. कोर्टातही जावे लागेल की नाही, हेही काही कळले नाही.

दादा अब्दुल्लांचे भागीदार होते शेठ अब्दुल करीम झवेरी. ते पोरबंदरला रहात. लक्ष्मीदासने भावाची त्यांच्याशी भेट घडवून दिली. शेठजी म्हणाले "तुम्हाला विशेष श्रम पडणार नाहीत. आमची मोठ-मोठ्या गोऱ्या लोकांशी मैत्री आहे. आमच्या दुकानातही तुमची मदत होईल. आमचा मोठा पत्र-व्यवहार इंग्रजी भाषेतून असतो. त्यातही तुम्ही मदत करु शकाल. तुमच्या निवासाची सोय शेठजींच्या बंगल्यातच होईल. तुम्हाला कुठलाच खर्च करावा लागणार नाही." गांधींनी सारे ऐकून घेतले.

'नोकरीची मुदत काय? पगार काय मिळेल?' हे दोन प्रश्न फक्त विचारलेत.

'तुमची गरज वर्षभर असेल. अधिक काळ नसेल. तुमच्या जाण्या-येण्यासाठी प्रथम श्रेणीचे भाडे मिळेल. निवास-भोजन आमच्याकडे. पगारादाखल एकशे पाच पौंड मिळतील.' शेठजी म्हणाले.

ही काही वकिली म्हणता यायची नाही. ही नोकरी झाली. गांधींना काहीही करुन हिंदुस्तान सोडायचाच होता. नवा मुलुख बघायला मिळणार होता. अनुभव मिळणार होता. पगार बरा होता. तो घरी पाठवता येणार होता. यातून घरखर्चात काही मदत लाभणार होती. त्यांनी पगाराविषयी घासाघीस केली नाही. शेठजींचे म्हणणे मान्य केले. दक्षिण आफ्रिकेला जायची मनोमन सिध्दता केली.

ते कस्तूरपासून परत दूर जाणार होते. या विचाराने ते कळवळले. काही महिने दोघे सोबत होते. काही बाबतीत साहचर्य होते. एकमेकांचा सहवास दोघांनाही हवाहवासा वाटत होता. दोघांच्या इच्छा एकमेकात गुंफल्या गेल्या होत्या. गांधींच्या मनात दक्षिण आफ्रिकेचे आकर्षण जागले होते. त्यांना हा वियोग सह्य वाटला होता. कस्तुरपुढे जीवनाचे तापते रण होते. नुकतेच कुठे प्रापंचिक जीवन संवादी होत होते. दोघे एकमेकांना समजून घेत होते. काही विषयांवर तरी आपसात बोलता येत होते. लेकरांच्या बाल-लीलांनी जीवनाचा ताप सुसह्य वाटत होता. कस्तुरसाठी हा वियोग प्रपंचसुखावर कुठाराघात होता. तिचे म्हणता येईल असे प्रपंचात कोण होते? ना सासरे ना सासू. एकाकी खांबासारखा प्रपंच होता. गांधीच तो खांब होते. त्यांनी कस्तुरची समजूत घातली. या खेपेला आई नव्हती. निरोप काय तो कस्तुरचाच घ्यावा लागणार होता.

वियोग पत्नीचाच जाणवणार होता. दोन-दोन मुले होती. उभयतांमधील प्रेमभावना अजूनही विषयदूषित होती. तरीही त्यात काहीशी निर्मळता येऊ लागली होती. गांधी विलायतेहून परतल्यावर उभयता एकत्र असे थोडाच काळ राहिले होते. नवरा हा नवरा कमी शिक्षक अधिक होता. त्याला अजूनही पत्नीकडून काही सुधारणा करवून घ्यावयाच्या होत्या. त्या टिकवण्यासाठी दोघांचे एकत्र रहाणे गरजेचे होते. हे उभयतांचे मत होते. तिकडे आफ्रिकेचेही आकर्षण तर होते. 'वर्ष अखेर तर आपण एकत्र येणारच आहोत ना!' असे मनाचे समाधान करता आले. गांधींनी राजकोट सोडले. मुंबई गाठली.[२]

कस्तुरच्या मनात प्रश्नांचे वादळ घोंगावत होते. विलायतेत शिक्षण घ्यायला म्हणून नवरा आतापर्यंत बाहेर होता. व्यवसाय आजमावून बघायचा होता. नवरा मुंबईत एकटाच रहायचा. विलायतेत एकटे असणे अपरिहार्य होते. मुंबईतही पाय रोवायचे होते. त्यावेळी एकटे असायला पर्याय नव्हता. घरी काही महिन्यांचीच तर साथ-संगत झाली होती. नुकतेच वीणेचे तार जुळू बघत होते. आता नवरा परत बाहेर जाणार होता. लांब, अगदी सातासमुद्रापार जाणार होता. नवऱ्याने तिला काय विचारावे? तिने सल्ला तरी कायच द्यावा? तिचे मत का कुणी विचारात घेणार होते? आपली आठवण मेली राहो. लेकरांची नाही का आठवण येणार? लेकरांसमवेत असा कितीसा काळ घालवला होता? रमली होती लेकरे छान. नवरा तरी काय? एवढा शिकला. घरा-दारापासून लांब राहिला. खाण्या-पिण्याची पार आबाळ-आबाळ केली. शाकाहाराचे प्रयोग केले. आईच्या चरणी शपथ वाहिली होती. तिच्या पालनासाठी जीवाचे रान केले. कस्तुर विचार करत होती. चिंता करत राहिली होती. नवऱ्याने एकदम निघून जाऊ नये. इथलाही विचार करावा. नवराही इथला विचार करत होता. किती दिवस थोरल्या भावावर असे अवलंबून रहायचे? प्रश्न काय तो एकाच वर्षाचा तर होता. हा हा म्हणता काळ निघून जाईल. तसे काम तर कारकूनाचेच होते. नवऱ्याची घुसमट कस्तुरला त्याच्या चेहऱ्यावर वाचता येत होती. कस्तुरला अक्षरांची ओळख नव्हती. भाव मात्र तिला वाचता येत असत. आता ती आई होती. जबाबदार पत्नी होती. गांधी घरातली सून होती. कस्तुरने त्याला साथ द्यावी असे त्याला वाटले. साथ म्हणजे सहाय्य ! सोबत येऊ नये. यायचा आग्रह धरु नये. शिकायला जाताना आईने आणि पत्नीने साथ दिली होती. कस्तुरने काय करावे? तिचे डोळे आसवात तरंगू लागले. 'हो' म्हणता येत नव्हते. 'नाही' म्हणवत नव्हते. नवरा त्या आसवांची भाषा जाणत होता. त्या परिस्थितीत त्याला हिंदुस्तानात थांबणे शक्य नव्हते. लक्ष्मीदासने प्रस्ताव मांडला होता. याचा अर्थ त्यांची संमती होतीच. आईचे मत विचारात घेतले असते. आई तर आता देवाघरी गेली होती. कस्तुरचे मत विचारात घ्यायचे फार कारण नव्हते. ती बायको होती. नवरा काही बोलत नव्हता. चर्चा करत नव्हता. त्या काळी पुरुषांमध्ये अशी पध्दत नव्हती. त्याने जायचे ठरवले होते. तो निश्चयाचा पक्का होता. एकदा ठरले की ठरले.

आपण शिकायला जात नाहीहोत याची नवऱ्याला जाण होती. कस्तुर होकार देणार नाही, हेही तो जाणून होता. तिचे म्हणणे त्याला पटतही होते. दक्षिण आफ्रिकेत काम तसे मोठे नव्हते. जबाबदारीही काही फारशी नव्हती. काम दुभाष्याचे होते. कारकुनी करायचे होते. नवा प्रदेश बघता येणार होता. नवी माणसे भेटणार होती. नवीन शिकायचे आकर्षण मनात होते. नाही तरी आता तसे राजकोटमध्ये काय उरले होते?

मनात उलघाल होती. याचे चित्रण गांधीजींनी आत्मचरित्रात केले आहे. शिकायला जाताना वियोगाचे दु:ख वाटले होते. तेवढे या खेपेला नव्हते. आई निवर्तल्या होत्या. गांधींजवळ अनुभव भरपूर होते. अनुभव जगाचे होते. अनुभव व्यवसायाचे होते. अनुभव प्रवासाचे होते. राजकोट-मुंबई या दरम्यान तर खेपा चालुच होत्या. यावेळी वियोगाचे केंद्र कस्तुर होती. आता एक कस्तुर आणि दोन मुले असा परिवार होता.

कस्तुरचा मनाशी संवाद सुरु होता. पहिला विरह होता तो शिक्षणासाठीचा. गांधी शिकायला भावनगरला गेला होता. पहिले सत्र पूर्ण करुन परतला होता. परत गेलाच नव्हता मग तर थेट विलायतच गाठले. तीन वर्षांचा विरह होता. या काळात सासूबाई निवर्तल्या होत्या. एकाकी वाट सरत नव्हती. नवरा परतला. उदरनिर्वाहाचा जळता प्रश्न होता. मुंबई गाठली. राजकोटला खूप प्रयत्न केले. यश मात्र हुलकावण्या देत होते.

या प्रयत्नात दोन वर्षे अशीच निघून गेली होती. जून १८९१ साली नवरा परतला होता. आता एप्रिल १८९३ साल होते. तो आता आफ्रिकेकडे रवाना होत होता. गृहसौख्याचा अनुभव नाही. मनांचा मनांशी संवाद नाही. घराला घरपण नाही. जाती-बहिष्कृतीचा फास अजूनही गळ्यात अडकलेलाच होता. परत एका वर्षासाठी बाहेर. बाहेर म्हणजे अगदी विदेशात. यामुळे आर्थिक स्थिती सुधारणार आहे. शाप-ताप आपल्या नशिबी राहू-केतुसारखे तरंगत आहेत.च. नवऱ्याने कस्तुरची समजूत

घातली होती. खरे तर कस्तुरनेच आपल्या मनाला समजावून सांगितले होते. आपल्या भावनांना आवर घातली होती. कर्तव्याला मोकळीक दिली होती.

आता कस्तुरच्या मनावर निवांतपणाचे तरंग होते. लग्नानंतरचा नवऱ्याचा झंझावाती आवेग आता मंदावत चालला होता. दोघे एकमेकाना अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न करत होते. वस्त्र-प्रावरणाविषयीचा आग्रह कस्तुरने पचवून घेतला होता. याविषयी नवऱ्याला अनुकूल बनण्यासाठी ती प्रयत्नशील राहिली होती. कस्तुरच्या भावदशेचाही काही अंदाज आता नवऱ्याला येऊ लागला होता. दादा अब्दुल्लांचे निमंत्रण होते वर्षभरासाठीच. कस्तुरचे मन कालगणना करत होते. एक वर्षाचा काळ. वर्षभर म्हणजे तीनशे पासष्ठ दिवस. या दिवसासोबतच्या एकाकी रात्री. तेवढे तास. तेवढी मिनिटे. सेकंदांचा हिशेब काही तिला लावता येत नव्हता. नशिब आजमावण्यासाठी परमुलूख गाठणारा नवरा. तो तिला पुरुषार्थी वाटला होता.

कस्तुरच्या टपोऱ्या डोळ्यात आसवांनी दाटी केली होती. तो थांबला. थबकला. हळुवारपणे तिचा खांदा थोपटला. एक वाक्य बोलला 'रडू नकोस, एक वर्षाचा तर कालावधी आहे. भुर्रकन निघून जातील दिवस. वर्ष संपल्यावर तर आपण भेटू ना?' त्याच्या सांत्वनेमुळे तिच्या आसवांचा बांध फुटला. ते आता मुक्तपणे वाहू लागले होते. त्याने ते तसे वाहू दिले. तिचे मन मोकळे होत होते. मुलांना केवळ आईच हवी नसते. त्यांना पिताही लागतो. आई घरातले सारे करते. बाहेरचे बघायला पिता लागतात. विलायतेला जाताना 'नका ना हो जाऊ !' असे कस्तुर म्हणाली होती. यावेळी मात्र तिने आडकाठी आणली नाही. याचा अर्थ ती आनंदित झाली होती असा मात्र नाही. ती समाधानी होती. नव्या संघर्ष वाटेवर चालायला सिध्द होती. तिथल्या कामाचा धड अंदाज तर अजून त्यालाही यायचा होता. आपला नवरा निघाला आहे. नवा प्रदेश आहे. काही कमवायला निघाला आहे. तिथल्या कामाचे नेमके स्वरुप अजून आपल्याला कळले कुठे? पण ते तसे अजून खुद्द नवऱ्याला तरी कुठे माहित आहे.? तो तिला कायच सांगणार होता? ती काय विचारुन घेणार होती? नाहीतरी कामाचे स्वरुप तिला नेमके कळले तरी असते काय? सारा प्रवास अज्ञाताच्या दिशेने सुरु होता. अतर्क्याकडे चालला होता. अनिश्चिततेकडे चालला होता. अशावेळी हट्ट नको करायला. आग्रह नको धरायला. एवढी जाणीव तिला खचितच होती. इथले प्रश्न टोकदार होते. त्यांच्याशीही ती काहीशी परिचित झाली होती. कस्तुर विचारपूर्वक पावले उचलत होती.

कस्तुरपुढे पुनश्च नवे आव्हान उभे ठाकले होते. आता या पुढे नवरा बाहेर असेल. दोन लेकरे मांडीवर असतील. संयुक्त कुटुंबात रहावे लागेल. आता नवरा काही शिकायला जाणार नव्हता. कमवायला जाणार होता. कस्तुरने मन घट्ट केले. आता नवरा कमावता असणार होता. इथे मात्र वर्षभर जळता विरह वणवा. कस्तुर कसे समायोजन करु शकत होती? तिच्या मनाला अपेक्षा वाटायची. निराशा गाठायची. मोठी विचित्र मनस्थिती होती. कालपर्यंत तिला एकाकीपण सतावत होते. आज ती या विरहाला नियतीची अटळता मानायला लागली होती. यामागे आर्थिक पाठबळाचे कारण होते. घरात पैसा येणार होता. ती एकाकी राहणार होती, हे तर खरेच पण एकाकीपणाला आर्थिक आधाराचे पाठबळ होते. तिचे आर्थिक परावलंबन संपणार होते. नाहीतरी वर्षभरचाच तर काळ होता. हा हा म्हणता वर्ष सरेल. पुनः मिलनाच्या सनईचे सूर ऐकता येतील. वर्ष लोटायचा अवकाश. पुन्हा सारे गोकुळ सजेल. नवरा निघाला. कस्तुरने अलबिदा म्हटले.

विरह-वियोग आणि वेदना बस्स. दुसरे काय? आणि आता तर वेगळाच कहर होता. तिच्या मनाच्या चिंधड्या-चिंधड्या झाल्यात. तिचे स्वप्न भंगून गेले होते. एका शून्याने तिला घेरुन घेतले होते. विलायतेचा प्रश्न वेगळा होता. त्या काळी सासुबाईंच्या मायेची छाया होती. नवरा शपथेने भारलेला होता. विलायतेतून सुखरुप परत आला होता. स्वच्छ, निर्दोष परतला होता. आता कमवता झाला होता. कुठे आहे. हा देश? तिथे पोहोचायला किती दिवस लागतील? तिथले हवामान मानवेल का? कशी असतील ती माणसे? कायच व्यवस्था असेल खाण्या-पिण्याची? कुणाची असेल साथ-संगत? कोण अडल्या-नडल्या वेळी मदत करील? आता सल्ला

द्यायला असे कुणी नव्हते. प्रतिज्ञा करायला लावायला आई कुठे होती? शिक्षणाचे एक वेळ ठीक होते. त्याला काही शिस्त असते. आता नवी माणसे. नवे काम. ना ओळख. ना देख. काम संपल्यावर पुढे काय? पानात पडेल ते खावे लागेल. नवरा नव-नवे मनसुबे रचत होता. कस्तुरच्या मनसुब्यांचा बंगला पत्त्यांच्या बंगल्यासारखा सारखा कोसळून पडत होता.

नवऱ्याचा स्वभाव असा हट्टी होता. काहीसा एककल्ली होता. कस्तुरचे मन प्रश्नांकित झाले होते. कस्तुर गृहिणी होती. नवऱ्याची काळजी वाटणे स्वाभाविक होते. समुद्र तिच्याही बालपणापासूनचा साथीदार होता. नवरा पुनश्च सागराच्या छातीवर स्वार झाला होता. त्याला सागर कधी अडचणीचा ठरला नव्हता. कस्तुरचे मन परत आपल्या घरट्यात रमले. आकाशाच्या हाका तिलाही ऐकायला येत होत्या धरतीचे आकर्षण मात्र अधिक वाटत होते.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १०२
२) कित्ता पृष्ठ १०३

❖❖❖

## २) दक्षिण आफ्रिकेच्या वाटेवर

गांधींना दक्षिण आफ्रिकेची वाट धरायची होती. विवाहानंतरच्या काळातला झंझावाती आवेग शमत चालला होता. दोघे एकमेकाना काही अंशी जाणू-समजू लागले होते. नवऱ्याच्या आहार-विहारातली नवलाई कस्तुर समजून घेत होती. त्याविषयी अधिकच अनुकूल होता यावे यासाठी प्रयत्नशीलही होती. कस्तुरच्या अडी-अडचणीही नवरा समजू लागला होता. कस्तुरची नवऱ्याविषयीची समज आता परिपक्व होत चालली होती. आपला नवरा आत्मगौरवाला तडा लागू देणार नाही. भ्रष्ट आचरण करणार नाही. सत्याची कास सोडणार नाही. असत्याचरणाला थारा देणार नाही. कुणाची खुशामत करणार नाही. खोट्या प्रशंसेला बळी पडणार नाही. याविषयी ती निश्चिंत होती. नवऱ्याच्या दृढ आग्रहासंबंधी तिला पूर्ण कल्पना होती. विलायतेत शिकायला जाताना निरोपावेळी ती 'जाऊ नका ना!' असे म्हणाली होती. या खेपेला तेवढेही बोलली नाही. 'मीही येते.' असे ती कसे म्हणू शकत होती? दोन तान्ही लेकरे सोबतीला होती. त्यांना सोबत घेऊन 'आम्हालाही सोबत घेऊन चला ना' असे सांगता न येण्याइतका समंजस विवेक तिच्या ठायी होता.

कस्तुरच्या आशांना नवे पंख फुटले होते. अनिश्चितता मात्र मनात तुडुंब भरली होती. काळजात अतर्क्य कळ उठली होती. हंबर-हंबर हंबरडा फोडणारा काळ होता तो. परत वियोगाची वाट होती. साऱ्या वाटा झाकोळून गेल्या होत्या. वाटेवर कासाविशीभरल्या हाका अंथरल्या गेल्या होत्या. विरही ऋतुंचे संकेत कायम राहिले होते. संपूर्ण भविष्य गडद अंधाराच्या पटलाआड होते. सतत पडणारा वियोगाचा विळखा तिला असह्य वाटला होता. तिने मनाची समजूत घातली होती. नवऱ्याला बळ पुरवले होते. येण्या-जाण्याची सोय होणार होती. निवास-भोजनाची सोय होणार होती. वरुन घसघशीत पगार मिळणार होता. त्या पगारावर घर चालणार होते. सारे कर्ज फिटून जाणार होते. या घरात आता ती परावलंबी राहणार नव्हती. सन्मानाने दोन घास खाऊ शकणार होती. तिच्या मनाचे अंधाराचे जाळे फिटत होते.

दक्षिण आफ्रिकेत निघायच्या दिवशी कोण लगबग सुरु होती. आवरा-आवर सुरु होती. बांधा-बांध जारी होती. कस्तुरला सारे खूप अवघड गेले होते. आता खरे तर मनानेही जवळिक वाढायचा काळ होता. दांपत्य प्रेमात अजूनही जबरदस्ती होती. नवरा काहीसा धसमुसळा होता. त्याला मनापेक्षाही देहाचे आकर्षण अनिवार होते. ती मनोमीलन चाहत होती. तिने आपले सर्वस्व अर्पण केले होते. नवरा याहूनही अधिक काहीतरी चाहत होता. ते नेमके काय ते तिला कळत नव्हते. याहून अधिक काही द्यायला तिच्यापाशी उरले तरी काय होते? ती उधळत होती. तो ओरबाडून घेऊ बघत होता. ती मुग्ध होती. तो लुब्ध होता.

कस्तुरचे दोन बछडे सोबत होते. तिच्या आशा-आकांक्षा आता नवऱ्याच्या सोबत प्रवास करणार होत्या. त्या जहाजाच्या फडफडत्या शिडाच्या खांद्यावर विहरत होत्या. चिंता, विरह, धाकधूक सारे काही तिने आपल्या पदरात झेलून घेतले होते. वेदनांचे कढ गिळून टाकले होते. आसवे आपल्यापाशीच राखून ठेवली होती. आशा, आनंद आणि अहोभाव सारे तिच्या नवऱ्याच्या आधीच जणू जहाजावर चढले होते. ती त्याचा आग्रह समजू शकत होती. तो नशीब आजमावण्यासाठी निघाला होता. त्याला दक्षिण आफ्रिका हाका मारत होते. तिला घरच्या जबाबदाऱ्यांनी जखडून ठेवले होते. तो आकाशातून घरटे न्याहाळत होता. ती खिडकीतल्या चौकटीत मावणारे आभाळ बघत होती. तिचे मन जात्याच्या घरघरण्यासोबत फिरत रहायचे. दह्याचा डेरा घुसळताना उसळणाऱ्या लोण्यासारखे उसळत रहायचे. सूपात दाणे पाखडताना समंजस सूर लावत रहायचे. सडा-रांगोळी घालताना एक नवी रांगोळी मनाच्या अंगणात रेखत असायचे. तिला आता वेगळा अनुभव येत होता. आपले कुणाला म्हणावे? परके नेमके कोण? एवढे नेमकेपणे कळत होते. ती हुशार होती. सावध तर होतीच. मनाने खंबीर होत चालली होती. 'सारे काही सहन करायला शिक.' ती आपल्या मनाला बजावून सांगायची. काळ्या पाण्यावरच्या उसळत्या लाटा. तरंगणाऱ्या जहाजावर लांब-लांब जाणारा नवरा. जहाज हेलकावे खात निघाले होते.

कस्तुरला असे वाटले की आपण एका घनघोर अरण्यातून एकाकी निघालो आहोत. आकाशात तळपता सूर्य आहे. त्याला आपल्या पानांच्या ओंजळीत झेलू बघणारे उंचच उंच वृक्ष आहेत. ते आपल्या भोवताली उभे ठाकलेले आहेत. त्यांना लगटलेल्या लालस वेली आहेत. निर्मनुष्य मार्ग आणि ध्येयाचा अजिबात पत्ता नसलेली आपली चालती पावले आहेत. ती चालत राहिली होती. पुढे जे वाढून ठेवले आहे. त्याची चिंता करत होती. मनाच्या भोवताली अज्ञात भविष्याचे मजबूत कडे पसरले होते. आपल्या उजव्या हातचा तळवा कपाळावर आडवा धरुन तिने बघायचा प्रयत्न केला. आता तर जहाजाचे फडफडते शिडही अधांतरी लहरणाऱ्या पताकेसारखे दिसत होते. हळूहळू त्याचा एक ठिपका हवेत तरंगत असल्याचा भास होऊ लागला होता.

कस्तुर थकून जात होती. आकाशात नक्षत्रे होती, नव्हती असे नाही पण तिला ती खूप निस्तेज वाटलीत. त्यांच्या अस्तित्वामुळे अंधाराची सद्दी संपल्याची कथा संपणे तर दूरच राहो उलटपक्षी अंधार अटळ वाटत होता. अगम्य आणि गूढ वाटत होता. घनघोर अंध:कार आणि कमालीचा एकाकीपणा एवढेच जणू काही आपल्या जीवनातले परम सत्य आहे. असे तिला वाटू लागले होते. ही भावना तिच्या मनी सलली. लहानग्याला थोपटत ती घरात शिरली. नवऱ्याच्या मनाला कस्तुरचा विरह अणकुचीदार वाटला होता.

दक्षिण आफ्रिकेकडे गांधी निघाले होते. आता आई नव्हती. तिने त्यांना अखंडपणे मार्गदर्शन केले होते. वडिलांच्या निधनानंतर आई ध्रुवतारा होती. गांधींच्या अंतर्गत विश्वाच्या केंद्रस्थानी होती. आईच्या आठवणी त्यांना येत राहिल्या होत्या. बायकोचीही आठवण येत होती. घरगुती आनंददायी जीवनाच्या आठवणी सोबत होत्या. 'देवाने टाकून दिलेली दक्षिण आफ्रिका. इथेच गांधींना आपल्या देवाची भेट झाली.' या शब्दात त्यांनी काही वर्षानंतर या प्रदेशाचे वर्णन केले होते. आई आता त्यांच्या अस्तित्वाचा भाग बनून गेली होती. तिचा आत्मा त्यांच्यासोबत सदैव राहणार होता. पत्नीशी असलेली आधीची क्षुब्धता काही अंशी मावळली होती.

२४ एप्रिल १८९३. 'एस्. एस्. सफारी' या आगबोटीने गांधी मुंबईहून निघाले. मार्ग समुद्री होता. लक्ष डर्बन होते. गांधींचा प्रवास सुरु होता. ते बदलत होते. हा बदल बाह्य होता. आंतरिकही होता. ते आपले निरीक्षण करत होते. परीक्षण करत होते. परिष्करण करत होते. मनाशी प्रामाणिक होते. त्यांना आपल्यासाठी तपश्चर्या करणारी बायको आठवायची. दोन-दोन लेकराना मांडीवर वागवणारी कस्तुर कुठला विश्वास जोपासत होती? तिने जर हट्ट धरला असता तर? तो का आपण टाळू शकलो असतो? ते आपल्या मनाला प्रश्न विचारत होते. उत्तराचा नेमका शोध घेत होते. त्यांचे मन त्यांना जाब विचारत होते.

बारा दिवसांचा प्रवास झाला होता. मलेशिया देशाच्या पूर्वेला लामू बंदर आहे. तिथे जहाज थांबले होते. प्रवास पुढे सुरु झाला होता. लामूहून मोंबासा आले. तिथून ते झांजीबारला पोहोचले होते. झांजीबारहून स्टीमर बदलावे लागणार होते. तिथे दहा-एक दिवस थांबावे लागणार होते. तिथे कप्तानाने त्यांना वेश्यावस्तीत नेले होते. एक दलाल तिथे घेऊन गेला होता. गांधींची तर शरमेने गठडीच वळली होती. कप्तानाने बाहेरुन हाक मारली. ते त्या खोलीतून जसेच्या तसे बाहेर आले. ती बिचारी बाई. तिच्या मनात काय विचार आले असतील देव जाणे. त्यांचा भोळेपणा कप्तानच्या ध्यानी आला होता. सुरुवातीला गांधींना लाजल्यासारखे झाले. असे काही त्यांना जमू शकेल असे नव्हते. ओशाळेपणा थोडाच वेळ टिकला. त्या बाईला गांधींनी बघितले. मनात तिळमात्र विकार टिकला नाही. ती लगेच निघून गेली. तिच्या तर लगेच सारे ध्यानी आले होते. त्यांनी देवाचे आभार मानले. ते बाहेर पडले. बाहेर अंधार-अंधार होता. काळी रात्र. त्यांच्या मनात आपल्या दुबळेपणावर चीड आली. त्यांनी त्या घरात प्रवेशच का केला? तेव्हाच 'नाही' का म्हणू शकले नाही? त्यांना मनोमन पश्चात्ताप वाटला. यात त्यांना काही स्वत:चा पुरुषार्थ दिसला नाही. त्यांनी मनोमन देवाचे आभार मानले. चुकीची शरम बाळगायला नको हा पाठ शिकले. त्यांची देवावरची श्रध्दा वाढली. आस्था बळावली[१] आपल्या मनाची ही

अवस्था गांधींनी आपल्या आत्मचरित्रात मांडली आहे. यातला प्रामाणिकपणा आणि ईशसमर्पणभाव विशेष आहे.

गांधी दक्षिण आफ्रिकेकडे निघाले. तिथे सत्याग्रह लढत आठ वर्षे चालली. यात कस्तुरचा सहभाग होता. मोठा मुलगा हरीलाल. त्याचाही सहभाग होता. गांधींनी या लढतीला 'सत्याग्रह' हे नवीन नाव दिले आहे. एक नवा मनू उगवला. या लढतीने जगाचे लक्ष वेधून घेतले. बॅरिस्टर एम्. के. गांधी इथे गिरमिट्या बॅरिस्टर म्हणवले गेले. पुढे 'गांधी भाई' झाले. दक्षिण आफ्रिकेचा निरोप घेतला आणि जगाला महात्मा गांधीजी लाभले.

गांधींनी स्वत:च या लढ्याचा इतिहास लिहिला आहे. यात सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान आहे. सत्याग्रहात दोन्ही पक्षांचा विजय होतो. निराशेला इथे स्थान नाही. या लेखनाला अतिशयोक्तीचा स्पर्श नाही. हे कमालीचे पारदर्शक चित्रण आहे. इा इतिहास स्मरण शृंखलेवर आधारित आहे. गांधी लढतीचा मूळारंभ आहे. या प्रवासात अडी-अडचणींचा डोंगर उभा आहे. द्वेष, भांडणांचे विषवमन झाले आहे. क्वचित् कुठे निराशा आणि नापसंती दिसते. कुठे कंटाळा आणि आळस झळकतो. उत्साह आणि ऐक्य आहे. मेळ आणि आग्रह आहे. द्दढता आणि श्रध्दा आहे. भक्ती आणि ईशकृपा आहे. त्याग आणि सहिष्णुता आहे. यात बालके आहेत. युवक आहेत. वृध्दजन आहेत. महिला आहेत. पुरुष आहेत. सुशिक्षित आहेत. अशिक्षित आहेत. लढतीची नेमकी पायाभरणी आहे. या लढतीला ईशकृपेचे वरदान आहे. न मागता मिळालेली मदत आहे. लढवय्यांमध्ये उत्साह संचरण्याची दिशा आहे. गांधींना विजयाचा विश्वास संपादन करता आला. हिंदी जनांचा विजय झाला. यात आत्मसन्मान साधता आला. आत्मविश्वास विकसित झाला. साधनांऐवजी इथे साधनेला महत्व लाभले. एका दूरदेशी ही लढत चालली होती. नवा प्रदेश होता. नवी भाषा, नवे लोक होते. नवे प्रश्न होते. नवख्या भागात नवजागरण घडले. कसा होता हा प्रदेश? काय याचा इतिहास? या विषयी कुतूहल असणे तर स्वाभाविकच वाटते ना?

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १०५.

❖❖❖

### ३) दक्षिण आफ्रिका: एक ओळख

आफ्रिका हा जगातल्या मोठ्यात मोठ्या खंडांपैकी एक. तसे तर आपण आपल्या देशालाही खंडप्राय म्हणतो. भारतासारखाच आफ्रिकाही द्वीपकल्प आहे. आफ्रिकेचे क्षेत्रफळ मात्र खूप मोठे. भारताच्या चार-पाच पटीने मोठा देश. दक्षिण आफ्रिका म्हणजे आफ्रिका खंडाचा सर्वात दक्षिणी भाग. हा अतिशय भाग्यशाली भूखंड. दक्षिण आफ्रिकेचा मोठा भूभाग सागरवेष्टित आहे. तीन-तीन महासागर आणि दोन-दोन समुद्र याच्या चरणी अभिषेक करतात. वीस हजार मैलांचा विस्तृत समुद्र किनारा या प्रदेशाला लाभला आहे. नाना प्रदेश. विविध जाती-जमाती. अगणित बोलीभाषा. भिन्न संस्कार. वेगवेगळे रीती-रिवाज, जगण्या-झुंजण्याचे नाना संदर्भ. आसपास रुणझुणत्या पर्वत माळांची रांग. उत्तर भागाच्या पश्चिमवर्ती क्षेत्रात सहाराचे धगधगते वाळवंट. पूर्वेला विसावलेले हिमाच्छादित किलीमांजराचे गगनस्पर्शी शिखर. मधमाश्यांच्या मोहोळासारखी खाली लोंबती एक झालर. आफ्रिकेच्या चरणी मादागास्करचे कमळ. यात विविध पर्वतराजी. उंच सखल प्रदेश. आभाळात निसर्गाची नित्य बदलती रुपे. सर्वात मोठी चैन तर इथल्या ऋतुंची आहे. इथे एकाच वेळी गळ्यात गळा घालून दक्षिणायन आणि उत्तरायण नांदते. एका भागात थंडीने थरारणारी प्रजा. दुसरीकडे घामाने थबथबलेले जनलोक. एका दिशेला बरसणारे गगन. दुसऱ्या दिशेला निरभ्र आभाळ. उत्तर-दक्षिण टोकावर प्रचंड उन्हाळा व कडाक्याची थंडी. मध्य भागात ना थंडी ना उन्हाळा. या प्रदेशातील पाखरे मोठी भाग्यशाली. घटकेत वसंत ऋतुचा आनंद लुटावा. घटकेत शरदाचे चांदणे वेचावे. खरीपाच्या पिकांची मौज चाखावी. ग्रीष्मात आम्ररस सेवावा. कुठे शितल वाऱ्याच्या संगे विहार करावा.

भूमध्य रेषा आफ्रिकेला मध्यभागातून छेद देते. दक्षिण आफ्रिका मात्र भूमध्य रेषेपासून लांब लांब आहे. तिथल्या भूभागावरचे तापमान समशीतोष्ण आहे. हे हवामान कुणालाही मानवणारे आहे. युरोपातील अनेक लोकसमूह इथे सुखेनैव नांदतात. दक्षिण आफ्रिकेची स्वर्णपुरी आहे. जोहान्सबर्ग. कधीकाळी हा वैराण प्रदेश होता. वाळक्या गवताचे प्रचंड ढिगारे सर्वत्र दिसत असत. तिथे सोन्याच्या खाणींचा शोध लागला. बघता-बघता घरे उभी राहिलीत. गगनचुंबी महाल उभारले गेलेत.

भारतातून निघून दक्षिण आफ्रिकेला जाताना वाटेवर लागणारे पहिले-वहिले बंदर आहे. डर्बन. केपचे राज्यपाल होते सर बेंजामिन डर्बन. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ या शहराचे नाव डर्बन ठेवले गेले. यालाच नाताळचे बंदर म्हणूनही ओळखतात. हे इथले प्रमुख बंदर आहे. ४७२, ६८५ मैल क्षेत्रफळाचे दक्षिण आफ्रिका. त्याचे चार भाग होते. केप कॉलनी, नाताळ, ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट. तिथे आरंभी ३३ लाखांची लोकवस्ती होती. ७ लाख गोरे होते. उरलेले नेटिव्ह, रंगीत होते. अधूनमधून शिडकावा केल्यासारखे आशिया खंडातील लोक होते. हे पहिले ब्रिटिश संस्थान होय. नाताळमधील मोठ्यातील मोठे शहर. नाताळची राजधानी पीटरमोरित्सबर्ग. डर्बनचे हवामान काहीसे मुंबईसारखे म्हणता येईल. मुंबईच्या तुलनेने गारवा काहीसा अधिक.

नाताळ ओलांडल्यावर लागते ट्रान्सवाल. तिथे सोन्याच्या खाणी आहेत. हिऱ्यांच्या खाणी आहेत. ट्रान्सवालची राजधानी प्रिटोरिया. ट्रान्सवालच्या पुढे पश्चिमेकडे ऑरेंज फ्री स्टेट आहे. या संस्थानाला ऑरेंजिया असेही म्हणतात. तिथून काही तासांचा रेल्वेचा प्रवास. तिथे केप कॉलनीची सीमा लागते. केप कॉलनी मोठ्यात मोठे संस्थान आहे. मोठे बंदर केप टाऊन. तेच राजधानीचे शहर. ही चार प्रमुख ब्रिटिश संस्थाने होत. याशिवाय ब्रिटिश सल्तनतीच्या आधिपत्य आणि संरक्षणाखाली कित्येक प्रदेश आहेत. दक्षिण आफ्रिकेचा मुख्य व्यवसाय शेतीचा आहे. इथे सुजलाम सुफलाम भूमी आहे. विविध पिके आहेत. नाना फुले-फळे आहेत. इथे समृध्द गोवंश आहे. सृष्टी सौंदर्याने नटलेला प्रदेश आहे. इथले ऋतु भिन्न. आपल्याकडे उन्हाळा तिकडे हिवाळा असतो. पाऊस तर अगदी हवे तेव्हा येतो.

युरोपीय लोकानी दक्षिण आफ्रिकेत पाय ठेवला तेव्हा तिथे हब्शी लोक होते. हब्शींच्या विविध जाती-जमाती आहेत. हेच दक्षिण आफ्रिकेतील मूळ निवासी. ते गौरवर्णीय बालकालाही भितात. बंदूकीला भितात. बंदूक दिसली की एक तर पळ काढतात किंवा मग

दिग्मूढ होऊन उभे ठाकतात. शेतीत राब-राब राबतात. खाणीत खपतात. प्राणहरण करणाऱ्या क्षय रोगाने ग्रस्त होतात.

ही निर्दोष प्रजा आदिकालीन होती. जवळपास पाचेकशे वर्षांपूर्वी तिथे वलंदा लोक आलेत. तेही पदरी गुलाम बाळगत असत. वलंदा हे मूळचे जावा संस्थानातले. त्यांचे गुलाम मलायी. या गुलामांसोबत वलंदा केप कॉलनीत हजर झालेत. हे मलायी मुसलमान होत. यातले अनेक गोऱ्यांची नोकरी पत्करुन होते. इतर काहीजण स्वतंत्रपणे व्यापार-धंदा करत. मलायी महिला उद्योगी आणि हुशार. त्यांचे रहाणीमान स्वच्छ असते. या महिला धोब्याचे काम करु शकत असत. उत्तम शिलाई काम करु शकत असत. पुरुष छोटा-मोठा व्यापार करत. एखादा अपवादात्मक उच्च विद्याविभूषितही झाला होता. उच्चपदीही पोहोचला होता खरा.

वलंदा म्हणजे डच हे नव्याने सांगायची गरज पडू नये. ते उत्तम शेतकरी तसेच बहादूर योध्दे, त्यांची या गुणांनी प्रसिध्दी आहे. त्यांनी मजूरी पासून सुरुवात केली. पुढे शेती करु लागले. हळूहळू इंग्रज आले. इंग्रज आणि डच तर चुलत भाऊच ना ! दोन्ही लोभी. दोघांना हब्शीना वश करायचे होते. यानिमित्ताने दोघांमध्ये संघर्ष सुरु झाला. पुढे ऐक्यही उपजले. हे वलंदाच तर आफ्रिकेच्या अंतर्वर्ती प्रदेशात प्रविष्ट झाले. पुढे ट्रान्सवाल काय आणि ऑरेंज फ्री स्टेट काय आकाराला आले. हीच वलंदा वा डच मंडळी दक्षिण आफ्रिकेत बोअर या नावाने परिचित झाली. बोअर लोक साधे-भोळे पण कट्टर धार्मिक. त्यांच्यापाशी जमीन होती. जमीन आपल्याकडच्या शेतकऱ्यासारखी चार-दोन एकर नाही. त्यांच्यापाशी शेकडो-हजारो एकर जमीन होती. हे स्वातंत्र्यप्रेमी आणि लढवय्ये होते. जनरल स्मट्स काय आणि जनरल बोथा काय, जनरल हर्झोग काय आणि जनरल डिवेट काय हे फार मोठे शेतकरी होते. फार मोठे लढवय्ये होते. बोअर स्त्रियाही शूरवीर आणि साहसी होत्या. त्यांना ना वैधव्याचे भय ना एकाकीपणाची भीती ! बोअर हे कट्टर ख्रिश्चन आहेत. या भूमीत गांधी आणि कस्तुरने संघर्ष केला. एका भयावह संघर्षाला तोंड दिले.

❖❖❖

## ४) भारतीय मजूरांचे पहिले जलपोत

नाताळमध्ये इंग्रज आलेत. एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली. इथे चहा, कॉफी आणि ऊसाची शेती होऊ शकते. ही शेती खूप फायदेशीर ठरणार होती. त्यांनी हब्शींना कामासाठी लालूच दाखवली. हब्शी ही मोठी आळशी आणि कामचुकार जमात. बरे, त्यावेळी गुलामीचा कायदा नव्हता. हब्शींवर जोरजबरदस्ती करता येण्यासारखी परिस्थिती नव्हती. शेतीसाठी कायम टिकतील असे मजूर हवे होते. आता काय करावे? इंग्रजांनी हिंदी सरकारशी पत्रव्यवहार सुरु केला. मजूरांची मदत मागितली. नाताळ सरकारने हिंदुस्तान सरकारशी एक करार केला. ही घटना आहे. १६ नोव्हेंबर १८६० सालची. अजून तर गांधी आणि कस्तुरचा जन्म व्हायचा होता.

हिंदी सरकारने नाताळ सरकारच्या या प्रस्तावाला मान्यता दिली. हिंदुस्तानी मजूरांनी भरलेले एक जलपोत निघाले. ते दक्षिण आफ्रिकेच्या बंदराला लागले. मजूरांचा पहिला दस्ता आफ्रिकेत पोहोचला. यात दिडशे बंधू-भगिनी होते. हिंदी सरकारने ही विनंती मान्य करायला नको होती. हिंदुस्तानातले इंग्रज अधिकारी सहजपणे आपल्या बंधुंकडे झुकले. हे करार करुन आलेले मजूर होते. करारात मजूरांच्या रक्षणाची यथाशक्य चर्चा होती. खाण्या-पिण्याची सोय होती. हे अशिक्षित मजूर आपल्या मूळापासून लांब-लांब जाऊन राहणार होते. यांच्या मुक्ततेचा विचार काही कुणी केला नव्हता. त्यांच्या धर्मव्यवस्थेचे नेमके कायच होईल? त्यांच्या नीतीचे रक्षण कशा प्रकारे केले जाईल? त्यांना काही स्वातंत्र्य राहील किंवा कसे? त्यांच्या सुख-दु:खात वाली कोण? या व यासारख्या प्रश्नांचा विचार केला गेला नव्हता. कायदेशीरपणे तो काही गुलामगिरीचा काळ नव्हता, हे खरे पण श्रीमंतांच्या मनात वसणाऱ्या आढ्यतेचे काय? इतराना गुलाम बनवून वागवण्याच्या वृत्तीचे काय? लोकांचे शोषण करण्याच्या लोभाचे काय? हे मजूर दीर्घकाळानंतर अनायासेच गुलाम बनून जाणार होते. हा विचार काही कुणाच्या मनाला शिवला नाही.

या सोबतच सत्याग्रहाची बीजे दक्षिण आफ्रिकेतल्या समृध्द जमीनीवर पडलीत. इंग्रजी शब्द आहे. एग्रिमेंट. या इंग्रजी शब्दाचा धडपणे उच्चारही मजूराना करता येत नसायचा. या शब्दाचे अपभ्रष्ट रुप आहे. गिरमिट. ते म्हणायचे गिरमिट. हे गिरमिटे लोक. 'मजूर' व 'कुली' या संबोधनाने गिरमिटे ओळखले जात. कुली म्हणजे हमाल. तिथे हे नाव प्रचलित झाले होते. हिंदुस्तानींनाही स्वत:ला कुली म्हणवून घेण्यात काही न्यून वाटत नसायचे. पुढे हे नाव तमाम हिंदुस्तानींसाठी रुढ झाले. कुली व्यापारी. कुली वकील. अहो, कुली बॅरिस्टरसुध्दा. दक्षिणेतले स्वामी. त्यांच्यासाठी सामी असे अपमानास्पद संबोधन होते. सारेच नष्टचर्य !

सर विल्यम हंटर नावाचे एक इंग्रज गृहस्थ होते. त्यांनी या परिस्थितीचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांनी या स्थितीला 'अर्ध्द गुलामगिरीची अवस्था' असे म्हटले होते. त्यांना ही अवस्था जवळपास गुलामीच्या अवस्थेप्रत पोहोचलेली वाटली. त्यांनी एका पत्रातून हे नमूद केले आहे. मिस्टर एस्कंब तिथले नामांकित गौरवर्णीय होते. नाताळच्या एका कमिशनपुढे साक्ष देताना त्यांनीही असे म्हटले होते. असे तर खूप पुरावे आहेत. अगदी इंग्रजांमधल्या सुप्रसिध्द लोकांच्या वतीने मांडलेले आहेत.

स्टीमरने या मजूरांना नाताळला उतरवले. त्याच स्टीमरच्या पोटातून सत्याग्रह वृक्षाचे बीजवपन झाले. या मजूरांना इथल्या दलालांनी नाना प्रकारे नागवले. हे भोळसट बनून तिथे गेले. तिथे पोहोचल्यावरही यांचे डोळे उघडले नाहीत. डोळे उघडले तरीही हे मजूर नाताळातच राहिलेत. आणखी मजूरवर्ग सतत जातच राहिला. त्यांच्या मागोमाग चालत राहिला. तिथे जाऊन आपल्या धर्म आणि नीतीला तिलांजली दिली. या विधानांना का व कसे हे प्रश्न विचारता येतात पण त्याचा काही एक उपयोग नाही. काही प्रश्नही स्पष्ट आहेत. आपल्या मजुरी करणाऱ्या बंधु-भगिनींची बंधने गळून पडलीत का? विवाहित स्त्री आणि वेश्या यातला भेदही कसा पुसला गेला? यांना कोणीच वाली कसा उरला नाही? यासारखे नाना प्रश्न दंश करतात. यांची मीमांसा या ग्रंथातून करावी का? हा प्रश्न गांधीजींनी वाचकांना विचारला आहे. हा प्रश्न वाचकांच्या सद्सद्विवेकबुध्दिवर सोडून दिला आहे.[१] हे सारे भारतीय मजूर गिरमिटे बनले.

नाताळ येथे गिरमिटे गेले आहेत. ही वार्ता पंख लेऊन मॉरिशसमध्ये पसरली होती. तिथल्या हिंदजनांना ही सुवर्णसंधी वाटली होती. या घटनेमुळे हिंदी व्यापारी नाताळकडे जायला लालचावलेले होते. नाताळ आणि हिंदुस्तानच्या मध्यावर आहे. मॉरिशस. इथल्या टापूत हजारो हिंदजन वसतात. त्यात मजूर आणि व्यापारी होते. त्यांच्यातील एक व्यापारी होते अबु बकर आमद. त्यांनी नाताळ येथे आपली पेढी काढायचे ठरवले. त्या समयी नाताळच्या इंग्रजांनाही भारतीय व्यापाऱ्यांच्या कुवतीचा अंदाज नव्हता, त्याविषयी फार दरकारही नव्हती. या गिरमिट्यांच्या मदतीने त्यांनी शेतीत अपार उत्पन्न काढले होते. जंगलात मंगल उभारले होते. त्यांचे गगनचुंबी बंगले उभे राहिले होते. अबू बकर आमद मोठा हुशार माणूस होता. त्याने एका इंग्रजाशीच दोस्ती केली. मोठा व्यापार केला. शेती घेतली. ही खबर त्यांच्या देशात पोहोचली. पोरबंदर आणि आसपासच्या गावात पोहोचली. यामुळे इतर मेमण नाताळला पोहोचले. त्यांच्या पाठोपाठ सुरतेचे बोहरीही निघाले. त्यांना मुनीम हवे होते. यासाठी काठियावाडहून हिंदू जन निघालेत. अशा प्रकारे नाताळमध्ये हिंदजनांचे एक संमेलन भरले. हिंदजनांचे दोन वर्ग झालेत. एक स्वतंत्रपणे व्यापार करणारे व्यापारी आणि त्यांची मुनीम मंडळी. दुसरा वर्ग गिरमिट्या मजूरांचा. काळ पुढे सरकत होता. गिरमिटे लेकुरवाळे झालेत. प्रजा वाढत राहिली होती.

हे गिरमिटे पाच वर्षांचा करार करुन गेले होते. पाच वर्षांचा काळ लोटल्यावर ते काही मजुरी करायला बांधील नव्हते. ते तिथेच राहिले. काहींनी नोकरी केली. छोटा-मोठा व्यापार केला. थोडीशी शेती केली. हा त्यांना हक्क होता. काही हिंदुस्तानात परतलेत. जे तिथे थांबलेत त्यांना मग 'फ्री इंडियन्स' म्हटले गेले. यांना 'मुक्त हिंदजन' किंवा 'गिरमिटमुक्त हिंदुस्तानी' म्हणता येईल. स्वतंत्र हिंदजनांना असलेले अधिकार या गिरमिटमुक्त हिंदजनांना नव्हते. त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाता येत नसायचे. स्थलांतराचा परवाना लागायचा. त्यांचे विवाह कायदेशीर नव्हते. कायदेशीर सिध्द करायचे असेल तर त्या विवाहाचीनोंद करवून घ्यायला लागायची. गिरमिट्यांचे रक्षण करणारे अंमलदार होते. त्यांच्यासमोर जाऊन ही नोंद करावी लागत असे. याशिवाय अन्यही काही कडक नियम त्यांच्यावर लादण्यात आले होते.

ट्रान्सवाल आणि फ्री स्टेट येथे १८८० - १८९० या दशकात बोअर लोकांची प्रजासत्ताक राज्यव्यवस्था होती. प्रजासत्ताक म्हणजे गौरसत्ताक होय. त्याशी हब्शी प्रजाजनांना काही देणे-घेणे नव्हते. हब्शी लोकांना हिंदी व्यापारी प्रिय होते. गोरे व्यापारी रागावत असत. त्यांची भाषा उग्र असे. खरेदीसाठी कुणी उभे राहिले तर गिऱ्हाईकाला नेमकी वस्तु मिळेलच याची खात्री नव्हती. वस्तु मोजताना तर नेहमीच घोटाळे होत असत. हे सारे सहन करावे लागायचे. शिवीगाळ ऐकावी लागे. कधी कधी तर बुक्केही खावे लागत. लत्ताप्रहार झेलावा लागायचा. अर्थात् सारेच व्यापारी काही असे नव्हते. अधिकांश मात्र याला अपवाद नव्हते. याच्या अगदी उलट आपले हिंदी व्यापारी वागत. हिंदी व्यापारीही फसवत, नाही असे नाही पण त्यांच्यापाशी गोड वाणीचे अमृत होते. ट्रान्सवाल आणि फ्री स्टेट हे दोन भाग होते. येथे बोअर लोकांसोबत मिळूनही व्यापार करता येऊ शकतो. हे हिंदी व्यापारी जनांना कळून चुकले होते. यामुळे काहींनी या भागाकडे प्रस्थान ठेवले. केप कॉलनीतही हिंदी व्यापारी पोहोचले. व्यापार-उदीम करु लागले. चारी संस्थानांमध्ये व्यापारानिमित्त हिंदजनांचा मुक्त वावर सुरु झाला.

नाताळच्या गोऱ्या मालकाना हवे होते केवळ गुलाम. करार संपल्यावर स्वतंत्र होणारे त्यांना नको होते. करारानंतर त्यांच्याशी स्पर्धा वा बरोबरी करणारे तर मुळीच नको होते. करारमुक्त झाल्यावर गिरमिटे लहान-मोठा धंदा घेऊन बसले. यामुळे एकंदरीतच नाताळला फायदा झाला. शेतकऱ्यांचे एकूणच दुर्लक्ष होते. यामुळे त्यांना भाजीपाला काही मिळत नव्हता. तो आता मुबलक प्रमाणात मिळू लागला होता. भाजीपाला स्वस्तही झाला होता. ही बाब गोऱ्यांना भावली नाही. त्यांना आपल्या एकाधिकारशाहीवर हे आक्रमण वाटले. स्पर्धेची रीत वाटली.

संदर्भ

१) दक्षिण आफ्रिकाना सत्याग्रहनो इतिहासः (गुजराती) श्री मो. क. गांधी पृष्ठ २३ / २४.

❖❖❖

## ५) गिरमिटे गुलाम की शत्रु?

गरीबड्या गिरमिट्यांच्या विरुध्द चळवळ सुरु झाली. एकीकडे नव्या गिरमिट्यांना मुक्त प्रवेश होता. दुसरीकडे गिरमिटमुक्त हिंदजनांची कोंडी होती. असा दुहेरी पेच उभा राहिला. हिंदी जन हुशार, प्रामाणिक व परिश्रमी होते. ते अडकित्त्यातील सुपारीसारखे अडचणीत आले. गिरमिट्यांना विरोध करणे आता सुरु झाले होते. विरोधाने नवी-नवी रुपे धारण केली होती. एक मागणी भयंकर होती. गिरमिट्या हिंदजनांना त्वरित हिंदुस्तानात परत पाठवून द्यायला हवे. यासाठी जुना करार बदलणे आवश्यक होते. नवा करार करायला हवा होता. गिरमिटचा अवधी संपल्यावर एक तर हिंदजनांनी परत हिंदुस्तानात जावे वा पुनश्च नव्याने करार करुन गिरमिटे बनावे. हिंदजनांनी कधीच गिरमिटमुक्त बनू नये. गिरमिटे हिंदजन पुनरपि करार करायला तयारच नसतील तर त्यांच्यावर दरडोई प्रचंड वार्षिक कर लादावा. असाही एक विचार पुढे आला. कुठल्याही प्रकारे हिंदजनांना गिरमिटमुक्त होता येणार नव्हते. यावर प्रचंड 'हो ना' झाली. अखेर नाताळ सरकारने या प्रश्नावर कमिशन नेमले. गिरमिट्यांचे दक्षिण आफ्रिकेत रहाणे तिथल्या लोकाना आर्थिक दृष्ट्या लाभदायक ठरत होते. कमिशनचा निर्णय विरोधकांना समाधानकारक ठरणारा नव्हता. अग्नी विझून गेल्यावरही आपल्या दाहक खूणा सोडून जातो, तसा या चळवळींचा जळता प्रभाव नाताळ सरकारवर पडलाच. नाताळ सरकार मुख्यत्वेकरून धनिक वर्गाचे समर्थन करणारे सरकार होते. कुठल्या सरकारला धनिकांचा असंतोष परवडणार असतो? हिंदी सरकारशी पत्रव्यवहार सुरु झाला. गिरमिटे कायम गुलामगिरीतच खितपत पडून रहातील असा करार हिंद सरकारने कसा काय मान्य करावा? खरे तर हिंदजनांना इतक्या लांबवर करार करुन पाठवायचे काय कारण होते? त्यांनी गिरमिट मुक्त झाल्यावर स्वतंत्रपणे आपली शक्ती वाढवावी हेच ना? त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी हेच ना? त्यांच्या परिश्रमी जीवनाला एक आकार लाभावा हेच ना? पण याचा विचार करायला कुणी तयार नव्हते.

नाताळमध्ये स्वराज्याधिकार संपादित करुन घेण्यासाठी चळवळ सुरु झाली. १८९३-१८९४ साली ही सत्ता प्राप्त झाली. बरोबर याच वर्षी गांधींनी वर्षभरासाठी दक्षिण आफ्रिका गाठले होते. कस्तुरच्या दीर्घकालीन वास्तव्याच्या शंखनादाचा हा काळ होता. चळवळीला जोर आला होता. आता कॉलनीयल ऑफिस होते. नाताळच्या मागण्या स्वीकार करण्यात अधिक अडचण येणार नव्हती. नवे सरकार होते. आता त्यांचे नवे राजदूत आले होते. ते आता हिंदुस्तानशी चर्चा-मसलत करायला पोहोचले. त्यांची मागणी कर्कश होती. गिरमिटमुक्त प्रत्येक हिंदुस्तानीवर दरडोई पंचवीस पौंड कर लादण्यात आला. ही रक्कम किमान तीनशे पंच्याहत्तर रुपये होती. याचा अर्थ स्पष्ट होता. कुठलाही गिरमिटमुक्त हिंदजन हा कर भरु शकणार नाही. तो स्वतंत्रपणे नाताळात राहू शकणार नाही. एक तर तो मायदेशी परत येईल किंवा मग नव्याने करार करुन घेऊन गुलामी पत्करील. तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड एल्गिन यांना हा कर अन्याय्य वाटला होता. त्यांनी तो दरडोई तीन पौंड करायचे ठरवले होते. या तीन पौंडांचा अर्थ समजून घ्यावा लागेल. तीन पौंड ही गिरमिट्या हिंदजनाची सहा महिन्यांची कमाई होती. हा कर काही केवळ गिरमिट्या मजूरावरच नव्हता. त्याच्या बायकोवर होता. तेरा वर्ष वा त्याहून अधिक वयाच्या मुलीवर होता. सोळा वर्ष वा त्याहून अधिक वयाच्या मुलावर होता. बायको आणि किमान दोन लेकरे नसलेला मजूर शोधूनही सापडणार नव्हता. याचा अर्थ कर किमान तिप्पट होता. या कराच्या ओझ्याखाली पिचून जाणाऱ्या मजूरांची काय दु:स्थिती वर्णावी? नाताळ सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात हिंदजनांनी प्रखर संघर्ष केला. थोरल्या सरकारला अर्ज विनंत्या केल्या गेल्या. याचा परिणाम एवढाच झाला की पंचवीस पौंडांच्या ऐवजी कर तीन पौंडांवर आला. गिरमिटे या विरुध्द काहीही करु शकत नव्हते? व्यापारी काही करु बघत होते पण त्यांचे संघटन नव्हते.

ट्रान्सवाल आणि इतर संस्थानांमध्ये हिंदजन होते. त्यांना नाना प्रकारे विविध अडचणी सोसाव्या लागत होत्या. १८८३ साली गांधी दक्षिण आफ्रिकेत प्रविष्ट झाले.

१८८० सालापासूनच तिथे हिंदजनांविषयी नापसंती सुरु झाली होती. केप कॉलनी याला अपवाद मानता येईल. ट्रान्सवाल तर प्रजासत्ताक राज्य होते. तिथले प्रेसिडेंट हिंदी जनाना ब्रिटिश रयत कसे मानतील? हिंदजनाना जर काही तक्रार करायची असेल तर ती ब्रिटिश राजदूतापाशी नोंदवावी लागायची. कधी काळी हे राजदूत मदतरुप ठरत होते. ट्रान्सवाल ब्रिटिश अधिसत्तेखाली आले आणि या राजदूतांनी मौन पाळले. मदत समूळ नाकारली.

१८८१ साली हिंदजन प्रथम ट्रान्सवालमध्ये दाखल झाले. इंग्रज व्यापाऱ्यांनी याविरुध्द सरकार दरबारी अर्ज केले. "हिंदजनांना कायदे मंडळातून घालवून द्या. त्यांचा व्यापार थांबवा. हिंदी व्यापारी मानवी संस्कृती जाणतच नाहीत. ते बदफैली माणसाला असणाऱ्या व्याधींनी सडत आहेत. प्रत्येक स्त्रीला ते केवळ भोगवस्तु मानतात. सावज समजतात. स्त्रियांना आत्माशून्य मानतात." अशी अनेक असत्य विधाने या अर्जात दडलेली होती. अशी नतद्रष्ट उदाहरणे अनेक देता येतील. जशी प्रजा तसे प्रतिनिधी. व्यापाऱ्यांच्या विरोधात अभद्र आणि अमंगल चळवळ सुरु होती. त्या बिचाऱ्या व्यापाऱ्यांना याविषयी काहीही पत्ता नव्हता. कायदेमंडळाने एक बिल मंजूर केले. ही बातमी अग्रेसर हिंदजनांच्या कानावर आली. ते हैराण झाले. त्यांनी प्रेसिडेंट क्रुगरचे घर गाठले. त्यांना घरात प्रवेशदेखिल मिळाला नाही. अंगणातच उभे राखले गेले. त्यांचे थोडे-फार ऐकून घेतले गेले. हिंदजनांना खडे बोल सुनावले गेले " तुम्ही गुलामांची औलाद आहात. तुम्ही मागत असलेले अधिकार तर तुम्हाला मिळू शकणार नाहीतच. आम्ही जी काही भीक देतोहोत यावरच तुम्हाला समाधान मानून जगावे लागेल. कळले काय?"

१८८५ साल आले. कायदे मंडळाने अतिशय क्रुर कायदा मंजूर केला. कायदा हिंदजनांपासून पंचवीस पौंडांचा कर मागणारा होता. त्याला एक तसूभरही जमीन विकत घेण्याचा अधिकार उरला नव्हता. तो मताधिकाराची भाषा तर बोलूच शकणार नव्हता. यातून बचाव कोणी करावा? या कायद्याच्या संदर्भात हिंदजनांनी ब्रिटिश राजदूतांची मदत मागितली. १८८६ साली यात सुधारणा झाली. पंचवीस पौडांऐवजी कर तीन पौंडांवर येऊन थांबला होता. ट्रान्सवाल सरकारने निर्दिष्ट केलेल्या मुलुखात हिंदजन जमीन घेऊ शकणार होते. हे मुलूख गैरसोईचे आणि अडचणीचे होते. यामुळे अनायासेच हिंदजन पंचम जातीचे सिध्द झाले. हे मुलूख म्हणजे आपल्या देशातील गावकुसाबाहेरचे भाग म्हणता येतील. हिंदजनांनी आपला व्यापार-उदीम सुध्दा याच विवक्षित वाड्या-वस्त्यांमधून करावा. एका अर्थाने हे बहिष्कृतीचेच जीवन होते. या बदलासाठी काही प्रयत्न झालेत, नाही असे नाही. एकूण परिस्थिती मात्र दुःखद आणि अनिश्चित होती. बोअर युध्द सुरु होईपर्यंत ट्रान्सवालमध्ये एकूणच अशी परिस्थिती होती.

फ्री स्टेट मध्ये दहा-पंधरा दुकाने उघडली, तोच गोऱ्यांनी जबरदस्त चळवळ उभारली होती. एक कडक कायदा पास करण्यात आला होता. हिंदजन फ्री स्टेटमध्ये व्यापार करु शकत नव्हते. शेती करु शकत नव्हते. मतदार होण्याचा तर प्रश्नच नव्हता. विशेष परवानगी मिळाली तर मजूर होता येत असे. ते हॉटेलात वेटर म्हणूनही काम करु शकत होते. बरे, अशी परवानगीही प्रत्येक अर्जदाराला मिळत होतीच असे नव्हे.

केप कॉलनीत थोडी फार चळवळ होती. शाळेत हिंदी बालकांना प्रवेश नव्हता. हॉटेलसारख्या सार्वजनिक ठिकाणी आश्रय मिळणे दुरापास्तच होते. हिंदजनांची अवगणना तर होती. शेती वा व्यापाराला फारसा प्रतिरोध नव्हता. अशी परिस्थिती बराच काळपर्यंत होती हे खरे आहे. याचे एक कारण असे की इथे फार मोठ्या प्रमाणावर मलायी लोकांची वस्ती होती. मलायी मुस्लिम जन असल्यामुळे हिंदू व मुस्लिमांशी त्यांचे ऐक्य लगेचच साधले गेले. याशिवाय हिंदू-मुस्लिमांपैकी अनेकानी मलायी स्त्रियांशी विवाह केले. मलायींच्या विरोधात एखादा कायदा करणे केप कॉलनी प्रशासनाला कसे काय शक्य होते? त्यांची तर जन्मभूमीच केप कॉलनी होती. इथे रंगद्वेषाची विषवल्ली क्षीण होती. हे जुने संस्थान होते. इथे शिक्षण केंद्र प्रबळ होते. इथे तुलनेने अधिक उदारमतवादी, प्रौढ आणि विनयी गौरवर्णिय रहात असत.

❖❖❖

## ६) नकोसा पाहुणा

गांधी दक्षिण आफ्रिकेत आले. कस्तुर हिंदुस्तानात होती. तिने मनात स्वप्नांची आरास सजवून ठेवली होती. इकडे गांधींच्या स्वप्नांची राखरांगोळी होत होती. गांधी दादा अब्दुल्ला यांच्या सोबत कोर्ट बघायला गेलेत. गांधींच्या डोक्यावर पगडी होती. मॅजिस्ट्रेटने ती काढायला सांगितली. गांधींनी मानले नाही. पहिल्या आठवड्यातच 'नाताळ एडव्हर्टायझर' या वृत्तपत्रात बातमी झळकली. 'अनवांटेड व्हिजिटर' म्हणजे 'नकोसा पाहुणा'. गांधींनी या संदर्भात आपली भूमिका मांडली. एक पत्र लिहिले. ते पत्र वृत्तपत्रात प्रकाशनार्थ पाठवले. पत्र छापून आले. पुढे त्यांनी पत्र लेखनाचा भरपूर उपयोग करुन घेतला.

पीटरमोरित्सबर्गच्या स्टेशनावरचा प्रसंग गांधी आयुष्यातील अद्भुत प्रसंग आहे. प्रथम श्रेणीचे तिकिट असतानाही त्यांना रंगद्वेषाचा विषारी अनुभव आला होता. त्यांना सामानासकट प्लॅटफॉर्मवर फेकून देण्यात आले होते. आधी वाटले 'चलू या आपल्या देशात. का झेलायचा अपमान?' ही शारीरिक प्रतिक्रिया होती. गांधी बॅरिस्टर होते तरी 'कुली बॅरिस्टर' होते. 'याला कोर्टात खेचीन. जाब विचारीन.' असे बुध्दी बोलली मग मन बोलले. ते अधिक संवेदनशील आणि विवेकी होत, संयमी होते. 'हा रंगद्वेषाचा परिणाम आहे. तुझे अगणित बंधू-भगिनी हा जळता शाप झेलताहेत. उठ, सज्ज हो, लढ या अन्यायाच्या विरोधात !' गांधींच्या प्रतिक्रियेला असे तीन पदर होते. गांधी ठाम बनले.

सक्रिय अहिंसेचा शुभारंभ झाला होता. गांधींचा नवा जन्म झाला. दुबळ्या देहाचे गांधी बुलंद बनले, निर्भय बनले. नकार देणारे बनले. व्यवस्था बदलाचा आग्रह धरणारे बनले, वज्रकठोर बनले. गांधी आता आग्रही बनून पुढे आले होते. सत्याग्रही गांधी हळूहळू आकाराला येत होते. ते दीन-दुबळ्यांसाठी काम करु इच्छित होते. त्याची सुरुवात होत होती.

इकडे त्यांच्या नजरेपुढे आपले घर होते. वाट बघणारी कस्तुर होती. दोन छावे होते. घरची खडतर आर्थिक परिस्थिती होती. कर्जबाजारी जीवन होते. अनिश्चततेचा डोंगर उभा होता. एका अर्थाने त्या नकारघंटांना नाकारण्यासाठी त्यांनी ही विदेशाकडची वाट धरली होती. काही कमाई करावी. घरच्यांच्या मुखावर आनंद विलसित करावा. मानाने जगावे. वैयक्तिक जीवनातील दुख:द्वंद्वे संपवावीत असे जीवनस्वप्न होते. आता संकोच संपला होता. हिंमत जागली होती. अनिर्णय व अनिश्चितता संपत होती. द्दढ निश्चय व कर्तव्यबुध्दी जागत होती. डळमळीत मनोवस्थेऐवजी ठाम आत्मविश्वास उभा ठाकला होता. स्पष्ट अभिव्यक्तिचे बळ संचारले होते.

गांधींनी दक्षिण आफ्रिकेत अपरंपार अपमान झेलला होता. तक्रार केली नव्हती. आपला मार्ग बदलून घेतला होता. सत्याच्या या शोधकर्त्याने जीवनाला समग्रतेने बघितले होते. व्यष्टी आणि समष्टित समन्वय साधायचा प्रयत्न केला होता. क्षमावृत्ती अंगी बाणवली होती. यापाठीमागे किशोरवयात वडिलांनी शिकवलेला शिस्तीचा धडा होता. यौवनकाळात कस्तुरने घालून दिलेला क्षमेचा पाठ होता. गांधींच्या क्षमावृत्तीच्या पायथ्याशी अशा प्रकारे करमचंद आणि कस्तुर होते. पिता आणि पत्नी होते.

दादा अब्दुल्लांच्या केसच्या निमित्ताने गांधी तिथे गेले होते. ते प्रतिपक्षी तैयब हाजी खान महमद शेठ यांना भेटले. दादा व ते दोघे चुलत भाऊ होते. दक्षिण आफ्रिकेतला सर्वात मोठा खटला होता हा ! दोघे भाऊ लढत होते. या लढ्यासाठी गांधी मदतनीस म्हणून गेले होते. त्यांनी तैयब शेठांची भेट घेतली. समजूत घातली. 'पैश्यांचा व्यय थांबवा' अशी विनंती केली. या केसमध्ये कालापव्ययही होत होता. गांधींनी लवाद नेमायचा आग्रह धरला. तैयब शेठजींनी गांधींचे म्हणणे मान्य केले. आता दोघे लवादानुसार काम करणार होते. तंटा शमला होता. संवाद सुरु झाला होता. गांधींचे कर्तव्य तर दोघांमध्ये समेट घडवून आणण्याचे होते. मैत्र जोडून देण्याचे होते. उभयता नातलग होते. गांधींनी त्यांचा खंडित संबंध सांधून दिला. तडजोडीसाठी जीवापाड मेहनत घेतली. तैयब शेठ वळले. पंच नेमले गेले. त्यांच्या पुढे खटला चालला. दादा अब्दुल्ला केस जिंकले. एवढ्याने काही गांधींचे समाधान झाले नाही. पंचांच्या

ठरावाची अमलबजावणी झाली. तैयब शेठ इतके पैसे एकदम देऊच शकत नव्हते. सदतीस हजार पौंडांची रक्कम होती ती ! केसचा खर्च वेगळा. हे सारे एकदम देणे तर केवळ अशक्य होते. त्यांना एक दमडी द्यायची नव्हती. आपले दिवाळे झाल्याचे घोषितही करायचे नव्हते. दिवाळे झाले असे घोषित करणे सोईचे होते. हा या देण्यातून सुटका करुन घेता येण्याचा एक उपाय होता. होता तो चुकीचा उपाय पण काही गत्यंतर नव्हते. दिवाळे काढण्याऐवजी मरण पत्करले तरी बेहत्तर असा मेमण परिवारात एक घरगुती अलिखित कायदा होता. अशा परिस्थितीत नेमके काय करावे? काय व्हावे? गांधींना पेच पडला होता. यातून वाचायचा एक मार्ग होता. दादा अब्दुल्लांनी तैयब शेठना पुरेशी मुदत दिली पाहिजे. गांधींचा प्रभाव असा की दादा अब्दुल्लांनी हे मान्य केले. त्यांनी उदारता दर्शवली. भरपूर मुदत दिली. वसूलीसाठी लांब मुदतीचे हप्ते ठरवून देण्याचे काम अधिक मेहनतीचे होते. जिकीरीचे होते. गांधींची शिष्टाई संमत झाली. दादांनी तेही मान्य केले. दोन्ही पक्ष आनंदित झाले. दोघांची प्रतिष्ठाही वाढली. गांधींच्या समाधानाला सीमा उरली नाही. गांधी म्हणतात "मी खरी वकिली शिकलो. मनुष्याची चांगली बाजू शोधून काढायला शिकलो. मनुष्याच्या हृदयात प्रवेश करण्याची कला साधली. मी ठरवले की वकिलांचे कर्तव्य पक्षकारांमध्ये पडलेली फूट भरुन काढण्याचे आहे. हा पाठ माझ्या मनात इतका दृढमूल झाला की माझ्या वीस वर्षातील वकिलीचा बराचसा वेळ स्वतःच्या ऑफिसात बसून शेकडो दाव्यांच्या तडजोडी करविण्यातच गेला. त्यापासून माझे काही नुकसान झाले नाही. द्रव्याचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही, आत्म्याचे नुकसान तर नाहीच झाले."[१]

गांधी कमाई करायला गेले होते. त्यांना आपल्या घरादाराला सुखी, समृध्द जीवनाची वाट दाखवायची होती. हिंदुस्तानात आलेल्या पराभव आणि अपयशाच्या अनुभवांवर मात करायची होती. यशस्वीपणा मिरवायचा होता. त्यांनी ठरवले असते तर हा खटला दीर्घकाळपर्यंत सहज चालवता आला असता. खूप पैसे घरी पाठवता आले असते. हिंदुस्तानात परतून दुसऱ्या कुठल्याही प्रकारचे काम वाट बघत नव्हते. पैसा साठवून ठेवलेला नव्हता. निर्वाहाचे साधन नव्हते. गांधींनी शेठ तैयबचा विचार केला. लवाद नेमला. यात भरपूर सव्यापसव्य करावे लागले. स्वतःच्या निर्वाहाचा विचार गांधींनी केला नाही. ते दादा अब्दुल्लाकडे काम करत होते. त्यांच्या हिताहूनही त्यांनी तैयब शेठजींचा अधिक विचार केला. त्यांच्या सुरक्षित रहाण्याची काळजी केली. तैयब शेठजींना नादारी आणि नामुश्की या दोन दोषांपासून वाचवले. यासाठी जीवाचे रान केले. तैयब शेठजींची शोकाकूल नजर बदलून गेली. तिथे हास्य फुलले. दादा अब्दुल्लांचे समाधान वाढले. दोघांच्या नजरेत गांधींविषयी हितकर्त्याचा भाव जागला. गांधी अशी उत्कर्षाची वाट चालत होते. बॅरिस्टर गांधी आता दक्षिण आफ्रिकेतल्या हिंदजनांचे 'गांधीभाई' बनले होते.

गांधींना दक्षिण आफ्रिकेत जाऊन वर्ष सरत आले होते. निसर्गचक्र आपल्या गतीने सुरु होते. कस्तुर नवऱ्याच्या परतीची वाट बघत होती. पत्रातून कळले की नवऱ्याचे आगमन थांबले आहे. किमान महिनाभर तरी ते परतणार नव्हते. कस्तुरच्या वियोगाचा काळ वाढत होता. कस्तुरने स्वतःला सावरले. एकाकीपणा होता. सूनेपण होते. आता तिने ते कवच बनवून घेतले होते. या कवचाच्या सामर्थ्याने ती तेजाळून उठली होती. कच्या-बच्च्यांना छातीशी कवटाळले होते. नियतीच्या आव्हानाला आनंदाने झेलले होते. तिला लेकरांनाही जपायचे होते. स्वतःला तर सांभाळायचे होतेच.

गांधी सेवारत होते. दुःखिताना मदत करत होते. वंचिताना दिलासा देत होते. त्यांचा मोठा सन्मान होत होता. तिचे वैष्णव मन सुखावले. तिच्या प्रपंचाची काय कथा होती? "एकत्र या, नांदा, सुख-दुःखे वाटून घ्या. विरह-वियोगाचा सामना करा. भेटा, विलग व्हा. विलग होण्यासाठी जणू भेटा. भेटल्यावर अटळपणे विलग व्हा." मुलांना काय वाटेल? ही चिंता तिचे काळीज कुरतडायची. आपला बाप आपल्या सोबत का रहात नाही? येतो, काही काळ आपल्या समवेत रहातो. खेळतो. लागलीच पाठ वळवतो. असे का होते? आपल्या मित्रांचे वडिल तर असे नाही वागत. आपल्या लेकराना असे वाटत असेल. कस्तुरला हे सारे जाणवत

होते. तिचा काळ चिंतेत जायचा. एकदा निसटले ते क्षण का परत फिरुन येतील? मुलांचे बालपण का परत फिरुन येईल? समाधान एका गोष्टीचे होते. नवरा अलीकडे घरी अधिक पैसे पाठवू लागला होता. नवरा जबाबदारी जपणारा आहे. घरात मदत करणारा आहे. हा विचार कस्तुरला सुखावून जाणारा होता. ती आत्ममग्न होती. प्रसन्न होती.

गांधींच्या परत येण्याची काही खबर नव्हती. कस्तुर आणि मुलांना तिकडे बोलवायची बातमी नव्हती. घरचे सारे मजेत होते. पैसा मिळत होता. दिवस पंख लेऊन उडून जात होते. दिवसभर घरकाम होते. लेकरांच्या खोड्या होत्या. नवऱ्याच्या आठवणीची मनःस्मरणी सतत सुरु होती. नवरा मनमोकळा आहे. विश्वसनीय आहे. गरजेपेक्षा अधिक मोकळा-ढाकळा आहे. कस्तुरला तिकडच्या वार्ता जावांकडून कळायच्या. आता त्याने म्हणे मोठे घर घेतले आहेत. तिला कळत होते.

वर्ष लोटत होते. कस्तुर रोज नवऱ्याची वाट बघायची. सणवार यायचे. परंपरेने सारे काही साजरे करावे लागायचे. घरात गोडधोड व्हायचे. नवऱ्याच्या आवडीची पुरणपोळी व्हायची. पुरणपोळी मग कितीतरी वेळ तिच्या पानात रुसून पडून रहायची. इकडे नवऱ्याच्या मनात धर्मचिंतन जारी होते. घुसळण सुरु होती. कस्तुरपुढे हा काही प्रश्न नव्हता. एकच धर्म. वैष्णव धर्म. विष्णु धर्म. व्यापक धर्म. विविध पूजा-उपासनांचा धर्म. उपास-तापासांचा धर्म. एकच विचार. कृष्ण भक्तिचा विचार. देव बालक रुपात वसतो. 'बालकृष्ण नमो नमो । गोपालकृष्ण नमो नमो.' बालक रुपातला देव. बालकापुढे काही मागायचे नसते. बालकापुढे रडायचे नसते. नवरा धर्म जिज्ञासेच्या वेगवेगळ्या प्रवाहात पोहत होता. कस्तुरसाठी पातिव्रत्य धर्म होता. या धर्माचा आधार होता समर्पण बुध्दी. या धर्ममंथनातून लोणी निघाले होते सेवा धर्माचे. तिच्यासाठी हा धर्माचा सारांश होता. सत्याचा सारांश होता. जगण्याचा सारांश होता.

हिंदुस्तानच्या सागरकाठी गुजरात आहे. त्यात वसले आहेत. राजकोट आणि पोरबंदर. गांधी आणि कस्तुरची कहाणी तिथून सुरु होते. समुद्र ओलांडते. दक्षिण आफ्रिका गाठते. विश्वाला नवी जीवनरीत शिकवते. एकोणिसाव्या शतकाच्या सातव्या दशकात दोघे जन्माला आले. विसाव्या शतकाचा मध्य गाठला. दोघांच्या आयुष्यात संघर्ष आला. कस्तुर गांधींच्या आयुष्यात सामावून गेली. गांधी आणि कस्तुर दंपती. ते समर्पित जीवन जगले. उभयतानी एकमेकांना उत्क्रांत केले. ही एका उन्नत जीवन साधनेची कहाणी आहे.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १३४ .

❖❖❖

## ७) वाट बघून डोळे शिणले

दक्षिण आफ्रिकेतील काम तर सुरुच होते पण गांधींनी भारतात परतायचे ठरवले. ते सहा महिने थांबणार होते. पत्नी व मुलांना आपल्यासोबत नेणार होते. कस्तुरच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. परिवारासोबत रहायचा विचार गांधींच्या मनात प्रथमच आला होता. तिच्या प्रतिक्रियेला दोन टोके होती. एक पहाटेच्या प्रसन्नतेचे. दुसरे मळभभरल्या सायंकालीन उदासीनतेचे. प्रसन्नता अशासाठी की गृहस्थ धर्म सार्थकी लागणार होता. उदासीनता अशासाठी की हे किती काळ टिकून राहणार आहे.? लेकरांना पित्याचे सान्निध्य लाभेल. हा खूपच सुखावणारा भाग होता. मुलांच्या प्रतिक्रियांचा ती अंदाज बांधत राहिली.

गांधी एक वर्षानंतर परत येणार होते. त्यांना थांबायला लागले. या घटनेचा घरावर काय परिणाम झाला असेल? खरे तर हा अनुमानाचा विषय आहे. वाट बघणाऱ्यांमध्ये कोण-कोण होते? थोरले भाऊ लक्ष्मीदास होते. ते काहीसे निराश झाले असतील पण लगेच सावरलेही असतील. भाऊ तिथे स्थिरावला तर आर्थिक मदतीचा झरा वहाता राहील. कस्तुर उपेक्षित होती. तिने तर मुदत पूर्ण होण्यापूर्वीपासूनच वाट बघायला सुरुवात केली होती. न जाणो तब्येतीचे नेमके कायच झाले असेल? लेकरे का यांना आठवतील? आपल्या सोबत का परत रुसणे-मनवणे सुरु राहील? तिला ही बातमी कशी कळली? पत्र तर मोठ्या दिरांना यायचे. हा निरोप मग जाऊ बाई नंदकुंवर कळवायच्या. चाळणी लागून कसातरी तो कस्तुरपर्यंत पोहोचायचा. आधी बातमी कळली की यायला महिनाभर उशीर होईल. ही बातमी पोहोचायलाही महिना लोटला होता. परत बातमी आली की परतायला अजून उशीर होईल. विरहिणी कस्तुरला याचा सल खूप जाणवला असेल. तिचा मनाशी संवाद चालला असेल. असा हा काय पण स्वभाव बाई या माणसाचा? कुणी आग्रह केला म्हणजे का आपण लागलीच असे थांबून जायचे? पण याचे नेमके कारण काय असावे? मामंजीना कसा पोरबंदर आणि राजकोटमध्ये मान-सन्मान होता. राजे लोक कसे त्यांना थांबवून ठेवत. खुद्द आपल्या लग्नात नाही का राजेसाहेबांनी त्यांना थांबवून घेतले होते? क्षणभर कस्तुरचे मन भूतकाळात रमून गेले. यांना थांबवणे म्हणजे पैश्यांची कोणी तरी सोय केली असेल ना? विलायतेहून परतले होते तेव्हा केवढे काळजीत होते. मुंबईला गेले. त्यावेळी खर्चाचा सारा भार तर थोरल्या दिरांच्याच खांद्यावर होता. आता काय मिळाले आहे.? मुख्य म्हणजे मान-सन्मान मिळाला आहे. यांच्या मान-सन्मानात माझाही वाटा नाही का? नाहीतरी विदेशात गेलेले लोक का लवकर मायदेशी परत येतात? मला विरह वाटतो तसा त्यांनाही तर वाटत असेलच ना? मी का यांना ओळखत नाही? बाहेरुन वाटतात फणसासारखे. आतून मात्र गोड आणि स्निग्ध. तसे तर ते एकटेच म्हणवले जातील ना? मला तरी इथे दोन-दोन लेकरांची साथ आहे.

हा वियोग खूप काळ सहावा लागणार होता. "आपल्याला का आपले घर मिळणार नाही? लेकरे किती काळ पितृसुखाला आचवतील? किती काळ नवरा मायेच्या छपराशिवाय राहील? किती काळ आपण दोन काठांवरील चक्रवाकांसारखे राहू? चक्रवाकांची भेट तरी होते. कधी होईल पुनरपि आपली भेट? दीर्घकालीन विरहयोग. गेला काळ का भरून काढता येईल?" कस्तुर आपल्या मनाशी बोलत होती. आपण नवऱ्यासोबत राहू. आपले हक्काचे घर असेल. आपल्या वैभवाला आपलीच दृष्ट न लागो. ती देवाला विनवत राहिली होती.

काही दिवस नाहीत. काही महिने नाहीत. चक्क दोन वर्षे अशी गेलीत. उन्हाळा तापवत रहायचा. पावसाळा भिजवून टाकायचा. हिवाळा हुडहुडी भरायला लावायचा. जिव्हाळ्याचा ऋतु मात्र आला नाही. गांधींची पत्रे भावाला यायचीत. बहुतेक पत्रे तर हिशेब-ठिशेब सांगणारी असायचीत. गांधींनी डर्बन येथे वकीलीसाठी कार्यालय थाटले आहे. ते दरमहा थोरल्या भावाला पैसे पाठवतात. आता घरावरले कर्ज उतरत चालले आहे. हे सारे आहे. पण परतीच्या बाबतीत ते काही बोलत नाहीत. बायको-मुलांना तिकडे बोलावण्याविषयी काही लिहित नाहीत. हे तिला कळत होते. तिला नवऱ्याची

काळजी वाटायची. तिचा त्यावर पूर्ण विश्वास होता. देवावर अपरंपार श्रध्दा होती.

गांधींनी एक घर घेतले आहे. असे तिने ऐकले. घर मोठे आहे. डर्बनच्या भल्या लोकांच्या वस्तीतले आहे. घर सजवलेले आहे. तसे ते एकटे त्या घरात रहातात. घरात स्वयंपाकी आहे. काही कारकूनही सोबत असतात. गांधींचे भावनगर मधले घर. लंडनमधले घर. मुंबईतले घर. आता हे डर्बन येथील घर. सारी घरे गांधींचीच. गांधींची एकट्याची. तिला सारखे असे वाटायचे. ती हिंदुस्तानात होती. तिचे घर आफ्रिकेत सजत होते. तिच्या गैरहजेरीत सजत होते. तिला स्वत:ला आपले घर सजवायचे होते. तिच्या काही कल्पना होत्या. तिला या नव्या घराची बातमी कळली. तिचे मन हरखून गेले. नसेना का हिंदुस्तानात पण आफ्रिकेत तरी आपले घर उभे ठाकत आहे. नसेना का आपल्या उपस्थितीत पण आपल्या गैरहजेरीत तरी सजते आहे. ही भावना तिला सुखावून जाणारी होती. कुठली भूमी माहीत नाही. तिथली भाषा अवगत नाही. नवरा आणि दोन मुले. एवढी काय ती सोबत असेल. शेजार कसे असेल? ते का वैष्णव असतील? घरात देवघर असेल का? सायंकाळच्या प्रार्थनेसाठी जागा असेल का? तुळशी वृंदावन? ते तर हवे. सणवार कसे असतील? पाऊस खूप बरसत असेल का तिथे? थंडी कडाक्याची असेल का? मुलांच्या शाळा कशा असतील? घराजवळ असतील का? काही दुखले-खुपले तर डॉक्टर वा वैद्य कुठे असतील? तेच तेच प्रश्न विषारी डंखासारखे तिच्या मनाला डसत राहिलेत. छे, अजून तिला नवऱ्याने बोलावले नव्हते. ती आपल्या मनाचे मनोरे रचत होती. आपले दोघांचे घर केव्हा होईल? त्या घरात चंद्र नांदता असेल. तिथल्या भिंतींना इंद्रधनुष्याचे रंग असतील. छतावर नक्षत्रांचे झगमगते झुंबर टांगलेले असेल. अंगणात गरब्याचा गोफ विणलेला असेल. लाख-लाख दिव्यांनी सजलेले आभाळ असेल. आपल्या मनासारखे असेल ते घर. आपले असे स्वत:चे स्वयंपाकघर तिथे असेल. अंगणात रांगोळी असेल. किमान गोपदे तरी असतील. ते आपले व आपल्या नवऱ्याचे घर असेल. आपले दोघांचे घर असेल. आपल्या मालकीचे घर असेल. कस्तुरच्या मनात डोकावल्यावर असे अब्द-अब्द दिसते.

गांधींना वैयक्तिक सुख-दु:ख आणि लाभ-हानीची काळजी नव्हती. त्यांना समाजाचे जीवन मोलाचे वाटू लागले होते. हे फार मोठे रुपांतरण होते. हे एकांगी नसून समग्र होते. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तीर्ण बनले. कष्टसहन करण्याची शक्ती वाढली. अन्याय-अपमान आणि अत्याचाराचा विरोध करण्याचे सामर्थ्य जागले. आत्मसन्मानाचा अर्थ विस्तारला. तो सामुदायिक आत्मगौरवापर्यंत पोहोचला. वैयक्तिक हितभावना क्षीण झाली. समाजाच्या उत्कर्ष वाटेवर ते चालू लागले. प्रिटोरियात वर्षभरचे वास्तव्य होते. ते समाजाभिमुख बनले. याची दिशा श्रेयोन्मुखी होती. प्रेय बघता-बघता समासात पोहोचले होते. मुख्य मजकूर जनकल्याण होता. व्यष्टिची समष्टिगत धारणा अधिक बळकट बनली. व्यावसायिक संबंधांना आत्मीयतेची सुंदर झालर लाभली. धंद्याचे नाते आंतरिक बनले. कायदेशीर संबंध मधुर बनले. इथले नियोजित कार्य पूर्ण होत आले होते. मनात घरच्या आठवणी होत्या.

गांधींची कराराची मुदत संपत आली होती. सोपवलेले काम त्यांनी पूर्णत्वाला नेले होते. पहिल्या भेटीत दादा अब्दुल्लाना गांधी पांढरा हत्ती पोसणे वाटले होते. आता गांधी भाई उपकारक ठरले होते. करारानुसार एकशे पाच पौंड द्यायचे होते. तेवढेच हातावर टिकवून का गांधी भाईंना निरोप द्यायचा? दादांचे मन यासाठी तयार नव्हते. अखेरच्या क्षणी घसघशीत बक्षीस द्यायची योजना त्यांनी मनोमन आखून ठेवली होती. हा वेगळा वकील होता. पैसे कमवणारा नव्हता. अशिलाचे हितचिंतन करणारा उपकारी वकील होता. १८९३ साल होते ते ! गांधींचे नियोजित काम पूर्ण झाले. आता प्रिटोरियात रहायचे काही कारण उरले नव्हते. ते डर्बनला परतले. मायदेशी परतायची तयारी करु लागले. शेठ अब्दुल्ला त्यांना असे बरे परतू देतील?

त्यांनी सिडनहॅम येथे गांधींना निरोप देण्यासाठी सभा बोलावली. हिंद महासागराच्या काठावर डर्बन शहर आहे. त्याच्या एका बाजूला मुख्य शहरापासून काही अंतरावर सिडनहॅम नावाचे उपनगर आहे. तिथे

दादा अब्दुल्लांचे घरही होते. त्या काळी ते शहरानजिक वसलेले खेडे असेल. दादा अब्दुल्लांनी तिथल्या आपल्या घरात गांधीभाईंचा निरोप समारंभ आयोजित केला होता. कार्यक्रमात भरपूर खाणे-पिणे होते. विविध प्रकारची आमोद-प्रमोदाची साधने होती. डर्बन आणि लगतच्या उपनगरांमधून निमंत्रितांची एकच झुंबड उडाली. तांगे, इक्के, बग्ग्या अशी वेगवेगळी वाहने सिडनहॅमच्या दिशेने धावू लागली होती. काहींनी स्वत:च्या घोड्यांच्या पाठीवर मांड ठोकली होती. खूप लोक जमले होते. मोठे होते. छोटे होते. शेठ होते. नोकर होते. हिंदु होते. मुसलमान होते. पारशी होते. ख्रिस्ती होते. गुजराती होते. मद्रासी होते. सिंधी होते. सारे हिंदजन होते. सारे भेदभाव विसरले. सारी हिंदुस्तानची लेकरे. दाराशी खुद्द दादा अब्दुल्ला अभ्यागतांच्या स्वागतासाठी उभे होते. आगंतुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंदी व्यापारी होते. स्वागतमूर्ती तरुण बॅरिस्टर गांधी होते. त्यांनी वैयक्तिक सुख-लाभाला तिलांजली दिली होती. दादांच्या आर्थिक घसरणीला थोपवले होते. तैयब शेठजींच्या निसटत्या प्रतिष्ठेला थांबवले होते. हे युवक जिथे म्हणून गेले तिथे प्रामाणिकपणे वागले. समोरच्याला उत्सुकतेने जाणून-पारखून घेतले. त्यांची सत्यशोधनाची वृत्ती मनमोहक होती. त्यांना अकृत्रिम विनयी वाणीचे वरदान लाभले होते. मधुर वागणुकीने त्यांनी सर्वांची मते आणि मने जिंकून घेतली होती. परिश्रम आणि प्रामाणिकपणा हे दोन परीस त्यांना सापडले होते. सभेत हिंदुस्तानातील मुस्लिम जनांची संख्या अधिक होती. त्यांच्या मनमोकळ्या हसण्याने सभा दुमदुमत होती. या सभेत एकही महिला मात्र नव्हती. तत्कालीन सभेत असे असणे सहज स्वाभाविक होते. त्यांच्या अनुपस्थितीकडे कुणाचे लक्ष गेले नव्हते. तशा महिला तिथे होत्या. त्या सभेत वा समारंभात मात्र नव्हत्या. त्या स्वयंपाक कक्षात होत्या. तिथल्या मुस्लिम व्यापारी कुटुंबात तर असेच चित्र रुढ होते. काहीसे अपेक्षित होते.

❖❖❖

## ८) हिंदजनांच्या मताधिकारावर कुऱ्हाड

गांधींनी सहज सवयीने त्या दिवसाचे वृत्तपत्र बघितले. एक छोटीशी बातमी वाचली. एरवी तिच्याकडे कुणाचे लक्षही गेले नसते. गांधींच्या नजरेतून मात्र ही बातमी सुटली नाही. बातमीचे शीर्षक होते 'हिंदजनांचा मताधिकार'. गांधी भाईंनी दादा अब्दुल्लांना विचारले 'तुम्ही ही बातमी वाचलीत?' त्यांनी नकार दिला. त्यांनीच काय पण तिथे उपस्थित असलेल्या व्यापाऱ्यांपैकी कुणीही ही बातमी वाचली नव्हती. कुणाचेही लक्ष या बातमीने वेधले नव्हते. त्या काळी काही हिंदजनाना मताधिकार होते. त्यांच्या शिवाय कुणाही नवीन हिंदजनाना मताधिकार मिळणार नाही. या आशयाचा खर्डा नाताळच्या विधानसभेत सादर झाला होता. पहिले वाचन झाले होते. दुसऱ्या वाचनाची तयारी सुरु होती. यामुळे हिंदजनांची गच्छंति होणार होती. यात हिंदजनांच्या आत्माभिमानावर तडाखा बसणार होता. दादा अब्दुल्लांशी गांधींची चर्चा सुरु झाली. हे ऐकून एक जण बोलला की तुम्ही लगेचच निघून जाऊ नका. किमान महिनाभर तरी थांबा. हे सारे आम्हाला समजावून सांगा. तुमच्या आदेशानुसार आम्ही लढू.

'हे खरे आहे. अब्दुल्ला शेठ तुम्ही काहीही करुन गांधीभाईंना थांबवून घ्या.' असे इतर स्वर आले.

'हे बघा, आता त्यांना रोखून धरण्याचा मला काही अधिकार पोहोचत नाही.' चतुर दादा अब्दुल्ला बोललेत.

'काहीही करा. गांधीभाईंना थांबवून घ्या.' गर्दीतल्या स्वरात आग्रह होता.

' खरं सांगू? हा अधिकार जेवढा मला आहे. तेवढाच तुम्हा सर्वांनाही आहे. आपण सारे मिळून त्यांना आग्रह करु या. प्रश्न समजून घेऊ या, पण ते तर बॅरिस्टर आहेत. त्यांच्या फीचे काय?' दादा अब्दुल्लांनी कळीचा प्रश्न विचारला.

"हे बघा, हे समाजसेवेचे काम आहे. यात मुळी फी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जाहीर सेवेची फी हो कसली? मी महिनाभर थांबून जायला तयार आहे. थांबेन मी. या कामात काही खर्च होईल. तारा कराव्या लागतील. काही छपाईचा खर्च होईल. प्रवासानिमित्त गाडी भाडे लागेल. कदाचित स्थानिक वकिलांचा सल्ला घ्यावा लागेल. त्याची फी द्यावी लागेल. कायदेविषयक ग्रंथ लागतील. हा सारा खर्च तुम्हाला करावा लागेल. बरे, हे काम काही माझ्या एकट्याच्या बळावर होणार नाही. याला संघबळ लागेल." गांधीभाई नम्रतेने खुलासेवार बोलले. हे सर्वांनी शांत चित्ताने ऐकून घेतले.

'खुदाची कृपा आहे. पैसे तर जमतीलच. माणसेही आहेत.च. तुम्ही रहायचे मान्य करा म्हणजे झाले.' सभेचे सामुदायिक मत पडले.

सभा संपली. कार्यकारिणी बनली. लढतीची रुपरेषा ठरली. एक महिना थांबायचे ठरले. गांधी थांबले. एक महिन्यासाठी नाही तर पुढच्या कायमच्या निवासाची ही नांदी ठरली. निरोप समारंभाप्रसंगी नव्या अभियांनाची घोषणा झाली. २२ मे १८९४ साली 'नाताळ इंडियन काँग्रेस' ची स्थापना झाली. कार्यवाहक समिती तयार झाली. गांधींनी चळवळीची रुपरेषा मनाशी जुळवली. स्वाभिमानाच्या लढ्याचे बीजारोपण झाले. [१]

निरोप समारंभ २४ जून १८९४ रोजी होता. दुसऱ्याच दिवशी नाताळ विधानसभेच्या सदस्यांकडे हरकत घेणारा सह्यांचा एक अर्ज पोहोचला. २७ जूनला खर्ड्याचे दुसरे वाचन होणार होते. ते थांबवण्यासाठी विधानसभेच्या अध्यक्षांना तारेने कळवले. अर्ज वृत्तपत्रांकडे प्रकाशनार्थ पाठवला गेला. गांधींनी अर्जात रंगभेदावर आघात करण्याऐवजी हिंदजनांच्या योग्यतेचे महिमान गाईले. हिंदजन अशिक्षित खरे पण ते अडाणी नाहीत. त्यांना मतदानाचे मर्म व मोल कळलेले आहे. त्यांना पंचायती राज्यव्यवस्था ठाऊक आहे. हे सारे समजावून सांगितले. पंचायती राज्यव्यवस्था इंग्लंडच्या संसदीय व्यवस्थेचा पाया आहे. हे मर्म त्यांनी कुशलतेने वरिष्ठांच्या निदर्शनाला आणून दिले. गांधींच्या या प्राथमिक लढ्यात युवक वर्ग जोडला गेला. विविध धर्म मतांचे प्रतिनिधी आलेत. दोन घटक फक्त नव्हते. एक तर महिला नव्हत्या. दुसरे गिरमिटे नव्हते. इतिहासाचे हे आश्चर्य आहे. पुढे जाता या घटकाना केंद्रवर्ती मानून गांधींनी लढा चालवला आहे.

गिरमिटे हिंदजन आणि गिरमिटमुक्त हिंदजन. असे दोन वर्ग होते. गिरमिटमुक्तांची स्थिती काही वेगळी नव्हती. जात्यात आणि सुपात एवढाच काय तो फरक

होता. हिंदी व्यापाऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. त्यांनी मोक्याच्या भागात चांगल्या जमिनी विकत घेतल्यात. गिरमिटमुक्त हिंदजनांची संख्या वाढली. आपण कायदेमंडळात सभासद होऊ शकतो हा शोध त्यांना लागला. अनेक नावांची नोंद मतदार यादीत करण्यात आली. नाताळच्या राजद्वारी वसणाऱ्या गौरवर्णियांना हे कसे सहन व्हावे? सरकारने पहिले राक्षसी पाऊल उचलले. नव्या हिंदजनांच्या मतदानाच्या अधिकारावरच कुठाराघात केला. हिंदजन मतदार नसतील तर त्यांचा प्रतिनिधी निवडून येणार नाही.

१८९४ साली याविषयीचे पहिले बिल नाताळच्या कायदेमंडळात आले. याच वर्षी गांधी आपले नियोजित कार्य संपवून मायदेशी परत यायला निघाले होते. बायको व लेकरांच्या भेटीची ओढ मनाला लागली होती. ते जाऊ शकले का? का नाही जाऊ शकले? पुढे केव्हा मायदेशी गेले? कस्तुर त्यांच्यासोबत आली किंवा काय? हे सारे आपण पुढे यथावकाश बघणार आहोत. यातले काहीही घडले नाही, हे मात्र खरे ! गांधींना तिथेच थांबावे लागले. ही कथा पुढे येईल. हे बिल भयंकर होते. याच्या प्रभावाने हिंदजनांच्या मतदानाचा अधिकार समाप्त होणार होता. नाताळमधील रंगभेदाची नव्हे तर रंगद्वेषाची ही पहिली ठिणगी होती. हिंदजनांच्या अधिकारावर वेसण घालणारा पहिला कायदा होता.

सारे हिंदजन एकत्र आले. रात्रीतून बसून अर्ज लिहिला गेला. ताबडतोब चारशे लोकानी सह्या केल्या. हा अर्ज पटलावर जाताच कायदेमंडळ दचकले. कायदा मात्र पास झाला. लॉर्ड रिपन तत्कालीन प्रमुख होते. अर्ज त्यांच्याप्रत पोहोचला. अर्जावर दहा हजार लोकांच्या सह्या होत्या. दहा हजार म्हणजे जवळपास नाताळची एकूण स्वतंत्र वस्ती होय. लॉर्ड रिपन यांनी बिल नामंजूर केले. ब्रिटिश सल्तनत कायद्यात रंगभेदाला थारा देणार नाही असे त्यांनी घोषित केले. हा विजय हिंदजनांच्या ऐक्याचा विजय होता. याचे काय महत्व होते याविषयी पुढे चर्चा करु. याच्या उत्तरादाखल नाताळ सरकारने नवे बिल दाखल केले. यातून रंगभेद हटला खरा पण हिंदजनांवरचे आक्रमण कायमच होते. त्याविरुध्दही हिंदजनांनी कंबर कसली. अपयश पदरी पडले.

नाताळ सरकारला आपल्या आजूबाजूच्या सत्ताधारी खुर्च्यांवर हिंदजन आरुढ झालेले नको होते. यापेक्षाही राग काही वेगळ्याच कारणासाठी होता. त्यांना आता नाताळमध्ये मूळात हिंदजनच नको होते. व्यापारी आणि शेतकरी हिंदजन तर मुळीच नको होते. तत्कालीन तीस कोटी हिंदजन जर नाताळात उतरले तर आपले भविष्य काय असेल? आपल्या अस्तित्वावरच गदा येईल. आपण तर सारे समुद्रात बुडून मरु की काय? या भयाने ते बेचैन होते. नाताळच्या कायदे मंडळाने आता दोन नवे कायदे मंजूर केले होते. यात रंगभेदाची चर्चा तर नव्हती पण रंगभेदाचा गर्भितार्थ मात्र कायम होता. हिंदी जनता याविरुध्द झुंजली. कायदे तर पासच झाले. एक कायदा हिंदजनांच्या नाताळ प्रवेशावर अंकुश लादणारा होता. व्यापारावर टाच आणणारा होता. हिंदजनांना युरोपीय भाषेतच अर्ज करावे लागतील. हा दुसरा कायदा होता. कोट्यवधी हिंदजनांना नाताळची दारे यामुळे आपोआपच बंद झाली. हा कायदा अंमलात येण्यापूर्वी हिंदजन नाताळात होते. नाताळ सोडून जर ते हिंदुस्तानात वा अन्यत्र जाऊन परत नाताळला येत असतील तर त्यांना आपल्या पत्नी व सज्ञान लेकरांसोबत नाताळमध्ये दाखल होता येईल. त्यांना यूरोपीय भाषेची सक्ती असणार नाही. नाताळ संस्थानात हिंदजनांचा अपार आणि अमानुष छळ करण्यात आला. गिरमिटे काय अन् गिरमिटमुक्त काय, स्वतंत्र हिंदजन काय आणि नाताळातून बाहेर पडून परतू इच्छिणारे हिंदजन काय यांना कठोर कायदेशीर बंधने होती. त्या सर्वांची चर्चा करायचे म्हटले तर एक स्वतंत्र महाग्रंथ होईल.

दक्षिण आफ्रिकेतली गांधींची तीन वर्षे वामनाच्या तीन पावलांसाखी होती. पहिल्या वर्षी धर्म जिज्ञासा जागली. विकसली. माणसातल्या सत्पक्षाचे स्वागत झाले. समोरच्या व्यक्तिच्या अंत:करणात त्यांनी प्रवेश केला. दोन पक्षांमधला संघर्ष संपवून ते समन्वय करता शिकले. ते परिपूर्ण माहिती मिळवत. अशिलाची सत्य बाजू समजून घेत. आवश्यक तडजोडीला तयार रहात. ते लढाया हरले पण युध्द जिंकले.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १४१

❖❖❖

## ९) डर्बनमधले घर

कस्तुर इकडे वाट बघत होती. मुलांना 'आता तुमचे बाबा येतील. तुमच्या साऱ्या खोड्या सांगेन.' असे बजावत होती. गांधींचे थोरल्या भावाला पत्र पोहोचले. त्याचे मायदेशी परतणे लांबणार होते. कस्तुर हिरमुसली झाली. गांधींचा निर्णय सोपा नव्हता. हा प्रश्न तीन खंडांशी संबंधित होता. आफ्रिका, आशिया आणि युरोप खंडांशी संबंधित होता. रंगभेदाचा संघर्ष होता. राजकीय गुलामगिरीचा प्रश्न होता. माणसांच्या जगण्या-वागण्याशी संबंधित प्रश्न होता. सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि मानवीय प्रश्न होता हा! हे सारे त्या वेळी कस्तुरला कळणे केवळ अशक्य होते. तिला तर आपला प्रपंच माहित होता. ती आपला परिवार जाणत होती. तिला एवढेच अपेक्षित होते.

गांधी विलायतेत शिकायला गेलेत. तिथे शाकाहाराचा आग्रह धरला. तिथून परतले. मुंबईला गेले. तिथे घर केले. आचारी सोबत राखला. कस्तुर राजकोटलाच राहिली होती. गांधी आता परत घर करत होते. कस्तुरशिवायचे घर. गांधी आता टापटिपीचे कपडे वापरु लागले होते. त्यांची आर्थिक स्थिती सुधारली होती. ७ ऑगस्ट १८९४ रोजी गांधी डर्बनच्या बीचग्रोव भागात रहायला गेले. त्यांनी मुंबईत बिऱ्हाड थाटले होते. आता नाताळात थाटत होते. यात खूप अंतर आहे. घरच्या व्यवस्थेत फार बदल झालेले आहेत. नाताळातला खर्च वाढता होता. तो मुख्यत्वेकरुन प्रतिष्ठेसाठीचा होता. नाताळात ते हिंदी बॅरिस्टर होते. हिंदजनांचे प्रतिनिधी होते. त्या पदाला साजेसा थाट हवा होता. यामुळे श्रीमंत वस्तीत घर घेतले होते. घरातले सामानसुमानही सुरेख मांडणीचे होते. अन्न तसे साधेच होते. इंग्रज मित्रांना जेवायला बोलवायचे असे. त्यामुळेही खर्च वाढता होता. नोकराची अडचण सर्वत्रच असते. कोणाला नोकर म्हणून ठेवण्याचे त्यांना कधी जुळलेच नाही. गांधीजी आपल्या आत्मचरित्रात लिहितात 'माझ्या बरोबर एक सोबती रहात असे. एक आचारी ठेवला होता. तो कुटुंबातलाच होता. ऑफिसात जे कारकून ठेवले होते, त्यापैकी शक्य तेवढ्यांना घरीच ठेवत असे.'[१] ती सहजीवनाच्या प्रयोगाची सुरुवात होती. यासाठी सुख-दु:खे वाटून घ्यावी लागतात. या घरात सारे एकत्रितपणे रहात. सोबत एका टेबलावर बसून जेवत. आजारपणात एक-दुसऱ्याची सेवा-सुश्रूषा करत. घरात गांधी होते. आचारी हिंदू होता. मुसलमान मित्र होता. ख्रिश्चन कारकून होता. सारे समवेत होते.

गांधींच्या जीवनात आत्मसन्मानाला फार महत्वाचे स्थान आहे. गांधी जीवनयात्रा अस्मितेच्या शोधात निघाली आहे. समाज जीवनात त्यांना स्वत:ला स्थापित करायचे आहे. प्रतिष्ठित करायचे आहे. तो युरोपियन लोकांचा सन्मानित असा मुहल्ला होता. याच भागात थोड्याच अंतरावर सरकारी वकील हेरी एस्कंब रहायचे. त्यांचा एक विशाल बंगला होता. वेळोवेळी गाठीभेटी होतच रहायच्या. 'हाय, हॅलो, गुड मॉर्निंग' होत रहायचे. गांधींचे घर दोन मजली होते. घराला लोखंडी गेट होते. या मोठ्या गेटच्या बाजूने यायला-जायला एक मार्ग होता. डर्बनच्या आखाताशी समांतर अशी ओसरी होती. त्यावर झरोके ठेवले होते. बैठकीचा हॉल होता. दिवाणखाना, स्वयंपाकघर, स्नानगृह वगैरे सर्व सोयी खालच्या मजल्यावर होत्या. मागल्या वाड्यात झोका होता. व्यायामासाठी डबल बार होते.[२] घर मोठे असून फर्निचर साधेच होते. आहार भरपूर होता. तो चटकदार वा चमचमीत नव्हता. पोशाख आणि भांड्या-कुंड्यांबाबत विलायतेची नक्कल कायम होती. साधेपणाकडे मन आकृष्ट झाले होते. सच्चा साधेपणा अजून यायचा होता. अपरिग्रहाची मौज अजून चाखायची होती. गांधींनी हिंदजनांच्या हिताला आपले हित मानले. संगठन स्थापन केले. सामाजिक व्यवहाराची आचार संहिता रचली. वाचन-लेखनामुळे त्यांचे मन समृध्द झाले होते. मानवी समतेचे घोष मनात गुंजत होते. कुणाला नोकर म्हणून ठेवायचे त्यांना कधी जुळलेच नाही.

गांधींनी बालमित्र शेख मेहताबला आपल्या घरी राखले होते. तो त्यांच्या घरातच रहायचा. राजकोटला केवढे कटू अनुभव झेलावे लागले होते. गांधींचा मेहताबवरचा विश्वास अजूनही अभंग होता. त्याला सुधारण्याची हौस मनात असेल. विलायतेत शिकत असतानाही वेळोवेळा गांधींनी त्याला आर्थिक मदत

केली होती. डर्बनला आल्यावर तर जणू काही मेहताबने बीच ग्रोव व्हिलावर ताबाच मिळवला होता.

एके दिवशी अघटित घडले. तसे ते याच्या पूर्वीही घडत होतेच पण ते त्या दिवशी उघड होणार होते. गांधींचा आचारी रजेवर होता. दुसरा आचारी तात्पुरता नेमला होता. गांधी कार्यालयात निघून गेले होते. या प्रसंगाचा तपशिल खुद्द गांधींनीच सांगितला आहे. त्याचा मथितार्थ असा सांगता येईल. "बारा वाजायचा सुमार होता. आचारी धापा टाकत कार्यालयात येऊन दाखल झाला. त्याने गांधींना सांगितले की त्यांना काही पहायचे असेल तर त्वरित असेच्या असे घरी यावे. गांधींनी याचा अर्थ विचारला. कामाचे स्वरुप आणि तातडीचे कारण विचारले. आचारी बोलला की जर त्यांनी घाई केली नाही तर त्यांना पश्चात्ताप करावा लागेल. याहून अधिक काही तो बोलला नाही. गांधी चमकले. आचाऱ्याच्या दृढतेचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. कारकूनाला आपल्या सोबत घेऊन ते घराकडे निघाले. आचारी पुढे-पुढे चालत होता. घर आले. आचाऱ्याने गांधींना वरच्या माडीवर नेले. एका खोलीत त्यांचा मित्र मेहताब रहात होता. त्या खोलीकडे निर्देश करत आचारी बोलला की ही खोली उघडून बघावी. आता कुठे गांधींच्या डोक्यात प्रकाश पडला. त्यांनी खोलीचा दरवाजा ठोठावला. त्याचा कोण जबाब देणार? गांधींनी परत जोरजोरात दरवाजा ठोठावला. भिंत हादरली. या दणक्यामुळे दरवाजा उघडला. आत एक बदफैली बाई दिसली. गांधींनी त्या बाईला निघून जायला सांगितले, परत कदापि या घरात पाऊल न टाकायला बजावले. सोबत्याला गांधींनी सांगितले की यापुढे त्यांनी त्याच्याशी असलेला संबंध तोडून टाकला आहे."

गांधी सपशेल फसले होते. त्यांच्या विश्वासाची ही परतफेड फारच शोककारक होती. सोबती बिनसला. त्याने गांधींचे सारे व्यवहार चव्हाट्यावर आणायची भाषा केली. यावर गांधी म्हणाले 'माझ्यापाशी गुप्त व्यवहार काही एक नाही. मी जे काही केले असेल ते तुम्ही खुशाल जाहीर करा. तुमचा आणि माझा संबंध मात्र आजपासून तुटला.' गांधींच्या आयुष्यातील घटना फारच भयंकर स्वरुपाची आहे. या मेहताबमुळे कस्तुरचा केवढा छळ झाला होता. सोबती अधिकच संतापला. गांधी खाली उभ्या असलेल्या सहकारी कारकूनाकडे वळले. त्याला सांगितले 'पोलिस सुपरिटेंडेंटला जाऊन कळवा. त्यांच्या एका जोडीदाराने त्यांना दगा दिला आहे. ते आता त्याला आपल्या घरातून घालवून द्यायला तयार आहेत. पण सोबती निघायला तयार नाही.' गुन्हेगारात धमक थोडीच असते? गांधींचे हे वचन ऐकून मेहताब नरमला. माफी मागितली. 'पोलिसाला बोलावू नका.' असे विनवू लागला. लगेच घर सोडून जायचे कबूल केले. लागलीच घरातून निघूनही गेला. गांधीजींनी सांगितले आहे. की या घटनेमुळे त्यांच्या आयुष्याची चांगली झडती झाली. त्या इसमाची सोबत किती घातक होती. अनिष्ट होती. त्याने गांधींना कसे भारुन टाकले होते. त्या सोबत्याला ठेवण्यामध्ये त्यांनी चांगले करण्यासाठी वाईट साधन चालू दिले होते. सोबत्याची चाल-चलणूक चांगली नव्हती. गांधींना त्याच्या सत्प्रवृत्तीवर विश्वास होता. त्याला सुधारण्याच्या नादात ते स्वतःच चिखलात माखले गेले होते. आपल्या हितचिंतकांचा सल्ला मानला नव्हता. आईचा सल्ला मानला नव्हता. थोरल्या भावाचे म्हणणे मान्य केले नव्हते. कस्तुरच्या डोळ्यातील अश्रुसुध्दा गांधींची या मित्राविषयीची प्रेम भावना पुसु शकले नव्हते. गांधींना सारे आठवले होते. मोहामुळे आपण कसे अंध झालो होतो हे आठवून त्यांना खूप पश्चात्ताप झाला. गांधींना अंधारात ठेऊन त्यांच्या मनात भलभलतेच भरवून देण्याचे कसब मेहताबच्या अंगी होते. हे सांगताना गांधीजी लिहितात 'पण देव तारी त्याला कोण मारी? माझी निष्ठा शुध्द होती. त्यामुळे माझ्या चुका होत असताही मी निभावून गेलो आणि पहिल्याच अनुभवाने मला सावध केले.'[३] या विधानात गांधींच्या मनात कस्तुरवर केलेल्या अन्यायी वागण्याची भावना निश्चितच तरळत असली पाहिजे. या आत्मस्वीकृतीत त्यांनी आपल्या चुका झाल्यात हे मान्य केले आहे. याचा अर्थ केवळ या एकमेव घटनेविषयी त्यांना पश्चात्ताप नोंदवायचा नाही. श्री नारायण देसाई या घटनेचे विश्लेषण करताना म्हणतात 'आपण चुका केल्याचे ते स्वतःच स्वीकार करत आहेत. चूक एक नव्हे पण अनेक चुका होत्या हे तर त्यांनी चूक शब्दाचे अनेकवचनी प्रयोग केल्यावरुनच लक्षात येते.'[४]

शेख मेहताब प्रकरण काही केवळ या एकट्या बदफैलीपुरतेच मर्यादित असे नव्हते. गांधींचे मन खूप व्यथित झाले. पश्चात्तापदग्ध झाले. त्यांना मेहताबवर आत्यंतिक विश्वास होता. त्यांना एका मित्राला मुकावे लागले होते. या घरात अधून-मधून चोऱ्या व्हायच्यात. मेहताबने गांधींच्या एका मित्राकडे अंगुलीनिर्देश करुन त्याला गुन्हेगार ठरवले होते. कुठलीही शहानिशा न करता गांधींनी ही फिर्याद खरी मानली होती. त्या मित्रावर संशय घेतला होता. साथीदार स्वाभिमानी दोस्त होता. त्याने गांधींना प्रणाम केला. घरचा निरोप घेतला होता. कार्यालयाचाही त्याग केला होता. या घटनेला खूप वर्षे लोटलीत. आत्मचरित्रातून गांधींनी या विषयीचे दु:ख व्यक्त केले. त्यांचा तो सोबती फार हुशार आणि भरवशाला पात्र असा होता. त्याची पारख होऊ शकली नव्हती. ऑफिसातील एका कारकूनाला त्यांनी घरी ठेवले होते. मेहताबला या गोष्टीचा हेवा वाटला होता. त्याने जाळे रचले. कारकून गुन्हेगार ठरवला गेला. कारकुनावर संशय घेतला गेला होता. हे चुकले होते. हा विचार गांधींना जाचत राहिला होता.[५]

मेहताब विघातक शक्तिचा पुतळा होता. गांधींना या गोष्टीचे भान खूप उशिरा झाले. या संपूर्ण प्रसंगाविषयी त्यांना दु:ख वाटत राहिले होते. वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षापासून मेहताब त्यांच्या सोबत होता. एरवी मित्रांमध्ये फारसे न रमणारे गांधी या मित्रात मात्र गुंतून पडले होते. बालपणी कस्तुरविषयी शंका जागली होती. गांधी निष्पाप कस्तुरचे गुन्हेगार ठरतात. तिसरा प्रसंग विलायतेहून मेहताबला आर्थिक मदत करण्याचा आहे. ही मदत काही आई वा मोठ्या भावाच्या संमतीने नसेलच. त्याला चोरुन, लपून-छपून केलेली ही मदत आहे. चौथा प्रसंग आहे. गांधी कमकुवतपणाचा. गांधी विलायतेतून शिकून परतले आहेत. तरीही कस्तुरविषयी शंकेचे पिशाच्च मेहताबने त्यांच्या मानगुटीवर बसवून दिले आहे. गांधी त्या पिशाच्चाला वशही झाले आहेत. दक्षिण आफ्रिकेला येताना तर शेख मेहताबच्या मैत्रीचे जाळे झुगारुन द्यायची वेळ होती. या पाचव्या प्रसंगीही गांधी मेहताबला जवळ घेतात. त्यांना नग्न सत्याचे दर्शन घडते. ते जागे होतात. नवी वाट धरतात. एकदा १९१९ साली गांधींनी आपले सचिव श्री महादेवभाई देसाई यांना सांगितले होते ‘मला आयुष्यात कुणी फसवू शकला असेल तो एकमेव शेख मेहताब होता.’[६] कस्तुर दक्षिण आफ्रिकेला पोहोचायच्या आधीच शेख मेहताब घालवला गेला. घर आंतर्बाह्य स्वच्छ झाले. किटाळ दूर झाले. कस्तुरच्या दांपत्य जीवनाला लागलेले एक भयंकर ग्रहण दुर झाले.

आता गांधींनी घर वसवले होते. कस्तुरची आठवण सतत सोबत होती. ‘एक वर्षभरात तर परतणार आहे. ना ग मी.’ असे आश्वासन त्यांनी कस्तुरला दिले होते. कस्तुरचा निरोप घेतला होता. त्या गोष्टीला आता तीन वर्षे लोटली होती. विलायतेत शिकायला गेलेत ती तीन वर्षे आणि दक्षिण आफ्रिकेतील ही तीन वर्षे ! विदेशात जाणाऱ्यांचा असा अधिक काळ वाट बघायला लागण्याच्या कहाण्या खूप होत्या. कस्तुर हिंदुस्तानात वाट बघत होती. गांधीजी लिहितात की त्यांना दक्षिण आफ्रिकेत येऊन तीन वर्षे लोटली होती. लोक त्यांना ओळखू लागले होते. ते नेतृत्व करत होते. तीन पौंडांचा क्रूर कर ही वहाती जखम होती. आता दक्षिण आफ्रिकेत बराच काळ रहावे लागणार होते. वकिली चांगली चालली होती. सार्वजनिक कामांसाठी लोकाना त्यांची गरज वाटत होती. त्यांना चळवळीसाठी लोकांची आवश्यकता वाटत होती. आता आपण इथे सहकुटूंब रहायला हवे असे त्यांच्या मनाने घेतले होते. यासाठी मायदेशी जाऊन येणे आवश्यक होते. तिकडे गेले तर काही सार्वजनिक कामेही करता येतील अशीही योजना मनाशी होती. हिंदुस्तानात लोकमत जागृत करता येईल अशी एक शक्यता मनाला वाटत होती. वह्नि चेतवता येईल. इथल्या प्रश्नांकडे हिंदुस्तानी जनतेचे अधिक लक्ष वेधून घेता येईल असाही विचार आला.[७] घरावरचे कर्ज तर कधीच उतरुन गेले होते. पत्नीला भेटायची इच्छा होती. मुलांना आपल्यासोबत आणायची ओढ होती. इथली आर्थिक परिस्थिती चांगली झाली होती. मुख्य म्हणजे घर झाले होते. कमाईत स्थैर्य आले होते. समाजात मान होता. आत्मविश्वास जागला होता.

गांधींना आता मायदेशी परतायचे होते. कस्तुरच्या आठवणींनी त्यांचा गळा दाटून आला होता. कस्तुर

विचार करु लागली. लेकरे किती काळ पितृ सुखाला आचवतील? किती काळ नवरा मायेच्या छताशिवाय राहील? दीर्घकालीन विरहयोग. गेला काळ का भरून काढता येईल? कस्तुर आपल्या मनाशी बोलत होती. आपण सारे सोबत राहू. आपले हक्काचे घर असेल.

१८८६ साल उजाडले. गांधींनी सहा महिन्यांसाठी मायदेशी परतायचे ठरवले. गांधींचा प्रवास डर्बन ते कलकत्ता असा होता. 'एस्. एस्. पोंगोला' या स्टीमरने दिनांक ५ जून १८९६ रोजी ते डर्बनहून निघाले. कलकत्त्याला आले. तिथे कस्तुरचे बाबा गोकुळदास मकनजी कापडिया यांच्या पेढीची एक शाखा होती. तिथे गांधी थांबले नाहीत. तडक मुंबईकडे निघाले होते. राजकोटला आले. या प्रवासादरम्यान त्यांनी उर्दू आणि तमीळ भाषा शिकायचे ठरवले होते. मायदेशी परतायचा प्रवास चोवीस दिवसांचा होता. त्यांनी हुगळीचे सृष्टिसौंदर्य न्याहाळले. कलकत्त्याला उतरले. कलकत्ता मुंबई या प्रवासादरम्यान प्रयाग येते. भव्य अशा त्रिवेणी संगमाचे दर्शन घेतले. ते मुंबईहून राजकोटकडे निघाले. कस्तुरने त्यांच्या आवडीचे काय-काय पदार्थ तयार करुन ठेवले होते? त्या प्रत्येक खाद्य पदार्थाला स्वाद होता. गंध होता. तिच्या आठवणींची स्निग्धता होती. ती तर स्वयंपाकघरात होती. ती कशी येऊ शकेल वाढायला? थोरल्या जावेने सर्वांना वाढले. मनाने तर ती नवऱ्याच्या शेजारी हातात पंखा घेऊन बसली होती.

कस्तुरला नवऱ्याशी खूप-खूप बोलायचे होते. बराच काळ लोटला होता. घराविषयी खूप काही सांगायचे होते. जे कडवट होते ते सारे तिने गिळून टाकले होते. गोड-गोड तेवढे ती सांगणार होती. तसे तिला ऐकायचे खूप होते. ते सांगण्यापेक्षा मोलाचे होते. तिथल्या घराबाबत जाणून घ्यायचे होते. नवरा खूप काम करायचा. अनेकांशी बोलायचा. भरपूर लोकाना पत्रे लिहायचा. दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या पत्रांना उत्तरे द्यायचा. त्याला अवकाश नव्हता. तो सतत कामात असायचा. काहीतरी लिहित असायचा. लोकांशी बोलत असायचा. रात्री उसंत असायची. बोलता बोलता त्याचा डोळा लागायचा. कधी तिला झोप यायची. कस्तुर स्वप्न सृष्टितल्या दुनियेचे महाद्वार उघडायची. तोवर तर त्याला पेंग यायला लागायची. अधिक काही सांगायचे-विचारायचे असायचे. ती काही बोलायची नाही. शांतपणे त्याच्या नजिक झोपून जायची. एका विश्रब्ध प्रवाहासोबत एक उसळता प्रवाह शांतपणे सुखावून रहायचा. दोन प्रवाह आपापल्या स्वप्नरंजनात रंगून जायचे. रोजच्यासारखी सकाळ उगवायची.

नवरा घरी आला आहे. सतत कामात आहे. पत्रव्यवहार करत आहे. लेख लिहित आहे. लेख कुठे पोस्टात टाकतो आहे. सारखा कुठल्यातरी वेडाने झपाटल्यासारखा कामात आहे. न जाणो कुठली अदृश्य विवंचना त्याला सतावते आहे. कस्तुर या माणसाच्या वागण्याचा अंदाज घेत होती. डोक्यात सारख्या नव-नव्या कामांच्या योजना. कस्तुरशी काही चर्चा, काही नवलाई याचे काही उल्लेख गांधी आत्मचरित्रातून तरी डोकावत नाहीत. काही संवाद झाल्याची नोंद नाही. गांधी नातलगाना भेटले. लेकरांशी खेळले-बोलले-रमले. लहान बालकांमध्ये तर त्यांचे मन रमायचे. गांधी सार्वजनिक कामातले खंदे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या आत्मचरित्रात गल्लीतल्या बालकांनी मदत केल्याची चर्चा आली आहे. घरची बालके या वत्सल उल्लेखापासून वंचित राहिली आहेत. या संदर्भात गांधींचे चरित्रकार श्री नारायण देसाई यांनी पुढीलप्रमाणे मत मांडले आहे. ते म्हणतात की हे वर्णन वाचून सहाजिकच हा प्रश्न आपल्या मनाला पडतो. गांधींनी आपल्या लेकरांना वगळून गल्लीतल्या मुलांच्या मदतीचा उल्लेख केला आहे. हे तर घरच्या बालकांवर अन्याय करण्यासारखे झाले आहे. खरी गोष्ट जाणून घ्यायला हवी. गांधींनी आपल्या कुटूंबातील बालकांपासून या कामाची सुरुवात केली आहे. लगेच आळीतील मुले मदतीला धाऊन आली असतील. या निवेदनात गांधींनी आत्मचरित्रात उल्लेख केला आहे. 'लहान मुलांनाही अशा तऱ्हेने स्वयंसेवक बनवण्याचा हा माझा पहिला प्रयोग होता. या मुलांपैकी दोघे जण आजही माझ्याबरोबर काम करीत आहेत.'[८] या ज्या दोन बालकांचा गांधींनी उल्लेख केला आहे. ही बहुतेक छगनलाल व मगनलाल असावीत. त्यांची स्वतःची मुले तर मदत करायच्या वयाची नव्हती. मोठा हरीलाल हा

आठ वर्षांचा होता. धाकटा मणीलाल तर चार वर्षांचा होता. पुतणे छगनलाल पंधरा वर्षांचे तर मगनलाल तेरा वर्षांचे होते. हे दोन्ही पुतणे पुढे दक्षिण आफ्रिकेला गेले होते. तिथे आयुष्यभर सेवाकार्य आचरले होते. गांधी आशीर्वादाचा मेघ तर आपला-परका असा भेद करत नव्हता. पुढे मोठे झाल्यावर गांधींच्या मुलांनीही दक्षिण आफ्रिकेत पराक्रम गाजवला आहे.[१]

गांधी हिंदुस्तानात पोहोचले त्यावेळी मुंबईत प्लेगचा प्रकोप सुरु झाला होता. राजकोटमध्येही कुठे हा आजार पोहोचू नये अशी काळजी होती. गांधी काही डॉक्टर नव्हते. सेवक होते. त्यांनी बाळपणी वडिलांची भरपूर सुश्रूषा केली होती. त्यांनी राजकोटच्या राजाला एक पत्र लिहिले. आपण सेवेकामी मदत करायला उत्सुक असल्याचे लिहिले. राजाने त्यांच्या पत्राचे स्वागत केले. एक प्लेग निवारक समिती स्थापन करण्यात आली. गांधी या समितीत सदस्य बनले. समितीत संडास सफाईचा मुद्दा त्यांनी उचलून धरला. तीन वर्षांच्या वियोगानंतर घरी परतलेला नवरा संडास सफाईच्या मोहिमेत गुंतून पडला होता. आता पुनश्च दक्षिण आफ्रिकेत जायचे आहे. पत्नी आणि लेकरांना न्यायला गांधी राजकोटला आले आहेत. त्याची काही तयारी करावी लागणार आहे. ही सारी कामे आहेत. आणि तरीही गांधी संडास सफाई समितीचे सदस्य बनताहेत. एवढे लिहिणे पुरे व्हावे. वैयक्तिक सेवेसाठी हे योध्दे सिध्द होतात. अमंगळ आणि गलिच्छ वाटणारे काम हाती घेतात. थेट हरिजन वाड्यात जातात. तिथली घरे पहातात. तिथली स्वच्छता बघून थक्क होतात. श्रीमंतांचे संडास कमालीचे अस्वच्छ जिवंत नरकतुल्य असल्याचे आपले मत नोंदवतात. हे फार विलक्षण आहे. प्रदीर्घ काळानंतर आपल्या पत्नीच्या सहवासात ते आले आहेत. लेकरांचे कोड-कौतुक करायचा हा काळ आहे. सर्वांच्या सोबत जायचे आहे. यासाठी काही पूर्वतयारी करावी लागणार आहे. हे सारे आहे. गांधींच्या मनात हा भाव खचितच आहे. की हे सारे करायला कस्तुर समर्थ आहे. ती ही सारी आघाडी सांभाळेल.

गांधींचे हात कामात होते. हात सेवेत होते. पाय धावत होते, भिंगरीसारखे भिरभिरत होते. पाय सेवेत रमलेले होते. मन करुणेने भारलेले होते. मस्तक ईश्वर दर्शनाच्या जाणिवेने मंत्रपूत होते. या धामधूमीत कुठे मुले आणि कुठे बायको? कस्तुर नवऱ्याचा विचार करत होती. तिला याचा नेमका अंदाज येईना. जीवाला घोर. संध्याकाळी तरी घरी परतायचे ना? छे, परतायची वेळ कशी ती ठरलेली नाही. घरी परत आले म्हणजे संध्याकाळ झाली असे समजावे. बरे आल्यावर काही थकवा-बिकवा? काही विश्रांती वगैरे? भूकेचे काही चिह्न? तसे काहीही नाही. एकच विचार. एकच ध्यास. सेवेचा ध्यास. कस्तुर मनाशीच संवाद करत राहिली होती.

दक्षिण आफ्रिकेच्या परिस्थितीची जाणीव हिंदुस्तानी लोकाना करुन देणे गरजेचे होते. या मिशनच्या निमित्ताने ते मुंबईला गेले. मुंबई, पुणे, मद्रास, कलकत्ता असे दौरे सुरु होते. गांधींच्या पायाला अक्षरश: भिंगरी होती. दक्षिण आफ्रिकेत असलेल्या हिंद जनांच्या व्यथा-वेदना त्यांनी आपल्या भाषणातून मांडल्या. भरपूर प्रवास केला. ठिकठिकाणी भाषणे दिलीत. अनेकांना पत्रे लिहिलीत. नाना संपादकांची दारे ठोठावलीत. हिंदुस्तानी पत्रकारांच्या अलिप्त वृत्तीचा त्यांना राग आला नाही. त्यांची दया आली. कीव आली.

कस्तुरच्या मनापुढे नवऱ्याच्या नाना प्रतिमा तरळून गेल्या. नवरेपणा गाजवू बघणारा बालक नवरा. अंधाराला भिणारा नवरा. शाळेचे भय बाळगणारा विद्यार्थी. महाविद्यालयातून एक सत्र संपताच घरी थांबणारा युवक. वडिलांच्या निधनाने अपराधग्रस्त झालेला पुत्र. पहिल्या अर्भकाच्या मृत्युने भांबावून गेलेला पिता. भ्रमित मनाचा हट्टी-विक्षिप्त नवरा. शिक्षण घेऊन परतलेला ज्ञानदीप्त तरुण. बेराजगारीशी संघर्ष करणारा गृहस्थ. दक्षिण आफ्रिकेतून परतलेला परिपक्व गृहस्वामी. काळ पंख लेऊन उडत होता.

दक्षिण आफ्रिकेकडे निघायची प्रस्थानवेळ येऊन ठेपली. कस्तुरने एवढ्या लांब पल्ल्याचा प्रवास यापूर्वी कधीही केला नव्हता. आता तर थेट सागर ओलांडायचा होता. तिथे ना कुणी गणगोत ना कुठली ओळख पाळख. प्रवासाची तयारी सुरु झाली. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करावी लागते. अगदी तसे झाले

होते. दक्षिण आफ्रिकेतली रीतभात वेगळी. चालचलन निराळे. पोशाख वेगळा. कस्तुर सारे काही समजून घेत होती. जमेल ते सारे काही करीत होती. तिला काही देश-दुनियेचा अनुभव नव्हता. समुद्री प्रवासाचा अनुभव नव्हता. सारे नवे होते. सारे अनोखे होते. ती स्वागतशील मनाची होती. आपल्या मालकीच्या घरी जायचा आनंद होता. तो आनंद काही मनात मावत नव्हता.

गांधी सहा महिने हिंदुस्तानात राहिले होते. घरी राहिले होते. कस्तुरसोबत राहिले होते. लेकरांसमवेत राहिले होते. या काळात प्रेयापेक्षा श्रेयाकडे त्यांचे अधिक लक्ष दिसते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदजनांचे दु:ख मांडण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. अपमान साहिला. घरी काम आणि बाहेरही कामच. कामच काम. ते सेवाव्रती बनून कार्यरत राहिले. रात्रीची जाग्रणे केली. आपल्या परिवारासोबत नव्या मोहिमेवर निघाले. नव्या आशांचे पाखरु त्यांच्या खांद्यावर भिरभिरत होते. या संकल्पाला कस्तुरची सश्रध्द साथ होती. गांधी लिहितात की त्यांना सुश्रूषेचा शौक होता. या शौकाने पुढे विशाल रुप धारण केले. हा शौक प्रबळ होता. इतका प्रबळ होता की यासाठी त्यांना कधी आपला धंदा बाजूला ठेवावा लागला होता. गांधी कस्तुरलाही या सेवाकार्यात गुंतवून ठेवत. या सेवा वृत्तीला त्यांनी शौक म्हटले आहे. खरे तर ते सत्कर्म होते. या सत्कर्मातून आनंदलाभ झाला तर सेवेचे चीज होते. सेवा ओढून-ताणून नको. देखाव्यासाठी नको. जनलज्जेस्तव नको. यामुळे सेवेकरी दडपून जातो. जीवन खुरटल्यासारखे होते. सेवकाला आनंद वाटावा. यामुळे लाभ होतो. सेवा घेणाऱ्याला सुख वाटते. या सेवेपुढे नको ऐष. नको आराम. नको द्रव्यार्जनासारखे तुच्छ तुणतुणे.[१०] सेवाकार्य हे सत्कर्म होते. सत्कर्मात तर सहधर्मचारिणीची साथ हवीच. कस्तुर या कामी गांधींच्या सोबत सेवेचे अध्याय गिरवीत होती. पाठ्यक्रमाच्या जाचापेक्षा हे सोपे होते. अवघडही होते म्हणा. यात प्रत्यक्ष शिकवणी नव्हती. अनुभवातून धडा गिरवायचा होता. रोजचा पाठ्यक्रम नवा असायचा. त्याच्या आकलनाची रीत नवनवी असायची. कस्तुर समरसून या अभ्यासात रमली. ही सारी कथा यथाक्रम येईल.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १६१;

२) महात्मा गांधी : द अर्ली फेज (इंग्रजी) श्री प्यारेलाल पृष्ठ ४९१;

३) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १६३ ;

४) मारु जीवन ए ज मारी वाणी : (गुजराती ) श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ २२६;

५) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १६१ / १६२;

६) मारु जीवन ए ज मारी वाणी : (गुजराती) श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ २२६;

७) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १६४;

८) कित्ता पृष्ठ १६९;

९) मारु जीवन ए ज मारी वाणी: (गुजराती) श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ २४१;

१०) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १७४ .

❖❖❖

## १०) कस्तुरचे दक्षिण आफ्रिकेकडे प्रयाण

डर्बनहून तार आली. गांधी तिकडे जायच्या तयारीला लागले. कस्तुरला सोबत घेतले. दोन मुलांना घेतले. रलियातताई आता एकटी होती. तिचा नवरा निवर्तला होता. तिला गोकुळदास नावाचा एक छोटा मुलगा होता. या भाच्याला सोबत घेतले. कस्तुरसोबत आपल्या दोन लेकरांसह हा भाचाही होता. १८९९ साल. उन्हाळा तापला होता. आता साथ-संगत आनंददायक होती. कस्तुरला एकटीच्या अनुभवांची साथ-सोबत होती. लेकरांना पिता प्रथमच भेटत होता. गांधींजवळही सांगण्यासारखे खूप काही असावे. कस्तुर अंदाज करत राहिली. नवा प्रदेश. नवी माणसे. नवा भूगोल. मनात उत्साह होता. भयाची काळी पडछायाही होती. भाषा वेगळी. भूषा भिन्न. भोजन वेगवेगळे. भवन तऱ्हे-तऱ्हेचे. भजन कसे गावे लागेल? हा प्रश्नच होता. वाट अशी प्रश्नांच्या खाचखळग्यांनी भरलेली होती. अननुभवाच्या निसरड्या वाटा होत्या. अनोळखीपणाची अज्ञात वाटा-वळणे होती. नवऱ्याने तिला आपल्या नव्या घराविषयी माहिती दिली. तिचे कान आसुसले होते. ऐकून मन तृप्त झाले.

दादा अब्दुल्ला यांनी स्वत: 'कुरलँड' नावाची आगबोट विकत घेतली होती. ते हिशेबात पक्के होते. त्यांनी गांधी परिवारासाठी विनामूल्य प्रथम श्रेणी प्रवासाची व्यवस्था केली. एवढा अवाढव्य खर्च त्यांनी आपल्या खांद्यावर घेतला. गांधींच्या दक्षिण आफ्रिकेला परतण्याचे मोल ते जाणून होते. खऱ्या व्यापाऱ्याला किंमत आणि मूल्य यातला फरक उत्तम कळतो. सारे निघाले.

गांधी दुसऱ्यांदा दक्षिण आफ्रिकेकडे निघाले होते. त्यांना पहिल्या प्रवासाच्या आठवणी आल्यात. कस्तुरचा मात्र पहिला प्रवास होता. इतक्या लांबवरचा पहिला प्रवास. तोही सागराच्या छातीवरचा. सागर तसा शेजारी होता. बालपणी आपली वाळूची घरे वाहून नेणाऱ्या सागर लाटा तिला आठवत राहिल्यात. तिने सागराला सतत पाहिलेले होते. आपण याच्या छातीवर कधी काळी आरुढ होऊ. कधी प्रवास करु. असे मात्र तिला कधी वाटले नव्हते. सारे गणगोत सोडले. मनात आनंद होता. आपले घर असेल पण कुठे दक्षिण आफ्रिकेत? त्यात काय विशेष? 'जेथे राघव तेथे सीता.'

१८९६ च्या डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला 'कुरलँड' या बोटीतून सारे निघाले. गांधींच्या सोबत परिवार निघाला. मुंबई ते डर्बन प्रवासात सबंध हिंदी महासागर लंघून जावा लागतो. सारे नवे-नवे होते. केवढी तयारी करायला लागली होती कस्तुरला? नवऱ्याचा आग्रह. आग्रह कमी हट्ट अधिक. तशा या प्रवासानिमित्त काही गोष्टी गरजेच्याही असतील म्हणा! तिने आपल्या मनाची समजूत करुन घेतली होती. प्रवास आगबोटीतून. खाली उसळता दरिया. अथांग निळे-काळे पाणी. चहुकडे केवळ पाणीच पाणी. वर निळेभोर आकाश. तेच जणू काही सागरात डोकावतेय की काय असे तिला वाटले. वर निळा रंग. खाली निळे तवंग. बाप रे बाप ! तिचा जीव घाबरला. लेकरे आनंदाने उड्या मारत होती. वडिल सोबत होते ना. फर्स्ट क्लास केबिनने प्रवास सुरु होता. लेकरे तर दमून झोपी गेलीत. कस्तुर सत्तावीस वर्षे वयाची होती. रात्रीत त्या चमचमत्या जलप्रवाहाला बघत होती. अगणित काजवे जणू काही गरबा नृत्य खेळत आहेत. असे तिला सहज वाटले. त्या झगमगाटाचा तिला विस्मय वाटला असेल. तिच्या मनात डोकावून बघितले तर आनंदाची महायात्रा दिसते. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' दिसतात. चौफेर आनंदाचे अंग दिसते. रमणीय. सळसळते. प्रवाही. उत्कंठावर्ध्दक. गगनाशी स्पर्धा करणारे.

आपल्या परिवारासोबत क्षण-न्-क्षण व्यतीत करण्याची ही गांधींची पहिलीच वेळ होती. मुलांमध्ये रमायची अनोखी अनुभव यात्रा होती. आगबोटीत सहप्रवासीही होते. काही परिचित होते. काही आप्त-स्वकीय होते. डेकवर काही उतारु भेटलेत. त्यांच्याशी संपर्क झाला. आगबोट मित्राची होती. मोकळेपणा होता. मुलांना संपूर्ण बोट समजावून सांगताआली. स्टीमरमध्ये काय आणि सागराच्या छातीवर काय कुतूहल जागवणाऱ्या शंभर गोष्टी आहेत. मोठ्यांना ती नवलाई वाटायची. बालकांना तर ते अद्भुत, नवलाईने भरलेले वाटावे अशीच स्थिती होती. स्टीमरची अवाढव्य

यंत्र सामग्री. तिथले मजले. चकचकीत पॉलिश केलेली संपदा. स्टीमरच्या शेजारी लटकत्या अगणित होड्या. सागराच्या छातीवर तरंगती रंगीबेरंगी दुनिया. याविषयी माहिती गांधींनी लेकराना दिली. लेकरांनीही काय काय प्रश्न विचारले. गांधींनी त्या प्रश्नावलीत मनोमन रस घेतला. कस्तुरने असे काही प्रश्न विचारले नाहीत. तिची जिज्ञासा मात्र या बालकांपेक्षाही उणी नव्हती. ती ऐकत मात्र सारेच होती. नवरा अनुभवी होता. हुशार होता. कस्तुर आता दोन लेकरांची आई होती. तिचे प्रगल्भ रुपसौंदर्य गांधींना खुणावत होते. गांधींची रसिक नजर या सौंदर्य साक्षात्काराला अनुभवल्याशिवाय कशी बरे राहील? या प्रसंगाचे गांधी चरित्रकार श्री नारायण देसाई मोठ्या रसिल्या शैलीत वर्णन करतात. [१]

गांधींचा आपल्या कुटुंबासोबतचा प्रवास सुरु होता. हा जगावेगळा होता. कुटुंबाला सुधारण्यासाठीचे गांधींचे अयशस्वी प्रयत्न सुरुच होते. सुधारणेसाठीचा आग्रह काही मावळला नव्हता. त्यांना आंतरिक सुधारणा हवी होती. ती शक्य नव्हती. किमान बाह्य सुधारणा तरी व्हावी. असा त्यांचा आग्रह होता. आपले बाह्य आचरण युरोपियनांसारखे दिसावे. किमान बायकोच्या पोशाखात तरी बदल व्हावा. याचा निर्णय गांधींनी स्वतःच घेऊन टाकला होता. कस्तुरशी विचार विनिमय नाही. सल्ला-मसलत नाही. पसंती-नापसंतीचा तर विचारसुध्दा नाही. संमती मिळावी अशी वाट बघणे नाही. त्यांनी हे सारे एकतर्फीच ठरवून टाकले होते. इतर कुटुंबियांनीही या बदलाला मान्यता द्यावी असा आग्रह धरला होता. हिंदुस्तानातल्या पारशींचा पोशाख गांधींना युरोपियनांशी मिळता-जुळता वाटला होता. या विषयक पहिला प्रयोग कस्तुरवरच झाला.

गांधींनी कस्तुरचा पोशाख ठरवला. मुलांचा पोशाख ठरवला. आपली लेकरे काठियावाडी दिसायला नकोत. बनियाची पोरे दिसायला नकोत. अनुकरण तर पाश्चात्यांचेच करायला हवे. काही ठिकाणी तसे करणे शक्य नव्हते. सोईचे नव्हते. अशावेळी अनुकरण किमान तरी व्हावे. त्या काळी पारशी अधिक शिकले-सवरलेले म्हणवले जात. जगभर पसरलेली मोठी हुशार जात. यामुळे जिथे शक्य व आवश्यक तिथे पारशी पोशाख ठरला. कस्तुरसाठी पारशी बायकांसारख्या साड्या घेतल्या गेल्या. लांब बाह्यांचे पोलके आले. बालकांना पारशी शैलीचे कोट-पाटलोण आले. सर्वांना बूट आले. बूट आले म्हणजे मोजे आले. कस्तुरला ते सारे काही आवडले नाही. मुलांना भावले नाही. सगळ्यांनी याविषयी कुरकुर केली. जोडे चावायचे. मोजे घाणेरडा वास करायचे. पाय सुजून यायचेत. सवय नव्हती ना कधी ! यावर गांधींपाशी उत्तर तयार असायचे. उत्तर समर्पक व योग्य असायचेच असे नाही. उत्तरामागे हुकूमाचे बळ असायचे. पत्नीचा नाइलाज होता. मुलांचा काही इलाज चालत नव्हता. नाइलाजाने त्यांनी हा बदल स्वीकारला. सारे कंटाळून जात. कस्तुरची घुसमट होत होती. तिला राजकोट आठवत राहिले. काय पण मौज होती नुसती ! छान ऐटीत चालता यायचे. टेबलावर पाय कसे आखडून जातात. कसे जेवायचे? बरे जेवायचे तरी काय? उकडलेल्या भाज्या. पावाचे तुकडे. देवाने धडपणे हात नाहीत का दिलेले? या साधनांनी का अन्नाची चव कळते? तिचे साधे सवाल असायचे. तिला हे सारे मुळात मान्य नव्हते. असे का कुठे जेवायचे असते? कधी संपेल बाई हा प्रवास एकदाचा? तिचे मन तिला विचारत राही. गांधींच्या आग्रहाच्या पुराचे पाणी हळूहळू ओसरु लागले होते. आग्रह शिथिल होत गेला होता. बुट-मोज्यांचा त्याग झाला. सुरी-काटे अडगळीत जाऊन पडले. या घटनेनंतर तीस-पस्तीस वर्षे लोटली होती. गांधी आपल्या आत्मचरित्रात याविषयी कबूली देतात. त्यांनी सुधारणेचा आग्रह टाळून दिला होता. हळूहळू सर्वांनाच हलके-फुलके वाटू लागले होते.[२]

हिंद महासागराच्या दक्षिणी पट्ट्यातून प्रवास चालला होता. हा भाग थोडा वादळी होता. कस्तुरचा पहिला प्रवास होता. सागराने आपल्या रुद्र स्वरुपाचे दर्शन घडवले. मुंबईहून निघायला पंधरवडा लोटला असेल. समुद्र खवळला होता. हा भाग विषुववृत्ताच्या दक्षिणेला येतो. इथले ऋतुचक्र आपल्यापेक्षा भिन्न आहे. डिसेंबर महिना तिथल्या पावसाळ्याचा महिना असतो. बघता-बघता सागर लाटांनी अक्राळ-विक्राळ स्वरुप धारण केले. या ऋतुत तर छोटी-मोठी वादळे ठरलेलीच असायची. हे वादळ मात्र दीर्घकाळ चालले. वरुन

मुसळधार पावसाचा वर्षाव सुरु होता. दुसरीकडून प्रचंड झंझावाती वारे वहात होते. डोंगराएवढ्या सागरलाटा उसळत होत्या. 'कुरलँड' मध्यम आकाराची बोट होती. ती कधी डोंगर लाटांवर स्वार व्हायची. एकदम उसळायची. कधी सागराचा तळ गाठणाऱ्या पाण्याच्या खोल दरीत कोसळायची. प्रवाश्यांमध्ये भयाचे वातावरण संचरले होते. खरे तर अशा वेळी कप्तानाने पुढे येऊन धीर द्यायला हवे होते. हिंमत द्यायला हवी होती. वादळाचा तडाखा प्रचंड होता. कप्तान मिस्टर मिल्नेच्या चेहऱ्यावर काळजीच्या रेषा दिसू लागल्या होत्या. त्यांनी प्रवाशांचे मनोबळ वाढवण्याचा प्रयत्न चालवला होता.

स्टीमरला थपडा बसायच्या. थपडा कसल्या? ते तर तडाखे होते. त्यांचा आवाज कानठळ्या बसवणारा होता. बोट आता बुडेल, आपणही बुडू असे वाटू लागले होते. समुद्राच्या पोटातील सारे बळ जणू काही त्याच्या पृष्ठभागावर आले होते. वादळवारा गगनात दाटून आला होता. विजांचा लखलखाट होत होता. पावसाच्या मुसळाएवढाल्या धारा कोसळू लागल्या. लाटांचा प्रचंड मार आगबोटीच्या छाती-पोटावर पडत होता. हत्तींच्या कळपाने आपल्या सोंडांनी करावा त्याहूनही हा मार मोठा होता. हा जणू त्यांनी आपल्या गर्वोन्मत्त गंडस्थळांनी केलेला मारा होता. लाटांची घुसळण सुरु झाली होती. आगबोट सुरपारंबी खेळणाऱ्या कुशल खेळाडूसारखी खाली-वर होत होती. ती एकदम सागरी जळाचा अंतर्वेध घेतल्यासारखी सूर मारु बघत होती. सागर प्रचंड खवळला होता. त्या पाण्याचे हेलकावे कमालीच्या वेगाने खालून वर आणि वरुन खाली येत होते. सारे खारे पाणी आत येऊ बघत होते. खाऱ्या पाण्याचे तुषार आपली मर्यादा ओलांडत होते. बोटीवर आक्रमण करत होते. लाटांचे उसळते ढग होते. ते जणू काही आकाश आणि सागर यांना आक्रमून टाकत होते. वादळ रोंरावत आले होते. ते खूप काळ टिकून राहिले होते. वादळाला चोवीस तास झाले होते. वादळ काही थांबायचे नाव घेत नव्हते.

कस्तुरचा हा असा पहिला अनुभव होता. जमिनीवर वादळ बघणे वेगळे. तिला आठवले. एकदा आपल्या बालपणी असे वादळ आले होते. हवेचा एक धपाटा आला होता. सारी धुळ आणि पाला-पाचोळा वर उडू लागला होता. आकाशात दिसेनासा झाला होता. जमीनीवरच्या तमाम वस्तु, लहान झुडुपं, बारकी झाडं, झिंज्या पिंजारलेल्या चेटकीणीसारख्या उडत राहिल्या होत्या. अशा वावधुळी तिने पाहिल्या होत्या. हे मात्र अद्भुत होते. हे मात्र विलक्षण होते.

घराचे छत असते. छताखाली बसून खिडक्यांमधून सुरक्षितपणे वादळ बघणे वेगळे असते. इथे बोटीच्या छतावरुन वादळ बघणे आले होते. डोंगराएवढ्या उसळत्या लाटा होत्या. खवळलेला सागर होता. माथ्यावर रागावलेले आभाळ बरसत होते. कस्तुर बावरुन गेली होती. लेकरांना छातीशी घट्ट धरुन राहिली होती. तिला काही सुचत नव्हते. संपूर्ण बोट हवालदिल झाली होती. मदतीसाठी हाक कुणाला मारायची? सारेच तर भेदरलेले होते. बायका-पोरे तर कमालीची भयभीत झालेली होती. लटलटा कापत होती. कस्तुरच्या छातीत एक वादळ होते. दुसरे तिच्या अवती-भवती पिशाच्चासारखे नाचत होते.

गांधीजी या वादळाविषयी लिहितात की चहुकडे भीतीदायक वातावरण होते. त्यावेळचे दृश्य अतिशय गंभीर होते. सर्वांची पाचावर धारण बसली होती. संकट मोठे होते. सारे प्रवासी एकवटले. भेदभाव विसरले. देवाचा मन:पूर्वक धावा करु लागले. करुणा भाकायला लागले. कुणी नवसही बोलले. 'वाचव रे बाबा यातून.' कप्तानाकडे आशेने बघू लागले. त्यांनी लोकाना धीर दिला. ते म्हणाले 'हे वादळ भयंकर आहे. हे खरे.' ते पुढे म्हणाले 'याहूनही मोठ्या वादळांचा मी सामना केलेला आहे. भिऊ नका. बोट मजबूत असेल तर एकाएकी बुडत नाही. आपली बोट मजबूत आहे. काळजी करु नका.' थोडे स्थिरस्थावर झाले मग कप्तानने सांगितले 'आता निश्चिंत असा. वादळ संपलेले आहे. काळजी करु नका.' अखेर एकदाचे वादळ शमले. सूर्यनारायणाने दर्शन दिले. लोकांची काळजी संपली. आता संकट टळले होते. आता देवाच्या नाम जपाचे काय कारण? मरणाचे भय संपले होते. सारे हसायला-बोलायला लागलेत. नाचायला-खिदळायला लागलेत. गाणे-बजावणे सुरु झाले. मायेचे पटल आले. नमाज-

प्रार्थनेचा सूर आटला नव्हता हे खरे पण तूफानाइतकी आर्तता व गांभीर्य मात्र नव्हते. [३]

कस्तुर कमालीची भयभीत झाली होती. लेकरांना पंखाखाली घेऊन बसली होती. नवरा मात्र निश्चिंत होता. त्याला वादळाचे भय वाटले नव्हते. तो मस्त कलंदर होता. खरे तर तोही नवखाच प्रवासी होता. त्याला तरी अशा वादळाचा यापूर्वी कुठे परिचय होता? त्याला आगबोट लागत नव्हती. भोवळ येत नव्हती. तो निर्धास्त होता. कस्तुर यामुळे चिंताग्रस्त होती. नवरा शांतचित्ताने उतारुंमध्ये फिरत होता. धीर देऊ शकत होता. कप्तानचे निरोप कळवत होता. गांधींना वादळाचे भय नव्हते. सागरी प्रवासाचा आणि प्रवाहाचा त्यांना अनुभव नव्हता तरीही त्यांना हा प्रवास त्रासदायक वाटत नव्हता. त्यांना या वादळाचे भय कमीत-कमी जाणवले, किमान कस्तुर आणि इतर प्रवाश्यांसारखे ते भ्याले नव्हते. अशी वादळे जणू काही त्यांनी अनुभवलेली होती. झेललेली होती. गुलाब गेंदांसारखी छातीवर वागवलेली होती.

संदर्भ

१) मारु जीवन ए ज मारी वाणी: (गुजराती)
श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' २४६;

२) सत्याचे प्रयोग: श्री मो. क. गांधी पृष्ठ १८३/१८४;

३) कित्ता पृष्ठ १८४/१८५

❖❖❖

## ११) दुसऱ्या वादळाची पूर्वतयारी

आगबोट मध्ये कुठे थांबणार नव्हती. अठरा दिवसांचा सलग असा प्रवास होता. सागरात मोठे वादळ आले होते. नाताळ यायचे होते. तिथे एका मोठ्या वादळाला तोंड द्यावे लागणार होते. त्याची ही पूर्वसूचना म्हणावी की काय? अजून तीन-चार दिवसांचा प्रवास बाकी होता.

हिंदुस्तानात असताना गांधींनी 'पायोनियर' या वृत्तपत्राला एक मुलाखत दिली होती. ती छापून आली होती. रॉयटर या एजंसीने ती विकृत केली. तिकडे लंडनला पोहोचल्यावर तर ती अधिकच विकृत बनवली गेली. पुढे ती दक्षिण आफ्रिकेत पोहोचली. गांधी बोलले काय आणि पोहोचवले गेले काय? गांधींच्या बोटीच्या सोबत पर्शिया स्टीम नेव्हिगेशन कंपनीची 'नादरी' नावाची बोटही होती. दादा अब्दुल्ला तिचे एजंट होते. दोन्ही बोटी डर्बन बंदरावर येऊन पोहोचल्या. आरोग्याचे कारण पुढे करत बोटींना धक्क्यावर पोहोचू दिले नाही. या दोन्ही बोटींना क्वारंटाईनमध्ये राखण्यात आले. आता कोरोनामुळे क्वारंटाईन हा शब्द खूप प्रचलित झाला आहे. ही दुसऱ्या वादळाची पूर्वतयारी होती. गांधींना जमिनीवर पायसुध्दा ठेऊ न देण्यासाठी गोरे प्रतिबध्द होते.

कस्तुरला हे सारे माहित नव्हते. माहित असायचे काही कारणही नव्हते. गांधींना ही माहिती होती. दादा अब्दुल्लांकडून त्यांना ही माहिती मिळाली होती. गोऱ्यांच्या सभा सुरु होत्या. एकाहून एक जंगी सभा घेण्यात आल्या होत्या. दादा अब्दुल्लांना धमक्या दिल्या जात होत्या. आमिष दाखवले जात होते. दादा पक्के होते. ते धमक्यांना दाद देणारे नव्हते. बोटी परत कराव्यात असा दबाव वाढत होता. गोरे नुकसान भरुन द्यायला तयार होते. दादांच्या पेढीवर अब्दुल करीम हाजी आदम होते. त्यांनी प्रतिज्ञा घेतली होती. वाटेल ते नुकसान सोसायचे. बोटी बंदरात आणायच्यात. उतारुंना उतरुन घ्यायचे.

अब्दुल करीम सेठ मोहनदासना पत्र पाठवत होते. काही मित्र भेटत होते. डर्बनमध्ये द्वंद्व युध्द जुंपले होते. एका बाजूला मूठभर गरीब बापडे हिंदजन होते. त्यांचे हाताच्या बोटांवर मोजता येण्याजोगे इंग्रज मित्रही होते. दुसरीकडे गोरे होते. गोरे द्रव्यबळाने समृध्द होते. हिंदजन करार करुन उदरभरण करणारे होते. गोरे प्रचंड बाहुबली, कायदे पंडित होते. हिंदजन दुबळे, अंगठे बहाद्दुर होते. गोरे उच्च विद्या विभूषित होते तर हिंदजनाना आपली सही सुध्दा करता येत नव्हती. गोऱ्यांचे संख्याबळ अफाट होते तर हिंदजनांची संख्या मात्र नगण्य अशी होती. गोरे सर्वसत्ताधीश होते. त्यांना सत्ताबळाची साथ होती. हिंदजन करार करुन गेलेले मजूर होते. त्यांना ना कुणी वाली, ना कुणी हितचिंतक. गोऱ्यांना नाताळ सरकारची उघड-उघड मदत होती. हिंदजनांचे रास्त म्हणणे सुध्दा ऐकणारे कुणी नव्हते. मिस्टर हॅरी एस्कंब मंत्रीमंडळात होते. तेथील कर्ते-धर्ते होते. त्यांचा खुला सहभाग होता. सभांमधून मार्गदर्शन होते.

गांधी अजून डर्बन बंदरावर उतरायचे होते. त्यापूर्वी 'कुरलँड' स्टीमरवर 'नाताळ एडव्हर्टायझर' चे प्रतिनिधी जाऊन पोहोचले. त्यांनी गांधींची दीर्घ मुलाखत घेतली होती. यात खूप आडवे-तिडवे असे अडचणीत आणणारे अनेक प्रश्न विचारले. त्या मुलाखतीत विचारलेला एक प्रश्न असा होता. हिंदच्या मुलाखतीला जाण्याचा त्यांचा प्रमुख हेतु काय होता? या प्रश्नाला गांधींनी स्पष्ट उत्तर दिले. ते म्हणाले की त्यांचा हेतु आपल्या पत्नीला, मुलांना आणि आप्त-स्वकीयांना भेटण्याचा होता. सात वर्षे दरम्यान त्यांना त्यांचा वियोग सहन करावा लागला होता.[१]

आगबोट क्वारंटाईन म्हणजे विटाळात होती. याचे एकमेव कारण आरोग्य नव्हते. एजंटाला धाकदपटशा दाखवला जात होता. उतारुंना धमक्या दिल्या जात होत्या. 'परत जा बऱ्या बोलाने. अन्यथा सागरात बुडवून मारु.' असा धमकीचा सूर होता. 'माघारी फिरलात तर परतीचे भाडे देऊ.' अशी लालुचही दाखवली जात होती. गांधी हे सारे जाणून होते. ते उतारुंमध्ये फिरत होते. धीर देत होते. दुसरी बोट होती 'नादरी'. तिथेही निरोप पाठवत होते. उतारु शांत राहिलेत. त्यांनी हिंमत दाखवली.

डर्बनमधील गोंधळाचे कारण गांधी होते. त्यांच्यावर मुख्यत: दोन आरोप होते. एक म्हणजे त्यांनी हिंदुस्तानात जाऊन गोऱ्यांची नालस्ती केली. ही निंदा निराधार होती. दुसरा आरोप मोठा होता. गांधींचा इरादा चांगला नव्हता. ते हिंदी लोकांनी नाताळ प्रांत भरुन टाकू इच्छित होते. यासाठी हिंदजनांना आणत होते. 'कुरलँड' व 'नादरी' या दोन बोटी बंदरात उभ्या होत्या. बोटीत हिंदजन होते.

गोऱ्यांच्या आरोपात काहीही अर्थ नव्हता. गांधी तिहेरी अडचणीत सापडले होते. एक म्हणजे दादा अब्दुला मोठ्या नुकसानीत आले होते. सर्व उतारुंचे जीव धोक्यात होते. गांधींचे कुटुंब संकटाच्या छायेत होते. ते निरपराधी होते. ते नाताळात हिंदजनांना कसे काय आणू शकत होते? 'नादरी' वरील प्रवाशांना ते ओळखत नव्हते. 'कुरलँड' वर त्यांचे कुटुंब फक्त परिचित होते. इतर शेकडो उतारु होते. त्यांचा परिचय त्यांना नव्हता. यापूर्वी त्यांनी आपले मत नाताळात मांडले होते. ते त्यांचे गोऱ्यांविषयीचे प्रामाणिक मत होते. हेच मत त्यांनी हिंदुस्तानात मांडले होते. आपल्या मतांविषयी ते ठाम होते. याविषयी त्यांच्यापाशी ढीगभर पुरावे होते.

गांधींच्या लढ्याला व्यापक परिमाण होते. गोऱ्यांची विशिष्ट संस्कृती होती. त्या संस्कृतीचे ते प्रतिनिधी होते. त्या संस्कृतीचे समर्थक होते. त्या संस्कृतीविषयी गांधींना किळस वाटू लागली होती. वेळ पुढे सरकत होती. विटाळाची मुदत लांबत चालली होती. त्या खात्याचा अंमलदार होता. त्याला विचारले तर त्याने कानांवर हात ठेवले. 'ही गोष्ट काही माझ्या अधिकार कक्षेत नाही. मी हुकूमाचा बंदा. सरकार मला हुकूम करील मग मी प्रवाशांना उतरु देईन.'असे तो म्हणाला होता. शेवटी निर्वाणीचा खलिता आला. खलिता गांधींसाठी होता. उतारुंसाठीही होता. दोघाना धमकी दिली गेली होती. धोका प्राणांवर बेतला होता. दोघे ठाम होते. नाताळ बंदरात उतरायचा त्यांचा हक्क होता. ते हक्काला चिकटून होते. त्यांनी आपला निश्चय कळवला. ते बलिदानाला सिध्द होते.

बोट बंदराला लागली. 'झाला बाई एकदाचा प्रवास. आला गाव.' असे मनोमन म्हणत कस्तुरने सुटकेचा नि:श्वास सोडला. 'आता उतरायचे ना खाली?' तिने जणू स्वत:ला विचारले. एकदा जमीनीवर उतरलो म्हणजे मिळवली. तिचे मन सांगत होते. तिच्या डोक्यात वादळ घोंगावत होते. 'हा दक्षिण आफ्रिका आहे. इथल्या बंदरावर सर्वांची आरोग्य विषयक तपासणी होते.' कुणीतरी माहिती पुरवली. 'हा आणखी काय पण बाई ताप?' ती मनाशी बोलली. सागरी प्रवास होता ना. प्रवासात कुणाला साथीचा रोग तर नाही ना लागला? ती तपासणी होते. असा रोगी आढळला तर बोटीवर सूतक येते. ती मग सुतक्यासारखी बाजूला उभी रहाते. सर्वांची मग कसून तपासणी केली जाते. 'काय पण बाई एक-एक.' ती मनाशी पुटपुटली. तिला आठवले की बरोबर आहे. आपण मुंबईचा किनारा सोडला. तिथे प्लेगची लागण होती ना? यामुळे ते सूतक तर नडायचे ना? गांधींचेही असे मत पडले. ती राजी झाली. बोट बंदरावर थांबली. त्यावर पिवळा झेंडा फडकू लागला. डॉक्टरांची तपासणी आटोपल्यावर ते मोकळीक देतील मग पिवळा झेंडा उतरवतील मगच उतारुंच्या आप्तेष्टांना आगबोटीवर येण्याची परवानगी मिळेल. डॉक्टर आलेत. त्यांनी तपासणी केली. पाच दिवसांचे सुतक जाहीर झाले. अखेरीस तेवीस दिवसांनी १३ जानेवारी १८९७ रोजी आगबोटीला मोकळीक मिळाली. उतारुंना उतरण्याचा हुकूम झाला.

नवऱ्याच्या परत येण्याचे काही चिह्न दिसेना. इतर उतारु उतरत होते. काही वेळ लोटला. आता बहुतांश प्रवासी खाली उतरले होते. लेकरे उतावीळ होती. कस्तुरचे मन नाना शंका-कुशंकांनी त्रस्त झाले.

गांधींनी कस्तुरला समजावून सांगितले होते.

"आता मार्गात काही दगा-फटका नाही. आंदोलक गोरे घरोघरी निघून गेले आहेत. एका गाडीची व्यवस्था झाली आहे. तुम्ही सारे त्या गाडीत बसा. माझे मित्र आहेत. जीवन रुस्तुमजी. तुम्ही तिथे पोहोचा. ते भले गृहस्थ आहेत. तिथे तुम्ही सारे सुरक्षित असाल." गांधींनी बायकोला सांगितले.

कस्तुरला हे मान्य नव्हते. ती अशा भयद प्रसंगी नवऱ्याला एकटे सोडू इच्छित नव्हती.

'मुले जाऊ द्या की गाडीत. मी तुमच्यासोबत पायी चालत येईन.' कस्तुरने निर्धाराने सांगितले.

'मुले कशी एकटी जातील? तो नवा परिवार आहे. तू त्यांच्यासोबत निघायला हवे.' गांधींनी सांगितले.

गांधी लॉटनसोबत चालू लागले. कस्तुर लेकरांसोबत रुस्तुमजींकडे निघाली होती. तिचा प्रवास सुखरुप होता. गांधींची वाट काट्या-कुट्यांची होती. त्या त्रासाचा तिच्या आयुष्यावर खोल ओरखडा उठला. तिचे आंतर्बाह्य विश्व ढवळून निघाले. तिचा नाइलाज झाला. सारे काही बरोबर नाही हे तिला कळत होते. नवरा संकटात आहे. आपण त्याची सोबत सोडायला नको. असे तिचे साधे गणित होते. मुलांना अगदी अनोळखी घरात सोडणेही चुकीचे होते. तिची द्विधा मनस्थिती झाली. कायच करावे? काय करु नये? तिचे मन भयकातर झाले. नवऱ्याचे हे कोण पारशी मित्र? आपली ना देख ना ओळख. ना परिचय ना नाते? ती भांबावून गेली. हे सारे तर आपल्या नवऱ्यालाही कळतच असेल ना? तिने क्षणभर विचार केला. लेकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न होता. तिने मनाचा हिय्या केला. ती तयार झाली. लेकरांसोबत गाडीत जाऊन बसली. जहाज भूतासारखे समुद्राच्या छातीवर तरंगत होते. नवरा जहाजाच्या डेकवर उभा होता. आपल्या परिवाराकडे एकटक बघत होता. इकडे गाडी चालु लागली. कस्तुरच्या मनात विचार चक्र गरगरु लागले. वाट सोपी नाही. या वाटेवरच चालावे लागणार आहे. वाटेवर काटे होते. फुले समजून ती पुढे निघाली होती. कस्तुर आणि मुले रुस्तुमजींकडे निघालीत. त्यांचे घर दोन मैल अंतरावर होते. सारे सुखरुप पोहोचले. रुस्तुमजी डर्बनचे प्रसिध्द व्यापारी होते. ते गांधींचे जुने मित्र व अशीलही होते.

दक्षिण आफ्रिकेत वातावरण खूप तापले होते. हिंदजनांना विरोध सुरु होता. या कामी दोन संघटना पुढे आल्या होत्या. एक होती 'युरोपियन प्रोटेक्शन एसोसिएशन' (यूरोपियन सुरक्षा मंडळी). दुसरी होती 'कॉलोनियल पेट्रिएटिक युनियन' (संस्थानिक देशभक्त संघ). या संघटनाना वृत्तपत्रांचा भरघोस पाठिंबा होता. नाताळ सरकारची संपूर्णपणे सहानुभूती होती. वातावरणात हिंदजनांच्या विरोधात विद्वेष पसरवला गेला होता. दादा अब्दुल्ला अर्ज-विनंत्या करत होते. त्याचा काही विशेष उपयोग होताना दिसत नव्हता. प्रवाशांना बंदरातच डांबून ठेवायचे प्रयोग जारी होते. गौर जनांची चळवळ अधिक उग्र स्वरुप धारण करत होती. गौरवर्णियांचे काही आक्षेप होते. दोन्ही बोटींमध्ये आठशे लोकाना घेऊन गांधी आले आहेत. प्रचारासाठी एक छापखाना सोबत आणला आहे. सोबत अनेक बॅरिस्टर्स आहेत. यातला एकही आक्षेप खरा नव्हता. आक्षेप घेणाऱ्या टोळ्या विखुरल्या. दोन तास उलटले. सारे उतारु होड्यांमध्ये बसून किनाऱ्यावर आले.

गांधी बीचग्रोव भागात रहात. तिथे त्यांचे शेजारी होते हेरी एस्कंब. ते नाताळ सरकारात एटर्नी जनरल होते. त्यांनी कॅप्टन मिल्नेमार्फत निरोप पाठवला होता. दिवस ढळल्यावर गांधींनी बोटीतून खाली उतरावे. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी एका अंमलदारावर सोपवण्यात आली आहे. गांधींनी ही सुचना मान्य केली. या घटनेला अर्धा तासही लोटला नव्हता. श्री फ्रेडरिक लॉटन लांबून येताना दिसले. ते दादा अब्दुल्ला कंपनीचे कायदेशीर सल्लागार होते बघता-बघता ते बोटीजवळ येऊन पोहोचले. मिस्टर लॉटन हे डर्बनमधील सुप्रसिध्द वकील होते. त्यांनी गौरवर्णीयांच्या वर्तनाला गैर ठरवले. ते एक सच्चे मित्र होते. मनसुखलाल हिरालाल नाझर त्यावेळी होते. ते हुशार आणि बहादुर होते. त्यांनी योग्य तो सल्ला दिला. गांधींनी अंधार झाल्यावर येऊ नये. ते काही चोर-गुन्हेगार नाहीत. त्यांनी असे नाताळमध्ये यावे हे काही लॉटन यांना मान्य नव्हते. ते स्वत: हिंमतवान गृहस्थ होते. धिप्पाड शरीराचे होते. त्यांनी गांधींना कळवले की तुम्ही जर मरणाला भीत नसाल तर लगेचच माझ्यासोबत यावे. आता गर्दी ओसरली आहे. काही जोखिम नाही. तुमच्या कुटुंबाला गाडीत जाऊ द्या. आपण दोघे मात्र चालत रस्त्यावरून जाऊ या.[२]

या हल्ल्याची तपशिलवार कथा गांधींनी लिहिली आहे. ते लिहितात की संध्याकाळची वेळ होती. चार-साडे चार वाजले असावेत. आकाशात तुरळक ढग होते. सूर्य पूरेसा झाकला गेला नव्हता. गर्दीने गांधींना ओळखले होते. त्यांच्यावर हल्ला सुरु झाला होता. गर्दी आक्रमक झाली होती. गांधींवर मारा सुरु झाला होता. हा मारा शिव्यांचा होता. दगडा-धोंड्यांचा होता. कुजक्या अंड्यांचा होता. लाथा-बुक्क्यांचा होता. कुणी

थप्पड मारली. कुणी ठोसा लगावला. गांधी भोवळ येऊन खाली कोसळणार होते. त्यांनी प्रसंगावधान राखले. एका घराच्या अंगणाची जाळी घट्ट धरुन ठेवली. इतक्यात नवल वर्तले. डर्बनच्या पोलिस सुपरिंटेंडेंट यांच्या पत्नी मिसेस जेईन येत होत्या. त्यांच्या हातात छत्री होती. त्यांनी ती छत्री गांधींच्या रक्षणार्थ उघडली. गांधींचे रक्षण करण्याच्या इराद्याने त्या गांधींच्या बाजूने चालू लागल्या. काही हिंदी युवकांनी हे दृश्य बघितले. ही बातमी लागलीच पोलिस सुपरिंटेंडेंट यांच्या कानावर घातली. पोलिस पार्टी मदतीला धावून आली. पोलिस ठाणे मार्गातच होते. जेईन मॅडमची छत्री कामी आली. मॅडमना घाव लागू नये म्हणून गांधींना कमी मार लागला. सारे पोलिस ठाण्यातच जाऊन पोहोचले. गांधींना पोलिस चौकीतच थांबून रहाण्याचा आग्रह झाला. गांधींनी ते काही मान्य केले नव्हते. आता गांधींना सुरक्षा कवच होते. ते रुस्तमजींच्या घरी सुखरूप पोहोचले. पाठीवर रट्टे बसले होते. एके ठिकाणी रक्त आले होते. घरात शांतता होती. बाहेर गोऱ्यांनी घराला वेढा दिला होता. आगडोंब उसळता होता. सूर्यास्त झाला. हळूहळू अंधाराचे साम्राज्य पसरले. बाहेर हजारो लोक जमले. त्यांचा आरडा-ओरडा सुरुच होता. त्यांचा स्वर टिपेला पोहोचला होता. 'गांधीला आमच्या ताब्यात द्या.' आरोळ्या उसळत होत्या. परिस्थिती आटोक्यातली नव्हती. हे सुपरिंटेंडेंटला कळले. ते स्वत: तिथे येऊन पोहोचले.[३]

गांधी रुस्तुमजींच्या घरी जाऊन पोहोचले होते. तोवर रात्र होत आली होती. 'कुरलँड' बोटीवरील डॉक्टर दाजी बरजोर तिथे होते. त्यांनी सुश्रूषा केली. जखमा तपासल्या. मुका मार लागला होता. रुस्तुमजी शेठच्या घरासमोर गौरवर्णीय हजारो आक्रमणकारी गोळा झाले होते. ते क्षुब्ध होते. ते कुणाचेही काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हते. पोलिस सुपरिंटेंडेंटने एक युक्ती केली. आपल्या एका अंमलदाराला बोलावले. त्याला हुकूम केला. हिंदी व्यापाराचे रुप घ्यायला लावले. त्याने गांधींची गाठ घ्यावी. गांधींना सुरक्षेचा विचार करायला सांगावे. गांधींना त्यांच्या मित्राचे रक्षण करायला हवे. त्याच्याकडे उतरलेल्या पाहुण्यांची काळजी वहायला हवी. आपल्या पत्नी व मुलांचे हित जोपासायला हवे. तिथल्या मालमत्तेचे रक्षण करायला हवे. यासाठी त्यांनी हिंदी शिपायाचा वेष धारण करावा. इथून शांतपणे निघावे. असे गांधींना समजावून सांगावे. आता मात्र गांधी अडचणीत आले. संकट प्रत्यक्ष डोळ्यांसमोर येऊन उभे ठाकले होते. दुसरा पोलिस अधिकारी सल्लागारही मित्रच होता. त्याने गुपचूप पळ काढायचा सल्ला दिला. गांधींनी तो मान्य केला. एक तर स्वत:च्या प्राणांवर संकट होते. मित्र व त्याची मालमत्ता असुरक्षित होती. कुटुंबीजन संकटात होते. यातले एक-एक संकट भीषण होते. तिथून पळ काढायला लावायला पुरेसे होते. तिथे तर तिन्ही संकटे एक साथ होती. पळण्याची तयारी करावी लागली. जखमा विसरणे भागच होते.

गांधींनी शिपायाचा वेष केला. माथ्यावर पितळी थाळी ठेवली. मद्रासी शैलीचा फेटा बांधला. त्यांच्या सोबत पोशाख बदललेले दोन डिटेक्टिव्ह पोलिस होते. शेजारच्या गल्लीतून ते पारशीच्या गोदामात शिरले. तिथे गोण्यांची रास रचलेली होती. अंधारात ती ओलांडली. दुकानातील बाहेरच्या दारातून बाहेर पडले. लोकांच्या जमावातून निघून गेले. गल्लीच्या दुसऱ्या टोकाला एक गाडी त्यांची वाट बघत होती. तिच्यात बसून ते पोलिस ठाण्यात सुखरुप जाऊन पोहोचले. ही खबर पोलिस सुपरिंटेंडेंट अलेक्झांडर यांना कळली. त्यांनी त्या उसळत्या गर्दीला सांगितले 'गांधी इतरत्र निघून गेले' अशी बातमी दिली. त्यांच्यावर कुणी विश्वास ठेवायला तयार नव्हता. 'आता आम्ही हे घरच जाळून टाकू' असे ते म्हणू लागले होते. पोलिस सुपरिंटेंडेंटने त्यांना सांगितले "तुमच्या मताला येतील अशा तीन चार जणांची एक कमिटी नेमा. ते घरात जाऊन गांधींना हुडकून काढतील. जर तिथे गांधी नसलेत तर शांतपणे घरी जा." कमिटी नेमली गेली. कमिटीने रुस्तुमजींच्या घरचा काना-कोपरा धुंडाळून काढला. अर्थात्च तिथे गांधी नव्हते. काही एक नुकसान न करता ती उसळलेली गर्दी आपापल्या घरी निघून गेली होती. ही १३ जानेवारी १८९७ ची घटना आहे.[४] पोलिस अधिकारी अलेक्झांडरने समयसूचकता दर्शवली होती. गांधींचा जीव वाचला होता.

लंडनहून मंत्री चँबरलेनची तार आली. ते वसाहत खात्याशी संबंधित मंत्री होते. 'हल्ला करणाऱ्यांवर खटला भरा. तुम्हाला न्याय मिळेल.' हा होता तारेचा मजकूर. एस्कंबने गांधींना आपल्याकडे बोलाऊन घेतले. गांधींना दुखापत झाली होती. एस्कंबने दिलगिरी व्यक्त केली. म्हणाले "तुम्ही माझे म्हणणे मानले नाही. लॉटनचा सल्ला मानला. साहस केले. माझ्या निरोपाला मान दिला नाही. हा प्रसंग ओढवून घेतलात. तुम्ही हल्लेखोरांना ओळखू शकता का? त्यांना पकडू या. त्यांच्यावर खटला भरु या. मी यासाठी तयार आहे. चँबरलेनचेही असे म्हणणे आहे. म्हणणे नाही फक्त मागणी आहे."

गांधींनी उत्तर दिले की त्यांना कुणावरही खटला चालवायचा नाही. ते शांत राहणार होते. हल्लेखोरांपैकी एक-दोघांना ते ओळखू शकले असते. त्यांना शिक्षा झाली असती. यातून गांधींना काय मिळणार होते? ते हल्लेखोरांना दोषीही मानत नव्हते. त्यांना भ्रमित केले गेले. त्यांचा गैरसमज झाला. ते संतापले. यात काय नवल? खरे दोषी वरचे लोक होते. आता सल्ला देणारे होते. त्यांनी लोकांना योग्य मार्गाने नेले नव्हते. रॉयटरच्या तारेलाच खरे मानले होते. शहानिशा केली गेली नव्हती. गांधींना कुणावरच खटला चालवायचा नव्हता. खरी गोष्ट कधी तरी कळेल. लोकांना सत्य कळेल. त्यांना पश्चात्ताप होईल. गांधींना एवढे पुरेसे होते.

हे एस्कंबने ऐकले. हे न पटणारे सत्य होते. गांधी म्हणाले की त्यांचे विचार ठाम आहेत. त्यांना कुणाशीही चर्चा करायची नाही. वेळही मुळीच घ्यायचा नाही. त्यांना कुणावरही खटला भरायचा नाही. ते तिथेच हे सारे लिहून द्यायला तयार होते. गांधी एवढे बोलून थांबले नाहीत. लागलीच योग्य मजकुराचे पत्र लिहून दिले. सारे लेखी स्वरुपात दिले. एस्कंबचा असा सल्ला होता. गांधींनी तो मानला.

कस्तुर या प्रसंगाची साक्षीदार होती. ती विचार करत होती. विचार करत राहिली. आगबोटीतून उतरल्यापासून रुस्तुमजींच्या घरी येईपर्यंतचा प्रवास तिला आठवला. तो सुखरुप होता. तिच्यासाठी मात्र गोंधळाचा होता. दुविधेचा होता. विस्मयाचा होता. अविश्वसनीय वाटावा असा होता. तिने रुस्तुमजींच्या घरात प्रवेश केला. लेकरांना पाणी प्यायला दिले. नवऱ्याची वाट बघू लागली. बाहेर कोलाहल वाढू लागला होता. काही मिनिटातच गर्दी वाढली. रुस्तुमजींच्या परिवारासोबत कस्तुर वरच्या मजल्यावर गेली. जनांचा उग्र आक्रोश तिथेही ऐकू येत होता. लेकरे रडायला लागली होती.

गांधींचे निवेदन स्पष्ट होते. चँबरलेनचे म्हणणे त्यांनी नाकारले. एस्कंबच्या म्हणण्यालाही मानले नाही. डर्बनच्या वृत्तपत्रात ही बातमी झळकली. कस्तुरला आपल्या नवऱ्याचा हा अनोखा परिचय होता. प्रेमाने प्रेमाचे महाद्वार उघडते. द्वेषाने द्वेष वाढतो. क्षमेने आत्मप्रतिष्ठा वाढते. दक्षिण आफ्रिकेतले कस्तुरचे हे पहिले पाऊल होते. तिला आत्मसंयमाचा पाठ शिकायला मिळाला. गांधी दोन दिवस पोलिस ठाण्यात राहिले. अलेक्झांडरच्या सुरक्षेत राहिले. पाहुण्यासारखे राहिलेत. अलेक्झांडर दंपतीने गांधींची काळजी वाहिली.

संदर्भ


१) मारु जीवन ए ज मारी वाणी : (गुजराती)श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ २५६ ;

२) कित्ता पृष्ठ २५३ आणि 'नाताळ मर्क्युरी' दिनांक १९ जानेवारी १८९७;

३) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी परिशिष्ट पहिले 'डर्बनमधील हल्ला' पृष्ठ ४९५ ते ४९७;

४) कित्ता पृष्ठ ५०० / ५०१


❖❖❖

## १२) कांचनमृगाचा चकवा

कस्तुरने पाहिलेले दक्षिण आफ्रिकेतले जीवन कमालीचे बकाल होते. तो अनोळखी प्रदेश होता. चाबकाचे फटकारे उघड्या पाठीवर झेलणारे गिरमिटे. परवान्याशिवाय श्वास न घेऊ शकणारे गिरमिटे. भूकेचा आगडोंब पोटात उसळलेले गिरमिटे. जळून होरपळून गेलेली त्यांची स्वप्नांची दुनिया. गवताने शाकारलेल्या बुटक्या छतांच्या झोपड्या. मातीच्या भिंती. खिडक्यांऐवजी झरोके. दाटी-वाटीने उभ्या असलेल्या कर्म दरिद्री वस्त्या. धुराने काळवंडून गेलेली सूपाएवढी कोळीष्टके. ओल असलेले अंगण. घाणीचे अखंड साम्राज्य. कोपऱ्यातली हरकामी मोरी. तिथेच पडलेला खरकट्या भांड्यांचा ढीग. कळकट ओल्या कपड्यांचा गट्ठा. लघवी करणारी बालके. मागच्या-पुढच्या गल्ल्यांमध्ये साचलेले-तुडुंबलेले काळेशार पाणी. त्यातल्या मच्छरांच्या वसाहती. वळवळत्या अळ्या. सरपटत्या ओंगळ किड्यांची दुनिया. जगणारी माणसे. जगण्यासाठी झुंजणारी माणसे. सारे जणू काही नकार यात्रेचे वारकरी. हे का जीवनगान म्हणायचे? छे, हे तर मरणगान होते. मरणातून वाचायला हे जीव इथे आले होते. इथे या प्रवेशद्वाराशीच मरणदूत त्यांची वाट बघत होते. भय इथला स्थायीभाव होता. गांधींनी या दुनियेचा परिचय तिला करुन दिला होता. दु:ख आणि वेदनेच्या धाग्याने बांधली गेलेली ही नि:शब्द प्रजा. हे अनाम जीव. ही जनसत्ता सिंहासनाच्या विरोधात बुलंदीचा शंखनाद करत होती. कस्तुर थक्क होऊन गेली होती.

गांधी डर्बनला आले. त्याकाळात त्यांचे मन संघर्षरत राहिले होते. संघर्ष होता हिंदजनांच्या हितरक्षणासाठीचा. हिंदजनांवर लादल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या अन्याय-अत्याचारांच्या विरोधातली झुंज होती ती ! गांधी अंतर्बाह्य झुंजत होते. आत सुरु असलेला संघर्ष विवेकाधारित होता. बाहेर सुरु असलेला लढा कायदेशीर होता. आंतरिक लढा मन:स्थितीशी होता. बाह्य लढा परिस्थितीशी होता. अंत:संघर्ष गुह्य आणि सूक्ष्म होता. बाह्य संघर्ष स्पष्ट व प्रकट होता. गांधी साधनेचे हे दोन पंख होते. कस्तुर या संघर्ष यात्रेत सहभागी होती. केवळ साक्षीदारच नव्हे तर साथीदारही होती. भागीदारही होती. कस्तुर या तमाम चळवळींच्या किमान परिघावर आहे. १९०६ सालापासून मात्र ती या चळवळीचा मध्यबिंदू बनून गेली आहे. ती संघर्ष कथा पुढे वाचू !

आता गांधींच्या समवेत त्यांचे कुटुंब होते. वकिली उत्तम चालली होती. दक्षिण आफ्रिकेत येताना त्यांना वार्षिक एकशे पाच पौंड मिळाले होते. त्याच्या किमान पन्नास ते साठ पट अधिक द्रव्य त्यांना आता मिळत होते. मुंबईला ममीबाईच्या केसच्या प्रसंगी लटपटणाऱ्या अवस्थेत ते हास्यास्पद ठरले होते. आता ते कोर्टात उभे ठाकले म्हणजे निश्चितच जिंकतील अशी खात्री वकील मंडळींना होती एवढेच नव्हे पण खुद्द न्यायाधीशानाही होती. दक्षिण आफ्रिकेतल्या दोन प्रतिष्ठित शहरांमध्ये त्यांची घरे होती. त्यांच्या दिवाणखान्यात प्रवेश केल्यावर गौरवर्णियांनाही भारावल्यासारखे होऊन जायचे. शाकाहारी खानपान होते. यात कधी त्यांनी कंजूषपणा दाखवला नव्हता.

विसावे शतक. अखेरची दोन दशके. जवळपास दीड दशक ते दक्षिण आफ्रिकेतच होते. त्यांच्या अंत:करणाला प्रेयापेक्षा श्रेयाचाच अधिक स्पर्श झाला होता. वाटा आणि वळणातील काटे-कुटे तुडवत ते निघाले होते. ऊन-पाऊस, वादळ-वारा अंगावर झेलत होते. अस्मानी-सुलतानीशी हसत-खेळत सामना करत होते. त्यांच्या आजूबाजूच्या लोकानाही थबकता-थांबताना बघितले की ते बळ पुरवत होते. थकल्या-भागल्यांना विश्रांतीच्या जागा सुचवत होते. पुढे चालत रहाण्याला प्रेरणा देत होते. आपल्या शिक्षणासाठी थोरल्या भावाने खर्च केला होता. त्यांनी भरपूर अधिक रकमेची परतफेड केली होती. दक्षिण आफ्रिकेतील हिंदजनांनाच आप्त-स्वकीय मानले होते. त्यांच्यासाठी मनमुक्त व्यय केला होता. पत्नी व लेकरांच्या हितासाठी काढलेला विमाही रद्द केला. हिंदजनांसाठी खर्च केला. 'इंडियन ओपिनियन' साठी द्रव्य वेचले. गिरमिट्यांच्या हितासाठी खिसा रिकामा केला. कमाईचे मुख्य साधन वकिली होते. गरीबांच्या केसेस फी न घेता लढल्यात.

जाहीर सेवाकार्याचे शुल्क नाकारले. अखेर वकिली व्यवसायालाच तिलांजली दिली.

हा साधना काळ होता. कस्तुर याकाळात त्यांच्या सोबत होती. याकाळात गांधींनी जगाला चमत्कृत केले आहे. त्यांच्या आसपासच्या साधकांनी जगाला परिवर्तनाची अभिनव वाट दाखवली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण कायापालट झाला होता. चारित्र्यात तेजस्वीता आली होती. त्यांचा दृष्टिकोण बदलला होता. कार्यपध्दतीत परिवर्तन आले होते. मनात बदल झाला होता. एकूणच व्यक्तिमत्व विलक्षण बदलले होते. मानवजातीला सत्याग्रहरुपी आगळी जीवनदृष्टी लाभली होती. गांधींचे हे परिवर्तन वैयक्तिक स्वरुपाचे होते आणि खरे तर सामुदायिकही होते. ‘स्व’ची भिंत ओलांडून ‘सर्व’च्या क्षितिजाला ते स्पर्श करु बघत होते.

कस्तुर सुगरण होती. गांधींची भोजनावर प्रीत होती. ते रसिक खवैये होते. खावे आणि खाऊ घालावे त्यांच्यासाठी रसप्रद विषय होता. सूक्ष्म स्वाद त्यांना कळायचे.  स्वादातले बदल त्यांना पारखता यायचे. हे कस्तुरच्या सहकार्याशिवाय कसे शक्य होते? पुढे त्यांची स्वादविषयक व्याख्या बदलली. जिह्वालौल्य कमी झाले. भरण-पोषण मोलाचे ठरले. भोजनाला सहजच सामाजिक भान आले. वेगळे परिमाण लाभले. सामान्यातल्या सामान्य व्यक्तिला मिळणारा आहार त्यांचा आहार बनला. साधा आणि सर्वांना परवडणारा आहार त्यांना तृप्तीदायक वाटू लागला होता. पाच पदार्थांपेक्षा अधिक अन्न पदार्थ आता त्यांच्या पानात दिसत नव्हते. या पदार्थात औषधांचाही समावेश होता. आहाराविषयी त्यांनी केलेले प्रयोग अतुलनीय होते. फिनिक्सला आल्यावर तर त्यांनी मीठ-मसाल्यांचा व साखरेचा त्याग केला. आश्रमातल्या बालकांना मात्र थेट डर्बनहून मिठाई मागवून स्वहस्ते वाटली होती.

ब्रह्मचर्य व्रताच्या मूळाशी त्यांनी आहाराचे मोल वर्णिले आहे. खरे सुख इंद्रियांच्या आनंदात नाही. आत्मानंदात आहे. हा शोध त्यांना लागला होता. मनाच्या या साधनाकाळात त्यांच्या रहाण्या-वागण्यात परिवर्तने आलीत. डर्बनमध्ये प्रविष्ट होताच कस्तुरच्या हातात जेवताना परत काटा-सुरी-चमचे आले होते. मुले आनंदाने उड्या मारत ते वापरीत असत. कस्तुरला या गोष्टींची मूळी सवयच नव्हती. गौरवर्णियांमध्ये स्वाभिमान टिकवून रहायचे होते. यासाठी वेषभूषाही त्यांच्यासारखीच करावी लागेल. असे गांधींचे मत होते. या मताशी कस्तुर काही फारशी अनुकूल नव्हती. तिला बदल करवुन घ्यावे लागले होते. आता ती पायात बूट-मोजे वापरायला लागली होती.

गांधींचे घर सर्वांसाठी खुले होते. याला कस्तुरची काही हरकत नव्हती. गांधींच्या मनात खळबळ सुरु होती. जीवन अधिक साधे असावे. सेवामय असावे. एके दिवशी एक अपंग आला. दारात उभा राहिला. त्याला महारोग होता. गांधींनी त्याला पाहिले. त्याला ‘काही खायला देऊ, मग देऊ या घालवून.’ असे काही त्यांना वाटले नाही. त्यांनी त्या रुग्णाला घरात प्रवेश दिला. एका खोलीत राखले. जखमा स्वच्छ केल्या. सुश्रूषा केली. हे काही फार दिवस चालणार नव्हते. चालले नाही. त्याला कायमचे घरात ठेऊन घेणे शक्य नव्हते. गिरमिट्यांसाठी एक इस्पितळ होते. तिथे त्याला पाठवले. कस्तुरची प्रतिक्रिया त्रासिक होती. घरातले सारे थकले होते. मुले बिथरली होती. कस्तुर एका वैष्णव जनाला बघत होती. दुसऱ्याची वेदना जाणणारा. परदु:खात उपकार करणारा. मनात अभिमानाचा किंतुही ऊरु न देणारा. गांधी वैष्णवांचा प्रतिनिधी होता. पुढे रुस्तुमजींच्या दानी वृत्तीने एक इस्पितळ उभारले गेले. गांधींनी रोज दोन तास वेळ काढला. नर्स वा कंपाउंडरचा कोर्स केला. हा कोर्स दीड-एक वर्षे चालला. हे सेवाकार्य शिकण्यासाठी त्यांनी वेळ काढला.

गांधींनी कपडे धुण्याचे तंत्र शिकून घेतले होते. न्हावी केस कापून देत नसायचा. ते काम स्वत: करुन त्यांनी आपले हसे करुन घेतले होते. काम मात्र सोडले नव्हते. रोजचा धोब्याचा खर्च वाचवला होता. आधी लहान-लहान कपडे धुऊन बघितले. केवळ खर्चच कमी झाला नाही. गांधींनी या कलेत नैपुण्य संपादन केले. जोहान्सबर्गमध्ये केलनबॅकचे कपडे धुवायला मागितले होते. केलनबॅक हे जर्मन वास्तुविशारद होते. त्यांनाही ही दीक्षा दिली. गांधींसोबत मग सारेच आलेत. आपापली कामे स्वत:च्या हातून करायची सवय करुन

घेऊ लागले. केलनबॅक कपडे धुण्याच्या कलेत पारंगत झालेत. गांधींनी स्वयंपाक कला आत्मसात केली. आचाऱ्यालाही निरोप दिला. बागकाम शिकून घेतले. माळीदादालाही नारळ दिला. याचा संबंध थेट कस्तुरशी यायचा. या साधनेचा स्पर्श शेजारच्याला लागल्याशिवाय कसा बरे राहील? तिच्या जीवनात साधेपणा आला.

या अनुभवयात्रेत कस्तुर सहधर्मचारिणी होती. तिच्या जीवनाचा अपूर्व विकास साधला गेला होता. या विकासयात्रेत गांधींची प्रयोगशीलता कारणीभूत होती. गांधी केवळ प्रयोगशीलच नव्हे तर प्रयोगवीर होते. कस्तुरने सुरुवातीला विस्मय व्यक्त केला मग विरोध केला. पुढे संमती दिली. तिच्या मनात श्रध्दा जागली. या कामाचे आकलन झाले. सहभागिता जागली. उभा ठाकला दृढ विश्वास आणि वज्र निर्धार ! पुढे तर पतीचे सिध्दांत तिचे स्वत:चे बनून गेले. त्या मूल्यांसाठी तिने जिवित्वाची बाजी लावली. बलिदानाला सिध्द झाली. ही सारी मोठी मनोरम कहाणी आहे. बदलत्या कालपटासोबत या कथेचे वेगवेगळे पैलू पुढे प्रकट होतील.

❖❖❖

## १३) मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

१८९७ चा जानेवारी महिना होता. गांधींसोबत तीन मुले होती. भाचा गोकुळ दहा वर्षाचा. थोरला हरीलाल नऊ वर्षाचा. धाकटा मणीलाल पाच वर्षाचा. यांच्या शिकायचा प्रश्न आला. यांना शिकवायचे कुठे? गांधी पुरुषप्रधान कुटुंबात जन्माला आले होते. त्यांचे बालपण तिथेच गेले होते. शिक्षणाची वाट चालताना वडिलांचे निधन झाले. मनात होते डॉक्टर व्हायचे. वडिलांना ते आवडले नसते. वडिलाना आवडेल अशी वाट त्यांनी निवडली. बॅरिस्टर व्हायचे ठरवले. घरातले निर्णय पुरुष घेतात. पुरुषांनीच घ्यायचे असतात. याविषयी तर्क-वितर्क करायला जागा नव्हती. त्यांच्या कुटुंबियांनाही हे मान्य होते. कस्तुर आणि बालकांवरही ते बंधनकारक होते. एवढेच नव्हे पण पुतण्यांवरदेखिल लागू पडणारे होते. गांधींचे चुलत भाऊ होते खुशालचंद. त्यांची तीन मुले होती छगनलाल, मगनलाल आणि जमनादास. या तिघांनीही गांधींना कुटुंबातले ज्येष्ठ म्हणून स्वीकारले होते. कस्तुरला एखादी गोष्ट मान्य नसली की ती अवश्य विरोध करायची. हरीलालचा विरोध तर विद्रोहाप्रत पोहोचला होता. इतर सारे मात्र गांधींचा शब्द झेलायला सिध्द होते. तत्पर होते.

मुलांना कुठे शिकवयाचे हा प्रश्न होता. गोऱ्या लोकांसाठी शाळा होत्या. तिथे ते मुलांना पाठवू शकत होते. ती मेहरबानी झाली असती. अपवाद म्हणून असे करणे योग्य होते. भारतीय मुले तिथे शिकू शकत नव्हती. भारतीय मुलांसाठी ख्रिस्ती मिशनच्या शाळा होत्या, नव्हत्या असे नाही. तिथे त्यांना मुलांना पाठवायचे नव्हते. तिथले शिक्षण त्यांना पसंत नव्हते. गुजराती त्यांची मातृभाषा होती. तिथे गुजरातीतून शिक्षण मिळणार नव्हते. इंग्रजीतून मिळणार होते. तमीळ वा हिंदी हा पर्याय होता. या भाषांच्या शुध्दतेची मात्र हमी नव्हती. शिक्षण मातृभाषेतच असावे असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी स्वत: मुलांना शिकवायचा थोडासा प्रयत्न केला. त्यांना शिकवयाची हौसही होती. कस्तुर शिकलेली नव्हती. नवऱ्याने लाख प्रयत्न केले होते. तिने शिक्षणाला नकार दिला होता. तिला आपली शिकवणी आठवली. गांधींच्या पसंतीला उतरेल असा गुजराती शिक्षक मिळू शकला नाही. गांधी विचारात पडले. कस्तुर काळजीत पडली. 'इंग्रजी शिक्षक हवा' अशी एक जाहिरात तयार केली. ती वृत्तपत्रात झळकली. कस्तुरचे समाधान झाले. शिक्षकाने नियमितपणे शिकवावे. थोडे शिक्षक शिकवील. जसे जमेल तसे थोडे गांधी शिकवतील असा विचार झाला. जाहिरात वाचून एक इंग्रज भगिनी आली. पगार सात पौंड ठरला. गाडे कसे तरी पुढे रेटले.

गांधी घरात गुजरातीत बोलत. कस्तुरशी गुजरातीतूनच बोलत. या मार्फत मुलांना थोडेसे गुजराती कळत असे. मुलाना शिक्षणासाठी परत हिंदुस्तानात परत पाठवून द्यावे हा एक उपाय होता. गांधी यासाठी काही तयार नव्हते. लहान मुलांनी आई-वडिलांपासून लांब रहायला नको असे त्यांना वाटायचे. घरे जर सुव्यवस्थित असली तर मुलांना सहजच शिक्षण लाभते. ते काही छात्रालयात शक्य नाही. यामुळे मुले बहुतांशी आई-वडिलांच्या सोबतच राहिलीत. भाचा आणि मोठा मुलगा हरीलाल यांना काही दिवस मायदेशी पाठवले होते. लवकरच परत बोलावून घेतले. मुलांच्या शिक्षणाविषयी गांधींनी काही प्रयोग केलेत. हे आजही साहसी वाटतील असे आहेत.[१] गांधींचे एक नवेच रुप कस्तुर बघत होती. आपल्याला शिकवताना आग्रही असणारा नवरा आता मात्र सौम्य होता. मुलांची काळजी वहात होता. आता तिला शिक्षणाचे महत्व पटले. आपण शिकलो असतो तर? असा प्रश्न मनात उभा ठाकला. ती निरुपाय झाली.

काळ असा चालला होता. एकदा हरीलाल हिंदुस्तानात शिकायला जायचे म्हणाला. त्याला अहमदाबादला शिकायचे होते. त्याने दक्षिण आफ्रिका सोडले. तो हिंदुस्तानात परत आला. अहमदाबादला शिकायला लागला. बाकी तीन मुले कुठल्याही शाळेत शिकायला गेली नाहीत. गांधींनी सत्याग्रहींसाठी एक शाळा काढली होती. या शाळेत ती शिकली. आपले शिक्षण विषयक प्रयोग अधूरे राहिले आहेत. हे तर गांधींना कळत होते. कस्तुर शांत-शांत होती. ती सारे बघत होती. नवऱ्याला मुलांसाठी वेळ अजिबात काढता येत नव्हता. त्याची कामे रोज वाढती होती. तो कमालीची धावपळ करायचा. जेवायच्या वेळा सुध्दा ठरलेल्या

नसत. याबाबत ती कुरकुर करायची. कुरबूर मात्र कधी होऊ दिली नाही.

गांधी काही मुलाना शिकवू शकत नव्हते. त्यांना वेळ नव्हता. “मुलाना आपल्यासमवेत अनुभवाचे ज्ञान मिळवता येते. त्यांना आपला सहवास मिळतो. साथ-संगत मिळते. स्वातंत्र्याचा वस्तुपाठ शिकता येतो. त्यांना काहीही करुन आपण जर शाळेत पाठवले ना तर हे ज्ञान त्यांना कदापि लाभणार नाही.” असे म्हणत गांधींनी बायकोला शिक्षणविषयक लांबलचक प्रवचन दिले. तिला खरे तर अशा प्रवचनांची आताशा सवय झाली होती. एकदा स्वयंपाकघरात ती भाजी चिरत होती. गांधी कणिक मळत होते. त्यांच्यात पुढील संवाद झाला होता. ‘थेट इंग्रजी भाषेतून मुलांना शिकवायला काय हरकत आहे.? अभ्यास नाही का पक्का व्हायचा त्यातून?’ कस्तुरने धीटाईने नवऱ्याला विचारले.

‘इंग्रजी भाषा शिकणे वेगळे आणि इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिकणे वेगळे. मुलांनी शिक्षण हे मातृभाषेतून घ्यायला हवे हे नक्की. मुलाना ते सोईचे ठरते.’ गांधी ठामपणे म्हणाले.

‘आपण त्यांना आवडणारी जीवनवाट निवडू दिली नाही. मुलांवर जबरदस्ती केली असे नाही का होणार?’ हा कस्तुरचा प्रांजळ प्रश्न होता.

‘याचा काही असा अर्थ होत नाही.’ गांधींनी तेवढ्याच ठामपणे उत्तर दिले होते.

असे प्रश्न गांधींना त्यांच्या काही मित्रांनीही विचारलेत, नाही असे नाही. भविष्यकालीन परिस्थितीने विचारले होते. हे प्रश्न त्यांनीही स्वत:ला विचारले हे महत्वाचे होते. पिता-पुत्र या दोन काठांवरील नदी बनून कस्तुर वहात होती. दोन्ही काठाना स्पर्श करत होती. तिला दोन्ही काठ सारखे होते. दोन्हीही काठ तिला भावसमृध्द करत राहिले होते. तिचा अधिक मुक्काम मात्र नवऱ्याच्या काठावर असायचा हे खरे. अधिक जवळीक नवऱ्याच्या काठाची असायची. कासावीशी मात्र मुलांच्या काठाबाबत असायची. असे दुहेरी ओझे तिने पुढे आयुष्यभर वागवले होते. अनेकदा चकार न काढता तिने सारे पत्करले होते.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ १९६ ते १९९.

❖❖❖

## १४) चल, निघ माझ्या घरातून

गांधी पुरुषप्रधान संस्कृतीचे प्रतिनिधी होते. ते सुधारणाविषयक नित्य नवे प्रयोग करत. स्वत: कसोटीवर चढत. कस्तुरला या अग्निदिव्यातून मार्ग काढावा लागत असे. तशी ती स्पष्टपणे धमकावून सांगणारी पत्नी होती खरी पण अनेकदा वरचष्मा तर घरधन्याचाच असतो ना? असा एकदा कसोटीचा प्रसंग आला. गांधींनी आपल्या आत्मचरित्रातून या प्रसंगाची चर्चा केली आहे. कस्तुर गरोदर होती. गांधी डर्बनमध्ये वकिली करत होते. या काळात त्यांचे अनेक सहकारी अनेकदा त्यांच्यासोबत रहात. यात हिंदू आणि ख्रिस्ती होते. प्रांतवार विचार केला तर गुजराती आणि मद्रासी होते. त्यांच्याबद्दल गांधींच्या मनात कधी आप-पर भाव जागला नाही. त्यांना ते आप्त-स्वकीय मानत. कधी कस्तुरने विरोध केला तर तिच्याशी भांडत.

१८९८ सालची ही घटना आहे. एक कारकून ख्रिस्ती होता. त्याचे नाव लॉरेन्स. तो घरात रहायचा. त्याचे आई-वडिल हरिजन होते. गांधींच्या घरची बांधणी पाश्चिमात्य पध्दतीची होती. या घरात मोरी नसते. मोकळे होण्यासाठी प्रत्येक खोलीत एक भांडे ठेवलेले असायचे. सकाळी ते उचलून स्वच्छ करावे लागायचे. हे काम काही नोकराचे नव्हते. ते घरधन्याचे काम होते. ते काम गांधी वा कस्तुरने करावे. घरात राहणारे कारकून खरे तर घरचे बनून जात असत. सहाजिक हे काम ते आपापले करत. हा ख्रिस्ती कारकून नवीन होता. त्याचे भांडे यजमानाला उचलावे लागायचे नाही तर मग यजमानीणबाईला तरी उचलावे लागायचे. इतर भांडी कस्तुर उचलायची. या कारकूनाचे भांडे उचलणे अवघड होते. हे उचलणे तिच्यासाठी जणू कडेलोट झाला होता. पती-पत्नीमध्ये तंटा उभा राहिला.

‘काही झाले तरी मी हे भांडे उचलणार नाही.’ कस्तुरने ठामपणे सांगितले.

‘ठीक, मी उचलतो. मग तर झाले.’ गांधींच्या या स्वरात उतावीळपणा होता.

कस्तुरची या गोष्टीलाही संमती नव्हती. दोघांमध्ये धूसफूस झाली. ती ते भांडे उचलणार नव्हती. नवऱ्याने ते उचलावे याला ती कबूल होत नव्हती. गांधी म्हणाले की हे बरोबर नाही. हे भांडे उचलावे लागेल. ती शांत होती. ठाम होती. बावीस वर्षे ती या माणसासोबत जगली होती, झुंजली होती आणि समर्पितही झाली होती. तरीही आता ती त्याच्यासमोर एकटी उभी होती. नवरा एखाद्या अपरिचित माणसासारखा भयावह रीतीने तिच्या समोर उभा ठाकला होता. तिला मनाविरुध्द वाटणारे एक काम करायला भाग पाडत होता. तिच्या आयुष्यातील हा निर्णायक क्षण होता. तिचे सुरक्षिततेसाठी जपलेले सारे मुखवटे गळून पडले. तिने सुरक्षिततेसाठी जोपासलेली सारी चिलखते क्षणार्धात झुगारुन फेकून दिलीत. तिला आज पारखून घ्यायचे होते की स्वत:शी प्रामाणिक राहून जगताना काय मोल द्यावे लागते? आपले काय होते? नातेसंबंधांचे काय होते? अस्मितेचे काय होते? आत्मप्रत्ययाचे काय होते? आत्मभान जागल्याची काय किंमत मोजावी लागते? कस्तुरचा हा सत्यापासून सत्यापर्यंतचा प्रवास होता. तिच्या नेत्रातून घळघळा आसवे ओघळत होती. गांधी जेवढे प्रेमळ होते तेवढेच निष्ठुर होते. ते स्वत:ला कस्तुरचे शिक्षकही समजत असत. अंध प्रेमाला वश होऊन तिला त्रास देत. कस्तुर पात्र घेऊन निघाली. तिचे असे संताप करत काम करणे गांधींना मान्य होणारे नव्हते. तिने हे काम हसतमुखाने करावे अशी त्यांची अपेक्षा होती.

‘कस्तुर, अशी आसवे गाळत ते भांडे उचलू नकोस. असला तंटा माझ्या घरात चालणार नाही. हे काम हसतमुखाने झाले तर माझे समाधान होईल.’ गांधी ओरडले. हे वाक्य बाणासारखे लक्ष्यावर लागले.

‘अडलेय माझे खेटर.’ कस्तुरचे चित्त विध्द झाले.

‘माझ्या घरात असली धूसफूस नाही चालणार. चल, चालू लाग माझ्या घरातून.’ गांधींचा संताप अनावर झाला.

“काय म्हणता? तुमचे घर? आणि माझे नाही की काय?’ कस्तुर आता पेटून उठली होती.

‘कस्तुर .. .. ..’ गांधींच्या अंत:करणातला ईश्वरांश निघून गेला. ‘हं, ऐका तर मग, हे जर तुमचे घर असेल तर ठेवा आपल्यापाशी. ही मी निघाले हे घर सोडून.’ कस्तुर तार स्वरात म्हणाली.

आगीत तूप ओतले गेले. भडका उडला. ते संतापत पुढे सरसावले. तिचा बाहू धरला. जिन्याच्या समोर बाहेर जायचा दरवाजा होता. ती अबला ओढली जात होती. गांधींनी तिला तसे ओढत-फरफटत थेट दरवाज्यापर्यंत नेले. दरवाजाही अर्धा उघडला. आता तिच्या डोळ्यातून गंगा-यमूना वाहू लागल्या. तिच्या मनावरचा ताबा सुटला.

"एक तुम्हाला नाही पण मला तर लाज आहे. ना? थोडी तरी लाज मनात धरा. अहो, मी बाहेर पडून जाणार कुठे? हा परमुलूख आहे. इथे ना माझे आई, ना वडिल. ना माहेर, ना सासर. मी बायको पडले ना तुमची? तुम्ही माराल तितक्या लाथा सहन कराव्या लागतील मला. आता दरवाजा बंद करा. कोणी असे पाहिले ना तर दोघांपैकी कुणाचीही शोभा नाही उरायची. काही जनाची नाही तर मनाची तरी .. .. . .. .." कस्तुर रागाने उसळली.

एखादे भले-थोरले झुंबर अचानक खाली कोसळून तुकडे-तुकडे होऊन अस्ताव्यस्तपणे घरभर विखरुन पडावे तशी कस्तुरची गत झाली. तिच्या डोळ्यात आसवांचा पूर होता. ती पदराने एकेक अश्रु जखमेला टिपावे तशी टिपत राहिली होती. हवेत एक सुन्नपणा साकळून राहिला होता.

गांधींचा राग तर काही कमी झाला नव्हता पण त्यांना शरम वाटली, हे खरे. त्यांनी दरवाजा बंद केला. बायको जर त्यांना सोडून जाऊ शकत नव्हती तसे ते तरी तिला टाकून-टाळून कुठे जाऊ शकत होते?

गांधींनी कस्तुरला शिक्षा केली. कस्तुरने नाखुशीने का होईना पण ते लघवीपात्र उचलले आहे. या प्रसंगी कस्तुरचे आत्मप्रत्ययी रुप दिसते. गांधी मात्र पानगळीतल्या देवदार वृक्षासारखे ओकेबोके भासतात. दुबळे आणि पत्नीला अबला मानणारे. श्रीहीन, पौरुषशून्य वाटतात.

या घटनेवर आपली प्रतिक्रिया गांधींनी व्यक्त केली. ती खूप बोलकी आहे. आत्मलक्ष्यी आहे. आपल्या आत्मचरित्रात ते लिहितात. त्यांना राग आवरता आला नाही. चेहरा रागाने लालीलाल झाला. मनातून शरमही वाटली. दरवाजा बंद करुन घेतला. कस्तुर तर त्यांना सोडून जाऊ शकतच नव्हती. ते तरी कुठे असे करु शकत होते? दोघांमध्ये भांडणे पुष्कळदा झालीत, परिणाम नेहमी लाभदायकच झाला. विजयी पत्नी झाली. याचे रहस्य म्हणजे तिची अद्भुत सहनशक्ती. पुढे सामंजस्य वाढले. कंगोरे घासले गेलेत. दोघे कसलेले मित्र बनलेत. एकमेकांविषयी निर्विकार झालेत. उपकाराच्या परतफेडीची अपेक्षा उरली नाही. कस्तुर सेविका बनली. नाना दुखण्यांमध्ये सेवा सुश्रूषा केली. पत्नी केवळ विषयभोगाचे साधन नाही. ती सहधार्मिणी आहे. सहचारिणी आहे. सुख-दु:खातील मैत्रीण आहे. असा साक्षात्कार त्यांना झाला. ती कुठल्याही आज्ञापालनासाठी जन्माला आलेली नाही. तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. तिला मन आहे. मत आहे. अभिव्यक्ती आहे. विचार आहे. असे वाटू लागले. पुढे गांधींच्या विचारात गंभीर परिवर्तन झाले. ते निर्विकार होत गेले. प्रपंच शांत, निर्मळ आणि सुखाचा होत गेला. उन्नतीच्या दिशेने ही वाटचाल होती. आदर्श दंपती बनण्याची धडपड होती.

आपल्या मनोमंथनाच्या संदर्भात गांधीजींनी लिहिलेले हे एक पत्र विलक्षण आहे. -

"आपण श्रीमती गांधीच्या संदर्भात आणि मी आत्मचरित्रात (चौथ्या भागातील दहाव्या 'एक पुण्यस्मरण आणि प्रायश्चित्त' प्रकरणातील पंचमवर्णी कारकूनाच्या लघवी पात्राचा संदर्भ.) या विषयी लिहिलेली घटना खरी आहे. आणि तिच्यातील प्रत्येक शब्दाच्या खरेपणाविषयी मी समर्थन करत आहे. मी या क्रुरतेचे स्मरण करण्यात धन्यता मानत नाही आणि आजही तशी क्रुरता करु शकत नाही पण मी असा विचार केला होता की लोक जर मला सज्जन आणि शांतीप्रिय व्यक्ती समजतात तर त्यांना हेही कळायला हवे की एक अशी वेळ होती जेव्हा मी खरोखरच पशु होतो. अर्थात् यासोबत मी एक स्नेहशील पती व्हायचा - असायचा - दावा करत होतो. एकदा एका मित्राने मला मी पवित्र गाय आणि क्रूर चित्त्याचे मिश्रण असल्याचे सांगितले होते- ते निराधार नव्हते."[१]

कस्तुरमध्ये कसलाच दोष नाही, असे नव्हते. उभयतांचे जीवनादर्श समान आणि समांतर झालेत असेही नव्हते. कस्तुरला आपल्या स्वतंत्र जीवनादर्शाची

कल्पनाही नसेल. नवऱ्याच्या अनेक गोष्टी तिला आवडतही नसाव्यात. याविषयी आपसात चर्चा नसायची. चर्चा करण्यात काही अर्थही नसेल. ती सहचारिणी राहिली. यामुळे दोघांचे जीवन सुखी-समाधानी व ऊर्ध्वगामी ठरले. यातून अनेकांना सुखी दांपत्याचा मंत्र कळू शकेल. अशा प्रकारच्या तंट्या-बखेड्याच्या जागा तर पुष्कळ आहेत. स्वत:च्या अद्भुत सहनशक्तीने कस्तुरने प्रत्येक प्रसंगावर विजय मिळवला आहे.[२] यापेक्षा अधिक परिणामकारक भाषेत कुणी दुसरा लिहू शकणार नाही एवढे खरे! गांधींनी हे मोकळेपणे कबूल केले आहे. पण यासोबत हेही ध्यांनात घ्यायला हवे की त्यांनी स्वत:ही कस्तुरची कमाल सेवा केली आहे. तिची दोन-दोन बाळंतपणेही केली आहेत.

या प्रसंगाचे आकलन करुन घेण्यासाठी आपण गांधी चरित्राचे भाष्यकार श्री नारायण देसाई यांचे मत जाणून घेऊ या. ते म्हणतात की या प्रसंगातही गांधींनी आपल्या पुरुषप्रधान मूल्यांचाच आग्रह धरलेला आहे. ना. हे जणू काही त्यांनी गृहीतच धरले आहे. अखेर कस्तुरची सहनशक्ती नवऱ्याला लाजवण्याकामी यशस्वी झाली हे खरे आणि अगदी एवढ्या टोकाची चूक गांधींनी केली नाही, हेही खरेच. तरी 'पत्नीने स्वत:च्या अद्भुत सहनशक्तीच्या बळावर विजय मिळवला आहे.' असे ते आत्मचरित्रातून लिहितात. खरे तर असे म्हणणे हा फार मोठा दावा होऊ शकतो. अनेकदा विजय तर गांधींनीच संपादन केला आहे. दोघांमध्ये चर्चा झाली वा अगदी भांडण झाले हेही खरे आहे. पण अनेकदा कस्तुरचे काहीही चालले नाही. गंमत म्हणजे खुद्द गांधीच याची नोंद ठिकठिकाणी घेताहेत.[३]

कस्तुर अशिक्षित होती. तिचे मन मात्र संस्कारी होते. ती पतीच्या सोबत चालली. त्यांना सल्ला दिला. तिचे सामान्य ज्ञान विलक्षण होते. उपजत आकलन मात्र प्रखर होते. विचारशक्ती भरपूर विकसित होती. वयाच्या पंधराव्या वर्षी तिला शेख मेहताब कळून चुकला होता. त्याशी मैत्री तोडायचा सल्लाही तिने नवऱ्याला दिला होता. आफ्रिकेत तर गांधी नाना लोकांनी घेरलेले असत. कुणी त्यागी तर कुणी संयमी. कस्तुर त्यांचे स्वरुप नेमके ओळखायची. ढोंग्याचा ढोंगी परदा टराटरा फाडून टाकायची. ती कधीही कुठल्याच भ्रमात नव्हती. मुला-मुलींच्या सह-शिक्षणाच्या बाबतीत गांधीदृष्टी उदार व विशाल होती. ती मात्र सावध होती. ती वेळोवेळी गांधींना याविषयी सूचना देत असायची. कधी गांधींच्या निर्णयाच्या विरोधात निर्णय द्यायची. त्यावर मग अमलही व्हायचा.

कस्तुरचे चारित्र्य उज्ज्वल होते. मनोबल मजबूत होते. विपत्तीची वादळे ती वरचेवर सहजपणे झेलायची. गळ्यात दागिन्यांप्रमाणे मिरवायची. मानसिक द्वंद्वांशी झुंजायची. तिची मन:स्थिती सदा न् कदा परिस्थितीवर विजय संपादित करायची. तिला ना पिष्टपेषण आवडायचे ना बाह्यविग्रह. तिची ही एक थोर साधना होती. मोठी लब्धी होती. ती आंतर्बाह्य संतुलित होती. अशी माणसे कधी रागावतच नाहीत असे नाही. कधी मोहात पडतच नाहीत असे नाही. त्यांच्या मनात एक अगाध शांतीचा स्रोत प्रवाहित असतो.

संदर्भ

१) गांधीजींनी जेन हॉवर्ड यास सत्याग्रह आश्रम साबरमतीहून दिनांक १२ मार्च १९२८ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३६ पृष्ठ १०९;

२) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ २७२ / २७३;

३) मारु जीवन ए ज मारी वाणी : (गुजराती) श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ२७४.

❖❖❖

## १५) कस्तुरची कसोटी

दक्षिण आफ्रिकेत कस्तुरने दोन बालकाना जन्म दिला. १८९८ सालचा मे महिना होता. बाळ जन्माला आले. रामदासचा जन्म झाला. गांधींची पार कसोटी लागली. कस्तुरला एकाएकी कळा येऊ लागल्या. डॉक्टर काही घरी नव्हता. दाईला बोलावण्यात आले. ती सोबतीला चालली असती. बाळंतपणातली सेवा ती करु शकली नसती. या प्रसवकाळात नवऱ्याने बहुतांशी सेवा पार पाडल्यात. कुणाला पटणार नाही कदाचित पण गांधींनी बालसंगोपनाचा अभ्यास केला. कुठलाही अभ्यास मूळापासून करणे हा त्यांचा स्वभाव होता. अभ्यास चौफेर आणि खोलवर असावा ही त्यांना सवय होती. यामुळे गांधी अध्ययनशील राहिले होते. डॉ. त्रिभुवनदास यांचे 'आईला शिकवण' हे पुस्तक त्यांनी वाचले होते. बाळंतपण शास्त्रीय पध्दतीने झाले पाहिजे यावर दोघांचे एकमत होते. ऐनवेळी डॉक्टर हवा. दाई हवी, परत दाई हिंदुस्तानी हवी. एक का दोन? प्रश्नच प्रश्न होते. दाई शिकलेली सवरलेली हवी. अशी दाई हिंदुस्तानात मिळणेसुध्दा अवघड होते. तिकडे तर मग याविषयी आनंदी आनंद होता.

५ मे १९०० साल. कस्तुर आता चौथ्या बाळाला जन्म देणार होती. देवदासचा जन्म झाला. या खेपेला प्रश्नांचे कुंपण अधिक घनदाट होते. नवा देश. इथे मदतीला कोण येईल? काळजीने तिचा चेहरा काळवंडून जायचा. इथे काही बाळ-बाळंतिणीची स्वतंत्र खोली नव्हती. कस्तुरला पुरुष डॉक्टर नको होता. भारतीय पुरुष डॉक्टरही नको होता. तिकडे तर अधिकांश पुरुष डॉक्टर्सच होते. तेच बाळंतपणाचेही काम करत असत. दुसरा प्रश्न दाईचा होता. कस्तुरला गोरी दाई नको होती. भाषेची अडचण मुख्य होती. तिथे भारतीय दाई कुठून मिळणार होती? नवऱ्याने समजूत घातली. कस्तुरने सल्ला मानला नाही तो नाहीच. खूप अडचणीत बाळंतपण पार पडले. कस्तुरला खूप दिवस अशक्तपणा सहन करावा लागला. काही महिने विश्रांती घ्यायला लागली होती[१]

गांधींनी आपल्या दोन्ही मुलांचे संगोपन केले. दाईची मदत घेतली. फार काळ नाही. दोन महिने दाई सोबतीला होती. ती खरे तर कस्तुरसाठी होती. ती कस्तुरला मालिश करुन द्यायची. न्हाऊ-माखू घालायची. सेवा करायची. बालकांना आंघोळ घालायचे काम सुरुवातीला गांधी करायचे. ते काम त्यांना मनापासून आवडायचे. पुढे कस्तुरला चिडवायला हा विषय त्यांना पुरला होता.

गांधी यापूर्वी १८९६ साली दक्षिण आफ्रिकेतून मायदेशी परत आले होते. आता ही दुसरी वेळ होती. नाताळातील हिंदजनांनी त्यांना प्रेमामृतात न्हाऊ घातले. निरोप देण्यासाठी मोठमोठ्या सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. अर्थपूर्ण मानपत्रे दिलीत. प्रत्येक ठिकाणी मौल्यवान भेटी मिळाल्यात. यावेळच्या सभा प्रचंड होत्या. भेटी अमूल्य होत्या. हे सारे गांधींना असह्य वाटले. भेटीत सोन्या-चांदीच्या वस्तु होत्या. हिऱ्या-माणकांच्या वस्तु होत्या. या नजराण्यांमध्ये कस्तुरसाठी पन्नास गिनीचा एक हार होता. गांधी आपल्या आत्मचरित्रात लिहितात की त्यांना या वस्तु घेण्याचा काय अधिकार होता? त्यांनी तर समाजसेवा नि:शुल्क करायचे ठरवले होते. मनाची समजूत कशी घालावी? यातल्या थोड्या भेटी अशिलांच्या होत्या हे खरे. अधिकांश भेटी मात्र सार्वजनिक कामांबद्दलच होत्या. शिवाय गांधींच्या नजरेत तर अशील आणि सहकारी यांच्यात काही फरकच नव्हता. सर्वच मुख्य अशील सार्वजनिक कामात सहकार्य करणारे सहकारीच होते. कस्तुरला काही वस्तु भेटीदाखल मिळाल्या होत्या. त्या तर गांधींची पत्नी म्हणूनच मिळाल्या होत्या. यामुळे त्या वेगळ्या करण्या-काढण्याचे काही कारण नव्हते. मुख्य नजराणे मिळाले होते. या महागड्या भेटवस्तु होत्या. त्या आपण स्वीकारता कामा नये या निर्णयाप्रत गांधी पोहोचले. जे रुचले-भावले ते कृतीत आणायचा त्यांचा स्वभाव होता. गांधींनी एक ट्रस्ट उभारला. त्यात पारशी रुस्तुमजी आणि मित्रांची नावे घेतली. करार लिहून काढला. मनोमन निश्चय केला. सकाळी कस्तुर सोबत चर्चा करु. मुलांशी बोलू.

गांधी आत्मचरित्रात या प्रसंगाची चर्चा करतात. मनाची उलघाल मांडतात. परिस्थितीचे गांभीर्य सांगतात. अर्ध्याहून अधिक प्रकरण या प्रसंगाला वहातात. ते लिहितात की पत्नीची समजूत घालणे अवघड जाईल असे ते वागले होते. मुलांची समजूत घालण्यात मुळीच अडचण येणार नाही, ही खात्री होती. गांधींनी मुलानाच आपले वकील नेमायचे ठरवले. मुलांची लगेच समजूत पटली. मुले मोकळेपणाने म्हणाली की त्यांना त्या दागिन्यांची काही गरज नाही. बाबांनी त्या सर्व भेटवस्तु परत कराव्यात. उद्या समजा काही वस्तुंची गरज वाटली तर ते त्या वस्तु नाही का विकत घेऊ शकत? या प्रतिप्रश्नाने गांधी सुखावले. त्यांना आनंद वाटला. त्यांनी मुलाना कस्तुरची समजूत घालायला सुचवले. मुलांनी उत्साहाने संमती दिली. ते आपले काम मानले. 'आई काही स्वत:साठी दागिने राखणार नाही. ती मुलांसाठी राखील आणि मुलानाच मुळी दगिने नकोहेत मग आई हट्ट तरी कुणासाठी करील?' हा मुलांचा तर्क होता. मुलाना आता ते काम सोपे वाटले होते. मुले मूळावरच घाव घालणार होती. काम तसे सोपे मात्र नव्हते.

कस्तुरने ठाम शब्दात आपला निश्चय जाहीर केला. "हे बघा, तुम्हाला एकवेळ या दागिन्यांची गरज नसेल. तुमच्या मुलानाही नसेल. मुलांचे काय? चढवावे तसे चढतात. पढवावे तसे पढतात. मला दागिने घालू दिले नाहीत. त्याविषयी माझी काही हरकत नाही पण उद्या येणाऱ्या माझ्या सुनांचे काय? हे दागिने किमान त्यांच्या तरी उपयोगी पडतील. उद्याचा काय भरवसा? दिवस कसे येतील हे तरी कुणी बघितले? शिवाय इतक्या प्रेमाने या वस्तु भेटीदाखल मिळाल्या आहेत. या परत करणे बरे नव्हे." कस्तुरची वाग्धारा सुरु झाली. त्यात अश्रुधारा येऊन मिसळली. मुले भक्कम राहिली. गांधींना तर डगमगून जायचे काहीही कारण नव्हते.

स्फोटक परिस्थितीचा अंदाज घेत त्यांनी हळूच सुचवले "मुले लग्न करतील तेव्हाची गोष्ट तेव्हा करु. तेव्हाचे तेव्हा बघू हो. आपल्याला कुठे बाल वयात मुलांची लग्ने करुन द्यायची आहेत.? मुले मोठी होतील. आपल्या इच्छेप्रमाणे करेनात लग्न. आपल्याला काही दागिन्यांची हौस मिरवणाऱ्या सुना थोड्याच शोधायच्या आहेत? तरीही काही दागिने हवेच वाटले तर मी तर कुठे गेलो नाही ना?"

या शांतपणे समजावण्याचा परिणाम विपरीत झाला. कस्तुरच्या मनाचा तळ ढवळला गेला. ती उसळून बोलू लागली "कळलेत ना तुमचे एथवरचे पराक्रम. माझे दागिनेही काढून घेणारे तुम्हीच ना? मला धड घालू दिले नाहीत ते तुम्ही सुनांसाठी काय देणार? मुलाना तर आतापासून बैरागी बनवता आहात. मी ते काही जाणत नाही. हे दागिने परत करायचे नाहीत म्हणजे नाहीत. बरे, त्यातून मला हा एक हार मिळाला आहे. यावर तुमचा काय बरे हक्क पोहोचतो?" गांधींनी एथवर सारे शांतपणे ऐकून घेतले होते. हे ऐकल्यावर म्हणाले की तो हार काही कस्तुरला तिच्या कामगिरीबद्दल मिळाला नव्हता. त्यांच्याच कामगिरीबद्दल मिळाला होता. हे कस्तुरला कसे मान्य व्हावे? ती उसळलीच "त्याचे काय मोठे घेऊन बसलात हो तुम्ही? तुमची आणि माझी कामगिरी काय वेगवेगळी आहे. की काय? तुमची कामगिरी ती माझीही खरीच ना? मला रात्रंदिवस राबवलेत. ही काय कामगिरी नव्हे? मला रड रड रडवूनही वाटेल त्याला घरात आसरा दिलात. माझ्याकडून त्याची चाकरी करवून घेतलीत. ते कुठे गेले?"

यावर गांधी आत्मचरित्रात लिहितात "हे सर्व बाण तीक्ष्ण होते. त्यातील मला भेदूनही जात होते पण दागिने तर मला परत करायचेच होते. पुष्कळशा गोष्टींबद्दल मी जेमतेम कबूली मिळवली. १८९६ साली मिळालेल्या आणि १९०१ साली मिळालेल्या सर्व भेटी परत केल्यात. त्यांचा ट्रस्ट केला. त्यांचा सार्वजनिक कार्यासाठी उपयोग व्हावा असे ठरवले. ट्रस्टीच्या इच्छेनुसार याचा विनियोग व्हावा अशी अट घातली. भेटवस्तु बँकेत ठेऊन दिल्यात. अनेकदा हे दागिने विकले गेलेत. पुष्कळदा पैसे जमवले गेलेत. ते पैसे आजमितीलाही ( आत्मचरित्र लिहीपर्यंत ) आपत्तीनिधी म्हणून शिल्लक आहेत." भेट वस्तु तर गांधींना परत करायच्याच होत्या. नाना प्रकारे समजूत घालून त्यांनी कस्तुरची संमती मिळवली. तसे पाहू गेल्यास या प्रसंगात कस्तुर हरली.[२]

या प्रसंगाविषयी गांधींचे चरित्रकार श्री नारायण देसाई लिहितात की असेल, कदाचित या म्हणण्यात

तथ्य असेल पण भविष्यकाळात कस्तुरचे श्वास नवऱ्याच्या श्वासात असे काही ओतप्रोत होऊन गेले होते की यासारख्या मोहाच्या प्रसंगी त्यांनी कुठल्याही प्रकारे कधीही ओढाताण केली नाही. या सोबत हेही खरे की या प्रसंगात कस्तुर आणि कुटुंबाची संमती मिळवताना गांधींच्या पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्था आणि वडील असण्याचाच भाग मुख्य होता. आंतरिक संघर्षात मूल्य नव्हे तर संस्कारांचा विजय झाला होता.[३]

या घटनेचे वर्णन अनेक चरित्रकारांनी केले आहे. आणि ते गांधींच्या दृष्टीकोणातून केले गेले आहे. या प्रसंगी सारे चरित्रकार नववधु मुग्धा कस्तुरला विसरतात. हिनेच तर पतीच्या शिक्षणाच्या वेळी आपले स्त्रीधन अर्पण केले होते. कुठलाही मागचा पुढचा विचार केला नव्हता. त्यावेळेला तिला अनुभव नाही. नवऱ्याच्या भविष्याविषयी कुठलीही खात्री नाही. उद्याची कमाल चिंता आहे. तरीही तिने एवढा मोठा त्याग केला आहे. या प्रसंगात तर उलट ती अनुभवाने समृध्द आहे. तिला हे कळले आहे. की नवरा शून्यातून विश्व उभारु शकणारा कर्तबगार पुरुषर्षभ आहे. उद्याविषयी काळजी करायचे काहीही कारण नाही. तरीसुध्दा ती एवढा विचार करते. पहिल्या प्रसंगाचा महिमा जर गांधींनी आपल्या आत्मचरित्रातून मांडला असता तर विवेचन करताना त्याचा आधार घेऊनच चरित्रकारांना मांडणी करावी लागली असती. आता कस्तुरचे हे सावधपण अधिक सयुक्तिक वाटावे असे आहे. तिच्या ठायी असलेली माता प्रकर्षाने अग्रेसर होताना दिसते. ती येणाऱ्या पिढ्यांच्या सुरक्षिततेची काळजी वहाताना दिसते. कस्तुरचे मत ठाम होते. विचारी होते. भविष्यवेधी होते. ती उद्याचा विचार करत होती. ते खोडून काढता येण्यासारखे नव्हते.

या प्रसंगाविषयी गांधी लिहितात "त्या कृत्याबद्दल मला कधीही पश्चात्ताप वाटलेला नाही. कालांतराने कस्तुरलाही यातला रास्तपणा समजून आला. आम्ही पुष्कळ मोहांपासून बचावून निघालो."[४]

काळ लोटला होता. आता पुराचे पाणी वाहून गेले होते. गढूळपणा संपला होता. जलप्रवाह स्वच्छ झाला होता. गृहस्थ ते वानप्रस्थ असा प्रवास सुरु झाला होता. हा नवा प्रवास होता. हा नवा प्रवाह होता. याला संन्यस्त धर्माची रुपेरी कडा होती. दोघे मग अनेक लोभांमधून मोकळे झाले. कस्तुर आणि गांधी जणू एका सत्याची दोन रुपे होती. दोन अभिव्यक्ती होत्या. चंद्र आणि चांदण्यासारखा अभेद जागला. शंभु आणि अंबिका असा सामरस्य भाव उपजला. दोघे एकरूप झालेत. आता गांधींची इच्छा कस्तुरची इच्छा बनली. नवऱ्याचा स्वभाव कस्तुरचा भाव बनला.

संदर्भ


१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ २०१;

२) कित्ता पृष्ठ २२०;

३) मारु जीवन ए ज मारी वाणी: (गुजराती)
श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ २७५;

४) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ २२०.


❖❖❖

## १६) कस्तुर मायदेशी परत

१९०१ सालचा ऑक्टोबर महिना होता. गांधींनी हिंदुस्तानात परत यायचे ठरवले होते. चळवळीच्या धकाधकीतून त्यांना मोकळिक मिळाली होती. यापुढे आपले कार्य दक्षिण आफ्रिकेत नसून मायदेशी आहे. असे त्यांना वाटू लागले. मित्र मंडळींचाही आग्रह होता. त्यांनी सहकायांर्जवळ हा विषय काढला. त्यांना निरोप देणे मित्राना खूप अवघड गेले. त्यांनी एका अटीवर स्वदेशी जायला परवानगी दिली. अट अशी होती की एक वर्षाच्या आत जर हिंदी समाजाला गांधींची गरज वाटली तर त्यांनी दक्षिण आफ्रिकेत परत यावे. गांधी प्रेमपाशाने जखडले गेले होते. मित्रांचे म्हणणे त्यांना नाकारता आले नाही. गांधींनी वचन दिले. परवानगी मिळवली.

१९०१ साली गांधींसोबत कस्तुर हिंदुस्तानात परत आली होती. तिची हिंदुस्तानात पाच वर्षांची गैरहजेरी होती. गांधींनी राजकोट गाठले. घरच्यांना खूप आनंद झाला. गांधींच्या मनात कामांच्या विविध योजना तयार होत्या. कस्तुर आपल्या कुटुंबात मिसळून गेली होती. विदेशातून परतलेली त्या घरची ती पहिली महिला होती. तीन दिवस गांधी राजकोटला थांबले. कस्तुर व मुले राजकोटलाच थांबलीत. गांधींनी मुंबईची वाट धरली. कलकत्ता काँग्रेसचे अधिवेशन संपन्न झाले. गांधी तिथेच थांबले. त्यांना श्री गोपाळ कृष्ण गोखलेंशी बोलायचे होते. विषय अर्थात्च दक्षिण आफ्रिकेच्या समस्या हा होता. गांधीभाई बर्माला निघाले. तिथे महिलांची चळवळ सुरु होती. चळवळ स्वातंत्र्याची होती. पुरुष निष्क्रिय होते. तिथून राजकोटकडे परतायला लागले.

कस्तुर दूधात साखर मिसळावी तशी कुटुंबात एकरुप झाली होती. तिला वाळीत टाकला जायचा प्रसंग आठवत होता. आता का परत तोच प्रसंग? पण तसे घडले नाही. सारे वातावरण बदलले होते. तिचा सन्मान होता. लेकरांना प्रेम लाभत होते. तिने सुटकेचा निःश्वास टाकला. कस्तुरच्या माहेरचे घर होते. ते तेच तर घर होते. तरी किती बदलले होते? तिचे आई-वडिल देवाघरी निघून गेले होते. ते सूनेपण तिला काचत होते. कुणीही काहीही कळवले नाही. मनात एक अस्फुट हुंदका दाटून आला. पोरकेपणाने घेरुन घेतले. माहेरी धाकटा भाऊ माधवदास होता. या दरम्यान ती माहेरी गेली नाही. माहेरहून कुणी नातवंडांच्या भेटीसाठी आले नाही. ना भेट होती. ना संवाद झाला. अगदी पत्रव्यवहारही नाही. ना कुठली सांत्वना. ना कुणाकडून काही संदेश. काही नाही म्हणजे अगदी काही नाही. तिला आठवले. लग्न झाल्यावर आपण कितीदा माहेरी आलो. दोन-एकदा तर यांनी रागावून पाठवून दिले होते. जखमेवर खपली धरत होती, ती परत वहायला आली. आता माहेरहून बातमी केवळ पोहोचली. भाऊ मजेत. वहिनी आनंदात. सासरी जावा भेटल्यात. तिच्या लेकरांचे भरभरुन कौतुक झाले. मुलांचीही छान गट्टी जमली. खरे तर ती एकरुप झाली होती. सासरमधली संख्या वाढली होती. नंदकुंवरला दोन मुले झालीत. गंगाबेनचे लग्न तिच्यासोबतच तर एकाच मांडवात झालेले. तिला एक मुलगी होती. कस्तुरची दोन्ही मुले रमून गेलीत. तीन लेकरांसोबत हुंदडत राहिलीत. कस्तुरचे मन राजकोटमध्ये रमून गेले. इथे एक आश्वस्त भाव होता. माया होती. आपुलकी होती. आत्मीयता होती. चौफेर आनंदी आनंद होता. कस्तुरची काळजी वेगळीच होती. लेकरांच्या शिक्षणाचे काय? डर्बनच्या शाळेत पाठवायला बाप तयार नव्हता.

गांधी डर्बन येथे आश्वासन देऊन परतले होते. वर्षभरात केव्हाही बोलावणे येऊ शकणार होते. कधीही हाक येऊ शकणार होती. हाक आली तर नवरा शांत राहणार नव्हता. गांधी कलकत्त्याहून परतले. राजकोटला काम मिळाले होते. यशही लाभले होते. गोखलेंची इच्छा वेगळी होती. ते त्यांना मुंबईला यायचे निमंत्रण देत होते. गांधींच्या मनात द्वंद्व जागले. मुंबईला थांबावे. प्रॅक्टिस करावी. काँग्रेसचे कामही करावे.

१९०२ साली ऑगस्ट महिन्यात गांधी कस्तुर सोबत मुंबईला आले. ही जागा अनोळखी. नव्याने संसाराला सुरुवात झाली. नातेवाईक भेटीला येत. कस्तुरचे कौतुक करत. आप्तजनाना तिच्याबद्दल केवढा अभिमान वाटायचा ! कस्तुर केवढी धीराची बाई. सागर ओलांडून परदेशी गेली. तिची दोन मुले सर्वांना हिरोच वाटायचीत. धाकट्याची गंमत तर काही औरच होती.

गांधींनी मुंबईत कार्यालय उघडले. गिरगावात घर घेतले. अजून ते नव्या घरात रमायचे होते. मुंबईत काही नातलगांची घरे होती. कधी काळी तिथे कस्तुरच्या वडिलांच्या व्यापारी शाखा होत्या. खूप मोठ मोठे तिथले बाजार. सोन्या-चांदीच्या मोठ्या पेठा. गिरण्या. कस्तुरने घर सांभाळायला सुरुवात केली. आता तो कळकट स्वयंपाकी नव्हता. काही दिवस सुखात गेले. अचानक मुलगा मणीलाल आजारी पडला. मुलाला विषम ज्वराने घेरले होते. ताप काही केल्या उतरायचे नाव घेईना. दिवसभर मुलाला जपावे. मुलाला भ्रम झाला होता. रात्र झाली की तो सन्निपातात बडबड करायचा. कस्तुरला आठवले बालपणी मणीलालला खूप मोठ्या प्रमाणावर देवी आल्या होत्या. आता हा विषमज्वर आला. डॉक्टर आले. तपासणी झाली. त्यांनी सांगितले 'हे बघा, आजार मोठा आहे. गुंतागुंतीचा आहे. यासाठी औषधे फारशी उपयोगाची नाहीत. मुलाला अंडी खायला द्या. कोंबडीचे सूप पाजावे लागेल.'

गांधींना ते मान्य नव्हते. कस्तुरला हे मान्य होणे शक्य नव्हते. दहा वर्षांचा मणीलाल. त्याला सल्ला तो काय विचारायचा? गांधी त्याचे वाली होते. पिता होते. याबाबतीतला निर्णय त्यांनी घ्यायचा होता. डॉक्टर पारशी होते. ते फारच सज्जन गृहस्थ होते.

"डॉक्टर साहेब, आम्ही सारे शाकाहारी आहोत. आपण सुचवले. आभार मानतो. या दोन वस्तु आम्ही नाही देऊ शकणार. दुसरा काही उपाय नाही का?" गांधी विनयाने म्हणाले.

"हे बघा, तुमच्या मुलाचा जीव जोखिमीत आहे. काहीही अघटित घडू शकते. पाणी मिसळून दूध देऊ शकता. अर्थात् तेवढ्याने त्याला अपेक्षित पोषण मिळणार नाही. अनेक हिंदू कुटुंबात मी उपचारासाठी जात असतो हे तुम्हीही जाणता. औषध म्हणून आम्ही जे काही देतो ते ती मंडळी निमुटपणे घेते. तुम्ही आपल्या मुलावर शाकाहाराबाबत जबरदस्ती करु नये असे एक डॉक्टर म्हणून मला वाटते." डॉक्टर शांतपणे म्हणाले.

"तुम्ही म्हणता ते आम्हाला मान्य नाही असे नाही. तुम्ही तुमच्या शास्त्रानुसारच सल्ला द्यायला हवा. एक वडिल म्हणून माझी जबाबदारी अधिक आहे. मुलगा मोठा असता तर मी त्याचा सल्ला विचारलाही असता. त्याच्या इच्छेप्रमाणे केले असते. याप्रसंगी मीच माझ्या मुलाचा विचार करायला हवा. मला वाटते अशाक्षणी माणसाच्या धर्माची कसोटी लागते. खरा असो वा खोटा. या वेळी मी हाच माझा धर्म मानला आहे. मनुष्याने मांसादिक सेवन करु नये. अखेर जगण्याच्या साधनांनाही काहीतरी मर्यादा असली पाहिजे. काही गोष्टी आपण जीव जगण्यासाठीही करता कामा नयेत. माझ्या धर्माने मला एक मर्यादा आखून दिली आहे. त्यानुसार मी माझ्या आणि माझ्या मुला-माणसांच्यासाठी अशा प्रसंगी मांसाहाराला परवानगी नाही देत, नाही देणार. अर्थात् मला तुम्ही म्हणता तो धोका पत्करायलाच पाहिजे. एक मागणी करतो. मी यापुढे काही तुमचे उपचार करणार नाही. मला या बालकाची ना नाडी तपासता येत ना छाती. मला पाण्याच्या उपचारांविषयी थोडी माहिती आहे. मी ते उपचार करु इच्छित आहे. तुम्ही अधुन-मधुन येत जात रहा. मणीलालची तब्येत बघत रहा. शरीरात होणाऱ्या फेरफारांविषयी मला कळवत रहा. मी तुमचा आभारी राहीन." गांधींनी एक लांबलचक प्रवचन दिले.

डॉक्टर भले होते. त्यांनी माता-पित्याची अडचण समजून घेतली. अधून-मधून येण्याचे कबूल केले. मणीलाल काही स्वत: निवड करु शकत नव्हता. तरीही गांधींनी त्याच्याशी बोलणी केलीत. डॉक्टरांशी झालेले बोलणे त्याला समजावून सांगितले. त्याचे स्वत:चे मत विचारले. तो म्हणाला की तुम्ही खुशाल पाण्याचे उपाय करावेत. मला ना सूप प्यायचे ना अंडी खायची. कस्तुरचा जीव सुखावला. मणीलाल सूप पिणार नव्हता. अंडी खाणार नव्हता. लेकराच्या बोलण्याने तिला समाधान वाटले. ती नवऱ्यासारखी ठाम होती. धाकटा मणीलाल तापाने फणफणत होता. त्याचे गुलाब पाकळ्यांसारखे नाजूक ओठ सुकून करपून गेले होते. डोळ्यात आग-आग होती. जिभेची चव रुसून गेली होती. तो बिछान्यात कण्हत पडून असायचा. कस्तुरचे कामात लक्ष लागेना. गांधींना पाण्याच्या प्रयोगांची जाण होती. मध्येच त्याला वाटे की कुणा वैद्याला बोलवावे की काय? काही निर्णय होत नव्हता.

खरे तर कस्तुरच्याही मनात काही कमी घालमेल नव्हती. अशावेळी दोघे एकमेकांचा आधार बनू शकत होते. मणीलालवर जलोपचार सुरु होते. त्याचे शरीर तापल्या लोखंडासारखे झाले होते. घामाचा टिपूस कपाळावर नव्हता. कस्तुर थकून गेली.

"असे बघा, डॉक्टरही तर काही देव नाही. तो काही कुणाला जीवनदान नाही देऊ शकत. जीवनाची दोरी तर ईश्वराच्या हाती असते ना? तो दयाळू आहे. कनवाळू आहे. आपण त्याला का न स्मरावे?" कस्तुर म्हणाली.

'बाळाकडे लक्ष दे. अर्ध्या तासाने परत येतो.' गांधी म्हणाले.

एवढे बोलून गांधी बाहेर निघून गेले. रात्री दहाचा सुमार होता. ते चौपाटीवर गेले. अर्ध्या तासाने परत आले.

'बाबा, आलात तुम्ही?' गांधींनी घरात प्रवेश करताच मणीलाल बोलला.

'होय बाळा, काय? तुला घाम येतो का?' गांधींनी अधीरतेने विचारले.

'मी तर ओला चिंब झालो. मजजवळ या बाबा.' मणीलाल म्हणाला.

गांधींचा हात मणीलालच्या कपाळावर होता. घामाचे बिंदू जमले होते. ताप उतरला होता. कस्तुरने देवाचे आभार मानले. गांधींचे मन शांत झाले. बाप-लेक सोबत झोपले. मणीलालचा घाम पुसून काढला. कस्तुरला नवल वाटले. तिचा केव्हा डोळा लागला हे तिचे तिला कळले नाही. सकाळ झाली. पती-पत्नी दोघे बोलत होते. ही रामकृपा की जलोपचाराचा गुण? अल्पोपाहारामुळे हे अनुकूल घडले की सेवेमुळे? हा फलाहाराचा परिणाम म्हणावा काय? गांधींना वाटले की देवाने लाज राखली. कस्तुरचे तेच मत पडले. मणीलाल बरा झाला.

❖❖❖

## १७) गांधी परत डर्बनला

गिरगावचे घर काही रहाण्यालायक नव्हते. हे कस्तुरच्या लक्षात आले. घरात ओल येई. पुरेसा प्रकाश नव्हता. ऊन तर रुसून असायचे. धंदा चांगला चालला होता. कमाई कल्पनेपेक्षा अधिक होती. मणीलालची तब्येत सुधारली. कस्तुरने नवऱ्याला पटवून सांगितले. दोघांनी ठरवले. घर बऱ्यापैकी असावे. गांधींनी घर बदलायचे ठरवले होते. सांताक्रुजमध्ये एक सुंदर बंगला आढळला. तिथे रहायला गेले. तिथे आरोग्याच्या दृष्टीने काही काळजी करण्यासारखे नव्हते. भरपूर खेळती हवा. बाजार जवळ. स्टेशन जवळ. शाळा शेजारी. कस्तुरचे वळण, स्वभाव, सवयी साऱ्या परंपराप्रिय होत्या. तिला लोकाना भेटायला मनापासून आवडे. शेजारी-पाजारी बहुतेक गुजराती भाषक होते. घर बदलण्याची कोण लगबग ! नेता-नेताही काहीतरी जुन्या घरी राहून जाते. काहीच नाही तरी आठवणी तर राहून जातात.

१९०२ साल. नोव्हेंबरची सुरुवात होती. दक्षिण आफ्रिकेहून गांधींसाठी तार आली

'चेंबरलेन इकडे येताहेत. तुम्हाला लगेच आले पाहिजे.'

'मला खर्चाला पैसे पाठवा. मी यायला तयार आहे.' गांधींनी तारेने तत्परतेने उत्तर दिले.

गांधींनी निघताना वचन दिले होते. त्यानुसार आलेल्या तारेला त्यांनी प्रतिसाद दिला होता. प्रवास खर्चासाठी लगेच पैसे आले होते. गांधींनी ऑफिस बंद केले होते. लगबगीने निघायची तयारी केली होती.

कस्तुरला वाटले की नवऱ्याला काही आराम नाही. थोडेसे ठाकठीक होऊ लागते न लागते तोच परत संघर्षाची वाट समोर येऊन भेटते. देवाच्या मनात काय आहे. न कळे बाई ! गांधींनाही वाटायचे की कस्तुरचे म्हणणे खरे आहे. वर्षभरात आपले काम पूर्ण होईल असे त्यांना वाटले. बायको मुलांनी इथेच रहावे असे त्यांनी इष्ट मानले. सोबत चार-पाच नातलगांना घेऊन निघाले.

गांधी निघाले होते. कस्तुर चक्रावून गेली होती. बोलताना नेहमी हसतमुख असणाऱ्या कस्तुरच्या डोळ्यात आसवे तरळलीत. तिला सारखे वाटत राहिले की आपण काही कुणाचे वाईट केले नाही. मनानेही कुणाचे वाईट चिंतिले नाही. मनात असूया ठेवली नाही. कधी कुणाशी स्पर्धा केली नाही. संकटे देणारा देव. वाट दाखवणारा तोच. तिने स्वत: आपल्या मनाचे समाधान करुन घेतले. आता इकडे मायदेशी सारे स्थिर-स्थावर होत होते. मुलाची तब्येत सुधारली होती. सोबत आपली म्हणता येईल अशी माणसे होती. आपला देश होता. गांधींच्या मनाची प्रतिक्रिया होती. ती स्पष्ट होती. त्यांना बायको-मुलांचा वियोग, बांधलेले घरटे मोडणे, निश्चित स्थितीमधून अनिश्चित स्थितीमध्ये प्रवेश, या सर्वांचे क्षणमात्र दु:ख वाटले. त्यांना अनिश्चित जीवनाची सवय झाली होती. या जगात ईश्वर किंवा सत्य याशिवाय दुसरे काहीही निश्चित नसते. जगात निश्चितपणाची अपेक्षा करणे अयोग्य होते. आपल्या सभोवती दिसणारे आणि घडणारे अनिश्चित आहे. क्षणिक आहे. तरी यामध्ये एक परम तत्त्व निश्चित रुपाने दडून राहिलेले आहे. त्याचा अणूमात्र जरी साक्षात्कार झाला, त्यावर श्रध्दा बसली तरच जगून सार्थक आहे. त्याचा सनातन शोध हाच परम पुरुषार्थ आहे.[१]

गांधींची आता दोन-दोन घरे झाली होती. राजकोटचे घर होते. मुंबईचे दुसरे घर झाले. मुलगा हरीलाल व भाचा गोकुळदास शिकत होते. दोघांना स्थानिक शाळांच्या वसतीगृहात ठेवले. थोरले बंधू लक्ष्मीदास होतेच. मुलांवर लक्ष द्यायची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. छगनलाल नावाचे एक जवळचे नातेवाईक होते. ते मुंबईला कारकून होते. त्यांची पत्नी काशीबाई. त्यांना एक मुलगा होता. त्यांची सांताक्रुजच्या घरात रहायची सोय करुन दिली. छगनलाल मणीलालला घरी शिकवू शकत होते. काशीताईशी कस्तुरचे सूत जुळले होते. दोघी जावा-जावांसारख्या राहिल्यात. नोव्हेंबरचा दुसरा आठवडा उजाडला. गांधींनी सर्वांचा निरोप घेतला. त्यांनी आपल्या परीने सोय लाऊन दिली होती. सोय वेगळी आणि साहचर्य वेगळे. सहायता वेगळी आणि सहभाग वेगळा. गांधींच्या मते प्रश्न वर्षभरचाच तर होता. कस्तुरसाठी त्याचा अर्थ तीनशे पासष्ठ दिवस असा होता.

गांधी डर्बनला पोहोचले. लगेचच कामाला लागले. मिस्टर चेंबरलेनपाशी डेप्युटेशन न्यायची तारीख

ठरवली गेली होती. अर्ज तयार करायचा होता. गांधींना डेप्युटेशनबरोबर जायचे होते. आता घर आणि कार्यालय दोन्ही जोहान्सबर्ग येथे झालेत. थोडे-बहुत द्रव्य साठवून ठेवावे अशी इच्छा गांधींच्या मनी होती. परमार्थाचा विचार होता. स्वार्थ काही मूळापासून सुटला नव्हता. गांधी मुंबईला असतानाची गोष्ट. विमा काढल्याची हकीकत त्यांनी आत्मचरित्रात सांगितली आहे. ते लिहितात की मुंबईत ऑफिस उघडले होते. त्यावेळी एक अमेरिकन विमा कंपनीचा एजंट आला होता. त्याचे व्यक्तिमत्व मोहक असून आवाज मधुर होता. अगदी जुनी दोस्ती असावी अशा प्रकारे त्याने गांधींशी त्यांच्या भावी कल्याणाविषयीच्या गोष्टी केल्यात. अमेरिकेत तर त्यांच्या स्थितीतील सर्व लोक आपल्या आयुष्याचा विमा उतरवतात. गांधींनीसुध्दा आपला विमा काढून भविष्यकाळाविषयी निश्चिंत व्हायला हवे. आयुष्याचा काही भरवसा नाही. अमेरिकेत तर विमा उतरवणे हा धर्म मानला जातो. गांधींनी एक लहानशी तरी विमा पॉलिसी काढावी असा त्याने आग्रह धरला. तेथपर्यंत दक्षिण आफ्रिकेत काय किंवा हिंदुस्तानात काय गांधींनी काही विमा उतरवला नव्हता. विमा उतरवला नव्हता एवढेच केवळ नव्हे पण अनेक विमा एजंटांना दादही दिली नव्हती. गांधींना विमा उतरवण्यात भ्याडपणा वाटत होता. ईश्वरविषयक अविश्वासाची भावना वाटत होती. या खेपेला मात्र ते बळी पडले होते. एजंटचे बोलणे मधुर होते. शिवाय त्यांच्या मनापुढे आपल्या बायकोची व मुलांच्या मूर्ती उभ्या ठाकत. त्यांचे मन त्यांच्याशी जणू काही बोलत होते ‘गड्या रे, तू बायकोचे दागिने तर बहुतेक सर्व विकून टाकले आहे.स. तुझे कमी जास्त झाले तर तुझ्या बायको व मुलांचा भार कुणावर? बिचाऱ्या वडील भावावरच पडणार ना? आजवर तर त्याने वडिलांची जागा घेतली आहे. केवळ घेतली एवढेच नव्हे. ती शोभवली आहे. यापुढे तसे करणे योग्य होणार नाही.’ गांधींचे मन त्यांच्याशी अशाप्रकारे बोलत राहिले होते. याचा परिणाम झाला. त्यांनी दहा हजार रुपयांची विमा पॉलिसी काढली.

दक्षिण आफ्रिकेत परिस्थिती पालटली. त्या सोबतच त्यांचे विचारही पालटले. तिथल्या संकट समयी त्यांनी जे जे काही केले ते ते सारे ईश्वराला स्मरुनच केले होते. तिथे किती काळ लोटेल हे काही त्यांना ठाऊक नव्हते. परत हिंदुस्तानात जाता येणार नाही असेच समजून ते चालत होते. बायको व मुले आपल्यासोबतच रहायला हवीत. यापुढे ते सारे व आपण वेगळे रहाता कामा नये. त्यांचा निर्वाहही दक्षिण आफ्रिकेतूनच चालायला हवा असे त्यांनी ठरवले. हा विचार मनात येताच त्यांना ही पॉलिसी दु:खदायक वाटू लागली होती. विमा एजंटाच्या जाळ्यात फशी पडण्याची त्यांना लाज वाटू लागली होती. त्यांचे संवेदनशील मन त्यांच्याशी बोलले होते ‘वडिल भाऊ पित्यासमान आहेत. त्यांना धाकट्या भावाच्या विधवेचा भार वाटेल. असे तुला वाटलेच का? तूच अगोदर मरशील असे तरी कशावरुन मानतोस? सर्वांचा पालनकर्ता तर ईश्वरच आहे. ना ! पालनकर्ता व रक्षक ना तू, ना तुझा थोरला भाऊ. विमा उतरवून तू तुझ्या बाल-बच्च्यांनाही पराधीन बनवलेस. त्यांनी स्वावलंबी का बनू नये? असंख्य गरीबांच्या मुला-बाळांचे कसे चालते? जी त्यांची गत तीच तुझी असे तू का समजत नाहीस? ‘ अशा विचारांचा प्रवाह सुरु झाला. हा विचार काही लगोलग अमलात आला असे नाही. विचार बीज मात्र मनात पडले होते. विमा पॉलिसीचा एक हप्ता दक्षिण आफ्रिकेतूनही पाठवला गेला होता.

धर्मचिंतनामुळे गांधी आत्मचिंतन करायला शिकले होते. अपरिग्रह करायचा असेल तर समभावी व्हावे लागेल. त्यासाठी हृदयपरिवर्तन आवश्यक आहे. हे स्वच्छपणे कळले होते. यामुळे विम्याची पॉलिसी बंद केली. बायको व मुलांचे रक्षण आपला जनक ईश्वर करील असे त्यांना मनोमन वाटले होते. एक नवी वाट निवडली होती. कस्तुर या वाटेवर त्यांच्या समवेत चालत निघाली होती. ही आता सहयात्रा होती.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ २४९

❖❖❖

## १८) कस्तुरचा दुसरा सागर प्रवास

गांधी डर्बनला निघून गेले होते. कस्तुर लेकरांसमवेत मुंबईत होती. असुरक्षित होती पण आर्थिक व्यवस्था होती. ही एक प्रकारची सुरक्षाच म्हणावी. परावलंबन नव्हते. हजारो मैलांचा प्रवास झाला होता. सागर लाटांवर हिंदकळणे अनुभवले होते. मुंबईत ऊष्म्याचे साम्राज्य अधिक असायचे. दक्षिण आफ्रिका सुंदर देश आहे. तिथले निसर्ग सौंदर्य अपरंपार आहे. मध्यम उंचीचे डोंगर आहेत. दूर दूरवर पसरलेली सुशोभित हिरवीगार कुरणे आहेत. डोंगरातून खाली उतारावर धावणाऱ्या पायवाटा तर किती सुंदर. आकाशातले ढग या डोंगरांवर तरंगत रहातात. त्यांचा या डोंगर शिखरांशी चालणारा लपंडाव प्रेक्षणीय असतो. त्यांच्या जणू काही आत्मीय गप्पा रंगतात. कस्तुरने तिथल्या भटक्या जाती बघितल्या. तिला हिंदुस्तानातील गुरे-ढोरे घेऊन जाणारे भटके आठवायचे. या यात्रेतला प्रत्येक क्षण तिच्या अंत:करणात जिवंत होता. एवढ्या आयुष्यात अपार भटकंती केली होती. बाहेरची थांबली तर आतली सुरु व्हायची. भटकंती मात्र अटळ होती. ती जणू तिची नियती होती. या भटकंतीच्या केंद्रस्थानी कधी नवरा असायचा. कधी लेकरे असायचीत. ती सारे खुल्या नजरेने बघत होती. ओठ बंद ठेऊन अनुभवत होती. ती सर्वांवर प्रेम करायची. स्नेह वितरित करायची. स्वत: दु:ख वेचायची. प्रार्थना करायची. तिचे स्वत:चे स्वत:साठी असे काहीही मागणे नव्हते. ती का यामुळेच संपन्न होती? दु:ख व्यक्तिला संपन्नतेचे दान करते, हे खरे आहे. तिच्या भटकंतीचा खरे तर कोण बरे साक्षीदार होता? कुणीच नव्हे. कुणी असेलच तर तिचा स्वत:चा अखंड चालणारा श्वास होता.

वर्ष पूर्ण होत आले होते. काही दिवस उरले होते. कस्तुर डोळ्यात प्राण आणून नवऱ्याची वाट बघत होती. नवरा काही परतला नाही. त्याचा निरोप मात्र आला. कस्तुरने लेकरांना सोबत घ्यावे. लवकरात लवकर इकडे निघून यावे. त्याला केव्हा परत येता येईल? या विषयीचा काहीही खुलासा नव्हता. गांधी भारतात परतण्याचे काही चिह्न नव्हते. या उलट कस्तुरला मुलांसोबत दक्षिण आफ्रिकेत जावे लागणार होते. नवऱ्याच्या परत येण्याची काही शाश्वती नव्हती. सारे काही अनिश्चित होते. ती शांतपणे याचा सामना करत होती. तिचे मन अशांत होते. नवऱ्याच्या आयुष्यात आता तिच्या भूमिकेची गरज होती. मोठा मुलगा हरीलाल राजकोटला शिकत होता. त्याला एकट्याला सोडून जायला तिचे मन तयार होत नव्हते. लेकराला एकट्याला कसे सोडायचे? तिच्या मनात शंका होत्या. भयाने मुक्काम ठोकलेला होता. मुलगा आईसोबत यायला तयार नव्हता. तो बुध्दिमान विद्यार्थी होता. सारेच त्याची प्रशंसा करीत. कस्तुर सुखावून जायची. अभिमानाने तिचा ऊर भरुन यायचा. मान गर्वाने ताठ व्हायची.

प्रिटोरिया व जोहान्सबर्गच्या वरीष्ठ हिंदी लोकांचा गांधींनी सल्ला घेतला. जोहान्सबर्गला ऑफीस थाटायचे ठरले. चांगल्या ठिकाणी घर मिळाले. गांधींची वकीली सुरु झाली. कस्तुर इकडे मुंबईत होती. गांधी तिकडे आणखी एक वेगळी लढाई लढत होते. कस्तुरला हे माहित असायचे काहीही कारण नव्हते. तिच्या मनात तर मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मुख्य होता. हरीलालच्या हट्टी स्वभावाची काळजी होती. ही काळजी स्वाभाविक होती.

तिला दक्षिण आफ्रिकेच्या दिशेने निघावे लागणार होते. तसा तिने एकदा सागर प्रवास केला होता. नाही म्हटले तरी आता त्याचा थोडा का होईना पण तिला परिचय झाला होता. दक्षिण आफ्रिकेबाबत मात्र ती शंकाकूल होती. तिथले वातावरण बदलले होते. हे तिला नवऱ्याच्या माध्यमातून कळले होते. यामुळे आपलेही जीवन बदलेल असे तिला वाटणे स्वाभाविक होते. आशा तर तिच्या सोबत होतीच.

कस्तुर एकटीच निघाली होती. प्रवासात एक परिचित गृहस्थ सोबत होते. दोन लहान लेकरे समवेत होती. प्रदीर्घ प्रवास होता. मागच्या प्रवासाच्या आठवणींचा दंश सोबतीला होता. मागच्या प्रवासातले समुद्री वादळ तिला आठवले होते. डर्बनच्या बंदरावरचे भयनाट्य तिला आठवले होते. ती प्रचंड थरारली होती. काय-काय वाढून ठेवले आहे. आता आणखी? दक्षिण आफ्रिकेत परिवर्तनाचे वारे वेगाने वहात होते. आपण

एका अंधाऱ्या गुहेत प्रवेश करत आहोत असे तिचेच तिला क्षणभर वाटले. आता ट्रान्सवालमध्ये घर आहे. घर म्हणजे नवीन घर. नवरा तिथेच वकीली करतो. सारे कुटुंब जोहान्सबर्गला राहील. तिथे सारेच नवीन. एक नवी सुरुवात. रहाणी वेगळी. खानपान निराळे. घर वेगळे. मुलांच्या शिक्षणाचा भेडसावणारा प्रश्न तर कायमचाच होता.

कस्तुर मुलांसोबत परतली होती. धाकटा रामदास अवखळ होता. त्याने थोडे काम वाढवून ठेवले होते. मुले, प्रवास आणि दंगा या तर समांतर गोष्टी. प्रवास सुरु होता. प्रवासात त्याची बोटीच्या कप्तानाशी छान दोस्ती जमली होती. तो कप्तानासोबत भरपूर खेळला. खूप दंगा केला. यात त्याचा हात मोडला. कप्तानाने त्याची काळजी घेतली. खूप सुश्रूषा केली. डॉक्टरांनी तात्पुरते हाड सांधले होते. रामदास आईसोबत जोहान्सबर्गला परतला. त्याचा हात लाकडी पट्टयांमध्ये बांधलेला होता. गळ्यात रुमालाची झोळी होती. हात त्या झोळीत अडकवलेला होता. झोळी गळ्यात लटकवून दिलेली होती. या जखमेवर कुणा डॉक्टरांकडून उपचार करवून घ्यावेत असा सल्ला बोटीवरच्या डॉक्टरांनी दिला होता. कस्तुरला आपलाच हात निखळल्यासारखे वाटत होते. ती शरमिंदी झाली होती. ती लेकरांसोबत घरी आली.

कस्तुर नवऱ्याचे नाना प्रयोग बघत होती. आहार आणि उपचार या प्रयोगाच्या मुख्य दिशा होत्या. आहाराची शिस्त शाकाहार. उपचारासाठी पाणी आणि मातीचे प्रयोग सुरु होते. निसर्गोपचाराची मदत होती. कधी-कधी तर ती थक्क होऊन जायची. यात त्याग आणि साधेपणा होता. धर्मजागरणाचा संदर्भ होता. ग्रांथिक विचार होते. प्रयोग वीरांशी विचार विनिमय होता. आचरण होते. प्रचाराची हौस होती.

गांधी त्या काळी मातीचे प्रयोग करत असत. ते आपल्या रुग्णांवर पाणी-मातीचे उपचार करत असत. त्या रुग्णांचा त्यांच्या आडमुठ्या वैद्यकीवर विश्वास होता. यापूर्वी मुंबईत असताना मणीलाल आजारी होता. त्यावर पाण्याचे प्रयोग केले होतेच. निसर्गोपचाराचा अनुभव होता असे नाही. हौस मात्र होती. सर्वांवर ते एक साथ मातीचे प्रयोग करत असत. रामदास तर मुलगाच होता. त्याच्याविषयी अपवाद कसा काय होणार होता? तो आठ वर्षांचाच तर बालक होता. कस्तुरचा सल्ला घ्यायचे काही कारण नव्हते. रामदासबाबत गांधींनी हीच उपचारपध्दत अवलंबिण्याचे ठरवले. गांधी आणि रामदास यांच्यात पुढीलप्रमाणे संवाद झाला.

'मी जखमेची धू-पूस केली कर चालेल का? ' गांधींनी रामदासला विचारले.

'होय, मला चालेल की.' रामदास म्हणाला.

'तू भिणार तर नाहीस ना? ' गांधींनी विचारले.

'छे, मी कसला भितो.' रामदासने हिंमतीने उत्तर दिले.

रामदास हसत होता. त्याने हसतमुखाने वडिलाना उपचारासाठी होकार दिला होता. ते काही त्याचे सारासार विचार करायचे वय नव्हते. त्याचा वडिलांवर विश्वास मात्र अटळ होता. प्रयोगावर श्रध्दा होती. त्याला भय वाटले नाही. त्याने चिंता केली नाही.

गांधींनी थरथर करत काळजीपूर्वक त्याच्या हातावरची पट्टी सोडली. जखम स्वच्छ केली. स्वच्छ मातीची घडी ठेवली. पट्टी आधीसारखीच परत बांधून दिली होती. अशाप्रकारे रोजचा उपचार सुरु झाला. स्वत: जखम स्वच्छ करायची. मातीची पट्टी बदलायची. पुनरपि बांधून द्यायची. यात महिना गेला. जखम पूर्ण भरुन बरी झाली. एकदाही कसलीही अडचण उभी राहिली नाही. बोटीवरच्या डॉक्टरांनी महिन्याची मुदत दिली होती. निष्णात डॉक्टरानाही एवढा काळ लागणार होता[१] गांधी हर्षित झाले. रामदास आनंदला. कस्तुर थक्क झाली.

१९०३ साल. गांधींचे वकीलीचे कार्यालय ट्रान्सवालला होते. निवासस्थान होते पीटरमोरित्सबर्ग येथे. ही उच्चभ्रु लोकांची वस्ती होती. सभोवती बाग असलेले दोन मजली घर होते ते ! घर आधुनिक होते. हेवा वाटावे असे होते. तिथले रहाणीमान मात्र अत्यंत साधे होते. तिथल्या जीवनावर जॉन रस्किनच्या विचारांची छाया होती. शिकवणुकीचा प्रभाव होता. एक नोकर घरात रहायचा. तो नोकर नव्हे तर घरचा सदस्यच होता. त्याच्या कामात मुले त्याला मदत करत असत.

नगरपालिकेचा एक झाडूवाला रोज घर झाडायला येई. त्याच्या येण्यापूर्वी गांधी आणि कुटुंबीय लोक संडास साफ करुन घेत असत. इथले शेजारी वेगळी भाषा बोलायचे. आहार, आरोग्य, मुलांचे शिक्षण एक का अनेक? कस्तुरपुढे प्रश्नांचा गुंता होता. तिने एथवर समायोजन केले होते. ती हर प्रकारच्या तडजोडीला तयार होती. खरे म्हणजे मुंबईत ती रमली होती. तिथे भजन, भवन, भाषा, भूषा सारे एक होते. आता इथे हे सारे बदलले होते. ती दमून गेली. तिचा जीव छगनलाल व त्याची बायको काशीबाई यांच्यात रमला होता. आता ते इथे येणार असले तरी सोबत राहणार नव्हते. ते नाताळला राहणार होते. अनेकदा नवरा उशिरा घरी यायचा. सोबत सवंगड्यांचा मेळा असायचा. कस्तुरच्या हातच्या सुग्रास भोजनासाठी ही अशी गर्दी उसळायची.

१९०४ साल उजाडले. जोहान्सबर्गच्या उपनगरात केसिंग्टनला गांधींनी घर घेतले. हे घर मोठे होते. घराला आठ खोल्या होत्या. कस्तुर या नव्या घरात स्थिर होत होती. तिचे स्वयंपाकघर सजले होते. बाजारपेठ जवळ होती. तिला आपल्या मनासारखे घर सजवता येत होते. गांधी खूप काम करायचे. अनेकदा तर ते कार्यालयात झोपी जायचे. आपण काही नवऱ्याच्या कार्याचा मध्यबिंदू नाहीहोत हे हळूहळू तिला कळून चुकले होते.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३०४.

❖❖❖

## १९) या रे या रे, सारे या

नवऱ्याच्या समोर कामांची दाटी होती. त्यांना समाज सेवेचे वेड होते. आह्वानेच आह्वाने होती. परिवर्तन तिच्या आयुष्याचा जणू स्थायीभाव बनून गेला होता. या आव्हानांचा नेटाने मुकाबला करावा लागणार होता. कस्तुर कटिबध्द होती. आजवर ती झुंजत आली होती. डगमगली नव्हती. आता का ती हार जाणार होती? हे घर तिने छान सजवले होते. अनेक बदल केले होते. गांधींची मुंबईत वकीली होती. पुढे नेटालमध्ये सुरु झाली. कमाई वाढली. आता ट्रांसवालमध्ये वकीली सुरु झाली. आता तर कमाई खूपच वाढली. कस्तुर आता पुढे निघाली होती.

गांधी-कस्तुरचे घर सर्वांसाठी खुले होते. ती एक प्रयोगशाळा होती. तिथे ना जातीचा अडसर. ना प्रांताचा अडथळा. ना भाषेची अडचण. ना अभिव्यक्तिची गैरसोय. धर्म कुठलाही असो. संप्रदाय कुठलाही का असेना. पंथ जो कुणी निवडेल तो. विचारधारा असे ना का वेगळी. एवढेच काय पण देशातला असो वा विदेशातला कुणीही. जवळचा असो वा लांबचा. नातेवाईक असो वा परका. गोरा असो वा काळा. सर्वांना खुला प्रवेश. खुले आमंत्रण. 'या रे या रे, सारे या.' असा घोष निनादता. कुठलाही भेदभाव गांधींच्या मनाला कधी शिवला नाही. कस्तुर त्यांच्या सोबत चालत निघाली होती. अनेकदा हे सारे सोसणे जड जायचे. असे झेलायचा तिला काही अनुभव नव्हता. असा संस्कार नव्हता.

कस्तुरची जीवनयात्रा चढ-उताराची होती. मिश्रित स्वरुपाची होती. गांधी विविध जातींच्या लोकांच्या संपर्कात आले होते. विविध धर्मांच्या लोकांच्या सहवासात आले होते. समानतेची ही शिकवणूक कस्तुरला मिळाली होती. ती हे सारे डोळसपणे बघत होती. आत्मसात करायचा प्रयत्न करत होती. तिला हे सारे सोपे नव्हते. तिचा संस्कार हे खुलेपणाने स्वीकारत नव्हता. परंपरेची बंधने तिला हे मान्य करु देत नव्हती. तिची धडपड जारी होती.

आता गांधींचा कार्यक्रम अधिक निश्चित ठरला होता. ते भल्या सकाळी घरातून निघून जात. परतताना कधी सायंकाळ व्हायची. कधी पायीच निघत असत. थेट रात्री जेवायच्या वेळीच घरी परतायचे. बहुधा सोबत सहकारी असायचे. रात्री उशिरापर्यंत काम चालायचे. गांधी कारकुनांना घरी राखायचे. इतर साथी-सोबती असायचे. ते घरी रहात. यात इंग्रज साथ-सोबत करत. नवऱ्याचे हे वागणे काही सर्वांना आवडायचे नाही. कस्तुरची तर याबाबत खुली नाराजी होती. बोअर-ब्रिटिश युध्दाच्या काळात गांधींचे घर भरलेले होते. तरी त्यांनी आणखी साथी जोडले. जोहान्सबर्गहून दोन इंग्रज आले. ते त्यांच्या घरीच थांबले. यांच्या सहवासापायी तर कस्तुरला अक्षरश: रडावेच लागले होते. तिच्या नशीबी नवऱ्यापाशी रडायचे असे अनेक प्रसंग होते. हे इंग्रज मित्र आल्यामुळे काही अडचणी उभ्या राहिल्यात. हे गांधींनाही कळले. त्यांच्यात असा संवाद व्हायचा.

'कस्तुर, काहीही असो हे आपले कुटुंबीजन आहेत. हे बहुतांशी आपल्या रिवाजाना अनुसरुन रहाताहेत. आपण शाकाहारी अन्न शिजवतो. हे मित्र आपल्यासोबत ते अन्न खातात.' गांधी म्हणाले.

'हे आपल्याशी मिळून-मिसळून वागतात हे खरे आहे. पण .. .. ..' कस्तुर म्हणाली.

कस्तुरच्या या 'पण' मुळेही हे संबंध थांबले नाहीत. थबकले नाहीत. बदलले तर मुळीच नाहीत. गांधी बदलले नाहीत. कस्तुरची सहनशीलता थोर ! अखेर विजय तिचा होत असायचा. गांधींच्या विचारात पुढे गंभीर बदल झालेत. कस्तुरच्या वागण्याला विवेकाची साथ होती. ती विरोध करायची. गांधी भांडायचे. ती तंडायची. तिच्या सहनशक्तिची त्यांना लाज वाटली. कस्तुर सेवेसाठी धावत होती. तिचे लक्ष मुख्यत्वेकरुन मुलांच्या शिक्षणाकडे होते. तिला ही काळजी सतावत रहायची. याविषयी कधी-कधी तिचे नवऱ्याशी भांडणही व्हायचे. गांधीभाईंना वाटायचे की शिक्षण घरी होऊ शकेल. कस्तुरला वाटायचे अभ्यास शाळेतच होईल. गांधी मणीलाल व रामदासला फिरायला नेत. या दरम्यान त्यांना शिकवत. अशी फिरती शाळा कस्तुरला मान्य नव्हती. गांधी लेकरांना कार्यालयातही घेऊन जात. तिथे लिहायला लावत. हिशेब सांगत. पाठांतर करायला लावत. या दरम्यान गांधी कामात असत. कधी

आपल्या अशीलांशी चर्चा करत. कधी कार्यालयीन कामे आटोपत. कधी पत्रांना उत्तरे देत. कधी मजकूर मिस श्लेसिनला सांगत. ती मदतनीस होती. ही मुलगी यहुदी होती. कमालीची विश्वसनीय होती. परिश्रमी तर होतीच होती. थकवा काय तो तिला ठाऊकच नव्हता. गांधी खूप काम करत. सवड मिळताच मुलांकडे वळत. हे काही कस्तुरला मान्य नव्हते. अभ्यासाची अशी पध्दत काही तिच्या मनात भरत नव्हती. गांधींजवळ याशिवाय वेगळा पर्याय नव्हता.

श्री. हेन्री पोलाक यांचा  जन्म १८८२ साली डोव्हर येथे झाला होता. लिओ टॉल्स्टॉयच्या साहित्याचे वाचन करून ते शाकाहारी बनले होते. ते 'ट्रान्सवाल क्रिटिक' पत्राचे उपसंपादक होते. एका निरामिष भोजनगृहात त्यांची गांधींशी भेट झाली. त्यांचा मनमोकळेपणा गांधींना आवडला. ते प्रथमदर्शनीच पोलाककडे आकृष्ट झाले. त्यांच्या जीवनविषयक विचारांमध्ये बरेच साम्य होते. त्यांना साधी राहणी आवडली. एक झपाटलेपण त्यांच्या ठायी होते. जे आवडले ते लगेच अंमलात आणायचा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्याविषयी गांधींनी लिहिले आहे. की ते आपल्या बुध्दीला पटेल त्याप्रमाणे कृती करणारे होते. आपल्या जीवनामध्ये आवश्यक ते आमूलाग्र परिवर्तन करणारे होते. एकदा गांधी नाताळला निघाले होते. पोलाक पोहोचवायला स्टेशनवर आले होते. त्यांच्या हाती रस्किनचे पुस्तक होते. 'अन् टु धिस लास्ट' हे पुस्तक त्यांनी गांधींच्या हाती ठेवले. जॉन रस्किन कलेचे चिकित्सक अभ्यासक. नीतिशास्त्राचे निबंधकार. लेखक. अर्थशास्त्रज्ञ. समाजशास्त्रज्ञ. रस्किनच्या लेखनाचा गांधींच्या जीवनावर आमूलाग्र परिणाम झाला. त्या लेखनात शरीरश्रमाचे महत्व, साध्या रहाणीची ओढ, सामाजिक ताण-तणावांवर मात करण्याची शैली त्यांना भावली. ते प्रस्थापित भ्रामक समजुतींवर हल्ला करणारे सुधारक होते. गांधींनी या ग्रंथाच्या महात्म्याचे वर्णन करताना चाळीस वर्षानंतर असे म्हटले की हे पुस्तक रक्त आणि अश्रुंच्या शाईने लिहिले आहे. गांधींवर या पुस्तकाचा खोलवर परिणाम झाला.

पोलाक आता फिनिक्समध्ये आले होते. गांधींनी त्यांना आपल्या घरी राहाण्यास निमंत्रण दिले. दोघे सख्ख्या भावांप्रमाणे राहू लागले. पुढे पोलाकचे लग्न झाले. सौ. मिली पोलाक वहिनी आल्या. एक अपरिचित इंग्रज बाई आली. छे, ती तर पुढे मैत्रीण बनली. ती कस्तुरच्या कुटुंबात दाखल झाली. समरस झाली. ना कधी भांडण ना तंटा. कस्तुरला हा नवा अनुभव होता. तिची कुटुंब कक्षा विस्तारित होत होती. कस्तुरने डर्बनमध्ये बिऱ्हाड केले होते. तिथे फेरफार केलेच होते. खर्च मोठा होता खरा. वळण मात्र साधेपणाकडे होते. जोहान्सबर्गच्या घरात तर विशेष फेरबदल झालेत. केवळ सामान-सुमान कमी झाले नाही. अंत:करणाचा साधेपणा वाढला. कामे स्वत:च्या हातून करायची हौस वाढली. कस्तुरने यासाठी मुलांनाही तयार केले. आता बाजारातून रोटी आणणे थांबले. पोळी घरात होऊ लागली. याकामी गिरणीचे पीठ निरुपयोगी होते. हाताने पीठ दळले जायला हवे. यातून साधेपणा जपला गेला. आरोग्य वर्ध्दन झाले. पैशांची काटकसरही साधता आली. कस्तुर सारख्या गृहिणीला तर हे भावणारेच होते. घरात जाते आले. हाताने ओढायचे जाते. सात पौंड किंमतीचे जाते. एकट्यासाठी जाते ओढणे अवघड होते. दोघे मिळून ते आरामशीरपणे ओढता येई. गांधी, मुले व पोलाक जाते ओढत. कस्तुर स्वयंपाकघरात गुंतलेली असे. कधी-कधी तीही मदत करायची. गोऱ्या इंग्रज सौ. मिली पोलाक वहिनीही जाते ओढू लागायच्यात. त्या कामात मदत करायच्यात. यातून मुलांचा व्यायाम झाला. कस्तुर मोठ्या कुटुंबात राहिलेली होती. तिला सहजीवनाचा पाठ नव्याने शिकायची गरज नव्हती. सर्वांसोबत काम करायची तिला सवय होती. सौ. मिली पोलाक चांगली युवती होती. ती कस्तुरला खूप आवडली. दोघींनी स्वयंपाकघरातील कामे वाटून घेतलीत. अडचण काय ती तेवढी भाषेची होती. गांधी दुभाषी होते. एकीने स्वयंपाक करायचा तर दुसरीने धुणी-भांडी उरकायची अशी कामांची विभागणी झाली होती. मिली कस्तुरला इंग्रजी शिकवू लागली. कस्तुर गुजराती भजने गायची. तिला शिकवायची. आपल्या संस्कृतीचा परिचय करुन द्यायची. घरात गांधींनी सुरु केलेला त्रासदायक उपक्रम आणि थकवणारा दिनक्रम होता. मिली त्या थकव्याची सोबत करत होती.

मिलीसोबतचे क्षण मात्र आनंदवर्ध्दक होते. मूल्यवान होते.

एकदा काही कारणाने पोलाक गांधींवर चिडला होता. घरातही अबोला धरला होता. कस्तुरने मिलीला विचारले होते

‘What the matter Mr. Polak? What for he cross?’ ‘पोलाकला काय झाले? तो रागावलेला का दिसतो?’

‘गांधींशी त्याचे पटले नाही.’ मिली उत्तरली. ‘What for he cross to my husband? What he done?’

‘माझ्या नवऱ्यावर तो का चिडला आहे.? माझ्या नवऱ्याने काय केले? मिलीने सारे काही तिला समजावून सांगितले. यावर ती म्हणाली Oh Oh. बरे बरे.

❖❖❖

## २०) फिनिक्स आश्रम

१९०४ साल होते ते! स्थानिक वृत्तपत्रात एक जाहिरात झळकली होती. 'डर्बनच्या नजिक कुठल्याही स्टेशनला लागून जमीन हवी.' जाहिरातीला अनुकूल उत्तर मिळाले होते. आठवड्याभरच्या आत वीस एकर जमीन खरेदी केली गेली. इथे एक ओढा होता. संत्री आणि आंबा मोहरला होता. शेजारी ऐंशी एकराचा आणखी एक भूखंड होता. त्यात नाना फळझाडे होती. एक कुटी होती. काही दिवसानंतर तो भूखंडही विकत घेतला गेला होता. एका नव्या वसाहतीचा शुभारंभ झाला होता. गांधींच्या डोक्याचा ताबा त्यावेळी सर्वोदयाने घेतला होता. सर्वांनी आपल्या निवास-भोजनाचा खर्च समानपणे वाटून घ्यावा. सर्वांनी आपापल्या वाटणीची शेती कसावी. उरलेल्या वेळेत वृत्तपत्राचे काम करावे. यात गोरा-काळा असा भेदभाव करु नये असे ठरले. फिनिक्सचा कारभारी अल्बर्ट वेस्ट होता. त्याच्याशी गांधींनी चर्चा केली होती. एका सकाळी त्यांच्यात असा संवाद झाला.

'मी काही वर्षांपूर्वी एक गाव बघितला होता.' गांधींनी सांगितले.

'कुठला गाव?' वेस्टला आश्चर्य वाटले.

'नाताळच्या मेरियन हिलवरील गाव.' गांधींनी पत्ता सांगितला.

'हो हो. तो तर ट्रॅपिस्ट समुदायाचा स्वावलंबी गाव !' वेस्टच्या लक्षात आले.

'तसा गाव आपल्याला वसवायचा आहे. आधी छापखाना तिकडे नेऊ या !' गांधींनी निर्णय घेतला.

'मग कामाची कक्षा वाढवता येईल. कसा आहे. तो गाव?' वेस्टला भविष्यकालीन वेध लागले.

"गावाकडे जाणारी वाट गर्द वनराई असलेल्या दरीतून जाते. त्या दरीतून एक छोटीशी नदी झुळझुळ वहाते. तिथे आहे. एक मठ. चहुबाजूच्या टेकड्यांवर हिरवा गालिचा अंथरलेला आहे. इथल्या वसाहतीत लोहारकाम, सुतारकाम, कातडी कमावणे, पादत्राणे तयार करणे, जस्तच्या पत्र्यापासून विविध वस्तु तयार करण्याचे उद्योग होतात. भगिनींच्या वसाहतीत कपड्यांची शिलाई, इस्त्री करायचे काम, विणकाम, गुंफण्याची कला असे उद्योग चालतात. मठापासून दोन मैलांच्या अंतरावर छापखाना आहे. जलप्रवाहाद्वारे संचालित पिठाची गिरणी आहे. एक तेल घाणा आहे. इथे शेंगदाण्याचे तेल काढले जाते. हा आवाज वगळता त्या लाल विटांच्या इमारतीत नीरव शांतता नांदते." गांधींनी सारे तपशिलवारपणे मांडले.

गांधींनी ही चर्चा आपल्या पुतण्यांशीही केली. छगनलाल, मगनलाल आणि जमनादास हे पुतणे. आपापल्या घरा-दारांवर तिलांजली देऊन हे स्वप्न मूर्त करायचे त्यांनी ठरवले. दहा दिवसांच्या आत या नव्या योजनेला आकार लाभला. तिन्ही बाजूला क्षितिजस्पर्शी डोंगर रांगा होत्या. केळीच्या सुरम्य बागा होत्या. ऊसाची नयनाभिराम शेती होती. ताम्हणात पूजेसाठी घेतलेल्या देवप्रतिमेसारखे फिनिक्स दिसत होते. ते एका सुरम्य टेकडीभोवती विलसले होते. ग्रीक मिथकातून फिनिक्सचा परिचय येतो. फिनिक्स नावाचा एक काल्पनिक पक्षी आहे. तो पाचशे वर्षे जगतो म्हणे ! स्वत: जळून भस्म होतो. त्या राखेतून पुनश्च फडफडतो. फिनिक्स शब्दाचे भाषांतर आपण अग्नीपूत, अमर वा संजीवनी असे करु शकतो.

दक्षिण आफ्रिका घनदाट अरण्यांचा प्रदेश आहे. या विराट आफ्रिकेतील एक भाग म्हणजे नाताळ. आफ्रिकेच्या पायाचा जणू अंगठा. या प्रांताच्या अगदी तळाशी. सागर किनाऱ्यापासून सहा-एक मैल आत वसलेले फिनिक्स. या प्रदेशाच्या तुलनेने सुईच्या अग्राएवढी जागा. प्रत्येक रहिवाशासाठी तीन-तीन एकर जमिनीचे तुकडे केले गेले होते. यात एक तुकडा गांधींनीही स्वत:साठी काढून ठेवला होता. या जमिनीवर सर्वांनी घरे बांधली. घरांना पाया खणायची फार गरज नव्हती. सतत बरसत्या पावसामुळे घरांची भूमी अधांतरी ठेवली जायची. तीन-तीन फुट उंचीच्याखांबांवर घर वसायचे. या उंच खांबांवर फळ्या अंथरून घरची जमीन तयार व्हायची. यामुळे ओल व गारव्यापासून बचाव व्हायचा. छतावर पत्रे असायचे. त्याखाली पुन्हा लाकडी फळ्या अंथरलेल्या असत. भिंतीत काचेच्या खिडक्या

असत. आरंभीची घरे अशी तयार झाली होती. अंगणात द्राक्षांच्या वेलींचे शोभिवंत मंडप असत. हिरव्या द्राक्षांची तिथे लयलूट असायची.

जमिनीच्या एका टोकावर एक बाग होती. त्यात आंबे, संत्री, पेरु या फळांची झाडे होती. दुसऱ्या टोकाला बाभळीची गच्च दाटी होती. तिथे सूर्यप्रकाशाच्या प्रवेशाला मज्जाव होता. वायव्येकडे एक छोटा ओढा होता. या ओढ्याला नाना वाटा आणि विविध वळणे होती. पूर्व सीमेवर आणखी एक छोटा ओढा होता. नावाप्रमाणेच ओढ असलेला ओढा. रात्रीची तर बातच कशाला? दिवसा उजेडीही तिथे भल्या-भल्यांची छाती धपापायची.

याशिवाय सर्वत्र रान गवताचे दाट गचपण माजलेले होते. पुरुषभर उंचीचे हे गवत सरपटणाऱ्या जीवांचे आश्रयस्थान होते. इथल्या झाडांवर लहरत्या हिरव्या सर्पांच्या एकाधिक माळा तरंगत असायच्या. त्या सावलीतही चमचमत्या दिसायच्या. या सोबत गवतातले सर्पराज तर अगणित होते. सर्प विविध जातींचे होते. विविध धर्मांचे होते. विविध रंगांचे होते. विविध स्वभावांचे होते. एखाद्या वेळी तर पाच-सात साप समूहाने निघत असत. ते एकाच वेळी दिसत असत. काही हातभर असत. काही कासऱ्याएवढे लांबच लांब असत. काही दीडफुटे होते. काही बारा ते वीस फुट लांबीचेही असत. काही मनगटाहून जाडजुड होते. काही करंगळीहून बारीक दिसत. कुणी त्रिकोणाकृती होते. कुणी ठिपक्या-ठिपक्यांचा साज लाभलेले चकाकते होते. कुणी लांबून पिचकारी मारुन माणसाला आंधळा करणारे होते. कुणी काळ्याकुट्ट रंगाचे पण बिनविषारी होते. कुणी उडता येणारे होते. कुणी झाडांवर सरसर चढू शकणारे होते. कुणी काळे होते. कुणी पांढरे होते.

पक्षी तर अगणित. ना मोर होते ना कोकीळ. ना कावळे होते ना चिमण्या. बुलबुल पक्षी मात्र भरपूर होते. पंचरंगी पक्ष्यांची शोभा तर काहीही अवर्णनीय ! छातीवर लाल ठिपका असलेला चिमणा पक्षी दिसायचा. तो हमखास लक्ष वेधून घेईल असा असायचा! काहींची घरटी अगदी सिमेंटच्या घरांप्रमाणे मजबूत होती. बगळ्यांच्या रांगा तर इथले वैभव होते. या पाखरांचा नांदता कलरव विलक्षण होता. हा एक अपवाद मानावा. बाकी सर्वत्र चिडीचूप शांतता आणि गहिरे सूनेपण नांदायचे.

इथे 'इंडियन ओपिनियन' साप्ताहिक सुरु झाले होते. श्री मदनजीत यांनी हे वृत्तपत्र काढायचा बेत केला. त्यांनी गांधीजींचा सल्ला व मदत मागितली. गांधी वर्तमानपत्र काढायच्या योजनेत सामील झाले. १९०४ साली या पत्राचा प्रारंभ झाला. श्री मनसुखलाल नाझर संपादक होते. संपादनाची खरी जबाबदारी गांधींचीच होती. सुरुवातीला तर हे गुजराती, हिंदी तमीळ व इंग्रजी भाषेत निघायचे. गांधींना त्यात पैसे गुंतवावे लागले. त्यांची सारी शिल्लक त्यात जाऊ लागली. या पत्राने समाजाची खूप सेवा बजावली. गांधी पत्रात आपला आत्मा ओतत असत. या पत्राची अपेक्षित झळ कस्तुरने सोसली. नेहमीप्रमाणे बोलली मात्र काहीच नाही.

गांधींच्या संपर्कात आलेले बहुतेक ख्रिस्ती बांधव प्रोटेस्टंट शाखेचे होते. ट्रॅपिस्ट लोक आणि यांचा मठ कॅथॉलिक साधूंचा होता. ट्रॅपिस्ट सारे शाकाहारी साधू होते. या मठाने गांधींना जणू काही आश्रमीय जीवनाची दीक्षा दिली. ट्रॅपिस्ट पंथियांचा हा मठ डर्बनहून सोळा मैल अंतरावर होता. हा समुद्र सपाटीपासून अदमासे अकराशे फुट उंचीवर होता. तिथले वातावरण सदाबहार होते. १८८२ सालच्या खिसमसच्या उत्सवात या मठाची स्थापना करण्यात आली होती. एबट फ्रान्सिस फान्नर इथले प्रमुख होते. मेरी आणि तिची आई आन यांच्या स्मृती जागवणारे 'मेरिआन हिल' असे मठाचे नामाभिधान केले होते. गांधींना तिथल्या भक्तिमय वातावरणाने मोहिनी घातली होती. मठाच्या जीवनशैलीने ते प्रभावित झाले होते.

मठाचा परिसर शांततेने भारलेला होता. त्यांच्या औद्योगिक प्रयोगशाळांमधून श्रम सरिता वहाती होती. औजारांचा खडखडाट आणि खणखणाट ऐकू येत असायचा. जवळपास सव्वाशे साधू तिथे वास्तव्याला होते. साठच्या जवळपास साध्वी होत्या. तिथले मौन आणि ब्रह्मचर्याचे तेज आगळे-वेगळे होते. ट्रॅपिस्ट साधू पहाटे दोन वाजता निद्रेचा त्याग करत. उठल्यावर चार

तास प्रार्थना व ध्यान-धारणा करत. बंधू पूर्ण शाकाहारी होते. भगिनी मात्र अंशत: शाकाहारी होत्या.

ट्रॅपिस्ट हसतमुख असायचे. ते हट्टेकट्टे होते. ते सुप्रसन्न असायचेत. ते नम्र आणि लवून नमस्कार करणारे साधू होते. इथे प्रमाद नव्हता. आळस नव्हता. शंका नव्हती. संदेह नव्हता. होता तो खळाळ आणि स्निग्धता. नम्रता आणि ईश्वरभक्ती. उद्योग आणि श्रमरतता होती. समता आणि सहकार्य नांदत होते. परस्पर आदरभाव आणि परिसराप्रती प्रेमभाव वस्तीला होता. सर्वत्र धर्माचे दर्शन होते. एकूणच हा मठ गांधींना भावला. त्यांच्या मनातील आश्रम कल्पनेचा हा आदिबंध होता. पुढे हिंदुस्तानात आल्यावर याचा विस्तार झाला.

फिनिक्स आश्रमात सारे मिळून अदमासे पन्नास-साठ लोक रहायचेत. सारे जणू एका कुटुंबाचेच सदस्य होते. तिथेही कस्तुरचा स्वच्छतेचा आग्रह असायचाच. तिची आत्मीयता तर सर्वांनाच मोहून घ्यायची. रामदासने तिथली एक आठवण सांगितली आहे. फिनिक्समध्ये एक गबाळी महिला होती. ती काही बदलायचे नाव घेईना. सुधारणा जणू तिला नकोच होती. तिला गबाळेपणा काही सोडता आला नाही. कस्तुरने तिची कामे करावीत असे व्हायचे. कस्तुरने तिच्याशी कधी भांडण केले नाही. तिचा घाणेरडेपणा सहन केला नाही. स्वत:च पुढे होऊन तिची कामे करुन द्यायची. गांधींची सचिव होती मिस सोन्जा श्लेसिन. तिच्याशी कस्तुरचे मेतकूट जमले होते. सत्याग्रह शिखरावर पोहोचला होता. सारी वडीलधारी मंडळी कैदेत गेली होती. आश्रमातल्या बालकांमध्ये उत्साह नव्हता. तो टिकवून ठेवण्यासाठी श्लेसिनने काही क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले. बटाटा-चमचा या शर्यतीत कस्तुर पहिली आली. साबणाच्या तीन वड्या मावतील असा डबा बक्षीस म्हणून तिने मिळवला. तिला खेळांमध्ये रस होता.

❖❖❖

## २१) टॉल्स्टॉय फॉर्म

टॉल्स्टॉय फॉर्मच्या मागे गांधींची इच्छाशक्ती आणि जर्मन वास्तुविशारद हरमन केलेनबॅक यांची धनशक्ती होती. दोघे टॉल्स्टॉयचे अनुरागी होते. केलेनबॅक हे स्कॉटलँडहून आले होते. हे उंच, धिप्पाड, आकडीबाज मिशांचे जर्मन ज्यू होते. ते बौध्द तत्त्वज्ञानाचा अभ्यास करत, यादरम्यान त्यांची व गांधींची अचानक भेट झाली होती. गांधींनी दक्षिण आफ्रिकेचा निरोप घेईपर्यंत ते सोबत होते. सत्याग्रह चळवळीत तर ते गांधीजींचा उजवा हात होते. केलेनबॅक दयाळू, ठाम विचारांचे आणि बालकासारखे निरागस होते. त्यांनी टॉल्स्टॉय यांची परवानगी मिळवली होती. ती आनंदपूर्वक मिळाली होती. फॉर्मचे नाव ठरले टॉल्स्टॉय फॉर्म.

जोहान्सबर्गहून एकवीस मैल अंतरावर टॉल्स्टॉय फॉर्म उभे राहीले. ती अकराशे एकर जमीन होती. फॉर्म लॉली स्टेशनपासून तीन-एक मैल अंतरावर होते. या फॉर्मचा पसारा फिनिक्सच्या तुलनेने किमान अकरा पट तरी मोठा होता. इथल्या जमिनीवर किमान हजारेक फळझाडे होती. झाडे विशाल होती. पाण्याचा एक झरा होता. गवतातून वेगवेगळ्या वनपुष्पांची पखरण होती. ही जमीन केलेनबॅक यांच्या मालकीची होती. गांधी वापरतील तोवर त्यांना विनामूल्य वापरायची अनुमती मिळाली होती. इथेच घर बांधायचे ठरले. कुटुंबाची वसाहत करायचे ठरले. गांधी कस्तुरसाठी जाकिटे शिवत असत. ती जाकिटे कस्तुर वापरायची. या जाकिटांचा तिला सहाजिकच अभिमान आणि आनंद वाटायचा. ते केवळ कपडे नव्हते. त्यात आत्मीयता होती.

खरे पाहू गेल्यास फिनिक्स काय आणि टॉल्स्टॉय फॉर्म कार्य ही स्थाने लौकिक नव्हतीच मुळी. ही ऐहिक विकासाची ठिकाणे नव्हती. ती आत्मिक साधनेची स्थळे होती. यात रहाणे म्हणजे निसर्गाच्या मांडीवर विहार करणे होते. आनंद आणि उल्हासासोबत श्रध्देचा मकरंद तिथे होता. दोन्हीही ठिकाणी श्रमाला अपार प्रतिष्ठा होती. लहान-मोठ्या श्रमशील प्रवृत्तींना समान सन्मान मिळायचा. तिथे या दोघांना सारखाच गौरव लाभायचा. पारस्पारिक स्नेह व समूह जीवन इथला परवलीचा शब्द होता. वातावरणात नीती, भक्ती आणि अध्यात्म झळकत होते. फिनिक्स आश्रमात अप्रत्यक्षरित्या तर टॉल्स्टॉय फॉर्ममध्ये प्रत्यक्षपणे आश्रमाचा अनुबंध होता. तो हिंदजनांच्या आत्मगौरवाशी संबध्द होता. ती आत्मविकासाची वाट होती.

दोन्हीही आश्रमांची आपापली स्वतंत्र वैशिष्ट्येही होती. फिनिक्स वृत्तपत्राच्या आवश्यकतेतून आकाराला आले होते. याची मध्यवर्ती प्रवृत्ती ही वृत्तपत्र आणि नियतकालिकांच्या प्रकाशनाशी संबध्द होती. यात सहभागीजन मोठ्या प्रमाणावर गांधींचे आप्त-स्वकीय होते वा गांधी विचारांनी आकृष्ट झालेले साधकजन होते. टॉल्स्टॉय फॉर्ममध्ये चार-पाच लोक गांधींच्या विचारांशी प्रतिबध्द होते. गांधी आणि केलेनबॅक तर होतेच. सत्याग्रहाच्या लढतीतील काही थकले-भागले सत्याग्रहीही विश्रांतीसाठी इथे आलेहोते. ज्यांचे कुटंबीजन तुरुंगात गेले असतील ते होते. ज्यांना कुठे ठाव नसेल असेही होते. इथे प्रवेश करणारे हिंदुस्तानातील प्रतिनिधी होते. गुजरात, मद्रास, आंध्र आणि उत्तर प्रदेशातील बंधु-भगिनी होते. हिंदू, मुस्लिम, पारशी आणि ख्रिस्ती होते. सर्वांचे एकच स्वयंपाकघर होते. सारे आपापली भांडी स्वत: स्वच्छ करत. सत्याग्रही उद्योगी होते. स्वावलंबी होते. फिनिक्समध्ये सुरुवातीला घरे बांधायचे काम होते मग छापखाना, गृहकार्ये आणि शेती एवढीच काय ती कामे होती. तुलनेने टॉल्स्टॉय फॉर्ममध्ये कामांचा विस्तार मोठा होता. फिनिक्सच्या तुलनेने गांधींची उपस्थिती टॉल्स्टॉय फॉर्ममध्ये अधिक असायची. पुढे १९१२ साली गांधींनी स्वत: टॉल्स्टॉय फॉर्म सोडला. फिनिक्सला आले. १९१३ च्या दरम्यान फिनिक्स आश्रमाची सर्व संपत्ती एका ट्रस्टला सोपवली. त्यानंतरची दोन-पावणे दोन वर्षे म्हणजे मायदेशी परतेपर्यंतचा संपूर्ण काळ तिथेच राहिले. तिथेच टॉल्स्टॉय फॉर्मची औद्योगिक झळाळीही नांदली.

दोन्ही आश्रम सत्याग्रहाच्या पाठशाळा होत्या. इथले श्रमसमृध्द जीवन आणि आहार तुरुंगातील जीवनाशी समांतर होते. भरपूर शरीरश्रम होते. आश्रमवासी जनांचे एक पाऊल तुरुंगात असायचे. एक पाऊल कार्यालयात वा शेतात असायचे. तिथल्या परिस्थितीचा पुरता अंदाज इथे असायचा. हे सारे ऐच्छिक होते हे विशेष. यामुळे

आश्रम जीवन सहज-सरळ तर होतेच उत्साही आणि प्रेरकही होते. आनंदी आणि प्रसन्नही होते.

गांधींनी श्री रावजीभाई पटेल यांना तुरुंगातून, प्रवासातून वा अन्य ठिकाणांहून पाठवलेली पत्रे या संदर्भात खूप मोलाची आहेत. ती दक्षिण आफ्रिकेतील आश्रम जीवनावर प्रकाश टाकणारी आहेत. श्री रावजीभाई युवक सत्याग्रही होते. दक्षिण आफ्रिकेला ते तर कमाई करायला गेले होते. ते गांधीरंगी रंगून गेले होते. गांधींनी त्यांना पत्रातून मार्गदर्शन केले होते. त्यांना गांधींनी लिहिले होते "विपत्तीसमयी धैर्याशिवाय दुसरा उपाय नाही. जे साधन ट्रान्सवालमध्ये आहे. तेच देशात आहे. आपण फिनिक्ससारख्या ठिकाणीच तयार होऊ शकू. स्मशानात निद्रा घेतानाही निर्भय रहाणे हे कर्तव्य आहे. तुमचा आणि माझा हिंदुस्तान सध्या स्मशानवत्‌च आहे." दुसऱ्या एका पत्रात लिहितात "ज्याला सच्चा रंग लागला आहे. तोच इथे थांबेल. आपण सारी तयारी तर हिंदुस्तानसाठीच करत आहोत." तिसऱ्या एका पत्रात लिहितात "माझ्या हयातीत आपण सर्वांनी फिनिक्समध्ये संपूर्ण गरीबीचा अनुभव घ्यावा अशी माझी इच्छा आहे. तसा समय आणि संधी मी ईश्वराला मागत आहे. आपण अलभ्य लाभ मिळवण्याचा प्रयत्न करु या. अशी स्थिती बुध्द वगैरेंना लाभली. खरे तर नरसी मेहता यांनी आणि सुदामा भक्ताने जे शिकवले ते ज्ञान महत्वाचे आहे."[१] या पत्रांमधून गांधींनी तीन गोष्टींकडे लक्ष वेधले आहे. एक तर त्यांचे सारे लक्ष हिंदुस्तानकडे आहे. दोन, यातून अध्यात्ममार्ग उजळताना दिसतो. तीन, यात संत वचनांचा आधार आहे.

पहाटे साडे पाचला सारे उठत. साडे पाच ते सात वाजेपर्यंत नित्यकर्म आणि प्रार्थना व्हायची. सात ते आठ वाजेपर्यंत शेतातली कामे चालत. आठ ते नऊ न्याहरी असायची. नऊ ते अकरा शेतीकाम, सफाई, स्वयंपाकघरातली कामे असायची. कावडीने पाणी भरणे, लाकडे फोडून सरपण तयार करणे, मोचीकाम, छापखान्यात वगैरे कामे आलटून-पालटून केली जात असत. अकरा ते एक स्नान, भोजन, भांडी विसळणे, विश्रांती. एक ते साडे चार शिक्षण चालायचे. साडे चार ते साडे पाच शेतीतली कामे व लाकडे फोडणे वगैरे अंग मेहनतीची कामे असायची. साडे पाच ते साडे सहा फूटबॉल, क्रिकेट, कबड्डी, आट्यापाट्या यासारखे खेळ असायचे. साडे सहा ते आठ भोजन, भांडी विसळणे, स्वयंपाकघरातील स्वच्छता यात जायचे. आठ ते नऊ प्रार्थना आणि धार्मिक ग्रंथांचे पठन व्हायचे. नऊ ते दहा स्वाध्याय चालायचा. दहा ते साडे पाच विश्रांती शयन. असे साधारणपणे वेळापत्रक होते.

हा फिनिक्स आणि टॉलस्टॉय वसाहत येथील सत्याग्रहींचा दिनक्रम होता. यात 'शिष्टागमने अनध्याय:' असायची शक्यता तशी कमी असायची. इथली न्याहरी साधी असायची. घरी दळलेल्या कोंडा न काढलेल्या पीठाची जाडजूड पोळी, त्यावर शेंगदाण्याचे कूट असायचे. संत्र्यांच्या सालीचा आणि विविध फळांचा मुरब्बा असायचा. हीच मिठाई होती. परिसरात कुठेही काडीकचरा नसायचा. घाण आणि अस्वच्छता तर नावालाही नसायची. ऊष्टे-शिळेपाके यांची कुठेहीसांड-लवंड झालेली नसायची. सांडपाणी झाडांना मिळायचे. कंपोस्ट खत तयार व्हायचे. मैल्याचा उपयोग खतासाठी केला जायचा. सारे उद्योगी, काटकसरी, स्वावलंबी होते. विद्यार्थी शिस्तप्रिय, उद्यमी, सहिष्णु, प्रामाणिक आणि उदारमतवादी होते.

फिनिक्स आश्रमात आपल्या आजीकडून शिकलेली भजने कस्तुर म्हणायची. सूर्याला अर्घ्य द्यायची. कुंकुम अक्षता वहायची. नमस्कार करायची. दिवस सुखाचे असोत वा दु:खभरले. तब्येत धडधाकड असो वा आजारपण सोबतीला असो. तिचा नित्यक्रम कधी चुकला नाही. रात्री नऊ वाजता झोप. वसाहतीत अनेकांची एकादशी असायची. मुस्लिम बंधुंचे रोजे असायचे. हिंदू एक वेळ जेऊन रोजात सहभाग नोंदवत. या दरम्यान खीर मिळायची. सारे जमिनीवर खाली अंथरुण टाकून झोपत. वसाहत आध्यात्मिक शुध्दिचे आणि तपश्चर्येचे पवित्र स्थान होते.

पाखरे जणू देवाचे भाट. ते पहाटे भूपाळ्या गाऊन रिझवायचेत. कस्तुर पाखरांच्या किलबिलाटाने जागी व्हायची. पाखरांची शिळ यायची. कुठून एखादा मधुर स्वर जागायचा. रानातले पक्षी गात असायचे. त्यांची ती गाणी होती. मानवी संवेदनेला नेहमी त्यातले गीत समजत असायचे असे नव्हे. कुणाचा आवाज मोठा सुरेल तर कुणाचा लयबध्द. कुणाचा नादमधुर. कुणाचा

मंद्र रागातल्या आलापीसारखा. कुणी कुणाला हाक मारल्यासारखा. कुणी कुणाची हाक न ऐकता आपल्या तानात मग्न असा. कुणी मंजुळ तान छेडणारा. कुणी भरदार साद घालणारा. तिथली सकाळ अशी विविध नाद रागांनी व ललित रंगांनी भावसमृध्द असायची. पाखरांचे चिवचिवणे सकाळची भूपाळी असायची. पाखरांची नाना गाणी, नाना प्रकारची आळवणी सजायची. रानाच्या मंडपात जणू काही भक्तजनांचा सप्ताह बसला की काय असे वाटे. गांधी-कस्तुर प्रार्थनेला बसायचे. त्या गुजराती प्रार्थनेचे शब्द होते.

***श्याम चरण स्मरण मित्र, सरस रीत साची***
***ते विना त्रिलोक मध्य, क्रोड वात काची***
***हस्त, चरण, करण, नाक ते कृपाळु दीधुं***
***नेत्र, वदन, दंत आपी ज्ञानदान दीधुं***

अर्थात्: "हे श्याम चरण दीनानाथा, मित्रा, तुझे स्मरण हेच खरे. त्याशिवाय त्रिलोकातले शेष सारे व्यर्थ. हात, पाय, कान, नाक हे कृपाळा तू दिले आहे.स. नेत्र तूच दिलेस आणि दात तू दिलेस. तूच तर ज्ञानदानी. तुझ्यामुळे खानपान लाभते. भूक असो वा तहान, थंडी असो वा उन्हाळा तूच सारे काही आहे.स. तुला घडीभर ध्यावे. इष्टदेवाला न जाणणारा व्यर्थ होय.

फिनिक्सची पहाट काही आगळी-वेगळी अशी होती. कस्तुरला मग प्रभातकालीन भजनांची आठवण यायची. तिला आठवायचे

जागने जादवा कृष्ण गोवाळिया तुज विना धेनमा कोण जाशे? त्रण सों ने साठ गोवाळिया टोळे मळ्या वडो रे गोवाळिया कोण थाशे?

भणे नरसैयो तारा गुण गाई रीझिये बूडता बांहेडी कोण सहाशे?

या गुजराती भजनाचा अर्थ आहे. "यादवा श्रीकृष्णा, जाग रे बाबा, तुझ्याविना अरण्यात धेनु चारायला कोण बरे जाईल? तीनशे साठ गोपाळ एकत्र आले. तुझ्याविना त्यांचा नेता कोण बनेल? नरसी मेहता म्हणतात की तुझे गुणगान आम्ही गातोहोत. हे नाथा, तुझ्याविना आम्हा बुडत्यांना कोण बरे वाचवील?"

तिकडे गांधी गात असायचे 'जागिए व्रजराज कुंवर पंछी बन बोले. जागिए रघुनाथ कुंवर पंछी बन बोले चकिया पिय मीलन गई जागन की बेर भई पंछि करत वृंदगान कमल वदन खोले

आश्रम जीवनाचा विचार करताना आश्रमातील प्रार्थनांचा विचार करायला हवा. यातून गांधी-कस्तुरच्या विकसित व्यक्तिमत्वाचे दर्शन होते. समूह जीवनाचा परिचय घडतो. तत्त्वविचारांची महती कळते. गांधींच्या प्रार्थनेचे रुप निरंतर विकासमान राहिले. ते गांधींच्या अखेरच्या प्रार्थनेपर्यंत तपासून बघता येण्यासारखे आहे. प्रार्थना सदैव मनोरम आहे. नित्य प्रत्ययकारी आहे. फिनिक्स आश्रमापासून गांधींच्या सामुदायिक प्रार्थनेला आरंभ होतो. फिनिक्स आश्रमात सायंकाळी सारे एकत्र जमत असत. ही 'मिटिंग' होती. क्वेकर संप्रदायाच्या लोकांनी आपल्या नाना प्रवृत्ती 'मिटिंग' शब्दाशी सांधल्या आहेत. क्वेकर यांच्या मते 'मिटिंग' हा शब्द 'प्रार्थना' या शब्दाचा पर्यायी शब्द असू शकतो. फिनिक्स आश्रमात सुरुवातीला असे काही नव्हते. ते साधे-सरळ-सोपे सांध्यमिलन होते. ही प्रवृत्ती पुढे प्रार्थना म्हणून आकाराला आली. गांधींनी विविध धर्मग्रंथांचा स्वाध्याय केला होता. विविध संतांची भजने वाचली-म्हटली होती. धर्मग्रंथातील बौध्दिक तत्त्वज्ञानाच्या तेजाने त्यांना भारले होते. भजनांनी त्यांच्या भक्तीयुक्त पिंडाला पुष्ट केले होते. बुध्दी चिंब झाली होती. हृदय भारावले होते. फिनिक्समध्ये गांधीपरिवारजन सोबत होते. ते मधुर कंठाने भजने गात असत. गांधी स्वत:ही भजने गात. देवदासच्या कंठाला गंधर्व स्पर्श होता. फिनिक्समध्ये प्रात:कालीन प्रार्थनेलाही आरंभ झाला. संडास निर्मिती आणि संडास सफाईनिमित्तच्या प्रयोगांची सुरुवातही फिनिक्समध्ये झाली. यातून स्वच्छता साधली जायची. अस्पृश्यता निवारणाचे क्रांतिकारी पाऊल उचलले गेले होते. यातून आंतर्बाह्य स्वच्छतेचा पाठ शिकवला गेला होता.

संदर्भ

१) गांधीजीनी साधना: (गुजराती) श्री रावजीभाई पटेल पृष्ठ ९८ ते १००.

❖❖❖

## २२) कस्तुरचा कायापालट

१९०४ सालची गोष्ट आहे. दक्षिण आफ्रिकेतील अशीच एक सायंकाळ होती. कस्तुर नवऱ्याची वाट बघत होती. ते काही घरी परत आले नाहीत. घरी आला होता त्यांचा निरोप.

'आज रात्री घरी येऊ शकणार नाही. वाट बघूनये.' असा गांधींचा निरोप होता.

यापूर्वी तर असे कधी घडले नव्हते. तिचे मन काळजीत पडले. लेकराना सोबत घेऊन तिने रात्रीचे जेवण आटोपून घेतले. कंदिलाची वात मंद केली. स्वयंपाकघरातली मेणबत्ती घालवली. लेकराना पंखाखाली घेतले. काळजी करत बिछान्यात पडून राहिली. या वर्षारंभी झालेला भयंकर पाऊस तिला आठवला. सातत्याने सतरा दिवस पाऊस बदाबदा कोसळत होता. संपूर्ण जोहान्सबर्गमध्ये ठिकठिकाणी तळी साचली होती. गावात प्लेगची साथ पसरली होती. शहरात हिंदुस्तानी लोकांसाठी रुग्णालयाची सोय नव्हती. सर्वत्र भयाचे वातावरण होते. काही लोकाना बाधा झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी गांधी उशिरा परतले. त्या भागात प्लेग पसरला होता. शहरात हिंदुस्तानी लोकांसाठी रुग्णालयाची सोय नव्हती. गांधी सायकलवरुन धावाधाव करत होते. हे बघून कस्तुर मदतीसाठी पुढे सरसावली. तिने यापूर्वी घरातली सेवा तर खूप केली होती. समाजसेवेचा तसा काही तिला अनुभव नव्हता. या सेवेत तिला प्लेगची बाधा होऊ शकेल अशी भीतीही होती. ती गांधींना खचितच वाटली. त्यांनी या सेवेसाठी तिला नकार दिला. ती हिरमुसली झाली. हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी एक थोडा सुरक्षित उपाय सुचवला. हिंदुस्तानी वसाहतीत जायचे. लोकांची भेट घ्यायची. त्यांना या रोगाबाबतची प्राथमिक माहिती द्यायची. कस्तुर तयार झाली. सामाजिक सेवेतला तिचा उत्साह गांधींना खूप सुखावणारा ठरला होता.

धाकट्या मणीलालची लुडबूड सुरु होती. कस्तुरने त्याला मुलांमध्ये खेळायला सोडले. नवऱ्याच्या सोबत ती हिंदुस्तानी वसाहतीत निघाली. गुजराती भाषा बोलता येत नसतानाही महिलांनी तिचे स्वागत केले. तिने लोकाना या संकटाची कल्पना दिली. नगरपरिषदेने एक मोठे गोदाम रिकामे करुन दिले होते. याचा रुग्णालय म्हणून उपयोग करता येण्यासारखा होता. कस्तुरने इमारतीची साफसफाई करायला सुरुवात केली. जवळपासच्या महिला लगेच मदतीला धाऊन आल्यात. दुसऱ्या दिवशी त्या वस्तीतल्या घरा-घरात जाऊन गाद्या आल्यात. उशा आल्यात. भांडी आलीत. बघता-बघता गरजेचे सामान गोळा झाले. रुग्णालय सज्ज झाले.

आता कस्तुरचा कायापालट झाला होता. ती उत्तम मदतनीस ठरली होती. गांधींना तिच्या ठिकाणी वसलेल्या अनेक सुप्त शक्तिंचा परिचय असा होत होता. तिच्या प्रत्यक्ष कृतीतून तिने अनेकाना प्रेरणा दिली होती. गांधींना तिच्या या नव्या रुपाचे दर्शन झाले होते. सहकारिणी. मृदुभाषिणी. खूप कष्ट उपसणारी. समूह जीवनात समरस होणारी. दु:खितांच्या वेदनेचा वेद वाचणारी. प्रेमाचे उपनिषद गाणारी. इतरांना प्रेरणा देणारी. सहकार्य भावना जागवणारी. मनापासून मदत करणारी. कस्तुरच्या या गुणांनी ते भारावून गेले. तिने 'आधी केले मग सांगितले.' ही गोष्ट तर गांधींना खूपच सुखावणारी होती. कस्तुर आपल्या जगावेगळ्या पतीच्या सेवेत आकंठ बुडाली होती. ती तृप्त होती. नवऱ्याची प्रत्येक कांक्षा तिची बनली. ती पातिव्रत्य धर्माचे पालन करायची. याला एक भौतिक संदर्भ होता. परमार्थाची सुरेख डूबही होती. तिचे आत्मविलोपन झाले होते. तिने आध्यात्मिक भूमिका संपादित केली होती. या उद्दिष्टाला साकार करत असताना तिने नाना आघात झेलले. अपार त्यागाचा परिचय दिला. गांधींच्या प्रखर तपाचा ताप असह्य होता. आपल्या अद्वितीय प्रीती, सहनशीलता आणि धैर्याच्या बळावर तिने गांधी तपश्चर्येला अंगिकारले. विसाव्या शतकातला हा अभिनव पतिव्रत-धर्म होता. तिचा गृहस्थधर्म सुंदर, सुदृढ आणि सुशोभित ठरला. परिस्थिती कुठलीही असो, आव्हान कसेही असो. तिने संपूर्ण सहकार्य दिले. स्वत:ला नवऱ्यात समर्पित करुन टाकले. या समर्पणामुळेच गांधींची सत्य साधना फळाला आली.

कस्तुर हिंदुस्तानपासून एवढ्या लांबवर होती. आपले व्रत-सण, उपवास काळजीपूर्वक पाळायची. एकादशी असो वा पौर्णिमा, रामनवमी असो वा जन्माष्टमी असो. मकर संक्रांतीच्या वेळी ती तिळगूळ वाटायची. ती तुळशी विवाह करायची. तिच्यामुळे सर्वांचे सारे सणवार साजरे व्हायचेत. तिचा सोमवारचा उपवास असायचा. सोमवती अमावस्येचे विशेष व्रत ती करायची. शाकाहार तर तिचा जीवनाधारच होता. १९०४--१९०५ सालादरम्यान गांधी व कस्तुर आलटून-पालटून जोहान्सबर्ग व फिनिक्स येथे रहात होते. गांधी आत्मसंयमनाचा प्रयोग आचरत असत. प्रसंगानुरुप ते आपल्या आईसारखे उपवास करत. इतर दिवशी अल्पाहार आणि ओली-कोरडी फळे खात असत.

१९०५ साल होते. जोहान्सबर्ग येथे पारिवारिक जीवन स्थिरावत होते. सहयोगी आणि सहकारीही कौटुंबिक सदस्य होते. रात्री भोजनोत्तर मित्रांसोबत धार्मिक-आध्यात्मिक चर्चा रंगायची. गांधी ट्रान्सवालमध्ये जोहान्सबर्ग येथे वकीली करत होते. तिथले घर शहरापासून लांब होते. ती मध्यमवर्गीय लोकांची वस्ती होती. दुमजली बंगली होती छान. अंगणात बाग होती. समोरच्या भागात सुरेख टेकड्या होत्या. खुली जागा होती. दोरीवरच्या उड्या मारायला कस्तुर व मिली यांच्यात चढाओढ लागायची. जिंकायचे मात्र गांधी. पोलाक खूप गाऊन-हसून-नाचून या चढाओढीत भाग घेत असायचे.

आज घरात जेवायला पाहुणा नाही असा दिवस कधी उगवत नसे. रात्रीच्या भोजनात दहा-पंधरा जण तर सहज असत. जेवण साधे असायचे. सारे अन्न डायनिंग टेबलावर मांडून ठेवायचे. वाढायला कुणाची गरज नसायची. ज्याला जेवढे लागेल तेवढे त्याने घ्यायचे. जेवणात दोन-तीन प्रकारच्या भाज्या. वरण. कढी. खरपूस भाजलेल्या पोळ्या. कच्च्या कोशिंबीरी. एवढे सारे असायचे. यानंतर मग दूध, फळे. ऋतुमानानुसार गार वा गरम पेये. कॉफी वा लिंबाचे सरबत. जेवण कधीही घाई-घाईत आटोपत नसायचे. किमान तासभर तरी ते चालायचे. गप्पा-गोष्टी सुरु असायच्यात. थट्टा-मस्करी चालू असायची. चर्चा-विनोद सोबतीला असत. हे सारे असायचे. गांधी खूप हसायचे. हसवत रहायचे.

एकदा एक इंग्रज गृहस्थ घरी आले. कस्तुरला त्याची वागणूक काहीशी असभ्य वाटली. त्याने घराविषयी काही विचित्र प्रश्न विचारले होते. तिला राग आला होता. तिने मिलीला सांगितले "To make laugh of me and my home.' 'असले रिकामटेकडे लोक इथे येतात. माझ्या घरचे रंग-ढंग बघतात. माझी टिंगल करतात. आमच्या घरची टवाळी करतात. मला नाही बाई हे सहन व्हायचे. मी नाही काही असल्या लोकांना भेटायची यापुढे कधीही.' कस्तुर तीव्रतेने म्हणाली.

गांधींचे घर साजेसे होते. घराला एक बैठक होती. दोन छोटी शयनगृहे होती. न्हाणीघरात शॉवर होता. छतावर पवनचक्की होती. वेस्टची बायको ग्रॅनी भरतकाम-विणकाम शिकवायची. तिचा उत्साह आणि लगबग अपूर्व ! यामुळे सारेच कामात असायचे. वस्तीत संगीत फुलले. अर्धा डझन कुटुंब वस्तीला आलेत. गांधींचा मनमोकळा स्वभाव, उत्तम विनोद करायची पध्दत, साधेपणावरील माया, आत्मसमर्पणाची तयारी सर्वांनाच प्रभावित करायची. काम कुठलेही असो कस्तुर सतत कामात असायची. नियमित येणाऱ्या अतिथींच्या भेटी असोत वा घरगुती कामांच्या जबाबदाऱ्या असोत, स्वयंपाकाच्या कामात मदत असो वा निसर्गाची हाक असो, गरजुंना मदतीचा हात असो वा रुग्णांची सेवा-सुश्रूषा असो, ती सतत पुढे असायची.

गांधींनी या दरम्यान आपला थोरला भाऊ लक्ष्मीदास याला एक पत्र लिहिले. 'यापुढे मला कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत पाठवता येणार नाही.' हा पत्राचा मध्यवर्ती आशय होता. त्यांच्या शिक्षणासाठी खर्च झाला होता. कस्तुर व गांधींच्या लेकरांचे पालन-पोषण लक्ष्मीदासने केले होते. घरावर खूप कर्ज झाले होते. हे सारे काही खरे होते पण हे सारे फिटेल याहून दुप्पट रक्कम गांधींनी इथपर्यंत लक्ष्मीदासकडे पाठवली होती. भावाला अशी शंका आली होती की पैसे न पाठवण्याच्या निर्णयामागे कस्तुरचा हात आहे. तिने हा पाठ नवऱ्याला पढवला असला पाहिजे. ती नवऱ्याला आपल्यापासून लांब राखायचा प्रयत्न करत आहे. गांधींची गरीबीची शपथ हा

केवळ बहाणा असावा असे त्यांना वाटले होते. गांधींचे पत्र गेल्यावर लक्ष्मीदासने संतापून पत्राला उत्तर दिले होते. गांधींची यावरली थंड प्रतिक्रिया वाचून त्याला काय साधु-संन्यासी व्हायचे आहे. की काय असेही त्यांना वाटले. तसे भावाचे वय तर अवघे सदतीस वर्षांचे आहे. या वयात संन्यासी कसे होता येईल? यापेक्षा महत्वाचे असे त्यांच्या ध्यांनात आले की गांधींच्या मदत करण्यात आड येणारी कस्तुर नाही. आता भावाचे कुटुंब मोठे झाले होते. त्यात सगळी माणूसजात आली होती. यात कस्तुरचा काही दोष नव्हता. तिला असे वाटायचे की भावाला काय वाटेल? जाऊबाईंना काय वाटेल? गांधी बायकोचे ऐकतात. तिने या कामी खोडा घातला असेल. वस्तुस्थिती मात्र काही तशी नव्हती.

❖❖❖

## २३) घायाळांसाठी सेवा पथक

ऑक्टोबर १८९९ साल उजाडले. बोअर्स आणि ब्रिटिशर्स परस्पर संघर्ष मुद्रेत होते. गांधींची सहानुभूती बोअर्स जनांच्या बाजूने होती. बोअर काय आणि इंग्रज काय दोघेही आपला सारखाच छळ करत. एक सापनाथ तर दुसरा नागनाथ. बोअर पराभूत होतील असे कुणी सांगू शकत नव्हता. ते जिंकले तर आपले उट्टे काढायला काही कमी करणार नाहीत. असा विचार करणारा एक गट होता. या मताला महत्व देऊनही गांधींना हे मत काही योग्य वाटले नाही. आपण स्वत:ला ब्रिटिश प्रजाजन मानतो. आपण हक्क मागतो तर ब्रिटिश राज्याच्या रक्षणार्थ भाग घेणे आपले कर्तव्य आहे. अशी त्यांची भूमिका होती. यामुळे त्यांनी घायाळ सैनिकांची सेवा-सुश्रूषा करण्याचे शिक्षण मिळवले. सेवेच्या योग्यतेविषयी प्रमाणपत्रही मिळवले. एका एम्ब्युलन्स तुकडीची स्थापना केली. ही अहिंसक सेवा होती. सैनिक युध्दात घायाळ होत. ही सेना त्यांची सुश्रूषा करायची. या सेवाकार्याच्या दरम्यान पुष्कळदा रोज वीस ते पंचवीस मैलांची मजल मारावी लागायची. या कामामुळे हिंदजनांची प्रतिष्ठा वाढली. गिरमिट्यांशी संपर्क वाढला. जागृती झाली. युध्दात इंग्रजांचा विजय झाला. त्यांच्याकडून उदारतेची आशा अर्थात्च निरर्थक ठरली. कायद्याची अंमलबजावणी काहीशी सैल व सूट देणारी झाली. एवढे मात्र खरे!

१९०६ साल आले. झुलू लोकांचे बंड उसळले. दक्षिण आफ्रिकेच्या एका भागात सरकारने १९०४ साली दरडोई कर लादला होता. ही स्वातंत्र्यप्रेमी भोळी-भाबडी जनता होती. तिला ते सहन झाले नाही. असंतोषाची तीव्र भावना उपजली. कर वसुलीसाठी आलेल्या एका सार्जंटला झुलूंनी कापून काढले. या घटनेमुळे गौरवर्णीय सरकार संतापले. त्या विरोधात जनता उसळली. या घटनेला सरकारने 'बंड' असे नाव दिले. हे दडपून टाकण्यासाठी प्रयत्न सुरु झालेत. या प्रसंगी गांधी ट्रान्सवालहून नाताळला धावत जाऊन पोहोचले. हिंदी लोकांचे सुश्रूषा दळ उभे केले. सार्जंट मेजर गांधींची एम्ब्युलन्स तुकडी सेवेसाठी निघाली. ही तुकडी तर गोऱ्यांतर्फेच निघाली होती. त्यांना सेवा मात्र काळ्या लोकांची करायचे भाग्य लाभले. बालपणापासून गांधींच्या मनात सेवाधर्माचे आकर्षण होते. ते लिहितात की त्यांचे काही झुलू लोकांशी वैर नव्हते. त्यांनी कुणाचेही वाकडे केले नव्हते. त्यांनी गव्हर्नरला सुश्रूषा पथकाची परवानगी मागितली. गव्हर्नरने लगेचच होकारार्थी उत्तर पाठवले. गांधींनी सारी योजना तयार राखली होती. कस्तुर सामानाची बांधाबांध करु लागली. गव्हर्नर या मागणीला मान्य करील याविषयी तिच्या मनात अजिबात शंका नव्हती. मान्यता दिली नाही तरी नवरा या अंधारातून मार्ग शोधेल याविषयी ती पूर्ण निश्चिंत होती. रुग्णांची सेवा नवऱ्याचा छंद होता. तिने नवऱ्याला पुरते ओळखले होते. त्याच्या सवयी, हट्ट, आग्रह, दुराग्रह सारे-सारे काही तिला अगदी तोंडपाठ झाले होते. त्याला आपण कधीही 'नाही' म्हणायचे नाही असे तिने मनोमन ठरवून टाकले होते. त्यांना सेवेचा मार्ग सुचला होता. याचा आपल्यावर आणि आपल्या लेकरांवर काय परिणाम होईल याची तिला पूर्ण कल्पना होती.

जोहान्सबर्गच्या घरात गांधींसोबत पोलाकही होते. गांधींनी जोहान्सबर्गचे बिऱ्हाड मोडून टाकायचे ठरवले होते. पोलाक यांनी दुसरे छोटे घर घ्यावे. तिथे रहावे. कस्तुरने फिनिक्सला जाऊन रहावे. ही योजना ठरली होती. योजनेला कस्तुरची संपूर्ण संमती मिळाली. नवऱ्याच्या अशा भरपूर मागण्या असत. तिने कधीही आडकाठी आणली नव्हती. काही सामान-सुमान पोलाकच्या घरी ठेवले. बाकीचे फिनिक्सला नेले गेले. गांधींचे सुश्रूषा पथक तयार झाले. यात हिंदू व मुस्लिम होते. सरकारने या पथकाला एक विशिष्ट पोशाख दिला होता[१]

बाळंतपणामुळे कस्तुर खूप थकून गेली होती. तिला विश्रांतीची गरज होती. गांधी विचारात गढून गेले. विषयवासना वेगळी. संतान उत्पत्ती वेगळी. विश्व हे ईश्वराच्या लीलेचे स्थान आहे. त्याच्या महिम्याचे प्रतिबिंब आहे. जगाच्या वृध्दीसाठी जननक्रिया आहे. त्यावर नियंत्रण हवे. स्त्री-पुरुष संबंधात परिवर्तन नको का घडायला? स्त्रीला नकाराचा अधिकार का नसावा? कस्तुर प्रतिबध्द होती.

कस्तुरच्या वैवाहिक जीवनात तृप्ती होती. समाधान होते. गांधींच्या मनात ब्रह्मचर्य पालनाचे विचार घोळत होते. विवाह झाला. एकपत्नी व्रताला त्यांच्या मनात स्थान होते. पत्नीविषयी एकनिष्ठा होती. हे सत्यव्रताचेच अंग होते. दक्षिण आफ्रिकेत या व्रताचा विस्तार झाला. ब्रह्मचर्य पालन पत्नीच्याही बाबतीत असावे. हा एक नवा विचार उसळला. कस्तुरला चौथ्या मुलाला जन्म देताना खूप त्रास झाला. कमालीचा अशक्तपणा आला.

गांधींच्या मनात प्रचंड घुसळण सुरु होती. आपण पत्नीशी कोणत्या प्रकारचा संबंध ठेवायचा? पत्नीला विषयभोगाचे साधन बनवावे का? यात पत्नीविषयक निष्ठा कुठे दिसते? आपण तर विषय वासनेने लडबडलेले आहोत. कस्तुर यातून मुक्त आहे. आपण पत्नीविषयी एकनिष्ठ आहोत? की वासनेविषयी एकनिष्ठ आहोत? कस्तुर पतीनिष्ठ आहे. तिच्यासाठी वासना स्वाभाविक आहे. पती-पत्नीचा संबंध होता. कस्तुरकडून कधीच आक्रमण झाले नाही. कस्तुरला ब्रह्मचर्याचे पालन करणे शक्य आहे. गांधी स्वत:ला आसक्त मानत होते. अशक्त मानत होते. ते जागृत नव्हते असे नाही. कस्तुर मात्र अतंद्र होती. अंतरंगी सावधान होती. गांधी प्रयत्न करत. कस्तुरला ते सहज साधले होते. गांधींना प्रजोत्पत्ती थांबवायची होती. यासंबंधीचे बाह्य उपचार ते जाणून होते. याविषयी विलायतेत थोडे-बहुत वाचलेले होते. कस्तुरचे काही वाचन नव्हते. अनुभवांती लाभलेले ज्ञान होते. तिचा भर साधनांऐवजी संयमावर होता. संयमाच्या समर्थनाचा ठसा जोरदार ठरला. अनुभवाने तो चिरस्थायी झाला. गांधींची विचारनौका किनाऱ्याला लागली. त्यांनी आता संयम पालनाचा प्रयत्न सुरु केला. कस्तुरच्या प्रापंचिक जीवनात दुसरे पर्व सुरु झाले.

समाजसेवेचा विषय होता. गांधींना जोहान्सबर्ग मधील घर सोडावे लागले. घर टापटिपीचे होते. घरात सामान-सुमान थाटले होते. एक महिन्याच्या आत गांधींनी त्याचा त्याग केला. पत्नीला व मुलांना फिनिक्समध्ये ठेवले. रणमैदानाकडे निघाले. इथे लोकसेवेत मन लागले. आता एक नवा साक्षात्कार झाला. मन जागृत झाले. संतती लोभ व धनाचा लोभ सोडावा लागेल. सेवा करताना व्यवधान नको. लेकरे व संपत्ती ही सेवेतली मुख्य व्यवधाने ठरतात. हे सत्य त्यांच्या ध्यानी आले होते. पुरे झाला गृहस्थाश्रम. आता वानप्रस्थधर्माचे पालन करायला हवे होते. आता निश्चय ठरला होता. गांधींचा स्वभाव निग्रही होता.

रणमैदानात घायाळांची सेवा घडली. हे कार्य अदमासे दीड महिने चालले. प्रत्येक क्षण जागृतीचा ठरला होता. कस्तुरने वानप्रस्थधर्म स्वीकारला. पतीप्रती समर्पित अशी तिची जीवनधारणा होती. दोघांच्या आयुष्यातील हा मोलाचा काळ होता. व्रताचे महत्व दोघांना पटले. कस्तुरला वैष्णव परिवारात व्रत महात्म्य कळले होतेच. गांधींच्या लक्षात एक गोष्ट आली. व्रत म्हणजे बंधन नव्हे. व्रत हे तर स्वतंत्रतेचे महाद्वार आहे. गांधींचे प्रयत्न यापूर्वीपासून सुरु होते. यात म्हणावे तसे यश काही त्यांना मिळाले नव्हते. याचे कारण निश्चयाची उणीव होती. स्वत:च्या शक्तीवर विश्वास नव्हता. ईश्वरी कृपेवर विश्वास नव्हता. मनावर नाना तत्वांचे तडाखे होते. अनेक विचारांचा मारा होता. गांधींना व्रताचा महिमा कळला. व्रत म्हणजे अव्यभिचारी निष्ठा होय. व्रताने मोह टळू शकतो. केवळ प्रयत्न केल्याने काही साधणार नाही. केवळ प्रयत्न करुन थांबू नये. ही तर मरणाची वाट आहे. एखाद्या वस्तुविषयी संपूर्ण वैराग्य बाणावे. कस्तुर फिनिक्समध्ये रहात होती. वैभवसंपन्न बंगला सोडला होता. साधेपणा तर तिचे जीवनव्रतच होते. ती उतली नव्हती. मातली नव्हती. तिने घेतलेला वसा टाकला नव्हता. ती, तिचा नवरा आणि तिची लेकरे. तिचा परिवार मर्यादित होता. समृध्द होता. नवऱ्याने निवडलेला मार्ग तिला सर्वथा मान्य होता.

झुलू बंडानिमित्त केलेल्या या सेवाकार्यात गांधींना खूप अनुभव आले. कस्तुर नव्या अनुभवाना सामोरी गेली. गांधींना विचार करायची संधी लाभली. कस्तुर नव्या अनुभवविश्वाशी समरस होऊ बघत होती. या ठिकाणी गांधींचे ब्रह्मचर्याविषयीचे विचार परिपक्व झालेत. ते आपल्या आत्मचरित्रात लिहितात की ब्रह्मचर्य विषयासंबंधात त्यांनी आपल्या सहकार्यांसमवेत काही चर्चा केली. ईश्वराचे दर्शन साधायचे असेल तर ब्रह्मचर्य हे अनिवार्य तत्त्व आहे. हे त्यांच्या प्रकर्षाने लक्षात आले होते. समाजसेवकासाठी ब्रह्मचर्य आवश्यक आहे. हे

तर त्यांना स्पष्टपणे कळले होते. आपल्या वाट्याला मोठ्या प्रमाणावर सेवाकार्य येणार आहे. याचा अदमास त्यांना होता. सेवा करताना वा सेवेचा विचार करताना ब्रह्मचर्य तर प्रेरक आहेच. आपण जर भोगविलासात, संतानोत्पत्तीत आणि बालकसंगोपनात रमून गेलो तर सेवेचे काय? संपूर्ण सेवा काही आपल्या हातून घडायची नाही. आपल्याला एकाच वेळी दोन काठांवर पाय ठेवता येणार नाही. याच वेळी जर कस्तुर गरोदर असती तर आपण निश्चिंत मनाने या सेवाकार्यात पडू शकलो नसतो असे त्यांना वाटले. ब्रह्मचर्याचे पालन करायचे असेल तर कुटुंबवृध्दी सेवाकार्यात अडथळा बनून जाईल. लग्न झाले असूनही जर आपण ब्रह्मचर्य पाळले तर योग्य होईल. ब्रह्मचर्यही पाळता येईल. गांधी अशा विचारांच्या भोवऱ्यात सापडले होते. आपण ब्रह्मचर्याचे व्रत घ्यायला हवे हा विचार त्यांना सतावू लागला होता. हे व्रत घ्यायला ते अधीर बनले होते. या विचारामुळे त्यांना आनंद वाटला होता. उत्साह वाढला होता. सेवेचे क्षेत्र विशाल करायला कल्पनेने परवानगी दिली होती.[२] पुढे गांधी लिहितात की ते फिनिक्सला पोहोचले. ब्रह्मचर्य विषयक गोष्ट त्यांनी मगनलाल, छगनलाल, वेस्ट यांच्याशी केली. ही गोष्ट सर्वांनाच आवडली होती. सर्वांनी या गोष्टीची आवश्यकता मान्य केली. अर्थात् या व्रताचे पालन करणे कुणालाच सोपे वाटले नव्हते. कित्येकांनी प्रयत्न करायची हिंमत केली होती.[३]

गांधी या व्रताच्या संदर्भात आत्मचरित्रातच पुढे लिहितात की एक फेरफार मात्र व्रत घेताच त्यांनी करुन टाकला होता. त्यांनी पत्नीसोबची सहशय्या आणि एकांत वर्ज्य केला. अशा प्रकारे ज्या ब्रह्मचर्याचे पालन ते इच्छा असो वा नसो १९०० सालापासून करत आले होते त्याचा व्रत म्हणून आरंभ १९०६ सालच्या मध्यापासून केला.[४] गांधींच्या ब्रह्मचर्यव्रत साधनेत कस्तुरची साथ आहे. संपूर्णपणे समर्पणाची भूमिका आणि भावना आहे. ब्रह्मचर्यव्रताचा असा दुहेरी संबंध कस्तुरमुळे प्रत्ययाला आला. ही विवाहोत्तर ब्रह्मचर्यसाधना आहे. आपल्या आयुष्यात अशा प्रकारची भूमिका पुढेही काहींनी आजमावल्याचे दिसून येते. जयप्रकाश नारायण आणि वसंत नारगोळकर हे दोन सहज लक्षात येणारे दंपती होत.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३११;

२) कित्ता पृष्ठ ३१४;

३) कित्ता पृष्ठ ३१४;

४) कित्ता पृष्ठ ३१६.

❖❖❖

## २४) ब्रह्मचर्याचा निश्चय

१९०६ साली ब्रह्मचर्याचा अंतिम निश्चय झाला. सत्याग्रहाची पहाट अजून उजाडायची होती. सत्याग्रहाचा विचार ध्यानी मनी-स्वप्नीही नव्हता. गांधींनी भरपूर चर्चा केली होती. ही चर्चा मुख्यत: स्वत:शीच होती. या निश्चयाला नकार द्यायचे कस्तुरला काहीही कारण नव्हते. गांधींनी पूर्ण विचार केला. १९०६ साली ब्रह्मचर्य पालनाचे व्रत घेतले. हे व्रत एकतर्फी घेऊन चालत नसते. या व्रताला कस्तुरची सहज मान्यता होती. सहज स्वीकृती होती. गांधींना हे व्रत बिकट, अडचणीचे, अवघड ठरले होते. कस्तुरला साधे, सोपे व सरळ वाटले होते. गांधींची शक्ती अल्प होती. कस्तुरची अफाट होती. गांधींना विकाराना ताब्यात ठेवणे अवघड गेले. कस्तुरला सुगम, सुबोध वाटले. कस्तुर हक्काची बायको होती. तिच्याशी विकारी संबंधांचा त्याग करायचा होता. ही गोष्ट गांधींना चमत्कारिक वाटत होती. तरी हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांना स्पष्ट दिसत होते. त्यांची दानत शुध्द होती. ईश्वर बळ देईल असे म्हणून त्यांनी उडी घेतली. कस्तुर या चिंतनजळावर आधीपासून पोहत होती. आधीपासून तरंगत होती.

गांधींनी आपल्या आत्मचरित्रातून या विषयी मोकळेपणाने दोन प्रकरणे लिहिली आहे. यात त्यांच्या स्वत:च्या प्रयत्नशीलतेची कहाणी आहे. कस्तुरच्या दृढ आत्मसंयमाची प्रशंसा आहे. या घटनेतून कस्तुरचे जीवन उजळून निघताना दिसते. तिच्या ठाम स्वभावाचा परिचय घडतो. पतीला उचित मार्गावर अग्रेसर करणाऱ्या तपस्वीनी रुपाचे दर्शन घडते. कस्तुरच्या दांपत्य जीवनाचा हा जगावेगळा अध्याय आहे. १९०१ सालापासून गांधींच्या ठायी संयम पालनाची वृत्ती बळावत होती. आता ही वृत्ती बंधनरुप उरली नव्हती. आनंद उपभोगता येत होता. आधी वासना त्यांच्यावर स्वार होती. आता ते वासनेवर स्वार होते. आता त्यांना वासुदेव भेटला होता. जीवनातल्या निकोप क्षणांचे साजरे स्नेहसंमेलन संपन्न होत होते. गांधींना आता ब्रह्मचर्याचा महिमा अधिकाधिक कळू लागला होता. हे व्रत फिनिक्समध्ये घेतले गेले होते. रणांगणात अर्जुनाला गीतेचे ज्ञान लाभले. रणांगणात सेवाकार्यात गांधींना आत्मप्रत्यय आला होता. स्वत:ला स्वत:ची ओळख झाली होती. पारंपारिक पध्दतीने आयुष्य जगणे झुगारले गेले होते. त्याला कस्तुरची साथ होती. कस्तुरच्या साथीशिवाय हे अशक्य होते. दोघांना जीवनाचे अमृत कळले. ब्रह्मचर्य ही ब्रह्मदर्शनाची सुरुवात आहे. गांधी म्हणतात की हे ज्ञान त्यांना ग्रंथातून लाभले नाही. ही फार मोठी कबुली आहे. त्यांना जीवनातून जीवन वाचता येते त्यांना ब्रह्मदर्शन घडते. कस्तुर शाळेत गेली नव्हती. तिला अक्षर ओळख नव्हती. तिने धिटाईने जीवन वाचले होते. अटळपणे नियतीने तिच्या ओटीत विरह योग दिला होता. तिने तो समर्थपणे झेलला होता. तिचा योग मोक्षदायक ठरला. अर्जुनाचा विषाद भोग बनला नाही. योग बनला. गोपींनी विरह योग अनुभवला. त्या कोमेजल्या नाहीत. गोपींचा विरह मूर्च्छेचे कारण बनला नाही. मरणाचे निमित्त बनला नाही. त्यांनी मूर्च्छा हटवली. मरणावर विजय मिळवला. त्यांना ब्रह्मदर्शन घडले. कस्तुर सामान्य बाई होती. असामान्य आई बनली. तिने ब्रह्मचर्याला रसमय बनवले. त्यातील ऊर्जा पचवली. त्यातील मर्म तिला कळले. नित्य जागृतीचा क्षण साधता आला.

आपण ब्रह्मचर्याचे व्रत घेतले आहे. हे गांधींनी एकदा कस्तुरला सांगितले. तिने कसल्याही प्रकारचा विरोध नोंदवला नाही. तिचे जीवन त्यांना फुलवण्यासाठी होते. खुलवण्यासाठी होते. तिला नवऱ्याला मोठा होताना बघायचे होते. तिच्या मनात विचारांचे काहूर माजले. आठवणींची यात्रा सजली होती. तिला आपले जीवन आठवत राहिले होते. कुठून सुरुवात केली आपण? कुठे पोहोचतोहोत? पहिला अनुभव आठवला. आपण लहान होतो. अजाण होतो. नवऱ्याने अनेकदा जबरदस्ती केली. आपण शांत राहिलो. तो रागावला. तणतणत राहिला. डाफरत राहिला. विरोध केला. माहेरी घालवून दिले. हे सारे आपण सहन करत होतो. आता हे वेगळे रुप होते. जगावेगळे रुप होते. एका छताखाली का कुणी असे रहाते? नवऱ्याने आपल्या ओटीत चार लेकरांचे दान टाकले आहे. काही राग नाही. कुठला विरोध नाही. सासरे निवर्तले ती रात्र तिला आठवली. त्या आठवणीने

ती केवढ्यांदा दचकली मग तर घटनांची लांबचलांब न संपणारी रांग. न थकता पावले उचलत ठामपणाने चालणाऱ्या मुंग्यांच्या रांगेसारखी ! इंगळ्यांसारख्या दंश करणाऱ्या कितीतरी आठवणी. न दमता नियमितपणे हलणारा पाळणा. आनंदापेक्षा भोग अधिक. ओरबाडणे अधिक. देहापलिकडे बाईला एक मन असते. याचा तर कधी विचार केला गेला नव्हता. गांधी विलायतेत असताना सासुबाईंनी या जगाचा निरोप घेतलेला मग जागलेले एकाकीपण. ते आठवले. तिचे मन दुभंगून गेले होते.

कस्तुर मंद-मंद हसायची. त्या हसण्याचे मग चांदणे व्हायचे. ते गांधींच्या मनाच्या आभाळभर पसरायचे. त्यांना ते हसणे कळले. एथवर कस्तुरची मूक संमती असायची. आज ती सक्रिय होती. ती नवऱ्याकडे बघू लागली. बघत राहिली. तिच्या मनासमोर नवऱ्याची एक चित्र मालिका सजली. छान वैष्णव संस्कारात वाढलेला. थेट विलायतेत जाऊन शिकून आलेला. आपलेच खरे मानणारा. धर्माचे मर्म जाणून घेण्यासाठी धडपडणारा. आहार विषयक नाना प्रयोग करणारा. सेवेच्या अंगणात जाऊन उभा राहिलेला. संयमाचा साक्षात्कार झालेला. नवरा आज ऊर्ध्वारोहणाला सिध्द होत आहे. आज तिच्या मनाच्या दारावर थाप देत आहे. सेवेचे मोल कळल्यावर तिची दुबळी काया थरारली. हा एक रोमांचकारी अनुभव होता. नवऱ्याची ही एक आगळी-वेगळी ओळख होती. नवऱ्याच्या मनाच्या आइन्यात तिने डोकावून बघितले. तिथे तिला संयमाचे दर्शन झाले. ती विचार करत होती. या अनुभवासाठी तिला नवऱ्यासोबत सप्तपदी करायची होती. सप्तपदी सुरु झाली होती.

या ब्रह्मचर्य व्रताचा शुभारंभ फिनिक्स वसाहतीत झाला होता. इथे शरीरश्रमाचा आग्रह होता. सत्याग्रहाची पलटण तयार होत होती. आश्रमातील दिनारंभ प्रार्थनेने व्हायचा. सांध्यमिलन भजनांनी सजायचे. सायंकाळ प्रार्थनेने फळाला यायची. ते एक आनंदग्राम होते. चहुकडे प्रसन्न खेळती हवा होती. खुला उजेड होता. निसर्गाशी मनमुक्त संवाद असायचा. रात्रीच्या एकांतात आकाशाची नक्षत्रे जवळ येत. थंडीच्या रात्रीत धगधगत्या शेकोट्यांभोवती जीवनगाणे गाईले जाई. सारे त्या विराट अस्तित्वाचे अंशभूत होते. सारे विश्वाच्या अल्याडचे आणि पल्याडचेही होते. निसर्गाशी एकरुप आणि आपल्या कोषातून मुक्त होण्यासाठी धडपड करणारे जन तिथे होते. तिथले स्वयंपाकघर सामुदायिक होते.

आपण घरात रहातो. नवरा मात्र जनात असतो. त्याचा जनसंपर्क मोठा आहे. त्याला खूप ज्ञान आहे. त्याने खूप वाचलेले आहे. अजुनही वाचतो. थोरा-मोठ्यांशी बोलतो. त्याला आपल्याहून नक्की अधिक कळते. हे त्याला गरजेचे वाटते. ती साक्षी होती. गांधींनी शौर्य दाखवले तर कस्तुरने धैर्य दाखवले. ज्या ज्या वेळी गांधीजींनी धैर्याचा मार्ग धरला त्या त्या वेळी कस्तुरबांनी शौर्याचा मार्ग आक्रमिला. सारे अपवित्र तिच्या व्यक्तिमत्वाच्या धगीत जळून भस्मसात झाले. पावनही झाले. ती एक उंचच उंच झोका होती. नवऱ्याच्या भलेपणावर तिचा पक्का विश्वास होता. त्याचे सिध्दांत आता त्याचे एकट्याचे उरले नाही. सारे लोक त्याच्यासोबत चालत राहिलेत. व्यक्ती-कुटुंब-समाज असा विस्तार होत गेला.

गांधींचे घायाळांना मदत करण्याचे काम आटोपले होते. ते फिनिक्सला परतले होते. तिथून त्यांना लगेच जोहान्सबर्गला जायचे होते. ते तिथे पोहोचले. महिना लोटला असेल नसेल तोच सत्याग्रहाला सुरुवात झाली. कस्तुरच्या विकासाची वाट झगमगत राहिली. गांधी प्रयोग करणारे शास्त्रज्ञ होते.

गांधींनी ब्रह्मचर्यविषयक अखेरचा निर्णय घेतला होता. जवळपास सहा आठवडे लोटले. त्यांचे सेवाकार्य सुरु होते. अनेक विकारांना ते वश होऊन जात असत. कस्तुर शांत होती. ती रोजचा जीवनक्रम आचरत होती. ती निसर्गसिध्द होती. निसर्गमान्य जिणे जगत होती. सारे काही निमुटपणे करत होती. स्वागत कशाचे नाही पण नकारही कशाला नाही. हा अनासक्त भाव होता. ना कशाला होकार ना कशाला नकार. एक सहज अवस्था. पाण्याचा प्रवाह आधी खड्डा भरतो मग पुढे जातो. कस्तुरचे पाण्यावर तरंगणाऱ्या पानासारखे होते. गवताचे पाते असते. ते प्रवाहासोबत हसते. नाचते. डोलते. वहाते. ते कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त करत नाही. नकार देत नाही. साऱ्या प्रवाहालाच उरी-शिरी घेते. पत्करते. स्वीकारते.

मान्य करते. वाहू लागते. वाहत रहाते. एखादा ओंडका असतो. तो मात्र प्रयत्न करतो. प्रवाहाच्या विरोधात वाहू बघतो. ते सोपे नसते. तो ओंडका अनेकदा मागे लोटला जातो. धक्के खातो. त्याला यश लाभतेच असे नाही. गवताचे पाते मात्र मस्तीत तरंगत रहाते. त्याला कुठल्या प्रवाहाशी झुंजायचे नसते. ना आंतरिक ना बाहेरच्या. कस्तुरबा मुक्त होती. गांधींनी नेहमीप्रमाणे तिला आपल्या या लोकविलक्षण प्रयोगात गृहीत धरले होते. या काळात त्यांचे मनोमंथन जारी होते. हा मोलाचा काळ होता. त्यांच्या मनात नाना तरंग उठत. विविध विचार उसळत.

गांधींनी ब्रह्मचर्याची शपथ घेतली होती. ते विवाहित गृहस्थ होते. त्यांचे तरुण वय होते. ती दु:सह प्रतिज्ञा होती. सारेच अद्भुत होते. यामागचे एक कारण कस्तुरची अस्वस्थ प्रकृती असेल का? असा प्रश्न काही चरित्रकारांना पडला आहे. त्यात तथ्यही आहे. आपण दक्षिण आफ्रिकेत होतो. या दरम्यान कोण्या स्त्रीकडे बघून आपल्या मनात कधीच विषय वासना जागृत झाली नाही असे गांधींनी सांगितले आहे. कदाचित तरुण वयात आपल्या थोर पित्याच्या अखेरच्या क्षणांचीही नोंद त्यांच्या मनात असावी. आध्यात्मिक चिंतनातून त्यांना हा विचार स्फुरला असावा. सर्वजनहितार्थ कार्याची आंतरिक ओढ आणि समर्पणाची भावना यामागे असावी. शुध्द आचार-विचार-उच्चाराची ही फलश्रुती असावी. याचा लाभ मात्र त्यांच्याप्रमाणेच कस्तुरलाही झाला हे खरे होते.

कस्तुरने गांधींच्या ब्रह्मचर्य व्रतात काही अडचण आणली नाही असे खुद्द गांधी लिहितात. तिला ते सहज साध्य कार्य वाटले. तिला तोच तोपणा नको असायचा. तिला गडबड गोंधळ आवडत नसायचा. तिने जीवनात येणाऱ्या वादळांचा सामना निर्धाराने केला. तिला खूपदा अंतविर्रोध झेलावे लागले. मनोमंथनातून पसार व्हावे लागले, नाही, असे नाही. ती खचली नाही. तिने शस्त्र भुईवर ठेवले नाही. ती अखंड संघर्षाच्या मुद्रेत दिसते. तिच्या ठायी नकार देण्याचे बळ आहे. तिने खोट्या तडजोडी कधी स्वीकारल्या नाहीत. मूल्यांवर मनाच्या तळापासून प्रीत केली.

कस्तुरची संवादशीलता व्यापक होती. संवेदना तरल होती. यामुळे तिला ब्रह्मचर्य व्रत अनुभव सिध्द होते. या रसाळ अनुभूतीत तिने नवऱ्याला मंत्रभारित केले. गांधींनी शास्त्रवचने वाचलीत. पोथ्या पालथ्या घातल्यात. ब्रह्मचर्यात देहाचे रक्षण होते हा पहिला पाठ होता. तो दोघांना कळला. बुध्दीचे रक्षण होते. ही त्यापुढची इयत्ता आहे. आत्म्याचे रक्षण होते. हा कलशाध्याय आहे. आता ब्रह्मचर्य जीवनाधार बनवायचा होता. यात रस-परिपोष कळत होता. हे जरी खरे असले तरी अडथळे अपार होते. काठिण्य भरपूर होते. हे नारिकेल फलासारखे होते. हे गांधींना आयुष्यभर व्रत वाटले. भले-भले ऋषी-मुनी आपल्या आयुष्याच्या संध्याकाळी गारद झाले. वासनेचा वणवा भारी दाहक असतो. यासाठी अखंड जागरुकता हवी.

कस्तुर सुगरण होती. गांधींना चवीचे खाणे आवडायचे. गोड पदार्थ आवडायचेत. पुरणपोळीवर त्यांची प्रीत होती. ब्रह्मचर्याचा मार्ग रसना मार्गातून जातो. स्वादेंद्रियावर ताबा हवा. स्वाद जिंकला तर ब्रह्मचर्य सुलभ होते. याचा गांधींनी अनुभव घेतला. पुढे आहारविषयक प्रयोग केलेत. हे काही केवळ अन्नाहाराशी संबंधित प्रयोग नव्हते. त्याला ब्रह्मचर्याची बैठक होती. गांधींच्या जीवनात साध्या रहाणीचे महत्व वाढले. अनावश्यक खर्च कमी करण्यात आले.

❖❖❖

## २५) पाऊल एक पुरेसे मजला

सेवाकार्य सुरु झाले. यात दोन गोष्टी होत्या. मरणाचा साक्षात्कार आणि तीव्र एकांतसेवन. या एकांतसेवनाला आत्मसेवन म्हणता येईल. समर्थ रामदास स्वामी यांनी 'एकांत' हा शब्द 'ये कांत' असा लिहिला आहे. कांत म्हणजे ईश्वर. येकांत काळ हा ईश्वराला हाक मारण्याचा काळ. या काळात त्यांना हृदयगुंफेच्या गुह्य भागात प्रवेश करता आला. ही अपूर्व गोष्ट होती. अद्वितीय अनुभव होता. या विषयाची चर्चा करणाऱ्या प्रकरणाला गांधींनी दिलेले शीर्षकच बोलके आहे. ते आहे. 'हृदय मंथन'. देवासुरांनी केलेल्या समुद्र मंथनाची आठवण यावी असे हे हृदय मंथन आहे. सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींनी केलेली हृदयाची घुसळण. यातून निघालेले ब्रह्मचर्याचे नवनीत. सागर मंथनातून चौदा रत्ने प्रकटलीत. गांधी हृदय मंथनातून दोन रत्ने प्रकट झालीत. ब्रह्मचर्य व्रत आणि सत्याग्रह चळवळ. गांधींच्या पुढे होते शस्त्रबळ, सत्ताबळ आणि संपत्तीबळ. या विरोधात उभे ठाकले प्रेमबळ, नम्रताबळ आणि आत्मबळ. १९०६ साली गांधी व कस्तुरचे वय होते सदतीस वर्षे.

१९०६ साल. एके दिवशीची दुपारी दोन वाजेची वेळ. हरी आणि गुलाब आले होते. थोरला मुलगा आणि लाडकी सून आली होती. गुलाब तर गांधींच्या अंगा-खांद्यावर वाढलेली मुलगी होती. या मुलीच्या आगमनाने कस्तुरमधली आई सुखावली. या हळव्या युवतीला तिने आपल्या पंखाखाली घेतले. माया लावली. आपल्या घरची रीत-भात शिकवण्याचा प्रयत्न केला.

आज गांधी कोठडीत होते. कस्तुरने विचार केला. आता फिनिक्स तिचे कुटुंब बनले होते. तिने सर्वांना हिंमत दिली. गांधी-मार्गाने चालायचा संदेश दिला. लोक तिचे ऐकू लागले. खरे तर ते तिच्याहून अधिक शिकलेले होते. अनुभवी होते. वयाने मोठेही होते. तिला तर त्या सर्वांच्या भाषासुध्दा येत नव्हत्या. बरे, ती गांधींची बायको म्हणून लोक मान देत असत असे नव्हते. ती नवऱ्याच्या कामात खूप गुंतून असायची असेही नव्हते. तिला हे महात्म्य उपजत लाभले होते. तिचा स्वतःवर अपार विश्वास होता. तिला हुकूम करायला कधी आवडले नाही. 'करा' असे म्हणण्याऐवजी ती 'करु या.' असे म्हणायची. ती खूप परिश्रमी होती. तिला कामाचे तपशील पाठ असायचे. तिची बुध्दी तीक्ष्ण होती. तिच्या नजरेतून बारीकसेही काही सुटू शकत नव्हते. 'विसरुन गेले', 'लक्षात आले नाही', 'वरवर बघितले' यासारखे शब्दप्रयोग तिच्या कोशात नव्हते. हे शब्द आपल्या सहकार्यांनाही तिने कधी वापरु दिले नाही. तिचा पै न् पैचा हिशेब अचूक असायचा. गांधींची सुटका झाल्याची बातमी मणीलालने वृत्तपत्रातून मोठ्याने वाचून दाखवली. तिचा आधी तर बातमीवर विश्वास बसेना. नवऱ्याची सुटका झाली. कस्तुरने गोड-धोड खायला केले. घरा-दारासोबत मित्रांना, नातलगांना, शेजाऱ्या-पाजाऱ्यांना बोलावले. मोठी पंगत बसली.

तमाम हिंदजनांनी आपले नाव रजिस्टर करुन घ्यावे असा कायदा झाला होता. या कायद्याला हिंदजनांनी 'खूनी कायदा' असे नाव दिले होते. ११ सप्टेंबर १९०६ रोजी नाताळ येथे एक मोठी सभा भरली होती. या कायद्याचा भंग करण्यासाठी लोक एकत्र येत होते. याचा भंग करताना देहदंड झेलावा लागणार होता. तो स्वेच्छेने पत्करायचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. या कायद्याच्या विरोधात शेकडो हिंदजनांनी शपथ वाहिली होती. सत्याग्रहाचा जन्म झाला होता.

जनरल स्मट्स यांनी एक नवा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव इंग्रज पत्रकार अल्बर्ट कार्टराईट यांच्या सोबत पाठवला होता. 'हिंदजनानी जर स्वयंस्फूर्तीने नोंदणी करवून घेतली तर त्यांचा राग असलेला नोंदणी कायदा रद्द करण्यात येईल.' खरे तर स्वयंस्फूर्तीने नोंदणी करवून घेण्यात हिंदजनांची काही आडकाठी नव्हती. कायद्याने अशी सक्ती करायच्या विरोधात गांधी होते. या प्रस्तावात काही बदल करुन गांधींनी या प्रस्तावाचा स्वीकार केला. प्रिटोरिया येथे झालेल्या भेटीत जनरल स्मट्स यांनी या सुधारित प्रस्तावाला हिरवा झेंडा दाखवला. तो दिवस ३० जानेवारीचा होता. गांधींच्या देहावर कैद्याचा पोशाख होता. तडजोड मौखिक स्वरुपाची होती. 'स्वयंस्फूर्ती' आणि 'सक्ती' या दोन शब्दांमधला फरक लोकांच्या लक्षात धडपणे आला नाही.

कालपर्यंत नोंदणीला विरोध करणारे गांधी स्वेच्छेने नोंदणी करायचा आग्रह का करताहेत? हे शीर्षासन कशासाठी करताहेत? भोळ्या लोकांच्या हे काही ध्यांनात येईना. गांधींनी पंधरा हजार पौंडांची लाच घेतली आहे. अशी एक अफवा पसरवली गेली होती. पठाणांच्या एका गटाने ही अफवा मान्य केली. गांधींनी त्यांना समजावण्याचे प्रयत्नही केलेत. काही उपयोग झाला नाही. गांधींनी स्वेच्छेने नावनोंदणी करुन घेण्याचा प्रस्ताव मांडला. नव्या परवान्याच्या संदर्भातले हे क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे काही हिंदजन नाराज झालेत. गांधींनी समाजाचा विश्वासघात केला आहे. पंधरा हजार पौंडांना आपला समाज विकून टाकला आहे. असे काहींच्या मनात आले. त्यांचा असा ठाम समज झाला होता. त्यांचा यामुळे गांधींना विरोध होता.

१० फेब्रुवारीचा दिवस उजाडला. सकाळची वेळ होती. गांधी काही जणांसोबत कार्यालयात आलेत. सारे नोंदणी कार्यालयाकडे पायी चालत निघाले. ते सत्याग्रह असोसिएशनच्या कार्यालयात पोहोचले. त्यांना नावनोंदणी करायची होती. नोंदणीसाठी पुढाकार घेऊन पुढे येणाऱ्याचा खातमा करण्यासाठी मीर आलम प्रतिज्ञाबध्द होता. तो गांधींचा एकेकाळचा अशील होता. मित्र होता. तो सहकाऱ्यांसमवेत त्यांच्या मागे मागे निघाला. त्याचे डोळे आग ओकत होते. काहीतरी अघटित होईल असे गांधीना जाणवले.

'कुठे निघाला आहात?' मीर आलमने गांधींना हटकले.

'मी नाव नोदवायला निघालो आहे.' गांधींनी शांतपणे उत्तर दिले.

'माझ्या कानावर काही आले आहे. तुम्ही आपला समाज पंधरा हजार पौंडांना विकला आहे. खरे का हे?' मीर आलमने दरडावून विचारले.

'नाही.' गांधींनी ठामपणे उत्तर दिले.

' मी अल्लाला साक्षी ठेऊन कसम घेत आहे. नोंदणी करायला पुढाकार घेणाऱ्याला मी ठार मारीन.' मीर आलम गरजला.

"गैरसमज होतोय मित्रा तुझा. अल्ला सर्वशक्तिमान आहे. त्याच्या नावाची शपथ वाहून कुणी कुणाला मारायचा निश्चय करत नाही. पुढाकार घेणे माझे परमकर्तव्य आहे. मरण कसेही येऊ शकते. रोग होऊन बिछान्यात पडून येऊ शकते. त्यापेक्षा आपल्या भावाच्या हातून मरणे सुखाची गोष्ट ठरेल." गांधी अजून उत्तर देतच होते. तोच पाठीमागून दंडुक्याचा प्रहार झाला. 'हे राम' म्हणत गांधी जमिनीवर पडले. बेशुध्द झाले. मीर आलम तयारच होता. त्याने आणखी तडाखे लगावले. त्याच्या मित्रांनी गांधींवर लत्ताप्रहार केला. रस्त्यावर यूरोपियन लोक होते. त्यांनी पळून जाणाऱ्या हल्लेखोरांना पकडले. पोलिसांच्या ताब्यात दिले. गांधी बेशुध्द होते. अर्धमेले होते. त्यांचे ओठ फाटले होते. डोळ्यांवर भयंकर सूज होती.

'आता कसे वाटत आहे.?' डोकने विचारले.

'जबड्यात वेदना आहेत. बरगड्यात दुखते. बाकी बरे आहे. मीर आलम कुठे आहे.?' गांधींनी विचारले.

'काही लोकांना अटक केली आहे. तो त्यांच्यापैकीच एक आहे.' कुणीतरी गांधींना माहिती पुरवली.

'त्या साऱ्यांना सोडून द्यायला हवे !' गांधी शांतपणे म्हणाले.

पोलिस गांधींना हॉस्पिटलमध्ये न्यायची तयारी करत होते. गांधींनी मनाई केली. डोक यांच्या घरी जाणे पसंत केले. त्यांना गाडीतून नेले गेले. ही बातमी पसरली. एशियाटिक्सचे निबंधक मॉंटफोर्ट चॅम्ने यांना कळले. ते तडक तिथे आले. गांधींनी सर्वप्रथम नोंदणी करायची इच्छा दर्शवली.

'मी शब्द दिला आहे. तो मी पाळायला हवा.' गांधी म्हणाले. ख्रिश्चन धर्मगुरु जोसेफ जे. डोक यांनी गांधींची सेवा केली. डोक यांची धाकटी कन्या ऑलिव्ह आली. तिच्याकडून त्यांनी 'मला कृपाळू प्रकाशाकडे ने !' हे ख्रिश्चनांचे ईशस्तोत्र म्हणवून घेतले. कार्डिनल न्यूमन यांची 'लीड काइंडली लाईट' प्रार्थना गायला लावले. डोक यांची कन्या प्रार्थना गात होती -

चल घे वत्सल प्रकाशा, खिन्नतेस येई पूर चल, घेऊन चल तू मजला! घनघोर रात्र ही फार, अन् दूर

राहिले घर चल, घेऊन चल तू मजला पावलांची संगत कर तू, नाही रे इच्छा मजला दूरचे दृश्य बघण्याची

पाऊल एक पुरेसे मजला - गांधींनी न्यायदंडाधिकारींना तार केली. हल्लेखोराना सोडून द्यायची विनंती केली.

डॉक्टरांनी जखमा बघितल्या. गाल आणि ओठावरची जखम मोठी होती. त्यांनी टाके घातले. टाके असेपर्यत द्रवरुप अन्न घ्यायला सांगितले. संपूर्ण मौनाचे पथ्य दिले. गांधींनी एटर्नी जनरल म्हणजे सरकारी वकीलासाठी तारेने पाठवायचा मजकूर सांगितला होता. त्यात आपण मीर आलम आणि त्याच्या साथीदारांना मुळीच दोषी मानत नसल्याचे सांगितले. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाऊ नये असा आग्रह केला. समाजासाठी लिहिलेल्या संदेशात म्हटले ‘माझी तब्येत चांगली आहे. हिंदूंनी मुसलमानांबद्दल राग धरु नये. ईश्वरापाशी माझे हेच मागणे आहे.’[१]

ही भयंकर बातमी कस्तुरप्रत पोहोचली होती. तिला काळजीने घेरले. कुणीतरी सुचवले की तुम्ही जायला हवे. ‘छे, छे. मी नाही जाऊ शकत. इथे आर्थिक तंगी आहे. माझ्या वैयक्तिक कामासाठी मी खर्च करायला नको.’ कस्तुरने ठामपणे सांगितले.

‘मी कसे तरी करुन भागवीन सारे. तुम्ही निघायला हवे असे मला वाटते.’ फिनिक्सचा कारभारी अल्बर्ट वेस्ट म्हणाला.

‘बघा, त्याची काही गरज नाही. एक तर यांची काळजी घेणारे तिथे खूप सारे लोक आहेत. आणि दुसरे महत्वाचे असे की सार्वजनिक पैसा किती काळजीपूर्वक वापरायला हवा हे यांनी आपल्याला शिकवले आहे.’ कस्तुर म्हणाली.

कस्तुर अशी ठाम होत चालली होती. तिच्या पतिनिष्ठेला सेवेची साजरी महिरप लाभत होती. त्या आर्य पतिव्रता महिलेच्या व्यक्तिमत्वाभोवतीचा सेवाकार्याचा परीघ असा विस्तारत चालला होता. गांधींवरचा हा हल्ला काही गौरवर्णियांनी केलेला नव्हता. हल्ला करणारा देशबांधव होता. तिला याचा खूप राग आला. तिने राग झटकला. गांधींची तब्येत सुधारत असल्याने तिला समाधान होते. सध्या ते पादरी डॉ. डोक यांच्याकडे आहेत. थोड्या दिवसानंतर पोलाक आणि त्याची बायको त्यांना आपल्या घरी नेणार आहेत. कस्तुरने हिंमतीने सारे ऐकून घेतले. सारे झेलले. नवऱ्याच्या काळजीने तिचा चेहरा काळवंडला. तिने परिस्थितीचा सामना केला. दुसऱ्या दिवशी गांधी फिनिक्सला गेले. तिथे कस्तुर व हरीलाल होते. पुढे मीर आलम गांधींचा अंगरक्षक बनला, प्रचारकही बनला होता.

संदर्भ

१) दक्षिण आफ्रिकाना सत्याग्रहनो इतिहास :
(गुजराती) श्री मो. क. गांधी , पृष्ठ १७१ / १७२

❖❖❖



एच-१७०
१०

## २६) गांधींचे कस्तुरला ऐतिहासिक पत्र

१० एप्रिल १९०८ साल. राम नवमीच्या शुभ मुहूर्तावर गुलाबला मुलगी झाली. हरीलालच्या या मुलीचे नाव ठेवले रामी. आपल्याला नात झाल्याचा विशेष आनंद कस्तुरने साजरा केला. आपल्या नातलग बायकांच्या मदतीने बाळंतपण सुखरुप पार पाडले. चारच दिवसानंतर गोकुळदास या भाच्याचे निधन झाले. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. तो फिनिक्सला येणार होता. कस्तुरला गोकुळदासच्या आठवणींनी बेजार केले. एकीकडे नातीच्या जन्माचा उत्सव तर दुसरीकडे भाच्याच्या निधनाचे दु:ख तिच्या वाट्याला आले होते. सुख-दु:खांच्या अशा संमिश्र प्रसंगांची मोठी रांग सदा न् कदा तिच्यासमोर असायची. एकीकडे उसळता आगडोंब असायचा तर दुसरीकडे फुललेला वसंत. एकीकडे पेटती-धडधडती होळी असायची तर दुसरीकडे दीपपर्वाचा दिवाळीचा सण.

आजार काही कस्तुरची पाठ सोडायला तयार नव्हता. ती आजारी होती. अल्बर्ट वेस्टने एका तारेने तिच्या तब्येतीबद्दल गांधींना कळवले होते. तिला रुग्णालयात हलवावे लागेल असे त्यांचे मत होते. यासाठी गांधींनी तुरुंगातून लवकर सुटका करुन घ्यावी. माघारी परतावे. असा सल्ला त्यांनी दिला होता. गांधींनी ही तार वाचली. तुरुंगातून कस्तुरला उत्तरादाखल पत्र लिहिले. हे ते ऐतिहासिक पत्र -

“प्रिय कस्तुर,

तुझ्या तब्बेतीविषयी वेस्ट यांनी पाठवलेली तार पोहोचली. माझे हृदय विदीर्ण झाले. तुझी सेवा करायला माझे मन धाव घेत आहे. परिस्थिती मात्र अनुकूल नाही. सत्याग्रहाच्या लढ्यात मी सारे काही अर्पण केलेले आहे. मी नाही तिकडे येऊ शकत. दंड भरल्यावर खरे तर मला तिथे येता येईल पण दंड तर मी भरणार नाही. तू जरा हिंमत धर. योग्य आणि नियमित आहार घे. तू बरी होशील आणि माझ्या दुर्दैवाने तू जर मरण पावणार असशील तर माझ्या हयातीत तुझे असे निघून जाणे काही वाईट नाही. माझे तुजवर इतके प्रेम आहे. की तू निघून गेल्यावर माझ्यासाठी जिवंत राहशील. तुझा आत्मा तर अमर आहे. मी तुला खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की तुला जावे लागले तर मी दुसरा विवाह करणार नाही. मी तुला अनेकदा समजावून सांगितले आहे. की तू ईश्वरावर आस्था ठेवून जीव सोडावास. तुझे बलिदान सत्याग्रहासाठी असेल. माझा लढा काही केवळ राजकीय स्वरुपाचा नाही. तो धार्मिक स्वरुपाचा आहे. यामुळे अतिशय स्वच्छ आहे. यात जीवन काय आणि मरण काय? दोघेही सारखे. तूही असे जाण. मनाला वाईट वाटून घेऊ नकोस. अशी मी उमेद करतो. असेमागणे मागतो.”[१]

पत्र या वाक्यापाशी थांबले आहे. स्वाक्षरीशिवाय हे पत्र पूर्ण केले गेले आहे. कस्तुरच्या तब्येतीचा किती ताण गांधींवर पडला होता? ते किती प्रयत्न करुन हा ताण झेलत होते? या त्रासासाठी त्यांना काय किंमत मोजावी लागली होती? यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे या पत्रातून मिळू शकतात. गांधींच्या मनात कस्तुरविषयी अपरंपार स्नेहभाव होता. या स्नेहात उणीव नाही. या पत्रात गांधींच्या मनात जागलेल्या अनासक्तीच्या प्रयोगाची छाया आहे. या पत्रातून कस्तुरविषयक स्नेहामुळे जागलेल्या वियोगाचे प्रकटीकरण होते. सिध्दांतनिष्ठेमुळे विकसलेला आत्मसंयम दिसतो. तत्त्वज्ञानामुळे पुष्ट झालेले आत्म्याच्या अमरत्वाचे ज्ञान प्रकटते. या त्रिवेणीची धारा खळखळ प्रवाहित होताना दिसते. या निवेदनाच्या आधारे कस्तुर सहजच बलिपंथियांच्या मेळ्यात सुशोभित होताना दिसते. तिचा स्वभाव दृढ होता. तिचे विशाल अंत:करण परवेदनेने अभिभूत होते. तिच्या तात्त्विक मनोमंथनाची कुणाला सहजच कल्पना करता येण्यासारखी परिस्थिती नव्हती. या पत्रात गांधींनी एक वाक्य लिहिले आहे. ‘तू योग्य आणि नियमित आहार घे.’ हे वाक्य वाचल्यावर कुणालाही असे वाटण्याची शक्यता आहे. की गांधींच्या उपस्थितीत कस्तुरचे आहारावर नियंत्रण असेल पण त्यांच्या गैरहजेरीत त्या मनमानी करत असतील. योग्यप्रकारे पथ्य सांभाळत नसतील. स्वादाला आकृष्ट होत असतील म्हणून गांधींनी वरील वाक्य लिहिले आहे. की काय? पण याउलट आठवणी छगनलाल गांधींच्या पत्नी काशीबाई सांगतात. त्यांनी सांगितलेली आठवण अशी आहे.

कस्तुरच्या सुनेच्या म्हणजे गुलाबच्या सीमंत पूजनाची धामधूम सुरु होती. घरात बायका मावत नव्हत्या. मंगल गाणी गात होत्या. गुलाब पाणी उधळले गेले. अत्तर लावले गेले. बायका नाना प्रकारचे खेळ खेळल्या. गरबा झाला. कस्तुरच्या घरात नवीन बाळ येणार होते. कार्यक्रम जोशात सुरु होता. या दरम्यान गांधींना दोन महिन्यांची शिक्षा ठोठावली गेल्याची तार येऊन धडकली. क्षणभरात कस्तुरची दुनिया बदलली. तिला काळजीने घेरले. नाताळमध्ये प्रवेश करताना नवऱ्यावर झालेल्या हल्ल्याला ती विसरु शकत नव्हती. कैद्यांना मिळणारी वागणूक अत्यंत वाईट स्वरुपाची असल्याचे तिला ऐकून माहित होते. खाणे तर न खाण्यासारखे असायचे. आज तिच्यासमोर पक्वान्नांनी भरलेले ताट होते. तिने शांतचित्ताने अन्नदेवतेला नमस्कार केला. आपल्यापुढील ताट बाजूला सारले. नवरा कैदेत असताना ती असे अन्न कसे खाऊ शकत होती? नवऱ्याची सुटका होईपर्यंत ती अळणी खाणार होती. गोड पदार्थ आता तिच्या पानातून हद्दपार झाले होते. गांधींचा तो पहिला कारावास होता. गुलाबच्या गर्भातील बाळाच्या स्वागताची तयारी सुरु होती. गांधी तुरुंगाची वाट चालत होते. जोहान्सबर्गच्या जेलमध्ये मिळणारे अन्न कस्तुर जेलबाहेर राहून खाणार होती. तिने घरालाच तुरुंगात बदलून टाकले होते. लक्ष्मण वनात होता. ऊर्मिलेच्या मूक वेदना अयोध्येच्या राणिवशात बंदिस्त होत्या. ती जागी राहून लक्ष्मणाच्या स्वप्नांची पाठराखण करत होती. कस्तुरचा पहिला-वहिला सत्याग्रह असा आकाराला आला होता. त्याची इतिहासाने कुठे नोंद घेतली नाही.

या ऐतिहासिक पत्राच्या संदर्भात गांधी चरित्रकार श्री नारायण देसाई लिहितात ही घटना १९०८ सालची आहे. गांधींनी ब्रह्मचर्य व्रताची प्रतिज्ञा तर यापूर्वीच घेतली आहे. तरीही या पत्रात ते 'मी दुसरा विवाह करणार नाही.' असे का लिहितात? कदाचित या भाषेमुळे कस्तुरला गांधी प्रेम अधिक स्पष्टपणे कळले असेल? कदाचित त्यांना आपली प्रतिज्ञा अधिक दृढपणे मांडायची असेल.[२] हे तर झाले खासगीतले चिंतन पण सार्वजनिकपणेही या भूमिकेचा पुनरुच्चार गांधी करताना आढळतात. ते फारच मनोरम आहे. या संदर्भात ते स्वतःच लिहितात.

"१९०८ सालची ही घटना. मी अजून अर्धी शिक्षा भोगली होती. या दरम्यानच फिनिक्सहून तार आली. श्रीमती गांधी खूप आजारी आहेत. त्यांची परिस्थिती खूपच काळजी करण्यासारखी आहे. त्या अत्यवस्थ आहेत. मला लागलीच पोहोचायला हवे. तारेची ही बातमी कळल्यावर सारेच खूप दु:खी झाले. मला माझ्या कर्तव्याविषयी सुतराम शंका जागली नाही. जेलरने मला विचारले 'दंड भरुन जायचे आहे. की नाही?' मी लागलीच उत्तरलो 'मी कदापि दंड भरुच शकत नाही.' आप्त-स्वकीयांशी होणारा वियोग हाही आमच्या लढ्याचा एक भाग आहे. हे ऐकून जेलरला हसू आले. त्याला खेदही वाटला. माझा हा निर्णय प्रथम दृष्टीने कठोर असल्यासारखा वाटू शकेल पण या परिस्थितीत हाच निर्णय खरा व योग्य होता असा मला विश्वास आहे. धर्माचे पालन करत असताना स्त्री-पुत्रादिकांचा त्याग करावा लागणार असेल तर तोही करावा. प्रसंगी त्यांना गमवून द्यायलाही सिध्द असायला हवे. लॉर्ड रॉबर्टस् याने केलेला त्याग आमच्यापेक्षा कमी दर्जाच्या कामासाठी होता. त्यांचा एकमेव पुत्र हरपला होता. ते युध्दात गुंतलेले असल्यामुळे आपल्या पुत्राच्या अंत्यविधीसाठीही येऊ शकले नव्हते.[३]

या प्रतिक्रियांमधून गांधींच्या मनाची ओळख होते. त्यासोबत कस्तुरच्या व्यक्तिमत्वाचेही उत्कट दर्शन घडते. हे पत्र परस्पर भावसमृध्दीचे प्रकटीकरण करणारे आहे. कस्तुरच्या संदर्भात गांधींच्या मनात प्रेमभावना दाटून होती. त्या भावनेचे यातून दर्शन होते. गांधी त्याग आणि समर्पणाच्या मार्गावर चालत होते. त्या मार्गावर कस्तुर अग्रेसर होती. त्याचाही संकेत या पत्रातून मिळतो. पत्र हे द्विपक्षीय संवाद रेखन असते. एका पक्षाकडून ते दुसऱ्या पक्षाला लिहिले जाते. तरी त्यातून दोन्ही पक्षांचा परिचय होतो.

संदर्भ

१) गांधींनी कस्तुरला दिनांक ९ नोव्हेंबर १९०८ रोजी लिहिलेले पत्र;

२) मारु जीवन ए ज मारी वाणी : (गुजराती) श्री नारायण देसाई प्रथम खंड 'साधना' पृष्ठ २७८;

३) इंडियन ओपिनियन' मधून दिनांक ३० जानेवारी १९०९ रोजी प्रकाशित 'माझा तुरुंगवासातला अनुभव भाग ५' शीर्षक लेख आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ९ पृष्ठ १८०

❖❖❖

## २७) कस्तुरचे आजारपण

१६ जानेवारी १९०९ रोजी गांधींना फोक्सरस्ट येथे अटक झाली. या काळात कस्तुर खूप आजारी होती. ते कस्तुरला बघून फीनिक्सहून जोहान्सबर्गकडे निघाले होते. ते तुरुंगात होते. फिनिक्समध्ये असताना कस्तुर अगदी फिकट दिसू लागली होती. एकतर रक्ताचा अभाव होता. दुसरे कारण होते अंत:स्राव. या दोषांमुळे ती अगदीच मेटाकुटीला आली होती. मरणासन्न अवस्था म्हणेनात!

काळ बदलला होता. कस्तुरची तब्येत हळूहळू सुधारत चालली होती. होती ती तात्पुरतीच सुधारणा पण होती खरी. तुरुंगातून सुटका झाल्यावर गांधी फिनिक्सला परतले होते. कस्तुरला बघून त्यांना धक्का बसला होता. त्यांनी वैद्यकीय तपासणीसाठी कस्तुरचे मन वळवले. काही काळापासून तिला मासिक पाळीच्या वेळी रक्तस्रावाचा त्रास होत असे. धाकट्या दोन मुलांना जन्म दिल्यानंतर हे दुखणे तिला जडले होते. यामुळे तिला खूप अशक्तपणा आला होता. एकीकडे नवऱ्याच्या सुरक्षिततेची तिला काळजी वाटायची. दुसरीकडे मोठ्या मुलाच्या तुरुंगवासामुळे तिला धस्स झाले होते. या दोन टोकांच्यामध्ये तिचे आजारपण होते. याचा विचार करायला तिच्यापाशी वेळ असा कुठे होता? नवरा सत्याग्रहाच्या मोहिमेत पार बुडाला होता. त्याला घराकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता.

गांधींनी आपल्या मोठ्या सुनेला हरीलालच्या बायकोला एक पत्र लिहिले आहे. यातून ते म्हणतात की कस्तुरची तब्येत बरी होत चालली आहे. तिला उत्तमोत्तम लेख आणि कविता वाचून दाखव. तिला विचारुन त्यांना नित्य पत्रे लिहित रहावीत. पत्रातून विचार तर बांचे असावेत पण सही तिची व मणीलालची असावी. [१]

आपल्या पत्नीने स्वाध्यायासाठी प्रयत्नशील असावे. हा भाव या पत्रातून व्यक्त होताना दिसतो. यासोबतच कस्तुरची आवड-निवडही लक्षात येते. उत्तमोत्तम साहित्यविषयक गोडी लागणे हा एक ऊर्जस्वल भाग आहे. कस्तुरचे विचार जाणून घेण्यासाठीची त्यांची तितिक्षाही या पत्रातून व्यक्त होते.

गांधींनी मोठ्या सुनेला दुसरे एक पत्र लिहिले आहे. यातून ते लिहितात की त्यांचा व कस्तुरचा वियोग-विरह जवळपास अनिवार्य होता. अर्थात् त्याची निवड काही त्यांनी केली नव्हती पण तो त्या उभयतांच्यासाठी कल्याणप्रद सिध्द झाला.[२]

हा वियोग उभयतांसाठी कल्याणप्रद ठरला आहे. ही भावना मनात जागणे मोलाचे. हे जाहीरपणे सांगता येणे हे तर आणखीही मोलाचे आहे. पत्रातून असे लिहिता येणे ही चित्ताची खूप उच्च दशा व दिशा आहे.

गांधींनी श्री ए. एच्. वेस्ट यांना एक पत्र लिहिले. तुरुंगातील अधिकारी त्यांना गुजराती भाषेतून पत्र लिहायला परवानगी देणार नव्हते. इंग्रजीतून लिहिलेले पत्र कस्तुरला आवडेल की नाही ते काही त्यांना सांगता येत नव्हते. अधिकाऱ्यांची इच्छा असली तर तिची पत्रे त्यांना मिळू शकतील. तिच्या तब्येतीविषयीची माहितीही त्यांना मिळू शकेल. आपण व्यवस्थित असल्याची माहिती कस्तुरला सांगावी असे ते सुचवतात. यासोबत एक मोठा विश्वास व्यक्त करतात 'बाह्य वातावरणापेक्षा आंतरिक--मानसिक स्वास्थ्यावर माझे सुखी रहाणे अवलंबून आहे. ही गोष्ट ती जाणते. ही गोष्ट ध्यानी घेऊन तिने माझी काळजी करु नये. मुलांच्या हितासाठी आपली तब्येत सुधारायचे प्रयत्न करावेत.' या पत्रातूनच ते कळवतात की तिने नियमितपणे मातीच्या पट्टया ठेवत रहाव्यात. कटीस्नान घ्यावे आणि मुख्य म्हणजे सुचवलेला आहार नियमितपणे सेवन करावा.[३]

या पत्रातून गांधी अधिक तरलपणे व्यक्त होतात. कस्तुरच्या मनाच्या हिंदोळ्याचाही परिचय घडतो. पती पत्नींमधील नात्यांची एक सुरेल वीण यातून वाचता येते. आपल्या स्वास्थ्याचे रहस्य ते उलगडवून दाखवतात. कस्तुरच्या स्वास्थ्याची परिस्थितीही पथ्य, औषधे व आहारावर अवलंबून असल्याचे सांगतात. आपल्या लेकरांसाठी स्वास्थ्याचे संवर्धन करणे गरजेचे

असल्याचे सांगतात. गृहस्थधर्माच्या एका नव्या पैलूकडे अंगुली निर्देश करतात. या पत्रात गांधींच्या मनोव्यथेचे स्पष्ट दर्शन घडते. यातून आपल्या मर्यादा स्पष्टपणे जाणण्याची भावना आहे. आहे. त्या परिस्थितीत प्रत्यक्ष भेट तर होणार नाही ही जाणीव आहे. अनेक आत्मीय सुचना आहेत. अगतिकता आहे. आंतरिक दबाव आहे. हे पत्र गांधीमनाचे प्रतिबिंब आहे. यात कस्तुरच्या स्थितीचे मनोरम अंकन आहे.

गांधी मणीलालला पत्र लिहितात. यातून कस्तुर आता अगदी स्वस्थ झाली असेल अशी आशा व्यक्त करतात. त्याने पाठवलेली अनेक पत्रे आपल्याला दिली गेली नसल्याचे सांगतात. कस्तुर आता बरी होत असल्याचे आपण डेप्युटी गव्हर्नरला कळवले आहे. ही माहिती देतात. पुढे असे विचारतात की कस्तुरला आरामाने आता चालता-फिरता येते का? त्या आणि ते सारे नियमितपणे सकाळी साबुदाण्याची खीर घेत रहाल.[४]

या पत्रातून गांधींनी आपली व कस्तुरची खबर दिली-घेतली आहे. कस्तुरच्या आहार-विहाराकडे ते अगदी सूक्ष्मतेने लक्ष देऊन आहेत. हे या पत्रातून कळते.

पुनश्च मणीलालला लिहितात की मांसाचे सूप न दिल्याने तिच्या देहाचे पतन झाले असते तरी ते त्यांना मान्य होते. तिच्या परवानगीशिवाय त्यांनी तिला सूप द्यायची परवानगी मुळीच दिली नसती. देह आत्म्याहून प्रिय वाटायला नको. जी व्यक्ती आत्मतत्वाला ओळखते आणि त्याचे देहाहून स्वतंत्र अस्तित्वही मान्य करते ती हिंसात्मक उपायांनी देह-रक्षणाचा विचार करणार नाही. हे कार्य खूप अवघड आहे.[५]

कस्तुरच्या आजाराविषयी आणि मुख्य म्हणजे डॉ. नानजी यांनी त्यांना गोमांसाचे सूप देण्याची शिफारस करण्याविषयीच्या प्रसंगांचा उल्लेख गांधी आत्मचरित्रात आला आहे.[६] या पत्रातून गांधी आणि कस्तुरच्या आध्यात्मिक उन्नयनाच्या खुणा तपासता येतात. देह आणि आत्मतत्त्व यातील नेमके अंतर ते अधोरेखित करताना दिसतात. मणिलालला लिहिलेल्या या दोन पत्रांमधून कस्तुर आणि गांधी यांच्या आंतरिक उन्मार्गगामी प्रवासाचा परिचय होतो.

जोहान्सबर्गहून हरीलालला लिहिले “तुमच्या आईला साधारणपणे तुमच्या पत्रांची अधिक आतुरता असते. तरी तुम्ही साधी चिठ्ठीही लिहिली नाही. या खेपेलाच एक छोटी चिठ्ठी आली आहे. लेकरांनी आई-बाबांना लिहिलेले दोन ओळींचे पत्र हे काही पत्र गणले जात नाही. एक विवेक म्हणून काही हा पत्र-व्यवहार होत नसतो, लेकरे आपल्या माता-पित्यांसमोर आपले अंत:करण उघड करत असतात. कठोर अंत:करणाची लेकरेच पत्रव्यवहाराविषयी बेदरकार असतात वा अल्प पत्रे लिहितात.[७]

१९०९ साल उजाडले. तीन ते चार हजार भारतीय तुरुंगात होते. यात हरीलालही होता

जुलै १९०८ मध्ये त्याने आठवडाभर तुरुंगवास भोगला. पुढे सत्याग्रह सुरुच ठेवला. ऑगस्टच्या मध्यावर त्याला महिनाभर तुरुंगवास झाला. फेब्रुवारी १९०९ मध्ये परत सहा महिन्यांची अटक झाली. १९०९ नोव्हेंबरमध्ये परत सहा महिन्यांची शिक्षा झाली. हरीलालचे व्यक्तिमत्व प्रसन्न होते. कारावास सहन करायची तयारी होती. वडील शाबासकी देत होते. आईला कौतुक वाटत होते. त्याच्या शिक्षणात अडथळे येते होते. तो फिनिक्सविषयी असमाधानी होता. त्याची तक्रार वडिलांनी ऐकली. तो म्हणाला ‘फिनिक्सला एक घाण वास येतो.’

गांधी म्हणाले ‘हे सुवासिक बनायला हवे. यासाठी तू विशिष्ट प्रकारे कार्य करत रहा. ते तुझे कर्तव्य आहे. तुझा सुगंध यात मिळेल. दुर्गंध नक्कीच कमी होईल.’

कस्तुरला टॉल्स्टॉय फॉर्ममधली ती सायंकाळ आठवली. काळया-काळ्या डोंगरासारखे ढग आभाळात दाटी करुन आले होते. डोंगरमाळा, खालच्या दऱ्या-खोऱ्या आणि शेतांमधून पावसाचा कहर बरसत होता. सारा आसमंत घनदाट निळ्या-काळ्या ढगांनी भारला गेला होता. घोंगावत्या वाऱ्यामुळे प्रचंड हत्तीसारखी वाटणारी झाडं मूळापासून गदगदा हलत राहिली

होती. वेळूचे बन पिसाटलेल्या भूतासारखे असंतुष्ट आवाज काढत होते. ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट वातावरणात भय जागवत होते. वादळाने झोडपल्या गेलेल्या ढगांना दिशांचे भान उरले नव्हते. सबंध वातावरणात दोनच नाद घुमत राहिले होते. एक वाऱ्याचा आणि दुसरा पावसाचा. त्या काळवंडलेल्या वातावरणाला भेदून जाणारी कर्णकर्कश वीज वातावरणात भयाचा संचार करत होती.

सत्याग्रह लढतीनंतर हरीलाल, प्रागजीभाई, सुरेंद्रभाई, बापूभाई वगैरे कार्यकर्ते तुरुंगातून सुटून परत आले होते. या दरम्यान चहा प्यायची सवलत आश्रमात केवळ कस्तुरलाच होती. या तत्त्वनिष्ठ, तुरुंगवास यशस्वीरित्या भोगून परतलेल्या लेकराना चहा प्यायची इच्छा झाली. कस्तुरला हे कळताच तिने वात्सल्याने चहाचे आधण चढवले. चहा केला. कार्यकर्त्यांनी चहा घेतला. तिला मनापासून समाधान वाटले. कोण जाणे कसे पण ही बातमी गांधींपर्यंत पोहोचली. त्यांनी कस्तुरला या कामासाठी ठपका दिला. आपल्यामुळे तिला त्रास झाल्याचे कळताच सत्याग्रही मित्रांनी स्वत:हून प्रायश्चित्त घ्यायचे ठरवले. त्याकाळी आश्रमवासी जन तुरुंगासाठी आपले जीवन सिध्द व्हावे म्हणून नाना प्रयोग करत असत. उशी म्हणून वीट वा लाकडी ओंडक्याचा उपयोग करत. त्यांनी लाकडी ठोकळ्याऐवजी एका ओबड-धोबड दगडाचा उपयोग उशी म्हणून केला. यामुळे गांधींनी त्यांना धन्यवाद दिले खरे पण कस्तुरवरचा ठपका कायमच राहिला होता.

गांधींनी मगनलाल गांधींना लिहिले होते की ब्रह्मचर्याचे व्रत घेण्यापूर्वी चांगल्या प्रकारे विचार करुन घ्यायला हवा. त्यांना जबरदस्तीने कस्तुरपासून वेगळे रहावे लागत आहे. या कारणामुळे ते खूप वाचले आहेत. ते जर १९०० सालापासून आजपर्यंत सोबत-सोबत राहिले असते तर ते वाचू शकले असते, हे सांगणे अवघड आहे.[८] या पत्रातील गांधींच्या मनाचा पारदर्शक भाव केवळ विलक्षण असाच आहे. यात सजलेली कस्तुरची प्रतिमा या संदर्भात विशिष्ट मानायला हवी.

श्री छगनलाल गांधी दक्षिण आफ्रिकेहून बाहेर गेले होते. त्यांना गांधींनी कस्तुरच्या वतीने पत्र लिहिले आहे. पत्र असे आहे. "कस्तुर असे लिहवून घेत आहे. की दोन छोटी कुलुपे घेऊन पाण्याच्या टाकीला लावावीत. तिचे म्हणणे योग्य वाटते. ज्याला गरज आहे. तो पाण्याचा उपयोग करु शकतो. प्रत्येकाने टाकीचा नळ उघडू नये अशी तिची इच्छा आहे. याशिवाय ती असे विचारत आहे. की तुम्ही खाट वगैरे सारे सामान व्यवस्थितपणे ठेवले आहे. की नाही? ठेवले नसेल तर ठेऊन देणे. तिचे म्हणणे आहे. की स्वयंपाकघराच्या दारामागे पोत्यात थोडे तांदूळ आहेत. त्याचा शोध नंतर घ्यावा."[९]

या पत्रातून गृहकृत्यदक्ष कस्तुरचे मनोरम दर्शन घडते. एक गृहिणी म्हणून किती बारीक-सारीक गोष्टींवर तिचे लक्ष होते याचा प्रत्यय येतो. दैनंदिन प्रयोगात घ्यायच्या वस्तुंच्या संदर्भातल्या दक्षतेचा परिचय घडतो. काटकसर तर कळतेच पण वस्तुंच्या सुयोग्य वापराचे दिशानिर्देशनही कळते.

संदर्भ


१) गांधीजींनी मोठी सून चंचल गांधी हिला फोक्सरस्ट तुरुंग ट्रान्सवाल येथून दिनांक २६ फेब्रुवारी १९०९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ९ पृष्ठ १९९;

२) गांधींनी सौ. चंचल हिला दिनांक २८ जानेवारी १९०९ रोजी लिहिलेले पत्र;

३) गांधींनी श्री ए. एच्. वेस्ट यांना प्रिटोरिया तुरुंगातून दिनांक ४ मार्च १९१९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गाधी वाड्.मय खंड ९ पृष्ठ २०२;

४) गांधींनी मणीलालला ट्रान्सवाल प्रिटोरिया जेलमधून दिनांक २५ मार्च १९०९ रोजी लिहिलेले पत्र - कैद्याचे नाव मो. क. गांधी कैदी नंबर ७७७;

५) गांधींनी मणीलाल गांधीला लंडनहून दिनांक १७ सप्टेंबर १९०९ रोजी लिहिलेले पत्र;

६) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३२० ते ३२२;

७) गांधींनी हरीलालला दिनांक २२ डिसेंबर १९०५ रोजी जोहान्सबर्गहून लिहिलेले पत्र आणि गांधीजीनुं खोवायेलुं धन हरिलाल गांधी : (गुजराती) नीलम परीख पृष्ठ १५४;

८) गांधींनी मगनलाल गांधीला दिनांक २० जानेवारी १९१० रोजी लिहिलेले पत्र;

९) गांधींनी मगनलाल गांधीला टॉलस्टॉय फॉर्म येथून दिनांक १९ ऑक्टोबर १९१० रोजी लिहिलेले पत्र.

❖❖❖

## २८) कस्तुरवर शस्त्रक्रिया

कस्तुरला तीन-तीनदा जीवावरची दुखणी झेलावी लागली होती. दरखेपेला ती बचावली. घरगुती उपचार केले गेलेत. डॉक्टर नानजी या मित्राने शस्त्रक्रिया करवून घेण्याचा सल्ला दिला होता. तिने संकोचून खूप आढेवेढे घेतले होते. अखेर नवऱ्याच्या आग्रहामुळे ती तयार झाली होती. तिचे शरीर खूप अशक्त झाले होते. डॉक्टरने क्लोरोफॉर्म न देता शस्त्रक्रिया केली होती. यासमयी तिने अपार वेदना झेलल्या होत्या. सोशिकपणे सारे सहन केले होते. नवरा तिथे काही अंतरावरच तर उभा होता. तो तर चक्रावून गेला होता. तो थरथर कापत होता. गर्भाशयात शस्त्र टाकले गेले होते. डॉक्टर चिरफाड करत होते. कस्तुरच्या मुखावर वेदना नव्हती. हूं नाही की चुं नाही. शस्त्रक्रिया प्रदीर्घ काळ चालली. कस्तुर स्थिर होती. काय तो तिचा धीरगंभीरपणा ! अनंत यातना देहाला होत्या. ती स्थिर होती. शस्त्रक्रिया सुखरुप पार पडली. ती अशी देहातीत राहून कशी काय जगू शकत होती? डॉक्टरची बायको स्वत: परिचारिका होती. त्या उभयतांनी खूप काळजी घेतली होती.

ऑपरेशन डर्बनला झाले होते. दोन-तीन दिवस झालेत. गांधी जोहान्सबर्गकडे निघाले. आपल्या नियोजित कामाला लागले. थोडे दिवस गेलेत. डॉक्टरांकडून त्यांना एक निरोप गेला. कस्तुरची तब्येत चांगली नाही. तिला अंथरुणातून उठणेही शक्य नाही. एकदा तर ती बेशुध्दही झाली होती. गांधींनी डॉक्टरना ताकीद केली होती की कुठल्याही परिस्थितीत तिला मांस वा मद्य देता कामा नये. अगदी औषध म्हणूनही देता कामा नये. आता तिची तब्येत बघून डॉक्टर हबकून गेले होते. कस्तुर दृढ निश्चयी होती. ती कट्टर शाकाहारी होती. डॉक्टर हे जाणत होते. त्यांनी गांधींची परवानगी विचारली. कस्तुरला मांस किंवा मद्य देणे डॉक्टरांना आवश्यक वाटले. हे औषध वा अन्न म्हणून द्यायचे होते. ते गांधींना शक्य नव्हते[१]

गांधी जोहान्सबर्गला होते. त्यांना डॉक्टरानी फोन केला. 'तुमची परवानगी हवी. तुमच्या पत्नीला मांसाचे सूप द्यावे लागेल. गोमांसाचा काढा देणे आवश्यक आहे. मला तरी असे वाटते.' डॉक्टर फोनवर बोलत होते.

'मी अशी परवानगी देऊ शकत नाही. कस्तुर स्वतंत्र आहे. विचारण्यासारखी स्थिती असेल तर तिला विचारा. तिची इच्छा असेल तर बेलाशक द्या. माझी हरकत नाही.' गांधी उत्तरले.

"रुग्णाला असले काही विचारणे मला पसंत नाही. तुम्ही प्रत्यक्ष इकडे येणे आवश्यक आहे. मी ठरवीन ते खाऊ घालू द्या. अशी परवानगी हवी. अन्यथा मी तुमच्या पत्नीची जबाबदारी घेत नाही. त्यांचा जीव जोखिमीत आहे. एवढे लक्षात घ्यावे." डॉक्टरांनी खुलासेवार सांगितले.

एवढे बोलून डॉक्टरांनी फोन खाली ठेऊन दिला. बोलणे थांबवले. गांधी काय समजायचे ते समजले. त्याच दिवशी डर्बनकडे येणारी गाडी धरली. डर्बनला पोहोचले. डॉक्टरांची भेट घेतली.

'मी आधी सारे देऊन टाकले आहे. त्यानंतर तुम्हाला टेलिफोन केला होता.' डॉक्टर धिटाईने म्हणाले.

'डॉक्टर, हे काय केलेत? अशी फसवेगिरी का केली?' अस्वस्थ होत गांधींनी विचारले.

"हे बघा, हा आमच्या औषधोपचाराचा विषय आहे. यात फसवेगिरी वगैरे काही मी जाणत नाही. आमची एक डॉक्टरी संस्कृती आहे. काही प्रसंग असे येतात. आम्ही रुग्णाचा विचार जाणून घेत नाही. त्याच्या नातलगांची परवानगी विचारत नाही. त्यांना फसवणे पुण्यकार्य मानतो. रुग्णाला वाचवणे आमचा धर्म आहे. मार्ग कुठलाही पत्करतो. यावर तुमचे काय म्हणणे आहे.?" डॉक्टरांनी तपशिलवारपणे आपली बाजू मांडली.

डॉक्टर दृढ होते. आपल्या उपचारावर ठाम होते. डॉक्टरांचे हे मत गांधींनी शांत चित्ताने ऐकून घेतले. त्यांना खूप वाईट वाटले. ते काही बोलू शकले नाही. डॉक्टर तसे मित्रच होते. सज्जन स्वभावाचे होते. त्यांचे कस्तुरवर उपकारच झाले होते. डॉक्टरांचे वर्तन मात्र असह्य होते.

"डॉक्टर, अजून काय ते मोकळेपणाने सांगा. आता आम्ही काय करावे? तुमचा सल्ला काय? माझ्या पत्नीचे स्वतंत्र मत आहे. ती शाकाहारी आहे. वैष्णव आहे. तिची संमती मोलाची! त्याशिवाय मी असल्या उपचारांना

परवानगी देणार नाही. तुमचा उपचार भीषण आहे. तो न केला तर माझ्या पत्नीचा जीव जाईल काय? तसे असले तरी मी ते सहन करीन. माझी तयारी आहे. माझी पत्नी एकवेळ मरण पत्करील. असला उपचार स्वीकार करणार नाही." गांधी गंभीरपणाने म्हणाले.

"या झाल्या वेदान्ताच्या बाता. त्या माझ्या दवाखान्यात चालणार नाहीत. माझे म्हणणे स्पष्ट आहे. रुग्ण माझ्या दवाखान्यात आहे. मी त्यावर योग्य तो उपचार करीन. आवश्यक ते खायला लावीन. प्यायला लावीन. हे मान्य आहे. का? मान्य नसेल तर रुग्णाला घेऊन जा. रुग्ण माझ्या दवाखान्यात नको. तुम्हाला हवे ते करा. मी रुग्णाला माझ्या दवाखान्यात मरु देणार नाही. तुमचे काय ठरते, ते बघा." डॉक्टर म्हणाले.

'म्हणजे तुमचे नेमके म्हणणे आहे. तरी काय? मी माझ्या पत्नीला आताच घेऊन जावे? दवाखान्यात ठेऊ नये?' गांधींनी खेदाने विचारले.

"मी काही असे म्हणालो नाही. घेऊन जा, असे माझे म्हणणे नाही. माझे म्हणणे थोडे समजून घ्या. मजवर कुठलाही निर्बंध घालू नका. असे असेल तर आम्ही उभयता तयार आहोत. आम्ही सुश्रूषा करु. तुम्ही खुशाल जाऊ शकता. आमचे म्हणणे साधे-सरळ आहे. हे मान्य असेल तर बघा. अन्यथा आमचा निरुपाय आहे. तुम्ही आपल्या पत्नीला घेऊन जाऊ शकता. बस. मला अधिक काही सांगायचे नाही." डॉक्टर शांतपणे म्हणाले.

गांधींचा एक मुलगा सोबत होता. त्याचाही विचार त्यांनी घेतला. तो सहमत होता. बाबाचे म्हणणे त्याला पटत होते. 'आईला मांस खाऊ घालता कामा नये.' हेच त्याचेही मत होते.

गांधी कस्तुरला जाऊन भेटले. ती कमालीची अशक्त झाली होती. तिचा सल्ला विचारणे त्यांना अवघड वाटले. डॉक्टरांशी संवाद झाला होता. आपले कर्तव्य मानून तो कस्तुरला सांगितला. कस्तुर दृढ होती.

'मला मांसाचे सूप घ्यायचे नाही. मनुष्य देह वारंवार मिळत नसतो. मला तुमच्या मांडीवर डोके टेकून मरण यावे. ते बेहत्तर ठरेल. मला देह बाटवायचा नाही. माझा निर्धार पक्का आहे.' तिने आपले ठाम मत मांडले.

या कस्तुरच्या बोलण्यावर गांधी मुग्ध झाले. काही समजाऊन सांगायचा प्रश्नच नव्हता ! 'तू स्वतंत्र आहे.स. माझ्या विचारांप्रमाणे वागायला बांधील नाहीस. आपले कित्येक हिंदू बंधू-भगिनी औषध म्हणून मद्य-मांस यांचे सेवन करतात.' गांधी म्हणाले.

कस्तुरचा निर्धार मात्र टळला नाही. तिने ठामपणे नवऱ्याला सांगितले. 'माझे ऐका, मला इथून घेऊन चला. मला इथे थांबायचे नाही. इथला औषधोपचारही घ्यायचा नाही. माझी काही-एक समजूत घालू नका.' कस्तुरच्या वाणीत निर्धार होता. गांधींना अर्थात्च खूप समाधान वाटले. कस्तुरला घरी नेणे सोपे नव्हते. मनात भयही उपजले. कस्तुरचे मत ऐकून निर्णय घेतला. पत्नीचा निर्णय डॉक्टरना कळवला. डॉक्टर गांधींना रागावले.

"तुम्ही घातकी पती दिसता. पत्नी दुखणाईत आहे. दुखणे जीवावरचे आहे. वेळ बिकट आहे. अशा अवस्थेत पत्नीशी अशी गोष्ट काढता? तुम्हाला शरम तरी कशी वाटली नाही. मी स्पष्टपणे सांगत आहे. रुग्ण इथून हलवण्यासारख्या स्थितीत नाही. शरीर जर्जर झालेले आहे. थोडेही हिसके त्यांना सहन करता यायचे नाहीत. माझे ऐका. रस्त्यातच काही बरे-वाईट होऊ शकते. अगदी जीवही जाऊ शकतो. मला आश्चर्य वाटणार नाही. मला बोल लाऊ नका. एवढे सांगून तुमच्या लक्षात काही येत नाही. आता तुम्ही तुमचे मुखत्यार आहात. अजूनही मला परवानगी द्या. माझा औषधोपचार करु द्या. मांसाचे सूप देऊ द्या. ही मोकळीक देणार नसाल तर तुमची मर्जी? मी रुग्णाची जबाबदारी स्वीकारत नाही. रात्रभरही आमच्या दवाखान्यात रुग्णाला ठेवता येणार नाही." डॉक्टरांचा आवाज चढा होता.

कस्तुरच्या या दृढ स्वभावाचा परिचय वेळोवेळी घडतो. ती अनेकदा जीवाच्या आकांताने कामे करते. आपल्या निष्ठा जोपासते. आपल्या मूल्यांसाठी बलिदानाला सिध्द असते. या प्रसंगी डॉक्टर ठाम होते. कस्तुर दृढ होती. गांधींचा निर्णय ठरला होता.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३०७ ते ३२६ या विवेचनाचा सारांश

❖❖❖

## २९) प्रयोगवीर नवरा आणि कस्तुरची सेवा

अखेर दवाखान्यातून निघायचे ठरले. स्टेशन तिथून लांब होते. प्रवास एरवीही सोपा नव्हता. डर्बन ते फिनिक्स रेल्वेची सोय होती. ईश्वरावर श्रध्दा होती. तोच संकटसमयी तारणहार असतो. गांधींनी सारी व्यवस्था काळजीपूर्वक आखली. एका साथीदाराला आधी फिनिक्सला पाठवले. तिथे त्यांच्याजवळ हॅमक होते. हॅमक म्हणजे जाळीदार कपड्याचा पाळणा किंवा झोळी. या झोळीची दोन टोके बांबूला बांधायची. सुरेख पाळणा तयार होतो. यात रुग्णाला सुखेनैव झुलत रहाता येते. गांधींनी वेस्ट यांना निरोप पाठवला होता. ते आपल्यासोबत हॅमक आणणार होते. गरम पाणी आणि गरम दूध आणणार होते. हे बाटलीत भरुन आणायचे होते. सहा माणसे सहाय्यार्थ सोबत होती. हे सारे घेऊन ते स्टेशनवर येणार होते. सारी सिध्दता झाली होती.

ढेरपोट्या ढगांच्या ढिगांमुळे आभाळाचे छत समृध्द झाल्यासारखे दिसत होते. क्षितिजावर अगदी स्पर्श करता येईल असे वाटणारे ढग नभाच्या माथ्यावर तरंगत होते, ते खरेतर खूप उंचच उंच होते. स्पर्श न करता येणाऱ्या स्वप्नांसारखे, चाखता न येणाऱ्या स्वादांसारखे. रिमझिम पाऊस पडत होता. डर्बन ते फिनिक्स हा आगगाडीचा प्रवास होता. फिनिक्स स्टेशनच्या पुढे साधारणपणे अडीच मैल पायी चालत जावे लागणार होते. धोका तर भरपूर होता.

आगगाडी निघायची वेळ झाली. गांधींनी रिक्शा मागवला. तशा गंभीर अवस्थेत कस्तुरला रिक्शेत बसवले. रिक्शेने स्टेशनची वाट धरली. तिला धीर देण्याची गरज नव्हती. तिने उलट नवऱ्याला हिंमत दिली. तिचे शरीर केवळ हाडांचा सापळा उरले होते. तिला अन्न जात नसे. प्लॅटफॉर्म भला लांबलचक होता. तिथे तर काही रिक्शा नेता येत नव्हता. गांधींनी तिला अलगद उचलले. अशाही स्थितीत कस्तुर 'नका हो मला उचलू.' असे म्हणत राहिली होती. गाडी सुरु झाली. आता तिला थोडा आराम मिळाला. अखेर आले एकदाचे फिनिक्स स्टेशन. इथे सारी सोय होती. सारे तयार होते. कस्तुर हॅमकमधून निघाली.

आता गांधींचे प्रयोग सुरु झाले. निसर्गोपचार सुरु झाले. यापूर्वी मणीलालवर मुंबईत पाण्याचा प्रयोग केला होता. यामुळे त्याचा ताप गेला होता. मातीचा प्रयोग झाला होता. यामुळे रामदासचा हात सुधारला होता. आता कस्तुरचा क्रम होता. पाण्याचे प्रयोग सुरु झाले. शरीर हळूहळू सुधारत गेले. अनुकूल फरक जाणवू लागला होता.

गांधी कस्तुरला केपटाऊनला घेऊन आले होते. फिनिक्सला सेवेकऱ्यांची मोठी सेना होती. संपूर्ण आश्रम सेवेसाठी तत्पर होता. सारे सेवा-चाकरीसाठी मदत करतील अशी अवस्था, व्यवस्था आणि शक्यता होती. रामदास आणि देवदास ही दोन मुले होती. छगनलाल व मगनलाल होते. सौ. काशीताई आणि सौ. संतोकताई होत्या. गांधी मात्र केपटाऊनमध्ये एकटेच कस्तुरची सेवा करत होते. एकट्याने सेवेचा हट्ट धरुन होते. या समयी देवदास तर आईच्या सेवेसाठी यायला तत्पर-उत्सुक-आतुर होता. गांधींनी त्याला फिनिक्समध्येच रहायला सांगितले होते.

गांधी केपटाऊनहून कस्तुरच्या आजारपणाविषयी फिनिक्सला पत्र लिहित. त्यांनी आजाराचे गंभीरपण लपवले नाही. पत्र वैराग्याला शोभेल अशा उपदेशाने भारलेले आहे. ते लिहितात की कस्तुरची तब्येत खूप म्हणजे खूप बिघडली आहे. डॉक्टरी उपचार आणि औषधांचा तिजवर विपरित परिणाम झाला आहे. असे तिचे स्वत:चे व माझेही मत आहे. खरे तर डॉक्टरी उपचार करायची इच्छा तिनेच दर्शवली होती. दोन वा तीन प्याले औषध घेतले व ती खूपच आजारी पडली. आता काहीही खाता येत नाही. अखेर मरण येईल. आपण मरणाला न भिण्याचेच ठरवले आहे. यामुळे काळजी करण्याचे काही कारण नाही. शरीर तर जाणार आहे. बरे, त्याची वेळही ठरलेली आहे. त्यानुसारच आपल्याला उपाययोजना सुचतात. आत्मा तर अमर आहे. आपला स्नेह व संबंध तर देहाशीच असतो. खरे तर आपण आत्म्यावर प्रीत करायला हवी. देहातून जीव निघून गेल्यावर आपण घडीभरही देहावर मोह करत नसतो. ही निश्चित गोष्ट आहे. हे पूर्णत: जाणून कस्तुरच्या देहाविषयी आवश्यक व शक्य ते सारे उपाय केल्यावर मी तरी निश्चिंत आहे. तसेच आपण सर्वांनीही निश्चिंत

असावे असे इच्छितो. आता देहाची अशी स्थिती जाणून आपण साधुत्व बाळगून 'देही उदास' असायला हवे. साधुत्व म्हणजे स्थूल वैराग्य वा जगतात भटकंती नव्हे. वैराग्य म्हणजे शुध्द चारित्र्य होय. उदासीन असणे म्हणजे दिलगीर असणे नव्हे तर विषयातील अनासक्ती आणि जगत्विषयक निर्मोहीपण होय! तुम्ही कस्तुरविषयी मोहभाव बाळगता ना, मग तुमच्या ठायी या गुणांचा विकास होवो. दुसरे काय?[१]

या आजारपणाच्या दरम्यान जमनादास गांधी दीर्घकाळ केपटाऊनमध्ये होते. ते मगनलाल गांधींचे धाकटे बंधू होते. मगनलालभाई या काळादरम्यान फिनिक्सला होते. त्या दोन भावांमधल्या पत्रव्यवहाराचा सारांश प्रभुदास गांधी यांनी मांडला आहे. याचा आशय असा आहे. 'गांधींचे तप प्रखर आहे. ते फराळ घेतात, तोही एकाच वेळी सेवन करतात. बांच्या सेवेत अगदी तत्पर आहेत.'[२]

कस्तुरची तब्येत सुधारु लागली होती. दोन-तीन दिवस लोटले होते. एका स्वामीजींचे त्यांच्या घरी आगमन झाले. त्यांना या दांपत्याच्या हट्टाची गोष्ट कळली. ऐकून त्यांना दया आली. ते दोघांची समजूत घालू लागले. या दरम्यान कस्तुरची दोन्ही मुले सोबत होती. मणीलाल आणि रामदास आई-वडिलांसमवेतच होते. स्वामीजींनी एक प्रवचन दिले. मांसाहार निर्दोष आहार असल्याची मांडणी केली. मनुस्मृतीतील श्लोक उध्दृत केले. आपले निवेदन पुष्ट केले. कस्तुर सारे ऐकत होती. गांधींना हे काही आवडले नाही. शिष्टाचार जपावा लागतो. त्यांनी काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्यांना मांसाहार मूळात मान्यच नव्हता. मनुस्मृतीच्या प्रमाणांची त्यांना काहीही आवश्यकता नव्हती. त्यांना तर ते श्लोक ठाऊकही होते. त्या श्लोकांना प्रक्षिप्त मानणारा एक प्रबळ पक्ष आहे., हेही त्यांना माहित होते. ते श्लोक जरी प्रक्षिप्त नसले तरी त्यांना मान्य नव्हते. शाकाहारावर त्यांची ठाम श्रध्दा होती. ती विज्ञानाने पुष्ट केलेली होती. त्यांचे विचार स्वतंत्रपणे बनलेले होते. ते आपल्या विचारांवर दृढ होते. कस्तुरची श्रध्दा आपले काम करतच होती. तिला शास्त्राच्या प्रमाणांशी काहीही घेणे देणे नव्हते. तिच्यासाठी रुढी हाच धर्म होता. रुढी वाड-वडिलांनी जोपासलेली होती. नवऱ्याच्या धर्मावर तिचा दृढ विश्वास होता. ते स्वामीजींशी चर्चा-विनोद करतच होते. हे कस्तुर ऐकत होती. तिचा निर्णय ठाम होता. डॉक्टरांचे विज्ञान तिला विचलित करु शकत नव्हते. स्वामीजींच्या धर्मावर तर तिला मुळी विश्वास नव्हता. तो संवाद तिला निरर्थक वाटला. तिने तो थांबवला. निर्णयात्मक स्वरुपाचे बोलली -

"स्वामीजी, आपले निवेदन मी ऐकले. ते तुम्ही करायला स्वतंत्र आहात. मी माझ्या मतावर ठाम आहे. तुम्ही काहीही म्हणू शकता, म्हणा. मला मांसाचे सूप घेऊन बरे व्हायचे नाही. यापुढे मला अधिक चर्चा नको. त्यामुळे माझे डोके ठणकते. आता शांत रहा. तुमचे उपकार होतील. आता निघालात तर उत्तम. तुम्हाला आणिकही काही बोलायचे असेल. मला तसे वाटते. परत या. मुलांच्या वडिलांशी बोला. मी माझा निश्चय सांगून टाकला आहे." कस्तुर निर्वाणीचे बोलली.

आहाराच्या संदर्भात तर गांधी जागृत होते. ते आहाराविषयी अखंड प्रयोग करत असत. त्यांनी आहारात मिठाला फाटा दिला होता. जवळपास वर्षभर हा फाटा अखंडपणे टिकून राहिला होता. अन्नाहाराविषयी त्यांनी अनेक ग्रंथ वाचले होते. आपल्याला मीठ खाण्याची गरज नाही. मीठ न खाणे आरोग्याला फायद्याचेच असते. यातुन ब्रह्मचर्याला लाभ होतो. शरीर दुबळे असेल तर कडधान्याचे सेवन करु नये. हा पाठही वाचला होता. अनुभवाने या गोष्टींना पुष्टही केले होते. त्यांचा काही लगेच त्याग करता आला नव्हता. दोन्ही वस्तु गांधींना प्रिय होत्या. कस्तुरवर नुकतीच शस्त्रक्रिया झाली होती. काही काळ रक्तस्राव थांबला. पुनरपि उलटला. तो काही केल्या बंद होईना. पाण्याचे उपचार सुरु होते. तेवढे काही पुरेसे ठरत नव्हते. कस्तुर सारे सहन करत होती. तिला नवऱ्याच्या उपचारांविषयी विशेष आस्था वाटत होती, असे नाही. अर्थात् त्याविषयी तिरस्कार मात्र नव्हता. इतर औषधांबाबत तिचा काही आग्रहही नव्हता. आता आपले उपचार व्यर्थ ठरत आहेत. हे गांधींच्या लक्षात आले. आता त्यांनी दुसरा प्रयोग सांगितला. मीठ व कडधान्य सोडण्याबद्दल कस्तुरला विनवणी केली. पुष्कळ समजूत घातली. ग्रंथांचा भारा आणला. उतारेच्या उतारे वाचून दाखवले. कस्तुर काही ऐकायला तयार नव्हती.

'हे जर तुम्हाला कोणी सांगितले तर तुम्ही ऐकाल का? तुम्हीसुध्दा या गोष्टी सोडणार नाहीत. एवढी खात्री बाळगा.' तिने कंटाळून सांगितले.

हे ऐकून साहजिकच नवऱ्याला वाईट वाटले. हर्षही झाला. वाईट यासाठी वाटले की बायको ऐकत नाही. हर्ष यासाठी वाटला की बायकोवरील प्रेम सिध्द करायची संधी लाभली. या आनंदाच्या भरात ते बोलले.

"हे बघ, तुझी समजूत चुकीची आहे. मला दुखणे आले तर मी हे सारे करीन. वैद्याने सांगितले तसे करीन. या गोष्टींचेच काय घेऊन बसलीस? आणीखीही काही अवश्य सोडीन. ते राहू दे. मी वर्षभर मीठ आणि कडधान्याचे सेवन करणार नाही. तू सोड वा सोडू नकोस. तुझी मर्जी. माझ्या निश्चयाशी त्याचा काडीइतकाही संबंध नाही." गांधी निकराने म्हणाले.

कस्तुरला खूप पश्चात्ताप वाटला. ती मनात खूप शरमली. "मी क्षमा मागते. मी तुमचा स्वभाव जाणते. बोलायच्या भरात काही बोलुन गेले. मी असे बोलायला नको होते. मी आजपासून मीठ आणि कडधान्य खाणार नाही. तुम्ही आपला शब्द परत घ्या. मी तरी असेच म्हणेन की ही मला बेसुमार शिक्षा केली आहे." कस्तुर मऊपणे बोलली.

"तू मीठ, कडधान्य सोडशील तर फारच छान. यातून तुला फायदाच होईल. याविषयी मला खात्री आहे. मी मात्र माझी प्रतिज्ञा बदलणार नाही. माझा झाला तर फायदाच होईल. माणसाने संयम पाळावा कारण काहीही असो. यातून लाभच लाभ होईल. तू मला निर्णय बदलायला लाऊ नकोस. यात माझी मला परीक्षा होईल. तुझा निश्चय भक्कम होईल." गांधी दृढतापूर्वक म्हणाले.

एवढे ऐकले. यावर कायच बोलणार? कशी समजूत घालणार? निर्णय बदलायला कसा काय लावणार?

'तुम्ही म्हणजे पक्के हट्टी. कुणाचे कधी ऐकणारच नाहीत.' कस्तुर एवढे बोललीच. ती शांत राहिली होती. तिच्या डोळ्यातून चार आसवे टपटप गळलीत. ते पश्चात्तापाचे अश्रू होते. ग्लानीभरल्या मनाचे अश्रु होते. ही आठवण दोघांना दीर्घकाळ राहिली. गांधींना तर ही मधुर आठवण वाटली. त्यांना या घटनेत सत्याग्रहाचे दर्शन घडले. हळूहळू कस्तुरची तब्येत सुधारली. याची कारणे अनेक असतील. इतर लहान मोठे फेरबदल झालेत. इतर नियमांचेही पालन झाले. मनाला उल्हास वाटला. नवरा अधिक जपू लागला. या कारणांसोबत पथ्य होतेच. पथ्य किती अंशी कारणीभूत ठरले, देवच जाणे. तिच्या शरीरातली क्षीणता दूर झाली. शरीर सुधारु लागले. रक्तस्राव बंद झाला. वैद्यराज म्हणून नवऱ्याची प्रतिष्ठा वाढली.

गांधींनी मगनलालला लिहिले होते की ते कामात होते. परत दुसऱ्यांदा कस्तुरचे कुशल-क्षेम विचारायला जाऊ शकले नाहीत. त्यामुळे त्या चिडल्या होत्या. ते जेव्हा गेले तेव्हा त्यांना रडू कोसळले. आता आपण मरतो की काय असे त्यांना वाटले. ते बघून गांधीही चक्रावून गेले. लगेच सावरुन हसत म्हणाले 'मरण आले तर चिंता कसली करता हो? लाकडांची उणीव नाही. या फॉर्ममध्येच जाळता येईल.' यावर मग त्याही हसल्या. अर्ध्या वेदना तर त्याक्षणीच दूर झाल्या, यानंतर खूप जालीम उपाय करायला हवा असा विचार त्यांनी केला. केवळ मातीच्या उपचाराने काम नाही भागायचे. यामुळे ते म्हणाले की भाज्या आणि मीठ अजिबात बंद करुन टाका - फक्त गहू आणि मेवा घ्या. भात ओलसर हवा असेल तर तूप घालून खा. यावर त्या म्हणाल्या ' हे तर तुम्हालाही करणे शक्य नाही.' यावर गांधी लिहितात ' मी म्हणालो की आजपासून मी मीठ-भाज्या सारे सोडले, मग तर त्या अगदी लाचार झाल्या. याचा परिणाम असा झाला की आम्ही उभयतानी जवळपास गेल्या महिन्यापासून मीठ-भाज्या आणि डाळींचे सेवन केले नाही. मला तर इतर दुसऱ्या आहाराची (आहार-सेवनाची) इच्छाच होत नाही. कस्तुरला इच्छा होते. एकदा तिच्याकडून रहावले गेले नाही आणि तिने थोडी गवारची भाजी खाली. तसे तर त्यांनी या आहारावर उरलेले दिवस घालवलेत. वेदनेत तर आश्चर्य वाटावा एवढा बदल झाला आहे. रक्तस्राव व्हायचा तो लगेचच बंद झाला. मला अनायासेच अधिक आत्मसंयमनाचा लाभ मिळत आहे. मीठ एक तेज पदार्थ आहे. हा माझा तर्क आहे. कुठल्याही पदार्थात थोडेसे मिसळले तर त्याचा गुण व स्वाद बदलून टाकतो. त्याच्या प्रभावाने रक्त खूप पातळ होत असावे. [३]

या पत्रातून गांधींच्या आणि कस्तुरच्या आहारविषयक प्रयोगाचे एक सुस्पष्ट चित्र उभे रहाते. गांधींचा आग्रह आणि कस्तुरची आहारविषयक कमकुवत भावना यातून व्यक्त होते. दोघांमधल्या निरलस एकात्मतेचे चित्रही यातून उभे ठाकते.

श्री रावजीभाई मणीभाई पटेल यांनी एक आठवण सांगितली आहे. त्यांना दक्षिण आफ्रिकेत रहायचा सुयोग लाभला होता. मुख्य म्हणजे गांधी-कस्तुरच्या घरात रहायची संधी लाभली होती.

'घटना फिनिक्स आश्रमातली आहे. १९१३ साल होते. एके दिवशी सकाळी अकराचा सुमार होता. जेवण आटोपून मी जेवायच्या मेजावर बसलो होतो. बापूजी सदैव सर्वांना जेऊ घातल्यावर अखेरीस जेवत असत. ते जेवत होते. त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबातले एक बुजुर्ग कालिदास गांधी बसले होते. ते टुंगाट नामक गावात रहात असत. तिथून काही दिवसांसाठी आले होते. बा उभ्याने स्वयंपाकघरातील कामे आवरत होत्या. स्वच्छता करत होत्या. श्री कालिदासभाई पुराणपंथी होते.

दक्षिण आफ्रिकेत एखाद्या साधारण व्यापाऱ्याकडे स्वयंपाकघराच्या वा इतरही स्वच्छतेचे काम करायला नोकर असत. इथे बा ला सारी कामे स्वतःच्या हातून पार पाडताना त्यांनी बघितले.

'भाई, तुम्ही तर जीवनात खूप फेरफार करुन टाकलेत. अगदीच साधेपणा अंगिकारला. या कस्तुरबाईनीही कुठले वैभव भोगले नाही.' ते गांधींना म्हणाले. 'पण मी तिला वैभव भोगण्यापासून कधी रोखले आहे.?' खाता-खाता गांधींनी विचारले.'तुमच्या घरात मी काय वैभव भोगले आहे.?' हसत-हसत बा ने टोमणा मारला.

'मी तुला दागिने वापरण्यापासून वा रेशमी साडया नेसण्यापासून कधी रोखले आहे. आणि तू मागितल्यावर तुझ्यासाठी सोन्याच्या बांगड्याही बनऊन आणल्या होत्या न?' त्याच स्वरात हसत-हसत गांधी म्हणाले.

"तुम्ही तर सारे काही आणून दिले हो, पण मी त्याचा उपयोग कधी केला? तुमचा मार्ग वेगळा आहे. हे मी बघून घेतले आहे. तुम्हाला तर साधू-संन्यासी बनायचे आहे. मग मी हौस-मौज करुन काय करणार? तुमच्या प्रकृतीला जाणून घेतल्यावर तर मी माझ्या मनाला मनऊन घेतले." कस्तुर काहीशी गंभीर होत म्हणाली.

'मी तर माझ्या मनाला मनऊन घेतले.' कस्तुरच्या या निवेदनात तिच्या यशस्वी जीवनाची किल्ली आपल्याला सापडू शकते. अशा प्रकारे आपल्या मनाला मनऊन घेतल्यावरही कस्तुरने गांधींना कठोर आणि शुष्क बनण्यापासून रोखले होते.

संदर्भ

१) जीवननुं परोढ : (गुजराती) श्री प्रभुदास गांधी पृष्ठ ४८० ते ४८१;

२) कित्ता पृष्ठ ५२१;

३) गांधींनी मगनलाल गांधींना दिनांक ९ मार्च १९११ रोजी लिहिलेले पत्र.

❖❖❖

## ३०) थकवणारा अध्याय

कस्तुरच्या जीवनग्रंथातील एक थकवणारा अध्याय हरीलाल आहे. सासरे करमचंद तिच्या घरचे आधार होते. त्यांचे निधन झाले होते. ओटीत नियतीने बालकाचे दान दिले होते. ते परत क्रुरपणे हिसकावून घेतले होते. पान्हा तटतटत होता. नवरा शिकायला विलायतेत निघाला होता. मांडीवर आता एक बाळ होते. हरीलाल एकाकीपणाचे सोबती बाळ होते. नवरा विलायतेत तीन वर्षे शिकायला गेला होता. घरात सासूबाई, मोठे दीर, मोठ्या जावा, लेकरे असा परिवार होता. या परिवारात कस्तुर या लेकराशी सुख-दु:खाचे संवाद करत असायची. बाळाला ती सारी भाषा कळत असेलच असे नाही. मात्र कस्तुर एकात्म भावनेने त्याच्याशी बोलत रहायची.

चौदा वर्षांचा हरी काका-चुलत्याकडे वाढला. मोठे काका करसनदास होते. त्यांच्याकडे तो वाढला होता. नवऱ्याने या अबोध लेकराला करसनदास काकाच्या हाताखाली का ठेवले होते? किशोरवयीन मुलावर या अभद्र व दूषित वातावरणाचा प्रभाव पडल्याशिवाय कसा बरे राहणार होता? मुलाला सोबत राखणे अगदी अशक्य होते तरी देश-विदेशात सुयोग्य शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थांची काही उणीव तर नव्हती ना? ही गोष्ट विचारात का घेतली गेली नाही? आपल्या मुलाबाबत नवऱ्याने टाळाटाळ केली की बेपर्वाई दाखवली? त्याने बनारसला शिकावे की गोंडलला की काठेवाडात? या गंभीर प्रश्नाचा निर्णय नवऱ्याने छाप की काटा करुन घ्यावा? याबाबत थोडे सावधपण दर्शवले असते तर त्याला दोनच महिन्यात परत राजकोटला बोलावून घ्यावे लागले नसते. बरे, या भयंकर चुका सुधारण्याची वेळ निघून गेली होती असे नव्हे. एवढे करुनही त्याला बनारस वा अन्यत्र पाठवले गेले नाही. त्याच रुढीप्रिय मागासलेल्या कुटुंबात आश्रित म्हणून जगावे लागले होते. ही निर्दय अशी बेपर्वाई होती. कस्तुर विचार करत रहायची आणि थकून जायची. तिचे मन पाऊस पडलेल्या ढेकळासारखे विरुन-विरघळून जायचे. या थकल्या मन:स्थितीची कुठे नोंद नाही. कस्तुरच्या मनाची आंदोलने अशा प्रकारे होत असली पाहिजेत.

गांधींची मुंबईत वकीली होती. पुढे नेटालमध्ये सुरु झाली. कमाई वाढली. आता ट्रांसवालमध्ये वकीली सुरु झाली. आता तर कमाई खूपच वाढली. कस्तुर आता दक्षिण आफ्रिकेकडे निघाली होती. तिचे मन द्वंद्वांनी भारलेले होते. हरीलाल आता सोळा वर्षांचा झाला होता. यातला किती काळ तो वडिलांसोबत राहिला होता? त्यांचा किती संपर्क झाला होता? आता तर तो हिंदुस्तानातच थांबणार होता.

जानेवारी १९०३ सालची ही घटना आहे. वोरांची मुलगी होती गुलाब. तिचे वय अकरा वर्षांचे होते. हरीलाल चौदा वर्षे वयाचा होता. गांधींना ही बातमी कळली. त्यांनी संताप-संताप व्यक्त केला. त्यांची संमती मिळवणे थोरल्या भावाला अवघडच गेले. कस्तुर अवघडून गेली. तिने काय करावे? मोठे दीर लक्ष्मीदास यांनी हा संबंध मान्य करुन टाकला होता. आपले लग्न झाले तेव्हा आपले वय तेराच वर्षांचे होते. ते का लग्नाचे वय होते? तरी अभ्यास करायचे वय. संस्कार जोपासायचे वय. एके दिवशी कस्तुरला हरीलालच्या विवाहाची बातमी कळली. गांधी-कस्तुरमध्ये असा संवाद झाला 'आणि केव्हा घडले हे सारे?' कस्तुरने विचारले.

'२ मे १९०६ रोजी हा विवाह झाला. गेल्या महिन्यात. नुकतेच. भाऊ म्हणतो सारे-सारे तिथे हजर होते.' गांधी म्हणाले. 'म्हणजे? ' कस्तुरच्या मनातील प्रश्न प्रकट झाला.

'नातलग सारे-सारे होते. एक तू नव्हतीस आणि एक मी नव्हतो.' गांधींनी खुलासा केला.

'असे कसे काय बाई?' कस्तुरचे आश्चर्य शतगुणीत झाले.

"लक्ष्मीदासला सारे माहित होते. तो मला चांगले ओळखतो. माझ्या इच्छेविरुध्द केले आहे. त्याने हे सारे ! हरी-गुलाब अजून कितीतरी लहान आहेत. नवरा अठरा वर्षांचा. नवरी जेमतेम पंधरा वर्षांची. हरीला तर अजून खूप काही जाणून घ्यायचे आहे. तशी गुलाब माझ्या अंगा-खांद्यावर वाढलेली मुलगी. बालपणी

हरीचा साखरपुडा झाला होता आणि आता लगेच लग्न." गांधींनी सारे स्पष्ट करुन सांगितले.

कस्तुरच्या मनात आले. आपल्या लग्नाच्या वेळी यांनी तरी कुठे काय विचार केला होता. हरी बापासारखाच तर उतावीळ, हट्टी आणि जिद्दी आहे. बाप का मनावर विजय मिळवू शकला होता? हरीला गुलाबचे अनिवार आकर्षण वाटण्यात चूक ती काय? त्यांचे लग्न लाऊन देऊन उलट मोठ्या दिराने समजूतदारीचेच पाऊल उचलले होते ना? तिचे मन विचार करत राहिले होते. विचारांच्या लाटा तिच्या मनाच्या तटावर आदळत राहिल्या होत्या. फुटत राहिल्या होत्या. धसमुसळ्या वासनेच्या उद्रेकी ढगांचा असा अनिर्बंध प्रवास तिला अपरिचित नव्हता. ती शांत-शांत राहिली. मनोमन तर तिने थोरल्या दिरांचे आभारच मानले होते. नवऱ्याला त्या क्षणी तरी ती काहीही समजावून सांगू शकत नव्हती हे मात्र खरे होते.

गांधींचे थोरल्या भावाशी खूप दिवसांपासून मौन होते. हे कळल्यावर त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी लक्ष्मीदास यांना पत्र लिहिले. 'माझ्या मते या विवाहाला काहीही अर्थ नाही.'

हरीलाल आणि गांधींचे संबंध जिव्हाळ्याचे उरले कुठे होते? किमान आत्मीय असा अंतरंग पत्र-व्यवहार जरी असता तरी काही गोष्टी तर कळल्या असत्या. हरीलालचे लग्न २ मे १९०६ ला झाले. गांधींना बातमी २७ मे १९०६ रोजी कळली. याचा दोष लक्ष्मीदासांवरच येतो. भारतात तेच त्याचे पालक होते. आई-वडिलाना वेळच्या वेळी सारे कळवणे त्यांची जबाबदारीच होती. मोठ्या भावाच्या बेफिकीरपणाचा दोष तरुण मुलावर लादणे अन्यायच होता.

पुढे आपल्या दोन लेकरांना सोबत घेऊन आपल्या भाच्यासोबत कस्तुर दक्षिण आफ्रिकेला आली होती. तिथे मुलांच्या शिक्षणाविषयीचा प्रश्न जागला होता. प्रयोगवीर गांधी आपल्या शैलीत मातृभाषेचा आग्रह धरत होते. घरातच शिकवायचे म्हणत होते. स्वतः वेळ देऊ शकत नव्हते. पुढे हरीलालने हिंदुस्तानात शिकायला जायचा आग्रह धरला होता. गांधींनी परवानगी दिली होती. कस्तुरची कासाविशी सुरु झाली होती. हरीलाल आपल्या काकांकडे वाढत होता. हरीलाल राजकोटला शिकू इच्छित होता. कस्तुरला वाटे की सर्वांनी आता राजकोटलाच रहावे. बस झाले दक्षिण आफ्रिका. नवरा विलायतेत शिकायला गेला तेव्हा हरी अवघ्या तीन महिन्यांचा होता. दक्षिण आफ्रिकेत त्याला प्रथम वडिलांचे सान्निध्य लाभले. वय वर्षे नऊ. व्यवस्थित शिक्षण नाही. तिला ही काळजी सतवत रहायची. याविषयी कधी-कधी तिचे नवऱ्याशी भांडणही झाले होते. शिक्षणाच्या गैर-सोईमुळेच तर हरीलाल राजकोटला थांबून गेला होता. कस्तुरला हरीची आठवण यायची. तिचे हृदय विह्वळ व्हायचे. हरी हुशार मुलगा होता. मोठा मुलगा होता. आपल्या वडिलांसारखी उच्चविद्याविभूषित होण्याची कामना हरीलालच्याही मनात होती. आपली योग्यता वाढवून त्याला समाजसेवा करायची होती. गांधींनी तर हरीलालच्या शिक्षणविषयक ध्येयधोरणालाच ठोकरले होते. यासाठी हट्टाने काही आग्रह धरला होता. हरीलालला कुठलेही व्यवसायिक योग्य शिक्षण लाभू शकले नाही. श्री प्राणजीवनदास मेहता यांनी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव मांडला होता. गांधींनी हरीलालला डावलले.

हा निर्णय झाला त्यावेळी हरीलाल कैदेत होता. परतल्यावर त्याला ही बातमी कळू न देण्याची दक्षता घेतली गेली होती. त्याला कळल्यावर मोठा आघात बसला. त्याने वडिलांना या विषयी स्पष्टपणे विचारलेही होते. त्याला काहीतरी थातुर-मातुर उत्तरही दिले गेले असावे. यावर रामदासची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे. तो म्हणाला होता 'ही बापूजींची चूक होती. हरीलालला या बॅरिस्टरीच्या प्रस्तावाविषयी कळवले असते तर त्याला त्रास झाला नसता. या घटनेमुळे त्याची समजूत झाली की वडिलांच्या मार्गदर्शनाखाली काही आपल्याला संधी लाभणार नाही. त्याला स्वतःच पुरुषार्थ करावा लागेल.'

कस्तुरला ही हरीलालची उपेक्षा वाटली होती. यात हरीलालचे काय चुकले होते बरे? तिचे मन तिला थकवत राहिले होते. अशा प्रकारे मुलांचे पंख छाटण्यात काय हशील होता? तिच्या मनात हा प्रश्न सलत राहीला होता. हरीलालने घुसमट तिच्यापाशी व्यक्त केली होती. तिचे मन या घटनेने पार विदीर्ण झाले होते. तिला नवऱ्याचा

बेदरकारपणा आवडला नव्हता. ती विचार करत राहिली होती की अखेर यांनी काय ठरवले तरी काय आहे.? मुलांना गरीब ठेवायचे. लंगोटी लावायला सांगायचे. खरे तर हरीलालची कार्यनिष्ठा अढळ होती. तो जन्मजात प्रतिभावान होता. त्याचे शौर्य वाखाणण्याजोगे होते. कर्मठता विलोभनीय होती. तो अक्षरश: झोकून देऊन कामे करायचा. अंगतोड मेहनत करायचा. तरुण पत्नी आणि छोट्या बालिकेला सोडून अनेकदा तो सत्याग्रहात सामील झाला होता. वेगवेगळ्या कारणांसाठी किमान दहादा तरी हरीलाल तुरुंगात गेला होता. त्याने तुरुंगात उपवासही केले होते. निर्भयपणे पाशवी सत्तेविरोधात सत्याग्रहात सक्रिय सहभाग नोंदवला होता. आपला मुलगा आदर्श सत्याग्रही योध्दा असल्याचे कस्तुर नेहमी म्हणायची.

कस्तुरचे मन हरीलालच्या जीवनाचा पट उलगडत राहिले होते. १९०७ साली हरीलाल आफ्रिकेत पोहोचला होता. जोहान्सबर्गमध्ये ट्रान्सवाल सत्याग्रहाची झळाळी अनुभवली होती. तो उत्साही युवक होता. गरज वाटेल तिथे तो समरसून पुढे यायचा. पित्याच्या खांद्याला खांदा लाऊन उभा ठाकायचा. नि:संकोचपणे वडिलांचा लढा पत्करायचा. कधी जोहान्सबर्गचे कार्यालय सांभाळायचा. कधी फिनिक्स आश्रमात राबायचा. कधी 'इंडियन ओपिनियन' च्या छपाईचे काम बघायचा. कधी पाहुण्यांना न्यायला-पोहोचवायला, स्वागताला जायचा. नाना छोटी-मोठी कामे करायचा. ही तर ठळक कामे होती. याशिवाय काही जबाबदाऱ्या त्याने स्वीकारल्या होत्या. त्या निष्ठापूर्वक जोपासल्या होत्या, पार पाडल्या होत्या. त्याच्या जन्मजात प्रतिभेचा परिचय सर्वांना झाला होता. त्याच्या व्यक्तिमत्वात कर्मठतेसोबतच हसमुखपणा होता. हरीलाल लोकप्रिय होता. स्वत:साठी त्याला कुठल्याही सुख-सुविधा नको होत्या. त्याचे नुकतेच लग्न झाले होते. तान्ही लेक पाळण्यात होती. तो सत्याग्रहात सहभागी होत होता. सत्याग्रहातल्या सातत्याला कुठे खळ नव्हता.

हरीलाल कधी निर्बंध असलेली सीमा ओलांडत राहिला. कधी बेकायदेशीर फेरी लावत राहिला. तो किमान दहा वेळा कैदेत गेला होता. दोनदा तीन महिन्यांची कैद झाली होती. त्याने एक-एक महिन्याची कैद तीनदा भोगली होती. सहा-सहा महिन्यांची कै द दोन वेळा झेलली होती. सात-आठ दिवसांसाठी कैद भोगण्याला तर काही गणतीच नाही. त्याला आरंभी सात दिवसांचा तुरुंगवास झाला होता. दोन वेळा देशातून हद्दपारीची शिक्षा त्याने भोगली होती. एकदा पिता-पुत्र एकाच वेळी तुरुंगात होते. एकदा हरीलालच्या सुटकेच्या वेळी गांधीजी गेटवर त्याच्या स्वागतासाठी उत्सुकतेने उभे होते. एकदा गांधीजींना दोन महिन्यांची शिक्षा झाली होती. याविरुध्द जोहान्सबर्ग येथे एक विराट सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेतील एक वक्ता हरीलालही होता.

हरीलालने कारावासात उपवासही केले होते. तो पाशविक सत्तेविरुध्द एकाकी झुंजला होता. संपूर्ण हिंदुस्तानी समाजाचे मन त्याने जिंकुन घेतले होते. तरुणाई तर त्याच्यावर मुग्ध होती. तो प्रखर कर्तव्यपरायण होता. कमालीचा सहनशील होता. सदैव प्रसन्न असण्याची अद्भुत क्षमता त्याच्याठायी होती. सत्याग्रही मंडळाला तर दुसरे गांधी लाभले होते. लोक त्याला 'छोटे गांधी' म्हणायचेत. या नावाने त्याची ख्याती चौफेर पसरली होती. उदासीन पिताही अखेर पुत्राच्या या यशख्यातीपुढे विरघळले होते. समर्पित पुत्राची साथ आणि मदत तर अनन्य होती. गांधी सत्यसाधक होते तर हरीलाल सत्याग्रही होता. सत्यसाधक गांधींना हरीलालची साथ होती. तो एक सक्षम, विश्वासू स्वयंसेवक होता. स्वतंत्र विचारसरणीचा भोक्ता होता. सरळमार्गी, शुध्द स्वभावाचा निष्कपटी युवक होता तो ! त्याच्या ठायी पाखंड नव्हते. तो छळकपट करणारा नव्हता. ईर्ष्याभाव तर त्याच्या जवळपास फटकूही शकत नव्हता. ठरवल्याप्रमाणे कार्य करायची धग त्याच्या ठायी होती. गांधीही प्रत्येकाची योग्यता-अयोग्यता पारखून बघणारे कुशल सेनानायक होते. ही कुशलता हरीलाल याच्याठायी संस्काराने पुष्ट झाली होती. तो चतुर होता. हरीलाल स्पष्ट-संशयरहित युवक होता. मोह व लालसेपासून लांब होता. कारावासातील क्रुर निर्दयता त्याने झेलली होती. आपली योग्यता सिध्द केली होती.

मे १९११ रोजी हरीलाल आईची भेट न घेताच वडिलांशी भांडून घर सोडून निघून गेला होता. वडिलांनी मुलाला आईची भेट घेऊ दिली नव्हती. १९१३ साली दक्षिण आफ्रिकेत चार-पाच हजार स्त्री-पुरुषांचा मोठा मोर्चा गांधींनी काढला. हरीलालने या चळवळीत सहभागी व्हायची वारंवार इच्छा केली होती. गोखलेंनी त्याला थांबवले होते. पुढे मग तिकडे जायचे काही प्रयोजनच उरले नव्हते. डॉक्टर प्राणजीवनदास मेहतांनी परत दुसऱ्यांदा प्रस्ताव पाठवला होता. ते हरीलालला रंगूनला घेऊन जाऊ इच्छित होते. तिथे मुलाला शिकता व काम करता येईल अशी भूमिका मेहतांची होती. गांधींनी हा प्रस्तावही नाकारला होता. या तीन-चार वर्षातली हरीलालला लिहिलेली गांधींची पत्रे अधिक तीक्ष्ण आणि व्यंग्यात्मक अशी आहेत.

असेच रुसुन दक्षिण आफ्रिकेतून हरीलाल निघून आला होता. आदल्या रात्री घनघोर विवाद झडला होता. जोहान्सबर्ग स्टेशनवर त्याला निरोप देताना गांधीजींनी आपल्या पुत्राचा गालगुच्चा घेतला होता. गालावर हलकेच थोपटले होते. 'तुझ्या बाबाने तुझे काही वाईट केले असे जर तुला वाटत असेल तर त्याला माफ कर.' असे म्हणताना पित्याचा आवाज थरारला होता. खूप अवघडून एकेक शब्द हळुवारपणे जपमाळेचा मणी ओढतात तसा तो आवाज होता.

हरीलालची पत्नी गुलाब आजारी होती. हरीलाल तिला बघायला राजकोटकडे निघाला होता. हे कळल्यावर गांधीजी त्याला भेटायला स्टेशनवर गेले होते. एकापेक्षा अधिक गाड्यांमध्ये त्याचा शोध घेतला होता. दोघात फार संभाषण काही झाले नव्हते. मुलाचा उदास चेहरा बघून पित्याला धक्का बसला होता. आजारी पित्याने मुलाला रोज एक पत्र पाठवले होते. आपल्या कठोर आणि निर्दयी स्वभावाची आपल्याला लाज वाटत असल्याचेही लिहिले होते. गांधीजी कुटुंबातल्या लोकाना सर्वात अखेरीस स्थान देतात या मुलांच्या मताशी कस्तुर सहमत होती. गांधी म्हणाले होते "कस्तुर, एक अशी वेळ होती माझ्या आयुष्यात जेव्हा मी स्वत:ही दास-प्रभु होतो पण तू मात्र स्वेच्छापूर्वक दासी बनायला कदापि मंजूर केले नाही. निकराने इन्कार केला आणि अशा प्रकारेमाझे डोळेउघडून दिले. यामुळे मी माझ्या जीवनाच्या महत्‌उद्देशाला समजू शकलो." गांधीजींच्या या प्रशंसोद्गारानंतरही कस्तुरला आपले खुजेपण अधोरेखित होत असल्यासारखे वाटत राहिले होते.

१९१५ साली भारतात गांधी परतले. हरीलाल स्वागतार्थ मुंबईला पोहोचला होता. कोचरब आश्रमाची स्थापना झाली. यादरम्यानही तो वेळोवेळी साथ देत होता. सोबत प्रवास करत होता. पिता-पुत्राच्या ठायी एक आकर्षण होते. मोह होता. पुत्र पित्याच्या नकारात्मक वळणामुळे क्षुब्ध होता. २२ एप्रिल १९१७ साली हरीलालच्या अखेरच्या लेकराच्या जन्मासाठी कस्तुर साबरमती आश्रमातून कलकत्ता येथे पोहोचली. आईच्या आगमनाने हरीलाल सुखावला. कृतार्थ झाला. हरीलालला व्यवसायात अपयश आले. मदत करणे तर लांब पण कुणी मदत करु नये असा पवित्रा गांधींनी घेतला.

वयाच्या तिसाव्या वर्षी हरीलाल विधुर झाला. आपल्या चार लेकराना साबरमती आश्रमात ठेवले. तिथे आजी-आजोबा सांभाळ करायला होते. मेव्हण्या रुढीग्रस्त होत्या. अस्पृश्यता न पाळणाऱ्या भंग्यांच्या आश्रमात लेकरांना ठेवले म्हणून त्यांनी हरीलालची भर्त्सना केली. कमालीचा विरोध केला. आपण आश्रमात नव्हे तर आपल्या आई-वडिलांकडे लेकरे ठेवायचा मुद्दा हरीलालने मांडला.

एकाकी हरीलाल आर्थिक दैन्याचा सामना करत होता. १९२० साली असहकार चळवळ सुरु होती. हरीलाल सहभागी झाला. ११ डिसेंबर १९२१ रोजी त्याला अटक झाली. याप्रीत्यर्थ आनंद व्यक्त करणारी तार पित्याने पुत्राला पाठवली. १० जून १९२२ रोजी हरीलालची सुटका झाली. या दरम्यान पित्याला सहा वर्षांची कैद ठोठावण्यात आली होती. ते साबरमती जेलमध्ये होते. पुढे कुठल्याही चळवळीत त्याने भाग घेतला नाही. माधवदास कस्तुरचे धाकटे भाऊ होते. या मामांसोबत हरीलालने व्यापार थाटला. आईने खूप रोखले. त्यांना आपल्या बंधूंच्या अवगुणांची ओळख होती. गांधींना हा व्यापार फिसकटल्यावर राग आला. पिता-पुत्र परत परस्पर क्षुब्ध झाले. दोष दोघांचा होता.

नियतीचाही असावा. असा ताण-तणाव उभा ठाकला. कधी पिता व्याधीग्रस्त होत. ही बातमी कळायची. हरीलाल धाव घ्यायचा. पिता उपवास करायचे. चिंताक्रांत पुत्र धावत भेटीला यायचा.

हरीलालने इस्लाम धर्म स्वीकारुन अब्दुल्ला हे नाव धारण केले होते. या घटनेने कस्तुर क्षतविक्षत झाली होती. रामदास भावाच्या भेटीसाठी गेला होता. देवदासने आईचे पत्र वृत्तपत्रात छापायला दिले होते. ती स्वत:ही मुंबईला पोहोचून मुलाला भेटली होती. त्याची समजूत घातली होती. गांधींच्या अंतिम समयी हरीलाल राजघाटावर नव्हता. १८ जून १९४८ रोजी त्याचा मृत्यु मुंबईच्या इस्पितळात झाला. एक क्लेशयुक्त आत्मा जगत्तापापासून मुक्त झाला.

हरीलालच्या धर्मांतरणानंतर गांधी काही कमी अस्वस्थ झाले नव्हते. हरीलालने इस्लाम धर्माचा स्वीकार केला होता. नागपुर येथे तो गांधींना भेटला होता. त्याला तर पैश्यांचा आणि विषयभोगांचा लोभ होता. या लोभाना संतुष्ट करण्यासाठी तो काहीही करायला तयार होता. त्याच्या इस्लाम धर्म स्वीकारण्याऐवजी त्याच्या या लोभी मनोवृत्तीचे गांधींना अपरंपार दु:ख झाले होते. त्यांनी रामदासला पत्रातून लिहिले होते की हरीलाल तर कुठल्याही धर्माचा नव्हता. आता इस्लामचे नाव घेतले आहे. यामुळे त्याला धामिर्क तर म्हणता येणार नाही[१]

विधुर झाल्यावर हरीलालला पुनर्विवाह करायचा होता. गांधींनी विधवेशी विवाह करायचा सल्ला दिला होता. हे का हरीलालला मान्य व्हावे? कस्तुरने याकामी लक्ष दिले नाही. तिने लक्ष घातले असते तर यशस्वी झाली असती. अजून तिची तिन्ही मुले अविवाहित होती म्हणून का ती अशी उदासीन होती?

संदर्भ

१) गांधीजींनी रामदासला दिनांक ३० मे १९३६ रोजी लिहिलेले पत्र.

❖❖❖

## ३१) पहिली महिला सत्याग्रही

गांधींचे युवावस्थेत आपली बायको व लेकरांशिवाय सर्वांशीच मधुर संबंध होते. दयावान आणि कृपायुक्त होते. एक काळ असा होता की पती-पत्नीमधील संबंध ताणतणावाचे होते. कधी-कधी ते टोकाचे होत असत. हळूहळू ते तणाव कमी झाले. पत्नीबरोबरचे त्यांचे संबंध सुधारले. कामवासनेचे रुपांतरण प्रेमात झाले. ते आदर्श सहयात्री बनले. ती आदर्श सेविका होती. ते आदर्श सांगाती होते. दोघांनी एकमेकाना प्रभावित केले. दोघेही एकमेकांपासून प्रभावितही झालेत. कधी तर स्वतः गांधींनीही कस्तुरला चहा करुन पाजला आहे. त्यांच्या दृष्टीने चहा पिणे दुर्गुण होता. याचा अर्थ असा की कस्तुर आपल्या पध्दतीने जगू शकत होत्या. गांधींचे मन विशाल होते. त्यांनी कस्तुरच्या अशा दुर्गुणांकडे डोळेझाक केली आहे. आपण गांधीजींच्या पत्नी आहोत असा तोरा ना कधी कस्तुरने मिरवला ना कधी त्याचा काही चुकीचा लाभ उठवला. व्यक्तिगत लाभ मिळवण्याचा तर प्रश्नच नव्हता. कस्तुरने कष्टाची अवघड कामे कधी टाळली नाहीत. आपल्या क्षमतेहून अधिक बळ लागत असणाऱ्या कामांचे ओझे आपल्या खांद्यांवर स्वेच्छेने वाहिले आहे. तरुण वा मध्यम वयाच्या अनेक सुंदर बायकांमध्ये तिच्या पतीचा वावर होता. तो वावर तिला कधी शंकास्पद वाटला नाही. याविषयी कुठल्याही प्रकारची असूया तिच्या ठायी नव्हती. हे तिच्या सुसंस्कृत अभिजात मनाचे लक्षण होते. तिने सदैव आपल्या व्यक्तिमत्वाचा बाज राखला. गांधींची पाठराखण सदैव सावलीसारखी केली आहे. भगवद्गीतेत स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत. ती तिच्याठायी समरसून सामावलेली दिसतात. तिच्याठायी निःस्पृहतेचे तेजोदीप्त वलय होते. तिच्या दीर्घकाळ सोबत असणाऱ्या लोकांनी वेळोवेळी हे व्यक्त केले आहे.

गांधींनी टॉल्स्टॉय फॉर्म बंद केला होता. कस्तुर, मुले आणि इतर सारे फिनिक्समध्ये स्थलांतरित झाले होते. १४ मार्च १९१३. केप कॉलनीच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश होते मिस्टर सर्ल. त्यांनी एक निर्णय घोषित केला होता. दक्षिण आफ्रिकेत ख्रिश्चन लोकांचे जे विवाह झाले असतील तेच कायदेशीर मानण्यात येतील. हिंदू, मुस्लिम व पारशी लोकांचे विवाह बेकायदेशीर आहेत. त्यांच्या स्त्रियांना कोणताही अधिकार देण्यात येणार नाही. त्यांना फार तर रखेली मानावे लागेल. त्यांच्या संततीला सनदशीर अधिकार मिळणार नाहीत. हा तर मोठा कुठाराघात होता.

१९१३ सालच्या मार्च महिन्याची १२ तारीख होती. फिनिक्स वसाहतीत एक सकाळ नेहमीसारखी उजाडत होती. घरात कामांची धावपळ सुरु होती. गांधी नुकतेच घरी परत आले होते. पादत्राणे काढलीत. तोंड, हात-पाय स्वच्छ धुतले. टॉवेलने खसखसा पुसले. स्वयंपाकघरात गेले. कस्तुरने पोळ्यांचे कणिक मळून ठेवले होते. तिची आता पोळ्या लाटायची लगबग सुरु होती. कस्तुरने लाटलेली अखेरची पोळी गांधींनी तव्यावर टाकली. पोळपाटाभोवती अगदी चिमुटभर पिठही कुठे सांडलेले दिसत नव्हते. गांधी पोळी शेकायला लागले. एरवी ते तिला भाज्या चिरुन द्यायचे. आपल्या हातातल्या स्वच्छ कपड्याने त्यांनी पोळीचे काठ शेकले. तव्यावरुन टम्म फुगलेली पोळी उतरवली.

‘अगं, ऐकतेस का?’ गांधींनी कस्तुरला विचारले.

‘काय? आज आणखी काय नवीन?’ कस्तुरने नवलाईने विचारले.

‘आजवर तू माझी विवाहिता बायको होतीस पण.. ...’ गांधी अजून काही तरी सांगणार होते.

‘पण काय हो? आजवर होतीस म्हणजे? आजपासून?’ गांधींना मध्येच अडवत कस्तुरने विचारले.

‘आजपासून तू माझी विवाहित बायको नाहीस.’ गांधी म्हणाले.

‘आणि कुण्या वेड्याने ठरवले हे?’ कस्तुरने आश्चर्याने विचारले.

‘मी नाही बुवा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. हा ! गांधींनी खुलासा केला.

‘हे मात्र थकवणारे आहे. बरे.’ कस्तुरचा आवाज थकून गेला होता.

‘ख्रिश्चन पध्दतीने न झालेले विवाह यापुढे नियमबाह्य ठरतील.’ गांधींनी स्पष्टीकरण दिले.

'म्हणजे काय?' कस्तुरची शंका प्रकट झाली. 'हिंदुस्तानी लग्नांना मान्यता मिळणार नाही. हिंदू असोत. मुस्लिम असोत. पारशी का असेनात. हिंदुस्तानी विवाह बेकायदेशीर ठरवले जातील. या दांपत्यांची संतती अनौरस मानली जाईल. यांना ना मालमत्तेचा हक्क असेल, ना वारसाचा अधिकार लाभेल.' गांधी म्हणाले.

'असे कसे म्हणता? चला तर मग, चलू या आपल्या देशात. इथे मला क्षणभरही थांबायचे नाही.' कस्तुरचा निश्चयी स्वभाव प्रकटला.

'हे हे रे, भित्री भागूबाई. असे केल्याने काही प्रश्न सुटणार नाही.' गांधींनी मर्म समजावून सांगितले.

'तुम्ही काही तरी करा ना? मला कासावीशी वाटते.' कस्तुरने नवऱ्यावरचा आपला विश्वास व्यक्त केला.

'मी या विरोधात पत्र दिले होते. डोमेनियन कायद्याचा आधार दिला होता.' गांधींनी सांगितले.

'असे करायलाच हवे.' कस्तुरने पुष्टी दिली. 'अगं, पण माझ्या पत्राला विचारतो कोण?' गांधींची अगतिकता त्यांच्या शब्दात होती.

"म्हणे आपले लग्न कायदेशीर नाही? काय पण खूळ एकेक. हे ठरवणारा कोण?' कस्तुरला काही कळेना.

'हे काही मी नव्याने शोधून काढलेले नाही. हे न्यायाधीश सर्लचे म्हणणे आहे.' गांधी म्हणाले.

'तो काय सांगेल त्याचे डोंबले? या रिकामटेकड्याला असले काही-बाही सुचते कसे हो?' कस्तुर चिडली.

'पण आता तुम्ही महिला याच्या विरोधात काय करणार आहात?' गांधींनी मुद्याला स्पर्श केला.

'आम्ही बापड्या काय करु शकतो?' कस्तुरने महिलांची असमर्थता व्यक्त केली. 'तुम्हीही आमच्यासारखे लढायचे. तुम्हाला तुमची अब्रु प्यारी असेल तर सरकारशी लढा.' गांधींनी सांगितले.

'असे कोड्यात बोलू नका हो. अखेर आम्ही करावे तरी काय?' नेमका बोध न झाल्यामुळे तिने विचारले.

'अगं सोपे आहे. आम्ही लढतो तशा तुम्हीही लढा. खरी विवाहिता ठरायचे असेल तर लढा. आत्मसन्मान राखायचा असेल तर भांडा. कायदा मोडा.' गांधींनी लढ्याची योजना मांडली.

'पण म्हणजे नेमके काय करायचे आम्ही? तुम्ही तर तुरुंगात जाता.' यातून काही न कळल्यामुळे ती विचारु लागली.

'कायदा मोडा. त्यासाठी तुम्हीही तुरुंगात जा.' गांधींनी मार्ग दाखवला. 'अस्सं होय? तुरुंगात का? बायका का कुठे तुरुंगात जातात?' कस्तुरने आपली अडचण मांडली.

'तर? महिला का तुरुंगात जाऊ शकणार नाहीत?' गांधींनी प्रतिप्रश्न केला.

'अहो पण .. .. .. ' कस्तुरच्या काही ध्यानात न आल्यामुळे तिने परत विचारले.

'पुरुष जी सुख-दु:खे भोगतात ती महिलाना भोगता नाही का येणार?' गांधी म्हणाले. 'कसे शक्य आहे. ते?' कस्तुरने असमंजसपणे विचारले.

'रामासोबत सीता वनात गेली. हरिश्चंद्रापाठोपाठ तारामती गेली. नळासोबत दमयंती गेली. कष्ट उपसले.' गांधींनी इतिहासाचे दाखले देत समजावून सांगत म्हटले. 'ही तर देवता मंडळी नाही का? आपण का त्यांचे अनुकरण करु शकतो बरे?' कस्तुर म्हणाली.

"आपण त्यांचे अनुकरण करु शकतो. त्यांच्यासारखे बनू शकतो. देव बनू शकतो.' गांधींनी सांगितले.

'अहो पण .. .. .. ' अजीजी तिच्या स्वरात मावत नसल्यामुळे ती म्हणाली.

'मी रामाचा वंशज. तू जानकीच्या कुळाची.' गांधींनी रामायण गाईले.

'म्हणजे?' कस्तुरने विचारले.

'अग मी राम बनू शकतो आणि तू सीता बनू शकतेस.' गांधींचा उच्चादर्श प्रकटला.

'अहो पण .. .. .. .. ' कस्तुरची शंका जागली.

'वनात न जाता सीता जर महालात बसून राहिली असती तर तिला का कुणी सीतामाता म्हटले असते?' गांधींनी रामकथेचे गौरवशाली पृष्ठ उलगडून दाखवले.

'नाही.' कस्तुरने ठामपणे सांगितले.

'नळासहित जर दमयंती वनात कष्ट सहन करायला गेली नसती तर तिलाही महात्म्य लाभले असते का?' गांधींचा साधा-सुधा वाटणारा प्रश्न होता.

'नाही.' कस्तुरचे उत्तर होते.

'मग आता तुझी कसोटी आहे. तुला सरकारशी झुंजावे लागेल. तुरुंगात जायची तयारी ठेवावी लागेल.' गांधींचे निवेदन निश्चयभरले होते.

'म्हणजे तुम्ही मला तुरुंगात पाठवू इच्छिताहात तर .. .. ? खराय ना? आता एवढेच उरले आहे.' कस्तुरने सांगितले.

'तू विचार कर.' गांधींचा आग्रह आता समंजस बनून गेला होता.

'पण मला का तुरुंगातले अन्न रुचेल?' कस्तुरने शंका विचारली.

'तू तुरुंगात जा असे माझे म्हणणे नाही. आपल्या अब्रुरक्षणार्थ तुरुंगात जायची तुझी इच्छा असेल तर जा.' गांधींनी स्पष्ट शब्दात सांगितले.

'पण आहाराचे काय?' कस्तुरची जिज्ञासा प्रकटली.

'तुरुंगात आहार नाही मानवला तर फलाहार कर.' गांधींजवळ प्रत्येक प्रश्नाचे जणू काही उत्तर होते.

'तुरुंगात सरकार का मला फलाहार पुरवील?' कस्तुरने विचारले. 'फलाहार न मिळेपर्यंत उपवास कर.' गांधींनी मार्ग सुचवला.

'हा तुम्ही मला मरणाचा मार्ग दाखवत आहात.' कस्तुरने सांगितले.

'विचार कर.' गांधींनी कस्तुरला निर्णय घ्यायची संधी देत म्हटले.

'विचार काय करु? तुरुंगात गेले तर माझे मरण अटळ.' कस्तुरने परिणामांची चर्चा करत म्हटले.

'मलाही असे वाटते. तू तुरुंगात मेलीस तर मी तुझी जगदंबा मानून पूजा करीन.' गांधींनी शांतपणे सांगितले.

'ठरले तर मग. मी तुरुंगात जायला सिध्द आहे.' कस्तुरचा दृढ निश्चय प्रकटला.

यापुढे ती काही बोलली नाही. तिच्या मनाचा काही एक निश्चय झाला होता. तिची गंभीर चर्या फुलून आली होती. अलिकडे तिची तब्येत अनुकूल नसायची. मोठी शस्त्रक्रिया होऊन ती जीवघेण्या दुखण्यातून बचावली होती. अशा अवस्थेत तिचे हाल होतील हे गांधींना कळत होते. तुरुंगात गेल्याचा तिला पश्चात्ताप झाला तर ते त्यांना आवडले नसते. हे सारे त्यांनी जेव्हा तिला सांगितले. तेव्हा कस्तुर ठामपणे म्हणाली.

"आपला छोटा रामा. तो तुरुंगातल्या यातना सहन करु शकतो मग मी का मागे रहावे? तुम्ही बघाल, मी तिथे मरेन पण कुठल्याही परिस्थितीत माफी मागणार नाही. त्यातही जर मी माफी मागून परत आले तर तुम्ही मला घरात घेऊ नका मग तर झाले. संघर्ष करायचा माझा निग्रह पक्का आहे." कस्तुरने निग्रहाने आपले म्हणणे मांडले.

ही घटना 'इंडियन ओपिनियन' मधून प्रकाशित झाली आहे. "श्रीमती गांधींनी जेव्हा विवाहविषयक अडचण जाणून घेतली तेव्हा त्यांना खूप क्रोध आला. त्या गांधींना म्हणाल्या ' यामुळे तर या देशातील कायद्यान्वये मी आपली पत्नी नाही.' श्री. गांधींनी उत्तर दिले 'होय, असाच याचा अर्थ होतो. आपली लेकरेही आपली उत्तराधिकारी नाहीत.' श्रीमती गांधी म्हणाल्या 'चला तर मग, आपण मायदेशी परतू या.' श्री. गांधी उत्तरले हा तर भित्रेपणा ठरेल. यामुळे प्रश्न काही सुटायचा नाही.' श्रीमती गांधींनी विचारले 'तर मग मी स्वत:ही संघर्षात सहभागी होऊन स्वत: काही अटक करुन नाही का घेऊ शकणार?' श्री. गांधींनी त्यांना समजावले की त्या संघर्षात सहभागी होऊ शकतात पण हा काही लहान-सान विषय नाही. त्यांची तब्येत चांगली नसते त्यांना अशाप्रकारच्या त्रासाचा अनुभव नाही आणि संघर्षात सामील झाल्यावर त्यांनी जर कच खाल्ली तर ते खूप शरमेचे ठरेल. सौ. गांधी आपल्या निश्चयावर अटळ-अभंग राहिल्यात. इतरही महिला होत्या. त्यांच्याशी असलेले त्यांचे घट्ट नाते आणि आश्रमातील साथी-संगतीमुळे त्याही मागे रहायला मुळी तयारच नव्हत्या. त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले की आमचा विचारही सौ. गांधींच्या विचारासारखाच दृढ आहे. आणि समजा आमचा विचार दृढ नसला तरी सौ. गांधी कैदेत जातील आणि आम्ही बाहेर राहू हे कसे काय शक्य आहे.? या

प्रस्तावाने सर्वांना काळजी वाटू लागली. हा निश्चय खूप महत्वाचा आहे."[१]

या संदर्भात स्वत: गांधींनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे.

"माझ्या पत्नीला या संदर्भात काही न सांगण्याचा मी निश्चय केला होता कारण की ती 'नाही' असे तर म्हणाली नसती आणि जर 'होय' असे म्हणाली असती तर ते किती आंतरिक स्वरुपाचे होते ते सांगणे अवघड होते. अशा जोखिमभरल्या उपक्रमात पत्नी जर स्वतःहून सहभागी होत असेल तर नवऱ्याला त्याचा स्वीकार करायला हवा आणि तिने जर सहभागाच्या दिशेने पावले उचलली नाहीत तर त्याने मुळीच दु:खी होता कामा नये. मी या विषयाला जाणत असल्यामुळे मी तिच्याशी याविषयी काहीही न बोलण्याचा निश्चय केला होता. मी इतर भगिनींशी बोलणी केलीत. ट्रान्सवालच्या भगिनींप्रमाणे त्या तत्काळ तयार झाल्यात. वाटेल तेवढा त्रास सहन करावा लागला तरी आपण तो सहन करु असा विश्वास त्यांनी मला दिला. या सर्व चर्चेचा सारांश माझ्या पत्नीलाही कळला. यामुळे ती मला म्हणाली 'आपण याविषयी माझ्याशी बोलणी केली नाहीत. याचा मला खूप विषाद वाटत आहे. माझ्यात अशी काय त्रुटी आहे. की मी तुरुंगात जाऊ शकणार नाही? आपण या भगिनींना जो मार्ग अवलंबिण्याचा सल्ला दिला आहे. त्या मार्गाचे मलाही अवलंबन करायचे आहे.' मी म्हणालो 'तुला दु:खी करायचा तर माझा विचार असूच शकत नाही. यात तुझ्यावर अविश्वास व्यक्त करायचेही काही कारण नाही. तुझ्या तुरुंगात जाण्याने तर मी प्रसन्नच होणार आहे. माझ्या सांगण्यावरुन तू तुरुंगात गेलीस ही कल्पनाही मला सहन होणार नाही. हे कार्य सर्वांना आपल्या आंतरिक बळानेच करायचे आहे., करायला हवे. माझ्या सांगण्यावरुन आणि माझ्या स्वभावामुळे तू अटक करवुन घ्यावीस. कोर्टात उभी करताच थरथर कापायला लागावीस. तू धैर्य गमावून बसावेस. तुरुंगातील त्रासांमुळे तू गांजून जावीस. असे झाले तर यासाठी मी तुला तर दोषी मानू शकणार नाही. माझी काय स्थिती होईल? अशावेळी मी तुझा कसा काय अंगिकार करु शकेन? जगापुढे कुठल्या तोंडाने उभा राहू शकेन? या भीतीपोटीच मी तुला तुरुंगात जायला नकार दिला आहे.' याचे उत्तर मला असे मिळाले 'मी हिंमत गमावून तुरुंगातून सुटले तर नका करु माझा अंगिकार. माझी लेकरे हा त्रास सहन करु शकतात. मी काय एकटीच हे सहन करु शकणार नाही? आपण असा विचार तरी कसा काय करु शकता? मला तर या युध्दात अवश्यमेव सहभागी व्हायचे आहे.' मी उत्तर दिले 'असे असेल तर मग मीही तुला या युध्दात अवश्य सहभागी करुन घेईन. माझ्या अटी तर तू जाणतेसच. माझा स्वभावही तुला ठाऊक आहे. अजून तुला पुनर्विचार करायचा असेल तर करु शकतेस. पूर्ण विचारांती या युध्दात सहभागी व्हायची इच्छा नसेल तर यासाठीही तू स्वतंत्र आहे.स. आपला निर्णय बदलण्यात काही लाज वाटायला नको, हेही समजून घे.' मला याचे उत्तर मिळाले 'विचार तर काहीही करायचा नाही. हा माझा निश्चयच आहे.' या तुकडीमध्ये सोळा सत्याग्रही सहभागी होते. कस्तुरच्या सोबत तीन भगिनी आणि बारा पुरुष.[२]

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचे रणशिंग फुंकणाऱ्यांमध्ये अशाप्रकारे कस्तुरचे नाव अग्रक्रमाने झळकले आहे. कुठल्याही प्रकारची सूट वा सवलत न मागता ती न थकता चालत राहिली आहे. पतीच्या एखाद्या उपक्रमाचे कौतुक करणे वेगळे असते. त्यात समरसून सहभाग घेणे मात्र वेगळे असते. कस्तुर या वेगळ्या वाटेवर अखंडपणे चालत रहाताना दिसते. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाच्या इतिहासातील हा गौरवभरला इतिहास आहे. त्या इतिहासाचा नारी सामर्थ्याचा हा तेजस्वी अध्याय आहे.

संदर्भ


१) 'इंडियन ओपिनियन' मधून 'न्यूज ऑफ द स्ट्रगल' (संघर्षाची बातमी -- कस्तुर गांधींशी बातचीत) या शीर्षकाने उध्दृत वृत्त १ ऑक्टोबर १९१३;

२) 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास' (गुजराती) श्री मो. क. गांधी पृष्ठ २८३ -२८४.


❖❖❖

## ३२) कस्तुर तुरुंगात

आज फिनिक्समध्ये सकाळपासून धामधूम सुरु आहे. जणू एखादा लग्न समारंभ असावा. दुपारी बाराच्या सुमारास सारे आश्रमवासी गोळा झाले. आपापले कपडे, अंथरुण-पांघरुण, चादर, पाणी पिण्यासाठी प्याला असे सामान गोळा करण्यात आले आहे. जणू फौजी शिपायांची पलटण निघाली आहे. खांद्यांवर अडकवून ठेवता येतील अशा गठड्या वळल्या गेल्या आहेत. कस्तुरने सत्याग्रहींना कुंकुम तिलक रेखिला आहे. प्रार्थनेला आरंभ झाला आहे. सर्वांनी एका सुरात 'वैष्णव जन तो तेने कहिए' हे भजन म्हटले आहे. दुसरे गुजराती भजन 'सुख-दुःख मनमां न आणीए' (सुख-दुःखाला मनात थारा देऊ नका) हे गाईले गेले आहे. सर्वांनी गांधींना चरणस्पर्शपूर्वक प्रणाम करुन आशीर्वाद घेतले आहेत. प्रफुल्लित चित्ताने गांधींनी कुणाच्या पाठीवर बुक्का लगावला. कुणाची पाठ थोपटली. कुणाचा कान पिरगाळला. सर्वांना प्रेमरसात न्हाऊ घातले आहे. हे धर्मयुध्द रणवीराना स्वर्गद्वारासारखे वाटत होते. सर्वांनी आश्रमाला अभिवादन केले. या निग्रही चमूला निरोप द्यायला गांधी निघाले आहेत. त्यांच्या कडेवर एक बालक आहे. सोबत आश्रमवासी जन आहेत.

पूर्वी दक्षिण आफ्रिकेत नाताळ, ट्रान्सवाल, कॅप कॉलनी आणि ऑरेंज स्टेट अशी चार स्वतंत्र राज्ये होती. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाण्यासाठी सरकारची परवानगी काढावी लागे. कस्तुरने परवानगी न घेता सीमा पार केली. कायदेभंग केला. ती या चळवळीचे नेतृत्व करत होती. दुसऱ्या दिवशी सारे वॉलक्रॉस्टला पोहोचले.

'कुठून येताहात? 'स्थलांतरण अधिकाऱ्याने विचारले. 'डर्बनहून.' उत्तर मिळाले.

'कुठला व्यवसाय करता?' अधिकाऱ्याचा प्रश्न होता.

'सध्या तर सत्याग्रही आहोत.' सामुदायिक उत्तर होते. 'पण कोण तुम्ही? तुमचा नेता कुठे आहे.?' अधिकाऱ्याचा तिखट प्रश्न होता.

'आम्ही नाव आणि पत्ता सांगणार नाहीहोत. तुम्हाला कुठलीही माहिती न देण्याचे आमचे धोरण आहे.' सत्याग्रहींची भूमिका ठाम होती.

'मग तसे लिहून द्या.' अधिकारी आपल्या शैलीत बोलत होता.

"आम्ही सारे सोळा जण ट्रान्सवालमध्ये विना परवाना दाखल होत आहोत. आम्ही सत्याग्रह आरंभिला आहे. तुम्ही जर २३ तारखेपर्यंत आम्हाला अटक करुन घेतली नाही तर आम्ही वाटेल ते करुन ट्रान्सवालमध्ये प्रवेश करु." सत्याग्रहींचा ठाम निश्चय व्यक्त झाला.

या महिलांना तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. पीटरमोरित्सबर्ग तुरुंगात डांबण्यात आले. कस्तुरला अटक झाल्याची बातमी हा हा म्हणता पसरली. जोहान्सबर्गच्या सत्याग्रहींमध्ये चैतन्य जागले. विशेषतः मद्रासी भगिनींच्या टोळ्या निघाल्या. भगिनी तुरुंगात जाण्यासाठी हर तऱ्हेचे प्रयत्न करु लागल्यात.

कार्यक्रमाची रुपरेषा ठरली होती. सत्याग्रहाला सुरुवात करण्यापूर्वी स्त्रियांच्या एका पथकाने प्रथम ट्रान्सवालमधून नाताळमध्ये प्रवेश करावा. तुरुंगवास ओढवून घ्यावा. सरहद्दीवरील पोलिसांनी जर त्यांना अटक केली नाही तर मग त्यांनी थेट नाताळ गाठावे. तेथील न्यू कॅसेलच्या कोळसा खाणीत काम करणाऱ्या वेठबिगारी कामगारांची भेट घ्यावी. त्यांना संपावर येण्याचे आवाहन करावे. त्याचवेळी नाताळ येथिल निवडक भगिनींनी परवाना न घेताच ट्रान्सवालमध्ये प्रवेश करावा. तुरुंगवास पत्करावा.

नाताळमधून ट्रान्सवालमध्ये प्रविष्ट होणाऱ्या भगिनींना अटक करण्यात आली. यामुळे एकच भडका उडला. स्त्रिया अधिक संख्येने सत्याग्रहात सहभागी झाल्यात. ट्रान्सवालमध्ये प्रविष्ट झालेल्या भगिनींना मात्र अटक झाली नाही. त्या थेट न्यू कॅसेलला जाऊन थडकल्यात. खाण मजुरांना आपली औजारे खाली ठेवण्याच्या सूचना केल्यात मग मात्र शासनाने त्यांना अटक केली. तीन महिन्यांचा तुरुंगवास ठोठावला. यामुळे खाण कामगारांचा संप अधिक तीव्र झाला. कस्तुर तुरुंगात जाणारी पहिली महिला ठरली होती.

कस्तुर अटकेत होती. इथले तुरुंग म्हणजे साक्षात् नरक होते. कमालीचे गलिच्छ. चहुकडे घाण-घाण. मच्छरांची भुणभुण. घोंगावणाऱ्या माशांचा सुळसुळाट. जेवणासाठीची भांडी मोडतोड झालेली. त्यावर खरकट्याची पुटे चढलेली. कळकट आणि किळसवाणी

ताट-वाटी. कल्हई उडून गेलेले पितळी ग्लास. अंथरुण-पांघरुणाला मल-मूत्राचा दुर्गंध. कैद्यांसाठीचे फाटके-तुटके आणि तोकडे कपडे. महिला कैद्यांची तर खूप दैना. अपुरे-आखूड फ्रॉक्स! उबग आणणारे जेवण. सक्तमजुरीचे काम. कैदेत श्रम होतेच होते. महिला वॉर्डाची स्वच्छता करावी लागे. फरशा धुवा-पुसायला लागायच्या. भिंतीवरली जाळी-जळमटे काढावी लागायचीत. सत्याग्रहींनी कांबळे धुतलीत. कांबळांना ठिगळे लावलीत. स्वच्छ करुन वापरण्यायोग्य केलीत. भांडी तर सारी एल्युमिनियमची होती. ती घासून-घासून चांदीसारखी चकचकीत केलीत. मॉरित्सबर्गच्या कैदेत एक निग्रो भगिनी वॉर्डन होत्या. त्या कस्तुर आणि त्यांच्या सख्यांच्या सेवेने प्रसन्न असायच्या. सकाळ ते सायंकाळपर्यंत दगड फोडण्याचे काम होते. तलाव खोदायला लागले होते. रस्ते तयार करवून घेतले गेले होते. जात्यावर दळायला लावले होते. हाताला घट्टे पडले होते. जखमा झाल्या होत्या. भळभळा रक्त वहात होते. या कारावासात कस्तुरची तब्येत पार ढासळली. कारावासातून सुटका झाल्यावर गांधीजी आणि रामदासने कस्तुरची अपूर्व सेवा केली.

कस्तुरसोबत आणखी तीन भगिनी होत्या. जेलरला गुजराती भाषा येत नव्हती. या भगिनींना इंग्रजी कळत नव्हते. जेलरने छगनलाल यांना दुभाषी म्हणून बोलावले. जेलरने कारकूनाला बोलावले. जबाब लिहून आणायला सांगितले. छगनलाल सोबत कारकून निघाला. त्यांच्यात असा संवाद झाला.

'या कृष्णभवनातली पहिली रात्र कशी सरली? ' छगनलालने विचारले.

'कसलं काय अन् कसलं काय. अंधार होताच आम्ही भजनं गायला बसलो. झोप कधी आली ते कळले नाही.' कस्तुरने सांगितले.

'यांचे नाव कस्तुर.' छगनलाल कारकूनाकडे वळत म्हणाला

'यांचा विवाह झाला का?' कारकूनाने विचारले.

'रात्री काही खाल्ले का?' छगनलालने विचारले.

'आम्हाला फलाहार हवा. या भगिनींनी तर ते अन्न पाहिले. हात जोडले. तसेच पडू दिले. कोण खाईल असल्या घाणेरड्या भांड्यातले अन्न? अशी भाजी कशी बरे खाता येईल?' कस्तुर म्हणाली.

'होय. यांचा विवाह झाला आहे. यांच्या नवऱ्याचे नाव मोहनदास.' छगनलाल कारकूनाकडे वळत म्हणाले

मग कारकूनाने वय, जात, वतन याबाबत जाणून घेतले. छगनलालने या प्रश्नांच्या निमित्ताने सगळी माहिती मिळवली. माहिती बाहेर पोहोचवली. कस्तुरच्या फलाहाराबाबत विचारणा केली. हनुमान म्हणजे केलेनबॅक निघाले आहेत. ते जेलरला भेटतील. फळांची सोय होऊ शकेल. असा संकेत तिला मिळाला.

तीन-चार दिवस लोटलेत. बातमी येऊन पोहोचली की कस्तुरला फळे मिळाली नाहीत.'फलाहारच करीन.' अशी तिची प्रतिज्ञा होती. 'फलाहार मिळणार नसेल तर मी उपाशी मरुन जाईन.' कस्तुर म्हणाली.

'असली सोंगं-ढोंगं करायची होती तर जेलमध्ये आलातच कशाला?' निष्काळजीपणे जेलरने सांगितले.

कस्तुरपुढे दुसरा कुठलाही पर्याय उरला नव्हता. तिने मग उपवासाला सुरुवात केली. एक दिवस गेला. दुसरा दिवस गेला. तिसरा लोटला मग त्यांच्यावर हुकूमत गाजवणारी अधिसेविका वरमली.

'आम्हाला तर सकाळचा चहा मिळाला नाही तरी डोके भणभणायला लागते. तुम्ही एवढ्या काटकुळ्या. कसे काय सहन करता? इथे का कुणाला आवडीचे खाणे मिळते बरे? मिळेल ते खावे लागते. मेहरबानी करा. आहे. त्या अन्नाला गोड मानून घ्या बाई.' अधिसेविकेने सांगितले. पाच दिवस लोटलेत. सरकार नमले. कस्तुरला फळे मिळालीत. फळे खूप कमी मिळायचीत. तिला तीन महिने तुरुंगात अर्धपोटी रहावे लागले होते. तीन केळी, चार जरदाळू, दोन टमाटे, दोन लिंबू. बस्स. ना शेंगदाणे ना काही स्निग्ध पदार्थ !

या सत्याग्रहाच्या वेळी कस्तुरचे शौर्य आणि धैर्य लक्षणीय आहे. फिनिक्स आश्रमातील वसाहत आणि टॉल्स्टॉय फॉर्म येथिल सामुदायिक परिश्रमशील जीवन या धैर्याच्या मूळाशी आहे. सत्याग्रहाच्या साफल्याचे मूळ कारण साहस आहे. कस्तुरने या लढ्याला एक नवी शक्ती आणि अभिनव प्रेरणा अर्पिली. तीन भगिनी या यज्ञकार्यात तिच्यासमवेत होत्या. यांच्या ऊर्जस्वल

प्रेरणेच्या बळावरच जोहान्सबर्गहून तमीळ भगिनी घरातून बाहेर पडल्या. त्या मूळ तुकडीपेक्षा सवाई सिध्द झाल्यात. मुख्यत्वेकरुन यांच्याच प्रेरणेमुळे खाण कामगार भगिनी जागृत झाल्यात. शेतांवर राबणाऱ्या श्रमिक भगिनी आपापल्या लेकरांसमवेत बाहेर पडल्या. या अखेरच्या सत्याग्रहात हजारोंचा भरणा त्यांच्यामुळे दिसतो. कस्तुर आजारी होत्या. तुरुंगवास भोगत होत्या. जामीन मागितला नाही. सुटका करुन घेतली नाही. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत चळवळ चालवली. कस्तुरने लहानग्या रामदासला सांभाळले. अनैतिक कायद्यांच्या विरोधात झुंज घेतली. वॉलक्रस्टच्या तुरुंगात गेली, पुढे मोरित्सबर्गच्या तुरुंगात गेली.

तीन महिन्यानंतर कस्तुरची तुरुंगातून सुटका झाली होती. सत्याग्रही भगिनींच्या स्वागतासाठी सारे तुरुंगाच्या द्वाराशी उभे होते. यामंडळीत कस्तुरचा धाकटा मुलगा देवदासही उभा होता. हाडांचा सापळा तुरुंगाच्या बाहेर पडला होता. तिला बघणारे जमलेत. सर्वांना रडू कोसळले. सत्याग्रही सारे बाहेर पडले. देवदासला आपली आई काही दिसली नाही. तो विचारु लागला. तेव्हा एका लुकड्या महिलेकडे बोट दाखवत कुणीतरी म्हणाले 'ती बघ, ती तुझी आई.' तुरुंगातल्या उपवासामुळे कस्तुर खंगून गेली होती. तिची तब्येत इतकी खालावली होती की तिचा स्वत:चा मुलगासुध्दा तिला ओळखू शकला नव्हता.

कस्तुरची आपल्या साथीदारांसह मॉरित्सबर्ग तुरुंगातून सुटका झाली. सत्याग्रहींची एक भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक संपवल्यावर एक जाहीर स्वागत समारंभ झाला. या समारंभात २२ डिसेंबर १९१३ रोजी गांधींनी पुढील भाषण दिले - "ही वेळ आपल्यासाठी खूप शोक करायची आहे. अशावेळी आपण समारंभ आणि उत्सवात सहभाग घेऊ शकत नाही. तरीही माझी पत्नी आणि अन्य महिलांचे जे स्वागत केले गेले त्यासाठी त्यांच्या वतीने मी आभार व्यक्त करत आहे. माझे बंधू गोळीबाराचा सामना करत असताना या स्वागत समारोहात सहभागी होत असतानाही माझ्या मनात खूप संताप होत आहे. मी तुरुंगात होतो त्यावेळी या सर्व भानगडींपासून मुक्त होतो. (या वेळी एक बालक रडू लागले. त्याचे रुदन ऐकून) गांधी म्हणाले की हे रुदन आपल्या शोकाच्या तीव्रतेचे सूचक आहे. यावेळी भारतीय बंधू आणि भगिनी वेगवेगळ्या प्रकारे शोक प्रकट करुन असहाय विधवा आणि त्यांच्या लेकरांविषयी खरी सहानुभूती व्यक्त करु शकतात. पुरुष तंबाखू, पान सुपारी यासारख्या अन्य व्यसनांचा त्याग करु शकतात आणि भगिनी दाग-दागिने आणि महागड्या वस्त्रांचा त्याग करु शकतात[१]

सत्याग्रहींची जेव्हा सुटका झाली तेव्हा डर्बन स्टेशनवर पाचशे लोक सत्कारासाठी जमले होते. मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये झालेल्या जाहीर सभेत सर फिरोजशहा मेहता म्हणाले. "वीरांगनांच्या अनेक कथांनी आपल्या इतिहासाची पाने शोभिवंत आहेत. मला अशी खात्री आहे. की आज जगभरच्या वीरांगनांच्या अग्रणी शोभेल अशी कस्तुर दक्षिण आफ्रिकेतल्या तुरुंगात आहे."

कस्तुरच्या धरपकडीची बातमी आगीसारखी सर्वत्र पोहोचली. वारुळावर विस्तव पडताच मुंग्या पांगाव्यात तशी माणसे घराबाहेर पडली. बायका आणि माणसे. पोरेसोरे, लेकरेबाळे, तरणेताठे, म्हातारेकोतारे, आजारीपाजारी. सारे निघाले. जोहान्सबर्गच्या अनेक भारतीय महिलांनीही या युध्दात सहभागी व्हायचे ठरवले. त्या ट्रान्सवालहून निघाल्या. नाताळमध्ये प्रविष्ट झाल्यात. कायदेभंग केला पण नाताळ सरकारने त्यांना अटक केली नव्हती. या भगिनींनी नाताळच्या खाणीत जाऊन तिथे राबणाऱ्या मजूरांपर्यंत सत्याग्रहाची बातमी पोहोचवली होती. बातमी ऐकून ऊसाच्या शेतातले मजूर चवताळले होते. चहा-कॉफीच्या मळ्यांमधल्या मजूरांच्या टोळ्या फुत्कार टाकू लागल्या होत्या. मजूरांनी चळवळीला पाठिंबा देण्यासाठी बंद पुकारला. तिथले मालक चवताळले. त्यांनी त्यांची वीज-पाण्याची रसद खंडित केली. त्यांचे सामान-सुमान घराबाहेर फेकून दिले. कामगार-मजूर आपापले सामान माथ्यावर वा खांद्यावर घेऊन न्यू कॅसेलकडे निघून गेले. तिथे गांधी सत्याग्रहाची तयारी करत होते. एकदम मोहोळ उठले.

संदर्भ

१) 'इंडियन ओपिनियन' दिनांक २४ डिसेंबर १९१३.

❖❖❖

## ३३) निरवा निरव

मार्च १९१४ साली कस्तुर खूप आजारी होती. याचे पडसाद गांधींनी मित्राना लिहिलेल्या पत्रातून वाचता येतात. एका पत्रात ते लिहितात की मागील आठवड्यात कस्तुर मरणाच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन पोहोचली होती. यामुळे मागील दहा दिवस ते अखंडपणे तिची सेवा-सुश्रूषा करत राहिले होते. तिच्या आजारामुळे आपले सारे कार्यक्रम थांबवून घरीच थांबलेले होते[१]

या पत्रातून गांधींच्या मनातील उलघाल स्पष्टपणे दिसते. पत्नीच्या तब्येतीची काळजी, उपचार, सुश्रूषा, आपली कर्तव्यबुध्दी, कार्यव्यस्तता, आत्मीयता, अंतरंगस्नेह अशा सप्तरंगी इंद्रधनुष्याचे रंग दिसतात.

श्री गोपाळ कृष्ण गोखले यांना पत्रातून ते कळवतात की श्रीमती गांधींच्या हयात रहाण्याविषयी त्यांना शंका आहे. ते सततच तिचे डॉक्टर, नर्स आणि साऱ्याच सेवेच्या भूमिका बजावत आहेत.[२]

गांधींनी श्री गोपाळ कृष्ण गोखले यांना लिहिले की महिलांसकट अधिकांश फिनिक्स-निवासी संघर्षात सहभागी होतील. आता तुरुंगात जायलाच हवे असा अनुभव महिलांना होत आहे. मग आफ्रिकासारख्या ठिकाणी याचा परिणाम काहीही असो. सौ. गांधींनी स्वत: असा प्रस्ताव मांडला आहे. मी त्यांना थांबवू इच्छित नाही. सौ. गांधींच्या या इराद्याची गोष्ट अजून जाहीर केलेली नाही. आपणही कृपया याविषयीची चर्चा कुठे करु नये.[३]

या पत्रात नाना गोष्टी आल्या आहेत. कस्तुरच्या अत्यवस्थ असण्याचा हा काळ आहे. चळवळीच्या नेतृत्वाच्या प्रश्नांचा पिंगा गांधींच्या मनाभोवती सुरुच आहे. भविष्यकालीन योजनांची आखणी आहे. आपण पत्नीची सर्वांगाने सेवा करत असल्याची सहज मनोज्ञ सुचना आहे.

ब्लूमफॉन्टीन तुरुंगातून फिनिक्सच्या शाळेतील अध्यापिकांना पत्र लिहिले की सौ. गांधींचा जुना आजार बळावला नसेल आणि त्यांची तब्येत बरी असेल अशी आशा करतो.[४]

गांधींनी तिच्यावर उपचार केलेत. पुनश्च उपवास आणि कडुनिंबाचा रस कस्तुरने सेवन केला. हे उपचार चौदा दिवस चालले. सकाळी गांधी कस्तुरचे दात घासून देत. स्वत: कॉफी करुन पाजत. एनिमा देत. पॉट स्वत: स्वच्छ करत. दिवसभर तिला बाहेर झोपवत असत. तिला बालकासारखे अलगद उचलून ठेवावे लागे. ते मग निंबाच्या झाडाच्या दाट सावलीत तिची खाट टाकून देत. बदलत्या ऊन्हाप्रमाणे ती खाट बदलावी लागे. सायंकाळ झाली की तिला उचलून घरात घ्यावे लागायचे. ती बाजेवर पहुडलेली असे. तिला निंबाच्या देहकांतीवर आगळा झळाळ अनुभवता आला. निंबाची फुले होती. पांढऱ्या फुलांचा गुच्छ. या फुलांच्या हृदयस्थ एक पिवळा थेंबुटा सजला होता. श्रीहरीसारखा. या फुलांना गंध आहे. ही झरतात भुईवर. पृथ्वीच्या शिवपिंडीवर टपटपणारी ही साजरी फुले. निंब फुलतो ही कल्पना केवढी रसप्रद. निंबाला मोहोर येतो या भावनेनेही तिचे अंतर्मन उजळून निघायचे. रसभान हरपून लदबदून गळून पडणाऱ्या पिवळ्याजर्द निंबोळ्यांची शोभा अवर्णनीय असायची. शक्यतांची कुठलीही चाहुल नसताना निंब फुलतो. कारावासाच्या उंचच उंच भिंती स्वातंत्र्याच्या सूयोर्दयाला थोपवू शकत नाहीत. नग्न खड्गांचे जागते पहारे असले तरी कृष्णजन्म अटळ असतो. संपवून टाकू म्हणत असतानासुध्दा अमर आणि सनातन, अजिंक्य आणि अवध्यतत्त्व तर फुलतच असते. निर्मितीचे गुज विध्वंसाच्या ओठांवरले अलगूज ठरते. कस्तुरला निसर्ग देवतेने हा अभिनव पाठ शिकवला होता. गांधी तिची सेवा करायचे. त्यांना तिचे केस मात्र विंचरता येत नसायचे. तिच्या देहावर सूज चढली होती. ते रोज मालिश करुन द्यायचे. या सेवेमुळे ती लवकर बरी झाली.

१९१४ साल होते. सत्याग्रह यशस्वी झाला होता. जनरल स्मट्सने मान्यता दिली होती. प्रिटोरिया येथे त्यांच्याशी प्राथमिक समेटाची बोलणी सुरु होती. मार्ग निघत होता. लिखित कराराचा मसूदा तयार झाला होता. सह्या करायच्या शिल्लक होत्या. यादरम्यान फिनिक्सहून तार आली. 'कस्तुर गंभीर आजारी आहे.

लवकर निघावे.' हे कळल्यावर 'लागलीच निघायला हवे' असा एण्ड्र्युजचा आग्रह होता. गांधींनी त्यांचे काही ऐकले नाही.

'या तडजोडविषयक पत्राचे काय? मी अशाप्रकारे सर्वांचे अधिकार सोडून कस्तुरच्या भेटीसाठी जाणार नाही.' गांधी परखडपणे बोलले.

'पत्र तर डाकेने पाठवता येईल. उत्तर मिळवता येईल.' एण्ड्र्युजने समजावून सांगितले.

'माझ्या जाण्याने ती वाचेल व न जाण्याने वाचणार नाही असे काही आहे. का? इथली जबाबदारी पूर्ण केल्याशिवाय मला नाही निघता यायचे.' गांधींच्या बोलण्यात निग्रह होता.

'तरीपण विचार व्हावा असे वाटते.' एण्ड्र्युजचा स्वर समंजस होता.

"आता हिंदजनांसाठी तडजोड होत आहे. केवळ चोवीस तासाभराचे काम उरले आहे. पत्रांचे आदान-प्रदान होऊन जाईल अशी खात्री आहे. अशा वेळी इथून कसे काय हलता येईल? मग तडजोडीचे हे प्रकरण लांबेल ना? हिंदजनांना विलंबाची जोखिम झेलायला लावायचा मला हो काय अधिकार?" गांधींनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली.

'होय, खरे आहे. ते, पण तारेचा मजकूर असे सांगतो आहे. की सौ. गांधी गंभीर आजारी आहेत. दोन दिवस जाणे का लांबवायचे?' एण्ड्र्युजची कासाविशी वाढत राहिली होती.

'मी माझे कर्तव्य सोडून एक दिवस जर आधी पोहोचलो तर त्यामुळे ती वाचेल याची काय खात्री?' गांधींचा बिनतोड प्रश्न होता. 'मग कायच करायचे ठरवता?' एण्ड्र्युजने विचारले.

'मांड ठोकून आधी हे काम पूर्ण करायला हवे. मगच पाय काढावा हे उचित !' गांधी स्पष्टपणे म्हणाले. यावर मिस्टर एण्ड्र्युज चूप बसलेत. काळजीतही पडले. लगेच तिथून उठले. सरळ स्मट्सला फोन लावला.

'इथे आमच्यासमोर एक धर्मसंकट येऊन उभे ठाकले आहे. फिनिक्सहून तार आली आहे. सौ. गांधी भयंकर आजारी आहेत. गांधींनी तातडीने तिकडे निघायला हवे.' एण्ड्र्युजने फोनवरुन जनरल स्मट्सना कल्पना दिली.

'मग मी काय करावे असे आपण म्हणताहात?' तिकडून आवाज आला.

' मी कसा काय आग्रह करु? ' एण्ड्र्युज बोलले.

यावर जनरल स्मट्स म्हणाले की तडजोड झालेली आहे. मिस्टर गांधी आनंदाने जाऊ शकतात.

'तुम्ही गांधीभाईंना चांगले जाणता. हिंदजनांच्या तडजोडीचे काम अधूरे सोडून जाणे त्यांना मान्य नाही.' एण्ड्र्युज म्हणाले.

'बरे. तुम्ही सांगाल ते करायला मी तयार आहे.' तिकडचा आवाज खूपच समंजस लागला होता.

'आता सायंकाळ होत आली आहे. तरीही गांधींच्या वतीने तयार झालेला कागद मी घेऊन येतो. आज कृपया आपले कार्यालय थोडा अधिक वेळ सुरु राखावे. Over Time खुले राखावे. सही शिक्का उठल्यावर कार्यालय बंद करावे.' एण्ड्र्युजने आग्रह केला.

'उशीर तर खूप होईल. मला इतरही कामे आहेत. तरीसुध्दा या, मी शक्यतो लवकर माझा कागद स्वाक्षरी करुन तयार ठेवतो.' फोनवरुन स्पष्टीकरण आले.

जनरल स्मट्सने एण्ड्र्युजचे म्हणणे मान्य केले होते. त्यांना खूप उशीरापर्यंत थांबावे लागले होते. रात्र झाली तरी ते थांबले होते. त्यांनी गांधींचे पत्र वाचले. ठरल्याप्रमाणे सरकारच्या वतीने लिहून द्यायचे पत्र तयार केले. स्वाक्षरी केली. एण्ड्र्युज यांनी स्मट्सचे आभार मानले.

सारे काम आटोपले होते. गांधींना सोबत घेऊन एण्ड्र्युज गाडीने रात्रीतूनच थेट फिनिक्सकडे निघाले. कस्तुरची तब्येत खूपच गंभीर होती. अगदी आणीबाणीच्या समयी गांधी येऊन ठेपले होते. अशा बिकटसमयीही कस्तुरने डॉक्टरांची मदत घेतली नाही. गांधींनी स्वत:च उपचार केले. कस्तुर बरी झाली. [५]

अखेरच्या वाटाघाटी केपटाऊनमध्ये होत्या. तिथे गांधींच्या सोबत कस्तुर होती. कस्तुर खूप आजारी होती.

आग्रहाने गांधी तिला सोबत घेऊन गेले होते. कस्तुरची सेवा स्वत:च करत होते. रात्रं-दिवस वाटाघाटी सुरु होत्या. नोंदी घ्याव्या लागत होत्या. खर्डेघाशी होती सारी. एक खर्डा तयार करावा, त्यात बदल करावेत, सुधारित प्रत तयार करावी असे चालले होते. पत्रे लिहावीत. लेख लिहावेत. मुलाखती द्याव्यात. या धावपळीत वेळ काढावा. कस्तुरची सेवा बजवावी. हे अखंडपणे सुरु होते.

संदर्भ

१) गांधींनी श्री सी. एफ्. एण्ड्रयुज यांना दिनांक १३ मार्च १९१४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १२ पृष्ठ ३७७;

२) गांधींनी श्री गोपाळ कृष्ण गोखले यांना फिनिक्स-नाताळहून दिनांक १ एप्रिल १९१४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १२ पृष्ठ ३९२;

३) गांधींनी फिनिक्सहून श्री गो. कृ. गोखले यांना दिनांक १९ एप्रिल १९१३ रोजी लिहिलेले पत्र;

४) गांधींनी कुमारी देवी वेस्ट यांना दिनांक १४ डिसेंबर १९१३ रोजी लिहिलेले पत्र;

५) गांधीजीनी साधना: (गुजराती) श्री रावजीभाई पटेल पृष्ठ २७७ ते २७९ चा सारांश.

❖❖❖

## ३४) तडजोड झाली

अखेर करार झाला. श्री गोपाळ कृष्ण गोखले यांचा आग्रह होता. आता मायदेशी निघायचे होते. टॉल्स्टॉय फॉर्म आवरुन झाला होता. त्याला तर कधीचेच फिनिक्स आश्रमात विलीन करुन दिले होते. काही फिनिक्सवासी तिथेच थांबणार होते. त्यांना आफ्रिकेत राहून उदरनिर्वाह करायचा होता. गांधी परिवारातील सदस्यांनी हिंदुस्तानात यायचे ठरवले होते. यात छगनलाल, मगनलाल यांचे कुटुंबीजन आणि फिनिक्स आश्रमातील काही युवक सरळ हिंदुस्तानात गेले होते. मिस्टर वेस्ट आणि मिस्टर पोलाक यांचे कुटुंबीजन इंग्लंडकडे निघालेत. हरमन केलेनबॅक गांधींसोबत येऊन हिंदुस्तानात वसणार होते. गांधी व कस्तुर यांच्यासोबत तेही इंग्लंडच्या दिशेने निघालेत. पहिल्या महायुध्दाचा भडका उडला होता. केलेनबॅक मूळ जर्मन नागरिक होते. त्यांना इंग्लंडमध्ये अटक करण्यात आली. युध्द थांबल्यावर परत ते दक्षिण आफ्रिकेत गेले. आपला व्यवसाय सुरु केला.

तुरुंगात कस्तुरच्या तब्येतीचे अतोनात नुकसान झाले होते. ती अंथरुणाला खिळली होती. गांधींनी भारतात हरीलाल व एण्ड्र्युज यांना कळवले 'त्या जीवन-मरणाच्या सीमारेषेवर हेलकावे खात आहेत. मागच्या आठवड्यात सौ. गांधी मृत्युच्या दारात उभ्या होत्या. त्यामुळे गेल्या दहा दिवसात मी काहीही करु शकलेलो नाही. त्यांची स्थिती सुधारण्याची काही चिह्ने दिसत नाहीत.'

गांधींची शंका खोटी ठरली. जुलै १९१४ साली कस्तुर केपटाऊनहून इंग्लंडकडे निघाली. तिला गांधींसोबत भारतात यायचे होते. निरोप घेताना डर्बन आणि व्हेरुलम इथल्या मानपत्रात गांधींचा उल्लेख 'महात्मा' असा केला गेला आहे. गोखल्यांनी प्रकृतीच्या कारणांमुळे युरोपात स्थलांतर केले होते. गांधी त्यांच्या भेटीसाठी आधी इंग्लंडला जाऊन मग भारतात परतले. १९ डिसेंबर १९१४ रोजी गांधी दांपत्य 'अरेबिया' बोटीने मुंबईसाठी रवाना झाले.

कस्तुरला हिंदुस्तानची आठवण यायची. गुलाब आठवायची. हरीलाल आठवायचा. नात रामीला मांडीवर घेऊन तिला खेळवायचे होते. कांती आणि रसिक या हरीच्या दोन लेकराना तर तिने पाहिलेही नव्हते. परिवारात अनेकांचे निधन झाले होते. आई-वडिल देवाघरी गेले होते. थोरला भाऊ खुशालदास वारला होता. त्याची बायको व मुलगी तापाच्या साथीत एका पाठोपाठ एक असे निघून गेले होते. उरला होता तो धाकटा भाऊ माधवदास. थोरले दीर लक्ष्मीदास यांचे ९ मार्च १९१४ रोजी निधन झाले होते. गांधींनी या बंधुला 'आता मी तुम्हाला मदत पाठवणार नाही.' असे निक्षून कळवून टाकले होते. खरे तर कस्तुरने या गोष्टीला तेव्हा केवढा विरोध केला होता. हे तिला अजिबात आवडले नव्हते. ती काहीशी बेचैन झाली होती. तिचे मन सुन्न झाले. मधले दीर करसनदास वारले होते. आठवणींचा कल्लोळ तिच्या मनात दाटला. या मोठ्या जावाना भेटायचे होते. ती अपार दु:खी-कष्टी झाली होती.

कस्तुर गांधींसोबत निघाली. आगबोटीवरील प्रवासातही गांधी झपाटलेले होते. त्यांच्यापुढे कामेच कामे होती. वृत्तपत्रे वाच. टाचणे काढ. पत्रे लिही. केलेनबॅकला तासभर गुजराती शिकव. तासभर कस्तुरला रामायण-गीता वाचून दाखव. गीतेचे श्लोक पाठ करवून घे. नाना प्रकारची कामे ते एकसाथ करत रहायचे. रामायण ऐकताना व गीतेचा अभ्यास करताना कस्तुरला नाना प्रश्न पडत असत. या प्रश्नांमधून तिची तीक्ष्ण बुध्दी आणि आकलनाचे मनोरम दर्शन घडते. तिचे हात इथे फार कामात नसत. मन भिरभिरत असायचे. मस्तकात नाना आठवणी ठाण मांडून बसलेल्या असायच्या. मनात कुठलीही निराशा नव्हती. पश्चात्ताप नव्हता.

गांधींनी जमनादास गांधीना लिहिले की बाची तब्येत तशीच आहे. ती ना चांगली आहे. ना वाईट. आज तर अंगावरची सूज अधिकच दिसते. ती हिंमतीने हिंडते-फिरते. तिला आवडेल ते खायची परवानगी मी दिली आहे. आता काय व्हायचे ते ठीक. बिछान्यात पडून रहाण्याइतकी ती आजारी नाही[१]

प्रसन्न व्यक्तिमत्वाची कस्तुर मायदेशी परत येताना अशी पार थकून गेली आहे. भारतात तिच्यासाठी काय-काय नवीन वाढून ठेवले आहे. आला दिवस प्रत्ययकारीतेने जगायची तिची अनोखी शैली आहे. आजारपणावर मात करत ती गीता व रामायणाचा स्वाध्याय करत आहे.

संदर्भ

१) गांधींनी केपटाऊनहून श्री जमनालाल गांधी यांना दिनांक १७ मार्च १९१४ रोजी लिहिलेले पत्र.

❖❖❖

## ३५) सत्कार समारंभ आणि मानपत्रांचा वर्षाव

हिंदू सभेने गांधी, कस्तुर आणि इमाम अब्दुल कादीर बावजीर यांच्या सन्मानार्थ एका समारंभाची योजना आखली होती. केपटाऊनच्या स्वागत समारंभात २५ मार्च १९१४ रोजी गांधींनी उपस्थितांना धन्यवाद दिलेत. कस्तुरच्या आजारपणात त्यांची व खुद्द गांधींचीही सेवा करणारे श्री गुल दांपत्य होते. त्यांच्या परिवाराचे अन्य सदस्य होते. ते वेळोवेळी कस्तुरच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी येत. अन्य मित्र फळे वगैरे आणत. या सर्व मित्रांबद्दल गांधींनी आभार व्यक्त केलेत.

२५ मार्च रोजी स्वागत समारंभ झाला. कस्तुर गांधींसोबत निरोप समारंभात उपस्थित होती. डर्बनच्या टाऊन हॉलमध्ये सभेचे आयोजन केले गेले होते. हिंदुस्तानी आणि युरोपियनांचा फार मोठा सहभाग होता. डर्बनचे मेयर श्री. डब्ल्यू होम्स समारंभाचे अध्यक्ष होते. संपूर्ण दक्षिण आफ्रिकेच्या विभिन्न संस्थांच्या वतीने गांधींना मानपत्रे दिली गेलीत. त्यांनी भाषण दिले. "आपण केलेल्या प्रशंसेला मी पात्र नाही. माझी पत्नीही हे मानत नाही की आपण तिच्याबद्दल जे लिहिले आहे. त्याला ती पात्र आहे. हिंदुस्तानी अनेक महिलांनी श्रीमती गांधीहून अधिक सेवा बजावल्या आहेत."

गांधींनी पत्रातून लिहिले की कस्तुर गव्हाच्या पिठाचे पेय (दूधा शिवाय) घेत आहे. याला ती कॉफी म्हणते. याशिवाय दुसरे ती काही घेत नाही. हिंडायला-फिरायला असमर्थ आहे. तिच्या देहावरची सूज उतरुन जाईल असे वाटते. काय परिणाम होईल हे सांगणे अवघड आहे.[१]

दुसऱ्या एका पत्रात लिहिले की स्नेहीजनांविषयी वीतराग स्थिती उपजल्यावर ह्रदय खरोखर दयावान बनते. ते हृदय स्नेहीजनांची सेवा करते. कस्तुरविषयी मी ज्या प्रमाणात वीतराग बनलो आहे. त्या प्रमाणात तिची सेवा अधिक करु शकतो.[२]

या दोन पत्रांमधून गांधींची सेवेची भावना दिसते. कस्तुरचा जीवघेणा आजार थकवतो. सिध्दांत वचनासोबतच आपल्या ऊर्ध्वगामी होत जाण्याचा आलेख दिसतो. हे सारे गांधींनी चितारले आहे.

९ जुलै रोजी डर्बन येथील हिंदू-मुस्लिमांनी निरोप दिला. गांधींनी इंग्रजीत उत्तर दिले. आपल्या भाषणातून आपले व कस्तुरचे अभिनंदन केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. सर्वांना धन्यवाद दिलेत.

डर्बन येथील व्हिक्टोरिया स्ट्रीटवरील हिंदू धर्मशाळेत गुजराती लोकांनी निरोप दिला. उत्तरादाखल गांधी म्हणाले

"आपण जो सन्मान आणि प्रेम आम्हा दोघांबद्दल व्यक्त केला त्यासाठी मी आपले उपकार मानतो. ज्या वेळी मला सन्मान लाभतो त्यावेळी माझ्या आत्म्याला एक प्रकारचे भय वाटते. आता मी भोगभूमीकडून कर्मभूमीकडे जात आहे."

१३ जुलै रोजी दोघे जोहान्सबर्ग येथील पार्क स्टेशनवर दोघे पोहोचले. हिंदुस्तानी जनांच्या विशाल समुदायाने त्यांचे स्वागत केले. मोठी मिरवणूक काढली. त्यांना एका गाडीत बसवून ती गाडी ओढली.

१४ जुलै १९१४ रोजी जोहान्सबर्ग येथील जेप्पी स्ट्रीटमध्ये गांधी-कस्तुर यांना निरोप देण्यासाठी मॅसॉनिक हॉल येथे एक समारंभ आयोजित केला गेला होता. यात ब्रिटिश भारतीय संघ, चिनी संघ, तमीळ कल्याण समिती, ट्रान्सवाल भारतीय महिला संघ आणि गुजराती, मुस्लिम तथा पारशी समाजांच्या वतीनेही अभिनंदन पत्रे देण्यात आली. भोजन समारंभाचेही आयोजन केले गेले होते.

१५ जुलै १९१४ रोजी ब्रामफांटीन येथील कबरस्तानात नागप्पन आणि वलिअम्माच्या सन्मानार्थ त्यांच्या कबरींवर स्मृती शिलान्यास स्थापनेचा समारोह झाला. यात गांधींसोबत कस्तुरही अन्य सहकाऱ्यांसमवेत हजर होती. त्यांच्यासोबत कुमारी श्लेसिन व सौ. मिली पोलाक होत्या. मोठ्या संख्येने हिंदुस्तानी व युरोपीय महिलांनी आणि मित्रांनी त्यांचे स्टेशनवर स्वागत केले. याच दिवशी जोहान्सबर्ग येथे तमीळ समाजाच्या एका सभेत गांधींसोबत कस्तुर आणि अन्य सहकारीही होते. या सभेचे अध्यक्ष थंबी नायडू होते. या सभेत मोठ्या संख्येने महिला आणि युरोपीय लोक उपस्थित होते.

जोहान्सबर्ग येथे १६ जुलै १९१४ रोजी गुजराती लोकांच्या एका सभेत गांधी व कस्तुरचा निरोप समारंभ आयोजित झाला.

१८ जुलै १९१४ रोजी गांधी आणि कस्तुर आपल्या सहकार्यांसमवेत 'इंपीरियल मेल' ने पोहोचले. स्टेशनवर मोठ्या संख्येने युरोपीय व भारतीय मित्रांनी त्यांचे स्वागत केले. एका मोठ्या मिरवणूकीने त्यांना बंदराच्या गोदीवर नेण्यात आले. तिथे मद्रास भारतीय संघ आणि अन्य संगठनांनी त्यांना मानपत्रे व भेटी दिल्यात.


संदर्भ

१) गांधींनी मणीलालला फिनिक्स, नाताळहून दिनांक ३ एप्रिल १९१४ रोजी; लिहिलेले पत्र.;

२) गांधींनी रावजीभाई पटेल यांना केपटाउनहून दिनांक १० जून १९१४ रोजी लिहिलेले पत्र.


❖❖❖

## ३६) वैष्णवजन कस्तुर

कस्तुरने दक्षिण आफ्रिकेचा निरोप घेतला होता. तिचे इथले अखेरचे दिवस खूप गजबजाटाचे आणि सौख्याचे होते. आनंदाचे होते. विजयोत्सवी होते. गांधींच्या सोबत तिचा अनेक ठिकाणी सत्कार झाला. अनेक निरोप समारंभांना तिने हजेरी लावली. त्यांच्यासोबत बसून अनेक खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला होता. ठिकठिकाणी दोघांचे आदर-सत्कार झाले होते. उत्साही-उसळत्या गर्दीने स्वागत झाले होते. गगनभेदी जयजयकाराच्या घोषणा निनादल्या. आपण या भूमीवर पहिले पाऊल ठेवले तो क्षण तिला आठवला. क्षणभर तिचे मन शहारले. तो आक्रोश आणि तो गोंगाट. तो निषेध आणि तो नकार. ते वृत्तपत्रांमधील मथळे. त्या जीवघेण्या बातम्या. आज मात्र सर्वत्र आनंदाची लाट लहरत होती. गांधींना 'नकोसा पाहुणा' म्हणून पत्रकारितेने हिणवले होते. आज त्या पत्रकारितेची ओंजळ गांधी-कस्तुर यांच्या स्तुती सुमनांनी भारलेली होती.

गांधी बदलले होते. कस्तुर बदलली होती. दोघांनी मिळून एका अभिनव जीवनवाटेवर चालायचे ठरवले होते. एका नव्या जीवनाची सुरुवात केली होती. मित्रांनी अश्रुभरल्या नेत्रांनी भेटी दिल्यात. प्रत्येकजण असे म्हणायचा 'गांधींनी दक्षिण आफ्रिकेचा कायापालट केला आहे.' तिला हे माहित होते की खरे तर दक्षिण आफ्रिकेने गांधींचा कायापालट केला आहे. एका हट्टी माणसाला समंजस बनवला आहे. रागीट माणसाला हसायला शिकवले आहे. 'माझे तेच खरे' असे म्हणणाऱ्या माणसाला 'खरे तेच माझे' असे म्हणायला शिकवले आहे. आसक्त भोगी माणसाला अनासक्त योगी बनवले आहे. तिला हे मनोमन वाटत राहिले. गांधींनी उन्नतीची नाना शिखरे पादाक्रांत केली होती. गांधी देह तर ती आत्मा होती.

गांधी इंग्लंडकडे जायला बोटीवर चढले. इंग्लंडहून मायदेशी यायचे होते. ६ ऑगस्ट रोजी त्यांनी ब्रिटिश भूमीवर पाऊल ठेवले. या दांपत्यासाठी हॉटेल सेसिल येथे स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ब्रिटिश सरकारला युध्दकाळात सहकार्य देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या करारपत्रावर कस्तुरचीही सही आहे. जगाच्या माथ्यावर महायुध्दाची वादळे घोंगावत होती. इंग्लंडच्या वृत्तपत्रांनी सत्याग्रहाची नोंद घेतली होती. कस्तुरच्या सक्रिय सहभागाची वाखाणणी केली होती. तिच्या तुरुंगवासाबद्दल वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरभरुन बातम्या होत्या. सत्याग्रही चळवळीच्या बातम्यांमधून तिचा उल्लेख सौ. के. एम्. गांधी असा झालेला होता. तिने दक्षिण आफ्रिकेतल्या चळवळीत कृतिशील सहभाग घेतला होता. तुरुंगवास पत्करला होता. हे सारे त्या बातम्यांमध्ये झळकत होते. गांधींनी याकडे तिचे लक्ष वेधले. तिच्या आनंदाला पारावार नव्हता.

गांधींनी इंग्लंडमध्ये रुग्णालय प्रशिक्षण वर्गासाठी आपले नाव नोंदवले होते. कस्तुरनेही त्याला सोबत केली. ब्रिटनमधले हवामान कुंद होते. अशक्तपणामुळे गांधींना प्लुरिसीचा आजार जडला. त्यांना वेगाने चालणे शक्य नव्हते. त्यांची हाडे खिळखिळी झाली होती. घरी थांबावे लागत होते. बिछान्यात पडून रहावे लागत होते. या काळात ते बंगाली भाषा शिकण्याचा प्रयत्न करत होते. त्यांची भूक मंदावली होती. खाणे कमी झाले होते. नैतिक आणि मानसिक वातावरणदेखील प्रतिकूल होते. सारे कृत्रिम आणि भौतिकवादी होते. बेगडी आणि अनैतिक होते. यात व्यक्तिच्या आत्म्याला स्थान उरले नव्हते. ते एकटे असूनसुध्दा इंग्लंडनिवासी जनांनी त्यांना एकटे पडू वा वाटू दिले नव्हते. कस्तुर स्वत: आजारी असुनसुध्दा त्यांच्या बिछान्याजवळ सेवारत होती. ती विचार करत राहिली 'काय पण बाई हा माणूस! दक्षिण आफ्रिकेत घेऊन आला तर बूट-मोजे काय वापरायला लावलेत. हिंदुस्तानात परत जाताना आता ते सारे सोडायला काय लावलेत.' निरोप घेताना गांधी कस्तुरला थोपटायचे. आजारपणात तिच्या केसातून बोटे फिरवायचे. नवऱ्याला जेवायला वाढताना, सुश्रूषा करताना आणि मालिश करताना सारी परतफेड कस्तुर करुन द्यायची. हळूहळू दोघे सोबत फिरायला जाऊ लागले. दोघांची प्रकृती बरी नव्हती.

कस्तुर इंग्लंडला प्रथमच गेली होती. तिच्या मनात उत्सुकता होती. कुतूहल होते. तिच्या मनात इंग्लंडबाबत दोन प्रकारच्या भावना होत्या. इथेच तर नवरा बॅरिस्टर झाला होता. हरीलालची इच्छा इथे येऊन शिकायची होती. ती पूर्ण होऊ शकली नव्हती. यामुळे पिता-पुत्रात अबोल्याची तटबंदी उभी राहिली होती. तिच्या मनात हरीलालच्या आठवणींची महायात्रा निघाली होती. नवऱ्याच्या गैरहजेरीत तिला त्याचीच तर साथ होती. हरीलाल तिच्या मांडीवर असल्यापासूनच्या नाना आठवणी तिच्या मनाभोवती फेर धरुन वेताळासारख्या नाचू लागल्यात. तो दंश गांधीलमाशांसारखा होता. पेटून उठलेल्या मोहोळासारख्या त्या आठवणी तिचा पाठलाग करत होत्या. ते आठवले की तिचे मन कासावीस होई. हरीलालचे बालपण बापाच्या सान्निध्याशिवाय गेले. ती आणि पुतळी आजी एवढे त्याचे जग होते. त्या जगालाही दृष्ट लागली आणि आजी देवाघरी निघून गेली होती. हरी तिला अनेकदा 'आपण आता आजीला देवाकडून परत घेऊन येऊ' असा आग्रह धरायचा. तिला त्याचे म्हणणे कसे टाळावे हे काही कळत नसे. आजीच्या मांडीवर बसून त्याने भरपूर खोड्या केल्या. आजी-नातवाच्या अनुबंधाला स्निग्ध स्पर्शाचे आवरण होते. त्यावर तिच्या सुरकुत्या पडलेल्या हातांची छाया नव्हती. तिच्या पारदर्शी मनाच्या आंदोलनांचा ठसा होता.

आपल्या इग्लंडहुन परतीच्या प्रवासाचे वर्णन गांधींनी केले आहे. ते म्हणतात "इंग्लंडहून स्वदेशी यायला ते निघाले होते. तो जुलै महिना होता. सोबत कस्तुर व केलेनबॅक होते. सत्याग्रहाच्या लढ्याच्या वेळीच त्यांनी तिसऱ्या वर्गाने प्रवास करायला सुरुवात केली होती. यामुळे समुद्रमार्गाने प्रवास करत असतानाही तिसऱ्या वर्गाचेच तिकीट काढले होते अर्थात् तिथल्या तिसऱ्या वर्गात आणि आपल्याकडील तिसऱ्या वर्गात खूपच तफावत आहे. आपल्याकडे निजण्या-बसण्याला जागा मिळण्याची पंचाईत, स्वच्छतेचे तर नावच घ्यायला नको. तिकडच्या तिसऱ्या वर्गात मात्र जागा योग्य प्रमाणात मिळत होती. स्वच्छताही चांगली असायची. कंपनीने आमच्यासाठी चांगली सोयही करुन दिली होती. आम्हाला कुणाचा उपसर्ग पोहोचू नये म्हणून एका शौचालयाला मुद्दामच कुलूप घालून त्याची किल्ली आमच्या हवाली करुन दिली होती. आम्ही तिघेही फलाहारी असल्यामुळे आम्हाला ताजी सुकी फळे पुरवण्याची आज्ञाही आगबोटीच्या कोठावळ्याला देण्यात आली होती. एरवी तिसऱ्या वर्गाच्या प्रवाश्यांना फळे बेताचीच मिळतात. सुका मेवा तर अजिबात नाही. या सोयी झाल्यामुळे समुद्रावरील अठरा दिवस फार शांततेत गेले[१]

या प्रवासातील कित्येक स्मरणे कस्तुरसाठी खूपच स्मरणीय अशी होती. त्यातला एक प्रसंग तर खासच म्हणावा लागेल. मिस्टर केलेनबॅक यांना दुर्बिणींचा फार शौक होता. त्यांनी महाग किमतीच्या दोनेक दुर्बिणी सोबत बाळगल्या होत्या. त्या दुर्बिणींच्या संदर्भात गांधी व त्यांच्यात सारखा वाद व्हायचा. गांधी आदर्शवादी होते. त्यांच्या साधेपणाला अशी चैन परवडणारी नव्हती. हा मुद्दा ते रोज केलेनबॅक यांना समजावून सांगत असत. एके दिवशी याविषयी दोघांमध्ये खणखणीत वाद झडला. गांधी आणि केलेनबॅक दोघेही केबिनच्या खिडकीच्या शेजारी उभे होते. गांधी म्हणाले की त्यांच्या दोघांमध्ये या दुर्बिणीमुळे रोज वाद होतात. ही दुर्बिणच जर समुद्रात फेकून दिली तर वादाचे मूळच नष्ट होईल. यावर केलेनबॅक यांनी लागलीच संमती देऊन ती दुर्बिण फेकुन द्यायला सुचवले. झाऽऽले. केलेनबॅकचे हे ऐकल्याबरोबर गांधींनी ती दुर्बिण समुद्रात फेकून दिली. ती सात-एक पौंड किमतीची दुर्बिण होती. ही झाली किमतीची गोष्ट. तिच्यावर केलेनबॅकचा मोह होता. यामुळे तिचे मोल अधिक होते. इतके असूनही केलेनबॅक यांना त्याविषयी किंचितही हळहळ वाटली नाही. त्यांच्यात व गांधींमध्ये असे प्रसंग वरचेवर येत असत. कस्तुरला हा एक प्रसंग ठळकपणे आठवला होता. त्यांच्यातील या संबंधामुळे कस्तुरला रोज काही-ना-काही शिकायला मिळायचे. दोघांचा प्रवास सत्याधारित होता हे त्याचे एक प्रमुख कारण होते. सत्याची कास धरल्यामुळे क्रोध, स्वार्थ, द्वेष यासारख्या भावनांचे सहजच निवारण होत असे. कस्तुरला हा पाठ शिकायला मिळाला की या भावनांचे निवारण झाल्याशिवाय सत्याचे दर्शन होऊ शकणार नाही. राग-द्वेषांनी भरलेली व्यक्ती सरळ

असू शकेल. ती व्यक्ती कदाचित वाणीचे सत्य पाळूही शकेल. शुध्द सत्य मात्र तिला लाभणार नाही. शुध्द सत्याचा शोध म्हणजे राग-द्वेषासारख्या विकारांपासून मुक्त होऊन शुध्द होणेच होय.[२]

गांधी पंचेचाळीस वर्षांचे झाले होते. त्यांच्या जीवनात वयाच्या तेराव्या वर्षी कस्तुर आली. बालवधू ते परिपक्व माता असा तिचा प्रवास घडला होता. उभयतानी गृहस्थाश्रम, ब्रह्मचर्याश्रम, वानप्रस्थाश्रम अनुभवला होता. आशिया, युरोप आणि दक्षिण आफ्रिका खंडांचा अनुभव झेलला होता. तिने नित्य विकासशील पतीच्या सोबत वाटचाल केली होती. गांधींचा मोहनदास, मिस्टर गांधी, बॅरिस्टर गांधी, गांधीभाई, कर्मवीर गांधी असा विकास होत चालला होता. पुढचा प्रवास चढणीचा होता. आता प्रयोगवीर गांधींची भेट होणार होती. कस्तुर अधिक विकसनशील रुपात भेटणार होती.

गांधी व कस्तुर मुंबईला पोहोचले. अपेक्षेपेक्षा दहा वर्षांनी उशिरा. मनात खूप आनंद होता. मुंबईत श्री गोपाळ कृष्ण गोखले आले होते. सभा-संमेलनांची रेलचेल होती.

'कस्तुर, मायभूमीची हाक आली. आता एक नवे अभियान सुरु होईल. तुझी साथ-संगत हवी.' गांधी म्हणाले.

"इश्श्य हे हो काय? मी तर अखंडपणे आहे. तुमच्यासमवेत पण एक सांगू? राग थोडा कमी करावा बाई एका माणसाने." कस्तुर हसत-हसत म्हणाली होती.

ती खळाळून हसली. त्यांनाही हसू आवरले नाही. तिच्यामुळेच तर त्यांना राग करतायेत होता.

कस्तुरने नवऱ्याची सुख-दु:खे झेलली. हट्ट पचवले. वेदना जपल्या. विजय अभियाने पाहिलीत. फजिती पाहिली. पराभव समजून घेतले. त्यांचा निषेध अनुभवला. त्यांचा जयजयकार ऐकला. त्यांना पूरक बनली. त्यांची सावली नाही बनली. तिने त्यांना प्रेरणा दिली. पूरक ठरली. त्यांच्या पूर्णविरामाला अर्थ दिला. ती आपल्या जगावेगळ्या विलक्षण पतीच्या सेवेतच आकंठ बुडाली होती. त्यातच तृप्त होती. नवऱ्याची प्रत्येक कांक्षा तिची बनली. ती पातिव्रत्य धर्माचे पालन करायची. याला एक भौतिक संदर्भ होता. परमार्थाची सुरेख डूबही होती. आत्मविलोपन करुन उभयतांनी आध्यात्मिक भूमिका संपादित केली होती. या उद्दिष्टाला साकार करत असताना तिने नाना आघात झेलले. अपार त्यागाचा परिचय दिला. गांधींच्या प्रखर तपाचा ताप असह्य होता. आपल्या अद्वितीय प्रीती, सहनशीलता आणि धैर्याच्या बळावर तिने गांधींच्या तपाचरणाला अंगिकारले होते. विसाव्या शतकातला हा अभिनव पतिव्रत-धर्म होता. तिचा गृहस्थधर्म सुंदर, सुदृढ आणि सुशोभित ठरला. परिस्थिती कुठलीही असो, आव्हान कसेही असो, तिने नवऱ्याला संपूर्ण सहकार्य दिले. स्वत:ला नवऱ्यात समर्पित करुन टाकले. या समर्पणामुळेच गांधींची सत्यसाधना फळाला आली. कुठल्याही अर्थाने आणि संदर्भाने ती नवऱ्याच्या पुढे होती. तिचे अद्भुत सहकार्य लोकविलक्षण होते. तिने नवऱ्याला सदैव जागृत ठेवले. आपल्या प्रतिज्ञेचे स्मरण करवुन दिले. प्रत्येक राजकीय लढ्यात समरांगणावर ती अग्रेसर राहिली. ती समर्पित वैष्णव होती. नरसी मेहतांची 'वैष्णवजन' होती.

संदर्भ


१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३४३;

२) कित्ता पृष्ठ ३४३ / ३४४


०००

तिसरा खंड

# सामवद

**सामवद तिसरा खंड काळ (१९१५ ते १९३०)**

साम म्हणजे समत्व. साम शब्दाचा आंतरिक अर्थ होतो साम्यरुप भक्ती. साम शब्द हृदयस्थ समतेचा द्योतक आहे. साम गायन आंतरिक गानाची एक अद्भुत लय आहे.

**अग्निरस्मि जन्मना जातवेदा**
**घृतं मे चक्षुरमृतं म**
**आसन् । त्रिधातुरर्को रजसो विमानोऽजस्त्रं**
**ज्योतिर्हविरस्मि सर्वम् ॥**
***(सामवेद ६ / ३ / १२ )***

मी म्हणजे आत्मतत्त्व. हे जन्मानेच अग्निस्वरुपी, सर्वज्ञ, तेजरुपी आहे. तूपाच्या दिव्याचा प्रकाश माझे नेत्र आहेत. माझ्या मुखी अमरत्व प्रदान करणारी वाणी आहे. मी प्राण, अपान आणि व्यान या तिन्ही प्राणांच्या ठायी व्याप्त प्राणतत्त्व आहे. मी अंतरिक्षाला मापणारा वायु आहे. मी सतत तेजस्वी असा सूर्य. मी हवी आहे. मीच हविवाहक अग्नी आहे.



## १) प्रयोगवीराच्या कर्मक्षेत्रात

गांधीजी भारतात परत आले होते. त्यांच्यासोबत कस्तुरबाही आली होती. गुजराती भाषेत 'बा' म्हणजे 'आई' होय. ब्रह्मचर्याच्या प्रतिज्ञेनंतर गांधीजींनी कस्तुरला नेहमी 'बा' या संबोधनाने पुकारले आहे. त्यांनी पत्रांमधून कस्तुरबांना 'बा' असे संबोधन केले आहे. जाहीरपणे तसा उल्लेख केला आहे. दक्षिण आफ्रिकेहून भारतात परतताना संपूर्ण प्रवासात हवामान थंड वा वादळी होते. उभयतांची तब्येत चांगली नव्हती. त्यांनी प्रवासाची मौज मात्र लुटली. विवाहानंतर जवळ जवळ प्रथमच कस्तुरबाला तिचे पती संपूर्ण वेळ तिच्यासोबत लाभले होते.

९ जानेवारी १९१५ साल. गांधीजी व कस्तुरबा मुंबई बंदरावर उतरले. बंदरावर अवघी मुंबापुरी जमली होती. उभयतांचा सत्कार करण्यात आला. गांधीजी म्हणाले.

"मी आपला खूप आभारी आहे. आपण आम्हा दोघांचा सन्मान केला. आम्ही सेवेसाठी आलो आहोत. आम्ही या सत्काराला पात्र नाहीहोत. तुम्ही देऊ केलेल्या या नजराण्यांनाही पात्र नाहीहोत. आपण सारे मिळून मायभूमीची सेवा करु या."

श्री गोपाळ कृष्ण गोखले यांची प्रकृती बरी नव्हती. गांधीजींच्या स्वागतासाठी थेट पुण्याहून ते मुंबई बंदरावर आले होते. मुंबईत अनेक स्वागत समारंभ झाले. एका कार्यक्रमाचे अध्यक्षपद फिरोजशहा मेहता यांच्याकडे होते. एका समारंभात लोकमान्य टिळक उपस्थित होते. १४ जानेवारी १९१५. मुंबई येथील मंगलदास भवनाचे प्रांगण! गुर्जर सभेच्या उद्यांनात कार्यक्रम होता. भोजनाची योजना केली होती. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी गुर्जर सभेचे अध्यक्ष बॅरिस्टर जिन्ना होते. [१] भारतात आल्यावर गांधीजी आणि जिन्नांची ही पहिली सलामी होती.

काठियावाडी लोकांनी गांधीजींचा सत्कार केला. काहींनी त्यांना 'महात्मा' म्हणून संबोधले, पुढे टागोरांनीही या उपाधीचा पुनरुच्चार केला. प्रयोगवीर गांधीजी कर्मक्षेत्रात प्रविष्ट होत होते. कर्मक्षेत्र म्हणजे कार्यक्षेत्र— प्रयोग क्षेत्र ! दक्षिण आफ्रिकेत तीन-तीन सत्याग्रहांचा अनुभव पदरी घेऊन ते परत येत होते. पहिला सत्याग्रह. यात फिनिक्स व टॉल्स्टॉय फॉर्ममधील समूह जीवनाची शिस्त होती. परिश्रमी जीवनसाधना होती. सत्याग्रहाच्या मूलभूत तत्त्वांचे प्रशिक्षण दिले गेले होते. यातून सत्याग्रह लढतीचे आधार स्तंभ उभे राहिलेत. दुसऱ्या सत्याग्रहात सत्याग्रहींनी तुरुंगात चळवळ जारी राखली होती. तिसऱ्या सत्याग्रही लढ्याचा आरंभही याच सत्याग्रहींनी केला होता. यात कस्तुरबा आणि तिच्या सोबतीला तीन भगिनी होत्या. या भगिनींनी सत्याग्रहाला नवी प्रेरणा व पावन ऊर्जा दिली होती. यांचे संकल्पबळ मोठे ! यातून जोहान्सबर्गच्या तमीळ भगिनी पुढे आल्यात. त्यांच्याच प्रेरणेने खाण कामगार, शेतकरी व मजूर गिरमिटे निघाले होते. त्यांच्यासोबत त्यांची लेकरे-बाळे होती. त्यांचा सहभाग मोलाचा ठरला होता. त्या सत्याग्रहात हजारो लोकांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता. तुरुंगात असताना कस्तुरबा गंभीर आजारी होती. गांधीजींनी जामीन मिळवून तिची सुटका करुन घेण्याचे प्रयत्न केले नाहीत. तिने स्वत:ही अशी सवलत मागितली नाही.

कस्तुरबाने तीन-तीन गंभीर आजारांचा सामना केला होता. दोन लेकरांच्या प्रसुतीकाळात अडचणींचा डोंगर उभा ठाकला होता. त्यावर आरोहण करावे लागले होते. तो अनुभव खूपच त्रासदायक होता. कौटुंबिक क्षेत्रात पीछेहाट होतीच. थोरल्या हरीलालला आपल्या पित्यापासून लांब-लांब जाताना तिने बघितले होते. तसे तर लेकरु तिच्यापासूनही लांब जाणार होते. तिचे घर अजब वस्तुसंग्रहालयासारखे झाले होते. हे सारे तटस्थ व अंतरंगपणे तिने बघितले होते. सौ. मिली पोलाकशी मैत्रीपूर्ण परिचय साधता आला होता. इंग्रज परिवाराना जवळून बघता आले होते. घरात कटु अनुभवांना सामोरे जावे लागले होते. आसवे गाळावी लागली होती. घरचा विस्तार अनुभवला होता. घरच्यांचे दु:खद निधन झेलावे लागले होते. अपरंपार सन्मान मिळाला होता. तिची कष्टकरी ओंजळ तृप्तीने आणि समाधानाने समृध्द झाली होती. तिला चळवळ आणि तुरुंगाचाही अनुभव लाभला होता.

हिंदुस्तानात गांधीजी परतले. थोरला मुलगा हरीलाल स्वागतासाठी मुंबईला पोहोचला होता.

कस्तुरबाला नवऱ्याची नाना रुपे आठवत राहिलीत. आपल्या भूमीवरची रुपे. परक्या भूमीवरची रुपे. वेगवेगळे प्रयोग करणारे गांधीजी. सतत नव्याचा शोध घेणारे. ते जुने उचलतात. स्वच्छ करतात. त्यावर नव्याचे कलम करतात. त्याला स्वीकारतात. समूहाला परिवर्तनाची दीक्षा देतात. कालच्याहून आज सुंदर व्हावा यासाठी धडपडतात. उसळते जनसागर तिने या आधीही पाहिले होते. हा मायमेळा होता. आपली माणसे होती ही ! तिला भरुन आले. आपला देश. आपली माती. आपली माणसे. आपली भाषा. आपली चळवळ. आपले लढे. आपले अंगण. आपले आभाळ. नवऱ्याने तर जग बघितलेले होते. त्यांना सारे जग एक कुटुंब वाटत होते. ही दुनिया त्यांना घरासारखी होती.

गांधीजींनी पत्रातून कळवले आहे.'चि. शामळदासने पोरबंदरहून कळवले आहे. की कस्तुरबाची गुजराती भाष्य असलेली रामायणाची पोथी राजकोटमध्ये पडून आहे. ती जर कुठे आढळली तर ती प्रत व मी जमनादासला दिलेली पोपची तामीळ पुस्तके येताना घेऊन ये.'[२]

या पत्रातून गांधी स्वाध्यायाची रीत कळते. ते नव्या योजनांच्या प्रचंड धामधूमीत होते. तरीही त्यांच्या स्वाध्यायाचा परीघ विस्तीर्ण होत होता. कस्तुरबासाठीही रामायणाची पोथी मागून घेण्याची त्यांची भूक दिसते.

गांधीजींची स्वत:च्या अक्षरात गुजरातीत लिहिलेली एक डायरी आहे. डायरी आहे. १९१५ सालची ! यातून त्यांच्या अधिकांश कार्यांच्या नोंदी ढोबळ मानाने वाचता येतात. यात हिशेब-ठिशेब, भेटी आणि प्रवासविषयक नोंदी आहेत. यातून कस्तुरबाशी संबंधित पुढील नोंदी आढळतात. "एक आहे., ८ जून मंगळवारी बा खूप आजारी आहे. दुसरी आहे., १७ जून गुरुवारी जटाशंकर वैद्य आले होते. त्यांनी बाची तपासणी केली. १७ जुलै शनिवारी प्रात: प्रार्थना करण्यापूर्वी स्नानाला बसलो. बाने देवदासचे धोतर धुतले. धुताना आढळल्यावर खोटे बोलली. मी रागावर आवर घालू शकलो नाही. खूप बरे-वाईट बोललो. त्याचा रुमाल जरी धुऊन दिला तरी चौदा दिवसांचा उपवास करायचे व्रत घेतले आहे. ईश्वराने सहाय्य करावे. चौथी नोंद आहे., ८ ऑक्टोबर शुक्रवारी परत राग आला आणि बा वर नाराज झालो."[३]

या छोट्या-छोट्या नोंदी जरी असल्या तरी यातून दोघांच्या भावसंबंधाचे इंद्रधनुष्य मनोरमपणे फुलताना दिसते. आजारी असताना कस्तुरबाने केलेल्या छोट्या सेवेमुळे गांधीजी व्यथित होतात. यासाठी अतिशय प्रभावी आणि जालीम असा उपवासाचा उपाय अवलंबितात. हे केवळ विलक्षण आहे. !

उभयतानी धावत-पळत राजकोट, पोरबंदर गाठले. नातलगांच्या गाठीभेटी घेतल्या. सुख-दु:खे वाटून घेतलीत. वाटून घेण्यासारखी तर दु:खेच होती. गांधीजींचे दोन्ही बंधू लक्ष्मीदास व करसनदास निवर्तले होते. कस्तुरने त्यांच्या विधवा बायकांची भेट घेतली. तिचे मन अपार दु:खी-दु:खी झाले. आपल्या जावांचा उत्कर्ष काळ तिने अनुभवला होता. तिला आपल्या जावांची आठवण यायची. तिची खूप काळजी घ्यायच्या मोठ्या जाऊबाई! नवरा विलायतेत शिकायला गेला तेव्हा त्यांचीच तर सोबत होती. सुख-दु:खाच्या साथीदार होत्या त्या! कधी सासुबाई रागावल्यात तर त्या एकमेकींशी बोलायच्यात. दु:ख कमी करुन घ्यायच्यात. एकमेकींची एकमेकींना मदत होती. त्या आनंदात रहायच्यात. त्या जावांची छान गट्टी जमायची. हे दुर्मिळ होते. पुतळी आई असे म्हणायच्या 'आमच्या कस्तुरला या मोतीसोबत ठेवावे. सहा महिने जेवायला न देता एका खोलीत कोंडून ठेवले आणि पोटभर गप्पा मारु दिल्या आणि पुन्हा बाहेर काढले तरी त्या मिनिटभरही एकमेकींशिवाय राहू शकणार नाहीत.' ते सोन्याचे दिवस आता संपले होते. ते काही फिरुन येणार नव्हते. मुंग्यांच्या वारुळाला आग लागावी तसे झाले होते. त्यांच्या कपाळीचा सौभाग्यसूर्य मावळला होता. त्यांच्या गात्रांवर आधीची उजळ कांती आता उरली नव्हती. छे छे, त्या आता 'त्या' उरल्या नव्हत्या. त्या तिच्या जीवा-भावाच्या सख्या ! गळ्यात गळा घालून मिरवलेल्या सख्या ! त्या उरल्या नव्हत्या आता. कितीदा त्या एकमेकींच्या अंगावर हात टाकून पडल्या होत्या. एकमेकींशी मनीचे गुज बोलल्या होत्या. कुजबुजल्या होत्या. रुसल्या-भांडल्या-करवादल्या होत्या. पुन्हा

न करमून एक झाल्या होत्या. आताच्या या बाया त्या सख्या नव्हत्या. या वृध्द, गंभीर, प्रौढ बायका होत्या. खळाळ संपलेल्या ओढ्यासारख्या निरर्थक. यांच्या भोवताली जणू काहीएखादा कोट होता. त्याच्याप्रत पोहोचता येऊ नये असे झाले होते. त्यांना साद घालता येत नव्हती. कस्तुरबाचे पुढे उचललेले पाऊल मागे ओढले गेले होते. त्याच म्हणाल्या 'अग कस्तुर! ये ना! बैस. उभी का अशी? केव्हा आलीस? कशी आहे.स?' तिचे यावर मौन होते. त्यांना रंगीत वस्त्रांमध्ये बघायची सवय होती. कस्तुरबाला त्यांना अशा विधवा वेषात बघावे लागले. ती चक्रावून गेली. त्यांच्या हातातील रंगीत काकणे उतरली होती. बांगड्यांशिवायचे भुंडे हात तिला थकवत राहिलेत. आता त्या गंगास्वरुप झाल्या होत्या. गंगा भागिरथी झाल्या होत्या आता त्या! पवित्र तर त्या होत्याच पण आता वैधव्याने त्यांना अग्निपरीक्षा द्यायला लावले होते. ती हतबुध्द होऊन त्यांच्यासमोर बसली. या अनोळखी महिलांना आपण आपल्या आयुष्यात प्रथमच भेटत आहोत असे तिला वाटत होते. तिला लग्नात धमाल करणाऱ्या त्या जावा आठवत राहिल्यात. देवघरात मोठ्याने भजने गाणाऱ्या जावा आठवत राहिल्यात. आता त्यांचा कंठस्वर एकदम नि:शब्द शंखासारखा मौन-मूक झाला होता. त्यांची वये अधिक वाटू लागली होती. कस्तुरबा त्यांना भेटून शिवलेल्या वस्त्राचे उसवणे असावे तशी होत गेली. अनिवारपणे आलेला हुंदका तिला रोखता आला नाही. तिच्या मनाभोवती आठवणींचा जाळ पेटला होता.

२१ एप्रिल रोजी व्हिक्टोरिया हॉलमध्ये मोठा समारंभ झाला. इंडियन साऊथ आफ्रिका लीगचे सचिव होते श्री नटेसन ! त्यांनी कस्तुरबाविषयी सांगितले "सौ. गांधी आपल्यासाठी दैवी पत्नीच्या सद्गुणांचे प्रतीक आहेत. त्या पतीसाठी समर्पित जीवन जगल्या. त्यांची सावली बनून वावरल्यात. त्यांनी आत्यंतिक अभावात जगून सेवा अर्पिल्या. आनंदात व दु:खात सोबत केली. घरात व मोर्च्यावर अग्रस्थानी राहिल्यात."

७ जून १९१७ रोजी देवदास, ब्रजकिशोर आणि कस्तुरबाच्या समवेत गांधीजी पाटणा येथे पोहोचले. मुंबईहून निघाले होते. राजकोटला प्लेग पसरला होता. ते लागलीच सेवेत रुजू झालेत. त्यांचे ध्येय ठरले होते. वकीली, बायको, मुले हे सारे समासात पोहोचले होते. हिंदुस्तान हा एकच एक विषय होता. सेवा ही एकच एक भाषा होती.

फिनिक्स आश्रमातला परिवार हिंदुस्तानात यायला पुढे निघाला होता. तो कुठे थांबणार हा प्रश्न होता. गुरुकूल कांगडीचा आग्रह होता. काही काळ लोक तिथे थांबले होते. पुढे रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनात थांबले. शांतिनिकेतनात गांधी व कस्तुरबा यांचे स्वागत झाले. कस्तुरबाला तिच्या फिनिक्सवासी सहकारी बायकांनी घेरुन घेतले. तिच्या लंडन भेटीविषयी प्रश्नांची सरबत्ती केली. ती एकेकाचे समाधान करत होती. गांधीजी व कस्तुरबा यांचे स्वागत झाले. रात्री सारे विश्रांतीची तयारी करु लागले. अंगणात मधोमध अर्जुन वृक्षाखाली एक भला थोरला पार होता. झाडावरल्या पाखरांचा कलकलाट थांबून ते पंखात चोची खूपसून विसावले होते. गांधीजी कस्तुरबाना म्हणाले 'आपण दोघे या चौथऱ्यावर झोपू या.' शेजारी अंथरुण टाकून दोघे झोपी गेले. सारी मंडळी त्यांच्या आजूबाजूला अंथरुणे टाकून झोपी गेली. अनेकाना त्या दिवशी असे वाटले की आपले हे आध्यात्मिक माय-तात आहेत.

सहधर्मचाराचे एक लक्षण आहे. सहपरिवर्तन. गांधीजींच्या आचरणाची वळणे तरी किती विविधांगी ! खरे तर अगणित. प्रत्येक वळण आले की कस्तुरबा अचंबित होत होती. कधी विरोध करत होती. कधी जिज्ञासा व्यक्तवत होती. हळूहळू तिची समज जागत होती. ती समर्थन करत होती. हे सहधर्माचरण होते. या पायऱ्या चढत ती उन्नत होत चालली होती. तिने आपले कस्तुरपण कायम राखले होते. हे तिचे महात्म्य ! हेच खरे तर महात्मेपणही. ती नवऱ्याच्या खांद्याला खांदा लाऊन उभी राहिली. पावलोपावली साथ देत राहिली. सहजच ऊर्ध्वारोहण करत राहिली. ही तिची जीवनरीत. ही तिची रहाणी होती. वहाणी होती. एका तपस्व्यासोबतचे तिचे सहजीवन होते. यात तादात्म्य होते. अस्मिता होती. अंतरंगताही होती. गांधीजी विशिष्ट होते. तिची श्रध्दा विलक्षण होती. ती दृढ होती. लवचिक होती. स्पष्ट होती. परमतसहिष्णु होती. नवरेपणा मिरवणाऱ्या गांधीजींचा

तिने विरोध केला. त्यांच्या अन्यायी वाटणाऱ्या आदेशांना धुडकावून लावले. आरोहणावेळी ती त्यांच्यासोबत चालू शकली नसेल कदाचित पण त्यांच्या मागे दमदार पावलांनी ती उभी राहिली. यात तिने आपल्या जीवनाचे सार्थक मानले.

गांधीजींची तिथे थांबण्याची इच्छा होती. एखादा आठवडा लोटला असेल नसेल तोच पुण्याहून गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनाची तार आली. त्याच दिवशी दुपारच्या गाडीने मगनलाल गांधी यांच्यासह ते पुण्याकडे निघाले. सोबत कस्तुरबाही होती. दक्षिण आफ्रिकेत असताना कस्तुरबाने प्रथमच तिसऱ्या वर्गातून प्रवास करण्याचा अनुभव घेतला होता. सत्याग्रही परंपरेनुसार तिला तिसऱ्या वर्गानेच प्रवास करावा लागणार होता. मायदेशी आल्यावर हीच प्रथा गांधीजी व कस्तुरबा यांनी जारी राखली होती. दक्षिण आफ्रिकेतील तिसऱ्या वर्गाचा प्रवास वेगळा आणि हिंदुस्तानातला वेगळा असल्याचा त्यांना अनुभव आला. इथले अधिकारी कमालीचे उध्दट होते. रेल्वेतील भ्रष्टाचार, प्रवाश्यांच्या घाणेरड्या सवयी, बोकाळलेले स्वार्थ, उध्दटपणा व अज्ञान यासारख्या अगणित गोष्टी थकवणाऱ्या होत्या. पुणे प्रवासात गांधीजींना आलेले अनुभव केवळ विलक्षण असे म्हणावे लागतील. तिकिट घेण्यासाठी कितीतरी वेळ त्यांना रांगेत उभे रहावे लागले होते. प्रवाशांची झुंबड उडली होती. तिसऱ्या वर्गाच्या डब्यात प्रवेश करताना खूप श्रम पुरले. गाडी आता अगदी निघणार त्या वेळी डब्यात कसाबसा प्रवेश मिळवायला लागला होता. सर्वात महत्वाचे म्हणजे कस्तुरबा त्यावेळी त्यांच्या सोबत होती. गांधीजींना त्रास झाला. कस्तुरबाला होणाऱ्या त्रासाची त्यांना पूर्ण कल्पना होती. या प्रसंगाचे वर्णन गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रातून केलेले आहे. यातून कस्तुरबाविषयीच्या त्यांच्या मनातील कोमल भावनांचे दर्शन होते. ते लिहितात की ते जेव्हा कल्याण जंक्शनवर पोहोचले होते तेव्हा खूप दमून गेले होते. गांधीजींनी आणि मगनलाल यांनी स्टेशनच्या पंपाने पाणी काढून स्नान आटोपून घेतले होते. कस्तुरबासाठी काहीतरी व्यवस्था करण्याच्या प्रयत्नात होते इतक्यात 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया' सोसायटीचे सदस्य श्री कौल यांनी त्यांना ओळखले. तेही पुण्याकडेच निघाले होते. त्यांनी कस्तुरबाला दुसऱ्या वर्गातील स्नानगृहात चलण्याची विनंती केली. दुसऱ्या वर्गाच्या स्नानगृहाचा उपयोग करण्याचा हक्क कस्तुरबाला नाही हे जाणत असूनही गांधीजींनी परवानगी दिली. असे करणे हे सत्याला धरुन नाही याची त्यांना पूर्ण कल्पना होती. बरे, कस्तुरबालाही काही तिकडे जाण्याची मोठी हौस होती असे नाही. गांधीजींच्या मोहरुपी सुवर्णपात्राने सत्याचे मुख झाकून टाकले होते. पत्नीसाठी पतीने केलेला तो काहीसा पक्षपात होता.[४]

गोखले यांचे और्ध्वदेहिक आटोपले. गांधीजी कस्तुरबाच्या सोबत परतले. त्यांचे लंडन येथील मित्र डॉ. प्राणजीवनदास मेहता रंगून, बर्मा येथे रहात असत. त्यांच्या भेटीसाठी ते उभयता निघाले होते. तिथे पोहोचण्यापूर्वी त्यांची ख्याती पोहोचली होती. तिथे नेते, हिंदुस्तानी लोक, बौध्द साधुंनी त्यांचे स्वागत केले. कस्तुरबा गांधीजींच्या सोबत प्रवासात असायची. ती माणसे वाचत होती. प्रदेश बघत होती. जीवन समजून घेत होती. ती जीवन सन्मुख होती.

गांधीजींच्या प्रयोगक्षेत्रात कस्तुरबा अग्रगण्य होती. तिची वाट ती स्वत:च शोधत राहिली. त्या वाटेवर चालत राहिली. गांधीजींचे प्रयोग व आपली परंपरा यातील मूल्यव्यवस्थेचे आकलन करत राहिली. तिने बदलत्या जीवनमूल्यांची कालसापेक्षता समजून घेतली. अन्य भगिनींना मार्गदर्शन केले. गांधीजींच्या सोबत उभे रहाणे हे वेदीवर उभे रहाणे होते. कस्तुरबा वेदीवरली तुळस होती.

संदर्भ

१) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १३ पृष्ठ १०;

२) गांधीजींनी श्री नारणदास गांधी यांना दिनांक १९ जून १९१५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १३ पृष्ठ ११६;

३) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १३ पृष्ठ १७४ / १७५ / १७८ / १८३;

४) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ३८२

❖❖❖

## २) सत्याग्रहाश्रमाची स्थापना

गांधीजींच्या मनात आश्रमाविषयी ओढ होती. कस्तुरबानेही त्याचा रसास्वाद मनमुराद चाखला होता. उभयता अहमदाबाद येथे आले. गांधीजी आपल्या जुन्या मित्राना भेटले. आपण इथे स्थायिक होण्याचा विचार करत असल्याचे सांगितले. तिथे त्यांना एक अॅटर्नींनी मदत देऊ केली. ते गृहस्थ होते बॅरिस्टर श्री जीवनलाल देसाई. ते म्हणाले की अहमदाबादच्या बाहेर काही मैलांवर कोचरब नावाचे एक खेडे आहे. तिथे त्यांच्या मालकीचे एक घर आहे. तेथे तुम्हाला तुमचा आश्रम सुरु करता येईल. गांधीजी लगेच दुसऱ्या दिवशी जागा बघून आले. त्या गृहस्थांचा प्रस्ताव आनंदाने स्वीकारला. तो आरामशीर असा बंगला होता. त्या बंगल्यात आश्रम सुरु झाला. २० मे १९१५ रोजी सत्याग्रहाश्रमाची स्थापना झाली. यात सेवा होती. श्रम होते. सत्य तर अंतर्भूत होतेच. पंचवीस स्त्री-पुरुष होते. आश्रमासाठी नियमावली तयार झाली. आश्रमाचे नियम सर्वांना पाळावे लागणार होते. कोचरबला नोकर नव्हते. स्वावलंबनाचा पाठ प्रमुख होता. शुध्द शाकाहार आणि शरीरश्रमाचा आग्रह होता. सामाजिक सेवा आणि ब्रह्मचर्य व्रताचा विचार होता. प्रात:कालीन आणि सायंकालीन प्रार्थना होती. पुढे एकादश व्रतांचा संकल्प इथे सिध्दिला गेला.

सामुदायिक राहणीच्या दृष्टीने बंगल्याचे बांधकाम झालेले नव्हते. फिनिक्स येथील कार्यकर्त्यांची सोय होऊ शकेल एवढा त्याचा आवाकाही नव्हता. आजूबाजूला विस्तार करायला संधी मात्र अवश्य होती. एकूणच आश्रम सुरु करायला कोचरब ही योग्य जागा वाटत होती. अहमदाबादमधील श्रीमंत मित्राना त्यांनी एकत्र बोलावले. आपली योजना समजावून सांगितली. त्यांच्या अपेक्षेनुसार मदत करायला ही मंडळी तयार असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. आपली भूमिका स्पष्टपणे मांडत असताना गांधीजींनी त्यांना समजावून सांगितले की हा आश्रम सर्व धर्मांच्या आणि जाती-जमातींच्या लोकांसाठी खुला राहील. अस्पृश्यांना जर यात सहभागी व्हायचे असेल तर त्यांनाही प्रवेश असेल. ही आपली भूमिकाही मोकळेपणाने मांडली. कुणीही अस्पृश्य या आश्रमात प्रवेश घ्यायला तयार नसेल अशी लोकांची समजूत होती. कस्तुरबा आता आपल्या घरी आली होती. तिला एक कुटुंब म्हणून शांत, सुसंवादी आणि समंजस आयुष्य जगायची इच्छा होती. तिच्या मनात पुरेपूर आशावाद होता.

या आश्रमात करण्यासारखी अनंत कामे होती. दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्स व टॉल्स्टॉय या आश्रमांच्या तुलनेने इथे रहाणीमान अधिक काटकसरीचे होते. गांधीजींनी अतिशय कठोर अशी आचार संहिता या आश्रमासाठी तयार केली होती. त्यांनी केलेले नियम तसे सुपरिचितच होते. सत्याचे पालन करावे. अहिंसा धर्म पाळावा. ब्रह्मचर्य व्रताचे पालन करावे. चोरी करु नये. अधिक वस्तु स्वत:जवळ बाळगू नये. आहारावर नियंत्रण असावे. विनयाने रहावे. यासारख्या काही गोष्टी होत्या. विदेशी कापड वापरणार नाही. निर्भय राहीन. सर्वात महत्वाचे म्हणजे अस्पृश्यता पाळणार नाही. या शपथा होत्या.

पुढे आश्रम साबरमती नदीच्या काठावर आला होता. या नदीच्या काठी पुराण काळी दधीची ऋषींचा आश्रम होता. आश्रमाला लागून दक्षिणेला दुधेश्वराचे मंदीर होते. समोरच्या घाटावर स्मशान होते. उत्तरेला मैलभर अंतरावर मुख्य तुरुंग होता. पहाटेच्या वेळी नियमितपणे मंदिरात शंखाचा ध्वनी निनादायचा. रात्री क्वचित् आकाशात उसळी घेणाऱ्या चितेच्या लाटा थरथरायच्यात. तुरुंगाची भयद शांतता होती. या लगबगीवर कंटाळून पाटीवर रेघोट्या काढणाऱ्या शाळकरी मुलासारखी ती शांतता एक नि:शब्द ओरखडा ओढत रहायची. आश्रमात मातीच्या विटांचे बांधकाम होते. उतरती कौलारु छपरे होती. लाकडांचे खांब व तुळया होत्या. शाळा, स्वयंपाकघर, भोजनगृह, ग्रंथालय, विणकामासाठी खोली होती.

पुढे 'हृदय कुंज' मध्ये गांधीजी व कस्तुरबा आले. तिथे एक मोठा हॉल, तीन खोल्या, छोटेसे स्वयंपाकघर, भंडारघर होते. कस्तुरबासाठी मागे एक खोली होती. मोठा हॉल होता. पुढची खोली होती. नदीसमोरील व्हरांड्याचा वापर गांधीजी करायचे. पुढे गरजेप्रमाणे इमारती वाढल्यात. चांगल्या संडास-मुताऱ्या आल्या.

सांडपाण्याच्या निचऱ्यावर गांधीजींचा भर असायचा. आश्रमासाठी रुंद रस्ता हवा. आश्रमात चारी बाजूला झोपड्या होत्या. चटईच्या भिंती आणि चटईचे छत. तळाशी धूळीचे नांदते साम्राज्य होते. अशात पाऊस म्हणजे काय मौज !

झोपडीतले कार्यकर्ते महालात राहिल्यासारखे रहात असत. सीता वनात गेली आणि असे म्हणाली होती की तिला त्या कुटीतच राजभवन भासते आहे. इथे तशी अवस्था होती. सारे कार्यकर्ते कामाला लागले. सारे मजुरांच्या सोबत राबत. आश्रमातले कार्यकर्ते आणि विद्यार्थी कामाला लागले. जीवापाड मेहनत घेतली. साबरमतीच्या भगदाडातील काटेरी झुडुपे साफ केली गेली. वालुकामय व गोखरुवाली जमीन साफ झाली. भाजीपाल्यासाठी शेत तयार झाले. जागोजागी निंब लावण्यात आले. बघता-बघता ओसाड जंगल हिरवेगार झाले.

साबरमतीचा आश्रम प्रयोगशाळा होता. आश्रमात सेवा करता-करता शिक्षण घ्यायचे होते. जीवनात साधेपणा आणायचा होता. संयमासाठी सातत्याने प्रयत्नशील रहायचे होते. सेवा, साधेपणा आणि संयम हा आश्रम जीवनाचा पाया होता. सर्वात आधी संडास सफाई बद्दल कौशल्य मिळवणे गरजेचे होते. स्थायी आश्रमवासियांनाच नव्हे पण काही काळ तिथे राहू इच्छिणाऱ्यांनाही संडास सफाईचे काम अनिवार्य होते. त्यावेळी पाट्यांचे संडास असत. त्यांना साफ करण्याची गांधीजींची एक विशिष्ट पध्दत होती. ती अतिशय स्वच्छ व सुरक्षित होती. अजिबात किळस न वाटणारी होती. यात या पती-पत्नीला सारखेच प्राविण्य लाभले होते. दुसरे कौशल्य वस्त्र विद्येतले प्राविण्य होते. साबरमती आश्रमाच्या उद्योग मंदिरात वस्त्र विद्येचा विकास झाला होता. वस्त्र विद्या म्हणजे कापूस स्वच्छ करण्यापासून तर विणण्या-शिवण्यापर्यंतच्या तमाम प्रक्रिया. अनेक लोक या विद्येत पारंगत होते. त्यांचे सूत बारीक, एकसारखे आणि कसदार असायचे. महिलांच्या अंगावर गुंजभर सोने नसायचे. काचेच्या एकेका बांगडी व्यतिरिक्त दुसरा दागिना नसायचा. घरात सामानही मोजके असायचे. दळण्यासाठी जाते. स्वयंपाकासाठी चूल, पोळपाट-लाटणे. सेवेसाठी चरखा. पेळू. लिहिण्यासाठी लेखणी व शाई असायची.

आश्रमात सामुदायिक प्रार्थना होती. सुप्रसिध्द संगीतकार श्री पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांना विनंती केली गेली होती. त्यांनी आश्रमासाठी अनुकूल अशा श्री पंडित नारायण मोरेश्वर खरे यांना पाठवले होते. हे संगीतज्ज्ञ प्रात:कालीन आणि सायंकालीन प्रार्थनेत उपस्थित असायचेत. खरे शास्त्री म्हणजे भक्ती आणि शास्त्रीय संगीताचे थोर सुपुत्र! विद्वानांनी पसंत केलेल्या भजनांना पंडितजी शास्त्रीय रागात बसवत आणि गात. आश्रमाची गोशाळा हेही आश्रमाचे महत्वाचे अंग होते. सर्व आश्रमवासी आकाशाच्या खुल्या छताखाली झोपत. हे आश्रमाच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक होते. सारे नदीच्या गार पाण्याने स्नान करत. घंटेच्या ठोक्यासोबत सारी कामे चालत. आदेश काय तो घंटानादाचा होता. डोळ्यात भरणारी स्वच्छता विशेष होती. साबरमती आश्रम नव्या-जुन्या परंपरांचे प्रतीक होते. त्या संस्कृतीची पाळेमुळे प्राचीन भारतीय सभ्यतेत होती. त्याच्या शाखा मानवीय सभ्यतेपर्यंत पोहोचलेल्या होत्या. साबरमती आश्रम जुन्या मुळांवर उभारलेला नवा वृक्ष होता. कस्तुरबाला सणावारांची बित्तंबातमी ठाऊक असायची. कुठल्याही सणावाराला अस्वाद व्रताला ओलांडून न जाणारा प्रसाद सर्वांना मिळायचा. तिच्या अनुपस्थितीत उत्सव-सण-वार-व्रते यांचा कुणालाही पत्ता नसायचा.

कस्तुरबा रोज वृत्तपत्रे वाचायची. सर्व घडामोडींची माहिती करुन घ्यायची. युध्दाच्या संहारकारी बातम्यांनी तिचे चित्त पिळवटून निघायचे. 'ही युध्दे जगाचा विनाश करुनच थांबतील का?' असा दु:खोद्गार ती काढायची. मानवतेच्या कल्याणासाठी तिचा सवाल रोखठोक असायचा. बंगालच्या दुष्काळाबाबत येरवडा येथून लिहिलेल्या एका पत्रातून तिने लिहिले होते 'बंगालच्या बातम्या ऐकून-वाचून हृदयाचा थरकाप होतो. बंगालवर तर जणू आकाश कोसळले आहे. देवाच्या मनात कायच आहे. कोण जाणे?' कस्तुरबासाठी गीतेचा कर्मयोग महामंत्र होता.

कस्तुरबा हसतमुख होती. ती हसत रहायची. आल्या-गेल्याचे स्वागत करायची. हसतमुखाने निरोप द्यायची. स्वागतासोबतचे तिचे स्मित अतिथी-अभ्यागताला आपलेसे करुन घेई. निरोप देताना तिची नजर नितळ असायची. ती 'पुनरागमनाय च' अशी जणू हाक द्यायची. तिच्या हसण्याच्या पायी किणकिणत्या तोरड्या होत्या. त्यात सुमधुर घुंगरु होते. त्यांना भावसमृध्दिच्या पारिजात पुष्पांचा सुवास होता. तिच्या व्यक्तिमत्वाच्या सरितेला ममत्व आणि मातृत्वाचे काठ होते. तिचे हास्य हे तिच्या मुग्ध व्यक्तिमत्वाचे अविभाज्य अंग होते.

गांधीजींनी ५ एप्रिल १९३२ रोजी येरवडा सेंट्रल तुरुंगात 'सत्याग्रह आश्रमाचा इतिहास' लिहायला सुरुवात केली. ते लेखन १९५५ साली प्रकाशित झाले. यात कस्तुरबाचा 'अस्पृश्यता' या उप शीर्षकात उल्लेख आला आहे. गांधीजी लिहितात की १९१५ साल उजाडले. साबरमती आश्रमाची स्थापना झाली. मुंबईत एक हरीजन शिक्षक होते. त्यांचे नाव श्री दूदाभाई. त्यांची बायको सौ. दानीताई. त्यांची मुलगी लक्ष्मी. श्री अमृतलाल ठक्कर यांनी आश्रमात त्यांची भरती करायचा प्रस्ताव मांडला होता. त्यांनी सांगितल्यावर या कुटुंबाला बोलवायलाच हवे होते. गांधीजींनी त्यांच्या येण्याविषयी संमतीदर्शक पत्र लिहिले. महिन्याभराच्या आतच दूदाभाईंचे कुटुंब आश्रमात रुजू होणार होते. नियमांचे पालन करणार होते. त्यांना आश्रमात घेतले गेले. या कुटुंबाच्या आश्रमात येताच मोठी खळबळ माजली. गांधीजींनी सांगितले 'दूदाभाई, तुम्ही सारे आज आमचे पाहुणे म्हणून आमच्यासोबत जेवाल !' रामा---रामदास हा गांधीजींचा मुलगा. त्याच्याकडे वळत गांधीजींनी त्याला पाहुण्यांची खरकटी भांडी घासून टाकायला सांगितले. दूदाभाई मुंबईचा शिक्षक. त्याला वाटले रामा हा गडी असावा. लगेच त्याला खरे काय ते कळले. तो विनंतीपूर्वक नकार देत राहिला. गांधीजींच्या आग्रहापुढे त्याचा नकार चालू शकला नाही. गांधीजींच्या लक्षात एक गोष्ट आली. आश्रम निवासींच्या परिवारांच्या मनात अस्पृश्यांच्या विषयी सद्भाव नव्हता उलट घृणाभाव व परकेपणा होता. कस्तुरबा हे सारे बघत होती. तिला एकदम दक्षिण आफ्रिकेतील पंचमवर्णियाच्या लघवीपात्र फेकण्याच्या प्रसंगाची आठवण झाली. या निवेदनात आपल्या पत्नीच्या संदर्भात गांधीजी लिहितात.

"माझ्या पत्नीला खरे तर दक्षिण आफ्रिकेत खूप सोसावे लागले होते तरी स्पृश्यास्पृश्य भावना तिच्या मनात अजून टिकून होती. माझ्या पत्नीने आश्रमाच्या कडक नियमांचे पालन करावे वा आश्रमाचा त्याग करावा एथवर विषय पोहोचला. स्पृश्यास्पृश्य भाव जोपासणाऱ्यांनी तिला समजावले की पतीचे अनुगमन करणाऱ्या स्त्रीला पातक लागत नाही पण अनुगमन न केल्यास मात्र अवश्य पाप लागते. या मान्यतेने माझी पत्नी प्रभावित झाली आणि ती शांत झाली. पत्नीने पतीच्या पापकर्मात साथ देणे कुठल्याही प्रकारचे धर्मकृत्य आहे. असे खुद्द ती मानत नाही पण या प्रसंगी मी पत्नीच्या सहकार्याचे स्वागत केले कारण की स्पृश्यास्पृश्य भाव संपवणे माझ्या लेखी पुण्यकार्य होते. अस्पृश्यता निवारण आश्रमात रहायची अनिवार्य अट होती. यामुळे माझ्या पत्नीने जर या अटीचे पालन केले नसते तर तिला आश्रमाबाहेर जावे लागले असते. हे माझ्यासाठी दु:खद तर होतेच. जिने एथवर माझ्या सुख-दु:खात मोठमोठे कष्ट झेलून मला साथ दिली होती, तिचा वियोग सहन करणे अपार कष्टप्रद होते पण धर्मपालनासाठी येणाऱ्या कुठल्याही संकटाला सहन तर करायला लागणारच होते. यामुळे स्वतंत्र धर्मरुपाने पत्नीधर्म म्हणून जरी पत्नीने स्पृश्यास्पृश्य भावनेला तिलांजली दिली तरी हे स्वीकारायला माझे मन कचरले नाही."[१]

रलियात उपाख्य गोकी ताई ही गांधीजींची थोरली बहिण. ती पुराणपंथी होती. तिचा भावाशी असा संवाद झाला - 'मी आश्रमाच्या स्थापनेपासून आहे. असे कधी मी पाहिले नाही.' गोकीताई बोलल्या.

'हा बदल स्वीकारावा लागेल.' गांधीजींचा स्वर ठाम होता.

'मला फलाहारावर रहायची किंवा स्वत: स्वयंपाक करायची परवानगी मिळावी.' गोकीताईने प्रस्ताव मांडला.

‘ते शक्य नाही.’ गांधीजींनी स्पष्टपणे प्रस्ताव नाकारला. ‘मी सर्वांसोबत जेवायला तयार नाही.’ गोकीताई निकराने बोलल्या.

‘मग तुला आश्रमात रहाता येणार नाही.’ गांधीजींचा निर्णय ठरला होता. ‘काही धर्म-कर्म आहे. की नाही रे बाबा?’ गोकीताई काकुळतीला आल्या होत्या.

‘आश्रमातल्या स्वयंपाक घरातले अन्न सर्वांसोबत तुला घ्यावे लागेल.’ गांधीजींनी अखेरचा निर्णय दिला.

‘ही जबरदस्ती नाही का?’ गोकीताई अजून किल्ला लढवत होत्या. ‘नाही. हे पत्करले तरच तुला आश्रमात रहाता येईल, अन्यथा नाही.’ गांधीजींची तर्जनी उंचावली होती. ‘मला हे मान्य नाही.’ गोकीताईनेही आपला निर्णय व्यक्त केला.

‘मग काय करणार आहे.स तू?’ गांधीजींनी सारे पर्याय खुले ठेवत म्हटले.

‘मी आश्रम सोडायचा निर्णय घेते.’ गोकीताईंनी निश्चयपूर्वक सांगितले. गोकीताई राजकोटच्या वडिलोपार्जित जुन्या घरी निघून गेली. तिला दर महा पंधरा रुपये पाठवले जात. एवढी अल्प रक्कम सामान्य गरजा भागवू शकणारी नव्हती. ताई वड्या, पापड, शेवया करुन थोडी कमाई करुन घ्यायची. ताईला आश्रम व खरे म्हणजे भावाला सोडून जाताना खूप त्रास झाला.

या घटनेमुळे सहायक मित्रांमध्ये खळबळ माजली. विहीर एकच होती. विहीरीत बंगल्याच्या मालकाचाही वाटा होता. दूदाभाईला त्रास होऊ लागला. पुढे पैश्यांची मदतही थांबली.

या काळात गांधाजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले:

“प्रिय कस्तुर,

हे बघ. दूदाभाई आपल्या परिवारासह आश्रमात राहील. हे मगनलालला मान्य नाही. तो आश्रम सोडू म्हणत आहे. रलियाततताईला हे मान्य होणार नाही. ती स्वतंत्र राहील. तुला याचा विचार करुन घ्यावा लागेल. तुला जर हे मंजूर नसेल तर तू मोठ्या ताईसोबत राजकोटला रहायचा विचार करु शकतेस. मी दरमहा खर्चापोटी सहा रुपये पाठवत राहीन.”[२]

हे पत्र अगदी स्पष्ट आहे. यातून गांधीजींनी एकाच वेळी आपली थोरली भगिनी आणि पत्नी यांच्याविषयी लिहिले आहे. यातली भाषा अगदी निकराची आहे. हे गांधी चिंतन सामाजिक समरसतेच्या संदर्भात तपासता येते. ते बहिणीला काही पैश्यांची मदत करत होते. तशी मदत कस्तुरबाला करायला तयार होते. आपल्या निर्णयाविषयी ठाम होते.

गांधीजींचे हे मत स्पष्ट आहे. यावर कुठल्याही प्रकारचे भाष्य करायची गरज नाही. कस्तुरबाने अस्पृश्येतचा दाह सोसला होता. तरीही तिचे मन अजूनही स्पृश्यास्पृश्य भाव बाळगून होते. हे त्यांच्या लक्षात आले. हे सहन करणे त्यांना खूप क्लेशकारक होते. हे ते स्पष्ट शब्दात मांडतात. पारंपारिक संदर्भ समजून कस्तुरबाने गांधीजींचे अनुगमन केले असे ते म्हणतात. पत्नीचे आश्रमाबाहेर जाणे आपल्यासाठी दु:खदायक झाले असते असे ते मान्य करतात. आपल्या पत्नीच्या स्वार्थ त्यागाचा उल्लेख करतात. तिने झेललेल्या अपार कष्टांचेही त्यांना स्मरण आहे. हे असले तरी ते आपल्या मतावर ठाम आहेत.

हे सारे कस्तुरबाच्या व्यक्तिमत्वाच्या जडण-घडणीचे विविध पैलू आहेत. यातून तिच्या ऊर्ध्वगामी व्यक्तिमत्वाचा आलेख उंचावताना दिसतो. आश्रमात दलितांचे आगमन बायकांना रुचले नाही. कस्तुरबालाही फार आवडले असे काही सांगता येत नाही. तिच्या मनात तिरस्काराची भावना नव्हती. स्वागतशील भूमिका होती असेही सांगता येत नाही. होती ती उदासीनता! गांधीजींची नजर सूक्ष्म, कान तीव्र होते. कस्तुरबाला दक्षिण आफ्रिकेत असे अनेक अनुभव आले होते. हा अनुभव थोडा अधिक व्यापक होता. आपल्या भूमीतला अनुभव होता. आपल्या घरातली गोष्ट होती. आपल्या म्हणवल्या जाणाऱ्या आश्रमात असे होत होते. पुढे तिचे मन विस्तारले. दूदाभाईंची मुलगी लक्ष्मी ही कस्तुरबाची कन्या झाली. दूदाभाईने आश्रमाचा निरोप घेतला तेव्हा तर तिला मायेने रडे कोसळले होते. ‘आम्ही सुटीत परत येऊ. लक्ष्मी मोठी झाली की ती खूप दिवस आश्रमात राहील.’ असे ते बोलले. कस्तुरबासाठी सारे जग हळूहळू कुटुंब बनत चालले होते.

दुदाभाईंच्या निमित्ताने एकदा आश्रमावर बहिष्कार टाकल्या जाण्यासंबंधी अफवा पसरल्यात. कस्तुरबा घाबरी-घुबरी झाली. ती गांधीजींना भेटली. त्यांच्यात असा संवाद झाला. 'मी काय ऐकते आहे. हे? आश्रमावर लोक बहिष्कार घालताहेत.' कस्तुरबाने कासाविशीने विचारले. 'काहीही होवो पण अहमदाबाद सोडायचे नाही हा माझा निर्धार आहे.' गांधीजींचा स्वर दृढ होता.

'अहो पण कसे?' कस्तुरबाच्या काही ध्यांनात न आल्यामुळे तिने विचारले होते. 'हे बघ कस्तुर, आपण मजूरी करु. पोट भरु. हरिजनवाड्यात जाऊन राहू.' गांधीजींनी योजना सांगितली.

हा निर्धार झाला होता. अचानक मदत आली. आश्रम पूर्ववत सुरु राहिला होता. आश्रमात शेतीची जमीन मोकळी होती. तिथे भाजीपाल्यासोबत अन्य हिरव्या रंगांची उधळण होती. नदीच्या काठावर आश्रम असल्यामुळे साबरमतीत डुंबायची मोठी मौज होती. कस्तुरबाचे स्वयंपाकघर स्वतंत्र होते. ते सर्वांसाठी आणि मुख्य म्हणजे अतिथी-अभ्यागतांसाठी सदैव खुले होते. तिथे चहा, कॉफी, टोस्ट, लोणी, शंकरपाळे, गुळपापडी यापैकी काही-ना-काहीतर हमखास असायचेच. घर होते संयमी गृहस्थाचे पण स्वागतार्थ ते आनंदाने ओतप्रोत भरलेले होते.

गोखले यांच्या आग्रहावरुन गांधीजींनी त्यांना असे आश्वासन दिले होते की ते वर्षभर देशदर्शन करतील. नाक व कान उघडे राखतील. ओठ मात्र बंद ठेवतील. ते वर्ष पूर्ण होत होते. वर्षभरच्या मौनानंतर गांधीजी देशभर दौऱ्यावर जाऊ लागले होते. कस्तुरबा ज्या-ज्या वेळी शक्य असेल त्या-त्या वेळी त्यांच्यासोबत असायची. या दरम्यान तिला त्यांच्या सोबत बोलता यायचे. आश्रमीय जीवनाची चर्चा व्हायची. घरगुती बाबींवर बोलता यायचे. बोलायला एक मोठा अवकाश असायचा. नवा प्रदेश बघता यायचा. माणूस वाचणे तिच्या आवडीचा विषय होता.

आश्रमातील सकाळची प्रार्थना सुरु व्हायची. आसमंतात त्या प्रार्थनेच्या स्वरधारा आकाशातून बरसणाऱ्या देवाजीच्या करुणेसारख्या बरसत रहायच्यात. एक स्वर तन्मयतेने उभा रहायचा. त्याचा आधार घेऊन समूहाला त्या प्रार्थनेची संथा मिळायची. हरि: ओम् ।

***ईशावास्यम् इदं सर्वं यत् किं च जगत्यां जगत्***
***तेन त्यक्तेन् भुंजीथा: मा गृध: कस्यस्विद् धनम्*** [३]

अर्थात्: या जगतात जे काही जीवन आहे. ते सारे ईश्वरनिर्मित आहे. यामुळे ईश्वराच्या नावाने त्याग करुन तू यथाप्राप्त जे आहे. त्याचा भोग घे. कुणाच्या धनाची वासना करु नकोस.

पुढे ही प्रार्थना अशी असायची: मी प्रात:काळी माझ्या हृदयात स्फुरलेल्या आत्मतत्त्वाचे स्मरण करतो. हा आत्मा सच्चिदानंदस्वरुप आहे. हा परमहंसाची अंतिम गती असून हा जागृती, स्वप्न आणि निद्रा या तिन्ही अवस्थांना नित्य जाणतो आणि हे जे शुध्द ब्रह्मरुप आहे., ते तत्व मीच आहे. मी काही पंचमहाभूतांनी बनलेला देह नाही.

मी स्वत:साठी राज्याची कामना करत नाही, स्वर्गाची कामना करत नाही. मला मोक्षही नको. दु:खाने पोळलेल्या प्राणीमात्रांच्या पीडेचा नाश होवो एवढेच मी चाहतो.

आम्ही तुझे स्मरण करतो आणि तुला भजतो. तू जगताचा साक्षीरुपी आहे. आम्ही तुला नमन करतो. आम्ही सत्स्वरुपी एकमात्र निधान, निरालंब आणि या भवसागरासाठी नौकारुपी असलेल्या तुला शरण आलो आहोत.

या प्रार्थनेसोबत आश्रमाच्या दिनक्रमाला आरंभ व्हायचा. हा नेम होता. यात सर्वांनीच समाविष्ट होऊन आपल्या मनात एका सत् संकल्पाची उभारणी करायची असे धोरण होते. आश्रम सर्वांचा होता. सर्वांसाठी होता.

सांज ढळत असायची. सूर्य अस्ताला जात असायचा. सायंकालीन प्रार्थनेचे स्वर आसमंतात निनादत रहायचेत.

***यं ब्रह्मा-वरुणेंद्र-रुद्र-मरुत: स्तुन्वन्ति दिव्यै: स्तवैर्।***
***वेदै: सांग-पद-क्रमोपनिषदैर् गायंति यं सामगा:***
***ध्यानावस्थित-तद्गतेन मनसा पश्यंति यं योगिनो ।***
***यस्यान्तं न विदु: सुरासुरगणा देवाय तस्मै नम: ॥***

मग गीतेतले स्थितप्रज्ञ लक्षणांचे वर्णन करणारे श्लोक म्हटले जायचे.

प्रार्थना आटोपायची. कस्तुरबा प्रार्थनाभूमीत बसून रहायची. तिथे तिचा दरबार लागायचा. आश्रमातल्या तमाम भगिनी जमायच्या. दिवसभरात काय-काय झाले? कोण-कोण आले? कुणा-कुणाचे पत्र आले? कोण आजारी आहे. का? या सर्व चर्चा चालायच्यात. तिला अस्वच्छतेचा मोठा राग होता. अस्वच्छता तनाची असो वा मनाची. तिने घासून ठेवलेली भांडी छानसे हसायला लागत असत. आळस, कामातली दिरंगाई आणि सुस्तपणा तिला मुळी आवडायचा नाही. भोंगळपणा तिला कधी खपला नाही. कुणी बेंगरुळ राहिलेले तिला आवडत नसायचे. तिचे सारेकाम नेटके होते. व्यवस्थित होते. आपल्याला नावडणाऱ्या गोष्टींबाबत ती थेट ठपका ठेवायची. आळसाचे तर तिला खूप वावडे होते. थंडीच्या दिवसात एका शेगडीत चुलीतले उरलेले निखारे सजायचेत. गप्पांसोबत कोळसे फुलत रहायचे. मने उजळत रहायचीत. भजने गात-गात ती गोशाळेसाठी दळायला बसायची. प्रार्थनेत चालीवर 'रामचरित मानस' गायची. तिचा स्वरविलास स्निग्ध व श्रुतीमधुर होता.

भारतातल्या प्रवासात गांधीजींचे ठिकठिकाणी अपार स्वागत झाले. त्यांना व कस्तुरबाला मानपत्रे मिळालीत. मद्रासला त्यांच्या स्वागतासाठी आलेल्या मंडळींनी त्यांना कधी पाहिलेले नव्हते. त्यांना ओळख कशी पटावी? त्यांच्या स्वागतासाठी रेल्वे स्थानकावर आलेल्या विद्यार्थ्यांनी पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या डब्यात त्यांचा शोध घेतला. ते उभयता मात्र तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून उतरले. चार दिवसांच्या प्रवासाने ते दमून गेले होते. गांधीजींचा साधेपणा पाहून विद्यार्थी प्रभावित होऊन गेले होते. त्यांनी 'श्री व सौ. गांधी चिरायु होवोत.' अशा घोषणा देत गांधीजी व कस्तुरबा या उभयतांची मिरवणूक काढली होती. त्यांच्या स्वागतासाठी बग्गी आणली होती. बग्गीचे घोडे मोकळे सोडून दिले होते. सारे विद्यार्थी रथ ओढत होते. गांधीजी आणि कस्तुरबा यांच्याविषयी जनमनात असा आदर आणि अशी तन्मयता होती.

संदर्भ

१) संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५० पृष्ठ २२३;

२) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ११ सप्टेंबर १९१५ रोजी लिहिलेले पत्र;

३) ईशावास्योपनिषद १

❖❖❖

## ३) दयेची देवी

१८९४ साली डर्बन येथे, १९०३ साली जोहान्सबर्गला आणि १९१३ साली न्यू कैसल येथे गांधीजींना कार्याची संधी समोर दिसली होती. त्यांनी तिचा लगेच उपयोग करुन घ्यायचे ठरवले होते. हीच गोष्ट चंपारणविषयी घडली होती. पाटणा आणि उत्तर बिहारच्या दूरस्थ भागात गांधीजी चळवळीसाठी सज्ज झाले होते. भारतात आल्यावरचा पहिला लढा चंपारणचा होता. हा किसानांचा लढा होता. निळीशी संबंधित लढा होता. या कामात कस्तुरबा सातत्याने गांधीजींच्या सोबत होत्या. तत्कालीन पत्रव्यवहारातून याचे स्पष्ट संकेत वाचता येतात.

१९१७ साली गांधीजी व कस्तुरबा कलकत्ता येथे पोहोचले. हरीलालला मुलगी झाली होती. कस्तुरबा कलकत्त्यात थांबली होती. तिने नातीचे नाव मनू ठेवले. मुलगी नक्षत्रासारखी सुंदर होती. तिला भरपूर जावळ होते. गोरी गोरी पान. तिने नातीला पायांवर घेतले. पालथे घातले. लसूण टाकून तापवलेल्या कोमट तेलाचे थेंब नातीच्या नाका-कानात सोडले. टाळूत तेल भरु लागली. बाळाचे अंग चोळून-चोळून खसखसा धुऊन काढले. आंघोळ आटोपली. हाता-पायाच्या तळव्यांना, गाला-कपाळाला काजळाचे बोट टेकवले. तेच बोट मग आपल्या डोक्यावर पुसून घेतले. गुलाबसाठी शिरा भाजला. शेकशेकोटी केली. मालिश करवून दिली. लेकराला सांभाळले. बाळ-बाळंतिणीला जपले. तिचे मन लेकराच्या भवितव्यासाठी आक्रंदन करत होते.

गांधीजी चंपारण्याकडे निघाले होते. पोलाकही सोबत होता. कस्तुरबा कलकत्त्याहून आश्रमात परतली होती. काही दिवसात तिला गांधीजींची हाक आली. पत्र मिळाले. पत्रात चंपारणमधील कामांचा तपशील कळवला होता. पुढे म्हटले होते की ग्रामशिक्षणाची मोहिम सुरु करायची आहे. यासाठी आपण स्वयंसेवक शिक्षकांची भरती करत आहोत. आश्रमातील ज्यांना शक्य आहे. त्यांनी या मोहिमेत सामील व्हावे. शेतकरी भगिनी व शेतकऱ्यांच्या मुला-बाळांमध्ये काम करायचे होते. या कामासाठी कस्तुरबाने यावे असे पत्रात म्हटले होते. कस्तुरबा हुशार होती. अनुभवी होती. तिचा स्वभाव सुयोग्य होता. चळवळीसाठी हे फार आवश्यक होते.

मोतीहारीहून लिहिले की श्रीमती गांधी परवा २४ तारखेपर्यंत तिथे पोहोचेल. तिचे मुख्य काम महिलांच्या गाठी भेटी घेणेच असेल[१]

या पत्रातून कस्तुरबाच्या कामाची सुरुवात संवादापासून होईल असा संकेत गांधीजींनी दिला आहे. ज्या लोकांसाठी आणि ज्या लोकांमध्ये आपल्याला काम करायचे असेल त्यांच्याशी संवाद साधला जाणे आवश्यक आहे. या मतातून कस्तुरबाच्या कार्यशैलीची आखणी दिसते. भेटी-गाठीतून एकमेकांना अधिक जवळून व समर्थपणे समजून घेता येऊ शकते यावरचा गांधीजींचा विश्वास दिसतो. कस्तुरबा या संवाद कलेत पारंगत असल्याचेही आपल्या सहजच ध्यांनात येते.

कस्तुरबा जाऊन पोहोचली. यानंतर बेतियाहून गांधीजींनी लिहिले 'श्रीमती गांधी आणि देवदास सध्या येथे आहेत. मला जर अटक करण्यात आली तर श्रीमती गांधी व देवदास गरीब किसानांमध्ये काम करतील. त्यांना संघर्षासाठी प्रोत्साहित करतील.[२]

या पत्रातून गांधीजींनी कस्तुरबासाठी एक निश्चित असा कार्यक्रम दिला आहे. यातून कस्तुरबाविषयीचा त्यांचा विश्वास दिसून येतो. कस्तुरबाच्या सामर्थ्याचाही अंदाज येतो. कस्तुरबाच्या संदर्भात गांधीजींची मुद्रा वेळोवेळी तापस वैराग्याची दिसते. गांधीजींनी लिहिले की बा वर ज्या ज्या वेळी त्यांना राग येतो त्या त्या वेळी त्याचे प्रायश्चित्त ते स्वत:ला त्रास करवून घेऊन पूर्ण करतात. [३]

यातून गांधीजींच्या सत्याग्रही शैलीचे उद्‌घाटन होते. कस्तुरबाविषयीची त्यांची आत्मीयता प्रकट होते. चंपारण येथे निळीचा सत्याग्रह सुरु झाला होता. गांधीजींनी मुजफ्फरपूरहून खेड्यांकडे मोर्चा वळवला. त्यांच्या हे लक्षात आले की उत्तर बिहारात खूप प्रश्न आहेत. शेतकऱ्यांच्या फिर्यादी नोंदून घ्यायचे काम तर प्रमुख काम आहे. तिथली घाण, गरीबी, अज्ञान आणि भय याकडे त्यांचे लक्ष वेधले गेले. खेड्यांमध्ये रचनात्मक कार्याकडे त्यांनी लक्ष एकाग्र केले. फिर्यादी अधिक होते. त्यांची नोंद करुन घ्यायला कार्यकर्तेही

कमी होते. त्यांनी जाहीरपणे स्वयंसेवकांची मागणी केली. कर्नाटकहून विधिज्ञ श्री गंगाधरराव देशपांडे यांनी सर्वश्री बाबासाहेब सोमण आणि पुंडलिक कातगडे यांना पाठवले. मुंबईहून अवंतिकाताई गोखले आल्यात. पुण्याहून आनंदीताई वैशंपायन आल्यात. आश्रमातून निवडक कार्यकर्ते आलेत. सतरा वर्षे वयाचा त्यांचा धाकटा मुलगा देवदास आला. सर्वश्री महादेवभाई देसाई आणि नरहरीभाई परीख आलेत. त्यांच्या पत्नी दुर्गाताई देसाई व मणीताई परीख आल्यात. रचनात्मक कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांचा चमू असा सिध्द झाला.

गांधीजींना बिहारात शिक्षणाचा अभाव दिसला. पोरे गावात उनाडक्या करत. टिवल्या-बावल्या करत. कामाशिवाय नुसतीच हिंडत. अकारण फिरत. त्यांनी शाळा चालवायचे ठरवले. शिक्षक मिळेनात. त्यांना पदवीधारी शिक्षक नको होते. जीवनधारी शिक्षक हवे होते. गांधीजींनी कस्तुरबाला ही जबाबदारी सोपवली. ती काही शिकलेली नव्हती. तिच्या मनाचा कोंडमारा होत असायचा. पहिल्या भेटीपासून नवऱ्याने शिकायचा आग्रह धरला होता. 'शिकून घे कस्तुर' असे सांगितले होते. आपण लक्ष दिले नाही. 'आपले चुकले' हा बोध तिला सतत होत राहिला होता. आपण मागे राहिलो. आपण यांच्या आग्रहाला मान का नाही दिला? तिचे मन तिला जाब विचारु लागले होते. ती  हिरमुसली झाली. तिचे शिक्षण अल्प-स्वल्पच होते. दुर्गाताई व मणीताई थोडे गुजराती शिकलेल्या होत्या. त्यांना हिंदी भाषेचे ज्ञान नव्हते. चार बायका जमल्या होत्या. यातल्या साऱ्या बायका शिकलेल्या होत्या असे नव्हते. एकदा तर कस्तुरबाने नवऱ्याला विचारले

"हे बघा, मी शाळेत शिकवण्याचे काम कसे बरे करावे? मला ना लिहिता येत ना वाचता येत. मी शाळेचा उंबरठादेखिल कधी ओलांडलेला नाही." कस्तुरबाचा स्पष्टपणा या प्रश्नात होता.

'मला माहित आहे. सारे.' गांधीजींनी शांत चित्ताने सांगितले.

'मग मी काय करेन?' कस्तुरबाचा प्रश्न जागला.

'माझी शाळेची कल्पना काही केवळ अक्षरज्ञानापुरती मर्यादित स्वरुपाची नाही. तू शाळा झाडून काढशील. शाळा सारवून टाकशील. स्वयंपाक करशील.' गांधीजी म्हणाले.

'हे मला जमेल.' कस्तुरबाला आता खात्री झाली होती.

'तू या मुलांना शिकवायचे कामही करशील. ते समजून घे.' गांधीजींचा पुन्हा सल्ला होताच.

'पण मला बापडीला स्वत: तरी कुठे येते लिहायला वाचायला? मी काय शिकवणार?' कस्तुरबा काहीही न समजून विचारु लागली.

"अगं मुलाना लिहायला शिकवायचे नाही. वाचायला शिकवायचे नाही. व्याकरण शिकवायचे नाही. गणित शिकवायचे नाही. भूगोल शिकवायचा नाही. इतिहास शिकवायचा नाही. त्यांना जगायला शिकवायचे आहे. परसाकडेहून आल्यावर हात स्वच्छ धुवावेत. सकाळी दात घासावेत. नखे काढावीत. नाक शिंकरावे. जेवणापूर्वी हात धुवावेत. केसांवर कंगवा फिरवावा. ही रीतभात शिकवायची आहे." गांधीजींनी सारा पाठ्यक्रम समजावून सांगितला.

नवऱ्याच्या या निवेदनाने ती खूश झाली. ती अभिमानाने त्यांच्याकडे बघत होती. यांना कधीही कुठलीही अडचण अशी ती येतच नाही. ती कामाला लागली. गावोगावी हिंडली. लोकाना समजावू लागली. वाटेल तिथे थूंकू नये. रस्त्यात लघवी करु नये. चुकीच्या सवयी बदलायला हव्यात. रोज कचरा गोळाकरावा. गाव स्वच्छ ठेवावा. झाडू कसा तयार करावा? विहिरी कशा स्वच्छ ठेवाव्यात? सांडपाणी कसे वहाते ठेवावे? व्यक्तिगत आरोग्य कसे राखावे? हे सारे ती समजावून सांगत होती. तिला भाषेचीही अडचण आली नाही.

कस्तुरबाची शाळा सुरु झाली. बिहारात थंडी कडाक्याची! सकाळ झाली की झोपडीचे छत पांढरे शुभ्र होत असे. पिंजल्या कापसाचे पुंजके असावेत असे छत व्हायचे. गरीबीला पार नाही. एके रात्री उशिरा दुर्घटना घडली. त्यांची शाळा जळून गेली. शाळा म्हणजे बांबूंची झोपडी. गवताने शाकारलेली. या झोपडीला आग लागली. सोमणभाऊ काम बघत असत. आता आग लागली की लावली गेली? कुणावर शंका घेऊन काही उपयोग नव्हता.  त्यांनीच नव्याने ही शाळा उभारायचे

ठरवले. जळून गेलेली शाळा पुनरपि उभारायचे ठरले. हे काम करताना कस्तुरबा गवंड्याला वीटा, चुना, चिखल देऊ लागली. तिने श्रमदान केले. शाळा पक्की बांधायचे ठरवले. विटांचे पक्के घर हवे. अंगमेहनत करावी लागली. बघता-बघता नवी शाळा उभी राहिली. कमी वेळात घर उभे राहिले. आता शाळा जळणार नाही. अक्षरं जळणार नाहीत. इतरांना पाठ मिळाला.

आरोग्यविषयक कार्यकर्तेही लागणार होते. 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' मधून डॉ. देव आले. कस्तुरबाचा दवाखाना होता. औषधे कमी होती. सोडा बाय कार्ब, क्विनाईन, एरंडेल तेल, कोयनेल. बस झालीत औषधे. एखादे मलम. पोट साफ नाही का? एरंडेल घे. फोड झालेत का? हे घे मलम लाव. मलम दवाखान्यात लावले जायचे. घरी न्यायचे नाही. दुखणे मोठे असेल तर डॉ. देव मदतीला होते. दुखणी तशी किरकोळच असायची. यासाठी विशारदांची गरज नसायची. गावच्या भगिनींसोबत त्यांच्या सामाजिक चालीरीतींच्या संदर्भात बोलले जायचे. आर्थिक परिस्थितीविषयी चर्चा चालायची. त्यांना रामायण वा संत साहित्यातून काही उतारे वाचून दाखवायचे. हा शाळेचा अतिरिक्त विशेष पाठ्यक्रम होता.

गांधीजींनी या कामातल्या कस्तुरबाच्या सहभागाची सुरेख नोंद घेतली आहे. ते मिस्टर वेस्ट यांना एका पत्रातून लिहितात की औषधे आम्ही मोफत देतो. हे काम शिक्षणाशिवाय विश्वासपात्र माणसावर सोपवण्यात कुठलाही धोका नाही. उदाहरणार्थ कस्तुरबा एका शाळेत काम करते. ती मुक्तपणे औषधे वाटते. आतापर्यंत आम्ही मलेरियाच्या तीन हजार रोग्यांना आजारातून मुक्त करु शकलो. आजपर्यंत आम्ही तीन शाळा उघडल्यात. त्यात मुले व चार वर्षांखालच्या मुली मिळून अडीचशेच्या वर विद्यार्थी आहेत. सगळे शिक्षक स्वयंसेवक आहेत. या कामात सद्भाग्याने मला चांगले सहकारी लाभले.[४]

सफाईचे काम तर रोज असायचेच. हे अवघड काम होते. अंगणे घाणेरडी असायचीत. चौक अस्वच्छ असायचेत. विहीरींच्या आसपास भरपूर चिखल असायचा. खड्डयांचे साम्राज्य नांदते असायचे. कधी कामाला लोक पुढे येत. कधी 'हे आमचे काम नाही' असे म्हणत. कामात अजिबात भाग घेत नसत. इतरांनाही भाग घेऊ देत नसत. कोंडी करत असत. तरीसुध्दा काम काही थांबत नव्हते. काम आकाराला यायचे. साफसफाई हा फार मोठा विषय होता. छोटी-छोटी गावे होती. खेडी होती. पाडी होती. सारे वातावरण कमालीचे घाणेरडे असायचे. बायका कळकटपणे रहात. माणसांचे कपडे मळकट असायचे. मुलांचे तर काही विचारायलाच नको. झिंज्या वागवणाऱ्या झिपऱ्या मुली तर सर्वत्रच आढळायच्यात.

गांधीजींनी कस्तुरबाला सफाईचा विषय समजावून सांगितला.

"तुला भीतीहरवा गाव माहित आहे. ना? तिथे जा. बायकांचे कपडे खूप घाणेरडे असतात. त्यांना स्वच्छतेचा पाठ शिकव. मन वळव. घरातले मला माहित नाही पण रस्त्यावर हिंडणाऱ्यांचेही घाणेरडे कपडे असतात बघ." गांधीजी म्हणाले.

कस्तुरबाने इतर बायकांसोबत या विषयाकडे लक्ष द्यायचे ठरवले. एकदा तिने महिला व मुलींना नदीवर नेले. आधी मुलींच्या आंघोळी उरकल्यात. या दरम्यान तापल्या वाळूवर त्यांचे कपडे वाळले. महिलांचे दोन गट केले गेले. एक गट गळ्याइतक्या खोल पाण्यात उतरला. कपडे धुतले. स्नान केले. या दरम्यान दुसऱ्या गटातील महिला एकत्रित आल्यात. नदीकाठावर हातात हात घेऊन मानवी भिंत उभी केली. पहिला गट पाण्यातून परत आला. नंतर हा गट पाण्यात उतरला. स्नान करुन आलेल्या महिलांची भिंत आडोसा करायला पुरेशी होती. परतताना लेकरं हसत-खिदळत होती. महिलांचे लांबसडक केस धुतले गेले होते. त्यांच्या देहावर कांती झळाळत होती. त्या हसत गप्पा करत परत येत होत्या. हे इतके दिवस आपल्याला का नाही सुचले असे त्यांना वाटत होते. त्यांना आज आकाशातला सूर्य थोडा अधिकच प्रकाशमान वाटला.

गांधीजींनी स्वयंपाक्याला रजा देऊन टाकली. चंपारण्यात साधारणपणे पन्नास-पंचावन्न लोकांचा स्वयंपाक करायची जबाबदारी एकट्या कस्तुरबावर येऊन पडली. सरपणाचा पुरवठा नाही. धूराने डोळे लालीलाल होऊन जायचे. कार्यकर्ते गांधीजींना हे

सारे समजावून सांगायचे. या सांगण्याचा काहीही उपयोग होऊ शकला नाही. आपल्याला बचतीने लढा द्यायचा आहे. हे त्यांचे उत्तर असायचे. दौऱ्यावर असताना कस्तुरबा मातृभावनेने सर्वांना जपायची. काळजी घ्यायची. चंपारण्यातल्या संपूर्ण काळभर ती गांधीजींच्या समवेत राहिली.

एकदा असे झाले. कस्तुरबा निघाली. वेळ दुपारची होती. रणरणते ऊन. सोबत अवंतिकाताई होत्या. दुर्गाताई होत्या. तिघी सोबत निघाल्यात. एका चौकात थांबल्यात. एका झोपडीपाशी थबकल्यात. चौकात मोठे चिंचेचे झाड होते. प्रगाढ सावली होती. तसे बिहारात बांबू खूप. गवताला तर काही सुमार नाही. यापासून झोपड्या बनवायच्यात. एका झोपडीपाशी या तिघी जणी थांबल्यात. हाक मारली.

'कुणी आहे. का घरात? घरातून काहीही हालचाल कशी नाही?' कस्तुरबाची हाक गेली.

उत्तरादाखल अपार शांतता होती.

'तहान लागली आहे. बाई खूप. कुणी आहे. का घरात? पेलाभर पाणी मिळेल का प्यायला? दाराशी साऱ्या बायका आहोत तुमच्या.' कस्तुरबाने परत हाक मारली.

झोपडीचे कवाड कुरकुरले. किलकिले झाले. एक हात दाराच्या फटीतून बाहेर आला. हात कृश काळा कुळकुळीत होता. हातावर निळ्या रेषांचे घनदाट जाळे होते. हात काळा कळकट होता. हातातला पेला मात्र कमालीचा स्वच्छ होता. पेल्यातले पाणी झळाळते होते. कस्तुरबाने पेला हातात नाही घेतला. पाणी देणारे मनगटच हातात धरले. काळा लुकडा हात थरथरला. कस्तुरबाची पकड मजबूत होती.

'कवाड उघड बाई.' कस्तुरबा बोलली.

'लाज आती है.' आतला आवाज थरारला.

'बाई ग, तू का नाही येत स्वराज्याच्या कार्यक्रमासाठी बाहेर?' कस्तुरबाने समंजसपणाने विचारले.

'अडचण आहे. बाई.' आतला स्वर कापरा होता.

'कसली अडचण आहे.?' कस्तुरबाने थेट विचारुन घेतले.

"काय करु बाई? आम्हाला चळवळीत सामील व्हायची खूप इच्छा आहे. आम्हाला वाटते की सभेला जावे. नेत्यांचे दोन शब्द आमच्या कानी पडावे पण काय करणार? मोठी अडचण आहे. या घरात तर या." आता आतल्या आवाजाने आमंत्रण दिले होते.

कस्तुरबा आपल्या सख्यांसोबत घरात गेली. घरात दोन बायका होत्या. एकीच्याही अंगावर धडपणे कपडे नव्हते. एका बाईने कस्तुरबाला सांगितले

"तुम्हीच पहा ना, येथे काही पेटी, कपाट, फडताळ वगैरे नाही. आमच्यापाशी कपडेच नाही तर ते ठेवावे तरी कुठे? आणि खरे तर ठेवावे इतके कपडे आहेत. तरी कुणाजवळ? आमच्यापाशी एकच एक साडी आहे. ती सासूबाईंनी नेसली आहे. आमच्याकडे दुसरी साडी नाही. साडी धुवायचा प्रश्नच नाही. महात्माजींना म्हणावे की आम्हाला कपडे देण्याची व्यवस्था करा मग मी रोज कपडे बदलून काम करायला तयार आहे." झोपडीतल्या स्वराने आपल्या दैन्याची कैफियत मांडली होती.

कस्तुरबा चक्रावून गेली होती. तिच्या सख्या आश्चर्याने मूढ बनून गेल्या होत्या. या भगिनी आपले दुखणे ऐकत आहे. असे कळल्यावर हिंमतीने दुसरा स्वर बोलला.

"आम्ही दोघ्या जावा घरात आहोत. सासूबाई घरातले एकमेव लुगडे नेसून बाजाराला गेल्या आहेत. अब्रु झाकण्यासाठी आमच्यापाशी दुसरा कपडा नाही. त्यामुळे आम्हाला घराच्या बाहेर पडता येत नाही. मन मारुन झोपडीत बसून रहावे लागते." त्या झोपडीतली एक बाई म्हणाली.

कस्तुरबाच्या प्रश्नाला हे उत्तर होते. सायंकाळी तिने दुपारची ही करुण कथा नवऱ्याला सांगितली. ते गंभीर झाले. त्यांच्या हृदयात वेदना जागली.

ही खरी परिस्थिती होती. हे काही खोटे नव्हते. एकच एक कपडा घरात असायचा. तो पुरुषाने अंगावर घ्यायचा. बाईला उरलेला अर्धा तुकडा अर्ध्या साडीसारखा नेसावा लागायचा. तो नेसून बाहेर पडावे लागायचे. त्यांना आपण कपडे देऊ शकतो का? हा सवाल होता. हिंदुस्तानात असल्या झोपड्या अगणित

आहेत. तिथे काहीही नाही. अंगावरचे कपडे तेवढे जेमतेम आहेत. खूप माणसे अशी रहातात.

कस्तुरबाने इथे जनतेची सेवा केली. लोक तिला 'दयेची देवी' म्हणू लागले होते. ती हिंदीतून भाषणे देत असे. गुजरातीतून भाषणे देत असे. तिला अक्षर ज्ञानाची उणीव कधी भासली नाही. ती साधे-सोपे बोलायची. विचारांचा प्रचार करायची. ग्रामोत्थान उपक्रमांना गती द्यायची.

कस्तुरबाच्या सोबतीला होत्या अवंतिकाताई गोखले. एकदा सायंकाळ झाली. सायंकालीन प्रार्थना आटोपली. अवंतिकाताईंना तिने विचारले की तुम्हाला तुमच्या भाषेतली काही गाणी आठवतात का? अवंतिकाताईंचा गळा गोड !

'होय तर, मला आमच्या मराठी भाषेतल्या ओव्या आठवतात ना.' त्या म्हणाल्या.

'म्हणा तर मग.' कस्तुरबाने आग्रह केला.

कस्तुरबाच्या या प्रस्तावावर अवंतिकाताईंचा गळा मोकळा झाला. त्यातून मोत्यांच्या सरींसारख्या ओव्या ओघळू लागल्यात. या देशातल्या एका प्रदेशात दुसऱ्या भाषेतली एक महिला गात होती. ते ऐकणारी महिलाही दुसऱ्याच प्रदेशातली होती. हा अद्भुत देश आहे. हेच खरे! ती गात होती.

कस्तुरबा थक्क होऊन हे ऐकत होती. तिला याचा अर्थ जेव्हा अवंतिकाताईंनी समजावून सांगितला तेव्हा ती एवढेच बोलली की आपले जगणे आणि सगळ्या स्त्रियांचे जगणे सारखेच ग बाई मग ती अगदी विहीर का असेना ! विहीरही स्त्रीच ना ! नदीही स्त्रीच. दु:खाचे सारे आदिस्रोत असे स्त्रीच असावेत. ती मनाशी विचार करु लागली. अवंतिकाताईचे गाणे तिला जीवनगाणे वाटले.

कलकत्त्याच्या 'द स्टेट्समन' या वृत्तपत्रात एक पत्र झळकले. पत्र होते आयर्विनचे. हा गोरा प्रमुख मळेवाला होता. त्याने गांधीजींच्या कार्यावर हल्ला चढवला. चंपारणमधल्या कस्तुरबाच्या उपस्थितीबाबत आक्षेप नोंदवला. आयर्विन म्हणाला की होमरुल आणि तत्सम समारंभांमध्ये आपल्या यजमानांच्या अनुपस्थिती दरम्यान मिसेस गांधींनी शाळा उघडण्याचा निव्वळ बहाणा केला आहे. खेड्यात बाजार भरवला आहे. गांधीजींनी या पत्राला उत्तर दिले होते. ते म्हणाले होते की आयर्विन यांनी भेकडपणा दाखवला आहे. या पृथ्वीवरच्या सर्वात निरागस स्त्रीयांमधल्या एकीवर हल्ला चढवला आहे. ती माझी पत्नी असतानाही मी हे वक्तव्य करत आहे. गांधीजींनी आयर्विन यांना लिहिले की एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर त्यांनी अशाप्रकारे चर्चा केली आहे. की त्यांना क्षमा केले जाऊ शकत नाही. माझा निर्देश गो-रक्षा विषयक प्रश्नाच्या संदर्भातला आहे.,आपल्या पत्रात ते पुढे लिहितात -

"आता दोन शब्द मी माझ्या निरपराध पत्नीविषयी सांगू इच्छितो. आपल्या वार्ताहराने तिच्यावर काय अपराध आरोपित केला आहे. हेही तिच्या बिचारीच्या ध्यानात येणार नाही. त्यांना गोरक्षाविषयक दोन्ही बाजारांविषयी काहीही माहिती नाही. अहो, मला स्वत:ला तरी आजवर (या तथाकथित बाजारांच्या स्थापनेच्या काही काळानंतरही) याविषयी काहीही माहिती नाही. श्री आयर्विन यांना जर माझ्या पत्नीचा परिचय प्राप्त करुन घ्यायचा मान लाभला तर त्यांच्या लगेचच लक्षात येईल की श्रीमती गांधी एक साधी-सरळ महिला आहे. जवळपास अशिक्षित आहे. त्यांना भेटल्यावर ते स्वत:ला या बाबतीत अधिक आश्वस्त करु शकतील की श्रीमती गांधींचा याच्या स्थापनेत मुळीच सहभाग नाही. अशा प्रकारच्या बाजाराची व्यवस्था राबवण्यात त्या सर्वथा असमर्थ आहेत. अखेरीस त्यांना लगेचच ज्ञात होईल की ते आपल्या पत्रात ज्या वेळेचा उल्लेख करताहेत तो वेळ कस्तुरबाचा मोकळा आहे.च कुठे? तो वेळ तर खेडयांमध्ये उभारल्या गेलेल्या शाळा चालवणाऱ्या अध्यापकांसाठी स्वयंपाक करण्यात त्या घालवतात. त्या अध्यापकांची काळजी वहातात. त्यांना वैद्यकीय मदत करतात. ग्रामीण भगिनींना आरोग्यविषयक साधे-सोपे नियम समजाऊन सांगतात. या कामी हिंडतात-फिरतात. त्यांचा वेळ तर या कामी व्यतीत होतो. श्रीमती गांधींनी भाषणे देण्याची वा वृत्तपत्राना पत्र लिहिण्याची कलाही अवगत करुन घेतलेली नाही, हेही मला सांगून टाकायला हवे.[५]

वृत्तपत्रांमधून सारखी अशी टीका यायची. संपादकीयांमधून गरळ ओकले जायचे. जमीनदारांचा विरोध वाढू लागला होता. गांधीजींच्या पाठीमागे सदा गुप्तहेरांचा ससेमिरा सुरु असायचा. काम सुरु होते. त्यात खंड नव्हता. एके दिवशी वृत्तपत्रातून छापून आले की कस्तुरबाई लोकाना फितवते. भडकवते. नवऱ्याचे काम पुढे चालवते. कस्तुरबाचे मन तिच्याशी बोलायचे. आपल्याला राजकारणातले काय कळते? आपण सेवेचे काम करतो. लोकाना स्वच्छता शिकवतो. आजारांवर औषधे वाटतो. इथली भाषा तिला परकी होती. इंग्रजी वर्तमानपत्रातले तिला काही कळत नव्हते. ती काही शिकायची धडपड करत होती. ती लोकाना काय आणि कशी भडकवणार होती? ही टीका तर सारखी सुरुच होती. हे धादांत असत्य होते. यातून तिच्या प्रभावशीलतेची मात्र साक्ष पटते. गोऱ्या इंग्रजांनी वृत्तपत्रांमधून तक्रार केली. "गांधीजी अनवाणी हिंडतात. त्यांची राहणी साधी आहे. ते जनमानसात अंधश्रध्दा पसरवतात. जनतेच्या भोळेपणाचा लाभ उठवतात. एवढेच नव्हे पण इतर चळवळींच्या निमित्ताने ते बिहारबाहेर जातात. कस्तुरबा मात्र इथेच थांबतात. बिहारी जनांना भडकवतात. दिशाभूल करतात."

एके दिवशी फिरायला जाताना कस्तुरबाच्या बांगडीची फिरकी कुठेतरी पडली व हरवली. सगळ्यांनी खूप शोधाशोध केली पण फिरकी काही सापडली नाही. गांधीजींनी विचारले की उशीर का होत आहे.? त्यांना उत्तर मिळाले की कस्तुरबाच्या बांगडीची फिरकी काही सापडत नाही. यावर ते म्हणाले की तिला सांगा की ते अजून हयात आहेत. त्यामुळे बांगडीशिवायच चल. उशीर होत आहे. कस्तुरबा मात्र ऐकायला तयार नव्हती. तिने का ऐकावे? बांगडी हे तर सौभाग्याचे लक्षण. अखेर निंबाच्या एका काडीची फिरकी केली. ती बांगडीत अडकवली. तेव्हा मग सारे निघाले.

चंपारण्यात कस्तुरबाला खूप शिकायला मिळाले. कार्यकर्ते विविध भाषा बोलणारे होते. शतकभरापासून दबलेली-पिचलेली जनता भयमुक्त होत होती. हे तिला अनुभवता आले. भयमुक्ती ही तर देशाच्या स्वातंत्र्याची किल्ली होती. चंपारण्याने सबंध देशाला सत्याग्रहाचा पदार्थपाठ शिकवला. चंपारण्य तसे पाहू गेल्यास बिहारचा एक जिल्हा. रचनात्मक कामांचा अनोखा अनुभव तिला तिथे मिळवता आला होता.

संदर्भ


१) गांधीजींनी जे. एल. मेरीमॅन यांना दिनांक २२ नोव्हेंबर १९१७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ९३;

२) गांधीजींनी एस्थर फैरिंग यांना दिनांक ९ जून १९१७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १३ पृष्ठ ४४५;

३) गांधीजींनी मगनलाल गांधी यांना दिनांक ३० नोव्हेंबर १९१७ च्यापूर्वी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ९७;

४) महादेवभाईनी डायरी: ( गुजराती ) श्री महादेव देसाई खंड ४ पृष्ठ २८ / २९;

५) 'स्टेट्समॅन' ला मोतिहारीहून दिनांक १६ जानेवारी १९१८ रोजी लिहिलेले पत्र ' श्री आयर्विनला गांधींचे उत्तर' या शीर्षकाने प्रकाशित झाले आहे आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ १३८ व १४०.


❖❖❖

## ४) खेडा जिल्ह्यात कस्तुर

कस्तुरबाला आळस काय तो मुळी ठाऊकच नव्हता. तिला आळसावून झोपलेले कधी क्वचित्‌च कुणी पाहिले असेल. ती कमालीची स्पष्टवक्ता होती. खेडा जिल्ह्यात सत्याग्रह सुरु होता. त्या काळी तीही सत्याग्रहात होती. कधी गांधीजींच्या सोबत असायची. कधी स्वतंत्रपणे कार्य करायची. खेडा जिल्हयात तोरणा नावाचे एक गाव आहे. तिथे तहसीलदाराने जप्ती आणली. तेवीस घरांवर ताबा मिळवला. जप्तीत दाग-दागिने, भांडी-कुंडी, गाई-म्हशी यासारख्या वस्तु जप्त केल्या गेल्या होत्या. कस्तुरबाला हे कळल्यावर ती धावत निघाली. तोरणा निवासींना हिंमत दिली. लढण्याचे बळ दिले. लोकांना अपार आनंद झाला. महिलांनी तर तिच्यावर अक्षरश: पुष्पवृष्टी केली. तिथे सत्याग्रही महिलांना मार्गदर्शनपर भाषण दिले. सत्याग्रही लढ्याचा धर्म आणि मर्म समजाऊन सांगितले. आपल्या भाषणात ती म्हणाली -

“आमच्या घरातल्या पुरुषांनी सरकारच्या विरुध्द युध्द आरंभिले आहे. आपण त्यांचा उत्साह वाढवायला हवा. सरकारने दिलेल्या त्रास व दु:खांना सहन करायला हवे. ते आपली चीज वस्तु नेतील, गुरे-ढोरे नेतील. नेऊ द्या. आपल्या जमिनी हिसकावून घेतील. हिसकावू द्या. आपण सरकारला एका पैशाचाही महसूल देण्याचे पातक करणार नाही. प्रजा आपल्याला पिकाचे उत्पन्न मिळाले नाही असे म्हणते. सरकारने विश्वास ठेवायला हवा. विश्वास न ठेवता सरकार जर छळ करत असेल तर आपण सहन करु. आपली जिद्द सोडणार नाही. सरकारी नोकरांना भिऊ नका. धैर्य धारण करा. आपले पती, मुले व बंधू बांधवांना धीर द्या.”

कस्तुरबाचे हे साधे-सरळ पण प्रेरणादायी व्याख्यान होते. लोकांमध्ये जोश जागला. अनेक बहादुर भगिनींनी त्यांना वचन दिले की तुम्ही आमच्यासाठी केवढा त्रास घेता, कष्ट उपसता तर आम्ही का आणि कुणाला भ्यावे? आम्ही हिंमतीने राहू. सरकारला महसूल मिळू देणार नाही. देशभर किसान-श्रमिकांच्या लढ्यात महिला अग्रेसर होत्या.

कस्तुरबा अशाप्रकारे प्रत्यक्ष लढ्यात सहभागी होती. ती आपल्या सोबत स्त्री-शक्तिच्या जागरणाचा एक अभिनव प्रयोग करत होती. मुंबईहून श्रीमती जिनरामदास यांचे पत्र होते. त्यांनी कस्तुरबाला अखिल भारतीय महिला संघाचे सदस्यत्व प्रदान केले होते. गांधीजींनी पत्रातून लिहिले की श्रीमती गांधी जवळपास निरक्षर आहेत. त्या इंग्रजीत आपले नाव सुध्दा लिहू शकत नाहीत. त्यांना इंग्रजीतून सही सुध्दा करता येत नाही. तुमच्या रजिस्टरच्या शोभेसाठी तुम्हाला तिचे नाव हवे का? या पत्राला श्रीमती जिनरामदास यांनी गोड टोमणा मारला होता. त्यांना साबरमतीहून गांधीजींनी कळवले होते. त्यांनी लिहिले होते. कस्तुरबाला इंग्रजीत सही करता येत नाही या वाक्याचा अर्थ समजून घ्यायला हवा. त्यांच्या पत्रातील शब्दावली समजून घेतली पाहिजे. या वाक्यातून त्यांचे संपूर्ण म्हणणे स्पष्ट होत नाही. कस्तुरबाई ‘शिक्षित’ शब्दाच्या प्रचलित अर्थाने शिक्षित नाही. गुजराती लेखन-वाचनही तिला अगदी अल्प येते. कस्तुरबाई इंग्रजीतून सही करु शकत नाही, हे लिहिण्याचा उद्देश असा होता की ज्या संस्थेच्या सर्व सदस्या आपापल्या भाषा व इंग्रजीच्या विदुषी आहेत, त्या संस्थेच्या सदस्या बनायला त्या अगदी अपात्र आहेत[१]

आपल्या निवेदनातील स्पष्टता हे तर गांधी लेखन शैलीचे वैशिष्ट्यच आहे. या पत्रातून कस्तुरबाविषयीची त्यांची भूमिका कळते. लोक तिच्याविषयी काय विचार करत होते. काय अपेक्षा करत होते. याचा सम्यक्‌ उलगडा होतो.

रामदास गांधीला लिहिले की सध्या तर ते सारे विखुरलेले आहेत., तो तिकडे, मणीलाल फिनिक्समध्ये, देवदास बधरवा (चंपारण) येथे कस्तुरबा भीतिहरवा येथे, हरीलाल कलकत्त्यात आणि ते स्वत: भटकंतीत ![२]

गांधीजींच्या सोबत कस्तुरबा गुजरात दौऱ्यावर होती. उत्तरसंडा येथे गेली होती. सभेत जवळपास दोन हजार शेतकरी होते. या सभेत सोबत सरदार वल्लभभाई पटेल, महादेवभाई, शंकरलाल बँकर आणि अनसूयाताई होत्या. २० एप्रिल १९१८ रोजी कस्तुरबा गांधीजींच्या समवेत आनंद तालुक्यातील कासर, अजरपुरा आणि

समरखा येथे होती. तिच्या सोबत सरदार पटेल, मनु सुबेदार आणि अन्य साथीदार होते.

एप्रिल व जुलै महिन्यात गांधीजींनी कस्तुरबाला लिहिलेली पत्रे आहेत. ती विलक्षण मनोज्ञ व संस्मरणीय आहेत. दिनांक २३ एप्रिल १९१८ रोजी मुंबईच्या प्रवासात असताना रेल्वेतून त्यांनी लिहिले की मगनलालला आईचे सुख दे. त्याने आपल्यासाठी मोठा त्याग केला आहे. तो आपल्या कार्याचा उत्तराधिकारी होणार आहे. त्याच्या सुख-दु:खात सक्रियपणे सहभागी हो. काही पारिवारिक जबाबदाऱ्याही पूर्ण करायच्या आहेत. त्यांचाही निर्देश केला आहे. कस्तुरबाचे मनोबल सतत उंच राखण्याचे काम केले आहे. ते आपल्या जबाबदाऱ्या व आत्मोन्नतीचे साधन एकाकार करुन सांगत आहेत. आपण लवकरच परत येऊ असे आश्वासनही देताहेत.[३]

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतल्या सहकारी भगिनीला पत्र लिहिले. या पत्रातून लिहिले की श्रीमती गांधींमध्ये अद्भुत परिवर्तन झाले आहे. ज्या गोष्टींबाबत त्यांना गैरसोय वाटत होती त्या गोष्टी आता त्यांनी सुंदर तऱ्हेने आत्मसात करुन घेतल्या आहेत.[४]

दुसरे पत्र नडियादहून पाठवलेले आहे. यातून ते कस्तुरबाचे मन वाचताहेत. तिच्या दु:ख-वेदनांशी आपल्या मनाची नाळ जुळल्याचे सांगताहेत. आपल्याला कर्तव्य पार पाडावेच लागेल हा आग्रही विचार त्यांनी मांडला आहे. प्रेमाच्या व्यापकतेत सौंदर्य आणि शांतता सामावली असल्याचे आपले मत त्यांनी नोंदवले आहे. रुग्ण सेवेला ते ईश्वर सेवेचा पर्याय मानतात. महाराष्ट्रातील भगिनींची भेट घ्यायला सुचवताहेत. त्यांच्या लेकरांना खेळायला लावणे व त्यांना फिरायला घेऊन जाणे हे करावे लागेल हे सांगत असतानाच ते आपल्याहून वेगळे नाहीत ही भूमिका मांडताहेत. त्या भगिनींच्या मनावरही हा भाव बिंबवावा लागेल असे सांगताहेत. कर्तव्याचे पाठ देताहेत. मानवी मनावर विजय प्राप्त करुन घ्यायची किल्ली हाती सोपवताहेत. सद्‌ग्रंथांच्या वाचनाचा आणि श्रवणाचा आग्रह धरताना दिसताहेत. स्वाध्याय करायची सूचना देताहेत.[५]

गांधीजींनी लगेच पत्र लिहिले आहे. की ते कस्तुरबाचे मन तर समजून घेताहेतच पण कर्तव्य कर्मांकडेही त्यांना पाठ वळवता येणार नाही. कस्तुरबा आनंदी तर ते आनंदी आणि कस्तुरबा नाराज- नाउमेद तर तेही नाराज असे गृहस्थधर्माच्या यशाचे एक समीकरण ते मांडताहेत.[६]

दोन दिवसानंतर गांधीजींनी आणखी एक पत्र पाठवले आहे. ते फारच हृदयस्पर्शी आहे. यातून दोघांच्या एकाकार असण्याचे अद्भुत उद्‌घाटन ते करताहेत. हे पत्र नेहमीप्रमाणे ‘प्रिय कस्तुर’ या संबोधनाने सुरु होते. हे का खरेच कस्तुरबाना लिहिलेले पत्र आहे. की हा त्यांचा स्वत:शी संवाद आहे.? ‘तुला माझ्यासोबत यायची इच्छा आहे.’ या वाक्याचा अर्थ ‘मला तुझ्यासोबत प्रवास करायचा आहे.’ असा नाही का होत? ‘वियोगात आनंद उपभोगायला आपण आता शिकलो आहोत.’ या वाक्याचा कर्ता ‘गांधीजीही’ आहेत.च ना? आणि ‘ईश्वराची इच्छा असेल तर आपण पुन्हा लवकरच भेटू.’ या आशावादी वाक्याचा अर्थ मग कस्तुरबाला हळूहळू उलगडत गेला. दोघांच्या एकत्वाची भावना कस्तुरबाप्रमाणे गांधीजींच्या मनातही अधिक प्रबळ असल्याचे यातून व्यक्त होते. खरे तर हे अनेक अर्थाने गांधीजींनी स्वत: स्वत:लाच लिहिलेले पत्र आहे.[७]

नडियादहून गांधीजींनी आपल्या मुलाला लिहिले की ते ज्याप्रमाणे आपल्या प्रयोगांसाठी बळी गेले आहेत. तसेच मणीलाल व कस्तुरबासुध्दा बळी गेले आहेत. कस्तुरबा समजून गेली आहे. यामुळे तिने जेवढे कमावले तेवढे कुठल्याही अन्य महिलेने कमावलेले नाही.[८]

हिंदू भगिनी मंडळाच्या सचिव रसिकमणी यांचे निमंत्रण होते. त्यांच्या मंडळाचा वार्षिक उत्सव होता. दादाभाई नौरोजी यांचा जन्मोत्सव होता. कार्यक्रम मोठा होता. त्या कस्तुरबाना सभेचे अध्यक्षपद भूषवण्याच्या संदर्भात बोलावत होत्या. त्यांना उत्तरादाखल गांधीजींनी लिहिले.

“प्रिय ताई, (रसिकमणी) आपण माझ्या धर्मपत्नीच्या नावे पाठवलेले पत्र मी कालच वाचू शकलो. यामुळे उत्तर द्यायला विलंब होत आहे., क्षमा करावी. आम्ही जरी दोघे स्वतंत्र असलो आणि आपापल्या अधिकारांचा उपयोग करणारे असलो तरीही सोईनुसार आम्ही आपापल्या

क्षेत्रांची वाटणी करुन घेतली आहे. विशेष म्हणजे आमचे लग्न झाले तेव्हा तर माझ्या धर्मपत्नीला लिहिता-वाचता येत नव्हते. खूप परिश्रमपूर्वक मी तिला थोडे शिकवले तरीही अनेक कारणांमुळे समाधानकारकरित्या शिकवू शकलो नाही. यामुळे आपला प्रस्ताव स्वीकार करता येत नाही. माझी धर्मपत्नी खुर्चीत बसून भाषण वाचून देईल असे वाटत नाही. ती आपले भाषण तयार करुच शकत नाही. आपल्या कार्यप्रवृत्तिंच्या संदर्भात तोंडी काही समजाऊन सांगू शकेल असे तिला काही ज्ञान नाही. यामुळे नाइलाजाने आम्ही उभयता आपणा सर्व भगिनींची क्षमा चाहतो.[९]

गांधीजींच्या मनात सार्वजनिक कार्यक्रम आणि सार्वजनिक समारंभांच्या संदर्भात एक प्रकारची ऊंची आहे. राष्ट्रपुरुषांच्या संदर्भात सन्मानाची भूमिका आहे. त्याचा इथे प्रत्यय येतो. आपली पत्नी शिकलेली नाही हे त्यांनी मोकळेपणाने लिहिले आहे. यासोबतच ती स्वतंत्रपणे विचार करु शकते हे सांगायलाही ते चुकत नाही. ती आपला निर्णय आपण घेऊ शकते हेही ते सांगून टाकतात. हे विशेष आहे.

संदर्भ


१) गांधीजींनी श्रीमती जिनरामदास यांना दिनांक १० फेब्रुवारी १९१८ च्या पूर्वी लिहिलेले पत्र;

२) गांधीजींनी रामदास गांधी यांना दिनांक २७ फेब्रुवारी १९१८ रोजी लिहिलेले पत्र;

३) गांधीजींनी कस्तुरबाना दिनांक २३ एप्रिल १९१८ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ३४७ -३४८;

४) गांधीजींनी सोंजा श्लेसिन हिला नडियादहून दिनांक २३ जून १९१८ रोजी लिहिलेले पत्र;

५) गांधीजींनी कस्तुरबाना नडियादहून दिनांक २९ जुलै १९१८ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ४९७;

६) गांधीजींनी कस्तुरबाना खेडा जिल्ह्यातील नडियाद येथून दिनांक ३१ जुलै १९१८ रोजी लिहिलेले पत्र;

७) गांधीजींनी कस्तुरबाना नडियादहून दिनांक ३१ जुलै १९१८ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ४९९;

८) गांधीजींनी नडियादहून मणीलाल गांधी यांना दिनांक ३१ जुलै १९१८ रोजी लिहिलेले पत्र;

९) गांधीजींनी रसिकमणी यांना दिनांक १२ ऑगस्ट १९१८ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १५ पृष्ठ १९.


❖❖❖

## ५) हरीलाल

कस्तुरबाचे व्यक्तिमत्व सदैव विकसलेले दिसून येते. त्याच्या मूळाशी तिचे वैष्णव संस्कार आहेत. परिवार आहे. परंपरेचे पायस आहे. आपण एका परिवाराला आकार आणि आधार देऊ शकू ही ठाम भूमिका आहे. मुख्य म्हणजे ती आई आहे. एक कन्या सून म्हणून श्वसुर घरात प्रवेश करते. पुढे एक सामान्य बाई समर्थ आई बनते. असा एक अद्भुत व अविश्वसनीय प्रवास कस्तुरबाने केला आहे. तिच्या मनात खोलवर मुरलेली ही माता अनेक कोणातून, नाना प्रसंगांमधून प्रकट होते. हे सारे बघणे स्वत:ला मातृतीर्थात स्नान करवून घेण्यासारखे आहे. तिच्या व्यक्तिमत्वाच्या सरितेला मातृत्व आणि पत्नीत्व अशा दोन्ही किनाऱ्यांची ओढ आहे. तिचे चरित्र आणि चारित्र्य विलक्षण आहे. ती एक लेकुरवाळी माऊली आहे.

१९१८ च्या जून महिन्यात सून गुलाब लेकरांना सोबत घेऊन आश्रमात रहायला आली. कस्तुरबाला खूप आनंद वाटला. काहीसे नवलही वाटले. कस्तुरबा ती सायंकाळ विसरु शकली नव्हती. तिच्यात व गुलाबमध्ये पुढील संवाद झाला.

'आणि आई घरची परिस्थिती काय सांगू?' गुलाब कासावीस झाली. 'का गं गुलाब?' कस्तुरबाने विचारले.

'यांना व्यसन लागले आहे.' गुलाबचा स्वर गंभीर होता. 'काय म्हणतेस काय?' अविश्वासपूर्वक कस्तुरबाने विचारले.

'हो ना आई, यामुळे उधळपट्टी वाढली आहे.' गुलाब आपले दु:ख सांगत होती. 'अशावेळी चुकीच्या मित्रांचे फावते बघ.' कस्तुरबाला अनुभवांची उतरंड आठवत होती.

'ते मी कसे सांगू आई?' गुलाब थकून गेली होती. 'वाईट सवयी लागल्यात की काय बाई?' कस्तुरबा विचारत होती.

'त्या विषयी तर मोठा पाढा वाचून दाखववावा लागेल.' गुलाबने सांगितले. 'आणि त्याची नोकरी?' कस्तुरबाचा प्रश्न तसा निरर्थकच होता.

'नोकरी गेली आई.' गुलाब म्हणाली.

''रडू नकोस गुलाब तू.' कस्तुरबाने धीर दिला.

'आई.' गुलाबच्या कंठात हुंदका अडकला होता.

'माझा खरे तर विश्वास बसत नाही.' कस्तुरबा म्हणाली.

कस्तुरबाचा थोरला हरीलाल असे वळण चुकला होता. दक्षिण आफ्रिकेतला आदर्श सत्याग्रही वाट चुकला होता. तुरुंगात जाऊन आलेल्या निष्ठावान सत्याग्रह्याचे अध:पतन झाले होते. मुलगा बघता-बघता हाताबाहेर चालला होता. तिला मुलाचा खूप-खूप राग आला. तिला यामुळे अपार वेदना झाल्या. गुलाब आणि लेकरांची दया आली. मुलाविषयी कणव जागली. या सर्वांना खरे तर तिचे प्रेम हवे होते. लक्ष द्यायची गरज होती. मोठी नात रामी दहा वर्षांची झाली होती. कांती, रसिक, शांती या नातवंडांसमवेत एक वर्षांची नात मनूही होती. गुलाबचे नववधुचे रुप आता मावळून गेले होते. ती एक पोक्त बाई झाली होती. दोघांमधला स्नेह मात्र अविरत होता. गुलाबने सासूसमोर आपल्या मनाला मोकळीक दिली. नवऱ्याच्या चमत्कारिक स्वभावाच्या आठवणी सांगताना गुलाबच्या डोळ्यांना पाझर होता. कस्तुरबाच्या मनात विव्हळणे होते. हरीच्या मनात वडिलांविषयी शिगोशीग कडवटपणा भरला असल्याचे तिच्या ध्यांनात आले. तिच्या मनात मुलाबाबत खूप रागाची भावना उमटली. हळूहळू तिचा राग दु:खात बदलला. विरोध सून व नातवंडांच्या वात्सल्यात चिंब भिजून निघाला. ढगांचा प्रखर आणि आक्रमक वाटणारा गडगडाट कसा हळूहळू सहस्रधारा बनून बरसू लागतो तसे तिच्या रागाचे झाले. या सर्व परिवारासमवेत तिने मनमुराद सुखाचा अनुभव घेतला. नातवंडांना न्हाऊ-माखू घातले. अंगाई गीते गाईली. त्यांना रामायण-महाभारतातल्या कथा सांगत राहिली. त्यांच्या संगे गाणी गात राहिली. काय पण उत्साह होता तिच्या मनी त्यावेळी! छोट्या नातीला स्नानासाठी बसवायची आणि तिची रसवंती प्रवाहित व्हायची.

*वारता रे वारता भाभो ढोर चारता चपटी बोर लावता*
*छोकराव समजावता*
*एक छोकरो रिसायो कोठी पाछळ*
*भींसायो कोठी पडी आडी*
*छोकराए चीस पाडी अरर माडी*

*या गंमत गाण्याचा अर्थ असा होतो*
*एकदा गंमत झाली बाई, एक गंमत झाली !*
*गुरांना चारताना, छोटी बोरं आणताना,*
*बाळाला समजावताना*
*बाळ गेले रुसुन कोठी आड गेले लपून कोठी गेली*
*कलंडून बाळाला आले रडू, आई ग ! आई ग !!*

बाळाची आंघोळ झाली की मग कस्तुरबा गायला लागायची. तिला काय काय बाल गीते आठवायचीत. त्या वातावरणात ती तल्लीन होऊन जायची. तिचा गाता गळा मोकळा व्हायचा. बाल गोपाळांमध्ये ती हरवून गेली होती. हरखून गेली होती.

कस्तुरबाने मुलींचे केस रिठ्याने खसखसा धुतले. तेल भरले. सुरेख विंचरले. कपडे नेटकेपणाने नेसवले. चांगले-चुंगले खाऊ घातले. यात तिचा वेळ भुर्रकन उडून जात असे. नातवंडांना ती फेरफटका मारायला घेऊन जाई. गुलाबशी गप्पा मारी. आता हळूहळू गुलाबच्या चेहऱ्यावर आनंद आला. नातवंडांच्या खेळात दांडगाई आली. कस्तुरबाचे अलवार मन आता आनंदाने हसू लागले. लेकरे हसू-खेळू लागलीत. नाचू-बागडू लागलीत. घरात हसणे-खिदळणे आले. गुलाबचा चेहरा फुलला. गुलाबशी तिने खूप गप्पा केल्यात. एके दिवशी गुलाब लेकराना घेऊन राजकोटला गेली. तिथे तिची विधवा आई होती. कस्तुरबाने सर्वांना निरोप दिला. 'आजी आजी' अशा निरोपाच्या कलकलाटाने तिचे मन गलबलून आले. झाडावरली पाखरांची दुनिया एकदमच अदृश्य व्हावी असे तिला वाटले. त्या सायंकालीन प्रार्थनेत ती स्वत:शीच एकतान होती. अबोल, एकाकी आणि अनोळख्यासारखी ती आश्रमात राहिली. भरली मैफिल सूनी-सूनी झाली होती. बोलके झाड अचानकपणे मुके-मुके झाले होते.

३१ मे १९१५ रोजी हरीलालच्या तिसऱ्या मुलाचा जन्म आजोळी झाला. नाव ठेवले शांती. हरीलालने कलकत्त्यात नोकरी धरली होती. १९१७ रोजी हरीलालचे अखेरचे अपत्य मनू कलकत्ता येथे जन्माला आले. या बाळंतपणासाठी कस्तुरबा साबरमती आश्रमातून कलकत्ता येथे आली होती. माय-लेकराचे हे सान्निध्य सुखकर होते. हरीलाल कृतार्थ होता. त्याने स्वतंत्रपणे काही करायचे प्रयत्न केलेत. हा भला मुलगा. अनुभवाचा पत्ता नाही. बदनामी झाली. पैसा बुडाला. विख्यात वडिलांपर्यंत तक्रारी पोहोचल्यात. गांधीजींनी घोषित केले 'हरीलाल मोठा आहे. तो स्वतंत्रपणे वेगळा रहातो. त्याच्या उधारीची जबाबदारी मी घेत नाही.' पित्याचे हे म्हणणे काही चुकीचे होते असे नाही. मुलाने याची ना कधी मागणी केली होती ना कधी अपेक्षा ठेवली होती. दुर्दैवाने तो कर्ज व उधारीच्या जाळ्यात पुरता अडकला होता.

एकदा महादेवभाईंनी गांधीजींच्या पत्रातला मजकूर कस्तुरबाला सांगितला. पत्र हरीलालला लिहिलेले होते. त्यात एका पित्याचे दर्शन होते. हे पत्र प्रेमळ होते. छोटीशी मनू कशी अवखळ आहे. कशी तरतरीत आहे. कांती आणि रसिक त्याच्या अंथरुणावरच कसे बागडतात याचे चित्र रेखाटले होते. या लेकराना बघून आपल्याला आपल्या बालपणाची आठवण येत असल्याचे एका पत्रातून त्यांनी कळवले होते. हे ऐकून कस्तुरबाला असे वाटले की आता परत तिच्या कुटुंबात आनंदाची सरिता वहात आहे. तब्येत सुधारल्यावर कस्तुरबा, नातवंडे आणि शेळीला घेऊन गांधीजी साबरमती आश्रमात परतले.

ऑक्टोबर १९१८ साली हरीलालची पत्नी - गुलाब माहेरी - राजकोटला एन्फ्लुएंजाने आजारी पडली. १९१८ ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात हरीचा मुलगा शांती वारला. प्ल्यूने त्याचा बळी घेतला. आठ-दहा दिवसात गुलाब देवाघरी गेली. गुलाब हरीच्या संघर्षशील जीवनातल्या वाटचालीतली सुरम्य बाग होती. आपल्या प्रेम आणि समर्पणाने तिने हरीला जिंकून घेतले होते. अचानक तिने देवाघरची वाट धरली होती. एका प्रचंड वावटळीसारखे तिला मरण

आले. हरीच्या जीवनात बघता-बघता भयद उलथा-पालथ झाली. जीवनात वेदनांचा उजाड भकासपणा आला. मनाच्या तळाशी उध्वस्त भविष्याचे भग्नावशेष साचून राहिलेत. पत्नीच्या निधनानंतर हरीलालच्या जीवन मंदिरापुढील झगमगती दीपशिखा विझून गेली. छोटी-छोटी लेकरे पोरकी झालीत. हरी उध्वस्त झाला. त्याच्या पायाखालची जमीन सरकली. तो चोळामोळा झाला. कणाकणाने तो नाश पावत गेला. गुलाबचे असे अवेळी निघून जाणे त्याच्यासाठी जिवंतपणी मरणाचा अनुभव देणारे होते. उत्तरकार्य आटोपले. दिवस शोकाचे होते तर रात्री वेदनेच्या होत्या. निरोप घेताना कस्तुरबाने चारी नातवंडांची जबाबदारी उचलली. एका धुळकट प्रस्थानासोबत घेतलेली शिदोरी तिच्या सोबत होती. हा एक प्रदीर्घ प्रवास होता. तिची अनेक स्वप्ने काळाच्या भयद पापणीवर स्थिर राहू शकली नव्हती. तिच्या आरंभिक व्यक्तिमत्वाच्या भोवताली निर्बंधांच्या कुंपणाची अंधारभरली सावली होतीच. कुटुंबातले तमाम कलंक हरीलालने पत्करले. वडिलांना तो कदापि विसरु शकला नाही. आपली निराशा घालवू शकला नाही. तो क्षत-विक्षत झाला. पुरता उध्वस्त झाला. गांधीजींच्या मोठेपणाच्या वेदीवर बळी चढला.

गुलाबचे जाणे कस्तुरबाला अंतर्यामी खूप थकवणारे होते. एकटे-एकाकी करणारे होते. तिच्या जाण्यामुळे हरी एकाकी झाला. उदास झाला. त्याला दारुचे व्यसन लागले. त्याच्या जीवनातले माधुर्य संपून गेले होते. कस्तुरबाचे मन विचार करत राहिले. हरी अंतर्यामी प्रेमाच्या अमृतरसाने समृध्द होता. तो का पतीत म्हणायचा? त्याच्या विद्रोहाची क्लेशभरली पराकाष्ठेची प्रतिक्रिया म्हणजे त्याचे दारू पिणे होते. बाह्य व्यवहारांबाबत त्याचे हृदय उजळ होते. निराशेच्या निबीड अंध:कारातही तो कधी संवेदनाशून्य बनला नाही. चांगल्या-वाईटाचा विवेक त्याला करता आला. त्याचा विद्रोह, विरोध व प्रताडन ही सारी आत्मपीडेचीच तर रुपे होती. त्याने स्वत:च स्वत:ला शिक्षा करुन घेतली होती. वयाच्या तिसाव्या वर्षी हरीने गुलाबचा वियोग झेलला. नातवंडे आजी-आजोबांकडे साबरमती आश्रमात राहिली.

१९२२ साली हरीलाल गांधीजींना भेटला. चौतीस वर्षे वयाच्या मुलाने पुनर्विवाहाची इच्छा व्यक्त केली होती. गांधीजींनी विरोध केला. कस्तुरबाने परवानगी दिली नाही. गांधीजींच्या नकाराचे कारण नैतिक होते. कस्तुरबाचे व्यावहारिक होते. मुलाना सावत्र आई नको असे तिला वाटायचे. हरीलाल वडिलांशी वाद घालू शकत होता. वडिलांचे मत त्याने आईला सांगितले. कस्तुरबा म्हणाली "खरे आहे. तुझ्या वडिलांचे म्हणणे. विधवांचा प्रश्न बिकट आहे. बालविवाह होतात. मुली बाळपणीच विधवा होतात. त्यामुळे मुले असलेल्या किंवा मुले नसलेल्या विधवेशी तू लग्न केलेस तर माझी काही हरकत नसेल." गांधीजी पुढे बोलले 'ज्या महिलेला तुझ्याइतकी लेकरे असतील तिच्या लेकरांना तू आणि तुझ्या लेकराना ती सांभाळायला-जपायला तयार असेल तर मी तुझ्या लग्नाचा पुनर्विचार करीन.' आईचे मन मोडणे मुलाच्या जीवावर आले. त्याचे भावजीवन उध्वस्त झाले होते. देशापुढे नाना प्रश्न होते. गांधीजी त्या प्रश्नांचा विचार करत होते. कस्तुरबापुढे कौटुंबिक प्रश्न आ वासून उभे होते. तिच्या तिन्ही मुलांची लग्ने अजून व्हायची होती.

या पत्रव्यहाराच्या निमित्ताने आणि मुख्य म्हणजे हरीलालच्या सान्निध्यामुळे गांधीजी प्रसन्न आहेत. कस्तुरबाने त्यांचे रक्षण केले आहे. पुत्र प्रेमाची ढाल त्यांना प्रथमच लाभली आहे. गांधीजींनी आपली आत्मिक संपदा नि:संकोच भावनेने आपल्या लेकराना अर्पित केली आहे. इतरांचे लांब राहो पण आपल्या लेकरांसाठीही त्यांनी पवित्र रहाण्याचे प्रयत्न केलेत. केवळ पवित्र राहूनच पावित्र्याचे रक्षण करता येते. हे खरे तर जीवन सूत्र आहे. त्यांच्या मते आपला व परका असा भेद नव्हता. त्यांच्या मार्गाने चालणारा तो त्यांचा अशी त्यांची साधी-सरळ व्याख्या होती. इतर मार्गाने चालणाऱ्याचा ते द्वेष करणार नव्हते पण त्याला मदतही करणार नव्हते हे मात्र निश्चित होते. गांधीजींनी हरीलालला पत्र लिहिले -

"आनंदाने राजी खुशीने तू जर माझ्याकडे येऊ शकत असशील तर येऊन जा. अशी तीव्र इच्छा माझ्या मनी जागली आहे. मला तुझी आठवण सतत येते.

माझ्या आयुष्यातील समतेविषयी जर तुझ्या मनात एवढा विश्वास जागला असेल तर तुझे स्थान माझ्या निकट आहे. आणि तुला जर काम करायचे असेल तर माझ्यापाशी या खेपेला ढीगभर कामे आहेत. बरे, तुला खूप मोठ्या संख्येने चांगले साथीदार इथे आहेत. सर्वात महत्वाचा तर्क असा की माझे स्वत:चे काहीही निश्चित नाही मला देवळात (तुरुंगात) जायचे निमंत्रण केव्हा येईल हे काहीही सांगता येत नाही. यामुळे आता जर तू मजजवळच राहणार असशील तर मला बरे वाटेल. यापरते तुला योग्य वाटेल ते कर."[१]

पुढील पत्रातून गांधीजी लिहितात: "मी तुझी गुंतागुंत समजू शकतो. तू मला व स्वत:ला फसवू इच्छित नाहीस. आता तुझ्या ठायी काम वासना आहे. तर ती तुला तृप्त करायला हवी. तुझ्या ठायी जेव्हा तीव्र त्याग उत्पन्न होईल तेव्हाच तू आपल्या काम वासनेचे दमन करु शकशील." पत्र लेखक वयाच्या छत्तीसाव्या वर्षी ब्रह्मचर्याची शपथ वहाणारा व्रतस्थ विवाहित पिता आहे. पिता आपल्या चौतीस वर्षे वयाच्या विधुर पुत्राला हे सारे लिहित आहे., हे एकदा समजून घ्यायला हवे.

याच पत्रात गांधीजी पुढे लिहितात की ते तर भोगाचा त्याग करायचाच उपदेश करु शकतात ही त्यांची अडचण आहे. ते लिहितात 'तू पुनर्विवाह करावा हे मी सहन करु शकतो पण तुला जर दुसऱ्या पत्नीचा शोध घ्यायचा असेल तर तो माझ्यानिकट राहून कसा घेऊ शकतोस?'

गांधीजी काही मुलाला लग्नासाठी मदत करणार नव्हते, याउलट ते तर त्याचे मन पालटावे यासाठी आपल्या जवळ बोलाऊन घेत होते. याशिवाय आपल्या मुलाच्या हृदयपरिवर्तनाची परीक्षा करुन घेणार होते. पुढे गांधीजी लिहितात 'मला शक्य ती मदत मी तुला करु इच्छित आहे. पण मी माझ्या मर्यादा जपून ती मदत करावी ही तर तुझीही इच्छा असावी.'[२]

भरपूर भटकंतीनंतर ऑगस्ट १९३४ साली हरीलाल पित्याकडे आला होता. हरीलालच्या संदर्भात आपल्या आदर्शांमध्ये कुठल्याही प्रकारची शिथिलता गांधीजींना मान्य नव्हती. आणल्या आदर्शांचा कुठल्याही प्रकारे त्याग न करण्याचा त्यांचा संकल्प होता. यामुळे ते आपल्या हरीलालला हृदयपूर्वक स्वीकारु शकले नाहीत. त्याच्या पुनर्विवाह करायच्या इच्छेला अनुमोदन देऊ शकले नाहीत. मुलाला पुनर्विवाहाची इच्छा जागली असता गांधीजी म्हणाले होते की पुनर्विवाह केल्यावर हरीलालला आपल्या सोबत राहता येणार नाही. त्याचा विवाह ते सहन करु शकणार नव्हते कारण ते ना त्यांना आवडणारे काम होते ना स्वागतार्ह घटना! गांधीजींचे स्पष्ट मत होते की रक्ताच्या नात्यांच्या दरम्यान तर जबरदस्ती अधिक असली पाहिजे. अशा प्रकारे कस्तुरबाच्या साक्षीने पिता-पुत्राच्या अचिर पुनर्मिलनाचा कारुणिक अंत झाला. हरीलालची अर्निबंध भटकंती पुनश्च सुरु झाली. वर्षभरापूर्वी पित्याच्या अंत:करणात कोमल भावना आणि सुखद अनुभूती जागल्या होत्या. गांधीजींनी या भावना व अनुभूतींचे संपूर्णपणे दमन करुन टाकले. त्यांनी स्पष्ट शब्दात श्री नारणदास गांधी यांना कळवून टाकले की त्याचे जे काही व्हायचे असेल ते होवो.

डिसेंबर १९३४ पर्यंतचा काळ बदलत्या दृष्टिकोणाचा आहे. या काळातला गांधीजींचा पत्र व्यवहार व्यापक स्वरुपाचा आहे. आपल्या नातलगांना लिहिलेल्या पत्रात हरीलाल व रामदासला लिहिलेली पत्रे विशिष्ट आहेत. जवळपास दोन दशकांचा काळ लोटला आहे. हरीलाल आता त्यांच्याकडे परतला आहे. या दोघांना लिहिलेल्या पत्रातून पित्याचे द्रवित अंत:करण वाचता येते. हरीलाल आपल्या जीवनाची नवी वाट चोखाळू बघत आहे. ते एका पत्रातून हरीलालला लिहितात 'तुला जर कुणी साथीदारच हवा असेल आणि साथीदार पत्नीच हवी असेल तर तू कुण्या योग्य विधवेचा शोध घे. यात मला अजिबात दोष वाटणार नाही. लिहिल्याप्रमाणे बदल खरोखरच जर तुझ्यात घडणार असेल तर आपली आशा सफल झाली असे आपण समजू शकतो.'

ते मुलाच्या भूतकाळाला विस्मरणात ढकलायलाही तयार होते. बौध्दिक पावित्र्य संपादन करण्यासाठी त्यांनी अपार कष्ट झेलले आहेत.

हरीलाल यास एका पत्रातून ते लिहितात की ते मुलावर अधिकात अधिक विश्वास ठेवायला तयार झाले आहेत. आपल्या पदरी इतरांप्रमाणेच कटू अनुभव

आलेले असतानाही ते निराश झाले नव्हते. 'एके दिवशी तू अवश्य शुध्द बनशील असा मला विश्वास होता. ती वेळ आता येऊन ठेपली आहे., असे मला वाटते. ईश्वर तुला मदत करो.'[३]

या पत्रव्यहाराच्या निमित्ताने आणि मुख्य म्हणजे हरीलालच्या सान्निध्यामुळे गांधीजी प्रसन्न आहेत. कस्तुरबाने त्यांचे रक्षण केले आहे. पुत्र प्रेमाची ढाल त्यांना प्रथमच लाभली आहे. गांधीजींनी आपली आत्मिक संपदा नि:संकोच भावनेने आपल्या लेकराना अर्पित केली आहे. इतरांचे लांब राहो पण आपल्या लेकरांसाठीही त्यांनी पवित्र रहाण्याचे प्रयत्न केलेत. केवळ पवित्र राहूनच पावित्र्याचे रक्षण करता येते. हे खरे तर जीवनसूत्र आहे. आपलीही भूमिका मांडत असताना हे त्यांनी खूप उशीरा जाणून घेतले. रामदासला गांधीजी लिहितात की त्याच्या आणि बाच्या संदर्भात ते केवळ धर्मबोधामुळेच टिकून राहिले होते.[४]

हरीलालच्या मुलाचे रसिकचे निधन झाले. कस्तुरबा दिल्लीला गेली. या संदर्भात गांधीजींनी कस्तुरबाला लिहिले.

"बा, तुला तर ज्ञात झालेच आहे. दिल्लीला जाऊन तर तू खूप धैर्य दाखवलेस. यामुळे तू खूप दु:ख करत नसशील असे मला वाटते. तू तर या बालकाचे पालन केले होतेस, यामुळे दु:ख तर होईलच पण रसिक ज्या मार्गाने गेला आहे. त्या मार्गाने आपणा सर्वांनाही जायचे आहे. मग लवकर वा उशिरा जायचा शोक का करावा?[५]

हरीलालचा मुलगा रसिक वारला. कस्तुरबा सैरभैर झाली. तिला सांत्वना देणारे पत्र गांधीजींनी लिहिले. यात ते म्हणतात की तिला आता ज्ञान झाले आहे. दिल्लीला जाऊन तिने अपार धैर्य दाखवले. यामुळे ती कदाचित अधिक काळ दु:ख करत नसतील असे त्यांना वाटते. या बालकाचे लालन-पालन तिने केल्यामुळे तिला दु:ख होणे तर स्वाभाविकच होते. रसिक ज्या मार्गाने गेला त्या मार्गाने आपल्या सर्वांना जायचे आहे. मग आधी वा उशीरा जायचा शोक का मनी धरावा? हे सिध्दांतवाक्यही ते या पत्रातून लिहितात.

फ्रांसिस्का स्टेंडेनेथ आपला नवरा प्रोफेसर फ्रेडरिक स्टेंडेनेथ यासोबत १९२८ साली आश्रमात आली होती. गांधीजींनी त्यांची नावे सावित्री आणि सत्यवान अशी ठेवली होती. यातील फ्रांसिस्काला (सावित्रीला) पत्रातून कळवतात 'तुम्हाला रसिक आठवतो का? तो आता आमच्यासोबत सशरीर नाही. हे पत्र तुला पोहोचण्यापूर्वी तू 'यंग इंडिया' मधून त्याच्या संबंधी सारे काही वाचून घेशील. त्याच्या मृत्युला बाने खूप शौर्याने झेलले. तिचा शोक नि:संदेह खोल होता. या घटनेला तिने खूप धैर्यपूर्वक सहन केले.[६]

या पत्रातूनही गांधीजी कस्तुरबाच्या धैर्याचे वर्णन करताहेत. तिच्या गहिऱ्या शोकाला अधोरेखित करत असतानासुध्दा तिच्या साहसी स्वभावाचे चित्रण करतात. हरीलाल हा कस्तुरबाचा थोरला मुलगा. तिच्या चित्ताकाशातला तळपता सूर्य ! या सूर्याला ग्रहण लागले. ती कथा वाचण्यापूर्वी कस्तुरबाच्या इतर तीन लेकरांची कथा वाचू या !

संदर्भ

१) गांधीजींनी हरीलालला दिनांक १४ फेब्रुवारी १९३५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६० पृष्ठ २४८;

२) गांधीजींनी हरीलालला दिनांक १२ एप्रिल १९३५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६० पृष्ठ ४५०;

३) गांधीजींनी हरीलाल यास दिनांक १७ ऑक्टोबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्र.मय खंड ५९ पृष्ठ १९९;

४) गांधीजींनी रामदासला दिनांक ६ ऑक्टोबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ १५३ ;

५) गांधीजींनी कस्तुरबाना दिनांक ९ फेब्रुवारी १९२९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३९ पृष्ठ ४१२ ;

६) गांधीजींनी फ्रांसिस्काला लिहिलेले दिनांक ७ मार्च १९२९ चे पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४० पृष्ठ १०६.

❖❖❖

### ६) मणीलाल, रामदास आणि देवदास

हरीलालप्रमाणे मणीलालचा जन्म भारतात झाला. तो बालपणी मुंबईत आजारी होता. जलोपचाराने बरा झाला. हा प्रसंग आपल्याला ज्ञात आहेच. कस्तुरबाचे मन भूतकाळात गेले. तिला आठवला तो प्रसंग. मणीलाल बारा वर्षांचा असतानाची गोष्ट. मुले वडिलांसोबत कार्यालयात अभ्यासानिमित्त जात असत. वाटेने चालताना अभ्यास व्हायचा. गांधीजी सदा न् कदा कामात गुंतलेले असायचे. मुलाना काहीतरी लिहायला-वाचायला सांगायचे. आपल्या कामात गढून जायचे. एकदा मणीलाल कार्यालयात पोहोचला खरा पण आपला चश्मा विसरला. गांधीजींनी त्याला घरुन चश्मा आणायला पिटाळले. रणरणते ऊन होते. पाच मैलांचे अंतर. मणीलाल निघाला. उन्हात दमला. त्याची चूक झाली होती. तो हिरमुसला झाला. आईने कारण विचारले. खूप नाराज होत मुलाने कारण सांगितले. आईने मायेने जवळ घेतले. जेवायला बसवले. आई त्याच्यासोबत बसली. त्याच्या डोक्यावरुन स्निग्धतेने हात फिरवू लागली. तिची श्रमसमृध्द बोटे त्याच्या केसांमधून नांगरट करत राहिलीत. त्याचे केस विस्कटले जात होते. मस्तकाची मशागत सुरु होती. 'हे जरा अतीच होत आहे. यांचे.' असे तिच्या मनाला वाटले पण ती बोलली मात्र काही नाही. तिने मनाला बजावले. लेकराला फूस देऊ नकोस. तिच्या मनाभोवती नवऱ्याच्या हटवादीपणाच्या अनेक आठवणी घिरट्या घालू लागल्यात. 'मणी, शहाणा ना तू? बाबा हे सारे तुझ्या भल्यासाठी करतात ना बाळ? ते केवढे मोठे आहेत.? त्यांना केवढा मान आहे.? तुलाही मोठे व्हायचे आहे. ना? मान मिळवायचा आहे. ना?' आईच्या या प्रश्नांवर मुलाने डोळे टिपत, घास गिळत होकारात्मक मान हलवली. मणी वडिलांमुळे शिस्तीला लागला की आईच्या वात्सल्यामुळे शिस्त पाळू लागला? हे एक न उलगडणारे कोडे होते.

कस्तुरबाला दक्षिण आफ्रिकेतील तो प्रसंग आठवला. त्या दिवशी जे काही झाले ते तिला विसरता येणे शक्यच नव्हते. पोलाकशी शाकाहारी भोजनालयात गांधीजींची ओळख झाली होती. ते एका वृत्तपत्राचे उपसंपादक होते. आपले एक पुस्तक कार्यालयातून घरी आणायला मणीलालला पोलाक काकाने सांगितले होते. मणीलाल पुस्तक आणायचे विसरुन गेला होता. गांधीजी म्हणाले

'रात्र अंधारी आहे. रस्ता बिकट आहे. मामला जाऊन-येऊन सहा मैलांचा आहे. तरी तू कबूल केलेले काम केले नाहीस ही चूक झाली आहे. तू आता कार्यालयातून तो ग्रंथ आणून पोलाक काकांना द्यायला हवा.' गांधीजींचा स्वर दृढ होता.

कस्तुरबा या निर्णयावर थक्क झाली. पण करणार काय? कार्यालयात काम करणारे कल्याणभाई तिथे बसले होते. त्यांना या मुलाची दया आली. त्यांनी दोन पर्याय गांधीजींपुढे ठेवले होते. एक तर ते स्वत: जाऊन ग्रंथ घेऊन येणार होते किंवा मग मणीलालला सोबत करणार होते. कस्तुरबा मनोमन प्रार्थना करत राहिली की किमान दुसरा पर्याय तरी मान्य होऊ दे रे दीनानाथा ! अखेर कल्याण भाईंसोबत मणीलाल निघाला तेव्हा कुठे तिचे मन शांत झाले. मणीलाल अवघ्या तेरा वर्षांचा होता. निर्भय मनाच्या कस्तुरबाला त्या अंधाऱ्या रात्रीचे भय लहानग्या मणीलालपेक्षाही अधिक जाणवले होते.

कस्तुरबाच्या मनाच्या खोल गाभाऱ्यात एक आठवण खूप सलत राहिली होती. मणीलाल तेव्हा एकवीस वर्षांचा होता. त्याचे अध:पतन झाले. त्याने कानावर हात ठेवले. अखेर गांधीजींचे सही असलेले पत्र त्याला पोहोचले. 'मणीला वेदनेने तळमळणाऱ्या बाबाचे आशीर्वाद.' तेव्हा त्याच्या आसवांचा बांध फुटला. त्याने घडल्या कृत्याची कबूली दिली. क्षमायाचना केली. पित्याने 'मी तुला क्षमा करतो. देवाची क्षमा माग.' अशी तार पाठवली.

डॉ. प्राणजीवनदास मेहता यांची कन्या जेकी विवाहिता होती. ती डॉक्टर मणीलाल या त्यागी व्यक्तिची बायको होती. एकदा मणीलाल व ती तळ्यात स्नानाला गेले होते. मगराने जणू श्वापदाला जळात खोलवर ओढून न्यावे तशी मणीलालची गत झाली. वासनेने त्याला मिठीत ओढले. मुलीने प्रायश्चित्त घेतले. खरे तर ते एक नाटक होते. त्या घटनेनंतरही जेकी मणीलालच्या बिछान्यात आढळली होती. गांधीजी फिनिक्सला निघून

गेले होते. आठवडाभर उपवास करण्याचे त्यांनी जाहीर केले होते. त्यानंतर एकवीस आठवडे दिवसातून एकदा भोजन घेण्याचा आणि जर हे गैरकृत्य पुनश्च घडले तर आणखी तीन आठवडे उपवास करण्याचा इरादा जाहीर केला होता. या आठवणीने कस्तुरबा फार थकून गेली.

रामदासच्या मार्फत मणीलालने दक्षिण आफ्रिकेहून वडिलांकडे एक संदेश पाठवला होता. केपटाऊनचे एक प्रसिध्द व्यापारी होते युसुफ गुल. त्यांच्या पत्नी वहिदा या केप मलाय होत्या. त्यांची मुलगी होती फातिमा वा टिम्मी गुल. तिच्याशी विवाह करण्याची इच्छा त्याने व्यक्त केली होती. टिम्मीही विवाहासाठी सहमत होती. गांधीजींचे उत्तर अगदी स्पष्ट होते. हिंदु आणि मुस्लिम यांच्यातला हा विवाह संकटांना निमंत्रण देणारा ठरेल. दोघांपैकी एक जण धर्मांतर करायला तयार होता काय? तसे नसेल तर मग विवाहोत्तर संततीचा धर्म कुठला मानला जावा? हा विवाह हिंदू-मुस्लिम प्रश्नावर आघात करणारा ठरेल. मणीलाल हा गांधी-कस्तुरबाचा मुलगा असल्याची गोष्ट ना तो विसरु शकणार होता ना समाज विसरु शकत होता. यानंतर त्याला हिंदुस्तानात येऊन रहाणेही अशक्य होऊन बसले असते. कस्तुरबाचा चेहरा कसनुसा झाला.

मणीलाल व फातिमा गुल यांच्या विवाहाला गांधींनी संमती दिली नाही. कस्तुरबाने हस्तक्षेप केला. गांधीजींना मणीलालसाठी दुसरी वधू शोधायला सांगितले. गांधीजींनी 'यंग इंडिया' १७ मार्च १९२७ मध्ये लिहिले. 'मतभेद असणे म्हणजेच शत्रुत्व असे असेल तर माझी पत्नी आणि मी एकमेकांचे हाडवैरी असलो पाहिजे.' असे असले तरी या प्रसंगी मात्र गांधीजींनी पत्नीशी सहमती दर्शवली. जमनालाल बजाज यांच्यासारख्या अन्य सहकार्यांशीही सल्लामसलत केली. गांधी-कस्तुरबाने एका मुलीची निवड केली. ही एकोणीस वर्षांची मुलगी अकोला येथील होती. सुशीला बनियाच होती. काठियावाडी मात्र नव्हती. किशोरलाल मश्रुवालांची ती पुतणी होती. किशोरलाल 'यंग इंडिया' व 'नवजीवन' मधले सहकारी होते.

मणीलालची तिशी उलटली होती. त्यानेही आपण विवाहाला उत्सुक असल्याची इच्छा व्यक्तवली होती. त्याचा हिरमोड करत पित्याने त्याला पत्र लिहिले होते - "ज्या दिवशी तू लग्न करशील त्या दिवशी तुझी कीर्ती लोप पावेल. कस्तुरबाबरोबर माझे आजचे संबंध एका बहिणीबरोबर असावेत असे आहेत. आणि त्यामुळेच आज माझी कीर्ती झाली आहे. मात्र मला काय वाटते यापेक्षा तुला काय वाटते ते तू कर. तुला जर लग्नावाचून रहाता येत नसेल तर तू जरुर लग्नाचा विचार कर."

या पत्रातून गांधीजी मणीलालला जीवनाचा एक मोलाचा संदेश देतात. कस्तुरबाशी असलेल्या आपल्या संबधांवरही प्रकाशझोत टाकतात. आपल्या जीवनातील उत्कर्षाचा आलेख समजावून सांगत ते मणीलाललाही ब्रह्मचर्याचे स्वरुप सांगतात.

१९२७ साली अकोला येथील सुप्रसिध्द मश्रुवाला परिवारची ज्येष्ठ कन्या सुशीला हिच्याशी मणीलालचा विवाह झाला. बा, बापू, रामदास, देवदास या चौघांची वरात अकोल्याला पोहोचली. विवाहानंतर लगेच मणीलाल-सुशीला आफ्रिकेकडे निघाले.

लग्न साधेपणाने झाले. गांधी-कस्तुरबाने दांपत्याला श्रीमद्भगवद्गीतेची एक प्रत दिली. एक प्रत आश्रम प्रार्थना गीतांची होती. सूतकताईसाठी लागणारी टकळी होती. गांधीजींनी कातलेल्या सूताच्या दोन माळा होत्या.

गांधीजींनी आपल्या भावी सुनेला लिहिले की रविवारी मुलगा मणीलाल, नानाभाई, विजयालक्ष्मी, ते आणि कस्तुरबा यांना विवाह विधी पूर्ण होईपर्यत म्हणजे बारा वाजेपर्यत उपवास करावा लागेल[१]

कस्तुरबा मनोमन विचार करत राहिली होती. नवदांपत्याला मिळालेल्या या अद्भुत आशीर्वादाचा अर्थ शोधायचा वृथा प्रयत्न करत होती. दक्षिण आफ्रिकेत असताना आपल्याला भेटीदाखल मिळालेले सारे दागिने परत करावे लागले होते. तमाम भेटवस्तु परत कराव्या लागल्या होत्या. ही आठवण एखाद्या ठसठसत्या जखमेसारखी उफाळून आली होती. आज काय देऊ शकली होती ती आपल्या सुनांना?

नवऱ्याच्या विविध प्रयोगाना कस्तुरबाने खूप जवळून पाहिले होते. अनेक प्रयोगांचे ती उपकरण बनली होती. साधन बनली होती. अनेकदा ती स्रोत बनली. लक्ष्य तर ती अनेकदा बनली होती. गांधीजी

म्हणजे इयत्ता उत्क्रांत करणारे शास्त्रज्ञ असल्याचे तिने अनुभवले होते. दूदाभाईंच्या निमित्ताने त्यांनी आपल्या कुटुंबाला व्यापक बनवले. विस्तार आणि व्यापकपणाची दीक्षा दिली. गांधीजींचे हे शिक्षेनिमित्त साधले जात होते. ते विश्वाला आपल्या ठायी सामावून घेत होते. कस्तुरबा आश्रमातील जबाबदाऱ्या उपसत होती. तिचे कुटुंब मोठे झाले होते.

मणीलाल-सुशिलाचे लग्न लागले. दोघे गुपचुप बसले होते. मोठ्यांची मर्यादा राखत होते मग कस्तुरबाच बोलली 'अरे, असे काय बसलात? तुमच्याजवळ बोलायला काही विषय नाही की काय?' हे वाक्य एक पुराणपंथी सासू बोलत होती. मिठाच्या सत्याग्रहात मणीलालला अटक झाली. कस्तुरबा सुशिलाला त्याच्या भेटीसाठी म्हणून तुरुंगात घेऊन गेली होती. मणीलालला तिने सांगितले होते 'आधी सुशिलाशी बोल. ती वाट बघत आहे. तुझी.'

गांधीजींनी मद्रासच्या एका मित्राला पत्र दिले. मणीलाल एका प्रकाशकाकडे कामाला लागला. काही महिने लोटले. अल्बर्ट वेस्ट इंग्लंडला जाणार होते. गांधीजींनी मणीलालला दक्षिण आफ्रिकेत पाठवले. तो आता 'इंडियन ओपिनियन' चे काम बघणार होता. चळवळीत सहभागी होणार होता. खरे तर मणीलालला शिक्षा झाली होती. कस्तुरबा त्यामुळे नाराज होती. मणीलाल फिनिक्सला जात आहे. हे तिला कळले. आपल्या मुलाच्या अपराधाबद्दल नवऱ्याने केलेली ही शिक्षा होती. ही मात्र तिला खूप सुखावून गेली. आपला मुलगा किती लांबवर चालला आहे. 'आपण आता मणीलालला केव्हा भेटू?' हा आईला सहज पडणारा प्रश्न तिलाही पडला. तिच्या मनाची घनव्याकुळता तिला अंतर्यामी घायाळ करत गेली. परत आता त्याला केव्हा भेटू? या प्रश्नाऐवजी तो वडिलांचे ऐकणारा आज्ञाधारक मुलगा आहे. वडिलांनी त्यावर विश्वास दर्शवला आहे. त्यावर एक जबाबदारी सोपवली आहे. याचेच तिला अपरंपार कौतुक होते.

१९३६ साल होते ते! कस्तुरबा रामाच्या मुलाला कान्हाला मुंबईहून सेवाग्रामला घेऊन येत होती. परतताना तिला विंचवाचा दंश व्हावा तशी दक्षिण आफ्रिकेतील एक घटना आठवली. सहशिक्षणाबाबत तिचे मत नवऱ्याच्या मतापेक्षा वेगळेहोते. विरोधी होते. एकदा एका युवतीच्या पायाला फोड झाले होते. या निमित्ताने गांधी--कस्तुरबाचा असा संवाद झडला --

'रामू, तू या महिलेचे पाय पोटॅशियम परमंगनेटने स्वच्छ करुन दे. जखमा धुवून दे. मलम लाऊन दे.' गांधीजींचा आदेश सुटला.

'मला वाटते त्याने हे काम करु नये.' विरोध दर्शवत कस्तुरबाने सांगितले.

'करु देत हे काम त्याला.' गांधीजींनी आग्रहपूर्वक सांगितले.

'हे काम कुणा महिलेने करावे.' कस्तुरबाने आपला मुद्दा मांडला.

'तू पण काय कस्तुर?' गांधीजींनी नाराजी दर्शवली.

'नाही म्हणजे नाही.' कस्तुरबाचा निश्चय दृढ होता.

'अगं, असे काय करतेस तू?' गांधीजींनी समजावणीच्या सुरात विचारले.

'ही माझी आज्ञा समजावी.' कस्तुरबानेही दृढपणे सांगितले.

'नाही, हे काम रामा करील. करु दे त्याला.' गांधीजींचा आग्रह कायम होता.

तिने ताकीद दिली होती. नवऱ्याचा आग्रह वाढता होता. आज ते आठवताना एखाद्या अजाण वाटसरुने अगम्य वनात वाट विसरुन जावे तशी तिची गत झाली होती. तिला ती आठवण येत राहिली. चौफेर माजलेले रान आहे. तिथे पसरलेली विस्फारलेल्या वारुळांची गुंतावळ आहे. अंगावर ऊन्हाची तिरीप न पडू देणारे घनदाट अरण्य आहे. सापाच्या आकाराच्या धसमुसळ्या वेली माजल्या आहेत. ती युवती रामदासच्या खोलीत आली. तिचा तो जखमी गोरा-गोरा पाय. तो काही रामदासचा पाठलाग सोडत नव्हता. शिकारी कुत्रा मागे लागल्यासारखा तो दमछाक करायला लावायचा. कस्तुरबाने रामाला विचारले.

'तुझे सेवेचे काम कसे चालले आहे.?' कस्तुरबाने विचारले.

'चांगले चालले आहे.' रामदास बोलला.

‘कामात काही अडचण तर येत नाही ना? तू कुठे चुकत नाहीस ना?’ कस्तुरचा प्रश्न अधिक तीक्ष्ण बनला.

‘नाही आई.’ रामदासने सांगितले.

रामदास खोटे बोलला होता. त्याने पाप केले होते. त्याला काही सुचेना. काही समजेना. प्रार्थनेच्या वेळीही ती मुलगी सारखी आठवत राहायची. तिचा वाऱ्यासंगे लहरणारा परकर आठवत रहायचा. आपण केले ते पाप केले ना? त्याचे मन त्याला जाब विचारत रहायचे. त्याला आपल्या पुस्तकात ठेवलेले मोरपीस आठवत राहिले होते. ते त्या फडफडणाऱ्या परकराच्या कडेशी गुंफले गेले होते. वणव्याच्या जाळाचा उजेड असावा तसा प्रकाश त्या कन्येच्या चेहऱ्यावर पसरला होता. दूरवरच्या डोंगरावर लुकलुकणाऱ्या दिव्यासारखा रामदास होता. त्याच्या नजरेसमोरचा एकांत अधिक गडद होत जायचा. आपण केले ते पाप आहे. ना? या प्रश्नावर तो निरुत्तर होऊन जायचा. कस्तुरबाला ही आठवण आली. तिचे मन एका अतर्क्य डोहात गटांगळ्या खाऊ लागले.

कस्तुरबाला १९१९ साल आठवले. गांधीजींनी रामदासला लिहिले होते -

“चिरंजीव रामा,

तुझे पत्र पोहोचले. कस्तुरबा मला अनेकदा सांगत असते की रामा आता मोठा झाला आहे. त्याला बोलावून घ्यावे आणि त्याचे लग्न लावून द्यावे. मी तुला बोलावून घेण्याविषयी साफ इन्कार केला आहे. तिला मी हे सांगितले आहे. की जेव्हा तुझी लग्न करायची इच्छा असेल तेव्हा तू मला मोकळेपणाने हे सारे सांगशील. मी तिला हेही सांगून टाकले आहे. की याबाबतीत मी तुला जे काहीअसेल ते स्पष्टपणे सांगायला परवानगी देऊन ठेवली आहे. हे ऐकून ती शांत झाली आहे.”[२]

गांधीजींनी कस्तुरबाचे जे मूल्यांकन केले आहे. ते अप्रुप वाढवणारे आहे. यात आपल्या मुलाच्या भवितव्याच्या संदर्भात एका मातेचे प्रत्यक्ष व्यावहारिक चिंतन आहे. एका पित्याचा आदर्शभूत असा विचार यांची सुरेख मांडणी आहे. आपले घर शांत ठेवण्याकामी वडिल अग्रेसर दिसतात. आई मात्र प्रत्यक्ष जीवनासाठी आग्रही आहे.

रामदास आता चोवीस वर्षांचा झाला होता. त्याने विवाहाची इच्छा बोलून दाखवली होती. बजाज यांच्यामार्फत गांधीजींनी मुलाला सल्ला दिला होता की एखाद्या गरीब कुटुंबातील गुणी कन्या शोधावी, श्रीमंत मुलगी बघू नये. गांधीजींनी तुरुंगवासात असताना कस्तुरबाच्या संदर्भात सतत विचार केला. रामदासच्या विवाहाच्या संदर्भात त्यांनी जमनालाल बजाज यांना लिहिलेले एक ऐतिहासिक पत्र आहे. यात ते लिहितात -

“बाच्या संदर्भात मी चुकीच्या मोहात पडलो होतो. मला वाटते की मी तिच्याशी रामदासच्या विवाहाच्या संदर्भात कठोरपणे वागणे हाच माझा धर्म आहे. आई-वडिलांना आपल्या स्वार्थाच्या मोहात पडून आपल्या लेकरांच्या प्रवृत्ती आणि इच्छेत अडथळा बनायला नको. काल तर मी घडीभर बाच्या ‘हो मध्ये हो’ मिळवला. बाला रामदासच्या वियोगाचा कटू घोटही समाधानाने प्राशन करुन घ्यायला हवा. रामदास राजगोपालाचारी सारख्या व्यक्तिंकडे जाऊन तिथे सुखाने राहील यासाठी बाने त्याला आशीर्वाद द्यायला हवेत. यातच बाचे परम श्रेय आहे. तिचा पुत्र सद्गुणी आहे. यातच तिने समाधान मानावे.”

“रामदासने काही व्यवसाय करावा किंवा शिकावे, नोकरी धरावी. व्यापार करावा वा आश्रमात सेवाकार्य करावे. एक वर्षभर सेवाकार्य केल्यावरच साखरपुडा करायचा विचार करावा. श्रीमंत माता-पित्यांची कन्या सुशील असली तरी जोवर ती स्वेच्छा निर्धनतेला वरत नाही तोवर रामदासने तिच्याशी विवाह करायचा विचार सोडून द्यायला हवा. त्याने जर असा विचार केला नाही तर तो स्वत:, सबंधित कन्या, तिचे माता-पिता हे सारेच दु:खी होतील. यामुळे योग्य व सोईचा मार्ग तर मला हाच दिसतो की त्याने कुणा गरीब परिवारातील गुणी कन्येशी विवाहाचा विचार करावा. यात कालापव्यय झाला तरी बेहत्तर ![३]

गांधीजींच्या मनात मोहरहित अवस्था जागली होती. कस्तुरबा मात्र आपल्या मोहमयी जगाचा परीघ ओलांडू शकत नव्हती. ती आई होती. माऊली होती. तिच्या मर्यादा स्पष्ट होत्या. तिच्या तपाचरणाने त्या मर्यादांचेच कवच परिधान केले होते. या आधारे ती जीवनाच्या समरंगणात उतरली होती. विजयी होत होती.

२७ जानेवारी १९२८. रामदासचा विवाह निर्मला व्होरा झाला. वसंत पंचमीचा उत्सव होता. प्रात:काळची वेळ. आश्रमातला हा एक आदर्श विवाह होता. कस्तुरबाचा तिसरा पुत्र रामदास. त्याचा विवाह होता. कन्या आश्रमात आली होती. नवरदेव-नवरीने आश्रमाचे अंगण झाडून स्वच्छ केले. सडा टाकला. रांगोळी काढली. गोशाळा स्वच्छ केली गेली. नदीवर स्नान झाले. वधू-वराने कळशीभर पाणी आणले. गो पूजन केले. खादीचे शुभ्र वस्त्र परिधान करुन वर-वधू मंडपात बसले. तांदळाच्या पिठाच्या रांगोळ्या काढल्या होत्या. काकासाहेब कालेलकरांनी मंत्र म्हटले. नवयुगुलाला गृहस्थ धर्माचे मर्म आणि महात्म्य समजाऊन सांगितले.

वसंत पंचमीच्या मुहूर्तावर रामदासचे काठेवाडच्या प्रसिध्द निर्मला व्होरा परिवारातल्या निर्मला या मुलीशी लग्न लागले. गांधीजींनी सूताचा हार दिला. श्रीमद्भगवद्गीतेची प्रत दिली. भजनावलीच्या प्रतीसोबत दोन टकळ्या दिल्या. कस्तुरबाने लाल काठाची साडी दिली. साडी गांधींनी कातलेल्या सूताची होती. लाल रंगाचा काचेचा चूडा दिला. लाल रंगाच्या लाकडी पेटीत करंड्यात कुंकू दिले. दीर देवदास हजर होते. ते व्यवस्थापक होते. व्याह्यांना हा लग्न समारंभ अगदी नवखा वाटला. देवदासने स्वत: कातलेल्या सूताची शाल भाऊ-वहिनींना भेटीदाखल दिली. कन्येला पिता नव्हते. माहेरुन मिळालेले सुवर्ण कंगण तिच्यासोबत होते. कस्तुरबाने तिला या घरची रीतभात समजाऊन सांगितली. काचेच्या बांगड्यांचे मोल सांगितले. काचेच्या नश्वर बांगड्याच अभंग सौभाग्याच्या उत्तम प्रतीक आहेत. सौभाग्याचे रक्षण काचेच्या नाजूक बांगड्यांप्रमाणे करावे लागते, करायचे असते. हा बोध तिला मिळाला. सूनही सिध्दांतवादी होती. तिने लागलीच सुवर्ण कंगण काढले. सासूच्या हातात दिले. आश्रमात का वैयक्तिक संपत्तीला स्थान होते? या चार सोन्याच्या बांगड्या आश्रम कोषाचे धन झाल्या. यथावकाश स्वराज्य फंडात सामावून गेल्यात. उत्तम गृहस्थाश्रमाचा आरंभ दानातून सजला. 'इदं न मम्' हा घोष घुमला. विवाहाच्या मंगल प्रसंगी सुनेला कांचन मुक्तीची दीक्षा मिळाली. त्यानंतर निर्मला कधीच कुणाला स्वर्णभूषित दिसल्या नाहीत. जरीची वस्त्रे परिधान करणाऱ्या आढळल्या नाहीत. माहेरच्या छोट्या वर्तुळाला निर्मलाने ओलांडले. किमान सव्वाशे लोकांच्या संयुक्त कुटुंबात ती दाखल झाली. विवाह समारंभाचा एकूण खर्च सव्वा रुपया झाला होता.

विवाहाच्या दिवशी वर-वधुंनी उपवास केला होता. गोशाळा आणि विहीरीच्या आसपासचा भाग स्वच्छ केला होता. सूतकताई केली. गीतेच्या बाराव्या अध्यायाचे पठन केले. अंगावर कुठलेही दागिने नव्हते. ना बँडबाजा ना पंगती. हुंडा व मानपानाचा तर प्रश्नच नाही. वर-वधुला केवळ मंगलमय माळांचे आदान-प्रदान झाले. गांधीजींनी भेटीदाखल गीतेची प्रत, 'आश्रम भजनावली' आणि दोन टकळ्या दिल्यात. वधुच्या आईने चरखा दिला. दहा मिनिटात विवाह विधी पूर्णत्वाला आला. सासूने रामाला भेटीदाखल चरखा दिला. छोट्याशा धार्मिक कार्यक्रमानंतर रामा, निर्मला आणि आश्रमवासी जनांपुढे गांधीजींनी एक भाषण दिले. आपल्या लेकरांवर लादलेल्या दारिद्र्याचा उल्लेख करत ते जवळजवळ अश्रु ढाळत होते. त्यांनी रामदासला आपल्या पत्नीचा मालक न बनता खरा मित्र होण्याचा सल्ला दिला. गरीबांप्रमाणेच त्याने कष्टाने भाकरी मिळवावी. गीता त्याच्यासाठी हिऱ्यांची खाण ठरो असे आशीर्वाद दिलेत. रामदास देवदासपेक्षा दोन वर्षांनी मोठा होता. मणीलाल याच्या विवाहाप्रमाणेच हा विवाहही कस्तुरबा- गांधीजींनी ठरवलेला होता. विवाहित दांपत्याला मणीलाल प्रमाणेच भेटी मिळाल्यात. हरीलालची पत्नी गुलाबही व्होराच होती. भाऊ लक्ष्मीदासची सून म्हणजे सामळदासची पत्नीही व्होराच होती. उपस्थितांना साखर-खोबऱ्याचा प्रसाद मिळाला.

रामदासला संबोधित करताना गांधीजी म्हणाले "आपल्या पत्नीचा आदर कर. तू तिचा मालक नसून खरा मित्र आहे.स. तू तिच्या देहाला व आत्म्याला पवित्र मानशील याचा मला विश्वास आहे. अर्थात्च तीही निश्चितपणे तुझ्याही देहा-मनाला असेच मानेल. यासाठी तुला आपले जीवन साधे, संयमी आणि परिश्रमी बनवावे लागेल. आपण स्वेच्छेने आणि संपूर्णत: विचार करुनच निर्धनतेचे व्रत घेतले आहे. त्यामुळे आपल्या देशातील

शेतकरी व मजूर हे ज्याप्रमाणे निढळाच्या घामाच्या भाकरीचे सेवन करतात त्याचप्रमाणे तुलाही श्रमाची भाकरी (Bread Labour) मिळवायची आहे. मी तुला काही भेट दिली नाही, टकळी, माझी प्रिय गीता आणि 'आश्रम भजनावली'च्या प्रतीशिवाय मजजवळ तुला द्यायला दुसरे आहे. तरी काय? सुताची ही माळ तुझे कवच आहे. गीता माझ्यासाठी रत्नांची खाण आहे. ती तुला आजीवन मदत करो, तुझे पथ-प्रदर्शन करो. तुला दीर्घायुष्य लाभो. तुझ्या हातून मंगलमय सेवाकार्य घडो.

"विवाहानंतर उभयता बारडोली आश्रमात राहिले. दोन-तीन महिन्यात बारडोली सत्याग्रह सुरु झाला. रामदासला अटक झाली. घर जप्त करण्यात आले. निर्मला सासु-सासऱ्यांकडे साबरमती आश्रमात येऊन काम करु लागली. रामदासची कारावासातून सुटका झाली. नव्याने घर वसवले. चार महिन्यानंतर परत घर जप्त केले गेले. परत अटक झाली. १९३२ साली बारा दिवसांचे लेकरु असताना रामदास कैदेत होता. आधी एक मुलगी होती. निर्मला या दोन लेकरांना छातीला लाऊन साबरमती आश्रमात दाखल झाली. खादी भंडारचे संचालन करु लागली.

गांधीजींनी रामदासला लिहिले: "मी कस्तुरशी जसा व्यवहार केला तसा तुम्ही कुणी आपल्या बायकोशी करु नये. पती-पत्नी नात्याबाबत माझ्या विचारात आता बदल होत चालला आहे. माझ्या बळजबरीमुळे कस्तुरने काही गमावले नाही कारण मी कधीही तिला आपली मिळकत मानली नाही. तिच्याबद्दल माझ्या मनात प्रेम आणि सन्मानाची भावना तर होतीच. मी तिला उन्नत होताना बघू इच्छित होतो. कस्तुर मजवर राग करु शकत नव्हती. उलट मी तिच्यावर नाराज होऊ शकत होतो. व्यावहारिकरित्या मी वापरतो तितके अधिकार तिला प्रदान केले नव्हते आणि बिचाऱ्या कस्तुरच्या ठायी ते प्राप्त करुन घेण्याचे बळही उरले नव्हते. निमूशी (पत्नी निर्मलाशी) कठोरपणे वागू नकोस. पती पत्नी विषयक संबंधांविषयी माझ्या विचारात फरक पडलाय खरा. मी बांशी जसे वागलो तसे तुमच्यापैकी कुणीही वागू नये अशी माझी इच्छा आहे. खरी. माझ्या कठोरपणामुळे बांना काही गमवावे लागले नाही कारण की बांना मी कुण्या दिवशी माझी मिळकत मानली नाही. तिच्याविषयी प्रेम आणि सन्मानाची भावना तर होतीच. मी तिची उन्नतावस्था बघू इच्छित होतो पण बा मजवर ठपका ठेऊ शकत नव्हती. मी ठपका ठेऊ शकत होतो. बांना अमलात आणण्यासाठी मी माझ्या इतकेच अधिकार सोपवलेले नव्हते आणि बा बिचारीच्या ठायी ही शक्ती नव्हतीच बा विषयीचे माझे साबरमतीतले वर्तन उत्तरोत्तर असे उन्नत होत गेले आहे. यामुळे बा उन्नती पथावर अग्रेसर आहे. पुढची मागची भीती अजून पूर्णपणे गेली नाही तरी मोठ्या प्रमाणावर गेली आहे. कमी झाली आहे. मनातही बाविषयी चीड येते तर मी स्वत:वरच चिडतो. चिडण्याचे मूळ मोह आहे. माझ्यात झालेला हा फेरबदल महत्वाचा आहे. आणि याचे सुंदर परिणाम मी अनुभवले आहेत. माझे प्रेम जसजसे अजून निर्मळ होत जाईल तसतसे परिणाम अधिकाधिक चांगले होत जातील."[४]

गांधीजी-कस्तुरबाच्या आंतरसंबंधाचे नेमके चित्रण अनेकानी अनेक प्रकारे केले आहे. पण स्वत: गांधीजींनी या विषयीचा मार्ग अतिशय सुगम करुन दिला आहे. त्यांचे व्यक्तिमत्व विकसनशील असल्यामुळे त्यांच्या अनेक विचारातही प्रत्ययकारी परिवर्तन दिसून येते. रामदासला लिहिलेले हे पत्र मोलाचे आहे. गांधीजींनी यातून आपल्या दांपत्य संबंधांचे विश्लेषण केले आहे. हे इतके स्पष्ट व पारदर्शक चिंतन आहे. की यावर अजून वेगळे भाष्य करायची काहीही आवश्यकता उरु नये. या पत्रातून गांधीजींचे स्वत:शी बोलणे ऐकता येते. आपल्या वर्तन-व्यवहाराची ते मीमांसा करतात. ही मीमांसा कुठल्याही कठोर समीक्षकापेक्षा कमी विदारक नाही. आपल्या बळजबरीने आणि आग्रहाने कस्तुरबा उन्नत होत गेली असे ते म्हणतात. कस्तुरबाच्या व्यक्तिमत्वाचे असे तरल विश्लेषण दुर्मिळ आहे. गांधीजींचा आग्रह आणि बळजबरी होती हे खरे आहे. पण हेतु मात्र उदात्त आहे. हेतु कस्तुरबाला उन्नत करण्याचा आहे. कस्तुरबाने गांधीजींच्या सोबत सर्वाधिक आघात सोसले होते जणू तिने आघात सोसण्यासाठीच जन्म घेतला होता. गांधीजींशी संबंध ठेवणाऱ्याला वा ठेवू राखणाऱ्याला मोठी किंमत चुकवावी लागली. कस्तुरबाला सर्वाधिक

किंमत चुकवावी लागली तरी तिला काही गमवावे लागले नाही. तिला गांधीजींची पत्रे मिळत नव्हती. यातून कस्तुरबाच्या प्रकृतीची अंतरंग चौकशी असायची. जिव्हाळा असायचा. आपण मजेत असलेले कळवलेले असायचे. आपले पत्र न मिळाल्यामुळे चिंतित कस्तुरबाला यातून सांत्वना लाभायची. गांधीजी आपली प्रकृती ठणठणीत असल्याचेही कळवत असत.

कस्तुरबाचा धाकटा मुलगा देवदास. १९२७ सालच्या पूर्वार्ध्दात देवदास व राजगोपालचारींची कन्या लक्ष्मी यांचा विवाह झाला. देवदास सत्तावीस वर्षांचा होता. पंधरा वर्षांच्या लक्ष्मी या मुलीशी त्याने विवाहाची इच्छा व्यक्त केली. मुलगी ब्राह्मण होती. वयाने लहान होती. दोघांच्या पित्यांनी त्यांना वाट बघायचा आदेश दिला. मुलीचे वय पाहू जाता योग्यायोग्यतेचा निर्णय करायला ती समर्थ होती असे म्हणणे धाडसाचे ठरले असते. काही वर्षे एकमेकाना न भेटता आणि पत्र व्यवहार न करता त्यांना नंतरही विवाह करायची इच्छा कायम असेल तरच पालकांची अनुमती मिळेल असे कळवण्यात आले. देवदास उत्तर भारतात परतला. लक्ष्मी आपल्या पित्यासोबत आणि आजारातून बरे होणाऱ्या गांधीजींच्या सोबत सिमला येथे गेली.

देवदासने सहा वर्षे वाट बघितली. १६ जून १९३३ रोजी त्याचा विवाह पुण्यात ‘पर्णकुटी’ मध्ये झाला. मधल्या काळात देवदास केवळ तुरुंगातूनच परत आला असे नव्हे तर साक्षात् मृत्युच्या दाढेतूनही परत आला होता. गांधीजी, कस्तुरबा, मुलीचे वडिल, मूठभर पाहुणे आणि आश्रमवासी विवाह समारंभाला उपस्थित होते. गांधीजींनी नव परिणितांना आशीर्वाद दिलेत. उपवासामुळे ते आणि त्यांचा स्वर क्षीण झाला होता. बोलायला शक्तिसंचय करायला त्यांना पाच मिनिटे लागली होती.

गहिवरल्या कंठाने ते बोलले: “देवा, माझ्या तुझ्याकडून असलेल्या अपेक्षा तू जाणतोस. तू त्या पूर्ण करशील. आज लक्ष्मीसारखे मौल्यवान रत्न तू तिच्या पित्यापासून हिरावून घेतले आहे.स. तू त्यास लायक ठरावास हीच इच्छा. ईश्वर तुझे रक्षण करो. तोच रक्षणकर्ता आहे. पिता, माता, मित्र सारे काही तोच तो आहे. मातृभूमिच्या आणि मानवतेच्या सेवेसाठी तुझे जीवन समर्पित असू दे. तुम्ही उभयता सदा विनम्र, पापभीरु राहा आणि सदैव ईश्वराचे स्मरण करत रहा.”

१९२६ साल गांधीजींच्या क्षेत्र संन्यासाचा काळ होता. देवदासचे मुंबईत एपेंडिसाइटीसचे ऑपरेशन होते. कस्तुरबा आश्रमातून तिथे गेली होती. ती अधिक काळ देवाजवळ राहू इच्छित होती. ती नवऱ्याच्या पूर्वपरवानगीने आली होती पण आश्रमीय जबाबदाऱ्या होत्या. त्या पूर्ण करण्यासाठी तिला परत यायला कबूल करवुन घेतले गेले होते. तिने स्पष्टपणे नवऱ्याला कळवून दिले होते की ती कुठल्याही परिस्थितीत मंगळवारपूर्वी नाही यायची. तिचा हा स्पष्टवक्तेपणा तिच्या करारी स्वभावाला साजेसा होता. ती आपल्या निर्णयावर ठाम रहात असे. आपला निर्णय बहुजनहिताचा आहे. याचा तिला विश्वास होता.

देवदास असो वा रामदास - त्यांच्या आजारपणात कस्तुरबा सेवेसाठी तत्पर असायची. नातवंडे तर तिला जीव की प्राण होती. देवदासची लेकरे आजारी असल्याचे वृत्त कळायचे. कस्तुरबा तडक दिल्ली गाठायची. देवदासला आधार द्यायची. नातवंडांची काळजी वहायची. तुरुंगात असतानाही नातवंडांची काळजी करायची. मुलाला, सुनेला सविस्तर सूचना द्यायची.

वृध्दावस्था आली पण कुणाकडून कस्तुरबानी सेवा स्वीकारली नाही. स्वतःचे मल-मूत्र स्वतःच स्वच्छ केले. सूट-सवलत मागितली नाही. तडजोडी स्वीकारल्या नाहीत. रामदासची लेकरे आश्रमात रहायची. त्यांचा खर्च रामदास आश्रमाच्या व्यवस्थापकाना द्यायचा. पैसे चुकवायचा. आश्रम सार्वजनिक फंडावर चालायचा. तिथे सर्वसामान्य काय आणि नातलग काय? सारेच सारखे होते. रामदास लेकरांचा खर्च द्यायचा. सेवाग्राम आश्रम दिल्या पैश्यांची पावतीही द्यायचा. कस्तुरबाला ते खूप वाईट वाटायचे. सोमवारी तिचा उपवास असायचा. ती बटाटे वा रताळी वाफवून घ्यायची. तूप-जिऱ्याची फोडणी द्यायची. मीठ-मिरी असायची. असा स्वाद आणि असा उपवास असायचा. ती नातवंडांना हे वाढायची. गांधीजींना राग यायचा. ‘या लेकरांच्या सवयी बिघडवू

नका.’ अशी ताकीद ते द्यायचे. यावर ती म्हणायची ‘अहो - इतर आजी-आजोबांची घरे बघा. नातवंडांना गोडधोड मिळते. मिठाया मिळतात. तुम्ही तर या लेकरांना वाफवलेले अळणी पालक खाऊ घालता. मी जर बटाट्याचे चार-दोन तुकडे दिले तर काही आकाश कोसळायचे नाही हो !’ हे ऐकून गांधीजी हसून द्यायचे. असे हे प्रपंचमुक्त, परिव्राजक आजी-आजोबा होते.

कस्तुरबा आणि तिची लेकरे हा अतिशय हृद्य आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. आपल्या सर्वच लेकरांच्या संदर्भातली तिच्या मनाची ही कमालीची निरलस अवस्था केवळ विलक्षण अशीच म्हणावी लागेल.

संदर्भ


१) गांधीजींनी सुशीला मश्रुवाला (भावी सून ) हिला दिनांक २८ फेब्रुवारी १९२७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३३ पृष्ठ १४२;

२) गांधीजींनी आश्रमातून रामदासला दिनांक १ जून १९१९ रोजी लिहिलेले पत्र;

३) गांधीजींनी श्री जमनालाल बजाज यांना दिनांक ५ ऑक्टोबर १९२२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ १५१;

४) गांधीजींनी रामदासला दिनांक ११ ऑगस्ट १९३२ रोजी लिहिलेले पत्र.


❖❖❖

## ७) साबरमती आश्रमात कस्तुरबा

साबरमतीचा आश्रम. या आश्रमातील कस्तुरबा आणि गांधीजी एकमेकात मिसळून गेलेले रसायन आहे. आश्रम म्हणजे मौज होती नुसती ! तिथे बुध्दिमान, मूर्ख, त्यागी, तऱ्हेवाईक सारे होते. घंटेच्या तालावरचे लयबध्द जीवन ! ते जगायला उत्सुक असलेले नाना लोक होते. यात तत्त्वचिंतनाचा शिखर पुरुष केदारनाथ होता. अभ्यासू वृत्तीचा प्यारेलाल आणि महादेव होते. कविहृदयाचा मामा होता. द.बा. कालेलकर होते. निर्मळ मनाचा आनंद होता. ऋषितुल्य विनोबा होते. धनंतर साराभाई, बिर्ला आणि बजाज कुटुंब होते. रवींद्र होते तर मालवीयही होते. सुखवस्तु मश्रुवाला परिवार होता. पटेल आणि राजगोपालाचारी होते. बिथोवनच्या स्वरसागरात विहरत असताना आपला रेशमी केशपाश छाटून मुंडन करुन घेणारी दूरदेशीची मीराताई होती. गळ्यात धोंडा बांधून पाण्यात पडून राहणारा, तांब्याच्या तारेने ओठ शिवून घेणारा आणि नरसाळ्याने पाण्यात पीठ कालवून प्राशन करणारा चमत्कारिक प्राध्यापक भंसाळी होता. तो लाटलेल्या पोळ्या उन्हात शेकून सेवन करायचा. दक्षिण गुजरातचा अनुलोम-विलोम करतानाच कुंभक, पूरक आणि रेचक साधणारा चंदुभाई होता. आठवड्यातून एकदाच शिजवलेले अन्न ग्रहण करणारा कलार्थी होता. गीतेचा अभ्यासक व मधुर गळ्याचा बाळकृष्ण भावे उपाख्य बाळकोबा होता.

एक का अनेक? कस्तुरबा एकेकाला आठवत राहिली. तो भला-थोरला परिवार. आश्रमात उदंड सहकारी. कुणी भोळे. कुणी सावध. कुणी बढाईखोर. कुणी विनम्र. कुणी चतुर. कुणी बनेल. कुणी क्रोधी. कुणी तामसी. कुणी शांत. कुणी स्थिरबुध्दी. कुणी डोक्यावर पागोटे गुंडाळलेला. कुणाच्या मस्तकी काठियावाडी पागोटे. कुणाच्या मस्तकी पुणेरी पगडी. कुणाच्या डोक्यावर गांधी टोपी. कुणाच्या माथ्यावर पुठ्ठयाची टोपी. कुणाचा ओठ वाकडा. कुणी उंचाडा. कुणी बुटका. कुणी सरळ भांग पाडलेला. कुणी खल्वाट. कुणी नाकेला. कुणी अपऱ्या नाकाचा. कुणी तीक्ष्ण नाकाचा. कुणी तिखट कानाचा. कुणी कपाळावर खोक असलेला. कुणी कानात बाळी घातलेला. कुणी मर्मवेधक नजरेचा. कुणाची नजर आत्मरंगी. कुणी गळा तुळशी माळा मिरवणारा. कुणाच्या कपाळी दुबोटी गंधाचा ठसा. कुणी उघड्या अंगाचा. कुणी अंगभर वस्त्रे ल्यालेला. कुणाच्या खांद्यावर उपरणे. कुणी धूत स्वच्छ वस्त्रांचा. कुणी डोळ्यांवर चश्मा घातलेला. कुणी स्पष्टपणे लांबवर बघू शकणारा. कुणी चेहऱ्यावर स्मित गोंदवलेला. कुणी रुक्ष तिरपागडा. कुणाची नजर नासाग्री. कुणाची नजर शून्यात. कुणाची नजर भ्रुमध्यी एकाग्र. कुणी शाल पांघरलेला. कुणी कोट घातलेला. कुणी अंगरखा नाकारलेला. कुणी तप:पूत चर्येचा. कुणी दिशा हरवून बसलेला. कुणी भरघोस दाढी-मिशांचा. कुणी स्वच्छ चेहऱ्याचा. कुणी एकदम साधा. कुणी गोरक्षक. कुणी साधक. कुणी तपस्वी. कुणी शास्त्री. कुणी अडाणी. कुणी संस्कृतज्ज्ञ. कुणाचे इंग्रजीवर प्रभुत्व. कुणी वेदविद्याविशारद. कुणी प्रवचनपटु. कुणी धर्मपंडित. कुणी पारंगत वक्ता. कुणी अबोल. कुणी देशविदेशातून ज्ञान संपादित केलेला. कुणी डॉक्टर. कुणी वैद्य. कुणाच्या माथ्यावर भुरभुरती शेंडी. कुणाच्या माथ्याला तेलाचा स्पर्श नाही. कुणाचे कान उंचच उंच. कुणाचे प्रलंब बाहू. कुणी कपाळावर टिळा मिरवणारा. कुणाच्या हाती पुस्तकांचा भारा. कुणी मेल्या गुरांची कातडी कमावणारा. कुणी चरख्याचा प्रयोगवीर. कुणी राष्ट्रभाषेचा प्रचारक. कुणी खादी विद्येचा प्रतिष्ठापक. कुणी संन्यस्त. कुणी गृहस्थ. कुणी मौलाना. कुणी आचार्य. कुणी सदैव प्रसन्न. कुणी अखंड उदासीन. कुणी अब्बास. कुणी गोवर्धनदास. कुणी रैहाना. कुणी अम्तुस्सलाम. कुणी इस्माईल. कुणी टॉल्स्टॉय. कुणी केलेनबॅक. कुणी पोलाक. कुणी एण्ड्रयुज. कुणी साराभाई. कुणी नानावटी. कुणी क्रांतिकारी. कुणी समन्वयवादी. कुणी दादा. कुणी काका. कुणी मामा. कुणी अण्णा. कुणी अप्पा. कुणी कुष्ठरोगी. कुणी श्रीरंग. कुणी कवी. कुणी पत्रकार. कुणी लेखक. कुणी चिंतक. कुणी तत्त्वज्ञ. कुणी विचारवंत. कुणी मोठे. कुणी धाकटे. कुणी नास्तिक. कुणी आस्तिक. कुणी असा. कुणी तसा. कुणी कसा.

ही यादी न संपणारी आहे. आश्रमातल्या वडाच्या झाडावर येणारी पाखरे किती विविध रंगांची असायचीत. किती विविध पंख असायचेत त्यांचे. कसे तजेलदार पंख. त्यांचे चिवचिवाट किती विविध प्रकारचे. त्यांचे थवे येऊन विसावत. कस्तुरबा बघत रहायची आणि मग तिचे संवेदनशील मन तुलना करत रहायचे. गांधी नावाच्या झाडाभोवती काही कमी पाखरे येत नव्हती. तिला समोरच्या झाडावर सायंकाळी विसाव्याला येणारे पक्षी आठवत राहिलेत. ते पक्षीकुळ ती न्याहाळत रहायची. त्यात तल्लीन होऊन जायची. तृप्त व्हायची.

आश्रमातील गुण विकसनाची शिडी एकादश व्रते होती. सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, अस्वाद, अभय, स्पर्श भावना, शरीर श्रम, सर्वधर्म समभाव आणि स्वदेशी. अभय आणि आनंद आश्रम जीवनाचे स्थायीभाव होते. कोचरबहून आश्रम साबरमतीला आला. गांधीजींचे पुतणे मगनलालभाई दक्षिण आफ्रिकेपासून त्यांच्या सोबत होते. आश्रमाच्या नियमांमध्ये ते तपःपूत शिस्त राखत. साबरमतीचा आश्रम देशभरच्या स्वयंसेवकांना देशसेवेच्या यज्ञासाठी प्रशिक्षण देणारी अभिनव प्रयोगशाळा होता. इथले सारे नियम आंतरिक शुध्दिशी संलग्न होते. आश्रमाच्या स्थापनेनंतर गांधीजींनी या नियमाना व्रतांचे स्थान दिले. आजपर्यंत वैयक्तिक मानल्या गेलेल्या गुणांना सामाजिक मूल्यवत्तेचा दर्जा दिला. आश्रम गांधीजींच्या सामाजिक मूल्यांची प्रयोगशाळा होते. आश्रमातले सर्वात मोठे प्रशिक्षण हे संडास सफाईचे होते. यात सर्वांना प्राविण्य संपादन करणे गरजेचे होते. स्थायी आश्रमवासियांना तर हे काम करावेच लागे पण काही काळ आश्रमात येणाऱ्यांनाही हे काम सोपवले जायचे. दुसरे एक कौशल्य वस्त्रविद्येचे होते. कस्तुरबा संडास सफाईचे काम करायची. आश्रमात येणाऱ्या भगिनींना वस्त्रविद्येचे ज्ञान देण्याकामी सुध्दा ती पुढे होती. भगिनींसोबत एकेका बांगडीखेरीज दुसरा कुठलाही दागिना नसायचा.

गांधीजींचे वादळी दौरे असायचेत. नाना अडचणी असायच्यात. त्यांचा स्वयंपाक आणि मालीश कस्तुरबा स्वतःच करायची. सभा-समारंभ नित्याचेच होते. गांधीजी रात्री उशिरा परतत. कस्तुरबा वाट बघत बसून रहायची. अंग चेपून द्यायची. दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता तयार व्हायची. नवऱ्याला कमीत कमी त्रास द्यायची. अधिकात अधिक सेवा करायची. आजारी अवस्थेतही तिची भिरभिरती नजर त्यांच्या व्यवस्थेवर स्थिर असायची. घासून ठेवलेली भांडी कस्तुरबा परत घासायची. तिला सफाईचे खास वेडच होते. इतर खर्चात तशी काटकसर होती. साबणाचा मात्र खर्च व्हायचा. साबरमती आश्रमात हा चर्चेचा विषय असायचा. एकदा तर प्रार्थनेत गांधीजींनी याविषयी उल्लेखही केला. भरल्या सभेत ताकीद दिली. 'साबणावरील खर्च कमी करा.' कस्तुरबाने स्पष्ट शब्दात भूमिका मांडली. 'अस्वच्छता मला सहन होणार नाही. साबणावरील खर्च कमी करा हे तर अनारोग्याला निमंत्रण.' ती हा खर्च कमी करायला तयार नव्हती.

कस्तुरबा व मगनलाल साबरमती आश्रम सांभाळत होते. पहाटे सर्वांना प्रार्थनेला उठवायची जबाबदारी जणू कस्तुरबाची होती. आश्रमातला दैनंदिन कारभार व कार्यक्रमाची योजना आखणे, कामांची रचना करणे, कामे आकाराला आणणे ही सारी कामे तिची होती. आश्रमातील विविध प्रश्न सोडवावे लागत. एकमेकांमध्ये अनेकदा गैरसमज निर्माण होत. ताणतणाव जागायचा. तो हटवण्यात ती कुशल होती. अटळ अशी जर वादावादी असेल तर ती मध्यस्थ बनायची. हे अवघड काम तिच्या अंगवळणी पडून गेले होते. अतिथींच्या अडी-अडचणी दूर कराव्या लागत. ती हे सारे करायची. खरे तर तिची गरज तिच्या कुटुंबियांसाठी अधिक होती. कस्तुरबासाठी चरखा म्हणजे ध्यान साधनेचे माध्यम होते. मनातील कल्लोळ आणि किल्मिष स्वच्छ करणारी ध्यानप्रक्रिया म्हणजे सूतकताई. ही ध्यान प्रक्रिया व्यक्तिला क्रोधापासून दूर ठेवते. सगळ्यांशी समरसतेने वागायला शिकवते. तुळशी पूजनात जशी एकाग्रता कस्तुरबाला साधता यायची तशी एकाग्रता तिला चरखा कातताना व्हायची. चरखा जणू तिच्या पूजेचे उपकरण होते. जीवनचक्र आणि कालचक्राचे प्रतीक होते.

डॉ. सुशीला नायर सेवाग्रामला आली. तिला कस्तुरबा स्वयंपाकघरात दिसली. आपल्याला झेपणाऱ्या कामांपेक्षाही अधिक काम ती करायची.

तिच्या हालचाली कमालीच्या चपळ असत. कस्तुरबाच्या ठायी थक्क करणारा वेग होता. चकित करणारे व्यवस्थितपण होते. सुशीला याची नोंद घेते. सुशीलेला कस्तुरबा गांधीजींजवळ क्वचितच बसलेली दिसली. तरीही संपूर्ण वेळ कस्तुरबाची नजर गांधीजींचा पाठलाग करत असे. गांधीजींच्या सगळ्या गरजा वेळच्या वेळी पूर्ण करण्याकडे तिचा कटाक्ष असे.

गांधीजींनी एका कार्यकर्त्याला पत्र लिहिले. ते मोठे आरस्पानी आहे.

"मी बांना डेहराडूनला जायला मनवू शकेन या आशेमुळे आपल्याला पत्रोत्तर द्यायला विलंब करत राहिलो पण त्या तयार झाल्या नाहीत. आपल्या आसपास काय चालले आहे. याविषयी त्यांना काही आवड उरली नसल्याचे लक्षात येते. सध्या नुकतेच आश्रमात जे महत्वाचे बदल केले गेले आहेत. त्याविषयीही त्यांच्या मेंदूवर चांगले प्रभाव पडले नसावेत अशीही मला शंका आहे. त्यांची तब्येतही सध्या चांगली नसते. त्यांना मानसिक व शारीरिक थकवा आला आहे. हे सारे असूनही मी भरपूर प्रयत्न केलेत पण यश मिळाले नाही. आपल्याला निराश करावे लागत असल्याचा मला खेद वाटतो. मी किती लाचार आहे. हे आपण समजू शकता. अखेर तर त्या स्वतंत्र आहेत. आणि त्यांना सदैव स्वातंत्र्य दिले गेले आहे."[१]

कस्तुरबा स्पष्टवक्ता होती. आपले म्हणणे समोरच्यापुढे न डगमगता मांडायची. तोंडपूजा करणाऱ्यांवर तिचा राग असायचा. कामात हयगय करणारे तिला आवडत नसत. नवागताना कधी-कधी याबाबत रागही यायचा. प्रत्येक वस्तु जागच्या जागी ठेवली जायला हवी यावर तिचा कटाक्ष असायचा. भांडी नेमकी रचलेली असावीत. कपड्यांच्या घड्या धडपणे घातलेल्या असाव्यात. चादरी स्वच्छ असाव्यात. याबाबत तिचा आग्रह असायचा. हलगर्जीपणा तिला मान्य नव्हता. अव्यवस्था दिसली की ती पुढे सरसावायची. स्वत: स्वच्छता करु लागायची. अशावेळी साखरेसारखी वाटणारी कस्तुर कडू निंबासारखी वाटू लागायची. तिचे हे आकलन एखाद्या विचार व्यूहाबाबतही असेच तीक्ष्ण स्वरुपाचे होते.

गांधीजींचा स्वयंपाक तर ती स्वत: करायची. कुणी आग्रहाने करु म्हटले तर स्वत: तिथे जाऊन उभी रहायची. पोळ्यांचा आकार बघायची. पोळी खूप जाड नको. कच्ची नको. करपलेली नको. मीठ नेमके पडले ना भाजीत? सोडा नेमका घातला गेला की नाही? एक का दोन. नाना विषय. ती जातीने लक्ष घालायची. तिच्यापाशी समोरच्या व्यक्तिला पारखण्याचे एक विलक्षण सामर्थ्य होते. ही तिला लाभलेली एक शक्ती होती.

कस्तुरबाचा तिथल्या महिलाना मातृवत आधार लाभायचा. महिलांचे इतके-इतके प्रश्न असत की काही विचारु नका. एका पत्रातून गांधीजी मीराताईला लिहितात

"मला वाटते की तुझ्याशी या विषयावर (मासिक धर्माच्या काळी स्त्रियांनी स्पृश्यास्पृश्य भेद पाळण्याच्या विषयावर) बोललो आहे. की मी स्वत:सुध्दा या नियमाला बाच्या संदर्भात पाळले नाही आणि यामागच्या सर्व गोष्टी समजून घेतल्यावर तर मला हा नियम पाळायची-पाळायला लावायची-कधी गरजच भासली नाही. राधा आणि रुखी तर या नियमाचे पालन करत नाहीत आणि माझ्या माहितीनुसार इतर मुलीही हा नियम पाळत नाही. अमीनाही पाळत नाही."[२]

विविध अडचणींच्या प्रसंगी कस्तुरबा पुढे यायची. सर्वांना धीर द्यायची. मार्ग काढायची. महिलांच्या लहान-सान मागण्या ती ऐकायची. सर्वांचे प्रतिनिधित्व करायची. तिच्या मनात कुणाविषयी पक्षपात नव्हता. ती सर्वांवर रागवायची. प्रेमही करायची. आदरही द्यायची. लहानांचे मन राखायची. मोठ्यांचा मान राखायची.

कस्तुरबा आश्रमात दिवसभर राब-राब राबायची. तिचा बहुतांश वेळ स्वयंपाकघरात जायचा. या धावपळीत वेळ मिळाला की ती गांधी-कुटीकडे धाव घ्यायची. गांधीजींच्या डोक्यावर तेल मालीश करायचे काम तिचे असायचे. अनेकदा तेही खूप दमलेले असायचे. मालीश करवून घेत तेही झोपी जायचे.

एकदा कस्तुरबा अशीच उशीरा पोहोचली. गांधीजींनी हळूच विचारले.

'आलीस?' गांधीजींचा स्वर कोमल होता.

‘हो.’ कस्तुरबा म्हणाली.

‘आज इतका उशीर का? बराच वेळ स्वयंपाकघरात खडखड चालली होती. तू कामात होतीस तर इकडे दुसऱ्या कुणाला पाठवून दिले असतेस.’ गांधीजींनी मायेने सल्ला दिला.

“अहो, सारे जेवल्यावर मी जेवले. भांडी घासली. सारे स्वयंपाकघर धुवून काढले. रामा मुंबईला जात आहे. त्याला काही करुन दिले. न्याहारीचे बघितले. उशीर झाला. कामात मला वेळेचे भान राहीले नाही. हे काम दुसरा कुणी करेल असे मला वाटले नाही.” कस्तुरबाने स्पष्टीकरण दिले.

“तुझ्यावर कामांचे मोठे ओझे आहे. हे सगळे तू कुठवर करणार आहे.स? माझ्याही स्नानाची, जेवणाची सारी सोय तूच करतेस. अतिथींची सेवा वेगळी. पाहुण्यांचे तर नित्याचे आगमन असते. त्यांची जबाबदारीही कुणावर सोपवायचे काम तुझेच. आपल्या कपड्यांसाठी लागणारे सूत कातायचे कामही तुझे. इतकी कामे करायला तू वेळ तरी कसा काय काढतेस हाच माझ्यासमोरील बिकट प्रश्न आहे. एवढे काम कमी म्हणून की काय तू वरुन रामासाठी न्याहारी करुन द्यायला बसलीस. होय ना? असे किती दिवस चालेल?” गांधीजींनी विचारले.

‘जमेल तितके आणि तसे करायचे.’ कस्तुरबा म्हणाली.

‘अगं, उद्या रामा मुंबईला जात आहे. परवा सुरेंद्र अहमदाबादला जाईल. तेरवा रुक्मिणी नेपाळला जाईल. या सर्वांसाठी का तू काही-ना-काही तयार करुन देशील?’ गांधीजींचा प्रश्न होता.

“रामा माझा मुलगा आहे. सर्वच आश्रमवासी जनांसाठी मी न्याहारी कशी काय करुन देऊ शकेल? आपण तर महात्मा आहात. आश्रमात येणारी सारीच आपली लेकरे आहेत. मी काही अजून महात्मा पदाला पोहोचलेले नाही तरी आश्रमवासींचे मजवर कमी प्रेम आहे. असे मानू नका. मी सर्वांशी रामदासशी वागावे तसेच वागते.” कस्तुरबाने उत्तर दिले.

वैयक्तिक गुणविकास आणि सामुदायिक उन्नतीमार्ग आश्रम जीवनातल्या दोन दिशा होत्या. शिक्षण, जीवन आणि अध्यात्म या गोष्टींसाठी एकाच तत्वाची त्रिवेणी होती. अध्यात्माचा अर्थ केवळ एकांत साधना आणि ध्यान-धारणा नव्हती. समाजात राहून समाजोन्नतीच्या दिशेने ती आगेकूच होती. दक्षिण आफ्रिकेत आपली सर्वोत्तम कृती फिनिक्स असल्याचे तर गांधीजी नेहमीच म्हणत असत. आश्रम व्यवस्था त्यांना सत्याग्रहाचे मूळ वाटायची. चंपारण्य वा खेडातील चळवळीपेक्षा आपली खरी ओळख आपला आश्रम असल्याचे त्यांना पुरेपूर भान होते. आध्यात्मिक साधना आपल्या ठायी भूतमात्राचे दर्शन करणे आणि भूतमात्रांच्या ठायी जगदीश्वराचे दर्शन करणे आहे. कस्तुरबासाठी आश्रम आत्मपरिचय, आत्मपरीक्षण आणि आत्मशोधनाची प्रयोगशाळा होते.

संदर्भ

१) गांधीजींनी श्री रामदेव यांना सत्याग्रह आश्रम साबरमतीहून दिनांक १५ जून १९२८ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३६ पृष्ठ ४३५;

२) गांधीजींनी कुमार पार्क बंगलोरहून मीराताईला दिनांक २६ ऑगस्ट १९२७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३४ पृष्ठ ४३५.

❖❖❖

## ८) समरांगणात रणरागिणी

अहमदाबाद शाही बागेचे सर्किट हाऊस. गांधीजी आणि श्री शंकरलाल बँकर यांच्या विरोधात राजद्रोहाचा खटला सुरु होता. न्यायमूर्ती होते श्री आर्. एस्. ब्रुमफिल्ड. अहमदाबाद न्यायालयात खटला उभा राहिला. या खटल्याची एक आख्यायिका बनून गेली. गांधीजी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे होते. आपणास कठोर शिक्षा मिळावी अशी मागणी त्यांनी केली होती. यावर ब्रुमफिल्ड म्हणाले होते "तुम्हाला सजा ठोठावताना चौदा वर्षांपूर्वीच्या एका खटल्याची मला आठवण येत आहे. मी त्याचेच अनुसरण करत आहे. मिस्टर बाळ गंगाधर टिळक यांना याच खटल्यात ज्या कलमान्वये शिक्षा ठोठावली गेली होती त्या खटल्याचे मला स्मरण होत आहे. मी जर तुम्हाला टिळकांच्या रांगेत बसवले तर तुम्हाला अयोग्य वाटणार नाही, अशी मला खात्री आहे. मी तुम्हाला सहा वर्षांची साधी कैद ठोठावत आहे."

न्यायमूर्ती ब्रुमफिल्ड यांचा हा निर्णय ऐकून गांधीजी म्हणाले होते " मी या संदर्भात माझ्या निवेदनात एकाच वाक्याचा अंतर्भाव करु इच्छित आहे. मला शिक्षा सुनावताना आपण स्वर्गीय लोकमान्य टिळक यांच्या खटल्याचे स्मरण केले. हा मी माझा बहुमान समजतो. या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की आपण या महान पुरुषाशी माझे नाव जोडून देणे हे माझे सद्भाग्य आहे. यापेक्षा माझा मोठा तो काय बहुमान असेल?"[१]

गांधीजी न्यायाधीशासमोर उभे होते. कस्तुरबा या ठिकाणी उपस्थित होती. ती न्यायालयात बसून होती. गांधीजींच्या भोवताली जमलेल्या त्यांच्या चाहत्या-सहकार्यांची नोंद घेत होती. गांधीजींचे हे ऐतिहासिक भाषण तिने प्रत्यक्ष ऐकले होते.

चौदा वर्षांपूर्वी १९०८ साली लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा झाली होती. २४ जुलै १९०८ रोजी टिळकांना मुंबई येथे सरदार गृहात राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. न्यायमूर्ती दावर यांनी शिक्षा ठोठावली होती. लोकमान्य टिळकांनी न्यायमूर्तीला सांगितले होते "ज्यूरीने मला दोषी ठरवले तर खुशाल ठरवो पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टींचे नियंत्रण करणारी अशीही एक शक्ती न्यायपीठाहून श्रेष्ठ आहे. कदाचित ईश्वराची इच्छाच असेल की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्यानेच मी अंगिकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी." लोकमान्यांचे हे धीरोदात्त उद्गार ! कोर्टात जमलेल्या श्रोत्यांनी ऐकले. त्यांचे चित्त कोर्टाच्या अंधारभरल्या वातावरणातून शाश्वत मूल्यांच्या प्रकाशमय विश्वात गेले. [२]

चौदा वर्षानंतरच्या न्यायदान प्रसंगी कस्तुरबा हजर आहे. यानंतर येरवडा जेलमध्ये १९२३ सालच्या २७ जानेवारी, १८ मे, १७ जुलै, १० ऑक्टोबर रोजी जाऊन गांधीजींना भेटली आहे.

गांधीजींना शिक्षा फर्मावली गेली. काही मित्रांना तर तुरुंगापर्यंत यायला परवानगी होती. निरोपाच्या वेळचे वातावरण उल्हसित करणारे होते. निरोप देताना कस्तुरबाने आणि अनसूयाताई साराभाई यांनी खूपच धैर्य दर्शवले.[३]

गांधीजींना साबरमतीहून येरवडा तुरुंगात हलवण्यात आले. कस्तुरबाला अपार दु:ख झाले. तिने स्वत:ला सावरले. अशासमयी ती आपल्या मूळ रुपात प्रकट व्हायची. सदैव मितभाषी आणि स्वयंपाकघर सांभाळणारी कस्तुरबा सार्वजनिक कामांसाठी आश्रमाबाहेर पडायची. ती म्हणाली.

"मला आता आश्रमात करमत नाही. आता तर मला, जमेल तेवढे गांधीजींचे कार्य करायला हवे. गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला आहे. आदिवासींमध्ये जाऊन सेवा करायला सांगितले आहे."

कस्तुरबा देश परिस्थितीवर भाष्य करत होती. आपल्या साध्या-सोप्या सरळ भाषणांमधून जनांचे प्रबोधन करत होती. तिची भाषणे संक्षिप्त, सारगर्भित आणि कृतीला प्रवृत्त करणारी होती. तिने अगदी साध्या शब्दात आवाहन केले. कस्तुरबा साधे-सोपे बोलायची. अनुभवाने तिच्या भाषेला सहज-सरळ बनवले होते. तिला परिस्थितीचा नेमका बोध होता. यामुळे तिची भाषा प्रांजळ व अंत:स्पर्शी होती. हे गुण तिच्या जीवनात अंतर्भूत होते. मिथ्या आडंबरांपासून ती लांबच लांब होती. ऋजुता आणि साधेपणा तिच्या व्यक्तिमत्वाचे अंग आणि भाषेचे बलस्थानही होते. कस्तुरबाने पुढील प्रमाणे संबोधन केले होते.

"माझ्या प्रिय देशबांधवांनो आणि भगिनींनो, आज आपल्या प्राणप्रिय नेत्याला सहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. त्याचा परिणाम आपणा सर्वांवर काही-ना-काही प्रमाणात होईल यात मला काही शंका नाही. ही शिक्षा आपण ना रद्द करु शकत ना कमी करु शकत हे तर मी जाणते. यावरचा उपाय आपल्या हाती आहे. आपल्या अपयशाला आपण जबाबदार असू. ज्यांना आस्था आहे. आणि नेत्याला मनापासून पाठिंबा द्यायचा आहे. त्यांनी एक काम करावे. विधायक कार्यक्रमांवर आपले लक्ष केंद्रित करावे."[४]

एवढे म्हणून थांबण्याऐवजी कस्तुरबाने देशवासियांना एक कृती कार्यक्रम दिला. विदेशी कपड्यांचा त्याग व खादीचा वापर, दैनंदिन सूतकताई कार्यक्रमात महिलांचा सहभाग आणि विदेशी कपड्यांवर बहिष्कार. ही या कार्यक्रमाची त्रिसूत्री होती.

स्वर्गीय श्री दयालजीभाई यांच्या मातेसोबत कस्तुरबा निघाली. विद्यापीठासाठी देणगी गोळा करायच्या हेतुने सूरत जिल्ह्यात फिरली. दक्षिण गुजरातेतून निघाली. उत्तर महाराष्ट्रातल्या थेट नंदुरबारपर्यंत जाऊन पोहोचली. बारडोली येथे चरखा क्रांती व्हावी यासाठी बैलगाडीतून गावा-गावात पोहोचली. कॉंग्रेसमध्ये स्वराज्यवादी दलाचा उदय झाला होता. गांधीजींच्या रचनात्मक कामांवरुन भल्या-भल्यांची श्रध्दा डगमगली होती. कस्तुरबा मात्र निष्ठेने आणि अविचल श्रध्देने गांधीजींच्या कार्यक्रमात लागली होती. ती म्हणायची-

"उसळत्या जोशाच्या वेळी तर सारेच साथ देतात पण जोशाचा भर उतरुन गेल्यावरही जे टिकून रहातात ते खरे निष्ठावान होत, दृढ होत. दक्षिण आफ्रिकेतही असेच नाउमेदीचे वातावरण कधी-काळी झाले होते. भगिनी निघाल्यात. खाण कामगारांनी साथ दिली. विजय संपादन करता आला. त्याचप्रमाणे माझा तर हा दृढ विश्वास आहे. की अंतिम विजय सत्याचाच असणार आहे."

१९२२ साली गांधीजींवर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. ते मुंबईला मणी भवन येथे विश्रांती घेत होते. कस्तुरबा त्यांची सेवा करत होती. आता इथे हसण्या-खिदळण्याचे निनाद ऐकायला येऊ लागले होते. गांधीजींची तब्येत सुधारत चालली होती. गांधीजी गमतीने एकदा म्हणाले सुध्दा की कस्तुरबा ब्रिटिशांपेक्षाही अधिक छळवादी आहे. १० एप्रिल रोजी गांधीजींच्या अटकेची बातमी आली. वीस हजारांच्या जाहीर सभेत मगनलाल, इंदुलाल यांच्या समवेत कस्तुरबाने भाषण दिले.

या वर्षी कस्तुरबाने झंझावाती दौरे केले. जनजीवन घुसळून काढले. अनेक ठिकाणी सभा-समेलनांमधून विचार मांडलेत. तिच्या पायाला भिंगरी होती. ती जनांमध्ये बसून प्राप्त परिस्थितीचे निदान करत होती. तिचे निदान अचूक होते. ती नारी-शक्तिला जागवत होती. सर्वसामान्यांच्या जीवनात जीवनानंद ओतत होती.

काठेवाडात विविध ठिकाणी झालेल्या सभांमधून कस्तुरबा बोलली. विषय एक आणि संदेशही एक. सूत काता आणि खादी वापरा. आपल्या एका भाषणात ती म्हणाली की मुंबईत आता लोकानी चरखे माळावर ठेऊन दिले आहेत. असे करु नका. सारे जण एकत्र या. हातमाग टाका. सूत विणा. खादी रंगवा. सूत बारीक काता. कपडे तलम वापरा. रोज दोन तोळे सूत काता. स्वराज्य आपला पत्ता शोधत येईल.

आणंद येथे सहावी गुजरात राजकीय परिषद भरली होती. कस्तुरबा या परिषदेची अध्यक्ष होती. तिने आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले की आपल्या तुरुंगात खितपत पडलेल्या बंधुंना बंधमुक्त कसे करावे हाच एक विचार आपल्या मनात असायला हवा. आपले देशप्रेम खरे असेल तर हा देश खादीमय असायला हवा.

सुरत येथील भगिनींच्या सभेत संबोधन करताना ती म्हणाली: "भगिनींनो, जपान व रशियात युध्द सुरु होते. तोफांचे दोरखंड संपून गेले. जपानी भगिनींनी आपल्या डोक्यावरील केसांच्या शोभिवंत वेण्या कापून दिल्या.' याचे दोरखंड वळा. वापरा यांना सैन्यदळात.' असे म्हणाल्या. आपण यापासून बोध घ्यावा. आपण आपल्या लढतीसाठी सूताचे दारुगोळे का तयार करु नयेत?"

नवसारी येथे दिलेल्या भाषणात ती म्हणाली,

"हे गाव तर दादाभाई नौरोजी यांचे आहे. हिंदचे धन विदेशात जात आहे. याची त्यांना वेदना होती. स्वराज्याचा जप करत त्यांनी देह ठेवला. पारशी भगिनी खूप उद्यमी आहेत. महायुध्द सुरु असताना रणांगणात

झुंजणाऱ्या व घायाळ झालेल्या सैनिकांसाठी मफलर, मोजे अशा वस्तु तयार केल्या जात होत्या. त्यावेळी पारशी भगिनी सेवाकार्यात पुढे होत्या. अजून विलायती कपड्यांचा मोह का सुटत नाही?"

'नवजीवन' ने आपला 'महिला विशेषांक' काढला. या विशेषांकाला कस्तुरबाने अभिप्राय दिला.

"मला आज दक्षिण आफ्रिकेतल्या भगिनी आठवतात. एवढ्या छोट्याशा भागातल्या दोन-अडीचशे भगिनी तुरुंगात जायला तयार झाल्या होत्या. इथेही भगिनींना रात्रं-दिवस कातावे लागेल. संयम पाळावा लागेल. बारीक कातता शिकावे लागेल. आपण एवढे तप करा. तपाशिवाय कुठले आले स्वराज्य?"[५]

६ एप्रिल ते १३ एप्रिल १९२२ सत्याग्रह सप्ताह होता. या दरम्यान कस्तुरबाने असा संदेश दिला:

"या पवित्र समयी मी 'नवजीवन' च्या वाचकांना काय संदेश देऊ? जालियांवाला बागेचा संदेश कमी नाही. त्या शूर सती रतनदेवीचा संदेश का कमी आहे.? मी हिंदूंना आणि मुसलमानांना हात जोडून विनवते की एक व्हा.

१४ ऑगस्ट १९२२ रोजी झालेले कस्तुरबाचे भाषण

"हरिजन बंधु-भगिनींनो, आजचा दिवस तुम्ही कसा साजरा कराल? आज आपले पातक धुऊन काढायचा निश्चय करा. आजपासून दारु सोडा. मांस खाणे सोडा. उष्टे खाणे सोडून द्या. आपापले घर आणि अंगण स्वच्छ राखा. आपल्या लेकराना शिकवा. घाणेरड्या सवयी टाळा. स्वच्छ रहायला शिका. भजने गा. प्रार्थना म्हणा.

पुणे येथे कस्तुरबाचे भाषण झाले.

"पुणे तर तीर्थक्षेत्र आहे. इथे लोकमान्य टिळक आणि गोखले यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांची इथे निवासस्थाने आहेत. त्यांनी आरंभिलेली कामे अजून चालताहेत. याहून पावन स्थान ते कुठले? हे तीर्थस्थान आहे. पण मी मात्र आज पुण्यात निराश झाले. मी देशभर फिरते पण इतक्या रंगीबेरंगी पगड्या व साड्या मला कुठे दिसल्या नाहीत. आज का पगड्या वापरायचा काळ आहे.? आज आपल्याला पगड्या मुळीच शोभून दिसत नाहीत."

कस्तुरबाची भाषणे जीवनस्पर्शी होती. ती श्रोत्यांच्या काळजाला थेट जाऊन भिडत असत. त्या भाषणाना अनुभवाचा ईसार होता. स्वकर्तृत्वाची झालर होती. ती स्वत: एका अभिनव संघर्षाला सिध्द झाली होती. यामुळे तिच्या निवेदनात व बोलण्यात ठाम विश्वास होता. तिच्या भाषणाना प्रत्यक्ष कृतीचे बळ होते. संवेदनशील हाक होती. ती सतत आघाडीवर राहिली. ती रणरागिणी बनून समरांगणात अग्रेसर होती.

कस्तुरबाने नवऱ्याला सांगितले 'मला तुमच्या सोबत प्रवासाला यायचे आहे.' गांधीजींनी नडियादहून पत्र लिहिले 'आपण वियोगात आनंद मानायला नाही का ग शिकलोत?' या पत्रात 'मी' किंवा 'तू' नाही तर 'आपण' असे गांधीजी लिहित होते. कस्तुरबा गांधीजींच्या ठायी सामावली होती की ते कस्तुरबामध्ये समाविष्ट झाले होते? चंद्राचा विस्तार चांदणे असते की चांदण्याच्या केंद्रस्थानी चंद्रमा असतो?

या चळवळीत कस्तुरबाचे स्वतंत्र रुप दिसते. तिची स्वत:ची वाट व वाटचाल दिसते. तिची आपल्या शैलीतली भाषणे आणि महिलांना आवाहन करायची शक्ती अद्भुत आहे. ती केवळ भाषण देत नाही तर एक कृतीशील कार्यक्रम देताना दिसते. आपल्या प्रचंड झंझावाती दौऱ्यांच्या माध्यमातून ती गांधीजींच्या सोबत चालताना दिसते.

संदर्भ

१) मारुं जीवन एज मारी वाणी : (गुजराती) श्री नारायण देसाई खंड द्वितीय ' सत्याग्रह ' पृष्ठ २२५;

२) लोकमान्य टिळक : प्रा. ग. प्र. प्रधान पृष्ठ ७४;

३) 'तुरुंगवासातील अनुभव १' : श्री मो. क. गांधी 'यंग इंडिया' १७ एप्रिल १९२४ आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड २३ पृष्ठ ४७७;

४) 'यंग इंडिया' दिनांक २३ मार्च १९२२ रोजी प्रकाशित लेख.;

५) 'नवजीवन' ने १६ जून १९२२ रोजी प्रकाशित केलेल्या 'महिला विशेषांक' साठी संदेश

❖❖❖

## १) खादीव्रती कस्तुरबा

कस्तुरबाने खादी परिधान केली. ती आमरण वापरली. ती खादीमय बनली. एकदा तिच्या पायाला जखम झाली होती. डाव्या पायाच्या बोटातून भळभळा रक्त वाहू लागले. आश्रमातल्या कुणीतरी धावत जाऊन तलम कापडाची पट्टी आणली. ती तिने नाकारली. ती म्हणाली,

'खादीची पट्टी हवी.' कस्तुरबाचा आवाज ठाम होता.

'ती तर खरमरीत असते.' समोरुन उत्तर आले.

'असू देत की खरमरीत. मला खादीची पट्टी बांधा. मला नाही ती बोचायची.' कस्तुरबाचे स्पष्टीकरण होते. स्वयंपाकघरातील स्वच्छतेचे कापडही खादीचेच असायचे.

दर एकादशीला कस्तुरबा खादीचे महात्म्य गायची. कुणाला तरी गीता वाचायला लावायची. ती खादीचे महात्म्य सांगायची. ती म्हणायची

"आपण का मिलच्या कपड्याने दूध गाळावे? आपल्याकडे खादीच्या कपड्यांची काय उणीव आहे. की काय? आपण आपल्या कामात खादी का वापरु नये? खादीशिवाय जर एखादे काम होणार नसेल तर मग ते काम टाळा. आपण स्वदेशीची प्रतिज्ञा घेतली आहे. ना? ती पाळायला नको का? दूध गाळताना खादीच्या कपड्याचा वापर न करणे हे प्रतिज्ञा भंग करणे नव्हे काय? यापुढे काळजी घ्या. यापुढे असे होता अजिबात कामा नये."

गांधीजींच्यासाठी दूध गाळताना मनूची एकदा चूक झाली. तिला मग हे खादी महात्म्य ऐकून घ्यावे लागले. जे जाणवलेले आहे. त्याचे सूक्ष्म विश्लेषण करण्याची रीत तिला ठाऊक होती. ती श्रध्देसोबत ज्ञानाचीही सांगड घालत होती. तिला खादीचे महात्म्य समजले. ती इतरांनाही ते समजावून सांगू लागली. कस्तुरबा तंत्राच्या विषयी काही बोलत नव्हती. ती बोलत होती तत्त्वाच्या संदर्भात. ती तत्त्वाचा विचार करत होती. जगत होती. तो विचार मांडत होती.

गांधी परिवारासोबत संपूर्ण आश्रम खादीधारी होता. कस्तुरबाचे तर आठ-दहा नंबरचे सूत असायचे. त्याची खादी वापरता यायची. त्या काळी खादीचे वस्त्र रुंद नसायचे. जोडून घ्यावे लागायचे. साधारणपणे गोणपाटासारखी ती खादी असायची. दोन-किलो वजनाची साडी नेसावी लागायची. खूप काळ लोटल्यावर गंगाबेन मुजूमदार यांनी रुंद पन्हा असलेले खादी वस्त्र तयार केले. एक नवे परिवर्तन जागले होते. कस्तुरबाची साडी नेहमी पांढरी असायची. क्वचित् तिच्यावर रंगीत रेषा किंवा ठिपके असायचे. पदराचा काठ आणि साडीच्या खालचा काठ रंगवलेला असायचा. तिला कोणत्याही विशिष्ट रंगाची आवड वा नावड नसायची.

कस्तुरबाचा खादी प्रचाराचा संदेश भारतीयांच्या छिन्न आत्मविश्वासाला नवी उभारी देणारा ठरला. देशभरात ठिकठिकाणी विदेशी वस्त्रांच्या होळ्या धडधडू लागल्या. चरख्याचे संगीत गुंजू लागले. काहींनी खादी अंगिकारली. व्रतस्थ बनले. हे व्रत आजन्म पाळले. कस्तुरबा गावा-गावात गेली. कस्तुरबाचे कर्तृत्व केवळ 'चूल व मूल' एवढेच बंदिस्त नव्हते. ती सभा-सभारंभात जायची. प्रबोधन करायची. तिच्या मार्गदर्शनाने गुजरातच्या ग्रामीण भागात क्रांतीची मशाल पेटली.

कस्तुरबाला वाटायचे की सर्व बायकांनी सूतकताई करायचे ठरवावे. ते मोठे क्रांतिकारी कार्य होईल. ती तसे सांगू लागली. खादी तिच्यासाठी प्रतिष्ठेची वस्तु बनली. खादी काही केवळ वस्त्र नव्हते. तो एक विचार होता. ते काम नव्हते. ती देशभक्ती होती.

गांधीजींचे बोरीवलीच्या सभेत भाषण झाले. जनतेने टिळक स्वराज्य कोषासाठी एक थैली अर्पण केली. या सभेत मोठया संख्येने बंधू-भगिनी उपस्थित होते. सभेत गांधीजी म्हणाले,

"मी आपला एक वैयक्तिक अनुभव सांगू इच्छितो. आता अगदी कालच माझ्या पत्नीने मला सांगितले. खादीची जाडी-भरडी साडी नेसली असल्यामुळे तिला स्वयंपाक करण्यात आणि घरकामे करण्यात गैरसोय होते. तिने मला हलके व तलम वस्त्र वापरायची परवानगी मागितली. मी मनासारखे करावे-वागावे यासाठी तिने मला जशी परवानगी दिली आहे. तद्वत्च

सर्व बाबतीत मीही तिला स्वातंत्र्य प्रदान केले आहे. असे असल्यामुळे मी सहाजिकच तिला काही करायला सांगू-सुचवू इच्छित नव्हतो पण मला माझ्या पत्नीला सांगावे लागले की माझा स्वयंपाक जर ती खादीची वस्त्रे नेसून करणार नसेल तर तिने तो करु नये. मी अपवित्र विदेशी वस्त्र नेसून तयार केलेल्या स्वयंपाकातले काहीही ग्रहण करणार नाही. माझ्या पत्नीने विदेशी वस्त्रे परिधान करुन तयार केलेल्या अन्नाला मी स्पर्शही करणार नाही[१]

गुजरात प्रांतिक परिषदेच्या प्रमुखपदी योग्य व्यक्तिची नेमणूक करायचा प्रश्न होता. कुणाची नेमणूक करायची याविषयी चर्चा सुरु होती. गांधीजी म्हणाले 'स्त्रियांची सभा असेल तर तिथे कदाचित श्रीमती जाईजी पीटिट सारख्या अत्यंत संस्कारी आणि सुशिक्षित भगिनी असतील तर मी त्यांना प्रमुख नेमेन, नाही तर मग खादी कार्य करणाऱ्या सूरजताईचे किंवा मग कस्तुरचे नाव जरुर सुचवीन.'

महाराष्ट्र प्रदर्शन समिती, महाराष्ट्रच्या प्रांतीय समिती खानदेशचे सचिव श्री ए. एम्. जोशी यांनी कस्तुरबाला खादी प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी पाचारण केले होते. त्यांना गांधीजी लिहितात -

"प्रिय श्री जोशी,

आपण आगामी महाराष्ट्र प्रांतीय संमेलनाच्या निमित्ताने आयोजित खादी प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी श्रीमती गांधींना कृपापूर्वक आमंत्रित केले आहे. श्री दास्ताने यांनी मला सांगितले की ते या उद्घाटनासाठी श्री चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना आमंत्रित करणार आहेत. त्यांना या कामासाठी बोलावणे अधिक चांगले असे माझे मत आहे. श्रीमती गांधी तर केवळ कार्यक्रमाची शोभा वाढवतील पण जनतेसमोर आपण जे व्यापक स्तरावरील एकमेव खरेखुरे रचनात्मक कार्य उपस्थित करताहात त्यासाठी आपल्याला अशा लोकांची गरज आहे. ज्यांच्या ठायी बुध्दी आणि हृदय या दोन्ही तत्त्वांचा समावेश आहे."[२]

गुजरात प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षपदी गांधीजी कस्तुरबाच्या नावाचाही विचार करतात. सार्वजनिक कार्यक्रमाच्या संदर्भात मात्र अधिक योग्य व्यक्तिला पाचारण करण्याविषयीचा आग्रह धरतात. या पत्रातून गांधीजींनी एकाच वेळी सार्वजनिक जीवन आणि आपल्या वैयक्तिक जीवनातील सीमारेषा स्पष्ट केल्या आहेत. यात कस्तुरबाच्या संदर्भातले प्रेम व्यक्त असूनसुध्दा ते या कार्यक्रमाला एक व्यापक परिमाण देतात. हे परिमाण राष्ट्रीय संदर्भांनी भारलेले आहे. हे एक भावसमृध्द पत्र आहे.

संदर्भ

१) ३० जून १९२१ रोजी बोरीवलीच्या सभेतील गांधीजींचे भाषण. सदर सभेचे वृत्त १ जुलै १९२१ च्या 'बॉंबे क्रॉनिकल' मधून प्रकाशित झाले आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २१ पृष्ठ ३१८;

२) गांधीजींनी श्री ए.एम्. जोशी, सचिव, प्रदर्शन समिती, महाराष्ट्र राज्य प्रांतीय समिती, जळगाव यांना दिनांक २८ मार्च १९२४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ ३४७.

❖❖❖

## १०) गांधीजींची माता : कस्तुरबा

गांधीजींच्या आयुष्यावर प्रभाव टाकणाऱ्या तीन महिला आहेत. यात एक त्यांची आई पुतळी आई आहे. दुसरी मोलकरीण रंभा आहे. तिसरी पत्नी कस्तुरबा आहे. कस्तुरबाच्या संदर्भातली त्यांच्या मनातली कोवळीक अनेकदा प्रकट झाली आहे. ते झुलू बंडाच्या निमित्ताने युध्दभूमीवर सेवाकार्यरत होते. त्यावेळी त्यांच्या मनात ब्रह्मचर्याचा विचार प्रखरतेने प्रकट झाला. जे ठरले ते आत्मीय भावनेने करायचे हा त्यांचा स्वभाव होता. या व्रताच्या निर्वाहासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. या व्रताचा मध्यबिंदू कस्तुरबा होती. जनता तर काय पण अनेकदा त्यांना स्वत:ला कस्तुर ही कस्तुरबा वाटली आहे. तिचा तसा सन्मान त्यांनी वेळोवेळी केला आहे.

एकदा एक व्यक्ती आश्रमात आली. तिने गांधीजींना विचारले.

'चहा कॉफी आरोग्याला हानीकारक आहे. ना?' व्यक्तिने धिटाईने विचारले. 'होय !' गांधीजी म्हणाले

'मग कस्तुरबा का सेवन करतात?' त्या व्यक्तिचा प्रश्न होता.

'बा ने काय-काय सोडले आहे. हे तुम्हाला काय ठाऊक? बा ने कशा-कशाचा त्याग केला आहे. हे तुम्ही कुठे जाणता? एवढी तिची आवडीची सवय उरली आहे. आता याचाही त्याग करायला मी सांगू का? मग तर माझ्यासारखा कठोर मीच ठरेन.' गांधीजींनी लागलीच उत्तर दिले होते.

पुढे तर कस्तुरबाने कॉफीचाही त्याग केला. कॉफी म्हणजे गव्हाच्या पिठाचे तयार केलेले पेय. अगदी गरज वाटलीच तर ती तुळस व मिरीचा काढा घ्यायची. यावरच समाधान मानायची. तिच्या ठायी ना आसक्ती होती ना परिग्रह. त्याग करायचा कुठलाही अहंकारसुध्दा नव्हता. अहंकारावर विजय प्राप्त करुन घेणे हीच तर खरी साधना आहे. तिला ते सहज साध्य झाले होते.

माटले येथील एका सार्वजनिक सभेत गांधीजींना मानपत्र मिळाले. त्यात कस्तुरबाचाही गौरवपूर्ण उल्लेख झाला होता. हे समजल्यावर गांधीजी आपल्या सत्काराला उत्तर देताना म्हणाले.

"आपण आपल्या मानपत्रात कृपापूर्वक माझ्या पत्नीचाही उल्लेख केला आहे. ती आता इथे माझ्यासमवेत कार्यक्रमात नाही. आम्ही ही यात्रा आपल्याकडून सन्मानपत्रे मिळवण्यासाठी करत नाहीहोत. भारताच्या लक्षावधी जनतेच्या सेवेचे कार्य आम्ही हाती घेतले आहे. तो आमचा हेतु आहे. लोक नेहमी माझ्या पत्नीला माझी आई मानून घेण्याची चूक करतात हे मी पाहिले आहे. काल रात्रीच एका बंधुला तसे वाटले. माझ्यासाठी आणि खात्रीपूर्वक सांगतो की माझ्या पत्नीसाठीही ही चूक केवळ क्षमा करण्यासारखी आहे. एवढेच नव्हे पण स्वागत योग्य आहे. मागील कित्येक वर्षांपासून आमच्या परस्पर समन्वयानुसार ती आता माझी पत्नी उरली नाही. गेल्या चाळीस वर्षांपासून मी अनाथ होऊन गेलो होतो. जवळपास गेल्या तीस वर्षांपासून ती माझी माता, मित्र, परिचारिका आणि सर्वच प्रकारची कामे करणारी आहे. दिवस उगवताच जर ती सन्मान प्राप्त करुन घेण्यासाठी माझ्यासोबत हिंडत राहिली तर मला जेवल्याशिवायच रहावे लागेल आणि माझे कपडे धुण्याच्या वा माझ्या अन्य गरजांचा कोणी विचार केला नाही, काळजी घेतली नाही असे झाले असते. यामुळे आम्ही एक युक्तिसंगत वाटणी करुन घेतली आहे. सन्मानाचा वाटेकरी मी होतो. श्रम-मजूरी करणारी ती असते."[१]

या भाषणातून गांधीजींनी कस्तुरबाच्या मातृ स्वरुपाचे दर्शन घडवले आहे. हे प्रत्ययकारी आहे. आपल्या पत्नीला साक्षात् आपल्या मातेचा दर्जा देण्याची भावना यात आहे. उभयतांच्या मनोमिलनाचे अनुपम रहस्य त्यांनी सहजपणे उद्घाटित केले आहे. कस्तुरबा निर्भय, निष्पक्ष आणि निर्वैर होती. अन्याय-अत्याचारांविरुध्द तिचा निडर प्रतिकार होता.

२५ मार्च १९२७ रोजी गांधीजींची तब्येत बिघडली. म्हैसुरच्या नंदी हिल्सवर ते विश्रांतीसाठी थांबले. इथे त्यांच्या समवेत देवदास व कस्तुरबा होती. कोलंबो येथिल महिलांच्या सभेत गांधीजी बोलले होते.

"स्त्रीच्या मनात प्रवेश करायच्या भावनेने मी मानसिक रुपाने स्त्रीच बनून गेलो आहे. मी माझ्या पत्नीशी ज्या प्रकारचा व्यवहार करत होतो त्यापेक्षा भिन्न व्यवहार करण्याचा मी जोवर निश्चय केला नाही तोवर मी

तिच्या अंत:करणात प्रवेश करु शकलो नाही. आता मी तिचा पती म्हणून असलेल्या माझ्या तथाकथित तमाम अधिकारांवर तिलांजली दिली आहे. तिला तिचे सारे अधिकार प्रदान केले आहेत. आज ती माझ्यासारखीच साधी-सरळ असल्याचे आपण बघाल. तिच्या गळ्यात एखादा दागिना वा अंगावर उंची वस्त्रे आपणास दिसणार नाहीत. आपणही तिच्यासारखेच होऊन जावे अशी माझी इच्छा आहे. आपण आपल्या स्वत:च्या लहरींच्या गुलाम बनू नका. आपल्या पुरुषांच्या गुलाम व्हायला नकार द्या."

"आपण स्त्रीच्या मनात प्रवेश करण्याची नियत ठेवावी. मी स्वत: तर मानसिक रीत्या स्त्रीच बनलो आहे. मी माझ्या पत्नीशी जसा व्यवहार केला होता तो बदलण्याचा निश्चय केल्यावर मी तिच्या अंतरंगात प्रवेश करु शकलो.  माझे तिचा नवरा म्हणून कुठलेच अधिकार उरले नाहीत. मी माझे तमाम तथाकथित अधिकार सोडून दिले आहेत. तिला तिचे अधिकार प्रदान केले आहेत. आज ती माझ्यासारखी साधी-सरळ आहे. तिच्या अंगावर गुंजभर सोने नाही. अनेकदा लोक तिला माझी आई समजतात. ही माझ्यासाठी काय आणि तिच्यासाठी काय स्वागतार्ह बाब आहे. गेल्या कैक वर्षांपासून आमच्या परस्पर आकलन व समजुतीनुसार ती माझी पत्नी उरली नाही. ती माझी आई, सखी, सेविका, स्वयंपाकीण आहे. सारे सन्मान मी स्वीकारतो. मेहनत-मंजुरी ती करते."[२]

या भाषणाचे वृत्त कस्तुरबाने वृत्तपत्रातून वाचले होते.

गांधीजींनी आपल्या एका मित्राला पत्रातून लिहिले 'बा आज माझ्यासाठी मातृवत आहे. अखंड प्रयत्न आणि ईश्वरी कृपेने हे शक्य झाले आहे.'[३]

या पत्राच्या माध्यमातून गांधीजींनी आपल्या मनातील भावनेला सार्वजनिक रुप दिले आहे. जाहीरपणे अशा प्रकारे आपल्या पत्नीचा उल्लेख करुन गौरव करणे केवळ विलक्षण आहे. आपल्या अखंड प्रयत्नशीलतेसोबत गांधीजी ईश्वरी कृपेचाही यात सहभाग मानतात.

आश्रमात भगव्या कौपीनधारींना प्रवेश नव्हता. साधु, फकीर, औलिया, भगत, मांत्रिक, ज्योतिषी यांना प्रवेश निषिध्द होता. 'नवजीवन' च्या एका वाचकाने कुठल्याशा मासिकात प्रकाशित झालेले एक कात्रण गांधीजींना पाठवले होते. कस्तुरबाने कुणा महाराजांना चरणस्पर्शपूर्वक नमस्कार केलेत याविषयी गांधीजींनी आपले मत व्यक्त करावे असे लिहिले होते. याच्या उत्तरादाखल गांधीजींनी लिहिले आहे.

"आम्ही उभयता वैष्णव संप्रदायाचे आहोत, तरीही जवळपास पस्तीस वर्षांपूर्वीपासून - म्हणजे जेव्हापासून आमचे सार्वजनिक जीवन सुरु झाले तेव्हापासून माझी पत्नी कधी कुणा महाराजांच्या दर्शनार्थ गेली असेल असे आमच्यापैकी एकालाही आठवत नाही. लेखकाने ही बातमी द्यायची हिंमत कशी केली हे काही माझ्या लक्षात येत नाही. माझी स्वत:ची कुणाला चरणस्पर्शपूर्वक प्रणाम करण्याविषयी श्रध्दा नाही. तरीही जे आपल्या उच्च चरित्रामुळे प्रसिध्दिला पावले आहेत. अशा व्यक्तींनाच चरणस्पर्शपूर्वक प्रणाम करणे उचित होईल आणि ते प्रणम्य भावनेला पुष्ट करणारे ठरेल. सांप्रदायिक महाराजांच्या वंशात जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती गुरुदेवासारखी आहे., हे काही माझ्या घशाखाली उतरत नाही. उतरु शकत नाही.[४]

या पत्रातून गांधीजींनी प्रणम्य व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाला तर रेखांकित केलेले आहे.च पण आपल्या आणि कस्तुरबाच्या श्रध्दास्पद स्थानांचाही अचूकपणे परिचय करुन दिला आहे.

एकदा लंडन येथे एका वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला दिलेल्या एका मुलाखतीत गांधीजी म्हणाले होते 'माझी पत्नी माझ्यासाठी विशेष भली सिध्द झाली आहे. माझ्या शारीरिक हिताहिताला तीच जपते. तिच्याशी माझे लग्न कसे झाले? माझ्या आई-वडिलांनी तो विवाह ठरवला होता. भारतात अधिकांशपणे मुला-मुलींचे आई-वडिलच लग्न ठरवतात. मी तिला आधीपासून ओळखत होतो आणि आमच्या ठायी प्रेमही होते.'[५]

आपण आता सतत नवऱ्याच्या सोबत असायला हवे असे कधी कस्तुरबाला वाटायचे. तिच्या आश्रमातल्या जबाबदाऱ्या काही कमी का होत्या? तरी जवळपासच्या

दौऱ्यात ती सोबत असायची. दौऱ्यावर असताना तिच्यासोबत चरखा असायचा. तिला साबरमती आश्रमात अनेकानी सूत कातताना पाहिले होते. तिला नवऱ्याच्या सोबत दौऱ्यावर जायला आवडायचे. तिच्याभोवती आया-बाया गोळा होत. नवल करत. चरख्याची माहिती विचारत. जिज्ञासेने काही प्रश्न विचारत. ती त्यांचे समाधान करत असे. सूतकताई आणि विणकाम हा पाठ तिने महिलाना दिला. महिला शक्तिचा प्रत्यय तर तिला दक्षिण आफ्रिकेत आला होता. ती चरख्यावर सूत कातत आहे. असे फोटो वर्तमानपत्रातून छापून येत. तिने चरख्याचा प्रचार-प्रसार केला. गांधीजींचे भाषण सुरु असायचे. ती शांतपणे सभेत बसून सूत कातत असायची.

विदेशी कपड्यांची होळी करण्याचे कार्यक्रम होत. एकदा तिने आपली रेशमी साडी या होळीत टाकली. ही साडी श्री गोपाळ कृष्ण गोखले यांनी भेट दिली होती. ती शांतपणे साडी जळताना बघत होती. गांधीजींच्या नजरेसमोर त्या अग्निज्वाळांमध्ये गोखलेंच्या भेटीचे मधुर चित्र उजळत राहिले होते. एखादी गोष्ट जळून उजळते कशी याचा तो साक्षात् प्रत्यय होता. अद्भुत परिचय होता.

आपल्या आयुष्यात पत्नीला आई मानण्याचा हा एक लोकविलक्षण प्रयोग व प्रवास आहे. आपले सत्त्व व स्वत्त्व कायम राखून पुरुषप्रधान पारंपारिक व्यवस्थेत गांधीजी जगत होते. त्याचा पडताळा अनेकदा त्यांच्या वाणी व वर्तनात आढळतो. आयुष्याचा प्रवास करताना हळूहळू मानसिक ऊर्ध्वगामी होत जाण्याचे हे विरळ उदाहरण आहे. कस्तुरबाला त्यांनी 'बा' म्हटले आणि मातृपदावर स्थापित केले आहे.

संदर्भ


१) माटले येथील एका सार्वजनिक सभेत गांधीजींनी दिनांक १८ नोव्हेंबर १९२७ रोजी दिलेले भाषण आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३५ पृष्ठ २७५;

२) कोलंबो येथील महिलांच्या सभेत गांधीजींनी दिनांक २२ नोव्हेंबर १९२७ रोजी दिलेले भाषण आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३५ पृष्ठ २९९;

३) गांधीजींनी श्री हरजीवन कोटक यांना दिनांक ११ डिसेंबर १९२७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३५ पृष्ठ ३९४;

४) 'नवजीवन' च्या दिनांक १५ डिसेंबर १९२९ च्या अंकातील 'खोटी बातमी' या शीर्षकाचा लेख;

५) लंडन येथे 'जॉन बुल' या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीला दिनांक २५ सप्टेंबर १९३७ वा त्यापूर्वी दिलेली मुलाखत आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४८ पृष्ठ ७१.


❖❖❖

## ११) शेळीचे दूध

२९ एप्रिल १९१९ रोजी युध्द परिषदेचे आयोजन केले गेले होते. यात गांधीजींनी सैन्य भरतीच्या प्रस्तावाचे समर्थन केले होते. युध्द थांबले. सैनिक भरतीचे काम जवळजवळ बंद झाले. त्यांना तर आत्म्याचे अनात्म्याशी सुरु असलेले युध्द दिसत होते. या कामाच्या धावपळीत त्यांचा दुर्धर आजारांशी सामना सुरु होता. हा जीवघेणा आजार होता. या आजाराच्या तीव्रतेची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यांना आमातिसाराची लागण झाली होती. याचा परिणाम त्यांना काही महिने भोगावा लागला होता. 'असह्य' या ऐवजी दुसरा शब्द या आजाराबाबत सांगता येणार नाही. जवळपास बेशुध्द अवस्थेत त्यांनी हा काळ काढला होता.

या आजारातून ते जेमतेम मुक्त होत होते. खूप अशक्त होते. आश्रमात जेमतेम हिंडू-फिरु शकत होते. आपल्या वाढदिवसाच्या दिवशी सर्वांना भेटले. रात्री सुमारे बारा वाजत होते. आता प्राणपक्षी उडून जाईल की काय अशी भयंकर अवस्था होती. आश्रमातल्या मुख्य कार्यकर्त्यांना त्यांनी बोलावले. सूचना दिल्या. वल्लभभाई पटेल यांना बोलवायला एका विशेष कार्यकर्त्याला पाठवले. ते रात्री दोनच्या सुमारास डॉ. कानुगो यांना घेऊन आले. गांधीजींनी वल्लभभाईंना आश्रम सोपवून दिला. शक्य तो आश्रमात येऊन निवास करायला सांगितले. डॉ. कानुगो यांनी तपासणी केली. 'काळजी करायचे कारण नाही.' असे ते बोलले. गांधीजी कमालीचे अशक्त झाले होते. बिछान्यात हालचाल करणेही शक्य नव्हते. संपूर्ण आठवडाभर आपली आवडती भजने आणि गीते ऐकण्यात त्यांनी काळ घालवला. वेदना कमी झाल्यात. शरीर दुबळेच होते. मित्र काय आणि डॉक्टर्स काय नाना प्रकारचे सल्ले देत असायचेत. गांधीजींनी मात्र कुठलेही औषध घ्यायला नकार दिला. काहींनी मांसाहाराचा आग्रह धरला. अंडी सेवनाचा सल्ला दिला. आपल्या मताच्या समर्थनार्थ आयुर्वेदातील श्लोकांचा पुरावा सादर केला. गांधीजींनी कुणाचेही म्हणणे मान्य केले नाही.

गांधीजी हवापालटासाठी माथेरानला निघाले होते. तिथले पाणी जड असल्यामुळे तेथे रहाणे अशक्य झाले. आमांशामुळे गुदद्वार फार नरम होऊन गेले होते. तेथे भेगा पडल्या असल्यामुळे मलत्यागाचे वेळी अपार वेदना सहाव्या लागत असायच्या. त्यामुळे काहीही खायची त्यांना भीतीच वाटायची. एका आठवड्यातच माथेरानहून ते आश्रमात परतले होते. त्यांच्या तब्येतीची जबाबदारी श्री शंकरलाल बँकर यांनी स्वत:कडे घेतली होती. त्यांनी डॉक्टर दलाल यांचा सल्ला घ्यायचा निर्णय घेतला. या काळात गांधीजींचा आहार साधा होता. एकदा बरे वाटत नव्हते. गांधीजी आत्मचरित्रात लिहितात की दुसरा दिवस सणाचा होता. 'आपण दुपारी जेवणार नाही.' असे त्यांनी कस्तुरबाला सांगून ठेवले होते. तिने आग्रह धरला. मोहात गुंतवले. गांधीजी अडकले. त्यावेळी ते कुठल्याही पशुचे दूध घेत नसत. यामुळे तूप, ताक सुध्दा वर्ज्य होते. एकदा कस्तुरबाने गहू भरडून तेलावर परतून त्याची लापशी केली होती. मुगाची उसळ होती. कस्तुरबा सारख्या सुगरणीचा स्वयंपाक होता. तिने आग्रह धरला होता

"असे कसे? एवढा सणाचा दिवस आणि उपवास कसा बरे करता येईल? आज तर गोरगरीबांच्या घरीही आनंद असतो. काही तरी खायला हवे. तुमच्या आवडीची लापशी केली आहे. थोडी मुगाची उसळ घ्या. थोडे खा." कस्तुरबाने आग्रह केला होता.

'आग्रह करु नकोस कस्तुर.' गांधीजींनी निक्षून सांगितले. 'चला जेवायला. दोन घास तर खा.' गृहिणी कस्तुरबाचा आग्रह झाला.

गांधीजी जेवायला बसले. अन्नाला अन्नपूर्णेच्या हातची चव होती. पोटभर जेवले. कस्तुरबाच्या हातची लापशी. मुगाच्या उसळीला खमंग फोडणी होती. जिह्वालौल्य आग्रह करत होते. त्यांचा निश्चय डळमळीत झाला. आपण कस्तुरबाच्या समजूत घालण्यापुरते थोडेसेच जेऊ असे त्यांनी ठरवले होते. याचा अर्थ स्वाद आणि संयम या दोन्हीही काठांवर ते पाय ठेवणार होते. सैतान मात्र संधी साधण्यासाठी टपून बसला होता. ते जेवायला बसले. थोडे खाण्याऐवजी चांगले पोटभर जेवले. स्वादाचे सुख पुरेपूर घेतले. खाऊन तासभर लोटला नसेल तोच जोराचा मुरडा सुरु झाला. गांधीजींना गाजरे आवडायचीत. कस्तुरबा याला 'घोड्याचे खाणे'

म्हणायची. जेवण आटोपले. तास लोटला नाही तोच गांधीजींना त्रास सुरु झाला. तिने विश्रांतीचा आग्रह केला. ते मानले नाहीत. त्यांना कामांचा डोंगर उपसायचा होता. रात्री परत नडियादला जायचे होते. साबरमती स्टेशनपर्यंत ते पायी चालत गेले. तेवढा सव्वा मैलांचा रस्ता पार करणे बिकट वाटले. अहमदाबाद स्टेशनवर वल्लभभाई येऊन भेटणार होते. ठरल्याप्रमाणे ते आले. त्यांच्या लक्षात गांधीजींचे दुखणे आले. आपले दुखणे असह्य असल्याचे मात्र गांधीजींनी त्यांना किंवा आपल्या अन्य साथीदाराना कळू दिले नाही. असे करता-करता नडियाद स्टेशन आले. स्टेशनपासून अनाथाश्रमापर्यंतचे अंतर अवघ्या अर्ध्या मैलांचे होते. आजारामुळे ते गांधीजींना दहा मैलांइतके वाटले. मोठ्या शिकस्तीने ते मुक्कामावर पोहोचले. त्रास वाढत होता. वेदना असह्य असल्याचे अखेर मित्रांना सांगावे लागले. आता त्यांनी अंथरुण धरले होते. सारे चिंतातुर होऊन सभोवती गोळा झाले. गांधीजींवर प्रेमाचा वर्षाव केला. गांधीजींना आपले दु:ख स्वत:च झेलावे लागत होते. त्यांचा हट्टही अमर्यादित स्वरुपाचा होता. डॉक्टरला बोलावून आणायला त्यांनी सपशेल नकार दिला. शक्ती खचून गेली होती. डॉ. कानुगो आले. त्यांना औषध घेण्याविषयी विनवले. गांधीजी कबूल झाले[१]

गांधीजी आणि डॉक्टर दलाल यांच्यात पुढीलप्रमाणे संवाद झाला.

'तुम्ही दूधाचे सेवन का बरे करत नाही? तुम्ही दूध घेत नाही तोवर मला तुमचे शरीर सुधारता येणार नाही. शरीर भरुन येण्यासाठी तुम्ही दूधाचे सेवन करायला हवे. यासोबत काही इंजेक्शन्स घेतली पाहिजेत.' डॉक्टर दलाल म्हणाले.

'इंजेक्शने द्या पण मी दूध घेणार नाही. ' गांधीजींनी ठामपणे सांगितले.

'तुमची दूधाविषयीची प्रतिज्ञा आहे. तरी काय?' डॉक्टरांची कासाविशी त्यांच्या प्रश्नात होती.

'गाई-म्हशींवर फुंकरीची क्रिया होते. यामुळे मला दूध नको. तो माणसाचा आहार होऊ शकत नाही. मी दूधाचा त्याग केला आहे.' गांधीजींनी निर्णयात्मक शैलीत सांगितले.

गांधीजींचे हे उत्तर कस्तुरबाला माहित होते. एथवर तर ते पाठही झाले होते. ती त्यांच्या खाटेशेजारीच तर उभी होती.

'हे तुमचे ठरले आहे., हे खरे आहे. अगदी असेच ठरवले असेल तर शेळीचे दूध घेता येईल.' कस्तुरबा म्हणाली.

डॉक्टरांनी हे ऐकले. ते खूप खूष झाले.

'मग तर माझे काम झाले. शेळीचे दूध घेतले तरी चालेल.' डॉक्टर आनंदून म्हणाले.[२]

'कस्तुरबा आहे.च आमची डॉक्टरीण!' गांधीजी हसत म्हणाले.

गांधीजी खुश झाले. कस्तुरबा लाजली. डॉक्टर हसले. आनंदाच्या लहरी उसळल्या.

शेळीचे दूध सुरु झाले. आराम वाटू लागला. गांधीजींच्या आहारात नव्या पर्वाची सुरुवात झाली. त्याचा श्रीगणेशा कस्तुरबाने केला. गांधीजींची निष्ठा सत्यावर होती. तिची निष्ठा गांधीजींवर होती. ती जीवनाला जीवनाच्या पुस्तकातून वाचत होती. मिली पोलाक गांधीजींच्या भेटीला आली असता गांधीजी कौतुकाने म्हणाले होते "तुम्ही बायका अतिशय हुशार असता. आपला हट्ट कदापि सोडत नसता. माझी तब्येत सुधारावी म्हणून कस्तुरबाने हुशारीने पावले उचललीत." गांधीजींच्या चर्येवर मिलीने मिस्किलपणा, भावनांचे थबथबलेपण आणि अपरंपार स्नेहभाव बघितला होता. गांधीजींच्या नेत्रातील विलक्षण दीप्ती आणि निवेदनातील स्निग्ध स्वनमाधुरी कस्तुरबाची वाखाणणी करत होती.

या प्रसंगाचे चित्रण करताना मिली पोलाकने पुढे लिहून ठेवले आहे. "आपली प्रकृती सुधारावी म्हणून कस्तुरबाने ज्या हुशारीने पाऊले उचलली, त्यासाठी त्यांच्याविषयी गांधीजींच्या मनात किती स्नेहभाव दाटून आला होता, हे त्यांच्या मिस्किल नजरेतून आणि भावनेने ओथंबलेल्या स्वरांवरुन समजत होते."

मिली पोलाक तर प्रत्यक्षदर्शी आहेत. त्यांनी साक्षात् अनुभव घेतल्यावर आपली प्रतिक्रिया लिहिली आहे. कस्तुरबाच्या सल्ल्यावरची गांधीजींची प्रतिक्रिया याहून

अधिक तरल व संवेदनशील शब्दात क्वचित्‌च कुणी व्यक्त करु शकेल एवढे मात्र खरे !

गांधीजींनी शेळीचे दूध घ्यायचे स्वीकारले. आपल्या या प्रयोगाविषयी त्यांनी एका पत्रातून मगनलाल यांना कळवले होते.

“सध्या मी आहारविषयक काही फेरफार केले आहेत. हे माझ्या दुबळेपणाचे लक्षण नाही. अशी साक्षी माझा आत्मा देत आहे. हे फेरबदल मी तटस्थतापूर्वक पण सामर्थ्यानिशी करत आहे. याचे मुख्य कारण तुम्हा सर्वांना आणि मित्र वर्गाला समाधान लाभावे हे आहे. कस्तुरबाचा चेहरा मी बघू शकत नाही. अनेकदा तिचा चेहरा गरीबड्या गाईसारखा कारुणिक वाटतो. कित्येकवेळा गाय करुणेने आपल्याप्रत काही निवेदन करत आहे. असे आपल्याला वाटते. कस्तुरबा मला अशी गाईसारखी भासते. तिच्या या दैन्यामागे स्वार्थ दडला आहे. हेही मी बघू शकतो. असे असले तरी तिचा विनय मला पराभूत करतो. त्यामुळे जिथे-जिथे मुक्त करता येईल तिथे-तिथे मुक्त ठेवायची इच्छा मनात होते. चार दिवसांपूर्वीच कस्तुरबा दूधासाठी आक्रंदन करत होती आणि अकस्मात्‌ बोलली ‘गाईच्या दूधाचे सेवन करु नका हो, पण शेळीच्या दूधाचे सेवन का करता येणार नाही?’ मी चमकलो. मी जेव्हा व्रत पत्करले होते तेव्हा शेळी तर माझ्या कल्पनेत नव्हती. शेळीची पीडा काही माझ्या नजरेसमोर तरळत नव्हती. माझे व्रत तर केवळ गाईच्या दूधाशीच संबध्द होते. मी तसा तर म्हशीचाही विचार केला नव्हता पण म्हशीच्या दूधाचे सेवन माझ्या मुख्य हेतुला आघात पोहोचवणारे होते. शेळीच्या दूधाच्या सेवनाविषयी अशी काही स्थिती नाही यामुळे या सेवनामुळे मी मित्रांचा विलाप बऱ्यापैकी झेलू शकेन असे मला वाटल्यामुळे मी शेळीच्या दूधाच्या सेवनाचा विचार केला.”[३]

या निवेदनात गांधीजींना गाय आणि कस्तुरमाय असे दोन चेहरे दिसताहेत. दोन्ही चेहऱ्यांमधली कारुणिकता आणि मार्दव त्यांना स्पर्शून गेले आहे. आपल्या व्रतात भंग पडू न देता ते शेळीच्या दूधाचा स्वीकार करतात. त्यांच्या प्रकृती स्वास्थ्यातही आश्चर्यकारक बदल जाणवतात.

शेळीचे दूध सेवन करायला स्वीकृती देताना गांधीजींना गहन मनोमंथनातून जावे लागले होते. त्यांच्या भावचिंतनाची कक्षा हे सुचवत होती की यामुळे पत्नी व मित्रांची इच्छा पूर्ण होत आहे. आदर्श दृष्टिकोण असे सुचवतो की ते सत्यनिष्ठ प्रतिज्ञेविषयी दृढ प्रतिज्ञ राहिलेत. ज्ञानमय चिंतन सुचवते की प्रतिज्ञेचा सूक्ष्मातिसूक्ष्म अर्थ ग्रहण करुन ते प्रतिज्ञेप्रती प्रतिबध्द राहिलेत. वस्तुस्थिती हे सुचवते की कस्तुरबाचे भावपूर्ण नेत्र आणि कारुण्यमय अंत:करण गांधी-प्रतिज्ञेच्या परिघाला वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या आधारे व्यापकता देते. गांधीजींच्या या प्रतिज्ञा पालनाचा सूक्ष्म अर्थ करण्याच्या शैलीत कस्तुरबाचा कारुणिक चेहरा केंद्रस्थानी आहे., एवढे मात्र निश्चित.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी पृष्ठ ४४५ ते ४४७;

२) कित्ता पृष्ठ ४५०;

३) मारु जीवन ए ज मारी वाणी : (गुजराती) श्री नारायण देसाई दूसरा खंड ‘सत्याग्रह’ पृष्ठ ९९ आणि मगनलाल गांधी यांना दिनांक १० जानेवारी १९१९ रोजी लिहिलेले पत्र.

❖❖❖

## १२) कस्तुरबाचे राग-लोभ

कस्तुरबा सभा-संमेलनात जायची. महिला शक्तिचे जागरण करायची. ही सहज एकात्मता तिला साधली होती. देशातल्या हजारो गावांमधून तिने प्रवास केला होता. गरीब व सर्वसाधारण भासणाऱ्या बायकांशी ती बोलायची. त्यांना हिंमत द्यायची. आश्वासन द्यायची. मायेची ऊब द्यायची. शेतकऱ्यांनी कर भरले नाही. शेतसारा दिला नाही. महिलांनी पुरुषांना सरकारची माफी मागू दिली नाही. स्वत: कष्ट उपसले. पुरुषाना तेजस्वी बनवले. महिला फ्रंट दृढ बनवली. मिठाच्या सत्याग्रहात नारी शक्तीचा अद्भुत साक्षात्कार जगाला घडला. अनेक महिला सत्याग्रही बनल्या. लाठ्या-काठ्या झेलल्या. कारावास पत्करला. पुरुषांचे आत्मबळ सुरक्षित राखले. याचे श्रेय कस्तुरबाला आहे.

कस्तुरबाचा विचार करताना अनेकदा गांधीजींच्या दृष्टिकोणातून तिचा विचार करणे सोईचे होते. या विवेचनाला सत्यदर्शीपणाचे वलय सहजच लाभते. गांधीजी एका लेखातून म्हणतात.

"माझ्या पत्नीविषयीच्या माझ्या भावनाना मूर्त रुप देणे माझ्यासाठी अवघड आहे. माझ्या पत्नीचा मजवर जेवढा परिणाम होतो तेवढा जगातील अन्य कुठल्याही स्त्रीचा प्रभाव पडू शकत नाही. तिच्या ठायी दोष नाहीतच असे नाही. तिच्या ठायी मला जेवढे दोष आढळतात त्याहून अधिक दोष तिच्या ठायी असतील असे मला वाटते पण तिच्याशी मला एका अतुट बंधनाचा अनुभव येतो."[१]

कस्तुरबाच्या ठायी गुण-दोष वसत होते. गांधीजींसारखा तटस्थ समीक्षक दुसरा दुर्लभ ! त्यांची मांडणी आत्मीय आहे. यात कमालीची तटस्थता आहे. कस्तुरबामधे दोष आहेत. त्या दोषांवर मात करुन तिच्या बंधनात अडकवणाऱ्या गुणांचीही ते चर्चा करतात हे विशेष !

गोरा रामचंद्रन हे एक कट्टर नास्तिक गृहस्थ होते. ते साबरमती आश्रमात वर्षभर राहिले होते. त्यांनी आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. श्री राजगोपालाचारी यांनीही या आठवणीला संमती दिली आहे. श्री राजगोपालाचारी हे गांधीजींचे व्याही होते. गांधीजींचे पुत्र देवदासचे श्वसूर. एकदा दुपारची वेळ होती. श्री मोतीलालजी नेहरू भेटीसाठी आले होते. ते का एकटे येतील? त्यांच्यासमवेत बरेच लोक होते. जेवायची वेळ टळून गेली होती. स्वयंपाकघरात झाकपाक झाली होती. कस्तुरबा वामकुक्षी घेत पहुडली होती. गांधीजींनी त्यांच्या स्वागतासाठी स्वयंपाकघराचा ताबा घ्यायचे ठरवले. स्वयंपाक करायची खटपट ते करु लागले होते. स्वयंपाक घरातल्या या गोंधळामुळे कस्तुरबाला जाग आली. तिने सर्वप्रथम आपल्या स्वयंपाक घरातून सर्वांना बाहेर घालवून दिले. रागाने उसळली.

'मला का नाही उठवलेत? मी काय आळशी म्हातारी झाले आहे.? ' कस्तुरबाने रागावून विचारले.

गांधीजींनी क्षमा मागितली. तिथे गोरा राम उभा होता. कस्तुरबा त्याला म्हणाली 'Gandhi call you. Why you not call me? why you open kitchen without permission?' गांधीजींनी तुला हाक मारली. तू मला का हाक मारली नाहीस? माझ्या परवानगीशिवाय स्वयंपाकघरात प्रवेशच कसा काय केलास तू? कस्तुरबाने विचारले.

कस्तुरबा स्वयंपाकाला लागली. राग विसरली. अन्नपूर्णेच्या आराधनेला लागली. रुचकर जेवण तयार केले. सारे पोटभर जेवले. मोतीलालजींनी तर भोजनाची खूप वाखाणणी केली. हे ऐकून तिची कळी खुलली. हेच तर तिचे श्रमसाफल्य होते. सायंकाळी नित्याची प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर कस्तुरबा कमरेवर दोन्ही हात ठेवून गांधीजींपुढे जाऊन उभी राहिली. ती चांगलीच भडकली होती.' तुम्ही मला का उठवले नाहीत?' हा तिचा एकदम सरळ प्रश्न होता. गांधीजींनी दिलगिरी व्यक्त करत म्हटले 'खरे सांगू, अशा प्रसंगी मला ना तुझी भीती वाटते.' कस्तुरबा हसू लागली 'काय म्हणता राव? तुम्ही आणि मला भिता होय? या म्हणण्यावर कोणाचा तरी विश्वास बसेल काय?' यावर टिप्पणी करत गोरांनी लिहिले आहे. 'पण गांधीजींचे ते म्हणणे खरे होते.'

कस्तुरबा आश्रमात येणाऱ्या-जाणाऱ्यांची सेवा करायची. त्यांच्याशी ओळख असो वा नसो. 'आपण कुठून आलात? सरळ आश्रमातच येताहात का?

प्रवास कसा झाला? जेवलात की नाही?' इतक्या बारीक-सारीक गोष्टी ती विचारायची. अतिथीला जेवायचा आग्रह करायची. आश्रमवासियांनाही वरचेवर विचारायची 'इथले जेवण मानवते ना? काही त्रास तर नाही ना? काही लागले-सवरले तर मागून घ्या. संकोच करु नका.'

आश्रमात दीनबंधुला लागायचा चहा. ती गुपचुप त्याला चहा पाजायची. राजाजीला कॉफी मिळायची. जवाहरलाल नेहरुंना मसाल्याचा चहा मिळायचा. असाच विरोध एकदा गांधीजींनी मुलाना साखर दिली म्हणून केल्याचे तिला आठवले. हा प्रसंग काही ती विसरली नव्हती. मुले यायची. नातवंडे यायची. निरोप घ्यायची. कस्तुरबा व्यवस्थापकाकडे जायची. त्याला सांगायची 'हे बघा, हे लोक आज जाताहेत. यांच्यावर आजपर्यंत काय खर्च झाला ते सांगा. त्याचे बिल द्या. ही रकम घ्या.'

एकदा तर नात रामीचा नवरा कुंवर आला होता. तो हरीलालचा जावई. कस्तुरबाचा नातजावई. त्याला टी.बी. होता. यामुळे तो आश्रमात सहा महिने राहिला होता. निरोप घेताना त्याच्या हाती निवास-भोजनाचे बिल ठेवले गेले.

'ही काही माझ्या बापाची संपत्ती नाही. हा आश्रम आहे.' गांधीजी एवढेच म्हणाले.

कस्तुरबा खूप नाराज झाली. कस्तुरबाने अनेकाना दीक्षा दिली. ती या बाबतीत कडक होती. नियमित होती. गांधीजींच्या विराट पावलात तिची लघु पावले सामावली गेलीत. गांधीजी-कस्तुरबा एकमेकांची ताकद होते. एकमेकांना पूरक होते. ते एकमेकांना प्रेरक ठरले. त्यांनी तेजोमय वारसा जपला. जोपासला. वारसा वसिष्ठ-अरुंधतीचा. कस्तुरबा मानव हृदयाची शुचिता. सरळतेचे प्रतीक. साधी. सरळ. वीर. धीराची बाई. गुणग्राहक दृष्टिची. तिची ईशश्रध्दा अफाट होती. ती प्रेमळ तशीच कठोर प्रशिक्षक होती.

अधून-मधून नातवंडांना पत्रे लिहवून घ्यायची. परीक्षेत दुसरा क्रमांक आला तर 'पहिला का नाही आला?' असे विचारायची. रामदासची कन्या सुमित्रा मोठी झाली. तिला साडी नेसायला हवी. हे ध्यानी घेऊन कस्तुरबाने स्वत: कातलेल्या सूताची चटणी रंगाची काठ असलेली साडी नातीला पाठवली. हे सुमित्राच्या आईलाही काही उमगले नव्हते, हे विशेष. ब्रिटिश सल्तनतीच्या तुरुंगात काटेरी कुंपणाआड कस्तुरबा होती. त्या बंदिवान आजीचे लक्ष आपल्या पौगंडावस्थेत पदार्पण करणाऱ्या नातीकडे लागून होते. तिचे प्रेम आणि जबाबदारीचे हे मनोज्ञ दर्शन आहे.

एस्थर फैरिंग एक डॅनिश मिशनरी होती. ती १९१६ साली भारतात आली होती. पुढे साबरमती आश्रमात राहू लागली. गांधीजी तिच्याशी लेकीसारखा व्यवहार करत. दिल्लीहून तिला एका पत्रातून ते लिहितात 'तू बा' ला मदत करावीस अशी माझी तर इच्छा आहे. पण यामुळे तुला त्रास होणार असेल तर हे काम पत्करु नकोस. बाच्या स्वभावाचे - मूडचे - काही खरे नाही. तो सदैव बरा नसतो. तिचा व्यवहार सदा गोड असत नाही. कधी-कधी तर ती आपल्या व्यवहारात क्षुद्रतेचा संकेतही देऊ शकते. सध्या तर ती शरीरानेही थकून गेली आहे. यामुळे क्षुद्रतेचे उत्तर महानतेने देण्यासाठी तुला ख्रिश्चन औदार्याच्या सर्व शिकवणीची मदत घ्यावी लागेल.[२]

हे पत्र कस्तुरबाच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणारे आहे. यातून एका विदेशी कन्येला ते आपल्या पत्नीचा अंतरंग परिचय घडवताना दिसतात.

एका सहकार्याला लिहिले की बाच्या विषयी एस्थर फैरिंगला आधीच लिहिले होते. कस्तुरबाने खूप कामात अडचण आणली आहे. तिने फैरिंगच्या बाबतीत अडचण निर्माण करु नये अशी आपण देवाला प्रार्थना करु या. कस्तुरबाच्या या दोषाला घालवण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे.[३]

या दोन्ही पत्रांमधून गांधीजींची कस्तुरबाच्या संदर्भातली तक्रार करणारी भूमिका दिसते. एके दिवशी सायं प्रार्थनेच्या गप्पांमधून एका आश्रमवासीयाच्या आजारपणाविषयी कस्तुरबा अनभिज्ञ आहेत. हे गांधीजींना कळले. अगदी सर्वांसमक्ष ते कस्तुरबाला म्हणाले 'देवदास जर आजारी असता तर ते तुला लगेच कळले असते पण दुसरे लोक जेव्हा आजारी असतात तेव्हा तुला कसे समजत नाही?' गांधीजींनी समानता जपण्याचा प्रयत्न केला. कस्तुरबाचा सर्वांसमोर

धडधडीत अपमान झाला होता. ती मात्र नंतर खासगीत रडली असेल.

एका पत्रातून गांधीजी लिहितात 'बाना सुध्दा जर सेवेची गरज वाटत असेल तर त्यांनी आश्रमात जायला हवे. माझी सेवा करणाऱ्यांना स्वत: सेवा करवून घ्यायची आवश्यकता वाटत असेल तर त्यांनी केलेली सेवा ही सेवा म्हटली जाणार नाही आणि मी अशा सेवेचा त्याग करायला हवा.' [४]

या पत्रातून गांधीजी काहीशा कठोरपणे वागताना दिसतात. 'सेवेची गरज असेल तर बाने आश्रमातच रहावे म्हणजे त्यांच्यासोबत बाहेर येऊ नये' असा होतो. आपण अशा सेवेचा त्याग करायला तयार आहोत अशी त्यांची भूमिका आहे.

कस्तुरबांचेही काही प्रश्न असतील. त्यांच्याही काही समस्या असू शकतील. याचाही सम्यक् विचार झाला पाहिजे असे होताना मात्र दिसत नाही. आपल्या प्रियजनांसाठी कस्तुरबाने जीव पाखडून कामे करावीत ही त्यांची मागणी आहे. ती अनेकदा व्यवहारात अडचणीचीही ठरू शकते. या भूमिकेचे समर्थन करणारी भूमिकाही त्यांच्या काही पत्रांमधून दिसते. नमून्यादाखल दोन पत्रांचा विचार करु या !

आपल्या एका सहकार्याला लिहिले आहे. 'मी तर बाचा विचार करुन हे पत्र लिहित आहे. बाचे मन प्रसन्न रहात नाही, असे बघत आहे. ती आजारी असते व आपल्या शक्तीहून अधिक काम करते.[५]

आपल्या दक्षिण आफ्रिकेतील सहकारी मित्राला लिहितात की श्रीमती गांधी आश्रमात आहेत. त्या वृध्द तर खूप झाल्यात पण आधीसारख्याच बहादूर आहेत. तुम्ही त्यांना ज्या गुण-दोष युक्त रुपात पाहिले होते, अजूनही त्या तशाच आहेत.[६]

कलकत्याकडे जाताना लिहिलेले हे एक पत्र 'बांचा आणि माझा स्वभाव एक सारखा नाही. बा मला समजून घेत नाही. आश्रमात तर आजपर्यंत मला हवी तशी एकही महिला भेटली नाही.'[७]

या दोन पत्रांमधून गांधीजी आपली मर्यादा रेखांकित करताना दिसतात. कस्तुरबाकडून त्यांनी आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. या व्यक्त करत असताना तिच्या मनाचाही विचार करताना ते दिसतात.

बंगालचे कृष्णदास गांधीजींच्या मदतीला दाखल झाले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कस्तुरबा अतिशय निष्ठेने आणि विनातक्रार गांधीजींच्या सगळ्या पाहुण्यांसाठी स्वयंपाक करायची. गांधीजींच्या गरजांविषयी त्यांना उपजतच जाणीव होती. पाहुण्यांसाठी भरपूर वेळा स्वयंपाक करायची वेळ यायची. तिची प्रकृती बिघडत असे. गांधीजी कृष्णदासना म्हणाले 'अथक कामे करुन जेव्हा ती दमून जाते, तेव्हा बिचारी कटकट करत नाही वा विरोधही करत नाही, फक्त रडत रहाते.'

गांधीजींनी आपल्या एका सहकार्याला लिहिले 'बाच्या संदर्भात मी चुकीच्या मोहात पडलो होतो. मला वाटते तिच्याविषयी मला भेटीला येण्याच्या बाबतीत मी कठोर वागणे हाच माझा धर्म आहे. माझा तर सल्ला आहे. की बाने रामदासचा वियोगही समाधानपूर्वक सहन करुन घ्यायला हवा. रामदासने राजगोपालाचारीसारख्या चारित्र्यसंपन्न व्यक्तींकडे जावे आणि सुखात रहावे यासाठी बाने आशीर्वाद द्यायला हवेत. यातच तिचे परम श्रेय आहे. आपला पुत्र सद्गुणी आहे. यावरच तिने समाधान मानावे.'[८]

या पत्रातून गांधीजी आपल्या जीवनप्रवासाचा एक न वाचला गेलेला अध्याय उलगडून दाखवत आहेत. आपल्या लेकरांप्रतीची कस्तुरबाची मोहावस्था गांधीजींना संभ्रमावस्था वाटते. कस्तुरबा मात्र आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

गांधीजींना एका सहकाऱ्याने ५ फेब्रुवारी १९२९ रोजी एक पत्र लिहिले होते की त्या उभयतांमध्ये सदैव मतैक्य रहात नाही. याच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनी साबरमती आश्रमातून लिहिले.

"आम्हा उभयतांमध्ये अत्यंत प्रेमाचे संबंध आहेत., हे मी आपणास सांगू इच्छितो. माझी पत्नी बुध्दिपूर्वक माझे अनुकरण करत नाही असे जर काही ग्रंथांच्या अभ्यासावरुन आपल्याला वाटले असेल तर ते अगदी खरे आहे. तिची निष्ठा अद्भुत आहे. आणि माझ्या आयुष्यात जे बदल झालेत त्या सर्वात तिने मला साथ दिली आहे." [९]

या पत्रातून गांधीजी कस्तुरबाचे मोठेपण नेमकेपणाने रेखांकित करतात. कस्तुरबाने दिलेल्या साथ-संगतीविषयीचा आपल्या मनाचा अहोभाव व्यक्त करतात. या पत्रात एक मोकळेपणा आहे. स्पष्टता आहे. आत्म स्वीकृती आहे. प्रामाणिकपणा आहे. सत्यकथन आहे.

कस्तुरबा मानवी गुणावगुणांची पुतळी होती. तिने कुठल्याही प्रकारे आपल्या मोठेपणाचा दावा कधी केला नाही. ती सर्वसामान्य आयुष्य जगत होती. तिला सर्वसामान्यांसारखे जगावेसे वाटले होते. ती सतत उन्नताचा ध्यास घ्यायची. तिची पावले मात्र मातीची होती. ती सुख-दु:खाने प्रभावित व्हायची. तिचे राग आणि लोभ तीक्ष्ण आणि तीव्र स्वरुपाचे होते.

संदर्भ

१) 'यंग इंडिया' मधून 'माझा धर्म' शीर्षकाचा दिनांक ६ ऑक्टोबर १९२१ रोजी प्रकाशित लेख आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २१ पृष्ठ २६०;

२) गांधीजींनी एस्थर फैरिंग या कन्येला दिनांक १६ जानेवारी १९२० वा त्यानंतर लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १७ पृष्ठ ५०६;

३) गांधीजींनी नरहरी परीख यांना दिनांक २५ जानेवारी १९२० च्या नंतर लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १७ पृष्ठ ५३१;

४) गांधीजींनी गंगाताईला दिनांक २२ ऑगस्ट १९२७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३४ पृष्ठ ४१६;

५) गांधीजींनी श्री मगनलाल गांधींना दिनांक १२ जुलै १९२० पूर्वी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १८ पृष्ठ ४०;

६) गांधीजींनी श्री हर्मन केलेनबॅक यांना १० ऑगस्ट १९२० चे पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १८ पृष्ठ १४२;

७) गांधीजींनी श्री महादेवभाईंना दिनांक १७ ऑगस्ट १९२१ च्या पूर्वी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २० पृष्ठ ५३६;

८) गांधीजींनी श्री जमनालाल बजाज यांना येरवडा तुरुंगातून ५ ऑक्टोबर १९२२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ १५१;

९) गांधीजींनी साबरमती आश्रमातून होरेस जी. अलेक्झांडर यांना दिनांक ७ मार्च १९२९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४० पृष्ठ १०४.

❖❖❖

## १३) आत्मप्रत्ययी कस्तुरबा

१९२१ सालची गोष्ट. बिहारात झरिया नावाचा एक गाव आहे. इथे गुजराती आणि कच्छी लोकांची मोठी वस्ती आहे. कोळशाच्या खाणींच्या कॉन्ट्रॅक्टसाठी आणि कोळशाच्या व्यापारासाठी ते झरियाला जाऊन वस्ती करुन आहेत. तिथे एका भगिनीने आपल्या मनगटावरील सोन्याचे कडे आणि गळ्यातला सुवर्णहार कस्तुरबाला दिला. ती गडबडून गेली.

'अहो ताई, मला कुठे देताहेत हे दागिने? दागिने तर स्वराज्यासाठी हवेत.' कस्तुरबा घाबरुन म्हणाली.

'हे दागिने मी गांधीजींच्या पायाशी ठेवले आहेत.' भगिनी आपल्या मतावर ठाम होती.

'मला नकोत हो दागिने.' कस्तुरबाने आग्रहपूर्वक सांगितले.

'आई स्वराज्यासाठी मी हा हार दिला पण हे कडे तर तुमच्यासाठी घेणार की नाही? हे कडे तुम्ही घ्याल तरच मी देईन अन्यथा नाही.' भगिनीचा स्वर कमालीचा कासावीस झाला होता[१]

कस्तुरबा गोड हसली. हसणे जसा होकार असतो तसा नकारही असतो. तिच्या हसण्याला नकाराचा संदर्भ होता. कस्तुरबाने सुवर्ण कडे स्वीकारले नाही आणि स्वराज्य फंडाला हार काही लाभला नाही. तिला ठिकठिकाणी चांदीची भांडी, दागिने व भेटवस्तु मिळायच्यात. ती त्यांचा लिलाव करायची. सारी रक्कम स्वराज्य फंडात जमा करायची.

कस्तुरबाला आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा परिचय होत चालला होता. ती हरिजनांच्या घरी जाऊन भेटी द्यायची. त्यांच्या परिस्थितीची चौकशी करायची. महिलाना विशेष सूचना व सल्ले द्यायची. स्थानिक महत्वाच्या बैठकांमधूनही सहभाग घ्यायची. गांधीजींच्या विश्रांतीची व्यवस्था लावायची. स्वत: मात्र सूत कातत बसून रहायची. अनौपचारिक गप्पा असत. ती यथाशक्य आपले मत नोंदवत असायची.

१७ नोव्हेंबरला प्रिन्स ऑफ वेल्थ (भावी आठवा एडवर्ड) मुंबईत दाखल झाला होता. या दरम्यान मुंबईत दंगे भडकले होते. पाच कॉन्स्टेबल्स मारले गेले होते. पाच दिवस दंगा चालला होता. दंग्यात आणि पोलिसी गोळीबारात हिंदू-मुस्लिम मारले गेले होते. सरकारने वृत्तपत्रांवर नियंत्रण आणले होते. सभा बंदीचे आदेश दिले होते. गांधीजींनी असहकार चळवळीतल्या कार्यकर्त्यांना आवाहन केले. आवाहनाचा वणवा देशभर पसरला. बंदीच्या विरोधात सत्याग्रहींनी विरोधी आवाज जागवला. तुरुंगात जायची तयारी ठेवली. भारतीय तुरुंग नदीच्या पुरासारखे ओसंडून वाहू लागले. हजारो लोक तुरुंगात गेले. यात दास, नेहरु, लाजपत राय, राजगोपालाचारी आणि आझाद यांचा समावेश होता. यात बंगालात दास यांची पत्नी बसंतीदेवी होत्या. इतर अनेक भगिनी होत्या. कस्तुरबानेसुध्दा तीन महिन्यांचा सश्रम कारावास भोगला होता.

१९२१ साली अहमदाबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. बारडोली तालुक्यात सामूहिक सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान कस्तुरबाच्या धाकट्या देवाला अटक झाली. या निमित्त तिने हा संदेश दिला

"चि. देवाला अटक झाली आहे. देशभरातून मला सांत्वनेची पत्रे व तारा येताहेत. याबद्दल मी सर्वांचे आभार मानते. माझी तर दोन लेकरे तुरुंगात गेलीत पण हिंदमातेची वीस हजार लेकरे आज तुरुंगात आहेत. मी काय माझे दु:ख गाणार? मला माझे दु:ख गायचा अधिकार तरी कुठे आहे.? हिंद मातेच्या युवान सुपुत्रांनो, तुम्ही थंड काळजाने कुठवर बसून रहाल? अजूनही जर तुम्ही पेटून उठणार नसाल तर केव्हा पेटणार आहात? तुम्ही खादीचे कार्य करा."

७ फेब्रुवारी १९२१ ची गोष्ट आहे. पाटणा येथे कस्तुरबा गंगा-स्नानाला गेल्या होत्या. तिथे अनेक भगिनी स्नान करत होत्या. त्यांना कुणीतरी सांगितले 'या माताजी आहेत.' यामुळे एका भगिनीने आपल्या पदराच्या टोकाला बांधलेले दोन आणे कस्तुरबाच्या चरणाशी समर्पित केले. अखेरीस एक फाटक्या-विटक्या वस्त्रांची एक म्हातारी पुढे आली आणि तिने एक रुपया ठेवला. कस्तुरबाने विचारले 'आजी, तुम्ही काय व्यवसाय करता?' उत्तर मिळाले 'दूध विकते.'

यामुळे तिच्या शेजारी उभ्या असलेल्या एका गृहस्थाने म्हटले 'दूध विकून जेमतेम वाचवलेल्या पैश्यांमधून हा एक रुपया लाभला आहे.' हे ऐकून म्हातारी म्हणाली 'माताजी, आपण देशाचे कल्याण करताहात त्यासाठी हे दिलेहेत.'[२]

कस्तुरबाच्या संदर्भात सर्वसामान्य महिलांच्या मनातील हा अहोभाव लक्षणीय आहे. या देशातील गरीब महिलांनाही आपला छोटा वाटा देशासाठी द्यावा असे वाटत होते. हे दान स्वीकारण्यासाठी कस्तुरबाचे हात स्वच्छ व प्रामाणिक होते.

२० मार्च १९२२. रात्री दहा वाजताहेत. गांधीजी आणि शंकरलाल बँकर यांना सूचना दिली जात आहे. त्यांना साबरमती तुरुंगातून हलवण्यात येत आहे. कुठे ठेवले जाईल हे काही सांगता येत नाही. गांधीजींना येरवडा तुरुंगात आणले गेले आहे. जेलमधून वर्षातून फक्त चार पत्रे लिहायची परवानगी देण्यात आली आहे. एप्रिल महिन्यात त्यांनी दोन पत्रे लिहिली आहेत. एक कस्तुरबाला. दुसरे हकीम अजमलखान यांना. मुंबईच्या गव्हर्नरने पत्रे सेन्सार केली आहेत. त्यातील 'आक्षेपार्ह' मजकूर खोडायला लावला गेला आहे. त्यापुढे गांधीजींनी पत्रे लिहिली नाहीत.

गांधीजींनी हकीम अजमलखान यांना लिहिले 'मला भेटायला माझ्या पत्नीने येऊ नये. यासाठी तिची समजूत घातली जावी.'[३] राष्ट्राच्या सेवेत असलेल्या गांधीजींना आपल्या पत्नीला भेटायला वेळ नाही. कस्तुरबाने आपल्या भेटीसाठी येऊ नये यासाठी तिची समजूत घातली जावी असे ते हकीम साहेबाना लिहित आहेत.

१९२२ ते १९२४ गांधीजी तुरुंगात होते. कैद्यांच्या आहारासाठी त्यांच्या काही मागण्या होत्या. या दरम्यान ते केवळ दूध पीत असत. त्यांची पावले जिना चढताना अडखळत होती. त्यांचे वजन एकशे चार पौंडांवरुन नव्वद पौंडांवर आले होते. वजन चौदा पौंड घटले होते. कस्तुरबा भेटीला आल्या. गांधीजींना भेटून त्यांना धक्काच बसला. आपले नियमित अन्न सेवन करावे असा आग्रह त्यांनी धरला. इंग्रज जेलर त्यांच्या समवेतच चालत होता. तो कस्तुरबाला म्हणाला की मिस्टर गांधींनी नुकतीच तुम्हाला माहिती दिली. यात माझा कुठलाही दोष नाही. त्यांना तक्रार करायचा कुठलाही अधिकार नाही. यावर कस्तुरबा आपल्या इंग्रजीत म्हणाल्या 'Yes,Yes. I know my husband. He always mischief.'[४] या मोडक्या-तोडक्या इंग्रजीने इंग्रज जेलरचे मन जिंकले गेले. कस्तुरबाचे हे एक इंग्रजी वाक्य गांधीजींचा आगळा-वेगळा परिचय करुन देणारे ठरले. कस्तुरबाचे इंग्रजी या शैलीचे होते. तिच्या खोडकर नवऱ्याचा परिचय इतक्या सुरेख व आटोपशीर शब्दात करुन देणे अन्य कुणालाही शक्य नव्हते असे तिलाही वाटायचे. हे तिचे मत अक्षरश: खरे आहे.

पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये १२ जानेवारी १९२४ रोजी श्री. व्ही. एस्. श्रीनिवास शास्त्रींची भेट झाली. त्या वेळी शास्त्रींनी गांधीजींना विचारले की श्रीमती गांधींना त्यांच्या या अवस्थेची माहिती दिली गेली आहे. का? यावर ते म्हणाले की श्रीमती गांधींना या नव्या निर्णयाविषयी काही माहिती नाही पण गेल्या काही दिवसांपासून मला बरे वाटत नसल्याचे त्यांना ठाऊक आहे. मी त्यांच्या पत्राची वाट बघत आहे.[५]

आपल्या प्रकृती अस्वास्थ्याविषयी कस्तुरबा काळजी करतील याची गांधीजींना पूर्ण खात्री होती. यामुळे ते जपूनच या बातम्या कस्तुरबांपर्यंत पोहोचाव्यात अशी दक्षता घेत असत.

१९२७ साली कस्तुरबा गांधींच्या सोबत सावंतवाडीला गेली. सावंतवाडीच्या महाराणीने तिचे स्वागत सौभाग्यचिह्ने देऊन केले होते. एक हजार रुपयांचा निधी अर्पण केला. कस्तुरबाला मिळालेल्या हार, मंजूषा आणि अन्य भेट वस्तुंचा लिलाव करण्यात आला. खादी विक्री झाली.

अनेक ठिकाणी कस्तुरबाला तिच्या स्वत:च्या कर्तबगारीवर प्रसन्न होऊन जनतेने भेटी दिल्या आहेत. या खेपेला मात्र ती कधीही या वस्तुंविषयींचा मोह मनात धरत नाही. हे विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखे आहे. कधी काळी आपल्याला मिळालेल्या भेटींवर हक्क सांगणारी आग्रही कस्तुरबा आता किती बदलली आहे. हे पहाणे खूप आनंददायी आहे.

गांधीजींनी देवदासला लिहिले 'बाचे हृदयविदारक पत्र आले आहे. मला काय करु आणि काय करु नको

असे झाले आहे. जर लेकरे तिथे असतील आणि तुला जर त्यांना इकडे आणणे योग्यच आहे. असे वाटत असेल तर त्यांना अवश्य घेऊन ये.'[६]

या पत्रातून लेकुरवाळ्या कस्तुरबाच्या तरल संवेदनशील मनाचे गांधीजींनी केलेले अंतरंग चित्रण कमालीचे प्रत्ययकारी झाले आहे. यातून ते एकाच वेळी कस्तुरबाविषयीचे आपले मत कळवत आहेत. आणि एकूण परिस्थितीचा अंदाजही व्यक्त करताना दिसत आहेत.

आपल्या रामदास नावाच्या मुलाला गांधीजींनी पत्रातून लिहिले 'बा बरोबर आज माझे संबंध एका बहिणीबरोबर असावे तसे आहेत. आणि त्यामुळेच माझी कीर्ती झाली आहे.'[७]

गांधीजी आपल्या उभयतांच्या तरल भाव जीवनाचे उद्‌घाटन करतात. तेव्हा ते खूप मनोज्ञ आणि हृदयस्पर्शी होते. यातून त्यांच्या ब्रह्मचर्य विषयक जाणिवांच्या विस्तृत होत जाण्याचा आलेख उंचावताना दिसतो.

मुंबईच्या एका सभेत आपले मन मोकळे करताना गांधीजी म्हणाले 'माझ्या स्वभावाला दोन बाजू आहेत. कठोर आणि मृदु. पहिल्या बाजुमुळे माझी पत्नी, मुलगा व स्वर्गवासी भाऊ मला दुरावले. जेव्हा मी कठोर चेहरा धारण करतो तेव्हा माझे प्रेम छुपे असते. ते शोधावे लागते.'[८]

अनेकदा गांधीजींनी आपल्या स्वत:च्या स्वभावाचे असे स्पष्टीकरण केलेले दिसते. आपल्या स्वत:शी असलेल्या कमालीच्या प्रामाणिकपणामुळे ते असे करु शकले आहेत. ते सत्याशी प्रतिबध्द आहेत. आत्मपरीक्षणाची त्यांना सवय आहे.

१० मार्च १९२२. शुक्रवार. रात्री साडे दहा वाजता साबरमती आश्रमातील गांधी-कुटीपाशी पोलिसांची गाडी येऊन थडकली. अहमदाबादचे पोलिस निरीक्षक गाडीतून उतरले. गांधीजींच्या अटकेची बातमी विनयी सूरात दिली. गांधीजींनी आपला पंचा, दोन कांबळी, सात पुस्तके सोबत घेतलीत. आश्रमातील डझनभर सहकाऱ्यांसोबत कस्तुरबाने प्रार्थना म्हटली. आश्रमापासून फार लांब नसलेल्या तुरुंगापर्यंत गांधींना सोबत करण्याची परवानगी तिला मिळाली. आणखी काही जणाना मिळाली. साबरमती मध्यवर्ती तुरुंगात गांधीजींना नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी कस्तुरबाने गांधीजींसाठी शेळीचे दूध, काही द्राक्षे आणि स्वच्छ कपडे पाठवले.

कस्तुरबा गांधी-चळवळीतील प्रत्येक वळणावर जागृतपणे क्रियाशील असलेली दिसते. आपल्या आवाक्याप्रमाणे आणि कधी-कधी तर आपल्या शक्तीहून अधिक पराक्रम गाजवताना आपण तिला बघतो. हे तिचे आत्मप्रत्ययी रुप आहे. ते आपल्याच अंगभूत गुणांनी तेजाळून उठलेले आहे. ते अनेक कसोट्यांवर खरे उतरलेले आहे. ते झुंजार असे व्यक्तिमत्व आहे.

संदर्भ


१) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ ४९९;

२) कित्ता पृष्ठ ५०४;

३) १४ एप्रिल रोजी हकीम अजमलखाँ यांना लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ १०९;

४) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ १११;

५) हिंदू' दिनांक १२ जानेवारी १९२४ आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २३ पृष्ठ २०२;

६) गांधीजींनी देवदास गांधीना दिनांक १४ मे १९२४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २४ पृष्ठ ४२;

७) गांधीजींनी रामदास गांधीना दिनांक १७ मार्च १९२२ रोजी लिहिलेले पत्र;

८) मुंबई येथिल एक्सलसिअर थिएटर मधील सभेतील वक्तव्य आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड २५ पृष्ठ ३६६.


❖❖❖

## १४) घरात चोर

साबरमती आश्रमात एकदा कस्तुरबाच्या खोलीतून चोरी झाली. कपडे भरलेल्या दोन पेट्या चोरांनी उचलून नेल्यात. हे आश्रमात कळले. कस्तुरबापाशी एवढे कपडे आलेत कुठून? कशासाठी आलेत? ती तर रोज इतके कपडे वापरत नाही. हरीलालच्या दोन मुली होत्या. रामी आणि मनू. त्यांची आई देवाघरी गेली होती. त्या अधून-मधून आश्रमात येत-जात. कस्तुरबाला भेटीत काही साड्या मिळालेल्या होत्या. त्या या मुलींसाठी तिने राखून ठेवल्या होत्या. तिला आपल्यासाठी तर यातली चिंधीही नको होती.

सायंकाळच्या प्रार्थना सभेनंतर गांधी-प्रवचन झाले. यात हे ऐकायला मिळाले. 'गरीबाला हे परवडणारे नाही. आपण कुणालाही कुठलीही भेट द्यायचे काहीही कारण नाही.' कस्तुरबाने हे ऐकले. चोराना तिने गुरु मानले. आपल्या जवळ काहीही राखून ठेवले नाही. अपरिग्रह व्रतात साक्षात् गांधीजींना पराभूत केले. तिच्यापुढे सारे हरले. ती जिंकली. गांधीजी एवढी अपरिग्रहाची चर्चा करत. अपरिग्रहाचा आग्रह धरत असत. त्यांचे सामान तिच्या सामानाच्या दुप्पट असायचे. कमीत कमी आकाराचा बिछाना तिचा असायचा. तिची छोटीशी पेटी बहुदा मोकळी असायची. पेटीला ना कडी ना कोंडा. हा केवळ भौतिक अपरिग्रह नव्हता. तिच्या आशा-आकांक्षा आणि अभिलाषाही कमी होत्या. गांधीजींचा मार्ग वेगळा असल्याचे तिला कळले होते. तिने त्यांना सांगून टाकले होते की त्यांना साधु-संन्यासी व्हायचे आहे. मग तिने मौज-मजा करुन काय करावे? एकदा त्यांचे मन जाणून घेतल्यावर त्याच दिशेने तिने आपल्या मनाला वळवले.

एकदा बाहेरुन कुणी गृहस्थ आश्रमाला भेट द्यायला आले होते. निरोप घेताना आपल्या खिशात जी काही रक्कम होती ती त्यांनी कस्तुरबाला दिली. ते म्हणाले की 'सध्या मजजवळ एवढे पैसे आहेत. ते आश्रमासाठी देऊन जात आहे.' कस्तुरबाने ते पैसे घेतले. रक्कम काही खूप मोठी नव्हती. तिने या थोड्याशा पैश्यांनी केळी विकत घ्यायचे ठरवले. दिवसभर आश्रमातली बालके तिच्याकडे येत असत. हीसारी बालके तिची नातवंडे होती. कुणी मुलांची तर कुणी मुलींची लेकरे होती ती ! ही बालके आपल्याकडे आलीत तर आपण त्यांना एकेक केळ देऊ असे ठरवून केळी खरेदी करण्यासाठी तिला या पैश्यांचा उपयोग करायचा होता. लगेच ही बातमी गांधीजींच्या कानावर पोहोचली. त्यांच्यात व कस्तुरबामध्ये असा संवाद झाला.

'तुला कुणी पैसे दिलेत असे ऐकले.' गांधीजींनी शंकेने विचारले.

'होय, बाहेरुन कुणी बंधू आले होते. त्यांनी थोडे पैसे दिलेत.' कस्तुरबाने मोकळेपणाने उत्तर दिले.

'या पैश्यांचे काय केले?' गांधीजींचा प्रतिप्रश्न होता.

'अजून काही केले नाही. ते पैसे मजजवळच आहेत.' कस्तुरबाने खुलासा केला.

'बरं बरं.' गांधीजी म्हणाले.

'मी त्यातून केळी विकत घ्यायचा विचार करत आहे. मुलं आली तर त्यांना देता येतील.' कस्तुरबाने योजना सांगितली.

'त्यांनी मुलांना खाऊ घेण्यासाठी पैसे दिले होते काय?' गांधीजींचा तिखट प्रश्न उभा राहिला.

'नाही. त्यांनी काही तसे सांगितले नव्हते.' कस्तुरबाचे प्रांजल उत्तर होते.

'तर मग त्यांनी काय सांगितले होते?' गांधीजींनी खुलासा मागितला.

'मी आश्रमासाठी देऊन जात आहे.' कस्तुरबाने सांगितले.

'तर मग तुम्ही या पैश्यांबाबत आश्रमातल्या व्यवस्थापकाला विचारलेत का?' गांधीजींनी व्यवस्थापकीय प्रश्न विचारला.

'नाही, मी नाही विचारले. हे चार-सहा रुपयेच तर होते. याबाबत ते काय विचारायचे?' कस्तुरबा म्हणाल्या.

'चार-सहा रुपये तर सोडा पण चार आणे असतील आणि ते जर आश्रमासाठी दिले असतील तर आश्रमाच्या व्यवस्थापकाला विचारायला हवे. आपण त्याचा इतर कामासाठी उपयोग नाही करु शकत.' गांधीजींनी आपली भूमिका स्पष्ट केली.

'चूक झाली माझी.' कस्तुरबाने आपली चूक मान्य केली.

एवढ्याने काही गांधीजींचे समाधान झाले नाही. हे पैसे तर त्यांनी परत द्यायला लावलेतच पण 'नवजीवन' मधून एक लेख लिहिला. लेखाचे शीर्षक होते 'घरात चोर.' गांधीजी इतरांसाठी कुसुमाहून कोमल हृदयाचे होते. आप्तस्वकीय जनांसाठी मात्र वज्राहूनही कठोर बनत होते. साधन शुचितेच्या बाबतीत तर सूट-सवलत नसायचीच.

या विषयीचे गांधीजींचे चिंतन त्यांच्या या लेखात प्रकटताना दिसते -

"माझ्या 'आत्मचरित्रातून' मी कस्तुरबांची खूप प्रशंसा केली आहे. माझ्या जीवनातील मोठ-मोठ्या बदलांमध्ये-परिवर्तनांमध्ये-इच्छेने वा अनिच्छेने तिने मला साथ दिली आहे. तिचे जीवन पवित्र आहे., हे मी मानतो. तिने समजून-उमजून म्हणजे जाणीवपूर्वक नव्हे पण पत्नी धर्माचा विचार करुन हा सारा त्याग केला आहे. माझ्या त्यागात तिने कधी अडथळा आणला नाही. माझ्या आजारपणात माझी सेवा करुन मला किती सुख दिले परंतु मी मात्र तिला त्रास देण्यात मुळीच कसूर केली नाही. माझ्या ब्रह्मचर्य पालनाकामी तिने केवळ मदतच केली असे नव्हे पण माझे रक्षणही केले आहे. या गुणांना आच्छादित करुन टाकणारे दोषही तिच्या ठायी आहेत. पत्नी धर्म जाणून तिने आपल्यापाशी असलेले धन वगैरे तर सारे देऊन टाकले तरीही तिच्या ठायी काही असा क्षुद्र मोह उरला आहे. जो समजून घेता येत नाही. यामुळे तिने मागील वर्षी वा त्याहून काही आधी वेगवेगळ्या लोकांपासून भिन्न-भिन्न वेळी मिळालेले शंभर, दोनशे रुपये साठवून ठेवले होते. कुणी तिच्या व्यक्तीगत कारणासाठीही काही देऊन जात असेल तर तेही ती स्वत:पाशी ठेवू-राखू-शकत नाही, असा नियम आहे. यामुळे वर निदिर्ष्ट गोळा केलेली रक्कम तर चोरीची रक्कमच ठरते. तिच्या आणि मंदिराच्या सुदैवाने एकदा मंदिरात चोर आले. त्यांना तर काही मिळू शकले नाही पण या निमित्ताने कस्तुरबांची चोरी उघड झाली. त्यांना शुध्द पश्चात्ताप झाला पण तो क्षणिक सिध्द झाला. त्यांचे खऱ्या अर्थाने हृदय परिवर्तन झाले नव्हते. धन जोडायचा मोह अजून सुटला नव्हता. काही दिवसांपूर्वी कुणी अनोळखी बंधू त्यांना चार रुपये भेटीदाखल देऊन गेले होते. आश्रमाच्या नियमानुसार या पैश्यांना कार्यालयात जमा करण्याऐवजी त्यांनी ते स्वत:जवळ ठेवले. एका जबाबदार आश्रमवासीने हे सारे बघितले होते. त्यांचा धर्म तर कस्तुरबाईंना सावधान करुन द्यायचा होता. खोट्या मर्यादेमुळे ते या पापाचे साक्षी बनून राहिले. छगनलाल गांधींच्या घटनेनंतर मंदिरवासियांचे (आश्रमवासियांचे) डोळे उघडले. कस्तुरबाईच्या चोरीच्या साक्षीदाराने छगनलाल जोशींना ही बातमी दिली. जोशी कस्तुरबाकडे थरथर करत जाऊन पोहोचले. कस्तुरबाईच्या सारे लक्षात आले. तिने दीनतापूर्वक पैसे परत केले. यापुढे परत असे होणार नाही असे वचन दिले. तिचा पश्चात्ताप खरा आहे. हे मी जाणतो. आता जर आधी केलेले पाप प्रकट झाले वा अन्य कुठले पाप प्रकट झाले वा भविष्यात केलेले असे पाप प्रकट झाले तर कस्तुरबाई माझा आणि मंदिराचा (आश्रमाचा ) त्याग करील अशी प्रतिज्ञा तिने केली आहे. मंदिराने तिच्या पश्चात्तापाचा स्वीकार केला आहे. आता ती या मंदिरात एक निर्दोष व्यक्ती मानली जाईल. लोकांनी निभाऊन घेतले तर अकारण वा सकारण - यथासंभव शक्य होईल तसा माझ्यासोबत प्रवासही करील[१]

या लेखातील चिंतनामुळे गांधीजी आणि कस्तुरबाच्या पारिवारिक जीवनावर झगझगीत प्रकाश पडतो. कस्तुरबाचे याहून तटस्थ व स्पष्ट मूल्यांकन तिचे तथाकथित टीकाकारही करु शकणार नाहीत.

संदर्भ

१) गांधीजींनी 'नवजीवन' च्या ७ एप्रिल १९२९ च्या अंकात 'माझे दु:ख, माझी शरम' शीर्षकाने प्रकाशित केलेला लेख आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४० पृष्ठ २२२.

❖❖❖

## १५) चळवळीत अग्रणी

१९२८ साल. बारडोलीत सत्याग्रहाचा प्रसंग होता. छावणीत शेतकरी होते. तिथे नाना आजार आलेत. ताप होता. देवी होत्या. जुलाब होते. उलट्या होत्या. कस्तुरबाला स्वत:लाही बरे नव्हते. ती मीठूताई पिटीट यांच्यासोबत मरोली येथे होती. एक पोस्टकार्ड आले. तिने तयारी केली. एक पिशवी घेतली. एक जोडी कपडे घेतले. सेवेसाठी सुसाट निघाली. 'कस्तुरबा आली आहे.' ही बातमी वायुवेगाने पसरली. अर्धा आजार तर या बातमीने पळून गेला. तिने छावणी बघितली. लोकांना गोळा केले. कामांची वाटणी झाली. बघता-बघता सफाईला सुरुवात झाली. स्वयंपाकघरांची सोय लागली. गावातील कारभारी गोळा झालेत. वैद्य आलेत. डॉक्टर्स आलेत. सर्वांना पथ्याप्रमाणे आहार मिळाला. खायला मिळाले. अंथरुण आले. पांघरुण आले. सायंकाळ झाली की सारे तिच्याभोवती गोळा होत. पोटभर गप्पाहोत. सुख-दु:खे वाटली जात. तिने लोकाना दिलासा दिला.

१९२९ साली गांधीजी बनारसला गेले होते. तिथले कर्मठ लोक चिडले होते. मोठा विरोध झाला. जाहीर सभा भरविण्यात आल्यात. गांधीजी तिकडे एकटेच गेले होते. सभेत गडबड वाढली. कस्तुरबाला हे कळले. ती तीरासारखी धावली.'सभेत दगडांचा मारा सुरु असताना मी घरी कशी थांबू?' हा तिचा प्रश्न होता. गांधीजींच्या अनेक उपवासात ती सोबत असायची. जीवन-मरणाच्या रणात हिंमतीने उभी ठाकायची. विह्वळ होत नसायची.

गांधीजींच्या सोबत तिचा हिमालयात कोसानी येथे मुक्काम होता. हिमालयाचा शेजार. तिथे थंडीला काय तोटा? आपल्या सवयीनुसार गांधीजी तर आभाळाच्या छताखाली झोपायचे. एका रात्री वाघाचा बछडा आला. गांधीजींच्या खाटेजवळ थांबला. दबक्या पावलांनी परत गेला. तिथे नैनितालहून आलेले काही कार्यकर्ते होते. त्यांनी हे दृश्य बघितले होते. त्यांनी हा किस्सा गांधीजींना सांगितला. घरात झोपायचा आग्रह केला. गांधीजी काही केल्या ऐकेनात. उलट हसू लागले. हे कळल्यावर कस्तुरबा बाहेर आली. कुणाशी काहीही बोलली नाही. आतापर्यंत ती रोज घरात झोपायची. तिने शांतपणे आपला बिछाना गांधीजींच्या बिछान्याशेजारी अंथरला. ती अशी कृतिशील सत्याग्रही होती. आकाशातल्या नक्षत्रांची सुरम्य मौज न्याहाळत ती बिछान्यावर पहुडली होती. चमचमत्या ताऱ्यांचे जग तिला विलक्षण वाटले होते. आकाशाच्या अंगणात नुसता आनंदोत्सव सुरु होता. ती विचार करत होती. प्रत्येकाच्या अंत:करणात असे झगमगते आकाश असते का? देवशक्ती सज्जन माणसाला का त्रास देते? आपली सज्जनपणाची व्याख्या देव शक्तिला मान्य नसावी काय? तिचे सज्जनपणाचे मानदंड वेगळे असतात का? माणसांच्या वागण्या-बोलण्याचे संकेत समान का दिसत नाहीत? एक ना अनेक प्रश्न. तिचे मन प्रश्नांच्या चक्रव्यूहात अडकून गेले. आकाशातले तारा मंडळ तिला आता अंधुक वाटू लागले होते. अगदी एकाग्रपणे बघितल्यामुळे आपल्या डोळ्यांना अंधारी आली की काय असे तिला उगाच वाटून गेले. एकेक चमचमती चांदणी तिला अस्पष्ट होत चालल्यासारखी दिसू लागली. तिने प्रयत्नाने आकाश बघितले तर तसे काही नव्हते. तिच्या मनाचा खेळ नभाच्या तारांगणात सुरु होता. असे करत करत तिचा डोळा लागला होता.

कस्तुरबा हळूहळू सार्वजनिक जीवनात सक्रिय होत होती. कधी अव्यक्त भयाच्या छायेत तरंगणारे तिचे जीवन आज सीमा लंघून विस्तारित होत होते. अखंड परिभ्रमण करणारे हे विश्व. यात कोटी-कोटी तारा मंडळे. एका नगण्य आकाशगंगेतला आपला ग्रह. यावर अब्जावधी लोकांची वस्ती. यात काळाच्या प्रवाहात अगणित वंश जन्मले आणि गेलेही. सत्ता ध्वस्त झाल्यात. राजदंडांची दीप्ती मंद झाली. राजवंश धुळीला मिळालेत. त्यात आपण का अमरत्वाची कांक्षा बाळगायची? या विश्वात जीवनाचे सातत्य हेच खरे आहे. कस्तुरबा आपल्या मनाची समजूत घालत राहिली.

नातू रसिकच्या निधनानंतर गांधीजी क्षणभराचाही वेळ न दवडता कामाला लागलेत. कस्तुरबाला याचा शोक खोलवर सहन करावा लागला. धैर्यपूर्वक तिने हा शोक सहन केला. एखाद्या रणरागिणीप्रमाणे हे दु:ख सोसले याची दखल गांधीजींनी या पत्रातून

घेतली. कस्तुरबाचे वय आता साठ वर्षांचे झाले होते. तिच्या पायाला भिंगरी होती. गावा गावा मागून गावे ती पादाक्रांत करत होती. मातृभूमीच्या मुक्तिची आणि जनजागरणाची गीते ती गात होती.

तुरुंगात कस्तुरबा इंग्रजी शिकू लागली. आपण एवढ्या वयाच्या आणि हे 'ए, बी, सी, डी.' काय शिकतो आहोत? असे काही तिला कधी वाटले नाही. खूप दिवस लागलेत. न थकता, न कंटाळता ती शिकत राहिली. घाई नाही, गडबड नाही. ती एकेक शब्द वीस ते पंचवीस वेळा लिहून काढायची. नवे शब्द जाणून घ्यायची. नवी वाक्य रचना शिकायची. इंग्रजी वर्णाक्षरांच्या आकलनापासून ही तयारी सुरु झाली होती. बरेच दिवस अभ्यास सुरु होता. तिला काही इंग्रजी शिकायचे नव्हते. इंग्रजी वाक्ये बोलायचीही काही इच्छा नव्हती. तिचे ध्येय स्पष्ट होते. 'आपल्याला गांधीजींचा किमान पत्ता तरी लिहिता यावा.' एवढी एकच एक आशा तिला लागून राहिली होती. पत्ता इंग्रजीतून लिहिता यायला हवा. तो स्वत:लाच लिहिता यायला हवा. दुसरे असे की आश्रमात तर पोतेभर टपाल येत असे. त्यातले आपले पत्र नेमकेपणाने ओळखता यायला हवे. बस. याहून अधिक काही नाही.

गांधीजी सिमला येथे गेले होते. व्हाइसरॉय यांच्याशी उच्च पातळीवरील काही चर्चा होती. कस्तुरबा सोबत होती. व्हाइसरॉय यांच्या पत्नी लेडी विलिंग्डन यांनी तिचे स्वागत केले. व्हाइसरॉयच्या पत्नीने भारतीयांचे असे स्वागत करायचे हे पहिले उदाहरण आहे. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या भुवया उंचावल्या. सर्वांना नवल वाटले. हा कस्तुरबाचा मोठा विजय होता.

कस्तुरबाच्या छोट्या-छोट्या प्रवासाच्या, आजारपणाच्या, आपल्यासोबत असण्याच्या वा कुठे प्रवासात असण्याच्या बातम्या गांधीजींनी मोठ्या तत्परतेने अनेकाना पत्रातून कळवल्या आहेत. आपल्या मुलाला व सुनेला ते कळवतात 'बाची तब्येत ठीक-ठीकच मानली जायला हवी. आता तिच्यावर म्हातारपण झळकू लागले आहे. ती माझ्यासोबत कलकत्ता येथे आली होती, हे तर मी कळवले होतेच. मी दिल्ली करत परत आलो. बा दोन दिवस दिल्लीला थांबून नंतर आल्यात.' [१]

कस्तुरबाच्या प्रवासाचे वर्णन गांधीजी करतात. तिच्या तब्येतीविषयी काळजी वहाताना दिसतात. तिच्या एकूणच प्रवास व कार्यक्रमाविषयी तपशीलवारपणे कळवतात.

गांधीजींनी कस्तुरबाच्या कर्तृत्वाचा आलेख मांडताना लिहिले आहे.-

"माझ्या आधी रवाना होण्याच्या वेळी बा आणि कुमकुम यांचे मन उद्विग्न झाले असे माझ्या लक्षात आले. यामुळे मी रवाना व्हायचा आग्रह केला नाही पण बांनी इथे थांबून आपल्या वाट्याची कमाई करुनच घेतली. त्या इथे असल्यामुळे ज्या शेकडो भगिनींपर्यंत मी पोहोचू शकलो नाही - तिथे बा पोहोचल्यात आणि त्यांना काहीसे आश्वासन लाभले. मार्गात मी झोपून प्रवास केला, बा दुसऱ्या कारमध्ये बसल्या होत्या, त्या पैश्यांच्या थैल्यांचा स्वीकार करत राहिल्यात. यामुळे लोकांना समाधान लाभले व दरिद्र नारायणाला लाभ झाला.[२]

या पत्रातून गांधीजींनी जे वर्णन केले आहे. ते कस्तुरबाच्या चळवळीतील प्रत्यक्ष सहभागाचे चित्रण करणारे आहे. गांधीजी झोपी गेल्यावरही त्या अखंड जागृत राहून देशसेवा करताहेत. तिला लाभलेल्या धनाने दरिद्री नारायणाचा लाभ होणार असल्याचे शुभ वर्तमानही ते देतात.

कस्तुरबाने जलालपुर येथिल दारु दुकानांवर पिकेटिंग केले. दांडी यात्रा आणि धरासणा या १९३० सालच्या लढतीत तिचा सहभाग होता. ५ मे १९३० ते २६ जानेवारी १९३१ पर्यंत गांधीजी येरवडा तुरुंगात अटकेत होते.

गांधीजींनी कस्तुरबाला लिहिले.

"हे पत्र सर्वांसाठी आहे. असे समजावे. रविवारी रात्री मी तुम्हा सर्वांना भेटून गेलो हे किती छान झाले. याशिवाय तुम्हाला तुमच्या कँपपर्यंत पोहोचवूनही आलो. असे केल्याने मला खूपच बरे वाटले. ईश्वरी कृपेचा घन मन:पूत बरसत आहे.'

गांधीजी आणि कस्तुरबा किती छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद घेऊ शकत होते हे या पत्रातून उकलते. जीवनाला जीवनातून समजून घेणारे नेतृत्व

एकमेकांच्या सहज आत्मीय भावसंबंधाला कशा प्रकारे समजून घेत होते हे जाणून घेण्यासाठी हा प्रसंग पुरेसा ठरावा. गांधीजी पत्रातून पुढे लिहितात की पत्र पोहोचले तर उत्तम नाही पोहोचले तरी काळजी करायचे काही कारण नाही. ते पुढे प्रार्थनेच्या श्लोकांचे महत्व समजावून सांगतात. रोज प्रात:काळी या श्लोकांचे पारायण केले जात असेल अशी आशा व्यक्त करतात.[३]

या पत्रातून गांधीजींच्या अंतरंगाचा परिचय होतो. प्रार्थनेतील श्लोकांना जीवनात आचरणात आणावे असा स्पष्ट संकेत देत असतानाच ते ईश्वरी कृपेच्या घनाच्या बरसण्याचाही आत्मिक अनुभव व्यक्त करतात.

दांडी यात्रेनंतर ६ एप्रिल १९३० रोजी गांधीजींनी दांडी येथे सार्वजनिक सभा घेतली होती. या सभेत प्रार्थनेवर विशेष भर देण्यात आला होता. नवसारीजवळ बीजलपुर येथे भगिनींची एक विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत चार-पाच हजार भगिनी उपस्थित होत्या. अहमदाबाद आणि मुंबईहूनही काही नेता भगिनी आल्या होत्या. या सभेत गांधीजींच्या सल्ल्याने 'स्त्री स्वराज्य संघ' स्थापन करण्यात आला. सूरत शहरात आणि जिल्हाभर विदेशी कपड्यांचा बहिष्कार आणि दारुबंदीसाठी छावण्या तयार करण्याची एक योजना आखली गेली. भगिनींच्या मदतीसाठी गांधीजींनी गुजरातचे सुप्रसिध्द नेते डॉ. सुमंत मेहतांची निवड केली. त्यांना सांगितले 'तुम्हाला भगिनींचे मार्गदर्शन करायचे नाही. मार्गदर्शन तर बा आणि मीठूताईच करतील. तुम्हाला केवळ मुनीम या नात्याने सहकार्य फक्त करायचे आहे.'

हे ऐकून मीठूताईंना थोडा संकोच झाला. त्या म्हणाल्या 'आपण आमच्या शक्तीला खूप मोठे समजून हे सांगत आहात.' गांधीजी मात्र आपल्या निर्णयावर ठाम राहिलेत. कस्तुरबाची तत्वनिष्ठा आणि कार्यशैलीशी ते परिचित होते. कस्तुरबाच्या नावात विलक्षण आकर्षण होते. शेकडो भगिनी छावणीत भरती होण्यासाठी आकृष्ट झाल्यात. सूरत शहरात मागासवर्गीय म्हणवल्या जाणाऱ्या समाजांमधूनही शेकडो भगिनी अगदी प्रथमच सार्वजनिक कामासाठी घराबाहेर पडल्या. त्या सर्वांना हिंमत आणि प्रेरणा देणाऱ्या कस्तुरबाच तर होत्या. त्या तरी काय इंग्रजी शिकलेल्या होत्या? मग त्या जर हे काम करु शकत असतील तर आपण त्यांना साथ का देऊ नये? असा एक सूर सर्वत्र प्रकटला. कस्तुरबाच्या जीवन शैलीमुळे महिलांच्या ठायी आत्मश्रध्दा जागली. याचे परिणाम लक्षणीय ठरले. तसा सूरत जिल्हा व्यसनासाठी प्रसिध्द आहे. पण कुठल्याही दारुच्या दुकानावर माणूस तर सोडाच पण अगदी चिटपाखरुही फडफडताना दिसले नाही. या घटनेचे परिणाम खोलवर झाले. सरकारला आपली ध्येयधोरणे बदलावी लागली. नीती नियम बदलावे लागेल. सरकारचे दमनचक्र सुरुच होते. भगिनींना छावणीसाठी कुणीही घर उपलब्ध करुन देऊ नये, असे प्रयत्न सुरु झालेत. भगिनी डगमगल्या नाहीत. त्यांनी मंडप टाकले गेले. छावण्या सजल्या. मंडप जाळून टाकण्यात आले. भांड्या-कुंड्यांची, गाई-म्हशींची जप्ती करण्यात आली. कस्तुरबाने ठणकावून सांगितले. 'आपण तंबू-राहुट्यांमधून राहू या. चटईच्या झोपड्या उभारु या. मातीची भांडी वापरु या मग बघू या. कोण आपल्यापासून कायच हिरावून नेतो ते?'

कस्तुरबाने लढ्याला नवे परिमाण दिले. एक तेज अर्पिले.

संदर्भ


१) गांधीजींनी मुलगा मणीलाल व सून सुशीला यांना दिनांक १४ जानेवारी १९२९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३८ पृष्ठ ३७४;

२) गांधीजींनी श्री रमणीकलाल मोदी यांना बांदाहून दिनांक २० नोव्हेंबर १९२९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४२ पृष्ठ २००;

३) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १२ मे १९३० वा त्या पश्चात् लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४३ पृष्ठ ४२८.


❖❖❖

## १६) महाप्रस्थान

१९३० साल. १२ मार्चपासून दांडीयात्रेला शुभारंभ होणार होता. ९-१० मार्चपासून आश्रम दांडीयात्रेच्या तयारीला मन:पूर्वक लागला होता. आश्रमात तयारी सुरु होती. कूचसाठी पारखून माणसे निवडली गेलीत. एका बलवान सत्तेच्या विरोधात सत्याच्या उपासकांची लढाई सुरु होणार होती. आश्रमात या दांडी यात्रेविषयी चर्चा सुरु झाली. यात सहभागी होण्यासाठी भगिनींच्या ठायी अपार उत्साह होता. गांधीजींनी या लढ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भगिनींची नावे मागवली होती. या घटनेला काही दिवस लोटले मग मात्र ते त्यांना सोबत घेऊन जाणार नाहीत असे स्वच्छपणे कळवून टाकले होते. यामुळे भगिनी नाराज झाल्यात. निरुत्साहित झाल्या. स्त्री-दाक्षिण्याचा मुद्दा मग गांधीजींनी पुढे केला. ते म्हणाले होते "जुन्या युध्दांविषयी असे म्हटले जाते की शत्रु पक्ष आपल्या सैन्याच्या आघाडीवर गायी राखत यामुळे प्रतिस्पर्ध्याला आक्रमण करणे अडचणीचे होत असे. ही गोष्ट खरी असो वा नसो. इंग्रज महिलांवर हात उगारणार नाहीत एवढे तर आपण त्यांच्याविषयी जाणतो. आपण तर वाटेल त्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी कृतसंकल्प आहोत. यामुळे आपण आपल्या सैन्यदळापुढे महिलांना ठेवणे हेअशोभनीय काम आहे. आपण जर प्रचंड मारझोड सहन करायला तयार असू तर मग यातून बचाव व्हावा म्हणून भगिनींना पुढे करणे कितपत योग्य आहे. बरे?" भगिनी हे समजून गेल्यात की त्या काही सदासर्वकाळ स्वातंत्र्य लढ्यापासून वंचित राहणार नाहीत. त्यांची इच्छा जाणून घेऊन गांधीजी पुढे म्हणाले ' जेव्हा आश्रमातील पुरुष संपूर्ण आत्मसमर्पण करतील तेव्हा तुम्हाला तुरुंगात पाठवायला मला कुठलाही संकोच होणार नाही.'

भगिनींनी या आह्वानाचा स्वीकार केला. तुरुंगाबाहेर राहून तुरुंगावासापेक्षाही अधिक कठिण काम करुन दाखवण्याचा विडा उचलला. आश्रम जवळपास ओस पडायला लागला होता.

१२ मार्च रोजी कस्तुरबाला नेहमीप्रमाणे पहाटे चार वाजता जाग आली. दांडी यात्रेत तीन पिढ्या भाग घेत होत्या. गांधीजी, त्यांचा मुलगा मणीलाल आणि हरीलालचा मुलगा कांतीलाल. आश्रमात मागे राहिलेल्या महिलाना कस्तुरबा धीर देत होती. स्वत:चीही समजूत घालत होती.

'तुम्ही मरायलाही सिध्द असले पाहिजे.' गांधीजी प्रतिज्ञापूर्वक बोलले.

आणि बायकांमध्ये रडारड सुरु झाली. मणीलालची बायको तर हमसून-हमसून रडत होती. तिचे सर्वांग थरथरत होते. कस्तुरबा पुढे झाली. तिने सुनेचा माथा आपल्या खांद्यावर घेतला. तिची समजूत घालू लागली

"बेटा रे, आता मणीलाल मोहिमेवर निघाला आहे. त्याने आपल्या बायकोचा रडका चेहरा आठवत जावे असे तुला वाटते का? या इतर बायका बघ. त्या का रडताहेत? तू एकटी का रडतेस?" कस्तुरबाने हिंमत दिली. महिलांकडे वळली.

'आपले पुरुष योध्दे आहेत. आपण वीरपत्नी आहोत. आपण रडता कामा नये.' कस्तुरबा म्हणाली.

त्या क्षणी कस्तुरबा अगदीच वेगळी वाटत होती. एथपर्यंत झुंजणाऱ्या मानवांच्या मुखावरचे तेज तिने पाहिले होते. या तेजामुळे तिचा चेहरा दीप्त झाला होता. तिच्या सुरकतलेल्या चेहऱ्यावर एक दिव्य झळाळी नांदत होती. तिच्या चेहऱ्यावर एक निर्भय खंबीरपणा विलसत होता. ती या सत्याग्रही चळवळीतील एकनिर्भय योध्दा होती. सत्याग्रहाच्या हेतुबाबत आणि यशाबाबत ती कमालीची निश्चिंत होती. या लढ्याचे नेतृत्व आपला नवरा करत आहे. एवढे सत्य तिच्यासाठी पुरेसे होते.

कस्तुरबा मोर्च्याच्या अग्रभागी पोहोचली. तिने गांधीजींच्या नजरेत नजर भिडवून बघितले. औक्षण केले. तिच्या डाव्या हातात तबक होते. आपल्या उजव्या हाताच्या तर्जनीने तिने गांधीजींच्या कपाळावर टिळा लावला. प्रत्येक सत्याग्रहीला टिळा लावला. तिच्या चेहऱ्यावर तेज उसळत होते. ती एक सैनिक वाटत होती. पंडित खरे यांनी 'वैष्णव जन तो तेने रे कहिये' भजन गायला सुरुवात केली. घोषणा निनादल्या. जयजयकाराचा ध्वनी सजला. कुच निघाली. आश्रमवासी जनाना परत फिरायचा आदेश झाला. लाखो नयनाना प्रेमपुर आला. आश्रम सूना-सूना झाला.

डवरलेल्या झाडाची सारी पाने रुसुन पडावीत अशा ओक्याबोक्या झाडासारखा आश्रम उभा होता.

कूच निघाली होती. तीन आठवडे संपूर्ण जगाचे लक्ष या कूचकडे लागले होते. जगभरातले छायाचित्रकार, वृत्तपत्रकार, पत्रसृष्टीतले मान्यवर लोक गर्दी करुन होते. कुठल्याही क्षणी पोलिसांच्या कारवाईची बातमी येऊन थडकेल असे सर्वांना वाटत होते. साबरमती आश्रमात कस्तुरबा आणि इतराना दांडी यात्रेच्या बातम्या पोहोचत होत्या. सत्याग्रही जनांसमवेत कस्तुरबाही होती. भगिनींसाठी दारु-ताडीच्या दुकानांवर धरणे देण्याचा आणि विदेशी वस्त्रांच्या दुकानावर ठिय्या देण्याचा कार्यक्रम सुचवला गेला होता. कस्तुरबाच्या नेतृत्वाखाली भगिनी दारु-ताडीच्या दुकानांवर धरणे देत हिंडू लागल्या. एवढ्या प्रचंड संख्येने घराबाहेर पडून भगिनींनी प्रथमच अहिंसक चळवळीत आपली हजेरी लावली होती.

५ मे रोजी पहाटे गांधीजींना अटक करण्यात आली. येरवडा तुरुंगात ठेवण्यासाठी त्यांना नेण्यात आले. त्यांना घेऊन पोलिसांची गाडी निघाली त्यावेळी त्यांना कस्तुरबासाठी काही निरोप आहे. काय? असे विचारण्यात आले असता ते हसत-हसत म्हणाले होते की कस्तुरबा शूर आहे. तिला ही बातमी अवश्य कळवा. गांधीजींचा महिला शक्तीवर अपरंपार विश्वास होता. येरवडा तुरुंगातून पाठवलेल्या पत्रातूनही नारी शक्तीवरील आपला विश्वास त्यांनी व्यक्त केला होता.

मिठाच्या सत्याग्रहाविषयीचे विदेशी पत्रकारांचे रिपोर्टिंग अद्भुत आहेत. युनायटेड प्रेसचा अमेरिकन वार्ताहर वेब मिलर लिहितो - "सावकाश आणि शांतपणे तो जथा अर्ध्या मैलावर असलेल्या मिठाच्या ढिगाऱ्यांकडे निघाला. काटेरी कुंपण खाली ओढण्यासाठी काहींनी दोरांचे फास करुन घेतले होते. जथा जसजसा मिठाच्या ढिगांजवळ जाऊ लागला, तसतशी त्यातल्या लोकांनी क्रांतिकारी घोषणा द्यायला सुरुवात केली. 'इन्कलाब झिंदाबाद' अचानक आदेश दिला गेला - भारतीय असलेले पोलीस पुढे जाणाऱ्या पदयात्रीवर धावून गेले आणि लोखंडी टोके असलेल्या काठ्यांनी त्यांनी त्या लोकांच्या डोक्यावर प्रहार करायला आरंभ केला. त्यांचा प्रतिकार करण्यासाठी एकाही सत्याग्रहीने हात उचलला नाही. ते धडाधड खाली कोसळले. मी ज्या ठिकाणी उभा होतो, तिथे त्या नि:शस्त्र लोकांच्या डोक्यांवर होणारे लाठींच्या तडाख्यांचे - आघातांचे - आवाज ऐकून माझ्या पोटात ढवळायला लागले. नंतर दुसरा एक गट तयार झाला. ताठ मानेने तो पुढे निघाला. पोलीस पुढे धावले. पध्दतशीरपणे आणि यांत्रिकपणे त्यांनी तो दुसरा गटही खाली पाडला. स्ट्रेचर म्हणून वापरली गेलेली ब्लेंकेट्स रक्ताने माखली होती. गांधीजींच्या अनुयायांनी मग आपली व्यूहरचना बदलली, ते पंचवीस पंचवीसच्या गटांनी पुढे गेले आणि ढिगांजवळ जाऊन जमिनीवर बैठक मारली, जवळ जाण्याचा त्यांनी अजिबात प्रयत्न केला नाही. त्यांच्या प्रतिकार न करण्याच्या धोरणाने शेवटी पोलीस चवताळले. बसलेल्या लोकांच्या पोटावर आणि गुप्तांगांवर त्यांनी दात-ओठ खाऊन लाथा घालायला सुरुवात केली."

एक ब्रिटिश पत्रकार आणि लेबर पार्टीचे पुढारी होते. एच्. एन्. ब्रेल्सफोर्ड. त्यांनी धरासणाला भेट दिली. ते लिहितात - "इतक्या शिस्तबध्द आणि शांत सभा मी दुसरीकडे कुठे पाहिल्या नाहीत. वकिली भाषेत बोलायचे तर भाषणे नक्कीच प्रक्षोभक होती परंतु ती कधीही अनागोंदी माजवण्यास उद्युक्त करणारी वाटली नाहीत. ती नि:संशयपणे अहिंसेचा पुरस्कार करणारी होती. वक्ते बोलत असताना श्रोत्यांमधले भक्तिभावाने भाषण ऐकणारे स्त्री-पुरुष आपली टकळी बाहेर काढत. शांतपणे न थकता सूत काढता-काढता ऐकत."

भारत सरकारचे गृह सचिव होते हॅरी हेग. त्यांनी दिल्लीत हे मान्य केले की मुंबईच्या रस्त्यांवर कॉंग्रेसचीच सत्ता असल्यासारखे वाटत होते. कॉंग्रेसच्या पदयात्रांमध्ये सामील झालेल्या लोकांची संख्या, त्यांची शिस्त आणि वहातुकीवर असलेले पोलिसांचे नियंत्रण झुगारुन देणारे त्यांचे सामर्थ्य या दोन्ही गोष्टीचा मिलाफ होऊन कॉंग्रेसच्या चळचळीची शक्ती आणि तिचे यश ठसठशीतपणे उठून दिसत आहे.

दांडी यात्रा पूर्ण झाली. मिठाचा कायदा मोडला. १३ एप्रिल १९३० राष्ट्रीय सप्ताहाचा अखेरचा दिवस होता. गांधीजींनी दांडी येथे महिला संमेलनाचे आयोजन केले होते. या संमेलनात अपेक्षेपेक्षा अधिक भगिनी आल्यात. यासाठी १६ एप्रिल बीजलपुर येथे भगिनींच्या

दुसऱ्या सभेचे आयोजन केले होते. या प्रसंगी गांधीजी म्हणाले होते की भारतीय भगिनींसाठी त्यांनी एक संदेश तयार केला आहे. भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीच्या संगरात पुरुषांपेक्षा भगिनींचा वाटा सिंहाचा आहे. गांधीजींना वाटत होते की पुरुषांच्या तुलनेने भगिनी या देशाला अहिंसेचा अर्थ अधिक समर्थपणे समजावून सांगू शकतील. केवळ मिथ्या अभिमानामुळे पुरुष महिलांना अबला मानतात. खरे तर महिलांमुळेच खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात अहिंसा आणि शांती नांदते आहे. गांधीजींनी स्पष्टपणे लिहिले "महिलांना अबला म्हणून संबोधित करणे त्यांची बदनामी करणे आहे. हा भगिनींवर मोठा अन्याय आहे. बळाचा अर्थ जर पशुबळ केला जात असेल तर महिला अवश्य कमी प्रमाणात पशु आहेत. बळाला जर नैतिक बळ मानले तर मग मात्र महिला पुरुषांच्या तुलनेने अधिक पटीने श्रेष्ठ आहेत. त्यांच्या ठायी अंत:स्फुरण अधिक प्रमाणात नाही का? अधिक प्रमाणात त्याग परायणता नाही का? अधिक प्रमाणात अंत:शक्ती नाही का? अधिक प्रमाणात हिंमत नाही का? त्यांच्याशिवाय पुरुषाचे तर अस्तित्वच असू शकत नाही."[१]

या गांधी मतावर आणखी काही वेगळे नव्याने सांगण्यासारखे खचितच नाही.

गांधीजींनी एरवडा सेंट्रल तुरुंगातून लिहिलेले एक पत्र 'माझ्यासाठी आप्त-स्वकीयांसारख्या असणाऱ्या लोकांची जेव्हा मी भेट घेऊ शकेन तेव्हाच श्रीमती गांधी आणि माझ्या स्वत:च्या कुटुंबातील इतर सदस्यांची भेट घेऊ शकेन.'[२] गांधीजींना स्वकीय आणि कस्तुरबा यांच्यात काही फरक नव्हता. ज्यावेळी आपल्या कुटुंबाचा असा विस्तार करता येतो तेव्हाच 'वसुधैव कुटुंबकम्' या शब्दाचा अर्थ उकलत असतो.

गांधीजींच्या अंत:करणात नारी पराक्रमाविषयी अंत:स्फूर्तीने श्रध्दा जन्माला आली होती. यापूर्वी सामाजिक क्षेत्रात नारी शक्तीचे दर्शन केल्याचे भारतीय इतिहासाला स्मरत नाही. इथे भगिनींनी त्याग आणि बलिदानाच्या क्षेत्रात सर्वश्रेष्ठ उदाहरण प्रस्तुत केले आहे. असे उदाहरण अन्य देशात आढळत नाही. विश्वाच्या स्त्री-मुक्ती चळवळीला हे गांधीजींचे योगदान आहे. या योगदानात कस्तुरचे समर्पण अधिक मोलाचे आहे.

गांधीजींना अटक झाल्यावर अब्बास तैय्यबजींनी कूचचे नेतृत्व स्वीकारले होते. सकाळी सहा वाजेच्या आधीच सारे सत्याग्रही रांगेत उभे राहिलेत. कस्तुरबाने वयोवृध्द तैय्यबजींच्या कपाळी टिळा लावला. गळ्यात सुताची माळ घातली. सहा वाजता 'वैष्णव जन तो' गाईले गेले. रामधून झाली. कूच निघाली. शहात्तर वर्षे वयाचे तैय्यबजी चळवळीचे नेतृत्व करत होते. काही अंतर कस्तुरबा त्यांच्या समवेत चालत गेली. गांधीजींवरचा खटला गुप्तपणे चालवण्यात आला होता. कस्तुरबा आणि काही जणाना जलालपुरच्या कोर्टात हजर राहू दिले होते. अब्बास तैय्यबजी यांना सहा महिन्यांची साधी कैद ठोठावण्यात आली होती. चोपन्न सत्याग्रहींना तीन महिन्यांची शिक्षा झाली. तिघाना लहान मानून सोडून देण्यात आले होते. पुढले नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले. त्यांना १६ मार्च रोजी अटक करण्यात आली होती. या चळवळीचे नेतृत्व एक महिला करत होती हे या चळवळीचे यश आहे.

आपल्या परंपरेने नारीला देवी वा दासी मानले. जिथे नारीचे पूजन होते तिथे देवता नांदतात असे म्हटले आणि नारीला देवता मानले. नारीला स्वतंत्रता प्राप्तीची अर्हता नाही असे म्हटले आणि तिला दासी मानले. नारी ही देवी असो वा दासी, दोन्हीही रुपात परतंत्र आहे. शोभेची बाहुली आहे. तिला ना स्वातंत्र्य ना अभिव्यक्ती. कस्तुरबा या संदर्भात विशिष्ट आहे.

कस्तुरबा साबरमतीहून गांधीजींच्या भेटीसाठी कराडी येथे गेली. गांधीजींनी त्यांना कारावासात जायच्या तयारीनिशीच यायला सुचवले होते. कस्तुरबा तर यासाठी कधीचीच तयार झाली होती. ती छावणीत होती. पहाटेचे चार वाजत होते. प्रार्थनेचा समय झाला होता. प्रार्थना सुरु होती. काल रात्री तिच्या छावणीनजिक मोटारगाड्या धावत होत्या. तिला शंका आली होती. प्रार्थना आटोपली. नवसारी छावणीहून खबर येऊन धडकली. मध्यरात्री गांधीजींना अटक केली गेली आहे. तिने लोकाना संदेश दिला: "मी सकाळी कराडी येथील छावणीत जाऊन आले आहे. आश्रमवासींना भेटले. दोन मोटारी होत्या. शस्त्रास्त्रधारी शिपाई होते. काही पोलिस अधिकारी होते. चहुबाजुंनी पोलिसांनी घेरुन घेतले होते. कराडी गावात ही बातमी आगीसारखी पोहोचली.

सारे गाव धाऊन आले. शिपायांनी लोकाना अडवले. एकालाही पुढे येता आले नाही. हे सारे मी ऐकून आले. मला खूप वाईट वाटले. सरकारी पागलपणावर हसूही आले. गांधीजींना अटक झाली. मध्यरात्री डाका घातला गेला. एवढा लष्करी लवाजमा? माझे मन थकून गेले. आता आपली कसोटी आहे. देशात कुठेही अशांतता माजू नये. जनतेने संयम पाळावा. भावनांवर अंकुश राखावा. चुकीचे पाऊल उचलू नये. बलिदानाची भावना कायम ठेवावी."

"सरकारी नोकरी करणाऱ्या बंधु-भगिनींनो, आता अजून किती काळ नोकरीला चिकटून राहणार आहात? आपल्या देशसेवकांवर लाठ्या बरसताहेत. गोळीबार होताहेत. हे कसे सहन करता? निष्पाप बालकांवर हात उगारला जात आहे. देशसेवकांवर घोडे दौडवले जात आहेत. तोंडात बोळे कोंबले गेले आहेत. खाऱ्या पाण्यात बुडवले गेले आहे. काटेरी कुंपणात फेकून दिले जात आहे. नि:शस्त्र सेवकांवर हरप्रकारचे जुलूम अत्याचार होत आहेत. नोकरीवर लाथ मारा."

गांधीजींनी १२ ऑक्टोबर १९३० च्या पत्रातून लिहिले की कस्तुरबा बरीच धावपळ करत आहे., असे दिसते. कस्तुरबाची सारखी धावपळ सुरु होती. तिचे पाय गतिमान होते. हात सक्रिय होते. मस्तक भणाणलेले होते. चित्त व्यग्र होते. बोरसदहून तार आली. 'कस्तुरबाची मदत हवी.' बोरसद येथे किसानांचा लढा सुरु होता. गावात हा:हाकार माजला होता. गुरे-ढोरे जप्त करण्यात आली होती. घरा-दारांवर जप्ती बजावली जात होती. शेतकरी सारा (महसूल) भरत नव्हते. कारावासात जात होते. मार-ठोक झेलत होते. जमीनींचा लिलाव होत होता. भगिनींनी लाठीमार झेलला होता. त्या घायाळ होऊन दवाखान्यात भरती झाल्या होत्या. सत्याग्रहींना हिंमत देण्यासाठी कस्तुरबाला पाचारण केले गेले होते. तिच्या अंगात ताप मावत नव्हता. डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता. काही भगिनींनी सुचवले. 'आम्ही तुमच्या ऐवजी जातो बोरसदला. तुम्ही थांबा इथे.' तिने कुणाचे ऐकले नाही. पिशवीत एक साडी ठेवली. कांबळे ठेवले. गरजेच्या चार गोष्टी पिशवीत कोंबल्या. बोरसदकडे धाव घेतली.

कस्तुरबा बोरसदला पोहोचली. दवाखान्यात गेली. घायाळ भगिनींना भेटली. त्यांचे मनोबळ वाढवले. ती धावत होती. आपल्या तब्येतीचा अजिबात विचार करत नव्हती. सकाळपासून काम सुरु व्हायचे. ते रात्री उशिरापर्यंत चालायचे. धावपळीमुळे तिची तब्येत अधिक बिघडली. नडियादहून डॉक्टर आले. तपासणी केली. तिला आरामाची गरज होती. यावर तिचे म्हणणे असे होते 'मी तर विशेष असे काही करत नाही. मला काही थकवा नाही. मी आपल्या नेत्याच्या मार्गाने निघाली आहे. मला ही संधी लाभली. तिचे सोने करत आहे. आराम तर मी नाही करु शकत.' हे ऐकून डॉक्टर चुप बसले. निराश झालेत.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदुस्तानी महिलांनी कस्तुरबाकडे एक रकम पाठवली. त्यांचे आभार मानणारे एक पत्र तिने लिहिले:

"प्रिय भगिनींनो,

तुम्ही पाठवलेले पंचवीस पौंड मिळाले. खूप आनंद वाटला. इतक्या लांबून हिंदुस्तानविषयी तुमच्या मनात असलेली आपुलकीची भावना बघून मी भारावून गेले. मी तुमची कृतज्ञ आहे. तुम्ही विदेशी कपडे वापरत नसाल अशी आशा करते. तुमचे जीवन हिंदुस्तानी आहे. वारसा हिंदुस्तानी आहे. त्याचे प्रतिबिंब तुमच्या रोजच्या जीवनात झळकेल अशी आशा करते. कस्तुरच्या शुभेच्छा."

कस्तुरबा धरासणाला धावत निघाली. तिथले दृश्य थरकाप उडवणारे होते. याबाबत तिने लिहिले आहे.: "देशसेवक घायाळ झालेत. त्यांना सांत्वना द्यायला मी बलसाडच्या दवाखान्यात गेले. बंधु बिछान्यांवर तळमळत आहेत. ते करुण दृश्य होते. माझे मन आकांत करुन उठले. त्यांच्यावर अन्याय झालेत. देशसेवकांची हिंमत वाखाणण्यासारखी आहे. त्यांचे शौर्य अभिनंदनीय आहे. त्यांचा उत्साह अनुकरणीय आहे. अन्याय-अत्याचारांच्या कथा चहुबाजुंनी ऐकायला येताहेत. खूप भगिनी दवाखान्यात आपली सेवा बजावताहेत."

लढाई जारी होती. जलालपुर तालुक्यात देशसेवकांची परिषद भरली होती. कस्तुरबा अध्यक्षस्थानी होती. या परिषदेत ती बोलली: "बंधुंनो आणि भगिनींनो, आज आपला देश एका नाजूक

वळणावर उभा आहे. या लढाईत भगिनींनी पुढे यावे. मनावर घेतले तर त्या खूप मदत करुशकतील. आपल्यापाशी वेळ कमी आहे. अधिक बोलायची ही वेळ नाही. सारे एकजुटीने रहा. भेदाभेद विसरा. संकटांचा सामना करा.”

लंडनमधील गोलमेज परिषद अयशस्वी ठरली. हिंदुस्तानात याचा जाहीर निषेध करण्यात आला. हा नागरी असहकार सरकारने हाणून पाडला. जानेवारी महिन्यात सरकारने पंधरा हजार लोकाना अटकेत टाकले. यात काही महिला होत्या. यात कस्तुरबा होती. तिला साबरमती तुरुंगात टाकण्यात आले होते. मायदेशातील हा तिचा पहिला तुरुंगवास होता. ही सहा आठवड्यांची सक्त मजुरीची शिक्षा होती. यानंतर तिला पुनश्च अटक झाली होती. या दरम्यान गांधीजींचे पत्र आले. पत्रात लिहिले होते: “आता तर तुझी सुटका झाली. मी तुला भेटू शकणार नाही. याचे तुला दु:ख होईल मला तर होईलच. तुझ्यासाठी सवलत मागायचे मनात होते पण ते शोभणार नाही. माझ्या या मताशी तू सहमत होशील असे वाटते. आपले जीवन बलिदानावर आधारित आहे. समाधान मानावे. मला लिहित रहावे.”[३]

या पत्राच्या संदर्भात गांधीजींच्या मताच्या व मनाच्या आंदोलनाना सहजच समजून घेता येते. स्वातंत्र्य लढ्याला प्रज्वलित स्वरुपात अखंड तेवत ठेवणारे हे दंपती अशा प्रकारे सर्वस्वाचा होम करुन वाट चालत होते.

संदर्भ

१) ‘यंग इंडिया’ १० एप्रिल १९३०;

२) गांधीजींनी आर्. व्ही. मार्टिन यांना दिनांक ८ जुलै १९३० रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४४ पृष्ठ १०;

३) गांधींनी कस्तुरबाला दिनांक २० ऑगस्ट १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५० पृष्ठ ४०१.

❖❖❖

## १७) जीवनाभिमुख कस्तुरबा

कस्तुरबा प्रदीर्घ विचार करायची. तिची जीवनशैली होती तर गांधीजींची जीवनदृष्टी होती. गांधीजींच्या विचारांची बैठक तत्त्वज्ञानमय-आध्यात्मिक होती. कस्तुरबाच्या विचारांची बैठक श्रध्दामय-समर्पणशील होती. दोघे जीवनातून जीवन समजून घेत होते. दोघे जीवनाभिमुख होते. गांधीजींच्या ठायी पौर्वात्य व पाश्चिमात्य जगण्याचे संदर्भ होते. कस्तुरबा भारतीय चिंतनशैलीविषयी आग्रही होती. यामुळे वैष्णव संस्कार, पतिव्रता धर्म, निरामिष आहार, अस्वाद व्रत, अपरिग्रह, श्रम पूजन तिच्या ठायी आधीपासून होते. तसा पश्चिमचा महिला मुक्तिचा लढा तिला ठाऊक होता. तिने भारतीय परंपरेचे मूळ सूत्र कायम राखले. पश्चिमचे समांतर विचारधन आपल्या पदरी जोडले. यामुळे स्वावलंबन, स्वमताचा आग्रह, आत्मसन्मान हेही तिच्या ठायी होते. यातून त्याग, तपश्चर्या, समर्पण, सर्वधर्मसमभाव यासारखी मूल्ये तिच्या ठायी उत्क्रांत होत गेली.

कस्तुरबाच्या जीवनातील एक पर्व पूर्ण होत होते. दक्षिण आफ्रिकेत केवळ चळवळींचाच नव्हे तर थेट तुरुंगवासाचाही अनुभव तिने झेलला होता. या पंधरा वर्षात मातृभूमीच्या सेवेचा साक्षात्कार तिला झाला होता. गांधीजींना आत्मनिरीक्षण, आत्मपरीक्षण आणि आत्मशोधन करताना जवळून पाहिले होते. सत्याग्रह रत्नाची झळाळी अनुभवली होती. भारतातील सात लाख खेड्यांमधील विस्तारित कर्मक्षेत्राचा परिचय करुन घेण्यासाठी तिची धडपड होती. नारी शक्तिच्या जागरणाचा नेमका प्रत्यय तिला आला होता. व्रतस्थ जीवनाच्या अनुभवाला पाव शतक लोटले होते. सत्याच्या शोधासाठी तिने चित्तशुध्दीचा ध्यास घेतला होता. दक्षिण आफ्रिकेतला काळ तिचा साधनाकाळ होता. मायभूमीत या साधनेला विविध धुमारे फुटले होते. सभा-संमेलनांमध्ये ती अग्रस्थानी होती. ती वृत्तपत्रांमधून संदेश देऊन महिला जागरणाचे विविध प्रयोग करत होती. सूतकताईच्या माध्यमातून सूत्र यज्ञाचे प्रवर्तन तिने केले होते. देशापुढे एकापेक्षा एक अशा नव-नव्या जाणिवा प्रगल्भतेने प्रकट होत होत्या. देशाची एका नव्या वाटेवरची प्रगती तिच्या सूक्ष्म नजरेतून सुटली नव्हती. त्याग आणि बलिदान हे काही बोलायचे विषय नव्हते. ते आचरणातून प्रकट करायचे दिव्य आहे. याचा अनुभव तिने अनेकदा घेतला होता.

कस्तुरबापाशी धैर्य होतेच. ते आता परिपक्व होत चालले होते. दक्षिण आफ्रिकेतील नियम आणि प्रतिज्ञांना एक अंगभूत पीळ होता. आता ती व्रते साधनेत उत्क्रांत होत होती. हा बदल ती काळजीपूर्वक समजून घेत होती. सत्याच्या शोधयात्रेचा मथितार्थ तिने अंतरात्म्याचा आवाज असे जाणले होते. कौटुंबिक पातळीवर मुलांची लग्ने झाली होती. थोरल्या सूनेचे निधन तिला झेलावे लागले होते. तिच्या वैयक्तिक जीवनातली ही फार मोठी हानी होती. वानप्रस्थाला तपश्चर्या आणि वैराग्याची झालर लाभली होती. सत्याग्रहाच्या सोळा कलांच्या विकसनाचा हा काळ होता. कधीकाळी 'तंत्र' वाटणारे हे रसायन आता तिला 'तत्त्व' वाटू लागले होते. तंत्राच्या तुलनेने तत्त्वाची व्यापकता आणि सर्वंकषता अधिक असते, हे तिच्या लक्षात आले होते. आता सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे प्रतीक बनले होते. लोभ आणि भय या तत्त्वांच्या ऐवजी तप आणि प्रेमधर्माचा विकास झाला होता.

कस्तुरबा ना कधी उदास झाली ना कधी तिच्यावर दाब पडला. तिने नाना आपदांचा निकराने सामना केला. विपत्ती आल्यात. ती डगमगली नाही. दीर्घ काळचा विरह वियोग झेलला. प्रियजनांची मरणे बघितली. पेटती सरणे बघितली. ती दृढ राहिली. कधी तक्रार नाही. कधी तडजोड नाही.

गांधीजींनी अनेक उपवास केलेत. कस्तुरबा सोबत असायची. तन्मयतेने सेवा करायची. कधी गांधीजी जीवन-मरणाच्या सीमेवर असत. कस्तुरबा विव्हळ होत नसायची. मन कठोर करायची. झटून सेवाकार्य करायची. सेवा सुश्रूषेत पार बुडून जायची. मनाच्या अशा ताण-तणावांवर विजय संपादन करणे सोपे नव्हते. यासाठी अपार शौर्याची गरज असते. कस्तुरबाच्या ठायी हे शौर्य ठासून भरलेले होते. कस्तुरबा आपल्या जेलच्या

साथीदारांना सांगायची' तसा काही त्रास तर होणार नाही. तिथे महादेव आहे. सरदार तिथे आहे. आणि हो, सरोजिनी आहेत. पण मी जर असते तर काही फरक पडेल ना. या वाक्यातल्या 'मी जर असते' या पूर्वार्ध्दात आणि 'फरक पडेल ना' या उत्तरार्ध्दात अनुक्रमे कस्तुरबाची आत्मीयता आणि कर्तव्यपरायणता दिसून येते.

कस्तुरबा मानवतेची सगुण-साकार मूर्ती होती. तिच्या उपस्थितीमुळे आश्रमजीवन मधुर, खळाळते आणि सुप्रसन्न असायचे. गांधीजींचे जीवन तर तपाचरणाचे होते. तरी या तपातून ते ना उग्र बनले ना शुष्क. यात कस्तुरबाचा मोठा वाटा होता. तिच्याजवळ नम्रता होती. कठोर कर्तव्यपरायणता होती. प्रखर निष्ठा व मनोबल होते. सहनशीलता होती. या गुणांपुढे गांधीजी विनम्र होत. तिच्या ध्येयनिष्ठेमुळे गांधीजी कठोर पिता व वत्सल माता होते. कस्तुरबा संपूर्ण आश्रमाची तर 'बा' म्हणजे आई होतीच. ती राष्ट्रमाताही बनली. गांधीजी तप्त मार्तंडासारखे दाहक होते. कस्तुरबा सावलीचा ढग बनायची. ताप स्वत: झेलायची. लेकरांवर छाया करायची.

कस्तुरबा भारतात किमान पाच-एकदा तरी कैदेत गेली. कधी एकट्या गांधीजीना अटक व्हायची. कस्तुरबाला अटक नसायची. अशावेळी ती उदास चिंतित होऊन जायची. विरह आणि चिंता मागे सारायची. नवऱ्याला प्रिय वाटणाऱ्या कामांमध्ये तल्लीन व्हायची. गांधीजींच्या सार्वजनिक उपक्रमात, सत्याग्रहात आणि चळवळीत सक्रिय व्हायची. ती विचारांचा प्रचार करायची. ग्रामोत्थानकारी उपक्रमांना गती द्यायची.

दक्षिण आफ्रिकेपासून तर भारतात येईपर्यंतचा कस्तुरबाचा काळ हा वाढत्या चंद्रकलांप्रमाणे दिसतो. गांधीजी तुरुंगात असायचेत आणि कस्तुरबा आघाडीवर सक्रिय व्हायच्यात. दांडी यात्रेत हिंसक आक्रमण झाले. सर्वत्र दंडुकेशाहीचा वरवंटा निर्दयपणे फिरत होता. कस्तुरबा विचलित झाली नाही. तिने नारी शक्तिचा जागर केला. महिलांना संगठित केले. आश्रमातील महिलांना धैर्य दिले. घरा-घरात राहणाऱ्या महिलांना जागरणाचा महामंत्र दिला. चळवळीतील महिलांचा सहभाग वाढता राहिला होता. सरकारवर दबाव वाढवला जात होता. यासाठी कस्तुरबाने अपार परिश्रम घेतले. गावागावात हिंडून महिला शक्तीला जागृतीचे वळण लावले. असहकार लढ्याला गती दिली. नारीशक्ती पुढे आली. यात मोठे यश लाभले. या यशात कस्तुरबाचा वाटा निश्चितपणे सिंहाचा आहे. भारतीय महिलांच्या मनात कस्तुरबाचा प्रभाव विशिष्ट असल्याचा बोध गांधीजींनाही झाला. उभ्या राष्ट्राला झाला. क्रुर मग्रुर ब्रिटिश सल्तनतीलाही झाला.

कस्तुरबा आपल्या जगावेगळ्या विलक्षण पतीच्या सेवेतच आकंठ बुडाली होती. त्यातच तृप्त होती. नवऱ्याची प्रत्येक कांक्षा तिची बनली. ती पातिव्रत्य धर्माचे पालन करायची. याला एक भौतिक संदर्भ होता. परमार्थाची सुरेख डूबही होती. आत्मविलोपन करुन तिने आध्यात्मिक भूमिका संपादित केली होती. या उद्दिष्टाला साकार करत असताना तिने नाना आघात झेलले. अपार त्यागाचा परिचय दिला. गांधीजींच्या प्रखर तपाचा ताप असह्य होता. आपल्या अद्वितीय प्रीती, सहनशीलता आणि धैर्याच्या बळावर तिने पतीच्या तपाचरणाला अंगिकारले होते. विसाव्या शतकातला हा अभिनव पातिव्रत-धर्म होता. तिचा गृहस्थधर्म सुंदर, सुदृढ आणि सुशोभित ठरला. परिस्थिती कुठलीही असो, आव्हान कसेही असो, तिने संपूर्ण सहकार्य दिले. स्वत:ला नवऱ्यात समर्पित करुन टाकले. या समर्पणामुळेच गांधीजींची सत्य साधना फळाला आली.

गांधीजी बॅरिस्टर होते. कस्तुरला पुस्तकी ज्ञान नव्हते. नवऱ्याला अनेक भाषा अवगत होत्या. तिला केवळ प्रेमाची भाषा येत असे. नवरा सभा-समारंभात जायचा. ती बायकांमध्ये रमायची. ते कोर्ट-कचेरी गाजवायचे. ती बायकांची सुख-दु:खे ऐकायची. त्यांनी सत्याग्रह केला. तिनेही सत्याग्रह केला. ते तुरुंगात गेले. तीही तुरुंगात गेली. ते स्पष्टपणे रागावले. तिने मनातले कढ मनात दाबून ठेवले नाहीत. त्यांना मौन पाळायची आवड होती. जेव्हा बोलायचे असेल तेव्हा तिने मौन बाळगले नाही. ती स्वतंत्र होती. स्वयंभू होती. तिने न मळलेली वाट


निवडली. काट्या-कुट्यांमधून चालताना कुरकुर केली नाही. अचूक आणि नेमके निवडले. एकदा घेतलेल्या निर्णयाला व्रतात बदलवून टाकले. नवऱ्याला अहिंसेचा पाठ शिकवला. या पाठाची ती श्रेयाधिकारिणी आहे. तिला अपरंपार सोसता आले. किंबहुना सोसता येणे हे तिचे सर्वात मोठे बलस्थान आहे. तिचे मौन अधिक मुखर आहे. अर्थवान आहे. संदर्भयुक्त आहे. ती नित्य परिवर्तनशील आहे. वडाच्या झाडाखाली कोणी वाढत नाही असे म्हटले जाते, हे खरे असेलही! ती वडाच्या पारंब्या बनून जगली. तिने वडाला बळ पुरवले.

भूमी आणि स्त्री या दोघींच्या ठायी विष शोषून घेण्याचे सामर्थ्य असते. कस्तुरने गांधीजींचे सारे विष शोषून घेतले. तिला नीलकंठाचे तेज लाभले. तिच्या मस्तकी गंगा शोभली. चंद्र विलसला. ती अपराजित व्यक्तिमत्वाची मालकीण होती.

OOO

चौथा खंड

# अथर्ववद



## चौथा खंड अथर्ववद १९३१ ते १९४४ हा तेरा वर्षांचा काळ

थर्व म्हणजे कुटिलता. अथर्व म्हणजे अकुटिलता. अकुटिल कस्तुरच्या जीवन कथेतील धगधगते पर्व. आयुष्याच्या संध्याकाळी कस्तुरबाने अनुभवलेले जीवनधन वितरित करण्याचा प्रसंग यात आहे. यात 'करेंगे या मरेंगे' या महामंत्रातील 'करेंगे' आणि 'मरेंगे' यांचे एकाच वेळी मनोज्ञ दर्शन घडते.

***अभयं नः करत्यंतरिक्षम् अभयं<br>द्यावापृथिवी उभे इमे<br>अभयं पश्चाद अभयं पुरस्तात् उत्तराद्-<br>अधरात् अभयं नो अस्तु अभयं<br>मित्राद् अभयं अमित्रात् अभयं ज्ञाताद्<br>अभयं पुरो यः अभयं नक्तं अभयं<br>दिवा नः सर्वा आशा मम मित्रं भवन्तु<br>(अथर्ववेद १९ / १५ / ५ )***

पृथ्वी, अंतरीक्ष आणि द्युलोक आम्हाला निर्भयता प्रदान करो. परमार्थाच्या प्रवासात आम्ही प्रगतीशील राहो वा प्रसंगविशेषी पीछेहाटही होवो, आम्ही ऊर्ध्वमुखी असो. आमची पीछेहाट होत असतानाही आमची निर्भय वृत्ती कायम राहो. आम्हाला मित्र वा

अमित्राकडूनही अभय लाभो. विगत गोष्टींचे ज्ञान वा चुकून घडलेल्या गोष्टींचे अज्ञान आम्हाला भयभीत न करोत. निवृत्तीची रात्र असो वा प्रवृत्तीचा दिवस आम्हाला भयकारी न वाटोत. सर्वांच्या सामुदायिक इच्छाशक्ती आम्हाला सहाय्य करोत.

### १) हृद्य पत्र-व्यवहार

मिठाच्या सत्याग्रहाचा लढा पूर्ण झाला होता. गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी निघाले होते. २८ डिसेंबर १९३१ रोजी परतले. कस्तुरबा या दरम्यान कृतिशील होती. एकदा ती वेडछी आश्रमात आली होती. श्री चुनीभाई मेहता आश्रमाचे व्यवस्थापक होते. त्यांनी कस्तुरबाच्या विश्रांतीसाठी बाजेची व्यवस्था केली. कस्तुरबा बाजेवर बसेल. सभा सुरु व्हायच्या वेळी सभेत जाईल. कस्तुरबा आली. तिचे स्वागत करत चुनीभाई म्हणाले 'आपण या बाजेवर बसा.' ती कसली ऐकते? ती सरळ स्वयंपाकघरात गेली. तिथे जाऊन स्वयंपाकाच्या कामात हातभार लाऊ लागली.

हे बघून चुनीभाईंच्या पत्नी सूरजताई पुढे आल्या. त्यांना वाटले की एवढ्या मोठ्या कस्तुरबा त्यांना स्वयंपाक कामात मदत करताहेत. हे तर अतीच होत आहे. त्या म्हणाल्या -

'बा राहू द्या हो तुम्ही. आम्ही साऱ्या जणी मिळून आता स्वयंपाकाचे काम पूर्ण करु. तुम्ही शांतपणे बाहेर खाटेवर बसून विश्रांती घ्या.' सूरजताई अजीजीने म्हणाल्या. कस्तुरबा कसली ऐकणार? ती सरळ भावनेने म्हणाली.

'काम करणारे हात सुंदर असतात. आपण आधी स्वयंपाकाचे काम हातावेगळे करु. साऱ्या मिळूनच सभेत जाऊन बसू.' असे कस्तुरबा म्हणाली. तिचे बोलणे निश्चयी होते. तिने तसेच केले.

२९ ऑगस्ट १९३१. 'एस्. एस्. राजपुताना' जहाजाद्वारे गांधीजी इंग्लंडकडे रवाना झाले. १२ नोव्हेंबर १९३०. पहिल्या गोलमेज परिषदेला आरंभ झाला. ३१ जानेवारी १९३१. या परिषदेचा समारोप झाला. ही परिषद खरे तर भारत व इंग्लंड मधला बुध्दीबळाचा खेळ होता. हा खेळ तीन महिने चालला होता. गोलमेज परिषद होती इंग्लंडमध्ये. तीन महिने गांधीजी तिथे होते. त्यांच्या सोबत सचिव महादेवभाई आहेत. मुलगा देवदास आहे. परिषदेत गांधीजींना अपयश आले. त्यांचा प्रभाव इंग्रज प्रजेच्या सामुदायिक चित्तावर मात्र उत्तम पडला. हे त्यांच्या जीवनातील उत्तुंग यश आहे. २६ डिसेंबर १९३१. गोलमेज परिषद आटोपून ते परतले. ब्रिंदिसीहून 'पिल्साना' बोटीने ते निघाले होते.

गांधीजींच्या स्वागतासाठी कस्तुरबा निघाली. सर्वश्री राजगोपालाचारी आणि वल्लभभाई पटेल सोबत होते. त्यांनी बोटीवर गांधीजींची भेट घेतली. नेहरू व खान बंधूंना अटक झाल्याची बातमी दिली. ही व्हॉइसरॉयकडून मिळालेली ख्रिसमसची भेट असल्याचे गांधीजी म्हणाले.

गांधीजी परतले. त्यांनी राजगोपालाचारी आणि कस्तुरबाशी चर्चा-मसलत केली. ते प्राणजीवन मेहतांच्या नातलगांच्या 'मणी भवन' येथे वास्तव्याला होते. ४ जानेवारी १९३१. गांधीजींना 'मणी भवन' येथून पहाटे तीन वाजता अटक करण्यात आली. देवदासनेच आपल्या पित्याला उठवले. सरदार पटेलांना अटक झाली. इतरांवरही पाठोपाठ अटकेचा बडगा उगारण्यात आला होता. कार्यकारी समितीचे सभासद सुटले नाहीत. प्रत्येक शहरातले पुढारीही तुरुंगात डांबले गेलेत. यात शहरातील पुढाऱ्यांचाही समावेश होता.

कस्तुरबाने गांधीजींना निरोप दिला. त्यांची इंग्लंडवारी झाली होती. ते कस्तुरबापासून चार महिने लांब होते. परतायला आठवडाही लोटला नव्हता. त्यांना अटक झाली होती. त्यांची ताटातुट होणार होती. कस्तुरबाच्या डोळ्यात पाणी आले. 'कोणत्याही मार्गाने मी जर तुम्हाला दुखावले असेल तर कृपा करुन मला क्षमा करा.' असे ती म्हणाली.

गांधी तुरुंगात गेले. एकदा आपले सहकारी पटेल आणि महादेवभाईंशी बोलत होते. त्यांना कस्तुरबाच्या वाक्याची आठवण आली. 'या जन्मात आता परत आपली भेट होणार नाही, अशी भीती कस्तुरबाला वाटत असावी.' गांधीजी सहकाऱ्यांना म्हणाले होते.

कस्तुरबाचा निरोप घेऊन गांधीजी आणि देवदास पोलिसांच्या गाडीकडे निघाले.

त्यांना येरवडा तुरुंगात नेण्यात आले. या प्रसंगाचे वर्णन श्री एरियर एल्विन करतात की गांधीजींच्या अटकेची तयारी सुरु होती. ते निरोपासाठी उभे ठाकले होते. ते अनोखे दृश्य होते. दाराशी पोलीस होते. मीराताई व देवदासभाई सामान इकडून तिकडे वहात होते. गांधीजींच्या भोवती मित्रांचे कडे होते. त्यांच्यातल्या अनेकांचे डोळे ओले झाले होते. श्रीमती गांधींचे अश्रु गालांवरुन खाली ओघळत होते. त्या विचारत होत्या 'आपण मला आपल्या सोबत नाही का हो नेऊ शकत?'[१]

गांधीजींनी नारणदास गांधींना पत्र लिहिले की तुरुंगात सूत कातले आहे. श्री स्वामी यांच्याकडून जर ते त्यांच्याप्रत पोहोचले नसेल तर ते मागवून घ्यावे. अखिल भारतीय चरखा संघ आणि गोसेवा संघाला हवे तेवढे सूत पाठवून द्यावे. उरलेल्या सूतातून बा साठी साडी तयार करुन घ्यावी.[२]

गांधीजी तुरुंगात आहेत. कस्तुरबासाठी सूत कातून पाठवताहेत. या सूतातून कस्तुरबाने साडी तयार करावी अशी इच्छा व्यक्त करताहेत. हे त्यांच्या विरागी दांपत्य जीवनाचे मनोरम इंद्रधनुष्य आहे.

कस्तुरबा भारतीय नारी होती. नवऱ्याने अद्भुत प्रयोग केलेत. याविषयीची तिची भूमिका स्पष्ट होती. विस्मय, विरोध, संमती आणि श्रध्दा असा तो प्रवास आहे. योग्य समज जागली. सहभागितेचा स्वर उपजला. सहज मनमुक्त स्वीकार केला गेला. कस्तुरबाची चारही लेकरे स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाली होती. पित्याच्या रंगी रंगली होती. पित्याच्या मिशनमध्ये त्यांनी सहभाग नोंदवला होता. तीन पुतण्यांपैकी एक मगनलाल. गांधीजी तर त्याला आश्रमाचे प्राण म्हणत. दुसरा पुतण्या छगनलाल. त्याने 'इंडियन ओपिनियन' ची जबाबदारी पत्करली. तिसरा जमनादास दक्षिण आफ्रिकेत काहीसा उशीरा पोहोचला. सत्याग्रह रंगी रंगून गेला. इकडे कस्तुरबा अटकेत होती. २६ जानेवारी १९३१ रोजी सकाळी तिची सुटका झाली.

कस्तुरबा आजारी होती. तिचे खूप आजारपण गांधीजींनी अनुभवले होते. दक्षिण आफ्रिकेत भरपूर सेवाही केली होती. या सेवेकामी त्यांचा नवरेपणा विरघळून गेला होता. एक सहकारी उभा ठाकला होता. त्यांच्या मनात कस्तुरबाच्या तब्येतीची काळजी होती. ती वेगवेगळ्या पत्रांमधून ओसंडून वहाताना दिसते.

गांधीजींनी श्री नारणदास गांधी यांना लिहिले की कस्तुरबासाठी वैद्याचे औषध सुरु आहे. त्याने तिला काही विशेष फायदा झाल्याचे दिसत नाही. तिला तर पाणी व सोड्याने फायदा होत आहे., असे वाटते. कस्तुरबाचे तर असे म्हणणे आहे. की औषधाने कफ मोकळा होत नाही. तो छातीत गोळा होऊन रहातो.[३] या पत्रातली गाधीजींची काळजी स्पष्टपणे वाचता येते.

श्री नानाभाईंना लिहितात की कस्तुरबाची अवस्था सध्या हिंडण्या-फिरण्यासारखी नाही. तिच्या चेहऱ्यावर अधून-मधून सूज दिसून येते.[४]

श्री नारणदास गांधींना लिहितात की ते ज्या घरात रहात होते ते घर आणि कस्तुरबाच्या खोलीचाही (अजून जर ती उपयोगात घेतली गेली नसेल तर) आता उपयोग करुन घ्यावा. याविषयी कस्तुरबाशी चर्चा केली आहे. ती सहमत असून तिला हा प्रस्ताव आवडला आहे.[५]

श्री पोलाक दक्षिण आफ्रिकेच्या लढ्यात गांधीजींचे निकटतम सहकारी होते. त्यांच्या पत्राला उत्तर देताना गांधीजी लिहितात की बा आता म्हातारी झाली आहे. काहीबाबतीत तर ती त्यांच्यापेक्षाही वृध्द वाटते. आध्यात्मिक दृष्ट्या तिने खूप प्रगती साधली आहे.[६]

गांधीजींच्या मते शरीराचे आणि आत्म्याचे वय वेगवेगळे असते. त्याचा हा पुरावा आहे. वाढत्या वयासोबत आध्यात्मिक अधिकार वाढतोच असे नाही. कस्तुरबाचा आध्यात्मिक अधिकार मात्र वाढला होता. हा अभिप्राय खुद्द गांधीजींचाच आहे.

या पत्रांमधून गांधीजींची काळजी व्यक्त झाली आहे. ती आंतरिक स्वरुपाची आहे. यात ते कस्तुरबाच्या शारीरिक वयाचा विचार करतात. आध्यात्मिक वयाची मांडणी करतात. तिने खूप प्रगती साधली असल्याचे सांगतात.

यातून उभयतांच्या नातेसंबंधांवर प्रकाश पडतो. हा संबंध वैशिष्ट्यपूर्ण आहे. गांधीजींचे आयुष्य संयम

आणि त्यागावर बहरलेले आहे. हा साधना काळ आहे. या काळात त्यांनी आपल्या आहारातून आंबे वगळले नव्हते. ते एक प्रयोग करत होते. त्यात ताज्या फळांची गरज होती. या दरम्यान एकदा श्री नारणदास गांधींना लिहिलेल्या पत्रातून ते लिहितात. आंब्याचे सेवन करुन आजारी पडण्याविषयीचे कस्तुरबाचे उत्तर योग्य नाही.[७]

पुढील एका पत्रातून लिहिले आहे. हा त्यांचा संयम काळ आहे. यात आंबे खाऊन आजारी पडण्यासंबंधीच्या कस्तुरबाच्या उत्तराशी ते सहमत नाहीत. ते म्हणतात "अशा समयी आंबे खाऊ नयेत हा कस्तुरबाचा दृष्टिकोण आहे. तो तिच्या दृष्टीने बरोबरच आहे. ती मनातल्या मनात माझ्याविषयी अशीच इच्छा बाळगते. अर्थात् उभयतांचा दृष्टिकोण सारखाच असावा असे तिला वाटते. या विचाराच्या पाठीमागे तिचा माझ्याविषयीचा प्रेमभाव आहे. मी ज्या ज्या वेळी संयमाचे पालन करायचे ठरवले होते त्या त्या वेळी कस्तुरबानेही त्या संयमाचा स्वाद चाखला आहे. आधी माझ्या संयमाच्या संकल्पामुळे ती गोंधळून जायची. हळूहळू ती संयमाचे मूल्य समजू लागली होती."[८]

गांधीजींनी कस्तुरबानाही संयमाची दीक्षा दिली आहे. अस्वाद व्रताच्या संदर्भात त्या उभयतांमधील जुगलबंदीच्या अनेक घटना कार्यकर्त्यांना ज्ञात आहेत. त्यापैकी एका घटनेचा हा गोषवारा आहे.

गांधीजींनी तुरुंग अधिकाऱ्यांना पत्र लिहिले होते.

'माझ्या पत्नीचीही तक्रार आहे. की तिला माझी पत्रे मिळत नाहीत. तिला इंग्रजी येत नाही. तिने मला आणि मी तिला लिहिलेल्या आमच्या पत्रांचे कायच होत असेल? हे काही मला कळत नाही.'[९]

१९३२ साल उजाडले. आरंभिक सहा-सात महिन्यांचा काळ राजकीय धामधूमीचा होता. या काळात अहिंसक चळवळीची शक्ती उत्तरोत्तर अधिकाधिक प्रकट होत गेली होती. १९३०-३१ साली तुरुंगात जाणाऱ्या सत्याग्रहींची संख्या साठ हजारांची होती. ती १९३२ साली नव्वद हजारांपर्यंत पोहोचली होती. कमालीचे त्रासदायक, यातनाग्रस्त आणि छळ छावणीसारखे तुरुंग होते. तरीही इथे अहिंसक प्रशिक्षण देणारी केंद्रे होती. तुरुंगात वर्ग, शिबीरे, स्वाध्याय वर्ग नियमित सुरु होते. कित्येक तुरुंगांमध्ये तर विद्यापीठासारखे वातावरण होते.

संदर्भ

१) ट्राइबल वर्ल्ड ऑफ एरियर एल्विन : वेरियर वेल्विन दिनांक ४ जानेवारी १९३२ रोजी झालेल्या अटकेचे वर्णन पृष्ठ ६५ ते ६८ आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ४९ परिशिष्ट १ पृष्ठ ५१५;

२) गांधीजींनी श्री नारणदास गांधी यांना दिनांक १६ फेब्रुवारी १९३१ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ४५ पृष्ठ १८५;

३) बारडोलीहून दिनांक ३१ मे १९३१ रोजी श्री नारणदास गांधींना लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ४६ पृष्ठ २८८;

४) बारडोलीहून श्री नानाभाई मश्रुवाला यांना ६ जून १९३१ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ४६ पृष्ठ ३५८;

५) बोरसदहून श्री नारणदास गांधींना मौनवारी दिनांक १५ जून १९३१ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ४६ पृष्ठ ४११;

६) गांधीजींनी श्री एच्. ए. एल्. पोलाक यांना दिनांक ८ जून १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ५० पृष्ठ १८;

७) श्री नारणदास गांधी यांना दिनांक १६ / १९ जून १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ५० पृष्ठ ६८;

८) गांधीजींनी श्री नारणदास गांधी यांना दिनांक १६ / १९ जून १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ५० पृष्ठ ६८;

९) गांधीजींनी श्री ई. ई. डायल यांना दिनांक २४ जुलै १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्मय खंड ५० पृष्ठ २८५;

❖❖❖

## २) साबरमतीच्या मध्यवर्ती तुरुंगात

१९३२ साली गांधीजी तुरुंगात होते. कस्तुरबालाही अटक झाली होती. हे वृत्त त्यांना वृत्तपत्रांवरुन कळले होते. काही आठवड्यांपूर्वी त्यांना सोडून देण्यात आले होते. परत अटक झाली होती. सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा झाली होती. कस्तुरबा साबरमती तुरुंगात होती. तिला 'सी' क्लास मिळाला होता. तुरुंगातल्या नव्वद टक्के सत्याग्रहींना 'सी'क्लास दिला गेला होता. खरे तर यासाठी कैद्यांचे शिक्षण, पद, संपत्ती या गोष्टींचा विचार केला जातो. मग हा क्लास म्हणजे वर्ग ठरवला जातो. असा साधारण नियम आहे. गरोदर, तान्ह्या बाळासोबतच्या माता, रुग्ण वा वृध्दांचाही विचार यासाठी केला जातो. यांनाही वरचा वर्ग देण्याची वा साधी कैद सुनावण्याची गरज असते. तसे या प्रसंगी घडले नाही. न्यायाधिशामध्ये एवढी माणूसकी दिसून आली नाही. हे कळल्यावर गांधीजींची पहिली प्रतिक्रिया अधिक गर्वोन्नत होती. त्यांचा अत्यंत नजिकचा सत्याग्रही कसोटीवर चढला होता. क्षणभरातच गर्वाचा भर ओसरला. वैयक्तिक प्रेम प्रकटले. मानवीय प्रतिक्रिया जागली. गांधीजी म्हणाले 'साठ वर्षे वयाच्या वृध्देला सक्तमजूरी ठोठावताना त्यांना लाज कशी वाटली नाही?' गांधीजी चिंताग्रस्त होते. त्यांची पत्रे वेळेवर पोहोचू दिली गेली नाहीत[१]

१९३१ ते १९३३ या काळात कस्तुरबाला तीनदा तुरुंगात जावे लागले होते. तुरुंगात ती 'रामायण' व 'श्रीमद्भागवत' ऐकायची. शंका विचारायची. मते मांडायची. तिला दीड महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली होती. इतरांना साडे तीन महिन्यांची शिक्षा होती. तीही सश्रम कारावासाची. शंभर रुपए दंड. दंड न भरल्यास परत दोन महिन्यांची अधिक शिक्षा. सर्वांनी शांत चित्ताने शिक्षा ऐकून घेतली.

कस्तुरबाने मॅजिस्ट्रेटला ठणकावून विचारले. "आमच्या शिक्षेत असा भेदभाव कशासाठी? मला कमी शिक्षा का? पुन्हा बाहेर पडून माझ्या देशबांधवांना लाठीमार झेलण्यासाठी सज्ज रहाण्याचा मी आदेश द्यावा यासाठी का ही कमी शिक्षा? माझ्या लेकींना कैदेत खितपत ठेऊन कैदेबाहेर पाऊल टाकायला मला आवडणार नाही. ती आणि तेवढीच शिक्षा मला नाही का देता येणार?"

हे ऐकून मॅजिस्ट्रेट चक्रावून गेला होता. असे करण्यात आपली अक्षमता असल्याचे त्याने विनयाने सांगितले. सारे जण साबरमती तुरुंगात होते. कस्तुरबा तिथे भरपूर काम करायची. खूप वाचायची. 'जामे जमशेद' वृत्तपत्र वाचायला मिळायचे. १८ जानेवारीला रामदासला सुरतेत अटक झाल्याची बातमी तिला कळली. आपला मुलगा तुरुंगात गेला या बातमीने तिचा अंतरात्मा अपरंपार सुखावला. २९ फेब्रुवारीला तिची सुटका झाली. बाहेर पडताच बारडोलीतील तारुण्याने सळसळणाऱ्या युवकांची तिने भेट घेतली. येरवड्याला जाऊन गांधीजींची भेट घेतली. देवदासला सहा महिन्यांची शिक्षा झाली होती. तो गोरखपुरच्या तुरुंगात होता. टायफॉईडने गंभीर आजारी होता.

गांधीजींनी १४ मार्च १९३२ रोजी कस्तुरबाला लिहिले. कित्येक दिवसांपासून त्यांच्या मनात लिहू की लिहू नको असा भाव येत होता. कस्तुरबा तुरुंगात नसल्यामुळे सदरचे पत्र लिहिले आहे. यातून केवळ खबर दिली गेली आहे.

गांधीजींनी प्रेमाताई कंटक यांना लिहिले की बांच्याविषयी त्यांना जे प्रेम वाटते ते ईशप्रेमात सामावलेले आहे. ते विषयी असताना ईशप्रेमविरोधी होते. त्यामुळे ते त्याज्य होते.[२]

कस्तुरबाचे जीवन चरित्र जाणून घेण्यासाठी या काळातला हा पत्र-व्यवहार फार मोलाचा आहे. हे एक महत्वाचे ऐतिहासिक साधन आहे. श्री एच्. एस्. पोलाक हे दक्षिण आफ्रिकेतल्या सत्याग्रही संघर्षात गांधीजींचे सहयोगी होते. श्री पोलाक यांनी पत्र लिहिले. लंडनच्या वृत्तपत्रांमधून एक रिपोर्ट आला आहे. रिपोर्ट असा आहे. की चरख्याचा वेग मंद आहे. यामुळे गांधीजींचा मोहभंग झाला आहे. त्यांनी शिवणयंत्र पत्करले आहे. पोलाकचा या रिपोर्टवर मुळीच विश्वास नव्हता. त्यांनी लवकरात लवकर या रिपोर्टचे खंडन केले जाणे गरजेचे आहे. अशी इच्छा प्रकट केली.[३] या रिपोर्टला अर्थात्च गांधीजी नाकारतात. चुकीचे खंडन करतात.

अस्पृश्यतेच्या प्रश्नाच्या संदर्भात गांधीजींनी श्री मथुरादास त्रिकमजी यांना कळवले होते की

अस्पृश्यतेच्या प्रश्नावर जर त्यांनी कस्तुरबाला घटस्फोट दिला असता तर आज जी सुंदर स्थिती आहे. ती तशी नसती ना? कस्तुरबा कुठे पडून असत्या आणि मी कुणाशी विवाह करुन बसलो असतो हे कोण सांगू शकेल?[४] गांधीजी असे म्हणत असत की त्यांचा अस्पृश्यतेशी विवाह त्यांच्या विवाहापूर्वीच झालेला होता. त्याचा पडताळा या पत्रातून वाचता येतो.

कस्तुरबाचे म्हणणे होते की तिला गांधीजींची पत्रे पोहोचत नाहीत. याचे स्पष्टीकरण देताना गांधीजी लिहितात.

"प्रिय कस्तुर,

तुझी पत्रे मला व माझी तुला का मिळत नाहीत? याविषयी कुणीही काहीही सांगू शकत नाही. यामुळे मी तुला सध्या पत्रे नाही लिहिलीत. तुला पत्र पोहोचेल हेच निश्चित नसेल तर तुला पत्र लिहायला मला कसे आवडेल? तुझे समाचार कळत असतात. तू थकल्यासारखी वाटतेस असे कळले. असे का? अन्न धडपणे पचत नाही का? कळव.

आम्ही इकडे सारे मजेत आहोत. मी सध्या दूध घेत आहे., हे तुला कळले असावे. काही खास असे कारण नव्हते बघ, पण इथल्या सुपरिंटेंडेंटच्या आग्रहामुळे मी दूध प्यायला लागलो आहे. तसे मी भाजी-पोळीही खातो. सध्या माझ्या पत्राबाबत खूप अनिश्चितता आहे. त्यामुळे या पत्राचे नेमके कायच होईल मला काही सांगता येत नाही. देवदास परत आजारी आहे. पण तू काही काळजी करु नकोस. भगिनींना आशीर्वाद."[५]

उभयताना एकमेकांची पत्रे मिळत नाही. याचे कारण कुणी सांगू शकत नाही. यामुळे पत्रे लिहिली गेली नाहीत. कस्तुरबाला पत्र पोहोचण्याची काही शक्यता वा खात्री नव्हती. तर त्यांना पत्र लिहायला कसे बरे आवडले असते? पण या सोबतच ते समाधानाचे बोल कळवतात. कस्तुरबा विषयीचे समाचार मात्र त्यांना अवश्य कळत असतात. कस्तुरबाची शक्ती क्षीण होत चालली असल्याचे निर्मलाच्या (रामदासच्या पत्नी) पत्रातून त्यांना कळले होते. शक्ती क्षीण का होत असावी? या विषयी काळजी करत ते विचारतात. अन्न पचन होते की नाही? आपण व्यवस्थित असल्याचे कळवतात. आपण दूधाचे सेवन करत असल्याचे लिहितात. सुपरिंटेंडेंटच्या आग्रहावरुन ते दूध घेऊ लागलेत हे कळवतात. आपण भाजी-पोळीही खात असल्याचा उल्लेख करतात. आपल्या पत्रांविषयी अनिश्चितता कळवतात. सरदार वल्लभभाईंनी संस्कृत शिकायला सुरुवात केली ही आनंददायक बातमीही देतात. यासोबत देवदासच्या आजाराची बातमी कळवतात. या विषयी चिंता न करण्याचा सल्ला देतात. राजाजी यांच्या जावयाच्या निधनाचे वृत्त कळवतात. तिकडे सांत्वनेचे पत्र लिहिले नसेल तर पाठवायला सांगतात.

कस्तुरबा साबरमतीच्या सेंट्रल तुरुंगात बंदिवान आहे. तिला पत्रातून गांधीजी लिहितात की त्यांचे कुठलेही पत्र न मिळाल्यामुळे कस्तुरबा काळजी करत होती खरी पण त्यांनी तिला या पूर्वीच तीन पत्रे लिहिली आहेत. एक पत्र आश्रमाच्या पत्त्यावर पाठवलेले असून हे क्रमाने पाचवे पत्र आहे. ते लिहितात की दोघे बंदिवान असल्यामुळे उभयतानी एकमेकाना समजून घ्यायला हवे. एकमेकाना पत्रे लिहिण्याची अनुज्ञाच नसती तर त्यांनी काय केले असते? अशा गोष्टींसाठी काळजी करणे व्यर्थ आहे. आपण अगदी व्यवस्थित असल्याचे ते कळवतात. याउलट ते कस्तुरबाचीच काळजी घेताना दिसतात. ते विचारतात की कस्तुरबाना अशक्तपणा वाटतो असे त्यांना कळले आहे. आपल्याला कस्तुरबाचे कुठलेच पत्र पोहोचले नाही हे सांगून विस्तारपूर्वक पत्र लिहायला सांगतात.[६]

या पत्रांमधून गांधीजींच्या अंतरंगाचा परिचय घडतो. कस्तुरबाविषयीच्या त्यांच्या मनाची कोवळीकही कळते. त्यांचे मन जगभरच्या विविध प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधात व्यग्र आहे. तरीही ते कस्तुरबाला अनेक घरगुती गोष्टी कळवतात. पत्नीच्या मनाला आनंद देणाऱ्या विषयांची चर्चा करतात. परिस्थितीची नेमकी जाणीव करुन देतात. समजून सांगतात. पत्नीला समजूनही घेतात. कस्तुरबा अहिंसेची मूर्ती होती. अहिंसेची अशी छाप अन्यत्र विरळ होती. अपार विनय, सरळ स्वभाव, कमालीची निरलसता हे सारे आश्चर्यकारक गुण तिच्या ठायी होते. सर्वात महत्वाचे म्हणजे शौर्य आणि हिंमत होती. काही वेळा ती आपल्या नवऱ्याला दोष द्यायची. स्पष्टपणे सांगायची

"या सरकारबरोबर भांडण उकरुन काढू नका असे मी तुम्हाला सांगितले नव्हते काय? तुम्ही इंग्रजाना भारत सोडून जायला का सांगितलेत? अहो, आपला देश मोठा आहे. आपण सगळे इथे बंधु भावनेने राहू शकतो." कस्तुरबाने गांधीजींना समजाऊन सांगितले.

'होय, तुझे म्हणणे खरे आहे. पण इंग्रजांनी इथे सत्ताधीश म्हणून न रहाता बंधुभावनेने रहावे हे तर खरे ना?' गांधीजींनी समंजसपणाचा सूर लावला. गांधीजींच्या या म्हणण्याशी ती सहमत होती. तिच्या वतीने सरकारला माफी पत्र पाठवावे काय? असे विचारल्यावर ती म्हणाली होती.

'तुमच्या करणीच्या परिणामांना सामोरे जाण्याशिवाय आता दुसरे काय करणार? आम्ही तुमच्या बरोबर त्रास भोगणार आहोत. महादेव तर गेलाच. आता माझी पाळी आहे.' कस्तुरबा उसळली.

गांधीजींनी देवदासला लिहिले 'माझ्याशी ज्यांचे-ज्यांचे संबंध जुळले आहेत. किंवा ज्यांनी ज्यांनी संबंध ठेवले आहेत., त्यांना मोठी किंमत मोजावी लागेल. बाने सगळ्यात मोठी किंमत मोजली आहे. असे म्हणावे लागेल.'[७]

या पत्रातून गांधीजी कस्तुरबाला आपल्या सरकारशी असलेल्या संबंधांविषयी मनमोकळेपणाने लिहितात. तिच्या पत्राची आणि तेही विस्तृत पत्राची वाट बघतात.

कस्तुरबाच्या सुटकेचा समय समीप आला. गांधीजींनी पत्र लिहिले होते.

"आता तर तुझी सुटका होईल पण मला भेटता न आल्याचे तुला दु:ख होईल मला तर हे दु:ख आहेच. तुझ्यासाठीही सवलत मागायचे मन होते. तरी हे शोभणार नाही हे तुलाही पटेल. आपले जीवन त्यागानेच शृंगारलेले आहे. यामुळे शांत रहा. मला सदा लिहित रहा."

'तुझ्यासाठी मुक्त व्हावेसे वाटते' असेही लिहितात 'पण' या एका शब्दाच्या वापराने आपली भूमिका मांडतात की 'पण हे काही शोभादायक नसण्याविषयी' कस्तुरबाही सहमत असेल.[८]

हे पत्र जणू काही खेळातल्या एका भिडूने दुसऱ्या भिडूला लिहिलेले पत्र आहे. एकानेच दोघांचा डाव खेळावा अशी परिस्थिती आहे. यातुन आपण कस्तुरबाचे मनोरम दर्शन घडताना बघतो. यातून कस्तुरबाचे मन वाचून घेतल्याचा गांधीजींचा आत्मविश्वास झळकतो. स्वातंत्र्य यज्ञातील कस्तुरबाच्या सामंजस्याची आणि सहकार्याची नोंदही आढळते. 'मला असे वाटते, तुलाही असेच वाटत असेल ना?' हे वाक्य प्रश्नार्थक वाटत असले तरी होकारार्थी वाक्यच आहे. 'मला भेटता न आल्याचे तुला दु:ख होईल.' या वाक्यासोबतच 'मला तर ते दु:ख आहेच.' असे लिहून जणू काही ते आपल्या वाक्याला रेखांकित करतात. पुढे ते लिहितात 'आपले जीवन त्याग समन्वित आहे.' या वाक्यात ते 'माझे जीवन' ऐवजी 'आपले जीवन' असा बहुवचनी प्रयोग करतात. यात दोघांचाही अनायासे समावेश करतात. हे संक्षिप्त पत्र एकाचवेळी आत्मप्रत्ययी आणि पर मत संवेदनशील आहे. कस्तुरबाच्या गांधीजींशी एकरुप होऊन जाण्याच्या रहस्य कथेचे उद्घाटन करणारे आहे. दोघांच्या अंत:करणाच्या तादात्म्याची कथा सांगणारे आहे. यात ना कस्तुरबाच्या सुटकेचा आनंद ना आपल्या कैदेत असण्याविषयीचा विषाद. हे पत्र संवादाची मागणी करणारे आहे. हे कस्तुरबाच्या प्रेरक, ऊर्जासंपन्न आणि संघर्षशील व्यक्तिमत्वाचा सुभग परिचय करुन देते. तुरुंगाच्या उंचच उंच भिंती असताना मन आणि आत्मा कसा मुक्त आणि नि:संग असतो त्याची ओळख करुन देणारे हे विलक्षण पत्र आहे.

श्री नारणदास गांधींना लिहिलेल्या पत्रातून गांधीजी काळजी व्यक्त करतात की कस्तुरबाचे वजन घटले आहे. ती सोळा पोंड वजन गमावून बसली आहे. या गोष्टीवर विश्वासच बसत नाही. एवढे वजन कमी झाल्यावर ती अगदी अस्थिपंजरच दिसेल अशी शंका व्यक्त करुन त्यांना विचारतात की तू त्यांना बघितले आहे.स? याविषयी थोडे कसून शोध घे. कस्तुरबा किती दूध पिऊ शकेल? आणि काय-काय खाते?[९]

कस्तुरबाचा विषय निघाला. महादेवभाई म्हणाले की बा तर कदाचित आपल्यासोबत उपोषणाला बसतील आणि त्या जर उपवास करतील तर त्यांना कुणीही रोखू शकणार नाही आणि कुणाची काही हरकतही असणार नाही.

गांधीजींचे मौन होते. त्यांनी होकारार्थी मान हलवली. कस्तुरबाचे पत्र आले. यावरुन ती खूप व्याकूळ झाली

असेल हे लक्षात आले. कस्तुरबाने त्वेषात गांधीजींना कटु वचने सुनावलीत.

या काळात गांधीजींचा जो पत्र व्यवहार उपलब्ध आहे. त्यातून कस्तुरबाचे होणारे दर्शन खूपच भावविभोर करणारे आहे. ते श्री नारणदास गांधींना लिहितात की आज बांच्या अटकेच्या वृत्ताने आनंद वाटला. तिला पत्र पोहोचवणे जर शक्य असेल तर पोहोचवा[१०]

हरिजन प्रश्नाच्या संदर्भात गांधीजींचे येरवडा जेलमध्ये उपोषण सुरु झाले. कस्तुरबा त्यावेळी साबरमती जेलमध्ये होती. गांधीजींपासून लांबवर होती. बेचैन होती. सौ. लाभूबेन त्यावेळी तिच्या सोबत जेलमध्ये होती. तिच्या या काळातल्या अवस्थेचे वर्णन करताना सौ. लाभूबेन लिहिते.

"कस्तुरबा सांगतात की आम्ही 'भागवत' वाचतो. 'रामायण-महाभारत' या महाकाव्यांचे पठन करतो. या ग्रंथांमधून कुठे उपवासांची चर्चा येत नाही. गांधीजींची तर गोष्टच वेगळी आहे. ते असेच करतात. आता कसे व्हावे?"

सोबतच्या भगिनी हे निवेदन ऐकत. त्यांना आश्वासन देत. सरकार काहीतरी मार्ग काढेल. गांधीजींपाशी सेवा-चाकरी करणारे बरेच लोक आहेत. यासारख्या गोष्टी सांगून कस्तुरबाला धीर देण्याचा प्रयत्न करीत. कस्तुरबाला मात्र क्षणोक्षणी हाच विचार सतावत रहायचा की आता कायच होत असेल? आता नेमके कायच झाले असेल? आता कायच करावे?"

अशा क्रांतिकारी महिलेला इंग्रज सरकार का मुक्त ठेवील? १९३० ते १९३३ या काळातला अधिकांश काळ कस्तुरबा जवळपास कैदेतच होती. या काळात ती निकोप आणि प्रसन्न होती. ती मूळातच प्रसन्नवदना होती. स्थान काय आणि परिस्थिती काय तिला कुणी उदास-अप्रसन्न करु शकत नव्हते. या कारावास काळातही तिचे मातृत्व बहराला आले होते. कैदेत नव्वदच्या जवळपास भगिनी असत. ती सर्वांना हिंमत द्यायची. मदत करायची. तुरुंगात जगायचा गुरुमंत्र तर ती दक्षिण आफ्रिकेतच शिकली होती. या मंत्राची दीक्षा ती अननुभवी सत्याग्रही भगिनींना द्यायची. तुरुंगात असणाऱ्या भगिनींना कधी एकाकी वाटले नाही. सर्वांनी त्रास झेलला. कुणीही तक्रार केली नाही. सर्वांना तुरुंग दुसरे घर वाटायचे. ती सर्वच भगिनींची काळजी वहायची. आजारपणात पुढे होऊन सेवा करायची. सर्वांना जपायची. सांत्वना द्यायची. सर्वांवर मन:पूर्वक प्रेमवर्षाव करायची. ती मातृरुप होती. आईच होती.

गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले

बा, कित्येक दिवसांपासून लिहू की नको, विचार करत राहिलो, आज वाचले की तू अजून बाहेर आहे.स, (अटक झाली नाही) म्हणून लिहायचे मन झाले. आता तर महादेवही मजसोबत आहे. अर्थात् साथींची संख्या वाढली आहे. आम्ही तिघे (मी, सरदार व महादेव) मजेत आहोत. रामदास भेटून गेला, चांगला होता. तू पत्र देत रहा[११]

या पत्रातला जिव्हाळा आणि आत्मीयता विलक्षण कोवळी आहे.

गांधीजींनी १२ सप्टेंबर १९३२ रोजी चार पत्रे लिहवून घेतलीत. नारणदासभाई, रामदास, देवदास आणि कस्तुरबा यांना ही पत्रे आहेत.

कस्तुरबाला पत्रातून लिहिले - "तुझे पत्र पोहोचले. तू कदाचित माझ्या उपोषणाविषयी ऐकले असेल. यामुळे तू मुळीच घाबरु नकोस. भगिनींना घाबरु देऊ नकोस. मला असा कठीण धर्म पाळायची संधी ईश्वराने दिली याविषयी तर तुला हर्षच व्हायला हवा. या उपोषणाचा अर्थही तू जाणून घेतला असशील. अंत्यज बंधुंविषयी मी केलेली मागणी जर पूर्ण झाली तर मला उपोषण करायचे काही कारण उरणार नाही आणि उपोषण सुरु करण्यात आले असेल तर ते थांबवता येईल पण उपोषण अखेरपर्यंत करावे लागले तर ईश्वराचे उपकार मानायला हवेत. मागितलेले मरण कोट्यवधींपैकी एखाद्यालाच लाभते. असे मरण मला लाभले तर किती छान होईल आणि मरण नच लाभले तर याहून अधिक शुध्द व्हायचा आणि अधिक सेवाकार्य करायचा माझा धर्म ठरेल हे तर सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. पन्नास वर्षांच्या मजसोबतच्या सहवासानंतर इतकी साधी सोपी गोष्ट तर तू अगदी बरोबर समजून घेशील आणि झेलशील असे मी मानतो[१२]

या पत्रातून गांधीजी आपल्या उपोषणासाठी ईश्वराचे आभार मानतात व मानायला लावतात. उपोषण आणि मरण यांचा परस्पर संबंध उलगडवून दाखवतात.

कमालीचे निरिच्छ व आत्मत्यागी दिसतात. आपल्या सोबतच्या साहचर्यामुळे कस्तुरबाच्या जीवनातही त्याग व समर्पणाची भूमिका जागावी अशी रास्त अपेक्षा व्यक्त करतात.

या पत्रातले 'ईश्वराने प्रदान केलेल्या संधीमुळे तुला तर हर्षच वाटायला हवा.' हे वाक्य समजून घेण्यासारखे आहे. या वाक्यात एक उत्तरार्ध्द दडलेला आहे. तो आहे. 'कारण मला हर्ष वाटला आहे.' कस्तुरबाची संवेदना आणि हर्ष-विषाद हे द्वंद्वात्मक अनुभव आहेत. ते सुध्दा गांधीजींशी संलग्न व समांतर आहेत. हा विश्वास या वाक्यातून ध्वनित होतो आहे. या संपूर्ण निवेदनाचा प्रसाद सुभग आहे., तो आहे. विश्वसनीयतेचा. ही विश्वसनीयता दोन प्रकारची आहे. एक आहे. अखेरच्या 'पन्नास वर्षांच्या सहवासाचे प्रयोजन'. दुसरी आहे. 'त्याच्या फलिताशी असलेली संलग्नता'. दांपत्य जीवनातील अर्ध्द शताब्दीची वाटचाल. या वाटचालीतील साधर्म्य आणि सामर्थ्य. ते या वाक्यातून व्यक्त होते. गांधीजींच्या उपवासाचे मर्म 'केवळ जाणून घ्यावे' अशी ही अपेक्षा नाही. हे 'पत्करावे' असे सांगणे आहे. याची भूमिका 'तू भयभीत होऊ नकोस' या वाक्यापाशी थांबत नाही. ती 'भगिनींना भयभीत होऊ देऊ नकोस' म्हणजे 'त्यांना धैर्य दे' वाक्याच्या या परिघापर्यंत पोहोचते. गांधीजी आपल्या व्यक्तिमत्वाचे तेज आणि धैर्य कस्तुरबामध्ये संक्रमित करतात. एवढेच करुन थांबत नाहीत. त्या धैर्य व तेजाच्या दर्शनाची आणि ते अनुभवण्याची कांक्षा व्यक्त करतात.

संकटसमयी कस्तुरबा अधिक दृढ व्हायची. आत्मविश्वास तिच्या चेहऱ्यावर झळकायचा. अडचणींपुढे नामोहरम होण्याचा तिचा स्वभाव नव्हता. रणभूमीत ती रणचंडी बनायची. स्वातंत्र्यलढा तिला न्याय्य वाटायचा. 'हा लढा आपण जिंकू.' असा दुर्दम्य विश्वास तिच्या ठायी वसत होता. नवऱ्याच्या निर्णायक बुध्दीवर ठाम विश्वास होता. तिला राजकारण फार नाही कळायचे. नवऱ्यावर मात्र तिची गाढ श्रध्दा होती.

संदर्भ


१) महादेवभाईंची डायरी (गुजराती ) खंड १ पृष्ठ २० / २१ आणि अग्निकुंडात उमललेले गुलाब : डॉ. मु. ब. शहा आणि डॉ. विश्वास पाटील (श्री नारायण देसाई यांच्या मूळ गुजराती ग्रंथाचा मराठी अनुवाद) पृष्ठ ६७३;

२) गांधीजींनी प्रेमाबेन कंटक यांना दिनांक १९ मे १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ४९ पृष्ठ ४४०;

३) श्री पोलाक यांनी गांधीजींना दिनांक ८ जून १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५० पृष्ठ १८;

४) गांधीजींनी श्री मथुरादास त्रिकमजी यांना दिनांक १८ जून १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्. मय खंड ५० पृष्ठ ६३;

५) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २१ जुलै १९३२ वा त्या नंतर लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५० पृष्ठ २७५;

६) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २७ जुलै १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि कित्ता पृष्ठ ३१४;

७) गांधीजींनी देवदासला लिहिलेले दिनांक १७ जुलै १९३२ चे पत्र;

८) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २० ऑगस्ट १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५० पृष्ठ ४०१;

९) गांधीजींनी श्री नारणदास गांधींना दिनांक २५ / २८ ऑगस्ट १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५० पृष्ठ ४४४;

१०) गांधीजींनी श्री नारणदास गांधी यांना दिनांक ११ जानेवारी १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ४९ पृष्ठ ५;

११) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १४ मार्च १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ४९ पृष्ठ १९३;

१२) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १२ सप्टेंबर १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५१ पृष्ठ ५४ -५५.


❖❖❖




एच-१७०
१७

### ३) पायी शृंखला, ओठी मुक्तीगीत

जानेवारी ते सप्टेंबर १९३२. स्वातंत्र्य लढा वेगळ्या वळणावर होता. भरती होती, ओहोटीही असायची. सरकारने स्वतंत्र मतदार संघाचा निर्णय घेऊन टाकला. गांधीजींनी या विषयावर प्रदीर्घ चिंतन केले. अंतर्नादाचा निर्देश मानला. आमरण उपोषणाचा निर्णय घेतला. २० सप्टेंबर १९३२. उपोषणाची मंगल प्रभात होती. गांधीजींनी मीराताईला लिहिले होते -

"माझ्या प्रतिज्ञेची जाणीव करुन देण्यासाठी मी पहिले पत्र सरकारला लिहिले. त्यावेळी मला तुझा व बांचा विचार आला होता. घडीभर तर मला भोवळ आली. तुम्ही दोघीजणी हे कसे काय सहन करु शकाल? पण माझ्या अंतर्नादाने ग्वाही दिली 'तुला जर यात प्रवेश करायचा असेल तर तमाम आसक्तीच्या विचारांचा त्याग करायला हवा.' मग पत्र गेले. अस्पृश्यतेचे पातक धुऊन काढण्यापुढे कोणतीही वेदना श्रेष्ठ ठरणार नाही. त्यामुळे या त्रासदायक परिस्थितीशी तुम्ही जुळवून घेतले पाहिजे. धैर्याने तोंड दिले पाहिजे. ज्या आत्म्यावर तुम्ही प्रेम करता, तो सदैव तुमच्याच बरोबर आहे."[१]

गांधीजी एनिमाचे पाणी घेऊन तुरुंगातील एका कॉटवर पहुडले होते. ब्लँकेटने आच्छादलेले होते. कॉट आंब्याच्या झाडाच्या सावलीत होती. कस्तुरबा तुरुंगात जाऊन पोहोचली. तिच्या चेहऱ्यावर ना संताप होता ना वेदना. जशीची तशी कस्तुरबा. तिच्या अंतःकरणात दुःखाचा सागर उसळत होता. मुखमुद्रेवर अपरंपार शांतता होती. तिच्या नेत्रात अश्रुचा थेंब मात्र नव्हता. प्रणाम करुन तिने आपला माथा त्यांच्या छातीवर टेकवला. बघणाऱ्यांचे डोळे भरुन आले. कस्तुरबामुळे त्यांना अधिक आराम मिळत होता. ती सहाजिकच काळजीत होती. ती गांधीजींची उशी नीट करुन द्यायची. कपाळावर ऑलिव्ह ऑईल चोळून द्यायची. त्यांच्याशी बोलायची. यात तिला अतीव आनंद मिळत होता.[२]

गांधीजींचे उपोषण सुरु झाले होते. कस्तुरबा साबरमती तुरुंगात होती. तिची बदली येरवडा तुरुंगात करण्यात आली. २२ सप्टेंबर १९३२. रात्री तिला येरवडा तुरुंगात हलवण्यात आले. पतीसमवेत रहायची परवानगी मिळाली. तिने 'पुन्हा तीच जुनी कहाणी' या शब्दांनी गांधीजींचे स्वागत केले. यावर गांधीजी हसले. खरे म्हणजे गांधीजींना तिची भेट घ्यायची इच्छा होती. कस्तुरबालाही तशीच इच्छा होती. हे ते जाणून होते. कस्तुरबाच्या येण्यामुळे गांधीजींना आनंद झाला. कस्तुरबाकडून त्यांनी मालिश करवून घेतली. गांधीजींचे सल्लागार हृदयतज्ज्ञ डॉक्टर गिल्डर आणि डॉ. पटेल हे मुंबईहून आले होते. त्यांनी कारागृहाच्या डॉक्टरांशी चर्चा केली. हा कैदी अत्यवस्थ आहे. असे ठरवले. त्यांचा रक्तदाब धोक्याच्या पातळीपेक्षा कितीतरी अधिक आहे. त्यांच्यावर कोणत्याही क्षणी मृत्यु झडप घालील. असे निदान करण्यात आले होते.

कस्तुरबाने गांधीजींना चरणस्पर्श पूर्वक प्रणाम केले. त्यांनी हात धरुन जवळ ओढले. 'हा काय खेळ मांडला आहे.?' कस्तुरबा म्हणाली.

'कसे? माझ्यासोबत मरायचे आहे. ना?' गांधीजींनी विचारले. 'नाही, मी कशासाठी उपवास करु? तुम्ही उपवास सोडा. देवाने तुमचे उपवास सोडवावेत.' कस्तुरबा काकुळतीला येत म्हणाली.

'तुझा चेहरा तरी बघ. कसा अशक्त दिसत आहे. हे बघ, माझ्यापेक्षाही तू अशक्त दिसतेस. याचा अर्थ असा की भंडारी माझी काळजी घेतात. अडवाणी काही तुझी काळजी घेत नाहीत.' गांधीजी म्हणाले.

भंडारी हे गांधीजींचे आणि अडवाणी हे कस्तुरबाचे कैदेतले अधिकारी आहेत. त्यांचा संदर्भ देत गांधीजी एकूणच सरकारी व्यवस्थेवर टीकास्त्र सोडत होते.

२६ सप्टेंबर १९३२ रोजी मॅकडॉनाल्ड आणि त्यांच्या मंत्र्यांनी पुणे करार वार्ता स्वीकारली. आधीच्या शिफारशीत बदल केला. बातमी संध्याकाळी पाच वाजता येरवड्याला येऊन पोहोचली. कस्तुरबाने सुटकेचा निःश्वास सोडला. उपवास पूर्ण झाला. गांधीजींची तब्येत परत खालावली. त्यांचा रक्तदाब वाढला. अधून मधून त्यांची शुध्द हरपत रहायची. गांधीजींचे उपोषण सोडण्याची घटिका आली होती. कस्तुरबा कमालीची प्रफुल्लित होती. ती गांधीजींच्या उशीनजिकच उभी होती. प्रार्थना समयी तिच्या मुद्रेवर

कृतज्ञतेचा भाव ओसंडून वहात होता. तिचे नेत्र अश्रुभिजले होते. ते पाऱ्यासारखे चकाकत होते. भारताचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स कर्नल ई. ई. डायल पुढे आले. येरवडा करारावर सह्या होईपर्यंत महात्मा तग धरुन होते असे त्यांचे मत होते. दुपारी कराराची लेखी प्रत डॉयल यांनी गांधीजींच्या हाती दिली. म्हणाले --

'आणि हो, आणखी एक गोष्ट. सरबताचा पेला सौ. गांधी यांनी तुमच्या हाती द्यायला हवा.' डॉयल म्हणाले.

कस्तुरबाच्या हाती मोसंबीच्या रसाचा प्याला होता. त्या ऐतिहासिक क्षणी तिचा आनंद गगनात मावत नव्हता. कस्तुरबाने आपल्या शिक्षेतील अखेरचे आठवडे येरवडा तुरुंगात घालवले. उभयता येरवडा तुरुंगातच होते. दोन काठांवर दोघे चक्रवाकासारखे. लवकरच गांधीजींची तब्येत सुधारली. कस्तुरबाचीही तब्येत सुधारली. गमावलेले वजन परत भरुन निघाले. गांधीजींच्या उपवासाच्या काळात कस्तुरबाच्या आहाराचे प्रमाण अगदी कमी होते. गांधीजींच्या उपवासामुळे तर कस्तुरबाला त्यांच्या भेटीला येता यायचे. रामदासलाही उरलेली शिक्षा भोगण्यासाठी येरवडा तुरुंगात आणले गेले होते. एका तुरुंगात माता-पिता व पुत्र होते. त्यागाची चरम सीमा होती.

कस्तुरबाने आपल्या शिक्षेचे शेवटचे आठवडे येरवडा तुरुंगातल्या महिला वॉर्डात घालवले होते. ती रोज त्यांना भेटत असायची. तिथे एक छोटा प्रायमस स्टोव्ह उपलब्ध होता. ती त्याचा वापर करुन गांधीजींसाठी स्वयंपाक करायची. श्री जयशंकर त्रिवेदी यांच्या वहिनी तारागौरी. त्यांचा स्टोव्ह भडकण्यामुळे मृत्यु झाला होता. या बातमीने गांधीजी सावध झाले. ते एका सहकाऱ्याला लिहितात.

'प्रायमस स्टोव्ह आश्रमातून काढून टाकण्यात यावा. किमान भगिनींनी स्टोव्ह न वापरण्याची तरी शपथ वहावी.'

कस्तुरबाच्या संदर्भात स्टोव्हच्या वापर न करण्याविषयी अंमल सुरु करुन टाकला. त्या वेळी तिथे स्टोव्ह होता. कस्तुरबा तो पेटवू बघत होती. गांधीजींनी तिला थांबवले. महादेवभाई स्टोव्ह पेटवत होते.[३]

गांधीजींनी नारणदास गांधींना लिहिलेले हे पत्र खूपच तलस्पर्शी व मार्मिक आहे.

१४ ऑक्टोबर १९३२ रोजी कस्तुरबा भेटीला गेली. तिचा निरोप करुणाभरला होता. 'ईश्वर, परत केव्हा भेट घालून देईल?' कस्तुरबा विचारत होती. 'या खेपेला भेट होईल हे कुणाला ठाऊक होते बरे?' गांधीजी म्हणाले.

गांधीजी तुरुंगात आहेत. उपोषण जारी आहे. कस्तुरबाच्या मनाची उलघाल सुरु आहे. कधी उगवतीची तर कधी मावळतीची किरणे तिच्या चेहऱ्यावर झळकताहेत.

१९ ऑक्टोबर १९३२ रोजी कस्तुरबा स्वतःहूनच सांगू लागली - "आता मला इथे यायचे थांबवावे लागेल. कित्येक जण तुरुंगात खितपत आहेत. यातले कित्येक आजारी - पाजारी असतील, त्यांना कोण बरे भेटायला येऊ शकत असतील? मला अनेकदा रामदासची काळजी वाटते. बापूंची वाटते. मनात येते की हजारो मुलांच्या माता आणि बायका अशीच काळजी करत असतील ना? सर्वांचा रक्षणकर्ता तर परमात्माच आहे. मला सरकारने इथे यायला परवानगी दिली याचा लाभ उठवला पण आता अजून अधिक काळ थांबणे योग्य नव्हे. हा अधिक लोभ मनी धरल्यासारखे होईल."

सरकारने आपल्याला यायला परवानगी दिली तरी अधिक काळ थांबणे योग्य होणार नाही. हा अधिक लाभ ठरेल असे कस्तुरबाच्या मनाने घेतले. मनाच्या तरल स्पंदनांचे हे गाणे आहे. स्वतःचे परीक्षण करणारे. आत्मप्रबोधन करणारे.

१९३२ साली सौ. लाभुबेन मेहता कस्तुरबांच्या सोबत तुरुंगात होत्या. त्यांनी कस्तुरबांचा अनुभव पुढील शब्दात मांडला आहे.

'हे कोण आलंय बाई जेलमध्ये. अशा नाजूक, लहानग्या वयाच्या लेकरांना पकडून तुरुंगात आणायची सरकारला काही लाज वाटत नाही काय?' मला बघून कस्तुरबांचे हृदय द्रवले. दुसऱ्या दिवशी त्यांना कळले की मी काही खात-पित नाही. तिथले शुष्क अन्न मला घशाखाली ढकलता येत नव्हते. त्यांनी तत्क्षणीच मला बोलावले. त्या 'ब' वर्गात होत्या. आपल्या खाण्यातला वाटा मला जबरदस्तीने खायला दिला. शिकवणूकीचे

दोन शब्दही बोलल्यात ‘बघ बाई, अशी उपास-तापास करशील तर कारावास कसा कंठता येईल? त्रास सहन करायला आली आहे.स तर कष्ट तर उपसावे लागतीलच?’ मी हे सारे काही जाणत तर होतेच पण मन मजबूत करण्यात दोन-तीन दिवस निघून गेलेत मग तर मी या आहारालाच अनुकूल मानून घेतले. या दरम्यान मला कस्तुरबांची अपरंपार सहानुभूती मिळाली. तुरुंगात अनेक महिला कैदी असत. कुणी आजारी पडत. कस्तुरबा मदतीला धाऊन यायच्या. कुणी कमकुवत मनाच्या असायच्या. कस्तुरबा त्यांची उमेद वाढवायच्या. कुणी आरामशीर कुटुंबातल्या असत. कस्तुरबा त्यांना समजावून सांगायच्या. त्यांच्या सहानुभूतीमुळे तुरुंग सुसह्य वाटायचा. तुरुंगात आम्ही ऐंशी भगिनी होतो. कुणाला अजिबात त्रास झाला नाही. इथे आपण एकट्या आहोत वा इथे आपले कोणी नाही असा भाव काही कधी कुणाच्या मनात आला नाही. जणू काही आम्ही साऱ्या कस्तुरबांच्या घरातच रहात होतो. त्या सर्वांची काळजी वहायच्या. सर्वांना जपायच्या. सांभाळायच्या. सवांर्वर सारखीच माया करायच्या, सर्वांची सारखीच काळजी घ्यायच्या. हा त्यांच्या स्वभावाचा विशेष होता.” ‘आत्मवत् सर्वभूतेषु’ हा अध्यात्मभाव विकसत होता. सारी ईश्वराची लेकरे असा ममत्वभरला हा अनुभव होता.

आपली सुटका होताच परत आपल्या कामाला लागू असे कस्तुरबा म्हणाली. ३ डिसेंबर १९३२ रोजी सुटका झाली. तेव्हा गांधीजींनी संमती दिली होती. गांधीजी लढ्यात अग्रभागी होते. सातत्याने नव-नव्या कार्ययोजना आखत होते. येरवडा तुरुंगात होते. कस्तुरबा सत्याग्रहींसमवेत बारडोली तालुक्यात जनजागरण करत होती. तिच्या पायाला भिंगरी बांधलेली होती. ती सर्वत्र हिंडत होती.

गांधीजींनी एस्थर मेननला लिहिले की बा आश्रमात आहे. ती त्यांच्यापेक्षा अधिक वृध्द झाली, असे त्यांना वाटते. तिच्या ठायी अद्भुत उत्साह आहे. तिचा मेंदू लवकर शिणून जातो. ती खूप काळजी करते.[४]

या पत्रातली गांधीजींच्या मनातील कासाविशी थेट आपल्या हृदयाला स्पर्श करणारी आहे. दोघांचे वय जवळपास सारखे आहे. तशी कस्तुरबा वयाने सहा महिने मोठी आहे. हे अंतर काळाने जणू पटापट पुसून टाकले आहे. याची काळजी गांधीजींच्या या पत्राच्या माध्यमातून वाचता येते.

मद्रास येथे अस्पृश्यताविरोधी परिषद होती. तिथे आपल्या पतीचे प्रतिनिधित्व कस्तुरबाने केले होते. तिने गुरुवायुर येथे एका संमेलनाचे उद्‌घाटन केले. गांधीजींनी तारेने या कार्यक्रमाला आशीर्वाद दिलेत. कस्तुरबाने अनेक महिलांच्या सोबत दौरा केला होता. तिच्यावर या कामासाठी टीका केली जाऊ लागली. चळवळीच्या विरोधात सनातन्यांनी विरोध केला. रोष प्रकट केला. गांधीजी व कस्तुरबा या दोघांच्यावर कटू वाग्बाण बरसू लागले. कस्तुरबा थांबली नाही. तिने नंतर अनेक ठिकाणी दौरे केले. हरिजनांच्या हक्कांचा प्रचार केला. साबरमती आश्रमात सारे काही ठीकठाक आहे. की नाही हे बघायला थोडा वेळ तिथे थांबली होती. गांधीजींची भेट घ्यायला एकदा येरवडा येथे गेली होती. गांधीजींचे दोन दिवसांचे उपोषण होते. सत्याग्रहींना शौचालय सफाई काम करायला प्रतिबंध करणारे तुरुंगाचे धोरण होते. ते बदलण्यास गांधीजींनी सरकारला भाग पाडले होते. तोवर सफाईचे काम हे केवळ हरिजनांचेच असल्याचे मानले जाई. गांधीजींनी ती दृष्टी बदलायला लावली. या बदलामुळे वर्षाअखेरीस कर्मठ हिंदूजनांमध्ये खळबळ माजली. हरिजनांच्या हक्कांसाठी झुंजणाऱ्या कस्तुरबावर टीका होऊ लागली होती. कधी ना कधी तिला विरोध होईल हे ठरलेले होते.

१९३२ साल खूप कसोटीभरलेहोते. वृध्द आणि जर्जर कायेची बुलंद आशेची महिला निर्णय घेत होती. नवऱ्याची भेट केव्हा होईल? होईल वा होणारही नाही. सरकार तर अधर्मी आहे. क्रुर आहे. काय होईल? बाहेरचा हा एकाकीपणा आपल्याला गिळून टाकील. महादेवभाईची सोबतही नाही. सारेनकारार्थी आहे. हरकत नाही. मार्ग काढता येईल. या कसोटीच्या प्रसंगी आपण दुबळे ठरणार नाही. कस्तुरच्या मनी उत्साहाची प्रखर, प्रगल्भ आणि प्रशस्त अशी त्रिवेणी वहात होती.

नागरी असहकारापासून दूर रहाण्याचा सरकारी सल्ला कस्तुरबाने पाळला नव्हता. १९३३ सालच्या फेब्रुवारी महिन्यात तिला परत अटक झाली. सहा महिन्यांची शिक्षा झाली होती. यावर टिप्पणी करताना

'न्यूयॉर्क टाइम्स' ने लिहिले होते की एका अज्ञात आरोपाखाली श्रीमती गांधींना अटक करण्यात आली आहे. १९३३ हे वर्ष गांधीजी आणि कस्तुरबासाठी अटक, सुटका, परत अटक, उपोषणे असे चालले होते.

दोन वर्षांमध्ये कस्तुरबाला सहाव्यांदा अटक झाली होती. तिला सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली होती. साबरमती तुरूंगात रवानगी करण्यात आली होती. ती महिलांचे संगठन उत्तम प्रकारे करु शकायची. यावरचा तिचा प्रभाव विलक्षण होता. तो बघून ब्रिटिशाना असे वाटू लागले होते की कायदा व सुरक्षा जपण्यासाठी खरा धोका गांधीजी नसून कस्तुरबा आहेत. या खेपेस साबरमती तुरूंगात तिला अन्य कैद्यांपासून वेगळे ठेवण्यात आले होते. कोणीही तिला भेटू शकत नव्हते. कस्तुरबा कायमच सर्वांसमवेत रहायची. सर्वांसोबत रमायची. ती प्रथमत:च अशी एकाकी आणि विलग झाली होती. आश्चर्य म्हणजे हा एकाकीपणा तिला खटकत नव्हता. तिला केवळ आपल्या पतीला पत्र पाठवायला परवानगी होती. दर आठवड्याला एकच पत्र पाठवण्याची वा स्वीकारण्याची मुभा होती.

१९३३ सालच्या कस्तुरबा आणि अन्यांशी झालेल्या पत्रव्यवहारातून कस्तुरबाविषयीची गांधीजींची भावना प्रत्ययकारीतेने प्रकट होताना दिसते.

प्रेमाताई कंटक यांना लिहिलेल्या पत्रात गांधीजी लिहितात की बाने त्यांना अनेकदा क्रोधी मानले आहे., असे त्यांना आठवते. तिच्या आक्षेपाचा ते इन्कार कसा करु शकतात? कस्तुरबाला गांधीजींचे बोलणे क्रोधयुक्त वाटले नसेल असे होऊ शकते यात काय? तिला त्यांचे बोलणे खुपले एवढेच त्यांच्यासाठी पुरेसे ठरायला हवे. पूर्णपणे सत्य आणि अहिंसेने भरलेले वचन कधी कुणाला खूपत-टोचत नाही.[५]

या पत्रातून गांधीजी कस्तुरबाच्या स्वभाव धर्माचे विश्लेषण करतात. कस्तुरबाच्या रागावण्याच्या पाठीमागे असलेल्या सत्यकथनाला प्रणाम करतात. या पत्रातून एक विषय ठामपणे मांडतात.

श्री नारणदास गांधींना 'बा आणि मीराताई यांना पाठवण्यात आलेल्या दूधाचा हिशेब चुकता करता की नाही? की तो भार आपल्या डोक्यावर पडतो?'[६] पत्राच्या अखेरीस प्रश्न विचारला आहे. यातून गांधीजींची वैयक्तिक व सामुदायिक व्यवस्था समजते. या व्यवस्थेतील आंतरसंबंध प्रकट करणारी मूल्यव्यवस्था प्रकट होते. या पत्रातून गांधीजी व्यावहारिक गोष्टींचा आग्रह धरणारे कठोर नेते वाटतात. तरीही ते सनातन मूल्यव्यवस्थेचा सतत आग्रह धरताना दिसतात. एकीकडे कस्तुरबाच्या रागाला असलेल्या सत्याच्या अविभाज्य तत्वाला प्रणाम करणारे पती गांधीजी भेटतात. दुसरीकडे आश्रमातील जीवन व्यवस्थेचा आग्रह धरणारे कुशल व्यवस्थापक गांधीजी रागावताना दिसतात. दोन्हीही ठिकाणी नातेसंबंधांच्या पलिकडे बघण्याची दृष्टी जोपासतात.

गंगाताई वैद्य यांना लिहिले की मीराताई बांवर टीका का करत होती? तिच्या ठायी दोष तर नि:संशयपणे आहेत. पण तिच्या एकनिष्ठतेच्या मूल्याचे मोजमाप करता येणार नाही. बा स्वत:ला खूप दीप्त करत राहिली आहे., हे खरे आहे. यात कुठलीही शंका नाही. कस्तुरबांचा दृढ स्वभाव त्यांच्या दोषांवर पांघरुण घालणारा आहे.[७]

या पत्रात कुठल्या गोष्टीला किती महत्व द्यावे हे सूचित करणारे गांधी चिंतन आहे. केवळ एक पती म्हणूनच नव्हे तर एक नेता आणि चिंतक म्हणूनही ते विशिष्ट आहे. मीराताईला लिहिले आहे. "बाला जबड्याकडे लक्ष द्यायला हवे. ती कृत्रिम दात लावते का? ती आवश्यक तेवढा व्यायाम घेते का? स्वत:हून काही वाचते का? तिला दर आठवड्याला पत्र मिळतात की पंधरवड्याला? मागच्या खेपेला तिला माझी अनेक पत्रे मिळाली नाहीत. त्या पत्रांचे काय झाले कोण जाणे? माझी पत्रे तिला मिळायला हवीत, असे मला वाटते. कैदेतील अधिकाऱ्यांनी पत्रे थांबवली नव्हती, अशी माझी माहिती आहे."[८]

मीराताईला पत्र लिहिले की बा तुमच्यासोबत आनंदात आहे. आणि हिंदी शिकत आहे. तुम्हाला भजने गायला लावते, याचा मला आनंद आहे.[९]

मार्च १९३३ साली लक्ष्मीचा मारुतीशी विवाह झाला. लक्ष्मी दूदाभाई व दानीबेन यांची कन्या. साबरमतीचा आश्रम नुकताच सुरु झाला होता. हे हरिजन दांपत्य आश्रमात आले होते. त्यावेळी लक्ष्मी तान्हे बाळ होती.

मारुती दक्षिण भारतीय अनाथ बालक होता. त्याचे संगोपन वेलाबेन व लक्ष्मीदास आसर यांनी केले होते. गांधीजींनी कस्तुरबाना सुचवले की या लग्नानिमित्त काही करायला हवे. कस्तुरबा या लग्न प्रसंगी तुरुंगात होती. गांधीजींनी नारणदासला पत्र पाठवले होते:

"चि. नारणदास,

लक्ष्मीच्या विवाहाचा प्रसंग आहे. आश्रमाच्या वतीने लक्ष्मीला काही वस्त्रे वगैरे वस्तु भेटीदाखल द्यायला हव्यात. याविषयी काही विचार करुन ठेवावा. कस्तुरशी भेटून काही चर्चा करणे शक्य असेल तर तसे कर. ती आपली एखादी नवी वा नव्यासारखी साडी देईल तर सोईचे होईल. तिच्याजवळ अजूनही एखादा दागिना असेल तर तोही तिने देऊन टाकावा. या कारणासाठी कस्तुरची भेट घेत आहे. असे तुरुंग अधिकाऱ्याला सांगावे. त्याने परवानगी दिली तर उत्तम, अन्यथा त्याची मर्जी दुसरे काय? लक्ष्मीला भेट देण्याविषयी अन्य भगिनींशीही बोला. सल्ला मसलत करा. आपल्या वतीने कुठल्याही परिस्थितीत काही उणीव राहणार नाही, असे बघा. याविषयी आणखी काही लिहावेसे वाटले तर लिहीन."[१०]

गांधीजींनी लक्ष्मी व मारुतीच्या विवाहप्रसंगी पुढीलप्रमाणे संदेश दिला होता -

"मारुती आणि लक्ष्मीच्या विवाह समयी ना मी आश्रमात आहे. ना बा. या गोष्टीचे मला मोठे दु:ख तर आहे.च पण हा मोह आहे. असे मी मानतो. धर्म जिथे राखेल तिथे रहाण्यातच सुख मानायला हवे. त्या अवस्थेत अन्य कुठल्या स्थितीची कल्पना करण्याची शक्यता उरत नाही. परिणामी दु:खाचा प्रश्नच उद्भवत नाही. माझ्या आणि बांच्या उपस्थितीतच विवाह झाला पाहिजे अशी लक्ष्मीची उत्कट इच्छा होती. चि. मारुतीलाही असे वाटत होते."[११]

या काळात साबरमती आश्रमातील प्रश्नही काही कमी तीव्र स्वरुपाचे नव्हते. त्यांची चिंता गांधीजींना अधिक होती. आश्रमातील बंधु-भगिनींच्या मनोवृत्ती विविधांगी होत्या. त्यांचे प्रलोभन प्रच्छन्न होते. तिथे सत्य साधनेचा एक अभूतपूर्व प्रयोग होता. 'श्रम हाच श्रीराम' या ध्येय वाक्यानुसार तिथली दिनचर्या होती. अशात आपल्या कार्यकर्त्यांच्या कमकुवतपणाची बातमी गांधीजींनी ऐकली. ते अपार व्यथित झाले. त्यांनी उपवासाचा निर्णय घेतला.

३० एप्रिल १९३३. पहाटे उपवास करायचा निर्णय झाला. खरे तर एका लोकोत्तर शक्तीने घेतलेला हा निर्णय होता. गांधीजींनी याचा स्वीकार केला. कस्तुरबाने विनम्रभावे स्वीकार केला. हा उपवास आत्मशुध्दीसाठी होता. अधिक जागरण हवे होते. अधिक सतर्क रहाण्यासाठी अंत:करणपूर्वक केलेली ही प्रार्थना होती. गांधीजींनी उपोषणाला सुरुवात केली. सरकारने त्याच दिवशी त्यांना अचानक कैदेतून मुक्त केले. उपवास काळाच्या आरंभीच त्यांची सुटका झाली. वैयक्तिक सविनय कायदेभंगाच्या चळवळीला आरंभ झाला. यानंतर 'अटक व सुटका' असा पाठशिवणीचा खेळ आरंभ झाला. हा खरे तर मांजर-उंदराचा खेळ होता.

१९३३ चा उपवास काळ होता. एकवीस दिवसांच्या उपोषण काळादरम्यान महादेवभाईंसमवेत काही काळ राहण्यासाठी त्यांचा मुलगा नारायणसुध्दा साबरमतीहून आला होता. पुण्याला आल्यावर त्याला दुर्दैवाने मलेरियाने घेरले. महादेवभाईंच्या मस्तकावर गांधीजींच्या उपवासाची टांगती तलवार होती. त्यावर नारायणच्या आजाराची चिंता कोसळली. ताप १०६ डिग्रीपर्यंत वाढला होता. छत्तीस तास लोटले. ताप काही उतरला नव्हता. महादेवभाईंनी आपले कार्यालय गांधीजींच्या बाजेपासून हटवून नारायणच्या खाटेपाशी स्थिर केले. एका हाताने गांधीजींना आलेल्या अगणित तारा आणि पत्रांना ते उत्तरे देत. दुसऱ्या हाताने नारायणच्या तप्त कपाळावर गार पाण्याच्या पट्टया ठेवत. लहानगा नारायण सन्निपातातही आईची आठवण काढायचा. 'आई आली का? आई तू कुठे आहे.स?' असे विचारत होता. एखाद दिवसात ताप उतरेल आणि बाळाला बरे वाटेल या विचाराने महादेवभाईंना आपली पत्नी दुर्गाला बोलावण्याची काही गरज वाटत नव्हती. त्यांनी काही बायकोला हाक मारलेली नव्हती. लेकराची तगमग मात्र त्यांना बघितली जात नव्हती. त्यामुळे सहाजिकच त्यांचे हृदय भरुन येई. नेत्राना अश्रुधार लागायची. गांधीजींची नात म्हणजे हरीलालची मुलगी मनू तिथेच होती. तिने महादेवभाईंचे अश्रु बघितले. लगेचच कस्तुरबाला निरोप पोहोचवला. कस्तुरबाने गांधीजींना सांगितले. गांधीजींनी ताबडतोब

महादेवभाईंना बोलावले. ते पोहोचताच गांधीजींनी महादेवभाईंच्या पत्नी दुर्गाताई यांना बोलावण्यासाठी तारेचा मजकूर सांगायला सुरुवात केली.

साबरमती आश्रमात कस्तुरबा परतली होती. मीराताई आश्रमातच होती. तिच्या व कस्तुरबाच्या - दोघींच्या वतीने गांधीजींना २ मे १९३३ रोजी तिने तार पाठवली. तारेचा मजकूर होता. "उपवासाची बातमी आजच कळली. बा माझ्या माध्यमातून कळवू इच्छिताहेत की त्यांना भयंकर धक्का बसला आहे. तुमच्या या निर्णयाला त्या अत्यंत चुकीचा मानताहेत पण आपण जिथे इतर कुणाचे म्हणणे ऐकले नाही तिथे आपण तिचेही म्हणणे ऐकणार नाही. ती आपल्या हार्दिक शुभ कामना पाठवत आहे." गांधीजींनी तारेने मीराताईला लगेच उत्तर पाठवले "बांना सांगशील की तिच्या पित्याने तिजवर एक असा साथीदार लादला आहे. की आणिक कुठली एखादी दुसरी स्त्री असती तर ती या भाराखाली चिरडून मेली असती. तिचे प्रेम माझ्यासाठी अमूल्य आहे. तिला अखेरच्या क्षणापर्यंत धैर्यवान रहायला हवे."[१२]

"चि. मीरा

कस्तुरला म्हणावे की माझ्या बाबतीत अजिबात काळजी करु नये. ती, मी व आपण सारी ईश्वराच्या हातातली खेळणी आहोत. बांना म्हणावे की त्यांच्याविषयी यत्किंचितही काळजी करु नये. ती, ते व आपण सारे ईश्वराच्या हातात आहोत. आपण जिवंत राहिलोत तर चांगले व आपले निधन झाले तरी चांगले. आपण मरण्यासाठीच जन्माला येतो आणि पुनश्च जन्म येण्यासाठीच मरतो. या तत्वाला हृदयंगम करुन घ्यायची गरज आहे. आत्म्याशिवाय देहाची कुठलीही आसक्ती धरली जाऊ शकत नाही आणि आत्मा शरीरासोबत नष्ट होतो याचे कुठलेही प्रमाण आपल्यापाशी नाही[१३]

६ मे रोजी परत एक पत्र पाठवले आहे. की तुम्हा दोघींची एकत्रित तार आली आणि तुमच्या पत्रांनी मला या यात्रेसाठी आध्यात्मिक पोषण मिळायला लागले आहे.[१४]

कस्तुरबाला पत्रातून लिहिले की 'श्रीमद्भगवद्गीता' ग्रंथाच्या केवळ एक नव्हे तर अनेक श्लोकांचा भाव हा आहे. की जे कार्य ईश्वराच्या नावे आणि त्याच्या प्रेरणेने संपन्न केले जाते त्या कार्याला ईश्वरच पूर्ण करतो. कर्ता-धर्ता तर तोच आहे. यामुळे आपण तर कोरेच्या कोरे आहोत. कुणी जर कुणाला काठीने मारत असेल तर ते काम काठीचे नसून काठीच्या मालकाचे आहे. त्याचप्रमाणे आपण जर आपला देह ईश्वराला सोपवून दिला आणि त्या शरीराकडून काही कार्य करवून घेतले तर ते कार्य त्या देहाचे नसून ईश्वराचे आहे. यशापयश त्याचेच आहे. यामुळे हे समजून घ्या की ज्याने उपवास करवले आहेत. तोच अवश्य पार उतरवील[१५] गांधीजींनी ईश्वराला कर्ता-धर्ता मानले. तोच यशापयशाचा मालकही आहे. असे म्हटले होते.

गांधीजींनी ८ मे १९३३ पासून उपवास सुरु केले. कस्तुरबाने गांधीजींना तार केली -

"वृत्तपत्रांमधील बातम्यांवरुन असे वाटत होते की बंदिवानांची सुटका होणार नाही. यामुळे मी सरकारजवळ दोन महिन्यांच्या सुटीचा अर्ज करायची परवानगी मागते जेणेकरुन मला आपल्यापाशी येता येईल. खूप व्यग्रता आहे. तारेने उत्तर द्यावे. मीरा प्रेम कळवत आहे. तिला प्रार्थनेने साहस आणि शांती लाभत आहे."

या तारेला गांधीजींनी एक्सप्रेस उत्तर दिले:

"तुझी तार वाचली. पन्नास वर्षांहून अधिक काळ माझ्यासोबत राहिल्यामुळे तुला बहादुर असायला हवे. अर्ज करायला नको. मी अगदी व्यवस्थित आणि प्रसन्न आहे. ईश्वराने तुला साहस, विश्वास आणि शांती द्यावी. मीरा प्रसन्न आहे. हे जाणून आनंद वाटला. प्रेम."

या तारेसोबत गांधीजींनी गुजरातीत पुढील मजकूर लिहिला आहे. -

"ज्या मुखाने नेहमी विडा खात आली आहेस त्याने कोळसा खायला तयार होऊ नकोस, ईश्वरावर विश्वास ठेव. आपण देहरुप आहोत या गैरसमजाला दूर लोट, राम नाम जप. बापू."[१६] गांधीजी कस्तुरबाला स्वातंत्र्य लढ्यापासून मोक्षाच्या महाद्वाराप्रत नेत आहेत. केवढा लांब पल्ल्याचा आणि आभ्यंतर प्रवास आहे. हा !

१९३३ साली पर्णकुटीत गांधीजी आजारी होते. कस्तुरबा सेवारत होती. त्यांचा १६ मे रोजी लेडी ठाकरसीशी संवाद झाला. वृत्तपत्राच्या प्रतिनिधींनी त्यांची मुलाखत घेतली होती.

'तब्येत कशी?' वृत्तपत्र प्रतिनिधीने विचारले.

'मी काय सांगणार? सध्या तरी ते एकदम चांगले आहेत. ते थोडेसे बोलतात. त्यांचा आवाज हळूवार असला तरी बोलणे मात्र स्पष्ट आहे.' कस्तुरबा म्हणाली.

'पण उपवास पार पाडता येतील का त्यांना?' प्रतिनिधीचा प्रश्न होता.

'देवाची इच्छा पूर्ण होईल. माझी त्यावर संपूर्ण श्रध्दा आहे. क्षमा करा. प्रार्थनेची घंटा झाली. मला प्रार्थनेत सहभागी व्हायला हवेय. येते मी आता.' कस्तुरबाचे सश्रध्द मन बोलले.

२९ मे १९३३. गांधीजींचा उपवास पूर्ण झाला. महादेवभाई म्हणाले उपवासांचा आरंभ बारा वाजता झाला होता म्हणून बारा वाजताच पूर्ण करायचे. आपण बारा वाजता पारणे फेडू शकता.

तत्क्षणीच गांधीजींनी सांगितले:

'नाही, सारे प्रार्थनेनंतर. उपवासाला आरंभ बारा वाजता केला होता. उपवास बारा वाजता पूर्ण झाल्यावरच प्रार्थनेला सुरुवात करायची.'

कस्तुरबा तर सकाळपासून महादेवभाईंना विचारत होती की गांधीजींनी ८ मे रोजी किती वाजता अखेरचा फलाहार घेतला होता. त्यांनी सांगितले होते की साडे अकराला फळांचा रस घेतला होता. त्यावेळी त्यांनी आशा बाळगली होती की २९ मे रोजी सुध्दा साडे अकरालाच पारणे होईल. तिथे तर गांधीजींनी थेट साडे बारा वाजता सारे काही आटोपेल अशी योजना सुचवली. कस्तुरबा व्यग्र झाली.

महादेवभाईंनी हसत हसत म्हटले:

'बा एकवीस दिवसांवर एक तास ज्यादा. दुसरे काय?' महादेवभाई म्हणाले. यावर बा हसल्या, गांधीजी पण सहज-स्वाभाविकपणे हसले आणि इशारा करुन सांगितले की हेच बरोबर आहे.

वल्लभभाईंना येरवड्याला सोडून गांधीजी, कस्तुरबा आणि महादेवभाई लेडी प्रेमलीला ठाकरसी यांच्या पुण्यातल्या 'पर्णकुटी' या निवासस्थानी दाखल झाले. पर्णकुटी, पुण्याहून गांधीजींनी मीराताईला पत्र लिहिले की बा अगदी प्रसन्न आहे. आपला संपूर्ण वेळ त्यांच्या सेवेत, त्यांची मालीश करण्यात आणि संपूर्ण श्रध्दा व स्नेहयुक्त भावनेने त्यांचा स्वयंपाक करण्यात घालवत आहे.[१७]

उपवासाच्या पाचव्या दिवशी कस्तुरबा भेटीला आली. कस्तुरबाला गांधीजींजवळ येरवड्याला येऊन रहायची परवानगी मिळाली. कृतज्ञ गांधीजींनी मीराताईला लिहिले की बाने अतिशय उत्तम प्रतिसाद दिला आहे. तिचे धैर्य माझ्यासाठी शक्तीस्रोत आहे. कस्तुरबाने निष्ठेने आणि प्रेमाने सुश्रूषा केली. मसाज केला. या सेवेमुळे गांधीजींना ८ मे रोजी सुरु केलेला उपवास सहजपणे पार पाडता आला.

महादेवभाईंचे डोळे भरुन आले. कस्तुरबाच्या डोळ्यात टिपूस नव्हता. उलटपक्षी हसतमुख होत ती म्हणाली. 'पुन्हा अटक केली तर जेलर आणि सुपरिंटेंडेटने यायला सांगितले तेव्हा नकार द्यावासा वाटला पण नाही म्हणायचे नसेल असा विचार करुन गप्प बसले. इथे येऊन स्नान केले आणि भेटीला तयार झाले. सुपरिंटेंडेंटने सुनावले की तुम्हाला सोबत ठेवायचा परवाना नाही. गांधीजी युरोपियन वॉर्डात आहेत. पंधरा मिनिटे तुम्हाला भेटीसाठी घेऊन आलो आहे.'

'असे होते तर मला मुळी इकडे आणायचेच नव्हते. मी का अशी मागणी केली होती?' कस्तुरबाने स्पष्टपणे सुनावले. यावर बापू प्रसन्न झाले. मान हलवत आपली संमती दर्शवत राहिले.

गांधीजींनी अन्य भगिनींचे कुशल-क्षेम विचारले. कस्तुरबाने सर्वांचे समाचार दिले.

'आम्हाला हुकूम दिला तेव्हा क्षणभर असे वाटले की अहमदाबादला जाऊन हुकूम मोडावा.' कस्तुरबा म्हणाली.

'रस्त्यातच तुम्हाला अटक करण्यात येईल.' असे त्यांना सांगण्यात आले होते.

'हे बसलो आहोत, करा न मग अटक. अटक करणार असाल तर करा.' असे कस्तुरबाने सुनावले.

कस्तुरबाने ही माहिती गांधीजींना दिली. ४ ऑगस्ट रोजी गांधीजींची सुटका झाली. पुण्यातच रहायचे आदेश होते. त्यांनी पुण्याबाहेर पडायचा प्रयत्न केला. परत अटक झाली. वर्षभराची कैद झाली.

अलीकडे कस्तुरबाची तब्येत चांगली नसायची. खोकला यायचा. दम्याची उबळ यायची. तिची फुप्फुसे कमकुवत झाली होती. हृदय कमजोर झाले होते. ती आपल्या शरीराची काळजी घेत नसायची. तिला हळूहळू काम करणे मान्य नसायचे. थकून-थबकून काम करणे आवडत नसायचे. रोज तास अर्धा तास तरी ती वेळ काढायची. कुणा-ना-कुणापाशी जाऊन बसायची. काही ना काहीतरी शिकत रहायची. कधी हिंदी शिकायचा प्रयत्न करायची. कधी इंग्रजी शिकायची. कधी गीतेचा अभ्यास करायची. 'रामचरित मानस' समजून घ्यायची. पंच्याहत्तर वर्षे वयाची कस्तुरबा. दहा वर्षे वयाच्या नारायण समोर बसायची. शिकत रहायची. नारायण हा महादेवभाईंचा मुलगा. धाकटा गुरुजी संकोचून-संकोचून जायचा.

'अग मी नवा शिक्षक आहे.' नारायण म्हणायचा. 'मीही तर नवीन विद्यार्थिनी आहे.' कस्तुरबा हसत-हसत म्हणायची. असा संवाद व्हायचा. ती गीता पाठ करायचा प्रयत्न करायची. त्या वयातही हा उत्साह कायम असायचा. ती श्रध्देने शिकायची. विनयाने शिकायची. गृहपाठ पूर्ण करायची. चुका झाल्या तर सुधारुन परत लिहायची. तिने कधी कंटाळा नाही केला. वृत्तपत्रे वाचून झाली की शिकवणी सुरु मग सूतकताई. रोज चारशे ते पाचशे तार सूत कातायची. आजारपणात अंथरूण धरावे लागायचे. या कामात मात्र खंड नसायचा. आश्रमात प्रार्थना व्हायची. त्यानंतर कातलेल्या सुताची नोंद व्हायची. तिचा नंबर सर्वात वरचा असायचा.

आश्रम अनेकांचे आश्रयस्थान होते. यासाठी कस्तुरबाने खूप मेहनत घेतली होती. ती चरख्यावर सूत कातायची. निवडत-पाखडत असायची. गांधीजींना सकाळी गरम पाणी आणि मध लागायचे. ती त्या तयारीला लागायची. गांधीजींचे होईपर्यंत तिथे थांबायची. तूपाचे निरांजन लावायची. अगरबत्ती लावायची. गीता पाठ करायची. तुलसी रामायण वाचायची. रामायण ऐकायला तिला भारी आवडायचे.

एकदा कस्तुरबा गंभीर आजारी पडली. शक्तीचा क्षय झाला होता. डॉक्टरांनी अंडी सेवन करायचा सल्ला दिला. निर्बीज अंड्यांची शिफारस केली. गांधीजी म्हणाले. 'अशी अंडी खाल्ल्यामुळे अहिंसा व्रताला बाधा पोहोचत नाही.' गांधीजींनी सांगितले.

'विनोबाला विचारा. त्याचा सल्ला जाणून घेऊ.' कस्तुरबा म्हणाली.

"निर्बीज अंडी फलित होत नाहीत हे खरे आहे. ती विकार उपजवणारी मात्र आहेत. ती अहिंसक दृष्टिने कदाचित बाधक नसतील. आध्यात्मिक दृष्टिने मात्र निश्चितपणे बाधक आहे. सबब हे सेवन करणे योग्य नाही." विनोबाने स्पष्टीकरण दिले.

कस्तुरबाने हेउत्तर ऐकले. अंडी सेवन न करण्याचा निर्णय तिने जाहीर केला. एके दिवशी गांधीजींनी विनोबाला बोलावले.

'कस्तुरला गीता शिकायची इच्छा आहे. तू वेळ देऊ शकशील काय?' गांधीजींनी विचारले.

'होय.' विनोबा उत्तरले.

रोज वेळेवर विनोबा हजर असायचा. त्याने आधी उच्चार शिकवले. पुढे अर्थ शिकवणे सुरु केले. पहिल्या अध्यायापासून शिकवायला सुरुवात केली नाही. बाराव्या अध्यायापासून सुरुवात केली. पुढे गांधीजींनी विवाहासाठी विधी तयार केला. त्यात हा अध्याय जोडून घेतला होता.

"कस्तुरबा-गांधीजींचा संबंध अद्वितीय स्वरुपाचा आहे. शास्त्रकारांनी एक विधी सांगितला आहे. नवदांपत्याने वसिष्ठ-अरुंधतीचे दर्शन घ्यावे. वसिष्ठ आणि अरुंधती दोघे तारे सोबत आहेत. नववधुला त्यांचे दर्शन वरासोबत करवले जाते. उभयतांचे जीवन वसिष्ठ-अरुंधतीसारखे व्हावे. निर्मळ, अनुशासित आणि एकमेकाना सोबत करणारे ठरावे असे सांगितले जाते. अरुंधती म्हणजे पतिच्या मार्गात रोध--अवरोध न करणारी पत्नी. अडथळा न आणणारी पत्नी. गांधीजी वसिष्ठ तर कस्तुरबा अरुंधती होती." विनोबा म्हणाले.

सेवाग्रामात नाना प्रकारचे लोक येत. शिवशंभूची वरातच का म्हणेनात ! एकदा काही हरीजन सत्याग्रही बंधू आपल्या काही तक्रारींच्या निवारणार्थ आले होते. ते थेट आश्रमात आले. गांधीजींनी सर्वांचे स्वागत केले. त्यांना कुठे थांबणे सोईचे होईल याचा त्यांनी विचार करुन घ्यावा, असे सांगितले. ते म्हणत असतील तर ते आपली कुटी त्यांना द्यायला तयार झाले होते. हरीजन बंधू म्हणाले की आम्हाला कस्तुरबांच्या कुटीत रहायला आवडेल. आता कस्तुरबाने कुठे रहावे असा प्रश्न निर्माण झाला होता. या निमित्त गांधीजी आणि कस्तुरबा यांच्यात असा संवाद झाला.

'तुम्हाला अधिक जागा द्यायची गरज भासणार नाही. मी स्वत: माझी कुटी त्यांना द्यायची तयारी दर्शवली होती.' गांधीजी म्हणाले.

'ती तुमची लेकरे आहेत. ना, मग तुम्ही असे केले यात काय नवल? तुमची कुटी द्या.' कस्तुरबा म्हणाली.

'अहो असे काय करता? माझी लेकरे ती तुमचीही लेकरेच ना? 'क्षणाचाही विलंब न लावता गांधीजी म्हणाले आणि खो खो करत खळाळून हसत सुटले. कस्तुरबा निरुत्तर झाली. हरिजन बंधुंसाठी तिची कुटी खुली झाली. मनही खुले झाले. तिच्या मनाच्या अंगणात लख्ख सूर्यप्रकाश सजला. हरीजन सत्याग्रही बंधू-बांधव कस्तुरबाच्या कुटीत थांबले. कस्तुरबा स्वत:च्याच कुटीत पाहुणी बनली. हरीजन सत्याग्रही बांधवांसोबत राहिली होती.

१४ डिसेंबर १९३४. गांधीजी सेवाग्रामात स्थिरावले होते. कस्तुरबा जवळपास अडीच वर्षे स्वतंत्र जीवन जगत होती. तिचे दौरे अखंडपणे सुरु होते. गांधीजींच्या सोबत बनारसला हरिजन सभेला तिने संबोधित केले. अहमदाबादला जाऊन आजारी रामदासची सुश्रूषा केली. रामदासची मुलगी सुमित्रा आजारी होती. तिच्या डोळ्यांचा उपचार करायला मुंबईला गेली. देवदासची मुलगी तारा आजारी होती. तिला भेटायला दिल्लीला गेली. रामदासच्या कुटुंबाची व्यवस्था लावायला मुंबईला गेली. हरीलालची कन्या मनुला घेऊन देवदासच्या घरी दिल्लीला गेली. देवदाससोबत सिमला येथे गेली. देवळाली येथे भरलेल्या ग्रामीण प्रदर्शनाला हजर राहिली. गांधीजी आणि महादेवभाई देसाई यांच्या सोबत बोरसद येथे गेली. स्वच्छता आणि सांडपाणी निचरा मोहिमेचा प्रचार केला. देवदास आणि कुटुंबियांची भेट घेतली. आपली नात मनू हिला सोबत घेतले. दिल्ली येथे गेली.

रास जवळील खेडा गाव चळवळीचे होते. गांधीजींनी ३१ जुलै रोजी जाहीर केले होते की कस्तुरबा आणि काही सहकाऱ्यांसह आपण कूच करु. तिथल्या अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी गमावल्या होत्या. साबरमती ते रास अशी कूच करण्यात आली होती.[२] ऑगस्ट रोजी कूच सुरु होणार होती. आदल्या रात्रीच १ ऑगस्ट १९३३ रोजी त्यांना अटक करण्यात आली. सोबत तेहतीस साथीदारही होते. सर्वांना साबरमती तुरुंगात ठेवण्यात आले. २ ऑगस्ट रोजी गांधी, कस्तुरबा आणि महादेवभाईना येरवडा येथे हलवण्यात आले.

भारतभर शेकडो लोकांनी सरकारचा वैयक्तिकरित्या प्रतिकार केला. अनेकाना अटक झाली. असहकार करणार नसल्याच्या शपथ पत्रावर देवदासने सही करायला नाकारले होते. त्याच्या विवाहाला काही आठवडेच लोटले होते. त्याला दिल्लीजवळ अटक झाली.

गांधीजींनी येरवडा तुरुंगात एक सवलत मागितली. सवलत होती हरिजनांसाठी कार्य करायची. ही नाकारण्यात आली. १६ ऑगस्टपासून गांधीजींनी याविरुध्द बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. सरकारने काही शर्तींवर सुटका करण्याचा प्रस्ताव मांडला. गांधीजींनी तो धुडकावून लावला. २० ऑगस्ट रोजी त्यांची प्रकृती खालावली. त्यांना ससून हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. गांधीजींनी 'आता आपण अधिक काळ जगत नाही.' असे मानून आपल्या वैयक्तिक तमाम वस्तु इस्पितळातील परिचारिकाना देऊन टाकल्या होत्या. १९२४ साली इथेच त्यांच्यावर एपेंडिसायटिसची शस्त्रक्रिया झाली होती. तीन दिवस लोटले. त्यांची तब्येत अधिक खालावली. त्यांना बिनशर्त मुक्त करण्यात आले. कस्तुरबा कैदेतच राहिली. आणखीही इतर काही स्त्रिया होत्या.

कस्तुरबाला त्या कार्यशील क्षणांच्या आठवणी येत रहायच्या. तुरुंगात उच्चभ्रू कुटुंबातील महिला होत्या. सामान्य कुटुंबातील स्त्रियाही होत्या. त्यांचे प्रमाण अधिक होते. चळवळ काय आणि तुरुंग काय. त्यांचा मोठा सहभाग होता. हे तिला अपार सुखावणारे सत्य होते. तिला पोलिसांचा लाठीमार झेलणाऱ्या भगिनी आठवत होत्या. कुमारिका आठवत होत्या. त्यांच्या हिमतीची आणि त्यागाची धडपणे नोंद इतिहासाने घेतली नाही हे शल्य तर तिच्या मनात खचितच असेल.

या काळातले एक मोठे संदर्भ साधन हरवले. तो म्हणजे या काळातला पत्र-व्यवहार. त्या काळी बाहेरच्या जगाशी पत्र हाच एकमेव दुवा होता. हे गांधीजींच्या लक्षात आले होते. ते पत्र पाठवूनच कस्तुरबाचे शिक्षण करत होते. प्रोत्साहन देत होते. गांधीजींच्या सचिवांनी ही पत्रे जपून ठेवली होती. तरीही ती आज हाती लागत नाहीत. गांधीजींचे धावते दौरे हे एक कारण. टपाल सेवेची अनुपलब्धता हे दुसरे कारण होय. पत्रे सेन्सार करायची कटु सरकारी व्यवस्था हेही एक कारण. आज ही सर्वच पत्रे काही उपलब्ध नाहीत.

संदर्भ

१) गांधीजींनी मीराताईला दिनांक २० सप्टेंबर १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५१ पृष्ठ १०८;

२) ब्रिटिशांच्या मालकीच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राच्या वार्ताहराने दिनांक २४ सप्टेंबर १९३२ रोजी लिहिलेले वार्तापत्र.;

३) गांधीजींनी श्री नारणदास गांधी यांना दिनांक ९ ऑगस्ट १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५१ पृष्ठ २३३;

४) गांधीजींनी एस्थर मेनन यांना दिनांक ११ नोव्हेंबर १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५१ पृष्ठ ४२३;

५) गांधीजींनी प्रेमाताई कंटक यांना दिनांक २२ जानेवारी १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५३ पृष्ठ १२५;

६) गांधीजींनी श्री नारणदास गांधींना फेब्रुवारी १९३३ रोजी पाठवलेलेपत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५३ पृष्ठ ३९३;

७) गांधीजींनी गंगाताई वैद्य यांना दिनांक २४ मार्च १९३३ रोजी लिहिलेले पत्र;

८) गांधीजींनी मीराताईला दिनांक ४ मार्च १९३३ रोजी लिहिलेले पत्र;

९) गांधीजींनी मीराताईला दिनांक ११ मार्च १९३३ रोजी लिहिलेले पत्र;

१०) गांधीजींनी श्री नारणदास गांधींना ८ मार्च १९३३ रोजी लिहिलेले पत्र.;

११) गांधीजींनी लक्ष्मी व मारुतीच्या विवाहप्रसंगी दिनांक ८ मार्च १९३२ रोजी दिलेला संदेश आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५४ पृष्ठ १५;

१२) गांधीजींनी मीराताईला दिनांक २ मे १९३३ रोजी केलेली तार आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ ८७;

१३) गांधीजींनी मीराताईला दिनांक ४ मे रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ १०९;

१४) गांधीजींनी मीराताईला दिनांक ६ मे १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ १३२;

१५) गांधीजींनी कस्तुरबाना दिनांक ७ मे १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ १४५;

१६) गांधीजींनी कस्तुरबाना दिनांक १० मे १९३३ रोजी केलेली तार आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ १७३;

१७) गांधीजींनी मीराताईला दिनांक ३ जून १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ १८९

❖❖❖

### ४) मगनवाडी आणि सेवाग्राम

१ ऑगस्ट १९३३ रोजी साबरमती ते रास कूच आरंभ झाली. साबरमती आश्रमाची आहुती दिली गेली. आश्रमाचा भंग केला गेला. सप्टेंबर १९३३ च्या उत्तरार्ध्दात गांधीजी वर्ध्याला गेले. सोबत साथीदार होते. त्यांना आता साबरमतीसारखा आश्रम पुनरपि नको होता. इमारती नको होत्या. श्री जमनालाल बजाज यांचे हे गाव. गांधीजी बजाजांच्या बागेतील अतिथीगृहात उतरले. त्यालाच आपले घर मानू लागले. गांधीजी चौसष्ट वर्षे वयाचे होते. अंगात जरा ताकद आल्यावर नोव्हेंबरमध्ये संपूर्ण भारताचा दौरा करायला त्यांनी सुरुवात केली. अस्पृश्यता उच्चाटनाचे मुख्य लक्ष्य होते. कस्तुरबा, महादेवभाई, प्यारेलाल व इतर सहकारी तुरुंगवासात होते. आता त्यांच्या समवेत नवे मदतनीस होते. प्रवासात नवे सोबती होते. नवीन वर्षात मीराताईची सुटका झाली. ती त्यांच्यात सामिल झाली. सेवाग्रामला गांधीजी आले. मगनवाडीहून पायी निघाले. सोबत एक बैलगाडी होती. मीराने विहिरीजवळ पेरुच्या बागेत बांबुच्या चटईच्या आधारे एक झोपडी बांधली. गांधीजींसाठी एका झाडाखाली चटई अंथरली होती. तिथे फक्त कस्तुरबा आणि लीलावती. दुसरे कुणी आले तर त्याला जेवण मिळणार नाही अशी परिस्थिती होती. गांधीजी व कस्तुरबा यांच्यासाठी होत्या दोन खाटा.

गांधीजींचे तीन आश्रम साबरमती, मगनवाडी आणि सेवाग्राम. १९३३ साली गांधीजी साबरमतीहून सेवाग्रामला आले. वर्षभर देशव्यापी हरीजन यात्रा केली. ३० ऑक्टोबर १९३४ रोजी राजकीय कार्यांपासून मुक्त झालेत. १९४६ सालापर्यंत इथेच ग्रामसेवेच्या दृष्टीने राहिले. कार्यकर्ता विकास, रचनात्मक कार्य आणि ग्राम सुधारणेवर लक्ष केंद्रित केले. कस्तुरबाची साथ-सोबत होती.

श्री जमनालाल बजाज यांनी वीस एकरांची संत्र्यांची बाग दान केली. ग्रामविकासाचा प्रयोग करण्यासाठी त्यांनी ही जमीन गांधीजींना देऊ केली होती. आपले मोठे घर दिले. मगनलालच्या स्मरणार्थ याला 'मगनवाडी' नाव देण्यात आले. मगनवाडी येथील स्वयंपाकघर पंचवीस-एक फूट लांबीचे होते. पश्चिमेकडील चौकात प्रवेशद्वार होते. स्वयंपाकघराच्या डावीकडे अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचे कार्यालय होते. हा पूर्व-पश्चिम असा लांबलचक भाग होता. पुढच्या भागातला मोठा ओटा बहुधा भोजनासाठी वापरात यायचा. मुख्य प्रवेशद्वाराच्या आजूबाजूला छोट्या-मोठ्या खोल्या होत्या. वर छत होते. उत्तरेकडच्या घरात पूर्वेकडे गांधीजींची बैठक असायची. पश्चिमेकडे कस्तुरबा व इतर भगिनी रहायच्यात. छतावर प्रार्थना व्हायची. गांधीजी तिथेच झोपायचे. त्यांच्या शेळीची धार काढण्यापूर्वी तिचे आचळ पोटेशियम परमंगनेटने स्वच्छ केले जाई. शेगावला गांधी कुटी विहिरीजवळच्या पेरुच्या झाडांच्या आसपास होती. कस्तुरबा तिथेच असायची.

१९३६ सालचा उन्हाळा आला. गांधीजींनी वर्ध्यापासून पाच मैल अंतरावर असलेल्या सेगाव येथे रहायचे ठरवले. ग्राम निवासासंबंधीची आपली कल्पना श्री जमनालाल बजाज यांना पत्रातून कळवली. या विषयीचे एक टिपण बजाज यांना पाठवले. त्यात म्हटले होते -

"कस्तुरची इच्छा असेल तर तिच्या सोबत नाही तर मी एकटा सेगाव येथे झोपडीत राहीन. ही झोपडी उभारण्यासाठी कमीत कमी खर्च करावा. तो शंभर रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये. ती उभारण्यासाठी मला जी काही मदत लागेल ती मला गावातून मिळवायची आहे. मी माझी बाह्य कामे चालू ठेवीन पण बाहेरच्या लोकानी मला तेथे भेटायला येऊ नये. मी ज्या दिवशी वर्ध्याला भेट देईन त्यावेळी तिथे त्यांनी भेटायला यावे."[१]

वर्धा शहरापासून काही मैल अंतरावर सेगाव. हे एक छोटे खेडे होते. गांधीजींचे अनुयायी श्री जमनालाल बजाज यांची तिथे जमीन होती. तिथे गांधीजी व कस्तुरबा राहणार होते. हरीलालचा मुलगा कांतीभाई आणि महादेवभाई वेगळ्या कुटीत राहणार होते. मीराताई आधीपासून तिथे झोपडी बांधून रहात होती. सेगावचे नामकरण सेवाग्राम झाले. कस्तुरबा कधी-कधी गुळपापडी, खवा वा पेढे तयार करायची. गांधीजी अधून-मधून त्याचे सेवन करत.

गांधीजींच्या सोबत कस्तुरबा, प्रभावती, बळवंतसिंग, मुन्नालाल आले. काही काळानंतर खान अब्दुल गफारखानही आले होते. तिथे 'आदि निवास' बनले. पुढे 'बा निवास' उभारले गेले. इथल्या भोजन

पंगतींचे एक वैशिष्ट्य होते. अखेरपर्यंत कस्तुरबा आणि गांधीजी स्वत: सर्वांना वाढत असत. आदि निवासाचे गांधीजींनी  केलेले वर्णन मोठे मनोरम आहे. तिथली कुटी चित्रासारखी सुंदर होती. एका कोपऱ्यात ते, दुसऱ्या कोपऱ्यात तुकडोजी आणि तिसरा कोपरा मुन्नालालचा होता. उरलेल्या कोपऱ्यात एक लाकडी बैठक होती.

आश्रमाचा परिसर चांगला वीस पंचवीस एकरांचा होता. छोट्या-छोट्या घरांमधून लोक रहात असत. त्या परिसरात स्वयंपाकघर होते. तिथे भाज्या चिरायला ओटा होता. जेवायला स्वतंत्र जागा होती. भांडी घासायला स्वतंत्र जागा होती. पाहुण्यांसाठी सोय होती. गोशाळा होती. सारे जवळपास होते.

गांधीजींना दुसरा आश्रम स्थापन करायचा नव्हता. त्यांना एकांत हवा होता. मातीची झोपडी उभारल्यावर त्यांच्यासमवेत सात लोक राहू लागलेत. उन्हाळ्यामध्ये कस्तुरबा आपली नात मनू हिच्या सोबत तिथे आली. वर्ध्याहून पाच मैलांचा धुळभरला मार्ग तुडवीत त्या पोहोचल्यात. गांधीजींच्या झोपडीत आधीच भरपूर गर्दी झाली होती. झोपडीच्या एका कोपऱ्यात त्यांना स्वत:साठी जागा मिळवायची होती. त्यांची स्वत:ची अशी झोपडी डिसेंबर १९३६ च्या सुमारास आकाराला येणार होती. या दरम्यान आपले नातलग आणि मित्र परिवाराला भेटण्याची योजना त्यांनी आखली होती.

सुरुवातीला एक तर घर होते. एक आदि निवास तेवढा होता. तिथे घरभर माणसे रहायची. कस्तुरबाने तिथे विश्रांती तरी कशी घ्यायची? ती संकोचून-संकोचून जायची. अखेर अगदीच न राहवून एके दिवशी म्हणाली, "तुम्हाला कसलेच काही वाटत नाही. कसला विधी निषेध नाही तो नाहीच पण आमचे काय? कधी केलात विचार? आणून या धर्मशाळेत दिले ढकलून. अहो, विश्रांती घ्यायची असते, कधी कपडे बदलायचे असतात. काही आडोसा नको का?" कस्तुरबाच्या निवेदनाला धार होती.

"हे बघ, आपण गरीबांचे प्रतिनिधी आहोत. यामुळे आपण सदैव अडचणीत रहाणे हेच शोभादायक आहे. आणि हो, आता तू म्हणतेच आहे.स तर थोडा आडोसा करुन देईन. बस? " गांधीजींनी उत्तर दिले. एवढे बोलून गांधीजींनी बळवंतसिंग या कार्यकर्त्याला हाक मारली.

'हे बघ, बांना इथे खूप त्रास होतो. ओट्यावर तिच्यासाठी ताटे लाऊन एखाद्या कोठरीसारखे करुन दे.' गांधीजी म्हणाले.

बळवंतसिंगाने ओट्याच्या ईशान्येकडील भिंतीत दोन भोके पाडलीत. तिथे बांबू अडकवलेत. या बांबूंना ताट बांधले. एक दार ठेऊन दिले. अर्ध्या-पाऊण तासात तर कस्तुरबाची स्वतंत्र खोली तयार झाली. गांधीजी म्हणाले की हा झाला बाचा महाल तयार. सोबत कस्तुरबाला घेतले आणि त्या खोलीच्या दारापर्यंत पोहोचले

'अरे व्वा ! हे तर खूपच सुरेख झाले.' गांधीजी खुश होत म्हणाले. 'चांगले आहे.' एवढे एक वाक्य कस्तुरबा कसेबसे बोलली. यावर तिने कायच प्रतिक्रिया व्यक्त करावी?

कस्तुरबा आदि निवासात रहात असायची. पुढे बापू कुटीतही सर्वांच्या सोबत रहायची. तिच्या आवश्यकतेनुसार पुढे कुटी बनवण्याची योजना आखली गेली.

कस्तुरबाची कुटी रेखीव होती. ती गांधीजींच्या झोपडीप्रमाणेच एका खोलीची होती. झोपडीचे छप्पर कौलांनी शाकारलेले होते. भिंती मातीच्या होत्या. जमीन शेणा-मातीने सारवलेली होती. झोपडीला व्हरांडा मात्र प्रशस्त होता. या कुटीत दगडी पायावर खांब होते. आत मातीच्या तळाऐवजी फरशी होती. खोलीत दोन दरवाजे होते. आलमारीत आश्रमाला लागणारे रोजचे सामान-सुमान असायचे. एका छोट्या खिडकीसारखी आलमारी होती. आलमारीचे तीन भाग होते. एकात कस्तुरबाचे कपडे असत. दुसऱ्यात नातवंडांचे कपडे. तिसऱ्या भागात नॅपकिन, टॉवेल, एखादी चादर. आलमारीत आश्रमासाठी लागणारे सारे सामान होते. बस, या घरात एवढाच काय तो परिग्रह होता. सोबत होते छोटेसे स्वयंपाकघर. स्वयंपाकघराचा उपयोग अधून-मधून येणाऱ्या पाहुण्यांसाठी आणि आजारी भगिनींसाठी केला जायचा. जेल यात्रेसाठी उपयुक्त सामानही या कुटीतच असायचे.

या कुटीत छोटेसे इस्पितळ होते. हे सेवा केंद्र होते. या कुटीत अनेक आजारी भगिनींची कस्तुरबाने सेवा बजावली होती. भिंतीत तीन कोनाडे होते. यापैकी एका कोनाड्यात श्रीकृष्णाची मूर्ती होती. दुसऱ्या कोनाड्यात कुंकवाचा करंडा होता. कस्तुरबा कृष्णभक्त होती. तिच्या भक्तीवर गांधीजींची श्रध्दा होती. यामुळे अद्वैताचे उपासक गांधीजींकडून ही अनुमती कस्तुरबाने मिळवली होती. बरे, या कुटीतही कस्तुरबा काही एकटी रहात नव्हती. तिचा नातू कान्हा तर असायचाच. तिसऱ्या कोनाड्यात असेच काही-बाही असायचे. मीराताई नेहमी तिथे येऊन रहायची. अन्य भगिनींचा तर नित्याचाच वावर होता. सेवाग्राम आश्रमातली कस्तुरबाची खोली १० x १२ ची होती. या खोलीला लागून एक छोटी खोली होती. कस्तुरबाजवळ एक पत्र्याची पेटी होती. एका कोनाड्यात कुंकवाने ॐ (ओंकार) चितारले होते. तिथे ती रोज दिवा लावायची. खोलीच्या मागल्या बाजूला बांबूच्या चटईने आडोसा केलेला होता. हे कच्चे बाथरुम होते. त्यात एका दगडावर बसून स्नान करायची सोय होती. नळ नव्हते. बादल्या पाण्याने भरलेल्या असत. पाण्याचा निचरा व्हायची सोय नव्हती. स्नान केल्यावरचे पाणी वहात नसायचे. तिथेच रेंगाळत रहायचे. मागे गुलाब होते. मेंदी होती. तिथवर ते पाणी थकत-थबकत पोहोचायचे. तिथे हात-पाय-तोंड धुता येत असायचे. स्नानासाठी विहिरीजवळ परत दोन-तीन न्हाणीघरे होती. सारी मंडळी बहुधा तिथेच स्नानाला जात असत. दिवसातून दोन एकदा बैल रहाट ओढत. जवळच पाणी खेळते रहाताना दिसत असायचे. सारेच आश्रमवासी आबालवृध्द स्त्री-पुरुष अगदी आरामात विहीरीतून पाणी ओढून काढत असत. अचानक विंचू येऊन पडत. सर्पांचे भय होतेच.

गांधीजी अमृत कौरला लिहिलेल्या एका पत्रातून लिहितात -

"बाची कुटी जवळपास तयार झाली. त्यात काहीसे शहरीपण-नागरीपण तर आहे. तशी तुला आवडेल. त्या कुटीसाठी माझ्या कुटीपेक्षा अधिक खर्च आला आहे. त्या कामी किमान शंभर रुपयांची तरी बचत करता आली असती एवढे मात्र निश्चित पण मी ती तयार होताना देखरेख ठेऊ शकलो नाही कारण की त्यासाठी वेळ द्यावा लागणार होता आणि तो मी देऊ शकत नव्हतो."[२]

आश्रम सामूहिक जीवनाचा प्रयोग होता. हे समूह जीवन आश्रमात चार विभागात विभागले गेले होते. पहिला भाग होता सामुदायिक भोजनगृहाचा. हे राष्ट्रीय एकात्मतेचे सर्वात मोठे साधन होते. दुसरी सामुदायिक क्रिया सफाईची होती. रोज आश्रमात आबालवृध्द स्त्री-पुरुष थोडा वेळ तरी सफाईच्या कामात घालवत असत. हे काम म्हणजे सांस्कृतिक क्रांतीचा ध्वज होता. तिसरा मुद्दा सामुदायिक सूत्र यज्ञाचा होता. हे समाज नवनिर्माणाचे चिह्न होते. चौथा सामुदायिक मुद्दा प्रार्थनेचा होता. आश्रमाची गोशाळा हेही आश्रमाचे एक महत्वाचे अंग होते. अनेक आश्रमवासियांचे आकाशाखाली झोपणे, नदीच्या गार पाण्याने स्नान करणे, छात्रालयात रहाणे, दिवसभरची कामे नियमितपणे करणे, तिथली नजरेत भरणारी स्वच्छता राखणे, पावनकारी घामाच्या धारा वहावणे ही सर्व कामे आश्रमात चालत असत.

आश्रमात कृषी कार्य, गो-पालन, खादी विद्येची प्रतिष्ठा होती. गांधीजींचे बौध्दिक, नैतिक आणि आध्यात्मिक मार्गदर्शन होते. कस्तुरबाची माया, ममता आणि वात्सल्य होते. आश्रमवासींचे कौशल्य, परिश्रम व निष्ठा होती. आश्रमातील यशापयश, सुख-दुःखे, पाप-पुण्य सामुदायिक मानले गेले होते. गांधीजींच्या मते आश्रमात मुख्य सहभाग नारी-सहभाग होता. प्रत्येक कामात व प्रयोगात नारी शक्ती सारख्याच क्षमतेने व योग्यतेने अग्रेसर होत होती. पर्दा प्रथा वा चेहरा झाकून घेईपर्यंत पदर घेण्याचा प्रकार स्त्रियांसाठी नव्हता. गांधीजींचा साधेपणा होता. उपयोगितावाद होता. गांधी शैलीला शाश्वतता आणि सौंदर्यबोधाचे अलंकरण होते.

गांधी आश्रमात श्रम प्रतिष्ठेला मोठा मान होता. हा अगदी दक्षिण आफ्रिकेपासून दिसून येतो. संपत्ती परिश्रमाने मिळवायला हवी. संपत्तीचे संरक्षण निढळाच्या घामाने व्हायला हवे. संपत्तीचे रक्षण करण्यासाठी रक्ताचे घामात रुपांतरण व्हावे. असे झाले नाही तर एक कुत्सित भाव उभा रहातो. घाम गळला की सात्विक सौंदर्याची उभारणी करता येते. या सुभग सुंदरतेने सारे विकार धुतले जातात. घाम दुर्भावनांना

पावन करणारे एक अद्भुत रसायन आहे. याच्या धारेसोबत मांगल्य नांदते. किल्मिष धुतले जातात. अशी गांधीजींची विचार सरणी होती. भारताला आश्रम ही काही नवीन कल्पना नव्हती. गांधीजींनी मात्र त्यात संकल्प भरला. संयम जागवला. मुख्य म्हणजे श्रमाला प्रतिष्ठा देण्याकामी सदैव अग्रेसर राहिलेत. या कामी कस्तुरबा त्यांच्या खांद्याला खांदा लावून चालताना दिसते. दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींच्या घरात नोकर नव्हते. परिश्रम व स्वावलंबनावर भर होता. भारतीय आश्रम परंपरेत हा एक नवा प्रवाह गांधीजींनी प्रवाहित केला. या श्रमयज्ञाच्या तटावर त्यांच्यासमवेत कस्तुरबा आहे. भारतीय परंपरेत या श्रमसाधनेचा आरंभ एका अर्थाने श्रीकृष्णाने केला. त्यांनी घोड्यांचा खरारा केला. गाई-गुरांचे संगोपन केले. खरकट्या पत्रावळी उचलल्या. श्रमाचे एकही काम हीन मानले नाही. श्रमाच्या महात्म्याच्या वेळी अग्रेसर राहिले. गांधीजींच्या सर्वच आश्रम परंपरेचे हे वैशिष्ट्य आणि वेगळेपण आहे.

दक्षिण आफ्रिकेत गांधीजींचे सहकारी आणि मित्र होते पारसी शेठ रुस्तुमजी. त्यांचे थोरले चिरंजीव जालभाई १९४० साली एकदा भारतात आले होते. गांधीजींच्या भेटीसाठी ते सेवाग्राम आश्रमात आले होते. त्यांना दुपारच्या विश्रांतीसाठी कस्तुरबाने आपल्या ओट्यावर बाज टाकून दिली होती. तिथे पाहुण्यांसाठी काही स्वतंत्र व्यवस्थानव्हती. गांधीजींच्या अनुमतीने १९४२ साली तिथे पाहुण्यांसाठी एका विश्रामगृहाची रचना झाली. याला मग 'रुस्तुम भवन' हे नाव देण्यात आले. या भवनाचा वापर नेहरू, सरदार पटेल यांच्या शिवाय काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य, आश्रमात येणाऱ्या अनेक देशी-विदेशी पाहुण्यांसाठी केला जाऊ लागला होता.

सेगाव आश्रमातील प्रार्थना आदि निवासाच्या उत्तरेकडे व कस्तुरबा कुटीच्या पश्चिमेकडे खुल्या जागेत व्हायची. गांधीजी दक्षिणाभिमुख बसायचे. छोट्या आसनावर छोटी गादी असायची. गांधीजींपासून अदमासे बारा फुटाच्या अंतरावर सारे आश्रमीय जन प्रार्थनेसाठी उत्तराभिमुख असायचे. बसायला खजुरच्या पानांची चटई असायची. गांधीजींच्या डाव्या हाताला भगिनी असत. उजवीकडे बंधु असायचे. प्रार्थनेसमयी कंदिलाची वात मंद केली जायची. शांत अंधकार सर्वत्र पसरायचा. दुसरी घंटा झाली की प्रार्थना सुरु व्हायची. पंख्याच्या आकाराचे चर्मवाद्य होते. दोन मिनिटांची शांतता व्हायची. 'प्रार्थना' असा आदेश व्हायचा. तंबोऱ्याच्या तारा झणझणायच्यात. 'ओम ईशावास्यामिदं सर्वं' सुरु व्हायचे. एकादश व्रतांचे गान व्हायचे. दिलरुबा सोबत भजने, धून व तुलसी रामायणाचा पाठ व्हायचा. 'सियावर रामचंद्र की जय' या घोषणेसोबत धून समाप्त व्हायची. रामायण पाठाच्या वेळी कंदिलाची वात वर केली जायची. सारे बंधु-भगिनी पाठात सामील होत.

आश्रमाचा परिसर चांगला वीस पंचवीस एकरांचा होता. छोट्या-छोट्या घरांमधून लोक रहात असत. त्या परिसरात स्वयंपाकघर होते. तिथे भाज्या चिरायला ओटा होता. जेवायला स्वतंत्र जागा होती. स्नानगृहे, शौचालये होती. भांडी घासायला स्वतंत्र जागा होती. पाहुण्यांसाठी सोय होती. सारे जवळपास होते. कस्तुरबाला या सबंध परिसरात हिंडावे लागायचे. ते ती आनंदाने करत असायची.

गांधीजींची आश्रम कल्पना वामनाच्या तीन पावलांसारखी आहे. पहिले पाऊल दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स व टॉल्स्टॉय फॉर्म. दुसरे गुजरातेत कोचरब व साबरमती. तिसरे महाराष्ट्रात सेगाव -- सेवाग्राम. तिसऱ्या पावलात समाज भयमुक्त आणि आशावान बनला. रचनात्मक कार्यक्रमांचा शंखनाद झाला. देश गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाला.

तीन वर्षांची भटकंती थांबली होती. कस्तुरबा आता स्वत:च्या हक्काच्या झोपडीत विसाव्याला आली होती. तिच्या मोठ्या परिवाराचा विचार करु जाता ही झोपडी तशी लहान होती. तिचा परिवार काही तिच्या गणगोतापुरता मर्यादित स्वरुपाचा नव्हता ना ! तो मोठा होता. जात-पात विरहित होता. १९३७ च्या डिसेंबर पर्यंत ही छोटी वसाहत एखाद्या छोट्या खेड्यासारखी दिसू लागली होती. या सामुदायिक जीवन पध्दतीच्या जगण्याला गांधीजींनी नवे नाव दिले होते 'सेवाग्राम'.

कस्तुरबा मानवतेची सगुण-साकार मूर्ती होती. तिच्या उपस्थितीमुळे आश्रम जीवन मधुर, खळाळते आणि सुप्रसन्न असायचे. गांधीजींचे जीवन तर तपाचरणाचे होते. तरी या तपातून ते ना उग्र बनले ना

शुष्क यात कस्तुरबाचा मोठा वाटा होता. तिच्याजवळ नम्रता होती. कठोर कर्तव्य परायणता होती. प्रखर निष्ठा व मनोबल होते. सहनशीलता होती. या गुणांपुढे गांधीजी लवून जात. ध्येयनिष्ठेमुळे गांधीजी कठोर पिता व वत्सल माता होते. संपूर्ण आश्रमाची आई तर कस्तुरबा होतीच. ती राष्ट्रमाताही बनली. गांधीजी तप्त मार्तंडासारखे दाहक होते. कस्तुरबा चंद्रासारखी शीतल होती. ती सावली करणारा ढग बनायची. ताप स्वत: झेलायची. लेकरांवर छाया करायची. ती ऊन झेलून पांथस्थाला सावली देणाऱ्या झाडासारखी होती.

संदर्भ


१) गांधीजींनी जमनालाल बजाज यांना दिल्लीहून
दिनांक १९ मार्च १९३६ रोजी लिहिलेले पत्र आणि
संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६२ पृष्ठ २८६;

२) गांधीजींनी अमृत कौर यांना सेवाग्राम वर्धा येथून
दिनांक ११ डिसेंबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र आणि
संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६४ पृष्ठ १३७.


❖❖❖

## ५) सेवाग्राम आश्रम विहारिणी

सेवाग्राम आश्रमात झोपड्या मातीच्या-बांबूंच्या होत्या. आश्रमात वीज नव्हती. सकाळ झाली म्हणजे कस्तुरची फेरी स्वयंपाकघराकडे निघायची. ती काही सूचना करायची. झाकपाक केली आहे. की नाही ते बघायची. भाजीपाला उघड्यावर राहू नये याची काळजी घ्यायला सांगायची. फळे खराब होणार असतील तर ती लगेच वाटप करुन टाकत असे. स्वयंपाकघरात सत्ता केवळ तिची असायची. स्वयंपाक हा तिच्या अधिकारातला भाग. ती सर्वांना काही पाठ शिकवायची. पहिला पाठ नियमित असावे. दुसरा सावधान असावे. तिसरा पाठ वागणूक चांगली असावी. चौथा सहयोगाची भावना राखावी. पाचवा पाठ स्वच्छता पाळावी. थेट रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकासारखे तिचे चिंतन असायचे. ती कधी भाजी चिरुन द्यायची. कधी फोडणी द्यायची. कधी दही घुसळून द्यायची. कधी लोणी कढत ठेवायची. खंडू मामा आणि मणीताई हे दोन हरिजन कार्यकर्ते स्वयंपाकाला मदत करायचे. गांधीजींना खाकरा आवडायचा. भाजल्या पापडासारखी ही पोळी असायची. उकळत्या भाज्यांचा रस असायचा. लसूण तर असायचीच. कधी-कधी शेळीचे दूध आटवून त्यात ती गूळ घालायची. ते चॉकलेट सारखे स्वादिष्ट लागायचे.

कस्तुरबा सदा-न्-कदा कामातच असायची. तिचा काम करायचा उत्साह आणि शक्ती बघून तर युवकाना लाज वाटायची. कधी चरख्यावर सूत कातत रहायची. कधी गांधीजींच्या सेवाकार्यात निमग्न रहायची. तिचे एकामागून एक काम सतत सुरुच असायचे. ती अखंड कर्मरत असायची. दुपारी ती गांधीजींच्या पायांना तूपाची मालीश करायची. गांधीजींचा डोळा लागेपर्यत तिथेच बसून रहायची. पंखा हलवत रहायची.

त्या दरम्यान आश्रमाचे सामूहिक स्वयंपाकघर होते. सदा न् कदा दूधी वा भोपळा उकडून तयार असायचा. दूधी वा भोपळा मुबलक प्रमाणात उपलब्ध असायचा. काहीसा स्वस्तही असायचा. ती स्वस्त भाजी होती. आश्रमात तिखट-मिठाला मज्जाव होता. उकडलेली भाजी दोन्ही वेळच्या जेवणात हमखास असायचीच. वाटले तर कुणी वरुन मीठ घेऊ शकायचा. या उकडलेल्या भाजीचा प्रभाव अनोखा होता. आश्रमात बऱ्याच महिलाना वात-पित्त प्रकोपाचा त्रास सुरु झाला. गांधीजींकडे तक्रार नोंदवण्याची कुणाची प्राज्ञा होती. कस्तुरबापर्यंत मात्र ही तक्रार पोहोचली. तिने पुढाकार घेतला मग कुठे बदल झालेत. आश्रमवासी जनाना तिखट-मिठाचा उपयोग करायची परवानगी मिळाली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सारे जेवायला जमले.

'तुमच्यापैकी कोण - कोण तिखट-मिठाची भाजी खाऊ इच्छिताहात? द्या आपापली नावे लिहून.' गांधीजींनी विचारले.

'या बाबतीत आपण लक्ष घालू नये. आम्ही भगिनी परस्पर आमचे काय ते ठरवून घेऊ.' असे म्हणत कस्तुरबा पुढे सरसावल्यात. दुसरा दिवस उजाडला. सुरेख फोडणी दिलेली खमंग भाजी प्रत्येकाच्या पानात सजली.

'काय हो? जमली का फोडणी? भाजी छान मसालेदार तर आहे. ना?' गांधीजींनी सहज शैलीत विचारले. गांधीजींनी खरे तर सहज गंमतीखातर हे विचारले होते. महिला संकोचून गेल्या.

'आणि तुम्ही काय कमी चटोर होतात होय? दर रविवारी भजी तर ठरलेलीच असायची ना? आणि पुरणपोळीचा आग्रह कोण धरायचे? विसरलात की काय सारे? ही तुमचीच कथा आहे. ना? बोला तरी काही.' महिलाना वाचवण्यासाठी कस्तुरबा पुढे यायची.

अशा वेळी गांधीजी शांत रहात. कस्तुरबाचे म्हणणे त्यांना स्वीकारावेच लागायचे. आपल्या क्षेत्रावर कस्तुरबाचा सर्वाधिकार होता. ती नि:संकोचपणे त्याचा अमल करायची. तसा अंमल करवून घेण्यात तिला मुळीच संकोच वाटत नव्हता. गांधीजींच्या कठोर नियमाना जनलोक घाबरत असत. अशा वेळी कस्तुरबा आश्रमाची ढाल बनायची. कस्तुरबाचा सर्वांना मातृवत आधार लाभायचा. महिलांचे इतके-इतके प्रश्न असत की काही विचारु नका. कस्तुरबा पुढे यायची. सर्वांना धीर द्यायची. मार्ग काढायची. महिलांच्या लहान सान मागण्या ऐकायची. गांधीजींना सांगायची. कस्तुरबाच्या मनात

कुणाविषयी पक्षपात नव्हता. ती सर्वांवर रागवायची. प्रेमही करायची. आदरही द्यायची.

आश्रमात जेवणाची घंटा घणघणायची. आश्रमात गांधीजींच्या हाकेनंतर शब्द या घंटेचाच झेलला जायचा. नाद झाला की सारे जमायचे. कस्तुरबा गांधीजींच्या शेजारी बसायची. तिची नजर सारखी त्यांच्या पानावर खिळलेली असायची. डाव्या हाताने पंखा सुरु असायचा. भोजन आटोपले की गांधीजी वृत्तपत्रे वाचायला लागायचे. मग ती लवंडुन जायची. दहा-पंधरा मिनिटांनी उठायची. हात-पाय-तोंड धुवायची. पेपर वाचायला घ्यायची. 'वंदे मातरम्' आणि 'गुजरात समाचार' मधून गुजरातच्या बातम्या समजून घ्यायची. साप्ताहिक 'हरिजन बंधू' वाचायची. हळूहळू वाचन पूर्ण करायची. देशाची खबरबात जाणून घ्यायची. गांधीजींचे विचार समजून घ्यायची. जगभरच्या घटना वाचायची.

पाच वाजता गांधीजींना सायंकाळचे भोजन वाढायची. ते फिरायला सायंकाळचे बाहेर निघायचे. ती आश्रमात आजाऱ्यांच्या भेटीला निघून जायची. धूळीचे साम्राज्य असलेले रस्ते होते. फिरुन गांधीजी परत यायचे. पायांवर धूळच धूळ साचायची. ते एका स्टूलावर बसून जात. कस्तुरबा खाली बसून त्यांचे पाय धुवायची. या कामात तन्मयता होती. अपार कौशल्यही होते. कर्मपूजा करणाऱ्यांना काम छोटे वा मोठे नसते. निम्न वा उच्च प्रकारचे नसते. त्यांच्या सेवाभावी स्पर्शाने तुच्छ वाटणारी कामेही उजळून निघतात, सुशोभित होतात. संध्याकाळी साडे सहाला प्रार्थना असायची. त्यावेळी प्रत्येक जण आपण कातलेल्या सूताची नोंद करायचा. रामधून व्हायची. त्या प्रार्थनेने सारे वातावरण मंत्रमुग्ध व्हायचे. कस्तुरबा नियमितपणे सूत कातायची. सायंकालीन प्रार्थनेनंतर सर्व जण आपण कातलेल्या सूताचा हिशेब द्यायचे. कस्तुरबाचे सूत सर्वाधिक असायचे. रोज साधारणपणे चार-पाचशे तार सूत ती कातायची. आरंभी तिच्या साड्या वजनाने जड होत्या. धुवायला गैरसोईच्या होत्या. गांधीजी अनेकदा म्हणत 'आण मी धुऊन देतो तुझी साडी. जड आहे. ती.' कस्तुरबाने अर्थात्‌च हे काम कधीही त्यांना सोपवले नाही.

सायंकालीन प्रार्थना पार पडायची. कस्तुरबा तिथेच बसून रहायची. आता तिचा दरबार सुरु व्हायचा. आश्रमातल्या साऱ्या बायका गोळा व्हायच्या. काही काळ थांबायच्या. दिवसभरच्या घडामोडींची चर्चा व्हायची. सारी वास्तपुस्त व्हायची. समाचारांचे आदान-प्रदान व्हायचे. थंडीचे दिवस यायचे. आश्रमातील हरिजन बंधू खंडू मामा यायचे. त्यांच्या सोबत मातीचे एक कुंड असायचे. ते कुंड मग आश्रमातल्या प्रार्थना भूमीवर ठेऊन जायचे. ती जणू काही शेकोटी होती. प्रार्थना सभेतील बैठक आटोपायची. कस्तुरबा मग गांधीजींच्या माथ्यावर मालिश करुन द्यायची. तळपायांना तूप लाऊन चोळायची. याचा चांगला उपयोग रक्तदाब नियंत्रणासाठी असायचा. तूप लाऊन झाल्यावर पाय स्वच्छ पुसायला लागत. नखात वा पायाच्या बोटांच्या बेचक्यात कुठे स्निग्धता राहू नये. ही काळजी कस्तुरबा वहायची. तिच्या कामात कौशल्य असायचे. व्यवस्थाप्रियतेचा आग्रह असायचा.

कस्तुरबा अतिशय सुबकतेने साडी नेसायची. डोईवरचा पदर तिने कधी ढळू दिला नाही. आश्रम स्वावलंबनाचे प्रतीक होता. मजूर असे कुणी नाहीच. आता तर गोशाळेची जबाबदारीही आश्रमवासियांवरच येऊन पडली होती. कस्तुरबाने गोशाळेतील आपली जबाबदारी उचलली. गाईंना खायला सुगम व्हावे म्हणून ती जात्यावर दळून द्यायची. मुखातून भजनांची रसवंती प्रवाहित असायची.

सेवाग्राम मध्ये प्रवेश केला तर आरंभी तिची कुटी असायची. पुढे मग गांधी-कुटी. ती आपल्या ओट्यावर बसून चरख्यावर सूत कातत असायची. ओळख असो वा नसो ती अभ्यागतांचे हसून स्वागत करायची. निवास भोजन वगैरे सोय करायची. गांधीजींशी तर अभ्यागत केवळ चर्चा करायला येत असत. बाकी साऱ्या मागण्या व अडचणी तीच सोडवून द्यायची. कॉंग्रेस वर्किंग कमेटीचे सदस्य येत. सारेच कस्तुरबाची अवश्यमेव भेट घेत. या सदस्यांमध्ये विशेषत्वाने सरदार, नेहरु, राजेंद्रबाबू, कृपलानीजी तर असतच. राजगोपालाचारीजी तर व्याहीच होते. कस्तुरबा सर्वांच्या इच्छेनुसार चहा-कॉफी द्यायची. यात सरहद गांधी तिचे विशेष स्नेही होते. बादशहा खान सहा फूटापेक्षा उंच होते. कस्तुरबा जेमतेम

चार फूट सहा वा आठ इंच उंच. दोघांचे अगाध मैत्र होते. पेशावरहून येताना बादशहाखान कस्तुरबाच्यासाठी बदाम, अक्रोड आणि ईराणची मऊ काळी खजूर आणायचे. कस्तुरबाच्या महिला मैत्रिणींमध्ये दादाभाई नौरोजींच्या तीन नाती, गोसीताई, खुर्शिदताई व पेटिटताई होत्या. कोट्यधीश सर जहांगीर पिटीट यांची कन्या मीठूताई होती. सरोजिनी नायडू होती. मोतीलाल नेहरुंची पत्नी स्वरुपरानी देवी होती. राजेंद्रबाबूंची पत्नी राजवंशी देवी होती. ही काही प्रमुख नावे. या मैत्रिणी होत्या. बाकी मग लेकी वा सुना. या सर्वांना कस्तुरबा आकर्षणाचा मध्यबिंदु होती. ती आश्रमात असली म्हणजे सणवार आठवून साजरे करायची. सण-उत्सव आले की तिचा उत्साह शिगेला पोहोचायचा. काही-ना-काही प्रसाद तयार व्हायचा. आश्रमभर प्रसाद वाटला जायचा. सर्वत्र आनंद आणि मांगल्य नांदायचे. श्री घनश्यामदास बिर्ला तर सतत म्हणायचेत की आश्रम म्हणजे शिवशंभुची वरात आहे. केवळ कस्तुरबा एक समजूतदार आहे. गांधीजीही म्हणत की त्यांच्या व कस्तुरबाच्या संपर्कात अगणित लोक येत. त्यांच्यापेक्षा कस्तुरबावर श्रध्दा बाळगणाऱ्या लोकांची संख्या अधिक असायची. कस्तुरबा आपल्या या फार मोठ्या कुटुंबाशी हिंदी, गुजराती भाषेतून बोलायची. गरज पडली तर बेधडकपणे इंग्रजीचाही वापर करायची. इकडून तिकडून ऐकलेल्या इंग्रजी शब्दांचा वापर करायची. कामचलाऊ स्वरुपाचा संवाद तर साधायचीच. पोलाकच्या पत्नीने (सौ. मिली पोलाकने)' मिस्टर गांधी : द मॅन ' हा ग्रंथ लिहिला आहे. यात कस्तुरबाच्या इंग्रजीचे वर्णन आले आहे. तिच्या मनात ना शंका होती ना दुविधा. ना भय होते ना अडचण.

तो दुसऱ्या महायुध्दाचा काळ होता. 'लाईफ' या नियतकालिकाचे वार्ताहर श्री लुई फिशर हे गांधीजींच्या भेटीसाठी आले होते. ते भोजनाला सोबत होते. ते कस्तुरबाला प्रथमच भेटत होते. ते लिहितात

"बा गांधीजींच्या शेजारी बसलेल्या होत्या. त्यांची छोटीशी कुडी आक्रसल्यासारखी वाटत होती. मी पाहिलेला तो सर्वात सुंदर चेहरा होता. प्रेमळपणा आणि भक्तिभावनेने तो भरलेला होता. चेहऱ्यावरील सुरकुत्यांवरुन आत्मिक तेज प्रकटत होते. हे आत्मिक तेज बांच्या व्यक्तिमत्वाचाच एक भाग होता."

"गांधीजींची न्याहरी आटोपल्यावर कस्तुरबा त्यांना एक टॉवेल व आयताकृती ऊंच, निमुळत्या गळ्याची व बूच लावलेली पाण्याची बाटली देत असत. हात धुतल्यावर ते जवळपासच्या शेतावर फेरफटका मारायला बाहेर पडत. कस्तुरबा त्यांच्याकडे काळजीपूर्वक लक्ष देत. आपल्या पतीबरोबर त्या एकही शब्द बोलल्याचे वा ते तिच्याशी बोलल्याचे आठवड्याभरच्या वास्तव्यात त्यांना आढळले नाही. भोजनाच्या वेळी किंवा प्रार्थनेच्या समयी त्या त्यांच्या डाव्या बाजूला बसत. त्या किंचित मागल्या बाजूला असत. पंख्याने वारा घालत. त्यांच्याकडे सातत्याने काळजीपूर्वक लक्ष देत असत परंतु ते तिच्याकडे क्वचित्च पहात असत. तरीही तिने सतत आपल्यासोबत रहावे असे त्यांना वाटे. त्या दोघांत पूर्ण सामंजस्याची भावना होती."[१]

हे विदेशी पत्रकाराचे निरीक्षण आहे. तटस्थ निरीक्षण आहे. प्रत्ययकारी निरीक्षण आहे. हे प्रातिनिधिक निरीक्षण आहे. यातून कस्तुरबाचा समर्पण भाव स्पष्ट होतो.

कस्तुरबाचे असे चित्रण प्रभावती जयप्रकाश नारायण यांनी रेखाटले आहे. त्या आश्रमात होत्या. त्या म्हणतात की बा आणि बापूंच्या निवासस्थानी एक स्वयंपाकघर होते. तिथे आश्रमात येणाऱ्या पाहुण्यांसाठी स्वयंपाक केला जाई. हळूहळू तिथे रोजच १५ ते २० माणसांचा स्वयंपाक तयार होऊ लागला. आश्रमातले काही लोक बांना स्वयंपाकात सहाय्य करत असत. तिथली बहुतांश कामे बा स्वतःच करत. पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यात त्यांना मनस्वी आनंद होत असे.

आश्रमीय जनांचे विविध विचार प्रवाह असत. यातल्या प्रत्येकाला गांधीजी उत्तर देत. त्यांचे समाधान करत. एवढ्या धामधूमीत त्यांचे हे काम होते. प्रेमाताई कंटक यांनी एकदा विचारले होते की आश्रमाचे सिध्दांत नेमके काय आहेत.? हे सिध्दांत जीवनाप्रती विरोधी वाटतात. याविषयी कृपया आपले मत कळावे. या पत्राच्या उत्तरादाखल गांधीजी लिहितात. त्यांच्यासोबत राहणारे सारे त्यांच्यासारखेच व्हायला हवेत असे अजिबात नाही. मुख्य म्हणजे ते इष्टही नाही. त्यांच्यासोबत असलेले

सरदार पटेल चहा पितात. चहा त्यांच्यासाठी औषध आहे. त्यांना कोण बरे रोखू शकतो? कस्तुरबा चहा पिते आणि कॉफीही पिते. तिला प्रेमाने ते चहा -कॉफी तयार करुन पाजूही शकतात.[२]

ऑगस्ट १९३७ ते ३१ मार्च १९३८ या काळात गांधीजींची तब्येत चांगली नव्हती. रक्तदाब वाढलेला असायचा. त्यांना दीर्घकालीन मानसिक विश्रांतीची गरज होती. ऑक्टोबरचा अखेरचा आठवडा होता. त्यांची तब्येत कलकत्ता येथे अचानक खूप ढासळली. १७ नोव्हेंबरपर्यंत त्यांना तिथेच थांबून रहावे लागले. ६ डिसेंबर १९३७ ते ७ जानेवारी १९३८ हा काळ ! त्यांनी मुंबईला जुहू तटावर विश्रांती घेतली. याच वर्षी ते कलकत्ता यात्रेत होते. चौफेर हिंसेचा उसळता दावानल होता. ईर्ष्या आणि द्वेषाची धगधगती आग होती. गांधीजींचा ईश्वर विश्वास मात्र अटळ होता. श्रध्देची ज्योत अकंप होती. ते सेवाग्राम आश्रमात आले. सारा आश्रम घाबरुन गेला. हिवाळ्यात तिथे चांगलीच थंडी असे. त्यांना खूप सर्दी झाली होती. त्या काळात ते खुल्या आभाळाखाली झोपायचे. तब्येत सुधारायला हवी. निदान हिवाळ्यात तरी बाहेर झोपता कामा नये. घरात झोपावे. असा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. रक्तदाब वाढला होता. गांधीजी काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हते. मीराताईने आपली खोली रिकामी करुन दिली. ती खोली खादीच्या कामासाठीही उपयोगात यायची. गांधीजींनी ऐकले नाही. त्यांनी मोठ्या खोलीत सर्वांच्या सोबतच झोपायचे ठरवले. खरे तर त्या खोलीची रया गेली होती. ती अक्षरश: चावडी झाली होती. आजारी माणसाला काही ती सोईची जागा नव्हती.

'बापू माझ्या झोपडीत झोपतील.' कस्तुरबा म्हणाली. कस्तुरबाची खोली लहान होती. गांधीजींच्या जवळ आणखी एक किंवा दोन माणसे झोपायची. कस्तुरबाने आपली खोली रिकामी केली. ती व्हरांड्यात आपला छोटा नातू कनु (रामदासचा मुलगा) याच्यासह झोपली. आपल्या पती व्यतिरिक्त दुसऱ्या लोकांसाठी खोली रिकामी करताना तिने मुळीच नाखुशी दाखवली नाही. आपल्या खोलीत झोपायचा आग्रह धरला. गांधीजींसोबत सेवेसाठी दोघे-तिघे त्या खोलीत झोपलेत. कस्तुरबाने हे सारे सहन केले.

दुसऱ्या दिवशी गांधीजींना अपराध्यासारखे वाटले. "बिचारी बा! तिला तिची खोली स्वत:साठी कधी वापरायलाच मिळत नाही. ही झोपडी मी खास तिच्यासाठी बनवून घेतली. मी स्वत: देखरेख करुन प्रत्येक बारीक-सारीक सोय करुन घेतली. तिच्या उतारवयात तिला थोडातरी आराम आणि एकांत मिळावा. असे मला वाटले. आता मी बळकावून बसलो. मी इथे आलो. याचा अर्थ तिला हे सारे सोडून द्यायला हवे असाच तर होतो. मी जिथे म्हणून जातो त्या जागेची लगेचच धर्मशाळा होते. याचे मला दु:ख आहे. तिला स्वत:ची अशी खोली कधी मिळाली नाही. तिचे सारे काही सुरुवातीपासून सर्वांसाठी होते. ती कधीही कुरकुर करत नाही. मी माझे म्हणणे तिच्यावर अक्षरश: लादत असतो. मला जे आवडेल ते मी करत असतो एवढेच नव्हे पण तिलाही तसे करायला भाग पाडतो."[३]

गांधीजींचे हे मत शब्दश: खरे आहे. यातून गांधीजी आपल्या कार्यशैलीवर प्रकाश टाकतात. कस्तुरबाच्या सहनशीलतेचा परिचय करुन देतात. ती आपले सारे उत्सर्ग करते. याविषयी कुठली तक्रार कधी करत नाही.

अमृत कौरला गांधीजींनी पत्रातून लिहिले. अगदी बाळपणापासूनच त्यांनी प्रयोग केला. ते नारीला तिचा आत्मगौरव अनुभवायला समर्थ बनवण्याकामी कार्यरत राहिले. एक काळ असा होता की ते स्वत: दास -प्रभु होते. अर्थात् बाने कदापि स्वेच्छेने दासी बनायला मान्य केले नाही. अशाप्रकारे त्यांचे डोळे उघडले. ते जीवनाच्या महत् उद्देश्याला जाणून घेऊ शकले होते. [४]

कालचक्र आपल्या गतीने भिरभिरत होते. काळ, काम आणि वेग याचे प्रमाण निसर्गमान्य गतीने अविरत सुरु होते. कस्तुरबा तुरुंगात होती. इकडे दोन विवाह संपन्न होणार होते. ७ फेब्रुवारी १९३९ रोजी विजया पटेल हिचा विवाह मनुभाई पंचोली यांच्याशी आणि शारदाबेन शहा हिचा विवाह गोरधनदास चोखावाला यांच्याशी होणार होता. या विवाहाशी कस्तुरबाचे अंतरंग नाते होते. ती कन्यादानासाठी उपस्थित रहायला हवी होती. एकटे गांधीजी कन्यादान करणार होते. कस्तुरबा राजकोट सत्याग्रहानिमित्त त्रंबाला नजरकैदेत होती. याचे शल्य त्यांच्या मनी होते. ते आपल्या पत्रातून लिहिताहेत. विवाहासारखा मांगलिक प्रसंग आहे. कस्तुरबासारखी

गृहकृत्यदक्ष माता. नात्या-गोत्यांच्या नाना वेटोळ्यात गुंफलेली आणि गुंतलेली कस्तुरबा. अनेकांवर तिने अपत्यवत् प्रेम केलेले आहे. माया लावलेली आहे. उद्याच्या या प्रसंगात तिची गैरहजेरी हा विषय मनाला वाईट वाटेल असाच आहे.[५] कस्तुरबा उपस्थित नाही याची वेदना गांधीजींच्या पत्रातून वाचता येते.

सेगाव आश्रमातला पहिला विवाह प्रसंग. एक सजातीय तर दुसरा आंतरजातीय. विजया-मनू आंतरजातीय तर शहा व चोखावाला सजातीय विवाह होता. आश्रमातल्या विहिरीपाशी पेरुची झाडे होती. तिथे मंडपाशिवायच सावली असायची. गांधीजींच्या शेजारी एक पाट मांडण्यात आला होता. पाटावर कस्तुरबाचे प्रतीक म्हणून गुलाबाचे फुल ठेवण्यात आले होते. पुरोहित होते नानाभाई भट्ट. गांधीजी म्हणाले 'हे कस्तुरचे प्रतीक.' काट्यांच्या सिंहासनावर विराजित गुलाब. कस्तुरबाने तापल्या उन्हाच्या झळा सोसल्या. तिच्या मनाच्या गुलाबाच्या पाकळ्या कधी कोमेजल्या नाहीत. वातावरणातले हलाहल तिने पचवले. निळकंठाची शिवता ती ल्याली. तिचे प्रतिनिधित्व करणारे हे गुलाबपुष्प. कस्तुरबाचे सार्थक प्रतीक. पुष्पांच्या दुनियेतला अनभिषिक्त सम्राट! हे शुभंकर गुलाबपुष्प. शिव व सुंदराचा नयनाभिराम आविष्कार. शिवंकर आणि शुभंकर असे गुलाबपुष्प. ते सत्याच्या पाटाच्या शेजारी बसले. विवाह विधी संपन्न होत होता. कस्तुरबा त्रंबाला होत्या. तिला ही माहिती मिळाली. तिचे नेत्र पाणावले. रामरायाने अश्वमेध यज्ञ केला. त्यावेळी जानकीचा दुसरा वनवास सुरु होता. राम एकपत्नीव्रती होता. त्याने आपल्या नजिक सीतेची सुवर्ण प्रतिमा स्थापित केली होती. गांधीजींनी कस्तुरबाचे प्रतीक म्हणून गुलाबपुष्प ठेवले होते. गांधीजींना भरुन आले. कस्तुरबाला गलबलून आले होते.

श्री जमनालाल बजाज यांची कन्या मदालसा हिचा विवाह श्रीमन्नारायण यांच्याशी झाला. तारीख होती ११ जुलै १९३७. बच्छराज भवनासमोरच्या प्रांगणात हा विवाह संपन्न झाला. त्या दिवशी मुसळधार पाऊस कोसळत होता. गांधीजी नियोजित वेळेवर कस्तुरबाच्या समवेत मंडपात उपस्थित झाले. आश्रम पध्दतीनुसार विवाह संस्कार तासाभरात संपन्न झाला. या दरम्यान गांधीजी चरख्यावर सूत कातत बसले होते. वर-वधुंनी नमस्कार केला असता आशीर्वाद मागितले. गांधीजींनी वर-वधुंना स्वत: कातलेल्या सूताच्या माळा घातल्या. त्याच दिवशी संध्याकाळी भोजनासाठी सेवाग्रामला यायचे निमंत्रण दिले. कस्तुरबाने आनंद व्यक्तवला.

६ डिसेंबर १९४०. आश्रमात एक अद्भुत विवाह संपन्न झाला. वर-वधु उभयता दक्षिण भारतीय होते. वर श्री वेलायुधन त्रिवांकुरचे होते. वधू दाक्षायिणी कोचीनची होती. दोघे सुशिक्षित होते. दोघे हरीजन होते. भिन्न-भिन्न जातींचे होते. हा विवाह सोपा नव्हता. यामुळेच वेलायुधन गांधीजींच्या आश्रयाला आले होते. या विवाहाचे पौरोहित्य श्री परचुरे शास्त्रींनी केले. शास्त्रीजींच्या कुटीसमोर यज्ञवेदी स्थापिली गेली. कन्यादान गांधीजींनी केले. ना थाटमाट ना वेळेचा अपव्यय. ना आडंबर ना गर्दी-गोंधळ.

गांधीजींचे पुत्र रामदासचा विवाह आश्रमात झाला. या प्रसंगी गांधीजींनी हे जाहीर केले की हा आश्रमातला अखेरचा सजातीय विवाह होय. यापुढे वर-वधुपैकी एक हरीजन असेल असाच विवाह इथे संपन्न होईल. आश्रमाने या कामी नेतृत्व करावे. वयाच्या वीस वर्षांपर्यंत कन्येचा विवाह करु नये. पंचवीस वर्षे पूर्ण होईपर्यंत न झाल्यास अधिक उत्तम !

कस्तुरबाला रामायणाची मोठी गोडी होती. रामायण श्रवण आणि अर्थ ग्रहणात तिला खूप रस होता. चंपारण्यात निळीचा सत्याग्रह सुरु होता. या दरम्यान तिने मोडकी-तोडकी हिंदी शिकून घेतली होती. पुढे राजेंद्रबाबू आणि त्यांच्या पत्नी राजवंशी तिचे विशेष मित्र बनले. स्वत: राजेंद्रबाबू कस्तुरबाला रामायण शिकवत असत. कस्तुरबाचा तुलसी रामायणावर विशेष लोभ होता. सेवाग्रामला तर कामांची कोण लगीनघाई असायची. सायंकाळच्या प्रार्थनेत रामायणाचे वाचन व्हायचे. तेवढा भाग ती आधीच वाचून घ्यायची. तयारीनिशी प्रार्थनेला जायची. प्रार्थनासमयी सस्वर गाईल्या जाणाऱ्या रामायण पठनात सहभागी व्हायची. तिचा कंठ मधुर होता. तिला भागवत पठन-पारायणाचीही गोडी होती. दोन-तीनदा तिने संपूर्ण 'रामायण' आणि समग्र 'भागवत' ग्रंथाचे पारायण केले होते. ती अशिक्षित होती. हे सर्व प्रचलित तथ्य आहे. आपल्या वाचनातून गांधीजींच्या

कार्य कर्तृत्वाशी संबध्द असायची. दुष्काळाशी संबंधित बातम्या ऐकून तिने सेवाग्रामच्या पत्रात लिहिले, 'बंगालची वार्ता ऐकून तिचे हृदय विदीर्ण झाले. तिथे तर आभाळच फाटले आहे. देवाच्या मनात न जाणो कायच आहे.?' कस्तुरबाची वैयक्तिक संवेदना अशी व्यापक बनली होती.

सेवाग्राममधे कस्तुरबाला आपल्या पतीसोबत कोणताही खास वेळ घालवायला मिळत नसायचा. गांधीजींच्या महिला सहकाऱ्यांशी ती अत्यंत खेळीमेळीने वागायची. काही महिला गांधीजींची अतिशय वैयक्तिक स्वरुपाची सेवा करायच्यात. अगदी कस्तुरबानेच कराव्या अशा काही सेवा होत्या. त्यासुध्दा इतर महिला करत. ते तिने सहन केले. अनेक महिला तिच्या कामात वाटेकरी व्हायच्यात. आपण कस्तुरबाला खूप दु:ख दिले आहे. यापुढे अधिक दु:ख देण्याची आपली इच्छा नाही असे गांधीजींनी ठरवले. आपल्या नवऱ्याने मुलींकडून सेवा करवून घ्यावी. हा आग्रह तिनेही धरला होता. त्या महिलाना समजून घेणे तिला जमले होते. काही महिला तर तिच्या अधिक जवळच्या होत्या. त्या महिलांशी तिचा मुक्त संवाद होता. काहींशी तर तिचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्यापासून दूर जाणे तिला स्वत:लाही कधी आवडत नव्हते. गांधीजींनी त्यांच्या सहकार्यापासून वंचित रहावे असेही तिला वाटत नसायचे.

त्यांच्यापैकी एक, प्रभावती नारायण. त्या सांगतात की थंडीच्या दिवसात पहाटे चारची प्रार्थना आटोपायची. त्या कस्तुरबांच्या खोलीत जात असत. कस्तुरबा नेहमी आग्रह करत असत 'प्रभा जा आणि थोडा वेळ झोप.' अगदी गोठवून टाकणाऱ्या थंडीतसुध्दा कस्तुरबा स्वत: खोली झाडून काढायच्या. स्नानासाठी पाणी तापवायच्या. झाडणे, पुसणे आवरले की प्रभावतीला उठवायला यायच्या. त्यांच्या स्नानासाठी गरम पाणी नेहमीच तयार ठेवायच्या. "सबंध जगभरची माणसे येतात. तुमच्याशी बोलतात. आपल्या मनीचे गुज सांगतात. मी तुमची बायको आहे. मी तर सदा-न्-कदा तुमच्या सोबतच रहाते. मला मेलीला काही तुमच्याशी गूज करायची संधी कधी लाभत नाही. मला बोलता येणे शक्य नाही. मलाही तर माझे मन मोकळे करायची संधी हवी. माझे अज्ञान घालवण्याची संधी लाभायला हवी, होय ना? बाहेरच्या लोकाना माझ्या विषयी ईर्ष्याभाव वाटत असेल. मी तर महात्म्याची पत्नी असे वाटत असेल. मला तर आपल्याशी सविस्तर बोलायला खूप संधी लाभत असतील. मला ज्ञानप्राप्ती करुन घेणे सहज शक्य होत असेल पण माझे दु:ख कोण बरे जाणतो? मला तर पाच मिनिटेसुध्दा आपल्याशी बोलायला संधी लाभत नाही. ही वस्तुस्थिती आहे. खरे ना?" एकदा कस्तुरबाने गांधीजींना सांगितले.

'खरे आहे. तुझे म्हणणे. तुझ्याशी बोलायला मी अवश्य वेळ काढायला हवा. तू सांग बरे तुला किती वेळ हवा?' स्नेहाने गांधीजींनी विचारले. 'मी आता यावर कायच बोलू? आपण पहाटे चार वाजता उठता. रात्री उशिरा झोपता. या दरम्यान सातत्याने लोकांना भेटता. लेखन-वाचन करत असता. यातून तुम्हाला तर क्षणभराचाही अवकाश लाभत नाही. यावर तुम्ही मला वेळ द्यावा असे मी तरी कुठल्या तोंडाने म्हणू शकते? हे तर आपणही जाणताच ना?' कस्तुरबा संकोचून म्हणाली.

'आता पुढे रात्री झोपी जाताना माझ्या डोक्याला बदामाच्या तेलाची मालीश करायचे काम तू करत जा. त्याच वेळी माझ्याशी बोलायला तुला वेळ मिळू शकेल. आजपासून दुसरा कुणीही मला तेलाची मालीश करुन देणार नाही. जर तुला सवड नसेल तर तू सांगशील तरच दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती आपण करु या.' गंभीर होत गांधीजी बोलले.

दोघांच्या ठायी एवढी दगदग असतानाही असा मनमुक्त संवाद होत असायचा. या क्षणाला विस्तारित करायची किमया कस्तुरबाला साधली होती. सुखाला मोठे करावे आणि दु:खाला क्षुद्र करत रहावे. हा पदार्थपाठ ती शिकली होती. तिच्या सुखी दांपत्य जीवनाचे हे एक रहस्य होते.

एके दिवशी सेवाग्राम मध्ये काही प्रचारक गांधीजींना भेटायला आले होते. या गप्पांच्या दरम्यानच कस्तुरबा गांधीजींसाठी संत्र्याच्या रसाचा प्याला घेऊन तिथे दाखल झाली. तिने रसाचा प्याला गांधीजींच्या हाती ठेवला. गांधीजी चमच्याने तो रस ढवळू लागले होते. त्यांनी कस्तुरबाला तुम्ही काही घेतले का? असा

प्रश्न केला. सहजतेने कस्तुरबा उत्तरल्या की आधी त्यांनी तर घ्यावे. ती नंतर घेईल.

'असे का करता हो? तुम्हाला माझ्या आधी न्याहरी करुन घ्यायला हवी.' गांधीजी हसत म्हणाले. 'असे का बरे?' न कळल्यासारख्या होत कस्तुरबाने विचारले.

'असे का विचारताहात? तुम्ही माझ्यापेक्षा मोठ्या नाहीत काय? ' गांधीजी हसत म्हणाले. यावर कस्तुरबा लाजली.

आश्रमात सर्वांना मदत करण्यासाठी कस्तुरबा सदैव तत्पर असायची. आश्रम तिचे घरच होते. आश्रमातील सर्वच निवासींना ती आपले लेकरुच मानायची. यामुळे घरात ज्या प्रमाणे आई सर्वांची काळजी घेते तशी ती सर्वांची काळजी घ्यायची. कधी आश्रमात एखादे व्याख्यान आयोजित केलेले असायचे. काही कार्यक्रम असायचा. कुणी विशेष अतिथी आलेले असायचेत. कुणाशी आश्रमवासियांच्या मुलाखतीचा काही कार्यक्रम असायचा. कस्तुरबा धावत स्वयंपाकघरात शिरायची. सर्व कार्यकर्त्या बंधु-भगिनींना हाक मारली.

"तुम्ही सारे कार्यक्रमाला जा बरे. तुम्ही सारे तरुण आहात. तुमच्या ठायी बघायचा-ऐकायचा-समजून घ्यायचा अधिक उत्साह आणि रस आहे. तुम्हाला हे सारे उपयोगी आहे. इथली काळजी करु नका. मी इथले सारे काम सांभाळून घेईन. निघा बरे तुम्ही सारे जण." कस्तुरबा आत्मीयतेने म्हणायची.

आश्रमात एकदा श्री अमृतलाल नानावटी गांधीजींना काही सांगत होते. त्या दरम्यान कस्तुरबा तिथे पोहोचली. गांधीजींना विचारले, 'काय चर्चा चालली आहे. एवढी?' कस्तुरबाच्या मनात सहजच उत्सुकता जागली होती.

'काही नाही, थोडे खासगी आहे.' गांधीजी स्मित करत म्हणाले. 'या जन्मात सांगणार नसाल तर कुण्या जन्मी सांगाल?' कस्तुरबाच्या या प्रश्नातच उत्तराची अपेक्षा आणि साक्षात् उत्तरही होते.

एकदा श्री गुरुदयाल मल्लिक आश्रमात आले होते. ते शांतिनिकेतनमध्ये शिक्षक होते. निरोप घेताना कस्तुरबाने त्यांच्या हाती एक पार्सल ठेवले. तिच्या चर्येवर हास्य होते.

'उद्या सायंकाळी तुम्ही शांतिनिकेतनला पोहोचाल. रस्त्यात काही खायला नको का? मी तुमच्यासाठी ही डबल रोटी तयार केली आहे. इथे आम्ही हा नवा प्रयोग सुरु केला आहे. खाऊन मला पत्राने कळवाल.' कस्तुरबा म्हणाली.

कस्तुरबाची दुबळी शारीरिक अवस्था बघून अनेकदा गांधीजी तिला सांगत असत ' अग, तुझ्या इतक्या मुली असतानाही तू सारखी धावपळ करतेस हे काही बरोबर नाही. कशासाठी तू एवढी धावपळ करतेस कोण जाणे?' यावर कस्तुरबाचे काहीही उत्तर नसायचे. खूप आजारी असली तरच आपल्या हातून होऊ न शकणारे काम ती इतरांना सोपवत असायची. थोडी अनुकूलता वाटू लागली की ताबडतोबीने ते काम इतरांच्या हातून काढून घेऊन आपल्या हाती घ्यायची. कस्तुरबा आश्रमवासिजनांना आपले कुटुंबीजन मानायची. यामुळे अनेकदा इतरांसाठी तिला भांडावेही लागायचे. तिचे अंत:करण हे मातेचे ममताळू अंत:करण होते. यात तिला खूप सुख आणि अपार आनंद लाभत असायचा. अनेकदा तर ती आईप्रमाणेच आपल्या आचरणाने आपल्या भोवतालच्या लोकांना शिकवत समजावून सांगत असायची.

आश्रमात कुणी आजारी पडले की कस्तुरबा धावून जायची. विचारपूस करायची. सेवा करायची. गप्पा मारायची. ती स्फूर्तीचा झरा होती. तिला खेळ आवडायचे. कॅरम खेळायला तिला भारी आवडायचे. पिंगपाँग खेळ आवडायचा. आश्रमातील मुला-मुलींशी खेळायला तिला आवडायचे. ती कामापुरते बोलायची. कामाचेच बोलायची. पेटली की अंगार व्हायची. गती घेतली की वाऱ्यासारखी धावायची.

एकदा आश्रमात एक कन्या आजारी पडली होती. तिच्या सेवा सुश्रूषेसाठी एका भगिनीची नियुक्ती केली गेली होती. ती त्या आजारी भगिनीची सेवा सुश्रूषा करायची. कमोडही स्वच्छ करायची. एके दिवशी सेवा करणारी भगिनी कमोड स्वच्छ करायचे काम विसरुन गेली. संध्याकाळपर्यंत ते पात्र तसेच होते. कस्तुरबाने आपली कामे आटोपली. त्या आजारी कन्येचा तपास करायला निघाली. तिचे लक्ष अस्वच्छ कमोडकडे

गेले. यावर तिने कुणालाही काहीही सांगितले-सवरले नाही. लगबगीने स्वत:च ते कमोड स्वच्छ केले. सुयोग्य ठिकाणी ठेऊन दिले.

तिच्यासाठी वेगळ्या शौचालयाची सोय करुन देण्याचा विचार गांधीजींच्या मनात होता. अन्य कार्यकर्त्यांच्याही मनात होता. कस्तुरबा मात्र ऊन असो वा पाऊस, थंडी का असेना सदैव सर्वांसाठी तयार केलेल्या शौचालयाचाच उपयोग करायची. आपले रात्रीचे लघवी पात्रही स्वत:च स्वच्छ करायची. कस्तुरबाच्या खोलीत तिच्यासमवेत दोन-तीन मुली तर नेहमी असायच्यातच. आपले कुठलेही काम तिने कधी त्यांच्याकडून करवून घेतले नाही. एवढेच नव्हे पण कधी एखाद्या कन्येला झाडू मारायला उशीर झाला असे ध्यांनात आले तर ती लागलीच स्वत: हाती केरसुणी घ्यायची. स्वच्छता करु लागायची. सकाळी लवकर उठायची. दात घासताना गरम पाणी लागायचे. ती स्वत:च स्वयंपाकघरात जायची. आपल्यासाठी लागणारे गरम पाणी स्वत: तयार करुन घ्यायची. दात घासण्यासाठी कडु निंबाची काडी असायची. तिलाही स्वत:च कांडून मऊ करुन घ्यायची.

एकदा कस्तुरबा आजारी होती. डॉक्टरांनी तिला पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला होता. गांधीजींनी सांगितले की तिच्या भोजनाचे पान अम्तुस्सलाम इथेच घेऊन येत जाईल. कस्तुरबा म्हणाली की ती तर भोजन कक्षातच येऊन भोजन घेणार आहे. याचे मुख्य कारण असे होते की या दरम्यान गांधीजींच्या पानावर तिला लक्ष देता येणे शक्य होत होते. आपले लक्ष नसता गांधीजी भोजन घेताहेत ही कल्पनाच तिला सहन होणारी नव्हती. ती गांधीजींच्या भोजनाची वेळ अचूकपणे जपायची. या कामी क्षणभराचाही विलंब तिला मान्य नव्हता. गांधीजी जेवत असत त्यावेळी ती त्यांच्या शेजारीच बसून असायची. गांधीजींचे भोजन पूर्ण होईपर्यंत ती तिथून हलतही नसायची.

गांधीजींनी तिच्या कुटीतच कमोडची सोय करुन दिली होती. कस्तुरबाचा या गोष्टीला खूप विरोध होता. गांधीजींनी तिचे काही एक ऐकले नाही परिणामी कमोड तिथे ठेवला गेला होता. अंजनादेवी नावाच्या एका कार्यकर्तीवर तो कमोड स्वच्छ करायची जबाबदारी सोपवण्यात आली होती. पहिल्या दिवशी तर कस्तुरबा त्या भगिनीला काही बोलली नाही. दुसऱ्या दिवशी मात्र या कामाला तिने कडाडून विरोध केला.

‘ताई ग, मला मुळी कमोडची आवश्यकताच नाही. मी आपली सार्वजनिक शौचालयाचा उपयोग करीन. गांधीजींनी जबरदस्तीपूर्वक हे इथे ठेऊन दिले आहे.’ कस्तुरबा म्हणाली. अंजनादेवींनी खूप आग्रह केला. कस्तुरबाने काही एक ऐकून घेतले नाही. संध्याकाळी गांधीजी कस्तुरबाच्या भेटीसाठी आले. अंजनादेवी तिथेच होत्या. गांधीजींना सारे काही समजले.

‘काय अंजना, नापास झालीस ना तू? कस्तुरबाने जर उत्तीर्ण करुन दिले तर शंभर टक्के उत्तीर्ण समजावे.’ गांधीजी हसत-हसत म्हणाले.

हे ऐकून कस्तुरबा म्हणाली की तिला जर कमोडचा उपयोग करायचा असेल तर ती स्वत:च तो स्वच्छ करुन ठेवील. तिने तसेच केले. कस्तुरबा इतरांची सेवा करण्यात खूप तत्पर होती. तिने कधी कुणाकडून आपली सेवा करवून घेतली नाही.

एकदा कस्तुरबाच्या आजारपणात तिच्या पुढ्यात एक ग्लास दूध देण्यात आले. दूधाचा रंग बघून तिने ते दूध घ्यायला नकार दिला. गांधीजींनी एका सेविकेला कस्तुरबाला दूध आणि द्राक्षे द्यायला सुचवले होते. त्या सेविका भगिनीने द्राक्षांचा रस दूधात मिसळून दिला होता. द्राक्षे तांबड्या रंगाची होती. दूध तांबूस दिसत होते. कस्तुरबाला ते घ्यावेसे काही वाटले नाही.

‘हे दूध नसून औषध आहे. असे समजून पिऊन टाक.’ गांधीजी म्हणाले. हे ऐकल्यावर मात्र कस्तुरबाने ते तांबूस वर्णाचे दूध घटाघटा प्राशन करुन टाकले.

एकदा कस्तुरबा आजारी होती. आश्रमात खूप लोक रहात असत. त्यात आजारी लोकांची विशेष देखभाल करायचे काम गांधीजी स्वत: करत असत. त्यांच्या नजिकच्याच कुटीत आजारी कस्तुरबा होती. गांधीजी तिच्या भेटीसाठी दिवसातून दोन-एकदा तर सहज जात असत. एके दिवशी काही अटळ अशी महत्वाची कामे होती. गांधीजींना तिच्या भेटीसाठी काही जाता आले नाही. तो दिवसच टळून गेला. ती वाट बघून-बघून अक्षरश: दमून

गेली. दुसऱ्या दिवशी नियोजित वेळेवर गांधीजी तिला भेटायला गेले. तिला काही ते आवडले नाही. गांधीजींना बघुन काहीही न बोलता ती शांतपणे बिछान्यावर पहुडली होती तशीच राहिली. नेहमीप्रमाणे सहजतेने गांधीजींनी विचारले होते की तब्येत कशी आहे.? दु:खी कस्तुरबाला आला होता राग. रागातच ती बोलली

"आपण तर बडी आसामी आहात. थोर आहात. जग तर आपल्याला महात्मा म्हणून हाक मारते. आपण त्या जगाचीच काळजी वहावी. माझी काळजी कशासाठी करताहात आपण? "कस्तुरबाचा राग गांधीजींच्या लक्षात आला.

त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. मोठ्या स्नेहाने ते कस्तुरबा नजिक जाऊन बसले. तिच्या कपाळावर हात ठेवत म्हणाले, 'अस्से होय, म्हणजे मी आता तुझ्यासाठीही मोठी आसामी आणि महात्मा झालो आहे. तर' गांधीजी म्हणाले.

गांधीजींचे हे शब्द ऐकले आणि कस्तुरबाचा आजार तर नाही पण राग मात्र कुठल्या कुठे पळून गेला. तिचे मन द्रवले. आधीसारखेच दोघे जण गप्पा करु लागले.

डॉ. सुशीलाताई आली होती. त्यावेळची गोष्ट आहे. कस्तुरबापाशी एक छोटीशी पेटी होती. तिला ना कडी होती, ना कोंडा. सुशीलाने एकदा ही पेटी बंद करताना एक कडी लावली. दुसरी नव्हतीच. ती तशीच सोडून दिली होती. कस्तुरबाने ते पाहिले. ती स्वत: उठली. पेटी नीट बंद केली. दुसऱ्यांदा एकदा परत पेटी आणायला सांगितले. परत करताना म्हणाली, 'आण, मीच ती पेटी धडपणे बंद करुन ठेवते.' कस्तुरबा म्हणाली.

'मी करुन घेईन.' सुशीला म्हणाली. 'तुझे कायच म्हणावे? तू विसरुन गेलीस तर? असू दे मीच बंद करते.' कस्तुरबा म्हणाली.

कामातली परिपूर्णता कस्तुरबाचा जीवन-मंत्र होता. व्यवस्था आणि शिस्त या मंत्राचे दोन पंख होते.

आश्रमातल्या कस्तुरबाची अशी अनेक रुपे आहेत. अनेक चित्रे आहेत. ती किती वर्णावी? त्यांचे महात्म्य कायच गावे? त्या प्रसंगांच्या नोंदी अनेकानी आपापल्या परीने आणि पध्दतीने घेतल्या आहेत. त्यातल्या या काही निवडक नोंदी.

संदर्भ


१) महात्मा गांधी : लुई फिशर (मूळ इंग्रजी) मराठी अनुवाद श्री वि.रा. जोगळेकर पृष्ठ ५२४;

२) प्रेमाताई कंटक यांना दिनांक २५ जानेवारी १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ४९ पृष्ठ ३९;

३) गांधीजींनी कस्तुरबाला पेशावरहून दिनांक ७ ऑक्टोबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र;

४) गांधीजींनी अमृत कौरला सेगाव वर्धा येथून दिनांक २१ ऑक्टोबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ६३ पृष्ठ ४१३;

५) गांधीजींचे दिनांक ६ फेब्रुवारी १९३६ रोजी लिहिलेले पत्र.


❖❖❖

## ६) गांधी उपोषण समयीची कसोटी

साबरमती आश्रम. ३१ जुलै १९३३. रात्री एक वाजून वीस मिनिटांनी पोलीस टोळी आली. कस्तुरबा, गांधीजी आणि महादेवभाईंची मागणी केली. ईमर्जन्सी पॉवर्स कलम ३ चा आधार घेतला गेला होता. आश्रमासमोर क्षणभर गांधीजींची गाडी उभी होती. महादेवभाईंचीही गाडी उभी राहिली. महादेवभाईंच्या गाडीत कस्तुरबा होती. १ ऑगस्ट १९३३ रोजी कस्तुरबाला मीराताई सोबत राखले होते. ही माहिती श्री अडवाणी यांनी दिली. सकाळी दूधई वाफवून आली होती. महादेवभाईंनी सूप तयार केले. सायंकाळी कस्तुरबाला दुधई दिली. तिने गांधीजींसाठी सूप तयार करुन पाठवले. कस्तुरबाच्या हातचे सूप दीर्घ काळ पर्यंत सेवन करायचा हा महादेवभाईंसाठी अखेरचा प्रसंग होता. ८ ऑगस्ट १९३३ रोजी 'टाइम्स' मध्ये कस्तुरबा आणि इतर १५ लोकांच्या अटकेचे वृत्त होते. अन्य सोळा जणानाही अटक करण्यात आली होती. लखनौहूनही अशाच बातम्या आल्या. गांधीजी खूप प्रसन्न झालेत. १० ऑगस्ट १९३३ रोजी कस्तुरबा आणि इतर १५ भगिनींना व १६ बंधूंना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. २० ऑगस्ट १९३३ रोजी कस्तुरबाला पंधरा मिनिटांसाठी गांधीजींची भेट मिळाली. तो दिवस गांधीजींचा मौनवार होता. तुरुंगातील अधिकाऱ्याच्या सोबत ही भेट ठरली होती. दोघे एकमेकांचे कुशल-क्षेम विचारत होते. या दोन पावन लोकांच्या भेटीत आपण इथे उभे राहू नये. इथून हललेले बरे. त्या अधिकाऱ्याला असे वाटले. यांना थोडे मोकळे बोलता येईल असा विचार केला. तो थोडे लांबवर जाऊन उभा राहिला. भेटीची वेळ संपल्यावर तो परत आला.

'झाले का तुमचे बोलणे?' शांतपणे त्याने विचारले.

'आमचे बोलणे? अहो, तुमच्या हजेरीत आम्ही एकमेकाना कुशल-क्षेम विचारले. तुम्ही गेल्यावर मात्र आम्ही चकार शब्दही उच्चारला नाही.' कस्तुरबा हसत म्हणाल्या.

'पण आपण असे का केलेत? अहो, एवढ्यासाठी तर मी थोडासा बाजूला झालो.' पोलिस अधिकारी म्हणाला.

'आम्हाला तुरुंगाचा नियम ठाऊक आहे. अधिकारी हजर नसेल तर कैद्यांनी आपसात बोलू नये. तुमच्या हजेरीत आम्ही बोललो की एकमेकांशी. तुम्ही गेल्यावर मात्र दोघेही अगदी शांतपणे उभे होतो.' कस्तुरबाचे उत्तर होते.

गांधीजींनी मौन असल्यामुळे लिहून कळवले

'तू बहादूर रहा. पंधरा मिनिटांसाठी भेटायला येऊ नकोस. आता तुला नेणार असतील तर खुशाल न्यावे. साऱ्या भगिनींना आशीर्वाद कळव. माझे रक्षण ईश्वर करील.'

कस्तुरबा विचार करत होती की ईश्वर रक्षण करील हे खरे आहे.

कस्तुरबा गेल्यावर गांधीजींनी प्रतिक्रिया लिहून दाखवली.

'कस्तुरच्या धैर्याला सीमा नाहीत.'

कस्तुरबाने येऊन त्यांच्या प्राणात प्राण ओतले होते. नवा रक्तसंचार केला होता. नवी आशा जागवली होती. नवा विश्वास जागवला होता. ती पतिपरायणा होती. तिची पती परायणता दृढ होती[१]

येरवडा तुरुंगात गांधीजी आपल्या बिछान्यात गतिहीन पडले होते. कस्तुरबा हलक्या हाताने त्यांची मालिश करत होती. आसपास सरोजिनी नायडू, वल्लभभाई आणि महादेवभाई चिंताग्रस्त होऊन बसले होते. कस्तुरबाचे मन विचार करत होते. पतीची मूळचीच कृश काया अधिकच शुष्क झाली होती. कंठ स्वर जवळपास ऐकू येत नव्हता. जठरात आम्ल साचले होते. अधून मधून सोडा घालून पाणी देण्यात येत होते. डॉक्टरांची जबाबदारी वाढली होती. गांधीजींच्या चित्शक्तीचा अजिबात ऱ्हास झाला नव्हता. चैतन्य ताजे-तवाने होते. प्रायोपवेशन करण्यापूर्वीच कमालीचा अवघड विचार करावा लागला. जटिल चर्चांशी सामना करावा लागला होता. सागरपार वसणाऱ्या राजकीय जनांशी पत्रव्यवहार सुरु होता. त्यांच्या मनावर कठोर घात-प्रत्याघात झाले होते. उपोषणसमयी विविध पक्षांच्या उसळत्या मागण्या होत्या. कुणीही त्यांच्या तब्येतीविषयी ममता दाखवली नव्हती. त्यांची चर्या स्वच्छ, प्रसन्न होती.

ना मानसिक जीर्णता ना शारीरिक थकवा. ना पराभवाचे पुसटसे चिह्न वा माघारीचे किंचितसे लक्षण! त्यांच्या विचारांची प्रकाशधारा स्वच्छ होती. ती यत्किंचितही म्लान झाली नव्हती. देहाचा कष्टमय साधना काळ होता. आत्म्याच्या अपराजित उद्यमाची ती मूर्ती होती. तिच्याकडे बघून सर्वांनाच नवल वाटले.

गांधीजी मृत्युच्या वेदीवर पहुडलेले होते. भारतवर्षातील कोटी-कोटी प्राणांपर्यंत त्यांची वाणी पोहोचली होती. कुठलीही बाधा त्यांचा मार्ग रोधू शकत नव्हती. ना अंतराची बाधा ना दगड-विटा-भिंतींची बाधा. ना प्रतिकूल राजकारणाची बाधा. ना अनेक शतकांच्या जडत्वाची बाधा. साऱ्या बाधा त्यांच्यासमोर धुळीला मिळाल्या होत्या.

२६ तारखेला पुणे करार झाला. उपोषण संपले. गांधीजी अजूनही बंदिवान होते. २९ तारखेला त्यांना देण्यात आलेल्या तमाम सवलती काढून घेण्यात आल्या. उपवासादरम्यान त्यांना तुरुंगाच्या प्रवेशद्वाराशी युरोपियन वॉर्डात राखण्यात आले होते. आता त्यांना तिथून हटवून पूर्वीच्या कक्षात ठेवण्यात आले. ते गैरसोईंनी भरलेले होते. तिथून मोठे मेज हलवण्यात आले. आरामखुर्ची काढून घेण्यात आली. कस्तुरबाला उपवास काळाच्या दरम्यान गांधींच्या वॉर्डात राखले होते. तिला परत कैदी महिला वॉर्डात पाठवून देण्यात आले. ती कैदी होती ना! येण्यापूर्वीच सत्याग्रहींनी या गोष्टीसाठी तयारी करुन ठेवली होती. कस्तुरबाची परत जायची वेळ आली. सायंकाळी तिची निघायची तयारी झाली. यातला कारुणिक संदर्भ महादेवभाई लिहितात.

"सायंकाळी कस्तुरबांना जायला लागले ही फारच वाईट गोष्ट होती.

'आता जेलरला थांबायला लावू नका, लगेच निघा, निघा लगेच.' गांधीजींनी बजावले.

गांधीजींसाठी अखेरचे जेवण तयार करुन निघायचे कस्तुरबांच्या मनात होते. सूप तयार करायचे मनात होते. बापूंचे ऐकल्यावर मात्र त्या लगेच जायला निघाल्या होत्या.

'बराय, भेटू या. येते मी आता.' निरोप घेताना कस्तुरबाचे डोळे भरुन आले होते. गंगा-यमूना वाहू लागल्या. बापूंनी त्यांच्या गालावर हलकेच चापटी मारत म्हटले 'आता कोण कुणापाशी येईल? मी की तू? काळजी करायचे काहीच कारण नाही. इतके दिवस सोबत राहता आले हे का कमी आहे.?' गांधीजींनी समाधान व्यक्त केले होते.[२]

या विषयाचा समारोप करण्यापूर्वी एका मुद्यासंबंधी स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. नेटवर या संबंधीचा एक तपशील असा आहे.:

'अखेर तो दिवस उजाळला जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुणे करारादरम्यान गांधीजींना भेटले. सप्टेंबर महिन्यात पुण्याच्या येरवदा कारावास येथून संपूर्ण जगभरासाठी एक महत्वाचा निरोप मिळणार होता. डॉ. आंबेडकरांची मागणी होती सर्व दलितांच्या अडचणी सोडवण्यासाठी एक वेगळा कायदा निघावा. गांधीजींना ते पटत नाही होतं बैठकी दरम्यान दोघांचं एका पर्यायावर एकमत झालं. बैठकीनंतर गांधीजी व आंबेडकर हसत हसत खोलीतून बाहेर पडले. खोलीच्या बाहेर कस्तुरबा बसल्या होत्या. कस्तुरबा नेहमी गांधी व आंबेडकरांच्या संबंधावर चर्चा करत असत. त्यानी आंबेडकराना जाताना पाहिलं आणि कस्तुरबांनी विचारलं 'तुम्हाला जे हवं होतं ते भेटलं का बाबासाहेब?' डॉ. आंबेडकर हसत म्हणाले 'बा, जे हवं होतं ते तर नाही मिळालं पण मात्र जे भेटलं आहे. ते अपेक्षेपेक्षा जास्त आहे. 'मग कस्तुरबांनी विचारलं 'तुम्ही तर आनंदी तर आहात ना डॉक्टर साहेब?' डॉ. आंबेडकर म्हणाले 'हो बा, मी खुश आहे.' कस्तुरबा सोबत डॉ. आंबेडकरांचे संवाद कमी असले तरी त्यात आपलेपणा होता."

हे निवेदन केवळ अनैतिहासिक आहे. एवढेच नव्हे पण चुकीचे आहे. ही चर्चा येरवडा कारावासात झालेली आहे., कुठल्या घरात नव्हे. कस्तुरबा साबरमती कारावासात होत्या. त्यांना येरवडा तुरूंगात स्थलांतरित करण्यात आलेले आहे. कस्तुरबा स्वत: कैदी आहेत. त्या खोलीबाहेर असण्याची सुतराम शक्यता नाही.

येरवडा तुरूंगाची एक झलक रवींद्रनाथ टागोर यानी पुढीलप्रमाणे केली आहे. "एकेकामागून एकेक लोखंडी दरवाजे उघडले गेले आणि मिटले. समोर कारावासाची गर्वोन्नत उंचच उंच भिंत उभी होती. बंदिवान गगन.

..... अंगणात एका छोट्या आंब्याच्या तरूतळी डेरेदार सावलीत महात्माजी झोपले होते."[३]

एक दुसरा संदर्भ डॉ. बाबासाहेब या सिरियल मधला आहे. तो असा एस् १ ई २५६ 'कस्तुरबाज रिक्वेस्ट टू भीमराव' दिनांक २० मार्च २०२०. या सिरियलची अनैतिहासिकता तर स्वयंमेव स्पष्ट आहे. महादेवभाई देसाई व कस्तुरबा डॉ. बाबासाहेबांची भेट घेतात असा हा प्रसंग चितारला आहे. या प्रसंगाची कुठलीही नोंद महादेवभाईंच्या तेवीस डायऱ्यांमध्ये नाही.

१९३२ सालचा कस्तुरबांचा जीवनपट पुढीलप्रमाणे आहे. उपोषण संपल्याबरोबर त्यांची महिला वॉर्डमध्ये रवानगी करण्यात आली होती.

१२ जानेवारी १९३२ कस्तुरबांच्या सोबत मीठूताई आणि अब्बास तैयबजींच्या नातीला अटक

१५ जानेवारी १९३२ कस्तुरबांना सहा आठवड्यांची शिक्षा, साबरमती तुरुंगात

१५ मार्च १९३२ परत अटक व सहा महिन्यांची शिक्षा

४ ऑगस्ट १९३२ गांधीजींच्या अटकेवेळी कस्तुरबा हजर होत्या

२० सप्टेंबर १९३२ गांधीजींचे येरवडा तुरुंगात उपोषण

२२ सप्टेंबर १९३२ कस्तुरबांना साबरमतीहून येरवडा तुरुंगात स्थलांतरित केले

२६ सप्टेंबर १९३२ कस्तुरबांच्या हातून संत्र्याचा रस घेऊन उपोषणाची समाप्ती

२६ सप्टेंबर १९३२ कस्तुरबांची पुनश्च महिला वॉर्डात रवानगी

नोव्हेंबर अखेर १९३२ हरीजन कार्यासाठी दक्षिण भारत दौरा

डिसेंबर १९३२ कस्तुरबांच्या विरोधात कट्टर सनातनी लोकांचा रोष

३ डिसेंबर १९३२ कस्तुरबांची सुटका, पुनश्च कार्यमग्न, अस्पृश्यता निर्मूलन कार्यात सहभाग, अस्पृश्यता निवारण राष्ट्रीय संमेलनात मद्रास येथे गांधीजींचे प्रतिनिधित्व केले.

या संदर्भाचा अभ्यास करत असताना प्रत्यक्षदर्शी महादेवभाई देसाई यांचे लेखन, [४] समकालीनांचे लेखन,[५] नातलगांचे लेखन,[६] महादेवभाईंचे चिरंजीव गांधीजींचे जगप्रसिध्द चिंतक[७] गांधीजींच्या संदर्भात लिहिले गेलेले अद्ययावत लेखन तपासले[८] आणि गांधीजींचे युवा संशोधक यांच्याशी चर्चा केली.[९]

या सोबतच डॉ. धनंजय कीर लिखित डॉ.बाबासाहेब यांचे प्रमाण मानले जाणारे चरित्र[१०] या ग्रंथाच्या संदर्भात प्रकाशक रामदास भटकळ यांचे मत[११] खुद्द धनंजय कीर यांनी प्यारेलाल लिखित 'द एपिक फास्ट' चा संदर्भ दिला आहे. बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठावंत संशोधक लेखकांचे लेखन,[१२] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे युवा संशोधक,[१३] यांच्याशी विस्तृत चर्चा केली.

या सर्व अभ्यासकांच्या मते कस्तुरबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात कुठल्याही प्रकारची चर्चा वा संवाद झाला नसल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे वरील नेट व सिरीयलमधील निवेदनावर शंकेचे प्रश्नचिह्न उपस्थित होते.

येरवडा तुरुंगात गांधीजी आणि कस्तुरबा होते. दर आठवड्याला त्यांचा एकमेकांशी पत्र व्यवहार चालायचा. इतर कुणाशीही पत्र-व्यवहार करायची कस्तुरबाला परवानगी नव्हती. 'हरिजन बंधू' आणि 'जामे जमशेद' ही गुजराती साप्ताहिके तिला वाचायला मिळायचीत. गांधीजी साप्ताहिक पत्रे पाठवत. त्या पत्रात एखादा आध्यात्मिक उतारा असावा अशी विनंती कस्तुरबाने केली. गांधीजी सहसा त्याप्रमाणे करत असत. गांधीजी ज्या-ज्या ठिकाणी जात तिथली वर्णने पत्रातून करत असत. बिहार भूकंपासारख्या राष्ट्रीय घटनांची खबर देत. दरेक पत्रातून कस्तुरबाच्या जिव्हाळ्यातल्या डझनभर लोकांची ख्याली-खुशाली कळवत. काही वेळा पत्रातून विनोदाची पखरण करत. या पत्रातून कस्तुरबाना आणि त्यांना सुध्दा कदाचित थोडा दिलासा मिळाला असावा.

१९३३ साल. ५ मार्च ते २२ एप्रिल हा दिड महिन्यांचा काळ. तसा हा काळ घटनाशून्य वाटतो. गांधीजींसाठी मात्र हा काळ मानसिक ताण-तणावांचा काळ आहे. याचा अर्थ तो कस्तुरबासाठीही तसा आहे. सप्टेंबर १९३२ साली उपवास घडला होता. जनतेत उत्साहाची लाट आली होती. कर्मठ मंडळींचा विरोध वाढला होता. जनतेमध्ये उत्साहाची जी प्रचंड लाट आली होती, ती आता ओसरत

चालली होती. एकानंतर एक धर्मसंकट समोर येऊन उभे ठाकत होते.

गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले होते:

"बा, हरीलालची कशाला काळजी करतेस? तो पत्र नाही लिहायचा. त्याची दारू प्यायची सवय जर देवाला परवडते तर आपण काय करु शकू? त्याला ईश्वर जेव्हा सुधारु इच्छिल तेव्हा सुधारेल."[१४]

कस्तुरबाच्या मनाचे सांत्वन करताना गांधीजींनी 'ईश्वरेच्छा बलियसी' याचाच जणू काही उच्चार केला आहे. गांधीजींनी अनेक उपवास केलेत. कस्तुरबा सोबत असायची. तन्मयतेने सेवा करायची. कधी गांधीजी जीवन-मरणाच्या सीमेवर असत. कस्तुरबा विव्हळ होत नसायची. मन कठोर करायची. झटून सेवाकार्य करायची. सेवा सुश्रूषेत पार बुडून जायची. मनाच्या अशा ताण-तणावांवर विजय संपादन करणे सोपे नव्हते. यासाठी अपार शौर्याची गरज असते. तिच्या ठायी हे शौर्य ठासून भरलेले होते.

गांधीजींच्या पत्रांमध्ये जिव्हाळ्याचे नाना विषय असत. हरीलालचा उल्लेख असायचा. तो कोणत्या ना प्रकरणात अडकायचा. वर्तमानपत्रातून झळकायचा. याची त्याला जणू सवयच लागली होती. हरीलालचा मुलगा कांतीलाल तुरुंगात होता. त्याच्या धैर्याची कथा कस्तुरबाचे बंधू माधवदास यांनी सांगितली. दक्षिण आफ्रिकेत मणीलालची धडपड सुरुच होती. रामदासची कन्या सुमित्राचे डोळे दुखत होते. मणिलालची मुलगी सीताचा खेळकरपणा अवखळ होता. रामदासची पत्नी निर्मलाचे गरोदरपण काळजीभरले होते. देवदासची पत्नी लक्ष्मी गरोदर होती. ती चिंता होतीच. महादेव व प्यारेलालचे आपापल्या तुरुंगातील दिनक्रम सुरु होते. गांधीजींची स्वत:ची तब्येत, कस्तुरबाची तब्येत यासारखे नाना विषय पत्रांमधून असत.

प्रेमलीला ठाकरसीला पत्रातून कळवले की कस्तुरबा आज खादी-कार्यासाठी नागपुरला गेली आहे. वसुमती पंडितला कळवले की बा त्यांच्याच सोबत आहे.[१५]

मणिताई पटेल यांना ४, ९ आणि १४ नोव्हेंबर रोजी पत्रे लिहिली आहेत. यातून ते लिहितात की ते गेल्यावर बा जेलसाठी निघेल. यासाठी त्यांना तयारी तर करुनच घ्यायला हवी.

दुसऱ्या पत्रात कळवले की बा मंगळवारी वर्ध्याहून निघेल. काही वेळ अर्थात् काही तास त्या अकोला येथे राहतील. नंतर तुझ्याकडे येतील.

तिसऱ्या पत्रात लिहिले आहे. (हरीलालचा मुलगा म्हणजे आपला नातू रसिकच्या मरणाचा संदर्भ देत गांधीजी लिहितात.) "रसिक मृत्युशय्येवर होता. ते त्याच्यासोबत असावे असा विचार तो करतही असेल पण ते दिल्लीला गेले नाहीत, बा गेल्या. रसिकचे निधन झाले पण त्यांनी अश्रुही वहावले नाहीत. ते जेवत असताना तार आली. जेवण आटोपून ते कामाला लागले."

पुढे लिहितात "आता बांविषयी. माझ्यापाशी सवड असती तर पत्रातून मी अधिक समजूत घातली असती. बांचे अंत:करण कमजोर झाले आहे. त्यांना मंदिरात (जेलमध्ये) जायचेही आहे. आणि जायचे नाहीही. आतल्या आत त्या जाणतात की तुरुंगात जाणे त्यांचा धर्म आहे. यामुळे त्या हा धर्म सोडू शकत नाहीत पण मी बाहेर आहे. म्हणून त्यांना तुरुंगात जायला आवडत नाही. मी काही आग्रह केला नाही. त्यांच्या मर्जीवर सारे सोडून दिले आहे. हे लिहायचा  माझा आशय असा आहे. की तू त्यांना धर्मपालनात कृतसंकल्पी बनव आणि त्यांची समजूत घाल, त्यांना समजव. तुजवर त्यांची आस्था आणि प्रेम आहे. मी जे काही सांगेन ते आदेशाच्या रुपात मानले जाईल आणि बा दबून जातील. यामुळे काही सांगत नाही. सांगत नाही याचा अर्थ तर बा असाच करते की त्यांना तर तुरुंगात जायलाच हवे."[१६]

मणिताई पटेल यांना लिहिलेल्या पत्रातून गांधीजींच्या वैराग्यशील व निरिच्छ वृत्तीचे दर्शन घडते. आपल्या नातवाचे निधन झाले आहे. ते धैर्याने आल्या प्रसंगाला तोंड देत आहेत. हे वाचताना लोकमान्य टिळकांचे सहजच स्मरण होते. १९०३ सालचा जानेवारी महिना होता. लोकमान्य टिळक यांचा सर्वात थोरला मुलगा विश्वनाथ हा प्लेगने मरण पावला. विश्वनाथ हा

एकवीस वर्षांचा होता. फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होता. या दुर्धर प्रसंगाला टिळक यांनी धैर्याने तोंड दिले होते. याविषयी 'केसरी' तील लेखनिक श्री अप्पाजी विष्णु कुळकर्णी लिहितात: "वडिल चिरंजीव विश्वनाथ पंत वारल्यावर दुसऱ्या दिवशी सोमवार आला. ज्या झोपडीत विश्वनाथ पंत वारले तिथून दहा-बारा पावलांवर टिळक यांची कुटी होती. जिकडे तिकडे औदासिन्य पसरले होते. अशा स्थितीत कुणालाही काम सुचणे शक्य नव्हते पण टिळक यांनी नेटिव्ह संस्थानिकांसोबत इंग्रज सरकारच्या झालेल्या तहनाम्याची आणि कराराची पुस्तके आणवून ती वाचली आणि 'केसरी' तील 'श्री महाराज होळकर यांचा राजीनामा मंजूर झाला' हा अग्रलेख मला मुखाने सांगितला. मला लिहिताना पंतांची वारंवार आठवण येई परंतु टिळक यांची मन:स्थिती निराळीच. नेहमी ज्याप्रमाणे शांत चित्ताने ते मजकूर सांगत तितक्याच शांतपणे त्या दिवशीही मजकूर सांगितला."[१७] गांधीजींचे याहून काही वेगळे नव्हते.

कस्तुरबाच्या चित्ताच्या प्रापंचिक आणि राष्ट्रीय स्वरुपाची गांधीजी मीमांसा मांडत आहेत. एकीकडे कस्तुरबाचे मन तुरुंगात जायला झेपावत होते. दुसरीकडे गांधीजी तुरुंगात नसल्यामुळे बाहेर त्यांची काळजी व सेवा करायला आपण नसणार या जाणीवेने ती व्यग्रही आहे. कस्तुरबा काहीही न बोलता गांधीजी बोलताहेत हे विशेष आहे. गांधीजींच्या मतानुसार नातवाच्या मरणाच्या शोकापेक्षाही मातृभूमीची हाक महत्वाची आहे. मातृभूमीचे दु:ख निवारण्यासाठी आपल्याला तुरुंगवास सोसणे आवश्यक आहे. गांधीजींच्या या पत्राच्या मध्यवर्ती दोन विषय आहेत. एक आहे. कौटुंबिक. दुसरा आहे. राष्ट्रीय. देशभक्तीचा अर्थ काय आहे. हे कस्तुरबा भल्या प्रकारे जाणते. ती गांधीजींच्या मौनाचाही अर्थ समजून घेते. तो अर्थ कस्तुरबाला अधिक खोलवर समजावून सांगता यावा यासाठी ते धडपडताहेत. आपल्या लेकीसारख्या असलेल्या सरदार पटेल यांच्या कन्या मणीताईला पत्र लिहिताहेत.

चांदाहून पंडित जवाहरलाल नेहरु यांना लिहिले की त्यांच्या विचारानुसार बा सुध्दा लवकरच तुरुंगात जात आहे. तिच्यासमवेत मणीताई पटेलही आहे.[१८]

येरवडा जेलच्या जेल अधीक्षकाची कृपापूर्ण परवानगी मिळाल्यावर कस्तुरबाला पत्रातून लिहितात

"बा, रणछोडभाईच्या मार्फत पाठवलेले पत्र तुला पोहोचले असावे. तब्येतीची काळजी घेशील. चिंता मुळीच करु नकोस. काहीही विचार करायची गरज नाही. माझ्या जीवनाला ईश्वराच्या हाती सोपवून द्यावे. ईश्वराशिवाय दुसरा कोण काळजी वहाणारा आहे.?"

या पत्रातून आपली तब्येत चांगली असल्याचे गांधीजी कळवतात. मीराताई आपली सेवा निष्ठेने करत असल्याचे सांगतात. आपण जबलपुरात असल्याचे कळवतात. तिथल्या काही भेटींचे उल्लेख करतात. अनेक मित्र व नातलगांविषयीच्या बातम्या कळवतात. आपला आहार योग्य करुन घ्यायचा सल्ला देतात. तब्येतीची काळजीपूर्वक चौकशी करतात. वर्ध्याच्या पत्त्यावर पत्र लिहावे असे सुचवतात[१९]

वल्लभभाईंना कळवतात की ते बांना पत्र लिहित राहतील. या खेपेला बांना तुरुंगात जाणे आवडले नाही पण देव निभावून नेईल.[२०]

गांधीजींनी सरदार वल्लभभाई पटेल यांची कन्या मणीताईला पत्रे लिहिली आहेत. त्यांचा नोंद आपण या पत्रातून ऐकू शकतो. कस्तुरबाच्या तुरुंगात न जाण्याच्या आवडी-निवडीमागचे मुख्य कारण 'गांधीजींचे स्वत: तुरुंगात नसणे' आहे.

कस्तुरबाला पत्रातून गांधीजी कळवतात.

"बा, तुला तुरुंगात पाठवलेले हे दुसरे पत्र. आता तुला 'जामे जमशेद' व 'हरिजन बंधू' ही नियतकालिके मिळत असतील. आणखी काही हवे असल्यास कळवशील. मधुरादास सध्या माझ्याजवळ आहे. मी १० तारखेला दिल्लीला आलो होतो. १४ रोजी आंध्र प्रदेशाकडे रवाना होऊन जाईन. मथुरादास मुंबईला जाईल. माझी अजिबात काळजी करु नकोस. मी साऱ्या परिस्थितीची तुला कल्पना देत राहीन. मी दूध आणि मावा वगैरे नियमितपणे घेतो. सर्दी झाली होती. आता नाही. डॉ. अन्सारी इथेच आहेत. तुझा जबडा आता चांगला असेल. मणीचे गुडघे कसे आहेत.? वाचायची सामग्री सोबत आहे. का?[२१]

या पत्राचा हा संक्षिप्त गोषवारा आहे. सर्व पत्रांचा असा संक्षिप्त गोषवाराच आपण इथे देत आहोत. जिज्ञासू वाचकाना सर्व पत्रे मूळ स्वरुपात परिशिष्टात वाचता येतील. गांधीजी कस्तुरबाच्या शारीरिक व बौध्दिक प्रगतीची काळजी वहाताना दिसतात. कस्तुरबाच्या तब्येतीसोबतच आपल्या तब्येतीचाही सर्वंकष अहवाल प्रस्तुत करताहेत. आपल्या पत्रातून तुरुंगातल्या अन्य भगिनींविषयीही जाणीवपूर्वक माहिती विचारताना दिसताहेत. तब्येतीच्या छोट्या-छोट्या गोष्टीही त्यांच्या निरीक्षणातून सुटत नाहीत. त्यातले मर्म ते सहज उद्‌घाटित करताना दिसतात. एका राष्ट्रीय नेत्याला हे आवश्यक आहे. एका गृहस्वामीसाठी आवश्यक असलेले पथ्यही ते पाळताना दिसतात. यातून त्यांच्या मनात असलेला कस्तुरबाविषयक जिव्हाळा आणि काळजीचेही दर्शन होते.

लगेच पुढच्याच आठवड्यात त्यांनी कस्तुरबाला पत्रातून लिहिले,

“बा, तुझे पत्र आजच पोहोचले. साबरमती तुरुंगातून लिहिलेले माझे पत्र तुला पोहोचलेच असेल. मी तर नियमपूर्वक लिहित राहीन. दर सोमवार वा मंगळवारी लिहिन कारण की या दोन दिवसातच मला थोडा अवकाश मिळू शकतो. तब्येतीची काळजी घे. पेळू पाठवीन. मजजवळ नसतील तर कुठूनही सोय करुन देईन. मला रक्तदाब असतो. डॉ. अन्सारींनी दिल्लीला तपासले होते. माझी अजिबात काळजी करु नकोस. .. . . रामनाम रामबाण औषध आहे. मी रामदाससाठी एक छोटी गीता तयार केली होती. ती प्रकाशित केली जात आहे. प्रकाशित झाल्यावर तिच्या प्रती तिकडे पाठवीन. इतर काही हवे असल्यास मागवून घ्यावे. पत्र वर्धा येथेच पाठव. वृत्तपत्रे तर मिळत असतील. तू मला प्रवचन मागतेस. आज तर नाही पाठवणार. पुढच्या आठवड्यात त्यावर विचार करीन. तू गीता वाचतेस हे चांगले तर आहेच. कोण शिकवते? तिथे खायला काय मिळते? जे हवे तू प्रेमलीलाबेन (प्रेमलीला ठाकरसी) अथवा त्रिवेदी मार्फत (पुणे कृषी महाविद्यालयातील प्राध्यापक जयशंकर पीतांबरदास त्रिवेदी) मागवू शकते, हे तर स्मरणात आहे. ना? आता तर इथे कमी लोक येत असावेत? यामुळे तू दर आठवड्याला एक पत्र लिहावेस आणि माझेही पत्र मिळवत रहावे. तुला जे योग्य वाटेल ते कर. .. . . . .. बापूचे आशीर्वाद.[२२]

मागच्या पत्रातून कस्तुरबाच्या कौटुंबिक व राष्ट्रीय कर्तव्याची मीमांसा गांधीजींनी मांडली होती. या पत्रातून तिच्या आध्यात्मिक उत्कर्षाची वाट सुगम करताना ते दिसत आहेत. आपल्या उत्तम तब्येतीचे वृत्त कळवत आहेत. आपल्या पत्नीच्या तब्येतीची काळजी घेत आहेत. सूत कातायला पेळू पाठवण्यासोबतच गीतेचा अभ्यास करणाऱ्या कस्तुरबाचे कौतुक करत आहेत. खायच्या-प्यायच्या व्यवस्थेकडेही त्यांचे लक्ष होते. एकाच वेळेला कस्तुरबाच्या सर्वांगीण विकासाची चिंता त्यांना भेडसावत होती.

तब्येत ही अत्यंत खासगी गोष्ट झाली. आहार-विहार हा शारीरिक काळजीचा विषय झाला. सूतकताई हा कताई यज्ञ झाला. गीतेचा अभ्यास अध्यात्म मार्गाचे रहस्यपूर्ण दालन झाले. गीतेवरील प्रवचन पाठवण्याच्या संदर्भातले आश्वासन या पत्रातून वाचता येते.

संदर्भ


१) महादेव भाई देसाई यांची डायरी (गुजराती) खंड २ पृष्ठ ३६३/३६४;

२) कित्ता पृष्ठ ८२ आणि अग्निकुंडात उमललेले गुलाब (मूळ गुजराती लेखक श्री नारायण देसाई) मराठी अनुवाद डॉ. मु. ब. शहा आणि डॉ. विश्वास पाटील पृष्ठ ६६९ - ६७०;

३) अग्निकुंडात उमललेले गुलाब’ (मूळ गुजराती) श्री नारायण देसाई मराठी भाषांतर डॉ. मु. ब. शहा व डॉ. विश्वास पाटील;

४) महादेवभाई यांच्या तेवीस डायऱ्या;

५) द एपिक फास्ट : प्यारेलाल, श्री डी. जी. तेंडुलकर यांचे ‘महात्मा’ या शीर्षकाचे इंग्रजी अठरा खंड;

६) अरूण गांधी ‘द अनटोल्ड स्टोरी ऑफ कस्तुरबा’ व सुमित्रा कुलकर्णी लिखित ‘अनमोल विरासत’ चे तीन खंड;

७) नारायणभाई देसाई यांचे चार खंडातले मारू जीवन एज मारी वाणी (गुजराती भाषेतील चरित्र) ;

८) गांधी व आंबेडकर : गं. बा. सरदार, गांधींविषयी खंड २ (गांधी विचार आणि समकालीन विचारविश्व), साधना प्रकाशन, पुणे संपादक: अशोक चौसाळकर या ग्रंथातील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी पूर्वार्ध्द व उत्तरार्ध्द' हे दोन लेख लेखक वसंत पळशीकर पृष्ठ क्रमांक २९५ ते ३०५ तथा गांधींविषयी खंड ३ (गांधी : खुर्द व बुद्रुक) संपादक: रमेश ओझा या ग्रंथातील 'गोलमेज परिषद, सांप्रदायिक निवाडा, पुणे करार' हा पन्नालाल सुराणा यांचा लेख पृष्ठ ५० ते ६६ ;

९) तुषार गांधी (गांधीजींचे पणतू अरूण गांधींचे चिरंजीव व गांधी अभ्यासक), उदय महाजन व डॉ. आश्विन झाला (महात्मा गांधीजींच्या संदर्भात संपूर्ण जगभरात सर्वाधिक मोलाचे व विश्वसनीय ज्ञान केंद्र असे गांधी रिसर्च फाउण्डेशन, गांधी तीर्थ, जळगावचे गांधी अभ्यासक);

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : धनंजय कीर;

११) या चरित्र ग्रंथातील सर्व तपशील हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नजरेखालून गेला होता. या चरित्र ग्रंथामुळे प्रथमच डॉ.आंबेडकर यांच्या जीवन व कार्याविषयीचे तपशील जगाच्या काना कोपऱ्यापर्यंत जाऊन पोहोचले. त्या नंतर अनेक विदेशी चिकित्सक लेखक व व्यासंगी इतिहासकार यानी या चरित्र ग्रंथाचा उपयोग करून ग्रंथ लिहिले.;

१२) राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर: डॉ. भूषण जोरगुलवार शहापुरकर (बारा खंड); प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर समग्र वैचारिक चरित्र: डॉ. नरेंद्र जाधव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ: संपादक दया पवार (निमंत्रक) प्रा. केशव मेश्राम, प्रा. बा. ह. कल्याणकर, वामन निंबाळकर, एस्. एस्. भोसले, अर्जुन डांगळे, हरी नरके प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशन २५ डिसेंबर १९९३ मूल्य ६० /-- पृष्ठ संख्या १४३१, Dr. Babasaheb Ambedkar Writings & Speeches (Vol. २) Publisher Education Departmant Government Of Maharashtra १९८२ // १८ April १९८२ // price २० |- Total pages ८०३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर: संपादक वसंत आबाजी डहाके, लोकवाड्.मय गृह मुंबई प्रकाशन, ऑक्टोबर २००७ किंमत २०००, पुणे करार: डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबुध्द भारत प्रकाशन नागपुर २६ जानेवारी २०१२ किंमत ६० /- पृष्ठ संख्या १११, माझी आत्मकथा: डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत प्रकाशन लेबर कॉलनी, नांदेड, १४ एप्रिल २००५ किंमत ६०/- पृष्ठ संख्या १६२, भारतीय राजकारण व डॉ. आंबेडकर : श्रीराम जाधव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद किंमत ६०/- पृष्ठ संख्या ११६, बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ संपादक य. दि. फडके महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई प्रकाशन २५ डिसेंबर १९९३ किंमत ६०/- पृष्ठ संख्या ६२६;

१३) डॉ. सुरेश तायडे व डॉ.मनोज गायकवाड;

१४) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ११ मार्च १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५४ पृष्ठ ६९;

१५) प्रेमलीला ठाकरसी यांना दिनांक २ ऑक्टोबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र, वसुमती पंडित यांना दिनांक २५ ऑक्टोबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ५४ व १४६;

१६) गांधीजींनी मणीताई यांना चांदाहून दिनांक ४, ९ आणि १४ नोव्हेंबर रोजी लिहिलेली पत्रे आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ १८९, २०९ आणि २३५;

१७) लोकमान्य टिळक :प्रा. ग. प्र. प्रधान पृष्ठ ४२;

१८) श्री जवाहरलाल नेहरु यांना चांदाहून दिनांक १३ नोव्हेंबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ २३१;

१९) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ७ डिसेंबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ३१६ -३१७;

२०) गांधीजींनी श्री वल्लभभाईना जबलपुरहून दिनांक ७ डिसेंबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ३१८;

२१) गांधीजींनी कस्तुरबाला दिल्लीहून दिनांक १२ डिसेंबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ३३४;

२२) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १९ डिसेबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ३६४.

❖❖❖

## ७) परिव्राजक माऊली

सेवाग्राम आश्रमात कस्तुरबाचे मातृत्व दशदिशांनी विकसित झालेले दिसून येते. कामांची प्रचंड धामधूम असली तरी ती स्वयंपाकघराला अवश्य भेट देत होती. तिथे कामे करु लागायची. कधी प्रवासात असायची. देशातल्या हजारो गावांमधून तिने प्रवास केला होता. गरीब व सर्वसाधारण भासणाऱ्या बायकांशी बोलायची. त्यांना हिंमत द्यायची. आश्वासन द्यायची. मायेची ऊब द्यायची. मिठाच्या सत्याग्रहात नारी शक्तीचा अद्भुत साक्षात्कार जगाला घडला. अनेक महिला सत्याग्रही बनल्या. कारावास पत्करला. महिला फ्रंट दृढ बनली. याचे श्रेय कस्तुरबाला आहे.

गांधीजी पत्राने कस्तुरबाची सारखी चौकशी करत असत. एकदा एका पत्रातून विचारले की तिची तब्येत कशी आहे.? ती आजारी वगैरे पडली होती की काय? आपल्या सहकाऱ्यांचा पत्रात उल्लेख केला होता. त्यांचे कुशल-क्षेम वर्तवले होते. पत्राचे मुख्य कारण असे होते. गांधीजींनी वृत्तपत्रात कस्तुरबाचा एक लेख वाचला होता. वाचून हे सारे लिहायचे काय कारण? असा प्रतिप्रश्न केला होता. या पत्राच्या आधारे एका इंग्रज भगिनीने कस्तुरबाला पत्र लिहिले होते. गांधीजी पुढे लिहितात की या भगिनीचे पत्र देवदासकडुन समजून घ्यावे. त्या भगिनीला त्याच्याकडून उत्तर लिहवून घ्यावे. हा सल्लाही दिला आहे.[१]

कस्तुरबाने गांधीजींनी कातलेल्या जाड सूताच्या खादीच्या साडीचा अंगिकार केला होता. ती हरीजन वाड्यात स्वच्छतेच्या कामासाठी जात होती. आश्रमातही शौचालय सफाईच्या कामात रमत होती. गरजेनुसार भाषणे द्यायला जात होती. धरणे धरत होती. तुरुंगात जात होती. भगिनींना संग्रामात सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होती. यासारखी ढीगभर कामे ती करत होती. ही कुटी कस्तुरबाच्या कर्मपूजेचे स्थळ होती. कस्तुरबाचे जीवन नारी गौरव आणि आत्मसन्मानाची खूण सांगणारे आहे. आपल्या आदर्शांसाठी लेशमात्र कंटाळा करणे वा सुट मागणे तर तिच्या गावीच नव्हते. कष्ट उपसायची तिची प्रचंड तयारी होती. ठाम मनोधैर्य आणि दृढ आत्मश्रध्दा होती. भक्ती आणि ईश्वर श्रध्दाभाव होता.

कस्तुरबाला स्वयंपाकघरात अधिक व्यवस्था आणि स्वच्छता लागायची. तिचे स्वयंपाकघरात आगमन म्हणजे सुचनांचा वर्षाव सुरु असायचा. केवळ सूचना देऊन थांबणे तिच्या स्वभावात नव्हते. ती लगोलग कामाला लागायची. एके दिवशी एका बंधूने गांधीजींपाशी कस्तुरबांच्या संदर्भात तक्रार केली. कस्तुरबा खूप रागावतात. यावर हसून गांधीजी म्हणाले

"कस्तुरबांची वाणी प्रखर आहे. तिचे अंत:करण मृदु आहे. तुझ्या हे लक्षात आले नाही की तिला गैरसोय आणि घाण अजिबात चालत नाही. तुला तर कस्तुरबांचे म्हणणे ऐकून बोध घ्यायला हवा. स्वत:चे काम अधिकाधिक स्वच्छ आणि पारदर्शक कसे होईल याविषयी काळजी घ्यायला हवी. असे केले तर तिला काही बोलायला जागाच उरणार नाही ना?"

गांधीजींचे हे कस्तुरबाविषयीचे मत आणि आकलन होते. ते अगदी तलस्पर्शी आणि पारदर्शक आहे.

एके दिवशी गोशीताई कॅप्टन आश्रमात आल्या होत्या. भोजनाला सारे सोबतच बसले. गोशीताई कस्तुरबाच्या सोबतच बसल्या होत्या. जेवणे आटोपल्यावर प्रत्येकाने आपापले ताट उचलायला सुरुवात केली. हा तर आश्रमीय नियमच होता. जेवण आटोपल्यावर प्रत्येकाने आपापले ताट उचलावे. स्वच्छ घासून-पुसून जागच्या जागेवर ठेवावे. गोशीताईंनी आपली भांडी कधीच घासली नव्हती. यामुळे जेवणानंतर आपल्या ताटाचे नेमके कायच करावे हे काही त्यांना कळेना. एवढ्यात कस्तुरबाचे जेवण आटोपले. तिने हळूच गोशीताईच्या पुढचे ताट आपल्याकडे ओढून घेतले. हे बघून तिचा चेहरा कसनुसा झाला. कस्तुरबा पूजनीय व्यक्ती. त्यांच्या हातून आपले ताट कसे काय स्वच्छ करवून घ्यायचे? त्या विचार करु लागल्या. कस्तुरबाने त्यांची अडचण समजून घेतली.

'असू देत हो, तुम्हाला भांडी घासायचा कधी अनुभव नाही ना? यामुळे हे काम काही तुम्हाला नाही करता यायचे. मला तर रोजच ताट घासावे लागते. मला या कामाची सवय झाली आहे. या कामात तुमचे एक ताट घासणे का मला जड जाणार आहे. बरे? 'कस्तुरबा हसत-हसत म्हणाली.

एके दिवशी गांधीजींनी एक योजना तयार केली. आपापली उष्टी-खरकटी भांडी आपली आपणच स्वच्छ करायची. सर्वांची उष्टी भांडी आलटून-पालटून दोघा-तिघांनी घासायची. स्वयंपाकाच्या उपयोगात लागणारी भांडीही आलटून-पालटून दोघा-तिघांनी घासायची. यातून परस्पर प्रेमभाव वाढीला लागेल. एकमेकांच्या भांडी घासण्याच्या कामातील घृणा भावही संपून जाईल. सर्वांचा वेळ वाचेल तो वेगळाच फायदा असेल. या उपक्रमाची सुरुवात गांधीजींनी कस्तुरबाच्या सोबत स्वतःच केली. कस्तुरबाच्या सोबत ते भांडी घासायच्या चौकात जाऊन बसले. सर्वांना सांगितले ‘हात धुऊन घ्या आणि ताट, वाटी, ग्लास तिथे ठेऊन द्या.’ आधी तर लोक विचार करु लागले पण गांधीजींचा आग्रह बघितल्यावर तसे करु लागले. गांधीजी कस्तुरबाच्या सोबत सर्वांची भांडी घासायला बसले. या कामात गांधीजी आणि कस्तुरबाच्या कामात एक प्रकारची स्पर्धाही जणू काही सुरु होती. कोण आधी काम पूर्ण करतो ही स्पर्धा होती. कोण भांडी अधिक स्वच्छ करतो ही स्पर्धा होती. स्त्री-पुरुषांमधील कामांची ही भेदरेखा गांधीजींनी अशा प्रकारे पुसून टाकली होती.

एकदा हे काम करायची जबाबदारी गांधीजी आणि जे. सी. कुमारप्पा यांच्याकडे होती. कुमारप्पा अविवाहित होता. तो गांधीजींच्या सोबत भांडी घासायला विहिरीच्या नजिक बसला होता. भांडी घास-घास करुन त्यांचा काळपटपणा घालवण्याच्या प्रयत्नात होता. योगायोगाने कस्तुरबा तिकडून जायला निघाली होती. ते दृश्य बघून ती स्तब्ध झाली. एवढे थोर महात्मे. कोपरापर्यंतचे हात राखेने माखलेले आणि भांडी घासायचे काम करताहेत. हे तिने बघितले. ती एकदम भडकली -

‘असले काम तुमच्यासारख्या पुरुषाना भले करता येईल? आपल्यासाठी याहून फार मोलाची कामे शिल्लक आहेत. चला, उठा बरे. हे काम दुसऱ्या कुणाला सोपवून देता येईल.’ कस्तुरबाचा राग अनावर झाला.

एवढे बोलून समाधान झाले असते तर ती कस्तुरबा कसली? ती उसळून जवळ गेली.

‘हं, उठा आता.’ गांधीजींच्या हातातले भांडे हिसकावून घेत म्हणाली. “कुमारप्पा, सुखी जीव आहे.स झाले. तुला बायको नाही ना बाबा, तू काही कुणाच्या हुकूमाचा ताबेदार नाहीस. मला तर शांततेसाठी बायकोचे म्हणणे ऐकावेच लागेल. यामुळे आता भांडी घासण्याकामी मी यांनाच तुमचा जोडीदार बनवून निघून गेलो तर राग मानू नये.” गांधीजी हसत-हसत म्हणाले.

मगनवाडीत जात्यावर दळलेले पीठ असायचे. हातसडीचा तांदुळ होता. घाण्यातून तेल काढले जाई. स्वयंपाकघराचा चार्ज बळवंतकडे होता. एकदा तेलघाण्यासाठी तिळ स्वच्छ करायची जबाबदारी कस्तुरबाची होती. तिळ खूपच बारीक होती. कस्तुरबाने बळवंतला सांगितले

‘बाबा रे, हे खूप अवघड काम आहे.’ कस्तुरबा म्हणाली. ‘हो ना. काय करु?’ बळवंतलाही प्रश्न पडला.

‘एखाद्या बाईकडून तेवढी तिळ स्वच्छ करवून घे.’ कस्तुरबाने उपाय सुचवला.

‘चालेल. थोडेसेच तर पैसे लागतील.’ बळवंतने होकार दिला. दोन बायका तिळ पाखडू लागल्या होत्या. या दरम्यान गांधीजी स्नानासाठी निघाले होते. त्यांनी हे दृश्य बघितले. बळवंतला विचारले

‘हे काम कुणाला सोपवले होते?’ गांधीजींचा प्रश्न गरजला.

‘कस्तुरबांना.’ बळवंतने उत्तर दिले.

‘या भगिनींना कुणी कामाला लावले?’ गांधीजींनी परत प्रश्न केला.

‘तिळ खूप बारीक आहे. यात खूप कचरा आहे.’ बळवंत उत्तराऐवजी दुसरेच काही सांगू लागला होता.

‘मग?’ गांधीजींच्या प्रश्नाचा रोख स्पष्ट होता.

‘कस्तुरबांना एवढा बारीक कचरा दिसत नाही. बरे, या सफाईला कमी पैसे लागणार आहेत. ‘बळवंत स्पष्टीकरण देत होता.

‘ज्याचे काम त्यानेच करायला हवे.’ गांधीजी सिध्दांतवाक्य बोलले. ‘हे मला मान्य आहे.’ बळवंतपुढे पुष्टी देण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता.

‘मी आता माझी सारी कामे थांबवतो. आधी तिळ पाखडून देतो.’ गांधीजी कृतनिश्चयी होते.

गांधीजींनी आपले काम थांबवले. हाती सूप धरुन ते त्या तिळाच्या ढिगाजवळ बसले. काम करणाऱ्या बायकाना सुटी दिली. कस्तुरबाने हे पाहिले. ती धावत आली. गांधीजींच्या हातून सूप काढून घेत म्हणाली.

'राहू देत ते. तुम्हाला काय कमी कामे आहेत. होय? मी करते माझे काम. तुम्ही तुमची कामे करा.' कस्तुरबा वरमली.  वृध्दावस्था आली पण कुणाकडून कस्तुरबाने सेवा स्वीकारली नाही. तडजोडी स्वीकारल्या नाहीत. रामदासची लेकरे आश्रमात रहायची. त्यांचा खर्च रामदास आश्रमाच्या व्यवस्थापकाना द्यायचा. पैसे चुकवायचा. सेवाग्राम आश्रम दिल्या पैश्यांची पावतीही द्यायचा. कस्तुरबाला ते खूप वाईट वाटायचे. आश्रम सार्वजनिक फंडावर चालायचा. तिथे सर्वसामान्य काय आणि नातलग काय? सारेच सारखे होते. सोमवारी तिचा उपवास असायचा. ती नातवंडांना बटाटे वा रताळे वाफवून द्यायची. असा स्वाद आणि असा उपवास असायचा. कस्तुरबा नातवंडांना हे वाढायची. गांधीजींना याचा राग यायचा.

'या लेकरांच्या सवयी बिघडवू नका.' गांधीजी ताकीद द्यायचे. 'अहो - इतर आजी-आजोबांची घरे बघा. नातवंडांना गोडधोड मिळते. मिठाया मिळतात. तुम्ही तर या लेकरांना वाफवलेले अळणी पालक खाऊ घालता आणि मी जर चार-दोन तुकडे बटाटा दिला तर काही आकाश कोसळायचे नाही हो!' एवढेच ती म्हणायची.

हे ऐकून गांधीजींना हसू यायचे. हे तर प्रपंचमुक्त, पारिव्राजक आजी-आजोबा होते.

एकदा मणीलाल व सुशीला सेवाग्रामला आलेत. त्यांचा धाकटा मुलगा अरुण आजारी होता. तापाने फणफणत होता. गांधीजींना हे कळले. त्यांनी उपचार सुचवला. 'आठवडाभरचा उपवास.' या दरम्यान फक्त पाणी प्यायला मुभा होती. तिसऱ्या दिवशी ताप उतरला. अरुणला भूकेने घेरले. तो काही खायला मागू लागला. रडू लागला. त्याची आई व्याकुळ झाली. तिने सासऱ्याला विचारले. 'अरुणचा ताप उतरला आहे. तो काही खायला मागत आहे. काही देऊ का खायला? काय देऊ?' आईचा प्रश्न होता.

'अजून काही खायला-प्यायला देता येणार नाही.' गांधीजी धीर गंभीरपणे म्हणाले.

'पण त्याला भूक लागलेली दिसते.' सुशीलाची कासाविशी वाढली होती. गांधीजींचा सूत कातणारा हात उंच-उंच होत जात होता.

'अजुन थोडी वाट बघावी लागेल.' ते एकाग्रपणे सूताकडे बघत म्हणाले होते.

आता गांधीजींचा हात सूत गुंडाळायला खाली-खाली येत होता. पांढरे शुभ्र सूत गुंडाळले जात होते. तिकडे अरुण भूकेने कासावीस होत होता. सुशीलेला तर इकडे आड आणि तिकडे विहीर असे झाले. एवढ्यात अरूणच्या कपाळावर मायेचा हात फिरला. त्याने डोळे किलकिले करुन वर बघितले तो आजी. ती स्निग्ध नजरेने बघत होती. तिच्या हाती संत्र्याच्या रसाचा चकचकित प्याला होता. स्नेहयुक्त स्निग्धतेने तिने विचारले 'भूक लागली असेल ना बाळा तुला?' अरुणला काही सांगता येईना. सुशिलाला काही बोलता येईना. कस्तुरबाने तो रसाचा प्याला अरुणच्या शुष्क ओठांवर टेकवला. कापसाने पाणी शोषून घ्यावे तसा तो प्याला अरुणच्या घशाखाली रिता झाला. गांधीजी हे सारे बघत होते. शांत होते. ही दोन सत्यांची टक्कर होती. गांधीजींची शिस्त अटळ होती. कस्तुरबाचा संकल्प दृढ होता. गांधीजींच्या मुखावर स्मित झळकले.

श्री अरुण गांधी यांच्या पत्नी सुशीला यांचा एक लेख आहे. यात आपल्या सासू आणि सासरे यांच्याविषयी त्यांनी अतिशय मनोरम अंकन केले आहे. दोघांच्या व्यक्तिमत्वाचे सुरेख खंडन आहे आणि हो मंडनही आहेच तर. त्या लिहितात.

"आम्ही निरोप घेण्या आधीची गोष्ट आहे. एके दिवशी बापू बांना चिडवत होते. ते म्हणाले 'आश्रम सोडून आपण एखाद्या आरामशीर बंगल्यात आपली मुले, त्यांच्या बायका आणि आपली नातवंडे यांच्यासमवेत एकत्र रहायला काय हरकत आहे? मग तुला आराम करता येईल. आपल्या सुनांवर अवलंबून रहाता येईल.' नंतर माझ्याकडे वळत बापू म्हणाले 'आणि सुशीला, तू सासूची सेवा करण्यासाठी सर्वात जास्त वेळ घालवतेस.

त्यासाठी तिने तुला लाच-बीच तर नाही दिली ना?' मी त्याच खट्याळपणे उत्तरले होते 'बापू, तुमची सेवा करुन मला मिळणार फार तर तुम्ही कातलेल्या सूताचे काही धागे पण बा मला मोठ्ठी बक्षिसी देतील.' यावर बापूंना खळाळून हसू आले. मी निरोप घेत असताना सामान-सुमान बांधत होते. बांनी माझ्यासाठी भेट वस्तु आणली. त्यांनी स्वत: सूतापासून कातलेली ती पांढरी शुभ्र नाजूक साडी होती. त्यावर बापू हसत म्हणाले होते 'त्यातले निम्मे सूत मी कातलेले आहे. हे तुला ठाऊक आहे. काय?"[२]

आश्रमात कस्तुरबाची भूमिका एका लवादाची असायची. प्रत्येक जण त्यांच्याकडे आपापले गाऱ्हाणे घेऊन यायचा. गांधीवादी तत्त्वचिंतक श्री काकासाहेब कालेलकर यांनी आपल्या 'टॉर्च बेअरर्स ऑफ द गांधी' या ग्रंथात एक आठवण दिली आहे. ते लिहितात की गांधीजींच्या दृष्टीने आश्रम म्हणजे तत्त्वांची ॲकॅडेमी होती. या वातावरणात कस्तुरबा ही सर्वांची माऊली होती. प्रेम आणि सहानुभूती यांचा मुख्य स्रोत होती ती. दुसऱ्यांचे दु:ख दूर करताना अनेकदा ती नियमांच्या पलीकडे जात असायची. आश्रमाच्या नियमातून कस्तुरबाला सूट दिली आहे. असे गांधीजींना जाहीर करावे लागत असे.

कस्तुरबा आता स्वत:चा कार्यक्रम स्वत:च आखू लागली होती. ती काही नवऱ्याची केवळ अनुगामिनी नव्हती. पत्नी ही पतीची आज्ञा मूकपणे पाळणारी स्त्री असते. हा समज तिने दूर केला होता. ती गांधीजींइतकीच मानसिक दृष्ट्या सक्षम होती. सहकाऱ्यांना तिच्याविषयी अपरंपार निष्ठा होती. अखेरच्या काही वर्षात तर ती वाचू लागली होती. तिच्या वाचनाला फार वेग नव्हता. समज मात्र पूर्ण होती. आता तिला वर्तमानपत्रे आणि पत्रे वाचता येऊ लागली होती.

सेवाग्राम आश्रमातील आपल्या आठवणी सांगताना श्री अमृतलाल नानावटी या शिक्षकाने 'इन द सर्व्हिस ऑफ बा एंड बापू' या ग्रंथात कस्तुरबाच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला आहे. ते लिहितात की ते सामुदायिक स्वयंपाकघरातील काम करत असत. याशिवाय आश्रमातील सदस्यांना अभिजात भारतीय संगीत शिकवत. एके दिवशी ते लीलावतीला एक चीज शिकवत होते. राग कलिंगडाची सरगम शिकवणे सुरु होते. वारंवार प्रयत्न करुनही लीलावती ते समजू शकत नव्हती. यावेळी कस्तुरबा आली. उंबरठ्यापाशी थबकली. लीलावतीला काही रेगम येत नव्हते. नानावटी ते पुन्हा-पुन्हा दिलरुबासोबत गाऊन दाखवत होते. कस्तुरबाने दोन-तीनदा बोल ऐकले होते. 'मी म्हणू का?' असे तिने विचारले. लागलीच हा राग गुरुच्या कल्पनेनुसार गाऊन दाखवला होता. त्या वयात सुध्दा एखादी गोष्ट पटकन आत्मसात करण्याचा गुण कस्तुरबाच्या ठायी होता. ती गात होती.

***मगम मगम पध पध सागध धपध मपम धप***
***म म मगरे सारे रेगम पपप रे निध पमम ग रे सा***

श्री अमृतलाल कस्तुरबालाही शिकवायचे. सकाळी आठ वाजता वर्ग सुरु व्हायचा. ती ओट्यावर उभी असायची. शिकायला उत्सुक असायची. वेळेवर वर्ग सुरु झालाच पाहिजे असा तिचा कटाक्ष असायचा. आधीच बैठकीसाठी चटई अंथरुन ठेवलेली असायची. ती तेलाचा दिवा लावायची. गीतेचा बारावा अध्याय वाचायला सुरूवात करायची. तो अध्याय तोंडपाठ करण्याचा तिचा प्रयत्न होता. त्यानंतर वेळ मिळेल तर गांधीजींच्या गुजराती आत्मचरित्रातील काही पाने वाचायची. गीता पाठानंतर 'आश्रम भजनावली' मग 'भज मन रामचरण सुखदायी' या भजनाचे पान उघडले जायचे. तुलसी रामायणाचे पठन व्हायचे. ती अर्थही वाचायची. पत्रे लिहवून घ्यायची. कधी रोजनिशी लिहवून घ्यायची. घड्याळ बघायची. 'चला वेळ संपला.' असे म्हणायची. एखाद्या दिवशी खाडा झाला तर तिच्या नजरेत नाराजी उमटायची. 'आज माझा वर्ग का नाही घेतलात?' असा जाब विचारायची. सुदैवाने ही नाराजी काही फार वेळ टिकायची नाही.

कस्तुरबा शिकायला लागली. गांधीजींनी तिला आधी पाटीवर लिहायला सांगितले. तिने नोटबुकचा आग्रह धरला. गांधीजींनी तिला 'चांगले लिहिता आले की देईन की नोटबुक.' असे सांगितले. तिला आला राग. तिने आपली पाटी गांधीजींच्या पुढ्यात ठेवली. 'मी

जीवनाच्या पाठशाळेत शिकेन. मला नको तुमची पाटी. घ्या ती परत.' गांधीजी समजावणीच्या सुरात काही सांगू बघत होते. कस्तुरबाचा निर्णय ठाम होता. अखेर प्यारेलालने एक सुंदर नोटबुक तिला दिले. हे नोटबुक गांधीजींकडूनच मिळाले आहे. हे तिच्या लगेच ध्यांनात आले. तिने ते शांतपणे गांधीजींना परत करत म्हटले 'मला नको हो नोटबुक. माझ्यासारख्या अशिक्षित बाईला कशाला हवे नोटबुक?'

गांधीजींनी तिला गीता शिकवायला सुरुवात केली. ते भूगोल शिकवत. कधी कथारुप इतिहास शिकवत. संध्याकाळी तिला काही-ना-काही वाचून दाखवत. पृथ्वीचा आकार कसा? अक्षांश-रेखांश म्हणजे काय? यासारख्या गोष्टी ती शिकली. गांधीजी अधुन-मधून इतिहास शिकवू लागले. दुपारची जेवणे आटोपायची. ते काही वाचून दाखवायचे. त्यावर चर्चा व्हायची. टीका-टिप्पणी व्हायची. तिला खूप आनंद वाटायचा. काही नवीन शिकायला खूप आवडायचे. आपण शिकायला खूप उशीर केला असेही वाटायचे.

आता आपण आपल्या नातवंडांचा किमान भूगोल - इतिहासाचा अभ्यास तरी घेऊ शकू असा विश्वास तिला वाटला. कसा निष्कपट विश्वास. नातवंडांविषयीची कशी वात्सल्यभरली प्रीती! पाचवीचे पुस्तक होते. यात कविता होत्या. कवितेच्या आरंभी त्या त्या रागाचे नाव असायचे. गांधीजी कस्तुरबाला तो तो राग शिकवू लागले. सायंकाळची प्रार्थना आटोपली की दोघे एकत्र बसून ती गाणी गात असत. आश्रमवासियांना ते मधुचंद्रासाठी आलेले म्हातारे जोडपे वाटायचे.

गांधीजींनी एकदा कस्तुरबाला पंजाबचा भूगोल शिकवला. तिथल्या प्रमुख नद्यांची नावे सांगितली. दुसऱ्या दिवशी नद्यांची नावे विचारलीत. कस्तुरबाला काही सांगता आली नाहीत. यावर गांधीजी काही रागावले नाहीत. याचे कस्तुरबाला खूप वाईट वाटले. वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षी त्या दिवशी तिने पंजाबच्या नद्यांची नावे पाठ केली. दुसरा दिवस उजाडला. गुरुजीला सारी नावे सांगितली. शाबासकी मिळवली. तिला केवढा आनंद झाला होता. ती वर्गपाठ तर करायचीच पण तिचा गृहपाठही पूर्ण असायचा.

एकदा आश्रमात प्यारेलाल मुलाना भूगोल शिकवत होता. कस्तुरबा ते ऐकत होती. प्यारेलाल अक्षांश व रेखांश शिकवत होता. त्याला इंग्रजी नावे येत होती. कस्तुरबाने लगेच सुशीलाला सांगितले 'हे बघ, प्यारेलाल चुकीचे शिकवत आहे. तो अक्षांशाला रेखांश म्हणत आहे. त्याला थांबव.'

दुपारी गांधीजी तिला गीता शिकवत होते. रात्री तासभर गुजराती लिहवून घेत. गाणेही शिकवत. कस्तुरबा सांगत होत्या की आधीपासून त्यांनी असे लक्षपूर्वक शिकवले असते तर तिने किती तरी शिकून घेतले असते. गांधीजींनी तरी कधी अशाप्रकारे वेळ दिला होता? आताही देत रहातील तर चांगले होईल.

गांधीजी श्रेष्ठ सत्याग्रही होते. ध्येयवादी होते. त्यांचे अनुसरण करताना कस्तुरबाने काही कमी त्याग केला नव्हता. गांधीजी तपस्वी पुरुष होते. त्यांच्यासोबत वाटचाल करणे सोपे नव्हते. अधूनमधून भूकंपासारखे धक्के खावे लागत. ज्वालामुखीच्या उकळत्या लाव्हारसातूनही वाट काढावी लागे. एवढे सारे तिने सहन केले. अखेरपर्यंत वाट चालत राहिली. आपल्या इच्छा-अनिच्छेचा त्याग केला. नाना अडीअडचणांचा डोंगर पार केला. परिवर्तनांना अनुकूल मानून घेतले. हे सारे पत्करुन नवऱ्याच्या वाटेवर वाटचाल करणे सोपे काम नव्हते. यासाठी विपुल आत्मबळ आणि अपूर्व समर्पणाची गरज आहे. तिच्या ठायी या दोन्ही गोष्टी होत्या. तिने या दोन्ही गुणांचा विकास साधला होता. यामुळे गृहस्थ जीवनाचा दुस्तर सागर ती कुशल पोहोणाऱ्याप्रमाणे पार करुन गेली.

कस्तुरबाला गांधीजींनी वाल्मिकी रामायण वाचून दाखवले होते. राम-भरत मिलाप प्रसंग तिला मनापासून आवडायचा. पुढे तिने मनूकडून ते संपूर्णपणे वाचवून घेतले होते. भागवत वाचायला लावले. सायंकाळी चार ते साडे चार ती भागवत ऐकायची. एकादशीला फलाहार करायची. सोमवारी उपवास असायचा. सोमवती अमावस्येचा उपवास असायचा. पौर्णिमेचा उपवास असायचा. गोकुळ अष्टमीचा उपवास असायचा. शिवरात्रीचा उपवास होता. असे तिचे उपवास असायचे. ती कधी-कधी सलगपणे तीन-तीन दिवस उपवास करत होती. या सोबत राष्ट्रीय सप्ताहाचा उपवास

असायचा. 'छोडो भारत' चा उपवास होता. 'करेंगे वा मरेंगे' हा उपवास असायचा. 'आश्रम भजनावली' आणि 'अनासक्ती योग' हे दोन ग्रंथ तिच्या हाती अखेरपर्यंत होते. ती जवळपास रोज हे ग्रंथ वाचायची. भजने गायची.

गांधीजी उच्चविद्याविभूषित - थोर नेते होते. कस्तुरबा मात्र अशिक्षित होती. एक सामान्य गृहिणी होती. गांधीजींनी आपल्या जीवनात सातत्याने एका-मागून-एक मोठी परिवर्तने केलीत. आपल्या आचार-विचारांविषयी खूप आग्रही राहिलेत. यामुळे या तमाम चढणीच्या वाटेवर तिची पूरेपूर कसोटी लागायची. अनेकांना असेही वाटायचे की तिला अपार त्रास सहन करावा लागत आहे. पण तशी वस्तुस्थिती नव्हती. ती हे सारे आनंदाने आणि उत्साहाने स्वीकारायची. एका आधुनिक विचाराच्या भगिनीने गांधीजींना एक पत्र लिहिले. यात तुम्ही आपल्या पत्नीचा गैरफायदा उठवत आहात असे लिहिले. एकदा कस्तुरबा बोलली होती की तिच्या नवऱ्याचा मार्ग कंटकाकीर्ण आहे. हे ऐकून त्या युवतीला असे काही वाटले असेल अशी शक्यता आहे.

कस्तुरबाने त्या युवतीला एक खरपूस पत्र लिहिले होते. हे कस्तुरबाचे एक ऐतिहासिक पत्र आहे. तिला हे पत्र साक्षात् त्या टीकाकार भगिनीलाच पाठवायचे होते. वृत्तपत्रामधून प्रकाशितही करायचे होते. गांधीजींनी हे पत्र त्या टीकाकार भगिनीला पाठवू दिले नाही. वृत्तपत्रातून प्रकाशित होण्याचा तर मग प्रश्नच उद्भवला नाही. सेवाग्राममध्ये वनमाला परीख महादेवभाई देसाई यांच्या काही पत्रांची नक्कल करत होत्या. त्या दरम्यान हे पत्र त्यांच्या हाती लागले. गांधीजींच्या परवानगीने त्यांनी हे पत्र आपल्या 'आपल्या बा' या ग्रंथात प्रकाशित केले आहे. पत्र मूळात गुजराती भाषेत आहे. कस्तुरबाने त्या युवतीला लिहिलेले हेच ते ऐतिहासिक पत्र!

शुक्रवार, अखंड सौभाग्यवती लीलावती, तुमचे पत्र मला खूप खटकत रहात आहे. तुमच्या-माझ्यात तर कधी चर्चेची वा गप्पांची खूप संधीही लाभली नाही मग गांधीजी मला खूप दुःख देतात, हे तुम्ही कसे काय जाणून घेतले? माझा चेहरा नाराज असतो. मला धडपणे खाताही येत नाही. हे सारे का तुम्ही कधी बघायला आला होतात? माझ्या पतीसारखा पती तर जगात कुणाही स्त्रीचा नसेल. सत्याच्या प्रभावामुळे ते जगभर पूजनीय आहेत. हजारो त्यांचा सल्ला घ्यायला येतात. ते हजारोंना सल्ला देतात. कधी, कुठल्याही दिवशी त्यांनी माझी चूक वा दोष काढलेला नाही. मी लांबवरचा विचार करु शकत नसेल, माझा दृष्टिकोण संकुचित असेल तर मला समजाऊन सांगतात की अग, असे तर जगभर सर्वत्र चालतच असते. गांधीजी वृत्तपत्रांमधून चर्चा करतात. माझ्या नवऱ्यामुळेच तर मी जगात वंदनीय आहे. माझ्या नातलगांमध्ये खूप प्रेमभावना आहे. मित्र परिवारात मला मोठा मान-सन्मान लाभतो. तुम्ही माझ्यावर खोटा आरोप लादताहात. हा कुणीही मानणार नाही. मी काही तुमच्यासारखी आजच्या काळातली नाही. खूप स्वातंत्र्य घ्यावे. पती जर तुमच्या ताब्यात राहिले तर उत्तमच अन्यथा तुमचा व माझा मार्ग भिन्न आहे. पण सनातनी हिंदूला हे काही शोभून दिसणारे नाही.[३]

पार्वतीजीचीं तर ही प्रतिज्ञा होती की 'मला जन्मोजन्मी शंकरच पतीरुपाने लाभोत.' कस्तुरबा खुप सुंदर होती. आश्रमात रोज काही-ना-काही गंमत व्हायची. आजची गंमत काही औरच म्हणावी लागेल. सकाळची वेळ होती. गांधीजी सूत कातत होते. आश्रमात प्रत्येक जण आपापल्या परीने कामात होते. कस्तुरबा अर्थात्च स्वयंपाकघरात होती. कवयित्री सरोजिनी नायडूने गांधीजींना एक प्रश्न थेट विचारला

'तुमच्या मते जगातील सर्वात सुंदर महिला कोण?' सरोजिनीचा प्रश्न तीक्ष्ण होता.

'कमाल आहे. कवयित्री आहात ना तुम्ही? आणि एवढीही कल्पना नाही करु शकत? जगातील सर्वात सुंदर महिला तर अलबत् कस्तुरच.' क्षणभरचाही विचार न करता गांधीजी उत्तरले होते.

हे ऐकून शांत न रहाता सरोजिनीने सरळ कस्तुरबाकडे धाव घेतली. तिलाही थेट विचारुनच तर घेतले. 'गांधीजी असे बोलले. यावर तुमचे काय मत?' सरोजिनीने कस्तुरबाला विचारले.

'माझा नवरा कदापि खोटे बोलत नाही.' कस्तुरबाच्या निवेदनात ठामपणा होता.

गांधीजींचा वाढदिवस यायचा. हा साजरा करण्याची कस्तुरबाची आपली स्वतःची शैली होती. या कामी गांधीजींच्या साधेपणाचे उल्लंघन होता कामा नये.

याबाबत ती काळजीही खूप घ्यायची. या कार्यक्रमानिमित्त कस्तुरबा आश्रमातील सर्व लेकराना चणे-चुरमुरे, खोबरे व बेदाणा द्यायची. सेवाग्रामपासून सहा-एक मैलांच्या अंतरावर एक महिलाश्रम होता. तरुण आणि अनाथ मुलींना यात सामावले जाई. २ ऑक्टोबर रोजी या मुली गांधीजींच्या वाढदिवसानिमित्त यायचे म्हणत होत्या. त्यांना परवानगी देण्यात आली. 'येताना आपले जेवणाचे डबे सोबत आणावेत. आश्रम केवळ पिण्याचे पाणी देऊ शकेल.' असे त्यांना कळवण्यात आले होते. मुलींनी तसे केले. सेवाग्राममध्ये या मुली प्रात:कालीन प्रार्थनेच्या वेळी हजर झाल्या. कस्तुरबाला खूप आनंद झाला. दुपारी विहिरीवर जाऊन त्या कन्यांनी हात-पाय-तोंडे धुतली. वडाच्या झाडाखाली गोलाकार अंगत-पंगत करुन जेवायला बसल्या. झाडाच्या सावलीत आपापले डबे उघडून बसल्या. त्या मुलींना कस्तुरबाने बघितले. तिला धक्का बसला. 'तुम्ही आमच्यासोबत का जेवत नाहीत?' तिच्या या प्रश्नावर कुणी काही बोलले नाही. तिने सर्वांना तिथून उठवले. आपल्या छोट्या कुटीत घेऊन आली. व्हरांड्यात बसवले. तिथे खूप घनदाट सावली होती. आश्रमातून काही गोड-धोड पदार्थ आणले. प्रेमाने वाढले. या दरम्यान गांधीजी तिथे आले.

'काय हो? काय चालले आहे. इथे?' गांधीजींनी विचारले.

'हे बघा, या माझ्या पाहुण्या आहेत. त्या माझ्या व्हरांड्यात बसल्या आहेत. मी त्यांची यजमानीण आहे.' कस्तुरबा म्हणाली.

'बरे, बरे.' गांधीजींना हे मान्य करण्याशिवाय पर्याय उरला नव्हता. 'काही हरकत आहे. काय?' कस्तुरबाने तीक्ष्णपणे विचारले.

'नाही, म्हणजे इकडे येण्यापूर्वी या मुलींसाठी मी काही अटी घातल्या होत्या.' गांधीजींनी स्पष्टीकरण दिले.

'आज माझ्या नवऱ्याचा वाढदिवस आहे. आज माझा कुठलापाहुणा उपाशी गेल्याचे मला चालणार नाही.' कस्तुरबाचा निर्णय ठाम होता. 'अग पण' गांधीजी काही सांगायचा प्रयत्न करत होते.

'काही मूठभर पाहुण्यांचेही आतिथ्य न करायला आपल्या आश्रमाचे काही दिवाळे निघालेले नाही म्हटले.' कस्तुरबाने खुलासा केला. गांधीजी मुळूमुळू हसू लागले. पंगतीत अधिकच रंगत आली.

कस्तुरबा आश्रमातील भोजन घेत नसत. स्वत:साठी स्वतंत्रपणे स्वयंपाक करत असत. तिच्या भोजनात साखर, मसाले आणि तळलेल्या पदार्थांचाही समावेश असायचा. आपल्या भोजनातून ती बालकांनाही प्रसाद देत असायची. हे सारे गांधीजी सहन करुन घ्यायचेत. अधून मधून टोमणा मारायलाही चुकत नसायचे. एकदा भोजनप्रसंगी म्हणाले "आज तर छान काही तरी चटपटीत केलेले दिसत आहे. मन लालचावत आहे. कोण खाईल हे सारे? थोडे आम्हालाही मिळेल काय?" गांधीजींना खरे तर त्यातले काही नकोच होते. गांधीजी स्वत:वरच अधिक बंधने लादत असत.

आभा गांधी एकदा आजारी होती. आठवडा लोटला होता. तिचा ताप काही उतरत नव्हता. एके दिवशी अचानक दुपारी कस्तुरबा तिला भेटायला म्हणून गेली. अत्यंत वत्सलतेने आभाच्या गालावरुन हात फिरवला. तिला हिंमत दिली. गांधीजींची परवानगी मिळवली. तिला बैलगाडीतून कस्तुरबाच्या कुटीत आणले गेले. कस्तुरबाने तिची खूप काळजी घेतली. आभाला अधिक दूध मिळू लागले. गांधीजीच्या फळातून काही फळेही तिच्या वाट्याला आलीत. तब्येत सुधारल्यावर आभा परत जायला लागली. कस्तुरबाने तिला थांबवून घेतले होते.

एकदा आश्रमातील प्रार्थना आटोपली होती. 'सायंकालीन प्रार्थनेनंतर रामायणाचे पठन केले जाते. चौपायांचे गान होते. त्याचा अर्थ काही माझ्या लक्षात येत नाही. तो मी सकाळीच बळवंतसिंगांकडून समजून घ्यावा का?' कस्तुरबाने गांधीजींना विचारले.

'हे फार उत्तम होईल. बळवंतसिंगाला निरोप दे. तो तर आनंदाने हे काम करील.' गांधीजी म्हणाले.

बळवंतसिंग सेवाग्रामच्या आश्रमातच रहात असत. ते मूळचे उत्तर प्रदेशातील होते. रामायणाचा त्यांचा सखोल अभ्यास होता. अर्थ समजावून सांगणे त्यांना अगदी सहज शक्य होते. त्यांना निरोप पाठवण्यात आला. ते आले. कस्तुरबाने विचारले की ते रामायणाचा अर्थ समजावून सांगतील काय? त्यांना रोज अर्धा तास देता येईल काय? बळवंतसिंगांना आनंद झाला. कस्तुरबाने

त्यांच्या सोईची वेळ समजून घेतली. ठरल्या वेळेच्या पंधरा मिनिटे आधीपासून ती तयार होऊन जायची. ओट्यावर बळवंतसिंगांसाठी आसन मांडलेले असायचे. हातात रामायणाची पोथी असायची. कस्तुरबाची एकाग्रता विशेष होती असे म्हणावे लागेल. पंच्याहत्तर वर्षे वयाची विद्यार्थीनी. पंचेचाळीस वर्षे वयाचे गुरुजी. हे एक अनुपम दृश्य होते. कस्तुरबाची जिज्ञासा आणि शिष्य भावना केवळ वाखाणण्याजोगी होती.

संदर्भ

१) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ३ ऑक्टोबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ६३ पृष्ठ ३७६;

२) 'इंडियन ओपिनियन' चा कस्तुरबा गांधी विशेषांकामधला सुशीला गांधी यांचा लेख.;

३) अमारी बा : वनमाला परीख आणि सुशीला नायर (मूळ गुजराती) हिंदी अनुवाद श्री काशिनाथ त्रिवेदी पृष्ठ १५ - १६.

❖❖❖

## ८) मंगल प्रवचने

गांधीजींनी आपल्या आत्मचरित्राच्या आरंभिक निवेदनात असे म्हटले आहे.

"मी सत्यस्वरुपी परमेश्वराचाच पुजारी आहे. तो एकच सत्य आहे. आणि बाकी सारे मिथ्या आहे. ते सत्य मला सापडलेले नाही. मी त्याच्या शोधात आहे. त्याच्या शोधार्थ मला सर्वात प्रिय असलेल्या वस्तुचाही त्याग करण्यास मी तयार आहे. या शोधरुपी यज्ञामध्ये या शरीराचाही होम करण्याची माझी तयारी आहे. आणि शक्तिही आहे. असा मला विश्वास वाटतो."[१]

गांधीजींची सत्यविषयक शोधयात्रा होती. त्यांनी 'श्रीमद्भगवद्गीता' व 'रामायण' हे ग्रंथ आधारभूत मानले. कस्तुरबाचा आग्रह होता. यामुळे आपल्या काही पत्रांमधून गांधीजींनी प्रवचन दिले होते. यात निरलसता आहे. प्रामाणिकपणा आहे. रामनाम महात्म्यविषयक जागरण आहे. त्या प्रवचनांचा या प्रकरणात आढावा घेऊ या ! गांधीजींनी कस्तुरबाला गीता प्रवचन पाठवले होते -

"बा, तू प्रवचनासारखे काही लेखन मागितले होतेस, एक तर आज पाठवायलाच हवे ना?

"आजचे गीतेचे अध्याय ९ ते १२ होते. नवव्या अध्यायातल्या २९ व्या श्लोकात भगवंत म्हणतात की मला भजणारा मला पावतो. बाराव्या अध्यायाच्या तेरा ते वीस या श्लोकात भक्त कुणाला म्हणावे? याविषयीचे विवेचन आले आहे. कुठल्याही अज्ञानीतील अज्ञानी व्यक्तीच्या लक्षात येणार नाही असे एकही लक्षण यात सांगितले गेलेले नाही, हे याचे वैशिष्ट्य आहे. कुणीही स्त्री वा पुरुष अन्य कुणाच्याही मदतीशिवाय स्वत: परिश्रम करुन भक्त बनू शकतो. अर्थात् ईश्वराला प्राप्त करुन घेऊ शकतो. लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत. -

कुणाचा द्वेष करु नये. प्राणीमात्राप्रती मैत्रभाव जोपासावा. सर्वांविषयी दयाभाव बाळगावा. 'माझे-तुझे' हा भाव नसावा. अहंकार नसावा. सुख-दु:खाला समान मानावे. क्षमावान असावे. सदैव संतुष्ट असावे. संयमाचे पालन करावे. जो भय आणि चिंतेपासून मुक्त असतो तो भक्त! जो कुठल्याही गोष्टीची आशा वा इच्छा करत नाही तो भक्त! जो पवित्र आहे. जो कार्यकुशल आहे. ज्याने सर्वस्वाचा त्याग केला आहे. ज्याच्या दृष्टीत शत्रु आणि मित्र समान आहेत. तो भक्त. त्याला मान-अपमान समान आहेत. तो शीत-उष्ण सहन करतो. त्याला निंदा-स्तुती समान आहे. तो जिथे असतो तिथेच घर वसवून रहातो. त्यासाठी घर नावाची कुठली गोष्ट नसते. तो अकारण बोलत नाही. त्याचे मन व्यवस्थित असते. तो माझा भक्त म्हणवला जातो."

या सर्वावर तू वारंवार विचार कर. तुझ्या लक्षात येईल की कुणीही केवळ इच्छामात्रेण कुणाच्या मदतीशिवाय भक्त बनू शकतो.[२]

गांधीजी गीतेचा उपदेश करतात. गीतेच्या नऊ ते बारा या अध्यायांची निवड करतात. हे फार मनोरम आहे.

गीतेचा नववा अध्याय हा गीतेचा मध्यबिंदू आहे. 'राजविद्या राजगुह्य योग' हे या अध्यायाचे नाव आहे. हा गुह्य ज्ञानाचा गाभा आहे. गूढ वेगळे आणि गुह्य वेगळे. गूढ उकलू शकते. गुह्य मात्र उकलत नसते. या अध्यायात जगाच्या उत्पत्तीचा विषय आला आहे. यात ईश्वर निंदकांची निंदा आहे. भगवंत सर्वात्मकरुपी आहे. प्रभावशाली आहे. त्याच्या स्वरुपाचे वर्णन आहे. उपासना दोन प्रकारच्या असतात. एक सकाम. दुसरी निष्काम. या दोन्ही उपासनांच्या फलिताची चर्चा इथे आली आहे. कर्मयोग आणि भक्तियोगाचा मधुर मिलाप आहे.

दहावा अध्याय विभूतीयोगाचा आहे. यातून भगवंताच्या विविध विभूतींचे दर्शन होते. योगशक्तीचे महत्व कळते. योगविद्या जाणण्याच्या फलिताची चर्चा येते. स्थावर व जंगम वस्तुंचा परिचय होतो. मानवी विविध प्रवृत्ती असतात. निसर्गात विविध घटिते असतात. तिथे भगवंताच्या अस्तित्वाची खूण वाचता येते. भक्तीयोगाचा प्रभाव कळतो. त्याचे फलित उलगडते.

अकरावा अध्याय विश्वरुपदर्शनाचा आहे. अर्जुन भगवंताला विनंती करतो. भगवंत आपल्या विश्वरुपाचा परिचय स्वत:च करुन देतात. अर्जुनाला युध्दासाठी प्रोत्साहित करतात. विश्वरुप दर्शन घडल्यावर अर्जुन भयभीत होतो. भगवंताच्या सौम्यरुपाचे दर्शन घेतो. अनन्य भक्तीचे महात्म्य यातून कळते.

बारावा अध्याय भक्तीयोगाचा अध्याय होय. साकार व निराकार उपासकांचा परिचय यातून घडतो. भगवत्

प्राप्तिविषयक नाना उपायांचा ऊहापोह यातून आला आहे. भगवत् प्राप्ती झालेल्या पुरुषाचे लक्षण यात येते.

दुसरे प्रवचन - "मागील पत्रातून मी भक्ताची लक्षणे कळवलीत. सेवेशिवाय भक्ति संभवत नाही हेही कळवले होते. या खेपेला सेवा कशी केली जावी? या विषयी लिहीन. लोक खूपदा हा प्रश्न विचारतात. कुणी म्हणते की सेवा अमुक एका विशिष्ट परिस्थितीतच होऊ शकते. कुणाचे म्हणणे असे आहे. की आपला अमक्या एका विषयाचा अभ्यास झाला असेल तरच आपण सेवा करु शकतो. या साऱ्या निव्वळ भ्रांतीपूर्ण गोष्टी आहेत. हे तर मी मागील आठवड्यात कळवले होते. मनुष्य वाटेल त्या अवस्थेत का असेना, तो सेवा करु शकतो. आपण आपल्यापाशी असलेले शक्ती-सर्वस्व ईश्वरार्पण करुन टाकावे. आपल्याला पैकीच्या पैकी गुण मिळतील. ज्याची क्षमता एक कोटी रुपये द्यायची आहे. त्याने जर अर्धा कोटीच दिले तर त्याला ५०% हून अधिक गुण मिळू शकणार नाहीतपण त्याच्यापेक्षा केवळ एक दमडा असणाऱ्याने जर तो देऊन टाकला तर त्याला पैकीच्या पैकी गुण मिळतील. यामुळे तू व तुझ्यासोबत असलेल्या भगिनी जर आपल्या संपर्कात येणाऱ्या भगिनींशी वा अधिकाऱ्यांशी चांगला व्यवहार करत असतील तर त्या सेवाधर्माचे पालन करतात असे होईल. अधिकाऱ्यांप्रती सेवाभावनेने वागायचा अर्थ त्यांचे कदापि अहित न चिंतणे, त्यांच्याशी विनयपूर्ण आचरण करणे, त्यांना न फसवणे होय. तुम्ही नियमांचे पालन करायला हवे आणि आपल्या संपर्कात येणाऱ्या गुन्हेगार भगिनींशी सख्ख्या बहिणींप्रमाणे व्यवहार करायला हवा. त्यांच्यावर तुमच्या प्रेमाची छाप पडावी. त्यांनी तुमच्या पावित्र्याला ओळखावे हेही सेवा धर्माचे पालन म्हणवले जाईल. दोघांमधला हेतु शुध्द असावा. स्वार्थामुळे वा भयामुळे चांगला व्यवहार ठेवणे हे काही सेवेत गणले जाणार नाही. एखादा माणूस स्वार्थ साधण्यासाठी अमुक एक कार्य करतो आणि दुसरा परमार्थ बुध्दीने करतो, असे दृश्य आपण अनेकदा बघतो. जिथे सारे काही ईश्वर समर्पित असते तिथे स्वार्थाला मुळीच स्थान नसते. अशाप्रकारे सेवा करणारा नित्य आपल्या शक्तीत वाढ करुन घेत असतो. तो जो काही अभ्यास करतो वा उद्यम करतो तोही सेवा भावनेनेच करतो. अशाप्रकारे जो सेवा-परायण असतो त्याच्या आहार-विहारात, हसण्या-विहरण्यात, सेवाभाव नांदतो. तात्पर्य हे की त्याची सर्व कार्ये निर्दोष ठरतात. ईश्वर अशा भक्तांना आवश्यक ती सर्व शक्ती प्रदान करतो. या आशयाचे तीन श्लोक भगिनींच्या प्रार्थनेत आहेत. ते लक्षात असतील. हे बघ ते श्लोक ! हे तीन श्लोक गीतेच्या नवव्या अध्यायातील २२ वा आणि दहाव्या अध्यायातील ९ वा व १० वा आहेत.

*अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनाः पर्युपासते।*
*तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥*
*(गीता अध्याय ९ श्लोक २२)*

*मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ।*
*कथयन्तश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥*
*(गीता अध्याय १० श्लोक ९)*

*तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।*
*ददामि बुध्दियोगं तं येन मामुपयांति ते ॥*
*(गीता अध्याय १० श्लोक १०)*

याचा अर्थ 'अनासक्ती योग' ग्रंथामधून बघून घ्यावा. हे श्लोक तुला नवव्या आणि दहाव्या अध्यायात सापडतील. गीतेच्या अनुरुप आचरण घडावे यासाठी आपण गीतेचा अभ्यास करतो. हे स्मरणात राखायला हवे. मी वर जे लिहिले आहे. ते गीतेच्या आधारानेच लिहिले आहे. असे समजावे."[३]

पत्राचा मुख्य विषय आहे. प्रवचन. मागील प्रवचनाला परत मागवले आहे. या प्रवचनाचा आंतरबाह्य संबंध तपासून बघायची गांधीजींची इच्छा दिसते. या अध्यायात मुख्यत्वेकरुन नवव्या आणि दहाव्या अध्यायाच्या तीन श्लोकांचा संदर्भ दिला आहे. या श्लोकांचा अर्थ गांधीजींनी लिहिलेल्या 'अनासक्ती योग' या गीताभाष्यामधून बघून घ्यायचा सल्ला द्यायला ते विसरत नाहीत. हे श्लोक विशिष्ट आहेत. सेवेच्या संदर्भातले योगेश्वराचे हार्द्र यातून प्रकट झाले आहे. गांधीजींच्या 'अनासक्तीयोग' या गीता भाष्यात पुढीलप्रमाणे अर्थ सांगितला गेला आहे. -

"जे लोक अनन्य भावनेने माझे स्मरण करतात आणि मला भजतात ते नित्य माझ्या ठायीच लीन असतात. त्यांचा योग क्षेमाचा भार मी वहन करतो.

(अध्याय ९ श्लोक २२) योग क्षेम या शब्दात 'योग' व 'क्षेम' हे दोन शब्द येतात. 'योग' म्हणजे न मिळालेली वस्तु आणि 'क्षेम' म्हणजे मिळवलेल्या वस्तुंचे संगोपन."

'माझ्या ठायी मन लावणारे आणि माझ्याच ठायी प्राणार्पण करणारे, भक्तीच्या चर्चेने परस्परात माझ्या प्रभावाचा बोध करत माझेच कीर्तन करत समाधान आणि आनंदात रहातात.' (अध्याय १० श्लोक ९)

'अशा प्रकारे माझ्या ठायी रममाण असणारे आणि मला प्रेमपूर्वक भजणारे जे आहेत. त्यांना मी बुध्दी, शक्ती आणि ज्ञान अर्पण करतो आणि तेही मला प्राप्त होतात.' (अध्याय १० श्लोक १०)

या श्लोकांचा गीताप्रेस गोरखपुरने दिलेला अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल.

"जे अनन्य प्रेमी भक्त निरंतर चिंतन करत निष्काम भावनेने मज परमेश्वराला भजतात त्या नित्य माझे चिंतन करणाऱ्या माणसांचा योग क्षेम (भगवत्स्वरुपाची प्राप्ती हा 'योग' आणि भगवत्प्राप्तीनिमित्त केलेल्या साधनांचे रक्षण म्हणजे 'क्षेम' होय.) मी स्वत: त्यांना प्राप्त करुन देतो." (अध्याय ९ श्लोक २२)

"निरंतर माझ्यात मन लावणारे आणि माझ्यातच प्राणांना अर्पण करणारे माझे भक्तजन (मज वासुदेवासाठीच ज्यांनी आपले जीवन वेचले, अर्पण केले त्यांना 'मद्गतप्राण' म्हणावे) माझ्या भक्तीच्या चर्चेने परस्परात माझ्या प्रभावाचा बोध करत तसेच गुण व प्रभावासह माझे कीर्तन करत निरंतर संतुष्ट होतात आणि मज वासुदेवातच नेहमी रममाण होत असतात." (अध्याय १० श्लोक ९)

'त्या नेहमी माझे ध्यान वगैरेमध्ये मग्न झालेल्या आणि प्रेमाने भजणाऱ्या भक्ताना मी तो तत्त्वज्ञानरुप योग देतो. ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात.' (अध्याय १० श्लोक १०)

पुढचे प्रवचन, "आज 'गीता' निरुपित यज्ञ विषयावर चर्चा करीन. यज्ञाचा विषय तिसऱ्या अध्यायापासून सुरु होतो. भगवंत म्हणतात की यज्ञ केल्याशिवाय भोजन करणारा माणूस चोरीचे अन्न खातो पण हे तर फार अवघड वचन म्हटले जाईल कारण की चोरीचे अन्न खाणे तर कच्च्या पाऱ्याच्या सेवनासारखे आहे. कच्चा पारा कुणाला पचत नाही आणि खाणाऱ्याच्या अंग-प्रत्यंगातून फुटून निघतो. यामुळेच संत अखा भगतने (गुजराती भाषेतील संत कवी) म्हटले आहे. 'कच्चो पारो खावे अन्न तेवु छे चोरीनुं धन.' म्हणजे चोरीचे धन हे कच्च्या पाऱ्यासारखे अन्न सेवन करणे आहे. जो मनुष्य घडीभर यज्ञ केल्याशिवाय रहातो तो चोर ठरतो. या यज्ञाला आपण सर्वांनी जाणून घ्यायला हवे. आपल्या सद्भाग्याने ज्याचे हृदय व्यवस्थित आहे. त्याच्यासाठी यज्ञ सोपा आहे. यासाठी ना धनाची आवश्यकता ना बुध्दी वा शिक्षणाची गरज. यज्ञ म्हणजे प्रत्येक परोपकारी कार्य होय. ज्याचे संपूर्ण जीवन यज्ञमय असेल त्याच्याच विषयी तो चोरीचे अन्न भक्षण करत नाही, असे म्हणता येईल. यामुळे जी व्यक्ती अल्प-स्वल्प प्रमाणातही यज्ञ करते ती अपेक्षाकृत कमी चोरी करते. अशा प्रकारे विचार करु जाता आपण सारे जण थोडी फार चोरी तर अवश्य करतो. आपण जेव्हा स्वार्थ भावनेचा त्याग करतो तेव्हाच संपूर्ण यज्ञ केला असे म्हणता येईल. स्वार्थाचा त्याग करणे याचा अर्थ अहंचा त्याग- 'मी' चा त्याग होय. हा माझा आणि तो परका. हा माझा मुलगा आहे. तो परका मुलगा आहे. असा भाव मनात असायलाच नको. ज्याने आपले सर्वस्व कृष्णार्पण करुन टाकले आहे. असाच माणूस असे करु शकतो. जो माणूस असे करतो तो सारी कामे ईश्वराला मध्ये राखून करतो, त्याच्या सेवकाच्या रुपातच करतो आणि सेवा भावनेनेच करतो. असा माणूस नित्य शांत-नित्य सुखी असतो. त्याच्यासाठी सुख-दु:खे समान असतात. तो आपल्या तन-मन-धन बुध्दीचा - जे काही त्याच्यापाशी आहे. त्या सर्वांचा परमार्थासाठीच उपयोग करतो असा पूर्ण यज्ञ आपण सारे नाही करु शकत. समस्त जगाची सेवा आपल्या हातून होत असेल तर आपण करावी. अशी भावना जर मनी असली तर समस्त जगाचे कल्याण होऊ शकेल असे सर्वांना करता येण्यासारखे कोणते कार्य आहे.? अशा प्रकारे विचार करु जाता माझ्या लक्षात सूतकताईचा विचार आला. परमार्थाच्या दृष्टीने अगणित व्यक्ती हे कार्य करु शकतात. एवढे परिश्रम जगतासाठी करता येतील. हे तर मी एक उदाहरण दिले. एक दृष्टांत दिला. मला तर मुखत्वेकरुन तुला यज्ञाचा

हेतु आणि अर्थ समजाऊन सांगायचा होता. यातून एवढे जरी मी समजाऊन सांगू शकलो तरी पुरेसे आहे."[४]

या पत्रासोबत गीतेशी संबंधित जे प्रवचन दिले गेले आहे. ते गीतेचा एक नवा अर्थ उलगडवून सांगणारे आहे. पारंपारिक अर्थाला फाटा देत गांधीजी यज्ञाला सेवेचे परिमाण मानतात. सेवाधर्म हा खरे तर सर्वात श्रेष्ठ आणि सर्वात अवघड असा धर्म आहे. यज्ञ शब्दाचा धातुगत अर्थ केवळ युज् या धातुचा विचार मांडतो. गांधीजी सेवेला यज्ञाचे अभिधान देतात. सूतकताईसारख्या रुक्ष वाटणाऱ्या कार्याला 'सूत्र यज्ञ' म्हणतात. इथे युज् म्हणजे जोडण्याचा संदर्भ येतो.

आता पुढील प्रवचन - "'भगवद्गीता' म्हणते की ईश्वराच्या भक्ताला एकांत सेवन करायला हवे. या कथनाला नीट समजून घ्यायला हवे. आपण सारे या जगात एकटेच आलो होतो आणि एकटेच जाणार आहोत. तर मग जन्म व मरण यात जो अनिश्चित काळ आहे. यात आपण कुणाच्या सोबतीसाठी का अस्वस्थ व्हावे? आपण एकटे जन्माला आलो असलो तरी आपण हेही बघतो की आपण एकटे नाहीहोत. आपल्याला माता-पित्यांचा संग लाभतो. त्यांच्या संगतीशिवाय आपण क्षणभरही जिवंत राहू शकत नाही. आपण जेव्हा मोठे होतो तेव्हा सामान्यपणे आपला विवाह होतो. त्यातूनही आपल्याला संग लाभतो मग आपल्याला मित्रांचाही संग लाभतो. आत्मोन्नतीसाठीही आपल्याला काही मर्यादेपर्यंत संगती-साथीची आवश्यकता असते. असे असतानाही आपल्याला एकांताचा-एकांत-सेवनाचा उपदेश का दिला जातो? हा विषय आपण समजून घेतला पाहिजे. आपण साथीदारांच्या साथी विषयी जेवढा म्हणून विचार करु तेवढे ते पराधीनतेचे सूचक असल्याचे आपल्या ध्यानी येईल. आई-वडील, पती-पत्नी, मित्र-सारे काही मर्यादेपर्यंत आपल्याला परावलंबी बनवतात पण जो ईश्वराचा भक्त आहे. तो दयाळू आहे. त्याला केवळ ईश्वराचा आधार असतो. ईश्वरच एकमेव खरा साथीदार आहे. आणि तोच सारथीही आहे. ज्याच्यासोबत ईश्वर आहे. त्याला आणिक काय हवे? यामुळे 'गीता' माता म्हणते आहे. की आपण एकांत शोधायला हवा. आपण माणसांची साथ सोडून पलायन करायला हवे असा मात्र याचा अर्थ होत नाही. याचा अर्थ एवढाच की आपण संगतीची आशा मनात धरायलाच नको. संगती लाभली नाही तर आपण भयभीत व्हायला नको. आपण कोट्यवधी लोकांच्या सोबत असलो तरी मानसिक एकांताचा उपयोग करायला हवा आणि ईश्वरी सामिप्याचा अनुभव घ्यायला हवा. 'देहीना स्नेही सकल स्वारथीया, अंते अलगा रहेशे?' (शरीरावर स्नेह करणारे सारे स्वार्थी जन आहेत. ते अंतकाळी विलगच रहातील.) हे भजन आठवते ना? एकांताचे सेवन करणारा कुठेही दु:खी रहात नाही कारण की तो तर सर्वत्र विष्णुचेच दर्शन करतो. भक्त प्रह्लादाने तप्त खांबातही विष्णुचे दर्शन केले होते. एकांत सेवनाच्या या भावनेला अल्पशा प्रयत्नांनी सारे सिध्द करु शकतात. याला शीघ्र सिध्द करायची उपयुक्त संधी तुम्हा सर्वांना अनायासेच लाभली आहे. ती सिध्द करावी."[५]

गीता प्रवचनाच्या स्पष्टीकरणाचा विचार केला तर ईश्वर भक्ती, आत्म चिंतन आणि देह व आत्म्याच्या संबंधाची चर्चा यातून आली आहे.

आता पुढील प्रवचन "आपल्यात एक म्हण प्रचलित आहे. 'एक पंथ, दो काज.' अखेर असा कुठला पंथ आहे. की ज्यावर चालल्यामुळे 'दोन काज' पूर्ण होतात? 'दो काज' चा अर्थ केवळ दोनच कामे समजायला नको. इथे दोन म्हणजे एकाधिक म्हणजे 'एक पंथ सौ काज' असेही म्हणता येऊ शकते. बिहारात एका मिनिटात हजारो लोक माती आड सामावून गेलेत. यामुळे सहजच आपल्या मनात विचार येतो की आपल्याला एक मिनिटही वाया घालवायला नको. मीराने गाईले आहे. 'आजनो लावो लीजिए रे काल कोणे दीठीती' (अर्थात् आजच्या आनंदाचा लाभ घेऊन घ्या, उद्या कुणी पाहिला आहे.?) आपल्याला तर एक पळ वा क्षणभराचीही खबर नाही. जांभई घेता घेता चालायला लागू. ज्यावर मार्गक्रमण केल्याने सारे उद्देश्य सिध्द होतील असा स्वर्णिम पंथ कुठला आहे.? असा मार्ग केवळ परोपकाराचा आहे. अर्थात् आपल्या शेजाऱ्यांची सेवा. याचेच दुसरे नाव परमार्थ आहे. परमार्थ शब्दाचा तात्पर्य आहे. उत्तम अर्थ. याचेच तिसरे नाव हरीभक्ती आहे. आपण लोक नरसी मेहतांच्या प्रभातीत (प्रभात काळी गायची भजने) गातो की जपमाळ हाती धरुन, टिळा लाऊन वा गंगा स्नान

करुन हरीभक्ती साधून घेता येत नाही. भक्त आपल्याला सांगतात की हा तर मस्तक अर्पण करायचा सौदा आहे. म्हणून आपण रोज खाता-पिता, उठता-बसता, तुरुंगात वा तुरुंगाबाहेर अखिल विश्वाच्या कल्याणाची कामना करावी आणि यासाठी जी सेवा आपल्या भाग्यात येईल ती करुन टाकावी. आज एवढे पुरेसे आहे. ना?"[६]

या पत्राच्या समापनात लिहितात. भक्त आपल्याला सांगतात की हा तर मस्तक अर्पण करायचा सौदा आहे. . या पत्रातून ते धर्माचे मर्म उकलून सांगतात. रामनामाला आध्यात्मिक आधार मानतात. रामनामाची कास न सोडण्याचा सल्ला देतात.

नाम महात्म्याचा परिचय देणारी ही दोन प्रवचने -

प्रवचन 'नामको आधार तेरे नामको आधार' - (नावाचा आधार, ईश्वरा, तुझ्या नावाचा आधार) हे भजन पाठ नसेल तर बघून घ्यावे. सध्या हा भाव मनात रमलेला असतो. तुलसीदासजींनी तर नाम-महात्म्य खूप गाईले आहे. नामाचा अर्थ आहे. रामाचे वा ईश्वराचे नाव. त्यांनी असे सांगितले आहे. की रामापेक्षा रामाचे नाव मोठे आहे. अर्थात् राम नामक जो देहधारी झाला आहे. त्याची तर मर्यादा होती. त्याचा देह नश्वर होता पण नाम अमर आहे. राम नामक देहधारीच्या गुणांना एक मर्यादा होती पण राम नामधारी ईश्वराच्या गुणांची तर कुठलीही मर्यादाच नाही. त्यात आपण वाटेल तितक्या गुणांची कल्पना करु शकतो कारण की ईश्वराचे गुण अनंत आहेत. आणि यामुळे तो गुणातीत आहे., अर्थात् गुणांच्या पार आहे. वाटेल तेवढे गुण मोजून दाखवले तरीही ईश्वराच्या गुणांची मोजदाद होऊ शकत नाही यामुळे तो गुणातीतच ठरतो ना? अशा ईश्वर नामाला जर आपण आपल्या हृदयात अंकित करुन घेतले तर आपण निश्चितपणे भवसागर पार करु शकू. या नाम स्मरणाने सारी दु:खे दूर होतील. यामुळे कितीही दु:खे कोसळलीत तरी आपण ती सहन करुन घेतली पाहिजे. आपणास जर नामस्मरणाची सवय लागली तर आपल्याला अन्य कुठल्याही गोष्टीची गरज वाटणार नाही. यामुळे या भजनाची रचना झाली आणि कवीने हे भजन गाईले. 'मला एकमात्र राम नामाचाच आधार आहे.' शेष सारे मिथ्या आहे. 'देह के स्नेही सकल स्वार्थी अंत में अलग हो जाएँगे' अर्थात् देहावर स्नेह करणारे सारे स्वार्थी जन, अखेर विलग होऊन जातील. यासोबत आपण जर केवळ नामस्मरण शिकून घेतले तर केवळ तेच आपल्यासोबत जाईल."[७]

या प्रवचनातून गांधीजींनी आपल्या संकल्प आणि संकल्पनेप्रमाणे गीतेच्या संज्ञांची अभिनव उकल केली आहे. गीतेचा प्रत्यक्ष अनुभवात येणारा अर्थ सांगितला आहे. संकटे आणि दु:खे कोसळलीत तरी रामनाम तारक आहे. हा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्या श्रध्देचा आग्रहही धरला आहे. आता पुढील प्रवचन - "मी मागील आठवड्यात नामाच्या महात्म्याविषयी लिहिले होते पण प्रश्न असा उद्भवतो की नाम कसे घेतले जावे? मनात जेव्हा वेगळ्या-वेगळ्या प्रकारचे हजारो विचार येत असतील तेव्हा नाम जप करुन उपयोग काय? नाम जप करायचा असेल तर हृदयापासून करायला हवा वा मग जप करायलाच नको. हे वचन खरेही आहे. आणि खरे नाहीही. कुणी व्यक्ती जर देखावा म्हणून नाम जप करत असेल तर त्यात काही सार नाही. उलट ते पाप आहे. कारण की ते तर ढोंग झाले पण शुध्द वृत्तीने नाम जप करायची इच्छा झाल्यावरही जपाच्या दरम्यान मनात नाना प्रकारचे विचार उठतच रहातात. असे झाल्यावरही पराभव पत्करायला नको. मनात अन्य विचार आल्यावरही नाम जप करत रहायला हवा. असे करत राहिले तर एखाद्या दिवशी हे नाव हृदयात अंकित होऊन जाईल. नामाचा जो महिमा गाईला आहे. त्याचे हेच कारण आहे. अशिक्षित आणि मूर्ख व्यक्तीही नाम जप तर करुच शकते. नाम जप तर क्षणभरात शिकला जाऊ शकतो. त्यानंतर तर तो करतच रहायचा आहे. असे करत रहाताना त्याला अशी सवय लागून जाईल की त्याशिवाय त्याला करमणारच नाही. खाता-पिता, जागता-झोपता, नाम जप सुरु राहील अशी सवय लागून गेली तर त्याच्या अंत:करणात नाम उतरले आहे. असे म्हणता येईल. अशी माणसे कमीच असतील पण ती दु:खाला पार करतील. याशी संबंधित हनुमंताची एक मजेशीर कहाणी आहे. आम्हाला पंडितजींच्या गुरुंनी ती आश्रमात सांगितली होती. ती कहाणी मी पुढल्या पत्रात लिहीन."[८]

"बा, आता प्रवचन - मी विष्णु दिगंबर शास्त्री यांनी सांगितलेली आख्यायिका वर्णन करायचे ठरवले होते.

ती आख्यायिका सांगतो. ही आख्यायिका भक्तीचे स्वरुप वर्णन करण्यासाठी रचलेली आहे. लंकेवर विजय संपादन झाला. राम प्रभु सीतेला सोबत घेऊन पुष्पक विमानाने अयोध्येला परतले तेव्हा हनुमान वगैरे सारे सोबत होते. आता सर्वांना निरोप द्यायची वेळ आली होती. यासाठी विशेष दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. रामप्रभु सर्वांना भेटले. सीताजींनी प्रत्येकाच्या मस्तकावर हात ठेऊन आशीर्वाद दिलेत. सर्वांचेच डोळे भरुन आले. सर्वांना पुरस्कार दिले गेलेत. हनुमानजींचा नंबर आला. सीतेने आपल्या गळ्यातून मणीमाळा काढून हनुमंताला दिली आणि वात्सल्य प्रकट केले. हनुमंताला त्या मणीमाळेशी काय देणे-घेणे होते? ते एक-एक मणी काढत, दाताखाली ठेवून चुराडा करत. त्यात राम न आढळल्यामुळे फेकून देत राहिले. हे बघून सर्वांना आश्चर्य वाटले. सीताजींनी आपल्या गळ्यातून काढून बक्षीस दिलेल्या माळेची अशी अवस्था? त्यांनी हनुमंताला याचे कारण विचारले. हनुमान म्हणाले 'माताजी, त्यात राम नाम नसेल अशा मणक्यांची माळ लेऊन मी कुठे मिरवू? मला रामाशिवाय दुसरे काहीही नको.' - हे ऐकून सर्वांना अपार विस्मय झाला. कुणीतरी म्हणाले 'असे असेल तर तुमच्या देहात तर कुठे राम नाम दिसत नाही, त्याचे काय?' खळाळून हसत हनुमंत म्हणाले -- 'ठीकाय, बघा, तर मग !' असे म्हणून त्यांनी आपली छाती चिरली. असे करताच रक्ताचा पाट वाहू लागला. त्या प्रत्येक रक्तकणात सर्वांना रामरायाचे दर्शन झाले आणि 'बस, बस, थांबवा आता हे. कृपा करा. कृपा करा.' असा चौफेर घोष सुरु झाला. हनुमंतांनी हे कार्य थांबवले आणि राज्यसभेत जयघोष निनादला. सीतेने हनुमंताला स्नेहाश्रुंनी चिंब केले. त्या आनंदाश्रुंनी हनुमंताची काया भिजली. मनही आर्द्र झाले.

ही कुणीतरी कल्पना केलेली कथा आहे. ही कथा रामायणातही कुठे आढळत नाही. हनुमंताला काही आपली छाती चिरुन आपली भक्ती प्रदर्शित करायची नव्हती पण यातून ज्ञान मिळवायचे आहे. हनुमंताला पुरस्काराची गरज नव्हती. त्याच्यासाठी सेवाकार्य हाच मोठा पुरस्कार होता. त्याच्या श्वासोच्छवासात - प्रत्येक रक्त कणात राम वसले होते. उठता-बसता, खाता-पिता, जागता-झोपता त्यांना रामाचीच धून होती. ते मनसा-काया-वाचा रामाला समर्पित होते. त्यांचे शौर्य त्यांच्या भक्तीच्या अधीन होते. भक्तीतून बळ प्रकटले होते. प्रयत्न केला तर अशीच भक्ती आपल्यालाही लाभू शकते. हर क्षणी जर आपल्या जिभेवर रामजी असतील तर कधीतरी हृदयात उतरतील आणि हृदयात ठसले की आपल्या रक्त कणात सामावतील असे समजावे.

प्रभावती तुला विशेषत्वाने नमस्कार कळवत आहे. ती सर्वांना जपते. अजून पहाटेचे चार व्हायचेत. काल पत्र लिहायला सुरुवात केली ते आज बुधवारी सकाळी लिहून पूर्ण केले. सर्व भगिनींना बापूचे आशीर्वाद[९]

या सोबतच एक प्रवचनही प्रकटले आहे. ते असे आहे. अशा प्रकारे ईश्वराची लीला अपरंपार आहे. जन्म आणि मरण यातले अंतर ईश्वराने दोन-एक मिनिटातच संपवून टाकले. कोण जन्माला आला आणि कुणाचे निधन झाले. माणूस जन्मो वा मरो पण ईश्वराची लीला अखंडपणे सुरुच असते. तर मग यात हर्ष कुठल्या गोष्टीचा करावा आणि शोक कसला मानायचा? सत्य तर एक हरीचे नावच आहे. ज्याला या गोष्टीचे भान आहे. आणि जो ईश्वराची अर्थात् ईश्वराच्या सृष्टीची यथाशक्ती सेवा करतो तोच जीवंत रहातो. जो असे करत नाही तो मृतवत् आहे.[१०]

या प्रवचनांची मागणी कस्तुरबाने केली आहे. हे विशेष. तिच्या मनात या गीतेच्या अध्यात्म शिखरांवर आरोहण करायचे आहे. गीतेवर अनेकांची भाष्ये आहेत. त्यांचे आपले एक विशिष्ट असे मोल आहे. गांधीजींनी लिहिलेले गीता भाष्य मात्र विशिष्ट आहे. कारण की ते प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित आहे. 'आधी केले मग सांगितले' ही गांधी शैली आहे. या प्रवचनांना पारलौकिक संदर्भ नाही यांना ईहलोकाचाच सुगंध आहे. यातून ते प्रत्यक्ष जीवनाला प्रकाश, प्रबोध आणि प्रेष देणारे चिंतन मांडताना दिसतात. त्यांचे पोषण संत साहित्यावर झाले. तो प्रकाश यातून सतत पाझरताना दिसतो.

मराठी साहित्यात पतीने पत्नीला लिहिलेल्या पत्रांची मोठी परंपरा आहे. काही पत्र-संकलने प्रकाशितही झाली आहेत. राम-जानकी रानडे हे संकलन वेगळे आहे. यात पत्नीला पतीने केलेले अध्यात्मविषयक मार्गदर्शन आहे. किंबहुना या संकलनाचे हेच मुख्य प्रतिपाद्य आहे. गांधीजींची कस्तुरबाला लिहिलेली ही पत्रे एक वेगळा

विषय घेऊन येतात. याची कक्षा मोठी आहे. याचा आवाका विस्तृत आहे. यातून प्रापंचिक उतरंड समजावून सांगितली आहे. राष्ट्रीय प्रश्नांचा सखोल ऊहापोह आहे. यात गीतेवरील प्रवचने आहेत. नाम-महात्म्यविषयक चर्चा आहे. यातली प्रवचने दीप्तीमान आहेत. अद्वितीय आहेत. हे पोथी पांडित्य नाही. याला अनुभवाचा दळदार संदर्भ आहे. व्यक्ती, समष्टी आणि प्रकृतीशी संवादाची त्रिधारा यातून प्रवाहित होताना दिसते.

संदर्भ

१) सत्याचे प्रयोग : श्री मो. क. गांधी प्रस्तावना;

२) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २५ डिसेंबर १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४१७;

३) गांधीजींनी कस्तुरबाला कडप्पा स्टेशनवरुन दिनांक १ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४३७;

४) गांधीजींनी बंगलोरहून कस्तुरबाला दिनांक ८ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४७७;

५) गांधीजींनी कस्तुरबाला कुमारिका त्रावणकोर येथून दिनांक २२ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४०;

६) गांधीजींनी कस्तुरबाला कुतूरहून दिनांक ५ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ १३१;

७) गांधीजींनी कस्तुरबाला म्हैसूरहून दिनांक २२ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ २११ -२१३;

८) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २७ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ २४५;

९) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १३ / १४ मार्च रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ २९३ ते २९५;

१०) गांधीजींनी कस्तुरबाला पाटणाहून दिनांक २० / २१ मार्च १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ३१८ .

❖❖❖

## ९) कस्तुरबाच्या मनाची मशागत

गांधीजी आणि कस्तुरबाचा पत्रव्यवहार अनुपम आहे. यातून त्यांच्या भावसंबंधांचा आलेख वाचता येतो. काही पत्रात विनोदाची पखरण आहे. दोघांच्या आंतरसंबंधांच्या आकलनाचे व विश्लेषणाचे पत्रव्यवहार हे एक साधन आहे.

गांधीजींनी पत्रातून लिहिले आहे

"बा, मी २५ डिसेंबर १९३३ च्या पत्रातून तुला जे एक प्रवचन पाठवले होते त्याची एक प्रत मला पाठव. तुझे पत्र आजच पोहोचले. मी हे पत्र मौनवारच्या दिवशी लिहित आहे. आता तुला दातांनी चावून खाता येते का? पोटॅशियम परमंगनेटच्या पाण्याने गुळणा करतेस? मी जिथे रहातो तिथे कामांची गर्दीही असतेच असते. काही अडचणीही असतात. माझी काळजी तर सारे लोक वहातात पण तशा मला अडचणी कमीच असतात. माझ्या लहानातल्या लहान गरजेचाही विचार मीराताई करते. लक्ष देते. काळजी घेते. यामुळे मला प्रवासाची काही अडचण नसते. माझे मौन आजकाल रविवारच्या रात्रीपासून सुरु होते. यामुळे सोमवारी रात्रीपर्यंत बोलावे लागत नाही. आज रात्री ९ वाजून १० मिनिटांनी मौन संपेल. यामुळे कुणाशी बोलायची कदाचितच संधी लाभेल कारण नंतर तर झोपायची वेळ होऊन जाईल. सकाळी तीन वाजता तर उठायचे असते[१]

या विस्तृत पत्रातून गांधीजींनी आपले अंत:करण प्रकट केले आहे. आपल्या प्रवासाचा तपशील दिला आहे. आपल्या तब्येतीचा समग्र अहवाल मांडला आहे. कस्तुरबाच्या तब्येतीविषयी चिंता व्यक्त केली आहे. आपल्या लेकरांविषयी कस्तुरबाच्या मनात नित्य काळजी वसायची. त्या संबंधीचे विवेचनही केले आहे. कस्तुरबाच्या जीवनशैली विषयक मार्गदर्शन आहे. कार्यपध्दती विषयक सम्यक् मार्गदर्शन आहे. या पत्रात विविध नातलग व इष्टमित्रांचे संदर्भ आलेले आहेत. ते केवळ थक्क करुन सोडणारे आहेत. कस्तुरबाच्या वाचनासाठी ते नियतकालिकांची जुळवाजुळव करुन देत आहेत. पोटॅशियम परमंगनेटच्या गुळण्या करायला सुचवताहेत. काही पत्रांमधून हा उल्लेख 'तांबड्या औषधाने गुळण्या करत जा' असा आला आहे.

या पत्रातून गांधीजींची काळजी लपून राहत नाही. ते लिहितात

"बा, या खेपेला तुझे पत्र आजवर नाही पोहोचले. फिरत-फिरत येऊन पोहोचेल असे मी मानतो. आता तुला वृत्तपत्र मिळत असावे. 'भागवत' आणि 'रामायण' पोहोचले असावे. आणखी अन्य जे ग्रंथ हवे असतील ते मागवून घे. मणीलालचे पत्र आले आहे. सुशीलाचेही. दोघे मजेत आहेत. मणीलाल शांत आहे. काळजी न करायला लिहिले आहे. सीता खूप वाढत चालली आहे. खूप खेळते. देवदासची अपेक्षेपेक्षा आधी सुटका झाली. तो अहमदाबादला गेला आहे. त्याची तार मला आली होती. कदाचित तुला भेटून जाईल. रामदास आणि नीमूची पत्रेही आली होती. मनूला मी लिहित रहातो पण नंतर तिकडून काही पत्र आले नाही. उद्या मंगळवार असल्यामुळे उद्या पंचायतीची बैठक होईल नंतर मला मलबारला जायचे आहे. तिथे तू फिरुन आली होतीस तिथे जायला हवे. माझी तब्येत चांगली असते. चिंता करायचे अजिबात कारण नाही. तुम्ही सारे तिकडे आनंदात असाल अशी आशा करतो."[२]

या पत्रातून गांधीजींनी कस्तुरबाच्या अंत:करणाला स्पर्श केला आहे. पारिवारिक विषय वर्णिले आहेत. यातली आत्मीयता आणि जिव्हाळा केवळ अद्भुत असा आहे. सर्वच नातलगांविषयक चिंता आणि काळजी आढळते. कस्तुरबाची पत्रे भेटतील अशी आशा ते व्यक्त करतात. आपल्या पुढील कार्य योजनांचा तपशीलही देतात. कस्तुरबाला प्रवचन गीतेच्या माध्यमातून दिले आहे. तिच्या स्वाध्यायासाठी मात्र ते 'रामायण' आणि 'भागवत' हे ग्रंथ पाठवतात. हे थोडे समजून घेतले पाहिजे. कस्तुरबाच्या मनातही 'गीता' समजून घेण्याची इच्छा आहे., नाही असे नाही. 'गीता' कुणाकडून तरी शिकून-समजून घ्यावी लागेल. ही गांधीजींची भूमिका आणि भावना आहे. 'रामायण' वा 'भागवत' या ग्रंथांविषयी मात्र तसे नाही. 'रामायण' सर्वपरिचित ग्रंथ आहे. ती एक प्रदीर्घ चालणारी कौटुंबिक कथा आहे. 'भागवत' एका प्रदीर्घ कथेच्या माध्यमातून मांडले गेलेले तत्त्वज्ञान आहे. 'भागवत' हे सोपे आहे. असे मात्र नव्हे. 'गीते' च्या तुलनेने कस्तुरबाच्या आकलनासाठी 'भागवत' खचितच सोपे आहे. भागवतात विद्वानांच्या विद्वत्तेचा कस लागतो, हेही

खरे! कालीकत येथील मलबार नगर परिषद, मलबार व्यापार संघ, तालुका बोर्ड, हरिजन युवक संघ आणि अन्य संस्थांनी गांधीजींना मानपत्र दिले होते. तिथे ते म्हणाले. "श्री. के. माधवन नायर यांच्याशी जवळपास माझा रोजचा पत्र-व्यवहार होता. ते मला येरवडा येथे भेटीला आले होते. त्या काळात श्रीमती उर्मिलादेवी आणि माझी पत्नीसुध्दा संपर्कात आली होती. माझी बायको एक साधी-सरळ महिला आहे. ती काहीही जाणत नाही. तिला इंग्रजी भाषेचे अजिबात ज्ञान नाही, मल्याळम भाषा तर ती खचितच जाणत नाही पण तिने आपल्या साध्या-सरळ भाषेत हे सांगितले की त्याही के. माधवन नायर यांच्या अत्यंत साधेपणाने खूप प्रभावित झाल्या होत्या. तिच्या या निवेदनातून माझ्या चित्तावर पडलेली त्यांची छाप अधिकच गडद झाली आणि अजूनही ती अमिट आहे."[३]

गांधीजी एका विशिष्ट काळाचे प्रतिनिधित्व करत होते. त्या काळात पत्नीविषयी जाहीरपणे काही सांगणे अशक्य होते. पत्नीच्या संदर्भात असे जाहीर भाषण केवळ दुर्मिळ म्हणावे लागेल. एक तर आपल्या पत्नीला 'साधी-सरळ' म्हणणे. दोन, तिच्या तथाकथित अशिक्षितपणाचा उल्लेख करणे. तीन, तिच्या सुसंस्कारित मनाचा परिचय करुन देणे. हे फारच रमणीय आहे. दुर्लभ आहे. विशिष्ट आहे. आपल्या पत्नीवर पडलेल्या प्रभावाचा आपल्यावर प्रभाव पडला. आपल्या चित्तावरची छाप अधिकच गडद झाली. असे गांधीजी सांगतात. यासाठी गांधीजींच्या मनाच्या खुलेपणाची प्रशंसा करायला हवी. कस्तुरच्या प्रभावशाली व्यक्तिमत्वाला दाद द्यायला हवी.

कस्तुरबा तुरुंगात होती. या काळात गांधीजी बहुधा दर आठवड्याला तिला पत्र पाठवत असत. या पत्रांमधून आपल्या विविध कार्य प्रवृत्तींचा परिचय करवुन देत असत. नातलग व मित्र परिवाराचे कुशल-क्षेम कळवत असत. खरे तर ती तुरुंगात जायला तयार नव्हती. याचे कारण मोठे मौलिक होते. गांधीजींच्या दौऱ्यात त्यांच्या सोबत रहायचे होते. त्यांची सेवा-चाकरी करायची होती. हे तिच्या प्रसन्नतेचे कारण ठरले असते. गांधीजींचे मत मात्र वेगळे होते. त्यांच्या मते खासगी जीवनापेक्षा राष्ट्रीय जीवन मोलाचे होते. प्रेम भावनेला व्यक्तिपुरते मर्यादित करणे योग्य नव्हते. गांधीजींच्या दृष्टिकोणातून प्रेम वा वैयक्तिक संबंधांपेक्षा धर्माचे मोल अधिक होते. धर्माचा अर्थ कर्तव्यबुध्दी होता. पती धर्माहून राष्ट्रधर्म मोठा होता. प्रेम वा व्यक्तिगत संबंधांपेक्षा राष्ट्रधर्माची मागणी पूर्ण करणे अधिक गरजेचे होते. कस्तुरबाचा धर्म पतिनिष्ठा होता. गांधीजींचा धर्म देशनिष्ठा होता. या काळातल्या पत्रांमधुन गीता विषयक प्रवचने आहेत. धर्मचर्चा आहे. धर्मजागरण आहे. या कोणातून ही पत्रे वेगळी आहेत. या पत्रांमधून त्यांनी आपले मत मांडले आहे. गीता प्रवचनांमधून मत मांडले आहे. कर्तव्य पथ मोलाचा मानला आहे. त्यावर स्थिर ठेवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसत आहेत. ही विविध पत्रे केवळ कोवळी आहेत. विलक्षण आणि धर्मचर्चा करणारी आहेत. या पत्रांमधून कस्तुरच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पदर उलगडताना दिसतात.

कस्तुरबाला लिहिलेल्या पुढील पत्रात ते लिहितात.

"बा, देवदास तुला भेटून गेला, कदाचित म्हणून तुझे पत्र आले नाही पण माझे पत्र तर तुला मिळाले असेल अशी आशा करतो. मी नियमितपणे दर आठवड्याला पत्र पाठवले आहे. आणि प्रवचनही ! (पहिले प्रवचन २५ डिसेंबर १९३३ रोजीच्या पत्रातून पाठवले आहे.). तेल मिळो वा न मिळो, योग्य प्रकारे खायला मिळो वा न मिळो तू प्रसन्न असतेस. 'गीता' व अन्य धार्मिक ग्रंथांच्या पठनाचा एवढाही परिणाम झाला नाही तर हे ग्रंथ वाचलेच नाहीत असे ठरेल. यामुळे या खेपेचे प्रवचन स्वाध्यायाशी संबंधितच पाठवत आहे. खूपशा ग्रंथांमधून आपण असे वाचतो की धार्मिक ग्रंथांचे पठन केल्यानेही पुण्य लागते. हे उत्साहवर्धक वचन आहे. आपण जर याच्या शाब्दिक अर्थानुसार वाटचाल केली तर आपल्याला काही लाभ होणार नाही. आपण जे वाचतो त्यावर परत-परत विचार करायला हवा म्हणजे हे बघायला हवे की ते आपण जीवनात कशा प्रकारे आचरणात आणू शकतो. सारे तुझी आठवण काढताहेत."[४]

या पत्रातूनही कौटुंबिक संदर्भ आहेत. नातलगांविषयीचे तपशील आहेत. त्यातला गोडवा आहे. संबंधातील साखरपेरणी आहे. माता आणि पुत्राच्या भावसंबंधांची कोवळीक आहे. सेवाभावनेची चर्चा आहे. आपल्या प्रवासाचा तपशील आहे. नातलगांच्या सोबतच स्नेहीजनांच्या आठवणी आहेत. आपले वाचन-चिंतन

आपल्या आचरणात उतरावे असा बोधपाठ द्यायला ते विसरत नाहीत. जीवनाच्या उन्नयनाच्या तमाम वाटा आणि वळणांचा बोध करुन देतात. हे पत्र संग्रहणीय आहे.

गांधीजी कुमारिका त्रावणकोरहून लिहितात -

"बा, आज आम्ही कुमरिकेत आहोत. तुझे पत्र मिळाले आहे. तू इथे आली आहे.स. तेव्हा उर्मिलादेवी सोबत होती. हे हिंदुस्तानचे अखेरचे टोक आहे. हिमालय मस्तक आहे. या भागाला आपण भारतमातेची पावले म्हणतो. समुद्र या चरणांचे रोज प्रक्षालन करतो. इथे वस्ती नसल्यामुळे खूप शांतता आहे. मी समुद्रातच स्नान केले आहे. तुझ्या तब्येतीचा विचार करत आवश्यक तो आहार प्रेमलीलाताई कडून (प्रेमलीला ताई ठाकरसी) मागवून घेण्यात संकोच करु नकोस. आज सर्व भगिनी तुरुंगातून सुटायला हव्यात. मी सर्व भगिनींना चार-दोन शब्द लिहिले आहेत."[५]

वरील पत्राचा तपशील व्यापक आहे. यात प्रवासाचे वर्णन आहे. तब्येतीची माहिती आहे. नातलगांच्या खुशालीच्या गोष्टी आहेत. शरीर व मनाचा आंतरसंबंध आहे. हरीलालची मुलगी होती रामी. रामीची मुलगी कुसुम. कुसुम एकदा गंभीर आजारी होती. अखेर कुसुम देवाघरी गेली. या निधनाच्या संदर्भात गांधीजींनी हरीलालच्या दोन्ही मुलींना-रामी आणि मनूला पत्र लिहिले.

"पाषाणासारखे कठोर हृदय असलेल्या मलाही क्षणभर अतीव दुःख झाले. हे पत्र मिळेपर्यंत तुम्ही दोघी बहिणी बऱ्याचशा शांत झाल्या असाल. मला लिहित रहा. मी रामीच्या पत्राची वाट पाहीन. या बातमीने बालाही खूप दुःख होईल."[६]

या पत्रातून गांधीजींना वाटणारी काळजी डोकावते. दोघे एकमेकांपासून लांब आहेत. प्रत्यक्ष भेट घेता येणे शक्य नसल्यामुळे हे पत्र !

कस्तुरबाचे बंधु माधवदास आणि वहिनी सौ. कृष्णा कापडिया यांना गांधीजी लिहितात.

"बा आपल्या पत्रांमधून यदा-कदा तुमची आठवण काढत असते. बाना सरळ तर कुणी पत्र लिहू शकत नाही. त्या आठवड्यातून एकच पत्र लिहू शकतात. एकच पत्र मिळवू शकतात. त्या आठवड्यात जर कुणी भेट घ्यायला येऊन गेले असेल तर तिला पत्र मिळत नाही. यामुळे तिला जर काही समाचार कळवायचे असतील तर माझ्या मार्फतच कळवले जाऊ शकतात."[७]

गांधीजींनी कस्तुरबाला लिहिलेले पत्र

"बा, तुझे पत्र पोहोचले. बिहार विषयी तू जे लिहिले आहे.स ते खरे आहे. खूप मोठी जीवित हानी झाली आहे. आणि या थंडीत हजारो लोक घरादाराला मुकले आहेत. चहुकडून मदतीचा ओघ सुरु आहे. मी माधवदासचे (कस्तुरबांचा भाऊ) समाचार मिळवण्याचे प्रयत्न करत असतो. तुला अवश्य समाचार कळवीन. हे माझ्या विस्मरणात गेले नाही. रामदासचे विस्तृत पत्र पोहोचले आहे. तो, नीमू आणि लेकरे निकोप आहेत. केशू आणि कृष्णा वर्धा येथेच आहेत. आणि आनंदात आहेत. तू आणि अन्य भगिनी निरोगी असतील अशी आशा करतो. मी उद्या सकाळी इथून निघेन आणि राजाजींना भेटेन."[८]

या पत्रातून कस्तुरबाच्या पत्राचा संकेत मिळतो. तिने बिहारच्या प्रश्नाविषयी विचारले आहे. आपले मत मांडले आहे. तिच्या पत्रांना राजकीय आणि पर्यावरणाचा संदर्भ आहे. राष्ट्रीय आपत्तीविषयी जागृती आहे. असा याचा अर्थ आहे. ते पत्र उपलब्ध नाही. अन्यथा त्याचे तपशील वाचता आले असते. गांधीजींच्या पत्रातून आश्रमवासी जन बिहार येथे मदतीला गेले असल्याचा उल्लेख येतो. यात आत्मीय जनांच्या तब्येतींविषयी माहिती आहे. त्यांच्या कार्यपध्दतीविषयी तपशील आहेत. पत्रातून सर्वच नातलगांच्या संबंधी विस्तृत माहिती आहे. बिहारचे दुर्दैव आणि निसर्गाच्या कोपाविषयी विचार आहे. या सोबतच 'ईश्वरेच्छा बलियसी' असा उद्गारही काढला आहे.

पुढील पत्रातून गांधीजी लिहितात

"बा, हे पत्र रेल्वेमधून लिहित आहे. तुझे पत्र पोहोचले. कामाचा बोजा प्रचंड असल्यामुळे मंगळवारी लिहू शकलो नाही. आज गुरुवार आहे. तुला हवे ते काम मला सोपव. हवा तो प्रश्न विचार. मी उत्तर देईन, किमान प्रयत्न तर करीनच. तू हरीलालविषयी विचारले आहे. तो पाँडेचेरीला गेला होता. तिथेही पैशांची भीक मागून खूप दारु प्यायचा. काही पैसे मिळालेतही. सध्या कुठे आहे., माहित नाही. त्याचे असेच चालेल. ईश्वर त्याला सुबुध्दी देईल तेव्हा खरे! यात आपली पाप-पुण्येही भूमिका

बजावत असतात ना? हरीलाल गर्भात असताना मी किती मूढ होतो? मी आणि तू जसे केले असेल तसेच आपल्याला भरावे लागेल. अशा प्रकारे लेकरांच्या आचरणासाठी आई-बाबा जबाबदारच असतात. आता तर आपण शुध्द बनावे एवढेच आपल्या हाती आहे. आणि तसे प्रयत्न आपण उभयता करत आहोत आणि यातच आपण आता समाधान मानावे. आपल्या शुध्दीचा प्रभाव कळत नकळतही हरीलालवर पडतच असेल. रामदास-नीमू बरे आहेत. त्या उभयताना तुझ्या पत्राची नक्कल पाठवत आहे. मूळ पत्र मणिलालला पाठवतो. नक्कल वल्लभभाईंनाही पाठवली आहे. तेही काळजी करतात. माधवदासकडून एथवर काही उत्तर आले नाही. तुला पेळू मिळाले असतील. संपले की कळव. परत पाठवून देईन. आता तर भरपूर बातम्या दिल्यात ना? नऊ तारखेला हैदराबादहून निघून मी पाटणा येथे येईन. राजेंद्रबाबूंनी बोलावले आहे. प्रभावती तिथेच आहे. बिहारात बराच काळ रहावा लागेल असे दिसते. तुम्हा सर्व भगिनींना बापूचे आशीर्वाद."[९]

या पत्रात भरपूर बातम्या दिल्या आहेत. यातील प्रत्येक पात्राच्या संदर्भात स्वत: गांधीजी आणि कस्तुरबा यांच्या मनात एक खोल आत्मीयता आहे. वैयक्तिक संबंधांची जाणीव आहे. राष्ट्रीय स्तरावरच्या प्रश्नांची चर्चा असताना या समग्र नातेसंबंधांचे असे सखोल आकलन सोपे नाही. कस्तुरबाच्या मागणीनुसार प्रचवनही पाठवले होते. यातून नाम महात्म्याबाबत लिहिले आहे. जप अंत:करणात उतरला आहे. असे साधक विरळ असल्याचे सांगितले आहे.

कस्तुरबाला लिहिलेले हे पत्र

"बा, या खेपेला तुझे पत्र अजूनपर्यत मिळाले नाही. मीसुध्दा अशा ठिकाणी फिरत आहे. की जिथे पोस्टाचा ठाव-ठिकाणा नाही कारण की इथे रेल्वेची सोय नाही. मी टोकावरल्या लहान-लहान खेड्यांचा दौरा करत आहे. आणि इकडे इतक्या नद्या आणि नाले आहेत. की रेल्वेचे रुळ टाकणे खूप महाग ठरेल. पहाडाच्या पायथ्याशी समुद्र आहे. यामुळे पर्वतातील नद्या सागरात मिळून एका मोठ्या खाडीचे रुप घेतात. नावेनेच ही खाडी पार करता येते. जिथे अशी परिस्थिती असेल तिथे वेगाने प्रवास केला जाऊ शकत नाही यामुळे टपाल उशिरा मिळते."[१०]

या पत्रातून गांधीजींनी खूप माहिती कळवली आहे. आपल्या प्रवासाचा तपशील कळवला आहे. तत्कालीन ऋतुमानाचा परिचय आहे. इष्ट मित्र नातलगांच्या संदर्भातील सारी माहिती कळवली आहे. पत्राच्या अखेरीस प्रवचन आहे. कस्तुरबाने आग्रह केला आणि गांधीजी तो आग्रह पुरवताना दिसतात. ती एक गृहिणी आहे. तिच्या आवडीचा तपशील पुरवतात. तिच्या नातलगांच्या आणि इष्टमित्रांच्या परिवाराच्या बातम्या देतात. अनेकदा हे तपशील भरपूर व्यापक आणि व्यामिश्र आहेत. ते एकदम लक्षातही येत नाहीत. यातून तिच्या मनाशी संवाद साधण्याच्या गांधी-शैलीचा परिचय घडतो. कस्तुरबाच्या मनाची होत जाणारी मशागत कळते. तिच्या चिंतनाचे विस्तृत होत जाणारे क्षितिज दिसते.

संदर्भ


१) गांधीजींनी कस्तुरबाला कडप्पा स्टेशनवरुन दिनांक १ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४३७;

२) गांधीजींनी बंगलोरहून कस्तुरबाला दिनांक ८ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४७७;

३) 'हिंदू' नियतकालिकाचा दिनांक १५ जानेवारी १९३४ चा अंक आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ५०७-५०८;

४) गांधीजींचे कस्तुरबाला दिनांक १६ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ १ -२;

५) गांधीजींनी कस्तुरबाला कुमारिका त्रावणकोर येथून दिनांक २२ जानेवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ४०;

६) गांधीजींनी रामी व मनुला दिनांक १ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र;

७) गांधीजींनी माधवदास व सौ. कृष्णा कापडिया या कस्तुरबांच्या भाऊ व वहिनींना दिनांक ५ फेब्रुवारी

१९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५७ पृष्ठ १२९;

८) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ५ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५७ पृष्ठ १३१;

९) गांधीजींचे कस्तुरबाला म्हैसूरहून दिनांक २२ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५७ पृष्ठ २११ -२१३;

१०) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २७ फेब्रुवारी १९३४ रोजी लिहिलेले पत्र संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ५७ पृष्ठ २४५.

❖❖❖

## १०) दांपत्य भाव-संबंधांच्या मनोहर छटा

गांधीजींनी कस्तुरबाना लिहिलेली पत्रे ही त्यांच्या आंतरिक भावसंबंधांना समजून घेण्यासाठी उपयुक्त आहेत. हा एक वैयक्तिक भाग. दुसरा महत्वाचा गाभा या पत्रांमधून आढळतो. तो आहे. या देशाच्या स्पंदनांचा आलेख. तोही या पत्रांमधून स्पष्टपणे वाचता येतो. गांधी परिवाराशी संबंधित गणगोताचा विचार केला तर आपण थक्क होऊन जातो. त्या विस्तारात उतरण्याचा प्रयत्न करणे सुध्दा अवघड आहे. इतक्या बारीक-सारीक गोष्टींच्या नोंदी गांधीजींनी घेतल्या आहेत. की ही पत्रे या नातलगांच्या प्रगतीचा एक आलेख पट्ट होऊन जातो.

गांधीजी पत्रातून लिहितात की बांनी त्यांना अनेकदा कटू मानले आहे. ते तिच्या आक्षेपांविषयी इन्कार करु शकत नाहीत. त्यांना आपल्या वचनात कदाचित कटुता जाणवली नसणार. तेवढे काही पुरेसे नाही. बाला त्यांची वचने टोकदार वाटलीत. अनेकदा बोचलीत. हे खरे आहे. एवढे पुरेसे आहे. पूर्णत: सत्य आणि अहिंसामय वचन कधीही कुणालाही बोचणार नाहीत. आरंभी ते बोचणारे वाटत असेल तर तो वेगळा विषय आहे. असे ज्याला वाटते तोच नंतर त्यातील अमृतत्वाचा स्वीकार करु शकतो[१]

या पत्रातून गांधीजींची सर्वसमावेशक दृष्टी दिसून येते. आपल्या पत्नीच्या संदर्भात काटेकोरपणे ते विचार करत होते याचा प्रत्यय येतो. वैयक्तिक संबंधांच्या आधारे ते एका वैश्विक सत्याला उद्घाटित करताना दिसतात. दुसऱ्या एका पत्रातून त्यांचा पत्नीविषयीचा जिव्हाळा दिसतो. आत्मीयतेचे मनोरम दर्शन घडते.

ते लिहितात की ती भरपूर व्यायाम घेते की नाही? ती स्वत:हून काही वाचते वगैरे काय? तिला त्यांची पत्रे दर आठवड्याला मिळतात की पंधरवड्यातून एकदा मिळतात? मागल्या खेपेला तिला त्यांची कित्येक पत्रे मिळाली नव्हती. त्या पत्रांचे कायच झाले कोण जाणे? या खेपेला आपली पत्रे तिला मिळावीत अशी अपेक्षा ते अवश्य व्यक्त करत आहेत. तुरुंग अधिकाऱ्यांनी काही त्यांची पत्रे थोपवली नव्हती अशी त्यांची माहिती होती.[२]

या पत्रातून दांपत्य-भाव-संबंधांच्या नाना मनोहर छटा उलगडताना दिसतात. ते आपल्या पत्नीची काळजी घेतात. तिच्या शारीरिक-मानसिक-बौध्दिक उत्कर्षाची वाट फुलवतात.

एका भगिनीला लिहिलेले हे पत्र

“मीरा बांवर टीका का करत होती? बांच्या ठायी दोष तर नि:संशयपणे आहेत. पण तिच्या एका निष्ठेचे मूल्य जाणता येत नाही. बा स्वत:ला खूप दीप्त करत आहे. यात मात्र काही संशय नाही. बांची दृढता तिच्या दोषांना झाकोळून टाकते.”[३]

हे पत्र बाच्या दोषांचे उद्घाटन करताना दिसते. दुसऱ्याच क्षणी तिच्या अद्वितीय गुणांचीही जयगाथा मांडते.

१९३४ साली गांधीजी बिहारात होते. या काळात त्यांनी फार मोठ्या प्रमाणात पत्रे लिहिली आहेत. कमालीचे व्यस्त असतानाही रात्री दोन-दोन वाजेपर्यंत जागून ही पत्रे लिहिली गेली आहेत. या पत्राचे स्वरुप विविधांगी आहे. कुणाला घरगुती प्रश्न आहेत. कुणाला सल्ला हवा आहे. कुणाचा प्रश्न सामाजिक आहे. कुणाला मार्गदर्शन हवे आहे.

कस्तुरबा अजूनही तुरुंगात आहे. या दरम्यान गांधीजी दर आठवड्याला तिला पत्र लिहित होते. या पत्रांचे विषयही वैविध्यपूर्ण आहेत. सहकाऱ्यांचे कुशल-क्षेम सांगितले आहे. विविध प्रवृत्तींचे विश्लेषण आहे. विशद विवरण आहे. या पत्रातही गांधीजींनी आपल्या प्रवासाविषयी लिहिले. संबंधी जनांच्या एखाद्या बातमीपत्रासारखे हे पत्र आहे. यातील प्रवचन एका अर्थाने मागील प्रवचनाचा उत्तरार्ध म्हणता येईल.

गांधीजींनी लिहिले की त्यांनी आता मणीलालची काळजी करणे सोडून दिले पाहिजे. त्याने आता चाळिशी पार केली आहे. हे लक्षात असावे.[४]

या संपूर्ण पत्रभर आपल्या नातलग व इष्टमित्रांच्या आठवणी आहेत. विविध संदर्भ आहेत. हे वाचून अगदी थक्क व्हायला होते.

गांधीजी कस्तुरबाला लिहितात

"बा, या खेपेला तुझे पत्र अजून नाही पोहोचले. हे पत्र मी मंगळवारच्या प्रात:कालीन प्राथेनेनंतर लिहित आहे. मी पटणा येथे आहे. माझ्या शेजारी बसलेले सतीशबाबू टकळीवर सूत कातताहेत. राजेंद्रबाबूंची बहीण शेजारी बसली आहे. प्रभावतीही आहे. ओम आणि किशन दोघी झोपायची तयारी करत आहेत. स्वामीही बसले आहेत. मीराताई दूध तयार करायला गेली आहे. यावेळी मालवीयजी, मौलाना अबुल कलाम आजाद, डॉ. महमूद वगैरे इथे आहेत. रविवारी त्या सर्वांची एक बैठक होती. त्यात बिहार आपत्ती निवारणासाठी एका समितीचे गठन केले गेले. या समितीत जमनालालही आहेत. काम बरे चालले आहे. यात कदाचित् दोन-तीन शब्द असे असतील जे तू समजू शकली नसशील पण डाहीबेन, ('डाही 'शब्दाचा गुजराती भाषेत 'शहाणी' असा अर्थ होतो.) शांता व ललिता यापैकी कुणी-ना-कुणी तरी त्याला समजतीलच. तरीही लक्षात न येणारा असा एखादा शब्द असेल तर त्याचा अर्थ मला विचारुन घ्यावा. .. . ... काल एथपर्यत लिहिले होते, पुढे काही सरकलो नव्हतो. आज परत बुधवारी सकाळी (८-४५) वाजता लिहित आहे. आता लवकरच बैठकीत पोहोचायचे निमंत्रण येऊन जाईल."[५]

हे पत्र एकाच वेळी एक सुंदर रिपोर्टिंग आणि प्रवचनही आहे.

"मोठ-मोठ्या हवेल्याही जमीनदोस्त झाल्या आहेत. गल्ली-मोहल्ले फिरुन आलो. तिथे चहुकडे विटा-चुन्याचा ढीग आणि ध्वस्त घरे दिसताहेत. पाण्याच्या प्रवाहासोबत आलेल्या वाळूचा जाडसर थर शेत जमिनीवर साचला आहे. ही वाळू जोवर हटवली जात नाही तोवर शेतात पीक घेता येणार नाही. वाळू हटवणे काही सोपे काम नाही कारण की ही वाळू काही बिघा दोन बिघे शेतावर नाही पण हजारो एकरांच्या शेतीवर सहा इंचाहून अधिक वाळूचा थर साचला आहे."[५]

बिहारच्या भूकंपानंतरच्या उध्वस्तीकरणाचे हे चित्रण गांधीजींच्या संयत आणि प्रत्ययकारी लेखणीचा परिचय करुन देणारे आहे. यातून कामाच्या योजना आल्या आहेत. कामांच्या ओझ्यामुळे हे पत्र दोन टप्प्यात लिहावे लागल्याचा उल्लेख आहे.

अशा प्रकारे पत्र लिहायला सुरुवात करुन या आठवड्याचे प्रवचनही गांधीजींनी देऊन टाकले आहे. काही तपशीलही पत्रात आहेत.

कस्तुरबाला लिहिलेले हे एक पत्र

"बा, पहाटेचे ३ वाजून ३० मिनिटे होताहेत. आज गुरुवार आहे. तुझे पत्र कालच सायंकाळी मिळाले. आज आम्ही मुजफ्फरपुर येथे आहेत. पंडितजी, स्वामी आणि कृपलानी इथे आहेत. माधवदासही येथेच आहे.[६]

नेहमीप्रमाणे या पत्रातूनही आप्तेष्ट जनांचे सारे तपशिल पुरवले आहेत. 'तू ज्या बातम्या जाणून घेऊ इच्छितेस त्या सर्व बातम्या मी तुला द्यायचा प्रयत्न करीन पण जर काही सुटले तर परत विचारुन घे.' असे सुचवले आहे. आपल्या प्रवास दौऱ्याची साद्यंत माहिती आहे. पत्रातले तपशील विलक्षण आत्मप्रत्ययी आहेत. ते अगदी आपल्या समोर बसून बोलताहेत असा भास होतो. सायुज्य भाव मनात येतो. यावेळी प्रवचन पाठवत नसण्याची बातमी आहे. प्रार्थनेची वेळ होऊन गेली आहे. पत्र पूर्ण करताना काहीशी घाई झाली असल्याचे ते कळवतात.

गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले

"बा, आज शुक्रवार आहे. तुझे पत्र अजून मिळाले नाही. पहाटे जवळपास तीन वाजेची वेळ आहे. तुझ्या पहिल्या पत्राचे संपूर्ण उत्तर मी दिले आहे. मी उद्या आसामकडे प्रस्थान ठेवीन. बाळ सोबत असेल. पृथुराज तर सोबत आहेच."[७]

या पत्रातून कस्तुरबाला आणि त्यांना सुध्दा कदाचित थोडा दिलासा मिळाला असावा.

"बा, तुझे पत्र उशिरा मिळाले. आता पहाटेचे सव्वा तीन वाजत आहेत. दात घासले. आता तुझे पत्र हातात घेतले आहे. या स्थानाला जोरहाट असे म्हणतात. हे आसाम प्रांतात आहे. इथला दौरा संपायला अजून दोन दिवस बाकी आहेत. त्यानंतर आठवड्याहून अधिक काळ मी दक्षिण बिहारात घालवीन मग उत्कल म्हणजे ओरिसात जाईन. तुझी जेव्हा सुटका होईल त्यावेळी मी बंगालमध्ये असेन असे मला वाटते. भंसाळीचे पाय खराब आहेत. त्यांना चालता-फिरता येत नाही. त्यांनी आपले

ओठ तांब्याच्या तारेने शिवून घेतले आहेत. पाण्यात पीठ कालवून नरसाळ्याने प्राशन करतात. पाण्यात हरभरा व मुगाचे पीठ मिसळूनही प्राशन करतात. मला वरचेवर पोस्टकार्ड लिहित असतात. वेदना असतानाही आनंदाने रहातात. तुला पेळू मिळाले असतील. आणखी पेळूंची गरज वाटली तर मला सांगशील. तू अधिक महिन्याच्या व्रताचे पारणे कुठे फेडू इच्छितेस? तुला दूध व फळे पुरेशी मिळत असतील अशी आशा करतो. आता या खेपेला एवढे पुरेसे ठरेल. या काळात मला प्रवचन पाठवता येत नाही."[८]

या पत्रातून नेहमीप्रमाणे सारा तपशील कळवला आहे. आपला प्रवास व आपल्या दौऱ्याची इत्थंभूत माहिती पाठवली आहे. कस्तुरबाच्या पत्रांच्या संदर्भात ती सारी पत्रे आपण दक्षिण आफ्रिकेत पाठवली असल्याचे ते लिहिताहेत. प्रा. जयकृष्ण भंसाळी या अवलिया गांधी-भक्ताचा संक्षिप्त परिचय आहे. ते खूप मनोरम व उत्सुकतावर्धक आहे.

गांधीजी कस्तुरबाला पत्र लिहितात

"बा, पहाटेचे चार वाजताहेत. डोळ्यात निद्रा आहे. तुझे पत्र मिळाले आहे....... माझी तब्येत चांगली आहे. चिंतेचे काही कारण नाही. पेळू तुला आवडले हे कळून आनंद वाटला. पेळू केशवच्या धनुकलीवर केले गेलेत पण मीराताईने पाठवले होते.[९]

अल्पाक्षर लेखनाची गांधीजींना सिध्दी प्राप्त होती. ते या पत्रातून नातलगांचा परिचय करुन देतात. कमालीचे कमीत कमी शब्द. ते आसाम, ब्रह्मपुत्रेचे वर्णन करतात. आसामी बंधू-भगिनींचा मनोज्ञ परिचय घडवतात. कताई करणाऱ्या आणि आपले कपडे विणणाऱ्या भगिनींविषयीची सहज सहानुभूती डोकावते. आनंद त्यांच्या पत्राच्या समापनात डोकावतो.

गांधीजींनी कस्तुरबाला लिहिलेले पत्र

"बा, रामदासच्या नावे लिहिलेले तुझे पत्र मिळाले. हे पत्र मी रांचीहून लिहित आहे. आम्ही काल सायंकाळी येथे पोहोचलो. .. . .. . .. माझी तब्येत चांगली रहाते. तू मुळीच काळजी करु नकोस. तुझी सुटका होईल तेव्हा मी पाटणा येथे असेन, तिथून पुढे कलकत्ता येथे जाईन. रामदास तुझ्या नावाचा जप करत असतो, यामुळे त्याच्याकडे जायला हवे. तिथून दिल्लीला निघून जा. तुला बारडोली येथेही तर जायलाच हवे आणि तिथून बहुत करुन अहमदाबादला तर येऊच शकतेस. या दरम्यान कदाचित माझे जर गुजरातकडे येणे झाले तर तू तिथून माझ्यासोबत असू शकतेस. मला तर हेच सुचले आहे. पण तुला बरे वाटेल तेच करावे. .. .. . .. 'राम गीता' पाठवायचा प्रयत्न करतो."[१०]

या पत्रातून गांधीजी केवळ आपल्या कार्य योजनेचा परिचय देत नाहीत. कस्तुरबासाठीचाही समग्र कार्यक्रम उलगडवून दाखवतात. तुरुंगात असलेल्या कस्तुरबाला उत्साह वाटावे असे हे वर्णन आहे.

गांधीजींनी ८ मे पासून ओरिसा दौरा पद यात्रा सुरु केली होती. ही धर्म यात्रेची पारंपारिक प्रथा आहे. ही यात्रा ८ जून पर्यंत चालली. काही दिवसांनंतर ही यात्रा रेल्वेने सुरु झाली. २ ऑगस्ट रोजी गांधीजी बनारसला पोहोचलेत. ही यात्रा पुढे नऊ महिन्यांपर्यंत चालली होती. या यात्रेनिमित्त गांधीजी बारा हजार मैल फिरले होते. त्यांना अध्यात्म क्षेत्रात पुरुषापेक्षा महिलांचा अधिकार मोठा असल्याचा सम्यक् बोध आहे. आपण कस्तुरबाच्या सहकार्याने या मार्गावर प्रगती करु शकलो. हे त्यांनी मुक्तपणे स्वीकारले आहे.

गांधीजींनी कस्तुरबाला लिहिलेले पत्र -

"बा, या खेपेला तुझे पत्र आतापर्यंत मिळाले नाही. हे पत्र मी पुरीहून दहा मैल अंतरावरच्या एका खेड्यावरुन लिहित आहे. रात्रीचा एक वाजत आहे. दात घासून मी एक पत्र लिहिले आहे. आणि आता तुला लिहायला घेतले आहे. परवा मी निश्चय केला की आता मला पदयात्रा करायला हवी. रेल्वे, कार वा बैलगाडीने यात्रा करुन काही धर्म-प्रचार केला जाऊ शकत नाही. तो तर पायीच चालत केला जाऊ शकतो. स्थानिक नेता व ठक्कर बाप्पाही अखेर सहमत झालेत. मी त्या दिवसापासूनच पदयात्रा आरंभिली आहे. यातून माझ्या ठायी नवी शक्ती संचारली. काल आठ मैलांहून अधिक पदयात्रा केली पण मला काही जाणवले नाही. आताही मी अगदी ताजा-तवाना होऊन उठलो आणि जागा झालो आहे. मला कटकहून तीन दिवस पाटणा येथे जावे लागेल. तिथे अखिल भारतीय काँग्रेस कमेटीची बैठक आहे. माझी इच्छा तर तिथून परत ओरिसाला जाऊन यात्रा पूर्ण करायची आहे. अन्य सहयोगी कार्यकर्त्यांशी

बोलूनच याविषयीचा निश्चय होऊ शकेल. या पत्राच्या सोबत 'गीता-प्रवेशिका' वा 'राम गीता' पाठवत आहे. (गांधीजींनी १९३२ साली येरवडा तुरुंगात रामदाससाठी भगवद्गीतेचे बेचाळीस श्लोक निवडून 'गीता-प्रवेशिका' तयार केली हीच 'राम गीता' होय. आचार्य विनोबा, त्यांचे मधले बंधू बाळकृष्ण उपाख्य बाळकोबा भावे आणि काका कालेलकर या दरम्यान तुरुंगातच होते. त्यांनी सर्वानुमते गांधीजींनी तयार केलेल्या या संकलनातील तीन श्लोक वगळून इतर चार श्लोकांचा अंतर्भाव केला आणि ही गीता तयार झाली.) ही सहज कळू शकेल. दुसऱ्या प्रतीची गरज असेल तर मागवून घे आणि ती प्रत तिथेच सोडून ये. सुटका झाल्यावर तुला काय करायचे आहे. हे तर मी तुला लिहिलेच आहे. याशिवाय तुला जे योग्य वाटेल तसे कर."[११]

या पत्रातून कस्तुरबाच्या कारावासातून सुटका झाल्यावरच्या कामाची रुपरेखा आहे. स्वाध्यायासाठी पाठवलेल्या 'राम गीता' चा उल्लेख आहे. या गीतेच्या विषयीची चर्चा त्यांनी आपल्या मागील एका पत्रातून केली होती. या गीतेविषयीचे आपले मत मांडले आहे. कस्तुरबाला आपल्या इच्छेप्रमाणे आपला कार्यक्रम आखायचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. हे विशेष.

१९३४ च्या आरंभी तुरुंगात असलेल्या फार थोड्या महिलांपैकी कस्तुरबा एक होती. तुरुंगवास मे महिन्यात संपणार होता. तिची सुटका झाली पण जीवित्वाला धोका होता. अस्पृश्यांसाठी गांधीजी कार्यरत होते. या कार्याची काही लोकांमध्ये खूपच कडवट प्रतिक्रिया उपजली होती. हे ती जाणून होती. गांधी-विरोधातला द्वेष कट्टर होता. याचा प्रत्यय तिला त्यांच्या सोबत प्रवास करताना आला होता. गांधीजी पुण्याकडे निघाले होते. सोबत कस्तुरबा आणि काही सहकारी होते. वाटेत त्यांच्या कारवर एक हात बॉंब फेकण्यात आला. नेम चुकला. बॉंब कारला लागला. सात जण जखमी झाले. कोणी ठार झाले नाही. गंभीरपणे दुखणाईत झाले नाहीत. ठरल्याप्रमाणे सभा पार पडली. गांधीजींचे भाषण ऐकण्यासाठी तुडुंब गर्दी जमली होती. कस्तुरबाला बाहेरच्या जगापेक्षा तुरुंगातील जीवन अधिक सुरक्षित वाटले होते.

३० जून १९३४. गांधीजी रात्री अहमदाबादहून रवाना झाले. गाडी सौराष्ट्रात प्रविष्ट झाली. प्रत्येक स्टेशनावर दर्शनातुर बंधू-भगिनींची झुंबड उडायची. मध्यरात्र काय आणि उत्तररात्र काय? जनतेचा प्रवाह वाहताच होता. लोक त्यांना जागे करत. दर्शन घेत. हरिजन फंडात थोडे-फार दान देत. बोराद असो वा धोळा, वीरमगाम असो वा वढवाण, सोनगड असो वा शिहोर. सर्वत्र या घटनेचे पुनरावर्तन व्हायचे. सकाळी भावनगरला पोहोचले. भव्य सत्कार समारंभ झाला. सनातन धर्म हायस्कूलच्या प्रांगणात भव्य शामियांना उभारला गेला. भावनगरातील लोक होते. आसपासच्या परिसरातून ग्रामीण जनांचा उसळता उत्साह होता. दिवाण प्रभाशंकर पट्टणी पुढे आले. भव्य स्वागत करण्यात आले. गांधीजींच्या समवेत प्रवासात कस्तूरबा होती. मीठुताई पिटिट होत्या. यांनी पुढे गुजरातेत मरोली येथील कस्तुरबा स्मारकाची जबाबदारी सांभाळली. अब्बास तैय्यबजी होते. स्वामी आनंद होते.

गांधीजी कराची येथे होते. तिथे सिंधच्या पत्रकारांशी भेट झाली. या भेटीत पुढीलप्रमाणे चर्चा झाली. पत्रकाराने प्रश्न विचारला होता.

'आपल्या उपवासाच्या निर्णयात कस्तुरबाही सामील आहेत. का?' पत्रकाराचा प्रश्न होता.

"होय, माझे हे परम सौभाग्य आहे. अशा प्रकारच्या सर्व उपक्रमात कस्तुरबाने मला कधी त्रास दिला नाही. कधी विवाद केला नाही. स्वत: व्यथित असतानाही मला माझ्या मार्गाने मार्गक्रमण करु दिले. याचमुळे त्या माझ्या धर्मपत्नी असल्या तरी मी हे नि:संकोचपणे सांगू शकतो की त्या माझ्या संपर्कात आलेल्या सर्वात बहादुर महिलांपैकी एक आहेत." उत्तरादाखल गांधीजी म्हणाले.[१२]

ऑगस्ट १९३४ च्या आरंभी गांधीजी व कस्तुरबा दोघे बनारसमध्ये आजारी पडले होते.

गांधीजींनी कस्तुरबाला लिहिलेले हे पत्र

"बा, तुझी चिठ्ठी काल मिळाली होती. तू जर कानो याला (कान्हा रामदासचा मुलगा) राखू इच्छित असशील तर मग मी त्याला इकडे बोलाऊन काय करीन? तू अवश्य त्याला तिथे ठेऊन घे. मी तर तुझी आणि रामदासची जबाबदारी कमी करु इच्छित होतो. सरिता (रामदासच्या सासूबाई) इथे आहेत. यामुळे नीमू

(निर्मला रामदासची पत्नी) कानो याची देखरेख करायला उत्सुक होती. रामदास सध्या तर चांगला असेल असे वाटते. त्याने उतावीळपणे खाऊ नये. तुझ्यापाशी मच्छरदाणी तर असेलच. दिवस कसे जातात? मी जे वृत्तपत्रामधून लिहितो ते कुणाकडून ऐकून घेत चल. सुमित्राच्या (रामदासची मुलगी) डोळ्यांसाठी नीमू रोज इस्पितळात जाते. कमला नेहरु खूप आजारी आहे. त्यांना कुणाकडून पत्र लिहवून घे."[१३]

या पत्रातून घरगुती बातम्या आहेत. त्यासोबतच आपले लेखन कस्तुरबाने वाचावे अशी इच्छाही व्यक्त केली आहे.

### गांधीजी कस्तुरबाला पत्र लिहितात

"बा, आज तुझे पत्र आले नाही. रामदासला मी लिहिलेल्या पत्रावरुन सुमित्रेच्या तब्येतीचे वृत्त जाणून घे. तिची काही काळजी करु नकोस. नीमूचीही काळजी करु नकोस. काकासाहेबांना ताप येत होता. आता कमी होत आहे. त्यांना बघायला रोज चालत जातो. थोड्या अंतरापर्यत नीमूही सोबत असते. परतताना पुन्हा सोबत करते. सध्या ती सूतकताई शिकत आहे. मणीलालही पत्र लिही."[१४]

काल एक पत्र लिहिल्यानंतर आज लगेचच एक पत्र पाठवले आहे. यातून अमलाला नोकरी मिळाल्याची बातमी कालही होती ती आजही दिली गेली आहे. नीमूविषयीची विशेष माहिती आहे.

### गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले आहे

"बा, काल तुझ्या चिठ्ठीला उत्तर पाठवले होते. सध्या तुम्हा दोघांना लगेच वर्धा येथे बोलाऊन घेणे उचित नाही. तिथल्या इस्पितळाचा उपचारही पूर्ण करुन घेणे सोईचे ठरावे. इथल्या हवा-पाण्यात तर काही उणेपणा नाही. रामदासला तिथे आवडत नसेल तर मुद्दा वेगळा आहे. यामुळे तू धीर धर. ईश्वर सारे बरोबरच करील."[१५]

हे पत्र खासगी स्वरुपाची माहिती देणारे आहे. ईश्वराच्या इच्छेप्रमाणे सारे होईल असा भाव व्यक्त करणारे आहे. आपल्या सहकार्यांच्या कार्यक्रमाचे स्वरुप सांगणारे आहे. हे पत्र खासगी असूनही जाहीर पत्र आहे.

### गांधीजी कस्तुरबाला पत्रातून कळवतात

"बा, माझी पत्रे मिळत असावीत. रामदासची शक्ती जर पूर्णपणे आली नाही तर कॉंग्रेस अधिवेशनात यायचा कार्यक्रम रद्द करुन टाकावा. नीमूला तिथे घेऊन जाणे उचित ठरणार नाही. जिथे बघशील तिथे गर्दी असेल. जिथे जेमतेम कामे निभावून घ्यावी लागतील अशा ठिकाणी लेकुरवाळ्या महिलांनी जायला नको. जेव्हा रामदास पूर्णपणे निकोप होऊन जाईल तेव्हाच हवा-पालटाविषयी विचार करायला हवा ना? तू याविषयी काळजी करु नकोस. स्वत:साठी मच्छरदाणीचा वापर करत जा."[१६] कुटुंबवत्सल गांधीजींचे हे मनमोकळे पत्र! लेकुरवाळ्या माऊलीची काळजी वहाणारे हे पत्र मनोरम आहे.

### गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिलेले आहे

"बा, यावर्षी कॉंग्रेसच्या अधिवेशन प्रसंगी तुझे येणे अजिबात आवश्यक नाही. मी अजिबात जाऊ इच्छित नाही पण मला तर जावेच लागेल. या खेपेला नि:शुल्क प्रवेश नाही. किमान तिकीट पंचवीस रुपयांचे आहे. एवढे कोण देईल? आणि आपण एवढे शुल्क कुणाला का देऊ द्यावे? मी सर्वाना 'जाऊ नये' असे सांगत आहे.[१७]

कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या संदर्भातील हे पत्र. अधिवेशनासाठी लागणाऱ्या शुल्काच्या संदर्भातील गांधीजींचे मत खूप विशिष्ट मानावे लागेल.

गांधीजींनी लिहिले की कस्तुरबानी अनियमितपणे पत्रे लिहिली आहेत. असे जाणवते. पत्रे लिहित रहाणेच योग्य आहे. [१८]

या पत्रातून कस्तुरबाच्या अनियमित पत्रांचा मुद्दा उपस्थित केला गेला आहे.

गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले आहे. की तिला मुंबईला न बोलाऊन त्यांनी योग्यच केले. जिथे पेरीनताईचा अपमान झाला तिथे कस्तुरबाने का जावे? हे तर एक विशेष कारण झाले. दुसरे कारण असे आहे. की रामदास जोवर तिथे आहे. तोवर तिचे तिथे रहाणे शोभून दिसते. तिसरे कारण हे की त्यांचे स्वत:चे मन

काँग्रेसवरुन उडून गेले आहे. त्यांनी जमनालालजींनाही रोखून धरले आहे. त्यांचे काँग्रेसमधून बाहेर पडणे निश्चित आहे. असे जर असेल तर मग कस्तुरबाला ते तिथे कशासाठी नेतील? नीमूची तब्येत चांगली असते[१९]

एस्. अम्बुजम्माल यांना गांधीजींनी पत्रातून कळवले की ते दिल्लीला किमान २० तारखेपर्यत निवास करतील. त्यांना लिहित रहा. सोबत बा, मीराताई आणि खुर्शिदताई आहेत.[२०]

या पत्र व्यवहारातून गांधीजी कस्तुरबाशी नित्य संवादरत दिसतात. आपले मत व्यक्त करतात. कस्तुरबाला स्वत:च्या मत प्रदर्शनासाठी स्वातंत्र्य देतात. आपला कार्यक्रम सांगतात. देशभरातील बातम्या देतात. गणगोत व मित्र परिवाराला आठवतात. त्यांच्या घरातल्या छोट्यातल्या छोट्या तपशीलाला अगत्यपूर्वक कळवतात. संघर्षाची मशाल सतत तेजाळत ठेवतात. कस्तुरबाला उमेद जागावी असे वातावरण उभारतात. धर्मचिंतन तिच्याभोवती मखरासारखे सजवतात. धर्म आणि राष्ट्र असा संघर्ष उभा ठाकला म्हणजे राष्ट्र सर्वोपरी असल्याचे मात्र हिरीरीने मांडतात.

संदर्भ


१) गांधीजींनी प्रेमाताई कंटक यांना दिनांक २२ जानेवारी १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५३ पृष्ठ १२५;

२) गांधीजींनी मीराताईला दिनांक ४ मार्च १९३३ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५३ पृष्ठ ५०६;

३) गांधीजींनी गंगाबेन वैद्य यांना दिनांक २४ मार्च १९३२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५४ पृष्ठ २०१;

४) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ८ मार्च १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ २७८;

५) गांधीजींनी कस्तुरबाला पाटणाहून दिनांक २० / २१ मार्च १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ३१८;

६) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २९ मार्च १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ३५०;

७) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ६ एप्रिल १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ३८८;

८) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १८ एप्रिल १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ४३७ -४३८;

९) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २७ एप्रिल १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ४८४;

१०) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १ मे १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ४९०;

११) गांधीजींनी कस्तुरबाला चंदनपुरहून दिनांक १० मे १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ५१९;

१२) 'ट्रिब्युन' या इंग्रजी नियतकालिकाच्या दिनांक १३ आणि १५ जुलैच्या अंकात प्रकाशित मुलाखत आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५८ पृष्ठ १७८;

१३) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २० सप्टेंबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ ३८;

१४) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २१ सप्टेंबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ ५२;

१५) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २७ सप्टेंबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ ८९;

१६) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २९ सप्टेंबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ १०१;

१७) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ६ ऑक्टोबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ १५१;

१८) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १५ ऑक्टोबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ १९६;

१९) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २० ऑक्टोबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ २१६;

२०) गांधीजींनी श्रीनिवास अय्यंगार यांच्या कन्या एस्. अम्बुजम्माल यांना दिनांक ३१ डिसेंबर १९३४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६० पृष्ठ ४३.

❖❖❖

## ११) ईश्वराच्या दिशेने!

१९३५ साल उजाडले. बारडोलीत कस्तुरबाने सत्याग्रहींची सेवा केली. शेतकऱ्यांना लढ्याची दिशा समजावली. सरकारचे धाबे दणाणले. बारडोली कँपचे नेतृत्व कस्तुरबाकडे होते. १५जानेवारी १९३५ रोजी तिला अटक करण्यात आली. सहा आठवड्यांची शिक्षा ठोठावली गेली. यथावकाश सुटका झाली.

बाहेर धो-धो पाऊस पडत होता. चिखलाचे साम्राज्य पसरले होते. बारडोली तालुक्यातील उंडक नावाचे गाव होते. कस्तुरबाची प्रचंड मिरवणूक निघाली होती. तिच्याजवळ एका सत्याग्रहीची निराधार कन्या होती. ती एका दुपट्यात गुंडाळून तिने आपल्या छातीला लावली होती. तिच्या डोळ्यात आसवे मावत नव्हती. सभेतल्या नेत्रानाही आसवांचा महापुर आला होता. सभेत अपार शांतता पसरली. एक महिला पुढे सरसावली. कस्तुरबाने त्या अजाण लेकराला तिच्या ओटीत टाकले.

'संकटाच्या परमावधीत जन्माला आलेली ही भारत कन्यका. देशाची सेवा करायला चिरंजीव होवो.' कस्तुरबा म्हणाली.

कस्तुरबाला ऐकून जनता मोहून जायची. दु:खे विसरायची. तिच्या भजनी लागायची. ती आई होती. तिला अबाधित मातृत्व लाभले होते.

एप्रिल ते सप्टेंबर १९३५ या काळात राजकीय क्षेत्रात काही विशेष धावपळ नव्हती. गांधीजी ग्रामसेवाकार्यात निमग्न होते. या दरम्यान गांधीजींची पत्रे कस्तुरबाला च्यवनप्राशसारखी होती. गांधीजींनी तिला लिहिले की खूप प्रतीक्षेनंतर तिचे पत्र मिळाले. तब्येतीची काळजी या पत्रातून व्यक्त केली गेली आहे. नातवंडांचे कौतुक आहे. सहकाऱ्यांचा तपशील आहे.[१]

दुसऱ्या पत्रात देवदासच्या आजारातही न भिणाऱ्या कस्तुरबाला ते सिंहिणीची उपमा देतात. रोज पत्रे पाठवायची सूचना देतात. तब्येतीला जपायची काळजी वहातात.[२]

१९३५ सालचा डिसेंबर महिना होता. न्यूयॉर्कहून मागरिट सेंगर भारतात आल्या होत्या. त्या वर्धा येथे आल्या. भारतीय महिलांच्या बोलावण्यावरुन त्या आल्या होत्या. त्या कुटुंब नियोजनाच्या पुरस्कर्त्या होत्या. त्या गांधीजींना येऊन भेटल्या. त्यांच्याशी गांधीजींनी दोन दिवस विस्तारपूर्वक चर्चा केली. चर्चेचे विषय होते - लैंगिकता, प्रेम आणि वासना. त्यांच्यातील संवाद महत्वाचा आहे. गांधीजी आणि कस्तुरबा यांचे जीवन यातून जाणून घेता येते. त्यांच्यात पुढीलप्रमाणे संवाद झाला. 'उभयतानी पाशवी वासना शमविण्यासाठी कुठल्याही कारणाशिवाय साधलेल्या संबंधाला मी प्रेम म्हणू शकत नाही.' गांधीजी म्हणाले होते.

इथून दोघांमधल्या मतभेदाचा विषय समोर आला होता. 'तुम्ही तमाम नैसर्गिक संबंधाना काममूलक मानाल का?' सेंगर यांनी विचारले होते. 'प्रजोत्पत्तीच्या निरपवाद हेतुशिवाय असणाऱ्या तमाम संबंधांना तसे मानले जाईल.' गांधीजींचे उत्तर होते.

"ही दुबळी स्थिती आहे. एक तर प्रेमसंबंध असतील वा विषयवासना तरी असेल. दोन प्रकारचे नैसर्गिक सबंध आहेत. एक प्रेमळ व दुसरे वास्तविक. आपल्या संस्कृतीच्या बळावर ईश्वराच्या दिशेने एक पायरी वर चढू शकण्याच्या प्रक्रियेला कामवासनेचे नाव देता येणार नाही." सेंगर म्हणाल्या.

"मी संयमित जीवन जगू लागल्यानंतर आम्ही उभयता अधिक निकट पोहोचलो. मजपाशी सवड होती तेव्हा कामवासना आडवी आली. विकार हटून अधिक उन्नत ध्येयप्राप्ती झाली त्यावेळी मजपाशी सवड उरली नव्हती." गांधीजी उत्तरले होते. [३]

पुढील चर्चेत गांधीजींनी मागरिट सेंगर यांना सांगितले होते -

"महिला स्वत:च्या मालक आहेत., धनी आहेत. हे मी आधी माझ्या पत्नीला शिकवले. मी तिच्यावर जबरदस्ती करायचो तेव्हाही तिचा शिक्षक व्हायच्या दिशेने प्रयत्न करायचो. आज तिला जे काही लिहिता-वाचता येते त्याचे कारण मी दिलेले शिक्षण आहे. मी जंगली असल्यामुळे तिचा आदर्श शिक्षक होऊ शकलो नाही. माझ्या ठायी पशुविकार दृढ स्वरुपात होते. त्याला मी स्त्रियांचे अखिल विश्व मानायचो. माझी पत्नी माझ्याशी सभ्यतेने-सौजन्याने वागते पण मी एवढे

दाक्षिण्य दाखवू शकलो नाही. आपल्या पतीला अंधतेने अनुसरणाऱ्या बांच्यासारख्या अधिक महिला नसतील. मी बांकडे विषयासक्तीनेच बघायचो असे माझ्यात काय होते याची मला अजूनही जाण नाही. आमच्या उभयतात प्रेम तर होतेच पण आम्ही किंवा खरे बोलायचे झाल्यास मी संयम पाळल्यावरच आम्ही अधिक नजिक आलो. तिने क्वचित्‌च माझा सामना केला असेल. ती अनेकदा अनिच्छा दर्शवायची पण मला तर सदा न्‌ कदा आमोद-प्रमोद हवा होता. यामुळे मी तिची सेवा करु शकत नव्हतो. आज ती खूप शिकली-सवरलेली महिला झाली असती. मी तिला शिकवायचा प्रयत्न केला पण निष्फळ गेलो. मजजवळ वेळ होता तेव्हा कामवासना आडवी आली. विकारातून बाहेर आणि अधिक उन्नत ध्येय सापडले तेव्हा मजपाशी वेळ नव्हता."[३] गांधीजींनी तपशिलवार सांगितले होते.

१९३५ साली काही विदेशी मान्यवर पाहुणे मंडळी वर्धा येथे आली होती. त्यांना ग्रामीण उत्थानाचे कार्य बघायचे होते. तुर्कीहून मॅडम हेलिडे इडूब हनूम (Madam Halide Edube Hanum) आल्या होत्या. त्या तीन दिवस आश्रमात थांबल्या. नव्या चळवळीचे स्वरुप त्यांना समजून घ्यायचे होते. त्या कस्तुरबासोबत मांडी घालून खाली बसल्या. परातीतल्या गव्हातले खडे निवडू लागल्यात.

७ डिसेंबर १९३५ रोजी कलकत्ता येथे गांधीजी आजारी पडले होते. त्यांना 'पूर्ण विश्रांती' घ्यायचा सल्ला मान्य करावा लागला होता. सेवाग्रामला आजारी अवस्थेतच परतले होते. त्यांची तशी अवस्था बघून ग्रामवासी भयभीत झाले. आश्रमवासी तर रडूच लागले. कस्तुरबाने लगेचच सेवाकार्य आरंभिले. गांधीजी परत उठून उभे राहिले. १९२० सालीही ते असेच आजारी पडले होते. १९३३ साली पुणे कराराच्या वेळी तर स्वत: जगायची आशाच त्यांनी सोडून दिली होती..

१९३६ साली कस्तुरबा खूप आजारी होती. गांधीजी खूप काळजीत होते. कस्तुरबा दु:खी अवस्थेत होती. तिला एकटी सोडून येण्याचे दु:ख होते. देवदासची खुलाशाची तार पोहोचली. गांधीजी सुखावले. पत्रातून नातवंडांचा गोडवा त्यांनी पोहोचवला.

गांधीजींनी मीराताईला फैजपुरहून लिहिले की बा दिनांक २४ रोजी येईल. आपण तिला आपल्यासोबत आणले नाही ते बरेच झाले. काँग्रेसच्या संमेलनात सुश्रूषेची अपेक्षा करणाऱ्या लोकांची गर्दी नको. असे लोक जेवढे कमी असतील तेवढे उत्तम ! आपले चालले असते तर आपण तिला येण्यापासून थांबवले असते. तसे होऊ शकले नाही.[४]

फैजपुर येथे दिनांक २५ डिसेंबर १९३६ रोजी खादी आणि ग्रामोद्योग प्रदर्शनाचे उद्‌घाटन गांधीजींनी केले. त्यावेळी त्यांच्यासमवेत कस्तुरबा, जवाहरलालजी, अब्दुल गफ्फार खाँ, वल्लभभाई, सरोजिनी नायडू, राजेंद्रप्रसाद, अबुल कलाम आजाद, गोविंदवल्लभ पंत, जे. बी. कृपलानी, जमनालाल बजाज आणि महादेवभाईही उपस्थित होते.

गांधीजींचा दौरा वादळी असायचा. नाना अडचणी असायच्या. त्यांचा स्वयंपाक व मालीश कस्तुरबा स्वत:च करायच्या. सभा-समारंभ नित्याचेच होते. गांधीजी रात्री उशिरा परतत. कस्तुरबा वाट बघत बसून रहायच्या. त्या गांधीजींना कमीत कमी त्रास द्यायच्या. अधिकात अधिक सेवा करायच्या. आजारी अवस्थेतही त्यांची भिरभिरती नजर गांधीजींच्या एकूणच व्यवस्थेवर स्थिर असायची.

कस्तुरबाने मार्च महिन्यात पंजाबात भाषण दिले. हे लिखित भाषण होते. ते श्री जमनालाल बजाज यांनी वाचून दाखवले. त्या भाषणातला एक अंश -

"अस्पृश्योध्दाराची चळवळ आता आपल्या आयुष्याचा एक अंगभूत भाग बनली आहे. आता हा विचार आपल्या अंत:करणात दृढपणे ठसला आहे. अस्पृश्यतेचा विचार मनात कायम राखून आपण सत्य व धर्माच्या पथावर एक पाऊलही टाकू शकणार नाहीत. सुदैवाने अन्य संस्थानांइतकी विशेषत: दक्षिण भारताइतकी या प्रश्नाची तीव्रता पंजाबात नाही. या शापापासून मुक्तता मिळवण्याचे प्रयत्न वेळोवेळी होत आलेले आहेत. शिख गुरुंनी आपल्या शिष्यांना समतेचा मधु चाखायला परवानगी दिलेली आहे. स्वामी रामतीर्थांनी सर्वांवर प्रेम करण्याचा आपला उपदेश दिलेला आहे. गुरु नानकदेवानी श्रेष्ठ-कनिष्ठ जातींच्या भेद भावनेला क्षणभरही थारा

दिला नाही. आर्य समाजानेही स्वतःच्या विचारसरणीला अनुसरुन या संदर्भात उत्तम भूमिका बजावली आहे. यामुळेच भारतातील इतर प्रदेशात आढळतो तसा इथे हा प्रश्न गुंतागुंतीचा नाही पण तरीही पंजाबातून अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन झाले आहे. असे काही तुम्ही म्हणू शकत नाही."[५]

या भाषणात अस्पृश्योध्दाराचा विषय कस्तुरबाचा जीवनमंत्र बनल्याचे लक्षात येते. पंजाबच्या परंपरेचा गौरव या भाषणात आहे. खऱ्या परिस्थितीचे दर्शन आहे. हे संपूर्ण भाषण परिशिष्टात आहे.

१९३४ ते १९३९ हा पंचवार्षिक काळ गीतेच्या पाचव्या अध्यायाच्या भाषेतील 'कर्मसंन्यास' आणि 'कर्मयोग' काळ आहे. विविध कर्मात रत असूनही कर्मयोग्याचे चित्त योगात स्थिर असते. सर्व कर्मांना आटोपून घेतल्यावरही कर्मसंन्यासीच्या प्रभावाने निरंतर कर्मप्रक्रिया सुरुच रहाते. गांधीजी या काळात या दुहेरी भूमिकेत दिसतात. गांधीजी आपल्या आसपासच्या वातावरणाला आत्मशुध्दिने मंत्रभारित करत होते. विसाव्या शतकाच्या अखेरच्या तीन दशकांच्या उत्तरार्ध्दातले गांधीजींचे कार्य विशिष्ट आहे. ते उन्हाळ्यात घामाने थबथबत्या अंगाने विहीर खणणाऱ्या शेतकऱ्याच्या कामासारखे दिसते. कस्तुरबा त्यांच्यासाठी शेताच्या बांधावर भाकरी घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्याच्या पत्नीसारखी आहे. या विहीरीतल्या जळाने भारतीय ग्राम कृषी संस्कृतीचे खोलवर मूळापर्यंत जाऊन सिंचन केले गेले आहे.

१९३६ सालच्या मे महिन्यात पंधरवडाभर विश्रांतीसाठी गांधीजी म्हैसुर राज्यात नंदी हिल्सवर गेले. तिथे पोहोचायच्या एका दिवसापूर्वीच त्यांना डॉ. मु. अ. अन्सारी यांच्या दुःखद निधनाची वार्ता कळली. या निधनाने कस्तुरबाही व्यथित झाल्यात.

कस्तुरबाचा उल्लेख गांधीजींच्या अगणित पत्रांमधून येतो. कधी थेट कस्तुरबाला लिहिलेली पत्रे. कधी मित्र, सहकारी वा नातलगांना लिहिलेली पत्रे. कधी आजारपणाची चर्चा आहे. कधी प्रवासाचा तपशील आहे. कधी पत्र-व्यवहाराची काळजी आहे. कधी चिंता-विवंचनांचा उल्लेख आहे. कधी हर्ष-आनंदाचा कल्लोळ आहे. कधी कुणा बातमीच्या संदर्भातील अनुकूल-प्रतिकुल मत वा प्रतिक्रिया आहे. कधी कस्तुरबाशी संबंधित कुण्या घटना-प्रसंगांची वार्ता आहे. ही चर्चा कधी संक्षिप्तपणे एखाद्या शब्दात वा वाक्यात आहे. कधी विस्तारपूर्वक अगदी चार-पाच ओळीतही आहे.

संदर्भ


१) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १८ ऑगस्ट १९३५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६१ पृष्ठ ३७०;

२) गांधीजींनी कस्तुरबाला वर्धा येथून दिनांक २४ ऑगस्ट १९३५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६१ पृष्ठ ३८९;

३) अग्निकुंडात उमललेले गुलाब : श्री नारायण देसाई (मूळ गुजराती) मराठी अनुवाद डॉ. मु. ब. शहा आणि डॉ. विश्वास पाटील पृष्ठ ७००;

४) गांधीजींनी मीराताईला फैजपुरहून दिनांक २२ डिसेंबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६३ पृष्ठ १८५;

५) कस्तुरबाने दिनांक २१ मार्च १९३६ रोजी पंजाबच्या अस्पृश्योध्दार संमेलनात जालियानवाला बागेत दिलेले भाषण.


❖❖❖

## १२) घायाळ मातेची हाक

१९३६ साल कस्तुरबासाठी आत्मग्लानीचे वर्ष होते. संताप व संयमाचे वर्ष होते. १४ मे १९३६ साली तिचा थोरला मुलगा हरीलाल अब्दुल्ला बनला होता. २९ मे रोजी मुंबईच्या जामा मशिदीतून त्याने आपल्या धर्मांतराची घोषणा केली होती. ३० मे १९३६ रोजी अठ्ठेचाळीस वर्षे वयाच्या हरीलालने गुपचूप इस्लाम धर्म स्वीकारला असे वृत्तपत्रांनी घोषित केले. कस्तुरबा गांधीजींच्या सोबत बंगलोर येथे होती. मुंबई येथील जामा मस्जिद येथे २९ मे रोजी हरीलालने इस्लामचा स्वीकार केला. आपले हरीलाल नाव बदलून अब्दुल्ला असे नाव करुन घेतले होते. कस्तुरबाने हरीलालच्या मुलीला रामीला पत्र लिहायला घेतले. धर्मांतराच्या बातमीने तिला प्रचंड मानसिक धक्का बसला होता. तिने पत्रातून लिहिले होते 'मी अतिशय दुःखी आहे. पण काय करु? खरे तर मला माझीच लाज वाटते. आपण एक रत्न गमावून बसलो आहोत.'

कस्तुरबाने हरीलालला पत्र लिहिले. हे ऐतिहासिक पत्र पुढीलप्रमाणे आहे

"चिरंजीव हरी,

काही काळ लोटला आहे. तू दारू पिऊन धिंगाणा घालत होतास. मद्रासला मध्यरात्री तुला पोलिसांनी अटक केली. दुसऱ्या दिवशी तुला मॅजिस्ट्रेटपुढे हजर केले गेले. एक रुपया दंड ठोठावला गेला. ते भले गृहस्थ असतील. तुझ्यावर दया दाखवली. किरकोळ दंड केला. तुझ्या बाबांची पुण्याई थोर ! तुझ्याबाबत अपवाद केला. सद्भावना दाखवली. हे सारे मला तपशिलवारपणे कळले आहे. मला खूप यातना झाल्यात. तू त्या रात्री एकटा होतास की मित्रांसमवेत होतास? मला यातले काहीही माहित नाही. तुझे असे वागणे बरे नाही.

तुला काय सांगावे? कायच लिहावे? मला काहीही सुचत नाही. मी तुला अनेकदा सांगून पाहिले. सुचवून पाहिले. संयमाने वाग. जीवनावर अंकुश ठेव. तू दिवसेंदिवस अधिकच वहावत चाललास. आता तर मला जगणे असह्य वाटते. हरी, तुझे आई-बाबा आता म्हातारे झालेत बघ. त्यांच्या आयुष्याची आता सायंकाळ आहे. तू त्यांना किती छळावेस? याचा काही विचार कर.

तुझे बाबा मौन पाळतात. कुणासमोरही मन उघड करत नाहीत. त्यांना खूप झेलावे लागते. त्यांच्या मनाच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडतात. तू वारंवार आमच्या भावनांना पायदळी तुडवतोस. हे महान पाप आहे. तू आमच्या पोटी का आलास? असा का वागतोस रे तू वैऱ्यासारखा?

अलीकडे तर तू बाबांवरही टीका करायला लागलास. तू कटू निंदा करतोस. असे मला कळले आहे. कानावर येते रे सारे! तू बुध्दिमान आहे.स. असे वागणे तुला शोभते तरी का? बाबांची निंदा केल्यामुळे तुझीही निंदा होते हे का तुला कळत नाही? याचा तू विचार का करत नाहीस? बाबांच्या मनात तुझ्याबद्दल अथांग प्रेम आहे. ते शुध्द चारित्र्याला मान देतात. हे तर तूही जाणतोस. तू मात्र या गोष्टीला आयुष्यात किंमत दिली नाहीस. एवढे असतानाही त्यांनी तुझे संगोपन केले. लालन-पालन केले. आपल्या सोबत राखले. अजुनही बाबा सारे काही करायला तयार आहेत. पण तू मात्र सदा कृतघ्न राहिलास. अरे, त्यांच्या डोक्यावर केवढ्या जबाबदाऱ्या आहेत. त्या काय तुला ठाऊक नाहीत? .. .. .. .. माझा विचार कर. मी तर एक दुबळी आई आहे. तू ज्या यातना देतोस त्या मला नाही सोसता येत. तुझ्या बाबांना अनेकांची पत्रे येतात. तुझ्या अवलक्षणांची त्यात चर्चा असते. बदनामीचे हे कडू घोट त्यांना नाइलाजाने घशाखाली ढकलावे लागतात पण मला तर तू जायला एकही जागा ठेवली नाहीस. मी कुठे जाऊ? कुणाला जाऊन भेटू? माझे दुःख कुणाला सांगू? मला लाज वाटते. मी माझ्या गणगोतापाशी नाही जाऊ शकत. मित्राना नाही भेटू शकत. मला तोंड लपवावे लागते रे सारखे.

तू मद्रासला तर कुणा मातब्बर सज्जनाच्या घरी पाहुणा होतास ना? त्यांचे घर सोडलेस. रस्त्यावर उतरलास. दारु प्यालास. दुर्व्यवहार केलास. त्यांना काय वाटले असेल? त्यांना केवढी मानहानी झेलावी लागली असेल बाळा! अरे, रोज सूर्य उगवतो. नवा दिवस उगवतो. मी थरारुन उठते. आज तरी तुझे काही दुष्कर्म कानावर न पडो अशी देवाला प्रार्थना करते. तू कुठे

रहात असशील? काय खात असशील? कुठे झोपत असशील? नाना विचार येतात. मला धडपणे झोपही येत नाही. अनेकदा तुला येऊन भेटावेसे वाटते पण तुझा पत्ता कोण सांगेल? तुला तरी तो येईल का सांगता? तू माझा थोरला आहे.स. तू आता पन्नासचा झालास. मी तुझ्याकडे येईन. तू माझीच तर बेअब्रू नाही ना करणार हरी? ही भीती वाटते रे राजा!

तू आपल्या मूळ धर्माला बदललेस. धर्मांतर केलेस. का असे केले हे काही मला कळले नाही. हा तुझा खासगी प्रश्न आहे. तू निष्पाप लोकांना चुकीचा मार्ग दाखवतोस. अज्ञानी जनाना चुकीची वाट सुचवतोस. असे मी ऐकत आहे. हे काही बरोबर नाही. तुला आपल्या मर्यादांचे भान केव्हा येईल? धर्माविषयी तुला कळते तरी काय? तुझ्या बाबांचे मोठे नाव आहे. त्यांच्या प्रभावामुळे लोक तुझे म्हणणे ऐकताहेत. चुकीची वाट धरताहेत. अरे, तू का धर्मप्रचारक आहे.स? पैश्यांचा गुलाम आहे.स तू गुलाम ! जे तुला पैसे देतात ते तुला चांगले वाटतात. तू सारा पैसा दारुवर उडवतोस. सभेत जातोस. व्यासपीठावर चढतोस. भाषणे ठोकतोस. तू स्वत:चे हनन करतोस. आपल्या आत्म्याचा खून करतोस तू ! तू जर हे असेच यापुढेही सुरु ठेवले ना तर एके दिवशी एकटा उरशील. एकाकी रहाशील. यामुळे मी तुझी आई तुला प्रार्थना करत आहे. तू सारा विचार शांततेने कर. मूर्खपणा सोड. मला तुझे धर्मांतर आवडलेले नाही. तू जीवन सुधारु इच्छित होतास. ते मला भावले. तुझ्या निवेदनाने माझे समाधान झाले होते. यापुढे तू शहाणा होशील. मला असे उगाच वाटत होते. मला मनोमन आनंद झाला होता. तो पुढे टिकू शकला नाही. माझ्या आशा तू धूळीला मिळवल्यास. काही काळापूर्वीच तू यापेक्षाही वाईट अवस्थेत आढळला होतास. तुझ्या मुंबईच्या जुन्या मित्रांनी मला सारे कळवले होते. माझ्या शुभचिंतकांनी कळवले होते. अरे, तुझ्या असल्या घाणेरड्या वागण्याने तुझ्या लेकरावर केवढे आघात होतात? हे तरी तुला ठाऊक आहे. काय? तुझे असे विचित्र वागणे! हरी, तुझ्या लेकराना काय वाटत असेल याचा तरी विचार कर. तुझ्या जावयांना काय वाटत असेल? अरे थोडा तरी विचार कर ना !"

हरीचे काहींनी धर्मांतर करवले. यानंतर त्याची अवनती झाली. या सर्व मित्रांनी आनंद व्यक्त केला. या मित्रांना संबोधन करत कस्तुरबाने लिहिले:

"मला तुमचे काम रुचले नाही. आज माझ्या मुलाची दयनीय अवस्था झाली आहे. ती ज्यांनी केली त्यांना उद्देशून हे लिहित आहे. विचारवंत मुसलमानांनी या घटनेची निंदा केली आहे. हे मला माहित आहे. आमच्या मुस्लिम मित्रांनीही निंदा केली आहे. आज महापुरुष डॉ. अन्सारी यांची मला खूप आठवण येते. ते जर आज असते तर त्यांनी माझ्या लेकराला योग्य वाट दाखवली असती. तुम्हा सर्वांना नेकीचा मार्ग दाखवला असता. आज ते नाहीत. तरी अनेक भले लोक आहेत. प्रतिष्ठित जन आहेत. त्यांनी तुम्हाला योग्य वाट दाखवावी अशी मी उमेद करत आहे. हे खरे तर तथाकथित धर्मांतर झाले. यामुळे माझा मुलगा काही सुधारला नाही. उलट अधिक वाहवत गेला. वाईट कामे करु लागला. त्याच्या कुकर्मांबद्दल आपण त्याला ठपका द्यावा. त्याला जाब विचारावा. चांगल्या मार्गावर आणावे. काही लोकांनी तर हद्द केली. माझ्या मुलाला ते मौलवी असे म्हणतात. हे का योग्य आहे.? एखाद्या दारुड्याला का मौलवी म्हणावे? तुमचा धर्म याला मान्यता देतो का? मद्रासला कशी अपमानित करणारी घटना घडली. काही मुसलमान मित्र त्याचा गौरव करण्यासाठी जमले होते. हे का बरोबर आहे.? हे काय आहे. सगळे?

अशा प्रकारे तुम्ही त्याला मोठेपणा देता. हे चुकीचे आहे. यात तुम्हाला कुठला आनंद मिळतो? हे काही मला कळत नाही. तो तुमचा खरा भाऊ आहे. ना? तुम्ही त्याला खरोखरच आपला मानता ना? मग असा कसा व्यवहार करता? असे कसे वागता? तुमचेहे असे वागणे त्याच्यासाठी अजिबात हिताचे नाही. तुम्हाला आमची थट्टाच मांडायची असेल तर.. .. .. तर मग मी अधिक काय लिहू? काय सांगू? तुम्हाला जमेल तसे करा पण ही एका घायाळ मातेची हाक आहे. ती ऐका. कदाचित तुमच्यापैकी काहींच्या तरी कानावर ही पडेल. ही हाक तुमच्या अंत:करणाला जागे करील. अशी मला आशा वाटते. कदाचित ते लोक तरी तुमची काही समजूत घालू शकतील. मी माझ्या मुलाला जे काही सांगत आहे. तेच

तुम्हालाही सांगत आहे. तुमचे हे असे वागणे खुदाला आवडणार नाही."[१]

हे कळल्यावर हरीलालने या पत्राला सरळ-सरळ काही उत्तर दिले नाही. कानपुर येथील एका जाहीर सभेतून उत्तर दिले.

"मी आता अब्दुल्ला आहे., हरीलाल नव्हे यामुळे हे पत्र मी स्वीकारत नाही. माझी आई अशिक्षित आहे. हे पत्र माझ्या आईने लिहिलेले नाही. मी आता इस्लाम धर्माचा कार्यकर्ता म्हणूनच देह ठेवीन. हिंदू धर्माइतका निष्ठुर धर्म या धरतीवर दुसरा नाही. मी या दुष्ट धर्माचा त्याग केला आणि विशाल पायावर उभ्या असलेल्या, आपल्या जन्मापासून आधुनिक समतावादाचा नारा देणाऱ्या धर्मात मी प्रवेश घेतला आहे. इस्लाम तलवारीमुळे पसरला नाही. इस्लाम फकीरांमुळे सर्वत्र पसरला. माझ्या आईने मला दारु सोडायची विनंती केली आहे. खरे तर हा उत्तर द्यायच्या लायकीचा प्रश्नच नाही तरी माझे त्यांना हे उत्तर आहे. की मी दारु जरुर सोडीन पण केव्हा? माझे आई-बाबा इस्लाम धर्म स्वीकारतील तेव्हा मी दारु सोडीन."

कस्तुरबाने हरीलालची मुलगी मनूला पत्र लिहिले

"हरीविषयी जावईच काही करतील तर बरे असे वाटते. तिथे त्याला कसे आवडत असेल? खानपान आपल्यासारखे नसेल. दूधही मिळत नसेल. पाण्यासारखा पातळ चहा मिळत असेल. पाव मिळत असेल? पण लोणी कोण देत असेल? त्याच्या नशिबी भोग आहेत. त्याला काय अवदसा आठवली आणि मुसलमान झाला. आता आपल्यापासून खड्यासारखा बाजूला फेकला गेला तो! मला खूप वाईट वाटते पण काय करु? मला तर खूप लाज वाटते. .. बाळा, आम्ही आमचे रत्न गमावून बसलो आहोत. हरी महादेवच्या जागी असता तर किती बरे झाले असते ही ममताही तुझ्या आजोबांच्या मनातून जात नाही हे तू ध्यांनात घे. आता हरीचे नशीब त्याला कुठे घेऊन जाईल तिथे."[२]

रामदास हरीलालला भेटायला गेला होता. त्याला भेटू दिले गेले नाही. रात्रीचे दहा-अकरा वाजले तरी तो त्या विचित्र वस्तीतून हटला नाही मग कुठे हरी भेटला. तो नखशिखांत बदललेला होता. मुंबईला येऊन देवदासने स्वत: हरीलालची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

१० नोव्हेंबर १९३६ रोजी सहा महिन्यानंतर हरीलालने आर्य समाजाच्या मदतीने पुनरपि हिंदू धर्माचा अंगिकार केला. काही काळ आर्य समाजात राहून हिंदू धर्माचा प्रचार केला. पुढे तो पाँडेचेरीला जाऊ-येऊ लागला होता. त्याने योगी अरविंद आणि मदर यांच्याशी पत्र-व्यवहार केला होता.

कस्तुरबाला बालपणी दंगा करणारा हरीलाल आठवला. आठवले की तो खेळाडू होता. सत्याग्रही होता. उजेडाच्या साम्राज्याचा धनी होता. आज तिथे काय उरले आहे.? केवळ अंधाराची अधिसत्ता. ना उजेडाचा कवडसा ना प्रकाशाची तिरीप! एक भयंकर दु:स्वप्न बघितल्यासारखे तिला वाटले.

एकदा कस्तुरबा जबलपुर मेलने गांधीजींच्या सोबत प्रवास करत होती. वाटेत मध्यप्रदेशातील कटनी स्टेशन आले. गाडी थांबली. प्लॅटफॉर्मवर गांधींच्या स्वागताच्या घोषणा सुरु होत्या. जयजयकार होत होते. त्या आवाजात एक क्षीण घोषणा घुमत होती. 'माता कस्तुरबा की जय.' तिला नवल वाटले. तिने खिडकीतून डोकावून बाहेर बघितले. बघते तो काय? बाहेर प्लॅटफॉर्मवर चक्क हरीलाल उभा होता. पुढचे दात पडून गेलेले. केसांचा चकचकीत काळेपणा हरवलेला. भुरकट झालेले भुरभुरते तुरळक विस्कटलेले केस. विसंगत पोशाख. थकून गेलेले शरीर. गालफडे बसलेली. फाटके-तुटके कपडे. पायात पायतण नाही. हरीलालने आपल्या फाटक्या खिशातून एक संत्रे काढले. ते आपल्या तळहातावर धरलेले होते.

'आई घे, हे तुझ्यासाठी आणले आहे. बाबांना देऊ नकोस.' हरीलाल निकराने बोलत होता. 'आणि माझ्यासाठी काहीच नाही आणलेस ते?' गांधीजींची कातर वाणी झंकारली. 'नाही, हे केवळ आईसाठी. तुमच्यासाठी एवढे निवेदन की आईमुळेच तुम्ही महान आहात.' हरीलाल ठाम होता. 'होय बाळा, खरे आहे. तुझे म्हणणे. मी तुझ्या या निवेदनाशी सहमत आहे. चलतोस आमच्या सोबत.' गांधीजींनी मायेने विचारले.

'नाही, मी केवळ आईलाच भेटायला आलो आहे.' हरीलालच्या स्वरात तुच्छतेची छाया होती.

'अरे, पण .. . .. . .. ' कस्तुरबा काही बोलायचा प्रयत्न करत होती. 'आई, घे हे संत्रे.' हरीलाल म्हणाला.

'कुठून आणलेस बाळा?' कस्तुरबाने मायेने विचारले. 'कुठूनही. ते काही विचारु नकोस. भीक मागून आणले आहे. तू घे. खा. एकट्यानेच.' हरीलाल बोलला.

कस्तुरबाच्या हातात संत्रे होते. तिचा गळा दाटून आला होता.

'आई, हे संत्रे तू खा. तुला खायचे नसेल तर मला परत देऊन टाक.' हरीलाल रागाने बोलला.

'बरे, बरे. मीच खाईन हो बाळ.' कस्तुरची ममता द्रवली. 'नक्की हो!' हरीलालने खात्री करुन घेतली.

'हरी, तुझा अवतार बघ. काय दशा करुन टाकलीस? अरे, कुणाचा मुलगा तू? चल, आमच्या सोबत चल.' कस्तुरबा म्हणाली.

'ते तर बोलूच नकोस आई. मला आता यातून बाहेर नाही पडता येणार. आई, मी अडकून गेलो आहे. ग पुरता!' हरीलाल अगतिकपणे बोलला.

कस्तुरबाचे डोळे भरून आले. गार्डने शिटी दिली. झेंडा हलला. गाडी निघाली.

'आई, ते संत्रे तू एकटीनेच खायचे आहे. बरे.' हरीलालचा आग्रही स्वर प्रकटला.

घंटा घणघणली. फलाटावरल्या संथ लयीला गती मिळाली. रुळाच्या चकचकीत रेषा पुसत जमीन हादरवत रेल्वे निघाली होती. कस्तुरबाला हरीबाबत अपार दु:ख होते. ते सोपे नव्हते. अनिर्वचनीय होते. तिला बोलता येत नव्हते. तिच्याने बोलवले जात नव्हते. हुंदका छातीत दाटून राहिला होता. डोळ्यात आसवांचा अथांग दरिया होता. तो झऱ्यासारखा वहाता नव्हता. ती आसवे तिला आपल्या आत सुकवून टाकावी लागत होती. गाडीने वेग धरला होता. 'आपण तर लेकराला काहीच दिले नाही. आता काही देता येईल का?' असा विचार केला. ती बाहेर बघायला लागली होती. गाडीने प्लॅटफॉर्म कधीच सोडला होता. लांबून एक क्षीण आवाज कानावर पडला 'माता कस्तुरबाचा विजय असो.'

मातेची ममता नयनातून झरु लागली होती. काही धडपणे बोलताही आले नव्हते. लेकराला काही खायलाही देता आले नव्हते. फळांच्या तर तिथे करंड्या भरलेल्या होत्या. मिठायांची खोकी भरुन पडलेली होती. खायचे तर टिफिन्स भरलेले होते. करंड्या तिच्याकडे बघत दात विचकून हसत होत्या. खोकी तिला निराश करत होती. टिफिन्स मधले ताजे अन्न वाकुल्या दाखवत होते. कस्तुरबा या दृश्याला आपल्या मन:पटलावरुन पुसुन टाकायचा अवघड प्रयत्न करत राहिली होती. या प्रयत्नात तिच्या डोळ्यातून आसवे वाहू लागलीत. आसवांमुळे हे चित्र पुसले जाण्याऐवजी अधिकच गडद होत राहिले होते. गांधीजी मुलाकडे पाहत राहिलेत. आवेगाने थरथरलेत. आपल्या आसनाकडे परतलेत. आसनावर जाऊन बसलेत. जीवनातील एक भयानक सत्य ते बघत होते. ते हिंस्त्र श्वापदासारखे त्यांच्या समोर उभे ठाकले होते. कस्तुरबाचे हृदय कापसासारखे पिंजले गेले.

गांधीजींनी हरीलाल याला पत्रातून लिहिले 'तो आनंदाने वडिलांकडे येऊ शकतो. इकडे अपार सत्संग आहे.' हे वाचून हरीलालच्या मनात काही बदल होण्याची शक्यता नव्हती. कस्तुरबाला मात्र सारखे वाटत रहायचे. हरीलाल खूप सरळ आहे. त्याच्या मनात वाईटपणा भरणारे त्याचे मित्र आहेत. तिला एकदम नवऱ्याचा मित्र शेख मेहताब आठवला. लाख प्रयत्न झाले होते. बाळपणी गांधीजी त्याच्यापासून विलग होऊ शकले नव्हते.हरीलाल वडिलांसारखाच सरळ मनाचा होता. उमदा होता.

राजकोटला गांधीजींची वडिलोपार्जित संपत्ती होती. गांधीजींनी तर १९०७ सालीच संपत्तीवरला आपला हक्क सोडून दिला होता. या कागदपत्रांवर देवदास, रामदास, मणीलाल या तिन्ही भावांनी संमतीदर्शक सह्या केल्या होत्या. राजकोट येथे कबा गांधींचे मोठे घर होते. ते लक्ष्मीदास व करसनदास यांच्या मुलांची मिळकत बनून गेले होते. १९३५ साली या मुलांनी हे घर विकायला काढले. यासाठी हरीलालची कायदेशीर संमती लागणार होती. त्याशिवाय हा व्यवहार होऊ शकत नव्हता. हरीलाल कमालीच्या विपन्न अवस्थेत

होता. तो यासाठी अडवणूक करु शकला असता. मोठी रक्कम मागू शकला असता. लक्ष्मीदासच्या शामळदास या मुलाने तार केली. हरीलालला सहीसाठी बोलावले. हरीलालने ना चर्चा केली ना खळखळ ! तो कफल्लक होता. त्याने संबंधित कागदपत्रांवर संमतीदर्शक सही केली. आपला हक्क सहजपणे सोडून दिला होता. 'माझ्या बापाने व तिन्ही भावांनी या संपत्तीवर उदक सोडले आहे. मी ते घेऊन काय करु? मला अशी अडवणूक करायचा कुठलाही अधिकार नाही. कारण नाही.' ही त्याची भूमिका होती. त्याला कोण वाईट म्हणेल?

माधवदास मामाने हरीलालला धंद्याला लावले. कस्तुरबाला आपल्या धाकट्या भावाचे अवगुण माहित होते. तिने हरीलालला थोपवण्याचा अतोनात प्रयत्न केला. मुलगा काही मानला नाही. धंद्यात अडकला. मामाने नुकसानीचा बोजा त्याच्यावर टाकला. गांधीजींना पत्र लिहून उलट हरीलालच्याच दोषांचा पाढा वाचला. दोघे बाप-लेक एकमेकांची समजूत घालू शकले नाहीत. दोष दोघांचा होता. तिसरा दोष नियतीचा होता. या सगळ्या प्रकारच्या अडी-अडचणी हरीलालने झेलल्या.

हरीलालच्या संदर्भात गीतेच्या अनासक्तीयोगाची साधना करणे तर गांधीजींना अधिकच अवघड गेले होते. हरीलालने इस्लामचा त्याग करुन पुनरपि हिंदू धर्माचा स्वीकार केला होता. यावर गांधीजी एवढेच म्हणाले होते ' मला हरीलालविषयी काहीही आठवत नाही .. .. .. .. त्याच्या धर्मपरिवर्तनाला माझ्या दृष्टीने काहीही अर्थ नाही.'[३]

कस्तुरबाला ही जखम खोलवर झाली होती. यापुढेही ही शिक्षा तिने भोगली. इतरांनी दिलेल्या शिक्षेला ती मुळी शिक्षा मानतच नव्हती. खरी शिक्षा तर तिला तिच्या अंत:करणाने दिली होती. सळसळत्या वृक्षाच्या सुकुमार डहाळीवरील पान नाचताना दिसते. ते शुष्क बनते. रसशून्य बनते. गुपचूप झरुन जाते. वृक्ष तसा तर विराट असतो. वेदना तर त्याला होतेच ना? कस्तुरबा वृक्षासारखी बळकट. हरीलाल गळून पडल्या पानासारखा. कस्तुरबाच्या अंतर्यामीच्या डहाळीवरला देठ पर्णविहीन झाला होता. ती ठसठस काही शब्दात सांगता येण्यासारखी नाही.

संदर्भ

१) कस्तुरबाने हरीलालला दिनांक २७ सप्टेंबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र;

२) गांधीजीनुं खोवायेलुं धन : (गुजराती) नीलम पारीख पृष्ठ ११३ -११४ ;

३) गांधीजींनी अमतुस्सलाम यांना दिनांक १२ नोव्हेंबर १९३६ लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ६४ पृष्ठ ३१.

❖❖❖

## १३) जगन्नाथ मंदीर आणि कस्तुरबा

१९३६ साल होते. ७ डिसेंबरला गांधीजी आजारी होते. म्हैसुरच्या नंदी हिल्सवर विश्रांतीसाठी थांबले होते. तिथे जपानी कवी योने नोगुची भेटीला आले. त्यांच्या गप्पा सुरु होत्या. कस्तुरबा तिथे जाऊन पोहोचली. गांधीजींनी तिचा परिचय करुन दिला.

'ही तुम्हाला जपानी स्त्रीसारखी नाही का वाटत?' गांधीजींनी विचारले. 'हो, या तर माझ्या आईसारख्या वाटतात.' जपानी कवी उत्तरले.

कस्तुरबा माता होती. तिच्या मातृत्वाच्या कक्षा विस्तीर्ण झाल्या होत्या.

१९३७ साल होते. १८ एप्रिल. कर्नाटकातील हुदली गाव. कुमरी आश्रम. इथे महादेवभाईंची धाकटी बहिण निर्मला हिचा विवाह संपन्न झाला. धाकटा भाऊ परमानंद आणि मुलगा नारायण यांचे मौंजीबंधन झाले. मनु म्हणजे गांधीजींची नात (हरीलालची मुलगी) हिचाही विवाह झाला. गांधीजी-कस्तुरबा आणि महादेव-दुर्गा. वधु पक्षाचे माय-तात. सुरेंद्र मश्रुवाला आणि ईश्वरलाल देसाई. दोघे नवरदेव! वर पक्षाकडून हे दोघेच. दोघे एक-एकटेच हजर. दोन्ही विवाह एकाच दिवशी संपन्न झाले होते. यात मित्र व नातलगाना निमंत्रणेही दिली गेली नव्हती. लग्नाचा कार्यक्रम साधेपणाने पार पडला. लग्नाला नगण्य खर्च आला होता.

गांधीजींनी नवविवाहित दंपतींना सल्ला दिला. गांधीजी म्हणाले होते 'मी जेव्हा बांना कामवासनेच्या नजरेने बघणे सोडले तेव्हापासून मला सच्च्या वैवाहिक जीवनाचे सौख्य लाभले हे लक्षात घ्या. संपूर्ण यौवनात असताना निकोप अवस्थेत मी ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा घेतली होती.'[१]

आपल्या वैवाहिक जीवनावरचे हे गांधी-भाष्य! हे अनुभवपूत आहे.

गांधीजींनी अमृत कौरला पत्रातून लिहिले

"देवदासच्या जन्मानंतर मी माझ्यातल्या पशुवर खूप मोठ्या प्रमाणात ताबा मिळवला होता. तीव्र आणि खूप कठोर कार्य पध्दतीने मजवर असा काही भार टाकून दिला होता की कुटुंबाची वृध्दी करण्यासोबत तो भार मला पेलताच आला नसता. अशाप्रकारे निसर्गाने मला मदत केली. बा एक अशी सहधर्मिणी मला लाभली की मला आठवते तसे एकदाही तिने मला लोभाकृष्ट केले नाही हे माझे परम भाग्य होय."[२]

मार्चची अखेर होती. गांधीजी ओरिसात होते. महादेव, कस्तुरबा आणि इतरही सहकारी होते. यासमयी कस्तुरबा, दुर्गा आणि दुर्गाची एक नातेवाईक भगिनी वेलाबेन हे सारे पुरीच्या जगन्नाथ मंदिरात गेले. बातमी गांधीजींना कळली. १९३४ साली गांधीजींना याच देवळाच्या प्रवेशद्वाराशी अपमानास्पद वागणूक मिळाली होती. मंदिरात हरिजनांना प्रवेश नव्हता. तशात यांच्या मंदिर प्रवेशाचे गांधीजींना कळले. त्यांना धक्का बसला. ते अस्वस्थ झाले. त्यांची वेदना वाढत राहिली होती. रात्री झोप आली नाही. सकाळी रक्तदाब वाढला. सारेच हादरले. याचा डेलांग येथील गांधी सेवा संघात गांधीजींनी उल्लेख केला. बैठक ३० मार्च १९३८ रोजी डेलांग येथे संपन्न झाली होती. या सभेचे हे वृत्त "मी अनेक वर्षांपासून कंठशोष करुन हे सांगत आलो आहे. की ज्या देवळात आपले अस्पृश्य बंधू जाऊ शकत नाहीत तिथे आपण जाऊ नये. त्या देवळात का माझी पत्नी, मुलगी वा आई जाऊ शकते? त्यांना समजाऊन सांगण्याचे आपले कर्तव्य आहे. त्या जर आपले म्हणणे मान्य करत नसतील तर माता-पित्यांचाही आपण त्याग करावा. माझा नातू म्हणतो की 'अमृत बजार पत्रिका' ने कस्तुरबाई देवळात गेल्या नव्हत्या असे प्रकाशित केले आहे. त्या बाहेरच थांबल्या होत्या अशी बातमी आहे. असे जर खरोखर घडले असते तर मी आनंदाने उचंबळलो असतो. पन्नास वर्षे माझ्यासोबत गृहस्थाश्रमात असल्यावरही बा देवळात का गेली? आणि त्या दोन महिलाही (दुर्गाबेन व वेलाबेन) का गेल्यात? त्या तर माझ्या मुली आहेत.? हीही माझी चूक आहे. त्यांच्या या कृतीने आपल्या-आमच्या आत्मिक शक्तीचा ऱ्हास झाला आहे."[३]

या घटनेचा गांधीजींनी मनापासून निषेध करत सांगितले होते -

"आपण हरिजनांची फसवणूक करत आहोत. आपण तर मंदिरात जातो. त्यांना प्रवेश निषिध्द

असलेल्या स्थळांचाही उपयोग करत रहातो. एवढे करुनही आपण हरिजनाना 'आपले' म्हणतो हे त्यांनी का म्हणून मान्य करावे? त्यावेळी आपण सर्वांनी, आपल्या माता-पित्यांनी, पती-पत्नींनी, नातलगानी संपूर्णपणे अस्पृश्यतेचा त्याग केला असेल अशी खात्री पटल्यावरच भले होईल."[४]

गांधीजींनी महादेवभाईंना पत्र लिहिले

"बाने तर प्रायश्चित्त घेतले. उपवास करुन नव्हे पण अत्यंत निरलसपणे आपली चूक मान्य केली. अशाप्रकारे आमच्या पंचावन्न वर्षांच्या संबंधाना तिने काल अधिक पवित्र बनवून टाकले."[५]

आपली चूक कस्तुरबाने मान्य केली होती. या चुकीसाठी प्रायश्चित्तही घेतले होते. गांधीजींच्या जीवनाचे वळण, त्याग, वैराग्य, संन्यासाच्या दिशेने वेगाने मार्गक्रमण करत होते. कस्तुरबाने त्या वळणाला-प्रवाहाला अनुकूल आणि इष्ट मार्गाने प्रवाहित होऊ दिले. काही अडसर निर्माण केला नाही. स्वत: त्या वळणाचा आत्मीयतेने स्वीकार केला होता.

संदर्भ

१) 'हरीजन' दिनांक २४ एप्रिल १९३७ आणि 'हरीजन बंधू' दिनांक २५ एप्रिल १९३७ आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६५ पृष्ठ १२०;

२) गांधीजींनी अमृत कौरला दिनांक २६ जून १९३७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६५ पृष्ठ ३७१;

३) गांधी सेवा संघाचे चतुर्थ वार्षिक अधिवेशन (डेलांग-ओरिसा) चे प्रकाशित विवरण पृष्ठ ६५ ते ६७ आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६६ पृष्ठ ४९५;

४) 'हरिजन बंधू' मध्ये दिनांक ११ एप्रिल १९३८ रोजी प्रकाशित श्री महादेवभाई देसाई यांच्या लेखाचा सारांश पृष्ठ ३६ - ३७;

५) कित्ता

❖❖❖

## १४) अहिंसा गुरु

हिंदी साहित्य संमेलनाच्या महिला परिषदेत कस्तुरबाने अध्यक्षपद भूषवले. एस्. श्रीनिवास यांच्या एस्. जम्बुजम्माल या कन्येने परिषदेचे आयोजन केले होते[१]

जून १९३७ साली विश्रांती घ्यायला गांधीजी बलसाड नजिकच्या तिथल गावी थांबले होते. केलेनबॅक भारतात आले होते. पहाटे चार वाजता कस्तुरबा आणि महादेवभाई त्यांच्या स्वागतासाठी स्टेशनवर गेले होते.

६ ते ९ ऑक्टोबर पर्यंत गांधीजी अब्दुल गफार खान यांचे अतिथी होते. खुदाई खिदमतगारांना भेटले होते. हूंगू येथे खुदाई खिदमतगार यांच्याशी बोलताना गांधीजी म्हणाले - "मी माझ्या पत्नीवर सारा राग ओतून द्यायचो. ती कुठल्याही प्रकारे तक्रार न करता तो सारा राग सहन करुन घ्यायची. मी तिचा स्वामी असल्यामुळे माझे आज्ञापालन करणे तिचे कर्तव्य आहे. असे मी समजून चालायचो. तिच्या विनयाने माझे डोळे उघडले. तिच्यावर माझा कुठलाही शाश्वत अधिकार नाही हे मला अनुभवायला आले. तिने माझे आज्ञापालन करावे असे जर मला वाटत असेल तर मी तिला सारे शांततापूर्वक समजावून सांगायला हवे. अशा प्रकारे ती मला अहिंसा शिकवणारी शिक्षिका बनून गेली. माझ्या आयुष्यात तिच्याहून अधिक निष्ठासंपन्न आणि विश्वासू मित्र दुसरा कुणी लाभला असे मी मानत नाही. मी तिच्या आयुष्याचा नरक बनवत होतो. .. . .. .. तिचे पालनपोषण एका संस्कार संपन्न कट्टर वैष्णव कुटुंबात झाले. तिथे स्पृश्यास्पृश्यतेची भावना होती. आमच्या घरी बहुधा मुसलमान आणि हरीजन येत-जात असत. तिची स्वाभाविक अनिच्छा असतानाही मी तिच्याकडून त्यांचे आगत-स्वागत करवुन घ्यायचो. तिने कधी 'ना' म्हटले नाही. ती तथाकथित प्रचलित अर्थाने शिक्षित नव्हती. ती साधी-भोळी होती. तिच्या निश्च्छल सरळतेने मला जिंकून घेतले."[२]

गांधीजी जनसामान्यांशी संवाद करताहेत. ईसाई मिशनरी यांच्याशी बोलताना गांधीजी म्हणाले होते:

"मी माझ्या पत्नीला माझ्या इच्छेपुढे मान तुकवायला लावायचा प्रयत्न करायचो. यातून मी तिच्या कडून अहिंसेचा पाठ शिकलो. ती एकीकडे माझ्या इच्छेचा दृढतेने प्रतिकार करायची तर दुसरीकडे माझ्या मूर्खपणामुळे तिला होणाऱ्या यातना शांतचित्ताने सहन करायची. मी तिच्यावर हुकूमत करायला जन्म घेतला आहे. या माझ्या मूर्खतायुक्त धारणेपासून मला मुक्ती मिळाली. अर्थात् ती माझ्या अहिंसा पालनाची गुरु बनली."[३]

गांधीजींनी ऑक्टोबर महिन्यात कस्तुरबाना चार पत्रे लिहिली आहेत. यातून ऋतुंचा परिचय करुन दिला आहे. नातवंडांची खुशाली जाणून घेतली आहे. खुशाली लिहायला सांगितली आहे. ते कस्तुरबाच्या तब्येतीविषयी खूप काळजीत असल्याचे लिहिले आहे. तब्येतीविषयी जाणून घ्यायला उत्सुक आहेत. आपल्या तब्येतीविषयी सुखकर समाचार दिले आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्याने वागायची सुचना देताहेत. कस्तुरबाच्या बरे होण्यात सर्वांची चिंतामुक्ती असल्याची जाणीव करुन देताहेत. कस्तुरबाच्या रागावण्यामुळे ते खूप चिंतेत पडले आहेत. त्यांच्यापुढे कर्तव्य आणि भावना अशी दोन टोके आहेत. कस्तुरबाचा निरोप घेताना गांधीजींना सारखी कर्तव्याची हाक येत असायची. या दरम्यान त्यांना कर्तव्यपूर्तीच्या दिशेने अग्रक्रम द्यावा लागत होता. लगेचच तिसऱ्या दिवशी गांधीजींनी कस्तुरबाना लिहिले की केवळ नऊ दिवसांनी त्यांची भेट होणार आहे. 'भेटलो की लगेचच सेवाग्रामकडे निघू या' असेही लिहिले आहे. कस्तुरबाचा निरोप घेताना गांधीजी तिच्या मस्तकावर हात ठेवायला विसरुन गेले होते. याचा उल्लेख करत ते म्हणतात की एका विशिष्ट अवस्थेतल्या परिपक्वतेनंतर बाह्य निशाणींची का कधी गरज उरते बरे? प्रेमाचे प्रदर्शन झाले नाही म्हणजे का प्रेम सुकून गेले असे मानावे? गांधीजी कस्तुरबाला केवळ मातीची पुतळी मानत नव्हते. चैतन्याची पुतळी मानत होते. आपल्या प्रेमाच्या अधिकाधिक निर्मळ होत जाण्याकडे ते कस्तुरबाचे लक्ष वेधून घेतात. तिला जर इतरांप्रमाणे बाह्य निशाणीची गरजच असेल तर तेही करायला ते तयार आहेत. 'आता तुझी तब्येत सुधारली असल्यामुळे मी तुला लिहायचा

कंटाळा करतो. या दरम्यान मी दौऱ्यावर आहे. यामुळे पत्र लिहायला वेळ मिळणेही खूप अवघड होऊन बसले आहे. पण तुला तर पत्र लिहवून घेतलेच पाहिजे.' असे कळवत इकडचे सारे कुशल-क्षेम असल्याची बातमी देताहेत.[४]

आपल्या पत्नीचा जाहीरपणे गौरव करण्याचे त्या काळातील हे विरळ उदाहरण आहे. आपल्या उणिवा न झाकण्याचा गांधीजींचा स्वभाव तर त्यांच्या लेखनात सर्वत्र आढळतो. या सोबत आपल्या पत्नीच्या सार्वजनिक ठिकाणी सन्मानपूर्वक उल्लेख केला असल्याचीही उदाहरणे आहेत. त्यातली काही उदाहरणे चित्तवेधक वाटावीत अशी आहेत.

जिथे जिथे गरज भासली तिथे-तिथे, त्या त्या वेळी नम्र सूचना करुन कस्तुरबाने बांध घातला होता. सविनय प्रतिकार केला होता. इष्ट अडथळे उभे केले होते. प्रवाहाला अनिष्ट वा प्रतिकूल दिशेने प्रवाहित होण्यापासून रोखले होते. सदैव योग्य दिशेने प्रवहमान राखले होते. कस्तुरबाने नम्रतेने समजाऊन सांगितले होते. सौम्य आग्रह धरला होता. कधी निरुपाय झाला तर अश्रुंची भाषाही वापरली होती. गांधीजींना ना कठोर बनू दिले ना कर्कश. अगदी जुलूमी जालीम बनण्यापासूनही रोखले होते. त्यांना प्रेमळ आणि रसार्द्र राखले होते. कस्तुरबाचे हे कौशल्य आहे.

संदर्भ


१) गांधीजींचे अमृत कौर यांना दिनांक ३० मार्च १९३७ रोजी रेल्वेतून लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६५ पृष्ठ ४३;

२) गांधीजींनी खुदाई खिदमतगारांशी कोहाट हूंगू येथे दिनांक २२ / २३ ऑक्टोबर १९३८ रोजी बातचीत केली त्याचा सारांश, 'ए पिलग्रिमेज फॉर पीस' हा ग्रंथ पृष्ठ ८७-९१ आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६८ पृष्ठ ४४ ते ४७ व ५०;

३) गांधीजींनी ईसाई मिशनरी यांच्याशी दिनांक १२ डिसेंबर १९३८ वा त्यापूर्वी केलेली बातचीत;

४) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ७ ऑक्टोबर १९३८ रोजी , दिनांक १२ ऑक्टोबर १९३८ रोजी, दिनांक १३ ऑक्टोबर १९३८ रोजी, पेशावरहून दिनांक १५ ऑक्टोबर १९३८ रोजी, दिनांक १८ ऑक्टोबर १९३८ रोजी, बन्नूहून दिनांक २५ ऑक्टोबर १९३८ रोजी लिहिलेली पत्रे.


❖❖❖

## १५) समरांगणी बिजली तळपली

स्वातंत्र्यापूर्वीचा हिंदुस्तानचा नकाशा काळजीपूर्वक बघण्यासारखा आहे. अभ्यासण्यासारखा आहे. ब्रिटिश सल्तनतीखालील प्रांतांशिवाय अदमासे सहाशे ठिपके देशी राज्यांचे दिसतात. १९३८ साली गुजरातेतील तापी नदीच्या काठावर हरिपूरा येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. नेताजी सुभाषबाबू अध्यक्ष होते. या अधिवेशनात देशी राज्यांच्या संदर्भात एक महत्वाचा प्रस्ताव मंजूर झाला. याचा आशय असा होता की देशी राज्यांमध्ये सुध्दा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य असायला हवे. देशी राज्ये या देशाचा अविभाज्य भाग आहेत.

१९३८ साली संपूर्ण देशात संस्थानिकांच्या लहरी राजवटीविरुध्द उठाव होऊ लागले होते. राजकोटमध्ये सत्याग्रहींची धरपकड होऊ लागली होती. त्यांच्यावर विविध प्रकारची जुलूम-जबरदस्ती सुरु होती. या सत्याग्रहात भगिनीही सामील झाल्यात. राजकोटचे राजे ठाकूर हे अन्यायी होते. विशेषत: महिलांवरील अत्याचारांविषयी कुख्यात होते. राजकोटमधील महिला संतापल्यात. राजकीय सुधारणांसाठी चळवळ सुरु होती. अहिंसक सत्याग्रह झाला. त्यात त्या पुढे सरसावल्यात. त्या स्वत:ला अटक करवुन घेणार होत्या. ही बातमी सेवाग्रामला पोहोचली. महिला चवताळल्या. कस्तुरबा तर फारच चिडून गेली.

१९३९ साल उजाडले. सरदार राजकोटला गेले होते. हे वृत्त कस्तुरबाने वृत्तपत्रामधून जाणले. राजकोट तर तिची मायभूमी होती. तिचा निश्चय ठरला होता. २६ जानेवारी १९३९ रोजी राजकोटचा लढा सुरु झाला. या लढ्याला आठच दिवस लोटलेत. राजकोटला जाऊन तिथल्या सत्याग्रहात भाग घ्यायचे तिने ठरवले. गांधीजींनी थांबवले. सरदारने अडवले. तिने कुणाचा सल्ला मानला नाही. प्रतिबंध नाकारला. ती तडक राजकोट सत्याग्रहात दाखल झाली. सरकारने तिला अटक केली. तिच्या समवेत मृदुलाताई साराभाई (अंबालाल साराभाई यांच्या कन्या) होत्या. मणि ताई पटेल (सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कन्या) होत्या. त्या तिघींचे अपार सैन्यदळ होते. देवदास आईला भेटायला राजकोटला गेला होता. तिथली अवस्था बघून त्याचे डोळे भरुन आले. कस्तुरबाने मात्र कधी चुकून उल्लेखही केला नव्हता. या वेदनांचा कधी पाढा वाचला नव्हता.

३ फेब्रुवारी रोजी कस्तुरबा आणि मणीताई निघाल्यात. ४ फेब्रुवारी १९३९ रोजी दुपारी दोन वाजता राजकोट स्टेशनवर उतरल्यात. त्या शहरात दाखल होत होत्या. त्यांच्यावर दोन महिने शहरात दाखल न होण्याचा मनाई हुकूम बजावण्यात आला. या हुकूमाला कस्तुरबाने केराची पाटी दाखवली. तिला अटक करण्यात आली. सणोसरा येथील दरबारगढ येथे नजरकैदेत ठेवण्यात आले. या दरम्यान तिची तब्येत खूपच खराब होती. तिथे तिला खूप त्रास झाला. ११ फेब्रुवारी रोजी तिला त्रंबा येथील राजमहालात हलवण्यात आले. मणी ताईची रवानगीही तिथे करण्यात आली होती.

गांधीजींनी लिहिले, "लोकांच्या हाल अपेष्टा आणि छळणूक याबद्दल कस्तुरला फार काळजी वाटते. जरी ती माझ्याइतकीच वृध्द असली आणि अशा कठिण परिस्थितीतून जाण्यास कमी कार्यक्षम असली तरी तिला राजकोटला जावेसे वाटते. किंबहुना हा अंक प्रसिध्द होण्यापूर्वी ती तिकडे रवानाही झाली असेल."[१]

गांधीजींनी एका लेखातून मांडले आहे

"राजकोट संघर्षात माझी वैयक्तिक आवड आहे. तिथेच मी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मिळवले. अनेक वर्षे माझे वडील तिथले दिवाण होते. तिथल्या लोकांना ज्या तमाम अडी-अडचणींचा सामना करावा लागला त्यांना माझी पत्नी अधिक तीव्रतेने अनुभवू शकते. ती माझ्याप्रमाणेच वृध्द आहे. तुरुंगवासातील कष्ट व त्रासांना शौर्याने सहन करण्यात माझ्यापेक्षा कमी समर्थ असूनही तिला असे वाटते की राजकोटला जायला हवे आणि कदाचित वाचकांच्या हाती हा लेख पोहोचण्यापूर्वीच ती तिथे पोहोचलेली असेल.[२]

कस्तुरबा राजकोट चळवळीत सामील झाली. या संदर्भात टिकेची झोड उठली. 'गांधीजींनी एका अशिक्षित महिलेला नवरेपणाचा अधिकार वापरून लढतीसाठी पाठवले.' हा टीकेचा मुख्य सूर होता. गांधीजींनी 'कस्तुर गांधीच का?' या शीर्षकाने लिहिले.

“राजकोट चळवळीत माझी पत्नी सहभागी झाली. याविषयी खरे तर काही लिहावे-बोलावे असा माझा विचार नव्हता. या बाबतीत निष्ठुर टीका माझ्या वाचनात आल्यामुळे मला हे लिहावे लागत आहे. ती सहभागी होईल असे मला कदापि वाटले नव्हते. खरे तर सविनय भंग हे जोखिमीचे काम आहे. ते झेलायचे तिचे आज वय नाही. तिचे शरीर झिजले आहे. आपला निर्णय घ्यायला ती पूर्णपणे स्वतंत्र आहे. आपली कार्य योजना ठरवायचे तिला संपूर्ण अधिकार आहेत. ती आपल्या अंत:प्रेरणेने चळवळीत सहभागी झाली आहे. मणीताईला अटक झाल्याचे जेव्हा तिला कळले तेव्हा तिच्याने राहवले नाही गेले. तिने माझ्यापाशी मागणी केली. मी तिच्या अशक्तपणाचा मुद्दा मांडला. ती काही दिवसांपूर्वी दिल्ली येथे स्नानगृहात बेशुध्द होऊन पडली होती. माझ्या मुलाने जर थोडी काळजी घेतली नसती तर ती अनंताच्या प्रवासाला निघून गेली असती. हे सारे मी तिला सांगितले होते. तिने सारे शांतपणे ऐकून घेतले. ‘ही चर्चा काही करु नका. मला परवानगी द्या.’ असे ती म्हणाली. ती राजकोटची कन्या आहे. मी किंवा ती तटस्थ कसे काय राहू शकतो?”

“माझ्या पत्नीची तीव्र इच्छा आहे. ती जरी माझ्याइतकीच वृध्द आहे. आणि तुरुंगात भोगाव्या लागणाऱ्या अपेष्टांना तोंड देऊ शकेल इतकी ठणठणीत नाही तरी राजकोटला गेलेच पाहिजे असे तिला वाटते. ही तिच्या अंतरीची हाक आहे. राज्यातील स्त्री-पुरुषांच्या स्वातंत्र्यासाठी राजकोटच्या मुली जिवाचे रान करत असताना ती शांत बसणे शक्यच नव्हते. माझ्या आणि माझ्या पत्नीच्या आयुष्यात राजकोटचे स्थान गौण नाही.”

“राजकोटशी असलेले माझे जुने-पुराणे संबंध वाचकांनी लक्षात घ्यावे. कस्तुर ही राजकोटची कन्या आहे. हे लक्षात ठेवावे. भारताच्या नकाशावरचे हे बिनमहत्वाचे ठिकाण आहे., यात शंका नाही पण मी आणि माझी पत्नी यांच्या दृष्टिने ते बिनमहत्वाचे नाही. स्वातंत्र्यासाठी चालू असलेल्या लढ्याचा पुढचा टप्पा राजकोटचा लढा होईल. आज नाही पण उद्या जेव्हा तो यशस्वी होईल तेव्हा कस्तुरचा त्यातील सहभाग मोलाचा गणला जाईल. सत्याग्रह हा शरीराने जे कमकुवत आणि म्हातारे झाले असतील पण ज्यांचे हृदय खंबीर आहे. अशांनी भाग घ्यावा असा लढा आहे.”[३]

या लेखातून कस्तुरबाची शारीरिक-मानसिक अवस्था कळते. राजकोटचे महात्म्य कळते. स्वातंत्र्य लढ्याचा भविष्यदर्शी आलेख वाचता येतो. हे तर सारे खरेच आहे. यासोबत आणखी एक मुद्दा महत्वाचा आहे. ‘बायको म्हणजे पायातली वहाण. ती पायातच ठेवावी, डोक्यावर घेऊ नये.’ असे मानणारा तो काळ आहे. त्या काळात गांधीजींनी कस्तुरबाना आदर द्यावा. तोही जाहीरपणे द्यावा. हा प्रकार खचितच नवलाईचा ठरला असणार! यातून कस्तुरबाचे महात्म्य विविध कोणांमधून व्यक्त होते.

कस्तुरबाचे आता वय झाले होते. ती आंतरिक भावनेने या लढाईत सामील झाली होती. तिची तब्येत बरी नव्हती. तिने शरीराची काळजी वाहिली नाही. तुरुंगवास भोगला. तिला ‘ए’ वर्ग मिळाला होता. याच तुरुंगात एक युवती कैदी आली. तिला ‘सी’ वर्गात राखले. कस्तुरबाने आपले जेवण तिला दिले. तुरुंगात ती नियमितपणे चरखा चालवायची. तिथले हवामान खूप वाईट होते. तिने कधी तक्रार केली नाही. तिला एका डाक बंगल्यात ठेवले. तिच्यासोबत मणीताई, मृदुलाताई होत्या. या काळातल्या आपल्या पत्रांमधून आपल्या अडचणींबाबत तिने चकार शब्दही काढला नाही. ती रामदास व गांधीजींच्या तब्येतीची काळजी करत होती. गांधीजी तिला तिथे जाऊन भेटले. ती कोमेजून गेली होती. ती गांधीजींपासून इतक्या दिवसपर्यंत लांब राहू शकत नव्हती. तिचे तन आणि मन हे सहन करु शकत नव्हते.

त्रंबा येथील बंगल्यात तिला एक आठवडाभर एकट्याने डांबून ठेवण्यात आले होते. ठाकूरचा विचार तिचे मानसिक खच्चीकरण करायचा होता. कस्तुरबा अविचलित राहिली. तिने कुठलीही तक्रार केली नाही. या दरम्यान तिच्या अटकेचे वर्तमान राजकोटमध्ये पसरले. निषेधाचा वेग अतिशय तीव्र झाला. आता ठाकूरना तिच्या अटकेविषयी पुनर्विचार करणे भाग पडले होते. एकाकी बंदीवासातून तिची मुक्तता करण्यात आली. राजकोट तुरुंगात ठेवण्यात आलेल्या मणीताई पटेल व मृदुलाताई साराभाई यांना तिच्या सोबत ठेवण्यात आले.

बंगल्याभोवती कडक पहारा होता. तिघींना आपापली पत्रे मिळू शकतील अशी सोय होती.

या दरम्यान गांधीजींनी जवळपास रोजच कस्तुरबाना पत्रे लिहिली आहेत. या पत्रांचे स्वरुप मोठेच मनोज्ञ आहे. यात अनेकरंगी चित्रण आहे. ऊन-सावल्यांचा खेळ आहे. गांधीजी २ फेब्रुवारी रोजी लिहिलेल्या आपल्या पत्रातून काळजी न करण्याविषयी सुचवतात. यातून तब्येतीला जपायचा सल्ला देतात. त्यांनी रामनाम स्मरण करायची दीक्षा दिली आहे. अनेकांच्या पुण्याईने निश्चितपणे लाभणाऱ्या या विजयात कस्तुरबाचाही वाटा असल्याचे ते सांगतात. ८ फेब्रुवारी रोजी लिहितात की त्यांना कस्तुरबाला होत असलेल्या त्रासाची पूर्ण कल्पना आहे. ती जणू काही दु:ख सोसायलाच जन्माला आली आहे. असे कळवतात. ईश्वर आपल्यासोबत असल्याचे रहस्य सांगतात. तिच्या सोबत मणीताईचे असणे ही एक खूपच दिलासा देणारी गोष्ट असल्याचे लिहितात. ९ फेब्रुवारी रोजी लिहितात की तिचे आजारी असणे काही त्यांना आवडलेले नाही. हिंमतीने कार्य करायला हवे. सोई उपलब्ध असतील किंवा नसतीलही. त्याचा काही विचार करु नये. राम आणि सीतेच्या दु:खाच्या तुलनेत आपल्या उभयतांच्या दु:खाची गणनाच काय? असे सांगून काळजी न करायचा सल्ला ते देतात. ११ फेब्रुवारी रोजी लिहितात की त्यांचे स्थलांतर झाल्याचे वृत्त वृत्तपत्रातून वाचले. कुठे का राखेनात. आपण निश्चिंत मनाने रहावे. काळजी करु नये. त्या जिथे असशील तिथे ईश्वर तर त्यांच्या सोबत आहेच. हा विश्वास जागवताहेत. आपल्या तब्येतीचे वृत्त कळवताहेत. १२ फेब्रुवारी रोजीच्या पत्रातून सारी चिंता सोडायला सांगताहेत. कुठली औषधे लागणार आहेत. ते विचारुन कुठली औषधे पाठवून देण्याची गरज आहे. ते विचारताहेत. नियमितपणे औषधे घ्यायचा सल्ला देताहेत. हिंमत बाळगायला लावताहेत. १३ फेब्रुवारी रोजी लगेचच कळवताहेत की आता तर कस्तुरबाला एकट्याने रहायचा चांगला अनुभव आलेला आहे. पुढच्याच वाक्यात आपले म्हणणे बदलून ते लिहितात की कस्तुरबा मुळी एकटी आहे.च कुठे? रामराया तर सदैव तिच्यासोबत आहेत.च ना? आणि जिथे रामराया असेल तिथे दुसरा कुणी असो वा नसो काय बरे फरक पडतो? १६ फेब्रुवारी रोजी लिहिलेले पत्र कस्तुरबाला हिंमत देणारे आहे. यातून अडचणी येतील असा संकेत आहे. सर्वच परीक्षांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल असा विश्वास आहे. दिशानिर्देशनही आहे. हे आशावाद जागवणारे पत्र आहे. १६ फेब्रुवारीच्या पत्रातून केलेनबॅक यांच्या चांगल्या तब्येतीची बातमी ते देताहेत. केलेनबॅक हे दक्षिण आफ्रिकेपासूनचे मित्र आहेत. खुद्द कस्तुरबाच्या मनातही त्यांच्या संदर्भात आदरभाव आहे. दुसरी चांगली बातमी कानन मजेत असल्याची आहे. अलिकडे तो गांधीजींच्याच सोबत जेवतो. त्यांच्याच सोबत दुपारी झोपतोसुध्दा. ही तर कस्तुरबाला खूपच आश्वस्त करणारी खबर आहे. पत्राच्या अव्यवस्थेविषयी चिंता तर त्यांच्या मनात आहेच. आपली काळजी न घेण्याचा संकेत ते देताहेत. १८ फेब्रुवारी रोजी लिहिलेल्या पत्रात ते अनेक संदर्भांची उकल करतात. आपल्या वा आपल्या तब्येतीच्या काळजीपासून कस्तुरबाला मुक्त करतात. संघर्षाच्या नव्या वाटा दाखवतात. या वाटांना समर्पणाचा संदर्भ जोडतात. आपल्या वियोगाला योग करुन टाकताना दिसतात. गांधीजी आपल्या वियोगाचा योग सिध्द करायची एक किमया या पत्रातून सांगताना दिसतात. २० फेब्रुवारीचे पत्र हे एका अर्थाने अपूर्ण पत्र आहे. घाईघाईत नव्हे पण कामांच्या दाटीमुळे अपूर्ण ठेवावे लागलेले हे पत्र आहे. २१ फेब्रुवारीच्या पत्रातूनही पत्र न पोहोचण्याविषयक चिंता आहे. आपण स्वत: तपास करायचे आश्वासन आहे. तब्येतीकडे लक्ष पुरवण्याची सुचना आहे. सुशीलाच्या आहाराविषयी आपण स्वत: लक्ष न घालू शकण्याची कबूली आणि काहीशी खंतही आहे. २३ फेब्रुवारीच्या पत्रातून आपल्याकडे चिंता करण्यासारखे काही कारण नाही असे कळवत आहेत. तिकडून मात्र प्रत्येक खबर मिळवण्याची काळजी आहे. २४ फेब्रुवारीच्या पत्रातून कस्तुरबाकडून धैर्य आणि हिंमतीची अपेक्षा ठेवली आहे.

या काळातील भक्ती कशी विशिष्ट होती. हा कसा दिवाणा प्रेमपत्र व्यवहार? उत्कट श्रध्देने लिहिलेली ही पत्रे. असे प्रेम दुर्लभ! असे समर्पण विरळ!!

२० फेब्रुवारी १९३९. 'हिंदू' च्या प्रतिनिधीशी गांधीजी बोलत होते. म्हणाले:

'मी त्रंबा येथे गेलो. तिथे कस्तुरबा, मृदुलाताई, मणीताई यांना भेटलो. तिथेच मी भोजन घेतले.'[४]

राजकोटची चळवळ सुरु झाली होती. यात प्रत्यक्ष भाग घेण्याचा गांधीजींचा काही विचार नव्हता. ठाकूरांना भेटण्याचा विचार होता. परिस्थिती पूर्णपणे जाणून घ्यायची इच्छा होती. ठाकूराना समजावून सांगण्याचाही विचार होता. ठाकूर यांनी वचनांचे पालन केले नव्हते. कैद्यांना योग्य ती वागणूक दिली नव्हती. या कैद्यांनी उपोषण सुरु केले असल्याचेही गांधीजींना कळले होते.

२८ फेब्रुवारी १९३९ रोजी गांधीजी राजकोट येथे दाखल झाले. ते राष्ट्रीय शाळेत थांबले होते. त्यांनी सत्याग्रही कैद्यांची भेट घेतली. त्यांच्यावर झालेल्या जुलूम-अत्याचारांची माहिती मिळवली. दरबार वीरावाला आणि अन्य अंमलदारांची भेट घेतली. वीरावाला यांनी गांधीजींचे म्हणणे नाकारले. गांधीजींनी त्यांच्याशी वितंडवाद करणे टाळले. २८ फेब्रुवारी व १ मार्च असे दोन दिवस निष्फळ चर्चेत वाया गेले. डॉ. सुशीलाताई, विजयाताई आणि नारणदास गांधी सारे कस्तुरबाला भेटले. त्यावेळी ती खूप चिंतातुर होती.

३ मार्च १९३९ पर्यंत सरकारकडून कुठलाही खुलासा आला नाही. ठरल्याप्रमाणे गांधीजींच्या उपोषणाला सुरुवात झाली. संपूर्ण देशभरात खळबळ माजली. गांधीजींनी उपोषणाला आरंभ केला. ठाकुरांनी आपल्या प्रतिज्ञेचे पालन करावे. समितीत सरदार पटेल यांनी सुचवलेल्या नावांचा अंतर्भाव करण्यात यावा. सत्याग्रहींची मुक्तता करावी. दंड माफ करण्यात यावा. वसूल केलेल्या दंडाची रक्कम परत देण्यात यावी. या गांधीजींच्या मागण्या होत्या. गांधीजींनी पत्र लिहिले होते. 'उद्या दुपारी बारा वाजेपर्यंत या मागण्यांचे पालन करण्यात आले नाही तर मागण्या पूर्ण होईपर्यंत त्यांचे उपोषण कायम राहील.'

कस्तुरबाने ४ मार्च रोजी एक हृदयद्रावक पत्र लिहिले. उपोषण सुरु होण्यापूर्वी आपल्याला काहीही न कळवल्याबाबत ठपका दिला. कस्तुरबा त्रंबा येथे नजरकैदेत आहे. तिला गांधीजींनी एक चिठ्ठी पाठवली ती अशी

'तुम्ही साऱ्या शांत आणि व्यवस्थित असाल, अशी मी आशा करतो. तुम्ही जर तिथे शांततेने राहू शकत नसाल तर माझ्याकडे येऊ शकता.'[५]

या संदर्भात गांधीजींनी कस्तुरबाला लिहिले होते.

"तू निष्कारण काळजी करतेस. उपोषण सुरु करण्यापूर्वी मी तुझ्याशी वा अन्य कुणाशी कशी काय चर्चा करु शकतो? हे उपोषण करावे लागणार आहे. हे मी तरी कुठे जाणत होतो? ईश्वराची हाक आली आणि ती ऐकण्याशिवाय मजपाशी तरी दुसरा कुठला उपाय उरला होता बरे? अखेरचे बोलावणे येणार आहे. आणि ते कधीतरी येणारच आहे. ना? त्यावेळीसुध्दा तुला वा कुणाला विचारण्यासाठी थांबता येणार आहे. होय?"[६]

या पत्रव्यवहारातून गांधीजींना कस्तुरबाविषयक वाटत असलेल्या काळजीचे उत्कट दर्शन घडते. या एकाकी तुरुंगवासात कस्तुरबा दोन ते तीन वेळा बेशुध्द पडल्या होत्या.

राजकोटला चळवळ सुरु होती. गांधीजींनी उपवास सुरु केले. कस्तुरबाची सुटका झाली होती. तिने स्वयंपाकघरात सूचना केली.

'उपवास सुरु असेपर्यंत मी फक्त एकदा जेवण घेणार आहे. जेवण म्हणजे अन्न नाही, केवळ फलाहार.' कस्तुरबाची सूचना होती.

महादेवभाई लिहितात, "गांधीजींची वृध्द, निरक्षर पण प्रभु-परायण थोरली बहिण त्यांच्या या निर्णयामुळे खूप अशांत होऊन गेली होती. गांधीजी हारलेत हे कुणाकडून ऐकून ती खूप चिंतित झाली होती. ही बातमी ऐकून कस्तुरबांनाही खूप धक्का बसला. कदाचित त्यांची भावनाही वृध्द भगिनी सारखीच झाली होती. गांधीजींनी बहिणीला दिलासा देण्याविषयी अनुरोध केला."

गांधीजींनी १८ मे १९३९ रोजी कस्तुरबाशी पुढीलप्रमाणे चर्चा केली.

'पण ताईंना माझ्या वतीने तू का समजाऊन सांगत नाहीस?' गांधीजींनी हसत-हसत विचारले.

'मी हो कशी समजावून सांगू? मी तर स्वत:ही समजू शकत नाही.' कस्तुरबाचा अगतिक स्वर जागला.

'पण तुला तर समजायलाच हवे. तुला ती घडी आठवते ना?' गांधीजींनी विचारले.

'कुठली घडी हो? ' कस्तुरबाने विचारले.

'दक्षिण आफ्रिकेत तू मृत्युशय्येवर पडली होतीस. डॉक्टरांनी तू कोंबडीच्या सूपाशिवाय जगू शकणार नाहीस असे सांगितले होते.' आठवते ना? गांधीजींना विचारले.

'आठवते तर.' कस्तुरबा म्हणाली.

'आठवते तर हेही आठवते ना? मी तुला जे योग्य वाटेल ते कर असे करण्याची सूट दिली होती. ' गांधीजी म्हणाले. 'होय, आपण तसे म्हणाला होतात.' कस्तुरबा म्हणाल्या. 'तरी तू म्हणाली होतीस की मला मरण आले तरी बेहत्तर पण मी तसले सूप घेणार नाही.' गांधीजींनी आठवण करुन दिली.

'होय, मला हेही आठवत आहे.' कस्तुरबा म्हणाली.

'त्याचे कारण होते तुझी परमेश्वराप्रती दृढ श्रध्दा. त्याची इच्छा असेल तर तो वाचवून घेईल. हे तू जाणत होतीस. मांसाला स्पर्श न करण्याचा आपल्या प्रतिज्ञेचा भंग करुन तू जगायला तयार नव्हतीस.' गांधीजी म्हणाले.

'होय, असेच होते.' कस्तुरबा म्हणाली.

'याचप्रमाणे जोवर ठाकूर साहेब आणि दरबार वीरावाला यांची ह्रदये द्रवित होणार नाहीत आणि ते येऊन मला उपवास थांबवायला सांगत नाहीत, आम्ही आमचे वचन पूर्ण करु-असे म्हणत नाहीत तोवर मला उपवास करत रहायला हवे होते.' गांधीजींचा दृढ निश्चय प्रकट झाला.

'हे खरे आहे. पण .. .. . 'कस्तुरबा म्हणाली. 'असे करण्याऐवजी मी डगमगून गेलो, ब्रिटिश सरकारची मदत घ्यायला हवी अन्यथा कदाचित मला माझे प्राण गमवावे लागतील असे माझ्या मनात आले तर ते पाप होते आणि हा निर्णय मी पापाने प्रेरित होऊन घेतला आहे. यासाठी पापाच्या फळाला तर मला त्यागून द्यायलाच हवे.' गांधीजींनी आपली भूमिका मांडली.

'पण ठाकूर साहेब आणि वीरावाला तर मार्गात विघ्न उपस्थित करत आहेत. त्यांनी जर असे केले नाही तर निर्णयावर योग्य अंमल होईल आणि संपूर्ण तंटा मिटून जाईल. हे लोक असे उत्पाती आहेत.' कस्तुरबा म्हणाली.

'उत्पाती तर आहेत.च पण हा माझ्या आरंभिक चूकीचा परिणाम आहे. त्यांनी मला त्यांच्याकडून कुठल्या भल्या व्यवहाराची आशा करायचा हक्क उरु दिला नाही. विघ्न ते उपस्थित करत नाहीत, त्यांच्या माध्यमातून ईश्वर विघ्न आणत आहे. पण यासोबतच ईश्वरानेच माझे डोळे उघडून दिले आहेत. आणि त्यानेच मला मार्ग दाखवला आहे. यामुळे मी या पापातून जितक्या लवकर मुक्त होईन तेवढेच भले आहे. असे तुला नाही का वाटत?' गांधीजींनी सांगितले.

'होय, वाटत तर आहे. पण दमनकारी अध्यादेशांचे आणि दंड वगैरेंचे काय होईल? आपण तर सारे काही सोडून दिले आहे. आणि त्यांचा तर तोच जुना दृष्टिकोण आहे.' कस्तुरबाच्या आवाजात चिंता होती.

'याने काय बिघडते? आपण तर आपल्या धर्माचे पालन करायचे आहे. आणि ते आपल्या धर्माचे पालन करतील असा विश्वास बाळगायचा आहे. मी कर्तव्याचरणात चूक केली आणि आपल्या उपवासाचा फायदा उठवायला वा उपवास लवकर थांबवायला अधीर होऊन गेलो आणि यामुळे ईश्वराने मला दंडित केले असे तू का नाही समजत-समजून घेत. मी पराभूत झालेलो नाही. ताईंना समजाऊन सांग की चूक स्वीकार करण्यात कुठलाही दोष नाही, या उलट चूक स्वीकार करण्यात आपोआपच विजय आहे." गांधीजीनी आपला विचार सांगितला.[७]

गांधीजींच्या उपोषणाचा काही उपयोग झाला नाही. व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी गांधीजींना विनंती करणारे पत्र लिहिले. ते ब्रिटिश रेजिडेंट गिब्सन यांच्या मार्फत पाठवले. उपोषण थांबवायचे आवाहन केले. आपल्या भेटीसाठी दिल्लीला बोलावले. ५ मार्च रोजी कस्तुरबाची सुटका झाली. ७ मार्च रोजी तडजोड झाली. निषेध आंदोलनात सामील झालेल्या सर्वांना ठाकूर यांनी माफी दिली. राजकीय सुधार समिती स्थापन करण्यास संमती दिली. गांधीजींनी मग उपोषण सोडले.

महिला सत्याग्रहींची सुटका झाली. कस्तुरबा गांधीजींच्या भेटीला आली. कस्तुरबा एकटी आली होती. गांधीजी व कस्तुरबा यांच्यात पुढील संवाद झाला.

'आणि मणी व मृदुला कुठे आहेत.?' गांधीजींनी विचारले.

'अग बाई, त्या तर त्रंबा येथे आहेत.' कस्तुरबाने माहिती पुरवली.

'तू आपल्या सहकाऱ्यांना एकटे सोडून अशी नाही येऊ शकत.' गांधीजींनी निर्वाणीने सांगितले.

'मी आज सायंकाळी परत जाते.' कस्तुरबा म्हणाली.

'आणि समजा तुला परत अटक करायला त्यांनी नकार दिला तर काय करशील?' सत्याग्रही गांधीजींचा प्रश्न होता.

'त्यांनी जर मला आत प्रवेश दिला नाही तर मग मी त्या भव्य प्रासादाबाहेर सारी रात्र जागून काढीन.' निग्रही कस्तुरबाचे उत्तर होते.

आता दोघानाही खूप मोकळे-मोकळे वाटत होते. ठरल्याप्रमाणे ती परत त्रंबाला परतली. तिथे ती नजरकैदेत होती. दुसऱ्या दिवशी आपल्या सहकारी मणीताई आणि मृदुलाताई यांच्यासोबत तिची पुनश्च सुटका झाली होती.

१९३९ साली राजकोट सत्याग्रहादरम्यानचा आपला अनुभव मणीताई पटेल लिहितात -

"पूज्य बा आणि मला अटक करुन स्टेशनवरुन सरळ सणोसराच्या विश्रामगृहात नेऊन ठेवले गेले. ते विश्रामगृह सूने होते. तिथे कुठलीही सोय सुविधा नव्हती. तिथे पोहोचल्यावर बांची तब्येत ढासळली. दुसऱ्या दिवशी मला राजकोटच्या तुरुंगात हलवण्यात आले. जोवर पूज्य बांच्या सोबत मला स्वत:ला वा अन्य कुणा राजकीय कैद्याला ठेवत नाही तोवर अन्नत्याग करायचा मी निर्णय घेतला. या दरम्यान पूजनीय बांना सणोसराहून त्रंबा येथे हलवण्यात आले. तिसऱ्या दिवशी मलाही त्रंबाला नेण्यात आले. तिथे पोहोचल्यावर पूज्य बांनी मला जेवण भरवले. मृदुलाला पकडून त्रंबा येथे आणण्यात आले."

कस्तुरबा त्रंबा येथे नजरकैदेत होती. तिला गांधीजींनी एक चिठ्ठी पाठवली. ती प्यारेलालने नेऊन दिली. 'तुम्ही साऱ्या व्यवस्थित आणि शांत आहात अशी आशा करतो. तुम्ही जर तिथे शांततेने राहू शकत नसाल तर माझ्याकडे येऊ शकता.'[८]

श्री प्यारेलाल म्हणतात की डॉ. सुशीलाने कस्तुरबाला एक मौखिक संदेश दिला होता. गांधीजींनी तिच्यामार्फत संदेश पाठवला होता. गांधीजींनी राज्याच्या अधिकाऱ्यांना कस्तुरबाला त्यांच्यासोबत रहाता येण्याविषयीचे निवेदन करावे काय? यावर कस्तुरबाने निश्चिंतपणे उत्तर दिले होते. "माझी कदापि 'हो' नाही. मला जर ते रोज कुशल-क्षेम जाणून घ्यायला परवानगी देऊ इच्छित असतील तर तेवढे माझ्यासाठी पुरेसे आहे. ज्या ईश्वराने परीक्षेच्या प्रत्येक क्षणी त्यांचे रक्षण केले आहे. तोच याही वेळेला त्यांचे रक्षण करील पण हर घडीला अशा प्रकारे संकटाला सामोरे जाणे गरजेचेच आहे. काय?"

हा निरोप ऐकल्यावर गांधीजी म्हणाले होते "होय, असे होऊ शकते पण आध्यात्मिक उपवासाचे औचित्य त्याच्या परिणामाने सिध्द होत नाही पण प्रभुच्या इच्छेचा नि:संकोचपणे आणि प्रसन्नतापूर्वक स्वीकार करण्यातून सिध्द होते कारण ती प्रभुच्या इच्छेची अभिव्यक्ती असते. आपल्या श्रेष्ठतम कर्तव्याचा निर्वाह करण्यात मृत्यु प्राप्त झाला तर तोही स्वागतार्ह आहे."[९]

हा छोटा संगर होता. यातले गांधीजी आणि कस्तुरबा या दांपत्याचे बलिदान. हे इतिहासाला सदैव स्मरण राहील. यातून लढ्याच्या छोट्या आघाड्या मजबूत होताना दिसतात. कस्तुरबा आपल्या सहकार्यांना सोडून स्वत:ची सुटका करुन घेऊ शकत नाही. हा गांधीजींनी घालून दिलेला पाठ आहे. तो सत्याग्रही लढवय्यांसाठी मोलाचा संदेश आहे. मुद्दा लहान असो की मोठा, त्याचे मोल गांधीजी जाणतात. राज्यकर्त्यांना जेरीस आणतात. पुनर्विचाराला प्रवृत्त करतात. हे विशेष आहे. आजारपणातही झुंज कायम ठेवण्याची कस्तुरबाची जिद्द महत्वाची आहे.

संदर्भ

१) हरिजन' दिनांक ३१ जानेवारी १९३९;

२) 'हरीजन' मधून 'राजकोट' या शीर्षकाने दिनांक ४ फेब्रुवारी १९३९ रोजी प्रकाशित लेख;

३) 'हरिजन बंधू' दिनांक ६ फेब्रुवारी १९३९;

४) कस्तुरबा राजकोटला का गेली?' या शीर्षकाचा 'हरीजन' दिनांक ११ फेब्रुवारी १९३९ रोजी प्रकाशित लेख आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६८ पृष्ठ ४२७ - २८.

५) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ३ मार्च १९३९ रोजी पाठवलेली चिठ्ठी, 'हरीजन' दिनांक ३ मार्च १९३९ आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६९ पृष्ठ १५;

६) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ४ मार्च १९३९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६९ पृष्ठ २९;

७) गांधीजींची कस्तुरबाशी दिनांक १८ मे १९३९ रोजी झालेली बातचीत, 'हरीजन' दिनांक २७ मे १९३९. आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६९ पृष्ठ ३०५ - ३०६;

८) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १६ फेब्रुवारी १९३९ रोजी पाठवलेली चिठ्ठी

९) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६९ पृष्ठ २९ तळटीप;

❖❖❖

## १६) ब्रह्मचर्य प्रयोगात साथीदार

गांधीजींनी ब्रह्मचर्य व्रताला आरंभ केला. या व्रतात कस्तुरबाचे योगदान आणि स्फुरण मोलाचे असल्याचे त्यांनी वेळोवेळी प्रकट केले आहे. आपल्याला अवघड वाटलेले हे व्रत कस्तुरबाला सुगम असल्याचेही कळवले आहे. कस्तुरबा या व्रताकडे ज्या आत्मीय आणि स्निग्ध भावनेने बघतात त्याचे अप्रुप तर त्यांच्याही मनात आहे.

कस्तुरबा राजकोट चळचळीमुळे अटकेत होत्या. गांधीजींनी पत्रातून कळवले होते की त्यांनी सध्यापुरते मुलींकडून सेवा करून घेणे थांबवले आहे. अस्वस्थ होऊ नकोस[१]

कस्तुरबाच्या हाती जळते पलिते होते. ते तळपते होते. ती गांधीजींच्या ब्रह्मचर्य विषयक प्रयोगांची साक्षीदार होती. गांधीजींनी अनेकदा आपल्या वागण्या-बोलण्याचे फसवे समर्थन केल्याचे तिच्या लक्षात आले. त्यांना अनेकदा अशा निसरड्या वाटांवरुन चालताना सावरले होते. ते आपल्या आयुष्यातील कमालीच्या काळ्याकुट्ट क्षणांबाबतची चर्चा जाहीरपणे करत होते. आपल्याला मोहात पाडणाऱ्या क्षणांची चर्चा बिनदिक्कत करत होते.

कस्तुरबा अशिक्षित होती. बावळट वा निर्बुध्द होती असे नाही. गांधीजींचे बौध्दिक आणि राजकीय क्षेत्र व्यापक होते. कस्तुरबा आपल्या सामर्थ्याने त्या वर्तुळाच्या मध्यबिंदूला स्पर्श करु शकत होती. परीघ तपासू शकत होती. ती लढाऊ बाण्याची होती. तिची सहनशक्ती अपार होती. आजार काय आणि दैवदुर्विलास काय दोन्ही गोष्टी तिने सारख्याच सामर्थ्याने सहन केल्यात. अनेकांना ती मातृस्थानी होती. तिचा प्रेमळ स्वभाव, चापल्य, नीटनेटकेपण विलक्षण होते. उच्चभ्रु परिवारातील महिलांशी वागताना येणाऱ्या अडचणींवर तिला सहज मात करता यायची. तिचे मानवी स्वभावाविषयीचे आकलन आणि अनुमान प्रशंसनीय होते.

महादेवभाईंनी ही एक आठवण लिहिली आहे. ते लिहितात:

“गांधीजी आजारी होते. बिछान्यात झोपून होते. शेजारी कस्तुरबा उभी होती. गांधीजींनी आपली स्वत:चीच आठवण सांगितली.

‘मी विलायतेत शिकायला गेलो होतो तेव्हा अविवाहित म्हणून खपवून घेण्याचा प्रयत्न केला होता.’ हे शब्द त्यांनी कस्तुरबाना उद्देशून उच्चारले होते.

कस्तुरबा तर स्तंभित होऊन बघत राहिल्यात. यामुळे गांधीजी म्हणाले तिला कसली माहिती असायची? ही एवढी भली आहे. की तिने मला क्षमा करुन टाकले आहे. एवढेच नव्हे पण ती हा प्रसंग विसरुनही गेली आहे. अजून हा कुठला प्रसंग सुरु आहे. या विषयी कस्तुरबाला माहिती होत नव्हती.

‘बा, जवळपास पन्नास वर्षे जुनी हकीकत आहे. ही. तुम्हाला कशी लक्षात असेल? आत्मकथेत या घटनेचे वर्णन आहे.’ महादेवभाई म्हणाले

यानंतर गांधीजींनी संपूर्ण किस्सा गमतीने वर्णून सांगितला.

‘होय बाई, असे काहीतरी माझ्या लक्षात येत आहे. खरे.’ कस्तुरबा म्हणाली.

यामुळे गांधीजींनी परत सांगितले

‘तर मग तू इतकी भली आहे.स की मला माफ तर केलेसच पण सर्व घटना - प्रसंग विसरुनही गेलीस. मी म्हटलेले खरे आहे. ना?’ गांधीजींनी विचारले.

कस्तुरबा परत खो खो करुन हसली. आपला सहज बचाव करत असल्यासारखे गांधीजी पुढे बोलू लागले

“पण मी एकटाच काही असा नव्हतो, हे मी सांगितले पाहिजे. सारे युवक त्याकाळी असेच करत-वागत. बालपणी हिंदुस्तानातून विवाहित होऊन जात. विलायतेत या वयाचे कुणी विवाहित नसायचे यामुळे आपण विवाहित आहोत असे मान्य करण्यात आपल्या देशाची लाज जात आहे. असे त्यांना वाटायचे. यामुळे ‘आम्ही अविवाहित आहोत’ असेच सारे म्हणत असत. असेच माझेही होते आणि मी तर घरी बायको आणि एक मूल ठेऊन गेलो होतो.” पण लगेच सुधारुन घेत म्हणाले - ‘पण मी काही देश-लज्जा सुरक्षित राखण्यासाठी खोटे

बोललो नव्हतो काही. कुमारिका कन्यांसोबत हिंडता-फिरता येईल म्हणून खोटे बोललो होतो.”

एवढे बोलून गांधीजी गंभीर बनले. त्यासोबतच आम्ही सारेही गंभीर बनलो होतो.”[२]

गांधीजींच्या जीवनात त्यांच्या ब्रह्मचर्याच्या संदर्भात मत प्रकट करण्याचा एक प्रसंग आला आहे. ते या संदर्भात स्पष्टपणे लिहितात. “माझ्या मनात वासनेविषयी अरुची जागली. माझ्या स्वत:च्या पत्नीच्या संदर्भातली ही अरुची होती. याविषयी मी स्वत:ला मूळापासून पारखून घेतले. मी या पारखण्यानंतरच १९०६ साली ब्रह्मचर्याचे व्रत घेतले. त्या दिवसापासून माझे खुले जीवन सुरु झाले. मी पत्नी वा अन्य कुणाही स्त्रीसोबत दाराला कडी लाऊन झोपलेलो नाही.

“ज्या दिवसापासून मी ब्रह्मचर्याची शपथ घेतली त्या दिवसापासून आम्हा उभयतांच्या स्वातंत्र्याचा आरंभ झाला. माझी पत्नी माझ्या मालकी हक्कांपासून मुक्त झाली. मी वासनेच्या गुलामीपासून मुक्त झालो. मी माझ्या पत्नीविषयी ज्या अर्थाने आसक्त होतो तसा मी कधीही कुणा महिलेच्या आकर्षणात बध्द झालो नाही, राहिलो नाही. मी पातिव्रत्याप्रमाणेच पतीव्रतधर्माचे पालन केले. एक नवरा म्हणून मी माझ्या पत्नीविषयी प्रामाणिक राहिलो. या संदर्भात मी कुण्या स्त्रीचा दास बनूच शकत नव्हतो. मी माझ्या पत्नीप्रती आणि आईच्या चरणी वाहिलेल्या प्रतिज्ञेविषयी प्रामाणिक राहिलो. माझ्या ठायी ब्रह्मचर्याचा उदय झाला. मी स्त्रियांकडे मातृरुपाने दुर्निवारपणे आकृष्ट झालो. स्त्रिया माझ्यासाठी इतक्या पावन ठरल्यात की मी त्यांच्याविषयी वासनामय दृष्टिचा विचारच करु शकत नाही. यामुळे माझ्यासाठी तत्काळ प्रत्येक स्त्री ही बहिण वा मुलगी ठरली. दक्षिण आफ्रिकेत असताना फिनिक्स आश्रमात माझ्या आसपास खूप महिला वावरत असायच्या. त्यापैकी काही तर माझ्या नातलग होत्या. माझ्या सांगण्यावरुन त्या तिथे आल्या होत्या. अन्य स्त्रिया माझ्या सहकाऱ्यांच्या पत्नी वा नातलग होत्या. यात वेस्ट कुटुंबीय आणि इतर काही इंग्रज होत्या. वेस्ट कुटुंबियांमध्ये त्यांची बहिण, पत्नी, सासुबाई एवढे सदस्य होते.

“ब्रह्मचर्याच्या खऱ्या पालनासाठी मी स्त्री-संपर्क मात्राला त्याज्य मानत नाही. स्त्री-पुरुष संपर्क मात्रावर अंकुश लादणारा संयम कितीही निर्दोष असला तरी तो जबरदस्तीने लादलेला संयम आहे. माझ्या दृष्टीने त्याला काही महत्व नाही. यामुळे सेवा वा कामकाजाच्या कुठल्याही संपर्कावर मी कसलाही प्रतिबंध लादला-लावला नाही. दक्षिण आफ्रिकेत मी विश्वसनीय सिध्द झालो. तिथे मी अनेक युरोपीय आणि हिंदुस्तानी भगिनींसाठी विश्वसनीय ठरलो. त्या आपल्या अंतरंग गोष्टीही माझ्यापाशी विश्वासाने सांगत असत. दक्षिण आफ्रिकेत मी हिंदुस्तानी भगिनींना चळवळीसाठी हाक दिली. तेव्हा मी त्यांच्यातलाच एक घटक असल्याचे मला जाणवले. मी स्त्री जातीच्या सेवेसाठी विशेषकरुन उपयुक्त आहे., या सत्याचा मला बोध झाला. ही रोमहर्षक कथा आहे. या कथेचे समापन करण्यापूर्वी हिंदुस्तानातले अनुभव सांगू इच्छितो. हिंदुस्तानात परतल्यावर मी लवकरच इथल्या भगिनींशी मिळून-मिसळून गेलो. मी त्यांच्या अंत:करणापर्यंत सहजच पोहोचू शकलो. हे माझ्यासाठी एक सुखद रहस्योद्घाटन आहे. दक्षिण आफ्रिकेप्रमाणे इथेही मुस्लिम भगिनींनी कधीही पर्दा प्रथेचा अवलंब केला नाही. आश्रमात तर मी महिलांमध्ये वावरतो. घेरला गेलेला असतो. त्यांना माझ्या समवेत सुरक्षित असल्यासारखे वाटते. सेगाव आश्रमात कुठल्याही प्रकारचा एकांत नाही. हेही नम्रपणे मला आपल्या लक्षात आणून द्यायला हवे.”[३]

या लेखाचे शीर्षक ‘माझे जीवन’ असे आहे. खरे तर त्याचे शीर्षक ‘आमचे जीवन’ हवे. यात दूधात साखरेसारख्या विरघळून गेलेल्या कस्तुरबाचेही दर्शन होते. गांधीजींनी कस्तुरबाला लिहिले होते की रामदास आणि देवदास यांच्या पत्रावरुन बांची तब्येत धोक्याची पातळी ओलांडणार नाही अशी असल्याचे कळले. ते लिहितात

‘मी तर माझ्या मनाला शांती लाभावी यासाठी बांच्या खाटेपाशी उपस्थित राहू इच्छितो आणि बांनाही हेच वाटते. असे असले तरी मला माझे हृदय कठोर बनवून इथे रहायच्या माझ्या कर्तव्याचे पालन करायचे आहे.’[४] या पत्रावर स्वतंत्रपणे काही भाष्य करावे असे नाही.

१९४० साली गांधीजींनी कस्तुरबाला लिहिले

'बा, तुझे पत्र पोहोचले. प्रभाने पत्रातून सर्व समाचार कळवलेत. . .. .. . . . . .. .तिथे तुझी जोवर गरज असेल तोवर तिथे थांबशील.[५]

गांधीजींनी कस्तुरबाला तब्येतीची काळजी घेण्याचा जणू काही महामंत्रच दिला आहे. देवदासचे आजारी पडणे आपल्याला अजिबात न आवडल्याचे त्याला सांगायचा निरोपही दिला आहे.

कस्तुरबा आजारपणातून उठली होती. तिला खूप अशक्तपणा जाणवत होता. गांधीजींनी ट्रेनमधून कस्तुरबाला लिहिले.

'तुला सोडून जाण्याची माझी मुळीच इच्छा नाही.' कस्तुरबा आजारपणातून उठली होती. तिला खूप अशक्तपणा जाणवत होता.[६]

या पत्रातून गांधीजींची मनोदशा कळते. यासोबतच ते कस्तुरबाला सुशीलाच्या सल्ल्यानुसार औषधे व आहार घ्यायचा सल्ला देतात. गांधीजींनी देवदासला पत्र लिहिले की बांची क्षमता, समता, उदारता, धैर्यशीलता, दृढता हे गुण त्यांना आश्चर्यात टाकणारे आहेत.[७]

एकदा प्यारेलाल आणि महादेवभाईशी चर्चा करताना गांधीजी म्हणाले होते की हिंदू बायका आपल्या पतीच्या उष्ट्या पानात भोजन घेणे पुण्यकारकही मानतात. बा ही कदाचित यात पुण्य मानत असतील पण ते मात्र कुणा इतरांच्या पानातले तर सोडा खुद्द बांच्या पानातलेही खाऊ शकत नाहीत. आता ते बांच्या पानात खायला नकार देत आहेत. हे बघून कुणी आपल्याला अहंमन्य मानायचा निष्कर्ष काढू नये असेही सुचवतात. असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल.[८]

गांधीजींनी कस्तुरबाला पत्र लिहिले होते की तिने पत्र लिहावे वा कुणाकडून लिहवून घ्यावे. मनुच्या ऑपरेशनच्या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यायला हवा आणि तो निर्णय ऑपरेशन करुन टाकावे असा आहे. हे सांगत असताना ते बाला स्वत:च्या तब्येतीची काळजी घ्यायला सांगतात. ते लिहितात की त्या तिथे आहेत.च तर संपूर्ण उपचार करुन तब्येत पूर्णपणे सुधारुन घ्यावी.[९]

गांधीजींनी कस्तुरबाला लिहिले की तिला बरे होण्याला अवधी लागेल असे वाटते पण ती जर एकदम चांगली होणार असेल तर वेळ लागायलाही काही हरकत नाही. [१०]

दुसऱ्या एका पत्रातून लिहिले आहे. की दंगलींच्या संदर्भातला त्यांचा उपवास बहात्तर तासांचा होता. याचा त्यांना काही त्रास झाला नाही. याउलट कस्तुरबा आजारी पडल्या तर गांधीजींना काळजी वाटते[११]

२ ऑक्टोबर १९४१ चा मंगलमय दिवस होता. गांधी जयंती होती. या निमित्त सेवाग्राम आणि वर्धा येथील सर्व संस्थांमधील अनेक कार्यकर्ते येत. गांधीजींचे अभिनंदन व अभिवादन एकत्रपणे करत. वर्धा येथिल महिला आश्रमातील भगिनी आल्यात. त्या गांधीजींसाठी एक शाल घेऊन आल्या होत्या. त्यांच्यासोबत एक साडीही होती. ही वस्त्रे सर्वांनी कातलेल्या सूताची होती. गांधीजींना खादीहून अधिक प्रिय आणिक दुसरे काय बरे होते? कपडे बघता त्यांचे लक्ष साडीकडे गेले. ते नवलाईने म्हणाले की हे हो काय? ही साडी कशासाठी? तुम्ही काय मला साडी देऊ इच्छिता की काय? यावर एका भगिनीने ही साडी कस्तुरबांसाठी आहे. असे सांगितले. गांधीजी म्हणाले की ही साडी जर कस्तुरबांसाठी आणली आहे. तर मग मला का दिली? दुसरी भगिनी उत्तरली की ती साडी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कस्तुरबांना भेट आहे. गांधीजी आश्चर्याने म्हणाले 'अरे वा रे वा. वाढदिवस माझा आणि साडी कस्तुरबांना भेट. हे कसे काय बुवा?' मग त्या मुलींकडे बघत गांधीजींनी हसत-हसत कस्तुरबांना हाक मारत म्हटले की या मुलींनी त्यांच्यासाठी काय आणले आहे. बघा. यावर कुणी काहीच बोलले नाही. हे बघून गांधीजी म्हणाले 'हे काही बरे नाही बुवा. कस्तुरबांना तुम्ही माझ्या अतंर्गत जाणता, हे काही बरोबर नाही. तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे. माझ्या वाढदिवशी तिला साडी भेट देऊन तुम्ही काही तिचा सन्मान करत नाहीहात. तिला जर तुम्ही काही भेट देऊ इच्छित असाल ना तर मग ती भेट तिच्या वाढदिवशी द्या. माझ्या वाढदिवशी तिला भेट नको.' गांधीजींच्या या प्रतिक्रियेवर स्वतंत्रपणे काही लिहायला हवे असे नाही.

१९४१ साली कस्तुरबा खूप आजारी होती. तुरुंगातून सुटका झाली होती. तिने पुरणपोळी करायला लावली. आनंदून म्हणाली.

'आज तर मीही खाईन. हे खातील का? विचारुन या बरे कुणीतरी. यांना पुरणपोळी खूप आवडते.' कस्तुरबा म्हणाली. 'कस्तुर खाणार नसेल तर मी पुरणपोळी खाईन.' गांधीजी म्हणाले.

'ते खात आहेत. ना? एवढे मला पुरे. मी नाही खायची पुरणपोळी.' कस्तुरबाने समाधानाने सांगितले. कस्तुरबाने सर्वांना आग्रहाने पुरणपोळी वाढायला सांगितले. स्वत: घासभरही खाल्ली नाही.

गांधीजींच्या धार्मिक महाव्रतात काय आणि देशसेवेच्या महाव्रतात काय ती सदैव गांधीजींच्या सोबतच राहिली. तिने निरंतर गांधीजींना अग्रेसरच ठेवले. साधेपणा तिच्या ठायी अंगभूत होता. स्वभावसिध्द होता. कपडे वगैरे ती साधेच वापरायची. अपरिग्रह मात्र तिच्यासाठी अवश्य अवघड वाटला असेल. या विषयीही तिने लगेचच आपल्या मनाची समजूत घालून घेतली होती.

तिच्या व्यक्तिमत्वात एकाच वेळी असे विविध रंग दिसत होते. ती पत्नी होती. पतिव्रता होती. तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व होते. त्या व्यक्तिमत्वाला एक सुरेख कुंपण तिने स्वत:हूनच घालून घेतले होते. ती लवचिक होती. वाकेन पण मोडणार नाही या वृत्तीची होती. महापुरात वाहून जाणाऱ्या झाडांना तिने पाहिले होते. ती तर लव्हाळ्यासारखी विनम्र होती.

गुरुदेव टागोरांनी लिहिले आहे. 'त्या काळी भारतात तपस्वी गृहस्थ होते. त्यावेळी घर काही मुक्तीच्या मार्गात बाधक नव्हते.' कस्तुरबाच्या जीवनाचाही हाच पाठ आहे. ती गांधीजींच्या साधनेत आणि त्यांच्या महाव्रतांच्या पालनात कधी बाधक तर बनली नाहीच. उलट तिने हळूहळू त्यांच्या व्रतांना, आदर्शांना आणि सिध्दांतांना पत्करले. यासोबतच तिचे वैयक्तिक जीवनही उजळून निघाले. विकसित झाले. या दृष्टीने तिला महान पतिव्रता म्हटले जायला हवे. पतिव्रता शब्दाच्या प्रचलित अर्थानुसार तर ती पतिव्रता होतीच. त्याहून विशाल अन् व्यापक अर्थानेही ती पतिव्रता होती. तिने पतीची तमाम व्रतसाधना अंगिकारली. त्यानुसार आचरण केले. ही सारी व्रते, सिध्दांत वा आदर्श तिचे स्वत:चे नव्हते. बापूंच्याप्रमाणे तिची महत्वाकांक्षा आपल्या जीवनाला परिपूर्ण करायची वा मोक्ष प्राप्त करुन घ्यायची नव्हती. तिची अशी कुठलीही महत्वाकांक्षा नव्हती. बापूंच्या अनुकूल होऊन रहायचा तिचा सहज स्वभाव होता. तिचे चिंतन विश्व स्वतंत्र होते. त्या विचारांवर ती दृढही होती - असायची. तरीसुध्दा सार्वजनिक कामे असोत वा आश्रमीय आदर्श असोत याविषयी ती निष्ठेने बापूंचे अनुसरण करायची. तसे अनुसरण करता-करता तिने आत्मविकास साधून घेतला होता. तिचा विकास झाला होता. तिच्या मनात कुठल्याही विकासाची आशासुध्दा नव्हती. तिचे जीवन तर अगदी सहजपणे व्यतीत झाले. तिच्या नजरेसमोर एकच ध्रुवतारा होता. जो विषय आकलनात येत नसेल याबाबत नवऱ्याचे अनुसरण करावे.

"बांच्या ठायी त्यागाचा गुण पराकाष्ठेला पोहोचला. याचे कारण आमचे ब्रह्मचर्य होते. माझ्या तुलनेने बांसाठी ब्रह्मचर्य अधिक स्वाभाविक अधिक सहज सिध्द झाले. आरंभी बाला याचे काही ज्ञानही नव्हते. मी विचार केला. बाने तो पत्करुन आपलासा करुन घेतला. यामुळे आमचे संबंध खऱ्या मित्रासारखे झाले. बा माझ्यासोबत १९०६ सालापासून खरे तर १९०१ पासून राहू लागली. तेव्हापासून माझ्या कामात सामील होऊन जगण्याऐवजी किंवा त्याहून वेगळे आणिक काही तिच्यासाठी उरलेच नव्हते. ती वेगळी राहूच शकत नव्हती. वेगळे रहाण्यात तिला काही अडचण नव्हती पण ती माझी मित्र बनल्यावरही एक महिला म्हणून आणि पत्नी म्हणून माझ्या कामात सामावून जाण्यालाच तिने धर्म मानले. यात बाने माझ्या वैयक्तिक सेवेला अनिवार्य स्थान दिले. यामुळे अखेरच्या श्वासापर्यंत तिने माझ्या सुखसोईचा विचार करण्याचे काम सोडलेच नाही."[१२]

गांधीजींची कामेच्छा तीव्र होती. त्यानंतर उद्भवलेले ब्रह्मचर्यविषयक आकर्षणही अनिवार होते. धनाचा मोह नसण्याची वृत्ती विलक्षण होती. मुलांच्या शिक्षण विषयक भूमिका टोकाच्या होत्या. अस्पृश्यतेविषयीची मते काळाला उत्क्रांत करणारी होती. त्यांचे अतर्क्य प्रयोग अविश्वसनीय वाटावे असे होते. वागणे चमत्कारयुक्त होते. याबाबत तिने आरंभी नकार दर्शवला होता. तसेच होकार दर्शवून जगाला अचंबितही केले. नाना धक्के साहिले. कष्ट पचवले. गांधी- वर्तुळातल्या विविधरंगी सहकाऱ्यांना जपले. त्यांच्या जगावेगळ्या प्रयोगाना खळखळ न करता मान्य केले. कोणत्याही परिस्थितीत त्यांची काळजी वाहिली. त्यांच्या खाण्या-पिण्यापासून त्यांच्या पथ्य-औषधांपर्यंत काळजी वाहिली. सेवा

केली. सेवा घेतली. गांधीजींनीही थेट तिची बाळंतपणे करून त्या सेवेची भरपाई केली. गांधीजींना तिने सतत साथ दिली. त्यांच्या समवेत देश-विदेश बघितले. त्यांचे हितचिंतन केले. हितवर्ध्दनाची वाट धरली.

काही बाबतीत मात्र दोघांनी एकमेकाना निराश केले. तरी ते एकमेकांविषयी समाधानी आणि तृप्त होते. दोघांनी अगदी पुढच्या जन्मीदेखिल एकमेकांच्या साथीची इच्छा प्रकट केली होती. गांधीजींचा तऱ्हेवाईकपणा जाणूनही त्यांच्या विषयी कस्तुरबाच्या मनातल्या आदरात वृध्दी झाली. कस्तुरबाच्या मोजून दाखवता येतील अशा मर्यादा आणि उणिवा होत्या. त्या मान्य करुनही गांधीजींचाही तिच्याविषयीचा आदर कमी झाला नाही. दोघे सहज होते, सहनशील होते, समजूतदार होते. मुख्य म्हणजे समाधानी होते. प्रेम आणि सहकार्य या मार्गाने ते एकमेकात विलीन होत गेले. केवळ एकत्र नव्हे तर एकरुप.

संदर्भ

१) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक ९ फेब्रुवारी १९३९ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६८ पृष्ठ ४४३;

२) महादेवभाई यांची डायरी (गुजराती) खंड ३ पृष्ठ ४६७ - ४६८;

३) ‘हरीजन’ च्या दिनांक ४ नोव्हेंबर १९३९ अंकात प्रकाशित ‘माझे जीवन’ शीर्षकाचा लेख आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७० पृष्ठ ३५०झ्३५१;

४) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १८ ऑक्टोबर १९३९ रोजी लिहिलेले पत्र;

५) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १० जानेवारी १९४० रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७१ पृष्ठ ११९;

६) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १३ मार्च १९४० रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७१ पृष्ठ ३७५;

७) गांधीजींनी देवदासला सेवाग्राम आश्रमातून दिनांक १५ मे १९४० रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७२ पृष्ठ ८१ - ८२.

८) प्यारेलाल आणि महादेवभाईशी २९ जून १९४० ला गांधीजींची बातचीत झाली. महादेवभाईनी ‘ए रिवीलिंग डायलॉग’ (एक मर्मस्पर्शी संवाद) या शीर्षकाने व प्यारेलालने ‘हरीजन’
(६ जुलै १९४०) च्या अंकातून एक संक्षिप्त विवरण ‘ऑन द रोड टु शिमला’ (शिमल्याकडे) या शीर्षकाने लिहिले. पुढे ‘हरीजन बंधू’ मधून दिनांक २० जुलै १९४० रोजी ‘प्यारेलाल आणि महादेवशी बातचीत’ या शीर्षकाने हे प्रकाशित झाले आणि संपूर्ण गांधी वाड्. मय खंड ७२ पृष्ठ २३९;

९) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक २६ मार्च १९४१ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७३ पृष्ठ ४४०;

१०) गांधीजींनी कस्तुरबाला दिनांक १ एप्रिल १९४१ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७३ पृष्ठ ४५८;

११) गांधीजींचे कस्तुरबाला दिनांक ९ मे १७४१ चे पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७४ पृष्ठ ४९;

१२) सेवाग्राम दिनांक १८ फेब्रुवारी १९४५.

❖❖❖

## १७) येरवडा तुरुंगात

१९४२ सालचा जानेवारी महिना होता. कस्तुरबा गांधीजींसमवेत काही काळासाठी बारडोलीत होती. तिथून मीठूताई यांच्या भेटीसाठी ती निघाली. तिला काही दिवस मीठूताई समवेत घालवायचे होते. या इराद्याने ती मरोली आश्रमात गेली होती. तिथे तिला ताप भरला. मागील काही वर्षांपासून तिचे हृदय कमकुवत होते. ती खूप अशक्तही झाली होती. अशा अवस्थेतही ती बारडोलीला येऊन पोहोचली होती. येताच ती आपल्या भेटीसाठी येईल हे गांधीजी जाणून होते. तिला जिना चढून वर यायचा त्रास होऊ नये असा विचार त्यांनी केला. ते स्वत: खाली येऊन वाट बघत होते. कस्तुरबा कारने आली. पुढे होत गांधीजींनी तिला आधार दिला. हळूच उतरवले. जवळच वल्लभभाईंची खोली होती. तिथे खाटेवर झोपवले. थोडा वेळ तिच्यापाशी बसले. ती आल्यावर पुढे होऊन गांधीजी तिचे स्वागत करत असत. या कामी तत्परता दर्शवत. स्वत: उपस्थित रहात असत. कस्तुरबा नेहमी गांधीजींच्या सेवेत रत असायची. गांधीजीही तिची खूप काळजी वहायचे. ते कुठे बाहेर निघायच्या तयारीत असत, बाहेर निघत असत, कार्यव्यस्त असत तरी तिला निरोप देत. तिचा निरोप घेत असत.

१९४२ सालचा उन्हाळा आला. मदतीचा हात सदैव पुढे करणारा बजाजांसारखा सहकारी देवाघरी गेला होता. श्री वल्लभभाई व महादेवभाई आजारी होते. ते दोघे अत्यंत महत्वाचे सहकारी होते. कस्तुरबाचीही तब्येत ठीक नव्हती. ती तर जीवन संगिनी होती. गांधीजी स्वत: त्र्याहत्तर वर्षांचे होणार होते.

मनू ही गांधीजींची पुतण नात होती. तिची आई तिच्या बालपणीच वारली होती. तिचे वडील जयसुखलाल गांधी हे गांधीजींच्या अनेक वारसदारांपैकी एक होते. मे १९४२ साली गांधी चौदा वर्षे वयाच्या मनूला सेवाग्रामला घेऊन आले होते. ती कस्तुरबाला मदत करायची. गांधीजींनी मनूच्या वडिलाना पत्र लिहिले - 'मनू ही एक अतिशय समजूतदार व हुशार मुलगी आहे. ती बाची मनापासून सेवा करते[१]

गांधीजींनी कस्तुरबाच्या बंधुंना कळवले की अस्वस्थ राहू नये. आजार तर येतो आणि निघून जातो. व्यक्ती जन्माला येते आणि मरते. कुणी लवकर तर कुणी उशीरा. ईश्वरावर ज्याचा विश्वास आहे. त्याला भय कसले? ज्याला भय नाही त्याला अस्वस्थता कशी? का? धैर्य राखायला हवे. हे पत्र बांच्या मार्फतही आहे. असे समजावे.[२]

गांधीजींनी कस्तुरबाला कळवले की त्यांची तब्येत चांगली आहे. इकडे रात्री खूप गारवा होता. सारेच त्यांची आठवण काढतात. गांधीजींना वाटते की कस्तुरबा तिथेच चांगली आहे. त्यांना तिकडे आजारी पडायला वेळ लागला नसता आणि जर त्या आजारी पडल्या असत्या तर मग तिथेच थांबून रहावे लागले असते. इतरांकडून सेवा करवून घ्यावी लागली असती ते वेगळेच.[३]

१ ऑगस्ट १९४२. कस्तुरबाच्या हातून आश्रमात वृक्षारोपण झाले. पिंपळानजिक पश्चिमेकडे बकुल वृक्ष लावला गेला होता. ५ तारखेला ती गांधीजींसोबत मुंबईला गेली. ९ ऑगस्ट रोजी येरवडा तुरुंगात गेली. सेवाग्राम आश्रमातले हे कस्तुरबाच्या हातचे अखेरचे कार्य होते.

एके दिवशी कस्तुरबाने वृत्तपत्रात एक बातमी वाचली. विलायतेचे गृह सचिव एमरीचे एक विधान होते. 'गांधी आणि जिन्ना एकमेकाना भेटायला तयार नाहीत.' एमरीच्या या वक्तव्याने ती नाराज झाली. हिंदू-मुस्लिम ऐक्यावर तिचा दृढ विश्वास होता. डॉक्टर अन्सारी असोत वा बादशाह खान. अब्दुल कलाम आजाद असोत वा हकीम अजमल खान. उमर सोबानी का असेनात. हे काही मुसलमान नव्हते. सारे अंतरंग मित्र होते. अशी निश्च्छल भावना होती. एमरीचे वक्तव्य तिच्या अगदी जिव्हारी लागले. ती म्हणाली" हे धादांत असत्य आहे. गांधीजी तर जिन्नांना भेटायला त्यांच्या निवासस्थानी गेले होते. हे सारे महादेवभाईंनीही लिहून ठेवले आहे. एमरी जर माझ्यासमोर आला तर हे लेखन त्याला दाखवीन आणि जाब विचारीन 'बघ हे आणि आता सांग की गांधी जिन्नांच्या भेटीस्तव गेले होते की नाही?' वृत्तपत्रात गांधीजींवर काही टीका आली की ती नाराज-दु:खी व्हायची. हे काही तिला नवीन नव्हते. जेलमध्ये वृत्तपत्रे

वाचायला उसंतच उसंत असायची. कैदेत नसताना मात्र निवांतपणे वृत्तपत्रे वाचायला वेळ नसायचा. ऑगस्ट क्रांती झाली. गांधीजींवर भयंकर आगपाखड करण्यात आली. कस्तुरबाचा सात्विक संताप उसळून यायचा. 'यांचे वाटोळे होईल. इतके असत्य बोलतात. यांच्या पापांचा घडा कधी-ना-कधी तरी भरेलच. ईश्वर यांचे पाप कसे काय सहन करु शकेल? यांना जाब हा द्यावाच लागणार आहे.' अशी तिची उग्र प्रतिक्रिया असायची. गांधीजींच्या अहिंसा विचारावर जनलोक आक्षेप घेत. ते सहन करणे तिला असह्य वाटायचे. ती संतापायची. तिचा संताप संताप व्हायचा.

काँग्रेस महासमितीची बैठक मुंबईला होती. कस्तुरबा गांधीजींच्या समवेत होती. राजकीय आकाशात काळे ढग दाटून आले होते. आकाशही मेघाच्छन्न होते. नीरस दिवस होते ते! सूर्यप्रकाश मंदावला होता. ऊन नव्हते, पाऊसही नव्हता. काही आश्रमवासी निरोप द्यायला वर्धा स्टेशनपर्यंत आले होते. त्यांना कस्तुरबानी उत्तर दिले होते की त्या सर्वांच्या आशीर्वादाने परत येता आले तर मनाला आनंदच होईल. तिला का परत येण्याविषयी निराशा वाटत होती?

संदर्भ

१) गांधीजींनी श्री जयसुखलाल गांधी यांना दिनांक ३० जुलै १९४२ रोजी लिहिलेले पत्र;

२) गांधीजींनी कस्तुरबांचे बंधू श्री माधवदास गोकळदास कापडिया यांना दिनांक २० एप्रिल १९४२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७६ पृष्ठ ६३;

३) गांधीजींचे कस्तुरबाला मुंबईहून दिनांक ११ मे १९४२ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७६ पृष्ठ १११.

❖❖❖

## १८) करेंगे या मरेंगे

८ ऑगस्ट १९४२ साल होते. सायंकालीन प्रार्थना पार पडली. सारे शांतपणे झोपले. झोप काय ती दोघाना नव्हती. भिंतीवर टांगलेले घड्याळही टळटळीतपणे जागे होते. घड्याळाने एक वाजल्याचा टोल दिला. कस्तुरबा आणि महादेवचा संवाद सुरु झाला.

'किती वाजताहेत महादेव?' कस्तुरबाच्या विचारण्यात कासाविशी होती.

'एक वाजला.' महादेवभाईनी वेळ सांगितली.

'तुला काय वाटते? यांना अटक होईल काय?' कस्तुरबाचा काही एक निश्चय होत नव्हता.

'मला तर असे वाटत आहे. पण त्यांना नाही तसे वाटत.' महादेवभाईंनी आपले व गांधीजींचे मत सांगितले. 'हूं.' कस्तुरबाच्या या हुंकारात होकार व नकार दोन्हीही होते.

'अनेकदा बुध्दिला नाही पटत पण त्यांचेच म्हणणे खरे ठरते.' महादेवभाई अनुभवाचे बोल बोलत होते. या दोघांसोबत घड्याळ जागेच होते. दोन. तीन. चार. असे टोल वाजत राहिले. या दरम्यान दोघांमधल्या संवादाचा विषय एकच होता. 'अटक होईल की नाही?'

गांधीजी, मीराताई आणि महादेव यांच्या अटकेचे वॉरंट होते. कस्तुरबा आणि प्यारेलालला पर्याय कळवला होता. त्यांची अटक ऐच्छिक होती. ते गांधीजींसोबत राहू शकत होते. त्यांना अटक करवून घेता येणार होते. अटक करवून घ्यायची नसेल तर ते मुक्त होते.

कस्तुरबापुढे मोठाच पेच होता. तुरुंगात जायचे की नाही? नेहमीप्रमाणे आपला प्रश्न तिने गांधीजींपुढे मांडला. तो संवाद असा झाला.

'मी काय करावे असे तुम्हाला वाटते? 'कस्तुरबाने विचारले. 'माझी इच्छा विचारतेस की सल्ला? ' गांधीजी नेहमीप्रमाणे टोकदार बोलले.

'तुमची इच्छा प्रमाण!' कस्तुरबाचा निश्चय दृढ होता.

'माझी इच्छा अशी आहे. की तू माझ्यासमवेत तुरुंगात येऊ नयेस.' गांधीजींनी निर्णायक मत दिले.

'मग मी काय करावे?' कस्तुरबाने पुढील कार्याची योजना समजून घेण्यासाठी विचारले. 'आज शिवाजी पार्क येथे सभेचे आयोजन केले गेले आहे.' गांधीजींनी कृती कार्यक्रम दिला. 'होय.' कस्तुरबाला कार्याची नेमकी दिशा कळली होती.

'तू माझ्याऐवजी तिथे भाषण द्यावे. स्वत:ला अटक करवून घ्यावीस असे मला वाटते.' गांधीजी स्पष्ट होते.

'बरे !' कस्तुरबाने पडत्या फळाची आज्ञा स्वीकारली.

'पण तुला जर माझ्यासमवेत तुरुंगात यायचे असेल तर मी अटकाव करत नाही.' गांधीजींनी पर्याय खुला केला.

'हूं.' कस्तुरबाला अर्थात्‌च तो पर्याय पटला नाही. 'तुला जर स्वतंत्रपणे अटक करण्यात आली तर कदाचित तुला माझ्यासमवेत राखणार नाहीत असेही होऊ शकते. याचा सारासार विचार करुन तू निर्णय घ्यावास हे उत्तम.' गांधीजींनी भविष्याची सूचना दिली.

कस्तुरबापुढे यक्ष प्रश्न होता. या खेपेची अटक साधी नव्हती. गांधीजी आमरण उपोषणाचे कठोर पाऊल उचलू शकणार होते. स्वतंत्रपणे अटक करवून घेतली तर कदाचित ही अखेरची भेट ठरली असती. एकीकडे संपूर्ण आयुष्याचा प्रश्न. एकीकडे नवऱ्याची इच्छा. गांधीजींचा कुठलाही दबाव नव्हता. निर्णय कस्तुरबाच्या हाती होता. आता स्वेच्छेने निर्णय घ्यायचा होता. भावनेला जपावे की कर्तव्याला वरावे हा पेच होता. बाहेर राहिलो तर गांधीजींची सेवा कोण करील? हा प्रश्नही होता. हा विरह कदाचित आयुष्यभरचा होऊ शकतो. हे भय होते. यामुळे तिच्या मनात प्रचंड कालवाकालव झाली होती. क्षणभरातच तिने आपल्या आयुष्याचा महान निर्णय घोषित केला.

“आता माझ्या इच्छेचे म्हणाल तर या क्षणी मला तुमच्या सोबत यायला आवडेल पण यापेक्षाही मला तुमची इच्छा पूर्ण करायला अधिक आवडेल म्हणून मी थांबायचे ठरवत आहे.” कस्तुरबाने आपला निर्णय स्पष्टपणे मांडला. तिचा हा प्रगल्भ विवेक होता. हे तपाचरणाचे सुमधुर फलित होते.

९ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींना अटक करण्यात आली. त्यांच्यासोबत महादेवभाई होते. 'करेंगे या मरेंगे' नारा बुलंद झाला. गांधीजींना अटक झाली. कस्तुरबा स्वतंत्रपणे अटक करवून घेणार होती. गांधीजी आणि कार्यकारी समितीच्या अटकेमुळे देशभर उत्स्फूर्तपणे संतापाची लाट उसळली. गावा-गावातून आणि शहरा-शहरातून नायक पुढे आले. ते प्रतिकार करत. उसळत. मृत्युला निर्भीडपणाने सामोरे जात. पहिल्या चार दिवसात सहाशे लोक मारले गेलेत. नोव्हेंबरच्या अखेरपर्यंत एक हजारापेक्षा अधिक लोक बळी पडले असे मजूर सभागृहाला (House of commons) सांगण्यात आले. खरा आकडा मात्र याहून अधिक होता.

सायंकाळचे पावणे पाच वाजत होते. कस्तुरबा सभेसाठी म्हणून बाहेर पडत होती. शहरभर पोस्टर्स झळकत होते. तिच्या भाषणाची चर्चा होती. पोलीस अधिकारी दारात उभा होता. त्याने हात जोडले.

'माताजी, आपले वय तर आता आराम करायचे आहे. आपण सभेत जाऊ नये.' पोलिस अधिकारी बोलला.

बिर्ला हाऊसमधून बाहेर पडताच तिला अटक झाली. तिच्या समवेत सुशीलालाही अटक करण्यात आली. शिवाजी पार्कवर पोहोचण्यापूर्वीच प्यारेलाललाही अटक झाली.

१९४२ चा लढा सुरु झाला होता. कस्तुरबाच्या मनात गांधीजींची काळजी असायची. दुपारी गांधीजी अर्धा तास ध्यान करत. ईश्वराने मार्गदर्शन करावे, अशी मागणी करत. स्नान आटोपले की कस्तुरबाची पूजा सुरु व्हायची. ती अर्धा-पाऊण तास तुळशीची पूजा करायची. नवऱ्याला उदंड निरामय आयुष्य मिळावे अशी याचना करायची. या काळजींनी तिचे आरोग्य पोखरले जात होते. ती खूप अशक्त झाली होती. सर्वांच्या मनी एकाच प्रश्नाची उलघाल होती. गांधीजींच्या उपोषण काळात कस्तुरबाच्या जीवाचे कायच होईल? काही बरे - वाईट झाले तर? एके दिवशी अगदीच न रहावून सरोजिनी गांधीजींना म्हणाली. 'बापू तुमचा उपवास एक-ना-एक दिवस बांचा जीव घेईल !'

या विधानावर हसत-हसत गांधीजी म्हणाले "मी तुम्हा सर्वांपेक्षा बांना चांगलाच ओळखून आहे. तुम्हाला बांच्या पराक्रमाचा बोध नाही. त्यांच्या बळाचा तुम्ही अदमास घेऊ शकत नाहीत. अखेर, मी त्यांच्या समवेत बासष्ठ वर्षे घालवली आहेत. बांच्या ठायी तुम्हा सर्वांपेक्षा अधिक हिंमत व धैर्य आहे. हे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. मला येरवडातील उपवास आठवतात. मी जीवनाची आशा त्यजून दिली होती. आपले सारे सामान-सुमान इस्पितळातील कर्मचाऱ्यांमध्ये वितरित करुन द्यायचा निर्णय घेतला होता. त्यावेळी बाची पापणीसुध्दा ओली झाली नव्हती. ती निश्चिंत होती."

कस्तुरबाला ९ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली. तिला शिवाजी पार्कवर भाषण द्यायला जाऊ दिले गेले नव्हते. तिच्या सोबत डॉ. सुशीला नायर यांनाही अटक झाली. त्यांचे बंधू प्यारेलाल यांना अटक झाली. सर्वांना मुंबईच्या ऑर्थर रोड जेल मध्ये ठेवण्यात आले. तिथे ना खुली हवा ना ऊन. ओल असलेली फरशी. मागे शौचालय. घाणेरडे स्नानगृह. सर्वत्र दुर्गंधाचे साम्राज्य. तिला खूप त्रास झाला. १० ऑगस्ट रोजी सकाळी प्रार्थना झाली. आज तिला तापही होता. खूप अशक्तपणा होता. पातळ जुलाब होत होते. जेलरच्या बायकोला हे कळले. तिने आपल्या घरुन दूध पाठवले. ती लांब राहून कस्तुरबाला प्रणाम करायची.

वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फोनवर काही चर्चा झाली. कस्तुरबाला येरवडा तुरुंगात हलवण्यात आले. तिची डॉक्टर म्हणून सेवेसाठी सुशीला नायर यांनाही नेले. प्यारेलाल मात्र तिथेच राहिलेत. कस्तुरबा तुरुंगात आली. जेलमध्ये कस्तुरबा चरख्यावर सूत कातायची. तिचा हृदयविकार बळावला. सुशीलाताई तिला चरखा चालवायला मनाई करायची. यावर ती म्हणायची 'भली डॉक्टर आहे.स बाई तू ! अग चरख्यावर सूत कातल्याने हृदयाला श्रम पुरतात होय?'

कैदेत एक ब्राह्मण शिपाई होता. कस्तुरबाचे त्यावर विशेष प्रेम होते. त्याला ती दूध-फळे द्यायची. तो कधी चुकलाही तरी क्षमा करायची. काहीसे दुर्लक्षही करायची. 'बिचारे ब्राह्मणाचे लेकरु आहे. नाही तरी इथे

कुठलाही धर्म-कर्म जपता येत नाही. याला काही देता आले तर बरे !'

'महाराज, तुम्ही ब्राह्मण आहात ना? आमची कधी सुटका होईल सांगा बरे!' एकदा तिने त्या ब्राह्मणाला विचारले. तो पामर काय बोलेल?

'मी पंचांग बघून सांगतो.' असे काहीसे पुटपुटत तो निघून गेला. या दरम्यान आपले ओले डोळे पुसायला मात्र तो विसरला नाही. या वृध्द महिलेच्या आस्थेने तो द्रवित झाला.

येरवडा येथे महादेवभाईंनी अखेरचा निरोप घेतला. कस्तुरबा खचून गेली. महादेवच्या निधनाचे दु:ख ती झेलू शकली नाही. महादेवचे जाणे तिला वज्रप्रहारासारखे होते. अंत्यविधी सुरु झाला. कस्तुरबा गांधीजींसोबत चालत निघाली होती. शव चितेवर ठेवण्यात आले. आजारी कस्तुरबासाठी एक खुर्ची आणण्यात आली होती. ती व्याकूळ बनली होती. तिच्या नेत्रात आसवांचा उसळता दरिया होता. त्याच्या चितेजवळ खुर्ची टाकून ती बसून राहिली होती. हात जोडून वर आकाशाकडे बघत होती. थेट अंतिम यात्रेत आणि नंतरही ती बोलत राहिली होती.

'महादेवा, बंधो, तू जिथेही जाशील तिथे सुखी रहा. हे बंधो, तू खूप सेवा केलीस. तू सदा सुखात रहा.' महादेवभाईला ही कस्तुरबाची श्रध्दांजली होती.

ती जो कुणी भेटेल त्याला हेच विचारायची, 'महादेव का निघून गेला? मी का नाही गेले? ईश्वराघरचा हा असा कसा न्याय आहे.?' कस्तुरबाला पुढे काही बोलता येत नव्हते.

ती सैरभैर झाली होती. ती गांधीजींच्या सोबत महादेवच्या समाधीवर जायची. नमस्कार करायची. समाधीला प्रदक्षिणा घालायची. समाधीला महादेवाचे मंदिर म्हणायची. तिला या दु:खातून बाहेर पडणे शक्य झाले नाही. कस्तुरबाच्या चित्ताकाशात या शून्याचे प्रतिबिंब झळकत रहायचे. एके दिवशी ती विचार करु लागली. 'या प्रचंड बलवान सल्तनतीविरुध्द गांधीजी कसे झुंजतील? इंग्रजांपाशी अफाट साधन संपत्ती आहे. आपण कसा सामना करु?' तिने न राहवून विचारुनच तर घेतले होते. 'चिंता नको.' गांधीजी म्हणाले होते.

'आपल्या पाठीशी ईश्वर तर आहे. ना? त्याच्याच तर आश्रयाने गांधी-लढा सुरु आहे. तोच यात विजयश्री खेचून आणील.' सुशीलाताई म्हणाल्या.

'ईश्वर तर आमच्यावर रुसला आहे. ना. बघा तरी, महादेवला कसे आमच्यातून ओढून नेले.' कस्तुरबा म्हणायची. हा संवाद गांधीजींनी ऐकला. ते पुढे आले.

'महादेवचे निघून जाणे हे विशुध्द बलिदानाचे उदाहरण आहे. या समर्पणातून लाभच लाभ होईल.' गांधीजी म्हणाले.

येरवडा तुरुंगात डॉ. गिल्डरने आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला. कैद्यांना पेढे वाटले. आंबे वाटले. कस्तुरबाने गांधीजींना विचारले.

'आपल्या लग्नाला किती वर्षे झाली असतील हो?' कस्तुरबाचा सहज प्रश्न होता. 'का? तुलाही आपल्या लग्नाचा वाढदिवस साजरा करायचा आहे. की काय?' गांधीजींनी मिस्कीलपणे विचारले.

यावर सारेच हसले. कस्तुरबाही हसली. तिचा हा प्रश्न. या प्रश्नाला गांधीजींचे उत्तरही प्रश्नार्थकच. या प्रश्न व उत्तरात तिच्या आयुष्यभरचे सारे दैन्य सामावलेले होते. तिचे खट्टू झालेले मन गांधीजींना दिसले. तिला एका अंधाऱ्या बोगद्यातुन प्रवास करत असल्यासारखे वाटले. उजेडाची तिरीपही न दाखवणारा अंधारग्रस्त बोगदा. तिथे चालणे असते पण उत्सव नसतो. अंधाऱ्या मंडपात का सनई-चौघडा वाजतो? नकार आणि निषेधाच्या अंगणात का आनंदाची कारंजी उसळतात? तिचे असे भाबडे निवेदन. नवऱ्याचा मिस्किल प्रश्न. स्फोटासारखा उसळलेला आसपासचा हास्य कल्लोळ. खूप दिवस कस्तुरबाला थकवत राहिला होता.

गांधीजींना कटेली यांनी बातमी दिली. महादेवभाई यांची पत्नी दुर्गाबिन, त्यांचा मुलगा नारायण आणि कनू गांधी पुण्याला येऊन गेले होते. उपवासादरम्यान आपल्याला गांधीजींसोबत राखण्यात यावे. ही विनंती त्यांनी केली होती. गांधीजींनी जर त्यांना बोलाऊन घेतले तर त्यांचे येणे सुगम होऊ शकेल. हे ऐकून कस्तुरबा बोलली 'बोलाऊन घ्या ना हो. बिचाऱ्या दुर्गाला दिलासा मिळेल.' यावर गांधीजी म्हणाले की त्यांनी कोणाला बोलावणार नाही असे लिहून दिले आहे. सरकार त्यांना

येऊ देणार असेल तर ठीक ! कस्तुरबा हे ऐकून निराश झाली. काहीशी नाराजही झाली. कटेलीकडे वळून म्हणाली 'सरकारला कळवा की सौ. गांधी या तिघाना बोलाऊ इच्छिताहेत. गांधीजींच्या सेवेसाठी त्यांची गरज आहे.' मग गांधीजींकडे वळून म्हणाली 'तुम्ही हवे तर कुणाला बोलाऊ नका पण माझाही काही-एक हक्क आहे.' गांधीजी हसले, म्हणाले 'सरकारने तुझा हक्क मानला म्हणजे झाले.'[१]

कर्तव्यकर्मात कस्तुरबा तल्लीन असायची. तिला हक्क गाजवायच्या अशा काही जागा होत्या. यात तिला समाधान वाटायचे. खरे तर कस्तुरबा दक्षिण आफ्रिकेत काय आणि देशात काय सर्वत्र चळवळीच्या रणधुमाळीत उभी ठाकली. अग्रेसर राहिली. कष्ट साहिले. तुरुंगवास भोगला. देशभर भ्रमण केले. भाषणे दिलीत. सार्वजनिक सभांना संबोधित केले. राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक-साहित्यिक परिषदांना हजेरी लावली. अध्यक्षपदावरुन संबोधन केले. वृत्तपत्रांना मुलाखती दिल्यात. गांधी-संघर्षाचा कणा बनली. काकासाहेब कालेलकर म्हणतात की कस्तुरबा गांधीजींच्या तमाम प्रयत्न, पुरुषार्थ आणि मानसिक संघर्षाच्या केवळ साक्षीदारच नव्हे तर साथीदारही झाल्यात. गांधीजींच्या जीवनशुध्दीच्या जिहादात त्या सहकारी होत्या. त्यांचे पारस्परिक प्रेम आणि ऐक्य वाखाणण्याजोगे होते. या आत्मैक्याला प्रामाणिक मैत्रीची झालर होती. त्यांचे दांपत्य प्रेम उन्नत स्वरुपाचे होते.

संदर्भ

१) बापूकी कारावास कहानी: डॉ. सुशीला नायर (हिंदी) पृष्ठ ३२४ / २६५.

❖❖❖

## १९) सत्यवानाची सावित्री

१९४३ साल होते. कस्तुरबाचा येरवडा कैदेत मुक्काम होता. मार्च महिना संपत आला होता. तिची तब्येत खूप बिघडली होती. न्यूमोनिया झाला होता. लघवीत त्रास सुरु झाला होता. औषधे नियमितपणे सुरू होती. तिला जणू आपल्या जाण्याची चाहूल लागली होती. आश्रमीय भगिनींची प्रार्थना या श्लोकाने व्हायची

***'गोविंदं द्वारकावासीन् कृष्ण गोपी जनप्रिय ।***
***कौरवैः परिभूतां मां कि न जानासि केशव॥'***

कस्तुरबा हा श्लोक म्हणायची. हा देश आताकौरवांनी घेरला गेला आहे. कृष्ण भगवंताने देशाची आता काळजी घ्यावी. वाचवावे, तरच काही भले. तिला तुरुंगातले सारे लोक आठवायचे. ती सर्वांची नावे घ्यायची. 'आम्हा दोघांना देव तुरुंगात राखो. सर्वांना मुक्त करो.' असे म्हणायची. ती अलिकडे अधिक वेळ बिछान्यात असायची. पडल्या-पडल्या सूरात प्रार्थना म्हणत असायची. एकदा कुणीतरी विचारले.

'रामायण वाचू का?'

'अगं, वाचू का काय विचारतेस? वेडाबाई. आण रामायण आणि वाचू लाग. मी बिछान्यात पडले आहे. पडल्या-पडल्या रामायण ऐकण्यात काय मी थकून जाणार आहे. की काय? वाच.'

तिला मणीताई, खंडू मामा, दूदाभाई, दानीताई या हरिजन बंधु-भगिनींची आठवण यायची. ती म्हणायची 'अखेर सारी ईश्वराची लेकरे आहेत. ना? यात उच्च काय आणि नीच काय? ही भावना मुळात चुकीची आहे.' ती हिंदू आणि मुसलमान यांनाही समान मानायची. ईदच्या दिवशी मुस्लिम बंधु-भगिनींना फळे वाटायची.

९ फेब्रुवारी १९४३ रोजी गांधीजींचे उपोषण सुरु झाले होते. ते २ मार्च पर्यंत चालले होते. ते एकवीस दिवसांचे उपवास होते. गांधीजी वृध्द होते. थकले होते. नाना प्रश्नांमुळे त्यांची काया झिजली होती. उपवासाचा तिसरा दिवस उजाडला. गांधीजींची प्रकृती ढासळू लागली. उपवासकाळात कारागाराची दारे खुली करुन देण्यात आली होती. रामदास या काळादरम्यान पंधरा दिवस पुण्यातच थांबला होता. उपवास गांधीजींचे एकट्याचेच होते. कस्तुरबा या काळात एकदाच फलाहार घेत होती. उपवासांचा काळ पुढे-पुढे सरकत होता. कस्तुरबाच्या पूजेचा समय वाढू लागला होता. तुळशी पूजेची वेळ वाढत होती. बाळकृष्णाच्या पुजेत अधिक वेळ जाऊ लागला होता. २२ फेब्रुवारी १९४३ चा दिवस उजाडला. गांधीजींची तब्येत जीवन मरणाच्या मध्यात होती.

इकडे कस्तुरबा तुळशी वृंदावनापुढे गुडघे टेकवून प्रार्थना करीत होती. तिच्या चेहऱ्यावरील भाव प्रार्थनेने समृध्द होते. परम कारुणिक होते. ती ध्यानमग्न होती. हे दृश्य अनेकांच्या मनाला चटका लावणारे ठरले होते. काहींना ही अंधश्रध्दा वाटेल. यात कुणाच्याही लाभ-लोभाचे हनन नव्हते. ही आत्मिक उन्नयनाच्या दिशेने निघालेली भावयात्रा होती. यात कुणाच्याही भल्याचा अधिक्षेप नव्हता. सार्वजनिक हित संवर्धनाची काळजी होती. ही कस्तुरबाची प्रार्थना होती.

गांधीजींचे उपवास सुरु होते. उपवासाचा आज तेरावा दिवस. गांधीजींना बिछान्यात जाऊन पडावे लागले होते. त्यांची शुध्द हरपली होती. नाडी मंद होत चालली होती. शरीर घामाने डबडबलेले होते. इशारा करता येणेही शक्य नव्हते. बोलणे तर लांबच राहो. नौका डगमग करु लागली होती. कस्तुरबा नेहमी त्यांच्यासोबत असायची. तिथे नसली तर मग बालकृष्णाच्या मूर्तीसमोर किंवा मग तुळशी मातेसमोर बसून विनवत असायची. या आजाराच्या दरम्यान सतत प्रार्थनेत निमग्न असायची. गुडघे टेकलेले. हात जोडलेले. डोळे मिटलेले. चेहरा करुण आणि दीन. ध्यांनात लीन. तिला आजूबाजूच्या जगाचा विसर पडला होता. तिने सावित्रीसारखी प्रार्थना केली. 'माझे सौभाग्य राख' ही एकच एक प्रार्थना. देवाने ही प्रार्थना ऐकली होती. 'मी पुढच्या वर्षी येईन असे का ती देवाला म्हणाली होती? त्यालाच माहित.'

गांधीजींचे एकवीस दिवसांचे उपवास सुरु होते. चक्रवर्ती राजगोपालाचारींना कस्तुरबा म्हणाली'I see you talk lot, I see what you do outside. मी बघत आहे. की गप्पा तर तुम्ही ढीगभर मारता. प्रत्यक्षात

बाहेर काय कराल ते मी स्वत: बघणार आहे.' कस्तुरबाने इंग्रजीतून ठणकावले. तिच्या इंग्रजी भाषेच्या ज्ञानावर काळाने कधीच प्रश्नचिह्न उभे केले नाही. ते सर्वस्वी मान्य केले.

उपवासाचा तेरावा दिवस उजाडला. अर्ध्या तासभर अथक प्रयत्न सुरु होते. गांधीजी अर्धा औंस पाणीही घशाखाली ढकलू शकले नव्हते. चार औंस प्रवाही पोषण द्रव्य देहात उतरले. गांधीजींच्या निस्तेज चेहऱ्यावर स्मित झळकले. ईश शक्तीने भाव भक्तीची हाक ऐकली होती. कस्तुरबाची प्रार्थना सुफळ संपन्न झाली होती.

३ मार्च रोजी उपवास पूर्ण झाले. रामदास आणि देवदास आठवडाभर तिथेच थांबले. संकल्प बळाने कस्तुरबा झुंजत राहिली. तिने मनोबळाचा ध्वज उंच उंच फडकत ठेवला. तिचा फलाहार सुरु होता. दिवसातून एकदा फलाहार. तेच जेवण. हे नित्याचेच होते.

उपवासामुळे सर्वांना प्रवेश खुला झाला. लोक येत. गांधीजींना नमस्कार करत. कस्तुरबाशी बोलत. ती दिवसभर हिंमतीने काम करायची. गांधीजींच्या खाटेसमोरच्या भिंतीवर लिहिलेले होते 'हे राम.' त्या नजिक तुळशीची कुंडी होती. सकाळी आंघोळ झाल्यावर कस्तुरबा तुळशीची पूजा करायची. तिला अवंतिकाबाईंनी चंपारण्यात गाईलेल्या तुळशीच्या ओव्या आठवायच्या. ओव्यांचा मथितार्थ तिच्या मनात एखाद्या दाटून आलेल्या हुंदक्यासारखा सामावलेला होता. ती मनातल्या मनात म्हणत होती 'तुझ्या हाती लाख-लाख दिवे सजलेत. तू या मनातल्या तमाला पराभूत कर. हे तुळशी वृंदावनापुढल्या दिव्या, माझ्या मनाच्या उंबरठ्याशी यमाचा तम जागला आहे. त्या तमाला तू परास्त कर रे बाबा.

कसे होते ते दृश्य ! सत्यवानाचे प्राण सावित्रीने परत आणले होते. ती यमाशी झुंजली होती. कस्तुरबाला तर गांधीजींसाठी अनेकदा झुंजावे लागले होते. गांधीजींचा उपवास सुरु झाला की ती उपवास करायची. त्यांचे शरीर थकायचे. मन करपुन जायचे. तिची श्रध्दा मात्र अटळ होती. ती भेटीला येणाऱ्यांना सांगायची :- 'तुम्ही काहीही काळजी करु नका. मी आधी जाणार आहे. यांना काहीही होणार नाही. हे परत उठून उभे रहातील. कामाला लागतील.' ती गांधीजींपेक्षा दुबळी नव्हती. ती धार्मिक व्रते-वैकल्ये करायची. तिच्या गळ्यात पवित्र मण्यांची माळ होती. एकवीस दिवसांच्या उपवासादरम्यान कस्तुरबाचे अस्तित्व त्यांच्यासाठी प्रेरणादायी होते.

७ मार्च रोजी भंडारींसोबत नर्सविषयक चर्चा होत होती. गांधीजींनी त्यांना सांगितले की आजवर दुर्गा (महादेवभाईची पत्नी) कस्तुरबांची मदत करत होत्या. आता त्या जातील. दुसऱ्या नर्सची गरज भासेल. दुर्गाताईने निरोप घेतला.

'लवकर या.' दुर्गाताई म्हणाल्या.

'हे पापी सोडतील तेव्हा ना! ते कुणाचेच काहीही ऐकत नाही.' कस्तुरबा सांगू लागली. गांधीजींचे मौन होते. त्यांनी आपले म्हणणे लिहिले 'सरकारच्या वर देवाचे अधिराज्य आहे. देव मात्र सर्वांचे ऐकतो.'

'कनूला इथून त्वरित निघायला हवे, कुणा इतराला सेवार्थ देता येईल.' भंडारी म्हणाले. 'दुर्गाताई निघून गेल्यात आणि दुसरे कुणीही आले नाही असे होऊ नये.' सुशीलाताई म्हणाल्या.

यावर त्यांनी लेखी द्यायला सांगितले. दुपारी सुशीला आणि डॉ. गिल्डर यांनी लिहिले. पत्रात म्हटले की आमच्या आकलनानुसार महिन्याभरासाठी एका नर्सची आवश्यकता आहे. कनू थांबू शकला तर सर्वोत्तम. तो गांधीजींच्या गरजा जाणतो.

❖❖❖

## २०) तनू भागली

सुशीलाताईने कस्तुरबाच्या आजारपणातील नोंदी घेतल्या आहेत. त्या कमालीच्या तपशीलवार आहेत. त्या आस्थेवाईक तर आहेत.च. त्यांना वैद्यकीय ज्ञानाचा शास्त्रीय स्पर्शही आहे. या प्रकरणात त्यांच्या संपूर्ण विवेचनाचा उपयोग केला गेला आहे. कस्तुरबाच्या छातीतली वेदना हृदयविकारामुळे होती. भंडारी रात्री आले होते. नंतर डॉ. शहा आले होते. ते आगाखान यांचे नातेवाईक आहेत. भले गृहस्थ आहेत. सप्टेंबर १९४२ चा हा अहवाल सुशीलाताईंनी सूक्ष्मपणे नोंदला आहे.

६ सप्टेंबर १९४२ रोजी सिव्हिल सर्जन आणि कलेक्टर परत आले. भंडारींनी सिव्हिल सर्जन यांना सांगितले की रुग्णांना भेटून या. यामुळे त्यांनी बा, बापू आणि सरोजिनी नायडू यांना बघितले. बाला फुफ्फुसांच्या पापुद्र्याचे दु:ख आहे. असे त्यांनी सांगितले. सुशीलाताई म्हणाल्या की या वेदनेचा ना श्वासोच्छवासाशी संबंध, ना खोकल्याशी. वेदना हृदयाशी संबंधित आहे.

कस्तुरबा कालपासून बिछान्यात आहे. डॉक्टरांच्या येण्याचा एवढा फायदा झाला की ती स्वत:ला खरोखर आजारी मानू लागली आहे. आपण खाटेवर पडून रहायला हवे असे ती मानते आहे. अन्यथा लाख प्रयत्न करुन देखिल तिला सुशीला आजवर झोपवून ठेऊ शकली नव्हती.

८ सप्टेंबर रोजी कस्तुरबाची तब्येत थोडी चांगली आहे. ९ सप्टेंबर रोजी तब्येत चांगली आहे.

१६ सप्टेंबर रोजी गांधीजी झोपी गेले. थोड्या वेळाने कस्तुरबाने गरम पाणी मागितले. आसपास कुणी नव्हते, सारे आत बसून कामात होते. गांधीजी स्वत: उठले. तिला गरम पाणी दिले. कस्तुरबाची आजची रात्र चांगली नाही गेली. खाण्या-पिण्यात काही कुपथ्य झाले होते. दुपारी गांधीजी कस्तुरबाला मालिश करु द्यायला सांगत होते. दक्षिण आफ्रिकेतली आठवण सांगत म्हणाले होते की चौदा दिवसांच्या उपवासानंतर स्मट्सने त्यांना बोलावले होते. ते पायी चालत निघाले होते. रस्त्यात पाय इतके दुखू लागले की आक्रंदून उठले. त्यावेळी कस्तुरबाही त्यांच्यासोबत होती. ती आजारी होती पण मागे थांबायला तयार नव्हती. त्याकाळी गांधीजी कस्तुरबाची सेवा करायचे. वेळ पडल्यास मालिशही करुन द्यायचे.

कस्तुरबाच्या आजाराच्या पाचव्या दिवशी गांधीजींनी प्यारेलाल यांना सांगितले "बांची मला खूप काळजी वाटते. हे मला मान्य करायला हवे की महादेव गेल्यानंतर माझे मन दुबळे होऊन गेले आहे. अनेकदा काळजी वाटते की कदाचित बांनाही गमवावे लागेल. तशी मी मनातल्या मनात याविषयीची तयारी तर करुनच ठेवली आहे. पण शक्यतो मी आणिक कुणाला गमवू इच्छित नाही."[१]

प्रार्थनेपूर्वी आणि प्रार्थनेनंतर गांधीजी रामायणाचा अर्थ सांगत. कस्तुरबासाठी निवडक चौपायांचे गुजराती भाषांतर प्यारेलालकडून करवून घेतले होते. ते स्वत: तपासले. सुधारले.

कस्तुरबालाही महादेवभाईंच्या समाधीस्थळी यायचे होते. तिला चालायची परवानगी नव्हती. 'ठीक आहे., पुढच्या शनिवारी.' एवढे बोलून ती बसून गेली. दुपारी ती काहीशी निराश होती. बाहेर जाऊन काय करु? ही चर्चा चालायची.

'मला तर माहित नाही की मी बाहेर जाईन वा नाही. मी तर आता आहे. आणि सायंकाळी नसेन असे होऊ शकते.' कस्तुरबा म्हणाली.

"असे तर सर्वांसाठी म्हणावे लागेल. ही सुशीला आता एम्. डी. बनून आली आहे. तरीही सकाळी आहे. आणि सायंकाळी नाही, असे होऊ शकते. महादेवचे असेच झाले ना? तू आणि मी जे आजारी आहोत, ते बसून रहातील. तुला तर बरे व्हायचेच आहे. हवी ती सेवा घे. चिंता करु नकोस." गांधीजी म्हणाले.

२७ सप्टेंबरला कस्तुरबाने सांगितले. बापूंच्या वाढदिवशी आपण सदैव गरीबांना भोजन देतो. या खेपेला असे करु शकणार नाही. का करु शकणार नाही? असे सुशीलाताईने विचारले. यावर म्हणाली की बापू म्हणतात की हा तुरुंग आहे. आणि सरकारी पैशाचा असा व्यय करता येणार नाही. हे ऐकून सुशीलाताईने त्यांना सांगितले की सारे आपापल्या पैश्यांनी सामान मागवत आहोत. सरकारच्या पैश्यांनी नव्हे. सर्वांना वाटणार आहोत. हे ऐकून कस्तुरबा खूश झाली.

२ ऑक्टोबर १९४२. तुरुंगातला गांधीजींचा पहिला-वहिला वाढदिवस होता. गांधीजी प्रार्थनेच्या वेळेला आले. भिंतीवर फुलांच्या माळा बघितल्या. कस्तुरबाला म्हणाले. 'तू रोखू शकली नाहीस ना यांना?' यावर बा उत्तरली 'मी मना तर केले होते पण यांनी ऐकले नाही.' कस्तुरबा म्हणाली होती की त्यांनी कातलेल्या सूताचा हारही सुशीलानेच घालावा. आज कस्तुरबा सुध्दा उत्साहात होती. आजची तयारी म्हणून तिने कालच केस धुतले होते. नवीन टिळा लावला. केसात फुले खोवलीत. बऱ्यापैकी जेवलीही. सर्वांना खायचे पदार्थ वाटले. खूप प्रसन्न होती. सायंकाळच्या प्रार्थनेत 'वैष्णव जन' भजन गाईले गेले. रेलिंगवर दीपमाळा सजल्या होत्या. कस्तुरबा म्हणाली की शंकरच्या (महादेवभाईच्या) समाधीवरही दिवा ठेऊन या.

कस्तुरबाला काही बरे नव्हते. धडपणे झोप येत नव्हती. खूप उकडत होते. प्यारेलाल तिच्या शेजारी झोपले. कस्तुरबाला असे वाटायचे की बापू रात्रीतून उठले आणि त्यांना काही गरज भासली तर प्यारेलाल कदाचित उठणार नाही. सुशीला मात्र अवश्य उठेल. यामुळे सुशीलाला ती गांधीजींपासून दूर हटू देत नव्हती. कस्तुरबाला आज खूप गाढ झोप आली. अर्ध्या रात्री गांधीजींनी सुशीलाला विचारले की बा झोपली आहे. का? तिचा काही आवाज येत नाही. सुशीला बघून आली. बा गाढ झोपेत होती. गांधीजींच्या मनात शंका जागली की बांनाही इथेच तर हरवून नाही ना जावे लागणार?

७ ऑक्टोबर रोजी तिथीनुसार गांधीजींचा वाढदिवस होता. कस्तुरबा, मीराताई, प्यारेलाल आणि सुशीलाताई यांनी सूताचे हार घातले. कस्तुरबाच्या सांगण्यावरुन सुशीलाने गांधीजींना टिळाही लावला. दुपारी अर्धा तास सूतकताईची धमाल होती.

ईद आली. आज 'शेवया खा.' असा आग्रह सरोजिनीने धरला. यावर 'मिष्टाहार नको, मिताहार दे.' असे गांधीजी म्हणाले होते. सारेच चकित झाले. त्यांनी खजूर मागितला.

'हे काय हो, तुम्ही फलाहार करणार आहात?' कस्तुरबा उसळली.

'हो बुवा, आज ईद आहे. ना म्हणून.' गांधीजी म्हणाले.

'अहो, सारे मुस्लिम बंधू-भगिनी तर आज खातात आणि एक तुम्ही आहात की उपवास करायचा म्हणे.' कस्तुरबा फणकाऱ्याने बोलली.

'अगं पण?' गांधीजी काही सांगायचा व्यर्थ प्रयत्न करत होते.

'दक्षिण आफ्रिकेत तुम्ही रमजानमध्ये महिनाभर रोजा राखायचे. या खेपेला एकही रोजा पाळला नाही. ईदच्या दिवशी तर नको ना रोजा.' कस्तुरबाने आठवण करुन दिली होती.

'तेच म्हणतो ना मी ! पैगंबर साहेबांना आवडणारे दूध-खजूर मागत आहे. मी. मला आवडणारी भाजी-भाकरी काही मागत नाही ना मी.' गांधीजी बोलले.

कस्तुरबाचा खोकला वाढला होता. बिचारीचे एक दुःख थांबले, तर दुसरे उसळायचे. कस्तुरबाने सुशीलासोबत गांधीजींचे आरोग्य विषयक पुस्तक वाचायला सुरुवात केली. गीता वाचायलाही आरंभ केला. तिला वाचायची खूप आवड होती. गांधीजींच्यासोबतही खूप वाचायची. तब्येत चांगली नव्हती.

१८ ऑक्टोबर रोजी कस्तुरबाला ताप होता. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ती खूप बेचैन होती. २० ऑक्टोबरला तब्येत पुष्कळ चांगली होती. २३ ऑक्टोबर रोजी गांधीजींना खूप काळजी वाटत होती. काही उपाय नव्हता. तब्येतीच्या कारणास्तव कस्तुरबाची सुटका होऊ शकली असती. सुटका झाल्यावर ती आणखी घाबरेल. गांधीजींशिवाय तिला बाहेर अजिबात करमणार नाही. त्यांचा वियोग सहन करता येणार नाही. कदाचित प्राणोत्क्रमणही होऊ शकेल. ९ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींना अटक झाली. त्याच दिवशी कस्तुरबाला जुलाब होऊ लागले होते. दोन दिवसानंतर तुरुंगात आणले. इथे येताच कुठल्याही औषधाशिवाय तिला बरे वाटायला लागले होते.

सरकारचे आरोप खोटारडे होते. त्याविषयी कस्तुरबाच्या मनात राग भरुन राहिला होता. कुठेही

संधी मिळाली की ती या विषयावर बोलु लागायची. डॉक्टरांशी बोलायची.

५ नोव्हेंबर रोजी दुपारी कस्तुरबा गांधीजींची वाट बघत होती. तिला खूप भूक लागली होती. गांधीजींना जेवायला अर्ध्या तासाचा उशीर झाला. गांधीजी उशिरा आल्यामुळे ती खूप नाराज झाली. गांधीजींनी कारण सांगायचा प्रयत्न केला पण ती का मानणार होती?

७ नोव्हेंबर रोजी सकाळी फिरत असताना गीतेच्या बाराव्या अध्यायाविषयी ते चर्चा करत होते -

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यांनात्कर्मफलत्यागः त्यागाच्छांतिरनन्तरम्॥**
**(अध्याय १२ श्लोक १२)**

गांधीजी सांगू लागले अभ्यास मार्गापेक्षा ज्ञानमार्ग श्रेयस्कर आहे. अभ्यास म्हणजे चित्तवृत्ती निरोधाची साधना होय. ज्ञानमार्गाहून ध्यानमार्ग श्रेयस्कर आहे. ज्ञान श्रवण-मनन आदी. ध्यानमार्गाहून कर्म फळत्याग सरस आहे. ध्यान म्हणजे उपासना होय. या त्यागाने लगेचच शांती लाभते.

कस्तुरबा सारखी स्त्री, जिला तीनशेच्या आधीची संख्या काय असे विचारले तर दोनशे हे उत्तर देता यायचे नाही पण हवेलीत (मंदिरात) जाऊन दिवा लावणे असो वा झाडू मारणे असो त्या कामाला ती खूप प्रेमाने करील, ही भक्ती झाली. अशा लोकांसाठी ध्यान आहे. चौथे तर कर्म फळत्याग आहेच. श्रेयाचा अर्थ मी सोपा असे करतो.  ज्ञानापेक्षा ध्यान सोपे आहे. सर्वात सोपा आहे. कर्मफळाचा त्याग. ध्यांनाचा हा अर्थ मला विनोबांनी सांगितला होता. मी 'अनासक्ती योग' ग्रंथ लिहिला तेव्हा विनोबांना वाचायला दिला होता. त्यातील कित्येक मुद्यांविषयी आमच्यात चर्चा झाली. त्यात हा श्लोक चर्चेचा विषय होता.[२]

१९ नोव्हेंबर रोजी कस्तुरबाला हृदयविकाराचा त्रास सुरु झाला होता. २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी फिरायला जाताना गांधीजी दक्षिण आफ्रिकेतल्या आठवणी सांगू लागले. कस्तुरबाने सदैव त्यांची साथ-संगत केली. 'सर्वांनी गांधीजींच्या मागे चालावे.' हे तिने सर्व नातलगांना सांगितले.

१६ डिसेंबर रोजी कस्तुरबाला खूप बरे वाटत होते. १८ तारखेला तिने वृत्तपत्र वाचले. 'मी रोज वृत्तपत्रे वाचते. लोक उपाशी मरताहेत. आपण जास्त वस्तु का मागवाव्यात? इथे तर सरकारी माणसे आहेत. हुकूम बजावला की इतके आणा तर तेवढे येऊन जाते, मरेनात का दुसरे भूकेने. असे करुन कसे चालेल?' कस्तुरबा विचारत होती.

गांधीजींच्या उपवासाचे समर्थन करुन कस्तुरबाने सगळ्यांना चांगलेच दिड्.मूढ केले. गांधीजींचे उपवास संपल्यावर तिची स्थिती हळूहळू खालावत गेली होती. हृदय, फुफ्फूस आणि मुत्रपिंड यांच्या कार्यात अडथळे येऊ लागले होते. मनूच्या सहवास आणि सेवेने तिला बरे वाटायचे. गांधीजींच्या उपवासादरम्यान रामदास आणि देवदास यांच्या झालेल्या भेटीने ती उल्हसित झाली होती. बंदीवास अनिश्चित काळासाठी होता. तिच्या स्वभावात कडवटपणा आला होता. चिडखोरपणा वाढला होता.

'आम्ही तुमच्याबरोबर त्रास भोगणार. महादेव तर गेलाच. आता माझी पाळी.' कस्तुरबा म्हणाली.

आपण आता बाहेरचे जग पाहू शकणार नाही. याची तिला खात्री पटली होती. तिच्यासमोर दोन जळत्या दिशा होत्या. गांधीजींच्या अटकेमुळे झालेले दुःख. हरिलालविषयीची न संपणारी चिंता. या दोन्हींवर मात करणारे मृत्युच्या चाहुलीचे सावट. ते तिला जास्त अस्वस्थ करत होते.

डिसेंबर महिन्यात कस्तुरबाला हृदयविकाराचे तीनदा झटके आले होते. गांधीजींनी ॲगाथा हॅरिसनना पत्र पाठवले. त्यात लिहिले 'ती जीवन आणि मृत्युच्यामध्ये हेलकावे खात आहे.'[३]

आठ दिवसांनी त्यांनी तुरुंगाधिकारी कटेलींना लिहिले:

रुग्णाची प्रकृती फारच खालावली आहे., हे मी सांगितलेच पाहिजे. ती आयुष्याला कंटाळली आहे. आणि त्यातून सुटका व्हावी म्हणून मृत्युची वाट पाहत आहे. एखादा दिवस ती पार पाडते. दुसऱ्या दिवशी तिची प्रकृती आणखी बिघडलेली असते. तिची स्थिती अगदी दयनीय झाली आहे.

गांधीजींनी कस्तुरबाच्या सुटकेची विनंती करायला नकार दिला. डॉक्टर्स आणि पारिचारिकांची मागणी करायला मात्र मागे-पुढे पाहिले नाही. तिची सेवा करण्यासाठी नातेवाइकांना येऊ द्यावे अशीही मागणी केली. सततच्या विनंत्यांना सरकार मात्र विलंबाने किंवा नकारात्मक उत्तर देत होते. मगनलाल यांचा पुतण्या कनू गांधी आणि जयप्रकाश नारायण यांची पत्नी प्रभावती या दोघांना आत सोडण्यात आले. प्रभावती साबरमती तुरुंगात होत्या. कस्तुरबाच्या अत्यंत जवळच्या होत्या. त्यांना आगाखान महल येथे हलवण्यात आले. त्या सेवा करु लागल्या. कनू भजने गाऊन त्यांचे मन रिझवण्याचा प्रयत्न करु लागला.

कस्तुरबाच्या आजारपणात हरीलाल दोन वेळा आपल्या आईला भेटायला आला होता. पहिल्या वेळी कस्तुरबाला अत्यानंद झाला. त्याच वेळी रामदास आणि देवदासही तिथे आले होते, त्यामुळे चारपैकी तीन मुले तिच्याजवळ होती. दक्षिण आफ्रिकेत असलेला मणीलाल मात्र नव्हता. लेकरांच्या येण्याने कस्तुरबाला अपार शांती लाभली होती.

संदर्भ

१) मारुं जीवन एज मारी वाणी: (गुजराती) श्री नारायण देसाई खंड ४ ‘स्वार्पण ‘पृष्ठ १३० / १३१;

२) बापू की कारावास कहानी : सुशीला नायर पृष्ठ १७६ --१७७;

३) गांधीजींनी ॲगाथा हॅरिसन यांना दिनांक २९ डिसेंबर १९४२ रोजी लिहिलेले पत्र.

❖❖❖

## २१) दिसे पैल तीर

१९४३ साल होते ते. १७ मार्च रोजी सायंकाळी कस्तुरबाला हृदयविकाराचा त्रास सुरु झाला. जवळपास दोन तास त्रास चालला. आपोआप बरा झाला. रात्री शांतपणे तिला झोप आली.

२४ मार्च रोजी तिला बरे वाटत होते. २५ मार्च रोजी हृदयविकाराचा त्रास पावणे चार तास राहिला. रात्री शांतपणे झोप आली.

२५ मार्चपासून कस्तुरबाचे स्वास्थ्य हरपले होते. उपवास सुरु होण्यापूर्वी गांधी म्हणाले होते की सहा महिन्यात काही-ना-काही निकाल लागून जाईल. उपवास पूर्ण झाले. आता गांधीजी वरचेवर सांगू लागले की किमान सात वर्षे तरी कारावासात खितपत पडून रहावे लागेल. हे ऐकून तिला प्रचंड धक्का बसला.

'आपण नाही बुवा सात वर्षे जगायचो. मला तर महादेवच्या भेटीला निघायचे आहे.' कस्तुरबा सांगू लागली.

'बा, तुम्ही शांत रहा.' सुशीला सांगायच्या.

'हे बाळकृष्णा, आमची लवकर सुटका कर.' कधी-कधी खूपच अजीजी करत कस्तुरबा म्हणायची.

२ एप्रिल पासून लघवीत दाह होण्याची तक्रार सुरु झाली होती. जळजळ वाढली होती. तापही आला होता.

येरवडा तुरुंगातून कस्तुरबाने पत्रे लिहिली आहेत. छगनलालची पत्नी काशी. तिला लिहिलेली ही पत्रे आहेत.

चि. काशी,

"तुझी दोन्ही पत्रे मिळालीत. वाचून आनंद वाटला. इकडे पत्रे खूप उशिरा मिळतात. तिकडे सारे कुशल हे जाणून आनंद वाटला. आर्यनायकम् नागपुरहून परत आला. त्याला व आशादेवीला माझे आशीर्वाद. माझी तब्येत चांगली आहे. काळजी करु नकोस. प्रार्थनेच्या वेळी तुम्हा सर्वांची खूप आठवण येते. तसे तर माझी राख तुमच्याप्रत पोहोचेल. मी कशी येऊ?"

आम्हा दोघांचे शुभाशीर्वाद[१]

कस्तुरबाची निरवानिरव सुरु होती. तिने काशीताईला लिहिलेले पत्र

चि. काशी,

तुझी दोन्ही पोस्टकार्ड्स मिळालीत. वाचून आनंद वाटला. सर्वांपेक्षा एक तुझे पत्र नियमित असते. वाचून खूपच आनंद होतो. १४ तारखेचे पत्र अगदी आज पोहोचले. पत्र खूप उशिरा पोहोचतात. तिकडे सारे मजेत हे जाणून आनंद वाटला. किशोरलालभाईची तब्येत चांगली आहे. ही एक आनंदित होण्यासारखी बातमी आहे. यापूर्वीचे माझी स्वाक्षरी असलेले पत्र तुला मिळाले ना?

आर्यनायकमजी नागपुरहून येऊन गेले आहेत., त्यामुळे त्यांना व आशादेवींना माझे आशीर्वाद. पत्र लिहिशील तर प्रभू आणि अंबाला माझे आशीर्वाद कळवशील. काल लक्ष्मीचे पत्र होते. कधी-कधी अंबाचे पत्र येत असल्याचे लिहिले आहे. बाकी इथे सारे मजेत. माझी तब्येत चांगली आहे. माझी काळजी करु नकोस. तुझी तब्येत बरी असेल? बचू मजेत असेल. इथे प्रार्थनेच्या वेळी तुम्हा सर्वांची खूप आठवण येते. चि. कहाना काय लिहित रहातो? भाज्या तर सारेच थोड्या-थोड्या चिरुन देतात. थोडी तूही चिरुन दे म्हणावे. भंसाळीभाईसोबत अभ्यास करतो की नाही? सुतारकाम करायला जातो की नाही? तसे माझी राख तर जाईल पण मी कशी काय जाऊ? सर्वांशी मिळून मिसळून रहायला कहानाला सांगशील. लीलावतीला म्हणावे की तिचा निरोप मिळाला आहे. तिला जे बरे वाटेल ते कर म्हणावे. तू शाळेत भरती होऊन जावेस असे मला तर वाटते. ही तर लांबलचक वाट आहे. छगनलालला आशीर्वाद. लीलावती, गोमतीताई, आनंद, बचू वगैरे सर्वांना आणि तमाम आश्रमवासींना माझे आशीर्वाद. कृष्णचंद्रजी, जमेल तसे कहानाला व्यवस्थित राखावे. एवढे करुन त्याला आवडत नसेल तर पाठवून द्यावे. नागपुरला सर्व भगिनींसाठी आशीर्वाद लिही. बाचे शुभ आशीर्वाद, बापूजींचे शुभ आशीर्वाद.[२]

५ जून रोजी कस्तुरबाला दम लागला होता. पहाटे पाचच्या सुमाराला हृदयविकाराचा झटका आला. कस्तुरबाला खेळांमध्ये रस होता. जूनच्या मध्यावर कस्तुरबा सर्व खेळांमध्ये रुची घ्यायची. सकाळ-संध्याकाळ बॅडमिंटन व रिंगचा खेळ बघायला यायची.

तुरुंगात एक खुर्ची ठेवून दिली होती. ती खुर्चीत बसून बघत रहायची. आगाखान जेलमध्ये असताना बॅडमिंटन व टेबलटेनिस हे खेळ ती जवळ बसून बघत रहायची. तब्येतीच्या तक्रारींमुळे तिला स्वत:ला काही खेळता येत नसायचे. खेळ बघताना रसिक खेळाडूप्रमाणे ती रंगून जायची एवढे मात्र खरे. ती अंपायरचे काम करु शकायची. खेळात लबाडी करणारे तिच्या नजरेतून सुटू शकत नसत. रडीचा डाव खेळणाऱ्यांना ती बरोबर पकडायची. तिला कॅरम खेळायला खूप आवडायचे. सायंकाळी एकटीच कॅरम खेळायचा सरावही करायची. रात्री कॅरम खेळायची. मीराताईने तिला प्रोत्साहन दिले. कस्तुरबाने कॅरम बोर्डच्या पाकिटात सातदा गोट्या टाकल्या. रात्री कटेली साहेब वगैरेंनी कस्तुरबाला खेळायला सांगितले. मीराताई उत्तम खेळाडू होती. कस्तुरबा तिला नेहमी आपल्या पक्षात घ्यायची. जेलर कटेली आणि डॉक्टर गिल्डर सोबत खेळत. ते स्वत:हूनच हार पत्करत. कस्तुरबाला आनंद व्हावा यासाठी ते असे करीत. हे काही तिच्या नजरेतून सुटत नसायचे. ती हरली तर नाराज-नाउमेद होऊन जायची. ती खूप समरसून खेळायची. या खेळांनी तिचे आयुष्य बदलून गेल्यासारखे झाले. पुढे मात्र हळूहळू कस्तुरबाची तब्येत अधिकच खराब होत गेली होती. पुढे पुढे तर कॅरम खेळता-खेळताही तिला दम लागायचा. तिच्या बिछान्याशेजारीच कॅरम मांडला जायचा. तिची पार्टनर मीराताई जिंकायची. कस्तुरबाला आपण स्वत:च जिंकल्याचा आनंद व्हायचा. ग्रामोफोनच्या माध्यमातूनही तिचे असेच भरपूर मनोरंजन व्हायचे. सकाळी तास-दिड तास ग्रामोफोन वाजत असायचा. त्यावेळी ती तल्लीन होऊन भजने ऐकायची.

रामी आणि मनू मश्रुवाला (हरीलाल भाईंच्या दोन्ही मुली) या दोन्ही बहिणी सोबत आल्यात. मामा माधवदास आणि देवदासभाई आले. मनूने कस्तुरबाला 'कहँ के पथिक, कहँ कीन्ह हे गगनवां' हे भजन गाऊन दाखवले. त्यांच्या मुलीने नाच करुन दाखवला. १० तारखेला कस्तुरबाच्या सोबत देवदासची ही अखेरची मुलाखत होती. सरकारने परवानगी दिली तर पत्नी व लेकरांना सोबत घेऊन देवदास परत येणार होता.

कस्तुरबाची तब्येत दिवसभर छान होती. रात्री खूप चांगली झोप आली. खोकल्याच्या मिक्श्चर शिवाय तिला दुसरे कुठलेही औषध दिले नाही. १२ ते १४ डिसेंबर १९४३ कस्तुरबाच्या तब्येतीत चढ-उतार जाणवत होते. १५ तारखेला डॉ. शहा यांच्या विचारण्यामुळे सुशीलाताईंनी चाकांच्या खुर्चीची मागणी केली. १७ तारखेला चाकांची खुर्ची आली. सायंकाळी त्यांना या खुर्चीत बसऊन फेरफटका मारला. त्यांना खूप बरे वाटले. २१ तारखेला एक नर्स पाठवावी असे सुशीलाताईंनी डॉ. शहा यांना सांगितले. सरकारने कुणा नातलग भगिनीला बोलाऊन घ्यायची परवानगी दिली. कस्तुरबा कनूला बोलाऊ इच्छित होती. प्रभावतीताईंचेही नाव दिले होते. २२ तारखेला रात्री कॅरम बघता-बघता कस्तुरबा आपला सारा आजार विसरली. दुपारी मणीलालभाईंचे पत्र आले. पत्रासोबत त्यांच्या लेकरांचे फोटोही होते. फोटो बघून ती आनंदित झाली. २७ तारखेला कस्तुरबाच्या सेवेसाठी वेड्यांच्या इस्पितळातून डॉ. शहा यांनी एक दाई पाठवली होती.

१९४३ साली कस्तुरबाने काही पत्रे लिहिली आहेत.

"चि. काशी,

"तुझे पत्र पोहोचले. वाचून आनंद झाला. इथे तर खूप पाऊस आहे. तिकडेही असेल. काठेवाडात तर चांगला पाऊस झाला. बाबलाला आशीर्वाद कळवशील. मला खोकला येतो. बाकी सारे छान आहे. आजची अमावस्या. उद्यापासून श्रावण लागेल. आता सारे सणवार. पुढच्या रविवारी वीर पसली. रक्षाबंधनाच्या आदल्या कुठल्या तरी रविवारी साजरी करतो ना आपण? सारे भाऊ, बहिणींना काही-ना-काही भेट देतात. अधुन-मधून विनोबाची पत्रे येतात. बाळकोबाला आशीर्वाद. तूर्त एवढेच.

आम्हा दोघांचे शुभाशीर्वाद [३]

यात उत्सवप्रिय महिलेचे दर्शन होते. दुसरे पत्र आहे

चि. काशी,

"२२ जुलैचे तुझे पत्र पोहोचले. वाचून आनंद वाटला. सध्याचे हवामान बघता माझी तब्येत चांगली आहे.

दुर्गा-बाबलाला माझे आशीर्वाद कळवावेत. आश्रमात सर्वांना आशीर्वाद.

दुसरे असे की माझी पेटी उघड. त्यात चार-पाच साड्या असतील. दोन काळ्या काठाच्या आहेत. त्या आत्याला दे. चार-एक हात लांबीचे कापड आहे. तेही आत्याला देशील. दोन साड्या लाल काठाच्या आहेत. एकेक रामी आणि मनूला पाठवून दे. माझ्या पेटीत गीताप्रेस गोरखपुरची मोठी गीता आहे. ती शांतीकुमारला दे. तो ती इकडे पाठवून देईल. लाल काठाची चादरही त्याला दे. तीही तो इकडे पाठवून देईल. आता वाढदिवस येईल ना यांचा. या निमित्त आत्याला, नातींना काही द्यायची माझी इच्छा आहे. यामुळे एवढे तपशीलवारपणे लिहिले आहे. आणि हे बघ, एक खाकी रंगाचे कापडही असेल. तेवढे रामीला देऊन टाक. याशिवाय माझी काही जाकिटे असतील तर बघ, तीही तुला कुणाला देऊन टाकावीशी वाटलीत तर देऊन टाक. माझा पूर्ण बाह्यांचा आकाशी रंगाचा स्वेटर आहे., तेवढा मला पाठवून दे.

आम्हा उभयतांचे आशीर्वाद"[४]

गांधीजींचा वाढदिवस येईल. वन्सबाईंना काही भेट द्यावी. नातींना काही द्यावे. गृहस्वामिनी कस्तुरबाची ही कशी उदात्त भावना !

कस्तुरबाची अशी निरवानिरव सुरु झाली होती. तिला दक्षिण आफ्रिकेतील घडामोडींच्या बाबत संपूर्ण माहिती असे. मणीलालला काही कायदेशीर आणि राजकीय प्रश्नांचा सामना करावा लागला होता. त्याने लिहिलेल्या काही संपादकीयांवरुन हे प्रश्न निर्माण झाले होते. कस्तुरबाने एका पत्रातून लिहिले होते

'अलीकडे तुला धमक्या देण्यात आल्याचे समजले. काळजी वाटते. तू शूर आहे.स. अधिक काय लिहू?'

मणीलाल त्यावेळी फिनिक्स वसाहतीत नवे घर उभारत होता. हे पत्र कस्तुरबाने आपल्या सुनेला लिहिले आहे.

"प्रिय सुशीला,

आम्हाला निकालाबद्दल कळले. या प्रकरणात हार झाली असली तरी मन खंबीर ठेव. तू धैर्याने तोंड देत असशील. तुझ्याभोवतालचे लोक मणीला सर्वतोपरी पाठिंबा देत असतील. अशी आशा आहे. प्रकाशकाच्या दृष्टिने यात काही नवीन नाही. असे यांचे म्हणणे आहे.

या प्रकरणामुळे मणी दुखावला असेल. मला अवश्य लिही. यामुळे तुझा खर्च वाढतो आहे. याची मला चिंता आहे. वर्तमानपत्राच्या इमारतीत तुम्ही भर टाकलेली आहे. नव्या घराचे बांधकाम झाले आहे. यामुळे खर्च आधीच वाढलेला आहे. तुला पण खूप सहन करावे लागले असेल. तू समजूतदार आहे.स. तुझी मणीला चांगली मदत होत असणार.. .."

तुम्हा सर्वांना आम्हा उभयतांचे आशीर्वाद

कस्तुरबाने नात जावयांना लिहिलेले पत्र -

चि. कुंवरजी, (रामीचे यजमान)

बरेच दिवस लोटले. तुम्हाला मी पत्र लिहिले नाही. मनूला पत्र लिहिले. ते तुम्हाला पोहोचते आणि तुम्हाला बातमी कळते, असे वाटते. कांती मुंबईला होता तेव्हा त्याचे पत्र होते. त्याच्या कॉलेजविषयी काही तजवीज होऊ शकली नाही पण आता मद्रास येथे राजाजींमार्फत व्यवस्था करवत आहे. तुम्हाला काही कळले तर मला कळवा. मनुचे तर बऱ्याच दिवसांपासून पत्र नाही. बलिताई (रामीची मावशी) तर आता राजकोटला गेल्या असतील. कमूची तब्येत बरी असेल. कामाला लागली असेल. मनु आणि पुष्पा दोघी सोबत रहातात की स्वतंत्र रहातात? ते कळवावे. आधी वेगळ्या होत्या. त्यांच्या वडिलांकडे रहात. असे सारे होते पण आता सारे तपशिलवारपणे कळवा. आता तर तुमची तब्येत चांगली असेल. लेकरे शिकायला जात असतील. सारे मजेत असतील. सध्या महागाई कोण वाढली आहे. ईश्वर राखेल तसे रहावे, दुसरे काय? रामीची तब्येत कशी असते? काशी, रामदास वगैरे सर्वांची पत्रे नियमितपणे येतात. एक मनू आणि दुसरे तुम्ही, तुमची काही नियमित पत्रे येत नाहीत. मामांची कधी भेट होते का? तुम्ही तर झंडू फॉर्ममध्येच नोकरी करता ना? मामाचे काही कधी मला पत्र येत नाही. तुम्ही तपास करुन कळवाल. मनू, बेबी, सुरेंद्र, रामी, लेकरे सर्वांना माझे शुभाशीष कळवावेत. तुमची तब्येत कशी

असते? तुमच्या मातोश्रींची तब्येत चांगली असेल. चि. मनू तुम्हाला व रामीला प्रणाम लिहायला सांगते. इकडे सारेच छान आहेत. गोसीताईंनी मला पाठवलेली साडी पोहोचली. बाकी इकडचे काही विशेष समाचार नाहीत. कांती असेल तर त्याला आशीर्वाद (कळवावेत.) त्याला पत्र लिहायला सांगाल, तसेच तुम्हाला हरीलालची काही खबरबात असल्यास मला कळवाल आणि मला पत्र लिहायला त्यालाही सांगाल. तब्येत कशी?

शीघ्र पत्र द्यावे.

बा तथा बापूंचे तुम्हा सर्वांना शुभाशीष.[५]

२ ऑक्टोबर १९४३. तुरुंगात गांधीजींचा दुसरा वाढदिवस आला. कस्तुरबाने गांधीजींनी कातलेल्या सूताची साडी परिधान केली होती. गांधीजींना टिळा लाऊन पुष्पहार घातला. पुष्पांच्या ढिगासमोर दोघे बसले. ते खूपच सुंदर दिसत होते. कस्तुरबाची तब्येत यथातथाच होती. गांधीजींनी कातलेल्या सूताची साडी तिने परिधान केली. उभयतानी आपल्या हातून कैदी बांधवांना जेवण वाढले. खूप काम केले. सूत कातले.

सण आला. कस्तुरबाने तुळशी विवाह साजरा केला होता. चार ऊसांचा मंडप उभारला होता. हार घातला होता. फुले वाहिली होती. रांगोळीने सुरेख पुष्प रेखले होते. त्यावर तुळशी वृंदावन सजवले होते. समोर ओंकार काढला होता. तुळशीला पुष्पमाळांनी सजवले होते. फळांचा नैवेद्य दाखवला होता. ओल्या-सुक्या फळांचा प्रसाद वाटला होता. खिरापत वाटली होती. डाळिंबाचे दाणे वाटले होते. कैद्यांना व शिपायांना ऊस दिला होता. तुळशी विवाह झाला. तिला तुळशीच्या ओव्या आठवत राहिल्या होत्या.

***मारे आंगणिए तुलसीनो क्यारो***
***तुलसीना क्यारे घीना दिवा बळे,***
***घीना दिवा बळे जोवा देव मळे***
***जोवा देव मळे रुडा राम रमे,***
***रुडा राम रमे साचा मोती झरे***
***साचा मोती झरे लीला मोर चरे***

या गुजराती ओव्यांचा अर्थ असा होतो. "माझ्या अंगणी बाई शोभते तुळशीचे वृंदावन! त्या वृंदावनाशी तूपाचे निरांजन तेवते आहे. यातून तर ईश्वराचे दर्शन होईल. राम जिथे रमतो तिथे जणू खऱ्याखुऱ्या मोत्यांची माळ ओघळते. मोत्यांच्या माळा घरंगळल्या ना तिथे बाई हिरवे मोर फेर धरतात."

संध्याकाळी या पूजेसाठी गांधीजीही आलेत. आरती झाली. रोजच्या वेळेवर प्रार्थना झाली. नित्यनियमानुसार तुलसीरामायणाचा पाठ झाला. धूप-दीप उजळले. प्रार्थनेच्या वेळी दिवे घालवले जात. त्यासमयी दिव्याची झगमगती ज्योत अधिक उजळायची. अगरबत्तीचा लाल-तांबडा ठिपका सजून उठायचा. तुळशीचा शृंगार अवर्णनीय होता. यासमवेत प्रार्थना, रामधून, भजन झाले. सुशीलाताईंचे टाळ निनादायचेत. मीराताईंचा तंबोरा झंकारायचा. आजचे वातावरण तर रोजच्यापेक्षा खूप वेगळे होते. कस्तुरबाने भजन म्हणायला लावले होते 'दिलमा दिवो करो रे दीवो करो.' या संपूर्ण गुजराती पदाचा अर्थ आहे. "अंत:करणात दिवा लावा. बाबांनो-
-बायांनो दिवा उजळवा. काम-क्रोधाचा वंगाळपणा सोडा. दयेचे तेल, ध्यानसाधनेची वात सजवा. ब्रह्मतत्त्वाचा वह्नि प्रकटवा. खऱ्या अंत:करणपूर्वक दिवा लावा. अंध:काराचा विनाश होईल. ब्रह्मलोकाचे ज्ञान होईल. असा दीपक हृदयाकाशात प्रकटवा. जगदाकार धवळेल-उजळेल. त्याला डोळा भरुन बघता येईल. ज्ञानाची किल्ली मिळाली. कुलूप उघडले. आत्मज्ञानाची प्राप्ती झाली. यामुळे अवघे भूमंडळ उजळून निघाले.

२८ ऑक्टोबर रोजी कस्तुरबाची तब्येत खूप चांगली आहे. दाह अजिबात नाही. १ नोव्हेंबर कस्तुरबा खूप आजारी होती. गांधीजी दुपारी तीन ते चार वाजेपर्यंत तिला कटीस्नान करवायचे. तिला समाधान वाटायचे. या वयात तिची सेवा करायची संधी मिळायची. ते आनंदित असायचे. तिलाही याचे बरे वाटायचे. ती तल्लीन होऊन जायची. हसायची. गप्पा मारायची. गांधीजींचा वेळ आपल्यासाठी वाया जातो असे तिला वाटायचे. गांधीजींना मात्र तसे काही वाटत नसायचे.

"मला हे खूप बरे वाटते की या अवस्थेत मला बांच्या सेवेची संधी लाभत आहे. याचे मला पूर्ण समाधान आहे. बांनाही बरे वाटते. बा आता या आनंदात तन्मय झाल्या आहेत. त्या हसतात. मनमोकळेपणाने गप्पाही मारतात.

बा माझा वेळ वाचवू इच्छितात. मी त्यांना समजाऊन सांगितले आहे. की त्यांनी माझ्या कामांची काळजी करु नये. ते झाले तरी भले, न झाले तरी भले. बांना या स्नानामुळे फायदाही खूप आहे. सांगत होत्या की दाह तर खूप वर्षांपासून जाणवत होता पण आता तो दाह कुठे गेला कोण जाणे?" गांधीजी म्हणाले. एके दिवशी कस्तुरबाने आपली पेटी मागवली. छोटीशी पत्र्याची पेटी. त्याला ना कडी ना कोंडा. त्यात होत्या दोन साड्या. खादीच्या साड्या. गांधीजींनी कातलेल्या सुताच्या साड्या. एवढी कस्तुरबाची संपदा होती. हाच काय तो संग्रह. परिग्रह काय तो एवढाच. आपल्या संपत्तीची वाटणी ती करत होती. तिला मुलगी नव्हती. गांधीजींच्या म्हणवणाऱ्या खूप लेकी होत्या. सूना होत्या. नाती होत्या. पणतीही होत्या. कस्तुरबा क्षीण आवाजात म्हणाली.

'यातली ही एक साडी बघा ग मुलींनो, ही मला अखेरच्या प्रवासात नेसवायची.'

सोबतच्या सर्वांना उत्सुकता होती. आता दुसऱ्या साडीचे काय होणार? दुसरी साडी कुणाला मिळणार? 'आणि ही दुसरी साडी माझ्या लक्ष्मीसाठी.' कस्तुरबा आनंदाने म्हणाली.

कोण होती ही लक्ष्मी? ही दूदाभाई आणि दानीताईची कन्या होती. १९१५ साली साबरमतीला आश्रम स्थापन झाला होता. त्या वेळी हे सारे गांधीजींच्या आश्रमात आले होते. तिथे राहीले होते. ही वाटणी ऐकून सर्वांच्या डोळ्यात आसवे तरळली. कस्तुरबाने आपली संपदा अशी वाटून दिली. अखेरची साडी मिळाली हरिजन कन्येला.

३० नोव्हेंबर १९४३. कस्तुरबाची तब्येत चार दिवसांपासून चांगली नव्हती. काल स्नानगृहात तिला खूप अशक्तपणा वाटू लागला होता. तिने सुशीलाताईंना हाक मारली. सुशीलाताईंनी तिला स्नानगृहातून बाहेर आणले होते. स्वत:हून उठायची तिला हिंमत होत नव्हती. दम लागत होता.

ब्रिटिश सरकार गांधीजींवर नाराज होते. कस्तुरबा खूप आजारी होती. तिला एक वैयक्तिक परिचारक हवा होता. तो उपलब्ध करुन देण्यासाठी गांधीजी तळमळत होते. त्यांची इच्छा निसर्गोपचार चिकित्सा करवुन घेण्याची होती. आयुर्वेदिक औषधांचा उपयोग करवून घेण्याची होती. त्यांना निसर्गोपचारक वा वैद्य हवा होता. त्यांच्या सेवा हव्या होत्या. त्यासाठी त्यांनी खूप शक्ती खर्च केली. सरकारकडे वारंवार तक्रारी कराव्या लागल्या होत्या. कस्तुरबाला औषधोपचारातल्या सोई मिळत नव्हत्या. त्या उपलब्ध करुन देण्यात शोभा आणि औदार्याचा नितांत अभाव होता. हा अभाव तर खूपच खटकणारा होता. कस्तुरबा आत्यंतिक यातना भोगत होती. गांधीजी नि:सहायपणे बघत बसले होते. यामुळे कस्तुरबाचे स्थलांतरण केले जावे अशीही मागणी त्यांनी केली होती.[६]

१ डिसेंबर रोजी सुशीलाताई आणि डॉ. गिल्डर यांनी सरकारला पत्र लिहिले.

'कस्तुरबांची तब्येत चांगली नाही. त्यांना नियमित भेटीसाठी डॉक्टरांनी यायला हवे. त्यांच्यासाठी नियमित भेटीची व्यवस्था केली गेली पाहिजे. ती औषधरुप ठरणार आहे.'

सरकारला पाठवण्यासाठी पत्र तयार केले होते. गांधीजींची मालिश सुरु होती. यावेळी सुशीलाताईंनी गांधीजींना सांगितले. गांधीजींनी डॉ. गिल्डर यांना सांगितले. डॉक्टरांना जर हे पत्र पाठवणे आपला धर्म वाटत असेल तर पाठवावे. पत्र पाठवायचे असेल तर ते लवकरच पाठवायला हवे. आज कस्तुरबाची तब्येत बिघडली आहे. आणिक दोन आठवड्यानंतर चांगलीही होऊ शकते. दुसऱ्यांदा बिघडेल तोवर वाट बघायला पाहिजे. मुलाखती त्यांच्यासाठी औषधरुप ठरणार होत्या मग त्या कामी विलंब का केला जावा? कस्तुरबा दर खेपेला संकटातून बाहेरच पडतील असे मानण्याचे काही कारण नाही. अखेर डॉ. गिल्डर सांगू लागले 'आम्ही डॉ. शहा यांना सर्व परिस्थितीची कल्पना देऊ. त्यांनी स्वत:हून लिहिले तर ते अधिक चांगले होईल.' डॉ. शहा आज आले नाहीत. गांधीजी काही करु शकले नाहीत. ३ तारखेला कस्तुरबाची तब्येत काहीशी बरी होती. डॉ. शहा येऊन सांगू लागले की त्यांनी कस्तुरबांच्या सुटकेविषयी कळवले आहे. डॉ. गिल्डर यांनी सांगितले की त्यांना सुटका नको आहे. मुलाखतीसाठी सवलत देण्याविषयी लिहायला हवे होते. यामुळे कस्तुरबांचे

मन काही अंशी शांत झाले असते. कदाचित डॉ. शहा याविषयी लिहितील.

४ डिसेंबर शनिवार. आज महादेवभाईच्या बलिदानाचा दिवस आहे. काल रात्री कस्तुरबाची तब्येत खूप खराब होती. श्वासाच्या त्रासामुळे झोप कमीच झाली. सकाळी खाटेवरच त्यांचे मुखमार्जन वगैरे करुन द्यावे लागले होते. आज त्या खूप घाबऱ्या-घुबऱ्या झाल्या. एकदा सांगू लागल्या 'बस, आता मी चार-पास तासांची सोबतीण आहे.' सायंकाळी काहीसे बरे वाटू लागले. सकाळी कटेली साहेब येऊन विचारुन गेले की त्या कुणा-कुणाला भेटू इच्छितात? गांधीजींनी लांबलचक यादी दिली. आठवले तर आणखी नावे देऊ असे म्हणाले. गांधीजींचा रक्तदाब वाढला होता. ५ तारखेला भंडारी आणि डॉ. शहा आलेत. सरकारने देवदास आणि रामदास यांना भेटीला येण्याच्या संदर्भात तार पाठवल्याचे कळले. रामदासने नीमू-निर्मला वहिनी आज दुपारपर्यत पोहोचणार असल्याचे फोनवरुन कळवले. त्यांना स्वत:ला व मुलांना येता येणार नाही, असे म्हणाले. सरकारच्या तारेमुळे ते लोक खूपच घाबरुन गेले होते.

तब्येत आज चांगली होती. रात्री झोप चांगली लागली होती. मुलाखत होईल या आशेने तिच्या तब्येतीत चांगली सुधारणा झाली होती. निर्मला वहिनी तर सायंकाळी सव्वा सहा वाजता आल्यात. तासाभराची मुलाखत होती. फक्त कस्तुरबा आणि गांधीजींना तिथे थांबायला परवानगी होती. श्री कटेली संपूर्ण वेळ हजर होते. देवदास उद्या येणार असल्याचे कळले. कस्तुरबाच्या मुलाखती संदर्भात त्यांनी सरकारला एक पत्र लिहिले. ते न पाठवण्याचे ठरले. देवदास आज दुपारी पुण्याला पोहोचत आहे. ही बातमी वृत्तपत्रात पाहिली. सायंकाळी भोजनाच्या दरम्यान देवदास आल्याची बातमी कळली. 'आज गांधीजींचा मौन दिवस असल्यामुळे उद्या यावे.' असे कस्तुरबाने कळवून दिले होते. गांधीजींनी आजच यायला सांगितले.

'रात्रीतूनच जर बांचे काही बरे-वाईट झाले तर?' गांधीजींच्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती.

मौन सुटल्यावर रात्री समजाऊ लागले. "महादेवने जाताना का तासाभराचीही नोटीस दिली होती? तो तर काही आजारी नव्हता पण आपण सारे जाणतो की बा तर कुठल्याही दिवशी, कुठल्याही क्षणी नोटीस न देता जाऊ शकते. कुठे काही अभद्र घडले तर मग मनात दु:ख आणि पश्चात्ताप राहून जाईल. देवदास तर बांना भेटायला येत आहे., मला नव्हे. माझ्या मौनासाठी त्याला रोखणे योग्य नव्हते." गांधीजी म्हणाले.

कस्तुरबाच्या छातीत अधिक वेदना होऊ लागल्या होत्या. काही वेळाने तिची तब्येत काहीशी बरी जाणवू लागली होती. यामुळे सारे फिरायला गेले. प्रार्थनेनंतर सर्वांनी सूतकताई केली होती. कालपासून कस्तुरबाने आत झोपायला सुरुवात केली. यामुळे प्रार्थना आत झाली.

८ डिसेंबर रोजी कस्तुरबाची तब्येत चांगली नव्हती. दिवसभर तर काहीशी बरी होती. सायंकाळी जास्त बिघडली. पोटात त्रास होत होता. प्यारेलालनी तिला उचलून आत आणले. सायंकाळीही काहीसा त्रास झाला. जीव घाबरत होता. आता कस्तुरबाला एक मिनिटही एकटी सोडायला नको असे सुशीलाताईंनी ठरवले. गांधीजींचा रक्तदाब कधी-कधी अधिक असायचा. आपल्याला कस्तुरबाची खूप काळजी लागून राहिली असल्याचे ते सांगत होते. 'बांना सोबत घेऊन तुरुंगातून बाहेर पडेन अशी मला आशा वाटत होती पण आता ती आशा मावळली आहे.' गांधीजींचा स्वर घनव्याकुळ होता.

८ डिसेंबर १९४३ साल होते. कस्तुरबाचा धाकटा भाऊ माधवदास तिच्या भेटीसाठी आला होता. त्याच्या पत्नीचे निधन झाले होते. तो एकटाच होता. तसे आता दोघेच उरले होते, एकटा भाऊ व त्याची दु:खी-कष्टी बहिण. दु:खावेगामुळे दोन मिनिटे नीरव शांततेत गेली होती. कुणी काही बोलले नव्हते. माधवदासने थोरल्या बहिणीला नमस्कार केला. "किती वाळलास रे भाऊ. रामाचे स्मरण करत जा. सोड सारी चिंता. 'हरिने भजता हजी कोईनी लाज जती नथी जाणी रे.' अरे भाऊ देवाला भजणाऱ्या कुणाची लाज गेली असे अजून तरी घडले नाही." कस्तुरबा भाऊला म्हणाली होती.

कस्तुरबाने मामाला चहा द्यायला लावले. चहा आला. देवदास आणि निर्मला यांनी नागपुरहून भेट पाठवली होती. भेट होती थंडीसाठी मेथीचे लाडू. ते सारे तिने माधवदासला देऊन टाकले. म्हणाली ‘घेऊन जा. नीमूने आणलेत. खाशील. निरर्थक चिंता करु नकोस. उरलेले आयुष्य ईश्वर भजनात घालव. जमेल तेवढे हरिनाम घे.’ निरोप घेताना दोघाना भरुन आले. तिचे मन बालपणीच्या आठवणीत रमून गेले.

संदर्भ


१) कस्तुरबाने काशीताईला दिनांक १६ मे १९४३ रोजी लिहिलेले पत्र;

२) कस्तुरबाने काशीताईला दिनांक सोमवार २६ मे १९४३ रोजी लिहिलेले पत्र;

३) कस्तुरबाने काशीताईला दिनांक २ ऑगस्ट १९४३ रोजी लिहिलेले पत्र;

४) कस्तुरबाने काशीताईला दिनांक ९ ऑगस्ट १९४३ रोजी लिहिलेले पत्र;

५) कस्तुरबाने आगाखान कारावासातून नात जावई कुंवरजी यांना दिनांक ९ ऑगस्ट १९४३ रोजी लिहवलेले पत्र;

६) गांधीजींनी मुंबईच्या तुरुंग महानिरीक्षकांना लिहिलेले दिनांक १६ फेब्रुवारी १९४३ चे पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २४४ -२४६.


❖❖❖

## २२) निघते मी आता

१९४३ साल संपले. जीवन-मरणाच्या दोन ध्रुवांवरची कस्तुरबाची यात्रा होती. ती मरणाच्या वेशीला स्पर्श करत होती, परत येत होती. तुरुंगातील उदास वातावरण भकास बनत चालले होते. कारागाराच्या उंचच उंच भयाण भिंती अधिक भयकारी वाटत होत्या. अधिकाधिक निष्प्राण वाटत होत्या. कुटुंबवत्सल कस्तुरबा कुटुंबीजनांची वाट बघत असायची. त्यांच्या भेटीने आनंदी व्हायची. ती विश्वकुटुंबाची आई होती.

१९४४ उजाडले. तारीख २ जानेवारी १९४४.

'मकर संक्रांती आली. तिळ मागवा. लाडू करा. सर्व कैद्यांना तिळगूळाचे लाडू वाटा.' कस्तुरबा म्हणाली.

'अहो, असे का कुठे जेलमध्ये करता येते? ही सगळी घरी करायची कामे आहेत.' गांधीजी म्हणाले

'पण मला कुठे आता परत घराला जायचे आहे.?' कस्तुरबा म्हणाली. दुसऱ्या दिवशी तिळ आली. तिळाचे लाडू तयार झाले. १४ जानेवारीला संक्रांतीनिमित्त सर्वांना वाटायचे होते. कस्तुरबा चाकांच्या खुर्चीत बसली. सर्वांना तिळाचे लाडू वाटले.

२७ जानेवारी १९४४ रोजी गांधीजींनी भारत सरकारला पत्र लिहिले.

"काही दिवसांपूर्वी कस्तुरबांनी जेलचे इन्स्पक्टेर जनरल आणि कर्नल शाह यांना सांगितले की पुणे येथील डॉ. दिनशा मेहता यांना उपचारासाठी बोलावण्यात यावे. तिच्या या विनंतीचा काहीही उपयोग झाला नाही. ती सातत्याने मला विचारत रहात आहे. की याविषयी मी सरकारला काही लिहिले की नाही? यामुळे मी डॉ. मेहताना त्वरित बोलावण्यात यावे, अशी विनंती करत आहे. तिने मला आणि तिच्या मुलालाही सूचित केले आहे. की तिला आयुर्वेदिक औषधौपचाराची सोय करण्यात यावी. ही विनंती अर्जंट मानली जावी. किमान तीन मदतनीस डॉक्टर्स हवेत."[१]

फेब्रुवारी महिना उजाडला. हा घातक महिना होता. कस्तुरबा हळूहळू थकत चालली होती. तिच्यासोबत आता चोवीस तास कुणाची-ना-कुणाची तरी हजेरी आवश्यक होती. ४ फेब्रुवारी रोजी तिने कुणा वैद्याला बोलावण्याची मागणी डॉ. शहा यांच्यापुढे केली. या पूर्वीही अशी विनंती दोन-एकदा केली होती. गांधीजींचे सरकारला एक पत्र होते. त्यावर सरकारी डॉक्टर विचार करतील असे उत्तर आले होते. मुलाखतीच्या वेळी किती लोकांनी हजर रहावे? याविषयीचा निर्णय इन्स्पेक्टर जनरल करणार होते. व्हाइसरॉयचे उत्तर आले नव्हते. 'हे चांगले लक्षण नाही. काय करायला हवे असा विचार ती मंडळी करत असतील? 'मीराताई म्हणाल्या.

'छे, व्हाइसरॉय दिल्लीत मुळी नव्हताच, असे मी वृत्तपत्रात वाचले होते.' कस्तुरबा म्हणाली. ५ फेब्रुवारी १९४४ रोजी तब्येत खूप बिघडली. कस्तुरबा स्वत: खूप घाबरुन गेली. सांगू लागली 'निघते ग मी आता.' गीता पाठही झाला. सरकारने एक सूचना केली. डॉ. दिनशा मेहता जेव्हा येतील त्यावेळी बांच्या जवळ कुणीही राहू नये. हे ऐकून गांधीजीही विचलित झाले. नंतर खुलासा करण्यात आला. बांच्या सेवेत असतील ते तिथे थांबतील. बांच्या प्रकृतीविषयीची माहिती डॉक्टरांना देऊ शकतील, हे कळले. गांधीजींनी सरकारला लिहिलेले पत्र फाडून टाकले.

कस्तुरबाने मुलाला पत्र लिहिले.

चि. हरीलाल,

तुझे पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. तुला पत्र लिहवून घेताना उशीर होत आहे. माझी तब्येत आहे. तशीच आहे. तू काळजी करु नकोस. तिथे किती काळ राहणार आहे.स? मनू, रामी, कुंवरजी - लेकरांना माझे आशीर्वाद.

तुम्हा सर्वांना बाचे आशीर्वाद.[२]

हे कस्तुरबाचे अखेरचे पत्र आहे. आपल्या थोरल्या मुलाला लिहिलेले अखेरचे पत्र! आपली खुशाली कळवणारे पत्र! त्याची काळजी वहाणारे पत्र! सर्वांना आशीर्वाद देणारे पत्र !!

वैद्यांना आणायला उशीर होत होता. सहा तारखेला याविषयी आपण सरकारला कळवू असे कर्नल भंडारी म्हणाले होते. या संदर्भात ते सरकारला कळवणार होते. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात बाच्या पायांवर

सूज आली होती. तिला झोप तर नव्हतीच. तिचा स्वरही कारुणिक झाला होता. किती दिवस झुंज चालेल असा प्रश्न परिचारिकाना पडला होता. वैद्यांना बोलावण्यासाठी दिल्लीपर्यंत फोन केले गेले होते. परिणाम शून्य होता. वैद्यांना बोलावण्याविषयी गांधीजी परत सरकारला लिहिणार होते. या दरम्यान भंडारी म्हणाले. वैद्य वा हकीम यांना गांधीजींच्या जोखिमीवर बोलवायची सूट आहे. गांधीजींनी पुण्याहून कुणा वैद्यांना आणि दिल्लीहून पंडित शिव शर्मा यांना तार करायला सांगितले.

कस्तुरबाची तब्येत कोसळत चालली होती. सरकार कमालीचे निष्ठुर होते. या मागणीकडे निरादराने बघत होते. सरकारची अक्षम्य बेपर्वाई होती. कमालीचा निष्काळजीपणा होता. दोन-तीनदा विनवण्या झाल्यात. एक आठवडा लोटला मग कुठे काही प्रमाणात मागणी पूर्ण करण्यात आली.

पुण्याचे वैद्य जोशी पाच तारखेला आलेत. दोन प्रकारची औषधे देऊन गेलेत. या औषधांशिवाय दुसरे कोणतेही औषध देऊ नये अशी ताकीद दिली. यामुळे दिल्लीहून शिव शर्मा येईपर्यंत कोणतेही औषध न देण्याचा निर्णय गांधीजींनी घेतला.

बारा तारखेला दुपारी शिव शर्मा येऊन पोहोचले. त्यांचा औषधोपचार सुरु झाला. तेरा तारखेला रात्री बेचैनी वाढली. शिव शर्मांना फोन केला. लघवी न झाल्यामुळे त्रास वाढला असल्याचे ते म्हणाले. रात्री बेचैनी खूप वाढल्यामुळे कस्तुरबाने खाट वा खोली बदलून देण्याविषयी खूप आग्रह धरला. औषध घेण्याविषयीही तिची वारंवार  समजूत घालावी लागत होती. तेरा तारखेला दिवसभर शिव शर्मा तिच्या सोबतच राहिलेत. संध्याकाळी गेले. परत रात्री आले. त्यांना गेटमधून आत येऊ दिले गेले नाही. गरज भासल्यास येता येईल या भावनेने ते रात्रभर गेट बाहेर गाडीतच पडून राहिलेत. चौदा तारखेलाही शिव शर्मा गाडीतच झोपले. डॉ. गिल्डर आणि सुशीलाताईंनी कस्तुरबाला तपासले. त्यांना तब्येत यथावत वाटली. पंडित शिव शर्मा त्यांच्या मताशी सहमत झालेत.

गांधीजींनी या बाबतीत व्हाइसरॉयशी प्रदीर्घ पत्र-व्यवहार केला.

१४ फेब्रुवारी १९४४ रोजी पत्र लिहिले. पत्राच्या अखेर लिहिले -

'मी माझ्या पत्नीच्या आजाराविषयी काहीही मदत करु शकत नाही. मजवर कृपा करावी. मला दुसऱ्या जेलमध्ये ठेवण्यात यावे. माझ्या पत्नीच्या घोर वेदनांचे मला किमान मूक साक्षीदार तरी बनू देऊ नये !'[३]

पंधरा फेब्रुवारीला कस्तुरबाला बरे वाटत होत. रात्र बेचैनीत गेली. तब्येत अशी चिंताजनक होती. नव्या व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांना लिहायचे होते. गांधीजींनी पत्राचा खर्डा तयार केला. सोळा तारखेला शिव शर्मा म्हणाले की आजवर ते भीत होते पण आता यथाशक्य ते सारे करतील. लघवी झाली नाही आणि तब्येतीला उतार पडला नाही तर ते दुसऱ्या चिकित्सकांना संधी देतील. सतरा तारखेच्या रात्री बाने भजने ऐकलीत. क्वचित् भजनात सहभागही घेतला. दुपारी सरकारपाशी अर्ध्या तासाची परवानगी मिळवून हरीलाल आला. दोन भावांमधला हा सरकारी भेदभाव कस्तुरबाला आवडला नाही. गांधीजींनी हरीलालला रोज भेटीला येता येईल अशी सोय करुन दिली. पुण्यात डॉ. मेहता यांच्या क्लिनिकमध्ये त्याच्या निवासाची सोय करुन दिली होती. हरीलालने धर्मशाळेत रहाणे पसंत केले. हरीलालला रोज येण्याची परवानगी मिळाली. आपण डॉ. मेहता यांच्याकडे असल्याचे तो सांगून गेला होता. आपल्याशी तिथे फोनवर संपर्क करावा असेही सुचवले होते.

गांधीजींनी सुशीलाला सल्ल्ला दिला की कस्तुरबा तिच्या देखरेखीखाली येतील तेव्हा औषधोपचार बंद करावा. या सल्ल्यासंबंधी सुशीलाने नाराजी व्यक्त केली. अठरा तारखेला पहाटे वैद्य आले. कस्तुरबाच्या उपचारात त्यांना यश न लाभल्याच्या चिंतेमुळे त्यांना रात्रभर झोप आली नव्हती. डॉक्टरांनी उपचार केले. कस्तुरबाना लघवी झाली नाही. डॉक्टर मंडळी निराश झाली.

वीस फेब्रुवारीला कस्तुरबा आपला निरोप घेताहेत असे सर्वांना वाटत होत. ती कमालीच्या करुण स्वरात 'हे राम, हे राम' असे म्हणत होती. एक वाजता तिची नाडी गडबडली. हळूहळू धडपणे चालू लागली.

कस्तुरबा रोज हरीलालची वाट बघायची.

'हरी कुठे आहे.? हरीला बोलवा. देवा तर मला भेटून गेला. माझा हरी का नाही आला अजून?' कस्तुरबा विचारत रहायची.

२१ तारखेला हरीलाल आला. कस्तुरबाचा अशक्तपणा खूप वाढला होता. ती ज्या हिंमतीने मानसिक व शारीरिक श्रम झेलत होती ते खरोखरच आश्चर्यकारक होते. कस्तुरबा हरीलालकडे वळली.

'किती वाट बघायला लावलीस रे माझ्या बाळा. काल का नाही आलास?' कस्तुरबाने विचारले.

'मला दुपारी झोप लागून गेली होती.' हरीलाल उत्तरला. कस्तुरबाला या वाक्याचा अर्थ कळला होता. ती मनोमन खूप कष्टी झाली. हरीलालला बघून उद्वेगाने ती आपले डोके आदळून घेऊ लागली. हरीलालला बाजूला केले गेले.

२१ फेब्रुवारी १९४४ रोजी रात्री झोपेचे औषध दिले. बारा वाजेपर्यत गाढ झोप आली. बेचैनी पुनश्च सुरु झाली. ऑक्सिजन दिल्यावर ती परत झोपी गेली. सव्वा सहाच्या सुमारास सकाळी देवदास वगैरे आले. त्यांना भेटून कस्तुरबा रडू लागली. मनूही रडू लागली. 'मनूने भजन गावे का?' असे सुशीलाताईने विचारले. कस्तुरबाने होकार दिला. मनू गायला लागली. दोघांचे रुदन बंद झाले. कस्तुरबा देवदासलाही भेटून रडली. म्हणाली 'बापू तर साधु आहेत. त्यांना खूप कामे आणि प्रचंड जबाबदाऱ्या आहेत. यामुळे तू सर्वांचा सांभाळ कर.'

२१ फेब्रुवारी. सबंध रात्रभर एकाधिक माणसे तिच्यासोबत बसून राहिलीत. गांधीजी दोन वेळा येऊन बसले. त्यांना त्रास होईल या भावनेने कस्तुरबाने त्यांना अधिक वेळ थांबू दिले नाही. रात्री दिड वाजता गांधीजी उठले. कस्तुरबाचे दोन रुमाल स्वच्छ करण्यासाठी आपल्याजवळ घेऊन गेले. सुशीलाताईंनी ते परत घ्यायचा प्रयत्न केला.

'मलाच स्वच्छ करु दे.' गांधीजी म्हणाले.

हा सेवेचा अभिनव मार्ग होता. ही सुश्रूषेची वेगळी वाट होती. सुशीलाताई निरुत्तर झाल्यात. कस्तुरबा बेचैन होती. तिला गांधीजींची काळजी वाटायची.

'मनू, गूळ तयार केला का?' कस्तुरबाने विचारले.

'होय. तू काळजी करु नकोस.' मनू म्हणाली.

'अगं, असे बघ, गूळ संपून गेला आहे.' कस्तुरबाच्या स्वरात कातरता होती.

'हो, मला माहिती आहे. ग सारे.' मनू निश्चिंतपणे म्हणाली. 'तू दुसरा तयार केलास का? हे बघ दूध-गुळाची व्यवस्था कर.' कस्तुरबा व्यवस्थेची आग्रही होती. 'मी सारे करत आहे. माझे लक्ष आहे. तू काळजी करु नकोस.' मनूने ठामपणे सांगितले.

कस्तुरबा गांधीजींच्या गुळाची काळजी वहात होती.

"मी निघते आता. रडू नका. माझ्यासाठी कुणी शोक करु नका. खूप सुख भोगले मी. आता मला शांतता वाटत आहे. मृत्युची भेट हा जीवनातील एक अत्युत्कट आणि भव्य प्रसंग आहे. मी गेल्यावर लाडू वाटा." कस्तुरबा म्हणाली.

२१ तारखेच्या रात्रीपासून कस्तुरबाला पाणी पिण्याविषयी अरुची जागली होती. देवदास गंगाजळ घेऊन आला होता. हे ऐकले. तिने ओठ किंचित विलग केले. लगेच घोट घेतला. 'पुरे !' असे म्हणाली. थोड्या वेळाने परत गंगाजळ घेतले. त्यात तुळशीची पानेही होती. गीता पारायण झाले. मगनलालभाई गांधींच्या पत्नी संतोकताई आणि मनू यांनी बांना भजने ऐकवलीत.

देवदास येऊन पोहोचला होता. याचे कस्तुरबाला समाधान होते. कुणीतरी बातमी दिली 'रामदासही येऊन पोहोचला आहे.' यावर 'काय गरज होती? 'असे ती म्हणाली. रामदासला प्रवासाचा खर्च करावा लागला. याची तिला काळजी होती.

पेनिसिलीन येऊन पोहोचले होते. दुपारी तब्येत खूप बिघडली होती. गांधीजींनी पेनिसिलीन देऊ दिले नाही. ते वापरले गेले नाही. काहीशी स्थिती सावरली. त्याचा उपयोग करावा अशी देवदासची इच्छा होती. पेनिसिलीनची इंजेक्शने वारंवार द्यावी लागतात. हे काही गांधीजींना त्यावेळी ठाऊक नव्हते.

'डॉ. गिल्डर आणि सुशीला ठरवत असतील तर द्याल की!' गांधीजी म्हणाले.

डॉक्टर्सही या संबंधात अंतिम निर्णय घेऊ शकत नव्हते. सुशीलाताई विचार करत राहिल्या होत्या. औषध हाताशी आहे. पण उपयोग करता येत नाही. हे केवढे

नैराश्य ! विनाकारण इंजेक्शन्स द्यावी लागणार नाहीत हे केवढे समाधान!! सुशीलाताई लिहिते "कस्तुरबांना आता वाचवण्याचा उपाय हाती असूनही त्याचा उपयोग करत नाही यामुळे मी निराश बनले आहे. यासोबत या गोष्टीचे समाधानही लाभले की बांच्या शरीराला अकारण छेदावे तर लागणार नाही."

कस्तुरबाच्या सेवेकऱ्यांची ही द्विधा स्थिती होती! यात खोल आत्मीयता होती. गहन वेदना होती. पराभूत भाव होता. नियतीशरणता होती.


संदर्भ

१) गांधीजींनी भारत सरकारला दिनांक २७ जानेवारी १९४४ रोजी लिहिलेले पत्र 'गांधीज कॉरस्पाँड्स विथ द गवर्नमेंट';

२) कस्तुरबाने हरीलालसाठी दिनांक ७ फेब्रुवारी १९४४ रोजी लिहवून घेतलेले पत्र;

३) गांधीजींनी तुरुंग महाअधिक्षक यांना दिनांक १४ फेब्रुवारी १९४४ रोजी लिहिलेले पत्र.


❖❖❖

## २३) महापरिनिर्वाण

२२ फेब्रुवारी उजाडली. आला तो काळा दिवस ! कस्तुरबा प्रार्थना करु लागली ‘हे कृपाळू रामा, आता तर तुझी भक्ती हवी. तुझेच प्रेम हवे. हे भगवान, गुरासारखे पोटाला तडस लागेल तोवर खाल्ले आहे. क्षमा करशील.’

२२ फेब्रुवारी १९४४ साल. आज कस्तुरबाने मुखमार्जन करायला नकार दिला. सुशीलाताईंनी ग्लिसरीनने तिची जिभ स्वच्छ करायचे प्रयत्न केले पण व्यर्थ! सायंकाळी फिरायला निघायच्या आधी गांधीजी कस्तुरबाजवळ आले. थोड्या वेळाने विचारले ‘येऊ का फिरुन?’ तिने नकार दिला. सदा ‘फिरुन या.’ असे ती स्वतःच म्हणायची. आज मात्र थांबवून घेत होती. गांधीजी तिच्या खाटेवर बसले. देवदासची सरकारच्या सचिवांशी चर्चा झाली होती.

‘आम्ही बांची सुटका करुन दिली. बाहेर पडल्यावर त्यांची तब्येत अधिक बिघडली. तरीही सरकारने गांधीजींची सुटका केली नाही तर तुम्हाला ती तुरुंगाच्या निष्ठूरतेची पराकाष्ठा वाटेल.’ सचिव स्पष्टपणे म्हणाले होते. गांधीजींवर दया दाखवून सरकार कस्तुरबाची सुटका करु इच्छित नव्हते. कस्तुरबा गांधीजींच्या मांडीवर शांतपणे विसावली होती. हे दृश्य कॅमेऱ्याने सुरक्षित करुन घ्यावे असे डॉ. गिल्डर यांना वाटले. यासाठी गांधीजींची परवानगी विचारायला हवे होते. त्यांना काही हिंमत झाली नाही. ‘देवदास कस्तुरबाचे छायाचित्र घेऊ इच्छित होते. सरकारने याविषयीचा आपला अभिप्राय जाणून घ्यायला मला पाठवले आहे.’ भंडारींनी येऊन गांधीजींना विचारले.

‘माझ्याशी संबंधित हा विषय असेल तर मला अशा गोष्टींची पर्वा नाही पण मुले, नातलग आणि मित्र यांचा छायाचित्रासाठीचा आग्रह स्वाभाविक आहे. यामुळे सरकारने अनुमती द्यावी असे मला वाटते. आजकाल तर छायाचित्र घ्यायची पध्दतच झालेली आहे.’ गांधीजी शांतपणे उत्तरले.

‘छायाचित्र घेणे वा न घेणे आपल्या दृष्टीने सारख्याच गोष्टी आहेत. असे मी सरकारला कळवू ना?’ भंडारी यांनी विचारले. ‘होय, या दोन्ही गोष्टी मला सारख्याच वाटतात. मित्रांचा हा अर्ज स्वीकारण्यात सरकारची शोभा आहे. असेही मला वाटते.’ गांधीजी म्हणाले होते.

कस्तुरबाला न्युमोनिया होता. या रोगाचे जंतू हवेतून पसरत असतात. डॉ. गिल्डर काळजी करत होते. गांधीजी तिथे अधिक वेळ न थांबतील तर बरे असे त्यांना वाटले. गांधीजींना सांगायची काही कुणी हिंमत करत नव्हते. अखेर हिंमत करुन ते म्हणाले ‘बांच्या जवळ अवश्य बसा पण त्यांच्या मुखानिकट मात्र बसू नका.’ रात्री साडे अकरा वाजेचा सुमार होता. नाडी अतिशय मंद चालत होती. हाताला लागत नव्हती. सुशीलाताई प्रभावतीताईंना हाक मारायला निघाल्या. तो लगेच नाडी व्यवस्थित लागली होती.

प्रभावतीताई कस्तुरबाच्या निकट बसलेल्या होत्या. कस्तुरबा ‘बापू !’ असे बोलल्या असा त्यांना भास झाला. त्या गांधीजींकडे निघाल्या. त्या दिवशी गांधीजींना फिरायला जाताना अंमळ उशीर झाला होता. निघणारच होते तेवढ्यात प्रभावतीताईंनी हाक मारली. गांधीजींनी जवळ येऊन विचारले ‘काय होत आहे.?’ अत्यंत करुण स्वरात त्या बोलल्या ‘काही कळत नाही हो !’ नाडी खूप मंद सुरु होती.

कस्तुरबाचे बंधू माधवदास आले होते. त्यांना ओळखले असावे असे गांधीजींना वाटले. डोळे भरुन आले. बोलणे मात्र काही झाले नाही. ती उठायचा प्रयत्न करत होती. हा अखेरचा प्रयत्न होता. गांधीजी तिला झोपून रहायला समजावून सांगत होते. नेत्र निस्तेज झाले होते. घशाला अखेरची घरघर लागली होती. अचानक श्वास घ्यायला मुख उघडले. चार-दोन श्वास घेऊन ती भवबंधनातून मुक्त झाली. खोकताना कस्तुरबा डोके टेकत, ते लाकडी स्टूल गांधीजींनी मागून घेतले. कस्तुरबाच्या गळ्यात शेवटपर्यंत असलेली पवित्र मण्यांची माळ त्यांनी लक्ष्मीला देण्याचे ठरवले. साबरमती आश्रमापासून त्यांच्या समवेत असलेली ही दलित कन्या होती. ही कस्तुरबाची अत्यंत लाडकी मुलगी झाली होती.

कस्तुरबाने जीवन तर जगून दाखवले होतेच. मरणही खरे करुन दाखवले. जगभर अक्षरे थरथरलीत. मने होरपळून गेलीत. पावले थिजलीत. हात निस्तब्ध झालेत. अंतःकरणे व्यथेने भारली गेलीत. कस्तुरबाने तुरुंगात मरण पत्करले. तिची नश्वर काया उरली होती. मंदिरात सायंकाळची आरती सुरु होती. शंखनाद सुरु

होता. रात्री बारा वाजेपर्यंत प्रार्थना चालली. गीता पठन सुरु होते. तिचा चेहरा तेजोमय होता.

कस्तुरबाचा सस्मित चेहरा. शांत-स्निग्ध जळत्या ज्योतीसारखा तेजाळत होता. दशदिशा स्तब्ध झाल्यात. चंद्राच्या सोळा कला असतात. सोळावी कला अमृता. अमृता ही अमावस्येची कला आहे. ही चंद्राची अमृता कला होय. याचा अर्थ मरण नव्हे. सूर्य बिंबातळी संपूर्ण चंद्रमा झाकला जातो. तरी चंद्रमा संपूर्ण उरतो. यानंतरही चंद्रमा हसत रहातो. ती त्याची अमृता कला. मरणाला नाकारणे ही अमृता कला. मरणावरची विजययात्रा ही अमृता कला. जीवनाचा स्वीकार हेच अमृततत्त्व. कस्तुरबाच्या ठायी हे अमृततत्त्व होते. गळून पडण्यापूर्वी पुष्प आपला सारा सुगंध पसरुन देते. विखरून जाण्याची तयारी करते. हा पुष्पाचा संन्यास आहे. त्याच्या पाकळ्या कोमेजू लागतात, देठ खाली वाकतो. सूर्यास्त येतो. देठ गळण्याच्या बेतात असतो. सुगंधाचे वितरण करण्याचे काव्य प्रकट होत असते. असेच काव्यमय, सुगंधी आणि प्रार्थनासंपन्न विसर्जन कस्तुरबाचे झाले. तिचा जीवनग्रंथ पूर्ण झाला. आता अनुक्रमणिकेवर बोट ठेऊनच आपल्याला तिचा जीवनार्थ शोधावा लागेल.

२३ फेब्रुवारी १९४४. महादेवभाईचा अंत्यसंस्कार करणारा ब्रह्मवृंदच परत आला. कटेली यांनी शवासाठी शुध्द खादी मागवली होती पण ‘खादी व्यर्थ जाळू नका. ती गोर-गरीबांना उपयोगाला येईल.’ असे म्हणून गांधीजींनी हा प्रस्ताव नाकारला. गांधीजी भंडारींना सांगू लागले.

“बा आपले वैभव घेऊन निघून गेल्या, आता माझे राज्य आहे. तिच्यासाठी मी अनेक गोष्टींना सहन करुन घेतले. मला आता तसेच करायची गरज नाही. माझ्यासाठी मित्र आणि नातलग यात भेद नाही. तुम्ही साक्षी आहात की मी माझ्या पत्नीच्या या भयंकर, दुर्धर अशा आजारात कुठलाही राजकीय फायदा न करुन घेण्याचे सतत प्रयत्न केले आहेत. सरकारला जे काही करायचे आहे. ते शोभनीय प्रकारे व्हावे, अशी माझी इच्छा आहे. आजवर या शोभनीयतेचा अभाव आढळून आला आहे. किमान तिच्या मृत्युनंतर तरी सरकार जे काही करील ते भलेच असेल, अशी आशा मनी धरणे काय मोठी गोष्ट ठरेल?’’

भंडारींनी विचारल्यावर ‘मित्रांची संख्या शंभर होईल. कुणी यावे आणि कुणी येऊ नये हे देवदास ठरवील.’ गांधीजी म्हणाले.

अंत्यक्रिया महादेवभाईंच्या अंत्यक्रियेप्रमाणेच आगाखान महलच्या परिसरात झाली. गांधीजींनी सरकारला तीन पर्याय दिले होते. कस्तुरबांच्या निधनानंतर त्यांच्या अंतिम संस्काराविषयी गांधीजींनी सरकारला निवेदन केले.

१) प्रेत माझ्या पुत्रांना व नातलगांना सोपवून देण्यात यावे. याचा अर्थ असा आहे. की अंत्यसंस्कार सार्वजनिकरित्या व्हावा यात सरकारकडून कुठलाही हस्तक्षेप केला जाऊ नये.

२) असे करणे जर शक्य नसेल तर महादेव देसाई यांच्या अंत्य-संस्काराप्रमाणे केला जावा. दाह-संस्कार समयी केवळ नातलगांनाच उपस्थित राहू दिले जाणार असेल तर माझ्यासाठी नातलगांच्या तुल्य असणाऱ्या तमाम मित्रांना जर उपस्थित राहू देणार असाल तर मी या कृपेचा स्वीकार करीन.

३) सरकारला जर हेही मान्य नसेल तर ज्या लोकांना कस्तुरबांना बघण्यासाठी परवानगी दिली होती त्या सर्वांना मी परत पाठवीन आणि केवळ कँपनिवासी जनच (नजरबंद लोक) अंत्यसंस्कार प्रसंगी उपस्थित रहातील.

गांधीजींनी शांततेची खात्री दिली. गांधीजी, सुशीला आणि प्रभावतीने प्रेताला स्नान घातले. गांधीजींच्या हाताने कातली-विणलेली लाल काठाची साडी नेसवण्यात आली. गीता पाठ झाला. गांधी म्हणाले होते ‘गीता पाठ सस्वर झाला नाही तर मी मध्येच थांबवीन.’ पाठ दीड एक तास चालला होता. देवदासने सुरुवात करवली होती. पाठ पूर्ण झाल्यावर गांधीजींनी समाधान व्यक्त करत म्हटले होते ‘खूप छान झाला पाठ. खूप मधुर होता.’ गांधीजींनी त्या अनश्वर आत्मतत्त्वाला अखेरचा प्रणिपात केला.

मुंबईहून मित्र पोहोचू शकतील तोवर अग्निसंस्कार थांबवावेत असे कुणीतरी सूचवले. गांधीजींनी सरकारशी मित्रांच्या मताविषयी चर्चा केली. त्यावेळी पुण्यातील मित्रांचेच स्मरण होते. त्यांनी मुंबईच्या मित्रांचा विचार सोडून द्यायला सांगितले.

'कस्तुरबांच्या अंतिम दर्शनासाठी अनेक लोक उत्सुक असतील, त्यांना शांती मिळेल आणि या निमित्ताने त्यांना गांधीजींचेही दर्शन घडू शकेल' असे गांधीजींना सांगण्यात आले.

महादेवभाईंचे अवसान झाले होते. त्यावेळी प्रयुक्त केलेल्या शब्दातच उत्तर दिले.

'मी बांच्या निधनाचा अशा प्रकारे उपयोग करुन घेऊ इच्छित नाही. लोकाना कळले तर ते आल्याशिवाय राहणार नाहीत.' गांधीजी म्हणाले.

कुणी सुचवले की फोनने सूचना द्यावी. ज्यांना शक्य आहे. ते आपापल्या वाहनांनी येऊ शकतील. गांधीजींनी आपले मत बदलले नाही.

कस्तुरबाला पेनिसिलीन दिले गेले नाही. याविषयी चर्चा निघाली. गांधीजी म्हणाले 'ईश्वराने माझ्या श्रध्देची परीक्षा बघितली.' मनाई करुन त्यांनी आपली ईश्वराप्रती श्रध्दा आणि सैध्दांतिक दृढता सिध्द केली होती. मग म्हणाले 'असे केले नसते तरी वेळ तरी कुठे होता?' सुशीला म्हणाली ' इंजेक्शनची सिरिंज गरम होत होती या दरम्यानच प्राण गेले.'

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वांनी प्रेताजवळ बसून प्रार्थना केली. कस्तुरबा म्हणायची 'मला कुठे बाहेर जायचे आहे.? मला तर महादेवनिकटच अखेरची निद्रा घ्यायची आहे.' तिचे हे म्हणणे तिने शब्दश: खरे केले. चंदनाच्या लाकडांचा विचार आला तर गांधीजी म्हणाले 'मी गरीबाना चंदनी चितेवर ठेऊ शकत नाही मग जो स्वत:ला गरीबातला गरीब माणूस मानतो असा मी माझ्या पत्नीसाठी चंदनी चितेचा कसा काय उपयोग करु शकतो?'

मनु मश्रुवाला या नातीने आरती केली. विधी झाले. 'वैष्णव जन' भजन गाईले गेले. रामधून चालली. भजन सुरु झाले. कनूने खूप फोटो घेतले. हयातीत कस्तुरबाच्या सोबत गांधीजींचे फोटो घेतले गेले नाहीत. मृत्युनंतर घेतले गेलेत. प्रेत चितेवर ठेवले गेले. सर्वधर्म प्रार्थना करण्यात आली. गीता, कुराण, बायबलच्या काही भागांचे पठन झाले. आश्रमवासी जनांनी एक भजन म्हटले. डॉ. गिल्डर यांनी झरथ्रुस्त धर्माची एक प्रार्थना गाईली. मीराताईने एक इंग्रजी भजन म्हटले. देवदासने अग्नी दिला. चितेला तीन प्रदक्षिणा घातल्या. 'गोविंद गोविंद' असे तो मोठ्याने म्हणत होता. शवाला अग्निने स्पर्श केला. एका भयावह आजाराने कस्तुरबाची जीवनलीला संपवली. कस्तुरबाचा अग्निसंस्कार चालला होता. गांधीजी शून्यमनस्क होते. ती जळती चिता बघत होते. चिता जळत होती. कपाळमोक्ष झाला. गांधीजी मनाशी म्हणाले. आज कस्तुर नावाचा देह निमाला. कस्तुर गंध मात्र दरवळत राहील.

काठीचा आधार घेऊन गांधीजी उभे होते. कुणी धावत जाऊन खुर्ची आणली. ते उभेच राहिलेत. चिता पेटली. गांधीजी थोड्या अंतरावरच्या चिंचेच्या झाडाखाली जाऊन बसलेत. दोन तास लोटलेत. त्यांना चलण्याची विनंती करण्यात आली. ते म्हणाले ' बासष्ठ वर्षे सोबत राहिल्यावर मला अखेरच्या दिवशी अशी काय घाई आहे.? बा पण काय म्हणेल?' गांधीजी अखेरपर्यंत तिथेच राहिलेत. दहा ते साडे चार ते तिथेच होते. एकेक करुन सर्वांना निरोप दिला. स्नान केले. देवदास थांबला. त्याला अस्थी न्यायच्या होत्या. साडे सहाच्या सुमारास रामदास आला. खूप रडला. त्याला चितास्थानी नेण्यात आले. परत आल्यावर त्याने स्नान केले.

चोवीस फेब्रुवारीला गांधीजींना दिडशेच्या जवळपास तारा वाचून दाखवण्यात आल्यात. पंचवीस तारखेला म्हणजे बांच्या निधनाच्या चौथ्या दिवशी प्रभावती आणि परिचारक रघुनाथ अस्थी गोळा करायला गेलेत. बांच्या पाच बांगड्या जशाच्या तशाच होत्या. काचेच्या सुरक्षित बांगड्या.

कस्तुरबाचे जीवनपुष्प श्री हरिच्या चरणारविंदी समर्पित झाले. तिने मरणाच्या कपाळावर ओठ टेकवले होते. जीवनातल्या विषाचे प्राशन करुन घेतले होते. श्रृंगार करुन झाला होता. कस्तुरबाने समर्पणाची वाट निवडली. त्या वाटेवर निष्ठेने चालत राहिली. वादळी विद्युत प्रवाहाचा वेग. कमालीचे खंबीर मन. ऋषितुल्य आत्मसमर्पण. ही तिच्या व्यक्तिमत्वाची त्रिवेणी होती. स्वातंत्र्याच्या बलिवेदीवरील 'करेंगे या मरेंगे' चा सर्वोत्तम आदर्श तिचे समर्पण होते. गांधीजींसाठी साऱ्या दिशा सून्या-सून्या झाल्या होत्या. एकटेपणा आणि उदासी आता त्यांची नित्य सोबत करणार होते. हाक ऐकणारे कुणी जवळपास नव्हते.

❖❖❖

## २४) उत्तर पर्व

कस्तुरबाच्या निधनाची बातमी आली. भारतीय कोट्यवधी जनतेच्या अंत:करणात शोकाची काळी छाया पसरली. अगणित बंधू-भगिनींनी अश्रु ढाळले. कस्तुरबाने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अपार कष्ट उपसले होते. कठोर तपाचरण केले होते. नाना चढ-उतार अनुभवले होते. तिच्यावर जनतेचे प्रेम होते. श्रध्दा होती. ऋण होते. ते चुकवण्यासाठी जनता बेचैन होती. तिच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी कस्तुरबा ग्राम स्वराज कोष स्थापित करायचा विचार पुढे आला. सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत केले. या ट्रस्टची स्थापना दिनांक १८ मार्च १९४४ रोजी झाली. गांधीजी येरवडा तुरुंगात होते.

पंडित मदनमोहन मालवीय यांनी नेतृत्व केले. एक अपील केले गेले. या कोषासाठी पंच्याहत्तर लाख रुपयांचा निधी गोळा केला जावा. गांधीजींच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवशी २ ऑक्टोबर १९४४ रोजी हा त्यांना सोपविण्यात यावा असे ठरले. गांधीजी अध्यक्ष आणि ठक्कर बाप्पा सचिव होते. २ ऑक्टोबर १९४४ रोजी हा निधी गांधीजींना सोपवण्यात आला. निधीच्या रकमेने एक कोटी रुपयांचा आकडा ओलांडला होता.

या योजनेचे प्रमुख प्रवर्तक श्री नारणदास गांधी होते. उपाध्यक्ष सर पुरुषोत्तम ठाकुरदास होते. या निधी संकलनाच्या कामाला गती मिळत होती. या कोषाचा हेतु ग्रामीण बालके आणि महिलांच्या कल्याणासाठी वापरला जावा हे ठरले होते. यात शिक्षण, आरोग्य, प्रसूती वगैरे सारे विषय होते. याचा उपयोग शहरे, देशी वा विदेशी विद्यापीठांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाप्रती नव्हता. शहरांपासून लांबवर असलेल्या खेड्या-पाड्यात वसणाऱ्या महिला आणि बालकांच्या आरोग्य, कल्याण आणि शिक्षणासाठी हा निधी खर्ची पडावा. असे ठरले.

निधीचा विनियोग तीन कारणांसाठी व्हायचे ठरले होते. एक, ग्रामीण महिला व बालकांची चिकित्सा यात स्वच्छता कार्य मोलाचे होते. दोन, नई तालीम आणि तीन, खादी व ग्रामोद्योगांवर भर. या कल्याण कार्यात ग्रामीण महिला आणि बालकांच्या समग्र जीवनाचा समावेश होता. यामुळे यात प्रसव वगैरे, स्वास्थ्य, स्वच्छता, रोग-निर्मूलन, शिक्षण या सर्वांचा अंतर्भाव होत होता.

सरकारने ज्या व्यक्तीला नजरबंदीची शिक्षा दिली होती, त्याच्या दिवंगत पत्नीच्या स्मारकासाठी योगदान देण्याच्या निमित्ताने भारतातून मोठ्या प्रमाणावर लक्षाधीश आणि कोट्यधीश लोक सहभागी झाले होते. या योगदानामुळे कुठल्याही प्रकारचे नुकसान संभवू शकणार होते. त्या खऱ्या वा काल्पनिक नुकसानीच्या भयाने न डगमगता या कार्यापासून त्यांनी स्वत:ला लांब राखले नाही. निधीच्या संबंधीच्या या प्रवृत्तीचा सूत्रपात काँग्रेस वा कुठल्याही काँग्रेसीने केला नसून काँग्रेसेतरांनी - गैरकाँग्रेसी जनांनी केला होता. यात शुध्द लोकोपकारी हेतुची प्रेरणा होती.

कस्तुरबा सेवा मंदीराच्या वतीने चालणाऱ्या विविध कार्य प्रवृत्ती पुढीलप्रमाणे होत्या --- खादी, अंबर सरंजाम, शिक्षण व उत्पादन, ग्रामोद्योग, तेलघाणी, चर्मालय, हाताने तयार केलेला कागद, कुंभारकाम, ताडगूळ, काडेपेटी, साबण, खादी ग्रामोद्योग विद्यालय, ग्रामीण विद्यालय, सहकारी संस्था, खादी ग्रामोद्योग भंडार, शेती व गोपालन, शांती सेना, दवाखाना, लोककल्याण विभाग वगैरे. यात सत्तावीस हजाराहून अधिक लोकांना काम मिळाले होते.

या कार्याला देशभरातून पाठिंबा लाभत होता. या उपक्रमात महाराष्ट्र कुठे होता? हे बघणे आवश्यक आहे. एक उदाहरण नमून्यादाखल बघू या! 'या निधीसाठी हिंदू संघटनांनी देणगी देऊ नये.' असे श्री वि. दा. सावरकर यांनी जाहीर आवाहन केले होते. या निधीचा उपयोग मुसलमान स्त्रिया आणि बालकांसह अन्य धर्माच्या स्त्रिया आणि बालकांवरही केला जाणार होता. श्री सावरकर यांना हे मान्य नव्हते. हा निधी फक्त हिंदूपुरताच मर्यादित करायला कस्तुरबा गांधी निधीच्या विश्वस्तांची तयारी नव्हती. श्री सावरकर आणि हिंदू महासभेच्या विरोधाची पर्वा न करता सप्टेंबर अखेरपर्यंत ८५ लाख रुपयांचा निधी गोळा करण्यात यावा असे आवाहन श्री पांडुरंग सदाशिव बापट उपाख्य सेनापती बापट यांनी जाहीर पत्रक काढून केला होता[१]

कस्तुरबांच्या निधनानंतर गांधीजी नाउमेद झाले होते. मलेरिया आणि आमांशाने त्यांना ग्रासले होते. एका क्षणी तर ते जगण्याची उमेद घालवून बसलेत की काय,

असे वाटू लागले.'आयुष्यभर त्यांना साथ देणारा आंतरिक प्रकाश जणू विझायच्या बेतात आला होता पण ही स्थिती फक्त क्षणभरच टिकली.' असे या संदर्भात प्यारेलाल यांनी लिहून ठेवले आहे. सुशीलाताईंनी केलेल्या नोंदीत गांधीजींना झालेला 'भ्रम', 'नैराश्य' याचा उल्लेख येतो. त्यांना 'चढलेला ताप' याचे वर्णन येते.

कस्तुरबाच्या निधनानंतर मुंबई सरकारने गांधीजींना अहमदनगरच्या तुरुंगात हलवण्याचे ठरवले होते. ५ मे रोजी भंडारींनी गांधीजींना सांगितले की उद्या सकाळी सुटकेचा आदेश आलेला आहे. निरोप घेताना सोबत महादेवभाई नव्हते आणि कस्तुरबाही नव्हत्या. साथीदार नव्हता. सहचरी नव्हती. सचिव नव्हता. सखी नव्हती.

गांधीजी हळूवारपणे म्हणाले ' बा तुरुंगातून बाहेर पडण्याची कशी वाट बघत होती पण मला कळते की तिला याहून अधिक धन्यतेचे मरण लाभले नसते. बा आणि महादेव दोघांनी स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर आपली प्राणाहूती अपिर्त केली आहे. दोघे अमर आहेत.' [२]

गांधीजींच्या मनात कस्तुरबाच्या निधनाने झालेली ही जखम किती खोलवर झाली होती. याचा या वाक्याने अंदाज येतो. आपल्या मनोव्यथेला शब्द देताना ते म्हणाले होते.

" काय करावे? आणि काय करु नये? हे मला काही सुचत नाही. कर्तव्याकर्तव्य मला सुचत नाही. आजवर ज्या ईश्वराने मला मार्ग दाखवला तोच आताही मार्ग दाखवील पण मला एवढे मात्र मान्य करायला हवे की आज मी अनुभवत आहे. एवढा अंधार मी यापूर्वी कधीही अनुभवला नव्हता." गांधीजी साथीदाराना म्हणाले.[३]

कस्तुरबाच्या स्वर्गवासानंतरचे काही दिवस तर त्यांना उठता-बसता, खाता-पिता, जागता-झोपता बाचेच विचार येत असत. बा एका टेवलावर माथा टेकवून अनेकदा झोपी जायच्या. ते टेबल गांधीजींनी आपल्या जवळ ठेऊन घेतले ' हे टेबल माझ्यासाठी खूप मौल्यवान आहे. यावर माथा टेकवून असलेली बांची विश्रब्ध मुद्रा माझ्या नजरेसमोर सदैव तरळत असते.' असे ते म्हणाले होते.

एकदा फिरायला निघताना गांधीजी म्हणाले 'माझे मन बांच्याशिवाय दुसरा कुठलाही विचार करत नाही.' दुसऱ्या एका प्रसंगी म्हणाले होते - 'बा माझ्या डोळ्यांदेखत निघून गेल्यात याचे एक प्रकारे समाधान आहे. पण बासष्ठ वर्षांपासूनही अधिक काळच्या माझ्या साथीदाराला गमावून मी दिग्मूढ झालो आहे.'

बाच्या अंतकाळाची चर्चा करताना म्हणाले ' बांनी अंतकाळी मला बोलावले आणि माझ्या मांडीवर विसावून निघून गेली. ही खूप अद्भुत गोष्ट आहे. '

प्रार्थना सभेत प्रवचन करताना गांधीजी म्हणाले "सूर्याच्या गतीनुसार बाना जाऊन एक वर्ष झाले आहे. चंद्राच्या गतीनुसार महाशिवरात्री. हा काही खेद करायचा दिवस नाही. आज तर जन्मोत्सवासारखा आनंद साजरा करायला हवा. मी जन्म व मरण यात खूप अंतर मानत नाही. आत्म्याचा कुठला आला जन्म? आणि कुठले आले मरण? आपण बांच्या आत्म्याला चाहत होतो. आत्म्याचे कदापि हनन होत नाही."[४]

गांधीजींच्या दु:खात गीतेच्या सनातन मूल्य व्यवस्थेचे गुंजन होत होते तरी या संदर्भातील त्यांची वेदना प्रकट होतच राहिली होती. कस्तुरबाच्या निधनानंतर लॉर्ड वेवेल यांनी पाठवलेल्या सांत्वना पत्रास उत्तर देताना त्यांनी लिहिले होते.

"प्रिय मित्र,

आपण आणि लेडी वेवेल यांनी माझ्या पत्नीच्या निधनानंतर प्रकट केलेल्या सांत्वना पत्रासाठी मी आपणास धन्यवाद देतो. बांना घोर व्याधीपासून मुक्ती लाभली. यास्तव मी या मृत्युचे स्वागत केले आहे. पण हा आघात आणि ही पोकळी मला अकल्पनीय वाटत आहे. आम्ही असामान्य दंपती होतो. १९०६ साली आम्ही परस्पर संमतीने आणि काही अचेतन प्रयोगानंतर आत्मसंयमनाला निश्चितपणे आमच्या जीवनात व्रताप्रमाणे स्वीकारले होते. परिणामी आम्ही एकमेकांच्या इतक्या नजिक पोहोचलो की या पूर्वी कधी इतके एकात्म नव्हतो. या गोष्टीचा मला हर्ष वाटतो. आमचे वेगवेगळे अस्तित्व उरले नाही. मला वाटले नव्हते तरीही त्यांनी स्वत:ला माझ्या ठायी लीन करुन टाकले. यामुळे त्या माझ्या अर्धांगिनीपेक्षाही वरचढ ठरल्या. त्या सदैव प्रबळ इच्छाशक्ती धारण करणाऱ्या महिला होत्या पण आरंभिक काळात माझ्या चुकांमुळे मी तो त्यांचा

हट्टीपणा समजत होतो. आपल्या प्रबळ इच्छाशक्तिच्या बळावर त्या नकळतच अहिंसक असहकाराची कला आणि त्याच्या आचारधर्मात माझ्या शिक्षिका सिध्द झाल्यात. त्यांचे आचरण माझ्या कुटुंबापासून सुरु झाले. १९०६ साली मी जेव्हा राजकीय क्षेत्रात याचा प्रयोग आरंभिला तेव्हा तो सत्याग्रहाच्या नावाने प्रसिध्दीला आला. हा अधिक व्यापक अर्थाचा आणि विशेषत: या प्रयोगासाठीच प्रयुक्त शब्द होता.

दक्षिण आफ्रिकेत जेव्हा भारतीयांच्या धरपकडीचे सत्र सुरु झाले त्यावेळी सविनय प्रतिरोध करणाऱ्यांमध्ये कस्तुरबाही होत्या. त्यांनी माझ्यापेक्षा अधिक शारीरिक कष्ट झेललेत. यापूर्वी त्यांनी अनेकदा तुरुंगवास भोगला. या खेपेच्या तुरुंवासात त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोई उपलब्ध होत्या तरी त्यांना तो तुरुंगवास मानवला नाही. अन्य अनेक व्यक्तिंच्या सोबत मला अटक झाली आणि लगेचच नंतर त्यांच्या अटकेने त्यांच्या मनावर जबरदस्त आघात झाला. त्यांचे मन कटुतेने भरुन गेले. माझ्या अटकेसाठी त्या मुळीच तयार नव्हत्या. सरकारचा माझ्या अहिंसक वृत्तीवर विश्वास आहे. आणि मी जोवर स्वत:ला अटक करवून घेणार नाही तोवर मला अटक होणार नाही असा विश्वास मी त्यांना दिला होता. माझ्या अटकेचा त्यांना एवढा धक्का बसला की अटकेनंतर लागलीच त्यांना अतिसाराची लागण झाली. डॉ. सुशीला नायरला त्यांच्यासोबतच अटक झाली. तिने जर त्यांच्यावर उपचार करुन काळजी वाहिली नसती तर कदाचित या नजरबंदी कँपमध्ये माझ्यापाशी पोहोचायच्या आधीच त्यांचे निधन झाले असते. माझ्या सोबतीमुळे त्यांचे मन शांत राहिले. कुठल्याही नवीन औषधांशिवायच त्या अतिसाराच्या आजारातून मुक्त झाल्यात. त्यांच्या मनाची कटुता मात्र कायम राहिली होती. यामुळेच त्यांचे मन विक्षुब्ध राहू लागले होते. यामुळे कष्टप्रद प्रकारे त्यांचा देह हळूहळू विरघळत गेला होता. .. .. .. .. .. सरकारी वक्तव्याच्या वृत्तपत्रीय अहवालामुळे माझ्या मनाला झालेल्या वेदनाना तुम्ही समजू शकाल. आपल्या वक्तव्यात ज्या व्यक्तिविषयी दु:खदपणे सत्याचा त्याग केला गेला आहे. ती व्यक्ती माझ्यासाठी असीम मौल्यवान होती."[५]

एकदा कस्तुरबाचे बंधू माधवदास आजारी होते. गांधीजींनी त्यांना निसर्गोपचार चिकित्सकांकडे पाठवले. तिथे ते समाधानी नव्हते. त्या काळी त्यांच्यापाशी काही साधनेही नव्हती. उत्पन्नाची साधने नव्हती. त्यांची काळजी वहाणारेही कुणी नव्हते. त्यांना गांधीजींनी पत्र लिहिले

चि. माधवदास,

"डॉ. कृष्ण वर्मा यांनी बांची सेवा केली आहे. हे मी माझ्या स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले आहे. त्यांनी बांचे गुण बघितले आणि ते बांचे भक्त बनून गेले होते. तुम्ही बांचे भाऊ आहात. यामुळे डॉक्टर तुम्हाला ठेवून घेतात आणि तुमची सेवा सुश्रूषा करतात. डॉक्टरांचे बिल काय होईल याची काळजी करायचे तुम्हाला काही कारण नाही. डॉक्टर तर एक रुपयाही घ्यायला तयार नाहीत पण मी याविषयी विचार करुन ठेवला आहे. तुम्हाला मान्य असेल तर तुमच्या पैश्यातूनच मला योग्य वाटतील तेवढे पैसे त्यांना द्यायला हवेत. याविषयी माझी मणीलालशीही चर्चा झालेली आहे. पण तुम्ही जर एक कवडीही द्यायला तयार नसाल तर एरवीच तर तुमच्यावर इतक्या पैश्यांचा वर्षाव झाला आहे. त्यात हे अधिकचे मानीन. तुम्ही चांगले व्हा आणि व्यवस्थित रहा असे मला तर वाटते. तसे निरोप घेता-घेता मला बाने सांगितले होते. 'माधवदाससाठी तुम्ही शक्य ते सारे केले आहे. मी सुध्दा एक बहिण या नात्याने करता येईल तितके केले आणि तुमच्याकडून करवून घेतले आहे. आता यापुढे तुम्ही काहीही करु नये.' तुमच्यासाठी व हरीलालसाठी हे बांचे अखेरचे शब्द होते. त्यांच्या या निवेदनात रोष होता हे मी जाणतो. प्रेम तर होतेच."[६]

बा गेल्यावर गांधीजींनी तळपायांना तूप चोळून घ्यायला मनाई केली. मुली सारख्या खूप आग्रह करायच्या. तूप चोळून घ्यायचा आग्रह करायच्या. त्यावेळी खूप उदास स्वरात रडवेले होत गांधीजी म्हणाले होते. 'मला तूप चोळून द्यायचे होते तर बा अशी निघून का गेली?' गांधीजींच्या या प्रश्नाचे उत्तर कुणाजवळच नव्हते. अखेर खूप आग्रह झाल्यावर त्यांनी मान्यता दिली. बासारखी तळमळ आणि भावना कुणी कुठून आणि कशी आणायची?

बाच्या मृत्युनंतर लगेचच गांधीजी म्हणाले. "मी किंवा तिने कोणत्याही प्रकारची विनंती केली नाही (सत्याग्रहाच्या कैद्यांना ती गोष्ट शोभणारी नव्हती) ही गोष्ट खरी असली, तरी किमान सरकारने तिच्यापुढे, माझ्यापुढे किंवा तिच्या मुलांपुढे तिच्या सुटकेचा प्रस्ताव मांडणे उचित ठरले नसते का? सुटकेच्या केवळ प्रस्तावाने तिच्यावर मानसिक दृष्ट्या चांगला परिणाम झाला असता."

साम्राज्याला आव्हान देणाऱ्या ताठ कण्याच्या, तडफदार आणि नित्य नव्या कल्पना घेऊन येणाऱ्या गांधीजींपेक्षा आगाखान पॅलेसमधल्या गांधीजींमध्ये आणखी काहीतरी अधिक होते. अधूनमधून नैराश्य त्यांना घेरुन टाकायचे. ॲण्ड्र्यूज, बजाज, महादेव आणि कस्तुरबा यांच्या लागोपाठ झालेल्या मृत्युंमुळे त्यांचे प्रेम आणि पाठिंब्याचे विश्वासू स्रोत नाहीसे झाले होते.

'अनेक वेळा सरकारने प्रकृतीच्या कारणासाठी कस्तुरबांच्या सुटकेचा विचार केला पण त्यांना त्यांच्या पतीबरोबर राहण्याची इच्छा होती, त्यामुळे त्यांच्या इच्छेचा आदर केला गेला.' असे भारतातील ब्रिटिश सरकारचे अमेरिकेतील प्रतिनिधी सर गिरिजाशंकर बाजपेयी यांनी अमेरिकी जनतेला सांगितले. या वृत्तामुळे गांधीजी चकित झाले, दु:खीही झालेत.

या काळात गांधीजींनी आपल्या आप्त सहकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यातले काही नमूने विशिष्ट आहेत.

'चि. लीलावती,

तू बांची दैनंदिनी सुशीलाला दिलीस हे चांगले झाले. ही दैनंदिनी मी मजजवळ ठेऊन राखली आहे. ही मी वाचू इच्छितो, कदाचित या लेखनाचा मी उपयोग करीन म्हणतो.'[७]

श्री क्लमेंट एम्. डोक हे दक्षिण आफ्रिकेतील गांधीजींचे सहकारी श्री जे. जे. डोक यांचे चिरंजीव होत. १९१४ ते १९२४ या काळात ते लाम्बालैंड येथील दक्षिण आफ्रिकी बॅप्टिस्ट सोसायटीचे सदस्य होते. पुढे जोहान्सबर्ग येथील विंटवाटर्सरेंड या विद्यापीठात बंटू अभ्यास विषयाचे विभाग प्रमुख होते. त्यांना गांधीजींनी पुढील पत्र लिहिले.

"प्रिय क्लेमेंट,

मी तुरुंगात असताना तुझे प्रिय पत्र पोहोचले होते. तिथून मी कुठल्याही पत्राला उत्तर देत नव्हतो.

बांचे पार्थिव शरीर तर अग्निला समर्पित झाले आहे. पण ती सदैव माझ्यासोबतच आहे. मी बुध्दी आणि हृदयानेही या सत्याचे दर्शन करुन घेतले आहे. तरीही सबंध जगभरातून मला जी सहानुभूती लाभत आहे. त्याची मी कदर करतो. यामुळे मला ईश्वरी दयेचे अभूतपूर्व भान जागले आहे."[८]

गांधीजींनी एका सहकाऱ्याला लिहिले होते 'बांना ईश्वराने नेले हे बांच्या भल्यासाठी आणि माझ्याही भल्यासाठी. यामुळे बांचा वियोग माझ्यासाठी दु:खदायी ठरायला नको.'[९]

दुसऱ्या एका सहकार्याला लिहिले होते '२२ तारखेला सौर पंचांगानुसार कस्तुरबा यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त हे करायचेच आहे. ते मलाही विचारुन गेले होते. सकाळी गीता पाठ आणि कताई तर करायचीच आहे. रामायणाचा पाठही करायला हवा.'[१०]

गांधीजींनी मणीताईला लिहिले

"महादेव वा बा यांच्यासाठी अधिक काही करता आले नाही तर उपवास तरी करावा, हा तुझा विचार अगदी चुकीचा आहे. त्यांना कळले असते तर त्यांना क्लेशच झाले असते. प्रियजन जेव्हा निघून जातात तेव्हा त्यांच्यासाठी आपण त्यांना प्रिय आणि अवघड काम करावे. यामुळे महादेवसारखे गोड बनायचे प्रयत्न करावे. बांच्याप्रमाणे आस्तिक बनायचे प्रयत्न करावे."[११]

गांधीजींनी लक्ष्मीला लिहिले की बा गेल्या, बांचे प्रेम शिल्लक उरले आहे. शरीराला तर जायचेच आहे. पण त्याच्या जाण्याने शरीरधारीचे प्रेम जाऊ शकत नाही[१२]

गांधीजींनी प्रेमलीलाला लिहिले 'पुण्याच्या आगाखान महालात कस्तुरबांची समाधी तुम्ही उत्तम बनवली. हे चांगले झाले. लोकांच्या जाण्याची व्यवस्थाही झाली आहे.'[१३]

मणीलालच्या बायकोला (सून सुशीलाला) लिहिले होते 'बांनी माझ्यासोबत दीर्घ आयुष्य घालवले यामुळे

तिचे स्थान रिक्त वाटते आणि वाटायलाच हवे याशिवाय ती माझ्या ठायी एकरुप होऊन गेली होती.' [१४]

सिमलाहून २ जुलै १९४५ रोजी गांधीजींनी फिनिक्स ट्रस्ट डीडचा सुधारित-संशोधित दस्तावेजाचा मसुदा तयार केला होता. यातील तिसरे कलम पुढीलप्रमाणे होते" या नियमांच्या अधीन राहून ट्रस्ट एका सार्वजनिक ग्रंथालय आणि विद्यालयाची स्थापना करु शकते. नियम ट्रस्टी तयार करतील. याची उभारणी जनतेच्या अनुदानातून केली जावी. हे माझ्या स्वर्गीय पत्नी कस्तुरबांच्या नावे असेल."

गांधीजी अगदी उकळत्या पाण्यात लिंबू पाणी व मध घेत. एके दिवशी एका नव्या उत्साही भगिनीने लिंबू-मध पाणी आणले. रामदासची पत्नी निर्मला सोबतच बसली होती. पाणी बरोबर गरम नव्हते. त्या भगिनीने उकळून पाणी आणावे असा आग्रह धरला. 'असू दे. आता तसे उकळते पाणी आणून द्यायला का बा आहे.? तिच्या सारखी सूक्ष्मता इतरत्र कुठेच आढळत नाही बघ.' गांधीजी म्हणाले. १९४५ साली मणीलालची पत्नी सुशीला आफ्रिकेहून भेटीला आल्या. 'बापू, तुम्ही खूपच विमनस्क-उदास वाटताहात !' सुशीला म्हणाली. 'होय, मी बा ला विसरु शकत नाही. तिच्या अनुपस्थितीने मी आतून इतका उदास-उदास होऊन जाईन असे मला वाटले नव्हते.' बापू खिन्न होत म्हणाले[१५]

गांधीजींनी आगाखान यांना पत्र लिहिले

"प्रिय आगाखान,

हे पत्र आपल्या राजवाड्यातीलच एका छोट्या स्मशानाविषयी लिहित आहे. आपणास कदाचित ज्ञात असेल की मी येरवडा तुरुंगात बंदिवान होतो. त्याकाळी आधी महादेवभाई आणि नंतर माझ्या पत्नीचे अस्थीविसर्जन तिथे झाले आहे. त्यांचा अग्निसंस्कार सरकारी हुकूमान्वये तिथे केला गेला होता. सरकारने मला सार्वजनिक स्मशानात दाह संस्कार करु दिला नाही. सरकारी कृपेने व आपल्या औदार्याने मित्रगण त्या स्मशानापर्यंत श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी जात असतात. सरकारने ती छोटीशी जागा विकत घ्यावी आणि भक्तांना तिथवर पोहोचता यावे यासाठी मार्गाच्या संदर्भात काही अधिकार प्राप्त करुन घ्यावेत अशी विनंती मी सरकारला करत आलो आहे. आता आपण भारतात आला आहात म्हणून आपण या संदर्भात यथायोग्य प्रकारे माझी विनंती पूर्ण करण्याच्या दिशेने प्रयत्न करुन माझा मार्ग प्रशस्त करावा अशी आशा करावी काय?

आपण आनंदात असाल, अशी आशा करतो. आपण भारतातून प्रस्थान करण्यापूर्वी आपली भेट होईल अशी मी आशा करतो.

हृदयपूर्वक आपला,[१६]

गांधीजींच्या मनात कस्तुरबाच्या वर्ष श्राध्दाची तर ठळक आठवण होती. या निमित्त विविध लोकाना लिहिलेल्या पत्रातून ती स्पष्ट होते. या संदर्भातील ही काही पत्रे

"प्रिय सी. आर. (चक्रवर्ती राजगोपालाचारी)

इथून १९ फेब्रुवारी रोजी निघून एका मोठ्या समूहासोबत २१ तारखेला तिथे पोहोचेन. जर शक्य झाले तर मी या महिन्याच्या २२ तारखेला ट्रेनमध्ये असायला नको. २२ तारखेला बांचे निधन झाले होते आणि त्या दिवशी आम्ही गीता पाठ - पारायण करतो."[१७]

वर्धा प्रार्थना सभेत गांधीजी म्हणाले होते

"१९ तारखेच्या सायंकाळी मी पुण्याकडे प्रस्थान ठेवेन. तिथल्या निसर्गोपचार केंद्रात थांबेन. तिथे जवळपास दहा दिवस थांबून शिवरात्रीच्या दिवशी बांच्या पुण्यतिथीसाठी २ वा ३ मार्च रोजी बारडोली आश्रमात येऊ इच्छितो. १) गोरियन दिनदर्शिकेनुसार २२ फेब्रुवारी रोजीही बांची पुण्यतिथी साजरी होऊ शकते."[१८]

गांधीजींनी आगाखान यांना तार केली

मी २२ तारखेला कस्तुरबांच्या पुण्यतिथीच्या दिवशी दाहसंस्कार स्थळी पोहोचू इच्छितो. आपणही जर तिथेच असाल तर या पावन यात्रेसोबत आपली भेट घेऊन आनंद वाटेल. [१९]

एका प्रार्थना सभेत गांधीजी म्हणाले

आगाखान महालात कस्तुरबांच्या निधनप्रसंगी डॉक्टर गिल्डर (एम्. डी. डी. गिल्डर. ते १९३७ ते १९३९ या काळात मुंबईच्या काँग्रेसी मंत्रीमंडळात आरोग्य आणि आबकारी खात्याचे मंत्री होते) यांनी पारशी धर्मग्रंथातल्या एका भागाचे पठन केले होते. त्या दिवसापासून ते भजन 'आश्रम भजनावली' चा एक भाग बनून गेले आहे.[२०]

भारतात मणीलालचे सर्वात अधिक वास्तव्य १९४५ चे संपूर्ण वर्ष आणि १९४६ चे अर्धे वर्ष या काळात झाले होते. या काळात त्यांना गांधीजींच्या सोबत रहाता आले होते. या काळातील आठवण सांगताना ते लिहितात की आमची आई गेल्यावर आम्हा 'वाया गेलेल्या' मुलांवर तर ते प्रेमाचा वर्षाव करतात. आणखी एक विशेष गोष्ट त्यांच्या लक्षात आली की ते चौघे भाऊ पूर्वी ज्यावेळी त्यांच्याजवळ रहात असायचेत त्यापेक्षा ते मुलांविषयी अधिक मृदु झाले आहेत. अधिक क्षमाशील व अधिक सहनशील झाले आहेत. १९४६ साल होते. या वर्षीची एक घटना आहे. पहाटे पावणे पाचची वेळ. कडुनिंबाचा पाला खायचा विषय निघाला. गांधीजी म्हणाले.

"बा तर यावरच जगल्यात. दक्षिण आफ्रिकेत तर मरता-मरता वाचल्यात. तिचा डॉक्टर दुसरा कुणी नसून मी होतो. बाला मी निंब पाला वाटून पाजायचो. तेराव्या दिवशी बा म्हणाल्या की मला आता भूक लागली आहे. काही खायला द्या. त्यावेळी मी फळे दिली. हळू हळू केळी आणि शेंगदाण्यांची भाकरी करुन द्यायचो तर खायची मग मी तिला केप टाऊनला घेऊन गेलो. बा वा कुणा बालकांना दूध देत नव्हतो.

बांना मी रामायण वाचून दाखवायचो. 'गीता' नाही कारण की बा गीता कशी समजेल? पण तिला रामायण कळायचे. स्वत: वाचता येण्याइतपत तर सूरांचे ज्ञान नव्हते - राग नव्हे रागडा काढत (हसायला लागले.)"

अशा बांच्या आठवणी निघाल्यात. बापूंजवळ बांची गैरहजेरी सलते. बा गेल्यावर बापूंचा हा पहिला उपवास होता. [२१]

१९४७ सालची गोष्ट आहे. कस्तुरबाचा उल्लेख गांधीजींच्या बोलण्यात नेहमी असायचा. कुणीतरी आपल्या जोडीदाराविषयी नाराजी व्यक्त केली. तेव्हा त्या व्यक्तिला गांधीजींनी पत्रात लिहिले.

'मी बॅरिस्टर होतो आणि बा जवळजवळ अशिक्षित होती. हे तुम्हाला माहीत नाही का? आणि तरीही, आज मी माझ्या आयुष्यात जी काही प्रगती करु शकलो आहे. तिचे सगळे श्रेय माझ्या पत्नीचे आहे.'

मुंबईच्या एका कलाकाराने भेट घेतली. त्याला बांचे चित्र रेखाटायचे होते. त्याने छायाचित्र मागितले. व्यक्तिमत्वातील बारकावे जाणून घेण्याची मागणी केली. त्यावेळी आपल्याकडे एकही छायाचित्र नसल्याचे गांधीजींनी सांगितले. एका पत्रातून कस्तुरबांच्या व्यक्तिमत्वाचे काही तपशील पुरवले. एका पत्रातून कळवतात.

'कस्तुरबांची साडी नेहमी पांढरी असायची. क्वचित् तिच्यावर रंगीत रेषा किंवा ठिपके असायचे पदराचा काठ आणि साडीचा खालचा काठ रंगवलेला असायचा. कोणत्याही विशिष्ट रंगाची आवड वा निवड नसायची.'[२२]

गांधीजींना एका अनाम व्यक्तिला लिहिलेले पत्र पुढीलप्रमाणे आहे -

"याच दिवशी आणि याच वेळी सात वाजून पस्तीस मिनिटांनी बांनी देहत्याग केला होता. पारायण समयी नवांगतुक अतिथीही होते - आज या यज्ञादरम्यान ते तथ्य नेत्रात तरळत आहे. कारण मनुडी स्वत:च होती. तिने एकटीनेच वेगाने गीता-पारायण केले. आगाखान महालातही एकटेच होतो ना? सहाव्या अध्यायानंतर मी पाय पसरवले, डोळा लागला तर असे वाटले की जणू काही बांचे मस्तक माझ्या मांडीवर विसावले आहे.[२३]

१९४७ सालच्या डायरीचे एक पान

'तीन वर्षांपूर्वी याच दिवशी बरोबर याच वेळी (७:३५) बांनी आपल्या पार्थिव देहाचा त्याग केला होता.'[२४]

गांधीजींनी एका अज्ञात व्यक्तिला लिहिलेले पत्र

'बा यांच्याशी माझे नाते केवळ दैहिक स्वरुपाचे नव्हते. माझ्या मते तर बा आजही जिवंत आहेत. आणि माझ्यासोबत आहेत. मी जे काही करत होतो, सारे काही

बांना ठाऊक होत होते. मी बांना जेवढे जाणतो तेवढे दुसरा कुणीही जाणत नाही. [२५]

गांधीजींच्या भेटीस्तव दक्षिण आफ्रिकेहून एक मंडळ आले होते. त्यांच्या समवेत आलेल्या एका महिलेशी त्यांनी अशी बातचीत केली होती.

"कस्तुरबा गुणात माझ्यापेक्षा अजिबात उणी नव्हती, उलट माझ्यापेक्षा अधिक सद्गुणी होती. माझ्या जीवनात तिचे सहकार्य नसते तर मी आज जीवनाच्या एखाद्या दरीत कोसळून पडलो असतो. या अशिक्षित महिलेने माझ्या तमाम व्रतांना परिपूर्णता दिली. मला जागृत राखले. अशाच प्रकारे राजकारणाच्या क्षेत्रातही माझ्या खांद्याला खांदा लाऊन शौर्याने लढतीत भाग घेतला. जगाच्या दृष्टीने भले ती अशिक्षित होती पण मी ज्याला सच्चे शिक्षण म्हणतो त्याचा ती आदर्श नमूना होती. बा परम वैष्णव होती. तुळशीची पूजा करायची. व्रत-उपवास करायची. गळ्यातल्या पूजेच्या माळेला तर तिने अखेरच्या श्वासापर्यंत जपले. ती माळा मी लक्ष्मीला दिली आहे. मनू वा देवदासची मुलगी तारावर बा जेवढे प्रेम करायची तेवढेच या हरिजन बालिकेवर करायची. नरसी मेहतांनी लिहिलेल्या 'वैष्णव जन' भजनाला बांनी साकार करुन दाखवले होते आणि तिच्यामुळे (तिच्याच पुण्याईमुळे) मी आज या परिस्थितीत आहे. वाटेल त्या आजारपणातही बांनी माझी सेवा बजावण्यात मुळीच कसूर केली नाही. त्याचप्रमाणे मजवर अनेकदा मृत्युच्या वादळाने थैमान घातले आणि १९४३ साली तर मी जवळपास यमाच्या दारातून परतलो त्यावेळीही बांनी डोळे गाळले नाहीत. हिंमत गमावली नाही. ती इतरांचे धैर्य जोपासत राहिली. ईश्वराला प्रार्थना करत राहिली. त्या बांचा चेहरा आजही माझ्या नजरेसमोर आहे." [२६]

१९४७ साल. बांचा तृतीय स्मृती दिवस होता. गांधीजी बिरामपुर येथे होते. दिवसभर तर नियमित कार्यक्रम पार पडले. दिसायला हा दिवसही इतर दिवसांसारखाच होता. त्यामुळे गांधीजींच्या दैनिक कार्यक्रमात कोणताच फरक पडला नाही. नेहमीप्रमाणे त्यांची दिनचर्या सकाळी चार वाजता सुरु झाली. दिवसभर चालू राहिली. गांधीजींनी उपवास केला होता. या घटनेचे त्यांच्या दृष्टीने महत्व तर होते परंतु त्यांच्या दैनंदिनीत एकाच वाक्यात उल्लेख करण्यात आला आहे. गांधीजींनी आपल्या डायरीत नोंद घेतली. 'आज यावेळी सात वाजून पस्तीस मिनिटांनी बांनी पार्थिव देहाचा त्याग केला होता.'

मनुच्या आग्रहामुळे त्या दिवशी सात वाजून पस्तीस मिनिटांनी गीता पठन सुरु झाले. कुणीतरी सिलहटहून फळे पाठवली होती. 'बा स्वत: खाऊन नव्हे तर सर्वांना खाऊ घालून प्रसन्न व्हायच्यात.' असे म्हणून गांधीजींनी ती फळे बालकांना वाटून दिलीत. 'याच दिवशी आणि अगदी याच वेळी (सायंकाळी ७.३५ वाजता) तीन वर्षांपूर्वी बाने आपल्या पार्थिव देहाचा त्याग केला होता.'[२७]

सायंकाळी सात पस्तीस वाजता मंडळी संपूर्ण गीता पाठ करण्यासाठी एकत्र झाली. समोर कस्तुरबांचे चित्र ठेवण्यात आले. चित्र फुलांनी व माळांनी सजवण्यात आले. पहिल्या सहा अध्यायांच्या पाठापर्यत गांधी ध्यानमग्न होऊन बसून होते. थकव्यामुळे त्यांचा डोळा लागला. ते जी कठोर तपश्चर्या करत होते त्यामुळे त्यांची आध्यात्मिक शक्ती खूप वाढलेली होती. त्यांच्या चेतनाशक्तिच्या ठायी अलौकिक तीव्रता आली असावी. त्यांना प्रथमच आपल्या प्रिय पत्नीच्या आध्यात्मिक मिलनाचा गूढ अनुभव झाला. आपल्या एका पत्रात आपल्या या स्थितीचे वर्णन करताना त्यांनी लिहिले आहे.

"याशिवाय अहिंसा आणि आत्मसंयमाच्या साधनेत मी यशस्वी होऊ शकलो नसतो हे मला मान्य करायला पाहिजे. ती मला जितके चांगले ओळखत होती तेवढे चांगले दुसरे कुणीच ओळखत नव्हते. माझ्याप्रती तिची निष्ठा अद्वितीय होती. अखेरच्या दिवशी अखेरच्या क्षणापर्यंत ती कुणाच्या मांडीवर डोके ठेवील हे मला माहित नव्हते. परंतु मृत्युच्या अगदी आधी तिने मला बोलावले आणि माझ्या मांडीवर तिने शेवटचा श्वास सोडला. अशी होती बा. तिच्या गुणांची आठवण करुन ते गुण आपल्यात आणण्याचा प्रयत्न करणे हाच तिचे श्राध्द करण्याचा योग्य मार्ग आहे. निश्चल श्रध्दा, नि:स्वार्थ निष्ठा आणि सेवा परायणता या बाबतीत तिच्यासारखे दुसरे उदाहरण मला माहीत नाही. आमचे लग्न झाल्यापासूनच जीवनातील सर्व संघर्षात अचल निष्ठेने तिने मला साथ

दिली. माझ्या जीवननिष्ठेसाठी तन, मन आणि धन अर्पून आत्मसमर्पण केले. अशासारखी फार कमी उदाहरणे आढळतात."

मनुला म्हणाले, "बा नसती तर मी एवढा ऊर्ध्वमुखी झालो नसतो. बांना माझा अंतरंग परिचय होता. बांचा परिचय माझ्याशिवाय दुसरा कोण करुन देऊ शकेल? ती माझ्याठायी पूर्णांशाने समर्पित झाली होती. आज या यज्ञात आपण तिचे स्मरण करत आहोत. आपण तिच्या सद्गुणांचे स्तवन केले. त्या गुणांचा आपण अंगिकार करु या. हेच बांचे खरे श्राध्द ठरेल. माझ्याप्रती तिची निर्दोष भावसंपन्न सेवा होती. माझ्या प्रत्येक कार्यात तिने आजीवन ती बजावली आहे."

एका अज्ञात व्यक्तिने गांधीजींना लिहिले:

'दुर्दैवाने आज बा हयात नाहीत. त्या जर आज हयात असत्या आणि त्यांचे अपहरण झाले असते तर तुम्ही आमच्या भावना समजू शकला असता.'

या पत्राला गांधीजींनी उत्तर दिले होते ते असे:

"आज कस्तुरबा हयात नाहीत हे माझे दुर्दैव आहे. विद्यमान परिस्थितीत एखाद्या महिलेने कसे शौर्य दाखवणे अपेक्षित आहे. त्याचे सुंदर प्रतिनिधित्व व दर्शन त्यांनी घडवले असते. आज आमच्या भगिनींनी जे स्थान मिळवले आहे. ते कस्तुरबांच्या धैर्य, पावित्र्य आणि खंबीर विश्वासाचा परिपाक आहे. ती तथाकथित पध्दतीने कदाचित शिक्षित नसेल - नव्हती पण स्त्रीला आवश्यक तमाम सद्गुणांची ती पुतळी होती. या गुणवैशिष्ट्यांमुळेच मी आणि आपला देश उन्नतीच्या शिखरावर विद्यमान आहे. हा देश वा त्यातील कुणीही नागरिक हे ऋण क्वचित्‌च उतरवू शकेल हे सांगायला मला मुळीच संकोच वाटत नाही."[२८]

गांधीजी ३० जानेवारी १९४८ रोजी सायंकालीन प्रार्थनेला निघाले होते. अखेरच्या प्रार्थनेला विलंब होत होता. ते सरदार पटेल यांच्याशी काही महत्वाच्या विषयावर बोलत होते. आभा गांधी गांधीजींच्या निकट वर्तुळातील एक होती. ती बंगालचे कार्यकर्ते श्री अमृतलाल चॅटर्जी यांची मुलगी. कनूची बायको होती. कनू हा मगनलाल यांचे धाकटे बंधू नारणदास यांचा मुलगा. दुपारच्या भोजनानंतर आभाने कच्ची गाजरे खायला दिली होती. गांधीजी ते आठवत राहिले होते.

'बराय ! म्हणजे तू गुरांचे खाणे वाढते हेस नाही काय ' गांधीजी म्हणाले होते.

'बा तर या खाण्याला घोड्याचे खाणे म्हणायच्यात ना?' आभा हसत-हसत विचारत होती.

'हूं.' गांधीजी म्हणाले होते.

गांधीजींची पावले प्रार्थनास्थळाच्या दिशेने झपझप निघाली होती. अखेरच्या क्षणीही त्यांना कस्तुरबाचे असे स्मरण होते. अखेरच्या श्वासापर्यंत कृतज्ञ स्मरण होते. पती भक्तीची अनेक उदाहरणे मिळतील. अशी समर्पित पत्नी भक्ति मात्र विरळ!!

संदर्भ

१) सेनापती बापट : प्रा. य.दि. फडके पृष्ठ ८९;

२) महात्मा गांधी पूर्णाहुती : प्यारेलाल नायर खंड १ पृष्ठ ७;

३) बापू की कारावास की कहानी : सुशीला नायर (हिंदी) पृष्ठ ५६१;

४) सेवाग्राम येथील प्रार्थना सभेत दिनांक २२ फेब्रुवारी १९४५ रोजी दिलेले प्रवचन आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७९ पृष्ठ १६७;

५) गांधीजीनी लॉर्ड वेवेल यांना दिनांक ९ मार्च १९४५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २५९ / २६०;

६) गांधीजींनी श्री माधवदास कापडिया यांना दिनांक ४ ऑगस्ट १९४५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ८१ पृष्ठ ७६ -७७;

७) गांधीजींनी लीलावती आसर यांना दिनांक ३१ ऑगस्ट १९४४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७८ पृष्ठ ६६;

८) गांधीजींनी श्री क्लेमेंट एम्. डोक यांना पाचगणीहून दिनांक २६ जुलै १९४४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ ४४९;

९) गांधीजींनी श्री आनंद तोताराम हिंगोरानी यांना दिनांक २४ ऑक्टोबर १९४४ रोजी लिहिलेले पत्र;

१०) गांधीजींनी श्री मुन्नालाल गंगादास शहा यांना दिनांक २१ फेब्रुवारी ४५ रोजी लिहिलेले पत्र;

११) गांधीजींनी मणीताई पटेल यांना महाबळेश्वरहून दिनांक ३ मे १९४५ रोजी लिहिलेले पत्र;

१२) गांधीजींनी लक्ष्मी गांधीला दिनांक २२/२४ मे १९४५ रोजी लिहिलेले पत्र;

१३) गांधीजींनी प्रेमलीला ठाकरसी यांना दिनांक ९ ऑगस्ट १९४५ रोजी लिहिलेले पत्र;

१४) गांधीजींनी सून (मणीलालची पत्नी) सुशीला गांधीला महाबळेश्वरहून दिनांक २७ एप्रिल १९४५ रोजी लिहिलेले पत्र;

१५) संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८० पृष्ठ ८०;

१६) गांधीजींनी आगाखान यांना दिनांक ६ डिसेंबर १९४५ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८२ पृष्ठ १७८;

१७) गांधीजींनी कलकत्याजवळच्या सोदपूरहून चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना दिनांक १६ जानेवारी १९४६ रोजी लिहिलेले पत्र;

१८) गांधीजींचे दिनांक ६ फेब्रुवारी १९४६ रोजी वर्धा येथे प्रार्थना सभेत झालेले भाषण आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८३ पृष्ठ ११७;

१९) गांधीजींनी आगाखान यांना दिनांक २० फेब्रुवारी १९४६ रोजी पुण्याहून केलेली तार आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८३ पृष्ठ १८२;

२०) गांधीजींचे दिनांक २८ नोव्हेंबर १९४६ रोजी श्रीरामपुर येथे प्रार्थना सभेतील भाषण आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड खंड ८६ पृष्ठ ८९;

२१) ३ सप्टेंबर १९४६ साल हैदरी मेन्शन, बेलियाघाटी कलकत्ता येथील घटना;

२२) गांधीजींनी बाप्सी पावरी यांना दिनांक २ डिसेंबर १९४७ रोजी लिहिलेले पत्र;

२३) गांधीजींनी एका अज्ञात व्यक्तिला श्रीरामपुरहून दिनांक १९ फेब्रुवारी १९४७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८६ पृष्ठ ५५०;

२४) गांधीजींच्या दिनांक १९ फेब्रुवारी १९४७ च्या डायरीचे एक पृष्ठ आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८६ पृष्ठ ५५०;

२५) गांधीजींनी पाटणा येथून एका अज्ञात व्यक्तिला दिनांक मंगळवार ११ मार्च १९४७ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८७ पृष्ठ ७७;

२६) गांधीजींनी दिनांक ८ जून १९४७ रोजी दक्षिण आफ्रिकेहून आलेल्या मंडळीतील एका भगिनीशी केलेली बातचीत आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८८ पृष्ठ ९०-९१;

२७) एकलो जाने रे!: मनू गांधी (गुजराती) पृष्ठ ३२;

२८) गांधीजींनी अज्ञात व्यक्तिला दिनांक २८ नोव्हेंबर १९४७ रोजी लिहिलेले पत्र.

ooo

पाचवे खंड

# यज्ञशिष्ट



## भूमिका

कस्तुरबांचे चरित्र गांधीजींच्या चरित्राइतकेच व्यापक आणि विस्तीर्ण आहे. गांधीजींच्या व्यक्तिमत्वाइतके जरी ते नसले तरी त्याहून उणेही नाही. महापुरुषांचे कार्य त्यांच्या निधनानंतरही सुरु रहाते. कस्तुरबा याला अपवाद नाहीत. त्यांचे कार्य आजही वेगवेगळ्या पध्दतीने सुरु आहे. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विविध संस्था कार्यरत आहेत. वेगवेगळ्या कार्य-योजना अद्ययावत आहेत. निरनिराळे संकल्प आजही सुरु आहेत. तऱ्हे-त-हेच्या संकल्पना कार्यान्वित झालेल्या आहेत. भिन्न-भिन्न सहकारी कार्यरत आहेत. त्यांच्या माध्यमातून ते कार्य अव्याहतपणे सुरु आहे. त्याचा साक्षेप करु म्हटला तरी एक ग्रंथ होईल. अभ्यासु जनांसाठी त्यातील काही तेज:कण यातून मांडले आहेत. यात विविध विषय येतात. काही गोष्टी अभ्यासकांसाठी प्रथमच सादर केल्या जात आहेत.

## १) कस्तुरबांच्या आयुष्याचा काल पट

- ११ एप्रिल १८६९ कस्तुरबांचा जन्म पोरबंदर येथे
- १८७६ साखरपुडा
- मे १८८१ विवाह
- २० नोव्हेंबर १८८५ पहिल्या लेकराचा जन्म, जन्मानंतर काही दिवसातच मृत्यु
- २३ ऑगस्ट १८८८ मोठा मुलगा हरीलालचा जन्म
- जुलै मध्य ते नोव्हेंबर आरंभ १८९१ बॅरिस्टर पती मोहनदाससोबत प्रपंच
- १८९२ मुंबई व राजकोट येथे प्रपंच
- २८ ऑक्टोबर १८९२ दुसरा मुलगा मणीलालचा राजकोट येथे जन्म
- एप्रिल १८९३ ते नोव्हेंबर १८९६ आपल्या दोन लेकरांसमवेत राजकोट येथे सासरी राहिली
- ९ जुलै १८९६ गांधीजी राजकोटला परत आले
- ९ जुलै १८९६ ते ३० नोव्हेंबर १८९६ पतीसोबत निवास
- ३० नोव्हेंबर १८९६ आपली दोन मुले व भाचा गोकुळदास यांच्या सोबत दक्षिण आफ्रिकेकडे रवाना
- १३ जानेवारी १८९७, १९ दिवसांचा सागर प्रवास व २५ दिवसांचे क्वारंटाईन सोसून डर्बन
- १३ जाने १८९७ कस्तुरबांसोबत दक्षिण आफ्रिकेत वादळ व विरोध रुस्तुमजींकडे कस्तुरबांचा मुक्काम
- १५ जानेवारी १८९७ पतीसोबत प्रपंचाला सुरुवात
- ४ मे १८९७ डर्बन येथे तिसरा मुलगा रामदासचा जन्म
- १८९८-१८९९ पंचमवर्णियाचे लघवी पात्र उचलण्याचा प्रसंग
- २३ मे १९०० चौथा मुलगा देवदासचा जन्म
- १८ ऑक्टोबर १९०१ मायदेशी परत, भेटवस्तु परत केल्यात
- डिसेंबर १९०१ हिंदुस्तानात परत, राजकोटला पोहोचले
- ऑगस्ट १९०२ मुंबईला मुक्काम
- १९०२ गांधीजी एकटेच दक्षिण आफ्रिकेकडे रवाना
- ३ जानेवारी १९०३ हरीलालचा गुलाबशी साखरपुडा (श्री अरुण गांधींच्या मते)
- नोव्हेंबर १९०३ हरीलालचा गुलाबशी साखरपुडा (श्री चंदुलाल दलाल यांच्या मते)
- १९०४ या वर्षाअखेरीस कस्तुरबा जोहान्सबर्ग येथे पोहोचल्या
- १९०४ ते १९१४ दक्षिण आफ्रिकेत मुक्काम, चळवळ, तुरुंगवास, प्रयोगात सहभागी
- १९०४ प्लेगच्या साथीच्या रोगात कस्तुरबांचा सेवेसाठी सहभाग
- १९०६ फिनिक्स आश्रमात
- १९०६ चा मध्य प्रपंचाची मुख्य म्हणून कार्यरत
- ११ सप्टेंबर १९०६ उभयतांचा आजन्म ब्रह्मचर्य व्रताचा आरंभ
- १९०७ हरीलाल पत्नी गुलाबसोबत फिनिक्स आश्रमात दाखल
- १० जानेवारी १९०८ गांधीजींना अटक, गुलाबचा गर्भसंस्कार
- १० एप्रिल १९०८ हरीलालच्या पहिल्या कन्येचा (रामीचा) जन्म, कस्तुरबा आजी झाल्यात
- नोव्हेंबर १९०८ कस्तुरबांना आजाराने त्रस्त केले
- ९ नोव्हेंबर १९०८ गांधीजींचे ऐतिहासिक पत्र प्राप्त
- २६ डिसेंबर १९०८ कस्तुरबा रुग्ण शैयेवर, गांधीजी भेटीला
- २९ जानेवारी १९०९ तब्येतीत सुधारणा, गांधीजी डर्बनकडे रवाना
- जानेवारी १९०९ डॉ. नानजीद्वारे कस्तुरबांवर शस्त्रक्रिया, तब्येत खूप बिघडली
- ४ फेब्रुवारी १९०९ ऑपरेशननंतर फिनिक्सकडे रवाना
- १० मार्च १९०९ गांधीजींना हातकड्या घालून कोर्टात साक्षी द्यायला नेले, सत्याग्रही बंधू- भगिनींनी कस्तुरबांचे अभिनंदन केले
- ११ मार्च १९०९ जोहान्सबर्ग येथे महिला सभा, 'पंख असते तर मी उडून आले असते.' कस्तुरबांची पत्र प्रतिक्रिया. कस्तुरबा व अन्य चार सत्याग्रही महिलांच्या स्वाक्षरीने पत्र ट्रान्सवालच्या वृत्तपत्रात प्रकाशनार्थ पाठवले
- ७ ऑक्टोबर १९१० पोलाकच्या सोबत फिनिक्सहून टॉल्स्टॉय फॉर्मकडे कूच

- ९ ऑक्टोबर १९१० कस्तुरबांचा सन्मान केला गेला
- फेब्रुवारी १९११ कस्तुरबांचा जुना आजार उफाळून आला
- १९११ आहारातून मीठ व डाळींचा त्याग
- १७ मे १९११ हरीलाल रुसून निघून गेला
- १५ नोव्हेंबर १९११ हिंदी महिला मंडळाद्वारे स्थापित हस्तकलाकुसरीच्या स्टॉलची मांडणी
- १९१२ वर्षभर टॉल्स्टॉय फॉर्ममध्येच राहिल्यात
- २८ जून १९१२ गांधीजींसोबत डर्बनला पोहोचल्यात
- ११ ऑगस्ट १९१२ कस्तुरबा अत्यवस्थ
- ९ जानेवारी १९१३ टॉल्स्टॉय फॉर्म सोडून फिनिक्सकडे परतीचा प्रवास
- फेब्रुवारी आणि मार्च १९१३ कस्तुरबांची तब्येत खूपच वाईट
- ७ फेब्रुवारी १९१३ गांधीजींच्या सोबत केपटाऊन येथे रवाना
- ५ मार्च १९१३ कस्तुरबांची तब्येत अत्यवस्थ
- १९ एप्रिल १९१३ यापूर्वी कस्तुरबांनी संघर्षात सहभागी होण्याचा व तुरुंगवास पत्करण्याचा निश्चय जाहीर केला
- १९ एप्रिल १९१३ गांधीजींनी श्री गोपाळ कृष्ण गोखले यांना कस्तुरबांच्या निर्णयाची माहिती कळवली
- १३ सप्टेंबर १९१३ तीन महिन्यांच्या सक्त मजूरीची शिक्षा, पहिला तुरुंगवास
- १५ सप्टेंबर १९१३ तीन भगिनी व बारा बंधूंसह सत्याग्रही रेल्वेद्वारा डर्बनहून फॉक्सरस्टकडे रवाना
- १६ सप्टेंबर १९१३ वॉलक्रॉस्ट येथे हटकले गेले
- २२ सप्टेंबर १९१३ सत्याग्रही वीरांना अटक
- २२ डिसेंबर १९१३ मॉरित्सबर्ग तुरुंगातून सुटका
- २ मार्च १९१४ गांधीजींनी हरीलालला लिहिले 'बा जीवन-मरणाच्या हिंदोळ्यावर आहे.'
- २० मार्च १९१४ केपटाऊनहून फिनिक्सकडे प्रस्थान
- २५ मार्च १९१४ केपटाऊन येथे भारतीयांनी कस्तुरबांचे भव्य स्वागत केले
- ३० मार्च १९१४ फिनिक्स गाठले, पोलाक व श्रीमती पोलाक यांना निरोप
- १ जुलै १९१४ केलेनबॅक व गांधीजींसमवेत केपटाऊनकडून फिनिक्सकडे प्रस्थान
- ८ जुलै १९१४ मायदेशी परतणाऱ्या कस्तुरबांचा सत्कार, सभेत भारतीय व युरोपीय बंधू- भगिनी उपस्थित होते, डर्बनचे मेयर श्री डब्ल्यू. होम्स अध्यक्षपदी होते, दक्षिण आफ्रिकेतील विविध संस्थांनी कस्तुरबांचा गौरव-सन्मान केला
- ९ जुलै १९१४ दलित बंधू-भगिनींनी कस्तुरबांचा सत्कार केला
- ९ जुलै १९१४ डर्बन येथे हिंदू-मुस्लिम बंधू-भगिनींनी सत्कार केला
- ९ जुलै १९१४ गुजराती बंधू-भगिनींनी सत्कार केला
- १४ जुलै १९१४ जोहान्सबर्ग येथे भोजन, मॅसॉनिक हॉल, जेप्पी स्ट्रीट येथे ब्रिटिश भारतीय संघ, चीनी संघ, तामीळ कल्याण समिती, ट्रान्सवाल भारतीय महिला संघ, गुजराती, मुस्लिम, पारशी समाजाच्या वतीने भोजन, सत्कार व मानपत्रे अर्पण करायचा कार्यक्रम संपन्न
- १५ जुलै १९१४ ब्रामफांटीन येथील कब्रस्तानात नागप्पन आणि वलीअम्मा यांच्या स्मृतीशिळेच्या स्थापनेचा समारंभ, युरोपीय समितीचे अध्यक्ष रेवरँड सी. फिलिप्स यांच्या पत्नीद्वारे स्मृतीशिळेचा अनावरण समारंभ
- १५ जुलै १९१४ जोहान्सबर्ग येथे तामीळ समाज सभेत उपस्थिती, थंबी नायडू अध्यक्ष
- १६ जुलै १९१४ जोहान्सबर्ग येथे गुजराती लोकांची सभा
- १८ जुलै १९१४ 'इंपिरियल मेल' ने सभास्थानी, स्टेजवर मोठ्या संख्येने यूरोपीय व भारतीय
- मित्रांनी स्वागत केले, एका मिरवणूकीने बंदरापर्यंत नेले, इथे मद्रास भारतीय
- संघ आणि विविध संघटनांनी उपहार व मानपत्रे प्रदान केलीत
- १८ जुलै १९१४ मायदेशाकडे परतीचा प्रवास
- ४ ऑगस्ट १९१४ लंडनला पोहोचले
- १३ ऑगस्ट १९१४ साम्राज्याची बिनशर्त सेवा बजावण्याच्या निश्चयावर दृढ संमती व्यक्त करणाऱ्या परिपत्रकावर स्वाक्षरी

- १ ऑक्टोबर १९१४ स्वेच्छा सहाय्यक पथकाच्या बैठकीत हजेरी, गांधीजी अध्यक्ष
- १९ डिसेंबर १९१४ मायदेशी प्रस्थान
- ९ जानेवारी १९१५ मुंबईच्या अपोलो बंदरावर अभूतपूर्व स्वागत
- १७ जानेवारी १९१५ प्रवास करत-करत कस्तुरबा राजकोटला पोहोचल्यात
- २० जानेवारी १९१५ राजकोट येथे ज्या मोढ वणिक ज्ञातीने वाळीत टाकले होते त्या बंधुंनी गांधीजींना आणि भगिनींनी कस्तूरबांना मानपत्र दिले.
- २५ जानेवारी १९१५ पोरबंदर येथे मोढ वणिक भगिनींनी कस्तुरबांचा आदर-सत्कार केला. मुस्लिम मुला-मुलींच्या शाळेला भेट, वनस्पती शास्त्रज्ञ जयकृष्ण इंद्र यांची भेट.
- ३० जानेवारी १९१५ राजकोट येथे भगिनींनी कस्तुरबांना मानपत्र दिले. कार्यक्रम करणसिंह माध्यमिक शाळेत झाला. अध्यक्षस्थानी गोंडलच्या राणी राजकुंवर होत्या.
- २ फेब्रुवारी १९१५ अहमदाबाद येथे भगिनींनी मानपत्र प्रदान केले
- ४ फेब्रुवारी १९१५ मुंबईला पोहोचल्यात
- ६ फेब्रुवारी १९१५ शांतिनिकेतनकडे रवाना
- ७ फेब्रुवारी १९१५ मुंबई, पुणे, शांतिनिकेतनकडे रवाना
- २० फेब्रुवारी १९१५ श्री गोपाळ कृष्ण गोखलेंच्या निधनाचे वृत्त ऐकून गांधीजींसोबत पुण्याकडे रवाना
- २२ फेब्रुवारी ते ३ मार्च १९१५ पुणे येथे मुक्काम
- ५ मार्च १९१५ शांतिनिकेतनात रवींद्रनाथांची भेट
- १२ एप्रिल १९१५ दिल्लीला पोहोचल्यात
- २४ एप्रिल १९१५ मद्रासच्या मुस्लिम लीगने लॉली हॉलमध्ये सन्मानार्थ न्याहरीचे आयोजन केले, मद्रासच्या वकीलांच्या द्वारे भोजन समारंभाचे आयोजन
- मार्च ते मे १९१५ ची सुरुवात गांधीजींसोबत दौऱ्यावर (कलकत्ता, रंगून, ऋषिकेश, गुरुकूल कांगडी, दिल्ली, मद्रास व दक्षिण भारतात प्रवास व विविध स्थानांना भेटी)
- २५ मे १९१५ कोचरब येथील आश्रमात स्थिरावल्यात
- ८ जून १९१५ अत्यवस्थ
- १७ जून १९१५ तपासणी केली गेली
- सप्टेंबर १९१५ दूदाभाई, दानीताई या हरीजन परिवाराचे कन्या लक्ष्मीसह आश्रमात आगमन
- १ डिसेंबर १९१५ अहमदाबादहून राजकोटला जाताना मार्गात वीरमगाम येथे पोहोचल्यात
- ३ डिसेंबर १९१५ वांकानेरला मोठी मिरवणूक निघाली, एका जाहीर सभेत मानपत्र प्रदान
- १९१६ अधिकांश काळ कोचरब आश्रमात वास्तव्य
- १९१७ आरंभिक सहा महिन्यात साबरमती आश्रमाच्या स्थापनेत सक्रिय सहभाग
- एप्रिल १९१७ गांधीजींच्या सोबत कलकत्ता येथे हरीलालकडे
- ८ नोव्हेंबर १९१७ पाटण्याकडून चंपारण्याकडे रवाना
- २७ फेब्रुवारी १९१८ उत्तरसंडा (गुजरात) येथे जाहीर सभेत
- ६ एप्रिल १९१८ गांधीजींसोबत उत्तरसंडा (गुजरात) जाहीर सभेत हजर, दोन हजार शेतकऱ्यांची उपस्थिती
- १७ एप्रिल १९१८ गांधीजींसोबत नडियाद येथे सत्याग्रहाच्या प्रचारार्थ हजर
- २० एप्रिल १९१८ आणंद तालुक्यातील कासर, असरपुरा, समरखा येथे शेतकरी सभेत हजर
- जून १९१८ सून गुलाब लेकरांसोबत साबरमती आश्रमात दाखल
- १९१८ हरीलालचा मुलगा शांतीलाल व पत्नी गुलाब यांचे निधन
- १९१९ कस्तुरबा राजकोटला परत आल्या व गांधीजींच्या सेवा-सुश्रूषेत लागल्यात
- ८ जानेवारी १९१९ गांधीजींसाठी शेळीच्या दूधाचा आग्रह धरला
- १९२० - १९२१ असहकाराची चळवळ सुरु. अधिकांश काळ साबरमती आश्रमात. १९२० ते १९२३ साबरमती आश्रमाची सूत्रे हाती घेतली. गांधीजी बापू बनण्याचा हा काळ आहे.
- १९२० ते १९२३ या काळात मगनलालच्या सोबत राहून सूत कताईत प्राविण्य संपादन केले

- २३ मार्च १९२२ गांधीजींवर  देशद्रोहाचा आरोप, कस्तुरबांचे 'यंग इंडिया' मधून अपील
- १ जुलै १९२२ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- ७ जुलै १९२२ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- ४ ऑक्टोबर १९२२ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- २७ जानेवारी १९२३ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- १९ मे १९२३ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- १६ जुलै १९२३ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- २२ जुलै १९२३ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- १० ऑक्टोबर १९२३ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- २७ डिसेंबर १९२३ येरवडा तुरुंगात गांधीजींच्या भेटीसाठी
- १३ जानेवारी १९२६ गांधीजी पुण्याच्या ससून इस्पितळात एपेंडिक्सच्या शस्त्रक्रियेसाठी भरती, कस्तुरबा जाऊ शकल्या नाहीत, आश्रमात जबाबदाऱ्यांचे वहन करत राहिल्यात, धाकटा मुलगा देवदासला पाठवले
- ५ फेब्रुवारी १९२६ गांधीजींची विनाशर्त सुटका झाली
- मे चा शेवट १९२६ साबरमती आश्रमात गांधीजींशी भेट झाली
- ६ मार्च १९२७ अकोला येथे पुत्र मणीलालचा सुशीलाशी विवाह संपन्न
- ऑक्टोबर १९२७ कन्याकुमारीच्या दर्शनार्थ
- १८ नोव्हेंबर १९२७ माटले येथे गांधीजींना मिळालेल्या मानपत्रात कस्तुरबांचा गौरवपूर्ण उल्लेख
- २० जानेवारी १९२८ पोरबंदर येथे काठियावाड राजकीय परिषदेच्या चौथ्या अधिवेशनात गांधीजींसोबत सहभाग
- २७ मार्च १९२८ मगनवाडी येथील हरीजन सभेत गांधीजींसोबत उपस्थिती
- ४ ऑगस्ट १९२८ बारडोलीत सहभाग
- १२ ऑगस्ट १९२८ बारडोलीचा प्रश्न सुटल्यावर गांधीजींसोबत साबरमतीकडे प्रस्थानाची तयारी
- १३ ऑगस्ट १९२८ साबरमतीला पोहोचल्या
- २३ ऑक्टोबर १९२८ कस्तुरबा आजारी
- २८ डिसेंबर १९२८ कस्तुरबा आजारी
- २ फेब्रुवारी १९२९ हरीलालचा मुलगा रसिक बेशुध्द असल्यामुळे कांतीसोबत दिल्लीला प्रस्थान
- ८ नोव्हेंबर १९२९ शहाबाद येथील महिला सभेत, सोबत मुलगा देवदास
- १७ नोव्हेंबर १९२९ मसुरीला जाताना गुरुकूल कन्या शाळेत सूत कताई स्पर्धेत सहभाग
- डिसेंबर १९२९ मणीलाल-सुशीला आपल्या एका वर्षाच्या सीता या कन्येसोबत साबरमती
- आश्रमात दाखल, कस्तुरबांनी अत्यानंदाने त्यांचे स्वागत केले
- १२ मार्च १९३० मिठाच्या सत्याग्रहात गांधीजींना औक्षण केले, भगिनींचे मनोबळ उंच राखले
- ९ एप्रिल १९३० नवरा आणि तीन मुले मणीलाल, रामदास व देवदास यांना अटक
- १९३० जलालपुर येथील दारु दुकानांवर धरणे धरले
- १० जानेवारी १९३१ बारडोली जवळ अटक
- १५ जानेवारी १९३१ सुरतेत शिक्षा दिली गेली, सोबत मणीताई व मीठूताई होत्या
- १३ मार्च १९३१ सहा महिन्यांची शिक्षा व पन्नास रुपये दंड, दंड न भरल्यास आणखी दीड महिन्यांची शिक्षा, साबरमती तुरुंगात
- १९३१ सहा-सात महिने पिकेटिंग, सत्याग्रहाचे नेतृत्व, पंजाबात देवदास कैदेत होता त्याच्या भेटीला गेली तर हजारो लोकांनी मिरवणुकीने स्वागत केले, दक्षिण आफ्रिकेतील भगिनींनी पंचवीस पौंडांची भेट पाठवली
- १४ एप्रिल १९३१ साबरमती आश्रमात परत
- १७ मे १९३१ लेडी विलिंग्डनशी भेट, अनसूया साराभाई दुभाषिया होत्या

- १३ जुलै १९३१ गांधीजींच्या सोबत सिमला येथे गेल्यात
- १९३२ गोलमेज परिषदेत सहभाग घेण्याऐवजी देशातच कार्य
- १२ जानेवारी १९३२ कस्तुरबांच्या सोबत मीठूताई आणि अब्बास तैयबजींच्या नातीला अटक
- १५ जानेवारी १९३२ कस्तुरबांना सहा आठवड्यांची शिक्षा, साबरमती तुरुंगात
- १५ मार्च १९३२ परत अटक व सहा महिन्यांची शिक्षा
- ४ ऑगस्ट १९३२ गांधीजींच्या अटकेवेळी कस्तुरबा हजर होत्या
- २० सप्टेंबर १९३२ गांधीजींचे येरवडा तुरुंगात उपोषण
- २२ सप्टेंबर १९३२ कस्तुरबांना साबरमतीहून येरवडा तुरुंगात स्थलांतरित केले
- २६ सप्टेंबर १९३२ कस्तुरबांच्या हातून संत्र्याचा रस घेऊन उपोषणाची समाप्ती
- २६ सप्टेंबर १९३२ कस्तुरबांची पुनश्च महिला वॉर्डात रवानगी
- नोव्हेंबर अखेर १९३२ हरीजन कार्यासाठी दक्षिण भारत दौरा
- डिसेंबर १९३२ कस्तुरबांच्या विरोधात कट्टर सनातनी लोकांचा रोष
- ३ डिसेंबर १९३२ कस्तुरबांची सुटका, पुनश्च कार्यमग्न, अस्पृश्यता निर्मूलन कार्यात सहभाग, अस्पृश्यता निवारण राष्ट्रीय संमेलनात मद्रास येथे गांधीजींचे प्रतिनिधित्व केले
- १ जानेवारी १९३३ मुंबईकडे प्रस्थान
- ५ जानेवारी १९३३ आश्रमाकडे रवाना
- जानेवारी १९३३ खेडा जिल्हा दौरा
- ८ फेब्रुवारी १९३३ सहा महिन्यांची शिक्षा, साबरमती तुरुंग
- मार्च १९३३ साबरमती तुरुंगवास
- ८ मे १९३३ गांधीजींनी पुनश्च उपोषण सुरु केले, त्यांची सुटका करण्यात आली
- १३ मे १९३३ साबरमती तुरुंगातून सुटका
- १४ मे १९३३ हरीलाल समवेत गांधीजींच्या भेटीसाठी पुण्याकडे रवाना
- ६ जून १९३३ लहान मुलगा देवदास-लक्ष्मीचा विवाह पुणे येथे पर्णकुटीत
- २१ जुलै १९३३ गांधीजींसोबत तुरुंगात जाऊन मीराताईची भेट
- १ ऑगस्ट १९३३ गांधीजींना अटक
- १६ ऑगस्ट १९३३ गांधीजींच्या उपोषणाला आरंभ
- २० - २१ ऑगस्ट १९३३ गांधीजींच्या भेटीसाठी ससून इस्पितळात हजर, सोबत एण्ड्यूज
- २ ऑक्टोबर १९३३ खादी कार्यासाठी नागपुरकडे रवाना
- १३ नोव्हेंबर १९३३ साबरमती तुरुंगातून सुटका
- १९३३ वर्ष अखेर पुनश्च शेष शिक्षा भोगण्यासाठी कस्तुरबांना अटक
- १४ एप्रिल १९३४ मणीलालचा मुलगा अरुणचा जन्म
- १४ एप्रिल १९३४ रामदासची मुलगी ऊषाचा जन्म
- १८ एप्रिल १९३४ देवदासची मुलगी ताराचा जन्म
- १६ मे १९३४ कस्तुरबांची सुटका
- ६ जून १९३४ कारने पुण्याकडे प्रस्थान करताना कारवर बॉंबस्फोट करण्यात आला
- ४ ऑगस्ट १९३४ बनारसला गांधीजी व कस्तुरबा दोघेही आजारी
- ७ सप्टेंबर १९३४ देवदासच्या आजारात मदतीसाठी हरीजन आश्रमात, डॉ. शर्मा चिकित्सा करणार होते
- ११ सप्टेंबर १९३४ रामदासची मुलगी सुमित्राच्या डोळ्यांच्या उपचारार्थ मुंबईकडे रवाना
- सप्टेंबर १९३४ रामदासच्या आजारात मदतीसाठी साबरमती आश्रमात
- १४ ऑक्टोबर १९३४ रामदाससोबत अहमदाबाद येथील एका इस्पितळात मदतीसाठी
- २८ डिसेंबर १९३४ गांधीजींसोबत दिल्लीला रवाना
- १६ जानेवारी १९३५ सहा आठवड्यांची शिक्षा
- जून १९३५ बोचासण येथे कस्तुरबा
- ३० जून १९३५ दिल्लीकडे प्रस्थान

- १९३४ ते १९३६ गांधीजींसमवेत प्रवास, खेड्या-पाड्यात दौरे, प्रबोधन, सत्याग्रहात सक्रिय, आपल्या मुला-मुलींकडे मुक्कामी, दोन वर्षे आपल्या शैलीत व्यतीत
- जानेवारी १९३६ जपानी लेखक योने नोगुची यांची प्रतिक्रिया- 'कस्तुरबा आईसारख्या आहेत.'
- फेब्रुवारी १९३६ देवदासची पत्नी लक्ष्मीच्या सुश्रुषेसाठी मुंबईत
- मार्च १९३६ गांधीजींसोबत दिल्ली येथे
- २३ मार्च १९३६ अमृतसरहून परत सेगावी सोबत श्री जमनालाल बजाज यांची कन्या मदालसा
- २४ ते २६ एप्रिल १९३६ गांधीजींसोबत नागपुर साहित्य संमेलनात सहभाग, हरीलालची भेट
- मार्च १९३६ सेगाव-सेवाग्रामात मुक्काम
- एप्रिल १९३६ वर्धा येथे गांधीजींसोबत
- एप्रिल १९३६ कस्तुरबा आजारी
- १० मे १९३६ गांधीजींसोबत पंधरवडाभर म्हैसुर येथील नंदी हिल्सवर
- २९ मे १९३६ हरीलालने इस्लाम धर्म स्वीकार करुन अब्दुल्ला हे नाव धारण केले
- ३ नोव्हेंबर १९३६ रामदास आजारी असल्यामुळे अहमदाबादहून मुंबईकडे प्रस्थान
- ८ नोव्हेंबर १९३६ कस्तुरबा मुंबईत
- २५ डिसेंबर १९३६ फैजपुर काँग्रेस अधिवेशनात खादी व ग्रामोद्योग प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थिती, सोबत जवाहरलाल, अब्दुल गफ्फारखान, वल्लभभाई पटेल, सरोजिनी नायडू, राजेंद्रप्रसाद, अबुल कलाम आजाद, गोविंदवल्लभ पंत, कृपलानी, जमनालाल बजाज, महादेवभाई देसाई हजर होते
- २५ मार्च १९३७ गांधीजींसोबत मद्रासला रवाना
- मार्च १९३७ श्री एस्. श्रीनिवास अय्यंगार यांच्या कन्या एस्. अम्बुजम्माल यांनी आयोजित केलेल्या हिंदी संमेलनाच्या महिला परिषदेचे अध्यक्षपद भूषवले
- ७ एप्रिल १९३७ बेळगाव येथे विवाह समारंभात उपस्थिती
- १२ मे १९३७ गुजरातेत बलसाड नजिक तिथल येथे गांधीजींसोबत
- २ जून १९३७ गुजरातेत मरोली येथे
- २९ जून १९३७ सेगावी परत, डाव्या पोटरीच्या हाडाला वेदना
- ११ जुलै १९३७ श्री जमनालाल बजाज यांची कन्या मदालसा व श्रीमन्नारायण यांच्या विवाहात उपस्थिती
- २८ मार्च १९३८ अखेरच्या आठवड्यात आश्रमातील दोन भगिनींसह जगन्नाथ पुरी मंदिरात दर्शनासाठी
- मे १९३८ दिल्ली येथे
- २६ मे १९३८ दिल्लीहून सेगावला परत
- १७ ऑगस्ट १९३८ दिल्ली येथे हरीजन निवास किंग्स वे इथे गांधीजींच्या सोबत
- २० सप्टेंबर १९३८ गांधीजींच्या सोबत दिल्लीत
- नोव्हेंबर १९३८ दिल्लीत आजारी
- २३ डिसेंबर १९३८ कन्या गुरुकूल डेहराडून येथे उत्सवासाठी प्रस्थान
- ३ फेब्रुवारी १९३९ राजकोट सत्याग्रहासाठी राजकोट येथे प्रवेश करताच त्रंबा येथे नजरकैद
- ६ मार्च १९३९ सुटका
- मार्च १९३९ गांधीजींच्या सोबत दिल्लीला
- २४ एप्रिल १९३९ गांधीजींसोबत मुंबईमार्गे कलकत्त्याकडे रवाना
- ३ मे १९३९ गांधीजींसोबत वृंदावन येथे ग्रामोद्योग प्रदर्शनाच्या उद्‌घाटन समारंभात कुमार बागेत, गांधी सेवा संघाद्वारे आयोजित या प्रदर्शनात राजेंद्रप्रसाद, सरदार पटेल व गांधी सेवा संघाचे अध्यक्ष श्री किशोरलाल मश्रुवाला हेही होते
- १३ मे १९३९ कस्तुरबा दिल्लीत
- १ जून १९३९ गांधीजींसोबत काठियावाड मेलने राजकोटहून मुंबईकडे प्रस्थान
- १४ जुलै १९३९ गांधीजींसोबत पेशावरला न जाता स्वतंत्रपणे प्यारेलाल, सुशीलाताई यांच्यासोबत एबटाबाद येथे थांबल्या
- २६ जुलै १९३९ एबटाबादहून वर्धाकडे रवाना

- ४ डिसेंबर १९३९ देवदासची पत्नी लक्ष्मीच्या सुश्रूषेसाठी दिल्लीत
- १७ फेब्रुवारी १९४० गांधीजींसोबत शांतिनिकेतन येथे
- २६ फेब्रुवारी १९४० शांतिनिकेतन येथे आजारी
- २१ सप्टेंबर १९४० अहमदाबाद येथे
- २३ डिसेंबर १९४० सेवाग्राम वर्धा येथे
- २१ मार्च १९४१ सुशीला नायरकडून उपचार करुन घेण्यासाठी कस्तुरबाने एकटीनेच दिल्लीचा प्रवास केला
- २१ एप्रिल १९४१ कस्तुरबा दिल्लीत, हरीलाल काही काळ कस्तुरबांच्या सोबत राहिला
- १० मे १९४१ कस्तुरबा दिल्लीत रुग्णशैयेवर, सुशीलाने सुश्रूषा केली
- २४ मे १९४१ वर्धा सेगावला परतल्या, सोबत देवदास, रामदास आहेत.
- १९ डिसेंबर १९४१ आजारी
- डिसेंबर १९४१ मरोली येथे
- १९४१ वर्षभर सेवाग्राम आश्रमात
- ७ फेब्रुवारी १९४२ आजारी
- १७ फेब्रुवारी १९४२ अत्यवस्थ
- एप्रिल १९४२ आजारी
- २ जुलै १९४२ ताप
- ९ ऑगस्ट १९४२ अटक, आधी ऑर्थर रोड तुरुंग मग येरवडा तुरुंगात, सोबत सुशीला २९ डिसेंबर १९४३ जन्म-मरणाच्या हिंदोळ्यावर, गंभीर व गुंतागुंतीचा आजार
- जानेवारी १९४४ दोन वेळा हृदयविकाराचा प्रबळ झटका आला
- २२ फेब्रुवारी १९४४ सायंकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी महापरिनिर्वाण

❖❖❖

## २) कस्तुरबा परिवार-परिचय

- उत्तमचंद उपाख्य ओता गांधी - आजे सासरे
- लक्ष्मीबाई गांधी - आजे सासूबाई (उत्तमचंद गांधी यांची दुसरी बायको)
- करमचंद उपाख्य कबा गांधी - सासरे
- पुतळी आई - सासूबाई (करमचंद गांधी यांची चौथी बायको)
- गोकुळदास - वडिल
- व्रजकुंवर - आई
- खुशालदास - थोरला भाऊ
- माधवदास - धाकटा भाऊ
- कृष्णा - धाकटी भावजय, माधवदासची बायको
- लक्ष्मीदास गांधी - मोठे दीर
- नंदकुंवर - मोठ्या जाऊ, लक्ष्मीदासची बायको
- करसनदास - गांधीजींपेक्षा मोठे , मधले दीर
- गंगा - मधल्या जाऊ, करसनदासची बायको
- रलियातबेन उपाख्य गोकी बेन - मोठ्या वन्संबाई
- छगनलाल गांधी - चुलत दीर
- काशी - चुलत जाऊ, छगनलालची बायको
- मगनलाल गांधी - चुलत दीर
- संतोक - चुलत जाऊ, मगनलालची बायको
- नारणदास - चुलत दीर
- जमनादास - चुलत दीर
- हरीलाल गांधी - थोरला मुलगा
- गुलाब उपाख्य चंचल गांधी - हरीलालची बायको, मोठी सून
- रामी ताई - थोरली नात, हरीलालची मुलगी
- कुँवरजी पारेख - थोरले नात जावई, रामीचे पती, हरीलालचे जावई
- डॉ. कांतीभाई गांधी - थोरला नातू, हरीलालचा मुलगा
- सरस्वती गांधी - नात सून, कांतीलालची बायको, हरीलालची सून
- रसिक गांधी - नातू, हरीलालचा दुसरा मुलगा
- मनु गांधी - नात, हरीलालची मुलगी
- सुरेन्द्र मश्रुवाला - नात जावई, मनुचे पती, हरीलालचे जावई
- डॉ. शांती गांधी - पणतू, कांतीलालचा मुलगा, हरीलालचा नातू
- सूसन गांधी - पणतू
- प्रदीप गांधी - पणतू, हरीलालचा नातू
- मंगला गांधी - पणतू सून, प्रदीपची बायको
- ऊर्मी मश्रुवाला - पणती, नात मनूची मुलगी
- मणीलाल गांधी - दुसरा मुलगा
- सुशीला गांधी - दुसरी सून, मणीलालची बायको
- सीता गांधी - नात, मणीलालची मुलगी
- नानूभाई धुपलिया - नात जावई, सीतेचा नवरा, मणीलालचे जावई
- अरुण गांधी - नातू, मणीलालचा मुलगा
- सुनंदा गांधी - नात सून, अरुणची बायको, मणीलालची सून
- तुषार गांधी - पणतू, अरुणचा मुलगा
- इला गांधी - पणती, मणीलालची मुलगी
- रामगोविन्द मेवालाल - पणतू जावई, इलाचा नवरा
- रामदास गांधी - तिसरा मुलगा
- निर्मला गांधी - सून, रामदासची बायको
- सुमित्रा गांधी - नात, रामदासची मुलगी
- गजानन कुलकर्णी - नात जावई, सुमित्राचे पती, रामदासचे जावई
- कनु गांधी - नातू, रामदासचा मुलगा
- शिवा लक्ष्मी गांधी - नात सून, रामदासची सून, कनुची बायको
- ऊषा गांधी - नात, रामदासची मुलगी
- हरीश गोकाणी - नात जावई, ऊषाचा नवरा, रामदासचे जावई
- डॉक्टर आनंद गोकाणी - ऊषाचा मुलगा
- संजय गोकाणी - ऊषाचा मुलगा
- देवदास गांधी - चौथा मुलगा
- लक्ष्मी गांधी - सून, देवदासची बायको
- तारा गांधी - नात, देवदासची मुलगी
- डॉक्टर ज्योतीप्रसाद - नात जावई, देवदासचे जावई
- भट्टाचार्य - तारा गांधीचे पति
- विनायक गांधी - ताराचा मुलगा
- सुकन्या भट्टाचार्य - ताराची मुलगी
- राजमोहन गांधी - देवदासचा मुलगा

- ऊषा गांधी - नात सून, राजमोहनची बायको, देवदासची सून
- डॉ. रामचंद्र गांधी - नातू, देवदासचा मुलगा
- लीला गांधी-पणती, देवदासची नात, रामचंद्रची मुलगी
- गोपालकृष्ण गांधी - नातू, देवदासचा मुलगा
- तारा गांधी - नात सून, गोपाळकृष्णची बायको, देवदासची सून,
- दिव्या आणि अमृता-पणत्या, गोपाळकृष्णच्या मुली
- सुप्रिया गांधी - पणती, राजमोहनची मुलगी, देवदासची नात
- देवव्रत गांधी-पणतू, राजमोहनचा मुलगा, देवदासचा नातू

**विकीपिडिया मधील माहिती.**

- हरीलाल दिल्ली येथे जन्म दिनांक २३ ऑगस्ट १८८८ पत्नी गुलाब,
- मुले शांती, कांती, मनोरमा मनु मश्रुवाला, रसिकलाल, रामी पारीख
- नातू अनिता, अन्न, अंजली
- हरीलालचा मृत्यु १८ जून १९४८, मुंबई
- मणीलाल २८ ऑक्टोबर १८९२ राजकोट, पत्नी सुशीला मश्रुवाला,
- मुले अरुण, ईला, सीता
- नातू तुषार, अर्चना
- मृत्यु ५ एप्रिल १९५६ डर्बन दक्षिण आफ्रिका
- रामदास जन्म १८९७ नाताळ कॉलनी, पत्नी निर्मला,
- मुले कनू, सुमित्रा, ऊषा मृत्यु १४ एप्रिल १९६९ पुणे
- देवदास जन्म २२ मे १९०० दक्षिण आफ्रिका, पत्नी लक्ष्मी, मुले राजमोहन, गोपालकृष्ण, रामचंद्र, तारा भट्टाचार्य
- नातवंडे लीला, देवदत्त, सुप्रिया
- मृत्यु ३ ऑगस्ट १९५७ मुंबई

❖❖❖

## ३) कस्तुरबांची काही भाषणे

: १ :

(ऑक्टोबर १९२२ साल. अजमेर जिल्हा राजकीय परिषदेचे आयोजन केले गेले होते. गांधीजी येरवडा तुरुंगात होते. कस्तुरबा या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होत्या. त्यांचे पुढील भाषण रामदास भाईंनी वाचून दाखवले.)

सध्या आपल्या देशात राजकीय चळवळीचे वारे वेगाने वहात आहेत. आपण या परिषदेच्या अध्यक्षपदी एखाद्या राजकीय निष्णात व्यक्तिची निवड करायला हवी होती. मी ना राजकीय घडामोडींशी संबंधित ना या संस्थानाशी परिचित. माझा गांधीजींवरील दृढ विश्वास व्यक्तवण्यासाठी आणि त्यांनी निर्दिष्ट केलेल्या साधनांची शिफारस करण्यासाठी म्हणून आपण मला हा बहुमान दिला आहे., एवढेच मला कळत आहे. त्यांचे विचारपूर्वक आचरण करणे मी माझे कर्तव्य मानते. गांधीजींचे विचार आणि प्रयोग आज प्रासंगिक असल्याचे मला वाटते. त्यांनी सुचवलेला मार्ग नेहमीसाठीच फायदेशीर आणि शांतीपूर्ण आहे. आज मी आपल्याला याविषयी विश्वास आणि निर्धार या पलिकडे काय बरे सांगू शकते? गांधीजींचा संदेश हा शाश्वत धर्माचा संदेश आहे.

आपण सरकारशी असहकाराचा निर्णय घोषित केला आहे. पण आपल्या परस्परांच्या ठायी सहकार भावना असल्यावरच तो यशस्वी ठरणार आहे. जनतेमधील परस्पर सहकार भावना हे स्वराज्य आहे. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य नसून स्वत:वर राज्य होय ! ज्यावेळी आपल्या परस्पर सहकार भावनेचा लोप होतो त्यावेळी आपल्याला अटळपणे इतर साम्राज्यांच्या समोर माना लववाव्या लागतात.

आपल्या प्रांतात आणि सभोवताली हातमागाचे कार्य सुरु असल्याचे मी ऐकले. त्यांच्या सहकार्याने आपण शुध्द खादी तयार करु शकता. विदेशी वस्त्रांची खरेदी हा स्वराज्याशी द्रोह असल्याची गोष्ट आता आपल्या खचितच लक्षात आली असेल. विदेशी वस्त्रे परिधान करणे म्हणजे स्वराज्याच्या आत्मतत्त्वाशी बेईमानी करणे होय. आपल्या मनात वंचितांविषयी किंचितही दयाभावना असेल तर आपण खात्रीने केवळ खादीच परिधान कराल. भगिनींनी केवळ शुध्द खादीच परिधान करावी अशी मी त्यांना प्रार्थना करीन. खादी हे आपल्या देशातील गोर-गरीबांच्या उदरनिर्वाहाचे साधन ठरेल. गरीबीत रहाणाऱ्या भगिनींना आपल्या पावित्र्य व धर्माचे रक्षण करण्यासाठी यातून सहाय्य मिळेल.

विदेशी वस्त्रे मद्यार्काहून कमी घातक आहेत. असे कृपया समजू नका. मद्यार्काला दूर ठेवण्यासाठी आपण भरपूर प्रयत्न करता पण विदेशी वस्त्रांच्या प्रभावातून मुक्त होण्यासाठी आपल्याला अधिक प्रामाणिकपणे प्रयत्न करावे लागणार आहेत. विदेशी वस्त्रे परिधान करणाऱ्या आपल्या नातलगांच्या व आप्तमित्रांच्या घरोघरी जाऊन भेटावे लागणार आहे. या विदेशी वस्त्रांचा त्याग करायला त्यांना प्रवृत्त करावे लागणार आहे.

मी नुकतीच गांधीजींना येरवडा तुरुंगात भेटून इकडे येत आहे. ते तिथेही खादी कार्य करत आहेत. ते स्वत: माग चालवून खादीचे कापड तयार करत आहेत. आपण गांधीजींचे समाधान करु इच्छित असाल आणि स्वराज्य जर शीघ्र पदरात पाडून घेऊ इच्छित असाल तर खादी निर्मिती आणि वितरणाच्या कामात आपण स्वत:ला जोडून घ्यायला हवे. घरोघरी जाऊन खादीचा प्रचार करायला हवा. खादीत सर्वच जाती-धर्मांचे स्वराज्य सामावलेले आहे. यात हिंदूंचे गोरक्षण आणि मुस्लिमांचे खिलाफत रक्षण अंतर्भूत आहे.

हिंदुस्तानात प्रथम पाऊल टाकणाऱ्या सुप्रसिध्द मुस्लिम सत्पुरुषाचे हे शहर आहे. त्यांच्या विषयी सर्वच हिंदू-मुसलमानांच्या मनात समान आदराची भावना वसते. त्या महापुरुषाच्या छायेखाली हिंदू-मुस्लिम ऐक्य भावना सुरक्षित आहे. असे मला वाटते. हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी सबंध देशाला आदर्श ठरावे असे हे पावन स्थळ आहे.

पंजाबात पोलिसी अत्याचारांचा सामना करताना शूर अकालींनी आपल्या शांततेच्या निर्धाराचे आणि धर्मप्रेमाचे उदाहरण प्रस्तुत केले आहे. अशा परिस्थितीत आपल्या युध्दात शांततेची किती गरज आहे. आणि तिचे पालन करणे किती सोपे आहे. हे नव्याने सांगायची आवश्यकता नाही. स्वराज्याचा अर्थ जर तीस कोटी भारतीयांचे सौख्य आणि शांतता असेल तर ते केवळ शांततेने साध्य करता येणार आहे. गोंधळ निर्माण

करणाऱ्या साधनांचा उपयोग करुन काही कुणी शांततेची स्थापना करु शकत नाही.

आणि मी सर्वांना व मुख्यत्वेकरुन हिंदू बंधु-भगिनींना विनवत आहे. आपल्या हरीजन बांधवांचा अंगिकार करणे आपले धार्मिक कर्तव्य आहे. हे खरे तर आता सर्वांना समजून चुकले आहे. तरीही या दिशेने अजून पुरेसे प्रयत्न झालेले नाहीत. तीन महिन्यानंतर जर मी गांधीजींना हे सांगू शकले की अजमेर भागातून अस्पृश्यतेचा समूळ बीमोड झाला आहे. तर त्यांच्यासाठी हा आनंद स्वराज्य प्राप्तीच्या आनंदाइतकाच असेल.

माझे भाषण पूर्ण करण्यापूर्वी मी आपणास एका गोष्टीची आठवण करुन देऊ इच्छिते. जेव्हा निम्मे अजमेर म्हणजे किमान पंधरा हजार अजमेरनिवासी नखशिखांत खादी वापरतील तेव्हाच आपण गांधीजींना इकडे येण्यासाठी हाक माराल, असे वचन आपण गांधीजींना दिले आहेच. आपण जर मला गांधीजींची प्रतिनिधी या नात्याने इथे बोलावले असेल तर आपण आपले वचन पाळले असे मी गृहीत धरुन चालते.

माझ्या छोट्याशा भाषणाचा समारोप करताना मी दयाघनाला प्रार्थना करीन की त्याने आपणास सर्व प्रकारचे कष्ट सहन करण्याचे सामर्थ्य प्रदान करावे. स्वराज्य प्राप्तीसाठी एकमेकांच्या चुका क्षमा करण्याची शक्ती प्रदान करावी[१]

: २ :

(२३-२४ नोव्हेंबर १९३१ साल. काँग्रेस कमिटी मिरवाडा-राजपुताना आणि मध्य भारताने आयोजित केलेल्या राजकीय परिषदेच्या अध्यक्षपदी कस्तुरबा विद्यमान होत्या. श्री चंद्रशंकर शुक्ल यांनी कस्तुरबांचे पुढील भाषण वाचून दाखवले होते.)

मला राजकीय घडामोडींविषयी विशेष ज्ञान आहे. म्हणून आपण मला इथे बोलावलेले नाही. आपल्याला गांधीजींवरील आपला दृढ विश्वास व्यक्त करायचा आहे. गांधीजींच्या हाती आपले हित सुरक्षित आहे. हा आपला विश्वास पुष्ट करण्यासाठी आपण मला हे पद दिले आहे.

आपल्याला ब्रिटिश शासित प्रदेश आणि आपल्या संस्थानांच्या प्रश्नांचा एकत्रिपणे विचार करावा लागतो कारण संस्थानांचे जाळे तुमच्या भोवती पसरलेले आहे. अशाप्रकारे शब्दश: म्हटले तर आपला देश एक आहे. आपण एक आहोत. यामुळे ब्रिटिश शासनकर्ते आणि आपले संस्थानिक राजे यात तफावत असली तरी ती आपल्यासाठी मात्र नाही. आपण एक आहोत त्याचप्रमाणे आपल्यापुढे करायची कार्येही एकच आहेत. भुकेल्यांसाठी आपल्याला भाकरी मिळवायची आहे. अन्यायाने दडपशाही झेलाव्या लागणाऱ्या लोकांना त्यांच्या उध्दाराचा मार्ग दाखवायचा आहे. त्यांना दुष्ट चालीरीतींच्या विळख्यातून मुक्त करुन आत्मशुध्दीकरण संपादनाचा मार्ग दाखवायचा आहे. ज्यावेळी खरी आणि सत्य शक्ती जनतेच्या हाती एकवटेल त्यावेळी स्वत:हूनच अनेक अडथळे आणि गुंतागुंत नष्ट होणार आहे. आपण जर सामर्थ्यशाली बनलो तर आपल्या भोवतालची जनताही आपोआपच बलशाली बनणार आहे.

राजांनी निर्माण केलेल्या त्रास आणि छळाबद्दल मी नेहमीच ऐकत आले आहे. त्यामुळे मला खोलवर वेदना होतात. आपले राजे असे का वागतात? याचे मला आश्चर्य वाटते. ते काही ब्रिटिशांसारखे कुठल्या दूरस्थ प्रदेशातून आलेले नाहीत. आपले संस्थानिक हे आपले - आपल्यातले आहेत. त्यांचा जन्म इथे झाला. विवाह इथे झाला. त्यांचे सारे आप्तेष्ट, गणगोत तर इथलेच आहे. त्यांचा अखेरचा श्वासही इथेच घेतला जाणार आहे. मग ते आपल्या प्रजेला सुखा-समाधानात का राखत नाहीत? जनतेच्या ठायी जर शक्ती निर्माण झाली तर ती राज्यकर्त्यांनाही हितावह ठरेल. काही लोकांनी राजांच्या विरोधात निदर्शने केल्याचे मी ऐकले. लंडनच्या गोलमेज परिषदेत काही संस्थानिक राजांनी विरोधी प्रतिक्रिया नोंदवल्यात हे सत्य आहे. ते नि:सहाय लोक या शिवाय दुसरे करु तरी काय शकतात? आपल्या अंत:करणातील सत्य ते कुठे बोलतील? सरकारच्या पाठिंब्याशिवाय ते एक दिवसही जगू शकणार नाहीत पण राजांच्या प्रश्नांविषयी काही गांधीजी निराश-नाऊमेद नाहीत. राजांच्या मनातली भीती निमाली तर ते जनतेसाठी खूप काही करु शकतील.

पण आपण राजांवर अवलंबून असता कामा नये. करता येण्यासारखी ढीगभर कामे आपल्या पुढे उभी ठाकली आहेत. खादीचे कार्य घ्या. खादी जवळपास मृत अवस्थेत होती. चरखा संघाच्या प्रयत्नांमुळे खादीचे

पुनरुज्जीवन झाले. आपण जर मनावर घेतले तर एकटा राजस्थान आपल्या सबंध देशाला खादी पुरवू शकेल पण आपण निर्माण करता त्या प्रमाणात खादीचा उपयोग करत नाहीत असे माझ्या कानांवर आले आहे. याला काही चांगले म्हणता येणार नाही. खादीसारखी कामधेनु जर तुमच्या घरात असेल तर तुम्हाला बाहेरुन वस्त्रे हवीतच कशाला?

दारिद्र्यग्रस्त भगिनी खादी कामातून रोजगार मिळवून घेताहेत, यामुळे सर्व भगिनींनी खादीचा वापर केला पाहिजे. राणीपासून तर थेट शाळकरी मुलीपर्यंत सर्वांनी खादी परिधान केली पाहिजे. वस्त्राविषयीची आत्मनिर्भरता बिजोरिया आणि रिंगास येथे सुरु असल्याचे ऐकून मला आनंद वाटला. बिजोरिया येथिल अधिकांश शेतकरी आपापल्या गरजेनुसार वस्त्र स्वावलंबी झाले आहेत. आणि रिंगास येथेही हा प्रयोग प्रगती पथावर आहे. अशा प्रयोगांमुळे राजस्थान वस्त्र स्वावलंबनाच्या बाबतीत जर आपल्या संपूर्ण देशापुढे एक उदाहरण म्हणून उभा राहू शकला तर ते उत्तम ठरेल.

विदेशी वस्त्रांच्या बहिष्काराचा विषय आपण किरकोळ स्वरूपाचा मानू नये. आपल्या देशातून या पापाचा समूळ नायनाट करणे यातच आपले स्वातंत्र्य दडलेले आहे. आपण सरकारशी टक्कर घेणे थांबवले आहे. पण विदेशी वस्त्रांचा बहिष्कार आणि मद्यार्क विक्रीच्या विरोधातले आपले युध्द कायम आहे. केवळ आपण बायकाच मद्यार्काच्या उपभोगाविरुध्द झुंजायला आणि ते रोखायला समर्थ आहोत. आता आपल्या राजस्थानी भगिनींनी पुढे येऊन हे कार्य आपल्या हाती घ्यावे.

पण इथे बुरखा आणि पर्दा प्रथा मात्र कायमच आहे. वृध्द जन आपल्या लेकींच्या वयाच्या बालिकांशी विवाह करतात. बाहुला-बाहुलींच्या लग्नांसारखी मुला-मुलींची लग्ने होतात. हे छातीत धडकी भरायला लावणारे विचित्र पातक आहे. या दुष्ट चालीरिती तुम्ही अजून किती काळ सहन करणार आहात?

या वाईट चालीरीतींचे निर्मूलन केल्याशिवाय आपण स्वत:ला शुध्द व पवित्र बनवू शकणार नाहीत. देशभरातल्या महिलांच्या ठायी जागृती आली आहे. अशा परिस्थितीत केवळ राजस्थानचे पिछाडीवर असणे कसे बरे सहन करता येईल?

माझ्या कानावर काही आले आणि मी त्यामुळे भयव्याकुळ झाले.

अशा परिस्थितीत केवळ राजस्थान कसा काय मागास राहू शकतो? मी अशाही प्रकारचे काही ऐकले की ज्याच्या केवळ स्मरणमात्रेणच त्रस्त होते. राजस्थानात नोकर राखायची पध्दत असल्याचे मी ऐकले. विवाहसमयी या लोकांना हुंड्यादाखल पाठवले जाते. हे सत्य नसेल असे मला प्रामाणिकपणे वाटते. गतवर्षी आपण शौर्याने सरकारविरुध्द झुंजलात. त्याचप्रमाणे आपण या सामाजिक कुकर्मांच्या विरोधात का झुंजत नाहीत?

सध्या तुमचे लक्ष लंडनकडे लागले आहे. ब्रिटिश भारताला तर स्वराज्य मिळेल पण संस्थानांमधली प्रजा आहे. तशीच राहील अशी काहींच्या मनात भीती आहे. मनात हे भय बाळगू नका. आपण जर आपले दोष घालवलेत आणि अहोरात्र जनतेची सेवा केली तर आपण स्वराज्य मिळवायला आपोआप पात्र ठरू. सूर्योदयानंतर सर्वांनाच प्रकाश लाभतो. या सत्यावरचा आपला विश्वास कुणीही ढळू देऊ नये. सामाजिक कुकर्मांना मूठमाती देऊन आणि जनतेची सेवा करुन आपणच आपल्यातून बलशाली लोक तयार करु या. इथे मला संस्थानिकांना चार शब्द सांगायलाच हवेत. सध्या होणाऱ्या बदलांचा विचार करु जाता त्यांनी लवकरात लवकर जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने पावले उचलायला हवीत. या आशा-आकांक्षा सौख्य आणि स्वातंत्र्याच्या जर ठरल्या नाहीत तर जनतेच्या अंत:करणातील राजांविषयीच्या शतकांपूर्वीच्या सनातन विश्वासाला तडा जाईल. जनता निराश होईल. जनतेला राज्यकर्ते वैऱ्यांसारखे वाटतील. जनतेच्या अंत:करणाच्या सिंहासनावर आरुढ व्हायचे संस्थानिक राजांवर अवलंबून आहे. लोकाना दडपून सिंहासनाला बळकट करुन रहाण्याचे दिवस आता गेले आहेत. हरीजनांच्या म्हणजे अस्पृश्यतेच्या प्रश्नाला आपण ताबडतोब सोडवायला हवे. त्यानंतरच आपल्याला देवाचे आशीर्वाद लाभणार आहेत. शहरांमध्ये अस्पृश्यतेचा प्रश्न गंभीर नाही हे खरे आहे. पण खेड्या-पाड्यांमधून मात्र या प्रश्नाची तीव्रता कायम आहे.

स्वराज्याचा संदेश प्रत्येक खेड्यात पोहोचला आहे. ग्रामीण जनांचे मोठे समूह तुरुंगात गेले आहेत. तरीही काँग्रेस कार्यकर्ते पुरेशा संख्येने खेड्यांपर्यंत पोहोचलेले नाहीत. आपण खेड्यांमध्ये जर पुरेसे कार्य केले तर स्वराज्य प्राप्तीचे प्रयत्न खूप सुगम होतील.

देशातील तरुणाईचे हे काम आहे. भारतातील युवक-युवतींच्या देशभक्तीची नोंद घेताना कुणाचे अंत:करण आनंदाने भरुन येणार नाही?

राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान राखण्यासाठी आपल्या बंधुंनी आपले शिरकाण करुन आणि भगिनींनी लाठ्या झेलून धैर्य दाखवले आहे. आता आपल्याला प्रत्येक खेड्यापर्यंत जाऊन पोहोचावे लागेल आणि भरीव स्वरुपाचे कार्य करावे लागेल. खेड्या-पाड्यांमध्ये कार्य करणे रुक्ष आणि रटाळ वाटेल खरे पण एकदा का आपण खेड्यातल्या भोळ्या-भाबड्या जनांच्या अंत:करणात प्रवेश केला ना तर मग खेड्यातून पाय बाहेर काढू नये असे आपल्याला वाटेल. स्वराज्याची किल्ली केवळ आपल्या खेड्यांमध्ये आहे. मी सुख-दु:खाचा काळ अनुभवला आहे. स्वराज्य हे प्रत्यक्षात साकार होईल. माझी थकली दृष्टी उतावीळ उत्सुकतेने स्वराज्याची वाट बघत आहे. यामुळे आपली शक्ती वाया न घालवता त्याचे कार्यात रुपांतर करुन काँग्रेसच्या शक्तीत आपली शक्ती मिसळून टाकण्याचे आवाहन मी तरुणाईला करत आहे. असे केल्याने आपण अखेरीस स्वराज्यावर अधिराज्य गाजवाल.

या काळात देशाने आश्चर्यकारक वाटावी अशी प्रगती केली आहे. आपण राजस्थानच्या उणिवांविषयी भरपूर बोललो पण राजस्थान ही शूर-वीरांची भूमी आहे. याचा आपल्याला विसर पडला असे मात्र नव्हे ! ही त्याग आणि बलिदानाची भूमी आहे. आयुष्याचे बलिदान आणि वैभवाचा त्याग हे तर तुमच्या आयुष्याचे भव्य उत्सव होते. आपण आपल्या आयुष्य आणि संपदेपेक्षा चारित्र्याला मोलाचे मानले. धारातीर्थावर वाहिलेल्या आपल्या पूर्वजांच्या रक्ताने या वीरगाथा लिहिल्या गेल्या आहेत. इतिहास या तेजस्वी क्षणांचा साक्षीदार आहे. स्वराज्य संपादित करण्याच्या जबाबदारीचे वहन आपण इतिहासकाळापासून करत आला आहात. ही ज्योत प्रखरपणे उजळत ठेवा आणि परमोच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठी प्रतिज्ञाबध्द होऊन सिध्द व्हा ! माझे आपणा सर्वांना आशीर्वाद असोत ! ![२]

: ३ :

(२१ मार्च १९३६. पंजाब अस्पृश्योध्दार संमेलनाचे पाचवे अधिवेशन होते. या अधिवेशनातील कस्तुरबांच्या भाषणाची ही संहिता.)

अस्पृश्योध्दाराची चळवळ आता आपल्या आयुष्याचा एक अंगभूत भाग बनली आहे. आता हा विचार आपल्या अंत:करणात दृढपणे ठसला आहे. अस्पृश्यतेचा विचार मनात कायम राखून आपण सत्य व धर्माच्या पथावर एक पाऊलही टाकू शकणार नाहीत. सुदैवाने अन्य संस्थानांइतकी विशेषत: दक्षिण भारताइतकी या प्रश्नाची तीव्रता पंजाबात नाही. या शापापासून मुक्तता मिळवण्याचे प्रयत्न वेळोवेळी होत आलेले आहेत. शिख गुरुंनी आपल्या शिष्यांना समतेचा मधु चाखायला परवानगी दिलेली आहे. स्वामी रामतीर्थांनी सर्वांवर प्रेम करण्याचा आपला उपदेश दिलेला आहे. गुरु नानकदेवानी श्रेष्ठ-कनिष्ठ जातींच्या भेद भावनेला क्षणभरही थारा दिला नाही. आर्य समाजानेही स्वत:च्या विचारसरणीला अनुसरुन या संदर्भात उत्तम भूमिका बजावली आहे. यामुळेच भारतातील इतर प्रदेशात आढळतो तसा इथे हा प्रश्न गुंतागुंतीचा नाही पण तरीही पंजाबातून अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन झाले आहे. असे काही तुम्ही म्हणू शकत नाही. आपण अस्पृश्यतेच्या पाळामुळांना हलवू शकलो आहोत हे खरे आहे. पण त्याच्या समूळ उच्चाटनाकामी मात्र आपण यशस्वी झालेलो नाहीहोत. अस्पृश्यता पालनाचे पातक हे काही सामान्य पातक नव्हे! सेवा आणि समर्पणाद्वारेच आपण या महत् पातकापासून स्वत:ला स्वच्छ राखू शकतो. अर्थात् हे सेवाकार्य नि:स्वार्थ भावनेने असावे. महात्मा गांधीजींनी वेळोवेळी घोषित केले आहे. की हा काही राजकीय प्रश्न नाही. ही तर मानवतेची विशुध्द सेवा आहे. यातूनच हे महत् पातक घालवता येईल. सच्ची आणि नि:स्वार्थ सेवा हेच आपल्या सनातन धर्माचे खरे पूजन ठरेल, धर्माची खरी भक्ती ठरेल.

प्रत्येकजण आपापल्या दृष्टिकोणातून विशिष्ट वळण लावण्याच्या हेतूने हरीजनांचे धर्मांतर करु इच्छिताहेत हे ऐकून मला यातना होताहेत. हे खरेखुरे धार्मिक प्रयत्न नाहीत. प्रत्येक धर्म सत्याच्या महात्म्याचा सारखाच उपदेश करतो. तिथे बळजबरीचा मुळीच

वापर व्हायला नको. गरीब आणि पद-दलितांच्या सेवेचा आपल्यापैकी प्रत्येकाला समान अधिकार आहे. पण आपल्या स्वार्थासाठी जबरदस्तीपूर्वक शरण आणणे, हाव बाळगून इतरांची मालमत्ता बळकावून ताब्यात घेणे हा काही माणसाचा अधिकार नाही.

सामान्य अशा प्रापंचिक कारणांसाठी धर्मांतरण करणाऱ्याला त्याने स्वीकारलेल्या धर्मात सांत्वना लाभणार नाही. आपण इतर धर्मांची चिंता करण्याचे काही कारण नाही. आपण आपल्या उणिवा आणि वैगुण्यांना बघायला हवे. आपण जर केवळ आपल्या आत्म्यांना शुध्द केले तर हिंदू धर्म या पापापासून मुक्त होईल आणि कुणीही या शुध्द झालेल्या धर्माची कक्षा ओलांडायचा विचार करणार नाही. जो कुणी या धर्माचे अनुपालन करील तो हिंदू-मुस्लिम-सिख-ईसाई यांच्यात भेदभाव करणार नाही कारण की हा दूजाभाव अखेर अस्पृश्यतेचाच एक भाग ठरेल. या कारणामुळेच मला वाटते की हरीजनांची सेवाच जातीभेद भावनेच्या मूळांचे खंडन करील.

अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीतील पंजाबचे योगदान समाधानकारक आहे. हरीजन सेवा संघाच्या पेय जल योजनेसाठी एथवर पाच हजार रुपयांचे सहाय्य केले गेले आहे. या दिशेने आपल्या कधीच न दमणाऱ्या अजिंक्य ताई श्रीमती रामेश्वरी नेहरु यांनी भरपूर कार्य केले आहे. त्यांच्या उत्साह आणि सेवेचा इतरांनी आदर्श घ्यावा अशी स्थिती आहे. कांगराच्या डोंगराळ भागात पाण्याचा प्रश्न फार बिकट आहे. या महासागरात हे योगदान एका थेंबासारखेही नाही. आपण या कामी जो काही निधी द्याल तो अल्प-स्वल्पच ठरेल.

हरीजनांसाठी विहीरी, पाणवठे आणि मंदिरे खुली करणे हे आपले कर्तव्य आहे.

पंजाब सनातन धर्म प्रतिनिधी सभेने या दिशेने केलेल्या कार्याने मी पुलकित झाले आहे. पाच-पाच नद्यांच्या या प्रदेशात हरीजन तहानलेला असेल यासारखे दुसरे अन्यायी कृत्य नसेल. याचप्रमाणे हरीजनांसाठी देवळांची दारे बंद ठेवणे यासारखेही दुसरे अधार्मिक कृत्य नसेल. आपण हे संपवायला हवे.

माझा हरीजन बंधु-भगिंनींसाठी एक संदेश आहे. जे मद्यप्राशन करत असतील त्यांनी या घातक सवयीपासून लांब रहायला हवे. बहुतांश हरीजन जुगार खेळतात असे मला कळले आहे. या वाईट सवयीचाही त्याग करायला हवा. आपल्या हरीजन बंधुंनी स्वच्छ रहावे आणि मद्यपान व जुगारासाख्या दुर्गुणांचा त्याग करावा. प्रभु-स्मरण करुन स्वत:च्या पायांवर उभे रहावे.

माझ्या भाषणात मी माझ्या भगिनी व लेकींसाठी काही बोलले नाही असे काही होणार नाही. धार्मिक सुधारणांच्या संदर्भात भगिनी पुरुषांच्या तुलनेने यशाची उच्चतम पायरी गाठू शकतात. आपण हरीजन भगिनींच्या घरोघरी जाऊन त्यांना लिहायला-वाचायला शिकवू शकता, शिलाई काम शिकवू शकता. त्यांच्या उत्कर्षासाठी यासारखे काही करु शकता.

केवळ बोलून आपल्याला थांबून चालणार नाही. यासाठी प्रत्यक्ष कृती करावी लागेल. स्पृश्यास्पृश्य भावनेचा समूळ नाश होवो अशी ज्ञानज्योत परमेश्वर तुमच्या अंत:करणात प्रकट करो.

कस्तुरबांनी पंजाबच्या भगिनींना पुढीलप्रमाणे संदेश दिला.

पाच नद्यांच्या प्रदेशातील या भगिनींना माझा हा संदेश आहे. की आपण भगिनी प्रामाणिकपणे या अस्पृश्यतेच्या भावनेतील मूलभूत कुकर्मांना घालवण्याचे प्रामाणिक मिशन हाती घेतले तर एकट्या बंधुंनी ते करण्यापेक्षा अधिक सुगम होईल. तर मग चला, आपण सर्व भगिनी मिळून आपल्या निराद्दत बंधू-भगिनींना बंधुभावाने जोडण्यासाठी एकत्रित येऊ या ! या प्रश्नावर सारे लक्ष केंद्रित करु या !! [३]

संदर्भ

१) गांधी आणि राजस्थान: शोभालाल गुप्त गांधी स्मारक निधी भिलवाडा राजस्थान १९६९ ; पृष्ठ २६ -२८ ;
२) गांधी आणि राजस्थान: शोभालाल गुप्त गांधी स्मारक निधी भिलवाडा राजस्थान १९६९ पृष्ठ ३० ते ३३;
३) गांधी आणि कस्तुरबा: गणपतराय कस्तुरबा मेमोरियल पब्लिकेशन पृष्ठ १०३ ते १०५

❖❖❖

## ४) गांधीजींनी कस्तुरबांना लिहिलेली पत्रे

९ नोव्हेंबर १९०८

"प्रिय कस्तुर,

तुझ्या तब्बेतीविषयी वेस्ट यांनी पाठवलेली तार पोहोचली. माझे हृदय विदीर्ण झाले. तुझी सेवा करायला माझे मन धाव घेत आहे. परिस्थिती मात्र अनुकूल नाही. सत्याग्रहाच्या लढ्यात मी सारे काही अर्पण केलेले आहे. मी नाही तिकडे येऊ शकत. दंड भरल्यावर खरे तर मला तिथे येता येईल पण दंड तर मी भरणार नाही. तू जरा हिंमत धर. योग्य आणि नियमित आहार घे. तू बरी होशील आणि माझ्या दुर्दैवाने तू जर मरण पावणार असशील तर माझ्या हयातीत तुझे असे निघून जाणे काही वाईट नाही. माझे तुजवर इतके प्रेम आहे. की तू निघून गेल्यावर माझ्यासाठी जिवंत राहशील. तुझा आत्मा तर अमर आहे. मी तुला खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की तुला जावे लागले तर मी दुसरा विवाह करणार नाही. मी तुला अनेकदा समजावून सांगितले आहे. की तू ईश्वरावर आस्था ठेवून प्राण सोडावेत. तुझे बलिदान सत्याग्रहासाठी असेल. माझा लढा काही केवळ राजकीय स्वरुपाचा नाही. तो धार्मिक स्वरुपाचा आहे. यामुळे अतिशय स्वच्छ आहे. यात जगणे काय आणि मरणे काय? दोघेही सारखे. तूही असे जाण. मनाला वाईट वाटून घेऊ नकोस. अशी मी उमेद करतो. असे मागणे मागतो."

११ सप्टेंबर १९१५

प्रिय कस्तुर,

हे बघ, दूदाभाई आपल्या परिवारासह आश्रमात राहील. हे मगनलालला मान्य नाही. तो आश्रम सोडू म्हणत आहे. रलियातताईला हे मान्य होणार नाही. ती स्वतंत्र राहील. तुला याचा विचार करुन घ्यावा लागेल. तुला जर हे मंजूर नसेल तर तू मोठ्या ताईसोबत राजकोटला रहायचा विचार करु शकतेस. मी दरमहा खर्चापोटी सहा रुपये पाठवत राहीन."

२३ एप्रिल १९१८

"प्रिय कस्तुर,

तू मगनलालला आईचे सुख दे. आपल्या माता-पित्यांचा त्याग करुन त्याने माझ्या कार्याला पत्करले आहे. माझ्या कामाचा उत्तराधिकारी व्हायला सध्या तरी तो तयार आहे. त्याला बळ कोण देईल? त्याला स्नेहाने खाऊ-पिऊ घाल. त्याच्या दु:ख वेदनेप्रसंगी चार अश्रु ढाळ. त्याला नाना प्रकारच्या चिंतांपासून मुक्त राख, हे तुझे काम आहे.

भूपतरायच्या घरातले क्लेश मिटव. तू अशी कामे करत रहावीस असे मी चाहतो. यात खरी विद्वत्ता व वडिलधारेपण आहे.

बिना काठाची पांढरी साडी नेसायला मुळीच संकोच करु नकोस. मी लवकर परतायचा प्रयत्न करीन."[१]

२९ जुलै १९१८

"प्रिय कस्तुर,

तू माझ्यासोबत रहायला खूप व्याकूळ होते. हे मी जाणतो पण जे कर्तव्य आपल्याला करायचे आहे. ते करायलाच हवे असा माझा विचार आहे. आता तुला ती कर्तव्ये पार पाडावीच लागणार. आता तुला तिथेच थांबायचे आहे. तिथे भरपूर लेकरे आहेत. त्यांना जर तू आपली मानशील तर तुला खटकणारा लेकरांचा अभाव संपून जाईल. ढळत्या वयात एवढे तर करायलाच हवे. तू जसजशी सर्वांविषयी प्रेमभाव दर्शवशील, सर्वांची सेवा करशील तसतसे तुझ्या अंतर्यामी आनंदाचे स्फुरण होईल. रोज सकाळी उठून तुला रुग्णांना भेटायलाच हवे. त्यांची सेवा-सुश्रूषा करायलाच हवी. त्यांच्यासाठी विशेष आहाराची जर गरज असेल तर त्यांच्यासाठी विशेष असा आहार तयार करावाच वा राखावाच लागेल.

महाराष्ट्रातील भगिनींची भेट घ्यायला हवी. त्यांच्या लेकरांना खेळायला लावणे व त्यांना फिरायला घेऊन जाणे हे करावे लागेल. ते आपल्याहून वेगळे नाहीत हा भाव त्यांच्या मनावर बिंबवावा लागेल. त्यांची तब्येत चांगली असायला हवी.

निर्मलाशी चांगल्या म्हणजे धर्म वगैरे विषयक गप्पा मारायला हव्यात. तू तिच्याकडून भागवत वगैरे वाचवून ऐकू शकतेस. याकामी तिलाही रस वाटेल. तू जर अशाप्रकारे सेवा-सुश्रूषेत लागून जाशील तर तुझे मन सदैव प्रसन्न राहील, एवढे निश्चित समज. पुंजाभाईंच्या खानपानाकडे तर लक्ष पुरवायलाच हवे.

मोहनदास."[२]

खेडा जिल्ह्यातील नडियाद येथून लिहिलेले पत्र

३१ जुलै १९१८

"प्रिय कस्तुर,

तुला माझ्यासोबत यायची इच्छा आहे., हे मला कळले पण आपण आपापली कामे करायला हवीत. माझ्यासमवेत तुझी रहाण्याची इच्छा मी समजू शकतो. आपण आपली कामे करत रहायला हवे, नाही का? तू जिथे आहे.स तिथेच आनंदाने रहावेस. तुझे असमाधान मलाही असमाधानी करते बघ."

३१ जुलै १९१८

"प्रिय कस्तुर,

तुझ्या नाराज असण्यामुळे मीही नाराज झालो. महिलाना सोबत घेऊन प्रवास करणे शक्य असते ना तर मी तुला निश्चितच सोबत नेले असते. आपण आता वेगवेगळे रहायला शिकलो आहोत ना? वियोगात आनंद उपभोगायला आपण आता शिकलो आहोत. ईश्वराची इच्छा असेल तर आपण पुन्हा लवकरच भेटू. आश्रमात अनेक उत्तम कामे आहेत. तू त्यात गढून जाशील तर अवश्य प्रसन्न रहाशील." [३]

हरीलालचा मुलगा रसिक वारला त्या संदर्भातले हे पत्र

९ फेब्रुवारी १९२९

"प्रिय कस्तुर,

तुला आता ज्ञान झाले आहे. दिल्लीला जाऊन तू अपार धैर्य दाखवलेस. यामुळे मला तर असे वाटते की तू कदाचित अधिक काळ दु:ख करत नसावीस. तू तर या बालकाचे लालन-पालन केले होते. यामुळे दु:ख तर होईलच पण रसिक ज्या मार्गाने गेला त्या मार्गाने आपल्या सर्वांना जायचे आहे. मग आधी वा उशीरा जायचा शोक का मनी धरावा? दिल्लीला थांबलीस तर १७ तारखेला भेटू या."[४]

१२ मे १९३० वा त्या पश्चात्चे पत्र

हे पत्र सर्वांसाठी आहे. असे समजावे. रविवारी रात्री मी तुम्हा सर्वांना भेटून गेलो हे किती छान झाले. याशिवाय तुम्हाला तुमच्या कँपपर्यंत पोहोचवूनही आलो. असे केल्याने मला खूपच बरे वाटले. ईश्वरी कृपेचा घन ओसंडून वहात आहे. सर्व भगिनींनी मला पत्रे लिहावीत. सारी पत्रे एकाच पाकिटात ठेवावीत. मला तर पत्र अवश्य मिळतील आणि समजा नाही मिळालीत तरी काळजी करायचे काही कारण नाही. तुम्ही घाबरुन जाऊ नका. स्त्रीयांसाठीच्या प्रार्थनेचे श्लोक विचारपूर्वक जोडले गेले आहेत. पहिल्या श्लोकातच सारे सार-सर्वस्व येऊन गेले आहे. अखेरचे 'गीता' ग्रंथाचे जे तीन श्लोक ठेवले गेले आहेत. त्यामुळे याचे सौंदर्य निखरले आहे. देवळाचा कलश ज्याप्रमाणे देवळाची शोभा वाढवतो त्याचप्रमाणे 'गीते' मधील हे तीन श्लोक प्रार्थनेला अधिकच अप्रुप व सुंदर बनवणारे आहेत. रोज प्रात:काळी या श्लोकांचे पारायण केले जात असेल अशी आशा करतो.

बापूचे आशीर्वाद [५]

१४ मार्च १९३२

बा, कित्येक दिवसांपासून लिहू की नको असा विचार करत राहिलो, आज वाचले की तू अजून बाहेर आहे.स, (तुला अटक झाली नाही) म्हणून लिहायचे मन झाले. आता तर महादेवही माझ्यासोबत आहे. अर्थात् साथींची संख्या वाढली आहे. आम्ही तिघे (मी, सरदार व महादेव) मजेत आहोत. रामदास भेटून गेला, चांगला होता. तू पत्र देत रहा.[६]

२० ऑगस्ट १९३२

"आता तर तुझी सुटका होईल पण मला भेटता न आल्याचे तुला दु:ख होईल मला तर हे दु:ख आहेच.

तुझ्यासाठीही सवलत मागायचे मन होते. तरी हे शोभणार नाही हे तुलाही पटेल. आपले जीवन त्यागानेच शृंगारलेले आहे. यामुळे शांत रहा. मला सदा लिहित रहा.” [७]

१२ सप्टेंबर १९३२

“तुझे पत्र पोहोचले. तू कदाचित माझ्या उपोषणाविषयी ऐकले असेल. यामुळे तू मुळीच घाबरु नकोस. भगिनींना घाबरु देऊ नकोस. मला असा कठीण धर्म पाळायची संधी ईश्वराने दिली याविषयी तर तुला हर्षच व्हायला हवा. या उपोषणाचा अर्थही तू जाणून घेतला असशील. अंत्यज बंधुंविषयी मी केलेली मागणी जर पूर्ण झाली तर मला उपोषण करायचे काही कारण उरणार नाही आणि उपोषण सुरु करण्यात आले असेल तर ते थांबवता येईल पण उपोषण अखेरपर्यंत करावे लागले तर ईश्वराचे उपकार मानायला हवेत. मागितलेले मरण कोट्यवर्धीपैकी एखाद्यालाच लाभते. असे मरण मला लाभले तर किती छान होईल आणि मरण नच लाभले तर याहून अधिक शुध्द व्हायचा आणि अधिक सेवाकार्य करायचा माझा धर्म ठरेल हे तर सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. पन्नास वर्षांच्या मजसोबतच्या सहवासानंतर इतकी साधी-सोपी गोष्ट तर तू अगदी बरोबर समजून घेशील आणि झेलशील असे मी मानतो. [८]

७ मे १९३३

‘गीते’ च्या केवळ एक नव्हे तर अनेक श्लोकांचा भाव हा आहे. की जे कार्य ईश्वराच्या नावे आणि त्याच्या प्रेरणेने संपन्न केले जाते त्या कार्याला ईश्वरच पूर्ण करतो. कर्ता-धर्ता तर तोच आहे. यामुळे आपण तर कोरेच्या कोरे आहोत.

कुणी जर कुणाला काठीने मारत असेल तर ते काम काठीचे नसून काठीच्या मालकाचे आहे. त्याच प्रमाणे आपण जर आपला देह ईश्वराला सोपवून दिला आणि त्या शरीराकडून काही कार्य करवून घेतले तर ते कार्य त्या देहाचे नसून ईश्वराचे आहे. यशापयश त्याचेच आहे.

यामुळे हे समजून घ्या की ज्याने उपवास करवले आहेत. तोच अवश्य पार उतरवील.[९]

१० मे १९३३

कस्तुरबांनी गांधीजींना तार केली “बंदिवानांची सुटका होणार नाही असे वृत्तपत्रांमधल्या वृत्तांवरुन वाटत असल्यामुळे मी सरकारजवळ दोन महिन्यांच्या सुटीचा अर्ज करायची परवानगी मागते जेणेकरुन मला आपल्यापाशी येता येईल. खूप व्यग्रता आहे. तारेने उत्तर द्यावे. मीरा प्रेम कळवत आहे. तिला प्रार्थनेने साहस आणि शांती लाभत आहे.”

या तारेला एक्सप्रेस उत्तर “तुझी तार वाचली. पन्नास वर्षांहून अधिक काळ माझ्यासोबत राहिल्यामुळे तुला बहादुर असायला हवे. अर्ज करायला नको. मी अगदी व्यवस्थित आणि प्रसन्न आहे. ईश्वराने तुला साहस, विश्वास आणि शांती द्यावी. मीरा प्रसन्न आहे. हे जाणून आनंद वाटला. प्रेम.”

या तारेसोबत गांधीजींनी गुजरातीत पुढील मजकूर लिहिला आहे. ’ज्या मुखाने नेहमी विडा खात आली आहे.स त्याने कोळसा खायला तयार होऊ नकोस, ईश्वरावर विश्वास ठेव. आपण देहरुप आहोत या गैरसमजाला दूर लोट, रामनाम जप.’ बापू[१०]

२१ जुलै १९३२

“प्रिय कस्तुर,

तुझी पत्रे मला व माझी तुला का मिळत नाहीत? याविषयी कुणीही काहीही सांगू शकत नाही. यामुळे मी तुला सध्या पत्रे नाही लिहिलीत. तुला पत्र पोहोचेल हेच निश्चित नसेल तर तुला पत्र लिहायला मला कसे आवडेल? तुझे समाचार कळत असतात. तू थकल्यासारखी वाटतेस असे कळले. असे का व्हावे? अन्न पचन धडपणे होते की नाही? ते कळव.

आम्ही इकडे सारे मजेत आहोत. मी सध्या दूध घेत आहे. हे तुला कळले असावे. काही खास असे कारण नव्हते बघ, पण इथल्या सुपरिंटेंडेंटच्या आग्रहामुळे मी दूध प्यायला लागलो आहे. तसे मी भाजी-पोळीही खातो. सध्या माझ्या पत्रांबाबत खूप अनिश्चितता आहे. त्यामुळे या पत्राचे नेमके कायच होईल मला काही सांगता येत

नाही. देवदास परत आजारी आहे. पण तू काही काळजी करु नकोस.

राजाजींच्या जावयाच्या निधनाची बातमी तुझ्याप्रत पोहोचली असेल. सांत्वनेचे पत्र लिहिले नसेल तर पाठवून दे. भगिनींना आशीर्वाद." [११]

कस्तुरबा साबरमतीच्या सेंट्रल जेलमध्ये बंदिवान आहेत.

२७ जुलै १९३२

माझे कुठलेही पत्र मिळत नसल्यामुळे तू काळजी करत आहे.स, पण मी यापूर्वीच तीन पत्रे लिहिली आहेत. एक पत्र मी आश्रमाच्या पत्त्यावर पाठवले होते. तुला आता लिहित असलेले हे पाचवे पत्र आहे. आपण दोघे बंदिवान आहोत हे आपण उभयतानी जाणून घ्यायला हवे. एकमेकाना पत्रे लिहिण्याची अनुज्ञाच जर नसती तर आपण काय केले असते? अशा गोष्टींसाठी काळजी करणे व्यर्थ आहे. मी अगदी व्यवस्थित आहे. आता मी दूध, पोळी, भाज्या खातो. वल्लभभाई व महादेवही चांगले आहेत. तुला अशक्तपणा वाटतो असे मला कळले आहे. मला तुझे कुठलेच पत्र पोहोचले नाही. विस्तारपूर्वक पत्र लिही. [१२]

२० ऑगस्ट १९३२

"प्रिय कस्तुर,

आता तर तुझी सुटका होईल पण मला भेटू न शकण्याचे दु:ख तुला होईल. मला तर ते होईलच. तुझ्यासाठीही मुक्त व्हायला मन करत आहे. पण हे योग्य ठरणार नाही हे तर तूही मानशील. आपले जीवन त्याग व बलिदानावरच आधारित आहे. यामुळे शांती बाळगावी. मला नियमितपणे लिहित रहावे."[१३]

मो. क. गांधी कडून येरवडा जेलच्या जेल अधीक्षकाची कृपापूर्ण परवानगी मिळाल्यावर लिहिलेले पत्र -

७ डिसेंबर १९३३

कस्तुरबा गांधींना

बा, रणछोडभाईच्या मार्फत पाठवलेले पत्र तुला पोहोचून गेले असावे. तब्येतीची काळजी घेशील. चिंता मुळीच करु नकोस. काहीही विचार करायची गरज नाही. माझ्या जीवनाला ईश्वराच्या हाती सोपवून द्यावे. ईश्वराशिवाय दुसरा कोण काळजी वहाणारा आहे.? माझा आहार तोच सुरु आहे. सगळीकडे पेढे तयार होतात. अधिकतर मी ते घेतो. कधी-कधी इन्कारही करुन देतो. मीरा आणि ओम माझी सेवा करतात. मीरा तर रात्रं-दिवस एकाच धूनमध्ये असते. कुठेही सभेत जात नाही. माझ्यासाठी सारे काही तयार करुन ठेवण्यातच स्वत:चा वेळ घालवते. तिची तब्येत चांगली रहाते. मला सर्दी झाली होती खरी पण आता बरा आहे. आज जबलपुरात आहे. गोपीचे आई-बाबा रहातात. मी त्यांना भेटलो. गोपीच्या छोट्या बहिणीलाही भेटलो. गोविंददासचे (हिंदी भाषेचे साहित्यिक सेठ गोविंददास) घरही इथेच आहे. व्रजकृष्ण सध्या खूप आजारी आहे. त्याला पत्र लिहवशील. प्रभावतीची पत्रे येतात. स्वत:चा आहार योग्य करुन घे. काही मागवायचे असेल तर रणछोडभाई वा चिमणलाल मार्फत मागवावे. तुझे तोंड व पाय कसे आहेत.? तुझ्यासोबत कोण राहतो? मला वर्ध्याच्या पत्त्यावर पत्र लिही. मणीला मला लिहायला सांगशील. ती चांगली असेल अशी आशा करतो[१४]

१२ डिसेंबर १९३३

"बा, तुला तुरुंगात पाठवलेले हे दुसरे पत्र. आता तुला 'जामे जमशेद' व 'हरिजन बंधू' ही (गुजराती) नियतकालिके मिळत असतील. आणखी काही हवे असल्यास कळवशील. मधुरादास सध्या माझ्याजवळ आहे. मी १० तारखेला दिल्लीला आलो होतो. १४ रोजी आंध्र प्रदेशाकडे रवाना होऊन जाईन. मथुरादास मुंबईला जाईल. माझी अजिबात काळजी करु नकोस. मी साऱ्या परिस्थितीची तुला कल्पना देत राहीन. मी दूध आणि मावा वगैरे नियमितपणे घेतो. सर्दी झाली होती. आता नाही. डॉ. अन्सारी इथेच आहेत. मी या खेपेला घनश्यामदास यांच्याकडे थांबलो आहे. आज जमनालालची यायचीही शक्यता आहे. प्रभुदास आणि त्याची बायकोही इथेच आहे. या दरम्यान प्रभुदास कुठे-ना-कुठे तरी स्थिरपद होऊन जाईल. मणीलालची काळजी करु नकोस. मी त्याला विस्तृत पत्र लिहिले आहे. मी त्याला दडपून टाकू इच्छित नाही. संतोकच्या

आईचे निधन झाले. मी तिला आज पत्र लिहिले आहे. ब्रजकृष्ण खूप आजारी आहे. खाटेवर आहे. डॉ. अन्सारी यांचा औषधोपचार सुरु आहे. तो बरा होईल अशी आशा आहे. राधा परत आजारी पडली असावी असे वाटते. तुला वा कुणा भगिनीला काही हवे असल्यास मला लिहावे.

तुझा जबडा आता चांगला असेल. मणीचे गुडघे कसे आहेत.? वाचायची सामग्री सोबत आहे. का?[१५]

१९ डिसेंबर १९३३

"बा, तुझे पत्र आजच पोहोचले. साबरमती तुरुंगातून लिहिलेले माझे पत्र तुला पोहोचलेच असेल. मी तर नियमपूर्वक लिहित राहीन. दर सोमवार वा मंगळवारी लिहिन कारण की या दोन दिवसातच मला थोडा अवकाश मिळू शकतो. तब्येतीची काळजी घे. पेळू पाठवीन. मजजवळ नसतील तर वाटल्यास कुठूनही सोय करुन देईन. मला रक्तदाब असतो. डॉ. अन्सारींनी दिल्लीला तपासले होते. माझी अजिबात काळजी करु नकोस. (मणीलाल आणि सुशीलाला अवश्य दर पंधरवड्यात पत्र लिहित राहीन.) मी त्यांना विस्तृत पत्रे लिहित असतो. सर्वांना तुझे आशीर्वाद पाठवीन. कुणाची काळजी करु नकोस. मनुला कुसुमविषयी लिहिले आहे. कुसुमची तब्येत खराबच तर असते. वाचली तर उत्तम! किशोरलालला ताप येत असतो. बिछान्यात पडून आहे. देवदास बरा आहे. राजाजीही बरे आहेत. तिकडे सर्व भगिनींना आशीर्वाद कळवशील. सर्व परिश्रम घेत असतील आणि सर्वांची तब्येत चांगली असेल (अशी आशा करतो.) रामनाम रामबाण औषध आहे. मी रामदाससाठी एक छोटी गीता तयार केली होती. ती प्रकाशित केली जात आहे. प्रकाशित झाल्यावर तिच्या प्रती तिकडे पाठवीन. इतर काही हवे असल्यास मागवून घ्यावे. पत्र वर्धा येथेच पाठव. वृत्तपत्रे तर मिळत असतील. तू मला प्रवचन मागतेस. आज तर नाही पाठवणार. पुढच्या आठवड्यात त्यावर विचार करीन. तू गीता वाचतेस हे चांगले तर आहेच. कोण शिकवते? तिथे खायला काय मिळते? जे हवे ते तू प्रेमलीलाबेन (प्रेमलीला ठाकरसी) अथवा त्रिवेदी (पुणे कृषी महाविद्यालयातील प्राध्यापक जयशंकर पीतांबरदास त्रिवेदी) मार्फत मागवू शकते, हे तर स्मरणात आहे. ना? आता तर इथे कमी लोक येत असावेत? यामुळे तू दर आठवड्याला एक पत्र लिहावेस आणि माझेही पत्र मिळवत रहावे पण तुला जे योग्य वाटेल ते कर. (ओम मजेत आहे. प्रेमाबेनची मैत्रिण किसन आता-आत्ताच माझ्यासोबत आली आहे. तुला ती आठवते ना? खूप परिश्रमी आहे. सुशिक्षित आहे.) बापूचे आशीर्वाद. [१६]

२५ डिसेंबर १९३३

"बा, मागच्या सोमवारी मी तुला पाठवलेले विस्तृत पत्र तुला पोहोचले असेल. या सोमवारी आम्ही सीतानगरम् येथे आहोत. सीतानगरम् गोदावरी नदीच्या काठावर वसलेले एक छोटे खेडे आहे., तिथे एक आश्रम आहे. खेडे आंध्र प्रदेशात आहे. खेडे असल्यामुळे इथे खूप शांतता आहे. इथे आम्ही नावेत बसून आलो आहोत. नदी मोठी असल्यामुळे इथे छोटे स्टीमर्स ये-जा करु शकतात. आम्ही मद्रासला जाऊन आलो, तिथे तीन दिवस राहिलोत. (शास्त्री तर तिथे होतेच.) जेठालालही भेटला. गंगावहिनी मद्रासला रहातात. जेठालालच्या सुनेलाही भेटलो. दोघे हृष्टपुष्ट आहेत. जेठालालला दिडशे रुपये वेतन मिळते त्यामुळे सुखात आहे. ऊर्मिलादेवींच्या मुलालाही भेटलो. तिथे लोक खूप मोठ्या संख्येने भेटीला यायचेत. लक्ष्मी बरी आहे. पापाही मद्रास येथे आहेत. लक्ष्मी तीन दिवस माझ्या सोबत राहिली. मीरा, कुसुम आणि ओमही माझ्यासोबत होत्या यामुळे तिला बरे वाटले. आता पुन्हा एकदा भेट होईल कारण की तिकडचा दौरा अजून व्हायचा आहे. माझी तब्येत चांगली आहे. मद्रास येथे दोन डॉक्टरांनी परत तपासणी केली. यामुळे मजविषयी काळजी करायचे काही कारण नाही. डाहीबेनच्या दाताना काही आराम मिळाला की नाही?) तुला 'जामे जमशेद' पोहोचतो ना? तू प्रवचनासारखे काही लेखन मागितले होतेस, एक तर आज पाठवायलाच हवे ना?

आजचे गीतेचे अध्याय ९ ते १२ होते. नवव्या अध्यायात २९ व्या श्लोकात भगवंत म्हणतात की मला भजणारा मला पावतो. बाराव्या अध्यायाच्या तेरा ते वीस या श्लोकात भक्त कुणाला म्हणावे? याविषयीचे विवेचन

आले आहे. कुठल्याही अज्ञानीतील अज्ञानी व्यक्तीच्या लक्षात येणार नाही असे एकही लक्षण यात सांगितले गेलेले नाही, हे याचे वैशिष्ट्य आहे. कुणीही स्त्री वा पुरुष अन्य कुणाच्याही मदतीशिवाय स्वत: परिश्रम करुन भक्त बनू शकतो अर्थात् ईश्वराला प्राप्त करुन घेऊ शकतो.

भक्ताची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत. - कुणाचा द्वेष करु नये. प्राणीमात्रासंबंधी मैत्रभाव जोपासावा. सर्वांविषयी दयाभाव बाळगावा. 'माझे-तुझे' हा भाव नसावा. अहंकार नसावा. सुख-दु:खाला समान मानावे. क्षमावान असावे. सदैव संतुष्ट असावे. संयमाचे पालन करावे. भय आणि चिंतेपासून मुक्त असतो त्याला भक्त म्हणावे. जो कुठल्याही गोष्टीची आशा वा इच्छा करत नाही. जो पवित्र आहे. जो कार्यकुशल आहे. ज्याने सर्वस्वाचा त्याग केला आहे. ज्याच्या दृष्टीत शत्रु आणि मित्र समान आहेत. मान-अपमान समान आहे. जो शीत-उष्ण सहन करतो. ज्याला निंदा-स्तुती समान आहे. जो जिथे असतो तिथेच घर वसवून रहातो अथवा त्यासाठी घर नावाची कुठली गोष्ट नाही. जो अकारण बोलत नाही. ज्याचे मन व्यवस्थित आहे. तो माझा भक्त म्हणवला जातो. या सर्वावर तू वारंवार विचार करशील तर तुझ्या लक्षात येईल की कुणीही केवळ इच्छामात्रेण कुणाच्या मदतीशिवाय भक्त बनू शकतो. [१७]

कडप्पा स्टेशनवरुन लिहिलेले पत्र -

१ जानेवारी १९३४

"बा, मी २५ डिसेंबर १९३३ च्या पत्रातून तुला जे एक प्रवचन पाठवले होते त्याची एक प्रत मला पाठव. तुझे पत्र आजच पोहोचले. मी हे पत्र मौनवारच्या दिवशी लिहित आहे. मणीलालची काळजी करु नकोस. त्याला तुझी पत्रे पाठवतो. प्रागजींच्या सांगण्यावरुन घाबरुन जायचे काही कारण नाही. दोघे प्रौढ आहेत. जर काही चूक घडली असेल तर दोघे स्वत:हून सुधारुन घेतील. 'जामे जमशेद' ची व्यवस्था तर मी केली आहे. मथुरादासने व्यवस्था झाली असल्याचे कळवल्यामुळे मी या दृष्टीने अधिक काही केले नाही. आता तर तुला हे नियतकालिक मिळतच असेल अशी आशा करतो. तरीसुध्दा तपास करीत आहे. 'रामायण' आणि 'भागवत' विषयीची व्यवस्था लावत आहे. प्रेमलीलाताईंकडून मागवायला अजिबात संकोच करु नकोस आणि परत तुला मागवायचे तरी काय आहे.? तुला जे अल्प-स्वल्प हवे ते ते लोक मोठ्या आग्रहपूर्वक पाठवतील पण ज्या गोष्टींची लगेच गरज नसेल ते माझ्याकडून मागवून घेणे सोईचे ठरावे. मी व्यवस्था करुन देईन. लक्ष्मीलाही (दूदाभाईंची कन्या ) सहावा महिना लागला आहे. याविषयीचे मारुतीचे (लक्ष्मीचा नवरा) पत्र आज पोहोचले. या सर्व बातम्या ऐकून मला दु:ख वा आश्चर्य होत नाही, तसे व्हायलाही नको. विवाह झाला म्हणजे परिणामस्वरुप हे सारे होणारच. रामदासलाही मी काही टोमणा मारला नाही. अशा बाबतीत टोमणा मारुन काय उपयोग? टोमणा तरी काय करील? सर्वांनी यथाशक्ती संयम बाळगावा. संयमाचा हा विषयही सध्या महत्वाचा वाटत नाही. लोक तर आपापल्या इच्छेनुसार भोग भोगतच आले आहेत.

आता तुला दातांनी चावून खाता येते का? पोटॅशिअम परमंगनेटच्या पाण्याने गुळणा करतेस? ठक्कर बाप्पा या खेपेला माझ्यासोबत नाहीत. १५ तारखेला भेटतील. सध्या मलकानी माझ्या सोबत आहे. तोही खूप काम करत आहे. बाकी सारे लोक तर करतातच आहेत. चंद्रशेखर ठीक रहातो. ओम, किसन आपापल्या तब्येतीची व्यवस्थित काळजी घेतात. यामुळे जमेल तेवढे परिश्रम घेतात. खूप भाबड्या आणि सरळ आहेत. किसनही तशीच आहे. सुरेंद्रच्या अंगात शक्ती भरली आहे. आंध्र प्रदेशातली मुशाफिरी तीन तारखेला पूर्ण होईल नंतर म्हैसुरला जायचे होईल. मी जिथे रहातो तिथे कामांची गर्दीही असतेच असते. काही अडचणीही असतात. माझी काळजी तर सारे लोक वहातात पण तशा मला अडचणी कमीच असतात. माझ्या लहानातल्या लहान गरजेचाही विचार मीरा करते. लक्ष देते. काळजी घेते. यामुळे मला प्रवासाची काही अडचण नसते. जर तु लोकांच्या मुलाखती घेणे बंद करशील तरच माझ्याकडून दर आठवड्याला पत्र मिळवू शकशील. मी तर प्रवचन दर आठवड्याला पाठवत राहीन. जे लोक इतर भगिनींशी मुलाखती

घेऊन येतात यावरच समाधान मानावे पण तुझी जशी इच्छा असेल तसे करावे. जर तुला मुलाखती करायची इच्छाच असेल तर तुझ्या भेटीला खूप लोक तयार होतील आणि ते भेटूही इच्छितील. आम्ही जाणीवपूर्वक कमी मुलाखती देण्याचा कार्यक्रम ठरवला आहे. पण तुझी जी इच्छा असेल ती नि:संकोचपणे मला कळव. जानकीताई बरी आहे. तिच्या मुलाच्या-रामकृष्णच्या टॉन्सिल कापण्याविषयीची बातमी मला वाटते तुला कळवली आहे. कमला आता आहार घेते. ताप अजून किशोरलालचा पाठलाग सोडत नाही पण काळजी करायचे काही कारण नाही. माझे मौन आजकाल रविवारच्या रात्रीपासून सुरु होते. यामुळे सोमवारी रात्रीपर्यंत बोलावे लागत नाही. आज रात्री ९ वाजून १० मिनिटांनी मौन संपेल. यामुळे कुणाशी बोलायची कदाचितच संधी लाभेल कारण नंतर तर झोपायची वेळ होऊन जाईल. सकाळी तीन वाजता तर उठायचे असते. व्रजकृष्णचा ताप आता उतरला आहे. तशी शक्ती अजून आली नाही. हेमीताईचे निधन झाले.

आता प्रवचन

मागील पत्रातून मी भक्ताची लक्षणे कळवलीत आणि सेवेशिवाय भक्ती संभवणार नाही हेही कळवले होते. या खेपेला सेवा कशी केली जावी? या विषयी लिहीन कारण लोक खूपदा हा प्रश्न विचारतात. कुणी म्हणतो की सेवा अमुक एका विशिष्ट परिस्थितीतच होऊ शकते. कुणाचे म्हणणे असे आहे. की आपला अमक्या एका विषयाचा अभ्यास झाला असेल तरच आपण सेवा करु शकतो. या साऱ्या निव्वळ भ्रांतीपूर्ण गोष्टी आहेत. हे तर मी मागील आठवड्यात कळवले होते. मनुष्य वाटेल त्या अवस्थेत का असेना, तो सेवा करु शकतो. आपण आपल्यापाशी असलेले शक्ती-सर्वस्व जर ईश्वरार्पण करुन टाकले तर आपल्याला पैकीच्या पैकी गुण मिळतील. ज्याची क्षमता एक कोटी रुपये द्यायची आहे. त्याने जर अर्धा कोटीच दिले तर त्याला ५०% हून अधिक गुण मिळू शकणार नाहीत पण केवळ एक दमडा असणाऱ्याने जर तो देऊन टाकला तर त्याला पैकीच्या पैकी गुण मिळतील. यामुळे तू व तुझ्यासोबत असलेल्या भगिनी जर आपल्या संपर्कात येणाऱ्या भगिनींशी वा अधिकाऱ्यांशी चांगला व्यवहार करत असतील तर त्या सेवाधर्माचे पालन करतात असे होईल. अधिकाऱ्यांप्रत सेवाभावनेने वागायचा अर्थ त्यांचे कदापि अहित न चिंतणे, त्यांच्याशी विनयपूर्ण आचरण करणे, त्यांना न फसवणे होय. तुम्ही नियमांचे पालन करायला हवे आणि आपल्या संपर्कात येणाऱ्या गुन्हेगार भगिनींशी सख्ख्या बहिणींप्रमाणे व्यवहार करायला हवा. त्यांच्यावर तुमच्या प्रेमाची छाप पडावी. त्यांनी तुमच्या पावित्र्याला ओळखावे हेही सेवाधर्माचे पालन म्हणवले जाईल. दोघांमधला हेतु शुध्द असावा. स्वार्थामुळे वा भयामुळे चांगला व्यवहार ठेवणे हे काही सेवेत गणले जाणार नाही. एखादा माणूस स्वार्थ साधण्यासाठी अमुक एक कार्य करतो आणि दुसरा परमार्थ बुध्दीने करतो, असे दृश्य आपण अनेकदा बघतो. जिथे सारे काही ईश्वर समर्पित असते तिथे स्वार्थाला मुळीच स्थान नसते. अशाप्रकारे सेवा करणारा नित्य आपल्या शक्तीत वाढ करुन घेत असतो. तो जो काही अभ्यास करतो वा उद्यम करतो तोही सेवा भावनेनेच करतो. अशाप्रकारे जो सेवा-परायण असतो त्याच्या आहार-विहारात, हसण्या-विहरण्यात, सेवा भाव नांदतो. तात्पर्य हे की त्याची सर्व कार्ये निर्दोष ठरतात. ईश्वर अशा भक्ताना आवश्यक ती सर्व शक्ती प्रदान करतो. या आशयाचे तीन श्लोक भगिनींच्या प्रार्थनेत आहेत. ते लक्षात असतील. हे बघ ते श्लोक. हे तीन श्लोक गीतेच्या नवव्या अध्यायातील २२ वा आणि दहाव्या अध्यायातील ९ वा व १० वा श्लोक आहेत.

*अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनाः पर्युपासते ।*
*तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥*
*(गीता अध्याय ९ श्लोक २२)*

*मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ।*
*कथयन्तश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥*
*(गीता अध्याय १० श्लोक ९)*

*तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।*
*ददामि बुध्दियोगं तं येन मामुपयांति ते ॥*
*(गीता अध्याय १० श्लोक १०)*

याचा अर्थ 'अनासक्ती योग' ग्रंथामधून बघून घ्यावा. हे श्लोक तुला नवव्या आणि दहाव्या अध्यायात सापडतील. गीतेच्या अनुरुप आचरण घडावे यासाठी आपण गीतेचा अभ्यास करतो. हे स्मरणात राखायला हवे. मी वर जे लिहिले आहे. ते गीतेच्या आधारानेच लिहिले आहे. असे समजावे. [१८]

८ जानेवारी १९३४

"बा, या खेपेला तुझे पत्र आजवर नाही पोहोचले पण फिरत-फिरत येऊन पोहोचेल असे मी मानतो. आता तुला वृत्तपत्र मिळत असावे. 'भागवत' आणि 'रामायण' पोहोचले असावे. आणखी अन्य जे ग्रंथ हवे असतील ते मागवून घे. मणीलालचे पत्र आले आहे. सुशीलाचेही. दोघे मजेत आहेत. मणीलाल शांत आहे. काळजी न करायला लिहितो. सीता खूप मोठी होत चालली आहे. खूप खेळते. देवदासची सुटका अपेक्षेपेक्षा लवकर झाली. तो अहमदाबादला गेला आहे. त्याची तार मला आली होती. कदाचित तुला भेटून जाईल. रामदास आणि नीमूची पत्रेही आली होती. मनूला मी लिहित रहातो पण नंतर तिकडून काही पत्र आले नाही. किशोरलालचा ताप आता कमी आहे. यामुळे थोड्या दिवसात तो व्याधीमुक्त होईल अशी आशा केली जाऊ शकते. मणीची चांगलीच बातमी आहे. ओम, किसन, चंद्रशेखर वगैरे सारे मजेत आहेत. आज मी बंगलोरला आहे. सारे तुझी आठवण काढताहेत. शंकरलाल आणि गुलझारीलाल येथेच आले आहेत. मजूरांच्या वेतनासाठी पंचायत बैठक होईल. उद्या मंगळवार असल्यामुळे उद्या पंचायतीची बैठक होईल नंतर मला मलबारला जायचे आहे. जिथे तू फिरुन आली होतीस तिथे जायला हवे. उर्मिलादेवींचा मुलगा सध्या मद्रासला नौकरी करत आहे. माझी तब्येत चांगली असते. चिंता करायचे अजिबात कारण नाही. खूप लोक भेटीला येतात. थैल्या, दाग-दागिने वगैरेही देतात. कांती आता आधीपेक्षा बरा. मला वाटते की बाळ थोड्या दिवसात मला भेटेल. त्याची तब्येतही चांगली आहे. तुम्ही सारे तिकडे आनंदात असाल अशी आशा करतो. शांता, ललिताची अभ्यासात कुठवर प्रगती?

आता प्रवचन, आज 'गीता' निरुपित यज्ञ विषयावर चर्चा करीन. यज्ञाचा विषय तिसऱ्या अध्यायापासून सुरु होतो. भगवंत म्हणतात की यज्ञ केल्याशिवाय भोजन करणारा माणूस चोरीचे अन्न खातो पण हे तर फार कठीण वचन म्हटले जाईल कारण की चोरीचे अन्न खाणे तर कच्च्या पाऱ्याच्या सेवनासारखे आहे. कच्चा पारा कुणाला पचत नाही आणि खाणाऱ्याच्या अंग-प्रत्यंगातून फुटून निघतो. यामुळेच संत अखा भगत यांनी (सतराव्या शतकातील गुजराती भाषेतील संत कवी) म्हटले आहे. 'कच्चो पारो खावे अन्न तेवु छे चोरीनुं धन.' म्हणजे चोरीचे धन हे कच्च्या पाऱ्याला अन्न म्हणून सेवन करण्यासारखे आहे. जो मनुष्य घडीभर यज्ञ केल्याशिवाय रहातो तो चोर ठरतो. या यज्ञाला आपण सर्वांनी जाणून घ्यायला हवे. आपल्या सद्भाग्याने ज्याचे हृदय व्यवस्थित आहे. त्याच्यासाठी यज्ञ सोपा आहे. यासाठी ना धनाची आवश्यकता ना बुध्दी वा शिक्षणाची गरज. यज्ञ म्हणजे प्रत्येक परोपकारी कार्य होय. ज्याचे संपूर्ण जीवन यज्ञमय असेल तोच चोरीचे अन्न भक्षण करत नाही, असे म्हणता येईल. यामुळे जी व्यक्ती अल्प-स्वल्प प्रमाणातही यज्ञ करते ती अपेक्षाकृत कमी चोरी करते. अशाप्रकारे विचार करु जाता आपण सारे जण थोडी फार चोरी तर अवश्य करतो. आपण जेव्हा स्वार्थ भावनेचा त्याग करतो तेव्हाच संपूर्ण यज्ञ केला असे म्हणता येईल. स्वार्थाचा त्याग करणे याचा अर्थ अहंचा त्याग- 'मी' चा त्याग होय. हा माझा आणि तो परका. हा माझा मुलगा आहे. तो परका मुलगा आहे. असा भाव मनात असायलाच नको. ज्याने आपले सर्वस्व कृष्णार्पण करुन टाकले आहे. असाच माणूस असे करु शकतो. जो माणूस असे करतो तो सारी कामे ईश्वराला मध्ये स्थापित करुन त्याच्या सेवकाच्या रुपातच करतो आणि सेवा भावनेनेच करतो. असा माणूस नित्य शांत-नित्य सुखी असतो. त्याच्यासाठी सुख-दु:खे समान असतात. तो आपल्या तन-मन-धन बुध्दीचा - जे काही त्याच्यापाशी आहे. त्या सर्वांचा परमार्थासाठीच उपयोग करतो असा पूर्ण यज्ञ आपण सारे नाही करु शकत. समस्त जगाची सेवा आपल्या हातून होत असेल तर आपण करावी. अशी भावना जर मनी असली तर समस्त जगाचे कल्याण होऊ शकेल असे सर्वांना

करता येण्यासारखे कोणते कार्य आहे.? अशा प्रकारे विचार करु जाता माझ्या लक्षात सूत कताईचा विचार आला. परमार्थाच्या दृष्टीने अगणित व्यक्ती हे कार्य करु शकतात. एवढे परिश्रम जगतासाठी करता येतील. हे तर मी एक उदाहरण दिले, एक दृष्टांत दिला. मला तर मुखत्वेकरुन तुला यज्ञाचा हेतु आणि अर्थ समजाऊन सांगायचा होता. यातून एवढे जरी मी समजाऊन सांगू शकलो तरी पुरेसे आहे. [१९]

१६ जानेवारी १९३४

"बा, देवदास तुला भेटून गेला, कदाचित म्हणून तुझे पत्र आले नाही पण माझे पत्र तर तुला मिळाले असेल अशी आशा करतो. मी नियमितपणे दर आठवड्याला पत्र पाठवले आहे. आणि प्रवचनही (पहिले प्रवचन २५ डिसेंबर १९३३) पाठवले आहे. देवदास येऊन मला भेटून गेला. तो काल आला. सोबत लक्ष्मीही आली. आनंदात आहेत. आम्ही आज वेगवेगळ्या वाटांनी चालू लागू. मला वाटते की दोघे राजाजींना भेटून दिल्लीकडे निघून जातील पण अजून काही ठरलेले नाही. देवदासने तुझ्याविषयी मला सारे काही सांगितले. ते तुला मालिशसाठीचे तेल बाहेरुन मागवू देत नाही, हे आश्चर्यच आहे. देवदासकडून हे जाणून मला प्रसन्नता वाटली की तेल मिळो वा न मिळो, योग्य प्रकारे खायला मिळो वा ना मिळो तू प्रसन्न असतेस. 'गीता' व अन्य धार्मिक ग्रंथांच्या पठनाचा एवढाही परिणाम नाही झाला तर हे ग्रंथ वाचलेच नाहीत असे ठरेल. यामुळे या खेपेचे प्रवचन स्वाध्यायाशी संबंधितच पाठवत आहे.

खूपशा ग्रंथांमधून आपण असे वाचतो की धार्मिक ग्रंथांचे पठन केल्यानेही पुण्य लागते. हे उत्साहवर्धक वचन आहे. आपण जर याच्या शाब्दिक अर्थानुसार वाटचाल केली तर आपल्याला काही लाभ होणार नाही. आपण जे वाचतो त्यावर परत-परत विचार करायला हवा म्हणजे हे बघायला हवे की ते आपण जीवनात कशा प्रकारे आचरणात आणू शकतो पण आज खूप लोकांची ये-जा सुरु आहे. त्यामुळे अधिक लिहित नाही.

आज आम्ही कालिकतमध्ये आहोत. इमामजीभाईंची तर तुला आठवण असेलच. बाली सेवाकार्यात लागली आहे. आणि नर्मदाही सेवाकार्यात लागली आहे. आज सायंकाळी आम्ही कालिकतहून रवाना होऊन जाऊ उर्मिलादेवी इथेच आहेत. सारे तुझी आठवण काढताहेत.[२०]

गांधीजी कुमारिका त्रावणकोरहून लिहितात -

२२ जानेवारी १९३४

"बा, आज आम्ही कुमरिकेत आहोत. तुझे पत्र मिळाले आहे. तू इथे आली आहे.स. तेव्हा उर्मिलादेवी तुझ्या सोबत होती. हे हिंदुस्तानचे अखेरचे टोक आहे. हिमालय मस्तक आहे. या भागाला आपण भारतमातेची पावले म्हणतो. समुद्र या चरणांचे रोज प्रक्षालन करतो. इथे वस्ती नसल्यामुळे खूप शांतता आहे. मी समुद्रातच स्नान केले आहे. ओम, किशन, चंद्रशंकर (चंद्रशेखर) यांनीही समुद्रात स्नाने केलीत. सर्दी तर बाधेलच.

बहुत करुन देवदास आणि लक्ष्मी एथवर दिल्लीला निघून गेले असतील. ते जाऊन राजाजींना भेटून आले. माझा आहार तोच आहे. आणि शरीर निकोप रहाते. मी मद्रासहून एक टाइपिस्ट शोधून काढला आहे. अण्णांनी (हरिहर शर्मा) मला दिला आहे. तो चांगला आहे. ठक्कर बाप्पा आता इकडे येऊन गेलेत यामुळे मलकानी दिल्लीला गेले आहेत. रामदास आणि नीमूची पत्रे नुकतीच मिळाली आहेत. सध्या सारे चांगले आहेत., असे वाटते. सुमित्रेच्या डोळ्यांची काळजी रामदास घेतो. अजूनपर्यंत रामदासचे मन स्थिर झाले नाही पण आता होऊन जाईल. काळजी करायचे काही कारण नाही. डाहीबेनच्या तब्येतीविषयी मी समजून घेतो. शरीरावर मनाचा खूप प्रभाव पडतो हे प्रत्येकाने जाणून घेतले पाहिजे. तुरुंगात माणसाच्या मनात खूप विचार येतात. त्यावर नियंत्रण करायला शिकले पाहिजे. कुठल्याही स्थितीत माणसाने समभावनेचे पालन करायचे ठरवले तर तो सुखात राहू शकतो. शांताला तर एथवर खूप समजूतदार होऊन जायला हवे. तिला म्हणावे की तिने आणखी ८० वर्षे जगावे आणि खूप सेवा कार्य करावे. ललिताही मजेत असेल अशी आशा वाटते. तुझ्या तब्येतीचा विचार करत आवश्यक तो आहार प्रेमलीलाताई कडून (प्रेमलीलाताई ठाकरसी)

मागवून घेण्यात संकोच करु नकोस. कांती आता चांगला आहे. आणि प्रसन्न रहातो. अर्थात् त्याचे वजन काहीसे कमी झाले आहे. मी जमनाताईला लिहीन. माधवदासची (कस्तुरबांचा भाऊ) सध्या काही खबर नाही. या दरम्यान त्याचे एक पत्र आले होते. आता तू त्याच्याबाबतीत विशेषत्वाने लिहिले आहे.स यामुळे मी त्याला तुझ्या वतीने लिहीन. मणीलाल आणि सुशीलाची पत्रे मिळाली आहेत. त्यात काही विशेष मजकूर नाही. दोघांची तब्येत चांगली असते. आता मणीलाल सर्वथा शांत आहे. सुरेंद्र वर्धा येथेच आहे. तो जमनालालजींना सहाय्य करतो. आज सर्व भगिनी तुरुंगातून सुटायला हव्यात. मी सर्व भगिनींना चार-दोन शब्द लिहिले आहेत.

आता प्रवचन

'भगवद्गीता' म्हणते की ईश्वराच्या भक्ताला एकांत सेवन करायला हवे. या कथनाला नीट समजून घ्यायला हवे. आपण सारे या जगात एकटेच आलो होतो आणि एकटेच जाणार आहोत तर मग जन्म व मरण यात जो अनिश्चित काळ आहे. यात आपण कुणाच्या सोबतीसाठी  का अस्वस्थ व्हावे? आपण एकटे जन्माला आलो असलो तरी आपण हेही बघतो की आपण एकटे नाहीहोत. आपल्याला माता-पित्यांचा संग लाभतो. त्यांच्या संगतीशिवाय आपण क्षणभरही जिवंत राहू शकत नाही. आपण जेव्हा मोठे होतो तेव्हा सामान्यपणे आपला विवाह होतो. त्यातूनही आपल्याला संग लाभतो मग आपल्याला मित्रांचाही संग लाभतो. आत्मोन्नतीसाठीही आपल्याला काही मर्यादिपर्यत संगती-साथीची आवश्यकता असते. असे असतानाही आपल्याला एकांताचा-एकांत-सेवनाचा उपदेश का दिला जातो? हा विषय आपण समजून घेतला पाहिजे. आपण साथीदारांच्या साथी विषयी जेवढा म्हणून विचार करु तेवढे ते पराधीनतेचे सूचक असल्याचे आपल्या ध्यानी येईल. आई-वडील, पती-पत्नी, मित्र-सारे काही मर्यादिपर्यत आपल्याला परावलंबी बनवतात पण जो ईश्वराचा भक्त आहे. तो दयाळू आहे. त्याला केवळ ईश्वराचा आधार असतो. ईश्वरच एकमेव खरा साथीदार आहे. आणि तोच सारथीही आहे. ज्याच्यासोबत ईश्वर आहे. त्याला आणिक काय हवे? यामुळे 'गीता' माता म्हणते आहे. की आपण एकांत शोधायला हवा. आपण माणसांची संगत सोडून पलायन करायला हवे असा मात्र याचा अर्थ होत नाही. याचा अर्थ एवढाच की आपण संगतीची आशा मनात धरायलाच नको. संगती लाभली नाही तर आपण भयभीत व्हायला नको. आपण कोट्यवधी लोकांच्या सोबत असलो तरी मानसिक एकांताचा उपयोग करायला हवा आणि ईश्वरी सामिप्याचा अनुभव घ्यायला हवा. 'देहीना स्नेही सकल स्वारथीया, अंते अलगा रहेशे?' (शरीरावर स्नेह करणारे सारे स्वार्थीजन आहेत. ते अंतकाळी विलगच रहातील.) हे भजन आठवते ना? एकांताचे सेवन करणारा कुठेही दु:खी रहात नाही कारण की तो तर सर्वत्र विष्णुचेच दर्शन करतो. भक्त प्रह्लादाने तप्त खांबातही विष्णुचे दर्शन केले होते. एकांत सेवनाच्या या भावनेला अल्पशा प्रयत्नांनी सारे सिध्द करु शकतात. याला शीघ्र सिध्द करायची उपयुक्त संधी तुम्हा सर्वांना अनायासेच लाभली आहे. ती सिध्द करावी."[२१]

३० जानेवारी १९३४

बा, तुझे पत्र अजून मिळाले नाही. आज आम्ही मद्रास येथे पर्वतावर आहोत. हा पर्वत अल्मोडा पर्वताइतका उंच आहे. इथे वृक्षसंपदा खूप सुंदर आहे. पण येथून बर्फाचे पर्वत दिसणार नाहीत. हिमालय तर खूप लांबवर आहे. इथे पाच तारखेपर्यंत रहायचे आहे. अमतुस्सलाम येथे येऊन पोहोचली आहे. आजच निघायचे म्हणत होती पण तिला पाच तारखेपर्यंत थांबवून घेतले आहे. तिची तब्येत साधारणपणे बरी म्हणावी अशी आहे. कुसूम रामचरणी लीन झाली. कालच पत्र मिळाले. बली (हरीलालची मेहुणी) खूप दु:खी झाली. मंजू तिथे होती. एवढे एक आश्वासन होते. हरीलालची अशात खबर नाही. रामदासची पत्रे येत रहातात. देवदास-लक्ष्मी दिल्लीला गेलेत. देवदासचे आता बस्तान बसले असे म्हणता येईल. ब्रजकृष्ण चांगला झाला आहे. बिहारच्या भूकंपात वीस-पंचवीस हजार लोकांची जीवितहानी झाली. लक्षावधी घरा-दाराला मुकले. कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. नुकतेच सुटका झालेले राजेंद्रबाबू सध्या मदत कार्यात गुंतून पडले आहे. चौफेर

निधी संकलनाचे काम जारी आहे. मी पण थोडे काम करत आहे. मला तारा येत रहातात. आश्रमातील बंधूंना बिहारात पाठवले आहे. यासाठी तार केली आहे. कोण-कोण जातील हे अजून जाणत नाही. लीलावती बरीच आजारी आहे. बेलाताईने पंचवीस रत्तल वजन गमावले आहे. आनंदी, मणीला सोबत घेऊन ते बडोदा येथे गेले आहेत. बाबला, बचूला घेऊन दुर्गा बलसाडला गेली आहे. प्रेमाताई पोहोचली आहे. तिची तब्येत चांगली आहे. आज प्रवचन पाठवत नाही. तुझ्याजवळ शिल्लक असेल, मी आरामात आहे. आज प्रवचन पाठवत नाही. माझी तब्येत चांगली आहे.

बापूचे आशीर्वाद

५ फेब्रुवारी १९३४

"बा, तुझे पत्र पोहोचले. बिहार विषयी तू जे लिहिले आहे.स ते खरे आहे. खूप मोठी जीवित हानी झाली आहे. आणि या थंडीत हजारो लोक घरादाराला मुकले आहेत. चहुकडून मदतीचा ओघ सुरु आहे. आश्रमातल्या लोकांपैकी पंडितजी, पारनेरकर, रावजीभाई, सोमण, बाल, स्वामी आणि धोत्रे गेले आहेत. धोत्रे वर्धावाले. आणखी काही लोकांची गरज भासली तर मी पाठवून देईन. सर्व भगिनींची पत्रे मला मिळाली आहेत. बेलाताई वगळता शेष ठीक आहेत. आनंदी आणि मणी या दोघींना घेऊन बेलाताई बडोदा येथे गेल्या आहेत. गरज भासली तर मुंबईत एखाद्या डॉक्टरला भेटतील. तिचे वजन खूप घटले आहे. तिला बरे व्हायला काही महिन्यांचा काळ लागेल. दुर्गा बलसाडला गेली आहे. तिथून बेळगावला जाईल. ६ मार्चला मी सुध्दा तिथे जाईन. लीलावतीला ताप होता पण ती तर प्रेमाताई सोबत आपल्या मुक्कामी म्हणजे तुरुंगात पोहोचून गेली आहे. देवदास पाटणा येथे गेला नाही आणि त्याला तिथे जायची गरजही नाही. तारा काकू आजारी असून सध्या अहमदाबाद येथे आहेत. मणी परीख आपल्या आजोळी आहे. नंतर कठलाल येथे जाईल. मी उद्या राजाजींना भेटेन. अमतुस्सलाम इथेच आहे. आजारी आहे. पण सध्या बरी आहे. ती कृष्णाकुमारीच्या जवळ काशीला जाईल असे वाटते. मी इंग्लंडला ज्यांच्या आश्रमात थांबलो होतो त्या म्युरिअल लेस्टर मला उद्या भेटतील. गंगाताई सुरेंद्रला भेटायला वर्धा येथे गेली आहे. सुरेंद्र जमनालालजींसोबत काम करताहेत. महालक्ष्मी आपल्या लेकरांसोबत मुंबईत आहे. मणीलाल आणि सुशीलाची पत्रे पोहोचली आहेत. दोघे लिहिताहेत की तू त्यांची काळजी करु नकोस. सीता आनंदात आहे. केलेनबॅक (गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील मित्र, जर्मन वास्तुशास्त्रज्ञ श्री हरमन केलेनबॅक) दोन दिवस फिनिक्सला राहून आलेत. गुजरात आणि अन्यत्र गारा पडल्यामुळे पिके ध्वस्त झाली आहेत. खूप जोरदार गारांचा वर्षाव झाला आणि खूप दिवस होत राहिला. ईश्वरेच्छा बलीयसी. वल्लभभाई निकोप आहेत. मृदुलाचे पत्र मिळाले. तीही चांगली आहे. मी माधवदासचे (कस्तुरबांचा भाऊ) समाचार मिळवण्याचे प्रयत्न करत असतो. तुला अवश्य समाचार कळवीन. हे माझ्या विस्मरणात गेले नाही. रामदासचे विस्तृत पत्र पोहोचले आहे. तो, नीमू आणि लेकरे तंदुरुस्त आहेत. केशू आणि कृष्णा वर्धा येथेच आहेत. आणि आनंदात आहेत. सध्या राधाचे काही पत्र मिळाले नाही. व्रजकृष्ण निरोगी आहे. हळूहळू शक्ती येत आहे. 'हिंदू' नावाचे एक प्रसिध्द वृत्तपत्र मद्रासहून निघते. त्याच्या संपादकांच्या निधनाचे वृत्त आज तारेने कळले. मी सांत्वनेदाखल तार पाठवली आहे. प्रभावती (जयप्रकाश नारायण यांच्या पत्नी) चांगली आहे. ती पाटणा येथेच आहे. तू आणि अन्य भगिनी तब्येतीने व्यवस्थित असतील अशी आशा करतो. मी उद्या सकाळी इथून निघेन आणि राजाजींना भेटेन.

आता प्रवचन

आपल्यात एक म्हण प्रचलित आहे. -- 'एक पंथ, दो काज.' अखेर असा कुठला पंथ आहे. की ज्यावर चालल्यामुळे 'दोन काज' पूर्ण होतात? 'दो काज' चा अर्थ केवळ दोनच कामे समजायला नको. इथे दोन म्हणजे एकाधिक म्हणजे 'एक पंथ सौ काज' असेही म्हणता येऊ शकते. बिहारात एका मिनिटात हजारो लोक मातीआड सामावून गेलेत. यामुळे सहजच आपल्या मनात विचार येतो की आपल्याला एक मिनिटही वाया घालवायला नको. मीराने गाईले आहे. 'आजनो लावो लीजिए रे काल कोणे दीठीती' (अर्थात् आजचा आनंदलाभ घेऊन घ्या,

उद्या कुणी पाहिला आहे.?) आपल्याला तर एक पळ वा क्षणभराचीही खबर नाही. जांभई घेता घेता चालायला लागू. ज्यावर मार्गक्रमण केल्याने सारे उद्देश्य सिध्द होतील असा स्वर्णिम पंथ कुठला आहे.? असा मार्ग केवळ परोपकाराचा आहे. अर्थात् आपल्या शेजाऱ्यांची सेवा. याचेच दुसरे नाव परमार्थ आहे. परमार्थ शब्दाचा तात्पर्य आहे. उत्तम अर्थ. याचेच तिसरे नाव हरीभक्ती आहे. आपण लोक नरसी मेहतांच्या प्रभातीत (प्रभात काळी गायची भजने) गातो की जपमाळ हाती धरुन, टिळा लाऊन वा गंगा स्नान करुन हरीभक्ती साधून घेता येत नाही. भक्त आपल्याला सांगतात की हा तर मस्तक अर्पण करायचा सौदा आहे. म्हणून आपण रोज खाता-पिता, उठता-बसता, तुरुंगात वा तुरुंगाबाहेर अखिल विश्वाच्या कल्याणाची कामना करावी आणि यासाठी जी सेवा आपल्या भाग्यात येईल ती करुन टाकावी. आज एवढे पुरेसे आहे. ना?[२२]

२२ फेब्रुवारी १९३४

"बा, हे पत्र रेल्वेमधून लिहित आहे. तुझे पत्र पोहोचले. कामाचा बोजा प्रचंड असल्यामुळे मंगळवारी लिहू शकलो नाही. आज गुरुवार आहे. तुला हवे ते काम मला सोपव. हवा तो प्रश्न विचार. मी उत्तर देईन, किमान प्रयत्न तर करीनच. तू हरीलालविषयी विचारले आहे. तो पाँडेचेरीला गेला होता. तिथेही पैशांची भीक मागून खूप दारु प्यायचा. काही पैसे मिळालेतही. सध्या कुठे आहे., माहित नाही. त्याचे असेच चालेल. ईश्वर त्याला सुबुध्दी देईल तेव्हा खरे! यात आपली पाप-पुण्येही भूमिका बजावत असतात ना? हरीलाल गर्भात असताना मी किती मूढ होतो? मी आणि तू जसे केले असेल तसेच आपल्याला भरावे लागेल. अशा प्रकारे लेकरांच्या आचरणासाठी आई-वडील जबाबदारच असतात. आता तर आपण शुध्द बनावे एवढेच आपल्या हाती आहे. आणि तसे प्रयत्न आपण उभयता करत आहोत आणि यातच आपण आता समाधान मानावे. आपल्या शुध्दीचा प्रभाव कळत नकळतही हरीलालवर पडतच असेल.

सध्या मनूचे पत्र नाही पण जमनादासने तिच्याविषयी कळवले होते. सुशीलाला लिहीन. हरखचंदच्या मुलीशी पुरुषोत्तमचा साखरपुडा झाला. पुरुषोत्तमची तब्येत सध्या चांगली आहे. असे काही सांगता येत नाही. रणछोडभाऊच्या वहिनी वारल्या यामुळे मोतीताई उदास-उदास असतात. त्यांची जबाबदारी वाढली आहे. अंबालालभाई व मृदुला मला भेटून गेलेत. अंबालालभाई व सरलाताई विलायतेत जाताहेत. तिकडे तीन-चार महिने रहातील. देवदास-लक्ष्मी मजेत आहेत. लक्ष्मीला मुलांची जबाबदारी पेलणे अवघड होते का? रामदास-नीमू बरे आहेत. त्या उभयताना तुझ्या पत्राची नक्कल पाठवत आहे. मूळ पत्र मणीलालला पाठवतो. नक्कल वल्लभभाईंनाही पाठवली आहे. तेही काळजी करतात. माधवदासकडून एथवर काही उत्तर आले नाही. मथुरादास माझ्यासोबत आहे. दोन-एक दिवस थांबून मुंबईला जाईल. एस्थर मेनन विलायतेहून आली आहे. ती मला भेटून गेली. मिस लेस्टर लंकेला गेली आहे. मद्रासचा प्रवास आटोपून काल राजाजी निघून गेले आहेत. ते दिल्लीला जातील खरे. अमतुस्सलाम अजून अशक्त आहे. त्यामुळे तिला मद्रास येथे सोडून आलो. राजाजी तिला जपतील. तुला पेळू मिळाले असतील. संपले की कळव. परत पाठवून देईन. कुसुमच्या भावाचे जंगबहार येथे निधन झाले, याचे मला खूप दु:ख झाले. प्यारेलालची काल सुटका झाली. किशोरलाल देवळाली येथे आहे. काहीसा बरा आहे. लक्ष्मी बारडोली येथे प्रसूत होईल. तिची काळजी वहायला मंजुकेशा आहे. मोती वा लक्ष्मीही तिथे असतील. काही त्रास होता म्हणून नानीताई जव्हेरी यांचे ऑपरेशन झाले आहे. आता तर भरपूर बातम्या दिल्यात ना?

नऊ तारखेला हैदराबादहून निघून मी पाटण्याला येईन. राजेंद्र बाबूंनी बोलावले आहे. प्रभावती तिथेच आहे. बिहारात बराच काळ रहावा लागेल असे दिसते.

तुम्हा सर्व भगिनींना बापूचे आशीर्वाद.

आता प्रवचन

'नामको आधार तेरे नामको आधार' (नावाचा आधार, ईश्वरा, तुझ्या नावाचा आधार) हे भजन पाठ नसेल तर बघून घ्यावे. सध्या हा भाव मनात रमलेला असतो. तुलसीदासजींनी तर नाम-महात्म्य खूप गाईले आहे. नामाचा अर्थ आहे. रामाचे वा ईश्वराचे नाव आणि त्यांनी असे सांगितले आहे. की रामापेक्षा रामाचे नाव

मोठे आहे. अर्थात् राम नामक जो देहधारी झाला आहे. त्याची तर मर्यादा होती. त्याचा देह नश्वर होता पण नाम अमर आहे. राम नामक देहधारीच्या गुणांना एक मर्यादा होती पण राम नामधारी ईश्वराच्या गुणांची तर कुठलीही मर्यादाच नाही. त्यात आपण वाटेल तितक्या गुणांची कल्पना करु शकतो कारण की ईश्वराचे गुण अनंत आहेत. आणि यामुळे तो गुणातीत आहे., अर्थात् गुणांच्या पार आहे. वाटेल तेवढे गुण मोजून दाखवले तरीही ईश्वराच्या गुणांची मोजदाद होऊ शकत नाही यामुळे तो गुणातीतच ठरतो ना? अशा ईश्वर नामाला जर आपण आपल्या ह्रदयात अंकित करुन घेतले तर आपण निश्चितपणे भवसागर पार करु शकू. नाम स्मरणाने सारी दुःखे दूर होतील. यामुळे कितीही दुःखे कोसळलीत तरी आपण ती सहन करुन घेतली पाहिजे. आपणास जर नामस्मरणाची सवय लागली तर आपल्याला अन्य कुठल्याही गोष्टीची गरज वाटणार नाही. यामुळे या भजनाची रचना झाली आणि कवीने हे भजन गाईले. 'मला एकमात्र रामनामाचाच आधार आहे.' शेष सारे मिथ्या आहे. 'देह के स्नेही सकल स्वार्थी अंत में अलग हो जाएँगे' अर्थात् देहावर स्नेह करणारे सारे स्वार्थी जन, अखेर विलग होऊन जातील. यासोबत आपण जर केवळ नामस्मरण शिकून घेतले तर केवळ तेच आपल्यासोबत जाईल."[२३]

२७ फेब्रुवारी १९३४

"बा, या खेपेला तुझे पत्र अजूनपर्यंत मिळाले नाही. मीसुध्दा अशा ठिकाणी फिरत आहे. की जिथे पोस्टाचा ठाव-ठिकाणा नाही कारण की इथे रेल्वेची सोय नाही. मी टोकावरल्या लहान-लहान खेड्यांचा दौरा करत आहे. आणि इकडे इतक्या नद्या आणि नाले आहेत. की रेल्वेचे रुळ टाकणे खूप महाग ठरेल. पहाडाच्या पायथ्याशी समुद्र आहे. यामुळे पर्वतातील नद्या सागरात मिळून एका मोठ्या खाडीचे रुप घेतात. नावेनेच ही खाडी पार करता येते. जिथे अशी परिस्थिती असेल तिथे वेगाने प्रवास केला जाऊ शकत नाही यामुळे टपाल उशिरा मिळते. आज सकाळी आम्ही कुंदपुर या ठिकाणावरुन स्टीमरमध्ये बसलो. स्टीमर आम्हाला रात्री कारवारला पोहोचवून देईल. ही बारा तासांची सागरऱ्यात्रा होईल. तू मंगलोरला यापूर्वी आली आहे.स. काल आम्ही मंगलोरला होतो. तिथून नद्या पार करत काल रात्री कुंदपुरला पोहोचलो. तिथून स्टीमर पकडले. इथले लोक कानडी बोलतात. हा संपूर्ण इलाका गंगाधररावांचा आहे. या संपूर्ण प्रांताला कर्नाटक असे म्हणतात. ५/६ तारखेला मी बेळगाव येथे असेन. समुद्रकिनारा असल्यामुळे हवा गार असते. कर्नाटकचा दौरा पूर्ण करुन पाटणा येथे जायचा निर्णय घेतला गेला आहे. मी दिनांक ९ तारखेला हैदराबादमध्ये असेन. तिथून पाटणा गाडी धरायची आहे. हैदराबाद येथे बहुत करुन सरोजिनी देवीशी भेट होईल. पद्मा तर तिथे आहेच. पाटणाकडे जाताना वाटेत वर्धा आहे. तिथे कदाचित मला भेटायला प्यारेलाल यायची शक्यता आहे. त्याची नुकतीच सुटका झाली आहे. आणि तो सुटका झाल्यावर तिथे गेला आहे. बहुत करुन जमनालालजीही पाटणा येथे जातील. ठक्कर बाप्पा माझ्यासोबत पाटणा येथे नव्हे पण दिल्लीला जातील. त्यांना तिथे काम करावे लागेल. लक्ष्मीदास पाटणा येथे आहे. तो खूप आजारी आहे. त्याला टायफॉईड झाला आहे. स्वातीची तार आली होती. चंद्रशंकर आपल्या पत्नीच्या भेटीसाठी पंधरा दिवसांची सुटी घेऊन गेला आहे. मी त्याला माधवदासची भेट घ्यायला सांगितले आहे. मी माधवदासला पाठवलेल्या पत्राचे उत्तर अजून मिळाले नाही. नारणदासची ९ तारखेला सुटका होईल आणि छगनलालची सुटका ३ तारखेला होईल. वसुमतीचीही सुटका झाल्याची बातमी आहे. पण तिचे काही पत्र मिळाले नाही. पृथुराज माझ्याजवळच आहे. अजून तर त्याची पाटणा येथे जायची इच्छा नाही. बिचारी बेलाताई त्याच्या भेटीसाठी उगाच व्यग्र होत असेल. मणीलालचे पत्र अजून आले नाही. महादेवची तब्येत चांगली असते. दुर्गा त्याला जाऊन भेटून आली आहे. तिच्या समवेत जीवनजी होते. प्रभावती आणि जयप्रकाश पाटणा येथे आहेत. ते मदत कार्यात लागले आहेत.

आता प्रवचन

मी मागील आठवड्यात नामाच्या महात्म्याविषयी लिहिले होते पण प्रश्न असा उद्भवतो की नाम कसे घेतले जावे? मनात जेव्हा वेगळ्या-वेगळ्या प्रकारचे हजारो

विचार येत असतील तेव्हा नामजप करुन उपयोग काय? नामजप करायचा असेल तर हृदयापासून करायला हवा वा मग जप करायलाच नको, हे वचन खरेही आहे. आणि खरे नाहीही. कुणी व्यक्ती जर देखावा म्हणून नामजप करत असेल तर त्यात काही सार नाही. उलट ते पाप आहे. कारण की ते तर ढोंग झाले पण शुध्द वृत्तीने नामजप करायची इच्छा झाल्यावरही जपाच्या दरम्यान मनात नाना प्रकारचे विचार उठतच रहातात असे झाल्यावरही पराभव पत्करायला नको. मनात अन्य विचार आल्यावरही नामजप करत रहायला हवा, असे करत राहिले तर एखाद्या दिवशी हे नाव हृदयात अंकित होऊन जाईल. नामाचा जो महिमा गाईला आहे. त्याचे हेच कारण आहे. अशिक्षित आणि मूर्ख व्यक्तीही नामजप तर करुच शकते. नामजप तर क्षणभरात शिकला जाऊ शकतो. त्यानंतर तर तो करतच रहायचा आहे. असे करत रहाताना त्याला अशी सवय लागून जाईल की त्याशिवाय त्याला करमणारच नाही. खाता-पिता, जागता-झोपता, उठता-बसता नामजप सुरु राहील अशी सवय लागून गेली तर त्याच्या अंत:करणात नाम उतरले आहे. असे म्हणता येईल. अशी माणसे कमीच असतील पण ती दु:खाला पार करतील. याशी संबंधित हनुमंताची एक मजेशीर कहाणी आहे. आम्हाला पंडितजींच्या गुरुंनी ती आश्रमात सांगितली होती. ती कहाणी मी पुढल्या पत्रात लिहीन. [२४]

८ मार्च १९३४

बा, तुझे पत्र पोहोचले. माधवदासचे पत्र न मिळाल्यामुळे मी मथुरादासला तिथे जायला सांगितले होते. तो तिकडे जाऊन आला आणि माधवदास व कृष्णा यांची पत्रेही आलेली आहेत. ती पत्रे या पत्रासोबत पाठवत आहे. मणीलालचेही पत्र आले आहे. या पत्रांशिवाय या चौघांच्या संदर्भात आणखी काही लिहायला उरत नाही. आता तू मणीलालची काळजी करणे सोडून दिले पाहिजे. त्याने आता चाळिशी पार केली आहे. तो स्वत: आपली काळजी वाहू शकतो आणि कुठल्याही गोष्टीची काळजी करत नाही. तो आपला कामधंदा करतो. स्वत: आपला खर्च करु शकतो. तो सुखात रहातो यामुळे मणीलालची काळजी करायला नको. मी बेळगावहून विजापुरला आलो आहे. दुर्गा, जिवणजी, डाह्याभाई, बाबला, चंदूभाई आणि मोहनलाल बेळगावला मला येऊन भेटले. दुर्गा आणि जिवणजी महादेवना भेटलेत आणि डाह्याभाई मणीताईला भेटले. सारे मजेत आहेत. सिध्दीमतीही येऊन भेटून गेली आणि ती दुर्गाच्या सोबत अहमदाबादला निघून गेली असेल. प्यारेलालची पत्रे येत असतात. जमनालालजी पाटणा येथे गेले आहेत. मी तिथे अकरा तारखेला पोहोचेन. ठक्करबाप्पा आपल्या दोघांपासून वेगळे होऊन जातील. वालजीभाई माझ्यासोबत आहेत. आणि माझ्यासोबतच पाटणा येथे येतील. किशन आणि ओम सध्या तरी मजसोबतच आहेत. हे पत्र मी जेवत असताना ओमच्या हातून लिहवले आहे.

तुम्हा सर्वांना आशीर्वाद.[२५]

१३ / १४ मार्च १९३४

बा, मागल्या आठवड्यातील माझे पत्र मिळाले असेल. ते ओमच्या हातून लिहवले होते. आज मंगळवार दंत-मुखमार्जन करुन हे लिहायला बसलो आहे. अजून पहाटेचे चार वाजले नाहीत. पाटणा येथे आहे. संकट निवारण समितीने एक घर भाड्याने घेतले आहे. तिथे तंबू उभारले आहेत. कित्येक जण तंबूत राहतात. राजेंद्रबाबू, त्यांच्या भगिनी प्रभावती, त्यांचे पती सारे इथे आहेत. जमनालालही इथेच आहेत. बाळ, मगनभाई, स्वामी, कृपलानी, सोमणजी वगैरेही आहेत.च. जिथे खूप नुकसान झाले आहे. अशा भागात मी उद्या जाणार आहे. लक्ष्मीदासला आता बरे आहे. थोडे हिंडु-फिरुही शकतात खरे. शक्ती येत चालली आहे. बेलाताई येण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पण अजून तरी आल्या नाहीत. या खेपेला मनू, बली, रामी यांची पत्रे आहेत. सारे एकाच वेळी आजारी पडले यामुळे कुणी पत्र लिहू नाही शकले. मनू, बली लिहितात की आपल्या आजारपणात सारे कुसूमच्या निधनाचे दु:ख विसरुन गेले. आता सारे बरे आहेत. रामी मुंबईला गेली असेल वा आता जाईल. मनूचे शिक्षण तर राहूनच गेले. मनूने लोणचे वगैरे खायला सुरुवात केली. ताप आला. घसाही दुखायला लागला. सर्वांनी तुला प्रणाम कळवले आहेत. तुझ्यासाठी नमस्कार तर सर्व पत्रांमधून कळवलेले असतातच.

काका हैद्राबादेत विराजित आहेत. छगनलाल जोशी द्वारकेला असल्यामुळे रमाताईही विमूला घेऊन तिकडे गेल्या आहेत. वसुमती बोरीवलीला आहे. गंगाताई कच्छला गेल्या होत्या. तिथून येऊन अहमदाबादला गेल्या आहेत. कृष्णकुमारी आजारी आहे. अमतुस्सलाम अजून राजाजीपाशी आहे. प्यारेलाल मुंबईत आहे. कुसुम देसाई वर्धा स्टेशनवर येऊन भेटली. इकडे येताना मार्गात वर्धा लागते. मी हैद्राबादहून आलो तिथे सरोजिनीदेवी आल्या होत्या, त्याही मजेत आहेत. ठक्कर बाप्पा दिल्लीला गेले आहेत., हिशेब ठेवायला मामाही गेले आहेत. यामुळे आम्ही सात जण आहोत. अन्यथा सोळा होतो. रामदास भेटला होता. रामदास दोन-एक स्टेशनवर आला होता, बरा आहे.

आता प्रवचन -

मी विष्णु दिगंबर शास्त्री यांनी सांगितलेली आख्यायिका वर्णन करायचे ठरवले होते. ती आख्यायिका सांगतो. ही आख्यायिका भक्तीचे स्वरुप वर्णन करण्यासाठी रचलेली आहे. लंकेवर विजय संपादन झाला. राम प्रभु सीतेला सोबत घेऊन पुष्कर विमानाने अयोध्येला परतले तेव्हा हनुमान वगैरे सारे सोबत होते. आता सर्वांना निरोप द्यायची वेळ आली होती. यासाठी विशेष दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. रामप्रभु सर्वांना भेटले. सीताजींनी प्रत्येकाच्या मस्तकावर हात ठेऊन आशीर्वाद दिलेत. सर्वांचेच डोळे भरुन आले. सर्वांना पुरस्कार दिले गेलेत. हनुमानजींचा क्रम आला. सीतेने आपल्या गळ्यातून मणीमाळा काढून हनुमंताला दिली आणि वात्सल्यपूर्वक त्याचे मस्तक थोपटले. हनुमंताला त्या मणीमाळेशी काय देणे-घेणे होते? ते एक-एक मणी काढत, दाताखाली ठेवून चुराडा करत. त्यात राम न आढळल्यामुळे फेकून देत. हे बघून सर्वांना आश्चर्य वाटले. सीताजींनी आपल्या गळ्यातून काढून बक्षीस दिलेल्या माळेची अशी अवस्था? त्यांनी हनुमंताला याचे कारण विचारले. हनुमान म्हणाले -- 'माताजी, ज्यात रामनाम नसेल अशा मणक्यांची माळ लेऊन मी कुठे मिरवू? मला रामाशिवाय दुसरे काहीही नको.' - हे ऐकून सर्वांना अपार विस्मय झाला. कुणीतरी म्हणाले 'असे असेल तर तुमच्या देहात तर कुठे रामनाम दिसत नाही, त्याचे काय?' खळाळून हसत हनुमंत म्हणाले -- 'ठीकाय, बघा, तर मग !' असे म्हणून त्यांनी आपली छाती चिरली. असे करताच रक्ताचा पाट वाहू लागला. त्या प्रत्येक रक्तकणात सर्वांना रामरायाचे दर्शन झाले आणि 'बस, बस, थांबवा आता हे. कृपा करा. कपा करा.' असा चौफेर घोष सुरु झाला. हनुमंतांनी हे कार्य थांबवले आणि राज्यसभेत जयघोष निनादला. सीतेने हनुमंताला स्नेहाश्रुंनी चिंब केले. त्या आनंदाश्रुंनी हनुमंताची काया भिजली. मनही आर्द्र झाले.

ही कुणीतरी कल्पना केलेली कथा आहे. ही कथा रामायणातही कुठे आढळत नाही. हनुमंताला काही आपली छाती चिरुन आपली भक्ती प्रदर्शित करायची नव्हती पण यातून ज्ञान मिळवायचे आहे. हनुमंताला पुरस्काराची गरज नव्हती. त्याच्यासाठी सेवाकार्य हाच मोठा पुरस्कार होता. त्याच्या श्वासोच्छवासात - प्रत्येक रक्तकणात राम वसले होते. उठता-बसता, खाता-पिता, जागता-झोपता त्यांना रामाचीच धून होती. ते मनसा-काया-वाचा रामाला समर्पित होते. त्यांचे शौर्य त्यांच्या भक्तीच्या अधीन होते. भक्तीतून बळ प्रकटले होते. प्रयत्न केला तर अशीच भक्ती आपल्यालाही लाभू शकते. आपल्या जिभेवर जर हरक्षणी रामजी असतील तर कधीतरी ह्रदयात उतरतील आणि ह्रदयात ठसले की आपल्या रक्तकणात सामावतील असे समजावे.

प्रभावती तुला विशेषत्वाने नमस्कार कळवत आहे. ती सर्वांना जपते. अजून पहाटेचे चार व्हायचेत. काल पत्र लिहायला सुरुवात केली ते आज बुधवारी सकाळी लिहून पूर्ण केले.

सर्व भगिनींना बापूचे आशीर्वाद [२६]

२० / २१ मार्च १९३४

"बा, या खेपेला तुझे पत्र अजून नाही पोहोचले. हे पत्र मी मंगळवारच्या प्रात:कालीन प्राथेनेनंतर लिहित आहे. मी पाटणा येथे आहे. माझ्या शेजारी बसून सतीशबाबू टकळीवर सूत कातताहेत. राजेंद्रबाबूंची बहीण शेजारी बसली आहे. प्रभावतीही आहे. ओम आणि किशन दोघी झोपायची तयारी करत आहेत. स्वामीही बसले आहेत. मीरा दूध तयार करायला गेली आहे.

यावेळी मालवीयजी, मौलाना अबुल कलाम आजाद, डॉ. महमूद वगैरे इथे आहेत. रविवारी त्या सर्वांची एक बैठक होती. त्यात बिहार आपत्तीनिवारणासाठी एका समितीचे गठन केले गेले. या समितीत जमनालालही आहे. काम बरे चालले आहे. मी मोतिहारी वगैरे ठिकाणी जाऊन आलो. मोठ-मोठ्या हवेल्याही जमीनदोस्त झाल्या आहेत. गल्ली-मोहल्ले फिरुन आलो. तिथे चहुकडे विटा-चुन्याचा ढीग आणि ध्वस्त घरे दिसताहेत. पाण्याच्या प्रवाहासोबत आलेल्या वाळूचा जाडसर थर शेत जमिनीवर साचला आहे. ही वाळू जोवर हटवली जात नाही तोवर शेतात पीक घेता येणार नाही. वाळू हटवणे काही सोपे काम नाही कारण की ही वाळू काही बिघा दोन बिघे शेतावर नाही पण हजारो एकरांच्या शेतीवर सहा इंचाहून अधिक वाळूचा थर साचला आहे. यामुळे लोकांचे दारिद्रय अपरंपार आहे. असे असूनही माणसांना जीवन इतके प्रिय आहे. की आपापली दु:खे विसरुन लोक चेहरा हसरा ठेवताहेत. ते बघून तर असे वाटते की जणू काही त्याला काळाचा ग्रास न बनण्याचा नशा चढला असावा. घरात दाणा नाही, अंगावर कपडा नाही पण याची मुळी तमा न बाळगता ते दिसताहेत. इथे अशी परिस्थिती आहे. अशात आपण काय करु शकतो? त्यांच्यामध्ये जाऊन कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी नम्रतेने आणि साधेपणाने त्यांची सेवा करावी. आळशी जनांना उद्यमी बनायला विनवावे. स्वेच्छाचारी जनाना आपल्या संयमाच्या उदाहरणाने संयमाचा पाठ शिकवावा. त्यांनी लोकाना रामधूनद्वारे ईश्वराकडे उन्मुख करावे. अशा प्रकारे मूळ भावनेने सेवा करणारेही ठिकठिकाणी सेवारत आहेत. अशा प्रकारे ईश्वराची लीला अपरंपार आहे. जन्म आणि मरण यातले अंतर ईश्वराने दोन-एक मिनिटातच संपवून टाकले. कोण जन्माला आला आणि कुणाचे निधन झाले. माणूस जन्मो वा मरो पण ईश्वराची लीला अखंडपणे सुरुच असते तर मग यात हर्ष कुठल्या गोष्टीचा करावा आणि शोक कसला मानायचा? सत्य तर एक हरीचे नावच आहे. ज्याला या गोष्टीचे भान आहे. आणि जो ईश्वराची अर्थात् ईश्वराच्या सृष्टीची यथाशक्ती सेवा करतो तोच जीवंत रहातो. जो असे करत नाही तो मृतवत् आहे. अशाप्रकारे मी तुला पत्र लिहायला सुरुवात करुन या आठवड्याचे प्रवचन देऊन टाकले. यात कदाचित् दोन-तीन शब्द असे असतील जे तू समजू शकली नसशील पण डाही, शांता व ललिता यापैकी कुणी-ना-कुणी तरी त्याला समजतीलच. त्यांच्याकडून समजून घ्यावा आणि तरीही लक्षात न येणारा असा एखादा शब्द असेल तर त्याचा अर्थ मला विचारुन घ्यावा.

काल एथपर्यत लिहिले होते, पुढे काही सरकलो नव्हतो. आज परत बुधवारी सकाळी (८-४५) वाजता लिहित आहे. आता लवकरच बैठकीत पोहोचायचे निमंत्रण येऊन जाईल. माधवदासचे आणखी एक पत्र आले आहे. त्याची तब्येत आता अशी झाली आहे. की त्याला पोरबंदर येथे जायची गरज वाटत नाही. मुंबईत राहून तो काही व्यापार-धंदा सुरु करील. देवदास व लक्ष्मी आनंदात आहेत. राजाजी अजून तिथे गेले नाहीत. बहुतकरुन ते मला इथे भेटून पुढे जातील. [२७]

२९ मार्च १९३४

"बा, पहाटेचे ३ वाजून ३० मिनिटे होताहेत. आज गुरुवार आहे. तुझे पत्र कालच सायंकाळी मिळाले. आज आम्ही मुजफ्फरपुर येथे आहोत. पंडितजी, स्वामी आणि कृपलानी इथे आहेत. माधवदासही येथेच आहे. मी अकरा वाजता बाळला भेटेन. मगनभाई, रावजीभाई आणि सोमण वगैरे जिथे काम करत आहेत. तिथे मी जाणार आहे. मी रावजी भाईंना पत्र लिहायला सांगेन. तू ज्या बातम्या जाणून घेऊ इच्छितेस त्या सर्व बातम्या मी तुला द्यायचा प्रयत्न करीन पण जर काही सुटले तर परत विचारुन घे. प्रभावती सध्या माझ्या सोबत प्रवास करत आहे. कुंवरजी मुंबईत आहे. रामीही तिथे गेली आहे. (हरीलालचे जावई-कन्या) मनु आता चांगली आहे. (हरीलालची दुसरी कन्या) माधवदासही (कस्तुरबांचा भाऊ) आधीपेक्षा चांगला आहे. वसुमती वर्धा येथे गेली आहे. छगनलाल व रमा द्वारकेत आहेत. छगनलालने केवळ आत्मशुध्दिसाठी सात दिवसांचा उपवास केला होता. तो सोमवारी पूर्ण झाला. तो बरा आहे. दूधीताई व धाकटी कुसुम भावनगरला आहेत. कुसुम देसाई शांतिनिकेतन बघायला गेली आहे. तिचा अजून काही पत्ता नाही. ती एखाद्या कामाच्या शोधात आहे. मणीलाल आणि सुशीलाचे पत्र आले होते. ते आनंदात

आहेत. चंद्रशंकर आता चार दिवसात येऊन जाईल. अहमदाबाद येथे धाकट्या मुलांचे डोके दुखायला लागते, ते बेशुध्द होऊन जातात, ताप येतो आणि मरतात. आता या आजाराचा प्रभाव कमी होत चालला आहे. सिनेमा वगैरे बघितल्यामुळे असा आजार होतो. याचे मुख्य कारण दुषित वायु आहे. हो, विद्यापीठाच्या इमारतीत एक इस्पितळ उघडून दिले आहे. सुटका झाल्यावर कांती कुठे राहील वा कुठे जाईल हे मला ठाऊक नाही. मी त्याला लिहिणार आहे. आनंदी वगैरे सारी लेकरे अनसूयाबेनच्या जवळ आहेत. आणि धमाल करत आहेत. आनंदीला थोडा ताप होता. आता चांगली आहे. लक्ष्मीदासही चांगला आहे. तो पाटणा येथे आहे. पार्वती प्रागजींना भेटून आली. प्रागजी बरे आहेत. देवदास व लक्ष्मी दिल्लीतच आहेत. काही दिवसांनी राजगोपालाचारी तिथे पोहोचून जातील. मणीताईचे कार्य व्यवस्थितपणे सुरु आहे., असे वाटते. मला तिचे काही पत्र मिळाले नाही. नगिनी अमेरिका येथे गेली आहे. आणि अमला साबरमतीला मजेत आहे. जानकीताई व मदालसा वगैरे वर्धा येथे आहेत. रावजीभाईंची विद्याही वर्धा येथे आहे. ती मोठी झाली आहे. तिची विवाह करायची इच्छा आहे. तिच्यासाठी वर शोधन सुरु आहे. लक्ष्मीताई खरे (श्री नारायण मोरेश्वर खरे यांच्या पत्नी ) या वर्धा येथील कामकाज सांभाळताहेत. मुलींची संख्या खूप वाढली आहे. ती पन्नासहून अधिक झाली आहे. द्वारकानाथजीही तिथे आहेत. व्रजकृष्ण दिल्लीत आहे. तो आता चांगला आहे. प्यारेलाल माझ्यासोबत आहे. इंग्लंडमध्ये मला सहाय्य करणारी महिलाही माझ्यासमवेत रहाते. तिच्यासोबत येणाऱ्या व्यक्तीचे काय केले जावे ते काही अजून ठरले नाही. सध्या तर तो इथे आहे. पद्मजा चांगली आहे. श्रीमती नायडू माझ्या भेटीसाठी हैदराबाद येथे आलीच होती. रामनवमीच्या दिवशी पंडीतजी (श्री नारायण मोरेश्वर खरे) उपस्थित नव्हते. सोमणजी यांनीच 'जय राम राम' हे भजन गाईले होते. १० तारखेला आम्ही आसामकडे कूच करु. आसामात दहा दिवस थांबून मी बिहारला परतेन. तिथून ओरिसा येथे जाईन. मे महिन्यात मी तिथे पोहोचेन. काल मी राजेंद्रबाबूंची पत्नी आणि विद्यावती यांना भेटलो होतो. या वेळी प्रवचन पाठवत नाही. आता प्रार्थनेची वेळ होत आली आहे. [२८]

६ एप्रिल १९३४

"बा, आज शुक्रवार आहे. तुझे पत्र अजून मिळाले नाही. पहाटे जवळपास तीन वाजेची वेळ आहे. तुझ्या पहिल्या पत्राचे संपूर्ण उत्तर मी दिले आहे. तुला रावजीभाईंचे पत्र मिळाले असेल. वसुमती येथे येऊन गेली आहे. तिच्याशी अजून बोलणेच झाले नाही. हेमप्रभादेवीही खादीविषयी चर्चा करायला इकडे येऊन पोहोचल्या आहेत. डोळ्यांचा आजार असल्यामुळे काल रात्री रुखी इथे येऊन पोहोचली. तिच्या डोळ्यातून पाणी झरते. माधवदासचे पत्र आले आहे. तो आता एकदम बरा असल्याचे पत्रातून लिहिले आहे. मनूचे पत्र आले आहे. ती चांगली आहे. तू माझ्याविषयी चिंता केली नसशील अशी आशा करतो. मी चांगला आहे. डॉ. अन्सारी माझी निगा राखतात. कालच तर इथे आले होते. विश्रांतीचा आग्रह अवश्य धरत होते. यथाशक्य विश्रांती तर घेतच असतो. अखेर सारे काही ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे. आता मी असा विचार केला आहे. की तुरुंगात जाणाऱ्या अन्य लोकांना थोपवून धरावे. मलाच केवळ एकट्याने सत्याग्रह करायला हवा. यामुळे तुम्हा सर्वांची सुटका झाल्यावर सध्या तुम्हाला सत्याग्रह करायची गरज नसेल. तुम्हाला खादी वगैरेचे कार्य करीत रहायला हवे. आज आणखी अधिक काही लिहित नाही. आज उपवासाचा दिवस असल्याचे तुला ठाऊक आहे. ना? मी उद्या आसामकडे प्रस्थान ठेवीन. बाळ सोबत असेल. पृथुराज तर सोबत आहेच.[२९]

१८ एप्रिल १९३४

बा, तुझे पत्र उशिरा मिळाले. आता पहाटेचे सव्वा तीन वाजत आहेत. दात घासले आता तुझे पत्र हातात घेतले आहे. या स्थानाला जोरहाट असे म्हणतात. हे आसामात आहे. इथला दौरा संपायला अजून दोन दिवस बाकी आहेत. त्यानंतर आठवड्याहून अधिक काळ मी दक्षिण बिहारात घालवीन आणि मग उत्कल म्हणजे ओरिसात. तुझी जेव्हा सुटका होईल त्यावेळी मी बंगालमध्ये असेन असे मला वाटते. तुझ्या सुटकेची तारीख ठरली असल्यास कळवावे. मणीलालचे पत्र

विशेषत्वाने तुझ्यासाठी आले आहे. तू ज्यांची आठवण करतेस त्या सर्व लोकांविषयी हे पत्र आहे. तुझी मूळ पत्रे मी फिनिक्सला पाठवत आहे. आणि त्यांची नक्कल रामदास, देवदास व सरदारना पाठव असे मी लिहून कळवले आहे. कांतीच्या सुटकेची बातमी तर मी तुला कळवलीच आहे. तो चांगला आहे. आता तुरुंगात जायचे नसल्यामुळे तो कुठे राहील हे अजून ठरवावे लागेल- ठरायचे आहे. तो मला एखाद्या स्थानावर येऊन भेटून जाईल. जमनालालजींना एथवर बिहारात पोहोचून जायला हवे. सतीशबाबू चांगले आहेत. ते कलकत्ता येथे आहेत. रावजीभाई, पंडितजी, पारनेरकर वगैरे बिहारात सोबत-सोबत काम करताहेत. माधवरावही आहे. बाळ आणि पृथुराज मजसोबत आहेत. नारणदासच्या नाकातून रक्त वहाते यामुळे तो सध्या राजकोट येथे आहे. तो कदाचित रांची येथे मला भेटेल. छगनलाल भावनगरमध्ये आहे. त्याचे जेवढे वजन कमी झाले होते तेवढे त्याने पुनरपि प्राप्त करुन घेतले आहे. तो भंसाळीला भेटून आला. भंसाळीचे पाय खराब आहेत. त्यांना चालता-फिरता येत नाही. त्यांनी आपले ओठ तांब्याच्या तारेने शिवून घेतले आहेत. पाण्यात पीठ कालवून नरसाळ्याने प्राशन करतात. पाण्यात हरभरा व मुगाचे पीठ मिसळूनही प्राशन करतात. मला वरचेवर पोस्टकार्ड लिहित असतात. वेदना असतानाही आनंदाने रहातात. राजेंद्रबाबूंची तब्येत अगदी छान असते. प्रभावती आणि जयप्रकाश आता बरे आहेत. माझे वजन १०८ पौंड आहे. मीराताई भाषण देत नाही. कधी-कधी खादीप्रदर्शनाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाला जात असते. तिथे मी जाऊ शकत नाही. उद्‌घाटनाच्या वेळी ती जे दोन शब्द बोलते त्याचा अहवाल वृत्तपत्रामध्ये वाचायला मिळेल. मी तर वृत्तपत्रे क्वचित्‌च वाचू शकतो. रामदासच्या सासूबाई आणि नवीन वर्धा येथे गेले आहेत. अहमदाबाद येथला आजार तर अन्यत्रही पसरला आहे. श्यामलाल नेहरु विषयी मी अलाहाबाद येथे लिहिले आहे. तिच्या मुलीने मला एक विस्तृत पत्र पाठवले होते. तुला पेळू मिळून गेले असतील. आणखी पेळूंची गरज वाटली तर मला सांगशील. तू अधिकमहिन्याचे व्रताचे पारणे कुठे फेडू इच्छितेस? तुला दूध व फळे पुरेशी मिळत असतील अशी आशा करतो. रणछोडभाई वगैरे तर अहमदाबाद येथेच आहेत. ते कुठे बाहेर गेले नाहीत. चिमणलालला ताप येत रहातो यामुळे तो वेरावळला गेला आहे. सोबत शारदा गेली आहे. मीठूताई मुंबईतच आहे. कल्याणजी व कुंवरजीही मुंबईत आहेत. कुंवरजींच्या पत्नीच्या निधनानंतर मी पत्रही लिहिले होते. चंद्रशंकर आला होता पण परत तब्येत बिघडल्यामुळे परत गेला. तुझ्या वतीने मी प्रेमलीलाताईंना पत्र लिहून देईन. किशोरलाल अजून आजारीच असून देवळाली येथेच आहे. राधा तर तिथे आहे.च, संतोक आणि गोमतीही आहे. वेलाताई बडोदा येथे आहे. ओम आणि किशन या दोघी प्रातःकालीन प्रार्थनेनंतर काही काम नसेल तर झोपून जातात. दोघांचे शरीर अधिक झोप मागते. आता या खेपेला एवढे पुरेसे ठरेल. या काळात मला प्रवचन पाठवता येत नाही.[३०]

२७ एप्रिल १९३४

"प्रिय कस्तुर,

पहाटेचे चार वाजताहेत. डोळ्यात झोप मावत नाही. तुझे पत्र पोहोचले. नीमू आणि लक्ष्मीला मुली झाल्यात. बाळ-बाळंतीण सुखरुप आहेत. आज-उद्या बारडोलीच्या लक्ष्मीच्या बाळंतपणाचीही बातमी येईल. बातमी आली म्हणजे कळवतो. १० तारखेला कांती मला रांचीला भेटेल असे वाटते. नारणदासही तिथेच भेटेल. रामी आणि कुंवरजीची खुशाली कळते. ते आनंदात आहेत. माधवदासला आता बरेआहे. त्यामुळेत्याला पोरबंदरला जायला काय लिहू? तो कमाई करायला उत्सुक आहे. भंसाळीला मी अधून-मधुन लिहित असतो. तो आता ठाण्यातच आहे. त्याची तब्येत अजिबात चांगली नाही पण तो आनंदात आहे. छगनलाल जोशी त्याला भेटून आला. त्याचे पाय चांगले नसल्यामुळे प्रवास करणे थांबवले आहे. संतोक व राधा दोन्ही मजेत. रुखी येऊन मला भेटून गेली. डोळ्यांच्या उपचारासाठी गेली होती. प्रभावती, किशन व ओम तिन्ही माझ्यासमवेत आहेत. कुमारी लिस्टरही आहे. यांच्याशिवाय राजेंद्रबाबूंची बहिणही आहे. शिकारपुरच्या लक्ष्मीबाबत मला काहीही आठवत नाही. कधी-कधी तुझ्या पत्रातील काही वाक्ये कापून टाकली जातात असे वाटते. आता तर लक्ष्मीबाईसाठी अधिक काही करायचे नाही ना? जमनालाल पाटणा येथे आहे. प्यारेलाल तिथेच आहे.

वसुमती वर्ध्याला गेली. ती चांगली आहे. वल्लभभाई चांगले आहेत. हो, दुर्गा आदी सारे पुनश्च ठाकठीक आहेत. मला वाटते की हे तर तुला मी याआधीच लिहिले आहे. माझी तब्येत चांगली आहे. काळजीचे काही कारण नाही. पेळूतुला आवडले हे कळून आनंद वाटला. केशुच्या धनुकलीवर ते तयार झालेत. मीराने तुला पाठवलेत.

आसाम छोटा प्रदेश आहे. इथे चहाचे मळेखूप आहेत. अधिकांश मळेइंग्रजांच्या ताब्यात आहेत. बिहारी मजूर तिथे राबतात. खूप पाऊस पडतो. सर्वत्र हिरवळ दिसते. आसामात ब्रह्मपुत्रा नदी आहे. यामुळेप्रदेश रमणीय व सुपीक आहे. इथले लोक खूप अफीम खातात. यामुळे सूस्त वाटतात. महिला विणकाम जाणतात. स्वत:च आपले कपडेविणतात. अनेक महिला कताईही करतात."

१ मे १९३४

बा, रामदासच्या नावे लिहिलेले तुझे पत्र मिळाले. हे पत्र मी रांचीहून लिहित आहे. आम्ही काल सायंकाळी येथे पोहोचलो. सध्या तर इकडे खूप लोक आहेत. राजकोटची सुशीलाही येथे येऊन पोहोचली आहे. जमनालालजी, प्यारेलाल, राजाजी, डॉ. अन्सारी, नारणदास, कांती, लीलावती मुंशी, सरोजिनीदेवी वगैरे इथे पोहोचून गेले आहेत. डॉ. राय आज येऊन जातील. आम्ही इथे गुरुवारपर्यंत राहू. त्यानंतर जमशेदपुरला जाऊ. तिथून उत्कल--ओरिसा. मारुती आणि लक्ष्मी यांना पुत्र प्राप्ती झाली. माझी तब्येत चांगली रहाते. तू मुळीच काळजी करु नकोस. तुझी सुटका होईल तेव्हा मी पाटणा येथे असेन. तिथून पुढे कलकत्ता येथे जाईन. रामदास तुझ्या नावाचा जप करत असतो, यामुळे त्याच्याकडे जायला हवे. तिथून दिल्लीला निघून जा. तुला बारडोली येथेही तर जायलाच हवे आणि तिथून बहुत करुन अहमदाबादला तर येऊच शकतेस. या दरम्यान कदाचित माझे जर गुजरातकडे येणे झाले तर तू तिथून माझ्यासोबत असू शकतेस. मला तर हेच सुचले आहे. पण तुला बरे वाटेल तेच करावे. हो, जर वर्धा येथे जाणे झाले तर मार्गात देवळाली आहे. म्हणून राधा आणि किशनलाल यांनाही भेटत येशील. एवढे तर कुठल्याही परिस्थितीत करण्यायोग्य आहे. शांता, ललिता वगैरेंविषयी मी रावजीभाईशी खूप गप्पा केल्या आहेत. 'राम गीता' पाठवायचा प्रयत्न करतो. [३१]

१० मे १९३४

या खेपेला तुझे पत्र आतापर्यंत मिळाले नाही. हे पत्र मी पुरीहून दहा मैल अंतरावरच्या एका खेड्यावरुन लिहित आहे. रात्रीचा एक वाजत आहे. दात घासून मी एक पत्र लिहिले आणि आता तुला लिहायला घेतले आहे. परवा मी निश्चय केला की आता मला पदयात्रा करायला हवी. रेल्वे, कार, वा बैलगाडीने यात्रा करत धर्म-प्रचार केला जाऊ शकत नाही. तो तर पायीच चालत केला जाऊ शकतो. स्थानिक नेता व ठक्कर बाप्पाही अखेर सहमत झालेत आणि मी त्या दिवसापासूनच पदयात्रा आरंभिली. यातून माझ्या ठायी नवी शक्ती संचारली. काल आठ मैलांहून अधिक पदयात्रा केली पण मला काही जाणवले नाही. असमयीही मी ताजा-तवाना होऊन उठलो आहे. अर्थात् लोकांच्या गर्दीला काही सुमार नव्हता पण तरीही शांतता टिकून होती. धक्का-बुक्की बंद झाली आणि अपेक्षाकृत अधिक काम झाल्याचे जाणवले. दलात तर तेच लोक होते. भगिनींमध्ये सुशीला, प्रभावती, ओम आणि मीरा तर आहेत.च. यांच्याशिवाय पुरवाई (जीवराम कोठारी यांच्यासोबत काम करणारी महिला), आश्रमातील सोनामणी आणि गोपबंधू बाबूंची पत्नी रमाबाईही आहेत. जीवरामही (कच्छ येथील जीवराम कोठारी) दलासोबत आहेत. आणि अशाच प्रकारे पुरुषोत्तमचे श्वसुर हरखचंदही आहेत. ही सारी मंडळी कटकहून विलग होऊन जातील. मला कटकहून तीन दिवस पाटणा येथे जावे लागेल. तिथे अखिल भारतीय काँग्रेस कमेटीची बैठक आहे. माझी इच्छा तर तिथून परत ओरिसाला जाऊन यात्रा पूर्ण करायची आहे. अन्य सहयोगी कार्यकर्त्यांशी बोलूनच याविषयीचा निश्चय होऊ शकेल.

पुरी येथे मला कुसुम देसाई भेटली होती. ती आपल्या नातलगांकडे कलकत्ता येथे गेली होती. कदाचित ती परत पाटणा येथे येऊन मला भेटून जाईल. वसुमती वर्धा येथे आहे. रामदास, नीमू आणि लेकरे मजेत आहेत. तसेच देवदास, लक्ष्मी व त्यांची

लेकरे तथा हरीजी, लक्ष्मी आणि तिचे बाळही मजेत आहेत. प्यारेलाल अजूनही राजेंद्रबाबूंच्या सोबत आहे. वालजीभाई, बाळ आणि पृथुराज माझ्यासोबत आहेत. चंद्रशंकर आमच्यासोबत नाही. तो अजून आजारी आहे. या पत्रासोबत 'गीता-प्रवेशिका' वा 'राम गीता' पाठवत आहे. हे सहज कळू शकेल. दुसऱ्या प्रतीची गरज असेल तर मागवून घे आणि ती प्रत तिथेच सोडून ये. सुटका झाल्यावर तुला काय करायचे आहे. हे तर मी तुला लिहिलेच आहे. याशिवाय तुला जे योग्य वाटेल ते-तसे कर. उत्तमचंदचे पत्र मिळाले होते. तो मरोली येथे गेला आहे. व त्याची पत्नीही सोबत आहे. [३२]

२० सप्टेंबर १९३४

"बा, तुझी चिठ्ठी काल मिळाली होती. तू जर कानो (रामदासचा मुलगा) याला राखू इच्छित असशील तर मग मी त्याला इकडे बोलाऊन काय करीन? तू अवश्य त्याला तिथे ठेऊन घे. मी तर तुझी आणि रामदासची जबाबदारी कमी करु इच्छित होतो. सरिता (रामदासच्या सासूबाई) इथे आहेत. यामुळे नीमू (निर्मला रामदासची पत्नी) कानोची देखरेख करायला उत्सुक होती. रामदास सध्या तर चांगला असेल असे वाटते. त्याने उतावीळपणे खाऊ नये. तुझ्यापाशी मच्छरदाणी तर असेलच. वेळ कसा जातो? मी जे वृत्तपत्रांमधून लिहितो ते कुणाकडून ऐकून घेत चल. सुमित्राच्या (रामदासची मुलगी) डोळ्यांसाठी नीमू रोज इस्पितळात जाते. अमलाबेनला शांतिनिकेतनमध्ये नोकरी मिळून गेली आहे. म्हणून दोन चार दिवसात ती तिकडे निघून जाईल. ती तिथे शांततेने राहिली तर सर्व ठीक होऊन जाईल. कमला नेहरु खूप आजारी आहे. त्यांना कुणाकडून पत्र लिहवून घे. [३३]

२१ सप्टेंबर १९३४

बा, आज तुझे पत्र आले नाही. रामदासला मी लिहिलेल्या पत्रावरुन सुमित्रेच्या तब्येतीचे वृत्त जाणून घे. तिची काही काळजी करु नकोस. नीमूचीही काळजी करु नकोस. अमतुस्सलाम आणि वसुमती तिथे जातच असतात. राधाकिसन (राधाकृष्ण बजाज) तर तिथे आहेच. अमलाला शांतिनिकेतनमध्ये नोकरी मिळाली आहे. ती तिथे चार-दोन दिवसात निघून जाईल. नोकरी मिळाल्यामुळे ती खुश झाली आहे. काकासाहेबांना ताप येत होता. आता कमी होत आहे. त्यांना बघायला रोज चालत जातो. थोड्या अंतरापर्यंत नीमूही सोबत असते मग परतताना पुन्हा सोबत करते. सध्या ती सूतकताई शिकत आहे. आज माझ्या नावे जमनाताईचे पत्र आले आहे. तू त्यांना लिहित रहात असशील अशी आशा वाटते. मणीलाही पत्र लिही. [३४]

२७ सप्टेंबर १९३४

बा, काल तुझ्या चिठ्ठीला उत्तर पाठवले होते. सध्या तुम्हा दोघांना लगेच वर्धा येथे बोलाऊन घेणे उचित नाही. तिथल्या इस्पितळाचा उपचारही पूर्ण करुन घेणे सोईचे ठरावे. तिथल्या हवा-पाण्यात तर काही उणेपणा नाही. रामदासला तिथे आवडत नसेल तर मुद्दा वेगळा आहे. यामुळे तू धीर धर. ईश्वर सारे बरोबरच करील. राजेंद्रबाबू उद्या निघून जातील. सरदारही निघून जातील. [३५]

२९ सप्टेंबर १९३४

बा, माझी पत्रे मिळत असावीत. रामदासला जर पूर्णपणे शक्ती आल्यासारखे वाटत नसेल तर काँग्रेस अधिवेशनात यायचा कार्यक्रम रद्द करुन टाकावा. तिथे विशेष काही नाही. नीमूला तिथे घेऊन जाणे उचित ठरणार नाही. जिथे बघशील तिथे गर्दी असेल. जिथे जेमतेम कामे निभावून घ्यावी लागतील अशा ठिकाणी लेकुरवाळ्या महिलांनी जायला नको. जेव्हा रामदास पूर्णपणे बरा होऊन जाईल तेव्हाच हवा-पालटाविषयी विचार करायला हवा ना? तू याविषयी काळजी करु नकोस. स्वत:साठी मच्छरदाणीचा वापर करत जा. [३६]

६ ऑक्टोबर १९३४

बा, यावर्षी काँग्रेसच्या अधिवेशनप्रसंगी तुझे येणे अजिबात आवश्यक नाही. मी अजिबात जाऊ इच्छित नाही पण मला तर जावेच लागेल. या खेपेला नि:शुल्क प्रवेश नाही. किमान तिकीट पंचवीस रुपयांचे आहे. एवढे कोण देईल? आणि आपण एवढे शुल्क कुणाला का देऊ द्यावे? मी सर्वांना 'जाऊ नये' असे सांगत आहे. [३७]

१५ ऑक्टोबर १९३४

बा, तू पत्र अनियमितपणे लिहितेस असे वाटते. लिहित रहाणेच योग्य आहे. खानसाहेब आले आहेत. आज चरखा-संघाची बैठक आहे. त्यामुळे इतर मंडळीही

आली आहे. राजेंद्रबाबू येणार होते पण आजारी पडले आहेत. बघू या काय होते?[३८]

२० ऑक्टोबर १९३४

बा, तुला मुंबईला न बोलाऊन मी योग्यच केले. जिथे पेरीनताईचा अपमान झाला तिथे तू का जावेस? हे तर एक विशेष कारण झाले. दुसरे कारण असे आहे. की रामदास जोवर तिथे आहे. तोवर तुझे तिथे रहाणे शोभून दिसते. तिसरे कारण हे की माझे मन काँग्रेसवरुन उडून गेले आहे. मी जमनालालजी यांनाही रोखून ठेवले आहे. माझे काँग्रेसमधून बाहेर पडणे तू निश्चित समज तर मग तुला मी तिथे कशासाठी नेऊ? नीमूची तब्येत चांगली असते.[३९]

१८ ऑगस्ट १९३५

बा, खूप प्रतीक्षेनंतर तुझे पत्र मिळाले. तू लवकर बरी होऊन जा. नीमू वगैरेची काळजी करु नकोस. नीमू आनंदात आहे. लेकरेही इथे पोहोचल्यावर काही वाढली आहेत. कानो माझ्यासोबतच जेवायला बसतो. कधी सुमित्राही जेवायला बसते तर कधी बसत नाही. ऊषा मोठी होत चालली आहे. नीमूची सतारही थोडी-फार झणझणत असते. अमतुस्सलाम खूप सेवा करते. राजकुमारी सध्या इथेच आहे. २१ तारखेला इथून रवाना होईल. खुर्शीदताई तर इथे आहेच. २२ तारखेला गोसीताईच्या यायची शक्यता आहे. हरीलालची पत्रे मिळत असतात. त्याच्या जे मनात येईल ते लिहित असतो. [४०]

२४ ऑगस्ट १९३५

बा, तुला तर तिथे देवानेच पाठवले होते ना? बरे, तिथे मनूही आहे. यामुळे मी निश्चिंत बसलो आहे. तू सिंहिण आहे.स आणि आजारांना भिणारी नाहीस. (देवदासला टायफॉईड झाला होता, तो संदर्भ आहे.) यामुळे तुला शक्य ते सारे दृढ निश्चयाने करत रहा. रामाला शरण जा. मनूकडून रोज पत्रे लिहवत रहा. (डॉक्टर) अन्सारी तर तिथे असतीलच. एवढे पुरेसे आहे. त्यांच्यापेक्षा चांगला अजून कुणी डॉक्टर नाही. बहुत करुन व्रजकृष्णही तिथेच आहे. आणि मग प्यारेलालची माणसे तर तिथे आहेत.च.[४१]

तारखेशिवायचे पत्र

बा, तू मला खूप काळजीत टाकून दिलेस. या खेपेला तुझ्या प्रकृतीअस्वास्थ्याविषयी जेवढी काळजी होती तेवढी यापूर्वी कधी वाटली नव्हती. आज देवदासची तार मिळाल्यावर मी निश्चिंत झालो. मी तुला दुःखी अवस्थेत सोडून आलो होतो, ते माझ्या दुःखी व्हायचे कारण होते. मी भले करायला गेलो पण तुला दुःख वाटले. तू विसरलीस पण मी कसा विसरेन? आजारी तर होतीसच. देवाने कृपा केली असे वाटते. आता तब्येत खूप सुधारुन घ्यावी. लक्ष्मी, रामू, तारा सारे अगदी चांगले झाले असतील. इथली हवा तर खूप छान आहे. आता तर थंडी येऊ शकेल.

३ ऑक्टोबर १९३६

बा, या दरम्यान तुझे पत्र मिळाले नाही. आजारी होतीस का? आता तर सारे काही ठीक आहे. ना? मीराचे बरोबर चालले आहे. अशक्त तर आहेच. ताप नाही. नानावटीला थोडा ताप आहे. दोन-एक दिवसात उतार पडेल असे वाटते.

वृत्तपत्रातला तुझा लेख वाचला. हे सारे लिहायचे काय कारण होते? या लेखाच्या आधारे एका इंग्रज भगिनीने तुला पत्र लिहिले आहे. ते पत्र देवदासकडून समजून घे. या पत्राला उत्तर लिहवून घे. लीलावती अधून-मधून महादेवकडे येत असते. सारे काही व्यवस्थित चालले आहे. आता तिकडे सर्वांच्या तब्येती चांगल्या असतील.

बापूचे आशीर्वाद.[४२]

हे पत्र जुहूहून लिहिलेले आहे.

१६ मे १९३८

बा, तुझे पत्र मला का बरे मिळावे? तू जमनालालसोबत होतीस तेव्हा पत्रे लिहायची तशी आवश्यकताही नव्हती म्हणा ! मी बरा आहे. कांती आणि सरस्वती इथेच आहेत. (हरीलालचा मुलगा आणि सून) बहुधा माटुंगा येथे जातील. आम्ही १७ वा १८ तारखेला वर्धा येथे येऊ. तुझे वर्धा येथे येणेच सोईचे व्हावे. देवदास लक्ष्मीला घेऊन कदाचित मद्रासला जाईल. यामुळे काहीसे समाधानही लाभेल. तो जर डेहराडूनला गेला

तर मला वाटते की त्याला तिथे एक-दोन दिवसांपेक्षा अधिक काळ थांबता येणार नाही. प्यारेलाल आणि सुशीला तर तिथे आहेत.च. कदाचित ते दोघे किवा मग एकटा प्यारेलाल तुझ्यासोबत येईल. अखेरीस देवदासशी सल्ला-मसलत करुन तुला जे योग्य वाटेल ते ठरव. राजगोपालाचारी इथेच आहेत. दोन-तीन दिवसात परत मद्रासला निघून जातील. कानन मजेत असेल अशी आशा करतो. [४३]

७ ऑक्टोबर १९३८

बा, तू जर स्वतःच्या व लक्ष्मीच्या (देवदासची पत्नी) तब्येतीविषयी एथवर मला लिहिले नसेल तर लिही. आम्ही सकुशल पोहोचलो. थंडी अजून पडायला लागलेली नाही. माझे मौन सुरु आहे. सध्या तर आम्ही पेशावरला आहोत यामुळे पेशावरच्या पत्त्यावर पत्र पाठवावे. तिकडे उन्हाळा कमी झाला असेल अशी आशा करतो. मला कुणी भेटू नाही शकत. खानसाहेब कुणाला येऊ देत नाहीत. सुशीला मजेत आहे. काननला लिहायला लाव. त्याला रोज फिरायला पाठवत चल. [४४]

१२ ऑक्टोबर १९३८

बा, तू मला खूपच चिंतेत पाडलेस. तुझ्या तब्येतीविषयी मला या खेपेला जेवढी काळजी करावी लागली तेवढी कदापि केली गेली नाही. आज देवदासला तार पोहोचल्यामुळे निश्चिंतता आहे. मी तुला दुःखी अवस्थेत सोडले हे माझ्या दुःखाचे मूळ कारण होते. नंतर तू ते विसरुनही गेलीस पण मी कसे बरे विसरणार? तू आजारी तर होतीसच.

ईश्वराची कृपाच झाली असे वाटते. आता तू तुझी तब्येत सुधारुन घे. लक्ष्मी (देवदासची पत्नी), रामू, तारा (देवदासचा मुलगा व मुलगी)

सारे आता अगदी छान झाले असतील. इथले हवामान तर खूपच छान म्हणवले जायला हवे. सध्या तरी सहन करता येईल अशी थंडी आहे. मला तर अशी थंडी आवडते.[४५]

१३ ऑक्टोबर १९३८

बा, तुझ्या बाबतीतले समाचार कळत रहातात. देवदासही तुझ्याविषयी तक्रार करत होता की तू खूप अशक्त झाली आहे.स तरीही कामे आटोपत असतेच. डॉक्टरांचा सल्ला ऐकायला हवा. तू जर लवकर बरी झालीस तर आपण सारे चिंतामुक्त होऊन जाऊ. माझी तब्येत तर खूप चांगली असते. खानसाहेब खूप विश्रांती देतात यामुळे मी माझे कामही योग्य प्रकारे करु शकतो. सुशीलाही स्वस्थ होऊन गेली आहे. अमतुस्सलामला तर तू ओळखतेस. ती सबंध दिवसभर कामाना वाहिलेली असते. केशूचा साखरपुडा मथुरादासच्या मेव्हणीशी झाला. [४६]

१५ ऑक्टोबर १९३८

बा, या खेपेला तू मला चांगल्याच चिंतेत टाकून दिलेस. मला तुझाही विचार करायचा आहे. आणि स्व-कर्तव्याचाही विचार करावा लागतो. माझे मन या दोन टोकांवर झुलत असते. मन म्हणते की तुझ्याकडे धाव घ्यावी. कर्तव्य म्हणते की जिथे आहे.स तिथले कर्तव्य आधी पूर्ण कर. आता तू जर लवकर बरी झालीस तर माझी काळजी संपून जाईल. [४७]

१८ ऑक्टोबर १९३८

बा, रामदास आणि देवदासच्या पत्रांवरुन असे वाटते की तुझी तब्येत आता काळजी करावी अशी उरली नाही. सुशीलाला जेव्हा तुझ्याविषयक माझ्या चिंतेची बातमी पोहोचली तर ती म्हणाली की मला पाठवा. मी तिला म्हणालो ‘तुला पाठवून काय करु? बांची सेवा तर खूप लोक करताहेत. मी तर माझ्या मनःशांतीसाठी बांच्या खाटेजवळ उपस्थित राहू इच्छित आहे. बांचीही हीच भावना आहे. याशिवाय मला आपले हृदय कठोर बनवून इथे आपल्या कर्तव्यांचे पालन करत रहायचे आहे.’ ईश्वराची कृपा झाली आहे. असे वाटते. लक्ष्मी आणि लेकरे मजेत असतील अशी आशा करतो.[४८]

बापूचे आशीर्वाद.

२५ ऑक्टोबर १९३८

बा, आता तुझी तब्येत सुधारली असल्यामुळे मी तुला लिहायचा कंटाळा करतो. या दरम्यान मी दौऱ्यावर आहे. यामुळे पत्र लिहायला वेळ मिळणेही खूप अवघड होऊन बसले आहे. पण तुला तर पत्र लिहवून घेतलेच पाहिजे. इकडे सारे कुशल-क्षेम आहे.[४९]

२ नोव्हेंबर १९३८

बा, आता तर नऊ दिवस उरलेत आणि देवाची इच्छा असली तर भेटू या. त्याचदिवशी सेगावकडे निघू या. तुझ्या पत्रात एक मुद्दा होता त्याचे उत्तर द्यायचे राहून गेले. निघताना तुझ्या मस्तकावर हातही ठेवला नाही असे तू लिहिले आहे.स. मोटर चालायला लागली आणि मलाही ते जाणवले. तू लांब होतीस. अजूनही तुला काही बाह्य निशाणी हवी का? मी बाहेर प्रदर्शित करत नाही म्हणून माझे प्रेम शुष्क होऊन गेले आहे. असे का मानून घेतेस? माझे प्रेम वाढते आहे. आणि सारखे वाढतच चालले आहे., असे माझे तर तुला म्हणणे आहे. याचा अर्थ आधी कमी होते असा काही होत नाही पण जे प्रेम होते ते रोज अधिकाधिक निर्मळ होत चालले आहे. मी तुला केवळ मातीची पुतळी मानत नाही. अधिक काय लिहू? याचा अर्थ कळला नसेल तर देवदास समजावून सांगेल पण ज्याप्रमाणे अमतुल, लीलावती वगैरे बाह्य निशाणी मागतात त्याप्रमाणे तुलाही हवी असेल तर मी देईन.[५०]

२ फेब्रुवारी १९३९

बा, तू का चिंतित होतेस? माझी काळजी करु नकोस. स्वत:च्या तब्येतीला जप. रामनाम स्मरण कर. अनेकांच्या पुण्याईने आपण ही लढाई जिंकू असे मानून चल. यात अर्थात्‌च तुझी पुण्याईही आहेच. [५१]

६ फेब्रुवारी १९३९

बा, या पत्रासोबत अकोल्याहून आलेली पत्रे पाठवत आहे. तू मजेत असशील. उद्या दोन्ही मुलींचे विवाह आहेत. (७ फेब्रुवारी १९३९ रोजी विजया पटेल हिचा विवाह मनुभाई पंचोली यांच्याशी आणि शारदाबेन शहा हिचा विवाह गोरधनदास चोखावाला यांच्याशी होणार होता.) तुझ्या अनुपस्थितीने सर्वांनाच वाईट वाटले. मला कन्यादान करायचे आहे. आणि तू सोबतीला नाहीस.[५२]

या दरम्यान गांधीजींनी जवळपास रोजच कस्तुरबाना पत्रे लिहिली आहेत.

८ फेब्रुवारी १९३९

बा, तुला खूप त्रास होत आहे. काहीही गैरसोय असेल तर अवश्य कळव. तू दु:ख सहन करण्यासाठीच जन्माला आली आहे.स. यामुळे तुझ्या त्रासाची कथा ऐकून मला काही आश्चर्य वाटले नाही. मी सरकारला तार केली आहे. तुझ्या त्रासाविषयी वर्तमानपत्रांमधून काही देऊ इच्छित नाही. ईश्वर तर तिथेही तुझ्यासोबत बसलेला आहेच. त्याला जे काही करायचे असेल ते तो करील.

कानन (नातू) मजेत आहे. रात्री तुझी आठवण काढतो. अजिबात काळजी करु नकोस. अमतुस्सलाम इथे आहे. ती कानननला सांभाळते.

चि. मणी, (सरदार वल्लभभाई पटेल यांची कन्या) तू तिथे आहे.स ही किती चांगली गोष्ट आहे.

बापूचे आशीर्वाद [५३]

९ फेब्रुवारी १९३९

बा, तुझे पत्र पोहोचले. तू आजारी-आजारी असतेस. हे काही मला आवडले नाही. आता तर हिंमतीने कार्य करायला हवे. सोई तर उपलब्ध होतीलच आणि न उपलब्ध झाल्यात म्हणून काय झाले? मणीताईला धडपणे गाता येत नसेल तरी तुला रामायण गाऊन दाखवील. राम आणि सीतेच्या दु:खाच्या तुलनेत तुझ्या-माझ्या दु:खाची गणनाच काय? तू काळजी करु नकोस. सध्यापुरते मी मुलींकडून सेवा करून घेणे थांबवले आहे. अस्वस्थ होऊ नकोस. काय करायचे ते मी बघतो. अर्थातच सुशीला माझी काळजी घेतेच आहे. [५४]

११ फेब्रुवारी १९३९

बा, तुझे स्थलांतर झाल्याची बातमी वृत्तपत्रातून वाचली. कुठे का राखेनात, निश्चिंत मनाने रहा. काळजी करु नकोस. तू जिथे असशील तिथे ईश्वर तर तुझ्यासोबत आहेच. डॉक्टर मला तपासायला आलेले आहेत. विश्रांती घ्यायला सांगताहेत. विश्रांती तर घेतो आहेच. तुला इथूनच रोज पत्रे पाठवत आहे.[५५]

१२ फेब्रुवारी १९३९

बा, तुझे पत्र मिळाले. तुला सर्व बातम्या तर कळवल्या जाताहेतच. सारी चिंता सोड. तुला एनिमा पोहोचल्याचे कळले. इथून काय औषधे पाठवायचीत? आता तिथे डॉक्टर येतात तर काही गरज वाटल्यास त्यांचे औषध घेत चल. तुला पत्र तर रोज लिहिली जातीलच. खूप हिंमतीने रहावे.[५६]

बापूचे आशीर्वाद.

(तारीख नाही)

बा, तुझे पत्र पोहोचले. तू तर आता राज्याची पाहुणी झालीस. तब्येतीला जप. मणी तुझ्यासोबत असल्यामुळे मला शांतता आहे. मला पत्रे मिळायला हवीत. तुझे म्हणणे लक्षात राखीन.

बापूचे आशीर्वाद

१३ फेब्रुवारी १९३९

बा, आता तर तुला एकट्याने रहायचा चांगला अनुभव आलेला आहे. पण माझे चुकलेच. अग, तू एकटी मुळी आहे.सच कुठे? रामराया तर सदैव तुझ्यासोबत आहेत.च ना? आणि जिथे रामराय असतील तिथे दुसरा कुणी असो वा नसो काय बरे फरक पडतो? पण आता तर मृदु (मृदुला) आणि मणी दोन झाल्यात. आनंदात रहा. त्या दोघींनीही मला लिहावे.

तुम्हा सर्वांना बापूचे आशीर्वाद.[५७]

१६ फेब्रुवारी १९३९

बा, तू आणि मणी, तुम्हा दोघींची पत्रे मिळालीत. तमाम परीक्षा उत्तीर्ण करा. इथून पत्रे तर तुला पाठवली जाताहेतच. तिथल्या अधिकाऱ्यांना विचार. केलेनबॅक आजारी आहेत. आजार अवघड आहे.

लीलावती सोमवारी उपवास करते. मणीला स्वतंत्रपणे काही लिहित नाही. [५८]

१६ फेब्रुवारी १९३९

बा, तुला रोज पत्र लिहित असतो तरी जर मिळत नसेल तर कायच करावे? तुझी काळजी करायचे जसे काही कारण नाही आहे. तसेच माझी चिंता करायचे तर कधीच काही कारण नव्हते. सुभाष बाबू येऊन गेलेत. आणिक इतरही लोकांचे येणे-जाणे सुरु असते. केलेनबॅक आता चांगले आहेत. कानन मजेत आहे. तो माझ्यासोबतच जेवतो आणि दुपारी झोपतोही माझ्यासोबतच. बापूचे आशीर्वाद.[५९]

१८ फेब्रुवारी १९३९

बा, तुला इथून रोज पत्र पाठवत असतो. टपाल रोजच जात असते. आता तिथे जर तुला पत्र मिळत नसेल तर कायच करावे? माझी काळजी करायची काही आवश्यकता नाही पण जरी माझी तब्येत काळजी करण्यासारखी झाली तरीहीमी तर तुझ्याकडून पुढील उत्तराचीच अपेक्षा करत राहीन. तुझे उत्तर असावे.

"आम्हा दोघांच्या वियोगातच जर त्यांचा मृत्यु लिहिला असेल तर तसेच होईल पण जिथे माझ्या लेकरांवर अन्याय होत आहे., अत्याचार होत आहे. तिथे मी तर पडून आहे. मला तुरुंगात पाठवले तर मी यापेक्षाही अधिक प्रसन्न राहीन. ठाकुरसाहेबांनी दिलेल्या वचनाचे पालन करावे. या कामी तुम्ही सारे मला मदत करा. तुम्ही जर माझा धडपणे उपयोग करुन घेणार नसाल तर राजकोटच्या सीमेतच देह विसर्जित करायची माझी इच्छा आहे."

तू काही स्वतःच्या इच्छेने तुरुंगात गेलेली नाहीस. तुझ्या अंतःकरणात जर वरीलप्रमाणे उद्गार प्रकट होत असतील तर मुक्तपणे त्यांना प्रकट कर. आपल्या मनातही अशीच धारणा धारण कर.[६०]

२० फेब्रुवारी १९३९

बा, सावध रहा आणि मुख्य म्हणजे आपल्या तब्येतीची काळजी वहा. सारे येऊन गेलेत त्यामुळे आता अधिक काही लिहित नाही. आज नानावटी काकांपाशी रहायला निघून गेले आहेत.[६१]

२१ फेब्रुवारी १९३९

बा, तुझी पत्रे बरोबर पोहोचतात. माझे टपाल इथून तर वेळेवर जाते पण तिथे वेळेवर का पोहोचत नाही याचा तपास करीन. तब्येतीची योग्य त्याप्रकारे काळजी घे. मला तपशीलवार समाचार पोहोचायलाच हवेत. शेष प्रभा लिहील. सुशीलाच्या आहाराविषयी मी सध्या काळजी घेऊ शकत नाही. तुला योग्य प्रकारे जाणीव करुन दिली आहे.

बापूचे आशीर्वाद.[६२]

२३ फेब्रुवारी १९३९

बा, तू माझे पत्र येत नसल्याची तक्रार करतेस. आज तुझे पत्र नाही - असे का? इकडे तर सारे कुशलच चालले आहे. चिंता करायचे काही कारण नाही.

बापूचे आशीर्वाद [६३]

२४ फेब्रुवारी १९३९

बा, आता तर तुला पत्रे मिळत असतीलच. धैर्याने आणि हिंमतीने कार्य कर. सारे काही योग्यच होईल.[६४]

४ मार्च १९३९

बा, "तू विनाकारण चिंतित आहे.स. ईश्वराने आपली इच्छा पूर्ण करायची मला संधी दिली याबद्दल तुला आनंद वाटायला हवा. मला उपवास करावा लागेल हे जिथे मी स्वत:ही जाणत नव्हतो तिथे उपवास सुरु करण्यापूर्वी मी तुझ्याशी वा अन्य कुणाशी चर्चा-विमर्श कसा काय करु शकलो असतो? ईश्वराने मला संकेत दिला आणि त्याचे पालन करण्याशिवाय मजपाशी दुसरा कुठला उपाय उरला नव्हता. जेव्हा काळाची अखेरची हाक येईल ती कधी-ना-कधी एके दिवशी येईलच, येईल तेव्हा काय तुझ्याशी वा कुणा दुसऱ्याशी विचार-विमर्श करण्यासाठी थांबायला मला संधी असेल का?"[६५]

१० जानेवारी १९४०

बा, तुझे पत्र पोहोचले. प्रभाने पत्रातून सर्व समाचार कळवलेत. देवदासचे आजारी पडणे मला अजिबात न आवडल्याचे त्याला सांगशील म्हणजे तो किमान हिरतो-फिरतो ना? तो जर हिंडत-फिरत राहिला आणि वेळच्या वेळी भोजन घेतले तर आजारी पडणार नाही. तिथे तुझी जोवर गरज असेल तोवर तिथे थांबशील.[६६]

रेल्वे प्रवासातून लिहिलेले पत्र

१३ मार्च १९४०

बा, तुला सोडून येणे अजिबात आवडले नाही. सुशीला जसे सुचवील तसा आहार आणि औषध घे. मी तर प्रवासात खूप झोप काढली. स्टेशनांवर गोंधळ कमी होता. महिला आश्रमातल्या बारा-एक मुली सोबत आहेत. माझी काळजी करु नकोस. [६७]

२४ मार्च १९४१

बा, तू पत्र लिही वा कुणाकडून लिहवून घे. या पत्रासोबत कांतीचे एक पत्र आहे. पत्राच्या एका बाजूला त्याने तुझ्यासाठी व दुसऱ्या बाजूला माझ्यासाठी लिहिले आहे. मनुच्या बातम्या येत रहातात. तिला ऑपरेशन करावे लागेल असे वाटते. आणखी एका डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि ऑपरेशन करणे गरजेचे असेल तर करुन टाकावे. असे मी तर पत्रात लिहून टाकले आहे. असे करण्यात काही जोखिम नाही. तू काळजी करु नकोस. आता तू तिथे आहे.सच तर संपूर्ण उपचार करुन बरीच होऊन जा.

इकडे ऊन खूप आहे. माझी काळजी करु नकोस. सारे काही सुयोग्य चालले आहे. आहाराची काळजी सारी लीलावती (लीलावती आसर) जपते.

लक्ष्मी (देवदासची पत्नी) आणि लेकरांना आशीर्वाद! [६८]

१ एप्रिल १९४१

बा, तुझे पत्र मिळाले. तुला बरे होण्याला अवधी लागेल असे वाटते पण तू एकदम चांगली होणार असशील तर वेळ लागायलाही काही हरकत नाही. तू योग्य ठिकाणी आहे.स त्यामुळे मी काळजी करत नाही. इथे सारे ठीक आहे.[६९]

सेवाग्राम, वर्धाकडे जाताना लिहिलेले पत्र - ९ मे १९४१

बा, तुझे पत्र पोहोचले. उपवास बहात्तर तासांचा होता. (बहुधा हा उपवास दंगलींच्या संदर्भातला होता.) अजिबात त्रास झाला नाही. शक्ती परतून येत आहे. तू आजारी पडतेस तेव्हा काळजी वाटते. तू लवकर लवकर बरी होऊन जा. आता मी सारे काही खायला लागलो आहे. [७०]

मुंबईहून लिहिलेले पत्र

११ मे १९४२

बा, माझी तब्येत चांगली आहे. इकडे तिकडच्या सारखा उन्हाळा तर नसतोच. हो, उकाडा मात्र असतो. रात्री खूप गारवा होता. सारेच तुझी आठवण काढतात पण मला वाटते की तू तिथेच चांगली आहे.स. तुला इथे आजारी पडायला वेळ लागला नसता आणि जर तू आजारी पडली असतीस ना तर मग इथेच थांबून रहावे लागले असते. इतरांकडून सेवा करवून घ्यावी लागली असती ते वेगळेच.

भरपूर विश्रांती घे. वर्मांची अजून भेट झाली नाही. आज माझे मौन आहे.

रतिलालला बघावे. मी अठरा तारखेला परतेन असे समजावे. पुढचे देव जाणे.

बापूचे आशीर्वाद. [७१]

संदर्भ


१) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ३४७ -३४८;

२) गांधीजींनी कस्तुरबा यांना नडियादहून लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ४९७;

३) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड १४ पृष्ठ ४९९;

४) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ३९ पृष्ठ ४१२;

५) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४३ पृष्ठ ४२८;

६) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ४९ पृष्ठ १९३;

७) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५० पृष्ठ ४०१;

८) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५१ पृष्ठ ५४-५५;

९) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५५ पृष्ठ १४५;

१०) कित्ता पृष्ठ १७३;

११) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५० पृष्ठ २७५;

१२) कित्ता पृष्ठ ३१४;

१३) कित्ता पृष्ठ ४०१;

१४) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५६ पृष्ठ ३१६-३१७;

१५) कित्ता पृष्ठ ३३४;

१६) कित्ता पृष्ठ ३६४;

१७) कित्ता पृष्ठ ४१७;

१८) कित्ता पृष्ठ ४३७;

१९) कित्ता पृष्ठ ४७७;

२०) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ १-२;

२१) कित्ता पृष्ठ ३८ ते ४०;

२२) कित्ता पृष्ठ १३१;

२३) कित्ता पृष्ठ २११-२१३;

२४) कित्ता पृष्ठ २४५;

२५) कित्ता पृष्ठ २७८;

२६) कित्ता पृष्ठ २९३ ते २९५;

२७) कित्ता पृष्ठ ३१८;

२८) कित्ता पृष्ठ ३५०;

२९) कित्ता पृष्ठ ३८८;

३०) कित्ता पृष्ठ ४३७-४३८;

३१) कित्ता पृष्ठ ४८९-४९०;

३२) चंदनपुरहून लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५७ पृष्ठ ५१८ -५१९;

३३) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ५९ पृष्ठ ३८;

३४) कित्ता पृष्ठ ५२;

३५) कित्ता पृष्ठ ८९;

३६) कित्ता पृष्ठ १०१;

३७) कित्ता पृष्ठ १५१;

३८) कित्ता पृष्ठ १९६;

३९) कित्ता पृष्ठ २१६;

४०) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६१ पृष्ठ ३७०;

४१) कित्ता पृष्ठ ३८९;

४२) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६३ पृष्ठ ३७६;

४३) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६७ पृष्ठ ९६;
४४) संपूर्ण गांधी वाड्मय खंड ६८ पृष्ठ ४५९;
४५) कित्ता पृष्ठ ४७५;
४६) कित्ता पृष्ठ ४८४;
४७) कित्ता पृष्ठ ९;
४८) कित्ता पृष्ठ २३;
४९) कित्ता पृष्ठ ६०;
५०) कित्ता पृष्ठ ९५;
५१) कित्ता पृष्ठ ४०१;
५२) कित्ता पृष्ठ ४३२;
५३) कित्ता पृष्ठ ४३७;
५४) कित्ता पृष्ठ ४४३;
५५) कित्ता पृष्ठ ४४८;
५६) कित्ता पृष्ठ ४५२;
५७) कित्ता पृष्ठ ४६२;
५८) कित्ता पृष्ठ ४७१;
५९) कित्ता पृष्ठ ४७२;
६०) कित्ता पृष्ठ ४७५;
६१) कित्ता पृष्ठ ४८५;
६२) कित्ता पृष्ठ ४८८-४८९;
६३) कित्ता पृष्ठ ४९२;
६४) कित्ता पृष्ठ ४९५;
६५) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ६९ पृष्ठ २९;
६६) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७१ पृष्ठ ११९;
६७) कित्ता पृष्ठ ३७५;
६८) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७३ पृष्ठ ४४०;
६९) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७३ पृष्ठ ४५८;
७०) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७४ पृष्ठ ४९;
७१) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७६ पृष्ठ १११.

❖❖❖

## ५) कस्तुरबांनी लिहिलेली पत्रे

कस्तुरबाने हरीलालला लिहिलेले हे ऐतिहासिक पत्र!

"चिरंजीव हरी,

काही काळ लोटला आहे. तू दारू पिऊन धिंगाणा घालत होतास. मद्रासला मध्यरात्री तुला पोलिसांनी अटक केली. दुसऱ्या दिवशी तुला मॅजिस्ट्रेटपुढे हजर केले गेले. एक रुपया दंड ठोठावला गेला. ते भले गृहस्थ असतील. तुझ्यावर दया दाखवली. किरकोळ दंड केला. तुझ्या वडिलांची पुण्याई थोर. तुझ्याबाबत अपवाद केला. सद्भावना दाखवली. हे सारे मला तपशिलवारपणे कळले आहे. मला खूप यातना झाल्यात. तू त्या रात्री एकटा होतास की मित्रांसमवेत होतास? मला यातले काहीही माहित नाही. तुझे असे वागणे बरे नाही.

तुला काय सांगावे? कायच लिहावे? मला काहीही सुचत नाही. मी तुला अनेकदा सांगून पाहिले. सुचवून पाहिले. संयमाने वाग. जीवनावर अंकुश ठेव. तू दिवसेंदिवस अधिकच वहावत चाललास. आता तर मला जगणे असह्य वाटते. हरी, तुझे आई-वडिल आता म्हातारे झालेत बघ. त्यांच्या आयुष्याची आता सायंकाळ आहे. तू त्यांना किती छळावेस? याचा काही विचार कर.

तुझे वडिल मौन पाळतात. कुणासमोरही मन उघड करत नाहीत. त्यांना खूप झेलावे लागते. त्यांच्या मनाच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडतात. तू वारंवार आमच्या भावनांना पायदळी तुडवतोस. हे महान पाप आहे. तू आमच्या पोटी का आलास? असा का वागतोस रे तू वैऱ्यासारखा?

अलीकडे तर तू तुझ्या वडिलांवरही टीका करायला लागलास. तू कटू निंदा करतोस. असे मला कळले आहे. कानावर येते रे सारे. तू बुध्दिमान आहे.स. असे वागणे तुला शोभते तरी का? वडिलांची निंदा केल्यामुळे तुझीही निंदा होते हे का तुला कळत नाही? याचा तू विचार का करत नाहीस? तुझ्या वडिलांच्या मनात तुझ्याबद्दल अथांग प्रेम आहे. ते शुध्द चारित्र्याला मान देतात. हे तर तूही जाणतोस. तू मात्र या गोष्टीला आयुष्यात किंमत दिली नाहीस. एवढे असतानाही त्यांनी तुझे संगोपन केले. लालन-पालन केले. आपल्या सोबत राखले. अजुनही ते सारे काही करायला तयार आहेत. पण तू मात्र सदा कृतघ्न राहिलास. अरे, त्यांच्या डोक्यावर केवढ्या जबाबदाऱ्या आहेत. त्या काय तुला ठाऊक नाहीत? माझा विचार कर. मी तर एक दुबळी आई आहे. तू ज्या यातना देतोस त्या मला नाही सोसता येत. तुझ्या वडिलाना अनेकांची पत्रे येतात. तुझ्या अवलक्षणांची त्यात चर्चा असते. बदनामीचे हे कडू घोट त्यांना नाइलाजाने घशाखाली ढकलावे लागतात पण मला तर तू हिरा-फिरायला एकही जागा ठेवली नाहीस. मी कुठे जाऊ? कुणाला जाऊन भेटू? माझे दु:ख कुणाला सांगू? मला लाज वाटते. मी माझ्या गणगोतापाशी नाही जाऊ शकत. मित्राना नाही भेटू शकत. मला तोंड लपवावे लागते रे सारखे.

तू मद्रासला तर कुणा मातब्बर सज्जनाच्या घरी पाहुणा होतास ना? त्यांचे घर सोडलेस. रस्त्यावर उतरलास. दारु प्यालास. दुर्व्यवहार केलास. त्यांना काय वाटले असेल? त्यांना केवढी मानहानी झेलावी लागली असेल बाळा? अरे, रोज सूर्य उगवतो. नवा दिवस उगवतो. मी थरारुन उठते. आज तरी तुझे काही दुष्कर्म कानावर न पडो अशी देवाला प्रार्थना करते. तू कुठे रहात असशील? काय खात असशील? कुठे झोपत असशील? नाना विचार येतात. मला धडपणे झोपही येत नाही. अनेकदा तुला येऊन भेटावेसे वाटते पण तुझा पत्ता कोण सांगेल? तुला तरी तो येईल का सांगता? तू माझा थोरला आहे.स. तू आता पन्नास वर्षांचा झालास. मी तुझ्याकडे येईन. तू माझीच तर बेअब्रू नाही ना करणार हरी? ही भीती वाटतेय रे राजा.

तू आपल्या मूळ धर्माला बदललेस. धर्मांतर केलेस. का असे केले हे काही मला कळले नाही. हा तुझा खासगी प्रश्न आहे. तू निष्पाप लोकांना चुकीचा मार्ग दाखवतोस. अज्ञानी जनाना चुकीची वाट सुचवतोस. असे मी ऐकतेय. हे काही बरोबर नाही. तुला आपल्या मर्यादांचे भान केव्हा येईल? धर्माविषयी तुला कळते तरी काय? तुझ्या वडिलांचे मोठे नाव आहे. त्यांच्या प्रभावामुळे लोक तुझे म्हणणे ऐकतात. चुकीची वाट धरताहेत. अरे, तू का धर्मप्रचारक आहे.स? पैश्यांचा गुलाम आहे.स तू गुलाम. जे तुला पैसे देतात ते तुला चांगले वाटतात. तू सारा

पैसा दारुवर उडवतोस. सभेत जातोस. व्यासपीठावर चढतोस. भाषणे ठोकतोस. तू स्वत:चे हनन करतोस. आपल्या आत्म्याचा खून करतोस तू! तू जर हे असेच यापुढेही सुरु ठेवले ना तर एके दिवशी एकटा उरशील. एकाकी रहाशील. यामुळे मी तुझी आई तुला प्रार्थना करत आहे. तू सारा विचार शांततेने कर. मूर्खपणा सोड. मला तुझे धर्मांतर आवडलेले नाही. तू जीवन सुधारु इच्छित होतास. ते मला भावले. तुझ्या निवेदनाने माझे समाधान झाले होते. यापुढे तू शहाणा होशील. मला असे उगाच वाटत होते. मला मनोमन आनंद झाला होता. तो पुढे टिकू शकला नाही. माझ्या आशा तू धूळीला मिळवल्यास. काही काळापूर्वीच तू यापेक्षाही वाईट अवस्थेत आढळला होतास. तुझ्या मुंबईच्या जुन्या मित्रांनी मला सारे कळवले होते. माझ्या शुभचिंतकांनी कळवले होते. अरे, तुझ्या असल्या घाणेरड्या वागण्याने तुझ्या लेकरावर केवढे आघात होतात? हे तरी तुला ठाऊक आहे. काय? तुझे असे विचित्र वागणे. हरी, तुझ्या लेकराना काय वाटत असेल याचा तरी विचार कर. तुझ्या जावयांना काय वाटत असेल? अरे थोडा तरी विचार कर ना."

हरीचे काहींनी धर्मांतर करवले. यानंतर त्याची अवनती झाली. या सर्व मित्रांनी आनंद व्यक्त केला. या मित्रांना संबोधन करत कस्तुरबांनी लिहिले:

"मला तुमचे काम रुचले नाही. आज माझ्या मुलाची दयनीय अवस्था झाली आहे. ती ज्यांनी केली त्यांना उद्देशून हे लिहित आहे. विचारवंत मुसलमानांनी या घटनेची निंदा केली आहे. हे मला माहित आहे. आमच्या मुस्लिम मित्रांनीही निंदा केली आहे. आज महापुरुष डॉ. अन्सारी यांची मला खूप आठवण येते. ते जर आज असते तर त्यांनी माझ्या लेकराला योग्य वाट दाखवली असती. तुम्हा सर्वांना नेकीचा मार्ग दाखवला असता. आज ते नाहीत. तरी अनेक भले लोक आहेत. प्रतिष्ठित जन आहेत. त्यांनी तुम्हाला योग्य वाट दाखवावी अशी मी उमेद करत आहे. हे खरे तर तथाकथित धर्मांतर झाले. यामुळे माझा मुलगा काही सुधारला नाही. उलट अधिक वाहवत गेला. वाईट कामे करु लागला. त्याच्या कुकर्मांबद्दल आपण त्याला ठपका द्यावा. त्याला जाब विचारावा. चांगल्या मार्गावर आणावे. काही लोकांनी तर हद्द केली. माझ्या मुलाला ते मौलवी असे म्हणतात. हे का योग्य आहे.? एखाद्या दारुड्याला का मौलवी म्हणावे? तुमचा धर्म याला मान्यता देतो का? मद्रासला कशी अपमानित करणारी घटना घडली. काही मुसलमान मित्र त्याचा गौरव करण्यासाठी जमले होते. हे का बरोबर आहे.? हे काय आहे. सगळे?

अशाप्रकारे तुम्ही त्याला मोठेपणा देता. हे चुकीचे आहे. यात तुम्हाला कुठला आनंद मिळतो? हे काही मला कळत नाही. तो तुमचा खरा भाऊ आहे. ना? तुम्ही त्याला खरोखरच आपला मानता ना? मग असा कसा व्यवहार करता? असे कसे वागता? तुमचेहे असे वागणे त्याच्यासाठी अजिबात हिताचे नाही. तुम्हाला आमची थट्टाच मांडायची असेल तर .. .. .. तर मग मी अधिक काय लिहू? काय सांगू? तुम्हाला जमेल तसे करा पण ही एका घायाळ मातेची हाक आहे. ती ऐका. कदाचित तुमच्यापैकी काहींच्या तरी कानावर ही पडेल. ही हाक तुमच्या अंत:करणाला जागे करील. अशी मला आशा वाटते. कदाचित ते लोक तरी तुमची काही समजूत घालू शकतील. मी माझ्या मुलाला जे काही सांगत आहे. तेच तुम्हालाही सांगत आहे. तुमचे हे असे वागणे खुदाला आवडणार नाही."[१]

सेवाग्राममध्ये वनमाला परीख महादेवभाई देसाई यांच्या काही पत्रांची नक्कल करत होत्या. त्या दरम्यान एक पत्र त्यांच्या हाती लागले. गांधीजींच्या परवानगीने त्यांनी हे पत्र आपल्या 'आपल्या बा' या ग्रंथात प्रकाशित केले आहे. पत्र मूळात गुजराती भाषेत आहे. पत्र पुढीलप्रमाणे आहे -

शुक्रवार

अखंड सौभाग्यवती लीलावती, तुमचे पत्र मला खूप खटकत रहात आहे. तुमच्या-माझ्यात तर कधी चर्चेची वा गप्पांची खूप संधीही लाभली नाही मग गांधीजी मला खूप दु:ख देतात, हे तुम्ही कसे काय जाणून घेतले? माझा चेहरा नाराज असतो. मला धडपणे खाताही येत नाही. हे सारे का तुम्ही कधी बघायला आला होतात? माझ्या पतीसारखा पती तर जगात कुणाही स्त्रीचा

नसेल. सत्याच्या प्रभावामुळे ते जगभर पूजनीय आहेत. हजारो त्यांचा सल्ला घ्यायला येतात. ते हजारोंना सल्ला देतात. कधी, कुठल्याही दिवशी त्यांनी माझी चूक वा दोष काढलेला नाही. मी लांबवरचा विचार करु शकत नसेल, माझा दृष्टिकोण संकुचित असेल तर मला समजाऊन सांगतात की अग, असे तर जगभर सर्वत्र चालतच असते. गांधीजी वृत्तपत्रांमधून चर्चा करतात. माझ्या नवऱ्यामुळेच तर मी जगात वंदनीय आहे. माझ्या नातलगांमध्ये खूप प्रेम भावना आहे. मित्र परिवारात मला मोठा मान-सन्मान लाभतो. तुम्ही माझ्यावर खोटा आरोप लादताहात. हा कुणीही मानणार नाही. मी काही तुमच्यासारखी आजच्या काळातली नाही. खूप स्वातंत्र्य घ्यावे. पती जर तुमच्या ताब्यात राहिले तर उत्तमच अन्यथा तुमचा व माझा मार्ग भिन्न आहे. पण सनातनी हिंदूला हे काही शोभून दिसणारे नाही.[२]

आगाखान महालमधून कस्तुरबांनी लिहिलेली पत्रे

२६ मे १९४३

चि. काशी,

तुझी दोन्ही पोस्टकार्ड्स मिळालीत. वाचून आनंद वाटला. तुझे पत्र नियमित असते. वाचून खूपच आनंद होतो. १४ तारखेचे पत्र अगदी आज पोहोचले म्हणजे पत्र खूप उशिरा पोहोचतात. तिकडे सारे मजेत हे जाणून आनंद वाटला. किशोरलालभाईची तब्येत चांगली आहे. ही एक खूष होण्यासारखी बातमी आहे. यापूर्वीचे माझी स्वाक्षरी असलेले पत्र तुला मिळाले ना?

आर्यनायकमजी नागपुरहून येऊन गेले आहेत., त्यामुळे त्यांना व आशादेवींना माझे आशीर्वाद. पत्र लिहिशील तर प्रभू आणि अंबा यांना माझे आशीर्वाद कळवशील. काल लक्ष्मीचे पत्र होते. कधी-कधी अंबाचे पत्र येत असल्याचे लिहिले आहे. बाकी इथे सारे मजेत. माझी तब्येत चांगली आहे. माझी काळजी करु नकोस. तुझी तब्येत बरी असेल? बचू मजेत असेल. इथे प्रार्थनेच्या वेळी तुम्हा सर्वांची खूप आठवण येते. चि. कहाना काय लिहित रहातो? भाज्या तर सारेच थोड्या-थोड्या चिरुन देतात. थोडी तूही चिरुन दे म्हणावे. भंसाळीभाईसोबत अभ्यास करतो की नाही? सुतारकाम करायला जातो की नाही? तसे माझी राख तर जाईल पण मी कशी काय जाऊ? सर्वांशी मिळून मिसळून रहायला कहानाला सांगशील. लीलावतीला म्हणावे की तिचा निरोप मिळाला आहे. तिला जे बरे वाटेल ते कर म्हणावे. तू शाळेत भरती होऊन जावेस असे मला तर वाटते. ही तर लांबलचक वाट आहे. छगनलालला आशीर्वाद. लीलावती, गोमतीबेन, आनंद, बचू वगैरे सर्वांना आणि तमाम आश्रमवासींना माझे आशीर्वाद. कृष्णचंद्रजी, जमेल तसे कहानाला व्यवस्थित राखावे. एवढे करुन त्याला आवडत नसेल तर पाठवून द्यावे. नागपुरला सर्व भगिनींसाठी आशीर्वाद लिही.

बाचे शुभ आशीर्वाद, बापूजींचे शुभ आशीर्वाद.

२ ऑगस्ट १९४३

चि. काशी,

तुझे पत्र पोहोचले होते. वाचून आनंद झाला. तिथे सारे मजेत जाणून आनंद वाटला. बचू, आनंद सारे धमाल करत असतील. पाऊस तर इकडे खूप आहे. तसा तो तिकडेही असेल. काठियावाडमध्ये तर चांगला पाऊस झाला. पत्र लिहिशील तर दुर्गा, बाबला (महादेवभाई देसाइंर्ची पत्नी व मुलगा) आणि इतर सर्वांना माझे आशीर्वाद लिही. छगनलालला आशीर्वाद. दूधई तुमच्यासारखीच आमच्याकडेही भरपूर होते. चि. मनू मजेत आहे. माझी आणि बापूजींची तब्येत चांगली आहे. मला खोकला येतो, बाकी सारे ठीक आहे. खंडू आहे. की गेला? मणीबाई आहे. की नाही? काल शंकरचे पत्र होते. लीलावती गेली. स्वयंपाकाचे कोण बघतो? आजची अमावस्या. उद्यापासून श्रावण महिना लागेल. श्रावण सण-उत्सवांचा महिना. पुढच्या रविवारी ‘वीर पसली’ आहे. (रक्षा पौर्णिमेच्या आधीच्या कुठल्यातरी रविवारी हा उत्सव साजरा होतो. या दिवशी भाऊ बहिणीला काहीतरी भेट देतो.) तुरुंगात सर्वांना आशीर्वाद. आता तर लीलावतीशिवाय सूने वाटत असणार?

विनोबाची पत्रे कधी-कधी येतात. बाळकोबाला आशीर्वाद. बस पुरे- एवढेच.

बा आणि बापूजींचे आशीर्वाद.

९ ऑगस्ट १९४३

चि. काशी,

दिनांक २२ जुलै १९४३ चे तुझे पत्र पोहोचले. वाचून आनंद वाटला. सध्याचे हवामान बघू जाता माझी तब्येत चांगली आहे. खोकला येतो. दुर्गाचे समाचार कळले. तिथे सारे मजेत हे कळून आनंद वाटला. तिला, बाबलाला आणि इतर सर्वांनाही माझे आशीर्वाद. तसे मला तर वाटते की तिला सेवाग्राममध्ये रहायला रुचणार नाही म्हणून ती तिथेच राहील. जिथे कुठे का राहीना, सुखात राहिली म्हणजे मिळवले. सावित्री परत मंदिरात (तुरुंगात) गेली असे आम्ही ऐकले होते. आश्रमात सर्वांना आशीर्वाद. दुसरे असे की माझे पेटी उघडशील त्यात चार पाच साड्या आहेत. त्यात काळ्या काठच्या दोन साड्या आणि चार गज कापडाचा तुकडा आत्याला पाठवून देशील. दुसऱ्या लाल काठाच्या दोन साड्या आहेत. त्या रामी आणि मनूला एक-एक पाठवून देशील. माझ्या पेटीत गोरखपूरची मोठी गीता आहे. आणि आलमारीत लाल काठची सूती चादर आहे. ती शांतिकुमारकडे पाठवून दे, तो हे सारे इकडे पाठवून देईल. आता बापूजींचा वाढदिवस येईल. यामुळे आत्यांना आणि मुलींना काही देण्याची माझी इच्छा आहे. म्हणून हे लिहिले आहे. एक खाकी रंगाचे कापड आहे. ते रामीला दे. याशिवाय माझी काही जाकिटे असतील आणि तुला ती देण्यासारखी वाटत असतील तर देऊन टाक. लाल काठचे जाकीट रामीला दे. माझा पूर्ण बाह्यांचा आकाशी रंगाचा स्वेटर आहे., तेवढा मला पाठवून दे. डॉ. मनुभाई आणि हीराबेनला आशीर्वाद. आज तर 'वीर पसली' आहे. तुम्हीही साजरी केली असेल.

बा आणि बापूजींचे आशीर्वाद.

१९४३ सालच्या उन्हाळ्यात मणीलालला काही कायदेशीर आणि काही राजकीय प्रश्नांचा मुकाबला करावा लागला होता. त्याने लिहिलेल्या काही संपादकीयांवरुन हे वादळ निर्माण झाले होते. या संदर्भात कस्तुरबाने एका पत्रातून लिहिले होते. 'अलीकडे तुला धमकी देण्यात आल्याचे समजले. काळजी वाटते. तू शूर आहे.स. अधिक काय लिहू?' मणीलाल त्यावेळी फिनिक्स वसाहतीत नवे घर उभारत होता. हे पत्र कस्तुरबाने आपल्या सुनेला लिहिले आहे.

"प्रिय सुशीला,

आम्हाला निकालाबद्दल कळले. या प्रकरणात हार झाली असली तरी मन खंबीर ठेव. तू धैर्याने तोंड देत असशील आणि तुझ्या भोवतालचे लोक मणीला सर्वतोपरी पाठिंबा देत असतील, अशी आशा आहे. प्रकाशकाच्या दृष्टिने यात काही नवीन नाही, असे यांचे म्हणणे आहे.

या प्रकरणामुळे मणी दुखावला असेल. मला अवश्य लिही. यामुळे तुझा खर्च वाढतो आहे. याची मला चिंता आहे. वर्तमानपत्राच्या इमारतीत टाकलेली भर आणि नव्या घराचे बांधकाम यामुळे खर्च आधीच वाढलेला आहे. तुलाही खूप सहन करावे लागले असेल पण तू समजूतदार आहे.स. तुझी मणीला चांगली मदत होत असणार.. .."

तुम्हा सर्वांना आम्हा उभयतांचे आशीर्वाद.

कस्तुरबाने नात जावयांना लिहिलेले पत्र -

९ ऑगस्ट १९४३

चि. कुंवरजी, (रामीचे यजमान)

बरेच दिवस लोटले. तुम्हाला मी पत्र लिहिले नाही. मनूला पत्र लिहिले. ते तुम्हाला पोहोचते आणि तुम्हाला बातमी कळते असे वाटते. कांती मुंबईला होता तेव्हा त्याचे पत्र होते पण त्याच्या कॉलेजविषयी काही तजवीज होऊ शकली नाही. आता मद्रास येथे राजाजींमार्फत व्यवस्था करवत आहे. तुम्हाला काही कळले तर मला कळवा. मनुचे तर बऱ्याच दिवसांपासून पत्र नाही. बलिताई तर आता राजकोटला गेल्या असतील. कमूची तब्येत बरी असेल, कामाला लागली असेल. मनु आणि पुष्पा दोघी सोबत रहातात की स्वतंत्र रहातात, ते कळवावे. आधी वेगळ्या होत्या. आपल्या वडिलांकडे त्या रहात. असे सारे होते. आता सारे तपशिलवारपणे कळवा. आता तर तुमची तब्येत चांगली असेल. लेकरे शिकायला

जात असतील. सारे मजेत असतील. सध्या महागाई कोण वाढली आहे. ईश्वर राखेल तसे रहावे, दुसरे काय? रामीची तब्येत कशी असते? काशी, रामदास वगैरे सर्वांची पत्रे नियमितपणे येतात. एक मनू आणि दुसरे तुम्ही. तुमची काही नियमित पत्रे येत नाहीत. मामांची कधी भेट होते का? तुम्ही तर झंडू फॉर्ममध्येच नोकरी करता ना? मामाचे काही कधी मला पत्र येत नाही. तुम्ही तपास करुन कळवाल. मनू, बेबी, सुरेंद्र, रामी, लेकरे सर्वांना माझे शुभाशीष कळवावेत. तुमची तब्येत कशी असते? तुमच्या मातुश्रींची तब्येत चांगली असेल. चि. मनू तुम्हाला व रामीला प्रणाम लिहायला सांगते, इकडे सारेच छान आहेत. गोसीताईंनी मला पाठवलेली साडी पोहोचली आहे. बाकी इकडचे काही विशेष समाचार नाहीत. कांती असेत तर त्याला आशीर्वाद (कळवावेत.) त्याला पत्र लिहायला सांगाल तसेच तुम्हाला हरीलालची काही माहिती असल्यास मला कळवाल आणि मला पत्र लिहायला त्यालाही सांगाल. तब्येत कशी?

शीघ्र पत्र द्यावे.

बा तथा बापूंचे तुम्हा सर्वांना शुभाशीष.

कस्तुरबाचे हरीलालला पत्र

७ फेब्रुवारी १९४४

चि. हरीलाल,

तुझे पत्र मिळाले. वाचून आनंद झाला. तुला पत्र लिहवून घेताना उशीर होत आहे.

माझी तब्येत आहे. तशीच आहे. तू काळजी करु नकोस. तिथे किती काळ राहणार आहे.स? मनू, रामी, कुंवरजी - लेकरांना माझे आशीर्वाद.

तुम्हा सर्वांना बाचे आशीर्वाद.

संदर्भ

१) कस्तुरबाने हरीलालला दिनांक २७ सप्टेंबर १९३६ रोजी लिहिलेले पत्र;

२) अमारी बा: (मूळ गुजराती) वनमाला परीख आणि सुशीला नायर हिंदी अनुवाद श्री काशिनाथ त्रिवेदी पृष्ठ १५-१६

❖❖❖

### ६) कस्तुरबांच्या आजारपणात तुरुंग अधिकारी यांच्याशी झालेला गांधीजींचा पत्र-व्यवहार - गांधीजींनी भारत सरकारला लिहिलेले पत्र-

२७ जानेवारी १९४४

"काही दिवसांपूर्वी कस्तुरबांनी जेलचे इन्स्पक्टेर जनरल आणि कर्नल शाह यांना सांगितले की पुणे येथील डॉ. दिनशा मेहता यांना उपचारासाठी बोलावण्यात यावे. तिच्या या विनंतीचा काहीही उपयोग झाला नाही. ती सातत्याने मला विचारत रहात आहे. की याविषयी मी सरकारला काही लिहिले की नाही? यामुळे मी डॉ. मेहताना त्वरित बोलावण्यात यावे, अशी विनंती करत आहे. तिने मला आणि तिच्या मुलालाही सूचित केले आहे. की तिला आयुर्वेदिक औषधौपचाराची सोय करण्यात यावी. आय्. पी. जी. अशा प्रकारे विनंती केल्यावर सोय करुन देऊ शकतात. ही विनंती अर्जंट मानली जावी. किमान तीन मदतनीस डॉक्टर्स हवेत."[१]

मुंबईच्या जेल महानिरीक्षकांना लिहिलेले पत्र

१४ फेब्रुवारी १९४४

"जेल महानिरीक्षक, पुणे

महोदय,

काल मी आपणास सांगितले होते की रात्री कस्तुरबांची तब्येत इतकी बिघडली होती की डॉ. नायर यांनी घाबरुन डॉ. गिल्डर यांना उठवले. मला तर वाटले की त्यांचा अंत जवळ येऊन ठेपला आहे. स्वभावतः दोघे डॉक्टर लाचार होते यामुळे डॉ. नायर यांना अधीक्षक महोदयांना उठवावे लागले. त्यांनी कृपापूर्वक वैद्यराजाना फोन केला, त्यावेळी रात्रीचा जवळपास एक वाजत होता. ते जर इथे महालात असते तर काही आराम अवश्य पोहोचवू शकले असते. यामुळे रात्री त्यांना कँपातच राहू देण्याविषयी मी आपणास अनुरोध केला होता पण आपण मला सांगितले की सरकारी आदेशात त्यांना रात्री इथे थांबू देण्याची चर्चा नाही तरीही रात्री त्यांना बोलावले जाऊ शकते. मी आपले लक्ष उशीर झाल्यामुळे संभवणाऱ्या धोक्याकडे आकृष्ट केले पण आपण खेद व्यक्त केला की आदेशानुसार आपण याहून अधिक काही करु शकत नाही. मी असेही निवेदन केले होते की सरकारने जेव्हा वैद्यराजांना बोलवायचा अधिकार या अटीवर दिला होता की आयुर्वेदिक उपचार कुठल्याही दुष्परिणामाच्या जबाबदारीतून मी सरकारला मुक्त मानीन अशा परिस्थितीत पेशंटच्या हितासाठी आवश्यक वाटेल तोवर चिकित्सकाला थांबता यावे यावर सरकारच्या मनात कुठलाही प्रतिबंध लादायचा विचार येणार नाही पण माझा हा तर्कही वाया गेला. आपण जेव्हा माझ्या अनुरोधाला ठोकरले तेव्हा वैद्यराजांनी जेलच्या गेटच्या बाहेर आपल्या कारमध्ये विश्रांती घ्यावी म्हणजे गरज भासल्यावर त्यांना बोलावले जाऊ शकेल असा त्रास मला वैद्यराजाना द्यावा लागला. त्यांनी दयाभावनेने हा त्रास मान्य करुन घेतला. त्यांना बोलवायची गरज भासली ते रुग्णाला आवश्यक तो आरामही देऊ शकले. संकटाची घडी अजून टळली नाही. यामुळे मी परत अनुरोध करुन त्वरित आराम मिळावा अशी मागणी करत आहे. शक्य झाले तर मी काल रात्रीच्या अनुभवापासून स्वत:ला वाचवू इच्छितो. रुग्णाच्या उपचाराशी संबंधित मी अनुरोध केला आहे. त्याला विलंब होतो. यामुळे रुग्णाला त्रास संभवतो. त्या त्रासाचा आता शेवट व्हावा. असे मी चाहतो. डॉ. मेहता व वैद्यराज दोघाना खूप विलंबानंतरच इथे येऊ दिले आहे. मौल्यवान वेळ घालवला आहे. यामुळे रुग्णाच्या स्वस्थ होण्याची शक्यता आधीपेक्षा अधिक अनिश्चित झाली आहे. रुग्णाची अवस्था बघू जाता गरज भासल्यास वैद्यजी रात्री कँपात थांबू शकतील. असा अधिकार आपण संपादन करु शकाल अशी मला आशा वाटते. रुग्णाला अखंड उपचाराची गरज आहे.

आपला, मो. क. गांधी[२]

दुसऱ्या दिवशी तातडीचे पत्र लिहिले ते पुढीलप्रमाणे आहे

१६ फेब्रुवारी १९४४

"(त्वरित) जेल-महानिरीक्षक, पुणे

महोदय,

मी (माझ्या १४ फेब्रुवारी १९४४ च्या क्रमात त्याला अनुषंगून) हे पत्र लिहित आहे.

मी जेव्हा वैद्यराजांची मागणी केली होती व श्रीमती कस्तुरबांचा उपचार बदलून घेण्याची सारी जबाबदारी स्वत:वर घेतली होती आणि सरकारी चिकित्सकाला हर प्रकारच्या जबाबदारीतून मुक्त करुन दिले होते त्यावेळी मी स्वाभाविकपणे असे गृहित धरुन चाललो होतो की या उपचारात वैद्यराज आवश्यक त्या सोयी रुग्णाला उपलब्ध करुन देऊ शकतील. रुग्णाला दिवसापेक्षा रात्री खूप अधिक त्रास होतो आणि खरे रात्रीतूनच त्यांना उपचाराची अधिक गरज भासते. वर्तमान परिस्थितीत त्यांना उपचारासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध नाहीत असे वैद्यराजाना वाटते.

हाक मारताच धावत पोहोचता यावे, या दृष्टीने वैद्यराज गेल्या तीन दिवसांपासून रात्रीच्या वेळी या कँपच्या फाटकाच्या बाहेर आपल्या कारमध्येच झोपी जातात आणि दर रात्री त्यांना किमान एकदा तरी बोलवावे लागले आहे. ही अतिशय अस्वाभाविक आणि अयोग्य अशी स्थिती आहे. आणि रुग्णासाठी वैद्यराजांच्या ठायी स्वत: गैरसोय सहन करुन घेण्याची अपार क्षमता दिसून येत असली तरी त्यांच्या या औदार्याचा अयोग्य लाभ उठवणे मला उचित वाटत नाही. याशिवाय यामुळे अधीक्षक महोदय आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या झोपेत (खरे तर संपूर्ण कँपच्याच झोपेत) एकदा वा अधिकवेळा व्यत्यय येतो, गैरसोय निर्माण होते. उदाहरणार्थ काल रात्री श्रीमती गांधींना अचानक हुडहुडी भरुन ताप आला. रात्री साडे दहा वाजता रुग्णाला बघून बाहेर पडलेल्या वैद्यराजाना जवळपास मध्यरात्री परत बोलवावे लागले होते. ते तर रुग्णासोबत आणखी अधिक काळ राहू इच्छित होते पण त्यांनी शीघ्र बाहेर पडावे असे मला त्यांना सांगावे लागले कारण की ते जेवढा काळ इथे थांबले असते तेवढा काळ अधीक्षक महोदय आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनाही जागते राहावे लागले असते - यामुळे कदाचित संपूर्ण रात्रच व्यतीत झाली असती आणि असे मी स्वत:च्या जीवनसंगिनीलाही वाचवण्यासाठी करु इच्छित नाही. विशेषत: याचा एक मानवोचित उपायही आहे. हे मी जाणत असल्यामुळे खास करुन असे करु इच्छित नाही.

वैद्यराज रुग्णाची देखभाल अखंडपणे करु इच्छिताहेत हे मी यापूर्वीही सांगून चुकलो आहे. ते रुग्णाच्या परिस्थितीनुसार क्षण प्रतिक्षणी औषध बदलत असतात. डॉ. गिल्डर आणि डॉ. नायर यांची सेवा मला प्रतिक्षणी उपलब्ध आहे. कारण की ते मित्रांहूनही अधिक आहेत. आणि रुग्णासाठी यथाशक्य ते सारे काही करायला सिध्द असतात पण मी मागील पत्रात लिहिले आहे. की त्यांच्या चिकित्सा पध्दतीहून अगदी वेगळी अशी उपचार पध्दत चालू असताना ते काही करु शकत नाही. त्यांचे तसे करणे खरे म्हणजे अव्यवहारिक तर आहे.च शिवाय रुग्ण, वैद्यराज आणि अगदी स्वत:वरही अन्यायकारक ठरेल.

यामुळे मी पुढील तीन पर्यायी सल्ले मांडत आहे. -

१) रुग्णाच्या दृष्टीने जेवढा काळ आवश्यक वाटतो तेवढा काळ वैद्यराजांना रात्रं-दिवस कँपात रहायला परवानगी मिळावी.

२) असे करण्यास सरकारची सहमती नसेल तर रुग्णाची पॅरोलवर सुटका करण्यात यावी जेणेकरुन ते वैद्याच्या उपचाराचा परिपूर्ण लाभ मिळवू शकतील.

३) सरकारला जर वरीलपैकी कुठलाही प्रस्ताव स्वीकार्य वाटत नसेल तर मला रुग्णाच्या देखभालीच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात यावे, असा माझा अनुरोध आहे. पती म्हणून तिला अपेक्षित असलेल्या वा मी आवश्यक मानत असलेल्या मदती मी तिच्यासाठी प्राप्त करुन देऊ शकत नसेल तर मला सरकारने आपल्या आवडीच्या कुणा वेगळ्या तुरुंगात धाडावे असा अनुरोध मी करत आहे. रुग्ण जे भयंकर कष्ट झेलत आहे. त्याचा निरुपाय प्रेक्षक बनून रहायला मला भाग पाडू नये.

रुग्णाने वारंवार अनुरोध केल्यावर सरकारने कृपापूर्वक डॉ. मेहताना तिला बघायला यायची अनुमती दिलेली आहे. त्यांचे सहाय्य तर बहुमूल्य आहे. पण ते औषध देत नाहीत. डॉ. मेहता जो शरीरावर उपचार करतात त्याची रुग्णाला गरज आहे. आणि या उपचारामुळे बराचसा आरामही मिळतो पण औषधांशिवाय काही उपाय नाही आणि औषधे तर डॉक्टर वा वैद्यराजच देऊ शकतात, डॉक्टरी उपाय तर आधीच थांबलेला आहे. या पत्राचे सायंकाळपर्यंत जर समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर मला वैद्यराजांचे उपचारही थांबवून द्यावे लागलीत. रुग्णाला ज्या औषधोपचाराची गरज

आहे. ते जर परिपूर्णतेने मिळत नसतील तर ते अजिबात बंद करणे मला इष्ट वाटते.

हे पत्र मी रात्री दोन वाजता रुग्णाच्या निकट बसून लिहित आहे. रुग्ण जीवन-मरणाच्या हिंदोळ्यावर झुलत आहे. तिला या पत्राची मुळीच कल्पना नाही, हे वेगळे सांगायला नको. आता ती स्वत: कुठला निर्णय घ्यायच्या स्थितीत राहिलेली नाही."[३]

परत दोन दिवसांनंतर गांधीजींनी जेल अधिक्षकांना लिहिले -

१८ फेब्रुवारी १९४४

"जेल-महानिरीक्षक, पुणे

महोदय,

वैद्यराज श्री शिव शर्मा यांनी अत्यंत खेदाने मला सूचना दिली आहे. की त्यांनी आपल्या सामर्थ्यानुसार सारे उपाय केले आहेत. तरीही श्रीमती कस्तुरबांच्या तब्येतीला आराम वाटेल अशी आशादायक परिस्थिती दर्शवणारी सुधारणा आणण्याकामी ते असमर्थ ठरले आहेत. वैद्यराजांचा उपाय तर केवळ हे बघण्यासाठी होता की आयुर्वेदिक उपचारांनी काही अधिक लाभ पोहोचवणे शक्य आहे. की नाही? यामुळे मी आता डॉ. गिल्डर आणि डॉ. नायर यांना पुनरपि आपले स्थगित केलेले उपचार पुनश्च सुरु करायला सांगितले आहे. डॉ. मेहता यांची मदत तर सदासर्वकाळ सुरु आहे.च आणि पुढेही रुग्णाच्या स्वास्थ्यलाभासाठी वा मरण येईपर्यंत चालत राहील.

मी असे सांगू इच्छितो की वैद्यराजांनी अथक परिश्रम आणि दक्षतेने या अतिशय दुर्धर आजाराचा उपचार केला आहे. आणि ते जर चाहत असते तर मी त्यांना सहर्ष त्यांचे उपचार सुरु ठेऊ दिले असते पण आपल्या या उपचारांचा अपेक्षित परिणाम न मिळताना बघून आता उपचार जारी राखणे त्यांना इष्ट वाटत नाही. डॉ. गिल्डर आणि डॉ. नायर यांनी मला सांगितले आहे. की ते शामक, रेचक वगैरे औषधांच्या संदर्भात वैद्यराजांचे सहाय्य घेऊ इच्छितात. डॉक्टर्स आणि रुग्ण उभयतांच्या दृष्टीने ही औषधे फायदेशीर ठरली आहेत. यासाठी वैद्यराजांच्या इथल्या आगमनाविषयी सरकारला काही हरकत उरणार नाही. या बदलत्या परिस्थितीत वैद्यराजांना रात्रीतून इकडे येण्याची आवश्यकता उरणार नाही. मला हे दु:खाने कळवावे लागत आहे. की वैद्यराज आणि डॉ. मेहता यांच्या सेवा प्राप्त करण्याच्या माझ्या अनुरोधाचा स्वीकार करण्याकामी जर अनावश्यक विलंब लावला गेला नसता तर रोगिणीची अवस्था आज जितकी बिघडली आहे., तितकी बिघडली नसती. ईश्वरी इच्छेशिवाय काहीही होत नाही पण माणूस आपल्या डोळ्यांनी जो परिणाम बघतो त्याशिवाय ईश्वरेच्छेचा अर्थ लावण्याचा त्याच्यापाशी दुसरा काही उपाय नसतो हे मी चांगल्या प्रकारे जाणतो.[४]

संदर्भ


१) गांधीजींनी भारत सरकारला दिनांक २७ जानेवारी १९४४ रोजी लिहिलेले पत्र 'गांधीज कॉरस्पाँड्स विथ द गवर्नमेंट';

२) गांधीजींनी मुंबईच्या जेल महानिरीक्षकांना दिनांक १४ फेब्रुवारी १९४४ रोजी लिहिलेले पत्र;

३) गांधीजींनी मुंबईच्या जेल महा-निरीक्षकाला दिनांक १६ फेब्रुवारी १९४४ रोजी नजरबंदी कँपातून लिहिलेले गांधींचे पत्र;

४) गांधीजींनी मुंबईच्या जेल महानिरीक्षकांना नजरबंदी कँपातून दिनांक १८ फेब्रुवारी १९४४ लिहिलेले पत्र.


❖❖❖

## ७) कस्तुरबांच्या निधनानंतर भारत सरकारशी झालेला गांधीजींचा पत्र-व्यवहार

कस्तुरबांच्या निधनानंतर त्यांच्या अंतिम संस्काराविषयी गांधीजींनी सरकारला निवेदन केले.

२२ फेब्रुवारी १९४४

१) प्रेत माझ्या पुत्रांना व नातलगांना सोपवून देण्यात यावे. याचा अर्थ असा आहे. की अंत्यसंस्कार सार्वजनिकरित्या व्हावा यात सरकारकडून कुठलाही हस्तक्षेप केला जाऊ नये.

२) असे करणे जर शक्य नसेल तर महादेव देसाई यांच्या अंत्य-संस्काराप्रमाणे केला जावा. दाह-संस्कार समयी केवळ नातलगांनाच उपस्थित राहू दिले जाणार असेल तर माझ्यासाठी नातलगतुल्य असणाऱ्या तमाम मित्रांना जर उपस्थित राहू देणार असाल तर मी या कृपेचा स्वीकार करीन.

३) सरकारला जर हेही मान्य नसेल तर ज्या लोकांना कस्तुरबांना बघण्यासाठी परवानगी दिली होती त्या सर्वांना मी परत पाठवीन आणि केवळ कँपनिवासी (नजरबंद लोक) जनच अंत्यसंस्कार प्रसंगी उपस्थित राहतील.

मी या बाबीसाठी खूप चिंताग्रस्त आहे. माझ्या जीवन-संगिनीच्या या अतिशय दुर्धर आजाराचा मी कुठलाही राजकीय लाभ उठवू इच्छित नाही, याचे आपणही भलेपणाने साक्षीदार आहात. सरकारला जे काही करायचे आहे. ते सरकारने अत्यंत शालीनतापूर्वक करावे. एथवर शालीनतेचा अभाव असल्याचे सांगावे लागते. आता रुग्णाच्या देहांतानंतर अंत्यसंस्काराविषयी सरकार जो काही निर्णय घेईल तो शालीनतेने घेईल अशी आशा करणे काही खूप मोठे मागणे ठरु नये. [१]

गांधीजींनी भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवाना लिहिले. "अतिरिक्त सचिव भारत सरकार (गृह-विभाग)

४ मार्च १९४४

नवी दिल्ली,

महोदय,

माझ्या दिवंगत पत्नीच्या संदर्भात हे पत्र लिहिताना मला खेद आणि संकोच होत आहे. तरीही सत्याचा आग्रह असल्यामुळे मी हे पत्र लिहित आहे.

वृत्तपत्रीय बातम्यांच्या अनुसार शिक्षण बोर्डाचे अध्यक्ष आर्. ए. बटलर यांनी २ मार्च १९४४ रोजी कॉमन्स सभेत सरकार मार्फत श्रीमती कस्तुरबा गांधींच्या निधनाबद्दल दु:ख प्रकट करताना म्हटले आहे. -

'त्यांना (कस्तुरबांना) त्यांच्या नियमित परिचारकांच्याद्वारेच नव्हे पण त्यांच्या कुटुंबियांनी ज्या लोकांची मागणी केली त्या सर्व लोकांच्या हातून शक्य ती चिकित्सा आणि सुश्रूषेच्या सोयी मिळत होत्या'

मी हे म्हणणे कृतज्ञतापूर्व स्वीकार करीत आहे. की त्यांची नियमित परिचर्या करणाऱ्या लोकांनी यथाशक्य ते सारे केले पण हेही सांगू इच्छितो की दिवंगताला माझ्या मागणीवरुन जर कुठली मदत मिळाली होती ती सुध्दा खूप प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मिळाली. मी तुरुंग अधिकाऱ्यांना हे स्पष्टपणे कळवून टाकले होते की रुग्णाला जर तिच्या इच्छेनुसार वा माझ्या आवश्यकतेनुसार उपचार देऊ शकत नसाल तर मला त्यांच्यापासून दूर पाठवले जावे. त्यांच्या दारुण त्रासाचा निरुपाय प्रेक्षक बनवला जाऊ नये. जेल महानिरीक्षकांना एक पत्र पाठवल्यानंतरच आयुर्वेदिक चिकित्सकाला यायची परवानगी दिली गेली. तेव्हा वैद्यराजांच्या सेवेचा मी संपूर्ण उपयोग मिळवू शकलो. (दिनांक १८ फेब्रुवारी १९४४ चे पत्र संलग्न केले आहे.) दिनांक २७ जानेवारी १९४४ रोजी डॉ. दिनशा मेहता यांना बोलावण्याच्या संदर्भात लेखी आवेदन दिले. त्याच्या जवळपास महिन्याभरापासूनच माझी दिवंगत पत्नी डॉ. दिनशा मेहता यांचे सहाय्य लाभावे म्हणून जेल महानिरीक्षकांना वारंवार सांगत होती. त्याचा उपयोग झाला नाही. डॉ. मेहता यांना

दिनांक ५ फेब्रुवारी १९४४ पासूनच यायला परवानगी दिली गेली. त्यानंतर नियमित चिकित्सकांनी अर्थात् डॉ. नायर व डॉ. गिल्डर यांनी कलकत्ता येथील डॉ. विधान चंद्र रॉय यांच्याशी परामर्श करायच्या निमित्ताने दिनांक ३१ जानेवारी १९४४ रोजी लिखित आवेदन पाठवले. त्यांचे लिखित आवेदन असो वा त्यानंतर केलेली तोंडी आर्जवे असोत, सरकारने सातत्याने उपेक्षाच केली आहे.

श्री बटलर यांनी असेही सांगितल्याचे कळते की श्रीमती गांधींच्या सुटकेसाठी कुठलेही आवेदन प्राप्त झाले नाही आणि भारत सरकारचा विश्वास आहे. की त्यांना आगाखान पॅलेस येथून हलवणे त्यांच्याविषयी वा त्यांच्या कुटुंबियांविषयी दयाळू व्यवहार ठरणार नाही.

त्यांनी स्वत: वा त्यांच्यावतीने मी असा काही अनुरोध केला नाही, हे तर खरेच आहे. (सत्याग्रही बंदिवान असल्यामुळे असे करणे अशोभनीय ठरले असते.) पण सरकारने श्रीमती गांधी वा माझ्या आणि त्यांच्या पुत्रांच्या समोर त्यांच्या सुटकेचा प्रस्ताव मांडणे उचित ठरले नसते का? सुटकेच्या केवळ प्रस्तावाने सुध्दा त्यांच्या मनावर मनोवैज्ञानिक दृष्ट्या खूप अनुकूल प्रभाव पडला असता. दुर्दैवाने असा कुठलाही प्रस्ताव सरकार मार्फत कधीही केला गेला नाही.

अंत्यसंस्कारांच्या प्रश्नाविषयी श्री बटलर यांनी असे बोलल्याचे सांगितले जाते -

'श्री गांधींच्या आग्रहाखातर पुण्याच्या आगाखान पॅलेसच्या प्रांगणातच दाह-संस्कार केला गेला आणि नातलग व मित्रगण तिथे उपस्थित असल्याचे मला सांगितले गेले.'

माझ्या पत्नीच्या दीर्घकालीन आजारपणाचा आणि यासंदर्भात मला सरकारकडून आलेल्या अडी-अडचणींचा मला जो अनुभव आला त्या आधारे कुठल्याही प्रकारचा राजकीय लाभ न उठवण्याचा मी संपूर्ण प्रयत्न केला आणि आताही तसा कुठलाही फायदा मी उठवू इच्छित नाही या म्हणण्याला सरकार कदाचित स्वीकार करील पण त्यांच्या स्मृतीविषयी, स्वत:विषयी आणि सत्याप्रती न्याय करायच्या दृष्टीने मी सरकारला सांगू इच्छितो की अजूनही सरकारने आपली चूक दुरुस्त करुन घ्यावी. वृत्तपत्रीय बातम्या महत्वपूर्ण तथ्यांच्या दृष्टीने चुकीच्या आहेत. यामुळे या संपूर्ण प्रसंगाची सरकारची स्वत:ची अशी काही वेगळी व्याख्या असेल तर या संपूर्ण प्रसंगाचा खरा तपशील आणि त्याचे सरकारी स्पष्टीकरण दोन्हीही मला देण्यात यावे. माझ्या तक्रारीला जर न्यायसंगत मानले जाणार असेल तर वृत्तपत्रांमधून प्रकाशित झालेले भारत सरकारच्या अमेरिका स्थित एजंटाचे जे विचित्र वक्तव्य वृत्तपत्रातून प्रकाशित झाले आहे. त्यात भारत सरकार यथोचित संशोधन करुन घेईल अशी मला आशा आहे.

वृत्तपत्रीय बातमी अशी होती की गिरिजाशंकर वाजपेयी यांनी अमेरिकन जनतेला सूचित केले होते.

"भारत सरकारने अनेकदा त्यांच्या (कस्तुरबांच्या तब्येतीचा विचार करुन त्यांच्या सुटकेचा विचार केला) पण त्या आपल्या पतीच्या सोबतच राहू इच्छित होत्या यामुळे त्यांच्या इच्छेला मान्य केले गेले. याशिवाय आगाखान पॅलेसमध्ये राहिल्यामुळे त्यांना तिथे निवास करणाऱ्या एका गणमान्य डॉक्टरांच्या देखभालीचाही लाभ मिळत आहे." [२]

भारत सरकारच्या अतिरिक्त गृहसचिवांचे गांधीजींनी आलेले पत्र

२१ मार्च १९४४

प्रेषक, अतिरिक्त सचिव, भारत सरकार, गृह विभाग, नवी दिल्ली.

"सेवेशी, श्री. मो. क. गांधी

महोदय,

२ मार्च १९४४ ला कॉमन्स सभेत एका प्रश्नाचे श्री बटलर यांनी उत्तर दिले. या संदर्भात आपण ४ मार्च १९४४ रोजी पत्र दिले. या पत्राच्या उत्तरादाखल मला हे सांगायचा निर्देश करण्यात आला आहे. की विशेष आयुर्वैज्ञानिक सहायकाला बोलावण्याकामी सरकारचा व्यवहार उचित नव्हता वा सरकारने याकामी अडथळा आणला असे जे आपणास वाटले हे जाणून भारत सरकारला दु:ख वाटले आहे. सरकारी डॉक्टरांना जर गरज भासली तर तशी अतिरिक्त आयुर्वैज्ञानिक सहायता वा सल्ल्याविषयक सोई-सुविधा पुरवायला सरकार सदैव तयार होते. भारत सरकार आणि सहकारी

डॉक्टरांनी गरज ठरवल्यावर बाहेरुन डॉक्टरांना बोलावण्यात काही विलंब लावला आहे. असे काही सरकारला वाटत नाही. अगदी सुरुवातीला २८ जानेवारी रोजी सूचित केले गेले की श्रीमती गांधींनी डॉ. दिनशा मेहता यांच्या उपचाराची मागणी केली आहे. आणि ३१ जानेवारी पूर्वी डॉ. गिल्डर यांनी काही वेगळ्याच (अन्य) डॉक्टरांच्या सल्ल्याचीही सोय उपलब्ध करुन द्यायला सरकारला सांगितले गेले नाही.

१ फेब्रुवारी रोजी मुंबई सरकारला हे स्पष्टपणे कळवण्यात आले होते की सरकारी डॉक्टरांना आवश्यक वा गरजेचे वाटेल असा प्रत्येक आयुर्वैज्ञानिक सल्ला वा सहाय्य सुलभ केले जावे. डॉ. दिनशा मेहता यांना आधी पाचारण केले गेले नाही याचे कारण असे होते की कर्नल भंडारी आणि डॉ. गिल्डर या दोघांनी आरंभी 'त्यांच्या सेवेचा काही लाभ होणार नाही' असे मत जाहीर केले होते पण या सरकारी डॉक्टरांनी आपले मत बदलताच डॉ. दिनशा मेहता यांना बोलावून घेण्यात आले. आपले २७ जानेवारीचे पत्र १ फेब्रुवारी पूर्वी भारत सरकारला मिळाले नाही. या पत्रात 'एका आयुर्वैदिक चिकित्सकाला बोलावले जावे' या आपल्या पत्नीच्या इच्छेचा उल्लेख केला होता. पण यात कुठल्या नावाचा उल्लेख केला गेला नव्हता. ९ फेब्रुवारीच्या पत्रानुसार वैद्यराज शर्मा यांच्या सेवा सुलभ करुन देण्याविषयी अनुरोध प्राप्त झाला. या अनुरोधाच्या चोवीस तासांच्या आत अनुरोध स्वीकारला गेला. वैद्यांना महालात मुक्काम न करु दिल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या अडचणींची माहिती भारत सरकारला मिळाली. हे कळताच वैद्यांना महालात थांबायची परवानगी देण्यात आली. या सर्व गोष्टींचा विचार करु जाता भारत सरकार हे मानते की आपल्या पत्नीला त्यांच्या आजारपणाच्या काळात त्यांच्या इच्छेनुसार सर्व उपचार सुलभ होऊ शकतील असे यथाशक्य सारे प्रयत्न सरकार मार्फत केले गेले आहेत.

१) सुटकेच्या संदर्भात भारत सरकारने अवलंबिलेला मार्ग सर्वात उत्तम आणि अनुकंपायुक्त मार्ग होता असे भारत सरकारचे अजूनही मत आहे. २५ जानेवारी रोजी आम्हाला सांगण्यात आले ते असे की आपले पुत्र देवदास गांधींनी आपल्या आईला विचारले की त्यांना पॅरोलवर सुटका हवी आहे. काय? या प्रश्नाच्या उत्तरादाखल त्या म्हणाल्या होत्या की त्या आपल्या पतीशिवाय महालच्या बाहेर जायला इच्छिणार नाहीत. एका खासगी संभाषणाचे विवरण असल्यामुळे सरकारने या माहितीचा कुठला उपयोग केलेला नाही पण या विवरणामुळे सरकारच्या वरील विधानाची / विचाराची पुष्टी झाली. अमेरिकेत सर गिरिजाशंकर वाजपेयी यांच्यावर जे वक्तव्य दिल्याचा अगदी चुकीचा आरोप लादण्यात आला त्याशी संबंधित चुकीचे मत झाले त्याचा निरास विधान सभेत दिल्या गेलेल्या उत्तरामुळे केला गेला आहे. ती उत्तरे आपण नि:संदेह पाहिली असतील.

२) दाहसंस्कारासाठी केल्या गेलेल्या व्यवस्थेच्या संदर्भात आमची माहिती अशी आहे. की ती आपल्या इच्छेनुसार केली गेली. याविषयी सरकारने चौकशी करता कळले की आपल्या पत्रात उल्लिखित दोन पर्यायांमध्ये कुठल्या एका पर्यायाला आपण विशेष प्राथमिकता दिली नव्हती.

३) या गोष्टींना बघू जाता श्री बटलर यांच्या संसदीय प्रश्नांचे दिले गेलेले उत्तर सारत: चुकीचे होते. असे भारत सरकार मानत नाही.

आपला परम आज्ञाधारक सेवक,

आर टॉटनम

अतिरिक्त सचिव, भारत सरकार.[३]

या पत्रानंतर गांधीजींनी भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवाला एक विस्तृत पत्र लिहिले त्यात डॉ. सुशीलाताई आणि डॉ. गिल्डर यांनी सरकारला लिहिलेल्या पत्रांचाही संदर्भ दिला आहे. हे पत्र अद्भुत आहे.

१ एप्रिल १९४४

"अतिरिक्त सचिव, नवी दिल्ली,

महोदय,

आपले २१ मार्च रोजीचे पत्र मला २७ मार्चला दिले गेले. या पत्रात हे परत सांगितले गेले आहे. की विधानसभेतील उत्तर तत्त्वत: खरे होते.

चिकित्सेसंबंधी अतिरिक्त सहायतेविषयी मला असे सांगायचे आहे. की दिवंगतेने सर्वप्रथम मागल्या डिसेंबर महिन्यात कधी तरी डॉ. अडवानी यांना (त्या काळात डॉ. भंडारी यांच्या जागी सरकारी डॉक्टर म्हणून डॉ. अडवानी कार्यरत होते.) डॉ. दिनशा मेहता यांच्या सेवा उपलब्ध करुन द्याव्यात म्हणून तोंडी विनंती केली होती. अनेकदा विनंती करुनही तोंडी विनवणीचा काही लाभ झाला नाही वा खूपच थोडा लाभ झाला तेव्हा मला २७ जानेवारी १९४४ रोजी भारत सरकारला स्मरण करुन देण्यासाठी एक लिखित अनुरोध-पत्र (२७ जानेवारी १९४४ चे पत्र) द्यावे लागले. ३१ जानेवारी १९४४ रोजी मुंबई सरकारला स्मरण करुन देण्यासाठी मी एक पत्र पाठवले. डॉ. नायर व डॉ. गिल्डर यांनीसुध्दा जेल-महानिरीक्षकांच्या नावे याच विषयी एक पत्र पाठवले. ते पुढीलप्रमाणे होते."

"प्रिय कर्नल भंडारी,

श्रीमती गांधी हळू-हळू थकत चालल्या असल्याचे आपणास ज्ञात आहेच. काल रात्री त्यांना खूप कमी वेळ झोप आली आणि आज सकाळी त्या अत्यंत गंभीरपणे बेशुध्द होऊन गेल्या होत्या. त्यांचा श्वास खूप मंद चालला होता. (श्वासोच्छवास ४८) नाडीची गती क्षीण पडली होती. ही गती प्रति मिनिटाला १०० झाली होती. त्यांची त्वचा धूसर निळसर पडत होती. जवळपास वीस मिनिटांच्या उपचारानंतर त्या या अवस्थेतून बाहेर पडल्या. दुपारी त्या बेचैन आहेत., डावीकडे छाती व पाठीत वेदनेविषयी तक्रार करत होत्या. त्या निळसर होत चालल्या आहेत. त्यांना श्वास घ्यायला त्रास होत आहे. नाडीची गती १०८ असून रक्तदाब ९०/५० आणि श्वासोच्छवास ४० आहे.

अशा अवस्थेत आम्ही डॉ. जीवराज मेहता (येरवडा केंद्रीय तुरुंग) आणि डॉ. विधानचंद्र रॉय (कलकत्ता) यांच्या सल्ल्याचे सहाय्य चाहतो. श्रीमती गांधी जेव्हा पहिल्यांदा आजारी पडल्या होत्या तेव्हा हे दोघे महानुभाव त्यांना बघायला इथे आले होते. श्रीमती गांधींना त्यांच्यावर मोठा भरोसा आहे. या पत्रात आणखी एवढे निवेदन करुन देऊ इच्छित आहे. की रुग्णाची अवस्था खूप नाजूक आहे. त्यांना या डॉक्टरांची मदत जर कुठल्या प्रकारे उपयुक्त ठरणार असेल तर ती सुलभ करुन देण्यात किंचितही विलंब होऊ द्यायला नको.

त्यांची देखभाल रात्रंदिवस करावी लागत असल्यामुळे त्यांची सुश्रूषा करणे खूप जिकरीचे काम आहे. हेही इथे नमूद करावेसे वाटते. याशिवाय स्वत: रुग्णच कनु गांधी आणि डॉ. दिनशा मेहता यांना बोलवायला पुन्हा पुन्हा सांगत आहे."

हृदयपूर्वक आपले,

डॉ. सुशीला नायर, डॉ. एम्. डी. डी. गिल्डर.

ता. क. - आज सकाळी गांधींचा रक्तदाब २०६/११० होता. (डॉ. सुशीला आणि डॉ. एम्. डी. गिल्डर यांनी दिनांक ३१ जानेवारी १९४४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ७७. परिशिष्ट क्रमांक ९ पृष्ठ ४९३)

हे पत्र उध्दृत करुन गांधीजी पुढे लिहितात-

"मी परत ३ फेब्रुवारी १९४४ रोजी भारत सरकारला एक पत्र पाठवले. याचे उत्तर मला प्राप्त झाले. या पत्रामुळे ५ फेब्रुवारी रोजी म्हणजे पहिल्या पत्राच्या अनुरोधाच्या तारखेनंतर सहा आठवड्यांहूनही अधिक काळ लोटल्यावर डॉ. दिनशा यांना बोलावण्यात आले आणि अनुमती दिल्यावरही त्यांनी किती वेळा यावे आणि उपचारासाठी किती वेळ थांबावे यावर प्रतिबंध लादले गेले. काही अडचणीनंतरच ही बंधने काहीशी शिथिल करण्यात आलीत आणि नंतर हटवली गेलीत.

आपल्या पत्रात डॉ. गिल्डर यांच्या विषयीचा जो उल्लेख आहे तो मी त्यांना दाखवून दिला आहे. याच्या उत्तरादाखल त्यांनी सरकारच्या नावे लिहिलेले एक पत्र मला दिले आहे ते पत्र मी आपणास पाठवत आहे. पत्र पुढीलप्रमाणे आहे -

"अतिरिक्त सचिव,

भारत सरकार (गृह-विभाग), नवी दिल्ली

महोदय,

आपण महात्मा गांधींना २१ मार्च रोजी पाठवलेल्या पत्रात पुढील मुद्दा मांडला आहे. सर्वात आधी २८ जानेवारीला त्यांना (भारत सरकारला) श्रीमती गांधींनी

डॉ. दिनशा मेहता यांच्या उपचाराची मागणी केली आहे. हे सूचित केले गेले आहे. .. . .डॉ. दिनशा मेहता आधी न बोलावले जायचे कारण हे होते की कर्नल भंडारी व डॉ. गिल्डर दोघांनी सुरुवातीला हे मत प्रदर्शित केले होते की त्यांच्या सेवेचा काही फार उपयोग होणार नाही पण सरकारी डॉक्टरांनी आपले मत बदलताच डॉ. मेहता यांना बोलावून घेण्यात आले.

कर्नल भंडारी यांच्या नावाशी माझे नाव जोडले जाणे खचितच एक चूक आहे. श्रीमती गांधी यांच्या सेवेत सरकारी डॉक्टर भंडारी आणि डॉ. शहा होते. माझा जेथवर संबंध येतो ती घटना पुढीलप्रमाणे आहे. - मागील वर्षी डिसेंबरातल्या कुठल्याशा सायंकाळी श्रीमती कस्तुरबा गांधींना बघायला कर्नल अडवानी आले (अडवानी त्या काळात कर्नल भंडारींच्या जागी कार्यरत होते) तेव्हा श्रीमती गांधी यांनी त्यांना डॉ. दिनशा मेहता यांना यायला सांगितले होते. यावर कर्नल अडवानी यांनी मला विचारले होते की डॉ. दिनशा मेहता यांचे येणे योग्य ठरेल काय? याविषयावर मी माझ्या सहकारी डॉ. सुशीला, श्रीमती गांधी वा गांधीजींशी काही बोलणी केली नव्हती म्हणून नंतर उत्तर देईन असे कर्नल अडवानी यांना सांगितले होते. पुढच्या दिवशी सकाळी परत जेव्हा श्रीमती गांधी यांना बघायला आलेत तेव्हा मी डॉ. दिनशा मेहता यांच्या उपस्थितीने खूप मदत मिळेल हा माझा सुयोग्य सल्ला मी दिला होता.

संपूर्ण जानेवारी महिना उलटून गेल्यावरही डॉ. दिनशा मेहता यांना जेव्हा अनुमती मिळाली नाही त्यावेळी डॉ. सुशीला व मी आम्ही दोघांनी ३१ जानेवारी १९४४ च्या पत्राद्वारे विनम्र शब्दात सरकारला याचे स्मरण करुन दिले. पत्राची नक्कल सोबत संलग्न आहे.

या पत्रातून आम्ही डॉ. विधानचंद्र रॉय यांच्या सल्ल्याचीही मागणी केली होती. हेही मला सांगायला हवे पण या मागणीचा आणि तोंडी आठवण करुन द्यायचाही काहीही उपयोग झाला नाही, या मागणीकडे लक्ष दिले गेले नाही.

आपण मला अजून एका चुकीकडे आपले लक्ष वेधून घ्यायची अनुमती द्यावी. ती चूक म्हणजे प्रशिक्षित नर्सेस्ची नियुक्ती. कुठलीही प्रशिक्षित नर्स कँपच्या आत कधीही आली नाही. श्रीमती जयप्रकाश नारायण आणि श्री कनू गांधी यांच्या आगमनापूर्वी सेवा-सुश्रूषा करणे जेव्हा अवघड जात होते तेव्हा आम्हाला एका महिलेची सेवा सुलभ करवून दिली गेली होती. तिने मानसिक रुग्णांच्या इस्पितळात आया म्हणून काम केले होते. एका आठवडाभरात ती सेवा कार्याला कंटाळली आणि तिने अधीक्षकांना रजा देऊन टाकायला सांगितले.”

आपला

डॉ. एम्. डी. डी. गिल्डर

(भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवांना नजरबंदी कँपातून दिनांक ३१ मार्च १९४४ रोजी डॉ. गिल्डर यांनी पाठवलेले पत्र, संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ परिशिष्ट क्रमांक १२ पृष्ठ क्रमांक ४९९ आणि ‘गांधीजीज कॉरस्पाँडस विथ द गवर्नमेंट’ २४०-२४१)

गांधीजी पुढे लिहितात -

“या पत्रातून प्रकट होत आहे. की डॉ. गिल्डर यांच्या कपाळी आपल्यामार्फत लादली गेलेली इच्छा त्यांनी कदापि जाहीर केली नव्हती आणि एवढे करुनही डॉ. दिनशा यांच्या सेवा उपलब्ध करुन द्यायला सहा आठवड्यांहूनही अधिक काळाचा विलंब केला गेला हे दु:खद तथ्य तर आपल्या स्थानी यथावत् कायमच टिकून आहे. व राहील.

मागील डिसेंबरच्या आरंभी माझा मुलगा (देवदास गांधी) परत इथे आला होता आणि त्यानेच सर्वप्रथम स्पष्ट शब्दात आणि विधिवत जेल महानिरीक्षक यांच्या समोर प्रस्ताव मांडला होता की कुणा गैर-एलोपॅथिक चिकित्सकांना बोलावले जावे. कर्नल भंडारी यांनी माझ्या पुत्राने केलेल्या अनुरोधाविषयी मला सांगितले असता ‘जर माझ्या मुलाचा-देवदासचा-असा सल्ला असेल तर सरकारने कुणा गैर-एलोपॅथिक चिकित्सकाच्या उपाययोजनेविषयी अनुमती देऊन टाकायला हवी असे मी सांगितले होते. माझ्या पुत्राच्या अनुरोधाचा प्रश्न विचाराधीन असतानाच रुग्णाची अवस्था बिघडायला लागली आणि त्या स्वत: आयुर्वेदिक चिकित्सकाला बोलवायचा आग्रह करु लागल्या. त्यांनी अनेकदा जेल महानिरीक्षक आणि कर्नल शाह यांच्याशी बोलणी केली पण काहीही उपयोग झाला नाही. तेव्हा हताश होऊन मी दिनांक २७ जानेवारी १९४४ रोजी भारत सरकारला

पत्र लिहिले. दिनांक ३१ जानेवारी रोजी या कँपच्या अधीक्षकांनी सरकार मार्फत अन्य विषयांच्या सोबत-सोबत हेही विचारुन घेतले होते की दिवंगतेच्या मनात कुण्या विशिष्ट वैद्यांचा विचार होता की काय? माझा मौनवार असल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर मी लिहून दिले होते. या चर्चेनंतरही कुठलीही मदत मिळाली नाही. विलंबाला अवकाश होत होता. रुग्णाची अवस्था बिकट होती यामुळे मी दिनांक ३ फेब्रुवारी रोजी भारत सरकारला एक तातडीचे पत्र लिहिले. दिनांक ११ फेब्रुवारी रोजी एका स्थानिक वैद्यांना बोलावण्यात आले आणि दिनांक १२ फेब्रुवारी रोजी वैद्यराज शर्मा यांना आणण्यात आले. अशा प्रकारे गैर-एलोपॅथिक उपचारासाठी पहिल्या विनंतीनंतर त्या उपचारसोयी उपलब्ध करुन देण्याच्या काळात आठ आठवड्यांपेक्षाही अधिक काळाचे व्यवधान झाले होते.

वैद्यराज शर्मा यांच्या आगमनापूर्वी मला लिखित स्वरुपात आश्वासन मागितले गेले असता (मी ते सहर्ष दिलेही असता) मी असे लिहून दिले की वैद्यराजांच्या चिकित्सेचा जो काही परिणाम होईल त्यातून मी सरकारला पूर्णपणे मुक्त करीत आहे. (संलग्न पत्र) अशा प्रकारे काही काळापुरती रुग्णाची चिकित्सा पूर्णत: वैद्यराजांवरच अवलंबून राहिली. रुग्णाच्या उपचाराचे दायित्व जर कुणा एकाच चिकित्सकावर अवलंबून असेल तर त्याला रुग्णापाशी यायची आणि रुग्णाची पूर्ण देखभाल करायची जेवढी गरज असेल तेवढी पूर्ण सोय मिळायला हवी हे कुणीही व्यक्ती उचित मानेल पण त्यांना या सोयी उपलब्ध करुन देण्याकामी अपार अडचणींचा सामना करावा लागला. माझ्या दिनांक ४ मार्चच्या संलग्न पत्रात आणि मग परत दिनांक १४ फेब्रुवारीच्या संलग्न लिहिलेल्या पत्रातूनही या विषयीचा उल्लेख केला गेला आहे.

या दरम्यान माझी पत्नी अपार त्रास भोगत होती आणि तिची दशा इतक्या झपाट्याने खालावत चालली होती की उशिराच्या दरेक क्षणाच्या सोबत-सोबतच तिच्या स्वस्थ होऊ शकण्याची शक्यता क्षीण-क्षीण होत चालली होती.

माझी पत्नी आणि माझ्यासाठी वेळोवेळी निर्माण केल्या गेलेल्या अडथळ्यांची आणि अडचणींची जबाबदारी जरी सरकारच्या कुण्या विभागाची वा खुद्द सरकारी डॉक्टरांची असली तरी त्याचे अंतिम उत्तरदायित्व तर निश्चितपणे केंद्र सरकारवरच आहे.

हे मी काळजीपूर्वक ध्यांनात घेतले आहे. की डॉ. गिल्डर आणि डॉ. सुशीला यांनी डॉ. विधानचंद्र रॉय यांना सल्ल्यासाठी बोलवायची जी लेखी विनंती केली होती (आणि तोंडी तर कितीतरी वेळा आठवण करुन दिली. आपल्या विनंतीवर भर दिला) या विषयी सरकारने पूर्णपणे मौन बाळगले आणि या विनंतीला स्वीकार न करण्याचे कुठलेही कारण देण्याचासुध्दा त्रास घेतलेला नाही.

'प्रशिक्षित परिचारिका रुग्णाची सेवा करत होत्या.' हे माननीय गृह सदस्यांचे विधान सभेतील निवेदन सत्य नाही हे मी माझ्या दिनांक २० मार्च १९४४ च्या पत्रातून नमूद केले आहे. आपण आपल्या पत्रात याविषयीही कुठलाही खुलासा केलेला नाही. प्रशिक्षित पारिचारिका मुळी तिथे कधीही नव्हत्या, हे सत्य आहे. या ठिकाणी मी हेही सांगायला हवे की दिवंगतेने ज्या सेवकांची इच्छा केली होती त्यांनाही विशेषत: श्री कनू गांधीनाही खूप विलंबानंतरच यायला परवानगी मिळाली होती.

मी स्पष्टपणे मांडलेल्या तथ्यांना आणि संबंधित पत्र-व्यवहाराच्या संलग्न केलेल्या प्रतींना शांतचित्ताने वाचल्यावर सरकारने दिवंगतेला रुग्णावस्थेत माझ्या इच्छेनुसार तमाम उपचार सुलभ करुन देण्याचे 'हरसंभव उपाय' केलेत हा भारत सरकारचा दावा अयोग्य आहे. अशी मी आशा करतो. श्री बटलर यांचा दावा तर आणखीही अनौचित्यपूर्ण आहे. कारण की त्यांनी तर या वक्तव्याच्याही पुढे जाऊन असे म्हटले आहे. की "त्यांना (कस्तुरबांना) केवळ त्यांच्या नियमित परिचारीकांद्वारेच नव्हे पण 'त्यांच्या परिवार जनातीलही ज्यांची इच्छा प्रकट केली गेली' त्या सर्व लोकांच्या माध्यमातून शक्य ती सारी सुश्रूषा करण्याची आणि देखभालीची सारी सोय उपलब्ध करुन दिली गेली होती.' मुंबई सरकारने निश्चय केला आहे. की जोवर स्वत: सरकारी डॉक्टर चिकित्सेसाठी बाहेरच्या डॉक्टरांना पाचारण करणे अत्यावश्यक समजत नाही तोवर त्यांना बोलावण्याची अनुमती दिली जाऊ नये. हे म्हणणे मुंबई सरकारच्या उपरोक्त दाव्याचे खंडन करणारे विधान नाही काय?

सुटकेच्या प्रश्नावर आणि माझ्या पुत्राच्या माझ्या पत्नीशी झालेल्या 'खासगी संभाषणाचा' जो अहवाल सरकारला प्राप्त झाला त्याविषयी तर मी एवढेच सांगेन की कुणीही बंदिवान कुठल्याही बाहेरच्या व्यक्तिशी 'खासगी' बातचीत तर करुच शकत नाही. यामुळे माझे तर सरकारला पूर्ण अनुमोदन आहे. की सरकारने माझ्या पुत्राची या खासगी संभाषणाबाबत सखोल चौकशी करावी (आणि अशा प्रश्नात अशी चौकशी करणे सामान्य आणि अनिवार्य आहे.) त्या खासगी संभाषणाचा अवश्य वापर करावा. यासंबंधी जे काही असेल ते असो पण सरकारने जर सुटकेचा प्रस्ताव मांडला असता आणि माझ्या पत्नीसाठी 'सर्वात उत्तम आणि मानवतायुक्त' उपाय काय आहे. हे ठरवण्याचा भार जर माझ्याच खांद्यांवर टाकला असता तर सरकारवर याविषयीचा कुठलाही दोष लागला नसता.

अग्नी संस्कारच्या व्यवस्थेच्या संदर्भात माझी वास्तविक विनंती जेल-महानिरीक्षकांनी मी बोलत असतानाच टिपून घेतली होती याशिवाय माझ्या सरकारच्या नावे लिहिलेल्या ४ मार्चच्या पत्रात ती उद्धृत केलेलीही आहे. या पत्रातील संपूर्ण मजकूर स्वयमेव स्पष्ट आहे. यामुळे 'चौकशी' केली असता सरकारला ही 'सूचना मिळाली' की माझ्या पत्रात उल्लिखित 'प्रथम दोन पर्यायांपैकी कुठल्या एका पर्यायासाठी' माझा 'विशेष आग्रह नव्हता.' हे वाचून मला आश्चर्य वाटत आहे. सरकारला दिली गेलेली सूचना अजिबात चुकीची आहे. सरकारने जर माझ्या पत्नीसाठी उपयुक्त आणि माणूसकीला शोभेल असा निर्णय घेण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्याच खांद्यांवर टाकून दिली असती तर कधीही पवित्र स्मशान भूमीऐवजी कुण्या तुरुंगाच्या प्रांगणात (आणि हा कँप आज तुरुंगच तर आहे.) कुण्या प्रिय व्यक्तीचा अग्नीसंस्कार व्हावा या पर्यायासाठी माझे मन कदापि राजी झाले असते. असे करण्याचा विचारसुध्दा कुणी करु शकत नाही.

अशा वैयक्तिक विषयांच्या संदर्भात सरकारला लिहिणे मला कधी ना सुखद वाटले ना सहज पण जी बासष्ठ वर्षे माझी निष्ठावान संगिनी होती तिच्या पुण्य स्मरणाच्या संदर्भात हे पत्र लिहित आहे. मी तर आता हा निर्णय सरकारवरच सोपवत आहे. जे बंदिवान श्रीमती गांधी यांच्यासारखे चांगल्या स्थितीत नाहीत त्या बंदीजनांवर काय गुदरत असेल?

आपला,

मो. क. गांधी [४]

गांधीजींनी भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवाना लिहिले होते.

२० मार्च १९४४

"अतिरिक्त सचिव, भारत सरकार (गृह विभाग), नवी दिल्ली

महोदय,

माझ्या दिवंगत पत्नीला ज्या वैद्यकीय आणि अन्य प्रकारच्या सोई-सुविधा उपलब्ध केल्या गेल्या होत्या त्याविषयी केंद्रीय विधान सभेत सरकारमार्फत दिल्या गेलेल्या उत्तराला मी दु:खपूर्वक वाचले आहे. .. .. .. .. 'त्यांना प्रशिक्षित परिचारिका दिल्या गेल्या होत्या' असे निवेदन करण्यात आले आहे., खरे तर त्यांच्यासाठी ना कुठल्याही प्रकारच्या प्रशिक्षित परिचारिकेची शिफारस केली गेली ना प्रत्यक्षात कुणाला पाठवले गेले .. .. .. अधिकतर सुविधा द्यायला नकार देण्यात आला होता आणि दिल्या गेलेल्या सुविधा खूप उशिरा आणि अनिच्छेने दिल्या गेल्या होत्या.[५]

गांधीजींनी परत भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवांना लिहिलेले पत्र

१३ एप्रिल १९४४

"अतिरिक्त सचिव, भारत सरकार, नवी दिल्ली

महोदय,

आपले दिनांक ३० मार्चचे पत्र मला दिनांक ६ एप्रिल रोजी प्राप्त झाले होते. या संपूर्ण परिस्थितीविषयी भारत सरकारला किती चुकीची सूचना दिली गेली होती याचे हे पत्र विशेष प्रमाण आहे.

'प्रशिक्षित परिचारिका' यांच्या संदर्भातल्या सरकारच्या पुढील वक्तव्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. सरकारी वक्तव्य असे आहे. 'काही काळासाठी

त्यांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या गेल्या होत्या.' खरे तर प्रशिक्षित परिचारिका माझ्या पत्नीला उपलब्ध करुन दिल्या गेल्या होत्या की नाही या प्रश्नाशी माझ्या पत्नीचा काही संबंध नाही कारण त्यांना प्रशिक्षित परिचारिकांच्या ऐवजी आया अधिक आवडायची. यामुळे ही चूक सार्वजनिकपणे स्वीकार केली जाण्याची गरज आहे. असे मला स्पष्टपणे वाटते.

माझ्या दिनांक १ एप्रिल १९४४ च्या पत्रात उल्लिखित अन्य विषयांच्या संदर्भात मला समाधानकारक उत्तर मिळेल अशी मी आशा करतो.

आपला

मो. क. गांधी[६]

सरकारने दिनांक २९ एप्रिल रोजी गांधीजींना पुढील उत्तर दिले होते

२९ एप्रिल १९४४

"भारत सरकारने आपल्या दिनांक २ आणि दिनांक १३ एप्रिलच्या पत्रांना खेदाने वाचले आहे. आपण ज्या तक्रारी केल्या आहेत. त्यांची पुष्टी कुठल्याही स्वतंत्र चौकशीने होऊ शकणार नाही असा सरकारचा विश्वास आहे. सरकारला जे अनुरोध केले गेलेत त्यांच्या पूर्तीसाठी सरकारने हरसंभव योग्य ते उपाय केलेत हे आपण अशा शोक-संतप्त अवस्थेत स्वीकार कराल अशी आशा आपल्याकडून केली जाऊ शकत नाही असे सरकारला वाटते. यामुळे या पत्र-व्यवहाराला पुढे जारी ठेवण्यात काही लाभ होणार नाही."[७]

गांधीजींनी मुंबई सरकारच्या गृह सचिवांना लिहिलले पत्र

६ मे १९४४

"सचिव, मुंबई सरकार (गृह विभाग). मुंबई

महोदय,

जेल महानिरीक्षकांनी मला सांगितले आहे. की आज सकाळी ८ वाजता या कँपातले सर्व नजरबंद्यांची सुटका होणार आहे. मी लिहून देऊ इच्छितो की ज्या स्थळी आधी श्री महादेव देसाई आणि नंतर कस्तुरबांचा अग्निसंस्कार करण्यात आला ते स्थळ कुंपणाने घेरले गेले आहे. अग्निसंस्कारांमुळे ती भूमी पवित्र झाली आहे. आमच्या दलातील लोक रोज तिथे दोन वेळा जाऊन त्या दिवंगत आत्म्यांना पुष्पांजली अर्पण करतात आणि प्रार्थना करतात. त्या स्थळाला सरकार आपल्या ताब्यात घेईल आणि आगाखान प्रांगणातून तिथे पोहोचायची सोय मिळवून देईल अशी मला आशा वाटते. यामुळे जी मित्र-मंडळी वा नातलग तिथे जाऊ इच्छितील ते हवे तेव्हा तिथे जाऊ शकतील. सरकारची अनुमती मिळाली तर मी त्या पुण्यस्थळाची देखभाल आणि दैनिक प्रार्थनेची व्यवस्था करु इच्छित आहे. माझ्या या अनुरोधाविषयी सरकार आवश्यक ती व्यवस्था करुन देईल अशी मी आशा करतो. माझा पत्ता असेल : सेवाग्राम द्वारा वर्धा (मध्य प्रांत)

आपला

मो. क. गांधी[८]

७ जुलै १९४४

या पत्राच्या उत्तरादाखल दिनांक ७ जुलै १९४४ रोजी सरकारने कळवले "भूमीग्रहण कायद्याच्या अंतर्गत या स्थळाला जबरदस्तीपूर्वक आपल्या ताब्यात घेणे सरकारसाठी कायदेशीरदृष्ट्या अशक्य आहे. हा प्रश्न आपण आणि आगाखान यांच्या दरम्यान सोडवला जावा, असे सरकारचे मत आहे. आपला विचार आगाखान यांच्याप्रत पाठवून दिला आहे. ते या प्रस्तावावर विचार करत आहेत., असे समजते. यासंबंधी सरकारला असे कळले आहे. की सध्या श्रीमती गांधी व महादेव देसाई यांच्या नातलगाना वा आपण निर्दिष्ट केलेल्या अन्य व्यक्तिंना महालाच्या प्रांगणातून दाह-संस्कार-स्थळापर्यंत जायला काही अडचण नाही. [९]

कस्तुरबांच्या निधनानंतर गांधीजींनी सचिव, मुंबई सरकार, गृह विभाग यांना लिहिलेले पत्र -

२२ मे १९४५

"प्रिय महोदय,

काही दिवसांपूर्वी माझी दिवंगत पत्नी आणि महादेवभाई यांच्या समाधीवर जायला मित्रांना आणि नातलगांना जाण्या-येण्याविषयी कुठल्याही प्रकारची बाधा नव्हती. सध्या एक अडचण निर्माण झाली आहे. आजवर तर सरकारशी संबंधित अधिकारीवर्ग विचारपूर्वक निर्णय घ्यायचेत यामुळे दर्शनार्थी जनाना ठराविक वेळेच्या दरम्यान श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी जाता येणे सोईचे होत होते. आता एक अफवा ऐकिवात आहे. आगाखान महालात सैन्यदळाला विश्रांतीस्तव थांबवले जाणार आहे. असे झाले तर कदाचित श्रध्दांजली अर्पण करणाऱ्यांना अजिबात अनुमती मिळणार नाही. ही शंका खोटी ठरो अशी मी तर आशा बाळगून आहे.

महाल कुणाच्याही मालकीचा असो आणि तिथे कुणीही रहात असो ज्या पवित्र भूमीवर या दोन्ही समाध्या बनलेल्या आहेत. तिथे त्या सुरक्षित रहातील आणि त्यांचा उपयोग दोन्ही परिवारातील नातलगांना व मित्रांना श्रध्दांजली अर्पित करण्यासाठीच असावा, अशी मी आशा करतो[१०]

संदर्भ

१) गांधीजींनी दिनांक २२ फेब्रुवारी १९४४ रोजी कस्तुरबांच्या निधनानंतर त्यांच्या अंतिम संस्काराविषयी सरकारला केलेले निवेदन आणि 'गांधीजीज कॉरस्पाँडन्स विथ द गवर्नमेंट' पृष्ठ २३३;

२) गांधीजींनी भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवाना दिनांक ४ मार्च १९४४ रोजी लिहिलेले पत्र, संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २५६ ते २५८ आणि 'हिस्ट्री ऑफ द नॅशनल काँग्रेस' बांधणी २ पृष्ठ ७७६;

३) भारत सरकारच्या अतिरिक्त गृहसचिवांचे पत्र - संदर्भ क्रमांक ३ /४३ - एम्. एस्. / भारत सरकार, गृह विभाग / नवी दिल्ली / दिनांक २१ मार्च १९४४ / गांधीजीज कॉरस्पाँड्स विथ द गवर्नमेंट पृष्ठ २३५-३७;

४) भारत सरकाच्या अतिरिक्त गृह-सचिवाला नजरबंदी कँपमधून दिनांक १ एप्रिल १९४४ रोजी लिहिले गेलेले पत्र, इंग्रजीची फोटो नक्कल (जी. एन्. ३९३६) गांधीजीज कॉरस्पाँडस विथ द गवर्नमेंट पृष्ठ २३७-२४० आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २६८ ते १७१;

५) गांधीजींनी भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवाना नजरबंदी कँपमधून दिनांक २० मार्च १९४४ रोजी लिहिलेले पत्र संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २६७ / २६८;

६) गांधीजींनी नजरबंदी कँपमधून दिनांक १३ एप्रिल १९४४ रोजी भारत सरकारच्या अतिरिक्त गृह सचिवांना लिहिलेले पत्र, 'गांधीजीज कॉरस्पाँडस विथ द गवर्नमेंट' पृष्ठ २४४-२४५ आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २७७;

७) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ तळटीप पृष्ठ २७७;

८) गांधीजींनी नजरबंदी कँपमधून सकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी दिनांक ६ मे १९४४ रोजी मुंबई सरकारच्या गृह सचिवांना लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ पृष्ठ २७९-२८० आणि इंग्रजीची फोटो नक्कल (जी. एन्. ३९३८);

९) संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७७ तळटीप पृष्ठ २८०;

१०) गांधीजींनी कस्तुरबांच्या निधनानंतर 'मोरारजी कॅसल' महाबळेश्वरहून दिनांक २२ मे १९४५ रोजी सचिव, मुंबई सरकार, गृह विभाग यांना लिहिलेले पत्र.

❖❖❖

## ८) विविध श्रध्दांजली

कस्तुरबाना श्रध्दांजली अर्पण करताना गांधीजींना आपल्या कर्तव्यनिष्ठ, न्यायप्रिय पित्याचे निधन आठवले. जन्म पावल्यावर अवघ्या दोन-चार दिवसात निधन पावलेल्या पहिल्या बालकाचे स्मरण झाले. साध्वी मातेच्या निधनाची वेदना ठसठसत होती. नातू रसिकचे मरण आठवले. अंगाखांद्यांवर खेळवलेल्या गुलाब या सुनेचे मरण आठवले. त्या मृत्युकथेचा थरार गांधीजी विसरु शकले नाहीत. अनेक नातलग, मित्र, सहकाऱ्यांचे मरण आठवले. दक्षिण आफ्रिकेतील आणि भारतातील हौतात्म्य पत्करणाऱ्या बलिपंथी वीर व वीरांगनांचे स्मरण झाले होते. १५ ऑगस्ट १९४२ रोजी 'करेंगे या मरेंगे' चा जप करत मृत्युच्या हाकेला 'ओ ' देणाऱ्या महादेवभाईंचे स्मरण होते.

२६ फेब्रुवारी १९४४. गांधीजी बांच्या समाधीवर जाऊन पोहोचले. गुलाबपुष्प वाहिले. मीराताईने त्या गुलाबपुष्पाच्या अवती-भोवती पुष्पांची आरास मांडली. बांचे स्मरण करत असताना गांधीजींनी असे सांगितले "बा माधुर्यमूर्ती होती. तिची अद्वितीय भागिदारी होती. ती बासष्ठ वर्षे चालली. कस्तुरबाची इच्छाशक्ती जबरदस्त होती. क्वचित् ती त्यांना दुराग्रही वाटायची. तिची इच्छाशक्ती प्रबळ होती. अहिंसा आणि असहकार या गोष्टीत नवऱ्याची शिक्षिका व्हायचे सामर्थ्य तिच्या ठायी होते." कस्तुरबाच्या निधनानंतर गांधीजींनी लॉर्ड वेव्हेल यांना लिहिलेल्या पत्रात असा उल्लेख मिळतो. [१]

स्वत: गांधीजींनी वाहिलेली श्रध्दांजली तर अविस्मरणीय अशी आहे. ते लिहितात.

"कस्तुरबाने जनतेच्या मनात मोठे आकर्षण निर्माण केले होते. मी त्याच्या मूळाला शोधायचा प्रयत्न करत आहे. बाचा एक जबरदस्त गुण होता. केवळ स्वेच्छेने माझ्या ठायी सामावून जाण्याचा गुण. हा काही माझ्या आग्रहाने उपजलेला गुण नव्हता. काळमानानुसार बाच्या आतच या गुणाचा विकास झाला होता. बाच्या ठायी हा गुण दडून आहे. याचा काही मला पत्ता नव्हता. माझ्या आरंभिक अनुभवानुसार बा खूप हट्टी होती. मी दबाब टाकल्यावरही ती मनाप्रमाणेच वागायची. यामुळे आमच्यात काही काळ वा दीर्घकालीन कटुताही असायची. जसजसे माझे सार्वजनिक जीवन उज्ज्वल बनत गेले तसतशी बा फुलत गेली आणि दृढ निश्चयाने माझ्यात म्हणजे माझ्या कामात सामावत गेली. जसजसा काळ पुढे सरकत गेला तसतसा माझ्या कामात-सेवाकार्यात आणि खुद्द माझ्यात अंतर उरले नाही. बा हळूहळू त्यात एकाकार होत गेली. कदाचित भारतीय भूमीला हा गुण सर्वाधिक प्रिय आहे. काहीही असो, मला तर बाच्या उपरोक्त भावनेचे हेच प्रमुख कारण वाटते."[२]

गांधीजींचे चरित्रकार श्री नारायण भाई देसाई लिहितात:

"गांधीजींच्या जीवनदृष्टीचा आधार तत्त्वज्ञान होते. बांच्या जीवनदृष्टीचा आधार श्रध्दा होती. ही श्रध्दा अटळ बनली. पुढे या श्रध्देचे रुपांतरण निष्ठेत झाले. दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी डर्बनचा त्याग केला. फिनिक्स वसवले. या पाठीमागे तत्वज्ञान होते. बा फिनिक्सला जाऊन राहिल्यात. यापाठीमागे संस्कार आणि पतिप्रेम होते. या संस्कार व प्रेमातूनच श्रध्देचा विकास झाला होता. या श्रध्देपोटीच बा सत्याग्रहात सहभागी झाल्यात. तुरुंगवास झेलला. ही श्रध्दा जन्मभर टिकली. विकसित झाली. नवऱ्याशी बांच्या मतभेदाच्या जागा जागल्याच नाहीत असे नाही. कधी नवऱ्याचे तर कधी बायकोचे म्हणणे मान्य व्हायचे. मतभेदातून समाधान जागायचे. ते दोघांना उन्नत करणारे ठरायचे. गांधीजी स्वत:ला आदर्शोन्मुख वास्तववादी म्हणवून घ्यायचे. त्यांच्या जीवनातील अनेक निर्णय आदर्शवादी असायचे. त्यांना वास्तव घाट म्हणजे आकार देणाऱ्या श्रेयाधिकारिणी बा आहेत. गांधीजी अग्रेसर व्हायचे. बांना आपल्या सोबत घेऊन चालायचे. निमंत्रण द्यायचे. बा अनेकदा लगेच मान्य करुन घेत. कधी-कधी मान्य करत नसायच्या. अतिम निर्णय घ्यायचा अधिकार बांचा आहे. असे गांधीजी मानत असत. एकदा निर्णय घेतल्यावर बा त्यावर ठाम रहात. ब्रह्मचर्याचा निर्णय दृढ करण्याकामी गांधीजींना सहा वर्षांचा काळ लागला होता. बांना हा आदर्श व्यवहारात आणणे अगदी सहज सोपे झाले होते. गांधीजींची जीवनदृष्टी होती. बांची जीवनशैली होती. या शैलीचे आधार होते भारतीय परंपरा आणि त्यावर केलेले

गांधीजींचे क्रांतिकारी संस्कार! यामुळेच बांच्या ठायी पतिभक्तिसोबत स्वातंत्र्याकांक्षी मूल्यव्यवस्था होती. बांचे संस्कार वैष्णवी परंपरेतले होते. ते परम भागवत झालेत. त्यातून अस्पृश्यतेच्या भावनांचे निर्मूलन झाले होते. स्वातंत्र्याविषयीचा आदरभाव जागला होता पण पाश्चात्य परंपरेनुसार पतिविरुध्द बंड मात्र जागलेले नव्हते. त्यागापेक्षा निजाश्रय वा स्वाश्रय, तपासोबत आत्मसन्मान आणि अपरिग्रहासोबत समर्पण त्यांच्या आश्रयाला आले होते."[३]

कस्तुरबांचे निधन झाले. अमेरिकेहून ग्लेम ई. स्नाइडर नामक भगिनीने गांधीजींना जेम्स व्हाइटकॉंब राइली (१८४९-१९१६) या कविची एक इंग्रजी कविता पाठवली होती. तिचा भाव असा होता की देहाचे पतन झाल्यावर व्यक्ती मरत नाही केवळ लांब निघून जाते.

सरोजिनीदेवींनी पुढील शब्दात श्रध्दांजली वाहिली

"भारतीय स्त्रीत्वाच्या जीवंत प्रतीकाप्रमाणे, त्या नाजूक पण शूरवीर नारीच्या आत्म्याला चिरशांती लाभो. त्या ज्या महापुरुषाला चाहत होत्या त्याची सेवा करत. अद्वितीय श्रध्दा, भक्ती आणि धैर्यपूर्वक त्यांचे अनुकरण करायच्या. यासाठी अखंडपणे सर्वस्वाची होळी करुन टाकायची भावना होती. ही बलिपंथी वाट बांनी स्वीकारली. या मार्गावर चालत असताना त्यांची पावले कदापि अडखळली नाहीत. त्यांच्या अंत:करणाने कधी कच खाल्ली नाही. त्या मृतत्वातून अमृतत्वाकडे गेल्यात. आपल्या गाथा, गीत आणि इतिहासातील वीरांगनांच्या मेळ्यात त्यांना आपल्या हक्काचे स्थान लाभले यासाठी तर आपण सर्वांनी आनंदोत्सवच साजरा करायला हवा."

कस्तुरबांचे निधन झाल्यावर गांधीजींना अनेकांकडून सांत्वनेची पत्रे आलीत. त्या पत्रांना त्यांना उत्तरे द्यावी लागली आहेत. यासोबत त्यांनाही काही लोकांना सांत्वना करणारी पत्रे पाठवावी लागली आहेत.

श्री आनंद तोताराम हिंगोरानी यांना लिहिले की ईश्वराच्या ठायी त्यांची अविचल श्रध्दा आहे. ही श्रध्दा त्यांच्या शांततेचे रहस्य आहे. ईश्वर आपल्या ठायी वसतो. तोच कर्ता-धर्ता आहे. ही भावना एकदा जर दृढ झाली तर मग दु:ख कुठले? मग दु:खाचे कारणच काय? यासोबत ते हेही जाणत होते की ईश्वर आपल्याकडून आपल्या भल्यासाठी असलेले कर्मच करवून घेतो. या ज्ञानाने प्रसन्न रहायला हवे. 'बांना ईश्वर घेऊन गेला त्यात बांचे भले झाले. माझ्याही भल्यासाठी ते होते. यामुळे बांचा वियोग माझ्यासाठी दु:खद असायला नको.'[४]

श्री आनंद हिंगोरानी यांनी विचारले होते की कस्तुरबांच्या स्मृतीप्रीत्यर्थ ते दर महिन्याला फळे व मिठाया वाटू इच्छिताहेत. यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना गांधीजी लिहितात ' पुण्यतिथी साजरी करण्याची उत्तम रीत तर अशी आहे. की सूतकताई वा आपल्या आवडत्या आश्रमीय कार्यक्रमात तल्लीन होऊन जावे. त्या कार्याशी रामनाम संलग्न करुन द्यावे. हा विनाकारण खर्च करु नये. गरजुंना काही देता येणार असेल तर तो मुद्दा वेगळा आहे.'[५]

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी श्रध्दांजली व्यक्त करताना दिनांक २२ फेब्रुवारी १९४४ रोजी म्हटले होते.

भारतीय जनतेची आईला श्रध्दांजली

"कस्तुरबा निवर्तल्या. वयाच्या ७४ व्या वर्षी पुणे येथे इंग्रजांच्या तुरुंगात त्यांचे निधन झाले. कस्तुरबांच्या निधनामुळे भारतातील अडतीस कोटी, ऐंशी लाख आणि विदेशात निवास करणारे माझे देशबांधव गहन शोक सागरात बुडून गेले आहेत. मी त्यांच्यासमवेत या शोकात सामील आहे. त्यांचे निधन दु:खद परिस्थितीत झाले पण गुलाम देशात निवास करणाऱ्या देशवासीयांसाठी यापेक्षा कुठलेही दुसरे मरण इतके सन्मानजनक आणि गौरवशाली असू शकत नाही. हिंदुस्तानची वैयक्तिक हानी झाली आहे. दीड वर्षांपूर्वी महात्मा गांधीजींना पुणे येथे बंदिवान करण्यात आले होते. त्यानंतरचे त्यांच्या सोबतचे हे दुसरे बलिदान आहे. त्यांचे मरण त्यांच्या नजरेसमोर झाले. पहिले कैदी त्यांचे आजीवन सहकारी आणि वैयक्तिक सचिव श्री महादेवभाई देसाई होते. महात्मा गांधीजींनी या तुरुंगवासाच्या दरम्यान झेललेली ही दुसरी वैयक्तिक हानी आहे.

ही महान महिला हिंदुस्तानी जनांची आई होती. त्यांच्याप्रती मी विनम्र श्रध्दांजली अर्पित करत आहे. आणि या शोकाच्या प्रसंगी मी गांधीजींविषयी आपली गहन संवेदना व्यक्त करत आहे. सद्भाग्याने मी अनेकदा श्रीमती कस्तुरबांच्या संपर्कात आलो होतो. काही शब्दांच्या माध्यमातून मी माझी श्रध्दांजली व्यक्त करत आहे. ती भारतीय स्त्रीत्वाचा आदर्श होती. बलशाली, धैर्यसंपन्न, शांत आणि आत्मनिर्भर! कस्तुरबा हिंदुस्तानातल्या लक्षावधी कन्यांसाठी एक प्रेरणास्रोत होती. त्यांच्यासोबत ती राहिली होती. स्वातंत्र्य संग्रामादरम्यान आपल्या मातृभूमीसाठी संघर्ष करताना ती त्यांना भेटली होती. दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहानंतर आपल्या पतीसोबत ती अपार कष्ट आणि नाना परीक्षांमध्ये सहभागी होती. ही कथा तीन दशके सुरुच राहिली होती. अनेकदा तुरुंगवासात तिची तब्येत बिघडली पण आपल्या वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षीही तुरुंगात जाताना तिला भयाचा यत्किंचितही स्पर्श झाला नाही. गांधीजींनी सविनय अवज्ञा चळवळ सुरु केली त्या संघर्षात कस्तुरबा पहिल्या रांगेत त्यांच्यासोबत राहिली. हिंदुस्तानच्या कन्यांसाठी एक देदिप्यमान उदाहरण बनली. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य संग्रामात तिने हिंदुस्तानी युवकांपुढे असे एक आव्हान उभे केले की आपणही आपल्या भगिनींपेक्षा मागे राहू नये!

कस्तुरबांना हुतात्म्याचे मरण लाभले आहे. चार महिन्यांपेक्षा अधिक काळापासून ती हृदयरोगाने पीडित होती. कस्तुरबा यांना वाईट तब्येतीमुळे मानवतेचा विचार करुन मुक्त करुन देण्यात यावे या हिंदुस्तानी राष्ट्राच्या अपीलाला हृदयशून्य इंग्रज शासकानी ऐकले नाही. गांधीजींचा मानसिक छळ करुन व शारीरिक त्रास देऊन ते गांधीजींच्या देह व आत्म्यावर वार करु इच्छित होते. यामुळे गांधीजी आत्मसमर्पण करतील अशी आशा ते मनाशी बाळगून होते. ते गांधीजींना यासाठी भरीस पाडू शकत होते. स्वातंत्र्य आणि न्याय-नैतिकतेचा दावा करणारे या निर्मम हत्येचे दोषी आहेत. अशा या पशुंप्रती मी तर केवळ घृणाभाव व्यक्त करतो. त्यांनी हिंदुस्तानींना ओळखलेले नाही. महात्मा गांधीजींचा वा हिंदुस्तानी राष्ट्राचा कितीही शारीरिक वा मानसिक छळ करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असो ते गांधीजींना आपल्या दृढ निर्णयापासून कदापि रंचमात्र मागे हटवू शकत नाहीत. एका आधुनिक युध्दाच्या भयावहतेपासून या देशाला वाचवण्याचे आवाहन करत महात्मा गांधीजींनी इंग्रजांना 'छोडो भारत' असे म्हटले. इंग्रजांनी या आवाहनाला उध्दटपणे आणि गैरव्यवहाराने उत्तर दिले. गांधीजींना एखाद्या सामान्य गुन्हेगाराप्रमाणे तुरुंगात डांबले. एका परतंत्र देशात तुरुंगाबाहेर येऊन जगण्यापेक्षा गांधीजींच्या महान पत्नी आणि ते स्वतःही तुरुंगात प्राणार्पण करायला सन्नध्द होते. कस्तुरबाने तुरुंगात आपल्या पतीच्या नजरेसमोर हृदयरोगाच्या यातना भोगत प्राणत्याग करावेत हे इंग्रजांनी अगदी ठरवून टाकले होते. त्यांची ही गुन्हेंगारासारखी असलेली इच्छा फळाला आली. हे मरण कुठल्याही हत्येपेक्षा कमी नाही! पण या देशात आणि विदेशात रहाणाऱ्या आपणा सर्व हिंदुस्तानी जनांसाठी कस्तुरबांचे निधन हा एक इशारा आहे. आपल्या एकेक नेत्याला अशा प्रकारे ठार करायचा दुःखद निर्णय इंग्रजांनी करुन ठेवला आहे. इंग्रज जोवर आपल्या देशात आहेत. तोवर आपल्या देशबांधवांवर त्यांचे अत्याचार-अन्याय होत रहातील. हिंदुस्तानच्या युवक-युवतींपुढे इंग्रज साम्राज्याला ध्वस्त करुन टाकणे हा कस्तुरबांच्या निधनाचा बदला घ्यायचा एकच मार्ग आहे. पूर्वी आशिया खंडात निवास करणाऱ्या हिंदुस्तानी जनांनी इंग्रज शासकांच्या विरोधात सशस्त्र युध्द सुरु करुन दिले आहे. यामुळे त्यांची विशेष जबाबदारी आहे. इथे रहाणाऱ्या तमाम भगिनींचाही या जबाबदारीत सहभाग आहे. आपण जोवर अखेरच्या इंग्रजाला सळो की पळो करुन सोडत नाही तोवर आपला सशस्त्र संघर्ष थांबणार नाही! या पावन शपथेचा आजच्या या दुःखद प्रसंगी आपण पुनश्च पुनरुच्चार करु या !!"[६]

बांच्या निधनानंतर 'द टाइम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्राचा अग्रलेख

"श्रीमती गांधी या भारताच्या महान महिलांपैकी एक होत्या. आपल्या पतीवर त्यांची दुर्दम्य निष्ठा होती. साध्या, सौम्य स्वभावाच्या कस्तुरबांना जाहीर भाषण करायचा संकोच वाटत असे. एका नेत्याची भूमिका त्यांना जमणारी नव्हती पण भारताच्या सार्वजनिक जीवनातल्या सर्वात महत्वाच्या व्यक्तीशी विवाह

करणे हे मात्र त्यांच्या प्राक्तनात होते. साठ वर्षे त्यांनी गांधींची साथ-संगत केली. एका महात्म्याची पत्नी म्हणून त्यांच्याबरोबर कारावास पत्करला. राजकीय आंदोलक, निदर्शक आणि सत्याग्रही अशा भूमिका बजावल्यात. थोर व्यक्तींच्या पत्नींनी क्वचित्च त्यांच्या इतका आदर संपादित केला असेल. भारतीय जनतेच्या स्मरणात एक अद्वितीय स्थान त्यांनी मिळवले होते. याची त्यांना जाणीव नसेल. त्या दयाळू अंत:करण असलेल्या शूर महिला होत्या. भारतातील लक्षावधी जनतेला त्या 'बा' म्हणजे माता म्हणून ठाऊक होत्या."

संदर्भ

१) Gandhi's letter to lord vevel दिनांक ९ मार्च १९४४;

२) अमारी बा: (गुजराती) वनमाला परीख, सुशीला या ग्रंथाला गांधीजींनी लिहिलेल्या प्रस्तावनेतून उध्दृत;

३) मारूं जीवन एज मारी वाणी : (गुजराती) श्री नारायणभाई देसाई खंड ४ 'स्वार्पण' पृष्ठ १५३ ते १५५;

४) गांधीजींनी आनंद तोताराम हिंगोरानी यांना दिनांक २४ ऑक्टोबर १९४४ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७८ पृष्ठ २४६;

५) गांधीजींनी श्री आनंद तोताराम हिंगोरानी यांना दिनांक १९ ऑक्टोबर १९४४ चे पत्र आणि संपूर्ण गांधी वाड्.मय खंड ७८ पृष्ठ २२७;

६) नेताजी: संपूर्ण वाड्.मय संपादक शिशिरकुमार बोस आणि सुगत बोस : अनुवादक रविनंदन सिन्हा प्रकाशन विभाग, नवी दिल्ली, खंड १२ पृष्ठ ६९ -७०

❖❖❖

## १) कस्तुरबा ग्राम स्मारक राष्ट्रीय ट्रस्ट

कस्तुरबांच्या निधनाची बातमी आली. भारतीय कोट्यवधी जनतेच्या अंत:करणात शोकाची काळी छाया पसरली. अगणित बंधू-भगिनींनी अश्रु वाहिले. कस्तुरबांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अपार कष्ट उपसले होते. कठोर तपाचरण केले होते. नाना चढ-उतार अनुभवले होते. यामुळे त्यांचे स्थान अद्वितीय ठरले. तुरुंगात झालेल्या त्यांच्या देहावसानामुळे सारा देश थरारला. त्यांच्यावर जनतेचे प्रेम होते. श्रध्दा होती. ऋण होते. ते चुकवण्यासाठी जनता बेचैन होती. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी 'कस्तुरबा ग्राम स्वराज कोष' स्थापित करायचा विचार पुढे आला. सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत केले. या ट्रस्टची स्थापना दिनांक १८ मार्च १९४४ रोजी गांधीजी येरवडा तुरुंगात असताना झाली.

या कोषासाठी एका समितीचे गठन करण्यात आले. समितीत सर्वश्री ठक्कर बाप्पा, नारणदास गांधी, देवदास गांधी, स्वामी आनंद, शांतिकुमार मोरारजी, वैकुंठराय मेहता आणि अन्य काही मान्यवर होते. पंडित मदनमोहन मालवीय यांच्या नेतृत्वात एक अपील केले गेले. या अपील पत्रावर कॉंग्रेसचे शेकडो नेते, समाजसेवक आणि अन्य मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या होत्या. या कोषासाठी पंच्याहत्तर लाख रुपयांचा निधी गोळा केला जावा. गांधीजींच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवशी दिनांक २ ऑक्टोबर १९४४ रोजी हा त्यांना सोपविण्यात यावा असे ठरले. या काळात गांधीजी तुरुंगात होते. गांधीजी अध्यक्ष आणि ठक्कर बाप्पा सचिव होते. बाप्पांनी अहोरात्र कार्य केले. गांधीजी व जवाहरलाल यांच्या सोबत शेकडो छोटे-मोठे नेते तुरुंगवासात होते. दिनांक २ ऑक्टोबर १९४४ रोजी हा निधी गांधीजींना सोपवण्यात आला. निधीच्या रकमेने एक कोटी रुपयांचा आकडा ओलांडला होता.

गांधीजींच्या इच्छेनुसार या ट्रस्टची कार्यकारिणी केवळ भगिनींचीच बनली. या रकमेचा विनियोग ग्रामीण बालक आणि भगिनींच्या उपयोगासाठी करायचे ठरले. गांधीजींनी स्पष्टपणे सांगितले की यातून कस्तुरबांच्या जीवनदृष्टीला प्राधान्य लाभावे. पुढे ते म्हणाले 'कस्तुरबांची जीवनदृष्टी म्हणजे मोहनदास करमचंद गांधी यांची जीवनदृष्टी नसून कस्तुरबांची जीवनदृष्टी होय.'

१ नोव्हेंबर १९४५ ते १९ जानेवारी १९४६ या काळात गांधीजींना कस्तुरबा ग्राम ट्रस्टच्या कामातही खूप लक्ष द्यायला लागले आहे. विशेषत: निधी कार्याशी संबंधित व्यवस्थापकीय कामांशी संबंधित प्रश्नांविषयी तर खूप लक्ष द्यावे लागले आहे. कस्तुरबांच्या पुण्यतिथीनिमित्त गांधीजींनी सूतकताई केली. गीतापारायणही केले. काही लोकांनी तासभर सूतकताई केली.

गांधीजींनी पुणे येथे कस्तुरबा ग्राम समितीच्या निमित्ताने सांगितले

येरवडा तुरुंगात असताना मी कस्तुरबा राष्ट्रीय स्मारक समितीचा अध्यक्ष झाल्याचे वृत्त वाचले. या योजनेचे प्रमुख प्रवर्तक श्री नारणदास गांधी होते. उपाध्यक्ष सर पुरुषोत्तम ठाकुरदास होते. या निधीसंकलनाच्या कामाला गती मिळत असतानाच कस्तुरबांचे निधन झाले. यातून राष्ट्रीय स्मारक स्थापन करण्याचा विचार जनतेच्या मनात आला. अशाप्रकारे या निधीची स्थापना झाली. कस्तुरबा एक साधी-सरळ महिला होती. ती ग्रामजीवनात अनुरक्त होती. ग्रामीणांच्यामध्ये राहून त्यांची सेवा करणारी होती. या कोषाचा हेतु ग्रामीण बालके आणि महिलांच्या कल्याणासाठी वापरला जावा हे उचित आहे. यात शिक्षण, आरोग्य, प्रसूती वगैरे सारे विषय येतात. याचा उपयोग शहरे, देशी वा विदेशी विद्यापीठांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाप्रती नसावा.

यासाठीचे संकलन केवळे शेठ-सावकारांकडूनच केले जाणे अपेक्षित नाही. ग्रामीण गोर-गरीबांचाही यात सहभाग असेल. माझ्याशी संबंध स्थापित करुन शेठ-सावकारांचा काहीही फायदा होणार नाही उलटपक्षी झालेच तर खरे वा काल्पनिक नुकसानच होण्याची शक्यता अधिक आहे. श्रीमंतांनी आनंदाने जनतेला त्यांचा वाटा देऊन त्यांच्याशी मिळून-मिसळून संपत्तीचा उपभोग करावा अशी कल्पना आहे. [१]

निधी गोळा करायचे कार्य पूर्ण झाले. या भांडवलदारांनी ट्रस्टच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा अशी सूचना पुढे आली. ही सूचना संकुचित वृत्तीच्या काही रचनात्मक कार्यकर्त्यांनी केली होती. त्यांच्या मनात भीती होती. भांडवलदार विश्वस्त नकोत. हे संघटनेवर प्रभुत्व गाजवतील. त्यांचा दृष्टिकोण शहरी आहे. ते मग विश्वस्तांचा हेतुच हाणून पाडतील. हा अकारण अपमान होता. अनेक विश्वस्तांनी या अपमानाचा विरोध केला. एकाने तर रागाने गांधीजींना पत्रही लिहिले. गांधीजींनी रचनात्मक कार्यकर्त्यांच्या मनातील भीतीचे वर्णन 'अशोभनीय भीती' असे म्हणून केले. मूळ ट्रस्टी संस्थेला प्रभावित करु इच्छित नव्हते. त्यांनी ना तशी मागणी केली होती ना इच्छा दर्शवली होती. गांधीजींनी इच्छा केली असती तर त्यांनी स्वेच्छेने राजीनामा दिला असता पण गांधीजींची तशी मुळीच इच्छा नव्हती.

"मला माहित आहे. की ट्रस्टच्या निधीचा विनिमय करण्याचा अधिकार मी सुचवलेल्या व्यक्तीचा असावा या विचाराला चालना देण्याची चूक मी केली आहे. हे मी कबूल केलेच पाहिजे परंतु काही हानी होण्यापूर्वीच माझी चूक माझ्या लक्षात आली. मी याचा जितका विचार करतो तितका मला या कल्पनेचा संकुचितपणा जाणवतो. आजचे ट्रस्टी म्हणजे एक उत्तम संघ आहे. आणि त्या सवांर्नी जर ट्रस्टच्या निधीच्या संचालनात रस घेतला तर आपण उत्तम परिणामाची अपेक्षा करु शकतो. पुढारलेले शहरवासी आणि भोळीभाबडी ग्रामीण जनता यांनी एकमेकांशी सहकार्य करणे हा अनुभव आगळाच."[२]

महादेवभाईंच्या बलिदानाला दोन वर्षे होत आली होती. दोन-तीन पत्र लेखकांनी एक प्रश्न उपस्थित केला. "आपण कस्तुरबा स्मारक समितीचे अध्यक्ष आहात. महादेवभाईंनी आपल्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला. प्राणांची आहुती दिली. कस्तुरबांच्या तुलनेने कमी वयात त्यांचे निधन झाले. कुठे त्यांचे कार्य आणि कुठे कस्तुरबांचे कार्य! कस्तुरबा सती होत्या हे सत्य आहे. पण हिंदुस्तानात तर अशा सती महिला भरपूर होऊन गेल्यात. महादेवभाई मात्र एकमेव होते, हे तर सर्वांनाच मान्य करावे लागेल. ते जर आपल्या हाती लागले नसते तर आज हयात असते. इतर विद्वान ज्याप्रमाणे आपल्या प्रतिभेच्या बळावर प्रतिष्ठा प्राप्त करु शकतात, धनसंग्रह करु शकतात, आपल्या कुटुंबाला सुखी-समृध्द करु शकतात, आपल्या संततीला उच्च शिक्षण प्रदान करु शकतात तसे करुन विद्वत् वर्गात अग्रेसर ठरले असते हे तर आपणही मान्य कराल पण ते बिचारे आपल्याठायी सामावून गेले. ज्याला आपण पुत्रवत मानले त्याच्यासाठी आपण काय केले? असे आपणास विचारावेसे वाटते." (दोन-तीन पत्रांच्या एकत्रीकरणातून तयार झालेली ही भाषा आहे.) गांधीजी उत्तरादाखल लिहितात -

"मला वरील उद्गार स्वाभाविक वाटतात. कस्तुरबा आणि महादेव या दोघांमधल्या अंतराला कुणीही दुर्लक्षित करु शकत नाही. एक कुठल्याही क्षणी गळून पडू शकणारे फळ आणि दुसरे अपक्व फळ. साधारणपणे बघू गेल्यास महादेवला तर अजुन पुढे जायचे होते. शंभर वर्षे जगायचे त्याचे प्रयत्न होते. कार्य करायची त्याची आशा होती. ते ज्या दिवशी चिरनिद्रेत लीन झाले त्याच्या आदल्यादिवशी मी त्यांच्याशी केलेल्या बातचीतच्या नोंदी उपलब्ध आहेत. माझ्याशिवाय दुसरा कुणीही त्या नोंदींना जाणू शकत नाही. याचा महादेवना काय उपयोग करुन घ्यायचा होता हे तर मीही सांगू शकत नाही. महादेव तर

***अजरामरवत्प्राज्ञ: विद्यामर्थं च चिंतयेत् ।***
***गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ॥***

या श्लोकाची साक्षात् मूर्ती होते. आपली जर तमाम स्वप्ने पूर्ण झाली असती तर आपण गगनविहारी बनून गेलो असतो आणि मानविहीन होऊन धरित्री रडत विष्णुजवळ जाऊन उभी राहिली असती. यामुळे आपल्या इच्छेप्रमाणे काही होत नाही व हरीच्छेनेच सारे होते. हे आपण बघतो.

महादेव जरी गगनविहारी (आदर्शवादी आणि स्वप्न द्रष्टा) होते तरी त्यांचे पाय जमिनीवरच होते. यामुळे त्यांनी जे काही केले त्याला सुशोभित केले. महादेव भक्ताना मी एवढे आश्वासन देऊ शकतो की माझ्या संसर्गाने त्यांना काही गमवावे लागले नाही. विद्वत्तेची त्यांना अभिलाषा नव्हती. त्यांना लक्ष्मी लालायित

करु शकत नव्हती. त्यांच्या अभिरुची बहुमुखी होत्या. त्यांची बुध्दी विशाल होती आणि तिच्या ठायी भक्तिला प्राधान्य होते. माझ्यानिकट येण्यापूर्वीच त्यांनी आपल्या अभिरुचीला अनुरुप अशा जनांचा सत्संग साधला होता. त्याच्या पूर्ततेसाठीच ते माझ्याजवळ आले होते, असे म्हणू शकता. त्यांच्या अभिरुचींची पूर्तता माझ्यानिकट आल्यावरही पूर्ण न होऊ शकल्यामुळे ते आपल्या यौवनकाळातच बंधू-बांधवाना रडत ठेवत निघून गेले.

महादेवसाठी मला एकच कार्य करायचे आहे. त्याच्या अधुऱ्या कामांना पूर्ण करणे आणि स्वत:ला त्याच्या भक्तीयोग्य बनवणे. स्मारकासाठी निधी संकलन करण्यापेक्षा हे अवघड कार्य आहे. हे ईश्वरी कृपेनेच संपन्न होऊ शकणारे कार्य आहे. महादेवचा बाह्य उद्देश्य स्वराज्य प्राप्ती आणि आंतरिक उद्देश्य यथाशक्य भक्तिचा साक्षात्कार करणे होता. त्यांना आपल्या विद्वत्तेच्या प्रचाराचा मोह नव्हता. हा मोह तर त्यांनी माझ्याजवळ येऊन सोडूनच दिला होता.

महादेवच्या भौतिक स्मारक उभारणीचे काम माझ्या कुवतीच्या बाहेरचे काम आहे. ते कार्य तर त्याच्या भक्त आणि मित्रांचे आहे. कस्तुरबा स्मारकाच्या आरंभाचे काम मी केलेले नाही. त्याचा उद्भव कसा झाला हे मी माझ्या आधीच्या पुण्याच्या दिनांक १ जुलै १९४४ रोजी दिलेल्या भाषणात समजाऊन सांगितले आहे. या समितीचा अध्यक्ष मी केवळ या धनाचा सदुपयोग करवून घेण्यासाठी आहे. तसे कुणी जर महादेव स्मारक निधी एकत्रित करण्यासाठी एखादी समिती गठित करुन धनाच्या सदुपयोगासाठी मला अध्यक्ष बनवत असतील तर मी तयार आहे. हा तर माझा पन्नास वर्षाचा धंदाच आहे. .... निधी संकलन एक चांगले व आवश्यक कार्य आहे. पण महादेवच्या रचनात्मक कार्याचे प्रामाणिकपणे अनुकरण करणे अधिक चांगले कार्य आहे. स्मारकनिधीसाठी धनसंकलन करण्याच्या कार्याला महादेवभाईंच्या कार्याचा पर्याय मानला जायला नको.”[३]

‘दोन शब्द साहित्यिकांसाठी-ते जाणत असतील वा त्यांनी जाणून घ्यायला हवे की महादेव साहित्यापेक्षा अधिक महत्व चरख्याला देत होते.’[४]

गांधीजी कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या बैठकीत सेवाग्राम येथे म्हणाले:

“मी तुरुंगात होतो. आजारपणामुळे ६ मे १९४४ रोजी माझी सुटका झाली. मी मार्गदर्शनासाठी अध्यक्ष झालो. शहरांपासून लांबवर असलेल्या खेड्या-पाड्यात वसणाऱ्या महिला आणि बालकांच्या आरोग्य, कल्याण आणि शिक्षणासाठी हा निधी खर्ची पडावा. .. . . .. . .. महिला विशेषत्वाने वृध्द महिला जर या कामात पुढे आल्यात तर दिवंगतेच्या आत्म्याला शांतता लाभेल.”[५]

गांधीजींनी कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या एका बैठकीत सेवाग्राम येथे सांगितले -

“हा निधी एका तथाकथित अशिक्षित पण सरळ अंत:करणाच्या महिलेच्या नावावर संकलित केला गेला आहे. माझे तर टीकाकारही आहेत. पण बांचे नव्हेत. यामुळे त्यांच्या नावाने केले जाणारे कार्य शंभर टक्के प्रामाणिकपणे व्हायला हवे.

“निधीचा विनियोग तीन कारणांसाठी व्हावा. एक म्हणजे ग्रामीण महिला व बालकांची चिकित्सा यात स्वच्छता कार्य मोलाचे आहे. दोन म्हणजे नई तालीम आणि तीन म्हणजे खादी व ग्रामोद्योगांवर भर.[६]

एका बैठकीत गांधीजींनी गुजराती भाषेतून दिलेल्या भाषणात सांगितले -

“या कोषाला आकार देण्याचे कार्य सुरु असतानाच कस्तुरबांचे निधन झाले-कस्तुरबा एक सरळ महिला होत्या. त्या ग्रामजीवनात अनुरक्त होत्या. ग्रामीण जनांमध्ये रहायच्या - त्यांची सेवा करायच्या. या कोषाचा उद्देश्य ग्रामीण महिला आणि बाल-कल्याण असल्याचे योग्यच आहे. विश्वस्त आणि दात्यांनी असंख्य ग्रामीण महिला आणि बाल-कल्याणाविषयीची माझी भूमिका जाणून घेणे चांगले ठरावे. माझ्या कल्पनेतील कल्याण कार्यात ग्रामीण महिला आणि बालकांच्या समग्र जीवनाचा समावेश आहे. यामुळे यात प्रसव वगैरे, स्वास्थ्य, स्वच्छता, रोग-निर्मूलन, शिक्षण या सर्वांचा अंतर्भाव होतो. शिक्षण म्हणजे हिंदुस्तानी तालिमी संघाची बुनियादी शिक्षणव्यवस्था

- पायाभूत शिक्षणव्यवस्था. यामुळे शहर, नगर, भारत वा विदेशातल्या विद्यापीठांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणासाठी या कोषात स्थान नाही." [७]

गांधीजींनी आपल्या भाषणात पुढे सांगितले

"हा कोष केवळ श्रीमंत लोकांकडूनच गोळा करायचा आहे. यात सामान्य जनतेला काही सहकार्य करायची गरज नाही असे मी म्हटल्याची एक अफवा पसरवली गेली आहे. असे सांगणे हा तर सत्याचा उपहास होईल. ग्रामीण भागात फिरुन पैसा गोळा करण्याची व्यवस्था करणारी मंडळी तर तुरुंगात आहे. मी स्वत: अक्षम आहे. यामुळे श्रीमंत मित्रांनी या कामी भरपूर सहाय्य करावे, अशी मी आशा करतो. काँग्रेसी वा इतर कार्यकत्यांर्नी निष्क्रियपणे बसून रहावे, असा विचार करायची चूक तर मी करु शकत नाही. हे स्मारक तर एक राष्ट्रीय स्मारक असेल यासाठी कुठल्याही पक्षाचा का असेना प्रत्येक व्यक्तीकडून भरपूर प्रयत्न व्हावेत अशी आशा केली जात आहे. वर्गणी केवळ भांडवलदारांकडूनच घ्यावी अशी मर्यादा घातली तर हे स्मारक खरे स्मारक ठरणार नाही."[८]

"खरे तर मी या गोष्टीला एक शुभ लक्षण मानतो की सरकारने ज्या व्यक्तीला नजरबंदीची शिक्षा दिली आहे. त्याच्या दिवंगत पत्नीच्या स्मारकासाठी योगदान देण्याच्या निमित्ताने भारतातून एवढे सारे लक्षाधीश आणि कोट्यधीश लोक सहभागी झाले आहेत. आणि या योगदानामुळे संभवू शकणाऱ्या कुठल्याही खऱ्या वा काल्पनिक हानीच्या भयाने न डगमगता त्यांनी या कार्यापासून स्वत:ला लांब राखले नाही. अध्यक्ष म्हणून ही माझ्यासाठी खूप समाधानाची बाब आहे."[९]

गांधींनी आपल्या भाषणात पुढे हेही सांगितले

'या स्मारकासंबंधी प्रवृत्तीचा सूत्रपात काँग्रेस वा कुठल्याही काँग्रेसीने केला नसून काँग्रेसेतरांनी - गैर - काँग्रेसी जनांनी केला आहे. यात शुध्द लोकोपकारी हेतुची प्रेरणा आहे.'[१०]

कस्तुरबा स्मारकाच्या बैठकीत गांधीजी म्हणाले

"धन महिला कार्यकर्त्याच्याद्वारे खर्च केला जावा अशी माझी इच्छा आहे. योग्य महिला कार्यकर्त्या अपेक्षित संख्येने पुढे येत नाहीत ही दु:खाची बाब आहे. याचा दोष पुरुषांना लागतो. त्यांनी महिलांना घरगुती कामकाजात अडकवून राखले आहे. त्यांनी महिलांना पुढे कार्यासाठी घरातून बाहेर जायला सांगावे. हा निधी एका वृध्द, अशिक्षित आणि ग्रामीण मानसिकता बाळगणाऱ्या महिलेच्या स्मरणार्थ गोळा केला जात आहे. जर महिला, खास करुन वृध्द महिला स्मारक निधीच्या उद्दिष्टाला पूर्ण करण्याकामी पुढे येऊन भाग घेतील तर दिवंगत आत्म्याला शांती लाभेल."[११]

या सदस्यांमधल्या काही महिला स्त्रीयांच्या अधिकारांविषयी खूप जागृत होत्या आणि कस्तुरबा स्मारकाचे संपूर्ण कार्य केवळ महिलांनीच सांभाळावे असे इच्छित होत्या. त्यांना गांधीजींनी सांगितले की कस्तुरबा स्मारकासाठी जी पुरुष मंडळी कार्य करते आहे. ती एका अशा महिलेसाठी करत आहेत. जी महिला आपल्या सहज अंगभूत वृत्तीने ग्रामीण महिला होती. मी जेव्हा ग्रामीण जीवनाला सेवेसाठी आदर्श जीवन मानून सेवाकार्य आरंभिले त्याच्या खूप आधीपासून कस्तुरबांनी त्या जीवनाविषयीची आपली पसंती प्रकट करुन दिली होती. खूप वर्षापूर्वी मी दक्षिण आफ्रिकेत कार्यरत असताना मी जेव्हा शहरांमध्ये कार्य करत होतो त्याकाळी कस्तुरबांचे मन फिनिक्समध्येच रमलेले होते. त्यांच्या स्मृतीत आज पुरुष वर्ग कार्य करत आहे., महिला त्यांचे स्थान घ्यायला तयार होत नाहीत तेवढाच काळ ते ही सेवा करतील. आज कस्तुरबा ट्रस्टचे राष्ट्रीय सेवाकार्यात जे स्थान आहे. ते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अधिक मोठे व व्यापक होणार आहे.

गांधीजींनी दिनांक २० मार्च १९४६ किंवा त्यानंतर उरळी कांचन येथे कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या भगिनींसमोर प्रवचन दिले. अमृत कौर यांनी 'इन्स्पायरिंग फॉर वुमेन' (महिलांसाठी प्रेरणादायक) या शीर्षकाने या प्रवचनाचा तपशील दिला आहे. त्या लिहितात - 'कस्तुरबा ट्रस्टद्वारा विविध प्रांतांमधून सेवाकार्य सुरु होते. तिथे कार्यरत तमाम भगिनी एजंटांच्या भेटीचे

स्थान उरळी कांचन होते. या भगिनी व्यवस्था राखतात व देखरेख करतात.'

इथे दिलेल्या प्रवचनात गांधीजी स्वच्छता व आरोग्य या प्रश्नांवर भर देत होते. उदरनिर्वाह करता येईल इतके वेतन अवश्य मिळायला हवे असे सांगत गांधीजींनी कार्याच्या स्वरुपाविषयी कार्यकर्त्यांच्या मनात आकर्षण असावे हे स्पष्ट केले. महिलांची आग्रही भूमिका होती की हे कार्य पूर्णपणे महिलांनीच करावे. याविषयी गांधीजी म्हणाले की या स्मारक ट्रस्टमध्ये काही पुरुषही कार्यरत आहेत. ते उपजतच ग्रामीण असलेल्या महिलेसाठी आपल्या सेवा अर्पित करताहेत.

उरळी गाव त्यावेळी कस्तुरबा ट्रस्टद्वारा विविध प्रांतात आपल्या कार्याची व्यवस्था आणि देखरेख करण्यासाठी एथवर नियुक्त केलेल्या सर्व महिला एजंटांना भेटायचे स्थान होते. उरळी कांचन येथे गांधीजी म्हणाले होते 'मी अशी एकमेव व्यक्ती आहे. जी या कार्यातून बाजूला होणार नाही कारण मी सदैव स्वत:ला स्त्री मानले आहे. आज कस्तुरबा ट्रस्टचे राष्ट्रीय सेवेत स्थान आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हे स्थान अधिक विशाल होईल.'[१२]

हरीजन सेवक संघाच्या सदस्यांशी झालेल्या चर्चेत एका बंधूने प्रश्न विचारला होता 'कस्तुरबा स्मारक ट्रस्ट निधीतली रक्कम हरीजन भगिनींसाठी निर्धारित करुन देणे योग्य नाही का होणार?' या प्रश्नाच्या उत्तरादाखल गांधीजी म्हणाले 'तुम्ही तर तो निधी सुयोग्य प्रकारे विनियोग होईल असा परिचय द्याल तर सर्वच रक्कम आपण देऊ शकता. यामुळे निधीचा विशिष्ट भाग त्यांच्यासाठी निर्धारित करुन देण्याची मुळी गरजच काय?'[१३]

बिहारात कस्तुरबा ट्रस्टमध्ये कार्यरत भगिनींना सांगितले की सेवा करायची भावना असेल तर भगिनींनी राजकारणात जायला नको पण तिथे कुठल्या प्रदर्शनात जर खादी विकायची असेल तर जायला हवे. आपल्या देशाला लाभकारी ठरेल अशा कार्यक्रमात जावे[१४]

गांधीजींनी एका महिला सहकाऱ्याला लिहिलेल्या पत्रातून माहिती मिळते की कस्तुरबांनी अमतुस्सलाम हिला आईचे प्रेम दिले. बांच्या निधनानंतर अमतुस्सलामने कस्तुरबांच्या नावानेच तमाम प्रवृत्ती केल्यात. राजपुरा येथे कस्तुरबा केंद्र चालवले. बंगाल येथील बोरकामता केंद्रात खूप कार्य केले. अमतुस्सलामचा जन्म पटियाला येथे १९०६ साली झाला[१५]

कस्तुरबा निरक्षर होत्या. साध्या-भोळ्या होत्या. अहिंसेचा आदर्श सिध्द करण्यात त्यांचा मोठा आधार होता. दक्षिण आफ्रिका असो वा भारत, तमाम अहिंसक संघर्षात त्या गांधींसोबत आघाडीवर होत्या. स्मारकाद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्वाला चहुबाजूने प्रतिनिधित्व मिळणे अपेक्षित होते. गांधीजींनी सूचना केली की हे स्मारक सर्वांगीण असावे. यातून भेदभावरहितता जोपासली जावी. ग्रामीण बालक व महिलांना शिक्षण मिळावे. त्यांची आर्थिक स्थिती सुधारली जावी. या सुधारण्यांसाठी झटणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देण्याची चळवळ यातून सुरु व्हावी. संस्थेच्या कार्यकारिणीवर केवळ स्त्रियाच असाव्यात. त्यांच्यामुळे हा कारभार चुकला वा अव्यवस्थित चालला तरी हरकत नाही. महिला स्वावलंबी व्हायला हव्यात. स्त्रियांना पुरुषांच्या अधिपत्यापासून वाचवावे. या स्मारक ट्रस्टतर्फे महिलांचे प्रशिक्षण व्हावे. त्या महिलांमध्ये कस्तुरबांप्रमाणेच अहिंसक भावनेचे प्राबल्य असावे. अन्य बाबतीतही या महिलांची जीवनदृष्टी कस्तुरबांसारखीच असावी.

कस्तुरबांच्या जीवनदृष्टिची व्याख्या काय? याविषयी ट्रस्टच्या एका सभेत सविस्तरपणे चर्चा झाली. गांधीजी म्हणाले:

'कस्तुरबांची जीवन दृष्टी म्हणजे मोहनदास करमचंद गांधींची जीवनदृष्टी नव्हे, कस्तुरबांच्या जीवनातून प्रकटणारी जीवनदृष्टी होय.' गांधीजींच्या या शब्दांच्या पाठीमागे अपरंपार जिव्हाळा होता. कस्तुरबांचे व्यक्तिमत्व आणि त्यांची संकल्पशक्ती महान होती. कस्तुरबांच्या क्षेत्रात गांधीजींना बहुधा त्यांचाच मार्ग स्वीकारावा लागायचा. या स्मारक ट्रस्टच्या रुपाने अहिंसेचे दालन अधिक भावपूर्ण आणि समृध्द झाले. भारतीय महिलांच्या ठायी शक्ती आहे. सुप्त रुपात. ती अहिंसक शक्ती मुक्त करणे या संस्थेचे कार्य होते.

सुचेता (कृपलानी) कस्तुरबा स्मारकासाठी काही चिह्न मागत होत्या. नंदिताने तयार केलेले दोन-चार सिंबॉल्स आले होते. गांधीजींना त्यातले काही विशेष आवडले नाही पण म्हणाले की या सर्वांपेक्षा 'जाते' ठेवा कारण की आता तर आपण भगिनींच्या हातून 'जाते' ओढून घेतले आहे. परिणामी भगिनी आळशी बनल्यात आणि आळसामुळे शरीरे अशक्त झालीत. आपली दक्षिण आफ्रिकेतली आठवण सांगू लागले की ते दक्षिण आफ्रिकेत रोज जात्यावर दळायचे. त्यांच्यामुळे बा देवदास सारेच दळू लागत असत.

राजपुरा कस्तुरबा सेवा केंद्र ४६ एकर जमीनीत विस्तारित कार्य क्षेत्र आहे. पंजाब सरकार, केंद्रीय सरकार आणि खादी ग्रामोद्योग कमीशन व जनतेच्या सहाय्यातून या केंद्राला अन्य सहाय्य लाभते. कस्तुरबा सेवा मंदीरच्या विविध कार्यप्रवृत्ती पुढीलप्रमाणे आहेत. खादी, अंबर सरंजाम, शिक्षण व उत्पादन, ग्रामोद्योग, तेलघाणी, चर्मालय, हाताने तयार केलेला कागद, कुंभारकाम, ताडगूळ, काडेपेटी, साबण, खादी ग्रामोद्योग विद्यालय, ग्रामीण विद्यालय, सहकारी संस्था, खादी ग्रामोद्योग भंडार, शेती व गोपालन, शांती सेना. दवाखाना, लोक कल्याण विभाग वगैरे सत्तावीस हजाराहून अधिक लोकांना काम मिळाले. कस्तुरबा सेवा मंदिर, पटियाला येथे संगरुर, कपुरथला, भटिंडा आणि महेंद्रगड हे पाच जिल्हे कार्यरत आहेत.

**कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, कस्तुरबा ग्राम, इंदोर येथील ही प्रार्थना -**

*यादगार माँ कस्तूरबा की,*
*यह भारत का ट्रस्ट महान*
*यह जन-जन की श्रध्दानिधि है,*
*जलती आई ज्योति समान*
*वंदे मातरम् वंदे मातरम् वंदे मातरम् वंदे मातरम् ॥*

*आत्मज्योति जब कस्तूरबा की,*
*परम तत्त्व में समा गईं*
*सारा देश दु:खी हुआ था,*
*जन-जन की आँखें रोईं*
*बा की याद में तब जन-जन ने,*
*अपनी सब श्रध्दा संजोई*
*संजोकर के पाई-पाई,*
*सरोजिनी ने बाती बनाई*
*पीडित, दु:खित ग्राम्या बहनें,*
*और बच्चों की करे भलाई*

*इसी हेतु खूद बापू जी ने,*
*ट्रस्ट रुप यह ज्योति जलाई*
*बस सेवा का बाँधे कंकण,*
*जागृत सेविकाएँ सारी*
*गाँव-गाँव में, अभाव में भी,*
*अर्पण कर दी जिंदगी सारी*
*बा-बापू का कार्य बढाया,*
*भारत के कोने-कोने तक*
*इस ज्योति से ज्योति ले कर*
*पहुँची बहनें गाँव-गाँव तक*
*यह है ऐसी ज्योति कि केवल,*
*नारी उदय ही मंजिल है*
*नारियों की, नारी द्वारा, नारी ही के लिए जली है*
*जलती आई, जलती रहेगी, जलाई है*
*जो ज्योति महान*
*यह जन-जन की श्रध्दानिधि है,*
*जलती आई ज्योति समान, वंदे मातरम् वंदे मातरम्*
*वंदे मातरम् वंदे मातरम्* [१६]

## संदर्भ

१) गांधीजींनी पुणे येथे दिनांक १ जुलै १९४४ रोजी दिलेले भाषण, 'बाँबे क्रॉनिकल' दिनांक ३ जुलै १९४४ आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ७७ पृष्ठ ३६५ ते ३६८;

२) गांधीजींनी जे. आर. डी. टाटा यांना दिनांक ३१ मे १९४६ रोजी लिहिलेले पत्र;

३) वर्धा गंज दिनांक १० ऑगस्ट १९४४, 'गुजरात समाचार' नियतकालिक दिनांक १३ ऑगस्ट १९४४ चा अंक आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ७८ पृष्ठ २२ ते २४;

४) 'गुजरात समाचार' दिनांक १३ ऑगस्ट १९४४;

५) गांधीजींनी कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या बैठकीत सेवाग्राम येथे दिनांक २ ऑक्टोबर १९४४ रोजी दिलेले वक्तव्य संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ७८ पृष्ठ १६५;

६) गांधीजींनी कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या सेवाग्राम येथे झालेल्या बैठकीत दिनांक १५ फेब्रुवारी १९४५ रोजी दिलेले भाषण आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ७९ पृष्ठ १३८;

७) कोषाच्या एका बैठकीत दिनांक १ जुलै १९४४ रोजी पुणे येथे केलेल्या मार्गदर्शनातून उध्दृत;

८) कित्ता बैठकीतले वक्तव्य;

९) कित्ता बैठकीतले वक्तव्य;

१०) उपरोक्त बैठकीतले वक्तव्य;

११) कस्तुरबा स्मारकाच्या बैठकीत सेवाग्राम येथे दिनांक २ ऑक्टोबर १९४४ रोजी दिलेल्या भाषणातून उध्दृत;

१२) उरळी कांचन येथील कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या महिला एजंटांसमोरचे दिनांक २८ मार्च १९४६ रोजी दिलेले प्रवचन, 'हरीजन' दिनांक १४ एप्रिल व २० एप्रिल १९४६ चा अंक आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८३ पृष्ठ ३७८ -३८१;

१३) हरीजन सेवक संघाच्या सदस्यांशी दिनांक २० जुलै १९४६ रोजी पाचगणी येथे झालेली चर्चा आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८५ पृष्ठ २५;

१४) कस्तुरबा स्मारक निधीत कार्यरत महिला सहकार्यांशी पाटणा येथे दिनांक २३ मार्च १९४७ रोजी झालेली बातचीत आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८७ पृष्ठ २२;

१५) गांधीजींनी अमतुस्सलाम यांना दिनांक २५ फेब्रुवारी १९४७ रोजी लिहिलेले पत्र;

१६) कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट. कस्तुरबा ग्राम. इंदौर द्वारा प्रकाशित 'प्रार्थना एवं गीत पुस्तिका' यात प्रकाशित कस्तूरबा ट्रस्टची प्रार्थना गीत

❖❖❖

## १०) वैद्यकीय सेवा कार्य

धर्मदेव शास्त्री मसूरी नजिक नगबाद येथील अशोक आश्रमात जौनसार-जावेरच्या आदिवासी लोकांमध्ये सेवाकार्य करत होते. त्यांनी कस्तुरबांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक पाठशाळा आणि औषधालय सुरु केले होते. पुढे जुलै १९४२ साली साळसी येथे अशोक आश्रमाचे कार्य सुरु केले होते पण त्यांना अटक करण्यात आली होती. दिड वर्षानंतर त्यांची सुटका झाली. त्यांनी आश्रमात ग्रामोद्योग विकास कार्याला पुनरपि आरंभ केला होता. ते मसूरी नजिक कस्तुरबा गांधींच्या स्मृतीप्रीत्यर्थ एक पाठशाळा आणि इस्पितळ चालवत होते[१]

काही काळानंतर डॉ. सुशीलाताई कामाला लागल्या. आता कस्तुरबा आरोग्य मंडळाची रुजुवात झाली. त्या प्रशिक्षित असल्यामुळे सारे कामकाज त्यांच्या देखरेखीखाली सुरु झाले. १९४४ साली कस्तुरबांच्या निधनानंतर दवाखान्याचे काम वाढले. यामुळे याचे स्थलांतरण करायचे गांधीजींनी ठरवले. गांधीजींच्या बलिदानानंतर आचार्य विनोबाजींनी सूचना केली. सेवाग्राम आश्रमाची जमीन वगैरे संपत्ती सर्व सेवा संघात विलीन झाली. गांधी स्मारक निधीने आर्थिक सहाय्य करायला स्वीकृती दिली. पुढे या गांधी स्मारक निधीने दवाखान्याची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. डॉ. सुशीलाताईने दवाखान्याला सरकारी मान्यता मिळवून दिली.

१९४४ साली मुंबईत शांतीभाईंच्या कार्यालयाखाली रोज-रोज बसून मणीलाल गांधींच्या सहाय्याने ट्रस्टचा मसुदा तयार करण्यात आला होता. मद्रास येथील कुष्ठरुग्णांना मदत करणारे मित्र एकदा गांधीजींच्या भेटीस्तव आले होते. श्री टी. एन्. जगदीशन् आणि वेल्लोर येथील डॉ. एम्. आर्. जी. कोचरेन गांधीजींना भेटले. त्यांनी गांधीजींपुढे एक प्रस्ताव मांडला होता. कस्तुरबा ग्राम स्मारक कोषांतर्गत खेड्यांमधून बालके व महिलांसाठी काही उपाय करायची त्यांची योजना होती. तो दिवस गांधीजींचा मौनवार असल्यामुळे त्यांनी आपली संमती व्यक्त करत लिहिले " तुमचा प्रस्ताव तर जाणत्यांना मार्गदर्शन करणारा आहे. दक्षिण आफ्रिकेत जेव्हा मी होतो तेव्हापासून कुष्ठरोग्यांच्या सेवेत मला रस आहे. तुम्ही एक सविस्तर योजना मला कळवा. आम्ही काय करु शकतो? काय करावे? तेही कळवाल. यात धन्यवादाची मुळी गरजच काय?[२]

गांधीजींनी सोराब यांना पत्र लिहिले:

"चि. सोराब,

कस्तुर स्मारक ट्रस्ट निमित्त दक्षिण आफ्रिकेत निधी गोळा करण्यात आला होता. दानशूर लोक त्या निधीचा विनियोग जोहान्सबर्ग येथे प्रसूती इस्पितळाच्या स्थापनेसाठी करणार असतील तर माझी काही हरकत नाही.[३]

प्रा. टी. एन्. जगदीशन् यांच्या देखरेखीखाली १९ मे १९४६ पासून कुष्ठरुग्ण सेवाकार्य सुरु झाले आहे. याकामी गठित एका विशेष समितीचे अध्यक्ष डॉ. टी. एस्. राजन आहेत. डॉ. वी. पी. रामस्वामी यांनी डॉ. आर्. जी. कोचरन यांच्यापासून या कार्यासाठी मुख्यत्वेकरुन प्रशिक्षण घेतले आहे. हे बाह्य रुग्ण विभाग चालवण्यासोबतच खेड्या-खेड्यात जाऊन सर्वेक्षणही करतात.

कन्दचीपुरम्च्या पाठशाळेतील ६५५ विद्यार्थ्यांच्या प्राथमिक पहिल्या सर्वेक्षणातून असे कळले की काही बालक कुष्ठरोगी तर आहेत.च पण याशिवाय अनेक बालकांना त्वचा रोग (खाज) आणि पोटात कृमीही आहेत. शंभरहून अधिक बालकाना याद्दष्टीने उपचार करावा लागणार आहे. तीस ते चाळीस बालकांचा उपचार कुष्ठमुक्तिच्या दिशेने करावा लागणार आहे. मदवीलगम गावातल्या ५९३ नागरिकांपैकी १८ तर खात्रीशिररित्या कुष्ठरोगाने पीडित आहेत. अदुक्कम गावातील ३२३ नागरिकांपैकी १५ नागरिकांना कुष्ठरोग आहे. डॉ. रामस्वामी यांनी पाच गावांचे सर्वेक्षण केले आहे. ३०० पैकी १५७ रुग्ण ट्रस्टचा लाभ घेत आहेत.[४]

१९४७ साली कुष्ठरोग निवारण समितीच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना श्री ठक्कर बाप्पा म्हणाले

"कस्तुरबा स्मारक ट्रस्टचा मसुदा तयार करत असताना मी यात कुष्ठरोगी बंधू-भगिनींच्या सेवेचे कलम घातले तेव्हा कुणीतरी आश्चर्यचकित होत

विचारले होते ‘अहो हे काय? कस्तुरबा स्मारक ट्रस्ट मध्ये कुष्ठरोग्यांच्या सेवा-सुश्रूषेचा अंतर्भाव करताहात?’ मी ‘होय!’ असे म्हणालो होतो. आमच्या माता-भगिनींना व बालकांना होणाऱ्या आजारांमध्ये हाही एक आजार आहे. गांधीजींनी या रोगाचा समावेश आपल्या अकरा रचनात्मक कार्यक्रमांतर्गत केला आहे. यामुळे या मिशनद्वारे देशभरात सत्तरच्या जवळपास सेवाकेंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. त्याशिवाय आता छोट्या-छोट्या दवाखान्यांची आणि विश्रामगृहांची स्थापना मोठ्या प्रमाणावर होईल.

“कुष्ठरोगाच्या देखभालीसाठी आज दोन प्रकारच्या विचारधारा कार्यरत आहेत. एका विचारधारेनुसार कुष्ठरुग्णांच्या सेवा-सुश्रूषेसाठी पाचशे ते हजार रुग्णांना प्रवेश मिळेल अशी मोठमोठी इस्पितळे स्थापन केली गेली पाहिजेत. दुसऱ्या विचारधारेनुसार या रोगाच्या निवारणासाठी गावा-गावात छोट्या-छोट्या दवाखान्यांचे जाळे विणले जायला हवे. यासोबत या रुग्णांवर वैयक्तिक लक्षही दिले जायला हवे. याविषयी तर या रोगाचे निष्णात लोकच अंतिम निर्णय घेऊ शकतात. तरीही यानिमित्त मी हे सांगू इच्छित आहे. की कुष्ठरोग काही क्षयासारखा शहरी रोग नाही. (पुरलिया कुष्ठरुग्ण मिशनचे सचिव श्री डोनॉल्ड मिलर या सभेत हजर होते. त्यांच्या उपस्थितीमुळे) ठक्कर बाप्पा पुढे म्हणाले पुरलिया येथे कुष्ठरुग्णांची देखभाल करणारे मोठे केंद्र आहे. तिथे अदमासे एक हजार रुग्णांची देखभाल आणि औषधोपचार केला जातो. याशिवाय तिथे आणखी एक केंद्र आहे. तिथे दोन-तीनशे रुग्णांवर उपचार केला जातो. आज आपल्याला देशभर पसरलेल्या अशा छोट्या-छोट्या दवाखान्यांची गरज आहे. कुष्ठ रुग्णांची ही संख्या गैरसरकारी असावी. अर्थात् सरकार या संस्थेला मदत अवश्य करील तरीही आपल्याला कुष्ठरोगी मिशन या ब्रिटिश एंपायर लेप्रसी रिलिफ असोसिएशनप्रमाणे आपल्या संस्थेला गैरसरकारी रुपातच चालवावे लागेल. या संस्थेची खूप भरभराट होवो. जोवर या रोगाचे तोंड पूर्णपणे काळे होऊन हा आजार हद्दपार होत नाही तोवर अशा अनेक परिषदांचे आयोजन केले जावो.”[५]

कस्तुरबांच्या सेवाभावी व्यक्तिमत्वाचा प्रकाश त्यांच्या महानिर्वाणानंतरही दीप्त होत आहे. सेवा हा त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता. त्यांच्या पतीभक्तीला आणि राष्ट्रभक्तीलाही सेवेचे कवच आणि वलय होते. एका निरंतर गतिमान चक्रासारखे आयुष्य त्या जगल्यात. त्यांच्या स्मृतीचे पवित्र कुंकू भाळावर मिरवणाऱ्या या संस्थांमधून आजही सेवा, शिक्षण आणि आरोग्यविषय जागरण होताना दिसते.

संदर्भ

१) संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८३ पृष्ठ २०२;

२) हिंदू’ दिनांक १२ फेब्रुवारी १९४५ आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ७९ पृष्ठ १२६;

३) गांधीजींनी सोराबजी रु. पारसी यांना दिल्लीहून दिनांक १६ मे १९४६ रोजी लिहिलेले पत्र आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८४ पृष्ठ १५६;

४) हरीजन’ दिनांक १४ एप्रिल १९४६ आणि संपूर्ण गांधी वाङ्.मय खंड ८३ पृष्ठ ४११;

५) ठक्कर बाप्पा: कांतीलाल शहा पृष्ठ ३७५ ते ३७९.

❖❖❖

## ११) संदर्भ ग्रंथ सूची


### हिंदी

१ गाँधी की कहानी : लुई फिशर
२ बापू की कारावास कहानी (येरवडा के इक्कीस साल): सुशीला नैयर
३ बापू के पत्र: मणिबहन पटेल के नाम
४ बीबी अम्तुस्सलाम के नाम: बापू के पत्र
५ बापू के पत्र: आश्रम की बहनों को
६ बा और बापू: मुकुलभाई कलार्थी
७ बापू के पत्र: मणीबेन पटेल के नाम
८ हमारी बा वात्सल्यमूर्ति बा: सुशीला नैयर
९ हमारी बा: वनमाला परीख
१० माता कस्तुरबा: बाबुराव जोशी / रमेशचंद्र ओझा
११ गाँधी संस्मरण और विचार: संपादक मंडल
१२ अनमोल विरासत (तीन खंड): सुमित्रा कुलकर्णी
१३ संपूर्ण गाँधी वाड्.मय: (१ ते ७७ खंड)
१४ नारी शक्ति की प्रतीक: कस्तुरबा: सविता सिंह
१५ बा और बापू की शीतल छाया में: मनुबेन गांधी
१६ बापू की छाया में: बलवंत सिंह
१७ गाँधी जी की साधना: रावजीभाई मणिभाई पटेल
१८ कस्तुरबा गाँधी: महेश शर्मा
१९ बा: गिरिराज किशोर
२० पहला गिरमिटिया: गिरिराज किशोर
२१ बापू कथा: हरिभाऊ उपाध्याय
२२ गाँधी आश्रम-हरिभाऊ उपाध्याय
२३ महात्मा गाँधी :एक जीवनी बी. आर्. नंदा

### मराठी

१ सत्याचे प्रयोग: श्री मो. क. गांधी
२ दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास: श्री मो. क. गांधी
३ पुत्र मानवाचा: मृणालिनी देसाई
४ गंध कोष: शांतिलाल भंडारी
५ पूर्णाहुती (चार खंड): प्यारेलाल नैयर
६ कस्तुरबा तेजाची शलाका : अरुण गांधी
७ बापू माझी आई : मनु गांधी
८ अग्निकुंडात उमललेले गुलाब: नारायणभाई देसाई
९ आचार्य विनोबा भावे: वि.प्र. दिवाण
१० अज्ञात गांधी नारायणभाई देसाई
११ संत चरण रज सेविता: नारायणभाई देसाई
१२ गंगेमध्ये गगन वितळले: अंबरीश मिश्र
१३ गांधी विचार दर्शन खंड १६ व १९ संपादक भाऊ धर्माधिकारी
१४ आश्रम व्रते गांधी वाड्.मय प्रकाशन समिती
१५ शोध महात्मा गांधींचा: अरुण सारथी

**ENGLISH**

१ kasturba Gandhi: Aparna Basu

२ Mahatma: {Eight Volumes}: D.G. Tendulkar

३ Gandhi & his Ashrams: Mark Thomson

४ Kasturba {Memorial}

५ The Good Boatman: A Portrait Of Gandhiji: Rajmohan Gandhi

६ Gandhi: A Biography Geoffrey Ashe Coopewr

७ Tolstoy & Gandhi Martin green

८ An Indian Petriot In South Africa joseph Doke

९ The Forgotten Woman Untold Story Of Kasturba Gandhi Arun & Sunanda Gandhi

१० Gandhi & Kasturba The Story Of Their Life Ganpat Rai

११ Seven Months With Mahatma Gandhi Krishnadas

१२ Lead Kindly Light Vinsent sheean

१३ Gandhi An Illustrated Biography By Pramod Kapoor

१४ The women in Gandhis life Elinor marten

१५ Gandhis Truth Erick Erikson

१६ Gandhi the South African Expereinces Meerim Wan Published in South Africa

१७ The South African Gandhi Ed Fatima meer

**गुजराती**

१ गांधी परिवारना ज्योतिर्धरो: श्री काकासाहेब कालेलकर

२ ज्यां रहो त्यां महकता रहो (पुत्र अने पुत्र वधुओने पत्रो): नीलम परीख

३ गांधीजीनुं खोवायेलुं धन: हरिलाल गांधी: नीलम परीख

४ कस्तुर (द्वि अंकी नाटक): श्री नारायणभाई देसाई

५ कस्तुरबा वाणी अने विचार: मणीबेन पटेल

६ महात्मानुं अर्धु अंग कस्तुरबा: कांता-हरविलास ‘हरिश्चंद्र’

७ जीवननुं परोढ : श्री प्रभुदास गांधी

८ मारुं जीवन एज मारी वाणी (चार खंड): श्री नारायणभाई देसाई

९ मारो जेलनो अनुभव: श्री मो.क. गांधी

१० महादेवभाईनी डायरी

११ मनुबेननी डायरी

१२ संस्मरणो: श्री रामदास गांधी


१३ गांधीजीनी दक्षिण आफ्रिकानी लडत: (४ खंड) श्री चंदुभाई भागुभाई दलाल चौथा खंड उपलब्ध झाला

१४ बापूनी प्रसादी: श्री मथुरादास त्रिकमजी

१५ गांधीजीनी तेजरेखा: श्री बालुभाई पारेख मूळ श्री श्रीपाद जोशी

१६ बापूना आश्रममा: श्री हरिभाऊ उपाध्याय

○○○




*डर्बन येथे भारतीय मित्रांसोबत गांधीजी आणि कस्तुरबा*



*कस्तुरबा यांच्या समवेत डावीकडून भाचा गोकुळदास,*
*खाली बसलेले मणीलाल, रामदास उभा हरीलाल*



*लंडनचा निरोप घेताना महान जीवनयज्ञाच्या पूर्वसंध्येवर*




*दक्षिण आफ्रिकेतून मायदेशी मुंबई येथे पोहोचल्यावर दिनांक 9 जानेवारी 1915*



*महात्मा गांधी यांच्या सोबत कस्तुरबा गांधी*



*कस्तुरबा गांधी, १९१५*




*महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी, 1917*




*गोंडल (गुजरात ) येथे महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी*



*कस्तुरबा गांधी (मध्यभागी) मुंबईतील प्रमुख महिलांसोबत बोरसद येथे पोलिसांच्या अत्याचाराविरुद्ध निदर्शने, १९३०.*



*खादीचा तागा स्वीकार करताना, अहमदाबाद*



*रवींद्रनाथ टागोर यांच्या समवेत गांधीजी व कस्तुरबा*




*कस्तुरबा गांधी, १९४०*




*पंडित मदनमोहन मालवीय आणि सरोजिनी नायडू यांच्या समवेत*



*कस्तुरबा गांधी समवेत सरोजिनी नायडू*



*सेवाग्राम आश्रमात राजकुमारी अमृत कौरसोबत कस्तुरबा गांधी, १९४१*




*महादेव देसाई, प्यारेलाल आणि इतरांसोबत कस्तुरबा गांधी, सेवाग्राम आश्रम*



*महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी आणि नातू अरूण गांधी (मणीलाल गांधी यांचे सुपुत्र), सेवाग्राम आश्रम*




*महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, सेवाग्राम आश्रमात १९४४*



19820

તા ૨૮-૬-૩૩ બુધવાર
૪ વાગે પ્રાર્થના ગીતાજીના સંલોક
હમેસ વચાય છે. પછી નિત્ય કર્મ
સાડાપાચ વાગે બાપુજીને દુધ [illegible]
[illegible] પછી પરચુરણ કામ આવ્યા કરે
પોણુ બાર વાગે ભોજન ૧૨ વાગે બાપુજી
દુધ ફળ ખાય તેની પાછી બેસવાનુ આરામ
કી / વખતે બાર જવું હોય તો બાપુજી
જાનકી બહેન કમલા બધા આહીં છે.
કમલાને આહીં ડોકટર મહેતાની
દીનમેન ચાલે છે. રાજગોપાલ
ચાર ઘનશ્યામદાસને ત્યાં રહેવાના
છે?


हस्ताक्षर



*येरवडा कारावास, पुणे येथे कस्तुरबांनी अखेरचा श्वास घेतला*




**प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांची**
**कस्तुरबा सेवाश्रम, मरोली (गुजरात) येथील भेट**




**कस्तुरबा यांच्या अंगणात आपली नात सुभद्राच्या समवेत प्राचार्य डॉ. विश्वास पाटील**



मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.